म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २६८७

संपूर्ण चोरघडे

— बामन-चोरघडे.

REFBK-001514

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे २

सिर्फ एक

१४३६५
~~अनुक्रमांक~~
१८ वा मजला
१७-२-६७.

संपूर्ण चोरघडे १९६७

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... दिः .....
अभिप्राय ..... नोंद दिः .....

वामन चोरघडे



REFBK-0015144

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे २

प्रकाशक :
अ. ज. प्रभू
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार : पुणे २

▣

सर्व हक्क सुरक्षित

▣

प्रथमावृत्ती : १९६६

▣

मूल्य रु. २२.५०

▣

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ : पुणे २

प्रकाशकाचे पान

बारा वर्षांपूर्वीची हकीगत !

सन १९५४ मध्ये मी गोमांतकात गावाकडची हवा खात होतो. पुस्तकविक्रीचा अनुभव साठवीत असताना विकली जाणारी पुस्तके वाचण्याची इच्छा मनात बळावत होती. विकले जाणारे पुस्तक विक्रेत्याने किती वाचावे ? हा प्रश्न मतभेदाचा असला तरी मला बहुतेक पुस्तकांचे विषय स्वतःच्या वाचनाने माहीत असत.

अशा वेळी एक मनास चटका लावणारी कथा माझ्या वाचनात आली. कथेचे नाव 'सव्वापाच आणे' कथालेखक होते श्री. वामन चोरघडे. सव्वापाच आणे व वामन चोरघडे ही नांवे त्याच वेळी माझ्या मनात स्थिरावली. या कथालेखकाच्या आणखी काही कथा माझ्या वाचनात आल्या. आणि एक-प्रकारचे ममत्व मला या कथाकाराबद्दल वाटू लागले.

पुढे सन १९५७ मध्ये नागपूर येथे मी किंचित भीतभीतच श्री. वामनराव चोरघडे यांची भेट घेतली. अजूनही मी एक साधा विक्रेता किंवा पुस्तकांचा प्रचारक होतो. आणि वामनरावांची कीर्ती कितीतरी मोठी होती. वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य, निष्णात प्राध्यापक, लोकप्रिय कथाकार या नात्यांनी त्यांचे स्थान फार उंच होते. त्यांच्या भोवती याशिवाय एक आकर्षक असे शुचित्वाचे वलय होते. गांधीजी, विनोबाजी, इत्यादींशी व वर्ध्याच्या सेवाग्रामशी चोरघडे यांचे संबंध जवळचे होते.

आणि मी श्रेष्ठ कथाकार म्हणून चोरघडे यांच्याकडे आकर्षित झालो होतो. प्रथमच्याच भेटीत आमची मैत्री कायमची जुळली. खास "वैदर्भी रीती" ने त्यांनी मला आपला परिचित मानले. आणि बोलता बोलता त्यांचे एखादे पुस्तक मी प्रकाशित करावे ही कल्पना साकार झाली.

ही प्रथम नुसतीच कल्पना होती. मी अजून प्रकाशनाचा पहिला धडाही घेतलेला नव्हता. एक मोठा कथाकार आपणावर

एवढा मोठा विश्वास सहज रीतीने टाकीत आहे. या आत्मविश्वासाच्या धुंदीतच मी होतो. लवकरच 'विदर्भ मराठवाडा बुक कंपनीचा' संसार मी मांडला. उत्तमोत्तम ग्रंथांचे प्रकाशन करण्याची हौस बळावली. परंतु चोरघडे यांस पुनः भेटण्यास मात्र मुहूर्त सापडेना.

मग एक सुसंधी प्राप्त झाली. सन १९६४ मध्ये पुसद येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या रौप्यमहोत्सवी अधिवेशनाचे अध्यक्षपद वामनरावांनी विभूषित केल्याचे समजले. या निमित्ताने त्यांच्या काही कथांचा छोटा संग्रह काढण्याऐवजी सर्वच कथा एकत्र करून मोठा संग्रह प्रसिद्ध करावा म्हणून मी उद्योगास लागलो. परंतु या मोठ्या कामातील अडचणी वाढत राहिल्या. पुसदचे साहित्य संमेलन होऊन गेले आणि आज दोन वर्षांनी चोरघडे यांच्या कथांचा हा संग्रह तयार होत आहे.

थोडा उशीर झाला हे मान्य. परंतु हातात घेतलेले कार्य पुरे झाले याचा आनंद काय वर्णावा ? श्री. वामनराव चोरघडे यांच्या स्नेहशील ऋणानुबंधाचे हे सर्वांगसुंदर व गोमटे असे फळ मराठी वाचकांना अतिशय रुचकर वाटेल असा विश्वास वाटतो.

यापेक्षा प्रकाशकाने जास्त लिहू नये. दुसऱ्याने लिहिलेले छापून प्रसिद्ध करणे हे प्रकाशकाचे काम. ते किती तत्परतेने व सुबकतेने होत आहे हे रसिक व चोखंदळ वाचक ठरवतीलच.

— प्रकाशक

अपूर्ण मी

माझ्या आयुष्यातला हा एक महत्त्वाचा क्षण. माझी एक फार दिवसांची कल्पना प्रभूच्या कृपेने पूर्ण झाली. माझे मित्र आणि विदर्भ मराठवाडा बुक कंपनीचे, उत्साही, धाडशी प्रकाशक श्री. अच्युत जयवंत प्रभू यांनी ती पूर्ण केली. त्यांची माझी भेट १९६४ मध्ये नागपूरला झाली. त्यावेळी माझ्या मनात माझ्या विद्यार्थ्यांसाठी छोटासा, सुबक, उपयुक्त मराठी कोश करावा असे घोळत होते. १९४२ च्या वेळी तुरुंगात पू. विनोबांनी मला हे काम करावयाची आज्ञा केली होती. ती अजून पूर्ण झाली नाही ही खंत. या कोशासंबंधी मी अगदी सविस्तरपणे श्री. प्रभूंजवळ बोलत राहिलो. हा कोश प्रकाशित करायला ते तयार झाले; पण म्हणाले, " पूर्वी ठरल्याप्रमाणे मला तुमचा कथासंग्रह अगोदर द्या." वाणिज्य शिकविणारा मी. द्यायचे अन् घ्यायचे तेही आजच्या यंत्रयुगात मोठ्याच प्रमाणावर. " मी सांगितले की, छोटा संग्रह कशाला ? मोठाच द्या की ! माझी पन्नाशी उलटली आहे; आता आवराआवर करायची ! "

हे माझे बोलणे माझा अंतर्यामी ऐकत होता. प्रभू तयार झाले. आम्ही उभयता उठलो. पैसासुपारी नागवेलीच्या पानावर देवाजवळ ठेवली, उभयातांनी नमस्कार केला अन् प्रभूंनी माझ्या हातावर नैवेद्याचा, प्रसादाचा पेढा ठेवला. उदबत्तीचा सुवास आसमंतात भरला.

प्रस्तुत ग्रंथात मी १९३२ ते १९६० च्या कालावधीत ज्या कथा लिहिल्या त्यांचा कालानुसार समावेश आहे. या कथांचे संग्रह वेळोवेळी निघाले. सुषमा, हवन, यौवन, प्रस्थान, पाथेय, संस्कार, प्रदीप, नागवेल या संग्रहातील सर्व कथा यात आहेत. कथेसंबंधीची माझी भावना अनन्य, असीम आहे. माझ्या संग्रहांची मी जी नावे दिली त्यांतही माझ्या मनोधर्माचा मागोवा मी घेतला. त्या त्या संग्रहांच्या प्रकाशकांनी फार तबियतीने माझे संग्रह काढले. त्यांपैकी ' यौवन ' काढले माझे मित्र श्री. वसंत श्रीपाद सातवळेकरांनी, ' पाथेय, प्रदीप, ' काढले श्री. राजाभाऊ गर्गे यांनी. त्यांच्या प्रकाशन संस्था आज नाहीत. सुषमाचे श्री. हरिभाऊ मोटे, प्रस्थानचे श्री. बा. ग. ढवळे, संस्कारचे श्री. रामभाऊ देशमुख, नागवेलचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांच्या शुभेच्छा ग्रंथासोबत जोडल्या आहेत. त्यांच्या स्नेहालोकाने मी उजळला गेलो. अर्थात् त्यांच्या सदिच्छांचे पाथेय मला हवेच होते. ते मिळाले. त्यांना मी धन्यवादादि काही देत नाही. त्यांना मागणेच मागतो; आजही, की मला तुमच्याकडून अजून स्नेहच हवा आणि तो द्या. आज, उद्या, मी असेपर्यंत अन् मी नसलो तरी !

'संपूर्ण चोरघडे' ला प्रा. म. ना. अदवंतांची प्रस्तावना आहे. मराठी साहित्य मंदिरात वावरणारा हा एक खरोखरीचा भला, सभ्य माणूस. अशा माणसाला विश्वासाने काही विचारता येते, सांगता येते. त्यांचा ग्रंथाच्या एकूण आकार-प्रकारासंबंधी मी सल्ला घेतला आणि प्रस्तावनेचे ओझेही त्यांच्यावर टाकले. न गुदमरता त्यांनी ते साहिले. मित्र म्हटला की असे काही काही करणे येतेच, हे त्यांनी समजून घ्यावे.

'यौवन' संग्रहात माझे मित्र श्री. मधुकर मंग्रूळकर यांनी मजबद्दल लिहिले. हवनचा संकल्प पू. काकासाहेब कालेलकर यांनी सोडला. प्रस्थानचे वेळी श्री. प्रभाकर पाध्ये यांनी स्नेहाने निरोपाची थाप पाठीवर दिली. संस्कारची सांगता श्री. वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर यांनी केली. मराठी लघुकथेचे श्री. खांडेकर म्हणजे राजलेणे ! त्यांचा आशीर्वाद मागायला मी आजच कोल्हापूरला जात आहे. उपरोक्त संग्रहातील कथा या ग्रंथात समाविष्ट असल्याने या प्रस्तावनांचा उल्लेख अपरिहार्य. माझ्या साहित्य संसारात मला उत्तेजन देणाऱ्या थोरांचे स्नेहऋण मला लाभले ही देखील प्रभूची कृपा.

कथाप्रयासाच्या निमित्ताने मी मजबद्दल जे लिहिले ते परिशिष्टात आहे. ते वेळोवेळी लिहिले गेले म्हणून त्यातील पुनरुक्तीचा दोष पत्करूनही सलगतेच्या दृष्टीने ते तसेच राहू देणे मला इष्ट वाटले.

साहित्याच्या काय अन् जीवनाच्या काय, साधनेची धडपड करणारा मी अपूर्ण साधक ! संपूर्ण म्हणून अहंकाराचा दावा मी केला तर माझी साधना विटाळेल. मी जगताना आणि लिहितानाही कुचराई केली नाही, गाफिल न राहण्याचा सतत प्रयत्न केला. लेखनसाधनेच्या त्या त्या वेळच्या अवस्थेची मी माझ्या जीवनसाधनेशी सांगड घातली. माझे सुषमा ते नागवेल पर्यंतचे संग्रह–त्यांच्या अर्पणिका म्हणजे माझ्या साधनेची प्रतीके असे मला नम्रपणे वाटते.

सुषमा हा माझा पहिला संग्रह मी 'झाडांच्या सावल्यांना' अर्पण केला. हवनच्या वेळी 'प्रजापतये स्वाहा, प्रजापतये इदं न मम; चरा चराणां जठरेषु तिष्ठते, त्रिधा विभक्ताय नमोऽस्तु वह्नये' म्हणून मी नमस्कार केला. यौवन मी गंधवती, क्षमावती धरित्रीला अर्पण केले आणि प्रार्थना केली 'त्वंच धारय मां देवी !' प्रस्थानच्या वेळी 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणत मी पाऊल पुढे टाकले. पाथेयच्या वेळी 'माळिये जेउते नेले तेउते निवांतचि गेले, तेया पाणेया ऐसे केले, होआवे गा' या अवस्थेत मी होतो. संस्कारच्या वेळी मी लिहिले 'आणि ती शिळा विनवू लागली. पण ते ध्यान भंगले नाही. टाकीचे घाव बसू लागले. तडाख्यासरशी वरवरचे पापुद्रे पडू लागले. आवरण दूर झाले !...आणि अखंड श्रमानंतर अखंड प्रहारानंतर ते ध्यान साकार झाले ! अविरत दुःख, अनंत वेदनांची परिणति–असीम सुख–प्रसाद !... आणि मग

शिणलेले हात विसाव्यास्तव–हृत्कमलावर जोडून– " असो नमस्कार अनेकवार, पुनः नमस्कार पुनः पुनः तो. "

माझ्या मनोदृश्यांचे माझ्या कथांमध्ये प्रतिबिंब उमटले असेल तर हेच !

कथालेखनाव्यतिरिक्त उण्यापुऱ्या पन्नास पुस्तकांचा प्रपंच मी केला आहे. हा संसार आवरण्याची इच्छा नाही. ईश्वराची इच्छा काय आहे ती तो जाणे ! एका विशिष्ट काळखंडात मी लिहिलेल्या कथांचा संपूर्ण खंड हाच क्षुल्लक अभिनिवेश या ग्रंथाच्या पोटी आहे. आपले काहीतरी संपूर्ण असे निघत आहे ही कल्पना सुखाची. ती पूर्ण होत आहे हे त्याहून सुखाचे. अशावेळी ममत्वातले मऊपण सुख देते पण ममत्वाची शीव ओलांडली जाऊ नये ही भीती आहेच. मजकडून मी प्रयत्न करतोच आहे !

या आत्मतोषाच्या क्षणी ज्यांच्या प्रोत्साहनाने मी पावले टाकली, ज्यांच्या बोलांनी मी फुललो, सावरलो; ज्यांच्या कृतींनी मी उचलला गेलो, ज्यांच्या स्मृतींनी मी सावध झालो त्या सर्वांना माझे प्रणिपात !

कळू लागले तेव्हापासून आजवर जेथे माझे कर जुळले त्या देवाला आणि दैवाला पुनः हात जोडतो आणि सतत हात जोडण्याइतपत माझी बुद्धी जागती राहो येवढेच मागणे मागतो !

पुणे
५–९–१९६६
श्रावणी सोमवार

— वामन चोरघडे

कथाक्रम

प्रस्तावना ६ अ – १६ अ

१	अम्मा	१७	२९	?	१३३
२	सव्वा पाच आणे	२०	३०	पदार्थांची चव	१३४
३	ते दिवस	२२	३१	मृत्यूची कृपा	१३७
४	काचेची किमया	२५	३२	एक अनावश्यक गोष्ट	१४६
५	अमरवेल	३०	३३	तुझ्याकरिता लिहिलेली	१५५
६	गंगा देखील आटली ?	३६	३४	" वास्तुदेवता "	१५६
७	आणभाक	४३	३५	नाग	१६३
८	रानबोरीचा पाटील	५०	३६	आमचा राजा	१६५
९	अंतरंग	५६	३७	देवाच्या शाळा	१६८
१०	रात्रिरेव व्यरंसीत्	६५	३८	सौंदर्याचे सुख	१७२
११	विहीर	६७	३९	तलाव	१७६
१२	वस्तूचे मूल्य	६९	४०	'आपुले मरण : नयनी सोहळा'	१७९
१३	पोर	७१	४१	विसर्जन	१८२
१४	कलाविकास	७५	४२	आनंद-ग्रन्थी	१८४
१५	कला-जीवन	७८	४३	शरयूची लग्ने	१९०
१६	पिंजरा	८०	४४	तिची जन्मठेप	१९३
१७	भाऊबंदांच्या प्रवृत्ती	८३	४५	गंगास्नान	१९७
१८	प्रत्येकाने सांगितलेली गोष्ट	८६	४६	माणूस का रडतो ?	२००
१९	मानव्याच्या दिशा	८९	४७	नव्या रूढी	२०२
२०	गुलामांचे संकल्प	९३	४८	समुद्राचे पाणी	२०७
२१	नवी आणि जुनी नीती	१००	४९	अबोध बोध	२१२
२२	भेद निमाला	१०२	५०	सरिता	२१९
२३	सुख	१०५	५१	आवाहन	२१९
२४	कुसुमची पहिली लघुकथा	१०५	५२	त्या आणि त्यांची दुःखे	२२०
२५	मातीची भांडी	१०९	५३	मिठाचे थेंब	२२७
२६	जीवनज्योत	११४	५४	चार आघात	२३०
२७	झोपेत लिहिलेली गोष्ट	११७	५५	परवाची दोन स्वप्ने	२३४
२८	न बदलणारे वातावरण	१२४	५६	मीलन	२३९
			५७	" कडू जा...गोड ये "	२४०

५८ नवी बायको २४२
५९ लोकसाहित्याचा निर्माता २४४
६० महायात्रा २४७
६१ भाकरीची गोष्ट २५१
६२ अर्पण २५४
६३ तेवढा एक तास २५८
६४ तीन पाने २६१
६५ घार २६२
६६ शुद्धी ! २६८
६७ नागपूर ते बडनेरा २७४
६८ जीवन तयासी कोण घाली ? २७९
६९ वर्षा २८२
७० जीवनशुद्धी २८२
७१ शैशव स्मृती २८३
७२ अग्निदिव्य २८८
७३ आजचे काम २९२
७४ संघर्ष २९४
७५ अभिशाप २९७
७६ लोकसाहित्याचा वारसा ३००
७७ सूनबाई ३०४
७८ लोकगंगेतील पुष्पदीप ३१३
७९ संस्कार ३१६
८० स्नेहदीप ३२२
८१ जीवन धर्म ३२७
८२ अतिथी देवो भव ! ३३३
८३ परिवर्तन ३४२
८४ लोककलेचे मूल्य ३४८
८५ पाणथळ ३५४
८६ तिच्या आईचे अक्षर ३५९
८७ सन्मार्ग ३६७
८८ पुनर्जन्म ३७३
८९ पराभव ३८२
९० हादरा ३८७
९१ तीनशे दोन ३९७
९२ वाट बघतो आहे ४०२
९३ अंजली ४२१
९४ पंकज ४२७
९५ पायात काटा, जीवाला व्यथा ४३१
९६ ज्योतिर्मयी ४३८
९७ गोरी बायको ४४४
९८ त्याग ४५०
९९ क्रव्याद ४५८
१०० मधु बोल ४६३
१०१ ते जुने पुस्तक ४६३
१०२ हा तरी जगायला हवा होता ! ४७८
१०३ तू मला जागे केलेस ! ४७८
१०४ ही काय माणसे आहेत ? ४८०
१०५ परिमार्जन ४८७
१०६ एक होती म्हातारी ! ४९३
१०७ निरुपाय ४९६
१०८ रीतभात ५०२
१०९ भर मध्यान्हीची वेळ ५०८
११० जखम ५१७
१११ अंतरी दीप उजळले ५२२
११२ कष्टांची कहाणी ५२९
११३ सखी ५३४
११४ हरीख ५४४
११५ सती ५५१
११६ लक्ष्मणाची रेघ ५५७
११७ औषधी जान्हवीतोयम् ५६३
११८ चोरी ५७३
११९ चार अध्याय ५७८
१२० घरट्याबाहेर ५९०
१२१ शासन ५९४
१२२ दुआ ६००
१२३ भागाबुढीच्या मताने ६०४
१२४ दुर्बीण ६०८
१२५ बळी ? ६१४

५ व : संपूर्ण चोरघडे

परिशिष्ट

१ मी का व कसे लिहिले ६२५
२ कथेची कहाणी ६३०
३ अक्षरसृष्टीत पदार्पण ६४७
४ " त्या तिथे तरुतळी " ६५५
ऋणानुबंध ६६३

प्र स्ता व ना

वामनरावांची कथाकार म्हणून प्रथम ओळख झाली तो दिवस मला अद्यापि आठवतो. त्यावेळी मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये बी. ए. च्या वर्गात होतो, आणि थोडाफार साहित्याच्या क्षेत्रात लुडबुडही करीत होतो. आम्ही वसतीगृहात राहणाऱ्या काही मित्र-मंडळींनी एक छोटेसे वाङ्मयचर्चा मंडळ काढले होते. दर पंधरा दिवसांनी किंवा एक महिन्याने एकत्र जमून नवीन पुस्तकांवर आम्ही अनौपचारिक चर्चा करीत असू. अशाच एका बैठकीच्या वेळी एका मित्राने बरोबर आणलेला प्रतिभेचा अंक बाहेर काढला व त्यातील 'काचेची किमया' ही गोष्ट वाचून दाखविली. त्या गोष्टीवर त्यावेळी चर्चा काय झाली हे मला आठवत नाही. पण येवढे मात्र आठवते की त्या गोष्टीने मला इतके भारून टाकले की मी तो मित्राजवळचा अंक ठेवून घेतला व रात्री दोन तीनदा त्या कथेची पारायणे केली. त्या कथेने मला विलक्षण अस्वस्थ केले. अशी अवस्था यापूर्वी दिवाकर-कृष्णाची 'मृणालिनीचे लावण्य' ही कथा वाचताना मी अनुभवली होती. टागोरांच्या काही कथा वाचताना अशाच अस्वस्थतेचा मला अनुभव आला होता. पण या कथेची जातकुळी मला काही निराळीच वाटली. त्यातील तरल भाववृत्तीचा अत्यंत काव्यात्म रीतीने झालेला आविष्कार मला फार विलोभनीय वाटला. त्यानंतर वामनरावांच्या 'प्रतिभे'तून व 'ज्योत्स्ने'तून येणाऱ्या गोष्टी मी अगदी नियमाने वाचू लागलो. त्यांचे कथासंग्रह जसजसे प्रकाशित होऊ लागले तसतसे ते अधाशीपणाने पुन्हा पुन्हा वाचू लागलो. 'अमरवेल', 'आणभाक', 'तिची जन्मठेप', 'घार', 'जीवन तयासी कोण घाली ?', 'अतिथी देवो भाव', 'ऋव्याद' इत्यादी त्यांच्या अनेक कथांनी मला अक्षरशः भारून टाकले. अशा कथा लिहिणारा कथालेखक कसा असेल ? कथेत वर्णन केलेल्या भाववृत्ती या त्याच्याच भाववृत्ती असतील काय ? कथेतील कथानायकाप्रमाणे तो स्वप्नाळू असेल काय ? त्याच्या लेखनाप्रमाणेच त्याचे बोलणेही काव्यमय व भावपूर्ण असेल काय ? एकदा वाटे त्यांना पत्र पाठवून त्यांची ओळख करून घ्यावी. पण तो विचार मनात फारसा टिकला नाही. एकतर संकोच वाटत होता व दुसरे म्हणजे त्या पत्राची त्यांनी काहीच दखल घेतली नाही तर वाईट वाटेल ही भीतीही वाटत होती. आपण लेखकाचे कल्पनेने त्याच्या लेखनावरून जे चित्र काढतो त्या चित्राशी मिळतीजुळती त्याची प्रतिमा नसेल तर आपणाला वाईट वाटेल आणि आपली निराशा होईल. तशी निराशा व्हावयास नको असाही विचार पत्र न पाठविण्याच्या मागे होता. त्यामुळे वामनरावांच्या कथांचा मी अगदी एकनिष्ठ वाचक होतो तरी त्यांची प्रत्यक्ष ओळख

करून घेण्याचा धीर मला झाला नव्हता. त्यांच्या वाङ्मयावरून त्यांचे जे चित्र मी रंगवीत होतो त्यावर मी संतुष्ट होतो.

आणि एक दिवस वामनराव अचानक माझ्या घरी आले. ती ही त्यांची पहिली भेट मोठी काव्यमय होती. अमळनेरला व्याख्यानासाठी ते गेले होते. व्याख्यान संपवून तेथीऊ माझ्या एका मित्राच्या मोटारीतून ते जळगावला आले. माझ्या मित्राने त्यांना थेट आणले ते माझ्याकडे. त्यादिवशी पौर्णिमेची रात्र होती. जेवण आटोपून बाहेर कुठे चांदण्यात भटकायला जाण्याचा आम्ही विचार करीत होतो. तोच माझा मित्र पहाडासारख्या धिप्पाड व्यक्तीला घेऊन वर येऊन धडकला. 'हे वामनराव चोरघडे,' त्याने ओळख करून दिली. आणि मी पहातच राहिलो. हे वामनराव चोरघडे ? ही धिप्पाड सहा फूट उंचीची खादीधारी व्यक्ती वामन चोरघडे ? त्यांच्या वाङ्मयावरून त्यांच्या-विषयी मी केलेल्या कल्पना अगदी निराळ्या होत्या. गोरापान, नाजुक, सडसडीत शरीर-यष्टीचा, भावुक घाऱ्या डोळ्यांचा आणि सोनेरी केसांचा असा हा वामनराव चोरघडे असेल अशी मी माझ्या मनाशी वामनरावांची मूर्ती कल्पिलेली होती. पण स्वतःच्या नावाशी आणि माझ्या कल्पनेशी विसंगत अशी वामनरावांची मूर्ती पाहून मी स्तिमित झालो. वामनरावांनी ही माझी गोंधळलेली अवस्था ओळखली असावी. माझ्या पाठीवर जोराची थाप मारून (त्याच्या झिणझिण्या मला अद्यापि जाणवतात) हसत ते म्हणाले, " तुम्हांला घराबाहेर काढायला आम्ही आलो आहोत; बाहेर चांदणे बरसून राहिले आहे अन् या चार भिंतीच्या आत तुम्हाला बसवते तरी कसे ? उठा आणि वहिनीनांही बाहेर काढा. जरा चांदण्याच्या स्नानाची मजा तर लुटा." वामनरावांच्या तेवढ्याच एका वाक्याने (आणि त्यांनी पाठीवर मारलेल्या थापेनेही) त्यांच्या माझ्यामधील अंतर एकदम कमी झाल्यासारखे मला वाटले. आम्ही बाहेर पडलो. मेहरूणच्या बागेत आम्ही तळ दिला. वरून चांदणे वर्षत होते–भोवताली उद्यानाची स्वप्निल शोभा बहरली होती, मधूनच गार वाऱ्याबरोबर रातराणीचा मदमधुर सुगंध येत होता. या वातावरणात वामनरावांची रसवंती फुलू लागली. वामनरावांना बोलताना मी प्रथमच ऐकत होतो. पण त्यांच्या पहिल्या कथेने मला जसे भारून टाकले तसे त्यांच्या रसवंतीने मला भारून टाकले. वामनरावांच्या गप्पाना एक असा विषय नव्हता. वऱ्ह्याचे अनुभव, भूतपिशाच्चाच्या कथा, बालपणीच्या आठवणी, निरनिराळ्या प्रादेशिक लोककथा–एक ना दोन. वामनराव बोलत होते आणि आम्ही सारे भारून गेल्यासारखे ते ऐकत होतो. बरोबर आणलेल्या शेंगा संपल्या–थर्मासमधील कॉफी संपली, वामनरावांनी आपल्या बरोबर आणलेल्या खास पानांचा साठाही संपला–पण वामनरावांच्या गप्पा संपल्या नाहीत. पौर्णिमेच्या चंद्राने समुद्राला उधाण यावे तसे त्यांच्या गप्पांना उधाण आले होते. वामनरावांच्या गाडीची वेळ झाली त्यावेळी अगदी नाइलाजाने आम्ही उठलो. वामनरावांची पुन्हा एक पाठीवर थाप बसली व मिश्किलपणाने हसत ते म्हणाले, " माझ्या गाडीच्या वेळेपर्यंत तुम्हा दोघांना जागवायचे असा दुष्ट बेत करून

आग्ही आलो होतो. तो यथासांग पार पडला. मात्र वहिनी, शिव्याशाप वगैरे काय द्यायच्या असतील ते घरी द्या बरं का-तोंडावर नको." त्या दिवशी वामनरावांना स्टेशनवर निरोप देताना एखाद्या जिव्हाळ्याच्या स्नेह्याला निरोप देत आहोत असे आम्हा दोघांनाही वाटत होते.

"मनरावांच्या व आमच्या त्यानंतर अनेक बैठकी झाल्या. त्यांच्या प्रत्येक बैठकीत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एखादा निराळाच पैलू प्रगट होई. कधी स्वप्नाळू वामनराव आपली स्वप्नसृष्टी आमच्यापुढे उभी करीत, कधी लोकवाङ्मयाच्या काव्यमय वातावरणात आम्हाला नेऊन सोडीत. कधी स्वतःच्या जीवनातील मधुर व जोपासलेल्या स्मृती उकलून दाखवीत तर कधी भूताखेताच्या भयानक साम्राज्यातही आम्हांला घेऊन जात. घरच्या मंडळीची व मित्रांची आस्थेवाईकपणे व जिव्हाळ्याने चौकशी करीत तर कधी एखाद्या अन्याय्य घटनेवर बोलताना शब्दांचे अंगार त्यांच्या मुखातून बाहेर पडत. बालपणीच्या स्मृती सांगताना ते अनेकदा गहिवरून येत तर वर्ध्याच्या जीवनातील आठवणी सांगतांना त्याच्या वाणीला निराळेच तेज चढे. असे अनेक रंगी व अनेक ढंगी वामनराव म्हणजे आम्हाला तरी न उकलणारे गूढच वाटत असे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा थांग लागणे जितके कठीण तितकेच त्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब ज्यात पडलेले आहे त्या वाङ्मयाचा थांग लागणे अधिक कठीण. वामनरावांची ओळख होण्यापूर्वी त्यांच्या कथा मला आवडत होत्या पण त्या का आवडत होत्या हे मला त्यावेळी निश्चित सांगता येत नव्हते, पण त्यांच्या सहवासात आल्यानंतर मात्र मला कथेच्या यशाचे रहस्य उकलू लागले. वामनरावांच्या कथा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने रंगलेल्या आहेत. त्यांतील प्रत्येक घटना त्यांच्या अनुभूतीने बोलकी केली असल्याने त्यात विलक्षण जिवंतपणा आला आहे. त्यांच्या भावुक वृत्तीचे व संस्कारक्षम मनाचे प्रतिबिंब त्यात पडले आहे. त्यामुळे त्यांच्या कथांना एक वेगळा गोडवा प्राप्त झाला आहे. वामनरावांहून वामनरावांची कथा निराळी काढता येत नाही हाच त्यांच्या कथांचा विशेष आहे. त्यांची काव्यात्म वृत्ती, त्यांची चिंतनशीलता व त्यांचा भावनाप्रधान स्वभाव यांनी रंगलेल्या त्यांच्या कथेचे भावगीताशी जवळचे नाते लागते.

वास्तविक ज्या काळात त्यांनी कथा लिहावयास सुरवात केली त्या काळात फडके व खांडेकर हे कथाक्षेत्रात आदर्श समजले जात होते. हरिभाऊंच्या बोधप्रधान व गुर्जरांच्या रंजनप्रधान कथेला या काळात नवीन आकार यायला लागला होता. 'स्फुट गोष्ट' व 'संपूर्ण गोष्ट' ही कथेची नावे मागे पडून लघुकथा हे नामाभिधान तिला प्राप्त झाले होते व या लघुकथेच्या तंत्राचा व मंत्राचा विचार नव्याने होऊ लागला होता. निरगाठ, गुंतागुंत व उकल हे शब्द कथेच्या क्षेत्रात परवलीचे शब्द झाले होते व आरंभ व अखेर यांचीही चर्चा कसोशीने होऊ लागली होती. 'काय सांगावयाचे' यापेक्षा 'कसे सांगावयाचे' याला प्राधान्य मिळाल्यामुळे लघुकथेच्या क्षेत्रात कारागिरीला महत्त्व

प्राप्त झाले होते. तंत्रशुद्धता, रेखीवता, डौलदारपणा व भाषेची सफाई या गुणांनी नटलेली कथा या काळात वाचकांच्या समोर येऊ लागली होती. आशयाच्या बाबतीत तोचतोपणा यावयास लागला होता. तरुण तरुणीच्या स्वप्नाळू भावजीवनाचे, कौटुंबिक जीवनातील अतिरेकी भावविवशतेचे व हळव्या आणि क्वचित् उबगलेल्या ध्येयदृष्टीचे ठराविक चित्रण कथेत पुन्हा पुन्हा येत होते. मध्यमवर्गीय जीवनाच्या पलीकडे कथेची नजर जात नव्हती व त्या मध्यमवर्गीय जीवनाच्याही ठराविकच कक्षांतून तिची आवर्तने चालली होती. त्याच त्या तरुण-तरुणीच्या प्रेमकथा, तेच ते कौटुंबिक भावनांचे गुंते, आणि त्याचत्या वेगडी ध्येयवादाच्या कृत्रिमकथा–त्यामुळे कथेत जीवंतपणा वाटेनासा झाला होता. तंत्राच्या आहारी जाऊन घटनाचमत्कृतीकडेच कथालेखकाचे लक्ष वेधले जाई. त्यामुळे कथेतील जीवनदर्शन उथळ व वरवरचे होऊ लागले होते. दिवाकरकृष्णांनी कथेला दिलेली नवी दृष्टी या काळात फारशी पचनी पडली नव्हती. तंत्राविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न य. गो. जोशी करीत होते पण त्यात सहजतेपेक्षा अभिनिवेश अधिक होता. थोडक्यात या काळातील कथेत आकृतीसौंदर्य होते पण आशयसौंदर्याचा अभाव होता.

अशा या तंत्रयुगात वामनरावांनी आपले कथालेखन सुरू केले. वामनरावांच्या कथेने सुरवातीपासूनच स्वतंत्र वळण घेतले. कुठल्याही कथालेखकाच्या किंवा कथा-लेखनपद्धतीच्या आहारी ते गेले नाहीत किंवा तंत्राचा बडेजाव त्यांनी कधीच केला नाही. स्वतःच्या समृद्ध अनुभूतीतून त्यांना जे जे जाणवले ते ते त्यांनी उत्कटतेने लिहिले, सहजतेने लिहिले. या सहजतेत त्यांचे भावजीवन मिसळले गेले आणि म्हणूनच वामनरावांच्या कथेने एक स्वतंत्र निराळा आकार घेतला. घटना, चमत्कृतीच्या कृत्रिम बंधनांतून त्यांनी कथेला मुक्त केले, तिला अन्तर्मुख बनविले आणि एक नवी काव्यात्मशैली तिला प्राप्त करून दिली. १९३२ साली 'अम्मा' ही पहिली कथा त्यांनी लिहिली. त्या कथेपासून ते 'बेला' या गेल्या वर्षीच्या त्यांच्या कथासंग्रहातील कथांपर्यंत वामनरावांनी स्वतःचे असे निराळेपण टिकवून धरले आहे. या दीर्घ काळात लघुकथाकारांच्या दोन पिढ्या होऊन गेल्या. पण चोरघड्यांची कथा या सर्व काळातून 'चिरतरुण व चिररुचिर' राहिली आहे. तिच्यातील टवटवीतपणा आजही आपले मन आकृष्ट करीत आहे.

त्यांच्या कथांतून त्यांच्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचा होणारा आविष्कार हे त्यांच्या कथांचे एक अतिशय प्रमुख आकर्षण आहे असे मला वाटते. हे व्यक्तिमत्त्व सकस आहे; संपन्न आहे, अनेक संस्कारांचा वारसा घेऊन आले आहे. कथेच्या माध्यमातून ते सारे उत्कट रीतीने आविष्कृत होते. मराठी कथेत कथाकाराचा आत्माविष्कार–य. गो. जोशी यांचा अपवाद सोडल्यास फार थोड्या कथाकारांच्या कथांतून इतक्या उत्कटतेने झालेला दिसेल. त्यांनी पुष्कळच कथांतून प्रथमपुरुषी निवेदन केले आहे.

त्या सर्वच कथांतील अनुभव किंवा विचार वामनरावांचे असतील असे नाही पण बहुतेक अशा कथांतून वामनरावांची मूर्ती आपणाला स्वच्छ दिसते. त्यांपैकी काही कथांतून त्यांनी निवेदकाची भूमिका घेतली आहे पण त्या कथात निवेदकाचे काव्यमय भाष्य हाच कथेचा आकर्षण बिंदू ठरला आहे. 'शुद्धी' 'आनंदग्रंथी' 'जखम' 'नागपूर ते बडनेरा' यांसारख्या कथांतून प्रथमपुरुषी निवेदन असले तरी त्यांतील मुख्य कथा निराळीच आहे. त्या कथेतून प्रगट होणारे कथानायकाचे जीवनविषयक भाष्य कथेला निराळाच उजाळा देऊन जाते. 'आनंद ग्रंथी' मधील कथा आहे पुनियेची व गेंदीची. त्या दोघींच्या जीवनातील कारुण्य प्रगट करताना वामनराव पुनियेला तिची जात विचारल्यास तिची आई काय उत्तर देईल याची कल्पना करतात. त्यांनी गेंदीच्या मुखात खालील भाष्य घातले आहे, "जात कशाला म्हणतात हो? काहीही विकून पोटाला मिळवायचे हा आमचा धंदा, पेशा; चार-दोन पैशांच्या हमालीत कुणीही आम्हांला धरी घेऊन जावे, धर्मात्मा असेल तर पैसे हातावर देऊन सोडून द्यावे, नाही तर खुशाल हक्काने दार लावावे. आमची जात विचारता–असं होय? ज्या जातीतील धडधाकट माणसांना पोटभर मजुरी मिळत नाही पण तरण्याताठ्या बायकांना लोक हमाली देतात ती आमची जात. हे पहा, माझ्या अंगावरचे वस्त्र. आम्ही चोळ्या घालीत नाही. हा एवढा पांढरा पदर आमची जी लाज राखील तेवढीच. ..... आम्हाला कपडे घालायला नसतात. आमचे अंग वस्त्राभावी उघडे असते. आणि तुम्ही सुखी लोक आमच्याकडे एखाद्या चित्र्यासारखे भुकेल्या नजरेने पाहता." गेंदीच्या मनातील या व्यथांना शब्दरूप देताना आर्थिक विषमतेवर त्यांनी केवढा विदारक प्रकाश टाकला आहे.

'शुद्धी' या कथेत तर वाचकांना विश्वासात घेऊन कथा सांगण्याचा त्यांचा अभिनिवेश आहे. त्या कथेची सुरवातच ते अशी करतात, "मी सगळे काही सांगेन. पण एका अटीवर. ती एक अट एवढीच की हे सगळे मला कुठून व कसे कळले हा प्रश्न आपण मला विचारू नये–या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडून आपल्याला मिळायचे नाही. असल्या गोष्टी युगातून देखील एखाद्याच वेळी घडतात." आणि मग ते वाचकांना समोर बोलावतील व डाव्या बाजूने शांतपणे येणाऱ्या एका शाळेत निघालेल्या सुंदर तरुणीचे दर्शन घडवतील आणि हळूहळू तिच्या जीवनांतील प्रक्षोभक घटनांचे अति हळुवारपणे वर्णन करतील. निर्मला व अरुणकान्त यांच्या जीवनातील भावनांची विलक्षण गुंतागुंत व त्याचा विलक्षण करुण शेवट याचे चित्र रंगविताना व त्यातील लोकविलक्षण घटना सूचित करताना वामनरावांनी वापरलेला संयम विलक्षण आहे. अशा निवेदकाच्या भूमिकेवरून ज्या ज्या वेळी वामनराव कथा सांगतात त्या त्या वेळी त्या कथेच्या अनुषंगाने येणारे त्यांतील जीवनभाष्य वामनरावांच्या चिंतनशील मनोवृत्तीची साक्ष देते, व नकळत वाचकांना अन्तर्मुख बनविण्याचे कार्य करते.

वामनरावांचा स्वतःचा भावानुभव ज्यात वर्णन केला आहे अशा कथा तर या संग्रहातील प्रमुख आकर्षण ठराव्यात. मला स्वतःला तर त्या कथा फारच आवडतात. वामनरावांच्या व्यक्ति-जीवनाचे व स्वभावाचे विविध पैलू त्यातून प्रगट होतात म्हणून तर त्या महत्त्वाच्या आहेतच—पण त्या कथातून वामनरावांची जी जीवनविषयक दृष्टी प्रगट होते ती मला अधिक मोलाची वाटते. बालपणीच्या मधुर स्मृती, मनावर घडलेले संस्कार, जीवनात आलेल्या विविध व्यक्ती आणि अनुभवलेले बरे वाईट प्रसंग यांचे चित्रण करीत असतांना वामनराव कधी कमालीचे हळवे बनतात, कधी अन्तर्मुख होतात, कधी त्यावर भाष्य करतात तर कधी स्वतःच अस्वस्थ होतात. वामनरावांच्या निरनिराळ्या मनोदशांचे दर्शन त्यातून घडते. पण या स्मृती साकार करताना कुठेही कडवटपणा नाही, कुठेही त्रागा नाही किंवा कुठेही आकस नाही. जीवनातील जे जे मधुर, मंगल व उत्कट ते सारे त्यानी टिपले आहे आणि अत्यंत संयमाने व तितक्याच कलात्मक रीतीने त्यानी ते रंगविले आहे. या भाववृत्ती प्रगट करताना सत्याबरोबर कल्पितांचा मेळ किती असेल हे सांगणे कठीण असले तरी त्यातील वामनराव मात्र खरे आहेत हे जाणवते. त्यातील काही भावानुभव कमालीचे नाजुक आहेत व तितक्याच नाजुक शब्दांनी त्यांची त्यांनी गुंफण केली आहे. 'काचेची किमया' ही सुरवातीचीच कथा त्या जातीची. त्या कथेतील जूलिया व तिच्या भोवती विणलेले भावनांचे जाळे वाचकांना अस्वस्थ करणारे आहे. लेखक स्वतःच या स्मृतीने अस्वस्थ झाला आहे. 'आणभाक' ही दुसरी अशीच एक कथा. तिची सुरवात चिंतनातून झाली आहे. हळूहळू स्मृतीच्या पडद्यावर अनेक आकृती येतात. 'काचेची किमया' मधील जशी जूलिया तशी या कथेतील अनामिका. नाव न सांगण्याची लेखकाने शपथ घेतली आहे. त्या दोघांचे निरागस बाल्य—पण वडिलधाऱ्या माणसांनी त्याला 'तो मुलगा असल्याची' व तिला 'ती मुलगी असल्याची' करून दिलेली जाणीव—त्यातूनच अजाणतेपणे त्यांच्या हातून घडलेला एक अनुचित प्रसंग—आणि दोन वर्षांपूर्वी त्यांची भेट झाली असता तिच्या कपाळावर पडलेली आठी-या साऱ्याचे वर्णन वामनरावांनी कमालीच्या नाजुकपणाने व संयमाने केले आहे. वामनरावांचा 'कलात्मक संयम' हा फार मोठा गुण या सारख्या त्यांच्या कथांतून दिसतो. तशीच 'धार' ही कथा. या कथेतील भावानुभव (त्यांच्या जीवनातील असेल किंवा कल्पित असेल) असाच अगदी वेगळा, पण विलक्षण संयमाने त्यानी तो रंगविला आहे. पतीचे अपेक्षित पत्र न आल्यामुळे पुरुषाच्या सहवासाची विलक्षण ओढ लागलेली नायिका, सौ. लीला देशपांडे कथानायकाला फिरायला बोलावते, त्यांच्याशी हास्यविनोद करते, त्याच्या आवडीनिवडीशी समरस झाल्यासारखे दाखविते. पण हे सारे करीत असताना पावित्र्याची तेवढीच जाणीव ठेवते. पुरुष सहवासाची ओढ व पावित्र्याची जाणीव या तरल व विरोधी भावनांचे रंग वामनरावांनी किती सुकुमारपणे रंगविले आहेत! ती त्याला सांगते—"आज त्यांच्या पत्राचा अखेरचा

दिवस होता. काळपासून वाट पहाते. ते पत्र ! ते वाचायला देखील मी माझ्या मनाची तयारी करीत असते. पुरुषाच्या सहवासाची कशी भुरळ पडते–तो दर्प किती हवासा वाटतो याची तुम्हाला जाणीव नसेल. मला, आम्हा स्त्रियांना ते कळते....काळपासून ते पत्र आले नाही...मनच स्वस्थ होईना. आणि म्हणून माझ्या मैत्रिणी मला नकोशा झाल्या. शिवाय मला माझी जबाबदारी होती. म्हणून तुमच्याबरोबर मी आले– तुमच्यावर माझा विश्वास होता. तेच कारण–'' स्त्रीमनाचे इतके सूक्ष्म व तरल चित्रण इतक्या संयमाने व इतक्या समर्थ रीतीने इतरत्र क्वचित्च रंगविले असेल.

'संस्कार' या कथेतूनही मुग्धतेच्या आसपास रेंगाळणाऱ्या किशोरमनाचे चित्रण करताना त्यांनी तितकेच कोमल रंग वापरले आहेत. खेड्यातील शाळेत शिकणारी दोन मुले. मुलगी मुसलमान व मुलगा हिंदू. मुलगा अवखळ खोडकर पण मनाने सरळ. ती मुलगी आपल्याकडून चांगुलपणाची अपेक्षा करते या जाणिवेने त्याला जागृती येते. सलमाचे कथानायकाच्या मनावर संस्कार करण्याचे प्रयत्न व त्याचा कथानायकावर झालेला परिणाम. या कथेतील निरागस भावानुभव एका निराळ्याच उदात्त पातळीवर आपणाला नेऊन सोडतो. वर्ध्यातील वास्तव्यात गांधीजींच्या जीवन-दर्शनाचा वामनरावांच्या मनावर जो ठसा उमटला त्याचा ज्या काही कथांतून उत्कट अविष्कार झाला आहे त्यांपैकी ही महत्त्वाची कथा.

त्यांच्या 'शैशवस्मृती' 'मिठाचे थेंब' 'सौंदर्याचे सुख' 'अञ्जली' या त्यांच्या कथांतून त्यांनी आविष्कृत केलेला भावानुभवही तसाच नाजुक आहे. 'शैशवस्मृती' मधील प्रथम बालपणी आणि त्यानंतर आठ दहा वर्षांनी त्याना भेटलेली ती जिप्सी अनामिका, 'मिठाचे थेंब' मधील मुलाने पहिला पगार हाती दिल्यावर जुन्या स्मृतीने गहिवरून येणारा पिता, 'सौंदर्याचे सुख' मधील लेखकाच्या घरामध्ये अन्नावारी काम करणारी जिजा आणि 'अञ्जली' मधील तऱ्हेवाईक प्रसंगातून लेखकाला नेणारा सर्ज्या–या साऱ्यांचे चित्रण करीत असताना वामनरावांची सारी वृत्ती अतिशयच कोमल झालेली दिसते. या साऱ्या जोपासलेल्या शैशवस्मृती त्याना एका काव्यात्म वातावरणात घेऊन जातात आणि त्या वातावरणातील साऱ्या भावसौंदर्याचा त्यांना पुनः प्रत्यय देतात. अशा कथांतून वामनराव विलक्षण हळवे झाल्यासारखे वाटतात. आणि म्हणून अशा कथा वाचकांनाही अस्वस्थ करतात. त्यानाही त्या आपल्या शैशवात नेत असाव्यात त्यांच्या शैशवात आलेली एखादी अनामिका, एखादा सर्ज्या, एखादी जूलिया, एखादी सलमा, त्यांची स्मृती चाळवून त्यांनाही पुनः प्रत्ययाचा आनंद देत असाव्यात. म्हणूनच त्यांच्या या कथा पुन्हा पुन्हा वाचूनही समाधान होत नाही.

वामनरावांच्या राजकीय जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या काही कथांतून उमटलेले दिसते. पण त्या कथांतून राजकारणापेक्षा महत्त्व मिळाले आहे त्यामधील व्यक्तींना व

त्यांना मिळालेल्या अनुभवांना. 'भेद निमाला' 'अग्निदिव्य' 'पराभव' 'तीनशेदोन' या त्यांच्या कथांतून बंदीवासातील काही क्षण त्यांनी टिपले आहेत. त्यात कित्येक अनामिकांच्या व्यथांना त्यांनी वाचा दिली आहे आणि चोर दरोडेखोर यांच्यामध्ये आढळणाऱ्या माणुसकीचे दर्शनही त्यांनी घडविले आहे. भावाविष्काराबरोबर चिंतनाची जोड या कथांना मिळाली आहे. त्यामुळे वामनरावांच्या व्यक्तित्वाचा एक निराळा पैलू या कथांतून प्रगट होतो.

वामनरावांची ही चिंतनशील मनोवृत्ती त्यांच्या कथांना एक आगळेच सौंदर्य प्राप्त करून देते. वामनरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या कथांतून होणारा आविष्कार केवळ भावनात्मक नाही. त्याला चिंतनाची जोड मिळाली आहे. मात्र हे चिंतन जीवनाकडे जिज्ञासू दृष्टीने पहाणाऱ्या, अन्तर्मुख होऊन त्यातील अनेक घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि विविध संस्कारांनी समृद्ध झालेल्या एका कविमनाचे आहे हे विसरता येणार नाही. वामनरावांच्या कथांतून जीवनावर मधून मधून येणारे भाष्य त्या त्या कथेतील भावजीवनाशी एकरूप झाले आहे. एक तर कथेतील एक व्यक्ती म्हणून वामनराव कथांतून वावरत असतात. त्यामुळे अशा भाष्यांना त्यांच्या कथांतून भरपूर वाव मिळतो व कलादृष्ट्याही ते समर्थनीय होते. शिवाय वामनरावांच्या तत्त्व-चिंतनातून जीवनाचे अनेक पैलू उजळून निघतात. त्यामुळेही त्या कथेचे सौंदर्य वाढते. केवळ बाह्य घटनांना वामनराव कधीच प्राधान्य देत नाहीत. बाह्य घटनांच्या मागे असलेले व्यक्तिमन हे त्यांच्या संशोधनाचा विषय होते. त्या व्यक्तिमनाचे पापुद्रे हळुवार रीतीने उकलत असता त्यातून प्रगट होणाऱ्या अनेक व्यथा व वेदना त्यांच्या चिंतनाचे विषय होतात. ते चिंतन त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वात मुरून ते साकार होते. त्यामुळे वामनरावांना कथावस्तूकडे तटस्थपणे पाहताच येत नाही. त्या जीवनात ते खोलवर शिरतात. त्याच्याशी समरस होतात आणि त्यावर भाष्य करू लागतात. हे भाष्य वामनरावांचे असले तर कथावस्तूशी एकरूप झालेल्या वामनरावांचे आहे हे कधीही विसरता येत नाही. काही काही वेळा चिंतनाचा अतिरेक होतो व 'अंतरंग' सारखी त्यांची कथा ललित निबंधाच्या वळणावर जाऊ लागते. पण अशा कथा थोड्या. बहुतेक कथांतील चिंतनशीलतेला भावनात्मकतेची जोड मिळाली आहे. त्यांच्या कथांचे खास असे हे आणखी एक आकर्षण.

वामनरावांच्या कथेतील काव्यात्मता हा त्यांच्या कथेला वेगळेपणा देणारा आणखी एक महत्त्वाचा विशेष आहे. ही काव्यात्मता त्यांच्या वृत्तीतूनच मुरली आहे, आणि त्याचाच आविष्कार स्वाभाविकपणे त्यांच्या कथांतून झाला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचाच हा एक विलोभनीय विशेष आहे. त्यांचे हृदय आहे कवीचे आणि त्यांनी माध्यम निवडले आहे कथेचे. त्यामुळे कोणताही अनुभव रंगविताना त्यांची कथा काव्यमय स्वरूप धारण करते. मग तो अनुभव स्वतःच्या भावजीवनातील असो

(काचेची किमया, संस्कार इ.) एखाद्या शेतकरी कुटुंबाच्या जीवनातील असो (अतिथी देवो भव) पतीपासून शिक्षणासाठी दूर राहणाऱ्या एखाद्या नवविवाहित तरुणीच्या जीवनातील असो (घार) किंवा एखाद्या प्राथमिक शिक्षकाच्या जीवनातील असो (जीवन तयासी कोण वाली) विविध थरांतील व्यक्तींच्या भावजीवनाचे नाजूक धागे कमालीच्या कोमलपणाने ते उकलतात. मानवी जीवनातील कोणतीही सूक्ष्म भावछटा त्यांच्या नजरेतून सुटू शकत नाही. मग ती दुःखाची असो, सुखाची असो, उदासीनतेची असो की उदात्ततेची असो. या भावछटांना लाभलेले असते त्यांच्या काव्यात्मतेचे वलय आणि ते त्या भावनेला निराळाच उजाळा देऊन जाते. काही काही कथा 'तर मूर्तीमंत कविताच वाटतात. 'वास्तुदेवता' ही कथा त्या दृष्टीने वाचावी. पौर्णिमेची रात्र, दूध शिंपडल्यासारखी शुभ्र व सौम्य दिसणारी सृष्टी, अशा चांदण्यात विहार करावयास निघालेला नायक, त्याला झालेले नागपूरच्या भोसल्यांच्या 'वास्तुदेवते'चे दर्शन त्या वास्तुदेवतेने त्याच्यापुढे उभ्या केलेल्या साऱ्या ऐतिहासिक स्मृती—या सर्व घटनांचे वर्णन वामनरावांनी विलक्षण काव्यमयतेने केले आहे. या सर्व काव्यमयतेच्या पाठीशी गतेतिहासाबद्दल वाटणारी खंतही तितक्याच उत्कटत्वाने जाणवते. 'ज्योतिर्मयी' ही अशीच दुसरी काव्यमय कथा. एका अनामिक तेजस्विनीचे त्यातून घडविलेले दर्शन अत्यंत लोभस वाटते. याशिवाय 'कलाविलास', 'कलाजीवन', 'भाऊबंदाच्या प्रवृत्ती' यांसारख्या काही कथांतून त्यांच्या कल्पनाविलासाचा स्वैर खेळ आढळतो.

त्यांच्या कथांतून विखुरलेल्या उपमा, उत्प्रेक्षा व काव्यमय वर्णने वाचत असताना त्यांच्या कल्पनाविलासाला सूक्ष्म निरीक्षणाची जोड कशी मिळाली आहे याचा जागोजागी प्रत्यय येतो. या त्यांच्या उपमा, उत्प्रेक्षा व काव्यमय वर्णने केवळ आतषबाजी म्हणून त्यांच्या कथांतून येत नाहीत तर त्या कथेतील भावजीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून ती येतात. 'एक अनावश्यक गोष्ट' या कथेतील खालील वर्णन त्याची साक्ष देईल.

"उन्हाच्या ऐनभरात उष्णतेने काहिलून सुस्कारित असताना नांगराचा फाळ पोटात खुपसला गेला, त्यावेळी पृथ्वी विव्हळली असेल; पण आज धान्याचा कोंब फुटल्यामुळे जन्मदात्रीचा आनंद तिच्या मुखावर विलसत होता. कधीतरी जीव आसुसून डोळ्यांवाटे अश्रू पाझरल्यावर आनंदाचा उन्मेष जिवाला हसवून जातो. बालरवीची उगवती कोवळी किरणे ओठ विलग करतात पण मोकळ्या किरणांनी उगीच डोळ्यांत आसवे उभी राहतात. निसर्गाच्या आपाततः घडणाऱ्या या दोन्ही परिमाणात सुख-दुःखाचे झिरपे असतात. त्यांची सीमारेषाही दिसत नाही" किंवा 'ज्योतिर्मयी' या कथेतील 'ज्योतिर्मयी'चे केलेले खालील वर्णन पहा—

"ती आली आपले अस्तित्व जाणवीतच. काखेतील कळशावर ताल धरीत, पावलाने साथ देत, झाडावरील पाखरांकडे सस्मित पाहात, प्रभातीच्या किरणांमुळे

आपले अन्तःकरण उजळले असल्याची ग्वाही देत देत ती आली. जणू भोवतालची सर्व चराचर सृष्टी तिला बोलवीत आहे, ' इतो इतो भगवती ' असे म्हणत आहे आणि दोन डोळ्यांनी सर्वांकडे कटाक्ष टाकता टाकता तिची पुरेवाट झाली आहे. ''

अशा कितीतरी कथांतून विखुरलेली काव्यात्म वर्णने त्यांच्या कथांतील जीवनानुभव उजळून टाकतात.

त्यांच्या काव्यात्म वृत्तीचा आणखी एक फुलोरा म्हणजे या संग्रहात आलेल्या छोट्या छोट्या भावकथा आणि रूपककथा. अगदी मोजक्या शब्दांत एखादी भाववृत्ती साकार करण्याचे त्यांचे सामर्थ्य, 'सुख' 'तुझ्याकरिता लिहिलेली' ' तीन पाने' यांसारख्या छोट्या कथांतून दिसून येते. ' तुझ्याकरिता लिहिलेली ' ही कथा तर उत्तम भावकविताच म्हणावी लागेल. या कथेमधील भावनेची आर्तता खरोखर मनाला अस्वस्थ करणारी आहे. ' विसर्जन ' ' सरिता ' ' आवाहन ' ' मीलन ' ' वर्षा ' यांसारख्या रूपककथा त्यांच्या चिंतनशील मनोवृत्तीतून स्फुरल्या आहेत. त्यात त्यांचा कल्पनाविलास तर आढळतोच पण त्यांतून काही तरी जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पण हे तत्त्वज्ञान काव्यात इतके घोळले आहे की त्या कथेतील काव्याची गोडीच प्रथम जाणवते आणि नंतर तत्त्वज्ञानाची चव येऊ लागते. ' भर मध्यान्हीची वेळ ' ही कथा तर काव्यमय कथेचा उत्कृष्ट नमुना म्हणून समजावी लागेल.

त्यांच्या काव्यात्म वृत्ती बहरण्याला सर्वात अधिक मदत केली असेल तर ती लोकसाहित्याने. ' लोककथा ' हा वामनरावांचा अगदी जिव्हाळ्याचा विषय. ' साहित्याचे मूलधन ' या ग्रंथाची जुळणी करतांना त्यानी पुष्कळच लोकसाहित्य नजरेखालून घातले होते. त्यातील अकृत्रिमता, सकसता, उद्‌बोधकता आणि त्यातील सौंदर्य यांचा वामनरावांवर अपरिहार्यपणे खूपच परिणाम झाला होता. लोककथेतील संस्कार, त्यामधील सामाजिक आशय, त्यामधील काव्य आणि त्याची भावोत्कट अशी सरळ निवेदन शैली यांची छाप त्यांच्या लेखनावर बरीच पडली. त्यातूनच अनेक लोककथा त्यांच्या लेखणीतून बाहेर पडल्या. ' लोकगंगेतील पुष्पदीप ' ' लोकसाहित्याचा निर्माता ' ' लोककलेचे मूल्य ' या त्यांच्या निबंधरूपी कथांतून लोकसाहित्याची प्रेरणा व तिचे स्वरूप यांची केलेली मीमांसा मूलगामी आहे. पण त्यापेक्षा त्यांनी लिहिलेल्या लोककथा व कहाणीवजा कथा या अधिक सुंदर वाटतात. या त्यांच्या कथांतून लोककथेचे सारे विशेष प्रगट झालेले आढळतील. त्यात काव्य आहे. उत्कटता आहे. सामाजिक आशय आहे आणि सकस भावोत्कट शैली आहे. आपला भावानुभव प्रगट करण्यासाठी लोककथा व कहाणी यांच्या माध्यमातून व्यक्त करताना त्यानी केवळ बाह्य अनुकरणावर भर दिला नाही तर सामाजिक वा नैतिक तत्त्व त्यातून प्रभावी रीतीने व्यक्त करण्याचे तंत्रही त्यानी आत्मसात केले. त्या दृष्टीने त्यांच्या ' नवी बायको ' ' भाकरीची गोष्ट ' ' सूनबाई ' ' पुनर्जन्म ' ' एक होती म्हातारी ' ' कष्टाची कहाणी ' यांसारख्या कथा

वाचाव्यात. लोकसाहित्याचा अस्सलपणा या त्यांच्या कथांतून प्रतिबिंबित झाल्याचे आढळेल. 'नवी बायको' या कथेच्या सुरवातीलाच ते म्हणतात, "ही गोष्ट घडली तशीच मी सांगणार आहे. त्यावर भाष्य करणार नाही." आणि जशी घडली तशीच सांगतांना त्या कथेतील आशय मोठ्या कलात्मकतेने ते प्रगट करतात. पन्नाशीला आलेल्या पाटलाने दोन बायका जीवंत असतांना तिसरे लग्न का केले हे शहरातील पांढरपेशाला कळणार नाही. शहरातील मूल्ये निराळी, गरजा निराळ्या. ती मूल्ये व त्या गरजा खेड्याला लागू पडतीलच असे नाही हे सहज जाताजाता या कथेतून वामनरावानी सूचित केले आहे. 'सूनबाई' ही तर एक कहाणी. एक मार्मिक व भेदक लोककथा कहाणीच्या स्वरूपात त्यांनी मोठ्या समरसतेने सांगितली आहे. त्यातील सामाजिक आशय अतिशय व्यापक आहे. 'सूनबाई सासरी आली-सासू तिला पोटभर खाऊ घालीना–भूक तर निभेना–म्हणून सूनबाईने चोरून खाण्याला सुरवात केली. एकदा बिचारीवर स्मशानात पानगा भाजून देवाचे तेलगूळ चोरून पोटातील आग शमविण्याची पाळी आली. तिचे ते कृत्य पाहून मारुतीरायाने तोंडात बोट घातले. गावावर हे अरिष्ट आले असे समजून मारुतरायाने तोंडातून बोट काढावे याविषयी अनेकांचे प्रयत्न झाले. शेवटी 'मी मारुतीरायाला तोंडातून बोट काढायला लावते' अशी पाटलाजवळ प्रतिज्ञा करून सूनबाई एकटी देवळात गेली आणि मारुतिरायांना म्हणाली, "मारुतिराया, मी प्रेतावर माझा पानगा भाजला, तुझ्या दिव्यातले थोडे तेल घेतले व नैवेद्याचा गूळ वापरला म्हणून तुला नवल वाटले. आणि म्हणून तू आश्चर्याने तोंडात बोट घातलेस. पण हा विचार तुझ्या मनात आला नाही की या गावाची शीव तू राखतोस; राम राजानं या गावाची जबाबदारी तुझ्यावर सोपवली आहे, आणि या गावात माझ्या-सारख्या कित्येक मुलींवर या ना त्या कारणाने भूक धरून ठेवण्याचे किंवा भुकेसाठी हवे ते करण्याचे प्रसंग येतात. याबद्दल आम्ही नवल केले तर तुला कसे वाटेल ?... तू तोंडात बोट स्वतःकरिता घालायला पाहिजे की तुला आम्हा लेकराची भूक कशी दिसली नाही ?" सूनबाईने जेव्हा त्रागा करून मारुतीरायाचा कपाळमोक्ष करण्याचा व स्वतःही जीव देण्याचा धाक घातला तेव्हा मारुतीरायाचे बोट तोंडातून निघाले.

या कहाणीवजा कथेतील व्यापक आशय विलक्षण प्रभावी रीतीने वामनरावांनी सांगितलेला आहे. देवाचे देवपण सगळ्यांचे दुःख हलके करण्यात व सर्वांना सांभाळ-ण्यात आहे. त्याला जर गावातील मुलांची भूक दिसत नसली व भुकेपायी प्रेतावर पानगा भाजण्याची व देवाचा नैवेद्य चोरण्याची पाळी मुलांवर येत असली तर देवाचे कुठे तरी चुकले आहे असेच समजावयास हवे. 'सूनबाई'ने मारुतीरायाना तीच जाणीव परखडपणे करून दिली. आज समाजातील कर्त्या पुरुषांना दलितांची दुःखे दिसत नाहीत किंवा दिसत असूनही तिकडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यांना मारुतरायाप्रमाणे परखडपणे बजावणारी सूनबाई मिळावयास हवी असे वामनरावांना सुचवायचे आहे की काय कोण जाणे.

'कष्टाची कहाणी' अशाच स्वरूपाची कथा. अठ्ठ्याऐंशी हजार वर्षे काशीपुर गावातला एक ब्राह्मण तप करतो, कष्ट करतो, महाविष्णूला प्रसन्न करून घेण्याची आकांक्षा धरतो. त्या कष्टाचे फळ त्याला मिळते–महाविष्णू त्याला प्रसन्न होतात. तो त्यांना मागणे मागतो. कोणते ? " देवाधिदेवा, जगात कष्टाची किंमत वाढू दे; श्रमाचे मोल कळू दे, कमाईची लाज कुणाला वाटू देऊ नकोस. जे कष्ट करतील, जे कमाई करतील, आणि आपल्या कमाईतून देवाचा, धर्माचा, देशाचा, ज्ञानाचा वाटा चुकवून जे आपल्या कमाईचे खातील, त्यांना तू आपले मान. त्यांना तू दर्शन दे." काशीकर ब्राह्मणाच्या मुखातून वामनरावांनी दिलेला हा संदेश आजच्या नव्या युगाला साजेसा आहे असेच म्हणावे लागेल.

वामनरावांनी लोककथेचा हा वारसा केवळ त्या पद्धतीच्या कथा लिहून संभाळला असे नाही, तर त्यांतील संस्कार, त्यांतील काव्य व त्यांतील उत्कट वृत्ती त्यानी आत्मसात केली. त्यांच्या इतर अनेक कथांतून लोककथेचे त्यांच्यावर झालेले संस्कार स्पष्ट दिसतात. त्यांची काव्यात्म वृत्ती पोसण्याचे व कल्पनाशक्ती फुलविण्याचे कार्य मुख्यतः या लोककथांनी केले. म्हणूनच 'अतिथी देवो भव' 'ज्योतिर्मयी' 'संस्कार' 'मिठाचे थेंब' यांसारख्या या संग्रहातील व 'कहाणी माझी दुधाची साय' 'वारक-ऱ्याचा वसा' 'कहाणी दीठ लागली त्या मुकी काकीची' यांसारख्या 'वेळा' मधील कथा ते लिहू शकले.

या लोककथांनी त्यांच्या काव्यात्मवृत्तीची जोपासना केलीच पण त्याबरोबर सनातन व शाश्वत जीवनमूल्यांची जाणीव त्यांना दिली. या जीवनमूल्यांतूनच त्यांचा प्रगत मानवतावादी दृष्टिकोन साकार झाला आहे. जीवनावरील असीम निष्ठा या श्रद्धेतूनच प्रगट होते आणि जीवनातील वास्तवाबरोबर त्यामधील मांगल्य, पावित्र्य ते शोधू लागतात. त्यांना समाजातील दारिद्र्य दिसते, दलितांची पिळवणूक दिसते, त्यांच्यामधील अज्ञान दिसते. आपल्या कथांतून त्या कठोर वास्तवाचे ते दर्शन घडवितात. पण त्या कठोर वास्तवाचे चित्रण करीत असताना त्यांची या दलित वर्गाबद्दल वाटणारी असीम सहानुभूती जागी असते. त्यामुळे वामनरावांची कथा ज्या सामाजिक पातळीवर आपल्याला नेते ती परंपरागत सामाजिक कथेतील पातळीपेक्षा भिन्न आहे. ती संकेताच्या आहारी जात नाही, कोणत्याही वादाचा पुरस्कार करीत नाही, किंवा कुठल्याही अभिनिवेशाचे रंग तिच्यावर चढत नाहीत. त्या करुण वास्तवातही भावनांचे मांगल्य शोधण्याचा ती प्रयत्न करते. त्यांच्याही जीवनात काही मूल्ये आहेत, काही श्रद्धा आहेत, व त्या श्रद्धेवर ते दारिद्र्याला किंवा अन्यायाला तोंड देऊ शकतात, हे ते जाणतात. त्यांच्या अशा कथांतील सर्व पात्रे 'स्व'त्व जोपासताना दिसतात. 'जीवन तयासी कोण घाली' मधील घरात अठरा विश्वे दारिद्र्य असलेला मास्तर आनंदी असतो. का ? कोणत्या अमृतावर तो जगतो ? 'पायाला काटा, जीवाला व्यथा' मधील रामजी

मास्तर दरिद्री असतील. पण आपण दिलेल्या माराने आपला विद्यार्थी आजारी पडला हे ऐकून ते धावत त्याच्या घरी जातात व त्याची स्थिती पाहून अश्रू ढाळू लागतात. कशासाठी ? या व्यक्तींची जीवनात काही जीवनमूल्ये आहेत– श्रद्धा आहेत. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीची पर्वा त्यांना वाटत नाही. त्यांच्या अगदी पहिल्या कथेतील 'अम्मा'— कथानायक ज्या वेळी तिला 'आज तुला उपवास नाही का ?' म्हणून विचारतो त्या वेळी ती त्याला उत्तर देते, "कशाचा उपवास भैय्या ? जिस दिन खानेको नही मिला, उस दिन उपासही है। आज कशाचा उपवास ?" या उत्तरामागे असलेले कारुण्य वामनराव नाजुकपणाने टिपतात. 'सव्वा पाच आणे' मधील मजूरही तसाच. त्याची करुणा येऊन कथानायकाने त्याला एक चवली देऊ केली पण ती त्याने घेतली नाही. ती घेणे त्याचे ब्रीद नव्हते. फुकट असा एक छदामही अडेचाळीस वर्षांत त्याने कधी घेतला नव्हता. 'समुद्राचे पाणी' मधील कथानायकाला प्रवासात भेटलेला जयपूरचा मनुष्य तर वाचकांच्या स्मरणात राहील. घरात अठरा विश्वे दारिद्र्य म्हणून बायका पोरं सोडून मुंबईला काम पाहायला चाललेला हा माणूस— दोन दिवसांचा उपाशी– पण कथानायकाने फराळाचा डबा समोर धरताच म्हणतो, "साहेब, सुखी राहो तुमची घरधनीण. पण मला तो खाण्याचा हक्क नाही. इतक्या उमरीत मी कधी दान घेतले नाही. हात आहेत तोपर्यंत भिक्षा मागणार नाही. देव तुम्हाला सुखी ठेवील." कथानायकाने आग्रह केल्यावरही "दुसऱ्याच्या हातचे आम्ही खात नाही. हाताने करीन तेव्हा खाईन. माझा धर्म बुडेल." असे तो निग्रहाने सांगतो. शेवटी कथानायक ज्यावेळी त्याला रुपया देऊ करतो त्यावेळी मात्र तो ढासळतो. मानवी मनात दिसणारी ही असीम सहानुभूती पाहून त्याला अक्षरशः रडू येते. तो शेवटी म्हणतो, "नका, मला आग्रह करू नका. माझा देव ते मला घेऊ देत नाही. माझ्या कष्टाचे नव्हत ते पैसे. माझं तेवढं तरी सुख हिरावून घेऊ नका." ही कथा वाचत असताना वाचक अक्षरशः पाझरून जातो. एका दरिद्री माणसाचे अत्यंत उदात्त व स्वाभिमानी मन रंगवितांना वामनराव वाचकांच्या मनात सहानुभूती निर्माण करतातच पण त्याबरोबर त्यांच्या स्वाभिमानाबद्दल, त्यांच्या निग्रहाबद्दल आत्यंतिक आदरही निर्माण करतात. या सर्व व्यक्तींच्या जीवनातील श्रद्धा हेच त्यांचे वैभव आहे आणि हे खचित उपेक्षणीय नाही असे वामनरावांना वाटते.

अशा काही कथांमधून प्रगट झालेल्या दलितवर्गाच्या व्यथा अधिक मूलगामी आहेत. समाजव्यवस्थेतील कीड त्यातून व्यक्त होते आणि त्यामुळे वामनराव अस्वस्थ होतात. 'गोरी बायको' मधील सखू अशा वर्गाची एक प्रतिनिधी. तिच्या जीवनातील अनामिक दुःखे कुणाला दिसत नाहीत. कुणी ती जाणून घ्यायला तयार नाही. पण त्याहीपेक्षा अन्नाकरिता, कुटुंबपोषणाकरिता स्त्रीला शीलविक्रय करावा लागणे ही तर समाजाला अत्यंत लाजिरवाणी गोष्ट. 'भाकरीची गोष्ट' 'तेवढा एक तास' 'निरुपाय' या कथांतून वर्णन केलेली स्त्रीची अगतिकता करुण तर आहेच पण समाजाला लांछनास्पद

आहे. 'भाकरीची गोष्ट' मधील निवेदन तर भेदक आहे. वामनरावांची चीड तर वाक्यावाक्यातून या कथेत प्रगट होते. येथे शब्द अंगार झाले आहेत. त्यांतील शेवटचा उपरोध तर विलक्षण तीव्र वाटतो. एका स्त्रीने दोन पायल्या ज्वारी व दोन पेंडया या मोबदल्यात स्वतःचे शरीर विकले हे दृश्य दाखवून ते वाचकाना उद्देशून म्हणतात— 'एक काम कराल का ? घरी गेल्याबरोबर हे सारे विसरून जा. नाहीतर काही तरी नवीन पाहिले, ऐकले, म्हणून लिहाल आणि कागद खर्च कराल. लोकांची सहानुभूती मिळवावी म्हणून स्वतःची बुरसलेली काव्यशक्ती शिणवाल. मघाशी तुमच्या डोळ्यांत ती भावना होती म्हणून भीती वाटते. तुम्हाला माणुसकीची शपथ आहे.' वामनरावांच्या अशा काही कथांतून स्त्रीच्या अगतिकतेचे व तिच्या होणाऱ्या विटंबनेचे जे दर्शन होते त्यामुळे वाचक अस्वस्थ होतो व अन्तर्मुख होतो.

ग्रामीण कथा हा वामनरावांच्या कथांपैकी विशेष उल्लेखनीय भाग. वामनरावांना ग्रामीण जीवनाचे विलक्षण आकर्षण वाटते. त्यांचा जन्म खेड्यात झाला होता. त्यांचे बालपण गोंड, गोवारी, कुणबी यांच्या मुलांबरोबर खेळण्यात गेले होते. त्यांच्यावर सारे खेड्याचे संस्कार झाले होते. त्यामुळे ग्रामीण जीवनाविषयी त्यांना विलक्षण ओढ वाटावी हे अगदी स्वाभाविक आहे. 'काचेची किमया' 'शैशवस्मृती' 'संस्कार' 'अंजली' 'पायाला काटा, जीवाला व्यथा' यां सारख्या कित्येक कथांतून रंगविलेल्या त्यांच्या स्मृती या खेड्याच्या परिसरातील आहेत. त्या स्मृतीचा 'टवटवीतपणा लक्ष्यात घेता खेड्यातील जीवनाबद्दल त्यांना किती विलक्षण जिव्हाळा वाटतो याची आपणाला जाणीव होते. याशिवाय लोकसाहित्य व लोकजीवन यांच्या अभ्यासामुळे त्यांच्या ग्रामीण जीवनाविषयी वाटणाऱ्या आकर्षणात भर पडली आहे. यामुळे त्यांची ग्रामीण कथा एक वेगळा आकार घेऊन प्रगट होते. तसे मराठीमध्ये ग्रामीण कथेचे पीक भरपूर आले आहे. पण ती कथा अद्भुतरम्यतेच्या पातळीवर तरी जाते किंवा अतिवास्तव-वादाच्या आहारी जाते. ग्रामीण जीवन रंगविताना ठराविक मालमसालाच पुष्कळदा वापरला जातो. खेड्यातील लोकांच्या अडाणीपणाचे, भोळ्या श्रद्धांचे, दारिद्र्याचे आणि तेथील गुंडगिरीचे ग्रामीण कथांतून खूपच भांडवल केले जाते. खेड्यातील जीवनातील किस्से ऐकवण्याकडेही अनेकांचा कल झाला आहे. त्यामुळे सन्मान्य अपवाद सोडल्यास ग्रामीणदृष्टी हा थट्टेचा विषय बनू लागली आहे. वामनरावांची ग्रामीण कथा अशा कथांपेक्षा अगदी निराळी आहे. याचे कारण खेड्यातील जीवनाबद्दल त्यांना विलक्षण जिव्हाळा वाटतो. खेड्यातील जीवनातील सौंदर्य. मांगल्य व संस्कार हे ज्याप्रमाणे त्यांनी कलात्मकतेने टिपून घेतले आहे त्याप्रमाणे त्या जीवनातील कारुण्यही त्यांना जाणवले आहे. त्यांच्या भोळ्या श्रद्धांशी ते समरस झाले आहेत, इतकेच नव्हे तर त्यांची भाषाही त्यांनी आत्मसात केली आहे. खेड्याचे अंतरंग असे अगदी आगळ्या रीतीने जाणून घेणाऱ्या वामनरावांची कथा त्यामुळेच विलक्षण समर्थ ठरते. त्या कथांमधील व्यक्तीही मनाची विलक्षण पकड घेतात. 'अतिथी देवो भव' या कथेमधील

भावचित्रण त्यांनी किती हळुवार रीतीने केले आहे ! तशीच ती अनामिक ज्योतिर्मयी विहिरीवर पाण्याला येताच पहिला पोहरा तुळशीसाठी व सदाफुलीसाठी, दुसरा पोहरा जनावरांसाठी व तिसरा वाटेच्या वाटसरासाठी काढण्याची रूढी पाळणाऱ्या त्या तेजस्वी स्त्रीच्या ठिकाणी असलेले तेज व निर्भयवृत्ती किती परिणामकारक रीतीने त्यांनी टिपली आहे ! आपणाकडे पापी नजरेने पाहणाऱ्या त्या वाटसरूला तिने दिलेला इशारा वाचून अशा ज्योतिर्मयी खेड्याखेड्यातून दिसू लागल्या तर स्त्रीची अगतिकता व विटंबना थांबवण्यास फारसा वेळ लागणार नाही असे वाटल्यावाचून राहात नाही. 'हादरा' मधील रशिदमियाचे चित्र तर विलक्षण प्रभावी आहे. गावाच्या भावजीवनाशी तो एकरूप झाला आहे, अनाथ, अपंगांबद्दल त्याला जिव्हाळा आहे पण जातीजातीतील तेढ व राजकारणातील नव्या विचारांचे वारे तो समजून शकत नाही. एका लहान अश्राप जीवाला वाचविण्याचा तो प्रयत्न करीत असता दुसऱ्या जातीचे लोक त्याला आडवे येतात. " ती तशी मेली तरी चालेल पण ती तुझ्या जातीत राहून जगता कामा नये " ही विरोधकांची हटवादी भूमिका त्याला सुन्न करते. देशात पाकिस्ताननिर्मितीचे प्रयत्न चालले आहेत पण ते त्याला मान्य नाहीत. " हे तुमचं शिक्षण गावापर्यंत आलं आहे. पण माझ्यापर्यंत त्याला येऊ देणार नाही. मला हादरा बसू देणार नाही. " ही त्याची जिद्द आहे. रशिदमियाच्या मनातील ही भावनांची विलक्षण गुंतागुंत मोठ्या कोमलतेने वामनरावांनी उकलली आहे. 'हरीख' मधील इसऱ्या हा अगदी साधाभोळा आहे. एका साहेबाने अन् साहेबिनीने त्याचा व त्याच्या बैलाचा फोटो घेतला व त्याला तो पाठविण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे आनंदलेला इसऱ्या फोटोसाठी डाकघराकडे जेव्हा वारंवार खेट्या घालू लागतो त्यावेळी आपणाला त्याची कीव येते. 'तिची जन्मठेप'ची नायिका लग्न झाल्यापासून पंचवीस वर्षे बुरख्यात आहे. बाहेर पंचवीस वर्षांत जग किती बदलले याची तिला जाणीव नाही. 'नळ बंद' म्हणून पाणी आणण्यासाठी पंचवीस वर्षांनी बाहेर पडलेल्या त्या स्त्रीला सारीच दुनिया वेगळी वाटू लागते. तिला देशीवाले कोण हे माहीत नाही, गांधीबाबा कोण याची कल्पना नाही, उंचउंच इमारतीना तर ती ताजमहाल समजते. रिप्व्हॅन् व्हिंकल् सारखी तिची झालेली स्थिती वामनरावांनी अत्यंत सहानुभूतीने रंगविली आहे. वामनरावांचा या कथेतील संयम वाखाणण्यासारखा आहे. कदाचित् एखाद्या कथाकाराला या कथेला विनोदी कलाटणी देण्याचा मोह झाला असता. पण वामनरावांनी तिच्या जीवनातील कारुण्यच या तिच्या अनुभवांच्याद्वारे रंगविले आहे.

वामनरावांच्या काही ग्रामीण कथांचा परिसर आहे विहीर, तलाव किंवा पाणवठा. खेड्यातील सर्व बायका तिथे धुणी धुण्यासाठी, पाणी भरण्यासाठी जमतात व तेथे त्यांचे सुखसंवाद सुरू होतात. त्या एकमेकींची चेष्टा करतात, एकमेकींची सुखदुःखे एकमेकींना सांगतात, घरातली गाऱ्हाणी सांगतात आणि साऱ्या गावातील उठाठेवीही करतात. ही विहिरीवरील व पाणवठ्यावरील भावचित्रे वामनरावांनी अत्यंत कलात्मकतेने टिपली

आहेत. त्यात शृंगाराच्या नाजूक छटा आहेत, (रात्रिरेव व्यरंसीत्) सासू व दीर यांचा छळ सहन करीत असलेल्या स्त्रीवद्दल सहानुभूती आहे (विहीर) पोरक्या पोराबद्दल वाटणारी आच आहे (तलाव) आणखी किती तरी ! वामनरावानी रंगविलेल्या भाव-चित्रातून प्रत्येक स्त्रीच्या स्वभावाचे वेगळे वेगळे रंग स्पष्ट दिसतात. वामनरावांनी वऱ्हाडी बोलीही चांगली आत्मसात केली आहे. (कथा सांगण्याच्या रंगात आले म्हणजे नाट्यमय रीतीने भाषणेच्या भाषणे वऱ्हाडी भाषेत ते बोलून दाखवितात.) त्यामुळे या कथांना आपोआपच प्रादेशिक रंग येतो. त्यातही मिष्किलपणामुळे लक्ष्यात राहाते ती भागाबुढी. म्हातारी असून उत्साह तरुणांना लाजविण्यासारखा, शब्दाला खंबीर, वागण्यात मिष्किल अशी भागाबुढीमाय सर्वांचे लक्ष वेधून घेते. ' भागाबुढीच्या मताने ' या कथेतील त्यांच्या संवादाचा नमुना तर पहा—

" झालं नाही का व पोऱ्ह्याव्हा तुमचं ? चालाचं नाही का गावाकडं ? का झाडा-खालतंच गोटे मांडान् इथं ? "

" हे मनी उठतच नाही. कईची म्हनून राह्यली पण म्हनते माही भागाबुढी येईन तवा मी उठन्. आता तरी बांधनं माय चंची. "

" हो, तू उपरी माही चंची खाली करसीन् आन् माही भागाबुढी जरासं पान् बी घेनार नाही; नाही वं ? बस गे भागाबाई, पान खा; कोलू काका आहे संगं ! वाट नाही दिसन् त धर जो ह्याचा हात. "

" दो लेकराची माय झाली हे मनी, पन् इब्लिसपना गेला नाही तिचा. सांगतो तुह्या मानसाले, थांब. "

" काका, माह्या दोईबी लेकराइले भागाबाईचाच हात लागला तिनंच सिकवलं मले असं बोल म्हून. "

या संवादातील खेळकर विनोद आणि त्यातील अवखळपणा वाचता वाचता लक्ष्यात येतोच पण त्याबरोबर भागाबुढी, कोलूकाका, मनी यांच्या व्यक्तिरेखाही डोळ्यांपुढे उभ्या राहतात.

श्रद्धा, समजुती व रूढी यांनी खेडेगावातील जीवनात अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण केले आहेत, अनेक समस्या उभ्या केल्या आहेत. काही समस्या मूलगामी आहेत. आणि त्यामुळे खेडेगावातील व्यक्तिमनावर होणारे परिणामही फार खोलवर गेले आहेत. वरवर पाहाणाऱ्याला त्यातील संगती लक्ष्यात येत नाही. ' मानव्याच्या दिशा ' मधील देवीपुढे मेंढराचा बळी देणारा रामजी मेंढरांना पोटाशी धरतो व त्यांच्यावर अपत्यवत् प्रेम करतो ही विसंगती रामजीचे अंतरंग जाणल्याशिवाय ध्यानात यावयाची नाही. ' परिवर्तन '-मधील तुळसामाय कान्ह्या—जैरामला झणझणीत तिखट भाकरीबरोबर खाण्यासाठी का देत होती हे भरतला कळले नाही. तुळसामायने स्पष्टीकरण केल्यावर त्याच्या डोक्यात प्रकाश

पडतो. तोंपर्यंत हृदयपरिवर्तनाचंच तत्त्व तो हृदयाशी धरून बसला होता. 'मातीची भांडी' मधील गोंड जमातीतील श्रद्धा व समजुती यांना बळी पडलेली काशीची मूर्ती निराळीच समस्या आपणापुढे उभी करते. 'आनंदग्रंथी' मधील पुनिया व तिची आई यांच्या समस्या तर अगदी वेगळ्या आहेत. या साऱ्या कथा लिहिताना वामनराव त्या त्या जीवनात खोलवर शिरतातच, पण त्यांतील व्यक्तींचे हृद्‌गत जाणून घेतात.

वामनरावांची ग्रामीण कथा अशी विविधरंगी आहे. पण ते रंग कृत्रिम नाहीत. ग्रामीण जीवनाचे अस्सल रंग घेऊन ती साकार होते. आपल्या ग्रामीण कथांना त्यांनी वास्तवाच्या पातळीवर नेले, पण तेथेच त्या कथेला घुटमळत ठेवले नाही. ग्रामीण भाषा त्यांनी समर्थपणे वापरली पण त्याचे त्यांनी भांडवल केले नाही. खेडेगावातील जीवनाचे रस रंग रूप घेऊन येणारी त्यांची ग्रामीण कथा त्यांच्या आत्माविष्कारातून –त्यांच्या अनुभूतीतून–स्फुरली आहे. त्या भूमीत वाढलेल्या जीवांच्या श्रद्धा, त्यांची स्वप्ने, त्यांची लहान मोठी दुःखे, त्यांच्या आशाआकांक्षा यांच्याशी वामनराव समरस झाले आहेत. जीवनातील सौंदर्य, पावित्र्य, मांगल्य व उदात्त त्यांनी अचूक टिपलेले आहे. त्यावर त्यांनी काव्याचा साज चढविला आहे. प्राथमिक शिक्षकापासून गोंड जातीच्या स्त्रीपर्यंत सर्व थरांची चित्रे त्यातून आली आहेत व ती सर्व प्रत्ययकारी आहेत. त्यामुळेच त्यांच्या ग्रामीण कथा जिवंत व रसरशीत वाटतात.

वामनरावांच्या कथांचे आणखी किती तरी पैलू आहेत–त्या सर्वच पैलूंचे यथार्थपणे दर्शन घडणे अशक्यच आहे. वामनरावांचे व्यक्तिमत्त्व जितके गुंतागुंतीचे तितके त्यांचे कथाविश्वही गुंतागुतीचे. खेड्यातील संस्कार, लोकसाहित्याचे संस्कार, वर्ध्याला गांधीवादी वातावरणात राहिले तेथील संस्कार, अशा अनेक संस्कारांचा वारसा घेऊन वामनरावांनी कथाविश्वात प्रवेश केला. त्या संस्कारांना समृद्ध अनुभव, चिंतनशील मनोवृत्ती आणि काव्यात्मता यांची जोड दिल्यामुळे त्यांचे कथाविश्व बहुरंगी व बहुढंगी झाले आहे. त्यामुळे त्यांच्या कथांतून एकसुरीपणा आला नाही.

वामनरावांची कथा वाचताना आणखी एक गोष्ट जाणवते. त्यांची वृत्ती आत्यंतिक आत्मनिष्ठ असल्यामुळे वस्तुनिष्ठ घटनाप्रधान कथा त्यांना जमत नाहीत. अशा कथा अद्‌भुतरम्यतेच्या पातळीवर जातात व त्यातील स्थूल संघर्ष अनेकदा नाटकी होतात. 'रानबोरीचा पाटील' 'वाट बघतो आहे' या अशांपैकी कथा. या कथांतील भावविवशता आणि अद्‌भुत प्रसंगांची चळत नाटकी वाटते. त्यामानाने 'गुलामांचे संकल्प' ही कथा त्यातल्या त्यात बरी साधली आहे. पण वामनरावांची प्रतिभाच अशा कथांना अनुकूल नाही. ती सूक्ष्म भावानुभवात रमते, व्यक्ति-मनातील नाजुक भावनांची गुंतागुंत मोठ्या कुशलतेने सोडविते आणि एक सुंदर भावचित्र आपणापुढे उभे करते. ज्याला स्थूलमानाने कथानक म्हणू ते त्यांच्या कथेला अनेकदा असतेच असे नाही. कथानका-

तील बाह्य भडक घटनांचे त्यांना आकर्षण नाही. त्याऐवजी माणसाच्या अन्तर्मनात ते शिरतात व त्या मनातील कोमल भाव नाजुक हातांनी टिपू लागतात. त्यामुळे त्यांची कथा सूक्ष्म आणि अन्तर्मुख झाली आहे.

त्यामुळे वामनरावांच्या कथांचे प्रमुख अंग म्हणजे त्यामध्ये आलेले नाजुक व रेखीव व्यक्तिचित्रण. त्यांच्या कथेचे हेच मोठे सामर्थ्य आहे. त्यांच्या या व्यक्तिचित्रणातही विविधता आहे. व्यक्तीच्या अन्तःकरणातील नाजुक प्रणयभाव टिपून घेण्यापासून ते त्याच्या मनाचा प्रक्षोभ दाखविण्यापर्यंत अनेक भावना ते समर्थतेने हाताळू शकतात. 'घार' मधील सौ. लीला देशपांडे, 'सखी' मधील नायिका, 'नव्यारूढी' मधील नाना, 'चार अध्याय' मधील डेली, 'हादरा' मधील रशीदमीया, 'परिमार्जन' मधील काका, 'पायाला काटा जीवाला व्यथा' मधील रामजी मास्तर–एक ना दोन. त्यांच्या कथा वाचत असताना अशा अनेक व्यक्ती आपल्या डोळ्यांसमोर तरळू लागतात. समाजातील वेगवेगळ्या थरातील या व्यक्तींच्या अंतरंगातील कोमल भावना, त्यांच्या व्यथा, त्यांच्या आशा आकांक्षा, त्यांची सुखदुःखं त्यांच्या अंतरंगात शिरून वामनराव सहानुभूतीने समजावून घेतात. आणि अत्यंत कोमल व हळुवार रीतीने त्या ते वाचकांच्या समोर मांडतात. या बाबतीतील त्यांचा संयम व सूचकता अत्यंत वाखाणण्यासारखी आहे. विशेषतः प्रणयभावनेचे चित्रण करताना वामनरावांनी दाखविलेला संयम विलक्षण आहे. त्यांच्या प्रेमकथांतून भावनेची सखोलता आहे, उत्कटता आहे; थिल्लर व भडक वर्णनाच्या आहारी ते जात नाहीत. 'घार' मधील सौ. लीला देशपांडे हिची, ठरल्यावेळी पतीचे पत्र न आल्याने झालेली व्याकुळ वृत्ती, 'सखी' मधील आई-वडिलांच्या मनाविरुद्ध एक विजातीय तरुणावर प्रेम करणारी लेखकाची निर्मळ मनाची मैत्रीण, 'चार अध्याय' मधील कथानायकावर निरपेक्ष प्रेम करणारी डेली व त्याच कथेत सूचित झालेली अलोकी, 'लक्ष्मणरेषा' मधील कथेच्या माध्यमातून नाजुकपणे आपले मनोगत सूचित करणारी अनुराधा, 'परिमार्जन' मधील सर्व नातेवाईकांच्या मनाविरुद्ध सखूशी एकनिष्ठ राहणारा काका.....अशी अनेक प्रेमभावनेची चित्रे अत्यंत नाजुक आणि मुलायम वृत्तीने वामनरावांनी रंगविली आहेत. 'काचेची किमया' 'संस्कार' 'आणभाक' यांमधील भावना तर कमल परागापेक्षा नाजुक आहेत. वामनरावच त्या रंगवू जाणोत!

या सर्व व्यक्तिरेखा जिवंत आणि प्रत्ययकारी वाटतात याचे कारण त्यांच्यामागे असलेले वामनरावांचे समर्थ व्यक्तिमत्त्व. जवळ जवळ प्रत्येक कथेतून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे वामनराव ही व्यक्ती वावरताना दिसून येते. कथेतील सर्व व्यक्तींच्या मनोभावनांशी ते समरस होतात त्यावेळी त्यांच्याही क्रिया प्रतिक्रिया व्यक्त होत असतात. त्यांच्या भावनांचे रंगही त्यात मिसळलेले असतात. त्या त्या भावनांवर व त्या त्या घटनांवर त्यांचे भाष्यही मधून मधून कथातून येत असते. या भाष्यावर

भावनेचे रंग चढल्यामुळे ते कथेचा अपरिहार्य भाग बनत असते. वामनरावांची कथा बोधवादी आहे असे म्हणणाऱ्या टीकाकारांना हे जाणवले नाही. कथा सांगताना लेखकाने अलिप्त राहावे की त्या कथेच्या प्रवाहात स्वतःला सामावून घ्यावे हा प्रश्न त्या त्या कथाकाराच्या मनोवृत्तीचा आणि परमनप्रवेश सिद्धीच्या सामर्थ्याचा आहे. तटस्थपणे कथावस्तू रंगविणे, अलिप्तपणे कथातील पात्रांची सुखदुःखे वर्णन करणे हे एका दृष्टीने सोपे आहे. कथेच्या प्रवाहात स्वतःचे व्यक्तिमत्त्व मिसळून टाकणे याला फार मोठा सहानुभव लागतो. वामनरावांच्या ठिकाणी तो आहे. त्यांची प्रतिभा खरी भावगीत रचनेला अनुकूल, त्यामुळेच त्यांच्या कथेला अनेकदा तरल भावगीताचे स्वरूप येते. त्यामुळे त्यांच्या कथांतून येणाऱ्या भाष्यावर काव्याचा आणि भावनेचा साज चढतो व कथेची उंची ते अधिकच वाढविते.

वामनरावांच्या कथा विस्कळित व पाल्हाळिक असतात व त्यांना कथेचे तंत्र अवगत नाही ही त्यांच्यावरील टीकाही अशीच पारंपारिक स्वरूपाची. कथेचे तंत्र म्हणजे कथा सांगण्याची एक पद्धत. ती कथाकाराप्रमाणे बदलत असते. ओ. हेन्रीच्या कथेचे तंत्र चेकॉव्हच्या कथेतील तंत्रापेक्षा अगदी भिन्न आहे. तरी ते दोघेही श्रेष्ठ कथाकार ठरले आहेत. तंत्राची ठराविक बंधने (गुंतागुंत, निरगाठ व उकल) ही स्थूल घटनाप्रधान कथानकाला अधिक मानवतात. वामनरावांची कथा सूक्ष्म आहे– जीवनाचा खोलवर वेध घेणारी आहे आणि वाचकांना अन्तर्मुख करणारी आहे. त्या कथेला तंत्राची ही ठराविक बंधने मानवणारी नाहीत. आणि तरीही वामनरावांची कथा सांगण्याची बैठक वाचकाच्या मनाची चटकन् पकड घेणारी आहे. त्यांच्या कथेला लोककथेचा वा कहाणीचा जो घाट येतो त्यामुळे कथाविश्व आपोआपच फुलत जाते. कथेची सुरवातही ते अतिशय आकर्षक रीतीने करतात, व काही काही कथांतून शेवटही अतिशय परिणामकारक केलेला आढळतो. ' घार ' या कथेची सुरवात पहा —

" सगळे विलक्षण ! मला अजूनही कधी कधी वाटते, ते स्वप्न असावे. पण ते स्वप्न नव्हे ! स्वप्न आपण केव्हा म्हणतो ? जेव्हा त्यातली एकादी घटना मनात कधी-तरी तरंगून जाते. तथापि तसला विचार माझ्या मनात मुळीच कधी आला नाही व म्हणूनच ते सगळे विलक्षण. "

किंवा ' परिमार्जन 'चा आरंभ पहा–

" त्या गावात जे पुष्कळसे निष्कलंक लोक होते ते त्या गृहस्थाशी बोलत नव्हते. कारण त्यांची वाणी विटाळण्याची भीती होती, व त्यामुळे त्यांचे परलोकसंचित कमी होणार होते. जे थोडे जनरीती संभाळून वागणारे अब्रूदार लोक होते तेवढे त्याच्याशी बोलत. निष्कलंक लोकांपैकी काहींना त्याच्याशी दिवसा बोलण्याची भीती वाटे. आपल्याला त्याच्याशी बोलताना कुणी पाहू नये एवढाच किरकोळ उद्देश त्या वाटण्याच्या पोटी होता. "

या दोन्ही कथांची सुरवात वाचताना वाचकांच्या मनात कथेविषयी उत्कंठा निर्माण करण्याचे तंत्र वामनरावांनी सहजपणाने कसे सांभाळले होते याची कल्पना येते. कथेची अखेरीही ते किती परिणामकारक करू शकतात हे पहावयाचे झाल्यास त्यांच्या 'धार' 'गोरी बायको' 'गुलामांचे संकल्प' 'समुद्राचे पाणी' अशांसारख्या काही कथांची अखेरी वाचावी. अर्थात् वामनराव जाणीवपूर्वक कथेची सुरवात आकर्षक व्हावी किंवा अखेरी परिणामकारक व्हावी असा प्रयत्न करीत नाहीत. त्यांच्या वृत्तीत ते नाही. पण नाही म्हटले तरी जी व्यक्ती खाजगी बैठकीत गोष्ट रंगवून सांगते व सर्व श्रोत्यांना भारून टाकते त्या व्यक्तीच्या कथांतून हे सारे स्वाभाविकच घडते.

वामनरावांच्या कथा वाचत असतांना मला सतत आठवण होते ती दिवाकर कृष्ण व य. गो. जोशी या दोन कथाकारांची. कथेला काव्यात्म वळण देण्याचे कार्य व तिला अन्तर्मुख करण्याचे कार्य दिवाकर कृष्णांनी केले. पण त्यांनी फारसे कथालेखन केले नाही. शिवाय त्यांची कथा काव्यात्म असली तरी करुणरसप्रधान होती. वामनरावांनी दिवाकर कृष्णांची परंपरा विकसित केली. पण केवळ कारुण्यावर त्यांच्या कथेने भर दिला नाही. त्यांची कथा सर्वंकष वाटते. त्यांच्या काव्यात्मतेला चिंतनशीलतेची व विविध संस्कारांची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या कथेतून करुण रसाबरोबर प्रणयाच्या नाजुक छटा येतात, तीव्र उपरोध येतो, व जीवनातील उदात्ततेचा व मांगल्याचा साक्षात्कारही त्यातून घडतो. य. गो. जोशी यांनी बंदिस्त कथानकाच्या काचातून मराठी कथेला मुक्त केले. आपल्या कथाविश्वातून तेही स्वैरपणे विहार करताना आढळतात. य. गो. जोशी ही व्यक्ती अनेक कथांतून येते, कथेतील पात्रांशी गप्पागोष्टी करते, त्यांची सुखदुःखे समजावून घेते व अनेकदा त्यांच्यावर भाष्य करते. वामनरावांच्या कथेनेही कथानकाचा बंदिस्तपणा झुगारून दिला आहे व तेही आपल्या कथांतून स्वैरविहार करताना आढळतात. वामनरावांची काव्यात्म वृत्ती य. गो. जोशी यांच्याजवळ नाही. उपहासाच्या अस्त्रावर त्यांचा अधिक भर तर वामनराव अन्तर्मुख होऊन जीवनात खोलवर शिरतात. वामनरावांच्या कथांतून त्यामुळे या दोन्ही कथाकारांची वैशिष्ट्ये आढळत असली तरी त्यांची कथा अगदी निराळे वळण घेते हे मानावे लागेल. मला त्यांच्या काही कथा वाचताना टागोरांच्या कथांची आठवण होते. नाजुक भावना, काव्यात्म चिन्तनशीलता व जीवन विषयक दृष्टिकोनाचा सहज होणारा आविष्कार याबाबतीत त्यांच्या कांही कथा टागोरांच्या कथांच्या वळणावर गेल्या आहेत असे वाटल्यावाचून राहात नाही.

मराठी नवकथेमध्ये अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ यांच्या कथांपासून जे मनोविश्लेषण आले आहे त्याची बीजे वामनरावांच्या कथांतून प्रथम दिसू लागली. पण वामनरावांच्या मनोविश्लेषणामधील व या नवकथेतील मनोविश्लेषणामधील एक महत्त्वाचा

फरक लक्षात येतो. वामनराव व्यक्तीच्या अन्तर्मनात शिरतात, त्यामधील भावनांचे नाजुक पापुद्रे उकलून दाखवितात पण तसे करताना ते त्या व्यक्तीशी समरस होतात. नव्या कथेतील मनोविश्लेषण अलिप्ततेच्या पातळीवरून केले जाते. त्यामुळे त्या कथांतून जीवनातील कुरूपता, वैफल्य, अगतिकता यांचे विदारक चित्रण येते. वामनरावांना अशा भावनांशी एकरूप होणे जमत नाही. त्यामुळे त्यांच्या कथांतून अतिवास्तववादी चित्रण कुठे येत नाही. दिव्यत्वाची जेथ प्रचीती त्याच ठिकाणी वामनरावांचे मन रमते. त्यामुळे या नवकथेच्या जमान्यातही वामनरावांची कथा आपले निराळेपण टिकवून आहे.

'संपूर्ण चोरघडे' ह्या वामनरावांच्या १९६० पर्यंत सर्व एकत्रित कथा वाचताना जे जे जाणवले ते ते या ठिकाणी नोंदविण्याचा हा प्रयत्न अपुरा असल्याची जाणीव मला आहे. कारण एक तर वामनरावांचे व्यक्तिमत्व इतके विविधरंगी आहे की ते सर्व रंग अद्यापि मला आकलन होऊ शकले नाहीत. वामनरावांच्या तरल भाववृत्तीचे दर्शन त्यांच्या सतत सान्निध्यात असणाऱ्या व्यक्तींनाच व्हावे. (तेही यथार्थतेने होते की नाही कोण जाणे!) वामनरावांचे अन्तरंग उकलून दाखविणारी त्यांची कथा त्यामुळे त्यांच्या जिव्हाळ्याच्या व्यक्तींना जितकी आकलन होईल तितकी त्यांच्यापासून दूर राहणाऱ्या व मधून मधून भेटणाऱ्या माझ्यासारख्या त्यांच्या मित्राला होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे कथांतून वामनराव मला कसे दिसले व वामनरावांच्या व्यक्तिमत्वाचे मला अनुभवाला आलेले पैलू त्यातून कसे व्यक्त झाले हे दाखविण्यापुरताच हा मर्यादित प्रयत्न.

अशा प्रकारचा संपूर्ण कथासंग्रह (ऑम्निबस व्हॉल्यूम) मराठीत प्रथमच निघत आहे व तो मान वामनरावांच्या कथांना मिळत आहे याचा रसिकांना निश्चित आनंद वाटेल. पण वामनरावांची कथा अद्यापि संपली नाही. तिची वाटचाल अद्यापि चालू आहे. तिचे नवे नवे उन्मेष १९६० नंतरच्या 'मजल' 'वेला' या कथासंग्रहातून दिसत आहेत. त्यामुळे 'संपूर्ण' या शब्दाला संग्रहापुरता मर्यादित अर्थ आहे. वामनराव संपले नाहीत, संपणार नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे नवे नवे पैलू त्यांच्या नव्या कथासंग्रहातून प्रगट होत आहेत. त्यामुळे आता 'संपूर्ण चोरघडे भाग २, संपूर्ण चोरघडे भाग ३' अशी त्यांच्या कथासंग्रहांच्या खंडांची वाट बघावयाची. त्यातून प्रगट होणाऱ्या वामनरावांचे दर्शन कसे विलोभनीय असेल याची कल्पनेने चित्रे रंगवावयाची हेच सध्या आपले काम.

—म. ना. अदवंत



१

अम्मा

हूः ! हूः !! हूः !!! कोण थंडी ही ! पण अशाही थंडीत आमची आई उठत असे. उठल्याबरोबर तिचे आपले म्हणणे सुरू होई —

" ऊठ पुरुषोत्तमा, वाट पाहे रमा. "

हे तिचे पालुपद सुरू झाले की आम्ही 'पुरुषोत्तम' नसलो आणि आमची वाट पाहावयास 'रमा' नसली, तरी आम्हांला मात्र उठावे लागे. रडतराऊ आम्ही ! सकाळी उठून तिच्यासारखे स्नान थोडेच करावयाला बसलो ? चांगले वेशरमासारखे उठावे आणि शेजारच्या गणोबाच्या शेकोटीवर जाऊन बसावे. आमचेही काही संवगडी होतेच ! आम्ही आलो की विचारे आमच्याकरिता वडील माणसांच्या आज्ञा (?) भिरकावून येथे यावयाचे आणि आमचा अड्डा चांगला भास्करबुवा वर येईपर्यंत चालवयाचा. गोष्टीचे विषयही अगदी 'राऊंड टेबल' सारखे आणि राऊंड बसूनच ! हा आमचा चातुर्मासाचा कार्यक्रम !

अशीच एक पहाट होती. आज मला पहाटेच्या प्रहरात एक विचित्र स्वप्न पडल्यामुळे माझी झोप लवकरच उघडली. मी उठलो आणि दारात येऊन बसलो. अंगावर आईची शाल घ्यावयास मात्र विसरलो नव्हतो.

रस्त्याने या वेळेस फारसे कोणीच जात नव्हते. पहाटे साडेचारला एक गाडी येत असल्यामुळे काही कष्टाळू टांगेवाले नुकतेच स्टेशनच्या रस्त्याला लागले होते. स्वतः-जवळ असलेल्या दुपट्ट्याने स्वतःचे सर्व अंग झाकून व एखाद्या गाठोड्याप्रमाणे बसून ते घोड्याला हाकीत होते. त्यांच्या तोंडातली बिडीची टोके मधून मधून ओढताना चमकत. आज मला त्या रस्त्याने तेच फक्त दिसत असल्यामुळे आणि रिकाम्या वेळी कशाकडेही पाहण्याची मनुष्याला सवय असल्यामुळे मी आज त्यांच्याकडे जास्त लक्ष लावून पाहात होतो. समोरचा टांगेवाला मागच्या टांगेवाल्याशी घोड्याकडे लक्ष न देता थंडीबद्दल बोलत होता. इतक्यात त्याचा घोडा अडला व त्याने समोर पाहिले. तो एकदम म्हणाला —

" ए बाई, जरा दूर हो जा. इतनी ठण्डीमें कहाँ जाती माई ? "

माझे लक्ष अगदी समोरच होते. त्याने संबोधिलेली बाई मला चटकन् दिसली. ती बाजूला झाली व टांगे भर्र्र् निघून गेले.

ती बाई माझ्या घरासमोरूनच जात होती. ती जवळ येताच मी तिला ओळखले. तिचे नाव अम्मा होते. ती आमच्या घरी बरेचदा येत असे. आई आजारी असली किंवा घरी काही जास्त काम असले की ती आमच्याकडे येई व घरकाम करी. तिचा उदरनिर्वाह कसा चालला होता, हे मला अजूनही मौहीत नाही; पण मला ती नेहमी काम करतानाच दिसे. धाकट्या इंदूला कधीकधी ती खाऊ वगैरे आणीत असे. यावरून तिला पोटापेक्षा जास्त मिळत होते, येवढे मात्र खास.

आजही ती रिकामी चालली नव्हती. तिच्या डोक्यावर पाण्याची घागर होती व ती पूर्ण भरली असल्यामुळे चालताना पाण्याचे थेंब तिच्या कपाळावरून खाली उतरून तिच्या नेसत्या लुगड्यावर पडत. यामुळे तिचे लुगडे ओले होत होते. तिला बिचारीला थंडी वाजत नसेल का ? असा विचार माझ्या मनात आला. इतक्यात ती माझ्याजवळ आली व पुढे जाऊ लागली. मी तिला विचारले—

" अम्मा, इतक्या थंडीत कशाला पाणी भरतेस ? तुला थंडी वाजत नाही ? " मला थंडी वाजत होती, म्हणून मी तिला हा प्रश्न केला. तिने माझ्याकडे पाहिले आणि हसून ती म्हणाली, " बेटा, थंडी तर वाजायचीच. ये ठंडीकेही दिन हैं, फिर वह क्यों नहीं सतायेगी ? अपना काम करना बस् । "

शेवटचे वाक्य अम्माने जाता जाताच उच्चारले. ती माझ्यासमोरून गेली; पण तिच्याबद्दलचे विचार माझ्या मनातून काही केल्या जाईनात. मला माझ्या आळशीपणाची लाज वाटू लागली आणि त्या दिवशी मी त्या 'अड्ड्यावर' गेलो नाही. एवढ्या थंडीतही अम्मा आपले काम – तिला ते कर्तव्य वाटत असेल का ? – करते अं ?

उन्हाळा, हिवाळा व पावसाळा या तिन्ही ऋतूंत अम्मा सृष्टीची पर्वा न करता आपले काम करी. जिकडेतिकडे उन्हाने हाहाकार करून सोडावा आणि अशा वेळी दुपारी अम्माने डोक्यावर पिठाचे टोपले घेऊन दुसऱ्याचे दळण अनवाणी पोचवावे. आठ आठ दिवस पावसाने झोड करून सोडावी. पक्ष्यांना घरट्यातून बाहेर निघण्यास अशक्य व्हावे, पण अम्मा मात्र आपले काम करीत असे. थंडी, ऊन्ह, पाऊस यांवर जणू तिने मात केली होती. आमची आई तिला इतके कष्ट न करता घरी येऊन राहण्यास सांगे; पण कोणाचे घरी असे खाणे तिला पसंत नसे. ती आपले काम नित्य करी व त्यात बाध आणणाऱ्या वस्तूंना फाजील महत्त्व ती देत नसे. आपले काम करणे यालाच ती कर्तव्य समजत असे आणि ते ती अविरत करीत असे.

आज मी बऱ्याच पहाटे उठलो होतो – नव्हे, मला उठविण्यात आले होते. उठल्याबरोबर मी स्नान केले आणि आम्ही सर्व शेजारच्या पाताळेश्वराला जाऊन आलो. आज शिवरात्र होती. त्या दिवशी मी आपले सर्व तत्त्वज्ञान एका ठिकाणी केले व त्याची एकदा उजळणी केली; पण भुकेमुळे माझा जीव काही स्वस्थ राहीना; कितीही

फराळ केला तरी त्याला भोजनाची सर थोडीच येणार आहे? मी एकादशी केली आणि दिवसभर चरलो; पण अंतरीचा तळीराम काही गार होईना. खोटे कशास सांगू? संयमनाचा असा एखादा प्रसंग आला की तेथे माझे तत्त्वज्ञान हटकून लंगडे पडे.

त्या दिवशी दुपारी बाराची गोष्ट असेल. मी, आई, इंदू, घरात शेंगदाणे निवडीत होतो, इंदू फार लबाड. ती आपले शेंगदाणे निवडी, पण आईचे लक्ष जरा इकडेतिकडे गेले की तिच्या हातचे दाणे ताटात पडण्याऐवजी तिच्या पोटात पडत असत. मला असे करताच येत नव्हते; कारण मी मोठा. पोटात कितीही काहूर माजले, तरीपण मी मोठा पडलो ना? मग तसे कसे करावे? त्या वेळी मला असे वाटे की—

लहानपण अम्हां द्यावे देवाजीने ।
इंदूसारखे दाणे । खायासाठी ॥ १ ॥

पण मीच कधी देवाची पूजा केली नाही, तर देव मला प्रसन्न होईल कसा?

आमचे काम चाललेच होते. त्या वेळी मी मोठेच संयमन केले. अंगावर मोठेपणाचे दडपण होते, तरी येवढे संयमन करणे काही लहानसहान गोष्ट नाही!

माझे निवडून संपल्यावर मी जाऊ लागलो. तितक्यात अम्मा आमच्या घरी आली. आज आईला 'जागोबाला' जावयाचे असल्यामुळे वरकाम करावयास तिने अम्माला बोलाविले होते. ती येताच मी तिला विचारले—

"अम्मा, आज तुला उपवास नाही?"

अम्मा नेहमीप्रमाणे या वेळेसही हसली. मी उत्तराच्या अपेक्षेने तिच्याकडे पाहू लागलो. ती म्हणाली—

"कशाचा उपवास भैय्या. जिस दिन खानेको नहीं मिला, उस दिन उपासही है। आज कशाचा उपवास?"

या तिच्या उत्तराने मी अगदी गारच झालो. स्वतःचे तत्त्वज्ञान अम्माने आपल्या वर्तनाच्या परिसावर घासून उजळ केले होते. तिचे तत्त्वज्ञान कितीही क्षुल्लक असो, पण माणसाला क्षणभर स्तंभित करण्याची जादू त्यात खास भरली होती. आमच्या असल्या उपवासापेक्षा तिचा ठणठणीत उपवास–तो कोणत्याही दिवशीचा का असेना– परमेश्वराच्या दरबारी जास्त पुण्याईचा ठरत असेल नाही? मी तेथून उठलो व माझ्या मनाला एकदम समाधान वाटले.

पुढे संयमन — कर्तव्य या लढ्यात माझे मन बराच वेळ घोटाळत होते; पण येवढे मात्र खरे की, त्या दिवसापासून मी गणोबाची शेकोटी सोडली.

टीचभर किंवा थोडे मोठे असले तरी वराक अशा पोटासाठीच अम्मा थंडी, वारे, पाऊस सहन करीत होती का?

१।८।१९३२

२

सव्वा पाच आणे

आज रविवार आहे. मी फिरावयास बाहेर पडलो आहे. मला नेहमी सभोवार पाहण्याची सवय आहे. मी सर्वीकडे अगदी कुतूहलतेने पाहात समोर जात आहे. मला अचानक कधीकधी एखाद्या माणसाशी टक्कर घ्यावी लागत आहे. तरी पण मी समोर चाललो आहे.

मी येथे उभा आहे. माझ्या आजूबाजूला आता फारसे कोणी दिसत नाही. समोरच्या तलावात* अक्राळविक्राळ आकृती दिसत असून ते पाणी आता काळसर दिसत आहे; कारण आता सायंकाळ होत आली आहे.

मी तेथेच एका दगडावर बसलो आहे. माझी सवय मला स्वस्थ बसू देत नाही. मी आजूबाजूला नजर फिरवीत आहे. मला माझ्यापासून सरासरी अकरा यार्डांवर काहीसे दिसत आहे. मी जास्त चौकसपणाने एवढाले डोळे करून त्याकडे पाहात आहे.

तो तेथेच स्वस्थ बसला होता. त्याला दगडावर बसण्याची आवश्यकता वाटत नाही. त्याच्याजवळ एक भलेमोठे टोपले होते आणि तो त्यातच बसला होता.

त्याच्या अंगात काळ्या रेघांचा, जाड आणि कोटवजा असा एक सदरा होता. त्याने एक फडके डोक्यास गुंडाळले होते आणि तेवढ्याच आणखी एका फडक्याने त्याची लज्जा रक्षण केली होती. त्याच्या पायांत काहीच नव्हते.

तो वर्णाने निमगोरा होता. त्याचे केस अस्ताव्यस्त वाढले होते. तो ते वारंवार खाजवीत होता. दिवसभर आलेल्या घामाने ते चिकट झाले होते. त्याचा चेहरा काळवंडून गेला होता.

तो एक साधारण प्रतीचा, मजबूत आणि वयस्क असा हमाल होता. त्याने दिवसभर काम केले होते आणि थकवा घालवावा म्हणून तो सहज बसला होता. त्याला तेथील झाडांची, निळ्या आकाशाची आणि काळसर पाण्याची किंमत वाटत नव्हती. त्याला विश्रांती हवी होती आणि स्वतःच्या भल्या मोठ्या टोपल्यात बसून ती त्याला मिळत होती.

आता त्याचे डोळे लागत होते. तो अशा करकरीत तिन्ही सांजेला निजू पाहात होता. मी त्याला हाक मारली. त्याने अगदी उत्कंठेने डोळे उघडून माझ्याकडे पाहिले ! काही ओझे न्यावयासच सांगणार होतो ? मी त्याला काहीच सांगणार नव्हतो. उलट त्याच्याकडूनच मला माहिती काढावयाची होती.

---

* नागपूरचा 'शुक्रवार' तलाव.

इतक्या थकलेल्या जिवाला पुन्हा हमाली करण्याची ताकद येते अं ! ती कोठून येते ? ती सहज येते का ? अथवा आणावी लागते ? त्याचे उत्तर सोपे आहे. ते मी देत नाही.

त्याला तीन मुले होती. त्याचा परिवार सर्व मिळून पंधरा माणसांचा होता. सर्वांच्या तोंडांत घास घालण्याची जबाबदारी तीन मुले आणि तो यांच्यावर होती. त्यांच्या बायकाही मधून मधून रोजमुरा करीत; पण त्याने काही फारशी तोंडमिळवणी होत नव्हती.

मुले हमाली करीत होती. पंचविशी उलटून गेली, तरी बापाची आज्ञा शिरसावंद्य मानावयास त्यांची तयारी होती. ती बिचारी जिवापाड मेहनत करून काही पैसे घरी आणीत. त्यांतून पंधरा माणसांचे त्या दिवशीचे अन्न निघे. दुसरा दिवस रामाचा ! त्यांचा नाही !

हमाल बसला होता. त्याला आज सव्वा पाच आणे मिळाले होते. ते त्याने हातीच धरिले होते. जणू काय ते त्याच्याजवळ अर्ध्या तासाहून अधिक वेळ राहात नाहीत, याची त्याला स्पष्ट जाणीव होती.

त्याचे वय आज अठ्ठेचाळीस वर्षांचे आहे. त्याने जगात अठ्ठेचाळीस वर्षे श्रम केले. पंधरा माणसांना ओलेकोरडे खाऊ घातले. देशाची संतती उपाशी मरू दिली नाही. अठ्ठेचाळीस वर्षे ! इतक्या वर्षांअखेर त्याला काय मिळाले ? सव्वा पाच आणे !

आजचा दिवस त्याचा होता. आज त्याच्याजवळ सव्वा पाच आणे होते. उद्याचा दिवस रामाचा, त्याचा नाही !

त्याला कधीकाळी एखादी इच्छा होत असेल, त्याच्या हयातीत म्हणजे गेल्या अठ्ठेचाळीस वर्षांत जगाने काय कमविले, हे पाहावेसे त्याला वाटत असेल, किंवा थकलेल्या जिवास विश्रांती म्हणून काहीतरी सुखद असे त्याला हवे असेल; पण ते त्याला घेता येणार नाही; पाहता येणार नाही. त्याच्याजवळ पैसे नाहीत. त्याच्या घरी माणसे किती ? पंधरा ! आणि पैसे ? सव्वा पाच आणेच फक्त !

स्वतःच्या मुलांकरिता काही करून ठेवावे आणि त्यांच्या सुखात भर टाकावी असे त्याला वाटत असेल; पण ते होईल कसे ? सव्वा पाच आण्यांत तो करील तरी काय काय ?

किंवा त्याची अशीही मनीषा असेल की, आपणाला एखादे वेळी चांगले गोडधोड मिळावे; पण तेही विचाऱ्याला शक्य नाही. आजपर्यंत त्याला ते शक्य झाले नाही. पुढे होईल का ? पण आजचाच दिवस त्याचा ! उद्या रामाचा ! त्याचा नाही !

आईचे दूध तुटल्यावर तो आज सत्तेचाळीस वर्षांपासून भाकरच खात आलेला होता आणि आजही त्याने भाकरच खाल्ली होती. आजचे सव्वा पाच आणेसुद्धा जेव्हा

कधी त्याला मिळत नव्हते तो दिवस त्याला भाकरीविना काढावा लागे. अशा दिवशी होणारा तोच त्याच्या अन्नातील बदल ! दुसरा नाही !

तो गरीब होता ! दरिद्री होता ! आणि आज त्याला अठराविश्वे दारिद्र्य दिसत होते ! अठेचाळीस वर्षे जगात घालविल्यावर मिळाले काय ? तर फक्त सव्वा पाच आणे !

तो तेथून उठून जाऊ लागला. मी त्याला एक चवली देऊ लागलो, पण ती घेणे त्याचे ब्रीद नव्हते. कष्ट न करिता फुकट असा एकही छदाम या अठेचाळीस वर्षांत त्याने घेतला नव्हता. त्याच्या हाती सव्वा पाच आणे होते आणि ते त्याच्या घामाने भिजून गेले होते.

तो तसाच उठून चालता झाला.

मी आता परत फिरलो असून विचार करीत घरी जात आहे.

जगात काय आहे ? जगाची करमणूक कशाने होते ? पैशाच्या आवाजाने ! गरिबांचे जग आहे काय ? नाही ! गरिबांना जग काय देते ? फक्त सव्वा पाच आणे !

१८।९।१९३२

३

ते दिवस

पुष्कळ लोक एक दुःखोद्गार काढतात आणि म्हणतात, " काय ते विद्यार्थी-दशेतील दिवस ! खरंच बुवा किती लवकर गेले ! काय मौज ! अजून त्यांचं स्मरण झालं म्हणजे वाटतं, की त्याच दशेत परमेश्वराने आपणांस ठेवावं. "

तथापी मी असं कधीच म्हणणार नाही !

यावरून असा मात्र कुणी कयास बांधू नये, की आज मी त्यापेक्षा जास्त सुखात आहे. मला भरभक्कम पगार सुद्धा नाही. मी एक साधा मिलमधील कारकून आहे. सकाळी आठ वाजल्यापासून सारखं रखडत राहून देखील " ते दिवस मजेचे होते " असं माझ्याने म्हणवत नाही.

मी असेन बारा वर्षांचा. तेव्हा मी इंग्रजी पहिलीत प्रवेश केला. सुरुवातीला एकदम तो इंग्रजी कारखाना पाहून मला बुजल्यासारखं झालं नि मी इंग्रजी भापेला जरा वचकूनच वागू लागलो. त्यामुळे माझा अभ्यास चांगला राहून मास्तर माझ्यावर नेहमी खूष असत. पुढे पुढे अभ्यासाचं मला फारसं भय वाटेनासं झालं.

तसा मी मराठी शाळेत देखील हुशार होतो. पण मला वाटे, इंग्रजी शाळेत शिकणं म्हणजे नुसतं हुशार म्हणून गाजणं नव्हे. दुसरे,— दुसरेच काही तरी! अशी भावना होण्याला काय कारणे झाली असतील हे मला स्पष्ट सांगता येत नाही.

काही तरी नवीन! नावीन्य मी पाहात होतो आणि जसजसा एकेक वर्ग मी चढू लागलो तसतसा हा शोध जास्त कसोशीने होऊ लागला. त्या वेळी आमच्या शाळेत 'शान' बरीच बोकाळली होती. म्हणजे शान हा आजकालचा शब्द नव्हे हे यावरून सहज दिसून येण्यासारखे आहे. शानचे व्यापकत्व किती आहे हे मला सांगता येत नाही. अर्थ मात्र कळतो आणि माझी खात्री आहे, की तो वाचकांना – निदान विद्यार्थी-वाचकांना तरी – चांगलाच कळतो. मी 'शान'च्या सदरात खालील गोष्टींचा समावेश करीत असे :

१. मी सुंदर आहे अशी फाजील भावना होऊ लागणे !

२. अशी एकदा भावना झाली, की सौंदर्यवर्धनाची लालसा वाटून त्यासाठी कृत्रिम उपायांची आवश्यकता भासणे.

३. आणि या सौंदर्यवर्धनास देशी उपाय म्हणून चालणे, बोलणे, हसणे, रागावणे, रडणे व लाडणे वगैरेची तऱ्हा बदलविणे !

ह्या गोष्टी मला माझ्या व्यवसायबंधूंकडून सहजासहजी कळत होत्या. माझी देखील हौस मी वाढविली. मला घरची परिस्थिती अनुकूल होती. आई लहानपणीच वारल्यामुळे आईविना पोर म्हणून बाबांनी मला कधीच कमी पडू दिले नाही आणि अगदी गरिबीत देखील त्यांनी दोनशे रुपये मागे टाकले होते.

वाढता व्याप म्हणून बाबांजवळ मी ३ रु. महिना 'जादा' मागितला. त्यांनीही तो देण्याचे कबूल केले, कारण परीक्षेत माझा निकाल चांगला लागला होता आणि परीक्षेच्या मार्कांशिवाय माझ्याकडे विशेष लक्ष देण्याची बाबांना आवश्यकता वाटत नव्हती.

ती खटाव मकनजीची ४॥ रु. किंमतीची धोतरजोडी ! जरा अघळपघळ नेसून आणि पंखे काढून चालले म्हणजे बरे वाटे.

ते लांब केस ! जरा साबू वगैरे लावल्यामुळे जमून बसत. टोपीचा खर्च साबूकडे आणि तेलाकडे.

मी शान करू लागलो !

मला वाटे मी खूप सुंदर आहे ! आता मी इंग्रजी सहावीत होतो.

माझे सहाध्यायी माझ्या भोवती जमू लागले. बिचाऱ्यांकरिता चार दोन पैसे खर्च करणे मला माझे कर्तव्य वाटे. मी थोडा थोडा खर्च करू लागलो होतो. थोड्याच दिवसांत आम्ही एक क्लब स्थापन केला. क्लबचे ऑफिस माझ्याच खोलीवर असल्यामुळे अभ्यास थोडा मागे पडे; पण मागील 'इम्प्रेशन'ने ते सर्व निभून जाई.

असा क्लब वगैरे स्थापन झाला म्हणजे चळवळींस सुरुवात होते व मग प्रकरण भलतेच लांबते !

बिचारे शिक्षक ! त्यांना वाटे आम्ही खूप चांगले निघून राष्ट्राचे आधारस्तंभ व्हावे. पण येथे एक गोष्ट सांगून ठेवतो. आमच्या सर्व मास्तरांच्या जन्मतारखा विसाव्या शतकातील नव्हत्या. त्यांना काय कल्पना बदलत्या काळाची ? त्यांनी आगरकर-चिपळूणकरांची पिढी पाहिली होती. शिक्षकांना वाटे ते योग्य करतात. आम्हांला वाटे आम्ही चांगले करतो !

ते आमच्या शाळेचे स्नेहसंमेलन ! फारच धडाक्यात झाले. आमच्या क्लबातला देशपांडे हा जनरल सेक्रेटरी होता. मग काय ?

पासिंग शो ! काही वेगळीच लज्जत असते बुवा !

दिवसातून तीस कप चहा ! तरी देखील प्रकृती म्हणण्यासारखी बिघडत नाही. थोडे दिवस चैन झाली क्लबात पैशाची ! आम्ही एक नाटकही करून दाखविले. सर्वांनी तारीफ केली आमच्या नाटकाची !

गॅदरिंगनंतर तीन महिन्यांनी !

मी नापास झालो. पण इम्प्रेशनमुळे प्रमोट झालो. भाग्य माझे !

गोष्टी फार थरास गेल्या होत्या. मधल्या भानगडी सांगण्यापेक्षा पुढे जाणे बरे ! वडिलांना मी पास झाल्याचे पत्र टाकले होते व त्यातच सुटीत मी पंधरा दिवस उगीरा येईन म्हणून लिहिले होते. कारण—

मी एका नाटक कंपनीत जाण्याचा विचार करीत होतो. माझ्याबरोबर माझा एक दोस्त येणार होता. बाबांनी जमविलेले २०० रु. मला जन्माला थोडेच पुरणार होते ? काही तरी करणे अवश्य ! मग आतापासूनच मार्गास लागणे बरे ! दोनशे रुपयांत कॉलेजचे पहिले वर्ष देखील मोठ्या मुष्किलीत जायचे. मग भलतीच महत्त्वाकांक्षा का ? बाबांना न विचारता मी जाण्याचे ठरविले. जम बसलाच तर परत यावयास नाक पाहिजे होते ना ? मी निघालो. बाबांना नंतर सविस्तर पत्र पाठविण्याचे ठरविले होते.

वरील हकीकतीनंतर सहा महिन्यांची गोष्ट ! मी वर्धेच्या गाडीत बसून परत येत होतो. वर्धेला असतानाच आमची कंपनी बुडाली होती. मला तिने काही दिवस 'ट्रायल' वर तीस रुपये दरमहा देण्याचे ठरविले होते. माझ्या ट्रायलचा शेवटचा दिवस येण्यापूर्वीच ती बुडाली.

आमच्या महत्त्वाकांक्षा पार बुडाल्या. दुसरी कंपनी काढण्याच्या विचारात मॅनेजरसाहेब गुंतले होते. इतक्यात बाबा फार आजारी असल्याची तार मला आली. मी परत फिरलो. मला नीटपणे डोळे उघडून व डोके स्थिर ठेवून विचार करावयास वेळ

मिळाला. अशी काही परिस्थिती अंगावर आली म्हणजे मनुष्य शहाणा होत असतो. कारण त्या वेळीं त्याला विचार करावा लागतो.

हल्ली ! मी हा असा आहे !

माझे बाबा ! माझ्यासाठी मरमर करून अखेर एक दिवस खरोखरीच मरण पावले !

मी ! रोज सकाळी आठ वाजता काही न खाता पोळ्यांचा डबा घेऊन मिलमध्ये जात असतो. विद्यार्थीदशेत म्हणजे मागच्या वर्षी घेतलेल्या खटावमकनजीच्या धोतरजोड्या अजून मला पुरून उरतात. माझ्या आजच्या सृष्टीत मिलचे मॅनेजर देखील इतक्या तलम धोतरजोड्या वापरीत नाहीत ! लांबसडक केस ठेवणे मला आता परवडत नाही !

माझे शिक्षक ! त्यांनी चळवळ्यांच्या वळवळीने फसू नये एवढीच परमेश्वराजवळ माझी प्रार्थना आहे !

माझी शाळा ! तिच्यावरून जाताना मी रोज तिच्याकडे पाहातो. ती आहे तशीच आहे. तिच्यातून भावी नागरिक तयार होत असतात.

माझे मित्र ! त्यांनी माझ्याजवळून बरेच लाटले होते. भेटतात कधी कधी सायकलवर ऐटीने जाताना ! त्यांनी केला तर मी देखील त्यांना नमस्कार करतो. नाहीतर मी आपला इकडे तिकडे पाहून जसे काही आपले लक्षच नाही असे दाखवून वेळ मारून नेतो.

मिलचा मॅनेजर मला रु. २५ दरमहा देतो. आज सर्व खर्च जाऊन माझ्याजवळ बरेच पैसे उरतात. मागील महिन्यापासून मी पुस्तके विकत घ्यावयाचे ठरविले आहे. साडेसात रुपयांची पुस्तके मी आता जमविली आहेत. या महिन्यात घेतलेल्या पुस्तकांना कव्हर लावताना काल सहजपणे मला माझी विद्यार्थीदशा आठवली !

४ । ३ । ३३

४

काचेची किमया

सहा वर्षांचा देखील नव्हतो मी तेव्हा. नुकताच कोठे शाळेत जाऊ लागलो होतो. गणूदादा इंग्रजी दुसरीत होता. एखादा नवीन शब्द माहीत झाला म्हणजे त्याचा पुनःपुन्हा उच्चार करण्यात, आणि त्याचा अर्थ ताईला अन् मला सांगण्यात त्याला मोठी मौज वाटे.

नुकताच तो आपल्या पुस्तकातला " रामू आणि न्यायाधीश " हा धडा शिकला होता. शाळेतून घरी येताच गणूदादाने मला सांगितले,

" आपल्यापेक्षा मोठ्या असलेल्या माणसाला नमस्कार करावयाचा असल्यास इंग्रजीत त्याला ' गुड् मॉर्निंग् ' म्हणतात.

झाले ! आई, ताई, गणूदादा या सर्वांना मी सकाळ-संध्याकाळ ' गुड् मॉर्निंग् ' करायचा ! बाबाच काय ते एक सुटले होते. कारण...!

जूलिया बरीच उंच होती, खूप गोरी होती आणि ती सुरेख पण होती. सायकलवरून इकडून तिकडे मारे मिरवत असे नेहमी. थोरामोठ्यांची मुलगी. बाप जिल्हाधिकारी. तिला कशाची वाण असणार ? तिचा बंगला अगदी शहराचे बाहेर - फार दूर होता. संध्याकाळी फिरावयास जाताना ती शहराकडे — शहरात नाही — येत असे.

एकदा संध्याकाळी जुलिया येत होती. मी जात होतो. मी तिच्याकडे पाहिले. तिने माझ्याकडे पाहिले मी तिला ' गुड् मॉर्निंग् ' केले; कारण ती माझ्यापेक्षा मोठी होती. आमच्या ताईइतकी - किंबहुना जास्त - सुंदर होती.

सौंदर्याकडे पाहण्याची माणसाला चटकच असते. तिने नुसते हसून माझ्याकडे पाहिले.

ती मला इतकी चांगली दिसे, की मला तिच्याशी नेहमीच बोलावेसे वाटे.

ती मला येताना दिसे. मी तिला जाताना दिसे. किती तरी दिवस आमचे ' गुड् मॉर्निंग् ' चालले होते.

एका गुरुवारी संध्याकाळी ती अशीच मला भेटली. रोजचा ' गुड् मॉर्निंग् ' चा विधी संपल्यावर ती — त्याच दिवशी तिला काय वाटले कोण जाणे ! — सायकलवरून खाली उतरली आणि माझ्याजवळ आली.

" तुझं नाव काय आहे ? "

आँ ! अरे हिला मराठी येते ? मी आश्चर्याने तिच्याकडे नुसता पाहत राहिलो. तिने पुन्हा विचारले.

" क्षितीन्द्र ! " मी उत्तर दिले.

" आमच्या घरी येतोस ? "

मी ' होय ' म्हणू शकलो नाही आणि ' नाही ' म्हणणे माझ्या जिवावर आले. तिने मला सायकलवर बसविले व सायकल आपल्या बंगल्याकडे वळविली !

तिचा तो झब्बूदार कुत्रा फार चांगला होता. आम्ही खाली उतरताच तो आमच्या जवळ आला. तिने मला संत्री दिली, पेररमिट दिले व थोडा वेळ गप्पागोष्टी केल्यावर तिने मला दोन तीन फर्लांगांवर असलेल्या आमच्या बंगल्यावर आणून सोडून दिले.

जूलिया माझ्या ओळखीची झाली. माझ्याशी मराठी बोलण्याइतके ज्ञान तिने आपला म्हातारा शिपाई विठू याच्याकडून मिळविले होते.

आज मी नवीन ज्ञान शिकलो होतो. ' सिस्टर ' म्हणजे बहीण !

जूलिया संध्याकाळीं भेटणारच होती. तिची भाषाच इंग्रजी ! मी तिला विचारावयाचे ठरविले.

नेहमीप्रमाणे आम्ही एका हिरवळीवर जाऊन बसलो. मी एकदम तिला प्रश्न केला.

" जूली ! ' सिस्टर' म्हणजे काय ? " का कोण जाणे, तिने झटकन् उत्तर दिले नाही. थोडा वेळ थांवून ती म्हणाली, " सिस्टर म्हणजे भाई. "

मला वाटले की हे उत्तर देताना ती मिष्किलपणे हसत असावी.

" भँई ! " मी तिला चिडविले. " अम ! ' सिस्टर ' म्हणजे बहीण. " मी दुरुस्ती केली.

" छे, मुळीच नाही. सिस्टर म्हणजे भाऊ ! " ती म्हणाली. मी समोरच बसलो होतो. तिने माझ्याकडे पाहून नाक उडविले, कपाळाला लाडक्या आठ्या पडल्या, माझे गाल धरले, मला जवळ ओढले व " भाऊ, भाऊ, अग भाऊ " करीत ती माझे मुके घेऊ लागली.

असा काही प्रकार झाला म्हणजे मी शेफारून जाई. घरी ताईने काही म्हटले म्हणजे मी म्हणे, " अग जा ! तुझी आता मला गरज नाही. " आणि खरंच ! गरज भासण्याची वेळ फक्त स्नान करून आल्यावर केस नीट करून घेताना येई तेवढीच.

जूलियाच्या घरी जाण्याची आता मला सवय लागून गेली होती. मी नेहमी सुटीच्या दिवशी तिच्याकडे जाई.

ती मला कधी कधी रडताना दिसे. ती रड रड रडे. मध्येच मी आलो म्हणजे मला जवळ घेई, आणखी रडे.

काही वेळ रडल्यावर थकून जात असे बिचारी ! पुन्हा आम्ही फिरावयास जात असू !

ती का रडे हे मला त्या वेळीं सांगून समजत नसे. आता सर्व नीट कळते. जूलियेला बहीण नव्हती, भाऊ नव्हता व आई फार लवकर तिला सोडून गेली होती. सर्व करील ते बाप !

तो देखील बिचारा कर्तव्याने – जबाबदारीने – बांधला गेला होता. आणि पुष्कळ वेळीं जूलियेचे डोळ्याचे अश्रू स्वतःच्या हाताने पुसण्यापेक्षा त्याला ते टेबलावरील टिपकागदानेच पुसावे लागत !'

जगात प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असते. त्याचा संबंध पोटाशी येतो.

मी तिच्याकडे गेलो नाही म्हणजे ती येऊन मला घेऊन जाई. एरवी मी तिच्याकडे जात असेच !

काल गणूदादाने कॉपिंग पेन्सिल माझ्या जिभेवर उमटविली होती. ही गंमत बरी आहे म्हणून रडून मी तो तुकडा गणूदादाजवळून मागितला. येऊन जाऊन गंमत करावयाची कुणाशी ? सर्व मेतकूट जूलियेशी होते ! !

त्या दिवशी तिला बरे वाटत नव्हते म्हणून मला बिठू घेऊन गेला. ती निजली होती. मला तिने जवळ बोलाविले – अगदी घट्ट धरून ठेवले व नेहमीप्रमाणे माझे गाल पिळले, हसऱ्या मुलांना रडविण्यात पुष्कळांना मौज वाटते, तशीच माझे गाल्गुच्चे घेऊन ते गुलाबी झालेले पाहण्यात तिला मौज वाटे.

त्या दिवशीही ती हसली !

" जूली ! तुला एक गंमत दाखवितो. तू पाहू नको बरं का ! "

मी तिच्या उजव्या गालाजवळ तोंड नेले. त्यावर तोंडाने वाफारा सोडला. तिच्या डोळ्यावर एक हात ठेवला व हळूच तो तुकडा काढून मी तिचे नाव लिहिले. तिच्या पिवळ्या गुलाबी गालावर ते खूप जांभळे उमटले. मी हसू लागलो. नंतर जवळचा आरसा घेऊन तिचे ' रूप ' दाखविले !

तिने ते रूप पाहिले. ' हूँ ' करून नाक उडविले. माझ्या हातून आरसा घेतला व तिच्या गालावर माझा गाल ठेवून ती आरशात पाहू लागली. आम्ही दोघेही एकाच वर्णाची होतो. ती आजारामुळे थोडी फिक्कट दिसत होती. बराच वेळ आम्ही तसेच राहिलो. ती हसली व एकदम तिच्या डोळ्यांतून पाणी आले. ती रडली म्हणून मी रडलो.

त्या दिवशी रात्री मी तेथेच होतो. माझ्या घरी विठू सांगून आला होता. त्या रात्री तिला बऱ्याच गोष्टी सांगितल्या. आमची ताई कशी आहे, ती मला कशी रागावते, तू माझ्याबर रागावत नाहीस, तू चांगली आहेस ! !...एक होता चांदोबा, त्याचे घरी एकदा लग्न होते. सर्व चांदण्या तेथे गेल्या होत्या...!

माझी गोष्ट सांगता सांगताच मला झोप लागली !

असे बरेच दिवस चालले. मला जूलीवाचून बरे वाटत नसे व तिला क्षितिन्-वाचून चैन पडत नसे – पण...!

एक दिवस जूलियेची मावशी आली व तिला दूर दूर,–ज्या देशाचा त्या वेळी मला भूगोल देखील माहीत नव्हता अशा ठिकाणी घेऊन गेली ! मी तिला एका सुंदर फुलझाडाचे चित्र बक्षीस दिले होते. तिने मला जाताना एक जादूची काच बक्षीस दिली होती. त्या काचेतून वस्तू फार मोठ्या दिसत असत.

आता तिच्या देशाचा भूगोल मास्तर मला शिकवितात. ते म्हणतात, " या इथे टेम्स नदीवर लंडन शहर आहे. "

" सर, तेथे जूलियेचे घर असेल नाही ! " मला हा प्रश्न विचारावा असे कितीदा वाटे. पण !—पुन्हा वाटे विचारूच नये !

वर्षांमागून वर्षे जात आहेत. मला आता सर्व समजते. भाऊ नसला म्हणजे बहीण का रडते ! बहिणीच्या अभावी भावांना उदास का वाटते, वगैरे सर्व कळते मला आता ! आणि असे एखादे वेळी वाटले म्हणजे जूलिया माझ्यासमोर उभी राहते.

अठरा वर्षांच्या, रूपाने सुंदर, बांध्याने उंच अशा कित्येक मुली सायकलवर जाताना मला दिसतात. एके काळी जूली अशीच जात होती व माझ्याकडे पाहून हसत मला बरोबर नेत होती. या दुसऱ्या माझ्याकडे पाहत देखील नाहीत !

जूली कोठे असेल ? तिला माझी आठवण होत असेल का ? तिच्या गालावर मी अनेकदा ठेवलेला गाल ! तिला सांगितलेल्या गोष्टी...! या सर्वांची आठवण नसेल का तिला ? एकाही प्रश्नाचे उत्तर मला निश्चितपणे देता येत नाही. आणि असे प्रश्न उपस्थित झाले म्हणजे मनाची स्थिती फार केविलवाणी होते.

जूली ! तुला मी विसरलो नाही. उभ्या जन्माची हुरहुर लावली आहेस तू ! पण !—त्यातही आनंद आहे. दुःखातच मागील सुख आठवते आणि हळूहळू त्याची किंमत वाढत जाते. मग असेही वाटते की ते अमोल आहे म्हणून !

आमच्या ताईसाहेब ! त्या देखील आता आमच्या जवळून दूर गेल्या ! मला वाटते, तिने मला खूप पत्रे पाठवावीत, पण ती – तिला काय काम असते माहीत नाही – कधी कधी फार उशीर करते उत्तर धाडायला.

जूली एकदम आठवते ती अशाच वेळेला ! अशी आठवण झाली म्हणजे मी टेबलावर डोके ठेवून स्वस्थ पडतो. काही वेळ असाच जातो. नंतर अनायासे हात खिशात जातो व ती जूलीने दिलेली काच घेऊन येतो. दुसरा हात टेबलावर आंथरलेल्या कागदावर लिहितो —

" जूलिया ! "

ती काच मी नीट धरतो. त्या अक्षरांवर ठेवतो. नंतर ती उचलतो. त्या काचेची किमया सुरू होते. तो कागद जसजसा दूर न्यावा तसतशी ती अक्षरे मोठी मोठी होत जातात—

" जूलिया ! "

" जूलिया ! ! "

" जूलिया ! ! ! "

आणि नंतर ती इतकी मोठी होतात की तेथे काहीच दिसत नाही !

३।४।३३

५

अमरवेल

"तुला तरी वाटतं किनई असं ?"

"वाटतंय खरं, पण पुष्कळ गोष्टी अशा असतात, की त्या पाहणाऱ्यालाच ऐकू येतात." मी उत्तर दिले.

"ते खरं रे, पण त्यांचं जर प्रेम होतं तर मग रविकान्तने लग्न कसं केलं ?"

"काय हरकत आहे ? आपल्या जीवनात हवी असलेली गोष्ट जर आपल्याला मिळाली नाही तर वाईट वाटून घेऊन रडत बसण्यात काय अर्थ आहे ?"

"परंतु त्याच्या लग्नाला आडकाठी तरी कोणती होती ?"

"तिच्या बापाची इच्छा ! त्या वेळी..."

"मग आत्ताच असं दोन तीन वर्षांत काय झालं ? रविकान्तने सिंधूशी सुखाचा संसारही केला. त्याला दोन मुलं पण झाली आणि आता हे मध्येच..."

हे कोडं त्याला एकट्यालाच पडले नव्हते, पुष्कळांना जरा विचित्र वाटले. बाबासाहेबांनी स्वतःची इतकी शिकलेली सुंदर आणि हुशार मुलगी रविकान्तला दिली कशी ? आणि तीही त्याला दोन मुले असताना ? दोन वर्षांपूर्वी याच बाबासाहेबांनी तिला खूप खूप शिकवायचे म्हणून तिचे लग्न लांबणीवर टाकले होते आणि आता एकदमच...!

"हीच रे ती मुलगी !" टांग्यातून उतरत असलेल्या मुलीकडे बोट दाखवून तो म्हणाला.

"यंदा पहिल्या वर्गात पास झाली ती का ?" दुसऱ्याने विचारले.

"हं ! नि अशी तशी नाहीं, संस्कृतमध्ये प्रावीण्य मिळविलं तिने आणि शिवाय आपल्या कॉलेजातून पहिलं बक्षीस मिळालं ते वेगळंच."

"मग आता काय, बी. ए. मध्ये तर अगदी..."

"अरे, आता कसचं कॉलेज ! झालं आता. लग्नाच्या भानगडी मागं लागल्या म्हणजे..."

अमरवेल : एक वेल, जिला मूळ नसते. झाडावर टाकल्यास त्या झाडाचे शोषण करून स्वत: जगते. झाड सुकून जाते. खाली 'रहिम' कवीचा दोहा देत आहे—

अमर बेलि बिन मूल की प्रतिपालत है ताहि
रहिमन ऐसे प्रभुहिं तजि ढूँढत फिरियै काहि ॥

अर्थ—विनामुळाच्या अमरवेलीचे प्रतिपालन देखील ईश्वर करतो. अशा प्रभूला सोडून मी इतर कुठे शोधत फिरू ?

" असंही आहे का ? म्हणजे लग्नाकरताच होतं वाटतं हे सारं ! इतक्या हुशार मुलीला निदान बी. ए. तरी करून घ्यायचं होतं. नाही का ? "

" अरे, अगदी तुझ्यासारखाच विचार होता तिच्या बापाचा. तो तर तिला परदेशात पाठवणार होता शिकायला. "

" मग फिसकटलं कुठे ! कुणावर प्रेम वगैरे बसलं होतं वाटतं बयाचं, की दुसरा कुणी तिच्यावर प्रेम करायला लागला ? झालं काय ? "

" वेड्या, एकाचंच प्रेम नव्हतं. सुंदर आणि हुशार मुलीवर कुणाचं प्रेम बसत नाहीं ? म्हणून तर तिच्या बापाने तिला काढून कॉलेजच्या बाहेरच्या तरुणाशी तिचं लग्न केलं ! ज्याच्या पदरात पडली तो भाग्यवान् दिसतो वेटा... "

" ते असो रे. त्याचं काय करायचंय् आपल्याला. आपल्या कॉलेजात काही प्रकरणं झाली का ? "

" तुला काय पंचाईत त्याची ? "

" का ? अगदी पाठच्या भावासारखा कड घेऊन बोलतो आहेस तिची ! काय विचार आहे राजश्री ? "

" लेका मन्या... "

इतक्यात तासाची घंटा झाल्यामुळे त्यांना झाडाखालून उठून क्लासला जावे लागले व ते बोलणे तितकेच राहिले.

काय असेल ते असो, पण लतिकेने लिहिलेली तेवढीच पानें बाबासाहेबांना दिसली. मग तिचा उद्देशच तसा होता किंवा काय नकळे. बाबासाहेबांनी ती वाचली...

" लोकांना वाटतं मी इंटर पास झाले; पण मला तो आनंद अनुभवता येतो का ? त्या दिवशी कॉलेजात एवढा गौरव झाला माझा. पण मला काय वाटलं ? दोन वर्षांपूर्वीची मी असते तर मला खात्रीने आनंद झाला असता.

" दोन वर्षांपूर्वी बाबांनी माझ्या लग्नाच्या गोष्टी केल्या नि लागलीच बंद केल्या. मला त्या दिशेने विचार करावयास लावलं नि एकदम माझी निराशा केली. मला सुद्धा वाटत होतं बाबा म्हणतात तसं, की आपण खूप खूप शिकावं म्हणून. पण ते केव्हा ? लहानपणापासूनच्या आशांना पालवी फुटायचा प्रसंग बाबांनी आणायचा नव्हता. रविकान्तचं नाव काढायचं नव्हतं. आमच्या बाळपणीच्या आठवणींचा गोडवा आम्हाला आठवू द्यायचा नव्हता. अगदी ओढी लावलेला पेला ओढून घ्यायचा नव्हता.

" होईन, मी उद्या बी. ए. होईन. पण माझं मन निवेल का ? सगळं काही मी मनाविरुद्ध करू शकले असते नि तसं मी केलं पण होतं. रविकान्तचं लग्न झालं तेव्हा मी नाही का हसत खेळत सारं निभावून नेलं ! सिंधूताईबद्दल माझ्या मनात काही तरी आलं का ?

" सिंधूताई आपला संसार, इतक्या लवकर अस्ताव्यस्त टाकून जातील असं कुणाला वाटलं नाही. सुधाकर आणि विमल यांच्यावर गाईचं दूध पिण्याची पाळी इतक्या लवकर येईल असं कुणी भाकीत केलं होतं का ?

" लोक काय म्हणतील याचा नाही मी विचार करीत, पण मला अजूनही वाटतं, की माझं आयुष्य सुखी करणं रविकान्तच्या हाती आहे. सुधाकर नि विमलची जी आबाळ होते ती मला बंद करता येईल. सावत्र मुलं म्हणून त्यांच्याबद्दलचा विपरीत भाव माझ्या मनात येणं शक्य नाही. असं पाप माझ्या हातून होणं अशक्य आहे. ती माझ्या रविकान्तची मुलं. सिंधूताईलाही मी माझीच मानली होती.

" मला शिक्षण नको आता. परदेश नको. काही नको. मला काय हवं हे मी स्पष्टच सांगितलं पाहिजे का ?

" पण हे बाबांना कसं सांगू ? त्यांना कसं कळेल ? दोन वर्षांपूर्वी त्यांनीच रविकान्तची गोष्ट काढली होती. म्हणून आज देखील ते पुनः नव्याने विचार करायला तयार होतील का ?

" आजपर्यंत सारं दिलं आहे बाबा तुम्ही मला. पण हे तुम्हाला कसं सुचवू ?

" बाबा, हे माझ्या नशिबी नसलं तर एवढं तरी करा, की पुढे माझ्या लग्नाच्या भानगडीत पडू नका. मी अशीच परदेशात जाईन नि अशीच जिवंत राहीन. मला मग विवाहाने सुख लागायचं नाही. प्रेम ! माझ्या कॉलेजातील कितीतरी मुलं माझ्यावर जीव टाकतात, पण मला मात्र एका व्यक्तीशिवाय कुणाबद्दल कधीही काही वाटलं नाही नि वाटणं शक्य नाही ....."

बाबासाहेबांच्या मनात या साऱ्या गोष्टी आल्या नव्हत्या असे नाही. पण मोठे ध्येय समोर ठेवल्याने लतिका सर्व विसरून जाईल अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. ज्या दिवशी त्यांनी वरील पत्रांची पृष्ठे वाचली त्या दिवसापासून त्यांना जरा विचारच पडला. लतिका त्यांची एकटीच मुलगी. तिच्याभोवती त्यांनी आपल्या आशेचे धागेदोरे गुंतविले होते. वैभवाच्या कोंदणात त्यांनी तिला हिरकणीसारखी बसविली होती. पण आज केवळ लतिकेला वाटत आहे म्हणून हे भलतेच कसे करावयाचे ? रविकान्तबद्दल प्रश्न नव्हता. पण त्याला दोन मुले आहेत ना ? आपल्या मुलीचे लग्न होत नाही असे थोडेच आहे ?

पण वात्सल्यापुढे हे सर्व तर्कट ठरले ! सर्व लतिकेच्या मनासारखे झाले !

जाणारा जातो पण जगाचे सारे व्यवहार सुरूच असतात ! रविकान्तच्या संसाराचे असेच झाले, पण थोड्या निराळ्या अर्थाने !

सर्व घर गजबजले. हसण्याचा आवाज पुनः रस्त्यापर्यंत ऐकू येऊ लागला. 'सावधान' झाल्यापासून लतिकेने रविकान्त, सुधाकर, विमल ह्यांची आईसारखी काळजी घेतली. ती सुखात होती. ती हसे व तिला मधून मधून रडविण्याची सवय

असलेल्या रवीने त्या हसण्याचे नावीन्य कायम ठेवले होते. लतिकेला रडविण्यास त्याला खूप सायास पडत, असे पण नाही. साधा छत्तिसाचा आकडा पाच मिनिटांत त्याचे काम करू शके. सायंकाळी ढगांच्या पुंजक्याआड लपलेले प्रकाशकिरण त्याला दिसत. डाव्या हाताने तोंडावर आलेले केस सावरून रवी झोपी जाई.

या दिवसात लतिकेला जर कोणी विचारले असते, की 'लतिका, स्वर्ग कुठे आहे?' तर ती रवीकडे बोट दाखवून पळून गेली असती!

बोलता बोलता राम-सीता म्हणत, "अरे, रात्र संपली?" खेळता खेळता रवि-लतिका वर्षे घालवीत होती!

कॉलेजमध्ये असताना लतिकेची मैत्रीण तिला आवडतात म्हणून रोज सकाळी गुलाबाची फुले आणून देत असे. लतिकेला हर्ष होई. ती फुले आपल्या मैत्रिणीच्या बागेतली आहेत हा विचार देखील तिच्या मनात आला नाही. फुले म्हणूनच ती तिला आवडत.

...आणि सुधाकर व विमल या दोन गोड मुलांबद्दल प्रेम वाटण्याचे आणखी एक कारण म्हणजे दोघांचाही तोंडवळा रवीसारखाच गोल व गोंडस होता. लतिकेच्या घरची ही दोन पाखरे आपला चिमुकला खेळ कोठे तरी सांदीकोपऱ्यात मांडून खेळत असत. तिच्या घरचा संपूर्ण आनंद त्यांच्या बाललीलांनी भरलेला असे. येता जाता लतिकेची नजर त्यांच्याकडे गेली म्हणजे आईचा स्वर्ग खाली उतरत असे.

एकदम दूध तुटल्यामुळे गाईचे दूध कधी कधी त्यांना मानवत नसे. लतिकेचा जीव तीळतीळ तुटे. पण त्यांच्या "अनियतरुदितस्मिताने" ती सारे विसरून जाई.

दोन्ही दिव्यांचा प्रकाश दिवसेंदिवस जास्त पडत होता. त्या प्रकाशात घरची दिवाळी बाराही महिने साजरी केली जात होती.

लतिकेच्या संसाराच्या बाबतीत तीन चार वर्षे उदासीन असलेला परमेश्वर जागा झाला. त्याने डोळे उघडले. विधाता आपल्या सिंहासनावर जाऊन बसला. त्याने आपली स्मृती उजळ केली. जगाचा उद्देश—सुख आणि दुःख! दुःख आणि सुख 'सुखाच्या समुद्रावर दुःखाची वादळे आणली पाहिजेत. दुःखाच्या काळरात्री सुखाच्या चंद्राने तेजाळल्या पाहिजेत.' विधात्याचा हुकूम सुटला. त्याने चित्रगुप्ताला हाक मारली. जगातील पापपुण्याच्या खतावण्या तपासल्या. जगाकडे अर्थपूर्ण नजर फेकली व पुराणपुरुष 'योगनिद्रा' घेता झाला!

गोरीगोमटी, लुसलुशीत गालांची लतिका हसत होती. खूप खूप हसत होती.

पण एक दिवस तिने रडून दिले. पुढेही सुखाच्या चंद्रासमोर आसवांच्या वाफेचे ढग सदोदित येत गेले!

बागवानाने बागेचे दार उघडले. फुलांची परडी सावरली व सरावलेल्या हाताने फुले तोडावयास सुरुवात केली. त्या दिवशी त्याची नजर एका कोपऱ्यात झाडाच्या आसऱ्याने वाढत असलेल्या कोवळ्या वेलीकडे गेली. तिच्यावर त्याला दोन सुंदर फुले दिसली. त्याची तीक्ष्ण नखे कच् कच् वाजली व वेलीस हिसडा देऊन तो पुढे गेला ! कितीतरी वेळ ती वेल धक्क्याने हालत होती.

आयुष्यातही असेच हादरे बसतात. सुखाच्या कळ्या कोण कधी खुडून नेईल याचा कोणाला काय नेम सांगता येईल ?

गावात साथ पसरली. लोक कॉलऱ्याने आजारी पडून पटापट मरू लागले. लतिकेला साधे निमित्त झाले. मुलांना बरे वाटावे म्हणून शनिवारी सर्व मंडळी सिनेमाला गेली होती. तेथे सुधा व विमा यांना तहान लागली. रविकान्तने जवळच्या हॉटेलातले पाणी आणून दिले. मुले पाणी प्यायली. आईनेही दोन घोट घेतले. हेच निमित्त झाले आणि त्या घरातही धावपळ सुरू झाली.

दैवाचा खेळ पाहा ! त्या आजारातून लतिका कशीबशी वचावली पण सुधाकर आणि विमल...! सर्व मानवी प्रयत्नांनी त्यांच्या बाबतीत हार खाल्ली !

...आणि त्या दिवसापासून लतिकेच्या डोळ्याचा थेंब खंडला नाही. रविकान्तचे सर्व प्रयत्न विफल ठरले. तिचे मन रमविण्यासाठी तो परोपरीने झटे. चंद्राच्या दर्शनाने समुद्राला भरती येई पण रविकान्तला ती नको होती. त्याला वाईट वाटे. केविलवाणा होऊन तो म्हणे,

"लते..."

ती भानावर येई व पुनः त्याच्याकडे पाहू लागे.

"नाही हो सिंधूताई, मला सांभाळता आलं नाही !"

दिवस जात होते. लतिकेच्या शोकाने पृथ्वी स्तंभित झाली नव्हती. असे प्रसंग तिने अगणित पाहिले होते. लतिकाही आपले व्यवहार करीत होती. खात पीत होती. हसत होती. फिरत होती. पण दिवसातून एकदा तरी ती उदास, खिन्न होत असेच.

एक दिवस रविकान्त तिला बागेत फिरायला घेऊन गेला. तीही आनंदाने गेली. सारी बाग त्यांनी पालथी घातली. तिला ती बाग फार आवडली. उल्हसित अंतःकरणाने दोघेही जाईच्या कुंजाखाली बसली.

"लतिका, तुला फुलं हवीत का गुलाबाची ? आणू मी तोडून ?"

"नको, ती तिथेच बरी आहेत..."

भुर्रर्र...! वर जाईच्या झाडावर आवाज झाला. त्यांनी वर पाहिले. चिमणी भुर्रकन् उडून गेली व उडताना तिच्या तोंडातली लहानशी फांदी लतिकेजवळ पडली.

टपोरशा दोनच कळ्या होत्या तिला !

लतिकेने ती फांदी उचलली व त्या कळ्या हळूच आपल्या पदरात धरून ठेवल्या. रविकान्त दचकला. लतिकेच्या डोळ्यांत हसता हसता पाणी आले.

" काय होतं आहे लता तुला ? "

" मला भीती वाटते. कुणी मोठ्याने बोललं की कसंसंच होतं. कुणाचं रक्त पाहिलं की जीव धस्स होतो. झाडाची फुलं तोडू नयेत. पाप आहे मोठं..."

ती काहीतरी बोलत होती आणि रविकान्त नुसता पाहात होता तिच्याकडे.

जान्हवीवहिनी सकाळी वेणी घालीत होत्या. सखूमावशी अगदी सहज म्हणून उभ्या उभ्या फेरी टाकायला आल्या शेजारणीकडे.

" का ? आज वेणी घालायला उशीरसा झालाय् ..."

" उठल्येच हो जरा उशिरा आज. आमच्या लीलाबाई आजारी आहेत ना ? साऱ्या रात्रभर कार्टीने झोप लागू दिली नाही कशी ती..."

" हो ? काल मग गेल्या होत्यात का चैत्राच्या हळदीकुंकवाला पाध्यांकडे ? "

" तुमच्या मागूनच तर मी आल्ये. गौर छान सजविली होती नाही ? पण काही म्हणा बाई, त्या फेण्या जरा काळ्याच आल्या होत्या नई ? "

" अहो, त्याबद्दल मी मुद्दाम चौकशी केली-तेव्हा स्वयंपाकीणकाकू म्हणाल्या, की फेण्या काही लतिकाताईनी केल्या नाहीत. दिवसभर त्यांना अस्वस्थ वाटत होतं म्हणे..."

" असं ? माझ्याशी तर बाई चांगली बोलली. हसून स्वागत केलं, हळदकुंकू दिलं... "

" ते सारं खरं, पण काल गौर सजवायला त्यांनी पेटीतील ठेवणीची खेळणी काढली होती म्हणे. "

" बरं मग ? "

" त्यात त्या मुलांची खेळणी होती काही. ती पाहून म्हणे त्यांना भडभडून आलं. "

" अस्सं ! " जान्हवीवहिनी उपरोधाने हसल्या व म्हणाल्या, " मला वाटलं, की आणखी काही कारण झालं होतं. "

" म्हणजे ? मी खोटं का सांगत्ये आहे ? "

" छे हो, तुम्हांला का खोटं म्हणायचं ? पण भारीच भोळ्या बाई तुम्ही. "

" ती कशी ? "

" अहो, हे असंच असतं ! तुम्हांआम्हांला दिसलं पाहिजे ना ? कालच नेमकं तसं झालं नाही का ? होती मुलं तोवर कसं वागवलं त्यांना हे आम्ही नव्हतो का पाहात ? अहो, ही शिकलेली बया ? नवऱ्याला लग्नाआधीच मथवून ठेवला होता म्हणे ! पोरकी पोरं गेली ती सुखी झाली बिचारी ! "

" असं कसं म्हणता बरं ? "

" असं म्हणजे ? कितीही झालं तरी सावत्र आई. मुलांचा छळच तो. वागण्या वागण्याच्या रीती असतात हो ! घातल्या पावसाने का कधी पीक येतं ? सोंगं आहेत सोंगं बरं ही...नीघ-नीघ, छे-छे, घातलंच बाई मांजरीने दुधात तोंड...वणवा मेला..."

जान्हवीवहिनींचे पुढचे शब्द स्वयंपाकघरातून ऐकू आले नाहीत !

प्रभू रामचंद्राच्या आयुष्याचा उन्हाळा करणाऱ्या परिटाचे वंशज या सुधारलेल्या काळातही आहेत एकूण !

...की अमरवेलीसारखी ही ' अपुण्या जनोक्ति ' देखील सुखवृक्षाचे जीवनरस शोषीत अक्षर राहाते ?

२८।६।३३

६

गंगा देखील आटली ?

अरुण आपल्या खोलीत उदासपणे बसला होता. वेळ करकरीत तिसांजी. अंधेरी वातावरण सर्वत्र पसरलेले. बाहेरच्या कोलाहलाचा उपसर्ग नाही.

असे वातावरण माणसाला उदास बनविते. आपण बाह्य जगात आहोत ही जाणीव अरुणला होती; पण त्याची कल्पनासृष्टी पूर्वस्मृतीचे पडदे त्याच्या डोळ्यांसमोर आणून सोडीत होती. त्याचे विचार चालू होते. मागचे प्रसंग – सुखाचे, दुःखाचे, उद्वेगाचे – झरझर त्याच्यापुढें येऊन जात होते. विचारांच्या प्राबल्याने तो दूरवर वाहात गेला होता जणू ! म्हणूनच की काय तो एकदम दचकला आणि भानावर येऊन दिवा लावावयास टेबलावर गेला.

परत पलंगावर येऊन टेबलाकडे पाहात असताना त्याची दृष्टी दिव्याच्या प्रकाशात असलेल्या सुंदर चौकटीत बसलेल्या एका फोटोकडे गेली. तो सारखा त्या चित्राकडे पाहू लागला. ओठ जरी हालत नव्हते तरी त्याचे मन बोलत होते, ' ही आपली बहीण, हिलाच बहीण मानायचं का ? आपली खरी बहीण कुठे असेल ? आपल्याला बहीण तरी असेल का ? नसेना ! ह्या बहिणीने तरी आपल्याला काय कमी केलं ? '

त्याला त्याची ताई सर्वत्र दिसू लागली. मागच्या गोष्टी त्या. ताई बसली असता हा जाऊन तिच्या मांडीवर डोके ठेवून पडायचा. दोघांनी एकमेकांकडे पाहिले म्हणजे हसायचे !

कित्येक प्रसंग त्याला आठवत होते. प्रेमाचे, वात्सल्याचे ! त्याने आठ दिवसांपूर्वी आलेले ताईचे पत्र काढले. ज्या पत्रात अरुणने आपले सर्व मनःस्ताप व्यक्त केले होते त्याचे उत्तर म्हणून ताईचे ते पत्र होते. तो पत्र वाचू लागला,

" अरुण, तू आपल्या मनाला उगीच गोष्टी लावून घेत आहेस. झालं काय तुला ? तुझ्यासारख्या मुलाने असं करावं का ? म्हणे माझ्या जन्माची हकीकत माझ्याजवळून का लपवून ठेवलीस ! असं विचारतात का कुणी वेड्यासारखं ?

" पण तुला कुठून का होईना जी हकीकत कळली ती पूर्ण कळती तर बरं. मी तुला पत्रात काय लिहू ? इथे तुला एवढंच सांगते की मी तुझी बहीण नव्हे. माई तुझी आई नव्हे नि अप्पा तुझे वडील नव्हत. त्यांनी तुला कोणत्याच प्रकारे उणं पडू दिलं नाही हे तू लिहिलंस ते अगदी खरं आहे. तू लहानपणापासून आमच्या घरी आहेस पण तुला परकं वाटलं नाही यात काय ते समज !

" पण तुला माहिती कळली कुठून ? बाबांची तर सक्त ताकीद होती, की तुझ्या लग्नापर्यंत कुणालाच काही कळू नये म्हणून ! वाईट वाटून घ्यायचं नाही बरं का ! आपल्या अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टी मनात आणू नकोस. तुझ्या मनाला स्वस्थता नाही असं तू लिहितोस. पण तसं करून कसं चालेल ? तू एक दोन दिवसांची सुटी काढून माझ्याकडे ये किंवा माईकडे जा. माझ्याकडे आलास तर मला करमेल नि सर्व खुलासा नीटपणे करता घेईल. यायचं विसरू नकोस बरं का ! आणि येताना इकडच्या पत्त्यावर पत्र घालून ये. "

अरुणने पत्र दोनदा वाचले. ' समजा, मी आता ताईकडे गेलो तर ती कशा दृष्टीने माझ्याकडे पाहील ? मी कसा वागेन ? ' त्याला नीटशी कल्पना येईना.

तो डाव्या कुशीवर वळला. त्याला रडायला येत होते. काही अस्फुट वाक्ये तो पुटपुटत होता. उशीखालून डावा हात घालून त्याने आपली डायरी काढली. चालू महिन्याची पाने तो चाळू लागला. त्याला वाटेल त्या पानावर तो थांबे. थोडे वाचल्यासारखे करून दुसऱ्या पानावर जाई.

ता. ३ जुलै—" सौ. राधाकाकूंनी सांगितलेल्या हकीकतीत काही सत्यांश असेल का ? मला दिवसभर मांडीवर घेऊन माझं कौतुक करणारे अप्पा माझे वडील नव्हत. स्वतःच्या तोंडातील विडा चावून रंगल्यावर माझ्या तोंडात भरणारी माई माझी आई नव्हे नि उठल्यासुटल्या ' अरुण, अरुण ' करणारी ताई...! ती देखील माझी बहीण नव्हे ! "

इतकेच वाचून त्याने पाने पलटविली.

ता. ७ जुलै—" आज माईकडून पत्र आलं. मला पत्र पाठविता यावं म्हणून मुद्दाम मी तिला लिहिणं शिकवलं. सुशिक्षित नवऱ्याची अशिक्षित बायको. पण किती उदार अंतःकरणाची आहे !

"माझी आई, माझे अप्पा, माझी ताई! काय संबंध त्यांचा माझा? ही माणसं किती चांगली? जगात सर्वत्र अशीच माणसं आहेत का?"

ता. १२ जुलै—"आज ताईचं उत्तर आलं. जाऊ का तिच्या गावाला? माझी आई कुठे आहे हे सांगेल का ती मला? आई कशी होती माझी? अजून आहे का? कुठे असेल? मी तिला एकटाच होतो कीं आणखी बहीण भाऊ होते मला? किंवा मी एकटा असूनही तिला भारी झालो होतो? मला घेऊन मिरवायची तिला लाज वाटली असेल का? माझ्या रूपानें तिचं पाप तिच्या कडेवर बसून चारचौघांत मिरविणार होतं का?

"असं जर असेल तर आहे ही परिस्थिती काय वाईट आहे? माझ्या माईने माझ्यासाठी काय केलं नाही? मला पक्की आठवते माझी इंग्रजी दुसऱ्या वर्गातील सवय. खिशातल्या निळ्या पेन्सिलीने पांढऱ्या भिंतीवर इंग्रजी नाव लिहायची मला फार आवड. मी भराभर लिहून काढी. पण त्याबद्दल, 'अरुण, शहाण्या मुलांनी असं करू नये' इतकेच ती म्हणत आली होती आणि अनेक वेळीं तिने भिंती पुसून काढल्या होत्या. पण तेच शेजारी राहणारे दत्तोपंत. त्यांच्या चिंतूने धोब्याला दिलेल्या कपड्यांची यादी भिंतीवर लिहून ठेवल्याबद्दल त्यांनी त्याला फाड्फाड् मारले व भिंत वाईट केली म्हणून त्याच्याकडून स्वच्छ करवून घेतली. माझे वडील कसे असतील? अप्पांसारखे की दत्तोपंतांसारखे?"

छातीवर पडलेले मघाचे ताईचे पत्र वाऱ्याने उडवून नेले होते ते त्याने वर उचलले व पुन्हा डायरीचे पान उलटून तो वाचू लागला.

"ह्या जीवांना माझ्यामुळे किती त्रास झाला असेल? मी त्यांच्याजवळ नाना-प्रकारचे हट्ट घेतले असतील. माझ्या आईला मी भारी होतो नि यांनी मात्र माझं फुलासारखं पालन केलं.

"या सुटीत मी आजारी होतो. ताप म्हणजे काय साधा उन्हाचा. पण 'अग आई ग' म्हणून मी कपाळावर हात ठेवताच तिथांची काय दशा झाली! अप्पा एवढे पुरुषासारखे पुरुष पण चटकन् धोतराचा सोगा त्यांनी डोळ्यांना लावला.

"ही माणसं माझ्याकरता रडतात, मी यांच्याकरता रडतो पण आमच्याकडे पाहून हसणारेही आहेत हे मला किती उशीरा कळलं."

ता. १९ जुलै—"आईबापांचा पत्ता नसलेला पोर! दुसऱ्याच्या घरीं वाढलेला पोरगा मी! अरुण माझं नाव!

"उद्या ही गोष्ट जगजाहीर झाली म्हणजे लोक माझ्याकडे आताच्या दृष्टीने पाहातील का? मला वेजबाबदारपणे टाकून जाणारी माझी आई आज हसत असेल की रडत असेल? मेली असेल? पतिव्रता असेल, की...? पण कितीहि झालं तरी ती माझी आई!

"मी चौकशी करू का ? वरून नीट दिसणाऱ्या या दलदलीत पाऊल घालू का ? यात फसणार तर नाही मी ? माझ्या पायाला काटे तर बोचणार नाहीत ?

"असं झालं तरी काय हरकत आहे ? माझ्या आईचा शोध लागला म्हणजे झालं ! ती कशीही असो. मला पाहून तिचे हात पुढे होतील. डोळे भरून येतील. मला जवळ घेऊन ती ईश्वराला म्हणेल, 'देवा, माझ्या राजाला सुखी ठेव.'

कल्पनेचे मनोरे बांधण्यात तो चूर झाला. कितीही भराऱ्या मारायच्या झाल्या तरी पक्षी समोर दिसलेल्या झाडावर अखेर बसतोच. त्याचे लक्ष डायरीकडे गेले. परवा लिहिलेला मजकूर तो वाचू लागला—

"ठरलं ताईकडे जायचं ! तिला सर्व हकीकत विचारायची ! माझी आई शोधून काढायची ! ती कुठे का असेना, तिला शोधूच काढणं हे माझं – तिच्या मुलाचं – काम ! कल्पान्तापर्यंत जरी काल लागला तरी हरकत नाही. प्रत्यक्ष काळाच्या दाढेतून मी तिला ओढून काढीन. मला मरण आलं तरी आईचाच ध्यास घेऊन मरेन."

"अरुण ! अहो नाना ! दार उघडा, मी बाळू आलो आहे."

दारावर थाप पडली व हे शब्द त्याला ऐकू आले. अश्रूंनी उशी भिजून गेली असताना अशा स्थितीत बाळूला आत घेऊन त्याच्याशीं बोलण्याची अरुणची अगदीच इच्छा नव्हती. उसासा आवरून त्याने उत्तर दिले. "बाळू, तुला काय सांगायचंय् ते तिथूनच सांग ना रे !"

"हे पाहा !" बाळू बोलू लागला, "उद्या आमच्या बेबीचा वाढदिवस आहे. आईने तुम्हांला जेवायला सांगितलं आहे. बरं का ?..."

उत्तराची वाट न पाहतां बाळू निघून गेला. अरुणची स्थिती केविलवाणी झाली. 'वाढदिवस ! माझा वाढदिवस कसा झाला असेल ? माईने कितीही चांगलं वागवलं असलं तरी आईने जे केलं असतं ते माई कशी करणार ? शिवाय माईला माझा नक्की जन्मदिवस तरी माहीत असेल का ? उद्या अरुण बाळूकडे जेवायला जाणार वाढदिवसानिमित्त !'

हा विचार अरुणला असह्य झाला होता. मनाला विचारलेल्या हजार प्रश्नांपैकी एकाही प्रश्नाचे उत्तर देण्याचे त्याच्या मनाने नाकारले होते. माई, ताई, अप्पा, तिघेही त्याच्या मनःश्चक्षूंसमोर दिसू शकत पण ... त्याची आई !

ताईनें पाठविलेले पत्र त्याच्या छातीवर मोकळे पडले होते. त्यावरच त्याची काळ्या कन्हराची डायरी उताणी पडली होती व अत्यंत अनुकंपनीय स्थितीत त्याचे निःस्तब्ध अश्रुमोचन चालले होते.

दहा मिनिटे, पंधरा मिनिटे, अर्धा तास ! तो रडणार तरी किती ? डोळ्यांतून गालांवर ओघळणारे थेंब तेथेच थांबले. तो छताकडे दृष्टी लावून स्वस्थ पडून राहिला.

त्याच्या लक्षात आले, 'आपण ताईकडे गेलो होतो. तिथे त्या वेळी राहताना आपल्याला कसं वाटलं ? ताईने सांगितलेली आपली कर्मकथा !'

त्याने आणखी एक वही हाती घेतली ! ती त्याची दुसरी रोजनिशी होती. नव्या जीवनाचा वृत्तान्त त्याने नव्या डायरीत लिहून ठेवला होता. कर्मकथेने त्याला जणू नवीन दिशा दाखविली होती.

ता. २२ जुलै—"यापुढची पानं लिहिता येतील किंवा नाही याची मला शंका वाटत आहे. मनाची तयारी आहे; पण हात थरथरतात.

'ताईला माझ्या इथे येण्याने किती पण आनंद झाला ! तथापी माझं वागणं तिला विचित्र वाटलं नसेल ना ?

"कसंही असलं तरी माझी ताई ती ! झटपट सर्व विसरून जाईल !

"कालचीच गोष्ट ! तिचे अनंतराव नाटकाला गेले होते. मला जायचं नव्हतं नि माझ्याकरता ताई पण गेली नव्हती. ती वेळ अगदी योग्य होती. मी ताईला एकदम प्रश्न केला.

"बिचारी ताई ! सांगता सांगता प्रत्येकदा 'वाईट वाटून घेऊ नकोस' म्हणून म्हणत माझ्याकडे कशी दीनवाणी पाहात होती !

"गालावर जखमेची उभी खूण ! गोरापान वर्ण ! नाकाचा शेंडा खाली झुकलेला. हिरवं लुगडं फार करून नेसणारी आणि कपाळाच्या आठ्या मिनिटामिनिटाने बदलविणारी ! ती माझी आई ! हल्ली नाव सरस्वती बर्वे.

"आज पाच वर्षांपासून माझी आई इथे आहे ताईच्या गावाला. ताईने तिला आपली ओळख देखील दिली नाही. तिच्याशी कोणत्याच प्रकारचा संबंध न ठेवण्यात ताईचा काही उद्देश असेल का ? माझ्या कानी पण ह्या गोष्टी तिने घातल्या नाहीत !

"उद्या मी जाऊन भेटतोच आईला ! ताई यायला तयार नाही. नसू दे. माझ्या आईला भेटायला इतर कशाला हवेत ?

"आई ओळखील मला ? ज्या परिस्थितीत तिने मला टाकून दिलं त्यावरून वाटतं, की देवा...

"पण देव काय करणार ! त्याच्या मनात असतं तर ह्या गोष्टी होऊ दिल्या नसत्या त्याने ! माझी आई जेव्हा मला त्या मिशनऱ्याच्या हातात द्यायला लागली नि अप्पांनी जेव्हा भांडण सुरू करून मला आपल्या ताब्यात घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा देव जर खरा असता तर त्याने तिच्या मनात सद्बुद्धी दिली असती.

"पण ती तर मिनिटभर देखील उभी राहिली नाही म्हणे तिथे ! आई म्हणजे वात्सल्याची गंगा ना ? ही गंगाही आटते का ?

" प्रेम ! आई-बाप, बहीण-भाऊ, आईचे आपल्या मुलावर प्रेम ! या शब्दां-बद्दल मला आता शंका यायला लागली आहे. पूर्वीच्या कल्पना नि आताचा अनुभव ! आई म्हणे मुलाकरता आपला प्राण देते. छे ! या कविकल्पना आहेत. ही कल्पनेच्या भरारीवर रंगवलेली चित्रं आहेत.

" तरी पण हे सर्व आताच मी कसं म्हणू ? अजून माझ्या आईची भेट झाली नाही. कदाचित् माझी आई मला ओळखेल. माझ्याकरता ती रडेल देखील. तिचा एक जरी अश्रू माझ्या डोळ्यांनी दिसला तरी मी समजेन, देव आहे ! आई मुलां-करता रडते ! कवी सत्यसृष्टीचे दिग्दर्शक आहेत. उन्हाळा असला तरी गंगा आटत नाही ; उलट तिला पूर येतो ! उद्या जातोच मी तिकडे..."

ता. २६ जुलै—" आज चार दिवस झाले. एक ओळ लिहिली नाही. लिहायची तरी का ? जी गोष्ट उभ्या जन्मात कधी विसरणार नाही ती लिहून ठेवायची तरी कशाला ?

" केवढ्या आशेने मी आईकडे गेलो. ताईचं ऐकलं नाही. स्वतःचाच हट्ट सवे घेऊन निघालो.

" दीड फर्लांगावर बंगला असताना जिच्याकडे ताईने एकदाही फेरी मारली नाही, तिच्याकडे जाताना मला थोडा विचार करावयास हवा होता, पण आता काय...

" ताईने सांगितलेल्या सर्व खुणा पटल्या. तिने त्या सांगितल्या नसत्या तरी मी माझ्या आईला ओळखलं असतं. माझेही डोळे घारे आहेत. नाक अगदी तसंच आहे.

" किती आनंदात गप्पा मारीत होती ती. चहाचा कप तिने 'त्यांच्या' हाती दिला नि एका खुर्चीवर ती बसणार इतक्यात मी तिथे पोचलो.

" तिने मला ओळखलं का ? तिच्या कपाळावर आठ्या पडल्या. ती मला घेऊन बाहेरच्या अंगणात आली.

" आईने मला एकान्ती बोलावलं तेव्हा वाटलं, ही आता मला मोठ्या आनंदाने भेटणार...

" जगात पूर्वी अशा गोष्टी कधी घडल्या आहेत, की माझ्यावरचा हा पहिलाच प्रसंग ? मी हात समोर केला पण...

" एकदम मला माझे हात मागे घ्यावे लागले. माझी सर्व हकीकत ऐकून घेताना तिने माझ्याकडे पाहिलं देखील नाही. सरळ मोगऱ्याच्या झाडाकडे ती पाहात होती. अंगणातील बगीचामधील छोट्या दगडावर तिने उजवा पाय ठेवला होता. जवळच्या फांदीची पानं ती खुडत होती. वाऱ्याने वारंवार उडणारे केस सावरण्याकरिता दुसरा

हात डोक्यावर जात होता. मी समोरच बाजूला उभा होतो. आशाळभूतपणे, अगदी आपलेपणाच्या स्निग्ध दृष्टीने मी तिच्याकडे पाहात होतो.

" तो प्रसंग जन्मभर विसरायचा नाही कधी मी ! माझी हकीकत सांगून झाल्यावर मला वाटलं ती मला उत्तर देईल. नंतर मी तिला प्रेमभरे हाक मारीन, ' आई '...

" ह्यापुढील मजकुरासाठीच मी तीन दिवसांपासून डायरीला हात लावला नाही.

" तिने माझ्याकडे पाहिलं पण क्षणभरच ! भुवई वर आकुंचित करून, कपाळावर आठ्या पाडून, निमुळतं तोंड करून त्रासिक आवाजाने ती म्हणाली,

" हे पाहा, तुमचा किनई गैरसमज झाला आहे काही तरी ! तुम्ही दुसऱ्याच कुणाला तरी उद्देशून हे बोलता आहात. माझा त्यात काय संबंध ? बरं, जा तुम्ही आता. झाली गोष्ट वाईट झाली. मला नाही वाटत इतक्या दिवसांनी तुमच्या आईचा शोध लागेल म्हणून ! बरं, आता मला वेळ नाही. तुम्ही जा. अशा गोष्टी इथे करू नका. तिकडून ऐकायच्या झाल्या तर उगीच...'

" ती थांबली देखील नाही. मी दिङ्मूढ झालो होतो. तरी मला तिथून परतणं भाग होतं. कंपौंडाच्या बाहेर येताना मी पुन्हा एकदा तिच्याकडे पाहिले. ती गंभीरपणे ' त्यांच्याशी ' कायसे बोलत होती.

" घरी आलो. माझी ताई रुमाल विणीत बसली होती. मी तिच्याकडे पाहिलं नि तिने काही विचारावयाच्या आधीच मला लहान मुलासारखं रडायला आलं.

" माझ्या आशेच्या फुलांवर माझ्या आईने आपल्या उत्तराने आग ओतून दिली होती.

" राहू द्या आता हे सर्व ! ' तिकडे ' ऐकू जाईल म्हणून आई उभी देखील राहिली नाही. माझ्याकरता – तिच्या पोटच्या पोराकरता – तिला दहा मिनिटं खर्च करता आली नाहीत नि ' तिकडे ' ऐकू जाईल म्हणून तिने माझ्याशी बोलणं बंद केलं.

" ' तिकडे ' ' ते ' ' त्यांना ' ! समजा आज ' तिकडची ' भीती माझ्या आईला नसती, ' तिकडच्या ' मनात काही संशय येण्यासारखा नसता तर ? माझी आई माझ्याशी बोलली असती ? मला तिने जवळ केलं असतं ?

" याचं उत्तर शोधायचं कुठे ? मातेचं अपत्यावरील सहजवात्सल्य गेलं कुठे ? "

१८ । ७ । ३३

७

आणभाक

जी गोष्ट आपल्या हातून अजाणता घडली ती योग्य होती की अयोग्य होती याचा मला आता नीट विचार करता आला किंवा त्या गोष्टीच्या मुळाशी असलेली कारणे मला आता शोधून काढता आली तरी तिच्यामुळे झालेला एक प्रकारचा परिणाम मात्र माझ्या मनावर पगडा बसवू पाहतो. काय असेल ते असो, पण असे वाटते की आपण तिला उगीच भेटलो —?

पण मला तरी काय माहीत ?

दिवसभराच्या धकाधकीतून वेगळा झाल्यावर तिसांजीला अंधुक उजेडात चटईवर पडलो म्हणजे उगीचच निरनिराळे प्रश्न माझ्या डोक्यात थैमान घालतात. माझ्या गतायुष्यात इतक्या काही गोष्टी घडल्या आहेत की, त्यांच्या बऱ्यावाईट स्मृतीने मी शेषायुष्य सुखावह करू शकेन.

दुःखकारक कां असेना, पण गतायुष्याच्या आठवणी किती गोड असतात ! कितीतरी व्यक्ती डोळ्यांपुढे येतात, पुन्हा नाहीशा होतात; कितीतरी प्रसंग आठवतात व ते देखील झरझर मागे सरतात—उगीच वाटते, त्यांच्याकरिता थोडेसे रडावे, थोडा विचार करावा व मनाला विसावा द्यावा !

आणि माझा तर असा अनुभव आहे की मी कितीही दुःखात असलो आणि मला जूलियेची आठवण झाली की दुःखात सुख वाटते—अश्रूंत आनंद वाटतो—!

एकामागून एक अशा कितीतरी आकृती पडद्यावर हलतझुलत येतात. त्यांच्याकरिता दोन दोन थेंब जरी डोळ्यांवाटे काढीन म्हटले तरी अंतःकरणाची झर कायमची सुरू राहील.—पण राहिली तरी काय हरकत आहे ? सुखदुःखांच्या आठवणींनी झरून झरून आयुष्य उजळ करता आले व तसेच पंख फडफडून उडता आले तर कुणाला नको आहे ?

माझा दृष्टिकोण इतरांच्या उपयोगी पडेल किंवा नाही हे मी कसे सांगू ? मला मात्र त्यामुळे समाधान वाटते—नव्या जगाकडे पाहताना उगीच म्हणावेसे वाटते—माझी जूलि—! माझी—!

जूलिया माझ्या स्मरणातून जशी कधीही जाणार नाही तशीच आणखी एक व्यक्ती—!

पण तिचे नाव न सांगण्याची मी शपथ घेतली आहे. ती मी कधी मोडणार नाही !—

—आणि नाव सांगून तरी उपयोग काय ? सुधारलेल्या जगाच्या शंकाकुशंकांना ठगीच जागा करून देऊ का ? जगाने जर सहानुभूतीने विचार करावयाचे सोडले तर—!

मात्र मी एवढे सांगतो की, ती आता कमीत कमी अठरा वर्षांची असेल; कारण त्या वेळी ती माझ्या वयाचीच होती—किंचित् एखाद दुसऱ्या वर्षाचा फरक ! ती आता कुठे असेल हे मी सांगू शकणार नाही; कारण मला त्याबद्दल काहीच माहिती नाही व मी तसा प्रयत्न पण कधी केला नाही.

परवा परवा ती मला भेटली होती. दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. जलंब स्टेशनवर दादा उतरले तेव्हा अचानक तिचे वडील तिथे भेटले; ते असेच कुठल्याशा गावाला जाणार होते. त्यांच्याबरोबर ती होती व तिची आई होती.

आठ-नऊ वर्षांनंतर तिची माझी भेट झाली. मला आनंद झाला. काही वेळ पुनः जुन्या जगात प्रवेश करावयास मिळणार म्हणून अंतःकरणात वाढविलेल्या कळ्यांची फुले झाली व हसत हसत मी नानांच्या मागून चालू लागलो.

स्टेशनच्या एका बाजूला हिरव्या पेटीवर ती बसली होती व तिच्याजवळच तिची आई बिछान्याला टेकली होती. मी काकूंना नमस्कार केला व तिच्याकडे पाहिले – अगदी हसून पाहिले – ती हसेल, तिच्या हसण्यात मागच्या मनोहर स्मृती जाग्या होतील व आपला आनंद दुणावेल—म्हणून मी तिच्याकडे आशेने पाहिले—

—पण तिच्या ओठांवर हास्य दिसले तरी कपाळावर आठी पडली होती !

" अँ ! " माझ्या तोंडून अस्पष्ट असा आश्चर्योद्गार निघाला. तो तिला ऐकू गेला नाही. पुनः मी तिच्याकडे पाहू लागलो.

हिरव्या गर्द झाडपाल्यात झाकलेल्या टपोर कळीसारखी दिसत होती ती. आणि तिच्या मुखावर रक्तिमा पसरला होता. ती माझ्याशी बोलत होती. पण त्या बोलण्यात आपलेपणा नव्हता; ती माझ्याबरोबर हसत होती. पण त्यात औचित्य नव्हते; ती माझ्याकडे पाहत होती, पण त्यात स्निग्धपणा नव्हता – मोकळेपणा नव्हता; उलट भेदरलेल्या हरिणीसारखी किंचित् कावरीबावरी होऊन संशयी दृष्टीने ती माझ्याकडे पाहत होती आणि तिच्या कपाळावरची आठी कायम होती !

माझा जीव उडू लागला. आमच्यात फरक पडला म्हणून असे झाले का ? आमच्याजवळ बोलावयास काही नव्हते म्हणून असे झाले का ? पण छे ! तसे असणे शक्य नव्हते—

सांजवाती लावल्यापासून आई जेवून येईपर्यंत एकाच पांघरुणाखाली दडून तिला मी कित्येक कहाण्या सांगितल्या होत्या; गाईची धार काढून त्यांना सोडल्यापासून त्या परत येईपर्यंत मी तिच्या मनाजोग्या कित्येक बाहुल्या कित्येकदा करून दिल्या होत्या तिला ! दिवसभर खेळताना व धिंगाणा घालताना आमच्या बाळपणीच्या

खेळांकरिता आम्हांला मोठ्या माणसाच्या खेळातून पुष्कळ वस्तू आणाव्या लागत. त्या मी कित्येकदा तिला चोरून आणून दिल्या होत्या व माझ्यावर त्यामुळे किटाळ आल्यावर मला मार बसू नये म्हणून तिनेही कित्येक आगळिकी आपल्याकडे बळेच ओढून घेतल्या होत्या.—आमच्या दोघांच्याही अंतःकरणात बेदिली नसती तर ह्या गोष्टी बोलता बोलता आम्हांला दिवस पुरला नसता; पण——

तिच्या कपाळावर उमटलेली आठी——

——आणि माझ्या जीवाची चाललेली कालवाकालव !

या दोन गोष्टींनी आम्हांला औपचारिक भाषणाशिवाय बोलू दिले नाही. वाह्यतः एकमेकांशी विलगलेले जीव अंतर्यामी अलग असतात असे कित्येक वेळी आपल्या दृष्टीस पडते, त्याचा मला अनुभव आला.

काकूंनी माझ्यासमोर ठेवलेले फराळाचे संपल्यावर मी त्यांना नमस्कार केला व काहीतरी निमित्त काढून परतलो. येताना मी तिच्याकडे पाहिले. तो तिच्या हसण्यात कशाची तरी असाहाय्यता होती, तिच्या दृष्टीने काहीतरी अपेक्षा केली होती.

पण आमच्या हातून जाणूनबुजून अशी कोणतीच चूक झाली नसताना तिला असे का वाटावे ? म्हणण्यासारखी जी चूक आमच्या हातून घडली त्याबद्दल आमच्यापैकी कुणालाच जबाबदार धरता येत नाही. मला जसे कळते तसेच तिला कळत नसेल का ? तिला कळले पाहिजे असे मला वाटे; पण पुन्हा वाटे, स्त्रीजात ! नेहमी पुरुषांच्या मागून जाणारी ! पुरुष-प्रकृतीच्या संशयी वृत्तीस बळी पडणारी, निर्भयपणे एखादी गोष्ट योग्य अयोग्य ठरविण्याची पात्रता तिच्यात असते का ?

पांढऱ्या शुभ्र दुधावर सुरकुत्या का पडतात ? त्याखाली जळजळीत निखारे असतात म्हणून ! तिच्या भालप्रदेशावर आठी पडली ! बाह्य वातावरणाची – जगाच्या हिस्सेवाटणीत स्वतःकडे आलेल्या असाहाय्य व्यक्तित्वाची – आच तिला लागली होती.

मी परतलो तेव्हा माझ्या मनात हेच विचार सुरू होते. मी येताना तिचा प्रेमळपणे निरोप घेऊ शकलो नाही. आम्ही आता पुढच्या आयुष्यात काय करणार आहोत याची एकमेकांना यत्किंचितही कल्पना नसताना, यापुढे आपली कधी भेट होईल किंवा नाही याची शाश्वती नसताना——आम्ही एकमेकांशी मोकळ्या मनाने बोलू शकलो नाही; उलट एकमेकांमध्ये अंतर कायम करून आलो.

पुढेमागे तिची माझी अशीच एखादे वेळी भेट झाली तर——?

——तिच्या कपाळावर अशीच आठी दिसेल का ? आणि माझा जीव असाच उडेल का ? मला कसेसेच वाटले !

मी गाडीत बसलो व ती चालू झाली तरी मला शुद्ध नव्हती. राहून राहून मला वाटे, आमच्या आड कोण येत आहे ? आमच्या हातून घडलेले प्रमाद ? पण ते

प्रमाद घडावयाला कारण कोण ? नदीकाठच्या उघड्या पडलेल्या ओल्सर मऊ मातीवर कोणताही ठसा पडला तर त्याला जबाबदार कोण ?

मला पक्के आठवतात ते दिवस ! जूलिया गेली तेव्हा मी आठ वर्षांचा होतो. मला कसेसेच वाटे व माझ्या डोळ्यांसमोर अंधुक अंधुक दिसे. ते नेहमी भरून येत. मला माझे मन रमविणे भाग होते. लहान मुलांचे मन कशातही रमते म्हणतात, पण त्यांना ज्या गोष्टीची सवय असते, त्यातच त्यांना मौज वाटते.

कसे तरी मन रमावे म्हणून मी, ताई व तिच्या मैत्रिणी यांमध्ये मिसळू लागलो. जूलिया असताना मी तिच्या अस्तित्वाविषयी देखील पूर्ण बेफिकीर होतो. पण आता तीच ताई मला गोड वाटू लागली होती.

" ती " देखील आमच्या घराशेजारीच राहत होती. ताईची मैत्रीण होती ती. आम्ही तिघेही खेळत असू. मला " तिच्या " विषयी प्रेम वाटू लागले व ती देखील माझ्याशिवाय खेळेनाशी झाली. लहान मुलांचे प्रेम कुणावरही बसते व कुणावरूनही उडून जाते !

लपंडावाचा खेळ खेळताना तिचे डोळे झाकावयाचा प्रसंग माझ्यावर कधी कधी येई. मी त्या वेळीं आपले चिमकुले हात तिच्या डोळ्यांवर ठेवताना बोटांमधील अंतर जास्त करून तिला पाहावयास अवसर देत असे. माझ्या या कामगिरीबद्दलचे बक्षीस ती माझ्याकडे लोभस दृष्टीने हसून देत असे.

किंचित् काल मला जूलियेची आठवण झाली नाही. बरोबरीचा खेळगडी मिळाला म्हणजे मग सहज मन रमते. मोठ्या माणसांच्या खेळात देखील असेच होताना मी आजकाल पाहतो. असो.

एक दिवस पहाटे झाडाखाली जाऊन मी पारिजाताची पुष्कळ फुले आणली व अर्घी तिला दिली. ती खूप खूष झाली. आम्ही फुलांशी बराच वेळ बोलत होतो.

जसजसा सूर्य वर सरकू लागला तसतशी ती फुले कोमेजून जाऊ लागली. आम्हांला कसेसेच वाटले ! त्यांचा सुवास नाहीसा होऊ लागला. आम्ही उदास झालो !

" काय रे क्षिती ! सकाळी यांना वास कुणी दिला होता ? " ती म्हणाली.

" अग, झाडाने ! झाड म्हणजे त्यांची आई "–पुरुषांना स्वतःचे ज्ञान मिरविण्याची हौस असते. त्याच हौसेने मी म्हणालो.

" नाही, देव देतो त्यांना ! तो आपल्याला का देत नाही रे वास ? अन् मग त्यांचा सुगंध तो काढून का घेतो मागाहून ?

" अग, देव देतच नाही मुळी त्यांना तो सुगंध ! देव कसा देईल ! तो तर देव्हाऱ्यात असतो. "

झाले ! या क्षुल्लक कारणावरून आमचे भांडण झाले. ती रुसली. मी देखील संतापलो. मी करून दिलेल्या बाहुल्या, खेळणी तिने भिरकावून दिली; मी चिडून तिला सडकून चिमटे घेतले; तिने सूर काढला.

माझ्या आईने मला दादांच्या स्वाधीन केले. तिच्या आईने तिच्यावर आपला राग काढून घेतला.

दादांनी मला मारले नाही, पण भयंकर भीती दाखविली; अन् तीनतीनदा ते म्हणत होते, " लहान आहेस का तू आता मुलींमध्ये खेळायला ? "--

—तिला देखील तिच्या आईने दम भरला. " खबरदार ! उद्यापासून मुलांमध्ये खेळताना दिसलीस तर--"

बरेच दिवस--म्हणजे तीनचार--आम्ही एकमेकांशी बोललो नाही व त्यामुळे हसलो देखील नाही. माझ्या माडीवर खिडकीत मी बसलो म्हणजे तिचे घरचे मागचे अंगणात सकाळी ती मला दिसे. आम्ही एकमेकांकडे पाहत असू, आम्हांला आनंद होत असे, पण—

" आई, " तिचे डोळे म्हणत !

--आणि " बाबा, " माझे डोळे म्हणत !

माझ्या बालबुद्धीला मी त्या वेळी बराच ताण दिला, पण तिच्याशी न खेळण्यासारखे असे मला माझ्यात काहीच दिसले नाही. मी असा किती मोठा झालो की मुलींत मी खेळू नये ? ती इतक्यात कशी मोठी झाली की तिने मुलांत खेळू नये ? आणि न खेळून आम्ही करावे काय ? दादा एवढे मोठे होते पण क्लबात गेले म्हणजे चांगले खेळत असत साहेबांच्या बायकांशी ! पण आम्ही मात्र खेळावयाचे नाही !-- त्या वेळचे मन म्हणे !

भांडणाच्या दुसऱ्या दिवशी मला वाटले – देवाने तिला मुलगाच का केले नाही ? मुलगीच का केले ? आणि तिला देखील तसेच काहीतरी वाटत असावे. पण देव देव्हाऱ्यात असतात – परवाच मी बोलून गेलो होतो.

मी चिडून गेलो. आम्ही का खेळू नये ? मग उपयोग काय ? माझ्या खेळात सामील न होणारी ही मुलगी कोण ? माझ्यापेक्षा काही निराळी जात आहे का ?

हीच ! अगदी हीच विचारसरणी मला त्या बेळी त्रास देऊ लागली. पुढे दोन-तीन दिवसांनी आईनेच मला तिच्याशी खेळावयास परवानगी दिली व मी देखील आढेवेढे घेतले नाहीत.

पण राहून राहून मला वाटे, आपण मोठे झालो काय ? आणि मोठे झालो म्हणजे काय झाले व मुलींत का खेळू नये ? तिलाही तसेच वाटत असावे; कारण तिचे डोळेच सांगत असत.

चिमुकल्या डोक्यात ब्रह्माचेही काहूर माजते. "हे असे का?"— तीनतीनदा मी आपले मनास हा प्रश्न विचारीत असे.

शिवाशिवीचा खेळ खेळताना डोळे झाकून तिला हुडकून काढण्यात मला समाधान वाटे.

— पण –! मोकळ्या मनाने तिच्याशी खेळणे बरे नाही; कारण तिची भूमिका वेगळी—!

भावलीचा खेळ खेळताना मला प्रत्येक कामात भागीदार करून घेणे तिला अवश्य वाटे व त्याशिवाय तिचे अडून बसे.

––पण ! " मोकळ्या मनाने त्याच्याशी खेळणे बरे नाही, कारण त्याची भूमिका वेगळी––! "

—म्हणजे ती मुलगी आहे असे मला वाटू लागले !

—व मी मुलगा आहे असे तिला वाटू लागले !

— आणि त्यात पुष्कळ अर्थ भरला होता !

आता मला असे वाटते की, इतक्या लवकर आम्हांला या गोष्टी कळावयास– नव्हे कळवावयास–नको होत्या. मुलगा म्हणजे कोण ? अन् मुलगी म्हणजे कोण ?

आपल्या मुलीला आपण धाक घातला होता हे तिची आई विसरली—माझे दादा देखील विसरले.

–अन् आम्ही ?

पुढे आमच्या खेळाचे स्वरूप बदलले. आम्ही काय खेळत असू हे उगीच सांगत बसत नाही. पण आम्हांला एकटे खेळणेच जास्त आवडू लागले.

तिची आई कुठे बोलायबसायला गेली तरी ती जात नसे. उगीच काहीतरी कारण सांगे.

मला ते इष्टच वाटे.

एके दिवशी अशीच आम्ही दोघेही माडीवरून खाली उतरलो. दोघांचीही हृदये धस्धस् उडत होती. कावरेबावरे झालो होतो आम्ही ! भेदरल्या दृष्टीने तिने माझ्याकडे पाहिले व ती हळूच म्हणाली—

" क्षिती ! कुणाला सांगू नकोस बरं, शपथ आहे तुला माझी ! "

" नाही ग ! नाही सांगणार. अगदी शपथ ! " मी म्हणालो. या आण-भाकेला त्या वेळी मोठे महत्त्व असते. घेतलेली शपथ कुणालाच मोडावीशी वाटत नाही.

—दुसऱ्यांदा देखील तिने शपथ घातली.

—आमचे खेळ कुणालाच कळले नाहीत.....!

ह्या आमच्या खेळांनी आमच्यात अंतर उत्पन्न केले व परवा ती माझ्याशी नीट बोलली नाही. तिच्या कपाळावर आठी पडली, दृष्टीत भीती उत्पन्न झाली व उगीच तिचे ओठ हललेसे वाटले– " कुणाला सांगू नकोस बरं ! "

तिची आई किंवा माझे दादा ! त्या वेळी त्यांना ह्या गोष्टी कळत्या तर आमची पाठ चांगलीच नरम झाली असती. कारण हा दोष आमच्यावर व ते—! पूर्ण निर्दोषी !

पण आता काय ! आता माझ्या हाती काय आहे ? सुखाची आशा प्रत्येकाला असते हे खरे, आणि गेलेले सुख पुन्हा परत येत नाही हे पण तितकेच खरे. परंतु त्याची आठवण असते ना ? व तिच्यामुळेच बरे वाटते—

—आमच्या सुखाच्या आठवणी देखील गिळल्या गेल्या होत्या ! पण कुणी ?

कधी कधी अशा विचारांचे डोक्यात काहूर माजते व डोळ्यांसमोर ती उभी राहते. तिच्या कपाळावरची आठी दोरखंडासारखी दिसते एखाद्या ! तिचे ओठ थरथरलेसे वाटतात व मला उगीच शब्द ऐकू येतात—

" कुणाला सांगू नकोस वरं ! स्वतःची आब्रुता मिरविण्यासाठी माझा विनाकारण बळी घेऊ नकोस. मला जगायचं आहे. क्षिती ! सांगू नकोस, शपथ आहे तुला. "

ती आकृती नाहीशी होते ! कशाने तरी काहूरलेले डोके सुन्न पडते...!!

आता वाटते पुन्हा एकदा तिची भेट घ्यावी. एकटी असताना तिची खात्री करून द्यावी व भीतीचा लवलेश न ठेवता आयुष्याची हयात गुजरण्यास तिला सांगावे. आपण दोघेही निरपराधी आहोत हे तिला समजावून द्यावे व गतसुखाच्या गोड स्मृती पुन्हा जागृत कराव्यात—

पण आता काय ? समजा, मी पुन्हा तिला भेटलो आणि तिची दृष्टी तशीच असली तर ? तिचे ओठ तसेच थरथरले तर ?. तर मला काय वाटेल ? मी इतरांसारखाच एक असेन—परिस्थितीने माझी सात्त्विकता मारली असेल असा तिचा समज झालेला पाहून मला वाईट वाटेल, दुःख होईल !!

दोन वर्षांपूर्वी पाहिलेली तिची आकृती माझ्यासमोर नीटशी येत नाही. मी तसा प्रयत्न केला की कपाळी बांधलेला दोरखंडच तेवढा स्पष्टपणे दिसतो.

लहानपणीची " ती " मला चांगली आठवते—! त्या वेळी ती फार चांगली होती. ती चुरूचुरू बोलत असे, दुडुदुडु धावत असे, खुदुखुदु हसत असे. ती फार हुशार निघाली असेल, फार सालस निपजली असेल, आता एका व्यक्तीच्या आयुष्याला तिने उजाळा आणला असेल—

पण त्याच व्यक्तीकरिता—तिच्या संशयप्रवृत्त मनोभावाकरिता तिला...!!

मला आता जसे वाटते तसेच तिलाही वाटत असेल ! मी जसा कावराबावरा होतो तशीच तीही होत असेल ! मी अपराधी नसताना माझे सात्त्विक सुख नाहीसे झाल्याबद्दल मला जशी चीड येते, तशीच तिलाही येत असेल. पण आता काय ?

अकारण येणाऱ्या आसवांना हातरुमालावर झेलून दृष्टी साफ झाल्यावर मी तिला एवढेच लिहू शकेन की—

" तू कुठेही असलीस तरी सुखी राहा, गतायुष्याची उजळणी करताना तुला माझी आठवण झाली की तू भेदरून जाऊ नकोस. तू चांगली होतीस व आता पण असशील – आणि माझ्यात देखील कशाचाच बदल झाला नाही !

" कधी काळी तुला माझे हे चार शब्द वाचावयास मिळाले व ते तू वाचलेस तर एवढे समजून जा, की ते लिहिताना माझा हातरुमाल भिजला आहे. तो का भिजला हे कसे सांगू ?

" एखाद वेळी अचानक तुझी माझी भेट झाली तर–! मजवर विश्वास ठेव की, बालपणी तुझ्या बावरलेल्या मुद्रेकडे पाहून वाहिलेली आणभाक जन्मभर मी मोडायचा नाही ! ! "

१६ । १२ । ३३

८

रानबोरीचा पाटील

ताटव्यावर फुललेली गुलाबाची फुले दरएकाला निरनिराळ्या कारणांकरिता हवी असतात. प्रत्येकजण फूल तोडतो. पण तोडताना त्याखाली असणाऱ्या काट्यांची भीती प्रत्येकाला बाळगली पाहिजे, असे थोडेच आहे ? पुष्कळ लोक तीक्ष्ण शस्त्रे वापरतात व बोटांचा स्पर्शही न होता फूल अलगद त्यांच्या हाती येते. उलट कित्येक लोकांना ती तोडताना स्वतःचा हातसुद्धा रक्ताळून घ्यावा लागतो.

पण मौज अशी की, रक्ताळून गेलेल्या हाती आलेली फुले फार जपणीने वापरली जातात. पण तेच दुसऱ्या माणसाला वाटते, ' उंः ! अशी फुले कित्येक तोडता येतील. एका फुलाची एवढी पर्वा कशाला ? '

शुद्ध-अशुद्ध, बऱ्या-वाईट अशा सर्व प्रकारच्या भावनांचे धागेदोरे अशाच प्रकाराभोवती गुंतलेले असतात. जगात नेहमीच प्रत्ययास नाही येत का ह्या गोष्टी ?

माझा मित्र यशवंत मराठे याच्या घरी रामजीकाका म्हणून एक पिढीजाद नोकर होता. तो जातीचा मराठा. इमानदारी हा त्याच्या हाडाचा प्रमुख गुण. यशवंताचे बालपण त्याच्याच मांडीवर गेले होते.

त्याने सांगितलेली रानबोरीच्या पाटलाची हकीकत त्याच्याच भाषेत सांगावयाची म्हणजे त्याला दीडदोनशे पानांचे चोपडे सहज लागेल. राजधन पाटील जसा दिसला तसा तो मुळीच नव्हता इतकीच माझी खात्री झाली नाही पण यापेक्षा कितीतरी !...

९५१४४

दिसावयाला तो टपोऱ्या बोरासारखा दिसत होता. वरून पिवळा गोल पण आत मात्र किडलेला ! बापाने त्याच्या नातवापर्यंत संपणार नाही एवढी नगदी रक्कम व जमीनजुमला करून ठेवला होता. तेव्हा त्याला विशेष सायास करण्याची गरज काय ? कोर्टाच्या कामापुरते इंग्रजी शिक्षण द्यावयाचा म्हाताऱ्याचा विचार होता. पण ज्याच्याकरिता शिकावयाचे ती पोटाची भाकर ताटभर असल्यामुळे राजधन घरी परत आला, शिकत असतानाच त्याचे लग्न झाले होते, व एका कुलीन घराण्याशी त्याच्या घराण्याचा सोयरसंबंध जुळला होता. लक्ष्मी राजधनचे मन ओढून घेण्यालायक सुंदर खास होती; किंबहुना त्याच्या अपेक्षेपेक्षा ती चांगली होती. पण...!

राजधन घरी आला तेव्हा तो बावीस वर्षांचा होता. खिसा गरम असल्यामुळे त्याचे मनोभाव गारठून जाण्याचे काहीच कारण नव्हते व दुसरे उद्योग नसल्यामुळे कामाच्या व्यापात मनोविकारांना किंचित्काल विसर पडणे देखील शक्य नव्हते.

कणखर म्हाताऱ्यासमोर काही करता आले नाही म्हणून घरामागची बाजू, मळ्यातली विहीर, बागेतील चबुतरा ही ठिकाणे होतीच. सर्वच बाबतीत लागू होते हे !

ज्या गोष्टी सुखासीन आयुष्यात लवकर आठवावयास लागतात त्यांची आठवण बरेच दिवसांपासून त्याला होती. कोणत्याच गोष्टीचा प्रत्यवाय नसल्यामुळे त्याचे दुर्दम्य प्रकारात पर्यवसान होणे अपरिहार्य होते.

तारुण्याचा उन्माद ! ! राजधनला वाटे, लक्ष्मीने आपल्याशी थोडे मोकळेपणाने वागावे, आपल्याकडे पाहून थोडे हसावे, सासूची नजर चुकवून तिने आपण सांगू तेथे येऊन भेटत जावे !

लक्ष्मीला तसे वाटणे शक्य नव्हते. चार दोन इंग्रजी शब्द येत असल्यामुळे घराण्याची विद्या राजधनला बद्य झाली होती व अमुक एक कृत्य वाईट आहे असे त्याला कधीच वाटत नव्हते. पण लक्ष्मीची गोष्ट वेगळी. कुलीन घराण्यात जन्म झाल्यामुळे शालीनता तिच्या रक्तात मिसळून गेली होती. नुसते हसण्यात किंवा सासूची नजर चुकवून राजधनला भेटण्यात तिला मोकळेपणा वाटत नव्हता. उलट आपण मर्यादेचे उल्लंघन करतो आहोत हीच जाणीव तिच्या मनात प्रामाणिकपणे वसत होती.

पण राजधनला हे चमत्कारिक वाटे. 'ही सासूसासऱ्यांला इतकी का भिते ?' हा प्रश्न त्याच्या तरुण, उच्छृंखल मनाने त्याला हजारदा टाकला होता. पण विचाऱ्याला हे माहीत नव्हते, की ह्या गोष्टींचा संबंध लक्ष्मीच्या समजाने घराण्याच्या नावलौकिकापर्यंत होता म्हणून !

—आणि हे एकमेव खरेच होते. राजधनचा जन्म जरी विसाव्या शतकातला असला तरी त्याचे व लक्ष्मीचे आईबाप एकोणिसाव्या शतकातले ना ? सासूच्या हयातीत सुनेचा जास्त संबंध नवऱ्यापेक्षा सासूशीच येतो !

राजधनला एक असें वाटले म्हणून...? लहानपणापासून कुणाचा उणापुरा शब्द कधी ऐकून घ्यायचे काम पडले नाही म्हणजे तरुणपणी बापास बाप न म्हणण्यापर्यंत मजल येते. राजधन असाच वाढला होता. नोकरचाकरांनी आजपर्यंत त्याचे शब्द झेलले होते. शालूसोबत्यांनी त्याची स्तुती केली होती. मानभंग असा त्याला कधी ठाऊकच नव्हता.

आपली बायको आपल्यापेक्षा सासूला जास्त भिते म्हणून तरुण राजधनला आईबद्दल संताप यावयास लागला. बाप जुना झाला म्हणून नव्या राजधनने स्वतःला सुधारक बनवून घेतले होते.

आपली बायको म्हणजे सोळा आणे मालकीची वस्तू ! आपल्या सुखाकरिता जन्मास आलेली ! ती देखील आपला असा विरस करते ? नोकराने एकपरी अपमान केला तर चालेल पण बायकोने–? राजधन अशाच परिस्थितीत वाढला होता की त्याला ह्या गोष्टी सहन होणे शक्य नव्हते.

त्याला बायकोचा राग येत होता. लक्ष्मीचे सद्गुण त्याच्या मार्गात येणारे वाटत होते. लक्ष्मी त्याच्या मनातून उतरत होती आणि याला आणखी एक कारण होते; ते म्हणजे, श्रीमंतीत वाढलेल्या लक्ष्मीचा स्वभाव देखील थोडा मानीच होता. नुकतीच माहेराहून आलेली, कुणाचा शब्द सहन केला नाही, मग राजधन झाला म्हणून काय झाले ?

खिसा गरम असल्यामुळे राजधनच्या वासना गोठून जाणे शक्य नव्हते.

रामजीने वरील हकीकत सांगावयास बराच वेळ लावला व बरेच प्रकार सांगितले. त्या सर्वांचा निष्कर्ष एवढाच की, सासूसासऱ्याची भीड धरणारी कुलवंताच्या पोटची मानी लक्ष्मी राजधनच्या शब्दावर नाचली नाही म्हणून त्याच्या मनातून उतरून गेली.

पाटलाचा बारा हजार वार्षिक उत्पन्नाचा एक बगीचा होता. राजधनची सर्वांत आवडती जागा म्हणजे तो बगीचा ! तिथे एका बाजूला एक झोपडी होती. पाटलाने एक रघवी* जातीचा म्हातारा बागेच्या राखणीला ठेवला होता. त्याला एक गुणी नावाची पोरगी होती. काकडीसारखा कोवळा वाण होता तिचा; नवरा जंगलात साप चावून मेला होता. म्हाताऱ्याला तुकडा करून घालावयास कुणीच नसल्यामुळे तिचा पाट लावून देण्याचे तो जरा लांबणीवर टाकीत होता.

जी परिस्थिती कायम होती ती राजधनच्या पथ्यावर पडली. तिथे बागेची पहाणी करण्यात त्याचा बराच वेळ जाऊ लागला. फळांनी लवलेल्या फुलझाडांना आकोड्या

---

* ह्या जातीची विचित्र प्रथा कोठे कोठे माझ्या पाहण्यात आली आहे. ती म्हणजे, एखाद्या तरण्याताठ्या पोरीचा हात जर एखाद्याने धरला तर तिला ओरडता येत नाही. कारण ओरडून प्रकरण उघडकीस आले तर तिच्यावर सामाजिक बहिष्कार घातला जातो.

लावण्यात म्हातारा गुंतला म्हणजे राजधन झोपडीकडे येई. एक दिवस तो तेथे पैशाची ' कसनी ' विसरला.

आणि असेच करून करून त्याने गुणीला पकडली !

राजधनच्या कानात पाचशेचा मोती होता. गावास जाताना बैलगाडीच्या दचक्याने तो पडून हरवला (?) ! दुसरे दिवशी असेच काही झाले.

पाटलाला वाटे आपल्यासारखाच आपला पोरगा शेतीत लक्ष घालतो. बागेचे उत्पन्न बारावरून पंधरा हजारांच्यावर जाणार !

सर्व गोष्टी ठीक झाल्यावर राजधनने गुणीच्या म्हाताऱ्या बापाला फायलावर घेतले. तो ओरडणे शक्य नव्हते. राजधनने रुपये वाजविले. साठ वर्षांच्या हयातीत ओंजळभर पैसे म्हाताऱ्याला कधी दिसले नाहीत. दातांवर मारावयास फुटकी कवडीही कधी कधीं त्याच्याजवळ राहात नसे. तेच आता हातावर छन् छन् वाजवावयास म्हाताऱ्याजवळ पाच शभरा आल्यावर दुःखाचे सुख होणे अशक्य नव्हते.

—आणि ज्या रात्री राजधन बाजाराला उशीर झाला होता म्हणून रानबोरी-पासून पाच मैलांवर असलेल्या गावास मित्राकडे राहिला (?) होता, त्या रात्रीच बागेतील झोपडीत रुपया वाजला व त्याच वेळी तिघेही हसले.

--म्हातारा हसला तो निराळ्या कारणाकरिता !

—राजधन हसला तो निराळ्या कारणाकरिता ! !

—आणि गुणी हसली ती निराळ्या कारणाकरिता ! ! !

त्या रात्री गुणीला स्वप्न पडले की आपण रानबोरीची पाटलीण झालो म्हणून ! !

पुढे राजधनने लक्ष्मीकडे पाहून हसणे सोडून दिले. तिला वाटले, आपली कुचंबणा होते हे नवऱ्याने जाणले ! तिला नवऱ्याबद्दल किती हायसे वाटले ! !

दुसऱ्याने प्रेमाने दिलेल्या फळापेक्षा एकेकाळी बागेतून चोरून आणलेले फळ अधिक गोड लागते–! बोटाला धक्का न लावता ताटव्यावरची शेकडो फुले मिळविण्याचे सामर्थ्य - शस्त्र - हाती असल्यावर बापाने सकाळी तोडून दिलेले गुलाबाचे फूल सायंकाळ-पर्यंत हुंगत बसण्यात काय मौज ? आणि दुसरे कोणतेच उद्योग नसताना एकच एक फूल हाती झेलण्याचा व त्याचा वास घेत बसण्याचा कंटाळा नाही का येत माणसाला ?

म्हाताऱ्या आईबापांनी डोळे मिटले ते राजधनच्या पथ्यावरच पडले. राजधन दौलतीचा मालक झाला. मात्र एवढे बरीक खरे की, त्याने दौलतीचा पैसा चोरापोरांना खाऊ दिला नाही. स्वतःच सर्व संभाळले.

कोणत्याच प्रकारची भीती बाळगण्याचे कारण नसल्यामुळे त्याने बागेत एक बंगली बांधली व गुणी त्यात राहू लागली. लक्ष्मीच्या अंगाची लाही लाही झाली. स्वतःकडून तिने शक्य तितका प्रयत्न केला. पण कितीही झाले तरी लक्ष्मी बायकोची जात ! अन

पुनः कुलीन घराण्यातली बायको ! स्वतःच्या घरचे व्यंग दुसऱ्याला दाखविणे तिला शक्य नव्हते. तिने राजधनला पुष्कळ सांगून पाहिले, घराण्याचा लौकिक सांगितला, नीती सांगितली, पदर पसरला, पाय धरले, पोरगा पायावर घातला. पण श्रीमंत मनोवृत्तीच्या लहरी राजधनचे उड्डून गेलेले मन काही लक्ष्मीजवळ आले नाही.

सर्व प्रकार तिला मुकाट्याने सहन करावा लागत होता. कारण एक ! राजधनची पत ! ! येवढ्या मोठ्या दौलतीचा मालक तो. त्याला चार लोकांत वसावे लागते. त्याच्या अब्रूवर आपली अब्रू अवलंबून ! आपल्यावरच लोक भलभलते संशय घेतील अशी तिची समजूत होती.

एक दिवस राजधन बागेत जावयास निघाला. लक्ष्मीने त्याचे पाय धरले. पण एक विचकट शिवी हासडून 'माझ्या सुखाच्या आड येतेस ?' असे काहीसे म्हणत तिच्या मस्तकावर लाथ मारून तो चालता झाला !

एक दिवस लक्ष्मी त्याला पुनः म्हणाली, तेव्हा 'माझा सूड घ्यावयाला तू दावेदारीण जन्मास आलीस !' असे उत्तर देऊन तो चालता झाला. दुसऱ्यांदा असेच काही झाले ! तिसऱ्यांदा असेच काही...!!...!!

लक्ष्मी मानी स्वभावाची खरी, पण हिंदू स्त्रियांच्या परस्वाधीन जिण्यात त्यांचा मानमरातब, अब्रू वेअब्रू सर्व त्यांच्या जीवधन्यावर ! ती बिचारी निराश झाली. माहेरी जावे तर स्वतःवर बोल ! घरी राहावे तर हे प्रकार ! कुणाला सांगावे तर राजधनची अब्रू ! जातिवंत वाघीण असली तरी पिंजऱ्यात सापडली होती. नखाने ओरखाडणेच तिला फक्त शक्य होते–पण राजधन थोडाच दाद देणार होता ? तिला सध्याच्या घटकेला एकच शक्य होते, रडायचे ! खूप रडायचे !! व ऊर बडवून घ्यायचा ! दुसरे ती काय करणार ? दुसऱ्यांना तिच्या जिवाचा तडफडाट ऐकू जाणे शक्य नव्हते. कारण पैशाच्या खणखणाटात कुणाला ऐकू जाणार ?

एक दिवस ती जिवाला कंटाळली व जिवाचे बरेवाईट करण्याचा तिने निश्चय केला. पोटचा कोवळा पोर ! त्याच्यापासून दूर होताना तिला भडभडून आले. त्याला पोटाशी धरून ती खूप रडली. रडताना भान न राहून ती त्या मुलाला उद्देशून काहीसे मोठ्याने बोलली व तितक्यातच राजधन आल्यामुळे त्याला ते ऐकू गेले. मग काय ? 'माझ्यावर बोल ! माझ्या नावाची बदनामी !' तो नुसता काटे ओकत होता. त्याने पोराला जवळ घेतले व दाराला कुलूप लावले. लक्ष्मी दोन दिवस अन्नपाण्याविना तडफडत होती.

तिसरे दिवशी बाहेर आल्यावर राजधन बागेत जावयास निघाला असताना ती पुनः त्याच्या पायांवर पडली. त्या वेळी तिच्या मुखावर दुःख, निराशा यांचे मेसूर मिश्रण झाले होते.

'माझा जीव घ्या, नंतर जा. मी नाही राहणार आता.' – तिने पाय घट्ट धरून ठेवले

राजधनची श्रीमंती लहर, मानीपणा, सारे सारे उसळले एकदम. त्याने तिला पुनः एकवार लाथाडले. 'थांब ! तुझा जीवच घेतो, म्हणजे मला सुख मिळेल.'

तो त्वेषाने बाहेर आला. आसुरी मनोवृत्ती पुरेपूर खवळल्या होत्या. त्याने बाग गाठली.

राजधन येणार म्हणून गुणी केस विंचरीत बसली होती. त्याने तिला तसेच घरी आणले. हट्टास पेटलेला राजधन एका अबलेवर सूड उगवणार होता.

त्याने गुणीचा हात घट्ट धरून ठेवला व तो लक्ष्मीच्या खोलीत आला. ती विपण्ण चित्ताने बसली होती. तिचे डोळे सुजले होते. निराशेचा त्वेष त्यातून प्रतीत होत होता. राजधन येताच ती उठून उभी राहिली.

.....–व जिच्याकडे जाताना तू मला रोज अडवितेस तिलाच घेऊन तुझ्या उरावर नाचतो, त्याशिवाय तुझे समाधान होणार नाही.' राजधनच्या तोंडून वाग्बाण निघाले.

किंचित्काल त्याने इकडे तिकडे पाहिले. गुणीचा हात झिडकारून टाकला व लक्ष्मीचे केस ओढून त्याने तिला पालथी पाडली.

एक अस्पष्ट अशी दबती किंकाळी तिच्या तोंडून बाहेर पडली. पण तिच्याकडे लक्ष कुणाचे होते ?

एक झटका देऊन त्याने तिचे दोन्ही बाहू वर पसरविले; बाजूचा पलंग खसकन् ओढला व उशाकडील दोन ठावे तिच्या तळहातावर ठेवले–!

गुणी या प्रकाराने भेदरून गेली होती. तिला त्याने पलंगावर ओढली व एक विकट, आसुरी हास्य केलें !

खाली लक्ष्मीच्या अंगाची लाही लाही होत होती – जीव पेटला होता, आणि वर रानवोरीचा पाटील नव्या पाटलिणीच्या गळ्यात हात टाकून गुलगुल् गोष्टी करीत होता–!!

इष्काच्या पायी स्वतःच्या नांदत्या बायकोला चिरून काढणाऱ्या मायावश राक्षसांच्या गोष्टी मी ऐकल्या होत्या, पण चालत्या बोलत्या, रक्तामांसाच्या, भावना-संवेदना असलेल्या माणसांच्या हातून होणारा हा प्रकार ऐकण्याची माझी ही पहिलीच वेळ होती.

तोंडात घास घालणे ही जर आवश्यक बाब नसती तर नोकरा–चाकरांच्या तोंडाबाहेर ह्या गोष्टी सहज पडल्या असत्या. पण पाच-पन्नासांच्याच तोंडी असणाऱ्या ह्या गोष्टी एकदम गडप का होतात ?—पैसा

वरील प्रकारानंतर तिसऱ्या दिवशी तुळशीला पाणी घालावयास लक्ष्मी बाहेर आली तेव्हा रामजीला मालकिणीचे हात रक्ताळलेले दिसले. तिच्या चर्येवर मृत्यूचे साम्राज्य पसरले होते. अंतरंग आणि बहिरंग यांनी पेट घेतल्यामुळे तिचा मुखडा

करपून गेला होता. रामजीची छाती धडधडली ! म्हातारा मालकिणीच्या पाया पडला; तिच्या बापाएवढेच त्याचे वय होते. त्याला दीनवाणे पाहताच तिला भडभडून आले व चार दिवसांचा उमाळा एकदम तिच्या हृदयातून बाहेर उसळला ! रामजीला सारी हकीकत सांगितल्यावर तिला थोडे समाधान वाटले !

पण लागलीच तिला स्वतःची चूक कळून आली. दुःखाने वेडावून आपण भलतेच बोलून गेलो म्हणून ती कावरीबावरी झाली. बापुडवाण्या मुद्रेने तिने म्हाताऱ्याकडे पाहिले व सोस गिळून त्याच्यापुढे पदर पसरला—

'रामजीकाका ! माझ्या बापासारखा आहेस तू ! ही हकीकत माझ्या माहेरी जाऊ देऊ नको. खानदानीच्या घराण्यातील अब्रूदार बापाची मी लेक ! माझ्या दोघीही बहिणी घरी सुखानं नांदत आहेत. माझी हकीकत कळली तर अवघा मराठमोळा म्हणेल, 'ह्या पोरीला नांदता आलं नाही, ताटभर भाकर खाता आली नाही अन् घराण्याच्या नावास बट्टा लावला !' काका ! माझ्या एकटीकरिता माझ्या देखत मी घराण्याची अब्रू कशाला घालवू ! राहिले किती दिवस आता माझे ? अवसेला चार दिवस बाकी ना ?'

'खानदानी घराणे ! घराण्याची अब्रू ! आणि अवसेला उरलेले चार दिवस !'

हळू, हळू, मोठ्यानं नाही वाचायचं हे !

५।१।३४

९

अंतरंग

तसे सहसा कधी व्हायचे नाही, पण झालेच तर—म्हणजे कुणा नवख्या माणसाला ते टेबल तशा स्थितीत दिसलेच तर—तो म्हणेल,"काय पोरकट आहे !" आणि दुसऱ्याची गोष्ट जरा बाजूला असू द्या; पण परवा माईने देखील असे म्हटलेच की !

स्वतःचे काम संपवून पदराला हात पुशीत ती माझ्याकडे आली. मी काहीतरी लिहीत होतो. मला त्रास देऊ नये म्हणून हळूच टेबलावर हात ठेवून ती माझे लिखाण वाचू लागली —'एकदा जी सवय लागली ती तोडावयास अत्यंत सायास पडतात'—

"माई ! मला हे लिहू दे बरं का. उद्याच्या नोट्स् आहेत ह्या."

"बरं, किती वेळात लिहून होईल रे तुझं–" तिने घाईने विचारले.

"अग पाच दहा मिनिटात—तू जाऊ नकोस मात्र." मी खाली दृष्टी वळविली.

"मी काकूकडे आहे, हाक मार मला—" ती जावयास निघाली. तिने हात उचलले तोच तिच्या त्या ओलसर स्वच्छ हातावर शाईच्या वेड्यावाकड्या रेषा उमटल्या.

"इश्श ! बापू, हे रे काय ! किती घाणेरडं झालं आहे टेबल हे ! अन् हा तुझा पोरकटपणा जाणार कधी ? किती लिहून ठेवलंस पण !! एकदा ते धुऊन तरी काढ – की मी देऊ धुऊन !"

"तू अगोदर इथून चालती हो. पाच मिनिटांत हाक मारतो तुला मी." मी लिहू लागलो. माई म्हणजे माझ्याबरोबरच खेळलेली. तिने चटकन् तो ओलसर भरलेला हात माझ्या गालावर दाबला आणि हसत हसत ती घरात पळाली—

—आणि खरोखर ही सवय वाईट नाही का ? काहीही, कसेही त्या टेबलावर लिहून ठेवायचे हे अजूनही मला शोभते का ? परवाचे माईचे ते वाक्य—"एकदा ते नीट धुऊन तरी काढ, की मी देऊ धुऊन—" तेच मी तितक्यातल्या तितक्यात पाच-सातदा लिहून काढले होते ! पण ते टेबल मात्र धुतले नाही. काय असेल ते असो !

पुष्कळदा असे होते. लिहिताना मध्येच लेखणी अडते आणि मी विचार करू लागतो. सहज टेबलावर नजर जाते. आणि मग मी कशाबद्दल विचार करीत होतो याचे भानच राहत नाही. आकृती, अस्पष्ट आकडे, शब्द वगैरेकडे माझे मन ओढले जाते —कारण त्यांपैकी प्रत्येकाला अर्थ असतो. मग तो कोणताही असेना—

— माईचे तर नाव कित्येक वेळा लिहिले असेल मी ! आणि ती सुकलेली चांदणी ! इतरांना तो एक शाईचा डाग दिसेल, पण मला तो तसा दिसेल का ? अंहं ! कितीतरी अर्थ भरला आहे त्यात !! माईची सारी जीवनकथा त्यात दिसते मला— आणि त्या चांदणीकडे पाहून हजारदा ओल्या हृदयाने मी माईबद्दल विचार केलेही–

एकाच ठिकाणी खेळलो आम्ही. आमच्या दोघांच्याही आयुष्याच्या दिशा कशा उजळल्या गेल्या ! पुष्कळदा मला मोठे आश्चर्य वाटते. माझे नाही मोठेसे, पण माई—?

वाऱ्याच्या झुळकीबरोबर माईचे केस उडत होते आणि ती सुखाने झोपली होती. एका रात्री प्रभाकराने तिचा हात धरला व झोपेने भारावलेल्या तिला नकळत तो भलत्याच वाटेने घेऊन गेला. ती जागी झाली आणि एकंदर सर्व प्रकार तिला जाणवला. तेव्हा त्याने दाखविलेल्या मार्गानेच आणि त्याचाच हात धरून जाणे तिला भाग पडले !

घराच्या दक्षिणेस खिडकीतून एक उंच उंच टेकडी खूब खूब दूर दिसत असे. इवलीशी माई मला नेहमी म्हणे—"मी किनई, एक दिवस त्या टेकडीवर चढून जाणार आहे." पण आता माईचा मार्ग निराळा फुटला होता आणि त्याच्या शेवटी ती टेकडी नव्हती !

भरली घागर डोक्यावर घेऊन आलेल्या माईच्या हातचा शिंतोडासुद्धा प्रभाकरच्या आईने सहन केला नाही, मग पाणी पिणे तर दूरच! आपल्या रस्त्याने जाणाऱ्या आयाबाया माईकडे बघू लागल्या तरी माई प्रभाकरच्याच पायाकडे पाहून चालू लागली. पण प्रभाकरला तरी त्या रस्त्याची नीट माहिती होती का? दिवस होता तोपर्यंत उजेडात त्याला पावले उचलता आली. पण अंधाऱ्या रात्री तो अडखळू लागला. रस्ता विचारावा तर माईशिवाय दुसरा कोणी दिसेना. तो चिडून गेला, संतापला आणि माईला सुख पारखे झाले!

मी कितीही समाधान केले तरी घातल्या पाण्याने कुठे पीक येते का? ती जेव्हा जेव्हा माझ्याकडे येई (आणि इथे होती तोपर्यंत ती रोज येत असे) तेव्हा तेव्हा मी तिला हसत खेळत घरी पाठवीत असे. ती नेहमी म्हणे—"बापू! तू तरी आता दूर जाऊ नकोस" तिच्या किंवा माझ्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करणारी एक प्रबल शक्ती असल्याची जाणीव मला असल्यामुळे मी नुसते—"नाही ग!" म्हणून स्वस्थ बसे. ती गेल्यावर मन उगीच हाका मारीत सुटे—"माई, माई ग!"

एक दिवस मी पेरू आणायला गेलो. सकाळची वेळ. पेरूवाला मला सुंदर सुंदर पेरू दाखवू लागला. इतक्यात माझ्याच बाजूला असलेला एक मध्यम वयाचा गृहस्थ म्हणाला,—"अहो, तो पेरू नका घेऊ, पक्ष्याने टोचला आहे."

"मग त्याला काय हरकत आहे! आज सकाळीच तोडला हो दादा, झाडाचा!" पेरूवाला बोलला. मला काय वाटले कुणास ठाऊक; पण मी तो पेरू मुद्दाम घेतला. घरी आणताच आई म्हणाली–"बापू, अरे हा टोचलेला आहे. कशाला आणलास-?"

"मग झालं काय? सबंध पेरू खराब आहे का?" मी तो पेरू घेऊन चिरू लागलो, इतक्यात माई ताकाचे भांडे घेऊन आली––"माइटले, अशी वेळ साधून येत जा. मी तुला बोलावणं पाठविलं नव्हतं."

"काकू, पाहा ग कसा बोलतोय तो—"

"काकू काय पाहते? माझ्यात असं पाहण्यासारखं काय आहे? तुझ्यात आहे तसं बरं? अगदी या पेरूसारखी पिवळी दिसते आहेस माई तू—"

तिने त्या पेरूकडे पाहिले. ती हसली नाही. मी चपापलो. आज माई खिन्न का झाली? आणि त्याला माझ्याकडून कारण मिळाले का?— मला चुकचुक वाटू लागली!

संध्याकाळी मन रमावे म्हणून "सदाफुली" हाती घेतली. शेवटचे राहिलेले प्रकरण मी वाचू लागलो. डावा दंड मी टेबलाला टेकला होता आणि हाताची बोटे केसाशी खेळत होती. शेवटी शेवटी फारच बहारीचे वर्णन होते—"अशोकाने तिमाला हृदयाशी घट्ट धरले होते. तो तिचे चुंबन घेण्यात मग्न झाला होता. माझी चाहूल लागताच अशोक ओशाळला. किती स्वाभाविक होते ते ओशाळणे!.....तो

प्रेमभराने जिवाचे सारे भाव एकवटून चुंबन घेत होता. तिमा अगदी अचल व स्तब्ध होती...'' शेवटचा शब्द वाचून मी भानावर आलो. माई माझ्यामागे उभी होती.

'' काय ग ? ''

तिने उत्तर दिले नाही. मी तिच्याकडे पाहिले. तिच्या डोळ्यांतून दोन अश्रुबिंदू गळाले आणि त्यांपैकी एक टपकन् त्या टेबलावर वाजला--

आज सकाळच्या प्रसंगापासूनच माईचा पदर ओला झाला होता. मी उगाच बसलो. मलाही तिच्यासारखेच करावेसे वाटले. तिला हसत खेळत घरी पाठवावयाची, हा माझा निश्चय मला आठवला. मी हसत म्हणालो—

'' माई, हे काय ? असं करावं का ? माझ्यावर रागावलीस का ? ''

'' बापू—''

'' मग तुला झालं तरी काय ? सांगायचं नाही का ? ''

'' मला काय झालं हे त्या अश्रूला विचार. ''

काय बोलावे हे मला सुचेना. मी पुनः बळेच हसलो.

'' तो म्हणतो आहे की माई उगाच रडते आहे. ती इतकी सुंदर आहे, इतकी बोलकी आहे--''

'' होय, आणि इतकी सुखी आहे-'' ती चिडून म्हणाली. तिला सारे अनावर झाले होते.

'' खरंच तसंच म्हणतो आहे तो ! सुख मानून घ्यायचं असतं माई ! कसल्या सुखाच्या आणि प्रेमाच्या कल्पना उरी बाळगून बसली आहेस तू ! मानलं तर प्रेम. दुसरं काय ! माझा तर नाही या प्रेमावर विश्वास—''

'' अगदी खरं बोलतो आहेस बापू तू ? ''

'' हो, खरंच ! '' मी बळजबरीने उत्तर दिले.

'' बरं—'' मला यानंतर दुसरे तिसरे बोलता येणे शक्यच नव्हते. पाने भिजू नयेत म्हणून मी '' सदाफुली '' बाजूला सारली आणि आवाज ओढून म्हणालो—

'' माई, निदान माझ्याकरिता तरी तू उगी राहीनास. परवा काय कबूल केलं होतंस तू—''

'' तू मला नेहगीच समाधान देत आला आहेस. अंधाऱ्या रात्री कुठे जावे हे मला समजेना. मी ओरडू लागले. तू तिथे असतास तर-- 'माई, एकदा मोठ्याने हास पाहू, म्हणजे तुझा मार्ग तेजाळून तुला आपोआप वाट दिसेल—' असं म्हणाला असतास. मी निजले होते.....''

माईने सांगितले ते खरे होते. मी तिला तसेच सांगितले असते. आम्ही सर्व इथे केव्हा आलो हे माहीत नाही, केव्हा जाणार हे निश्चित ठरलेले नाही, काय

करावे आणि का करावे हे देखील कुणी सांगू शकत नाही. मग मिळालेली भूमिका उजळ करून दाखविण्यातच आपले वैशिष्ट्य आणि व्यक्तित्व नाही का ? आपल्या रडण्याने दुसऱ्याला त्रास द्या कशाला ! !—

बराच वेळ थांबून मी माईला घरी पोचवून आलो. परत आलो तो टेबलावरचा अश्रुबिंदू सुकून गेला होता. मी त्याकडे किती वेळ पाहत बसलो ! नंतर नकळत एखाद्या यंत्राप्रमाणे माझ्या हाताने तिथे एक चांदणी काढून ठेवली !

पण मी ती कशाकरिता काढली ? माझा प्रेमावर विश्वास नाही ना ? मग माईबद्दल एवढे का वाटावे ? तिच्या परिस्थितीमुळे ? पण माझ्यासारखेच इतरांना का वाटू नये ? आणि पुष्कळदा आजपर्यंत कशाकरिता माझे डोळे ओले झाले आहेत ?

परंतु ज्या गोष्टी पटतात त्या सर्वच आपण दुसऱ्याला सांगत असतो का ? आणि तसे न केले तरी जो परिणाम व्हायचा तो टळतो का ?

मी किती वेळा त्या चांदणीकडे शून्य दृष्टीने पाहात होतो. तिच्या शेजारीच बत्तिसाचे आकडे गर्दी करून वेडेवाकडे काढले होते. त्यात सुद्धा किती गोष्टी भरल्या होत्या ! माझ्या आयुष्यात या आकड्यांना अकारण महत्त्व आले होते—

—मी आणि तो सतत चार वर्षे हातात हात घालून चालत होतो. त्या वेळी मैत्रीच्या व्याख्याही आम्हांला माहीत नव्हत्या. काठच्या पायरीवरून पाण्यावर हळूच फुंकर घातली तरी तरंगलहरी दुसऱ्या तीरापर्यंत जाऊन पोचत असत हे आम्ही पाहत होतो— अनुभवीत होतो.

त्या जगात सौंदर्य होते. उपवन होते ते एक ! त्यात फुले होती, फुलपाखरे होती— आणि सत्य पण होते ! दोन फुले एकमेकांजवळ येताना किंवा दोन फुलपाखरे एखाद्या फुलाभोवती बागडताना त्या फुलाला पूर्वी कीड लागली नव्हती हे पाहून घ्यावे लागे.

तेवढ्या अवधीत आम्ही फारच कमी वेळ बोललो. आम्हांला बोलावयास काहीच नव्हते— आणि बोलावयाचे तरी कशाकरिता ? दुसऱ्याच्या हृदयात आपल्या-करिता किती जागा आहे हे पाहण्याकरिताच ना ? ते तर आम्ही पूर्वीच करून टाकले होते. संथ पाण्यावर वारा खेळत असला म्हणजे मन लोभावून जाते. आत पाणी किती आहे याची जाणीव असली म्हणजे कशाचीही भीती न बाळगता जललहरीच्या मनोहर लास्यात मिसळून जावेसे वाटते. पण तीच आतली खोली माहीत नसली म्हणजे मन म्हणते—आत काय असेल ? किती पाणी असेल ? आत साप असतील का ? मला दुःख होईल की सुख होईल ?.....

माझा नेहमीचा नियम. रात्री साडेनवाला सहज म्हणून मी जिना उतरून खालच्या अंगणात येत असे. त्यानेही ती वेळ कधी चुकू दिली नाही. आम्ही नंतर

भेटत असू. आमच्याकडे पाहावयास त्या वेळी कुणीही नसे. तेवढ्या पाच-दहा मिनिटांतच जे होईल ते आमचे बोलणे आणि त्यातूनही बराच वेळ एकमेकांकडे पाहण्यातच जात असे. पण परतताना आम्ही कितीतरी आनंदित व्हायचे !

मला नीट आठवते ते ! मी एकदा आजारी होतो. हॉस्टेलमधील सारी मित्रमंडळी सहानुभूतीने माझ्या उशापायथ्याशी बसत–तो कधीच बसला नाही. मला विरंगुळा वाटावा म्हणून ते मला काही वाचून दाखवीत–काही गोष्टी सांगत–तसेही त्याने कधी केले नाही. सहा वाजले की सारी मुले जेवून उठत. त्यांच्या अगोदरच पाच मिनिटे तो उठत असे. टॉवेलने हात पुशीत तो माझ्याजवळ येई. राहिलेले औषध करात ओतून तो मला देत असे. मी औषध घेताना त्याचे डोळे माझ्या चेहऱ्यावर खिळलेले असत. माझ्या हातचा कप घेऊन तो मला केविलवाण्या नजरेने म्हणे—"बापू ! केव्हा बरा होणार आहेस तू ! असं काय करतोस रे ?" माझ्या खोलीत मुले यावयास लागली की तो चालता होई !

आमच्या मैत्रीबद्दल कुणाला हेवादावा वाटला नाही; कुणाला त्रास झाला नाही; कुणाला मध्ये बिब्बे घालण्याची बुद्धी झाली नाही.

एकदा तो माझ्या खोलीत आला. दुसरे दिवशी त्याची परीक्षा होती; त्याने पुस्तक उघडले व एका कवितेवर बोट ठेवून तो म्हणाला—"याचा अर्थ सांगतोस का ?" मला आश्चर्य वाटले. यापूर्वी तो कधीच मला असा भेटला नव्हता. मला आनंद झाला—

मुग्ध मधुरता चित्ती घेता – पूर्वी अपुली होती समता ।
गेला गेला काल अहह ! तो – फेर किती आता ॥

– केशवसुत.

पहिल्या दोन ओळींचा अर्थ मी त्याला चांगला समजावून दिला. शेवटच्या दोन ओळी मात्र मला नीट उमगल्या नव्हत्या. त्या रात्री आम्ही बराच वेळ बोलत होतो.

तीन-चार दिवसांनी मला गावाला जावयाचे होते. रात्री साडेदहाला गाडी जाणार होती. स्टेशनच्या एका कडेला बऱ्याच अंतरावर आम्ही बसलो होतो. कुणालाच बोलवले नाहीं–बोलावेसेही वाटले नाही. अखेर ती स्निग्ध शांतता मी मोडली—"परवाचा तुझा पेपर मास्तरांनी माझ्याकडून तपासून घेतला. आठ मार्क्स् कापून उरलेले बत्तीस मार्क्स् मी तुला दिले आहेत. केशवसुतांच्या ओळी तू किती सुंदर लिहिल्या होत्यास !" मी त्याचा हात जोराने दाबला—

—त्याने माझ्याकडे हसून पाहिले. तो अगदी आनंदी दिसला; जवळून त्याने मला विचारले—"किती मार्क्स् दिलेस तू मला ?"

" बत्तीस--"

" किती म्हणालास ? "

" बत्तीस ! का, ऐकू येत नाही ? "

" नाही ! पुनः एकदा सांगून दे. तुझी भेट कशाला--"

तसे म्हणण्याचा त्याचा काय उद्देश होता हे मी समजलो. त्याचे दोन्ही हात माझ्या गळ्याभोवती विळखा घालून होते. त्याच्या दोन्ही गालांवर मी आपले हात दाबले आणि ओठांशी ओठ भिडविले.

—एकमेकांचा निरोप घेतला आम्ही. ओठ हलत असतानाच मी गाडीत बसलो. किती तरी वेळ मला तो आवाज स्पष्टपणे ऐकू येत होता—

—आणि आता ? आज तरी मी तो विसरलो का ? ते स्थळ, ती वेळ—! पण आम्ही मात्र कायमचे दूर झालो आहोत-- यापुढे एकमेकांना भेटणे आमच्या हाती नाही आणि पुनर्जन्मी ?— पण हे खरे आहे का ?

त्या दिवशी कवितेचा अर्थ सांगताना शेवटच्या दोन ओळी मला नीट उमगल्या नव्हत्या, आता मात्र— पण त्या कुणाला समजावून द्यावयाच्या ? आता मला पुढच्याही ओळी बागेत बसलो म्हणजे गुणगुणल्याशा वाटतात—

सौकुमार्य तव अजुनी आहे-
हसतचि आहे हास्य तुझे हे ।
परि मग भाली ढग अश्रूंचा,
हाय, डवरलाहे ॥

मी नदीकाठी एकटा फिरतो. लव्हाळ्याशी खेळणारे पाणी आनंदाने खिदळत पळत असते. बाजूच्या झाडाच्या डहाळीवर पाखरांची किलबिल ऐकू येते. पानांच्या देठावर हळूच मारलेल्या चोचीचा आवाज देखील ऐकू येतो मला त्यांच्या ! पण--! एके काळी मला याचा अर्थ कळत होता आणि आता—आता वाटते काहीच ऐकू येऊ नये. फक्त तेवढाच आवाज ऐकू यावा—

" For all is dark where thou art not. "

सत्यसृष्टीतील भावलहरी स्वप्नसृष्टीत तरंगताना दिसतात असे माईने मला सांगितले होते. परंतु रात्रंदिवस ध्यानीमनी रंगणारी ही गोष्ट माझ्या स्वप्नी कधीच तरंगली नाही. मी त्याकरिता देवाजवळ प्रार्थनासुद्धा केली. तो तरी काय करणार बिचारा ! आकाशाच्या पोकळीत त्यालाच गटंगळ्या खाव्या लागतात !

दुसरा काहीच आधार नसला म्हणजे पाण्यावर तरंगणारे पानच आपण हाती धरतो. त्या बत्तिसाच्या आकड्याने मला तेवढे--नव्हे, त्यापेक्षा शतपटींनी जास्त समाधान मिळते. तीन आणि दोन यांची ही संगती माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली की त्यातून निराळाच आवाज ऐकू येतो व त्यातच रंगून जावेसे वाटते. वेडे

हात उगीचच चाळे करीत असतात आणि टेबलावर अक्षरे उमटत असतात—बत्तीस ! बत्तीस !!

तशीच हो शकूनची आठवण ! एक दिवसही असा गेला नाही की ज्या दिवशी मला शकूनची आठवण झाली नाही. मी असेपर्यंत तिला सावलीत बसवावयाचे असा माझा निश्चय आहे. तिला कशाला त्रास ! परिस्थिती ? पण तिला काय त्याचे ? मी कशाकरिता आहे ? वाघिणीशी झुंज खेळायला कोकिळेला कुणी नेत असतात का ? आणि तसे केले म्हणजे तिकडून दमून-दवडून आल्यावर आंब्याच्या डहाळीवर बसून गाईल कोण ! माझी शकून ! किती जपतो आहे मी तिला—!

परवाच्या सुटीत तिला चार दिवस मी इथे आणले होते. तिच्यात काहीही बदल झाला नव्हता. ती आली ती माझ्याच ताटात बसून जेवली. मी कालवून दिलेलाच भात तिला आवडला-माझ्या तोंडातलीच सुपारी चिमणीसारखी काढून घेण्यात तिला सुख वाटले ! माझी शकून ! किती किती गोड पोरगी आहे !

तिला मी हौसेने सिनेमाला घेऊन गेलो परवा. तिला फार आवडला तो सिनेमा.-कृष्णाने मथुरेला जातेवेळी परत यायचे राधेला वचन दिले होते. पण तो आला नाही. मधुवनातील झाडाखाली, नदीच्या खळखळीत, पक्ष्यांच्या कूजनात तिला बिचारीला तोच आवाज ऐकू येत होता— "हाँ राधे, जरूर आऊंगा-होय राधे, जरूर येईन"—

—राधेच्या पतिदेवाने तिच्यावर संशय घेतला व तिला मारण्यास त्याने काठी उचलली ! कृष्णाने त्याला त्या वेळी आपल्या उज्ज्वल प्रेमाची साक्ष पटवून दिली- "मोहन राधा है, राधा मोहन है, जिन्हें आँखे हैं, वे देख सकते हैं," — अगदी हे सारे सारे परत येताना शकूनने मला म्हणून दाखविले होते—

त्या रात्री जेवून चांदण्यात पडल्यावर केस बाजूला सारीत ती म्हणाली-- "राधा किती सुंदर नाचते रे ! मला शिकवशील तसा टिपऱ्यांचा नाच ?"

"हो, शिकवीन बरं शके."

"आणि मग आपण दोघेही नाचू."

"तेही कबूल-" आणि याची कबुली घेतल्यावर ती झोपली. किती निर्मल असते बालिकांचे मन ! ती कितीही मोठी झाली तरी तशीच राहिली पाहिजे. तिचे गाल तसेच गुलाबी असले पाहिजेत; तिच्या ओठांच्या पाकळ्या तशाच नेहमी खुलल्या पाहिजेत; तिचे डोळे असेच लाडके राहिले पाहिजेत आणि नेहमी तिने असेच म्हटले पाहिजे— "बापू ! मग आपण खूप खूप नाचू !" एवढे झाले की पुरे. बाकी मी आहेच सर्व गोष्टींकरिता !

आणि काका तरी तेच सांगून गेले मला. त्यांनी आम्हांला तसेच वागविले ना ? माझा परीक्षेत पहिला नंबर आला होता म्हणून मुद्दाम अडचण सोसून त्या महिन्यात

त्यांनी ते टेबल घेऊन दिले होते. किती तरी हौस वाटली मला नि त्यांना ! कसा विसरेन मी सारे ?

काका इतके आजारी होते. दहा दहा मिनिटांनी बेशुद्ध पडत, पण शेवटपर्यंत ते माझ्याशी बोलले–" दुसऱ्याच्या फंदात पडायचं नाही. आपल्याला काय वाटेल ते करायचं, चूक झाली तरी ती आपणच सुधारायची " ––कितीतरी सांगितले त्यांनी मला आणि शेवटी त्या काळघटकेच्या अखेरच्या सेकंदालाही त्यांचा आत्मा मला जाता जाता सांगून गेला—" बापू ! ऐकावं जनाचं, करावं मनाचं " – !

काकांच्या देहाला मी स्वतःच अग्नी दिला. अग्नीच्या एकेका ज्वालेबरोबर त्यांच्या आशा, निराशा, सुखदुःखे जळून गेली; काकाही राखेत मिसळले. पण त्यांची स्मृती ? –– रोज टेबलावर येऊन बसलो म्हणजे आठवते मला – त्यांनी किती प्रेमाने आम्हांला पंखाखाली धरले– शक्यकरिता मी काय वाटेल ते करीन– !

आणखी कितीतरी लिहिले आहे इथे ! किती किती म्हणून सांगू ! ढगाआड लपलेल्या चांदण्या लुकलुकताना दिसल्या म्हणजे जसे वाटते तसेच मला इथे वाटते– भोवतालची रडारड मला ऐकू येत नाही– माईला मी हसायला सांगितले होते तेच शब्द ऐकू येतात ! तापलेल्या वाळूतून प्रवास करताना मला चटके बसत नाहीत— मागच्या मुक्कामी अनुभवलेल्या स्निग्धमुग्ध सुखाच्या कल्पनेच्या हिंदोळी हेलकावतच मी पावले उचलतो ! पुढचा मार्ग दिसला नाही तरी मी भेदरून जात नाही. आशा सोडीत नाही. कारण कोणते तरी गाल मला नेहमी गुलाबी ठेवायचे आहेत; कोणत्या तरी ज्योती मला तेवत ठेवायच्या आहेत, याची मला नेहमी जाणीव असते. आणि म्हणूनच मी कुणाचे न ऐकता स्वतःला गवसेल त्या मार्गाने पुढे पुढे जात असतो,

माईप्रमाणे आईसुद्धा बरेच वेळा मला म्हणाली होती–" दे ना रे ते टेबल एकदा नीट करायला ! भारीच आळशी––"

तिला कसे समजावून देऊ हा माझा आळस नाही म्हणून ! बिचारी आई ! ! जगाच्या धकाधकीत चाळीस वेचाळीस वर्षे गमावून बसली आहे ती. तिला कल्पना देखील करता येणार नाही आता या वयात. अगदी साधीच गोष्ट– मी रोज सकाळीं बागेतून फुले आणतो; पण पूर्वीसारखा एकदा तरी तिने सुवास घेतला किंवा एखादे फूल सुंदर आहे असे तिला वाटल्याचे मला आठवत नाही. ती निमूटपणे देवावर वाहत असते ती फुले !

माझ्या टेबलाची सध्या मलाच फार किंमत आहे. ते मोडके आहे का ? असू द्या. ते घाणेरडे आहे का ? कबूल ! पण मी तिथे गेलो म्हणजे मला त्या कल्पना देखील शिवत नाहीत. उलट तहानेने व्याकुळ झालेला जीव सुखावतो. कशाची तरी लागलेली भूक शांत होते—

—आणि इतरांनासुद्धा काय त्रास आहे ? माझ्याकडे कुणीही भेटायला बोलायला आले म्हणजे त्यांना त्या टेबलावर जाडसा एक कागद अंथरलेला दिसतो— कल्पनाही येत नाही त्याच्या मनात काही. जेव्हा जेव्हा मी कामात गढलेला असतो – जगाशी संबंध ठेवीत असतो – तेव्हा तेव्हा त्यावर कागदच झाकून ठेवतो, पण माझ्या निवांत वेळी – शांततेच्या, विश्रांतीच्या वेळी – मी तो कागद हळूच बाजूला केला म्हणजे..... !

—आणि हे सुख सध्या तरी नाहीसे करून टाकावयाची माझी तयारी नाही. शिवाय ज्या वस्तूपासून इतरांना कोणत्याच प्रकारचा संपर्क पोचत नाही, ती तशीच राहिली म्हणून त्यांना उगीच हे का वाटावे ?

४।४।३४

१०

रात्रिरेव व्यरंसीत्

—आणि त्यानंतर ती धडपडून उठलीच !

तिच्या ह्या नेहमीच्या दगडाखाली ऊन घसरताच तिने धुणी धुण्याचे बंद केले. घरात काही वाजले म्हणून हातचा पिळा हातीच ठेवून ती आत आली. मांजरीच्या तोंडातून ओढलेली अर्धी भाकर तिने खापराखाली दाबली व खोलीबाहेर निघून झोपा लोटला. बाहेर राधा उभी होती. तिच्याकडे तिने पाहिले व चला बाई–झालं—" असे म्हणून ती निघाली.

अजून आठ वाजले नव्हते. पण आपल्याला उशीर होईल या भीतीने त्या दोघीही भराभर पावले उचलू लागल्या. चालताना त्यांच्या हातांतील पांढऱ्या धातूच्या बांगड्यांचा आवाज होत होता.

"राधे, उशीर झाला का ग ?" रंगूने मिलच्या भोंग्यातून निघणाऱ्या धुराकडे पाहात विचारले,

"नाही ग ! पण तुला आज अशी घाई का झाली ? संध्याकाळचं काम करून ठेवलंस वाटतं ! —"

"सकाळचंच पडलं आहे गाडाभर ! तुझ्यासारखी सुखी आहे का मी ! सासू आपली तुकडा करून ठेवतेच आहे..."

"हं ! सासूचा रंग पाहिला नाहीस म्हणून सोकावलीस वाटतं असं म्हणायला ! बरं, धंदा रोजचाच झाला. हे तुझे डोळे असे लाल का ?–"

"—काल बिलकुल डोळा कसा —"

"हं ? ? –" राधा मिस्किलपणे हसली व चुप बसली.

"काय झालं ग हसायला ?" — किंचित् रागाने रंगूने तिला डिवचले.

"समजायचं ते समजलंच. आता उगीच हे कशाला ?"

"अग, तसं नाही. तुझं आपलं भलतंच बाई नेहमी."

"माझं आपलं भलतंच आणि तू जशी वैतागलीस की नाही ? तसं नाही तर कसं बाई ! कालची रात्र गूळपोळीसारखी गेली असंच की–"

"काय मूर्ख आहेस ग ! ऐकून तर घेशील ! कर्जदार काल दारात येऊन बसला होता त्याची समजूत घालता घालता रातपाळीला झाला उशीर व—"

"पण रोज जातो ना तुझा नवरा रात--पहारीवर ?"

"हो, पण काल पंचवीस पेटारे जास्त भरायचे होते अन् येता येता रस्त्यात तमाशा सुरू होता, तिथं थांबली स्वारी व मग डुलत डुलत दोन वाजता घरी आली—"

"आणि मग तुला जागी केली म्हणतेस ?"

"अग, मी जागीच होते ! मला कशाची झोप येते आहे तोंपर्यंत..."

बिचारी रंगू भोळ्या भावाने बोलून गेली. पण राधेच्या खट्याळ हसण्याने तिला तिची चूक कळून आली, व खरा प्रकार ध्यानी आला.

"राधे, आज बरंच हसू येतंय तुला ! मी नाही बोलत जा--"

"अशी काय रागावतेस ग ! गंमत केली मी—" राधेने तिचा पदर धरून ठेवला.

"बरं, बरं—मोठी आलीस—"

"नाही, मी लहान, उगीच हे कशाला. मला सुद्धा कधी कधी झोप येत नाही एकटीला. हं, दोन वाजता आला—? —" तिचा आवाज समजावणीचा होता.

रंगू शेवटच्या वाक्याने निवळली, व सांगू लागली,--"रात्री दोन वाजता व तोही तमाशा पाहून आल्यावर तो काय निजू देतोय मला. जरा थोडया गप्पागोष्टी होऊन उगीच डोळा लागला तोच सकाळचा भोंगा झाला—उठलो बाई दोघेही धडपडून ! ! आणि त्यानंतर..."

मिलच्या दाराजवळ येताच त्यांनी एकदम बोलणे बंद केले. दाराचा शिपाई त्यांच्याकडे पाहत होता. त्या लगबगीने आत घुसल्या. आतली विस्तीर्ण जागा काळीभोर झाली होती. यंत्रांचा 'खर्रर्र खस्' असा विचित्र आवाज होत होता; व बाहेर बसविलेली चाके सारखी फिरत होती. दुतर्फा लावलेल्या मेंदीवर कोळशाच धुरळा बसल्यामुळे तिचा मूळचा हिरवा रंग आता काळसर धुरकट झाला होता. कित्येक दिवसांत भरपूर पाणी न मिळाल्यामुळे भुकेल्या माणसाने व्याकुळ होऊन जशी मान टाकावी तशी ती झाडे वाऱ्याने हलत होती; व मोठी झाली म्हणूनच जगत होती जणू !

—त्या झाडांच्या आड त्याही दिसेनाशा झाल्या !

१०।४।३४

११

विहीर

त्या विहिरीला वरून तोंडी नव्हती. चार धोंडे नीट बसवून तिची बांधण गोल व नीटनेटकी केली होती. भोवताली सारा चिखल माजला होता व त्यातच ठेवलेल्या दगडावरून पलीकडे विहिरीवर जावयाची वाट !

बऱ्याच जणी पाणी भरीत होत्या. चाक नसलेली विहीर ती. पाणी ओढायचे झालेच तर वाकून ओढणे फक्त शक्य.

प्रत्येकीच्या लुगड्याचा रंग निरनिराळा होता. पिवळा, खडी काढून रंगविलेला काळा, लालवट — पुष्कळ पुष्कळ रंग होते. पाणी ओढताना त्या खाली वाकत आणि त्या विहिरीची तोंडी झाकली जाई. दुरून पाहणाऱ्याला वाटे—जणू रंगीबेरंगी फुलांफळांनी लवलवलेल्या वेलींची चिरणच ! !

मातीच्या घागरी दोराने आत टाकून त्या पाणी ओढीत होत्या. बांधणीच्या गोटयाला लागून घागर केव्हा फुटेल याचा नेम नव्हता. फार जपत होत्या त्या ! घागर भरून आल्यावरच त्या इकडे तिकडे पाहत !

" यशोदे, हा हात उघडा कसा ग ? आज सकाळी तर होत्या साऱ्या बांगड्या, " एकीने भीत भीत प्रश्न केला. यशोदेचा चेहरा सुकला होता; डोळे लाल झाले होते; व नेहमीपेक्षा ती कमी बोलत होती.

तिच्या जवळ असलेल्या गिरजेने कपाळावरचे केस बाजूला सारले व स्निग्ध दृष्टीने तिच्याकडे पाहून तोच प्रश्न विचारला. तिला उत्तर देणे भाग होते. तिच्या कपाळी किंचितशी आठी पडली ! तिने ओठ थोडेसे आत ओढले !-

" फोडल्या बाई तुझ्या भावानं. "

" कोण, राजाराम का ग ?—"

" पण, तुझ्या नवऱ्यानं काहीच म्हटलं नाही ? " तिसरीने आश्चर्याने विचारले. त्या स्पष्टस्पष्ट बोलत होत्या !

" ते तरी काय म्हणतील ग नेहमी ? उलटी मलाच बोलणी बसली. जेवायच्या वेळेस चटणीचं नाव काढलं म्हणून घाईघाई वाटायला बसले. तुझ्या भावानं मीठ मागितलं. घाईत मला ऐकूच आलं नाही. त्याला आला राग आणि ताट आपटून तो उठून गेला-वाटी माझ्या हातावरच पडली. "

" एकेक उलटंच ! अन् तुझ्या घरी सारं सहन केलं अं ! " यशोदेच्या डोळ्याला थेंब आले होते.

" तो तरी काय करील बिचारा ! " गंगू घागरीचा गळफास सोडीत म्हणाली. " म्हातारी असेल जवळच. बोलून उगीच शोभा. चौघांच्या घरी बोलता येत नाही. होय, त्याला उदंड वाटलं तसं, पण तो यशोदेलाच बोलेल सारं गिळून. चौघांचं घर ! बिचारीला—"

सर्व बायका तटस्थ होऊन सहानुभूतीने तिच्याकडे पाहत होत्या. तिने डोळ्याला पदर लावला होता, बसून आठवण्याचा प्रयत्न करूनही, मागचे ते सारे आठवून तिला एकदम हुंदका आला !

" उगी, उगी बेटा ! " नुकत्याच आलेल्या वयस्क स्त्रीने तिच्या पाठीवरून हात फिरविला. दोन गोड शब्द बोलल्यामुळे यशोदेला गहिवर आला होता.

" उगी बेटा, हे कसलं मेलं चौघांचं घर ! "

" नाही तर काय ग ? " यशोदा एकदम बोलू लागली. तिचे अवसान तिच्या डोळ्यांतून साऱ्यांकडे पाहत होते.—

" उगी, उगी तरी किती वेळ राहू ? अशी लाही होते जिवाची. सासू बोलते ती वेगळी. दिराचा प्रकार हा असा. पुनः ते बोलतील वेगळेच—त्यांना समजून उगीच डोळ्यांवर कातडं - आणि मलाच बोलणी. जीव जातो सदा. एखादे दिवशी—"

" हं, असं भलते जागी बोलू नये. भर, पाणी भर, ती-पाहा, घागर गोऱ्याशी हेलकावते आहे-"

" रोजचंच झालं तर..."

ती घागर तिने तोलून धरली आणि तशाच जड हाताने वर ओढली. बाकीच्या साऱ्याजणी भारावलेल्या अंतःकरणाने पाणी काढीत होत्या-!! कुणीच बोलत नव्हते.

दुरून पाहणाऱ्यांना बाटे-फुलाफळांनी लवलवलेल्या निरनिराळ्या वेलींची चिरण आहे ती एक—

पण किंचित् जवळ गेल्यावर कळले असते - कुणाचेही जीव घ्यायला सोकावलेली, तोंडी न बांधलेली अशी ती एक काळ्या दगडाची विहीर आहे आड दडलेली—

आणि.....!!

—पण तिच्यातूनही त्या बिचाऱ्या खोल खोल घागरी टाकून जपून जपून जीवन ओढताहेत !

२९।४।३४

१२

वस्तूचे मूल्य

१

एका मोठ्या परडीवर बरेच स्वच्छ असे ओले धोतर घडी करून टाकलेले होते. त्यावर एका कडेस फुलांचे हार होते. दुसऱ्या बाजूला फुले पडली होती. भरगच्च भरली होती ती परडी !

फुलमाळी येऊन बसला. त्याने गळपट्टी नसलेला रेशमी सदरा घातला होता. हाताच्या दोन्ही बोटांत गोल आंगठ्या होत्या. आल्या गेल्या ग्राहकाला तो फुलांचे पुडे बांधून देत होता.

" माळीदादा, फुलं द्या बरं..." एक सतरा अठरा वर्षांचा तरुण आला. माळीदादा दुसऱ्या गिऱ्हाइकात गुंतला असल्यामुळे त्याला तेथेच थांबावे लागले.

त्याच बाजूला गुलाबाच्या तीन चार कळ्या ठेवलेल्या होत्या. अगदी सुंदर, छान, ताज्या ! कोणालाही त्यांच्याकडे एकदा डोळे भरून पाहिल्याशिवाय तेथून जावेसे वाटेना. अर्ध्या अर्ध्या उमललेल्या, जणू त्या आपल्याच आनंदात मुसमुसत होत्या !

त्या तरुणाने चटकन् एक कळी उचलली. स्वतःच्या फुलांबरोबरच घेणार होता तो. त्याने तिचा सुवास घेतला.

" फुलमाळ्याची रागीट नजर त्याच्यावर रोखली गेली. तो चिडला. तो म्हणाला, " भले हो दादा तुम्ही ! गिऱ्हाइकाकरता राखून ठेवल्या आहेत त्या नि एकदम वास सुद्धा घेतलात त्यांचा ? ठेवा खाली, तुम्हांला काय ! "

तरुणाने स्वतःचा पुडा हाती घेतला व तो निघून गेला.

२

ज्या गृहस्थाकरिता त्याने त्या राखून ठेवल्या होत्या त्याला पाहताच माळीदादा किंचित् हसला. " उशीर झाला साहेब बराच. कित्येकांच्या नजरेतून वाचविल्यात त्या. म्हटलं, तुम्ही बडी माणसं. तेव्हा..."

त्या कळ्या घेऊन प्रसन्न मनाने तो गृहस्थ निघून गेला.

बाईसाहेबांची नजर त्या कळ्यांकडे जाताच त्यांची कळी खुलली. कारकुनाला बोलल्यावाचून राहावेना. तो म्हणाला, " छान आहेत ना ? आज छोटेसाहेब अगदी खुष होतील, नाही का ? आपल्याला पण आवडल्यात ना त्या ? "

" हो, खरंच सुंदर आहेत. "

" फुलमाळ्याने मुद्दाम राखून ठेवल्या होत्या. मी गेल्यावर तो तसं म्हणालाही. "

" सुंदर आहेत खऱ्या, पण वासबीस तर घेतला नाही ना कुणी ? नाही तर उगीच... "

" छे, छे, असं कसं होईल ! इतका संभावित गृहस्थ तो. त्याने दिल्यान् त्या. अगदी खात्रीचा आहे तो. "

" मग ठीक आहे. नाहीतर आपलं... "

" बरं, मी तरी कसा आणीन ? कालचीच गोष्ट पाहा ना !... "

बाईसाहेब कळ्या घेऊन आत गेल्या !

३

' कालची गोष्ट ' अशी—

छोटेसाहेब आणि कारकून सायंकाळी फिरायला गेले होते. छोटेसाहेब असतील एकविशीच्या घरात. हौशी होती स्वारी बरीच.

एका बागेच्या शेजारून जाताना एका दगडाजवळ त्यांना चारपाच गुलाबाच्या कळ्या दिसल्या. अगदी सुंदर, छान, ताज्या, भरदार, किंचित् उमललेल्या. छोटेसाहेब त्या हौसेने उचलून त्यांचा वास घेऊ लागले. कारकुनाचे लक्ष होते. तो म्हणाला,

" साहेब, फेकून द्या त्या कळ्या. कुणी वास घेतला असेल त्यांचा. "

" नाही. किती सुंदर आणि ताज्या आहेत पाहिल्यात ? आपल्यासारखाच कुणीतरी फिरायला येणारा विसरून गेला असेल. "

" पण साहेब, विश्वास ठेवायचा कसा ? विचारायचं कुणाला ? " कारकुनाने शंका उपस्थित केली.

" बरं, असू दे ना त्या तशा. अजूनही त्या सुंदर आहेत. काय हरकत आहे घ्यायला ? "

" छे, छे, आपल्याला काय सुंदर मिळविता यायच्या नाहीत ? आपल्यासारख्यांना शोभत नाही हे असं. चला ! मी तुम्हांला अगदी तशाच आणून देईन दुसऱ्या... "

ते पुढे गेले !

त्या कळ्या तेथे पडल्या होत्या. त्यांचा विलोभनीय रक्तिमा, मोहक रंग, जिवाला ओढ लावणारा सुगंध, सारे सारे तेथेच सुकून जायचे होते का ? की... ??

...आणि फिरून परत येताना त्यांना त्याच जागेजवळ फुलमाळी भेटला. त्याने छोट्या साहेबांना अदबीने नमस्कार केला आणि बागेत जाण्याकरिता तोंड फिरविले.

त्याच्या परडीत गुलाबकळ्या होत्या ! त्यांकडे त्यांच्यापैकी कोणाचेच लक्ष गेले नाही !

जगाने आपली मूल्ये बदलली आहेत. फुलमाळ्याला जग महत्त्व देऊ लागले आहे.

वस्तूचे मूल्य ठरविणारा हा एक नवा घटक निर्माण झाला आहे !

१९।६।३४

१३

पोर

ती पाठमोरी बसली होती. तिच्यापुढे कसले तरी पुस्तक होते—रीडर होते ते. त्यातील काही वाक्ये ती अडखळत वाचीत होती. तिला शब्द अडला म्हणून तिने वहीत पाहिले, Golden = सोनेरी.

मी बराच वेळ उभा होतो. तिचे लक्ष जावयाचे अगोदर माझ्या हातातील फोटो मी तिच्या समोर ठेविला. किती तरी वेळ ती त्या फोटोकडे पाहत होती. तिला खूप आनंद झालेला दिसत होता. तिचे डोळे लहान मोठे होत होते.

तो फोटो दुसऱ्या कुणाचाच नव्हता. तिचाच; पण निराळ्या वेषात ! तो पांढरा शुभ्र साफा तिला अगदी खुलून दिसत होता आणि त्या पेहरावात ती एखाद्या तेरा-चवदा वर्षांच्या उमद्या, सुंदर आणि निरोगी अशा शीख मुलासारखी दिसत होती. किंचित् मार्दव थोडे अधिक !

तिला फोटो आवडला हे माझ्याजवळ थोडेच कबूल करणार होती ती ! लागलीच तिने चर्या बदलली आणि—" अहा ! हाच का तो सुंदर फोटो ? " असे म्हणून वेडावण्याच्या आविर्भावाने ती मनसोक्त हसली.

" बरं, लते, आता माग मला काही घेऊन ! चोर —" असे म्हणून मी तो फोटो हिसकून घेतला आणि " नाही बोलत जा तुझ्याशी " असे लटक्या रागाने म्हणत खोलीत गेलो. ती हसतच होती.

—आणि खरोखरच रागाने मी जरी घुमटून बसलो असतो तरी ती मला थोडेच बसू देणार होती ? खट्याळ पोर ती ! दिवसभर तिची टकळी बंद झालेली या आठ दिवसात मी कधीच पाहिली नव्हती. आणि आता काय-तिला इंग्रजीतून What is your name ? म्हणून विचारता येत होते. दिवसातून कमीत कमी पाच-सातदा तरी ती मला हा प्रश्न विचारायचीच.

थोड्याच वेळाने ती माझ्या खोलीत आली. मला खराच राग आला की काय हे पाहण्याकरिता ती किंचित्काल दारात उभी राहिली. अगदी हुबेहूब आत्यासारखा तोंडवळा होता तिचा. गाल खूप फुगीर – ते इतके की नाक चांगले सरळ असून किरकोळ वाटे. डोळेही नाही म्हणावयास अगदीच लहान नव्हते; पण ती हसावयास लागली की त्या गुलाबाच्या पाकळ्यांनी ते झाकले जात आणि किलकिले दिसत.

ती दारात उभी आहे हे मला दिसत होते. मी गंभीर चर्या केली. पण चाणाक्ष पोरटी ती ! तिने रागरंग ओळखला. माझा राग कशाने जाईल याचा तिने उपायही शोधला होता. ती भुर्रकन् माझ्याजवळ आली आणि माझा लोड करून ऐटीत बसली.

"बरं, आज मी पाहतेच तुझं माझ्यावर किती प्रेम आहे ते. पाहू तुझा हात—"

तिने खिशातील एक बांगडीचा तुकडा काढला आणि माझ्या तळहातावर कटकन् मोडला. एक-दोन कण माझ्या तळहातावर पडले.

"दोनच कण ! इतकाच तुझा लोभ !! म्हणून तर रागावतोस माझ्यावर तीन–तीनदा." आता तिला राग आलासे दिसले.

तिची ही प्रेम अजमावून पाहण्याची अगदी नवीनशी रीत मोठी मजेदार दिसली. त्या बांगडीचे दोन तुकडे होताना खाली फार तर एक-दोनच कण पडणार—मला रागाचा आव कायम ठेवणे शक्य झाले नाही.

"तसा नसतो करायचा लोभ ! हा असा बरं लताताई"—मी तिचे गालगुच्चे घेतले; देठी पक्के होते म्हणून—नाहीतर फुलेच हाती आली असती !

वातावरण निवळले आणि आम्ही फिरावयास गेलो. उन्हाळ्याची संध्याकाळ ! उष्मा कमी झाला नव्हताच ! मी तिला मोठ्या रस्त्याने न नेता, टेकडीच्या पायथ्याने नेले आणि टेकडी दाखवून आणली. रस्त्यात एक मोठे वडाचे झाड होते. आणि त्यातच एका पांढऱ्या देवळाने दडी मारली होती. मी तिला ते मुद्दाम दाखविले. काल त्या रस्त्याने परत येताना किंचित् काळोख पडला होता. पण तेव्हा तिला कितीतरी भीती वाटली तेथे ! आज उजेडात ते तिला दाखविताच ती लाजली. मी तिला भित्री म्हणून चिडविताच तिला हसू आवरेना.

भिणे वाईट आहे वगैरे तिला सांगण्यापेक्षा तिच्या त्या निष्पाप मनोहर हसण्याकडे पाहण्यातच आनंद होता. त्या हसण्यातच तर सारी जादू होती !

त्या वेळी चालता–चालताच तिने मला कितीतरी नवीन माहिती सांगितली. मी इतके वाचले पण मला त्यात ती कधीच सापडली नव्हती. कुठे "सत्याचे मार्ग"– कुठे "परमानंदाची पूर्वतयारी"–कुठे काही–कुठे काही शेंकडो पुस्तकांची मी पारायणे केली असतील, पण इतके जिवंत तत्त्वज्ञान मला कुठेच सापडले नव्हते. आणि म्हणूनच लता मला इतकी आवडत होती.

तिच्या प्रत्येक वाक्याने मला एका बालिश, चंचल, निष्कलंक हृदयाची ओळख पटत होती. ज्या गोष्टी काही वर्षांपूर्वी माझ्याजवळून हरपल्या होत्या त्या कुठे आहेत-असतात हे कळत होते. तिची टकळी सुरू होती.

—तिच्या रीडरचे वरचे कव्हर वसंताने खराब केल्यामुळे तिने ते फेकून दिले होते आणि माझ्याजवळून नेलेले गुलाबी कव्हर गोंदाने पक्के बसविले होते. सकाळी आंबे खाताना तिची अस्मानी रंगाची साडी खराब झाली, ती तिने आत्या रागावेल म्हणून गुपचुप धुऊन टाकली होती. वसंताने पत्त्याचे डाव मांडताना केलेली त्याची लबाडी तिने ओळखली होती; व तो चिडल्यामुळे खेळात बिघाड आला होता. खेळात असे चिडू नये.

—आज आपट्यांकडे जायचे म्हणून आईने सांगितल्यावर तिने नवा ब्लाऊझ काढला होता आणि साडी नेसून झाल्यावर ती आरशात पाहत असताना तिच्या वहिनीने–" अहा ! लताताई, कुणी पाहायला का येणार आहेत ? आता आलंच बरं-लवकर–" असे चिडविले म्हणून तिला राग आला होता आणि माझा धाक दाखविल्यावर तिने थट्टा बंद केली होती.....

कितीतरी ताज्या बातम्या सांगितल्या तिने मला. आम्ही नदीच्या वाळवंटात बसलो होतो. काठची वाळू ओलसर होती. तिने ती आपल्या दोन्ही पायांवर दाबून दाबून बसविली आणि हळूच पाय काढून घेतले.

—" लते ! आता लहान आहेस का तू मातीत खेळायला ? आता चांगली चवदा वर्षांची झालीस तू. "

— " मग काय ? आमच्या गावाला नदीच नाही म्हणून. अन् तू नाही का सकाळी माझ्याबरोबर दोरी खेळलास ? वहिनींना मी सांगितले तेव्हा त्या म्हणाल्या, –' फार शहाणे आहेत तुझे बंधुराज– ' " ती पुनः हसली. मला तेच पाहिजे होते.

रविवारचा दिवस तो. आत्या गुरुवारी जाणार होती. पण आमच्यापैकी कुणीच तिला जायची परवानगी देईना. आमचे बोलणे मोठ्यानेच सुरू होते. इतक्यात आपल्याशीच दंग झालेली लता माझ्याजवळ आली. तिने आपली गुलाबी नखे माझ्यासमोर धरली—

" वापू, हे पाहा बगळ्याचं दूध–" तिच्या तर्जनीच्या नखावर पांढरा डाग पडला होता.

तुझी नखं पाहू—" तिने पुनः विचारले. माझ्या नखांवर काहीच नव्हते आणि ती तितकी गुलाबी पण नव्हती.

" अग, सुंदर मुलींनाच बगळ्याचं दूध मिळतं अन् त्यांना नंतर त्याच्याशी लग्न करावं लागतं. हे पाहा लते, तू बगळ्याची बायको झाल्यावर तुला तिथे वाळूत खूपशा झोपड्या बांधता येतील पायावर–"

"हं, अन् मग त्या झोपड्यात ये तू नि वहिनी–" तिला उगीच राग आला होता. मी वसंताएवढा असतो तर तिने त्या वेळी मला खात्रीने फाजील किंवा वात्रट म्हणून अहेर केला असता.

त्याच रात्री आम्ही अंगणात गप्पा मारीत बसलो होतो. घराण्याच्या जुन्या गोष्टी निघाल्या होत्या. लतेला झोप लागली होती. तिची वहिनीही तिथेच झोपेला येऊन निजून राहिली.

सारी निजानीज झाल्यावर मी दिवा जवळ ओढला आणि नुकताच आलेला 'पारिजात' चा अंक चाळू लागलो. "शास्त्रज्ञाचा शेवट" हे त्या लघुकथेचे नाव. माझी ती अर्धी-मुर्धी वाचून झाली होती, इतक्यात—

"बरं, सोडून तर पाहा. काय होतं ते – होईल माझं पातळ ओलं —"

मी दचकून आजूबाजूस पाहिले. लतेला गाढ झोप लागलेली दिसली. पण बोलत तीच होती. अगदी तेच वाक्य ती दुपारी बोलली होती. वाळ्याच्या ताटीवर हँडपंपाने मी फवारे सोडीत होतो. लता जवळच उभी होती. काही तरी बोलायचे म्हणून मी तिला विचारले–

"लते, समज, हा फवारा असाच तुझ्या तोंडावर सोडला तर? पाहू बरं तू किती मोठ्याने रडतेस ती. मी तुला रडताना पाहिलंच नाही."

"वा! अन् माझे केस ओले होतील ते!"

"अन् तुझं तोंड भरगच्च भरल्यावर तू डोळे मिचकावशील ते?–किती सुंदर दिसशील तू?–"

"बरं सोड, सोडून तर पाहा. होईल माझं पातळ ओलं–"

अगदी हेच तिला दिसत असावे. 'ध्यानी मनी जे असायचे तेच स्वप्नी.'

किती–किती निष्पाप पोर–!

मला आश्चर्य वाटे. लता इतरांच्या दृष्टीने – आत्याच्या, माझ्या आईच्या दृष्टीने – साडी नेसायला लागली होती, तेरा-चवदा वर्षांची झाली होती. कुमारी आणि युवती यांच्या मध्येही तिने पदार्पण केले होते. आणि तरीही इतकी अल्लड! आता कुठे तिला मैत्रिणी मिळत होत्या; आता कुठे तिला आपला अंबाडा व्यवस्थित बांधता येत होता. अल्लड, निष्पाप, फुलपाखरासारखी हावरी, चंचल, आनंदी! नेहमी हसायचे–नेहमी मौज! कुणी काही विचारलेच तर चटकन् उत्तर द्यायचे– आणि ते सुद्धा इतके समर्पक, की कुणालाही वाटावे, पोर किती तल्लख आहे. किती सुख असते अशा मनोवृत्तीत! किती आनंद असतो अशा बेफिकीरपणात! किती मौज–किती गोड जीवनकाल असतो तो!

लतेचा शीख मुलाच्या वेषात असलेला फोटो माझ्या खोलीत मी तिच्या वहिनीच्या फोटोजवळ ठेवला होता. रोजच्यासारखे सुरू झाले सारे. रोजचा तोच

कार्यक्रम — तेच व्यवसाय – तेच कॉलेज – त्याच गप्पा — सहज, अगदी नकळत दिवस निघून जातात.

यंदाचे सहावे वर्ष माझे ! परीक्षा उद्यापासून सुरू व्हायची, पण काहीतरी भानगडी होऊन ती आठ दिवसांवर गेली. आजचे मरण उद्यावर टळले या आनंदात मी घरी आलो. टेबलावर हॅट फेकली त्यासरशी त्यावर ठेवलेली दोन्ही पत्रें खाली उडाली. पोट्टाच्या शिपायाने ती खिडकीतून फेकली असावीत—

त्या पत्रांपैकी एक बंद पाकीट होतें. लतेच्या वडिलांचेच अक्षर. दुसरी एक पत्रिका होती. पाकीट फोडायचे अगोदर मी पत्रिका वाचू लागलो. अशा कितीतरी लग्न-पत्रिका येत असत; पण—

मला स्वतःला त्या वेळी इतके आश्चर्य वाटले, की माझ्याने ती पत्रिका पूर्ण वाचूनही झाली नाही ! एकदम माझ्या तोंडून उद्गार निघाला—

" सौभाग्यकांक्षिणी... आणि... लता ?! "

भिंतीवरच्या फोटोत लता हसत होती. तिचे फुगीर गाल, रेशमी साफा, तिच्या तोंडावर फुललेले मार्दव .....सारे तसेच होते !

मला कुणीतरी कुठेतरी ओढून नेत आहे असे वाटले. लतेच्या फोटोकडे मी पाहत होतो.

" लते, तुला या पत्रिकेचा अर्थ तरी समजला का ? "

लतेच्या वहिनीने आतुरतेने माझ्या हातातील पत्रिका घेतली आणि आपली विस्मयगर्भ दृष्टी त्या अक्षरांवरून फिरविण्यास सुरुवात केली.

२१।६। ३४

१४

कलाविकास

लखूने नेमका तोच धडा काढला आणि वाचावयास सुरुवात केली. " पक्ष्यांची घरटी "—! त्या वेळी त्याच्या वयात असताना मला त्या धड्यातील स्वारस्य कळत नसे. ' कलेकरिता कला ' या तत्त्वाप्रमाणे मी तो धडा वाचावा म्हणूनच वाचीत असे. पण तीच आता त्यात किती अवीट गोडी भरली आहे!! वाचताक्षणीच एक निराळे वातावरण डोळ्यासमोर उभे राहते—पाखरांची सृष्टी !

" आपल्या मादीची मर्जी संभाळण्याकरिता नर काय वाटेल ती ती खटपट करील. लोकरीचा एखादा तुकडा मिळविण्याकरिता मेंढ्यांच्या मागोमाग जाईल. कोंबड्याच्या एखाद्या खुराड्याच्या आसपास हिंडून पिसे गोळा करील; व प्रसंगविशेषी एखाद्या घरात शिरून त्यातून ही लोकर, रेशीम, कापूस वगैरेवर झेप मारून भुर्रकन उडून जाण्यास कमी करणार नाही... ... "

" ... याप्रमाणे सृष्टीने अशी हत्यारे दिली असूनही केवळ अपत्यप्रेमाखातर विलक्षण मेहनत करून व कल्पकता दाखवून पक्षी आपली सुंदर घरटी तयार करितात. "

लखूने धडा वाचून संपविला. किती काव्यमय जीवन असते त्यांचे! आपल्या चिमुकल्या चोचीने पक्षी मऊमऊ, इवलेइवले अंकुर आणून देतो आणि पक्षीण घरटे तयार करते ! सर्व नरमगरम वस्तू ती एका कोपऱ्यात जमविते आणि आपल्या लुसलुशीत, पिसापिसांच्या, गुबगुबीत पोटाने त्या साऱ्या दाबून-दाबून नीट बसविते. पंख पसरून एकदा अंडी घातल्यावर किती जपते ती त्यांना !

सांज पडल्यावर नर आणि मादी अंडी पंखाखाली घालून सुखाने चिवचिवत झोपी जातात आणि पहाटेच्या मंद वाऱ्यावर भुर्रकन् उडून जातात. स्वतःच्या अपत्यांकरिता आपली सगळी कलाकुसर खर्च करायची ! त्या कलेतच त्यांचे जीवन विकास पावते ! आणि या जीवनातच त्यांचा कलाविकास होतो.

मी खोलीच्या खिडकीतून सहज बाहेर पाहिले. एका मोठ्या पिंपळावर एक घरटे होते. तिथून एक कावळा नुकताच उडून गेल्यामुळे ते कावळ्याचे होते याबद्दल मला संशय वाटला नाही. कावळ्यासारखा अभद्र, कर्कश पक्षी; लोक त्याचा विटाळ मानतात; त्याचा कर्कश आवाज ऐकून कुणाला [illegible] येते. पण त्यालाही त्या जीवनाची आवश्यकता असते अं ! तोही आपल्या मादीला काटक्याकुटक्या आणून देतो तर ! आणि त्याची मादीही पिलांकरिता कलाकुसर खर्च करून घरटे तयार करते तर—!

" कूऽहू—" माझी लेखणी जागच्याजागी थबकली. माझ्या चित्तवृत्ती प्रफुल्लित झाल्या. कोकिळेचा स्वर तो ! स्निग्ध, मधुर, मंजुळ ! ! —किती वर्णन करायचे ? आणि प्रयत्न करूनही ते साधेल का ? हृदयाच्या आतून आतून निघालेला आलाप तो !

मी इकडे तिकडे पाहू लागलो. " कूऽहू "— ! पुनः स्वर ऐकू आला. मी खिडकीजवळ गेलो. पूर्वेचे कोवळे ऊन झाडाच्या शेंड्यावर सोनेरी रंग फासत होते. मधूनच एखादी मैना चिवचिवत असे. पाखरे घरट्याबाहेर उडून गेल्यामुळे फारशी किलबिल ऐकूच येत नव्हती. फक्त एकच आवाज—" कूऽहू " !

त्याच चिंचेच्या झाडात तो दडलेला होता. पुनः एकदा त्याने साद घातली. नंतर पंखाची फडफड—त्याच्या जवळ बसलेली कोकिळा – त्याची जीवनकला – फडफडून उडाली. तिची चंचल दृष्टी साऱ्या बाजूंना भिरभिरत होती. इकडे त्याच्या हृदयामून सकंप पडसाद उठत होते.

त्या झाडावरून देखील ती उडाली. अगदी त्याच पिंपळावर त्याच घरट्याजवळ जाऊन बसली.– "अं!" मी संशयात पडलो. ते घरटे कावळ्याचेच ना? मी आणखी जवळ गेलो.

तिचे ते तपकिरी छटा असलेले पंख, आणि चोच – बाकी कावळ्यात नी तिच्यात फरक नव्हताच. ती गुपचिप त्या घरट्यात शिरली. माझी उत्कंठा वाढली. दुसऱ्या झाडावर चढून मी पाहू लागलो. तिने आपले पंख पसरविले होते. ती दबून बसली होती–

—सभोवार पाहत तिने अंड्यांवर पाचोळा झाकला आणि पंख फडफड करीत ती उड्डून गेली. तिचा जिवलग त्या चिंचेच्या झाडातच बसलेला होता. तिला जवळ घेऊन त्याने तिच्या चोचीत चोच खुपसली. विरहानंतरचे सुख त्याला मोहून टाकू लागले. त्याने आलाप काढले. आता त्याच्या आवाजात कंप नव्हता. त्याची जीवसखी गानलुब्ध झाली होती. तिला आता आजूबाजूला पाहण्याचे काही एक कारण उरले नव्हते. ती ऐकत होती—

—"कुहु कुहु कुहु कू ऽ ऽ ऽ हू" आतून आतून त्याने आलाप काढला – त्याच्या हृदयातील कोणत्या भावांचा प्रतिध्वनी असेल तो? —

संध्याकाळी थकून भागून कावळ्याची मादी येईल. भोळी बिचारी—तिला कळणारही नाही काय झाले ते. मायेने ती सारी अंडी पंखाखाली झाकून घेईल आणि तशीच झोपी जाईल.

पुरेशी उबवून झाल्यावर त्या अंड्यांतून गीद बाहेर येतील. त्यांच्या त्या चिमुकल्या चोचीतून दिसणारा लाल गाभा—त्याचा इवलाइवला आकार—त्यांचा नाजुक कलरव—घरट्याबाहेर हळूच डोकावून भीतीने आत दडताना त्यांची उडालेली तारांबळ – संध्याकाळी मादीच्या पोटा-पोटात घुसून निजण्याकरिता त्यांची चाललेली स्पर्धा—

... आणि एके दिवशी त्यातून कोकिळेचे प्रतीक उड्डून जाईल. आपल्याला कुणी वाढविले याचा त्याला विसर पडेल व सूर्याने सोनेरी रंग फासलेल्या झाडात लपून ते आवाज काढील—"कूऽऽहू"!

खरेच! किती गोड आलाप असतो तो! किती सुख वाटते आपल्याला!! तीच खरी कला—पण तिचा विकास कोणता? विलास कोणता? परंतु असले प्रश्न उपस्थित करणे म्हणजे अरसिकपणा—!!

'कला, कला, कला,' म्हणून कोकिळेने या झाडावरून त्या झाडावर उडावे—भोगता येईल तेवढी चैन भोगावी व बिचाऱ्या कावळीने लोकांनी तिरस्काराने चिडून मारलेले दगड चुकवीत चुकवीत पंख दुखवूनदुखवून दुरूनदुरून आणलेला चारा तिच्या पिलांच्या लाल कोवळ्या चोचीत मायेने भरवावा.—आणि त्याच पाखराने पुनः मोठे झाल्यावर रात्रंदिवस मौज मारीत स्वतःच्या कलेचे विकसन करावे !

जीवन ! कला ! विकास !

— यांचा परम्पराशी काहीच्च संबंध नसेल का ?

१०।८।१९३४

१५

कला : : : जीवन

कॉलेजचा दुसरा मजला. ती विस्तीर्ण गच्ची. त्यापलीकडे दिसणारा बागेचा आणि आकाशाचा देखावा. शिवाय ती खिडकी – बागेतून येणारा गार वारा प्रथम तिथेच यायचा.

प्रिन्सिपॉलनी त्याच हॉलमध्ये अर्थशास्त्राचा त्रास ठेवण्यात मोठे औचित्य दाखविले होते यात संशय नाही, आत रूक्ष विषयाची शिकवण आणि बाहेर सृष्टी व आकाश यांचा नेत्रसंकेत !—पावसाळी दिवस !

" अग ! पण वेणी सोड ना माझी "— पुनः माझे लक्ष तिकडे वेधले. पाच-सहा मुली बागेतील गालिच्यावर मोकळेपणाने बसल्या होत्या. त्या गालिच्यावरची नक्षी म्हणजे त्यांच्याच पावलांनी पडलेली आणि तिथले गवत तुडविले गेल्यामुळे किंचित् काळसर दिसणारी पाऊल-वाट ! पण ती हिरवीगार, मऊमऊ, जीवनरसाने रसरसलेली हिरवळ—गालीचा म्हणायचा झाला तरी नीटशी कल्पना येत नाही.

उंचशा बारीक बारीक पानांच्या झाडांवर पिवळी पिवळी फुले भडक उठून दिसत होती. बाजूलाच वेलींची जाळी. त्यावरील ते सुंदर भरदार घोस ! मुलींची अजून नजर न फिरकल्यामुळे फुललेले दिसत होते. आणि त्यांनीच्च ती जाळी मुसमुसल्या-सारखी दिसे.

आता तासाची घंटा होईल. भराभर मुली पळतील. कोवळी कोवळी पाने, पिवळी निळी फुले, शक्य तितक्या कल्पकतेने त्या आपल्या डोक्यांत खोवतील. हिंदू मुली खोचतात डोक्यात फुले, पण आमच्यात ? —मला नीना आठवली. तिला तर फूल हाती घेऊन त्याच्याशीच खेळत चालण्याचा नाद. पलीकडे दिसणारा गुलाब

तिची वाट पाहत होता. फूलच फूल ! पण किती आतुर दिसले ते ! वारा भिरभिरला की एकदम नाचू लागे. जणू स्वतःबरोबर घेऊनच जाणार होता तो वारा त्याला !

ते कारंजे ! त्या एकजात हिरवळीवर उठून दिसे. मला वेसीच्या सतेज मुखावरील डाव्या बाजूच्या तिळाची आठवण झाली. सारी बाग थरथरलेली दिसत होती. वर्षाऋतू तो ! किती सुंदर होता आजचा दिवस !

एकदम आकाश भरून आले. काळे काळे ढगांचे पुंजके. सारे आकाश झाकून टाकले होते त्यांनी ! सोसाट्याचा वारा त्यांना गती देत होता. ते एकमेकांशी चिकटून एकरूप झाले होते; किंचित् थोडा वेळ; आणि लागलेच मोती गळायला. नंतर धारा–जणू मोत्यांच्या सरीच त्या ! सारी बाग जलमय झाली. सारा प्रदेश पावसाच्या फवाऱ्यांनी दूधमय झाला. किती मनोहर दृश्य ते ! साऱ्या मुली केव्हाच पळून गेल्या होत्या. माझे लक्ष केव्हाच उडून गेले होते. त्या खिडकीतून अतृप्त नेत्रांनी मी ते सारे पाहत होतो.

कला म्हणाली, " पाहा, पाहून घे, पाहतच राहा ! "

पावसाळा ! मला नेहमीच आवडतो तो ऋतू ! त्यात माधुरी नसेल–वत्सलता मात्र खास; अगदी काठोकाठ–बाहेर हेलकावते आहे जणू ! किती टवटवीत

तरी मला वाटलेच ते, डोंगर इतके उंच उंच का जात आहेत. हा एक, दुसरा त्याहून उंच, तिसरा त्याहूनही. अगदी उंच उंच सुळके. काळ्या काळ्या ढगांना भिडलेले. किंचित् त्यांच्याही वर गेलेले. कदाचित् त्यांनाही वाटत असेल–वर काय आहे ? कोणत्या दिव्यत्वाचे सत्यदर्शन ? दिव्यत्वाची परिसीमा कोणती ? सौंदर्य कोणते ?–विकास कोणता ? –एखाद्या महर्षीसारखी जिज्ञासा.— आणि त्यांची ती जिज्ञासा पूर्णही झालेली दिसत होती. त्यांना कसला तरी आनंद झाला होता. ते खुलून उठले होते.

हिरवी सृष्टी—तिने आपल्या पोटाखाली डोंगरावरील दगड, धोंडे, खाचा, खळगे, सारे दडवून ठेवले होते. आणि एकच रंग—हिरवा ! !

मी एकटाच चाललो होतो. दोन्ही बाजूला, मागे पुढे, निसर्ग आणि त्याच्या मध्ये वाट काढणारा मी ! ही कल्पनाच मुळी माझ्या हृदयाला जाऊन भिडली. ते छोटे छोटे प्रवाह कसे खिदळत होते ! कसे पळत होते ! एखादा मोठा दगड मध्ये आला की चटकन् त्याच्या भोवती गिरकी खायची, नि पुढे खळखळायचे ! जणू पुढे कुणाला धरायचेच आहे ! सारे आपल्याच नादात ! कुणाचे कुठेच लक्ष नाही.

सर्वत्र शांत— ! माणसाचा वारा नाही. घराचा आसरा नाही. मध्येच एखाद्या पक्ष्याची किलबिल ! मध्येच प्रचंड घनगर्जना— !

—पुन्हा तोच गंभीर निनाद– दुंदुभीच वाजली देवाघरची ! आता हिऱ्या-माणकांची लूट; नंतर सोसाट्याचा वारा; नंतर पावसाच्या धारा – सृष्टीचा गडगडाट– सारा प्रदेश जलमय होणार —आजूबाजूला कुणी – कुणी नाही अगदी .....!

जीवन म्हणाले– " बघतोस काय ? पळ ऊठ. जा अन् कुठं तरी आसऱ्याला उभा राहा–" काही सुद्धा सुचले नाही मला !

हो

ही दोनीही पाने एप्रिलच्या रोजनिशीतली. जुनी म्हणून माझ्याच घरी विसरला तो ! नेईल सावकाश. हरविली नाहीत म्हणजे झाले – हीच त्याला भीती !

१५।८।३४.

१६

पिंजरा

" ... and it is a better incentive –" मला तिने ते वाक्य पुरते वाचू देखील दिले नाही. एकदम माझ्या गळ्याला विळखा घालून ती मला घुसळू लागली. माझाच उलट पापा घेतला तिने. ही कशाची लाडीगोडी आहे हे मी सवयीने तत्काळ ओळखले. — " बापू ! पाच वाजलेत् रे—" तिने माझी कान-उघाडणी केली. सायंकाळचे पाच वाजले तरी मी मूर्ख वाचीतच बसलो, हा तिच्या नजरेत अर्थ भरलेला होता.

फूल ! ते जोपर्यंत फूल असते, जोपर्यंत चुरगळलेले नसते, चुरडलेले नसते, सुकलेले नसते तोपर्यंत त्याचा सारखा सुगंध सुरू असतो. अगदी दिवसभर त्याचा परिमळ लुटा. पण कुठला येतो इतका सुगंध कळत नाही. जणू साठाच साठविला नाजुकशा परागाच्या पोटात--! मुलांचेही तसेच ! सदा फुललेली – सदा सुगंधी !

कुसुमचे जग वेगळे–माझे वेगळे ! माझ्या जगात कुसुम मिसळू शकत होती. मला ते साधणे शक्य नव्हते !

" हं, आज कुठं जायचं बाईसाहेब ?—" मी टोपी घालीत विचारले.

" आज ताराताईच्या गौरीला फुलं आणायची— " हे तिचे उत्तर. मी बाहेर येणारे केस टोपीत दडपले व तिला घेऊन निघालो.

पावसाने फुललेली बागेतील हिरवीगार झाडे; जाईच्या झाडांवरून वाहत येणाऱ्या सुगंधी वायुलहरी–सारे वातावरण उतास आलेले जणू ! कोवळ्या गवताची मिरास तर विचारायलाच नको. उगीच वाटे, सारे अंग उघडे ठेवून त्या गवतावर मनसोक्त

लोळावे, ते कोवळे कोवळे, पिवळे हिरवे अंकुर अंगात खूप खूप रुतवून घ्यावे आणि आपले सारे अंग पुलकित करावे !

कुसुम तर एखाद्या फुलपाखरासारखी उडत होती. ते तिचे भुरभुरणारे केस आणि फडफडणारा गुलाबी झगा, –कुणालाही सुवास वाटला असता फुलांचा !

मी उगीचच संथपणे फिरत होतो. कुसुम माझ्या समोर समोर पळत होती.

एका पिंजऱ्यात एक वाघ होता; दुसरा पिंजरा सिंहाचा; तिसऱ्यात अस्वल, तर चौथा वानरांचा. हा प्राणिसंग्रह करण्याचा उद्देश काय हे मला माहीत नव्हते, पण मौज वाटत होती यात संशय नाही. तो सिंह बिचारा स्वस्थ डोळे मिटून पडलेला. त्याचे ते साधे सात्त्विक स्वरूप जंगलात कधीच पाहावयास मिळाले नसते. मोठी क्रूर जात, अत्यंत शूर, कधीच स्वतःकडे पाहू द्यावयाची नाही. माझ्यासारख्या शहरवासीयाला कलेच्या दृष्टीने त्याचे हेच स्वरूप जास्त आवडले ! आणि त्याकरिता जीव धोक्यात घालावा लागला नाही !

कुसुमचे सारे मन रमले तिच्या जातीत ! पक्ष्यांचा पिंजरा किती सुंदर तयार केला होता ! नाजुक आणि बारीक लोखंडी जाळी; आंत सुंदर झोपाळे. झाडांच्या मोठ्या कुंड्या, पाण्याची टाकी, चुरचुरीत लाल वाळू. साऱ्या सोयी होत्या. निरनिराळ्या रंगांचे पक्षी; पांढरे गुबगुबीत ससे; गुलहौशी पोपटमैना; आपल्याच ऐटीत मिरविणारा मोर; कधी मनात आल्यावाचून पिसारा उचलायचा नाही ! तो पिंजरा या सर्वांमुळे अगदी फुलल्यासारखा दिसे.

एका उंच झोपाळ्यावर पांढऱ्या शुभ्र रंगाचे दोन पक्षी स्वस्थ बसले होते, पाण्याच्या त्या लहानशा टाक्यांवर भोवताली बसून काठाशी हेलावणारे पाणी पंखांनी आपल्या अंगावर शिंपडून घेण्यात कित्येक गुंतले होते; काही दाणे टिपत उडत असत, तर कित्येकांना उगीच किलबिलत उडण्यात मौज वाटत होती !

मी कवी नव्हतो, त्यामुळे त्यांच्या आवाजातील ध्वन्यर्थ मला नीट आकलन करता आला नाही. इतरांपेक्षा माझ्यात सहृदयता कमीच. कारण त्यांच्या सौंदर्याकडे, मनोहर विलासाकडे पाहत असताना त्यांच्या पिंजऱ्यांतील असहाय परतंत्रतेबद्दल माझ्या मनात मुळीच विचार आला नाही. कुसुमसारखा मी पण हौसेनेच पाहत होतो.

एक लहानसे पाखरू इकडे तिकडे उडत होते. ते उडले, उडले आणि जाळीच्या तारांत पाय अडकून स्वस्थ बसले. कशाने तरी किंचित् खरचटल्यामुळे तिथले एकदोन तार तुटले होते. आणि जाळीत एक मोठे छिद्र पडले होते. आणखी चारपाच तार वाकविले असते तर सहज त्याची सुटका झाली असती.

त्याच्या मनात तोच विचार आला असावा. त्याने आपली चिमणी चोच त्या तुटलेल्या तुकड्याला भिडविली. आणि पंख उंच करून सारी शक्ती खर्च केली. बराच वेळ त्याचा प्रयत्न चालला होता.

ते तिथून उडाले. एका दुसऱ्या पक्ष्याच्या कानात काहीतरी कुजबुजून त्याला घेऊन आले. दोघांचा प्रयत्न सुरू झाला. मला जिज्ञासा वाटू लागली.

मला वाटते दोघांचाही प्रयत्न अपुरा पडला असावा. त्या दोघांनी एक भरारी मारली आणि त्या उंच झोपाळ्यावर बसलेल्या पाखराकडे धाव घेतली. तिघेही कायसे चिलबिलली. परतली मात्र दोघेच ! पांढऱ्या गुबगुबीत पक्ष्याने झोका घेतला व वर पाहत साद घातली.

बदकांच्या तिथेही तोच प्रकार. त्यांनी तर पाण्यात पाय हलवून त्यांच्याकडे पाठच फिरविली. त्याचा मार्ग त्यांना अशक्य वाटला असावा. कबुतराला वाटले, कुठे आपली सुंदर (?) चोच खराब होते. ससा तर आपल्याच गडबडीत दिसला; स्वतःच्या बिळाला वाळूतून तिसरे तोंड काढता येईल की काय याचा विचार करण्यातच त्याची शक्ती खर्च होत होती. मोर काय, जाणूनबुजून कलेचीच प्रतिमा – एखादे पंख झडले तर सौंदर्यहानी – नुकसान ! कुणीच मदत केली नाही.

ती पाखरे परत आली. एकदा आणखी त्यांनी पंख फडफड केले, आणि आपल्या चोची त्या तारांशी भिडविल्या. अगदी पंख हलवून हलवून—जणू त्या लोखंडी तारांशी विलास चालला होता त्यांचा ! फुलपाखरू जसे फुलाशी बिलगलेले — जशी माता आपल्या मुलाला कवटाळून बसलेली !

कुणाच्या मर्मावर खबरही नव्हती. सारे पक्षी त्यांच्याकडे पाहून काहीसे ओरडत होते. ते सुद्धा त्यांना काहीतरी प्रत्युत्तर देत होते. " नाही, आम्ही करीत आहोत तेच बरोबर "—हाच त्यांचा मतलब दिसला.

मलाही जरा कसेसेच वाटले. नाजूक पाखरे बिचारी ! काय करणार होती बाहेर पळून, काही कळत नाही. जन्मापासून उंच भराऱ्या मारायची सवय नाही. बाहेर सुटका झाली तरीही एखाद्या फांदीवर बसतील चिवचिवत – मारील एखादा पारधी पटकन् तीर – पडतील मग खाली ! त्या सुंदर पंखांची नासाडी ! ती चोच, तो गुबगुबीतपणा – सारे व्यर्थ !

इतरांनीही त्यांना हेच सांगितले असावे. त्यांनी पुनः एकदा मोठ्याने कलरव केला. पुनः त्यांनी प्रत्युत्तर दिले– " नाही हेच चांगले "—

" यू, यू "—कुसुमचा आवाज तो. मी वळून पाहिले. फुलपाखरांमागे लागून कुसुम दूर पळाली होती आणि गुलबाच्या नाजूक कलमात फुलासारखी दिसत होती.

एकदम मोठा गोंगाट झाला. माझे लक्ष वेधले. दाण्याची टोपली घेऊन धनी आला. साऱ्या पक्ष्यांनी भराभर खाली उड्या घेतल्या. जाळीवर थाप मारून त्या पाखरांनाही धन्याने आत दडपले व त्या तारा नीट जुळविल्या.

सारे पक्षी चोची भरून भरून दाणे नेत होते. ती पाखरे मात्र थकून गेली होती. त्यांच्यात त्राण उरले नव्हते. एका कोपऱ्यात दोघांनीही आपले पंख

पसरवून डोळे लाविले. श्वासोच्छ्वासाबरोबर हलणारी पोटाजवळची पांढरी पिसेच काय ती त्यांच्यातील जिवंतपणाची साक्ष देत होती. पडले होते बिचारे स्वस्थ–! बाकीचे पक्षी हसत होते – किंचित् उपहास – थोडी आढ्यता...

"बापू, ताराताई आली रे,–" कुसुमने टाळ्या वाजविल्या. तारा फुलांची परडी हाती धरून येत होती.

"काय ग ! मी तर आणणारच होतो फुलं—"

"नको, दुसऱ्यांनी दिलेली नकोत काही ! माझ्या गौरीला मीच आणलेली फुलं आवडतात—"

तिच्याही बोलण्यात बराच गर्भितार्थ दिसला मला त्या वेळी !

२४।८।३४

१७

भाऊबंदांच्या प्रवृत्ती

दोनीही बाजूंला धार होती, पण तिथे ह्या डोहातच पाणी संथ होते. त्याची गती समजून देखील येत नव्हती. त्या डोहाच्या आत घुसलेला खडकाचा कोपरा— तिथेच मी आणि प्रभाकर बसलो होतो. आजूबाजूला कुणीच नव्हते. नदीच्या रेताड वाळवंटात चारदोन बगळे मात्र इतस्ततः उडत होते.

पलीकडच्या डोहात एक कोळी जाळे पसरून फिरत होता. त्याने सारे पाणी गढूळ करून टाकले होते. काय दुष्ट लोक ! त्या बिचाऱ्या माशांना विनाकारण त्रास. सापडतील ते मासे आपल्या पोतडीत भरून कोळीदादा चालता होईल. बाकी राहिलेले अस्थिरपणे त्या गढूळ जीवनात वावरत राहतील. त्यांना तो कोळी राक्षसासारखा वाटला असेल. स्वतःच्या जीवनाकरिता दुसऱ्याला जीवनापासून पारखे करावयाचे— राक्षसी प्रवृत्तीच ही ! प्रभाकर तर माझ्यापेक्षाही जास्त दोष देत होता कोळ्याला— "काय, बेट्याने सारे पाणी खराब केले !"

तो कोळी थोड्या वेळाने निघून गेला. त्याची ती पांढरी लंगोटी, काळे शरीर, मळके जाळे व ती पोतडी, त्याच्यावरोबरच गेले सारे ! आता आमच्याशिवाय त्या नदीवर कुणीच नव्हते. किंचित् समाधान वाटले आम्हांला !

नदीकाठची ती लव्हाळी —हिरवीगार, आणि आत पांढरी फुले फुललेली. त्यांचे ते कोवळे कोवळे अंकुर, त्यांचा तो नम्रपणा – किंचित् मोठ्यानें जरी लाट आली तरी दबून जायचे, पुनः भर ओसरल्यावर आपली पूर्वावस्था कायम ! आत

जीवनात शिरायचे ते अशा सुंदर लवाळ्यातून – हा विचारच मुळी मला आवडला, पण–! उगीच वाटले– यातच साप लपलेले असतात. आत पाऊल टाकावयाचा अवकाश की लागले किडे गोंगाट करायला ! –जीव बुजून जायचा मुळी ! —

पाणी तरी किती शांत ! त्या डोहात आमच्यापासून सहा-सात हात लांब असलेला तो दगड, पण त्याचेही प्रतिबिंब पाण्यात स्पष्ट उमटलेले दिसत होते. एखादी मासळी श्वास घ्यावयास वर येई; तिने सोडलेल्या नाजूक श्वासाने इवलेसे वर्तुळ पाण्यावर उठे आणि लागलेच विलीन होई. आकाशात आपल्या घरट्याकडे जाणारे पक्षी उडत; त्यांचे ते उडते प्रतिबिंब पाण्यात फडफडे—फार सुंदर दिसे ते ! पाण्यावर एखादा किडा चालायचा; त्यांच्या त्या घसरण्याने उठलेली लांबलांब वर्तुळे— वरून पाण्याची तेवढीच फक्त हालचाल !—

—पण त्या संथ प्रवाहाच्या पोटात किती गडबड–धडपड ! असंख्य मासे वळवळ करीत होते. पाण्यात काही पडले की मासे धावायचे एकदम. माझ्या खिशात असलेला चॉकचा पांढरा तुकडा मी पाण्यात टाकला. झर्रकन् त्याला मासे चिकटले. लोहचुंबकाला लोखंडाचा कीस चिकटतो— अगदी तसेच ! पण ती खाद्य वस्तू नाही असे पाहताच पळाले बिचारे !

पाण्यात आणखी एक प्रतिबिंब उठले. एक बगळा उडत उडत त्या दगडावर येऊन बसला. त्याचा पांढरा शुभ्र रंग–स्वच्छ, शुद्ध, सात्त्विक भावाचा द्योतक; जणू एखादा ऋषी भस्म चर्चून बसलेला. डोळे मिटलेले, पाय अगदी ताठ, चोच पाण्याकडे !

मधूनमधून आमच्या गोष्टी सुरू असत. त्यांना विषय नव्हता. कुठल्याही गोष्टी काढायच्या. प्रभाकर नुकताच शहरातून आला होता. त्याचे मन रमवायचे कसे तरी. त्याला ती शांतता मानवली. मात्र त्या शांत आणि संथ डोहाच्या पोटातही जीवना-करिता धडपड चाललेली आहे हा त्याचा पहिलाच अनुभव. बाकी त्याने वाचले वरेच होते !

बोलता बोलता मध्येच थोडी स्तब्धता येते. त्या अवधीत आम्ही पुनः इकडे तिकडे पाहत असू. विशेष असे नावीन्य कोणतेच नव्हते. सायंकाळ जास्त जास्त काळी होत होती; आणि दूरचा क्षितिजाचा भाग अस्पष्टसा – अंधुकसा दिसत होता.

तो बगळा मात्र तिथेच बसलेला – अगदी दगडासारखा. त्याचे पाण्यात उठलेले प्रतिबिंब तरी तरंगाबरोबर हालचाल करीत होते; पण तो आपला शांत. त्याला ती सवयच झालेली. किती तरी बगळ्यांचे असे दृश्य मी पाहिले होते ! मासे देखील सारखे वळवळत; त्यांची ती वर्तुळे तशीच उठत – सर्व तेच – पुनः आम्ही बोलण्यात गर्क झालो.

इतक्यात बाजूच्या देवळातील घंटा घण्‌कन् वाजली. वाऱ्याबरोबर तो निनाद येताच आम्ही तिकडे पाहिले. कुणीतरी दिवा लावायला आले असेल हीच आमची कल्पना. एक पाठमोरी तरुण बाई देवळात शिरत होती. नित्यनियमाने दिवा लावायला येणारी तीच एक विधवा होती.

मी प्रभाकराला तिच्याबद्दल सांगू लागलो. ती आपल्या जिवाला किती कंटाळली आहे, परवा आमच्या घरी आईजवळ येऊन ती किती रडली. मी सर्व त्याला हळूहळू सांगितले. तो ऐकत होता. त्याचे लक्ष मात्र नदीकडे होते—

" आणि प्रभाकर "—मी त्याला सांगू लागलो, " आश्चर्य हे की, नवरा होता तेव्हा देखील तिला सुख मिळालं नाही. जीवनाचा एकेक मासला पाहिला की मोठं विचित्र वाटतं. तिचा नवरा जिवंत होता तोपर्यंत त्याचे काय काय उद्योग चालले होते याची तिला बिचारीला कल्पना देखील नव्हती. तिची हीच कल्पना की सर्व संथ आणि शांत—"

" Oh ! look ! wonderful—" प्रभाकर एकदम ओरडला. मी पाण्याकडे पाहिले. बगळ्याने पटकन् दोन मासे आपल्या त्या लांब चोचीत धरले आणि पंख हालवीत तो उडून गेला —

—पाणी तसेच शांत होते, तितकेच स्वच्छ; तेच दृश्य, तीच प्रतिबिंबे— काहीही फरक झाला नव्हता !

" पण ते मासे जीवनातून नाहीसे झालेच ना ? " मी त्याच्या त्या उद्गारावर प्रश्नार्थक उत्तर दिले. तो काहीच बोलला नाही. त्याची दृष्टी त्या बगळ्याकडेच होती. किती शिताफीने त्याने मासे पकडले – हाच त्याच्या दृष्टीत अर्थ भरलेला होता.

तो बगळा सावकाश उडत गेला. पूर्णपणे क्षितिजात मिसळून जाईपर्यंत मी त्याच्याकडे पाहत होतो. त्याचे पांढरे शुभ्र पंख–सात्त्विकता–शुद्धता–विमलता यांचे प्रतीक – त्या काळोखातही बराच वेळ दिसत होते.

कोळ्याने पाणी गढूळ केले; माशांना त्याने अमानुषपणे जीवनापासून विलग केलेले स्पष्ट दिसले. त्याची ही कृती राक्षसी — त्रासदायक — विघातक..... !

आणि बगळ्याची मात्र ?

५ । ९ । ३४

१८

प्रत्येकाने सांगितलेली गोष्ट

" त्यांनी सर्व काही केलं, पण अरेरे !—"

या ठिकाणी प्रत्येकजण थांबायचा आणि किंचित् खिन्न दृष्टीने शून्याकडे पाहत सांगायचा—" अगदी थोडा वेळ बरं, तो जायला व घराने पेट घ्यायला एकच गाठ पडली – गेले बिचारे !—"

मला मोठे आश्चर्य वाटायचे. प्रत्येकजण काय मला सांगतोय हे ! आणि सांगताना किती उत्साह ! कंटाळा नाहीच मुळी ! स्वतःच्या मुलाचे लग्न सुखाने पार पडल्यावर आईबाप ज्याप्रमाणे सर्व खुलवून सांगतात – त्याच, अगदी त्याच अभिनिवेशाने सर्व सांगावयाचे; व मौज अशी की, मलाही त्याचा कधी कंटाळा आला नाही. प्रत्येक वेळीं जो तो आपापल्या परीने कसे सांगतो हेच ऐकावेसे वाटे. प्रत्येकाचा प्रश्न होता—" काय साहेब, गाव पाहायला आलांत ना ? मग इथला ' आशा महाल ' पाहिलात की— ? "

—आणि तो " आशा महाल– " म्हणजे ..... !

दादा त्या गावी गेल्यापासून एकदा तरी तेथे येण्याबद्दल सुशीलेने मला दहादा लिहिले होते; तेथील जंगल एकदा मी पाहावे हाच तिचा आग्रह; व मी तेथे पोचतो न पोचतो तोच आल्या दिवशी ती मला पाहावयाला चलायचा आग्रह करू लागली. काही झाले तरी त्या पोरीच्या हळुवार मनाला मी एका शब्दानेही कधी दुखविले नव्हते.

सुशीला खरेच धीट बनली होती. धीट म्हणजे ' अगवाई ' अर्थाने नाही म्हणत मी ! धीट म्हणजे अशी की जंगली मुलूख पाहून दादांनी एक साडेचारशेचा नवीन घोडा घेतला होता, त्याला ती सहज घामाघूम करून आणीत असे.

दुपारी दोन वाजता मी, सुशीला व वसंत असे तिघे निघालो. आमच्या गोष्टींना धरबंधच नसल्यामुळे आम्हांला रस्ता कंटाळवाणा वाटला नाही. शिवाय जंगल खरेच पाहण्यासारखे होते. सुशीलेने पत्रात जे लिहिले ते खोटे नव्हते. त्या जंगलात एकही जागा अशी नव्हती की जेथे काही पाहण्यासारखे नसेल. ज्या ठिकाणी काहीच नाही तेथे निदान सुंदरशी झाडी व फुलवेलीची गुंफा तरी सापडेलच !

जवळ जवळ दोन तास आम्ही सारखे भटकत होतो. रस्ता सुशीलेच्या पायाखालचा दिसला. तिथे पुतळेच पुतळे, पण किती तरी ! मात्र सर्व मोडके, छिन्नविछिन्न झालेले ! पडायला झालेल्या एका देवळातील बुद्धाची मूर्ती कमालीची सुंदर होती.

दगडांनी बांधलेली सुंदर सुंदर दुमजली मंदिरे पडून गेली होती व सर्वत्र बुजबुजाट होऊन रान माजले होते. मध्येच एखादी पाऊलवाट दिसायची. पुढे काही दिसेल या आशेने चालू लागले की सरळ रस्ता वाघाच्या गुहेत ! आणि ती गुहा म्हणजे तरी काय ? पहाडात खोदलेले व सुंदर कोरलेले असे एखादे कुंड असावयाचे व त्याचे आसपासच कुठेतरी अंधाऱ्या कोपऱ्यात स्वारी दिवसभर घोरत पडलेली असावयाची.

पूर्वी तेथे कोणत्यातरी राजाची राजधानी असावी. आता सर्व स्मृतिशेष होऊन जंगलात लपून बसले होते. जंगलाच्या पोटात शिरल्यावर काही निराळेच वाटायचे. मनुष्य-वस्तीत जे कधी वाटत नाही ते ! वर निळे-पांढरे आकाश व खाली हिरवी-काळी वनराई ! आकाशात हजारो वर्षांपासून चांदण्या लुकलुकतात—इथे ते पुतळे, ती घरे, ते स्तूप,—सारे अज्ञात आणि अनंत कालापासून पडले होते, चांदणीच्या मंद प्रकाशाने कष्टाळू वाटसरू आपला मार्ग काढतो; कुणी सांगावे, एखादा संशोधक त्या स्मृतिशेषां-पासून त्या कालाचा आणि त्या सम्राटाचा पत्ता लावील ! खाली विस्तीर्ण अरण्य, वर अनंत आकाश आणि त्या भव्य-दिव्य वातावरणात उभी असलेली आम्ही तिघे ! ! निदान दहा मिनिटेपर्यंत नीट पाहून घेतल्याशिवाय ही कल्पना चांगलीशी आकलन होत नसे.

वसंत थकून जाईल म्हणून आम्ही परत फिरलो. तो खरोखरीच थकून गेला होता. परत वाटेवर अर्ध्यांतच त्याला तहान लागली. मला तेथेच उभा करून सुशीला त्याला पाणी पाजायला निघून गेली. दादाबरोबर ती फिरली असल्यामुळे तिला जंगलाची खडान्‌खडा माहिती होती.

मी जेथे उभा राहिलो तेथेच मला एक पडकेसे बांधकाम दिसले. जवळ जाऊन पाहतो तो काय !—ती काही कोरीव लेणी नव्हती. तो एक बंगला होता – मात्र कोसळलेला ! खिडक्यांचे काच देखील होते – पण फुटलेले ! वरचा भाग काळा दिसत होता व वरच्या मजल्याचे सर्व सामान खाली आत कोसळल्यामुळे मध्ये जावयाची सोय नव्हती. फक्त चार भिंती तेवढ्या नीट दिसत होत्या; आजूबाजूला काही दगड-धोंडे अस्ताव्यस्त इतस्ततः पडले होते .....

"हाच तो 'आशा-महाल' बरं, बापू"-मागून येणाऱ्या सुशीलेने मला माहिती दिली. मला आश्चर्य वाटले. पडका, मोडका असा हा 'आशा-महाल' म्हणजे काय प्रकरण आहे ? मी तिला विस्मयानेच विचारले, "काय ग सुशे ! हा किती वर्षांपूर्वी बांधलेला आहे ? यांतलं सामान नी बांधणी अगदी हल्लीची दिसताहेत पण ! "

"हल्लीची म्हणजे वीस एक वर्षांपूर्वीची—" तिने सुरू केले. "अरे, तुला माहीत नाही का ? नुसती स्वतःकरिता ठेवलेली शिकार मारली म्हणून रामलालला गोळी घालून ठार मारणारा तो ××× होता ना ?—"

" बरं मग ? त्याचं काय ? "

" त्याचं असं की, तो या प्रांतावर होता काही दिवस. इतका जुलमी हो म्हणतात तो की, जंगलाचा राजासुद्धा त्याचेपुढे फिक्का वाटावा. माणसांना गिळायचं बाकी ठेवलं होतं त्यानं ! एकतर लोकांचं स्वातंत्र्य अन् त्याबरोबरच स्वास्थ्य गे याच्या येण्यानं आणि दुसरं म्हणजे त्याच्या चैनीसाठी घरादाराची केव्हा राखरांगो होईल याची शाश्वती राहिली नाही. सारे हवालदिल झाले बापडे ! शिवाय त्याच्यापु कुणाचा इलाज चालावयाचा नाही तो नाहीच. कोठे कुणाची दाद लागावी पण याच्या तर्फेनेच. कसं शक्य होतं ते ? सर्व काही त्याच्या हातात आणि त्या हात हे असे रक्ताने माखलेले. लोकांची निराशा पेटून गेली. पण करतात का बिचारे—"

ती किंचित् थांबली, आणि हळूहळू सांगू लागली— " शेवटी एकदा अ झालं; त्याने शिकारीसाठी हा बंगला इथं बांधला. येथून तो पशूंची शिकार करीत अ व माणसांची सुद्धा बरं का ? तो असाच तिथं राहायला आलेला पाहून आमच्य गावच्या दोन तरुणांनी मनाचा धडा केला व आपला वेत पार पाडायची त्यांन तयारी केली.

" त्यांनी असं ठरविलं की, अंधाऱ्या रात्री येऊन अगोदर हा बंगल पेटवायचा; आग लावल्यावर सशस्त्र पहारेवाले भेदरून इकडे तिकडे करतील व तो *** सुद्धा घाबरून बाहेर येईल. तो तसा वेसावध बाहेर येताच त्याचा खू पाडायचा; मग आपलं काय व्हायचं ते होवो ! पण अरेरे ! ! "

पुनः सुशीलेने तो उद्गार काढिला. " त्यांनी घर पेटविलं त्याच रात्री तो निकडीच्या कामाकरिता आपले लोक वगैरे ठेवून तसा एकटाच निघून गेला होता. आणीबाणीची वेळ अशी फुकट गेली. झालं ! लागलीच त्यांना पहारेवाल्यांनी पकडून त्यांच्या मुसक्या बांधल्या. तेवढ्या वेळात ते कायसे म्हणाले मला आठवत नाहीं. पण ते त्यांचे शेवटचेच शब्द–!

" ते दोघे तसे गेले याबद्दल लोकांना नाही मोठंसं वाटलं. पण ध्वनीला प्रतिध्वनी मिळाला त्यातच त्यांना आनंद ! लोकांची प्रवृत्ती अशी बनते जुलमानं ! ! तू कुठंही जा. या गावात तुला प्रत्येकजण ही गोष्ट अभिमानाने फुलवून सांगेल–"

—आणि तसा अनुभव मला दोन दिवसांतच आला. जो जो मला भेटला त्याने त्याने मला सांगितले. सिगारेट्स् घ्यायला मी पानवाल्याकडे गेलो. वास्तविक त्यांची मनोवृत्ती कशी असते याची प्रत्येकाला कल्पना आहे. पण मी सिगारेट पेटवीत असतानाच तो म्हणाला,– " साहेब, आपल्यासारखे येतात तेव्हाच सिग्रेटचा खप; नाहीतर इथे सर्व खाकीच चालते. पण गाव पाहायला येऊन 'आशा– "

" होय, पाहिला की—" मी त्याला उत्तर दिले.

"ते विसरणे शक्यच नाही. कुणीतरी सांगितलंच असेल," तो बोलू लागला. त्याने ती गोष्ट पुन्हा मला सांगितली. 'साहेब, पोरं पण पोरं होती ती!! अगदी राम-लक्ष्मणाची जोडीच समजा. कोवळी तर अशी की नरडी दाबून प्राण घेतला असता तर रक्ताऐवजी दूध ओकली असती. गरीब, सालस! पण अंगाची आग झाल्यावर काय सुचतं सांगा बरं! त्यांचा काका याच XXX च्या रागाला उगीच बळी पडला. असा मर्द गडी होता म्हणून सांगू! अन् त्याचेच हे बच्चे—सिंहासारखे, कोवळे, तरुण—"

त्याचा आवाज बदलला. नेहमीचा रंगेलपणा त्याच्या तोंडावरून नाहीसा झाला. आपुलकीच्या भावनांनी त्याचे डोळे लहानमोठे होऊ लागले. तो अभिमानाने म्हणाला,—"पण हे मर्दाचं काम बरं! त्याची मदार वयावर नसते—मनगटावर!! जिच्या पोटी आले त्या माउलीची कूस सोन्याची झाली....."

मी परतलो. तिथल्या टवाळांच्या अड्ड्यातही त्या राम-लक्ष्मणांची मानसपूजा सुरू आहे तर—! माझ्या मनात विचार सुरू होते.....

काल जे पाहावयाचे राहिले ते आज पाहावयाचे म्हणून मी व सुशीला निघालो. अर्ध्या वाटेवर 'त्या आशा-महाला' कडे माझी नजर गेली. मी उगीचच थांबलो.

दोन-चार गावकरी जंगलातून परत येत होते. तेही तसेच थबकले. आजूबाजूला चारदोन बांधकामाचे दगड पडले होते ते त्यांनी उचलून पुनः त्या चार भिंतींच्या चौकटीत टाकले व थोडा वेळ थांबून ते चालते झाले. ती आठवण तशीच राहावी, किंबहुना त्या पडक्या, निरुपयोगी, जंगलात एका बाजूला दडलेल्या पण त्यांच्या दृष्टीने त्या भंगलेल्या मंदिराची एक फुटकी काच देखील गमावू नये हीच त्यांची मनीषा!

भावविवश होऊन मी देखील तिथे पडलेला काचेचा तुकडा उचलून आत टाकला; व कधीकाळी मोडक्यातोडक्या भाषांतरात बसविलेल्या ओळी गुणगुणू लागलो:

'थडग्यावरी रिकाम्या, कुणि दीप ठेविता ना?" त्या अफाट वातावरणात सारखे पडसाद उठत होते. पण त्यात माझे शब्द विलीन झाले असे मला वाटलेच नाही.

१९

मानव्याच्या दिशा

मी नदीवर पोचलो तेव्हा चांगली पहाट झाली होती. वातावरण उमलले होते; प्रवाहाची खळखळ अविरत सुरू होती; पाखरांचे थवे चिवचिवत होते.

मी शीळ घालीत कितीतरी वेळ उभा होतो. थोड्याच वेळात बाजूच्या टेकडीवरील सूर्यबिंब स्पष्ट दिसू लागले. सारी सृष्टी तेजाळली, किरणे पाण्यावर नाचू लागली,

मी खिशातला चाकू काढला व दात धुण्याकरिता बाभळीची काडी तोडावयास गेलो. काटा बोचू नये म्हणून मी जपून जपून फांद्या ओढीत होतो. फांदी दोन बोटांच्या चिमटीत धरून मी जोराने चाकू मारला; परंतु तो चुकून माझ्या करांगुलीला लागून भळभळ रक्त वाहू लागले. माझा जीव कासावीस झाला. तात्पुरता करण्यासारखा असा कोणताच इलाज नव्हता. मी जोराने बोट दाबून धरले व नदीत वाळूवर येऊन बसलो.

"वें ऽ ऽ —" माझ्या मागून आवाज ऐकू आला. मी वळून पाहिले. एक मनुष्य दोन मेंढरांना धरून येत होता. आला तसाच तो पाण्यात शिरला, व त्याने त्या दोनीही मेंढरांना पाण्यात लोटले. ती बिचारी ओरडू लागली.

बोट कापल्यामुळे मी अस्वस्थ होतोच, त्यात त्यांच्या केविलवाण्या ओरडण्याची भर पडली. मला एकदम मागचा प्रसंग आठवला--

त्या दिवशी देखील याच वेळीं मी वाळूत बसलो होतो. एक मध्यम वयाचा शेतकरी एका मेंढराला घेऊन त्या नदीवर आला आणि असेच त्याला त्याने पाण्यात लोटले. मी सारखा पाहत होतो.

त्या मेंढरांच्या अंगावरची मऊमऊ लोकर भिजून गेली होती. त्याने त्याला सावकाश धुतले; नंतर बाहेर काढून अंगावरच्या वस्त्राने त्याचे अंग पुसून काढले. थोडा वेळ उन्हात राहिल्यावर त्या मेंढराचे ओरडणे बंद झाले, व ते चालू लागले. तो त्याच्या मागून जात होता--

त्या बारीक वाळूत मेंढराची पावले उमटत होती व मागून चाललेल्या माणसांच्या पावलांनी पुसटून जात होती. कसेसेच वाटले मला !

घराजवळ येताच रामजीने त्या मेंढराचे दावे धरले; व अंगणात उभ्या असलेल्या आपल्या मुलाच्या हाती देऊन तो घरात गेला.

अंगणात एका बाजूला वाजंत्री बसले होते. दुसरीकडे चारदोन शेजारी जमून लवकर चालण्याविषयी रामजीला घाई करीत होते. काय चालले आहे याचा मला उलगडा होईना. इतक्यात रामजी घराबाहेर आला. त्याची एक मूठ कुंकवाने भरली होती; व दुसऱ्या हाती मुळापासून तोडलेले मोराचे पंख होते. त्याने ते कुंकू मेंढराच्या कपाळी लावले व गळ्याचे दावे तोडून ते पंख बांधले. वाजंत्र्यांना वाद्ये वाजवावयास सांगून तो पुनः आत गेला.

थोड्या वेळाने अगदी शुचिर्भूत होऊन तो आला. त्याने पूजेचे तबक आपल्या हाती धरले होते. कणकेच्या दिव्यात तेलवाती तेवत होत्या. ती पंचारती त्या मेंढराला ओवाळली गेली. मरणापूर्वीचे त्याचे हे वैभव पाहून माझ्या पोटात धस्स झाले.

कुंकवाचा दोन बोटांचा टिळा रामजीने आपल्या कपाळी लावला; व सौभाग्यवतीला हाक मारली. ती आतून बाहेर आली. तिने पिवळे वस्त्र परिधान केले होते. तिच्या

खांद्यावर एक चार वर्षांचे मूल होते. त्याच्या अंगावर मळके पांघरूण असल्यामुळे त्याच्या डोक्यावरचे चिटाचे नवे टोपरेच तेवढे दिसत होते.

पुढे वाजंत्री, मध्ये ते मेंढरू, त्याच्यामागून रामजी, रामजीची वायको अशी सर्व मिळून सुमारे वीसएक जणांची ती मिरवणूक निघाली. त्या बिचाऱ्या मेंढराला कल्पना असेल का ? त्याला आज चांगले गहू खावयास मिळाले होते. त्याचे सर्वांग स्वच्छ धुतले गेले होते; व ते आपल्याच नादात डुलतडुलत अगदी 'इतश्च इतश्च' चालले होते !

—पुनः मला दिसले ... त्या मेंढराची गोल गोल, छोटी छोटी खुरे जमिनीवर उमटत होती व रामजीच्या पावलांनी पुसून जात होती. मला भीती वाटली त्या एकंदर प्रकाराची !

एका ओबडधोबड देवळाजवळ ती मिरवणूक थांबली. त्या देवळाला कडू-लिंबाच्या डहाळ्यांनी शोभा आणली होती. एक लाकडी त्रिशूळ तेथे गाडला होता व त्याला शेंदूर फासला होता. दाराच्या पायरीवर कोंबडीची पिले चिवचिवत होती.

आत जगन्माता देवी दगडाचे रूप घेऊन व सर्वांगाला शेंदूर फासून बसली होती. तिच्या डोळ्यावरही शेंदूर फासल्यामुळे तिच्या भक्तांचा हा सोहळा तिला दिसणे शक्य नव्हते !

रामजी, त्याची बायको, मुलगा वगैरे थोडीशी मंडळी आत गेल्यावर देवीची पूजा करण्यात आली. तिला दहीभात अर्पण केला गेला; तिच्यावर फुले उधळण्यात आली. खणानारळाने तिची ओटी भरण्यात आली. उदाचा एक प्रकारचा उग्र वास सुरू झाला.

पायरीवर फिरणाऱ्या पिलांपैकी एक देवीला अर्पण केले गेले; आणि येथपर्यंत सारे यथास्थित झाल्यावर रामजीची नजर त्या मेंढराकडे गेली. ते बिचारे डोळे मिटून स्वस्थ उभे होते. तो उग्र वास त्याला सहन झाला नाही म्हणा, किंवा त्या देवीच्या कृपेने त्याला मरणाआधी मरणाचे ज्ञान झाले म्हणून म्हणा, पण त्याने अत्यंत केविलवाण्या स्वरात टाहो फोडला.

रामजीने त्याला देवीजळ उभे केले. देवीला बळी देण्याचे भाग्य नशिबी आल्यामुळे त्या बिचाऱ्याचा देह सत्कार्यी खर्चला जाणार होता ! मान कापल्यावर रक्ताची धार देवीच्या शिरावर पडेल अशा रीतीने त्याला रामजीने उभे केले व अत्यंत भक्तिभावाने देवीची प्रार्थना केली—" माय माझे देवीमाय ! चुकलं माकलं पोटात घाल; हे लेकरू तुझंच आहे. चांगलं वागू दे. भुताखेतांपासून राखणारी तूच आहेस. तुझ्या 'निवेदाला' हा बळी देतो. संतुष्ट होऊन सुखी ठेव—"

रामजीच्या बायकोनेही असाच नमस्कार केला व त्या आजारी असलेल्या मुलाच्या कपाळी देवीचा अंगारा लाविला. सर्वांनी नमस्कार केल्यावर एक सुरा

घेऊन रामजी उठला. त्याने तो कचकन् मेंढराच्या मानेवर मारला. ते बापुडवाणे ओरडत होते. पण त्याचेकडे कुणाचे लक्ष जाणार ! ! अडीच घाव मारल्यावर रक्ताची धार देवीच्या शिरावर गळू लागली.

—एक अत्यंत हृदयभेदक टाहो आणि ते बिचारे धडापासून वेगळे झाले. त्याचे शीर देवीच्या पुढ्यात पडले. देवीने निर्माण केलेला एक जीव देवीच्या नैवेद्याकरिता देवीला दिला गेला. देणारा कोण ? देवीने निर्माण केलेला मानव...रामजी !

रामजीचा चेहरा आनंदी झाला. आता त्याच्या मुलाची रोगराई पळून जाणार होती. तो सुखी होणार होता. देवी त्याच्यावर संतुष्ट होणार होती. देवीच्या नैवेद्याची आज शेजाऱ्यांना मेजवानी--रामजी मोठा देवभक्त ठरला होता !

ती मिरवणूक परत निघाली. पंचारतीचे रिकामे ताट मुलाच्या हातात होते. त्या मेंढराचे धड रामजीच्या हातात असून त्यातून रक्त ठिबकत होते. आणखी एकदा माझे लक्ष गेले---ज्या जमिनीवर थोड्या वेळापूर्वी मेंढराचे खूर उमटत होते त्याच जमिनीवर आता त्याच मेंढराचे रक्त टपकत होते. रामजीचीही पावले तशीच उमटत, पण मागून येणाऱ्या लोकांच्या पावलांत मिसळून जात !

नदीवरच्या त्या दोन मेंढरांना पाहून माझ्या डोळ्यांसमोर वरील प्रसंग येऊन गेला. तो मनुष्य अजूनही त्यांना धूतच होता. माझ्या बोटाचे रक्त आता थांबले होते.

बिचाऱ्यांना मारायचेच झाले तर उगीच धुणे वगैरे कशाला ?--मला संताप आला. या माणसाचा नवस मोठा दिसतो; कारण दोन मेंढरांना हा बळी देणार ! ! मी त्याला काहीतरी म्हणणार होतो, इतक्यात त्याने दोनीही मेंढरांना बाहेर आणिले. पुनः मला वाटले, आता हा त्यांना त्या बोथट सुरीने...! ! भेदरल्या दृष्टीने त्याच्या त्या प्रत्येक कृतीकडे मी पाहत होतो. तो आपल्याच कामात गुंतला होता.

त्यांच्या अंगावरची पांढरी शुभ्र लोकर भिजून गेली होती. त्याने त्यांचे अंग पुसून काढले व घराकडे निघाला. त्याचे घर फार दूर नव्हते. अंगणात शिरल्याबरोबर त्याने बायकोला हाक मारली; व एक मोठे घोंगडे मागून घेतले. अंगणात कुणीच नव्हते. त्याने ते ऐसपैस आंथरले व त्यावर त्या दोनीही मेंढरांना बसवून तो आत गेला. आता पंचारती येईल. नंतर एका आजारी मुलाला घेऊन त्याची बायको बाहेर निघेल...

...पण बाहेर कुणीच निघाले नाही. तो घरातच काहीतरी बोलत होता—

" काय ग, भाकर झाली का ? "

" अहं--"

" किती वेळ आहे ? "

" एक घंटा, बरोबर रोजदार वेळी ताट आणून देईन मी. "

"मी घरीच आहे आज. भाकर झाली की हाक मार मला—" तो बाहेर आला. ती मेंढरे डोळे मिटून स्वस्थ ऊन खात बसली होती.

तो सावकाश त्यांच्याजवळ गेला. त्यांपैकी एकाला त्याने उठवून आपल्या मांडीवर घेतले व अत्यंत प्रेमाने पोटाशी धरले...

"एवढे प्रेम आहे तर बळी घेतो कशाला बिचाऱ्यांचा," मी स्वतःशीच आश्चर्याने—काहीशा तिरस्काराने उद्गारलो.

त्याने त्याच्या तोंडावर हात फिरविला, पाठीवर थाप मारली. ती त्याच्या अंगावरची लोकर पूर्णपणे वाळली किंवा नाही, हे अंगात हात खुपसून पाहिले; ती वाळली होती. तो सरसावून बसला. त्याने आपल्या खिशातून एक कात्री काढली व त्या मेंढराची लोंकर कापावयास सुरुवात केली.

तो आपल्याच कामात निमग्न होता. त्याचेही मुख सतेज होते.—आनंदी होते, हसरे होते.

पण त्याच्यासमोर शेंदूर फासलेली व रक्ताने न्हाऊ घातलेली देवी नव्हती.

—उलट अत्यंत शुभ्र, स्वच्छ, विपुल लोकरीचा ढीग पडला होता व देवीने निर्माण केलेले दोन जीव एकमेकांच्या गरजा भागवीत होते !

७।१२।३४

२०

गुलामांचे संकल्प

रोमन सीझर ! नाव ऐकले की नुसता थरकाप उडायचा गुलामांच्या अंगांचा. किती भेदरून जायचे ते ! जिकडे जागा सापडेल तिकडे भराभर पळून लपून बसताना त्यांची कोण धडपड ! उंदीर बिळातून जसे पाहतात तशाच प्रकारचे त्यांचे पाहणे ! त्यांच्या जीवनात खाण्यापिण्यापेक्षा त्या भीतीचीच जास्त धसक होती.

हातातील पहार त्याने खाली ठेवली. किंचित् इकडे तिकडे पाहिले. कोणीच त्याच्याकडे पाहत नव्हते. त्याने आपल्या केसांत दोन्ही हात खुपसले. किचकट घाणीने ते भरून आले. त्याने संतापून हात जमिनीवर आपटले. स्वतःच्या दंडाकडे नजर जाताच त्याच्या डोळ्यात पाणी आले. हातातील पहारीइतकी देखील त्यांची जाडी राहिली नव्हती. पहार लोखंडाची असून वापरून वापरून पांढरी झाली होती. त्याचे हात मात्र जास्त सुरकुतून गेले होते. खर्रखर्र खाजविले की अंगाचा भुसा उडायचा. त्याला स्वतःचीच किळस आली. विमनस्कपणे तसाच तो बसून राहिला. डोक्यावर सूर्य तळपत होता.

ऐन दुपार ! पोटात काहीच नाही. काम मात्र झालेच पाहिजे. चार दिवसांनी सीझरच्या राज्यात मोठा विजयोत्सव होणार ! मिरवणुकीसाठी शहरभर पताका लागल्याच पाहिजेत. त्या उत्सवाची त्याला एकदम आठवण झाली. अजून किती तरी खड्डे खणावयाचे होते. तो कामास लागला.

'खण्ण्...' ! दगडावर पहार आपटून ठिणगी उडाली. त्याच्या डोळ्यांसमोर चमक आली. मागच्या लढाईत त्याचा भाला असाच चमकला होता. एकेका फेकीने त्याने शत्रूकडील कित्येक शिपायांना लोळविले होते. त्याबद्दल त्याला सेनापतीकडून शाबासकी मिळाली होती. पण त्याचे आता त्याला काय ? काय उपयोग आता सर्व गोष्टींचा ! एकच गोष्ट यापुढे त्याला करणे आहे. रक्ताची गुळणी पडेपर्यंत काम आणि बादशहाची नजर चुकविण्याची अक्कलहुशारी !

त्याच्या देशाचा राजा हरला. त्याला गुलामी आली. बरोबर त्याचा एक शेजारीही पकडला जाऊन गुलाम बनविण्यात आला होता. दोघेही संत्रस्त झाले होते.

"यातून माझी मरेपर्यंत सुटका होणार नाही का ? बादशहा, मी इथेच मरणार का ? पळून गेलो तर...? पण जाणार कुठे ? "

रोमचा राजा शेकडो मैल हात लांब करून बसला होता. तेथली सारी हवा त्याच्या हुकमाने वाहात होती.

" माझा दोस्त मला साथ देईल. आम्ही दोघे मिळून पळून जाऊ. जंगलातच राहू. "

त्याला किंचित् समाधान झाले. पुनः त्याने इकडेतिकडे नजर टाकली. वरिष्ठ अधिकारी उत्सवाच्या तयारीत गुंतले असल्यामुळे गुलामांकडे कोणाचे फारसे लक्ष नव्हते.

तो उठला. जवळच त्याचा शेजारी दोस्त तेच काम करीत होता.

" काय रे, काय चाललंय् ? " तो आल्यावर म्हणाला.

" पण अगोदर मला सांग, काम सोडून येऊन मार खायचा आहे का तुझ्या मनात ? " दोस्ताने विचारले.

" अरे, कोण पाहातो आहे ? सर्व अधिकारी आपल्याच रंगात आहेत. जसं त्यांचंच लग्न आहे वेड्यांचं ? "

" पण तुला लेका नरोटीच मिळणार ! "

" ती टळते नशिबाची. पण एक गोष्ट करावी लागेल. तुझी तयारी आहे का ? "

" कसली ? सीझरच्या जागी तू किंवा मी... "

" चूप. असं मूर्खासारखं बोलू नकोस. "

" मुत्सद्यासारखाच आव आणतोस की..."

" हं..."

" पण, माझाच दोस्त तू. तुला काय माझ्यापेक्षा जास्त शिंगं आहेत ? "

" माझं म्हणणं असं, की..." तो सांगू लागला, " आपण इथून पळून जाऊ या. "

" अगदी शहाणपण ! हाती लागल्याबरोबर आपलं मरण ! वा ! सुंदर ! अरे, निदान उत्सवाची मिरास तर पाहा. कशाला मरतोस ? "

" तीच पाहात राहा जन्मभर ! " तो तिरस्काराने उद्गारला.

" मग काय, मरू म्हणतोस ? " मित्राने विचारले.

" मेलास तरी तुझ्यासाठी कोण रडणार आहे ? या साऱ्या रोम शहरात फटक्यांशिवाय विशेष बक्षीस आपल्याला कुणी दिल्याचं आठवतं तुला कधी ? "

त्याचा मित्र थोडा विचारात पडला. त्यालाही त्या एकंदर हीन परिस्थितीचा वीट आला होता; पण पळून जाण्याचा मार्ग प्रथम त्याला विचित्र वाटला. किंचित् थांबून त्याने विचारले,

" बरं, आपण पळून गेलो तर हाती नाही का सापडणार ? "

" नाही. "

" हे कसं ? "

" जंगलात लपून बसू. झाडपाला खाऊ, नाहीं तर मरू. निदान जंगलात बिगारी काम करता करता रक्त तर ओकावं लागणार नाही ? "

" पाहा बेट्या, नाही तर ऑफस् व्हायचं सारं..." तो हुरळून म्हणाला, " आणि तसं झालं, की उत्सवाच्या अगोदर आपलीच धिंड निघायची. "

" नाही रे; तू बेइमान होऊ नकोस म्हणजे झालं. शेवटपर्यंत असाच राहा. जंगलात सख्ख्या भावासारखं राहायला हवं. इतर वेळी भांडलो तरी हरकत नाही. "

" बरं, मग तुला कुठे भेटू ? "

" मला भेटू बिटू नकोस. उत्सव सुरू झाल्याच्या दुसऱ्या दिवशी पळून तू त्या खडकाच्या डाव्या कपारीत लपून बैस. मी तिथे येतो आणि मग ठरवू. "

तो त्या शेजाऱ्याजवळून धावत पळतच आला. आपल्या जागेवर येताच त्याने खणणे सुरू केले.

सीझरचा विजयोत्सव ! सर्वत्र धूमधडाका. कोण कोणाची पर्वा करतोय् ! सर्व तयारी झाली. सैन्याची कवाईत. नृत्यगायनाचे जलसे. सुन्दर सुन्दर पोषाखात हिंडणारे स्त्रीपुरुष. सर्व वातावरणात बदल झाला होता.

सीझरचा हुकूम सुटला, " अँफी थिएटर्समध्ये गुलामांची द्वंद्वयुद्धं होतील. विजयी गुलाम स्वतंत्र होतील. "

साठ-सत्तर हजार लोक तेथे जमणार. गुलामांच्या जोड्या पटांगणात उभ्या राहणार. एक गुलाम आपल्या जीवाची होड लावून दुसऱ्या गुलामाबरोबर युद्ध करील. एक

" बरं मग ? त्याचं काय ? "

" त्याचं असं की, तो या प्रांतावर होता काही दिवस. इतका जुलमी होता म्हणतात तो की, जंगलाचा राजासुद्धा त्याचेपुढे फिक्का वाटावा. माणसांना गिळायचंच बाकी ठेवलं होतं त्यानं ! एकतर लोकांचं स्वातंत्र्य अन् त्याबरोबरच स्वास्थ्य गेलं याच्या येण्यानं आणि दुसरं म्हणजे त्याच्या चैनीसाठी घरादाराची केव्हा राखरांगोळी होईल याची शाश्वती राहिली नाही. सारे हवालदिल झाले बापडे ! शिवाय त्याच्यापुढे कुणाचा इलाज चालावयाचा नाही तो नाहीच. कोठे कुणाची दाद लागावी, पण याच्या तर्फेनेच. कसं शक्य होतं ते ? सर्व काही त्याच्या हातात आणि त्याचे हात हे असे रक्ताने माखलेले. लोकांची निराशा पेटून गेली. पण करतात काय बिचारे—"

ती किंचित् थांबली, आणि हळूहळू सांगू लागली— " शेवटी एकदा असं झालं; त्याने शिकारीसाठी हा बंगला इथं बांधला. येथून तो पशूंची शिकार करीत असे व माणसांची सुद्धा वरं का ? तो असाच तिथं राहायला आलेला पाहून आमच्या गावच्या दोन तरुणांनी मनाचा घडा केला व आपला वेत पार पाडायची त्यांनी तयारी केली.

" त्यांनी असं ठरविलं की, अंधाऱ्या रात्री येऊन अगोदर हा बंगला पेटवायचा; आग लावल्यावर सशस्त्र पहारेवाले भेदरून इकडे तिकडे करतील व तो *** सुद्धा घाबरून बाहेर येईल. तो तसा वेसावध बाहेर येताच त्याचा खून पाडायचा; मग आपलं काय व्हायचं ते होवो ! पण अरेरे ! ! "

पुनः सुशीलेने तो उद्गार काढिला. " त्यांनी घर पेटविलं त्याच रात्री तो निकडीच्या कामाकरिता आपले लोक वगैरे ठेवून तसा एकटाच निघून गेला होता. आणीबाणीची वेळ अशी फुकट गेली. झालं ! लागलीच त्यांना पहारेवाल्यांनी पकडून त्यांच्या मुसक्या बांधल्या. तेवढ्या वेळात ते कायसे म्हणाले मला आठवत नाहीं. पण ते त्यांचे शेवटचेच शब्द-!

" ते दोघे तसे गेले याबद्दल लोकांना नाही मोठंसं वाटलं. पण ध्वनीला प्रतिध्वनी मिळाला त्यातच त्यांना आनंद ! लोकांची प्रवृत्ती अशी बनते जुलमानं ! ! तू कुठेही जा. या गावात तुला प्रत्येकजण ही गोष्ट अभिमानाने फुलवून सांगेल-"

—आणि तसा अनुभव मला दोन दिवसांतच आला. जो जो मला भेटला त्याने त्याने मला सांगितले. सिगारेट्स् घ्यायला मी पानवाल्याकडे गेलो. वास्तविक त्यांची मनोवृत्ती कशी असते याची प्रत्येकाला कल्पना आहे. पण मी सिगारेट पेटवीत असतानाच तो म्हणाला,- " साहेब, आपल्यासारखे येतात तेव्हाच सिग्रेटचा खप; नाहीतर इथे सर्व खाकीच चालते. पण गाव पाहायला येऊन 'आशा- "

" होय, पाहिला की—" मी त्याला उत्तर दिले.

" ते विसरणे शक्यच नाही. कुणीतरी सांगितलंच असेल, " तो बोलू लागला. त्याने ती गोष्ट पुन्हा मला सांगितली. 'साहेब, पोरं पण पोरं होती ती!! अगदी राम-लक्ष्मणाची जोडीच समजा. कोवळी तर अशी की नरडी दाबून प्राण घेतला असता तर रक्ताऐवजी दूध ओकली असती. गरीब, सालस! पण अंगाची आग झाल्यावर काय सुचतं सांगा बरं! त्यांचा काका याच XXX च्या रागाला उगीच बळी पडला. असा मर्द गडी होता म्हणून सांगू! अन् त्याचेच हे बच्चे—सिंहासारखे, कोवळे, तरुण—"

त्याचा आवाज बदलला. नेहमीचा रंगेलपणा त्याच्या तोंडावरून नाहीसा झाला. आपुलकीच्या भावनांनी त्याचे डोळे लहानमोठे होऊ लागले. तो अभिमानाने म्हणाला,—" पण हे मर्दांचं काम बरं! त्याची मदार वयावर नसते—मनगटावर!! जिच्या पोटी आले त्या माउलीची कूस सोन्याची झाली....."

मी परतलो. तिथल्या टवाळांच्या अड्ड्यातही त्या राम-लक्ष्मणांची मानसपूजा सुरू आहे तर—! माझ्या मनात विचार सुरू होते.....

काल जे पाहावयाचे राहिले ते आज पाहावयाचे म्हणून मी व सुशीला निघालो. अर्ध्या वाटेवर 'त्या आशा-महाला' कडे माझी नजर गेली. मी उगीचच थांबलो.

दोन-चार गावकरी जंगलातून परत येत होते. तेही तसेच थबकले. आजूबाजूला चारदोन बांधकामाचे दगड पडले होते ते त्यांनी उचलून पुनः त्या चार भिंतींच्या चौकटीत टाकले व थोडा वेळ थांबून ते चालते झाले. ती आठवण तशीच राहावी, किंबहुना त्या पडक्या, निरुपयोगी, जंगलात एका बाजूला दडलेल्या पण त्यांच्या दृष्टीने त्या भंगलेल्या मंदिराची एक फुटकी काच देखील गमावू नये हीच त्यांची मनीषा!

भावविवश होऊन मी देखील तिथे पडलेला काचेचा तुकडा उचलून आत टाकला; व कधीकाळी मोडक्यातोडक्या भाषांतरात वसविलेल्या ओळी गुणगुणू लागलो:

'थडग्यावरी रिकाम्या, कुणि दीप ठेविता ना?" त्या अफाट वातावरणात सारखे पडसाद उठत होते. पण त्यात माझे शब्द विलीन झाले असे मला वाटलेच नाही.

१-११-३४

१९

मानव्याच्या दिशा

मी नदीवर पोचलो तेव्हा चांगली पहाट झाली होती. वातावरण उमलले होते; प्रवाहाची खळखळ अविरत सुरू होती; पाखरांचे थवे चिवचिवत होते.

मी शीळ घालीत कितीतरी वेळ उभा होतो. थोड्याच वेळात बाजूच्या टेकडीवरील सूर्यबिंब स्पष्ट दिसू लागले. सारी सृष्टी तेजाळली, किरणे पाण्यावर नाचू लागली,

मरणार. एक विजयी होणार ! सीझरची, त्याच्या उमरावांची, विजयी सैन्याची व रोमच्या प्रजाजनांची घडीभर करमणूक. आणखी काय ! त्या दिवशी कित्येक गुलाम मारले जाणार होते. अँफी थिएटरमध्ये रक्ताचा सडा शिंपडला जाणार होता. कष्टून कष्टून संत्रस्त झालेले लोक शस्त्रांच्या जखमांनी रक्तबंबाळ होऊन तडफडून तडफडून मरणार होते...

...रोमचा सम्राट मात्र हसणार होता !

ही परिस्थितीची एक बाजू झाली.

पळून जाण्याला संमती ज्याने दिली होती त्या गुलामाला काय वाटले ? किंचित् आनन्द झाला त्याला. का झाला हे मात्र त्याला कळेना. त्याला काही सुचेना. त्याला कोणतीच इच्छा उरली नव्हती, की जिच्याकरिता तो आशेने वाट पाहात राहील ! सर्व इच्छा जळून भस्म झाल्या होत्या. त्याची विचारशक्ती इतक्या दिवसांच्या धसक्याने ढासळून गेली होती. ज्या काही आशा-आकांक्षा होत्या त्या साऱ्या पिचून गेलेल्या होत्या. ' आपण स्वतंत्र होऊ ' या शब्दत्रयाचा अर्थ त्याला कळत होता, अशांतला भाग नाही. आहे यापेक्षा निराळी परिस्थिती आली, की आपण स्वतंत्र झालो हीच त्याची कल्पना. पूर्वीचे दिवस त्याला आठवत. पण त्यांकडे आशेचा वेध लावणे त्याच्या आवाक्याबाहेरचे होते. हातातली चिमणी भुर्रकन् उडाली म्हणजे ती ज्या दिशेने उडाली तिकडे पाहात बसण्यापलीकडे दुसरे काही न करता येणाऱ्या असहाय जीवाप्रमाणे याची मनःस्थिती झालेली होती.

तो विचार करू लागला. सीझरचा हुकूम आणि त्यामुळे मिळालेली स्वातंत्र्याची संधी ! दोन्ही गोष्टी त्याला एकदम दिसू लागल्या. त्याच्या कपाळाला आठी पडली. हाती आलेली सुवर्णसंधी गमावून बसण्याइतका तो मूर्ख नव्हता हेच त्या आठीने दाखवून दिले जणू !

' जिंकलास तर स्वतंत्र होशील. मेलास तर आनंदच आहे. त्या जंगलात तरी मरणावाचून दुसरं कोणतं सुख मिळणार ? ' त्याच्या मनःश्चक्षूंसमोर हा वाक्यसमूह सारखा नाचू लागला. जंगलात मरण्यापेक्षा हा मार्ग कितीतरी सोपा होता. त्याची मनःस्थिती विचित्र झाली. शेजारी मित्रावरोबर अरण्यात पळून जावयाची कल्पना त्याला आता अव्यवहार्य वाटू लागली. कुठे त्याच्यावर विश्वास ठेवता ? काय त्याने आपल्याकरिता केलेले आहे ? पूर्वाश्रमीचा एक शेजारी ह्या नात्याशिवाय आपण त्याचे कोण लागतो ? त्यापेक्षा...'

त्याची नजर किंचित् बावचळली. त्याला एकदम एक गोष्ट आठवली. त्याच्या मित्राचा एक हात कमजोर होता. एका हातानेच तो काम करीत असे. एक खुनशी कल्पना त्याच्या मनात आली. त्याची शून्याकडे रोखलेली दृष्टी इकडे तिकडे फिरू लागली.

'युक्तीने फसवून त्याला इथे आणायचं. द्वंद्व-युद्धात आव्हान द्यायचं. त्याला मारायचं आणि—आणि मग आपण स्वतंत्र, अगदी स्वतंत्र !

त्याचा विचार कायम झाला. पूर्वापेक्षा त्याचे डोळे विस्फारले. मित्राला आणणे अगदीच सोपी गोष्ट. त्याने फक्त जाण्याचे नाकारले, की एकटे पळून जंगलात राहाण्याची मित्राची तयारी नव्हती. त्याला मारणे ही त्याहूनही सोपी गोष्ट. एक हात कमजोर असल्यामुळे मित्राचे बळ केव्हाही कमीच असणार. इतर लोक द्वंद्व पाहून हसतील. तो देखील हसू शकणार होता त्यांच्याबरोबर ! त्याचा उत्साह एकदम वाढला. आपण स्वतंत्र होणार ही कल्पनाच त्याला गोड वाटली. अंतःकरणाच्या आतील आतील भागातून कोणीतरी नाजूक साद घातल्याचा त्याला भास झाला.

❧

खडकाची डावी बाजू! तेथल्या एका खबदाडात दोघे लपून बसले होते. दोघांचा कडाक्याने वाद सुरू झाला होता. आवाज मात्र दबलेला.

" पण वेड्या, तूच मला नाही का सांगितलंस ? आणि आता तयार झालो तर...! "

" होय रे, पण आपण पळणार कसे ? जंगलात सबंध जन्म काढावा लागेल तो ? "

" अं, राहू. त्यात काय ? पूर्वीच हा विचार करायला हवा होतास. अरे, पाखरं कशी राहतात नि जगतात ? त्यांना कशी वाट सापडते ? आपण तर माणसं !... "

" मूर्ख आहेस झालं ! चल. आपण दुसऱ्या दोघांशी लढाई करून स्वतंत्र होऊ. सीझरचा हुकूम सुटला नव्हे का ! मग उजळ माथ्याने फिरता येईल चांगलं याच रोम शहरात ! तुला तर लढताही येतं. तुझ्या बाडवडिलांनी देखील चांगली तलवार गाजविली आहे. "

" मी नाही येत परत आता. एकदा निघालो आहे. "

" जा मर ! मी मात्र परत जातो व तुझी युक्ती कळवतो साऱ्यांना. "

तो परत फिरला. त्याचा शेजारी मित्रही परत फिरला. त्याचा नाइलाज झाला. उगीच आपल्या मागावर शिकारी लावून घेण्याची त्याची इच्छा नव्हती. त्याला आपल्या विश्वासघातकी मित्राचा अतिशय राग आला आणि त्याच सूडाच्या भावनेत लातो रो मआला.

❧

ॲंफी थिएटर लोकांनी चिक्कार भरून गेले होते. सीझर येऊन बसला. भीषण व भयानक सूर कानी पडू लागले.

सर्व गुलाम बिचारे भीत भीत पुढे झाले. त्यांची गात्रे विगलित झाली होती. स्वातंत्र्याच्या उन्हापेक्षा मरणाची सावलीच, त्यांचे करपलेले मुखवटे नीट दाखवीत होती. जुल्माचा रामराम झाला. नशिबाचे भोग पुरले गेले. मरणाऱ्यांच्या भयंकर किंकाळ्या हृदये कापून पार जाऊ लागल्या !

ते दोघे एकमेकांवर खूप संतापले होते. परस्परांवर सूड घेण्याची त्यांची इच्छा !

" दगलबाज ! घे आता प्रायश्चित्त. " एक उद्‌गार.

" मूर्ख ! मर आता माझ्या हातून. " दुसरे उत्तर.

दोघांच्याही चर्या भेसूर दिसत होत्या. डोक्यावरचे केस ताठ उभे राहिले होते. बटबटीत डोळ्यांतून रक्ताच्या ठिणग्या तिडकत होत्या !

त्याने नेमका आपल्या दोस्ताच्या डाव्या कडेस वार मारला. एक करुण किंकाळी. दबका स्वर. आणि जमिनीवर रक्त सांडले. तो भयानकपणे हसत होता. अधिकारी दचकला. आपल्या मित्राच्या मानगुटीवर बसून त्याने आपले हात त्याच्या रक्तात भिजवून घेतले.

" मला दगलबाज म्हणतोस ? घे, जा..."

सर्वांपेक्षा त्या दोघांचीच लढाई जास्त प्रेक्षणीय झाली. सीझर हसत होता. प्रेक्षकांनी टाळ्या वाजविल्या.

त्याचे हात रक्ताने भरले होते. सर्वांगावर रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या होत्या. त्याचा आनंद गगनात मावत नव्हता.

कोणतीही वस्तू जळून जाईल इतकी दाहकता त्याच्या त्या हसऱ्या नजरेत भरली होती.

अधिकाऱ्यांची नजर त्याच्यावर रोखली गेली. त्यांचे चेहरे फुलले. आपल्याला आज काही विशेष पाहावयास मिळाले या आनंदातच ते एके ठिकाणी गोळा झाले.

" किती निर्दयपणे लढला तो ! फार क्रूर दिसतो. त्याला रक्ताची हिचक वाटत नाही. " एक अधिकारी त्याच्याकडे पाहातच उद्गारला.

" हे पाहा, मला वाटतं..." दुसरा एवढंच बोलून थांबला. त्याच्या मनांत कसलीशी कल्पना आली असावी.

" काय वाटतं ?..." तिसऱ्याने विचारले.

" काही नाही. सहज एक जिज्ञासा म्हणून..." त्याने आपली जिज्ञासा बोलून दाखविली, " माणसांशी जर हा इतकी जबर लढाई देऊ शकतो तर जनावरांशीही देईल, नाही का ? "

" अरे होय, विशेष मजा येईल. " चौथा अधिकारी त्या कल्पनेवर खूष होऊन म्हणाला.

" आणि उत्सव आहे तोपर्यंतच हे घडलं पाहिजे. सीझरलाही आवडेल तुझी कल्पना. मग ? "

" आणखी त्याला या नवीन पिंजऱ्यातच सोडा बरं का ! "

" ठीक आहे. करतो सारी व्यवस्था. "

एक दोन अधिकारी लागलेच तेथून झटकले. पटकन् तीर मारून खाली पाडलेल्या पाखराची तडफड पाहून पारध्याला होणाऱ्या आनंदात आणि त्याच्या उन्मादात काहीच फरक नव्हता. फक्त प्रमाण तेवढे मोठे !

पहाटेच्या सुगंधी वाऱ्याने सृष्टीचे पांघरूण बाजूला सारले होते. ती डोळे उघडून हसत होती. तिचे आरक्त वदन फुलले होते.

रोमच्या राज्यात सूर्याने सोने शिंपडले होते. स्वतंत्र आणि स्वच्छंद पाखरे राना-डोंगरांत केव्हाच उड्डून गेली होती. पहाटेचा गजर थांबला होता. रोम शहर उठून कामास लागले होते.

क्रूर श्वापदांचे पिंजरे उघडले गेले. रात्रभराची घाण त्यात भरली होती. मासाची गाडी आली. जिकडून तिकडून आरोळ्या फुटल्या.

त्या सिंहाचा पिंजरा उघडला गेला. रक्तामांसाचे गोळे इतस्ततः पडले होते. हाडांची कांडकी माशांनी बुजबुजून गेली होती. कोंडलेला वनराज त्या पिंजऱ्यातच कोवळी किरणे अंगावर घेत इकडून तिकडे फिरत होता.

एक छिन्नविछिन्न झालेले डोके तेथेच पडले होते. रस्त्यात आल्यामुळे पुढचा पंजा मारून सिंहाने ते बाजूला फेकले व स्वतःच्या येरझारा तशाच सुरू ठेवल्या.

एका छोट्या पिंजऱ्यात सिंहाला बोलावल्यानंतर नोकर त्या मोठ्या कठड्यात शिरला. त्या रक्तामांसाच्या चिखलाकडे पाहून तो किंचित थांबला. कोपऱ्यात पडलेले शीर त्याने काठीने उलटे सुलटे केले व तो आपल्या कामास लागला.

तो मुखवटा त्या गुलामाचा होता. त्याच्या देहाच्या अन्नाने एका क्रूर श्वापदाची भूक, तहान शमली होती. त्याचा आत्मा केव्हाच निघून गेला होता.

त्या शेजारी मित्राचे प्रेत खडकाच्या उभ्या बाजूला फेकले गेले होते. त्यावर गिधाडे जमावयास सुरुवात झाली होती. त्याचेही शीर असेच कोठेतरी पडले होते !

दोघेही स्वतंत्र झाले होते. सुटले बिचारे !

पक्षी स्वतंत्रपणे भराभर जंगलाकडे जात होते.

अगदीं थवेच्या थवे, थवेच्या थवे !

१८ । १२ । ३४

२१

नवी आणि जुनी नीती*

माझ्या पुस्तकांत इतर पुस्तकांबरोबरच 'इसापनीती' पण पडली होती. तीच काढून आज मी चाळीत होतो. पाच सात गोष्टी वाचून झोत नाहीत तोच डोळ्यांवर झापड आली. दिवा बारीक करून मी पुस्तक मिटले.

ते स्वप्न उत्तर रात्रीचेच असेल. त्याशिवाय मला इतके स्पष्ट आठवणार नाही. तो स्वप्नातला म्हातारा अजून देखील माझ्या डोळ्यांसमोर दिसतो.

त्याचे घर गावाच्या एका बाजूला होते. चांगले प्रशस्त आणि मोठे. आवार अगदी मोकळे. चारी भिंती चांगल्या मजबूत असल्यामुळे त्याला कोणत्याच प्रकारची भीती नव्हती. त्याची सांपत्तिक स्थिती बऱ्यापैकी होती. पूर्वजांचे धन त्याने नीट राखण्याचा प्रयत्न केला होता. गावच्या इतर पंचायतीत तो पडत नसे.

त्याला बायका दोन. एक वयस्क – म्हणजे त्याच्यापेक्षा आठदहा वर्षांनी लहान. दुसरी तरुण – आता उतार वयात केलेली ! दोघींनाही एकमेकींशी भांडण्याचे वस्तुतः कारण नव्हते. दोघींचेही मार्ग भिन्न. दोघीही आपापल्या मार्गाशिवाय इतर पूसतपास करीत नसत.

दुपार झाली की मोठी पाटलीण अंगणात ओटीवर येऊन बसे व चार बायकांना पुराणातील गोष्टी सांगत असे. पुराणात असे आहे, अमुक हरिदासाने अमुक अमुक आख्यान लावले होते, वगैरेपासून सुरू करून ती चढत चढत सरळ मोक्षापर्यंत जाऊन येई. बिचाऱ्या शेजारणी अशिक्षित व अडाणी. त्यांना पाटलीणबाई म्हणजे 'रामायण, महाभारतच' वाटत.

पण हे महाभारत पतीच्या मात्र उपयोगी आले नाही. उतार वयात त्याचे मन दुसऱ्या तरुण बायकोकडेच झुकायचे व तिच्या सहवासात त्याला सुख वाटायचे. ज्ञान-प्रदर्शनाच्या, पोथ्यापुराणांच्या तो फारसा वाटेस जात नसे. शिवाय उतार वय झाले तरी त्याचे अर्धे केस अजून काळेच होते. त्यामुळे दोघांचे पटत नसेच असे नव्हे. आपले कामापुरते पटायचे.

त्या तरुण पत्नीची आणि गावातील एका मास्तरणीची चांगली मैत्री होती. त्यामुळे तिला 'महिला' नियमित वाचायला मिळायची. शहरातील शाळेत ती दोन वर्षे जाऊन आलेली असल्यामुळे तिच्यात एक प्रकारची श्रेष्ठ भावना आली होती. त्यातून लाडाची म्हातारपणाची बाईल ! 'मेल्या पुरुषांची' संगती तिला सदान्कदा बरी वाटत

* इसापची क्षमा मागून !

९५९५४

नसे. मोठी पाटलीण बायकांच्या घोळक्यात व्याख्यान देत बसली, की ही वर जायची आणि मग ती बरी की तिची मासिके बरी. तिला इंग्रजी चांगलेसे उमगत नसल्यामुळे ती आपली तहान मराठीवरच भागवी. 'किर्लोस्कर', 'रम्यकथा', 'पारिजात', 'सकाळ', 'शामसुंदर', 'प्रतिभा', 'महाराष्ट्रशारदा' इत्यादी सर्व आधुनिक वृत्तपत्रे आणि मासिके तिच्या खोलीत तयार असत. तिची मास्तरीण मैत्रीण तिला बरीच पुस्तके आणून देई. कधीमधी 'पुरुषार्था'चाही एखादा अंक ती चाळीत असे. नियमित नाही. तिचा 'बायकार्थ' वेगळा असल्यामुळे त्या मासिकाची तिला जरूर भासली नाही. सूर्यनमस्कार वगैरेसारखे विषय अर्थातच तिच्या कक्षेबाहेरचे होते.

असा क्रम बरेच दिवसांपासून सुरू होता. म्हातारा जोवर खंबीर होता तोवर घरचे वातावरण पूर्णपणे शांत होते – अगदी वाळूसारखे ! दगड टाकला तरी उत्तर यायचे नाही, प्रतिध्वनी उमटायचा नाही !

पण सगळे दिवस काय सारखे असतात ? आधी-व्याधी कुणाला सुटल्या आहेत ? उतारवयात त्या कुणाला जर्जर करीत नाहीत ? बिचाऱ्या म्हाताऱ्याचे वर्चस्व घरात उत्तरोत्तर कमी होत चालले. दोघींचा वरचष्मा घरात सुरू झाला.

कारभार मात्र मोठी पाटलीणच पाहात असे. धाकटीला त्याबद्दल कधी फिकीर वाटली नाही. तिच्या तारुण्याची मोहिनीच अशी काही होती, की म्हातारा तिच्यावर अगदी खूष ! तिने त्याचे मन ओळखले होते. त्याचीही निराशा होत नसे.

तिचे वाचन मात्र सुरू होतेच. म्हातारा तिच्या खर्चाकरिता कमी करीत नसे. त्यामुळे 'निर्भीड' वगैरे पत्रे देखील तिला वाचायला मिळत. निरनिराळी आधुनिक पुस्तके ती अगदी व्ही. पी. ने मागवीत असे. तिची दृष्टी फाकल्यासारखी तिला वाटे. ज्ञानाचा केवढा प्रभाव !

या सर्व गोष्टींचा परिणाम मोठ्या पाटलिणीवर फार झाला. तिला हा फुकटचा वरचष्मा सहन झाला नाही. नवऱ्याचे मन आपल्याकडेच ओढून घेण्याचा ती प्रयत्न करू लागली. तिने देवाला नवस करणे सुरू केले. तिची अंगकाठी बांधेसूद होती. तिला विशेष धावपळ जमत नसे. तरी स्वतः जातीने नवऱ्याचे काम करायची ती दक्षता बाळगू लागली. निदान तिने तसे भासविले तरी. पुराणातील गोष्टींनी ती त्याच्यावर आपली छाप पाडण्याचा प्रयत्न करू लागली. त्याचे कपडे वगैरे पूर्वीपेक्षा व्यवस्थित दिसायला लागले. पण व्यर्थ ! आपल्या तरुण बायकोला आपण सुंदर कसे दिसू याचाच तो प्रयत्न करू लागला. त्यामुळे मोठ्या पाटलिणीच्या अंगाचा तिळपापड होऊ लागला.

शेवटी तिला एक युक्ती सुचली. सर्व उपाय थकले असे तिला वाटले. अखेरचाच प्रयत्न. म्हातारा दिसतो त्यापेक्षा अधिक म्हातारा दिसावा व अखेर त्या तरुणीनेच नालायक म्हणून त्याचे नाव टाकावे अशी तिने शक्कल काढली. तरुण बायकोच्या आवडीप्रमाणे म्हातारा आता केस ठेवू लागला होता. मोठी पाटलीण त्याचे केस

रोज विंचरून देत असे व तसे करताना त्याला नीतीच्या, धर्माच्या कथा सांगून भुलविण्याचा प्रयत्न करी आणि...

...आणि हळूच त्याच्या डोक्यावरील शिल्लक असलेले काळे केस उपटून टाकी !

प्रथम प्रथम गोष्टीच्या नादात म्हातारा जरी अगदी स्वस्थ बसलेला असे तरी पुढे डोक्याची आग व्हायला लागल्यावर तो संतापून आकांडतांडव करू लागत असे. त्याच्या आवाजाने धाकटी पाटलीण बाहेर येई आणि मग काय ?...

तिच्या तोंडाचा पट्टा सुरू होई. नवऱ्याला तर ती फडाफडा बोलेच, पण वडील सवतीचेही वाभाडे काढायचे सोडीत नसे...

...आणि शेवटी सात्त्विक संतापाच्या भरात ती त्याच्या डोक्यावरील पांढरे केस उपटायला सुरुवात करी.

बिचारा म्हतारा...!

असे प्रसंग बरेचदा येत आणि म्हाताऱ्याची चांगली... !

" अरे, झोपेत हसायला काय झालं ? नीट उठून बैस बरं ! " मी डोळे उघडले, तेव्हा आई माझ्या खाटेपाशी दिवा घेऊन उभी होती !

७ । १ । ३५

२२

भेद निमाला

त्या जगाच्या डोळ्यांचीच भीती वाटायची ! खून, दरवडे, मारामाऱ्या, सर्व प्रकारची दुष्कृत्ये त्यांच्या त्या लाल तारवटलेल्या डोळ्यांत साठविलेली होती. तुरुंगाच्या शिस्तीने त्यांच्यात बेडरपणा मुरून गेला होता. निडर, आडदांड, दगडी दिलाचे कैदी ते !

त्या बॅरॅकमध्ये पाऊल टाकताच माझी छाती धडधडली. माझ्या शरीराबद्दल मला कधीही भीती वाटली नाही. त्या शरीरावर चामडी रक्ताळून सोलून जाईपर्यंत फटके बसले होते, पण त्याबद्दलही धडकी भरली नाही माझ्या मनात. उलट त्या आसुडांच्या तडाक्यांनी माझ्या हृदयाची जमीन तापून तडकून गेल्यामुळे थोड्याशा पावसानेही त्यात हिरवीगार वनस्पती उगवत असे. पण—

अधिकाऱ्यांनी माझ्या मर्मावरच हात ठेवला. राजकीय कैद्यांत अशांतता पसरविण्याच्या आरोपावरून माझी रवानगी चोर-डाकूंच्या बॅरॅक्समध्ये करण्यात आली होती.

ते वातावरण ! त्याने माझे हृदय काळवंडून गेले होते. त्या कैद्यांची ती वागणूक, तो वेशरमपणा, ती भांडणे,—भांडायला काही कारण लागत होते असेही नाही. एखाद्या कैद्याला वॉर्डरने किंचितशा मऊ शब्दांत आज्ञा केली की त्या कैद्याकडे काळेपिवळे डोळे सैतानासारखे पाहू लागत. फटक्याशिवाय रस्त्यावर येणारे लोक नव्हते ते !

मी राजकीय कैदी. माझा नेहमीचा सरळ, सीधा सवाल. आपले काम निमुटपणे करावयाचे. संध्याकाळी नियमाने प्रार्थना. वॉर्डरला माझ्यावर चिडण्याचे व मला लाथा मारण्याचे कधीच काम पडले नाही.

हे कारण कितीतरी भयंकर होते माझा द्वेष करायला. सर्व कैद्यांच्या हृदयाची दाहकता मला चटके देत होती. नाही नाही ती कुभांडे त्यांनी माझ्या अंगावर उलटविण्याचा प्रयत्न केला. त्यांचा त्रास मला असह्य वाटत होता. त्यांचा स्वभाव, त्यांच्या हालचाली – मी इतका हिचकून गेलो होतो की, परलोकातील नरकाची कल्पना यापेक्षा हिडीस असणे शक्य नाही अशी माझी खात्री झाली होती.

मला तिथून दुसरीकडे नेण्यात यावे म्हणून माझ्याने होईल तेवढी खटपट मी केली. अर्ज, विनंती सत्याग्रहीला अर्थातच वर्ज्य ! त्यामुळे तोच नरक माझ्या कपाळी आणखी एक महिना नोंदला गेला.

जानेवारीची थंडी ती ! आणि त्या वर्षी वादळी वारे आले होते म्हणे. पण आम्हांला नियमाने पाच वाजताच उठावे लागे. तिथे आमची कीव करणार तरी कोण ? आणि कीव करावी का ? दिवसभर उन्हात काम करावे लागे; त्यामुळे पुष्कळ बरे होते. पण सायंकाळी जेवणे आटोपून कोठड्यांत बंद झाल्यावर थंडीने ब्रह्मांड आठवावयाचे !

कोठडीच्या खिडक्या चांगल्या मोठ्या असून लोखंडी गजांनीच फक्त मजबूत केल्या होत्या. त्यांतून येणारा वारा कुठून कुठून थंडी आणून त्या कोठडीत साठवीत होता !

आम्हांला प्रत्येकाला देण्यात आलेली दोन घोंगडी आणि तीही कित्येकांनी– आमच्या पूर्वजांनीच म्हणा – वापरलेली; एक खाली अंथरून एक पांघरावयाचे व तेवढ्या साधनावर पोटाशी पाय घेऊन उष्णता आणावयाची. निजावयाचे ओटे थंडगार. हात लावायची सोय नाही. साठ साठ कैदी त्या कोठड्यांत राहावयाचे. त्यांच्या श्वासोच्छ्वासांनी उत्पन्न झालेली तेवढीच फक्त उष्णता. वॉर्डरची गस्त आणि त्याच्या बुटांचा आवाज हेच आमचे निद्रासंगीत !

विचारांच्या उष्णतेने माझे शरीर उष्ण राहू शकत होते; पण माझ्या कोठडीतील इतर कैद्यांना विचार तरी करता येत होता किंवा नाही कोण जाणे ! जगाच्या वाट्याला आलेली सारी मग्रूरी त्यांच्यात सामावली होती.

पण हत्तीने अंकुशाला पाहून चीत्कार करावा तसे ते रात्रभर कुडकुडायचे. थंडीने त्यांची शरीरे थरारून जात होती. कसले तरी अस्पष्ट आवाज काढीत बिचारे शरीराचा गोळा करून पडले राहात.

उरी फुटेपावेतो काम करावे लागले तरी डग न येणारे ते कैदी निसर्गाच्या एका फटकाऱ्याने हैराण झाले होते. केविलवाणे आवाज ऐकत माझी रात्र जात होती. त्या वेळी मला वारंवार वाटे, परमेश्वराने मला हृदय दिले कशाला ?

'अरे बापरे !' माझ्या शेजारच्या ओट्यावरील कैदी चीत्कारला. त्याची ती बापुडवाणी अवस्था पाहून मला राहवेना.

'काय होतंय् रे ?' मी हलक्या आवाजात विचारले.

'थंडीने मरतो हो दादा, आता !' त्याची दातखिळी वाजत होती. त्याने मला याच वेळी पहिल्यांदा 'दादा' म्हणून करुणस्वरात हाक मारली होती. एरवी माझ्याकडे पाहून मला शिव्या देण्यातच त्याचे समाधान !

'एक गोष्ट करतोस का ?' मी अनुकंपेने विचारले.

'कोणती ?'

'तू माझ्याजवळ ये. आपण आपली दोघांचीही घोंगडी पांघरून निजू. रात्रभर चांगली झोप लागेल.'

त्याच्या मनात काय विचार आले कळले नाही, पण तो थोडा वेळ गप्प राहिला. नंतर हळूच म्हणाला, 'पण उद्या शिक्षा कोण...'

'अरे, शिक्षेचं काय ! दगड फोडताना दगडांच्या तुकड्यांनी नाही का रक्त निघत ?'

'ते झालं. पण दादा माझ्याकरिता तुम्हांला' हे बोलताना त्याची माणुसकी जागी झाली होती. मी त्याची समजूत घातल्यावर एका क्षणाचाही विलंब लावला नाही त्याने. तो एकदम आला. त्या सव्वा हाताच्या ओट्यावर आम्ही दोघे एकमेकांशी घट्ट बिलगून निजलो. आमचेच अनुकरण आमच्या शेजाऱ्यांनी केले. वॉर्डरची शिवीगाळ सुरू झाली.

'दादा, तुम्हांला जी शिक्षा होईल तिच्या दुप्पट मी भोगीन बरं.' त्याच्या हृदयातील देव बोलत होता.

विभक्त राहण्याचा कायदा मोडून आम्ही एक झालो होतो. त्या वेळी आमची संस्कृती कोणती, धर्म कोणता, जातपात, विचार आचार - कशाचाही विचार आमच्या मनात डोकावला नाही. एकाच पांघरुणात आमचा श्वासोच्छ्वास मिसळत होता. शरीरे सुखावून झोपली होती; पण हृदये जागी होऊन मांसाच्या पडद्याआडून एकमेकांशी बोलत होती, आणि कसल्यातरी सुंदरशा आकृती रात्रभर डोळ्यांसमोरून झरझरत होत्या !

२।२।३५

२३

सुख

रावबहादुरांच्या पत्नी विमलाबाई दुपारी सहज बाहेर ओसरीवर येऊन बसल्या. जवळच त्यांचे मूल खेळत होते.

...त्यांच्या दाराशी एक भिकारीण केविलवाण्या स्वरात भिक्षा मागत होती. तिचे मूल तिच्या पुढ्यात गुंडाळून पडले होते.

...विमलाबाईंचे मूल रडू लागले. त्यांची मुद्रा त्रासिक झाली. लागलीच दाईला हाक मारून त्यांनी त्याला तिच्या स्वाधीन केले.

...भिकारणीचे मूल रडू लागले. तिने आपल्या मुलाला पोटाशी धरले.

...दाईने मुलाला सुंदरशा पाळण्यात मऊशा बिछान्यावर निजविले.

...भिकारणीने आपल्या मुलाला वात्सल्याने कुरवाळिले.

...मुलाला उगा करण्याच्या उद्देशाने दाई त्याला हळूहळू थोपटून झोके देऊ लागली.

...भिकारणीचा मुलगा आईच्या पोटाशी बिलगून स्तनपान करीत होता !

...विमलाबाईंचा मुलगा अजूनही रडत होता.

...भिकारणीच्या मुलाचे तोंड दुधाने फेसाळले होते.

...विमलाबाईंनी सर्व पाहिले. संतापून त्या बाईच्या अंगावर धावून गेल्या.

...भिकारीण केविलवाण्या स्वरात भिक्षा मागू लागली.

३।२।३५

२४

कुसुमची पहिली लघुकथा

" ही एवढी गोष्ट पूर्ण करून दे नारे ! "— कुसुमने माझ्या हाती एक वही दिली. मला काहीतरी strike होते, पण ते express करतां येत नाही. " तिने स्पष्टीकरण केले,

" Strike आणि Express ! मला इंग्रजी येत नाही कुसुम ! " मी उपरोधाने पाहिले.

" नंतर शिकवीन मी पाहिजे तर, बरं वेटा ! पण आधी ते वाच कसा. "

आपली लघुकथा कुणी वाचीत असले म्हणजे आपल्याला तेथे उभे राहणे कसेसेच वाटते. कुसुम जायला निघाली.

" अहो बाईसाहेब ! लाजू नका—तरी बरं, अर्धीच सोडली आहे गोष्ट !–"

" तुझी काळजी होती की मला. " ती माझ्या खुर्चीच्या पाठीवर रेलून माझ्या गळ्याला विळखा घालून उभी राहिली. मी तिची गोष्ट वाचू लागलो.....

" एक होती वाघीण "—मी दचकलो. कुसुम वाघिणीच्या गोष्टी लिहिते ? आणि या वयात ? तिच्या ओठावरला कोवळा फेसाळपणा जाऊन ती आता कमळासारखी मोहक दिसू लागली होती. पिकून फुटून गेलेल्या डाळिंबात आणि तिच्या उमललेल्या गुलाबी ओठांतून किंचित् दिसणाऱ्या कुंदकळ्यांत काहीच फरक नव्हता. आणि ही म्हणे वाघिणीच्या गोष्टी लिहिणार —!

" अग पोरी ! ही काय बुद्धी सुचलीय तुला ? हे वाघिणीचे दूध कशाला आणतेस या घरात ? तुझ्यासारख्या पोरीनं या वयात चंद्राच्या, चांदण्याच्या नि वसंताच्या....."

" बापू ! पुरे ना ! तूच सांगितली होतीस मला ही गोष्ट, मग आता का ? नाही का वाचून द्यायची तेवढी तुझ्या मनात ? "–ती शांतपणे म्हणाली. ती चिडली असती तर मलाही तिला चिडवावयास हुरूप वाटला असता.

मी सांगितलेली गोष्ट असलीच तर ती पाच-सहा वर्षांपूर्वीची – म्हणजे ती ज्या वेळी मी गोष्ट सांगितल्याशिवाय माझ्या जवळून उठत नसे तेव्हाची – आणि या गोष्टीवरून ती काय लिहिणार याची मला कल्पना होईना. मी पुढे वाचू लागलो.

" एक होती वाघीण. ती जरी क्रूर होती तरी आपल्या पिलांना फार जपत असे. तिची आपल्या दोनीही बच्च्यांवर सारखीच माया होती.

वाघ आणि वाघीण दोघेही शिकारीला गेली म्हणजे ही दोनीही पिले त्या गुहेत एकमेकांना चिटकून पडून राहत. त्या अंधारात त्यांच्या डोळ्यांचा इवलासा प्रकाश ठिणगीसारखा दिसत असे. अंगावरचे काळे पट्टेही नीटसे भरले नव्हते. त्यांचे अंग मऊ-मऊ आणि सोन्यासारखे पिवळे जर्द होते. ती इतकी लोभस दिसत की त्यांना उचलून पोटाशी धरावेसे वाटे.

पहाटे वाघ आणि वाघीण परत येत असत. पाणी पिऊन पोट भरल्यामुळे ती दोघे स्वस्थ डोळे मिटून पडली असली म्हणजे ते बच्चे त्यांच्या अंगांवर खेळत असत. त्यांच्या त्या नाजुकशा इकडून तिकडे उड्या सुरू झाल्या की वाघ त्यांना आपल्या पंज्याने कुरवाळीत असे, पण नखे अगदी आत ओढलेली – असलाच तर दूर्वांकुरांसारखा स्पर्श असेल त्यांचा फार तर ! त्या क्रूर, हिंस्र आणि रानटी श्वापदांचे ते

सांसारिक जीवन कितीतरी सुखाचे होते. त्यांच्या जगात ज्या गोष्टी येत त्यांपैकी त्यांना काहीही कमी नव्हते !

पण त्यांचे हे सुखाचे दिवस फार लवकर संपले. आपल्याप्रमाणेच त्यांनाही दैव असावे. ती पिले आता थोडी-थोडी हिंड्र-फिरू लागली होती. आमची छोटी विमल चालता येऊ लागल्यापासून जशी सरळ सडकेपर्यंत जाऊन येते, तशीच ती पिले क्वचित् आपल्या गुहेच्या बाहेर येऊनही बागडत असत.

एक दिवस त्या जंगलात शिकारी आले. वाघ आणि वाघीण रात्री भटकावयास बाहेर पडली होती. वाघाला शिकार गवसल्याबरोबर तो तिच्या मागे धावू लागला; तोच बंदुकीचा आवाज होऊन त्याच्या पोटात गोळी घुसली. पुनः तो संतापून उसळतो न उसळतो तोच दुसऱ्या गोळीने त्याचा प्राण घेतला.

वाघीण चिडून गेली; आणि सूडाच्या भराने तिने आरोळी ठोकली. पण करणार काय ? तिच्याही मागच्या पायाला एक गोळी चाटून गेल्याबरोबर तिने पळ काढला.

—आणि गुहेत येऊन पाहते तो काय ! तेथे एकच बच्चा ! बाहेर येऊन खेळत असलेल्या पिलाला शिकाऱ्यांनी पकडले असावे व गुहेत जाण्याची त्यांची हिंमत न झाल्यामुळे आतील बच्चा राहिला असावा.

हा सर्व प्रकार पाहून वाघीण अतिशय चिडली व तिने इतकी भयंकर आरोळी ठोकली की त्या अरण्यातील सारी चराचर सृष्टी भेदरून गेली. पक्षी तर झाडांवर जागे होऊन ओरडू लागले. वाघिणीने त्या टापूत थैमान घातले, पण तिचा मुलगा सापडला नाही.....

आता मातेचे सारे प्रेम एकाच मुलावर. त्याच्या भोवती तिचा सारा जीव गोळा व्हावयाचा. ती त्याची काळजी घेई. पण त्याच्यावर तिने फाजील प्रेम करणे सोडून दिले. त्याला दूध न पाजता कोवळ्या वयात तिने शिकार शिकविली आणि रात्री देखील ती त्याला स्वतःबरोबर नेत असे. वाघाचाच बच्चा तो ! कितीतरी लवकर तयार झाला. थोड्याच दिवसांत तो स्वतःची शिकार स्वतःच मारून खाऊ लागला.

ऐन दुपारी गुहेच्या अंधाऱ्या कोपऱ्यात स्वस्थ पडलेली वाघीण आपल्या मुलाकडे मोठ्या अभिमानाने पाही. तिला आपल्याप्रमाणेच विचारशक्ती असावी ! तिला काय विचार सुचत नकळे; पण ती त्या पिलाला पंज्याने जवळ ओढून त्याच्यावर नजर रोखून बसे. त्याच्या तोंडाजवळ आपले तोंड नेई. आणि असे रोज रोज ! जनावरांना बोलावयाचे असल्यास ती अशीच बसतात असे मी कुठेसे वाचले होते. ती वाघीणही त्याच्याशी बोलत असावी. जणू ती त्याला सांगत होती–'बाळ ! तुला चांगलं पराक्रमी व्हायला पाहिजे. तुझ्या बापाचा वध करणारा शिकारी अजूनही आपल्या मागावर आहे. तू त्याचा सूड घेतल्याशिवाय मला समाधान मिळायचं नाही. आपल्या जातीची आणि रक्ताची आठवण विसरू नकोस.–'

" नंतर शिकवीन मी पाहिजे तर, बरं बेटा ! पण आधी ते वाच कसा. "

आपली लघुकथा कुणी वाचीत असले म्हणजे आपल्याला तेथे उभे राहणे कसेसेच वाटते. कुसुम जायला निघाली.

" अहो बाईसाहेब ! लाजू नका—तरी बरं, अर्धीच सोडली आहे गोष्ट !–"

" तुझी काळजी होती की मला. " ती माझ्या खुर्चीच्या पाठीवर रेलून माझ्या गळ्याला विळखा घालून उभी राहिली. मी तिची गोष्ट वाचू लागलो.....

" एक होती वाघीण "—मी दचकलो. कुसुम वाघिणीच्या गोष्टी लिहिते ? आणि या वयात ? तिच्या ओठावरला कोवळा फेसाळपणा जाऊन ती आता कमळासारखी मोहक दिसू लागली होती. पिकून फुटून गेलेल्या डाळिंबात आणि तिच्या उमललेल्या गुलाबी ओठांतून किंचित् दिसणाऱ्या कुंदकळ्यांत काहीच फरक नव्हता. आणि ही म्हणे वाघिणीच्या गोष्टी लिहिणार —!

" अग पोरी ! ही काय बुद्धी सुचलीय तुला ? हे वाघिणीचे दूध कशाला आणतेस या घरात ? तुझ्यासारख्या पोरीनं या वयात चंद्राच्या, चांदण्याच्या नि वसंताच्या....."

" बापू ! पुरे ना ! तूच सांगितली होतीस मला ही गोष्ट, मग आता का ? नाही का वाचून द्यायची तेवढी तुझ्या मनात ? "–ती शांतपणे म्हणाली. ती चिडली असती तर मलाही तिला चिडवावयास हुरूप वाटला असता.

मी सांगितलेली गोष्ट असलीच तर ती पाच-सहा वर्षांपूर्वीची – म्हणजे ती ज्या वेळी मी गोष्ट सांगितल्याशिवाय माझ्या जवळून उठत नसे तेव्हाची – आणि या गोष्टीवरून ती काय लिहिणार याची मला कल्पना होईना. मी पुढे वाचू लागलो.

" एक होती वाघीण. ती जरी क्रूर होती तरी आपल्या पिलांना फार जपत असे. तिची आपल्या दोनीही बच्च्यांवर सारखीच माया होती.

वाघ आणि वाघीण दोघेही शिकारीला गेली म्हणजे ही दोनीही पिले त्या गुहेत एकमेकांना चिटकून पडून राहत. त्या अंधारात त्यांच्या डोळ्यांचा इवलासा प्रकाश ठिणगीसारखा दिसत असे. अंगावरचे काळे पट्टेही नीटसे भरले नव्हते. त्यांचे अंग मऊ-मऊ आणि सोन्यासारखे पिवळे जर्द होते. ती इतकी लोभस दिसत की त्यांना उचलून पोटाशी धरावेसे वाटे.

पहाटे वाघ आणि वाघीण परत येत असत. पाणी पिऊन पोट भरल्यामुळे ती दोघे स्वस्थ डोळे मिटून पडली असली म्हणजे ते बच्चे त्यांच्या अंगांवर खेळत असत. त्यांच्या त्या नाजुकशा इकडून तिकडे उड्या सुरू झाल्या की वाघ त्यांना आपल्या पंज्याने कुरवाळीत असे, पण नखे अगदी आत ओढलेली – असलाच तर दूर्वाकुरांसारखा स्पर्श असेल त्यांचा फार तर ! त्या क्रूर, हिंस्र आणि रानटी श्वापदांचे ते

सांसारिक जीवन कितीतरी सुखाचे होते. त्यांच्या जगात ज्या गोष्टी येत त्यांपैकी त्यांना काहीही कमी नव्हते !

पण त्यांचे हे सुखाचे दिवस फार लवकर संपले. आपल्याप्रमाणेच त्यांनाही दैव असावे. ती पिले आता थोडी थोडी हिंडू-फिरू लागली होती. आमची छोटी विमल चालता येऊ लागल्यापासून जशी सरळ सडकेपर्यंत जाऊन येते, तशीच ती पिले क्वचित् आपल्या गुहेच्या वाहेर येऊनही बागडत असत.

एक दिवस त्या जंगलात शिकारी आले. वाघ आणि वाघीण रात्री भटकावयास बाहेर पडली होती. वाघाला शिकार गवसल्याबरोबर तो तिच्या मागे धावू लागला; तोच बंदुकीचा आवाज होऊन त्याच्या पोटात गोळी घुसली. पुनः तो संतापून उसळतो न उसळतो तोच दुसऱ्या गोळीने त्याचा प्राण घेतला.

वाघीण चिडून गेली; आणि सूडाच्या भराने तिने आरोळी ठोकली. पण करणार काय ? तिच्याही मागच्या पायाला एक गोळी चाटून गेल्याबरोबर तिने पळ काढला.

—आणि गुहेत येऊन पाहते तो काय ! तेथे एकच बच्चा ! बाहेर येऊन खेळत असलेल्या पिलाला शिकाऱ्यांनी पकडले असावे व गुहेत जाण्याची त्यांची हिंमत न झाल्यामुळे आतील बच्चा राहिला असावा.

हा सर्व प्रकार पाहून वाघीण अतिशय चिडली व तिने इतकी भयंकर आरोळी ठोकली की त्या अरण्यातील सारी चराचर सृष्टी भेदरून गेली. पक्षी तर झाडांवर जागे होऊन ओरडू लागले. वाघिणीने त्या टापूत थैमान घातले, पण तिचा मुलगा सापडला नाही.....

आता मातेचे सारे प्रेम एकाच मुलावर. त्याच्या भोवती तिचा सारा जीव गोळा व्हावयाचा. ती त्याची काळजी घेई. पण त्याच्यावर तिने फाजील प्रेम करणे सोडून दिले. त्याला दूध न पाजता कोवळ्या वयात तिने शिकार शिकविली आणि रात्री देखील ती त्याला स्वतःबरोबर नेत असे. वाघाचाच बच्चा तो ! कितीतरी लवकर तयार झाला. थोड्याच दिवसांत तो स्वतःची शिकार स्वतःच मारून खाऊ लागला.

ऐन दुपारी गुहेच्या अंधाऱ्या कोपऱ्यात स्वस्थ पडलेली वाघीण आपल्या मुलाकडे मोठ्या अभिमानाने पाही. तिला आपल्याप्रमाणेच विचारशक्ती असावी ! तिला काय विचार सुचत नकळे; पण ती त्या पिलाला पंज्याने जवळ ओढून त्याच्यावर नजर रोखून बसे. त्याच्या तोंडाजवळ आपले तोंड नेई. आणि असे रोज रोज ! जनावरांना बोलावयाचे असल्यास ती अशीच बसतात असे मी कुठेसे वाचले होते. ती वाघीणही त्याच्याशी बोलत असावी. जणू ती त्याला सांगत होती–'बाळ ! तुला चांगलं पराक्रमी व्हायला पाहिजे. तुझ्या बापाचा वध करणारा शिकारी अजूनही आपल्या मागावर आहे. तू त्याचा सूड घेतल्याशिवाय मला समाधान मिळायचं नाही. आपल्या जातीची आणि रक्ताची आठवण विसरू नकोस.–'

वाघिणीने तोंड फिरविल्यावर तो बावचळल्यासारखे करून गुरगुरू लागे. त्याला तिचे बोलणे समजलेच जणू !"...

इथे कुसुमची अर्धी गोष्ट संपली. ती पूर्ण करण्याचे काम माझे होते. काय असेल ते असो, पण वाचून झाल्यावर मी कुसुमकडे अभिमानाने पाहिले. तिच्यामोवती माझ्या काही विशिष्ट आशांचे वलय उत्पन्न झाल्याचा मला भास झाला. आणि तिने देखील ओल्या नजरेने मला त्याची जाणीव करून दिली.

"मग देतोस का तेवढी पूर्ण करून ?" त्या स्निग्ध शांततेत तिचे ते शब्द पिंगळ्याच्या चिलबिलाटासारखे वाटले मला !

"खरंच, तुझ्याइतकं चांगलं लिहिता यायचं नाही मला कुसुम ! पण तुझ्या इच्छेप्रमाणे मी लिहून देतो तुला." आणि मी लिहावयास सुरुवातही केली.—

"शिकाऱ्याच्या घरी लोखंडी पिंजऱ्यात एक वाघाचा बच्चा गजांना पाठ टेकून पडला होता. सूर्याचा प्रकाश सहन न झाल्यामुळे त्याने डोळे किलकिले केले होते. आई नसलेल्या अर्भकासारखी त्याची स्थिती झाली होती. दिवसांमासी तो वाढत होता, पण पंज्याचा उपयोग अंग खाजविण्यापेक्षा दुसरा काही आहे याची त्याला फारशी जाणीव नसावी; आणि तसा त्याच्या अंगात उत्साहही नव्हता.

शिकाऱ्याची बायको एका भांड्यात मांस घेऊन तिथे आली. शिकारी अंगणात उभा होता. एक तुकडा उचलून त्या पिंजऱ्यात ती टाकणार तोच शिकारी ओरडून म्हणाला-'अग ! तो तुकडा रक्तात माखला आहे. कितीतरी रक्त आहे त्याला अजून. पुसून आण सारं ते मांस. एकदा रक्त मिळालं की उद्या तुझ्या व माझ्या नरडीचा घोट घ्यायला कमी करावयाचा नाही तो. त्याच्या जातीची आठवण होऊ देऊ नकोस त्याला. त्याच्यावर पैसे मिळवायचे आहेत-'

नवऱ्याच्या सांगण्याप्रमाणे ते मांस घेऊन ती आत गेली. इतक्यात त्याला कसलीशी आठवण होऊन तोही आत गेला. बाहेर आला तेव्हा नुकताच करून आणलेला लाकडी फुटबॉल होता त्याच्या हातात. त्याने कुलूप उघडून तो पिंजऱ्यात टाकला. आणि त्या वाघाला खेळ शिकवावयास सुरुवात केली.

—रक्ताची जाणीव आणि जातीची आठवण असलेला जंगलाचा राजपुत्र वनचरांशी खेळ खेळून त्यांचा फडशा पाडीत होता व इकडे त्याचाच भाऊ चेंडूला आपल्या पंज्याने जवळ ओढीत होता .....किती अंतर ! किती फरक ! !

काही दिवसांनंतरची गोष्ट. शिकारी अजूनही त्या बच्च्याच्या मागे होताच. दिवसेंदिवस त्याला मारणे जड होऊ लागले होते. एकदा दोघांची अगदी समोरासमोर गाठ पडली. आपल्या कलेत निष्णात असलेल्या शिकाऱ्याने एकदम गोळी झाडली; पण दुर्दैवाने नेम चुकल्यामुळे वाघाने त्याच्यावर झडप घालून त्याच्या नरडीचा घोट घेतला.

त्या शिकाऱ्याची बायको एकटीच घरी होती. तिची सर्वच बाजूंनी विचित्र परिस्थिती झाली. शेवटी दुपारची भ्रांत पडू लागल्यावर तिने तो पिंजरा वाघासहित विकून टाकला व आलेल्या पैशांवर ती आपले दिवस काढू लागली.

एक भाऊ ! आणि दुसरा भाऊ ! ''

मी टाक खाली ठेवला न ठेवला तोच कुसुमने माझ्यापुढचे कागद ओढून घेतले. टपलेलीच होती ती माझी गोष्ट पुरी केव्हा होते हे पाहत !

१०।२।३५

२५

मातीची भांडी

गोंडाची जात ती ! तिचे नाव काशी आणि तिच्या आईचे नाव लक्ष्मी. त्यांचा सर्व व्यवहार त्यांच्या गोंडी भाषेतच चाले. क्वचित् त्यांना मराठी किंवा हिंदीही बोलावे लागे आणि ते काम चारपाच भाषांचे मिश्रण करून त्या करून टाकीत असत.

दिवसातून एकदा तरी त्यांना शेजारच्या गावात जावे लागे. शिवारात कष्टाची किंमत असली तरी त्याचा मोबदला गावातच मिळतो. त्या दोघीही जंगलातील वस्तू गोळा करून गावात विकीत असत. कुठे एखादवेळी मधाचे पोळे सापडे; तर कधी एखाद्या पोपट हाती येई; कधी सशाचे पांढरे गुबगुबीत पिलू त्या घेऊन जात, तर केव्हा केव्हा तित्तुरच विकावे लागे. पाचसात पैसे हाती येतील त्याचे अधोली तीनशेर जोंधळे घेऊन त्या घरी येत असत.

पोट दोघींचेच, पण त्याकरिता त्यांना दिवसभर शिवशिवारात व दरीजंगलात हिंडावे लागे. जगात एका चंद्रमोळी खोपट्याशिवाय त्यांच्या मालकीचे असे काहीच नव्हते; ना जमिनीची एक चिरोटी की एक फुटकी कवडी. चारदोन पैसे आले की त्यातच आदले दिवशीचे एकदोन टाकून दिवस परतवावा लागे—

—पण त्यांचा जीवनक्रम त्यांच्या जातीच्या मानाने सुखाचा चालला होता. संध्याकाळ झाली की लक्ष्मीच्या झाडल्यासारवलेल्या अंगणात चारदोन गोंड जमत, तेव्हा एकंदर परिस्थितीचे आकलन होत असे. एका हाताने चिलमीवर टेंभुर्णीचा पाचोळा ठेवीत आणि दुसऱ्याने चकमक झाडीत एखादा वयरक तिला म्हणे—" माय, सुकानं साडितिन्ता। भागवान हाय " (लक्ष्मी, सुखाची भाकर खातेस बाई, भाग्यवान् आहेस). स्वतःच्या तुलनेने पाहत असे बिचारा तो. चार पोरे देवाने कंबरेला बांधली,

त्यांच्या ओझ्याने त्याला फरफटत चालावे लागे. पायात काटा बोचला तर धडपणे काढता येत नसे, मग विसावा घेण्याचे दूरच !—

लक्ष्मीची झोपडी होती खुटुमुटूच, पण कमालीची स्वच्छ होती. शेणाकरिता पैसे खर्च करावे लागत नाहीत व परमेश्वर गरिबांना जे हात देतो ते कष्टाकरिताच. सकाळी कमाविलेले संध्याकाळी संपून जात असल्यामुळे पसारा देखील घरात नव्हता.

पंधरा-सोळाच्या आसपास असलेली तिची मुलगी काशी अगदी पहिल्या नव्हाळीने फळास आलेल्या उंबरीच्या झाडासारखी पिवळी आणि रसरशीत दिसत होती. उन्हातान्हात व काट्यागोट्यात हिंडताना तिचे तोंड गेंदासारखे गरगरून येई व त्या वेळी ती उंबराच्या फळासारखी लालसुरंग भासे. तिचा कमरेपर्यंतचा खालचा भाग गोंदलेला होता. गोंदणे ही त्यांच्या धार्मिक समजुतीची बाब. गोंदल्याशिवाय त्यांच्या जातीत लग्नाला परवानगी नाही. काशी किंचित् दोनचार वर्षांची झाल्या-बरोबरच हा विधी करण्यात आला होता. त्यावेळी एकदोन कुरूप बाया एकत्र जमल्या. आणि काशीला पालथी घालून तोंडाने 'कुचकुच' असे विचित्र शब्द उच्चारीत व खूप मोठ्याने गाणी म्हणत त्यांनी तिच्या कमरेखालचा भाग सुयांनी टोचून काढला. त्या रंगीबेरंगी नक्षीकामाने काशी त्यांच्या दृष्टीने अधिक सुंदर दिसू लागली होती. काशीचा पोटऱ्यांपर्यंतचा भाग गोंदलेला असल्यामुळे तितुराच्या पंखासारखा चित्र-विचित्र दिसे; पण त्या गोंदण्याच्या विधीची आठवण झाली म्हणजे ते सारे भयंकर वाटे.

जंगलात जाऊन मोळी आणण्याचे काम खरेच कठीण असते. वरवर पाहत राहून हिरव्या झाडाची वाळलेली फांदी तोडावयाची, कुठे काटक्याकुटक्या गोळा करावयाच्या व मोळी बांधून आणावयाची, यातच काशीचा दिवस मोडत असे. शिवाय लक्ष्मी आता थकलेली असल्यामुळे दोघींचेही काम तीच करी.

दुसरे दिवशी इतर गोंडिणीबरोबर काशीही गावात मोळी घेऊन जाई. त्यावेळी लोक तिच्या जांभळासारख्या टपोर डोळ्यांकडे डोळे मोडून पाहत असत. रस्त्याने जाणाऱ्या त्या बायकांना मोळीचा भाव विचारतानाही अश्लील कोट्या करून दात काढावयास ते कमी करीत नसत. गरिबांकडे कसेही पाहण्याचा व त्यांच्याशी कसेही वागण्याचा लोकांना हक्कच असतो ! उलटपक्षी रोजरोज मुडदे पाहणाऱ्या डोंब्राला त्यात विलक्षण असे काही वाटत नाही !

चारदोन गोंडिणी एकत्र असल्यावर त्यांच्या वाटेस जाणे म्हणजे मारक्या म्हशींना चिडविणे होय. परंतु हे खरे असले तरी मोळी विकत घेणाऱ्यांच्या घरी त्यांना बिचाऱ्यांना एकेकटेच जाणे भाग पडे. कुठे एखाद्या बाईला जास्त उशीर लागला की दुसऱ्या बाया लागलीच समजत की तिच्या 'बटव्यां'त मोळीच्या किंमतीपेक्षा जास्त पैसे आहेत. आणि ह्या गोष्टीचे त्यांच्यापैकी कुणालाही कधी आश्चर्य वाटले नाही. असा प्रसंग प्रत्येकीवर बहुधा कधीतरी येत असेच. त्यातून ज्या सुटल्याबचावल्या

त्या भाग्यवान् आणि बाकीच्या बिचाऱ्या...!! पण त्यांना "बिचाऱ्या" असे म्हणणेच मुळी चूक ! आणि दुसरे असे की, पैशाचा लोभ कुणाला सुटला आहे ? आपल्या मुलाला रंगीबेरंगी आंगड्याटोपऱ्यात पाहण्याची त्यांना इच्छा होत नसेल का ? त्या एकमेकींना समजून असत, व त्यामुळे ह्या गोष्टी त्यांच्यापलीकडे फारशा पसरत नसत.

काशीचा निका ती तेरा चवदा वर्षांची असताना ठरला होता. पण तिचा नवरा लग्न व्हावयाचे अगोदरच झाडावरून पडून मेल्यामुळे ते तितकेच राहिले. मध्यंतरी बापाला वाघाची शिकार भोवली व तो देखील दगावला. घरचा आसरा तर गेलाच, पण मर्तिकाचे चार दोन पैसे देणे झाले होते, ते देताना काशीच्या लग्नाचा प्रश्न लांबला.

काशी या बाबतीत काय बोलणार ! दिवसभर काम करून थकल्यावर रात्री झाडलेल्या जमिनीवर एकदा पडली की तिला दिवस निघत असे. शिवाय तिच्यात एक प्रकारची उदासीनता बाणली होती. दिसावयाला ती भरलेली व लवचिक दिसे, पण असे दिसणेही गरिबीत देणगी नसून एक आपत्तीच असते. या सौंदर्यामुळे तिच्याबद्दलची इतर बायकांची सहानुभूती नाहीशी झाली होती. आणि लोकांच्या त्रासाला गरिबीमुळे आळा घालणे अशक्य झाले होते. ती बिचारी पाण्यात राहूनही इतर मासळ्यांची वैरीण झाली होती.

एकदा काशी एकटीच मोळी विकून मुक्यामुक्याने घरी आली. तिची चर्या करपलेली दिसत होती व तिचे सर्व अंग मोडल्यासारखे होऊन पासोळ्या ढिल्या पडल्या होत्या. घरी येऊन पोचते न पोचते तोच तिच्या मागोमाग बायका आल्या; व लक्ष्मीला बातमी कळली. काशी मोळी पोचवायला गेली होती. त्या घरात किती लोकांशी तिची गाठ पडली हे मात्र काशीलाच बिचारीला माहीत. पण तिचे ऐकतो कोण त्या वेळी..... ?

काशी सोळा वर्षांची होती.

लक्ष्मीला कळत नव्हते असे नाही किंवा असा प्रसंग गरिबांना नवखा नसतो हे तिला माहीत नव्हते असेही पण नव्हे. परंतु या वेळी तिचीच चवली खोटी झाली. तिने आज गावात न जाता काशीला एकटे पाठवावयाची चूक केली होती. इतरांसमोर ती काशीला नाही नाही ते बोलली. तिलाही राग आला होता. पण बायका जाताच ती शांत झाली. तिने काशीकडे पाहिले. रानबोरासारखी टपोर पोरगी आज सुकलेली पाहून तिला भडभडून आले व "काशी, मातीचं भांडं दुसऱ्याला कसं गवसू दिलंस बया, माणसांचं काय ! तांब्याचं भांडं नेहमींच खणखण आवाज देतं– त्याला दोष नाही. पुनः आपली जात पडली ही अशी... " काशीने आईच्या कुशीत मान खुपसली व डोळे मिटून ती स्वस्थ पडली. मधून मधून लक्ष्मीच्या बाहूचा आतला भाग ओलाचिंब होत होता.

लक्ष्मीला जी मूळ भीती पडली होती ती जातीबाहेर पडण्याची; आणि ती खरी होती. आज साऱ्या जातीत ही गोष्ट कळणार. त्यातल्या त्यात चारदोन जणांनी आपल्या मुलाकरिता काशीबद्दल मागणी घातली होती ती तिच्या बापाने नाकारली होती. मग काय, त्यांना एकप्रकारे आनंदच झाला ह्या गोष्टीने !

बिचारी लक्ष्मी शेवटी जातपंचाच्या हातापाया पडली आणि काशीला शुद्ध करून घ्यावयाची तिने गळ घातली. त्यांना आपला अधिकार गाजवावयास मिळाल्यामुळे त्यांनी दुसरे दिवशी काशीला त्यांच्या रिवाजाप्रमाणे शुद्ध करून घेण्याचे कबूल केले.

इकडे काशी बापुडवाणी होऊन झोपडीत पडली होती. आणि आश्चर्य हे की, इतर मोळीवाल्या बायकाही तिला घालून पाडून बोलत होत्या. जणू काही ह्यांच्या अंगी ह्यापैकी काहीच नाही ! लक्ष्मी झोपडीत येताच तिने शुद्धीची हकीकत सांगितली. त्याबरोबर काशीचे अंग शहारून आले आणि ती भयभीत होऊन भिरभिर पाहू लागली ! —

—साऱ्या जणी सहीसलामत सुटतात नि आपल्यावरच मात्र हा प्रसंग यावा याचाच तिला अचंबा वाटला. दैवावर हात ठेवण्याची तिला जन्मापासून सवय नसल्यामुळे तिला या सर्व प्रकाराची चीड आली. परंतु उपाय— ?

दुसरे दिवशी सकाळी काशीची आई तिला घेऊन नदीवर गेली. रस्त्यात तिने काशीला पुष्कळ धीर देण्याचा प्रयत्न केला, पण काशी एक शब्द बोलली नाही. ती संथपणे चालली होती. आली तशीच ती नदीच्या खडकावर उभी राहिली. अजून सूर्योदय झाला नव्हता. काशीची नजर नदीच्या पाण्यावर खिळली होती. पण तेवढ्या अवधीत नदीने कितीतरी पाणी वाहून नेले तरी काशीला कळले नाहीं. ती नुसती पाहत राहिली !

थोड्या वेळाने जातपंच एका न्हाव्याला घेऊन तिथे आले. नंतर शिंदीच्या पानोळ्यांची एक झोपडी करण्यात येऊन भोवतीं काटक्याकुटक्या गोळा करण्यात आल्या.

पंधरासोळा वर्षांची काशी अजूनही ह्या प्रकाराकडे पाठ करून खडकावर उभी होती. तिला त्यांनी नेसते वस्त्र सोडून पाण्यात उतरण्यास सांगितले. उतरली बापडी कशीबशी ! गळाभर पाण्यात गेल्यावर सूर्याकडे नजर करून तिला त्यांनी खूप बुचकळ्या खावयास सांगितल्या. चार-पाचदा बुडल्यावर ती भांबावून जाऊन किंचित् थांबत असे. ती थांबली न थांबली की लागलीच ते लोक तिला नाही नाही ते बोलत-" रन रोन बाडी सोडिति तिन्दाले पुट्टिता चोको चोको ! बाहुनकी तेनि आहुन सुदरकीन् " (गेलीस कशाला दुसऱ्याच्या घरात ? चांगलं सुख मिळालं, भोग आता जे केलं ते—) "

—टोचून टोचून त्यांनी तिची जखम सडवून टाकण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष प्रकार घडला त्याच्याही पुढे ते गेले. त्यांच्या रूढीतच सांगितले होते ते. अश्लील

आणि अभद्र बोलून पतितेची मानहानी केल्याशिवाय तिची शुद्धीच होत नाही ही त्यांची प्रामाणिक समजूत !

बराच वेळ पाण्यात बुडवून काढल्यावर तिला एक लहानसे फडके नेसावयास देऊन बाहेर बोलाविण्यात आले, व ती त्या झोपडीत जाऊन बसली. तिने कुणाकडेही पाहिले नाही. लक्ष्मीकडे पाहण्याचे दूरच, पण ती ज्या बाजूला उभी होती तिकडेही नजर टाकण्याचा तिला धीर झाला नाही. तिच्यात एक प्रकारची अशरणता बाणली होती.

दोन्हीही गुडघ्यांवर दंडाची घडी घालून तिने त्यात आपली मान खुपसली, व जगावरचे आपले लक्ष काढून घेतले.

नंतर ती झोपडी त्यांनी पेटवून दिली. आत काशी बसली होती. बाहेरच्या काटक्याकुटक्याही धडधडून पेटल्या. कुंभाराच्या भट्टीसारखा धूरच धूर झाला सगळीकडे !

काशी आतमध्ये चांगली होरपळून निघाल्यावर तिच्या आईने तिला झोपडी-बाहेर ओढले. न्हावी बाहेर तयारच होता. त्याने पाच रुपये घेऊन तिच्या समोरच्या केसांची वट घेटली व काशी शुद्ध झाली.

पण या वेळी मात्र ती शुद्धीत नसावी. शिंदीच्या जळत्या पानोळ्या तिच्या पाठी-वर पडून पाठ सोलून निघाली होती व बराच भाग भाजला होता.

—मातीचे भांडे एकदा विटाळले की त्यालाही असेच शुद्ध करून घेतात अग्नीतून— !

तिसरे दिवशी काशी नेहमीप्रमाणे जंगलात गेली व तिने मोळी बांधून आणली. रात्री आईच्या कुशीत दडून ती सुखावून झोपली. पंधरा वर्षांत तिने बरेच जग पाहिले होते, त्यामुळे ती थकली होती जणू !

—पहाटे मोळी डोक्यावर घेऊन ती एकटीच गावात गेली. व जी गेली ती परत आलीच नाही !

बापुडी लक्ष्मी ! तिने काशीकरिता भाकर करून ठेविली होती. – उन्हातान्हातून थकलेली काशी आता येईल. मग येईल; पाखरासारखी तडफड चालली होती तिची !

—जग कामाला लागले. कुंभाराने आपली भट्टी उकलली, व नव्या कोऱ्या मडक्यांचा बाजार मांडला. जगाचे व्यवहार सुरू झाले.....

३०।४।३५

२६

जीवनज्योत

विश्राम घरी जाऊन पोचला तेव्हा त्याला विठी पाटमोरी दिसली. ती घाई-घाईने हिरव्या मिरच्यांचा ठेचा तयार करीत होती. तिचा चेहरा घामाने डवरून आलेला होता आणि तोंडावर चुलीतल्या विस्तवाचा प्रकाश पडल्यामुळे ते सोन्या-सारखे चमकत होते. केसांवरून ठिबकणाऱ्या घर्मबिंदूंत मोत्यांची तकाकी खेळत होती.

विश्राम तिच्याकडे पाहतच राहिला. त्याच्या मनातील खिन्न विचार क्षणभर नाहीसे झाले. विठीच्या प्रत्येक हालचालीकडे त्याचे लक्ष होते. घाईघाईने तिने कपाळाचा घाम चोळीच्या बाहीला पुसला व खाली पडलेला पदर दातांनी धरून वर केला. तिचे दोन्ही हात चटणीने भरले होते.

विश्रामला मौज वाटली. परंतु तिच्या पदराकडे त्याची नजर जाताच पुनः तो उदास झाला. दिवसभर हाडे भरडूनही विठीच्या पदराला सतरा गाठी आहेतच. त्याने एक उसासा टाकला; त्याबरोबर क्षणभर जाणवलेली सुखाची संवेदना बाहेर निघून गेली, आणि हृदयाची रिकामी जागा घराच्या व्यापाने भरून निघाली, गरिबांना हे रोजचेच असते !

'विठे, उद्यासाठी भाकर बांधून ठेव–' विठीने मागे वळून पाहिले व चटकन तोंडावरचा घाम पुसला, तिच्या मुद्रेत प्रश्न उभा होता.

'उद्या सुकीर निघाल्याबरोबर मालकाची चिट्ठी घेऊन चिंचखेडला जायचं आहे.–'

'चिंचखेड ?–' एवढेच शब्द उच्चारून ती चूप बसली. जणू रस्त्यात लागणाऱ्या जंगलाची कल्पना येऊनच ती भेदरली होती !—'जरा दिवस निघू दिला तर नाही का चालणार ? रस्ता बरा नाही म्हणून —'

'विठे, दुसऱ्याची तावेदारी — कसलं बरं नि वाईट ? पोट आहे आपल्याला, झालं—'

विठीचा चेहरा उतरलेला पाहताच विश्राम तिला धीर देण्याच्या स्वरात म्हणाला—'देव आपला पाठीराखा आहे. तू अशी घाबरतेस का ? ह्या जन्मी देवावर अवलंबून राहा, पुढचे दिवस सुखाचे उगवतील—'

विश्रामच्या वाक्यात ओलावा होता–स्निग्धपणा होता, पण तो अश्रूंचा ! दयाळू देवाने गरिबांकरिता स्वतःसारखीच दुसरी भासमय पण बलवती शक्ती निर्माण केली आहे—आशा !

'जायचं आहे ना ?' पहाटे विठीने विश्रामच्या दंडावर हात ठेवला. त्याने हसत डोळे उघडले व तो उठून बसला.

'तुला झोप आली नाही वाटतं ?' त्याने सहज विचारले.

'तसं नाही—' तिचा आवाज दबून निघत होता. खोटे सांगितल्यामुळे विश्रामकडे पाहण्याचे टाळून तिने तोंड फिरविले.

'विठे, तुझ्यासारखं सोनं देवानं ह्या फाटक्या पांघरुणात दिलं ठेवायला. त्याची मर्जी—!' गरीब आणि देव यांत फार कमी अंतर असते !

भाकरीची शिदोरी हाती पडताच विश्राम आपली काठी घेऊन निघाला. कष्टाने वाळलेले शरीर, चिंतेने निस्तेज झालेले डोळे आणि चालून चालून घट्टे पडलेले तळवे–नजरेत भरण्यासारख्या त्याच्याजवळ ह्या तीनच गोष्टी होत्या. शुक्राच्या प्रकाशात तो भराभर पावले उचलीत होता. थोड्याच वेळात तो विठीपासून दूर गेला !

आकाशातल्या पाखरांनी मोत्याचा चारा वेचून घेतल्यामुळे एकही चांदणी दिसत नव्हती. दिशा किंचित उमलल्या होत्या आणि त्या गुलाबी प्रकाशात त्या जंगलातील सारी चराचर सृष्टी हसत होती. शैशवातून बाहेर पाऊल टाकलेल्या एखाद्या निरागस बालिकेचे केस वाऱ्याने उडावे, तशी पाखरे भुरभुरत होती. सुखस्वप्नासारखा मधुर होता त्यांचा आवाज !

त्या जंगलात आणखीही एक दुसरी सृष्टी अस्तित्वात होती. प्रत्येक झाडाखाली वाळलेला–मेलेला–पाचोळा होता आणि प्रत्येक झाडावर ओली–जिवंत पाने होती. काहीही सरपटले तरी सळसळ आवाज होत असे.

पायाखाली असंख्य हिरवी धुरकट झाडे उगवली होती व त्यांवर पांढरी पिवळी फुले फुलली होती. त्या जंगलात त्यांना कुणीही पाणी घातले नाही, कुणीही त्यांची कलमे बांधली नाही, एकाही नाजूक हाताचा त्यांना कधी स्पर्श झाला नाही, कुणाच्याही विश्वासाने ती हालली नाहीत, मग ती फुले जगतात कशी आणि जगतात का ? आपल्या शक्तीप्रमाणे फुलावे, रात्री आकाशातील आपल्या भाईबंदांकडे पाहून दुःखाने आपली मान टाकावी व त्यातच चूर होऊन दुसऱ्या दिवशी मरून जावे—याचकरिता ती जगतात का ? छे ! ती जगतात, फुलतात, आणि मरताना स्वतःच्या जागी चार–दोन बिया ठेवून जातात. वारा येतो, त्या बिया पसरवून देतो. पाऊस येतो, त्यांना जीवन देतो. सूर्य त्यांना लहानाचे मोठे करतो. ती रोपटी मोठी होतात, फुले देतात, बिया देतात आणि मरून जातात. कुणी कदर करो वा न करो ! खरेच, काय त्यांच्या जगण्याचा हेतू ? आपल्यासारखीच फुले निर्माण करण्याचा ? पांढरी फटफटीत–ज्यांना सुवास नाही, ज्यांना सौंदर्य नाही, दुर्दैवाशिवाय दुसरी देणगी नाही—

—तथापि त्यांच्यावरही एखादे स्वच्छंद फुलपाखरू येऊन बसतेच. त्याचे मन क्षणभरच का होईना पण ओढून घेण्याचे सामर्थ्य—तेवढी शक्ती असते त्या फुलात !

परंतु एवढ्या नाजूक सृष्टीतही विश्रामला आराम नव्हता. ती सृष्टी, विश्राम आणि त्याचे हृदय, यात खूपसे अंतर होते. त्याच्या पायाने किती तरी फुलझाडे तुडविली जात; पण पुनः पाऊल उचलले गेले की ती उठत-हालत-डुलत !!

मध्येच एक ओढा लागला, त्यात विश्रामने आपले हातपाय धुतले; चूळ भरली व पूर्व दिशेला नमस्कार केला– 'देवा, तूच आहेस बापा–'

ओढ्याच्या बाहेर येताच जंगलास सुरवात झाली. वेड्यावाकड्या कल्पना मनातून काढून भीती घालविण्याचा त्याचा सारखा प्रयत्न चाललेला होता, पण त्यात त्याला यश आले नाही. कपलाही आवाज झाला तरी तो तिकडे पाहत नसे. हेतू हा की, जास्त भीती वाटू नये. जीवाची भीती कुणाला नसते ?

पुप्कळ पाचोळा सळसळला-विश्रामने तिकडे पाहिले नाही. दुसऱ्यांदा सळसळ झाली; असेल एखादी कोल्ही, असे म्हणून विश्रामने समाधान करून घेतले. पुनः सळसळ; विश्राम किंचित थांबला; सळसळ बंद ! विश्राम चालू लागला – पाचोळ्याचा आवाज सुरू झाला.

कोण पाचोळा तुडवीत आहे ? विश्रामने आजूबाजूला पाहिले—

तो चरकला. 'सोनेरी म्हणतात तो हाच ! त्या वाघाकडे पाहून तो भीतीने आपल्याशीच पुटपुटला· त्याचे डोळे एकदम थिजले. देवाचेही नाव तोंडून निघेना· 'विठे, विठे ' एक-दोनदा अगदी कापऱ्या आवाजात त्याच्या तोंडातून शब्द निघाले. काय साधन होते त्याला ? ना शस्त्र, ना शक्ती, ना शिक्षण, ना पैसा ! कारण यांपैकी एक जरी त्याच्याजवळ असते तर त्याला इथे यावेच लागले नसते. 'विठे, देव सुखी ठेवो तुला, काय त्याच्या मनात आहे तोच जाणे–' तो मटकन खाली बसणार—

इतक्यात वाघ त्याच्यासमोर आला. दोघांची दृष्टादृष्ट झाली. विश्रामला काय आठवले कुणास ठाऊक, पण तो नुसताच उभा राहिला सारखा पाहत !

वाघ दबत दबत समोर आला. विश्राम तिथेच ! वाघ त्याच्याकडे पाहत होता. विश्रामचीही दृष्टी निश्चल !! त्याने भीती सोडून देऊन आपल्या साऱ्या सुप्त शक्ती एक केल्या व आपली वेडर नजर भिडविली !!

वाघ थबकला, त्याने आपली मान खाली वळवली, पुनः वर पाहिले, पुन्हा पापण्या मिटल्या; एवढ्या रानवटीचा राजा, चार-पाच विश्रामांचे रक्त पिऊन पचविण्याची शक्ती अंगात मुसमुसलेली, पण डोळा वर करून पाहण्याचीही हिंमत झाली नाही त्याची !! पुनः तो पापण्या लावी, इकडे तिकडे नजर फिरवी, पण उभा मात्र जागच्या जागीच—

आपल्या जीवाची कुणाला भीती नसते ?

विश्राम तसाच उभा होता. त्याने डोळ्याचे पाते पण हालविले नाही. त्याला आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली होती व त्यामुळे तो अधिकच मगरूरीने वाघाला नजर देत होता.

समोरच्या टेकडीवरून सूर्याची प्रभा फाकली. विश्रामने सूर्याला मनातच नमस्कार केला व वाघावरची नजर तशीच रोखून एकेक पाऊल मागे घेण्यास सुरवात केली.

दोघांत अंतर पडू लागले. विश्रामच्या डोळ्यांतून बाण निघत होते की काय न कळे, पण वाघ मात्र आपल्या ठिकाणीच उभा होता.

एका झुडपाचा आसरा घेऊन व अवधान ठेवून विश्राम मागे सरकू लागला. कासरे दोन कासरे हटल्यावर एका उंच टेकडीवर तो चढला. सूर्य बराच वर येऊन ऊन चटकले होते.

बऱ्याच वेळाने वाघ आपल्या तंद्रेतून जागा झाल्यासारखा हालला. संतापून त्याने वारा हातांची उडी घेतली व जंगलात दडी मारली.

विश्राम सुरक्षित निभावला. ना शस्त्र, ना शक्ती, एक फाटका रुमाल, एक मळके धोतर, एक लहानशी काठी आणि उघडे पाय— फक्त डोळे मात्र !

मालकाच्या चिठ्ठीशिवाय जपण्यासाखे त्याच्याजवळ एक खेटरही नव्हते !

—पण हे सारे राहू द्या ! मला सांगा—मग ती फुले जगतात कशी ? आणि जगतात का ?

९।६।३५

२७

झोपेत लिहिलेली गोष्ट

माझ्या केसांवर व पापण्यांवर फुंकर घातल्याचा मला भास झाला. मी डोळे उघडले. सुशीला नुक्तीच येऊन बसली होती. तिने हळूच माझा हात आपल्या हातात घेतला, व किंचित् हसून माझ्याकडे पाहिले.

—" मला आता झोप लागावयाच्या बेतात होती. तुला झोपायचं नाही का ?–"

—" हं—" एवढाच उद्गार फक्त उत्तरादाखल तिच्याकडून निघाला.

—" आज उदास वाटतंय सुशे तुला ? नीज ना,—" मी तिला जवळजवळ बळजबरीनेच निजवली. आणि वाऱ्याचा झोत बंद करावयास खिडकीची पाटी लोटली. सुशी अजून देखील बोलली नव्हती.

—" तुला राग आला का मी अगोदर झोपलो म्हणून ? " मी तिला अधीरतेने विचारले.

—" तुमचा राग ? नका बोलू असं–" ती माझ्या अंगाला अधिकच घट्ट चिलगली !

तिला उदास वाटावयास काही कारण घडले होते असे नव्हे. कधीकधी अकारणच खिन्नता वाटते, यातलीच सुशीलेची आजची अवस्था. मला मोठेसे वाटले नाही. तिला बोलती करणे मात्र अवश्य होते.

—" मी काय केलं म्हणजे तू बोलशील ? "

—" मला एक गोष्ट सांगा. "

—" आणि थापट्नथोपट्न निजवा माझ्या सोनीला; लहान आहेस की नाही आता—"

—" खरंच सांगा ना !—" तिच्या आवाजात असहायता भरली होती. " मला आज तुमचं बोलणं ऐकावंसं वाटतंय आणि ते ऐकत असतानाच झोपावंसं—"

—" सुशे, मी रागावेन अशानं तुझ्यावर ! हे काय ? एकदा खदखदून हास बरं ! सांगतो तुला एक गोष्ट, पण तू हास एकदा. अगदी मोतीमाणकं सांडली पाहिजेत. "

तिला आणखी जवळ घेताच ती खुदकन हसली ! व त्यानंतर संथ निळसर पाण्यावर उठणाऱ्या विलोल वलयांसारखे बराच वेळ तिचे अंग हालत राहिले.

—" आता सांगा गोष्ट. खूप लांब-मला ऐकता ऐकता झोप लागली पाहिजे. वाटल्यास मग मी अशीच हसत निजेन ! "

—" पण चांदण्यांच्या प्रकाशात मला झोप येईल का ?—" सुशीला पुनः एकदा हसली !

कुठली तरी एक गोष्ट मी तिला सांगावयास सुरवात केली– "एक होती..."

" हं– "—गोष्ट सुरू झाली.

" एक होती उषा आणि एक होता विशाल. दोघांचं एकमेकांवर साखर-लिंबा-सारखं प्रेम होतं. उषा सुंदर होती आणि विशाल गोड होता. पण त्याचं उषेवर प्रेम असलं तरी त्याला वेगळं कर्तव्यक्षेत्र होतं; आणि त्यातच त्याचा पतंगासारखा प्राण जाणार हे ठरलेलं होतं; पुढील वियोगाची कल्पना दोघांनाही आली की ते एकमेकां-कडे अगदी केविलवाण्या नजरेने पाहत असत. गवसल्या घडीचा एक क्षणही त्यांनी फुकट घालविला नाही.

उषा तारकेसारखी हसरी, चंचल आणि फुलपाखरासारखी हावरी होती. विशाल मेघासारखा गंभीर, स्निग्ध आणि पर्वतासारखा निश्चयी होता. दोघे सुखाने राहत होती.

पण त्यांचे सुखाचे पांघरूण एक दिवस वाऱ्याबर उडून गेले, व दोघांनाही एकमेकांपासून दूर व्हावे लागले. विशाल निघून जाणार होता आणि तो जिवंत परत येणार किंवा नाही याचीही मोठीशी आशा नव्हती. त्याला निरोप देताना उषेची स्थिती काय झाली याची कल्पना आहे का तुला ?

—" विचारीला आकाशातून निखळून पडल्यासारखं वाटलं असेल," सुशीला विरघळून म्हणाली. तिच्या डोळ्यांत दवबिंदूंचा ओलावा भरला होता. पुनः मी सांगू लागलो.

—" विशालने उषेचा निरोप घेताना. तिला आनंदी राहावयास सांगितले,—" ' उषे, माझ्याकरिता रडायचं नाही. झऱ्यासारखं झुळझुळ हसत राहायचं '—त्याचा स्वर समजावणीचा होता.

' पण खरंच तुम्ही जिवंत परत याल का ? ' उषेने निराशेने विचारले. वाफेने मलूल झालेल्या फुलाची एकेक पाकळी गळून पडत होती.

' मी खात्रीनं येईन. आणि मेलो तरीही तुझ्यापासून फार दूर असायचा नाही. माणूस मरत नाहीच मुळी ! ती जाईची वेल आहे ना ? तिला रोज पाणी घालीत जा. जोपर्यंत ती हिरवी राहील तोपर्यंत मी जिवंत आहे हे निश्चित. तिला फुलं आली, की समजून जा मी सुखात आहे आणि आनंदात हसतो आहे. '

' पण वेलीला एकदा हात लावून जा, ' उषा शरविद्ध साळुंकीसारखी चिवचिवून म्हणाली. विशालने घट्ट मन करून त्या झाडाला हात लावला व एक फूल उषेच्या ओठावर ठेवून तो निघाला—

" ती एकमेकांपासून दूरदूर जात होती. त्यांच्या डोळ्यांतील एकमेकांच्या आकृती आत आत उतरून हृदयांत स्थिरावत होत्या. "

मला किंचित थांबावे लागले. सुशी मुळीच बोलली नाही. तिच्या मंद निःश्वासाशिवाय कसलाही आवाज ऐकू येत नव्हता. भारावलेल्या अंतःकरणाने मी गोष्ट पुरी केली.

—" जगातली अर्धी अधिक माणसे चकोरासारखी आशेवर नि भावनेवर जगत असतात नाही ग सुशे ? उषेने त्या झाडाला नियमित पाणी घालणे सुरू केले. ते झाड अधिकाधिक हिरवेगार दिसू लागले. उषाही त्याच्या कळीसारखी उल्हसित राहू लागली. त्या वेलीला नियमित फुले येत; पण खरंच विशाल हसत होता का ?—"

—' होय, खात्रीने. ' सुशीला मध्येच म्हणाली.

—" कल्पना आहे तुझी. विशालच्या देहाच्या चिंधड्या उडाल्या होत्या ! पण इकडे उषा मात्र त्या जाईची नाजूक फुले हौसेनेच तोडून घेत होती. भोळी भावना बिचारीची ! जाई कशाला करपेल पाणी मिळतंय तोवर—"

—" पण असंच का म्हणून ? विशाल त्या झाडात कशावरून येऊन बसला नसेल ? व त्याच्या सजल सद्भावनांची फुले कशावरून फुलली नसतील ? "

—" तू सुद्धा उषेसारखीच बोलतेस. अग, झाडात का कुठं प्राण येतात माणसांचे ? आपल्या कल्पनांचे खेळ ! पण तू मला अशी बिलगतेस का ? मी तुला सोडून जात नाही—"

—" हं, असं नाही बोलायचं. निजा बरं, फार वेळ झाला. कशाला ही गोष्ट सांगितली ?—" आणि तिने माझ्या डोळ्यांवर हात ठेवून आपले डोळे घट्ट मिटून घेतले .....

.....का म्हणून तिला मी ही गोष्ट सांगितली ? सुशीचा उदासपणा घालवावा म्हणून मी तिला गोष्ट सांगावयास सुरवात केली आणि मलाच उदास वाटले. आमच्या दोघांच्या भावनांत काय साम्य असेल ?

सुशीलेला झोप लागलेली होती. तिच्या डोळ्यांच्या कडा अजूनही ओल्याच होत्या. मी देखील झोपण्याच्या प्रयत्नास लागलो.

मी कोणत्या जगात होतो हे कळले नाही. पण माझ्या पाठीखाली मऊमऊ हिरवळ होती, व वर अनंत आकाशाची पोकळी ढगांनी भरली होती. माझ्यापासून काही अंतरावर एक पांढऱ्या चाफ्याचे झाड होते व त्याच्याच खाली पांढरे कायसेसे दिसत होते.

कुणाचे तरी थडगे असावे ते ! चार चौकोनी दगडांनी ते रचल्यासारखे दिसत होते. त्यांतील मधला दगड किंचित पांढुरका दिसत होता.

आजूबाजूला पाहिल्यावर मी स्मशानात असल्याची माझी खात्री झाली. पण इथे इतकी सुंदर, स्वच्छ, मऊशी हिरवळ कशी उगवली ? स्मशानाबद्दलच्या माझ्या कल्पनेशी ते सारे विसंगत वाटले मला. मी माझ्याबरोबर सहज म्हणून आणलेल्या कळ्या त्या पांढऱ्या गोट्यावर ठेवल्या व एकटे आणि निवांत वाटले म्हणून पुनः बसून राहिलो.

पावसाळा अर्ध्यावर आला होता. श्रावण आणि भाद्रपद महिन्यांतील मधली पंधरा दिवसांची उघाड होती. आकाशातून ढग बाजूला सरकावयाला लागले होते. त्यांची धावपळ सुरू होती. दूरदूरचे ढग जवळजवळ येत आणि एकमेकात विरून जात. साऱ्या पृथ्वीवर हिरवी सावली पडली होती. फुलपाखराचे पिवळे पंख इकडे तिकडे फडफडत असत. सर्व प्रदेश जीवनाने मुसमुसून आला होता-आणि ते एक स्मशान होते ! !

कुठूनशी वाऱ्याची मंद झुळूक आली. स्मशानात वारा देखील खेळायला येतो. दुसरा झोत आला. झाडावरची पांढऱ्या चाफ्याची फुले टप्टप् आवाज करीत त्या थडग्यावर पडली. किती नाजूक होता तो आवाज ! झोपेला आसुसलेल्या वनदेवतेच्या पापण्यांचासुद्धा मिटताना इतका नाजूक आवाज होत नसेल ! !

माझ्या कळ्या त्या फुलांनी झाकून टाकलेल्या मी पाहिल्या. किंचित गंमत वाटली मला. वाऱ्याच्या मंद स्पर्शाने सुखावल्यामुळे आकाशात फिरणाऱ्या धारीकडे दृष्टी लावून सुस्त पडून राहावेसे वाटले मला. त्या अर्धसुप्त स्थितीत मी किती वेळ पडलो असेन कोण जाणे !

माझ्या कळ्या त्या पडलेल्या फुलांशी बोलू लागल्या. एका कळीने एका फुलास विचारले— "कसा आलास इथं तू ?"

—" तू कशी आलीस ते सांग."

—" तो पलीकडे माणूस झोपला आहे ना ? त्यानं मला आणले आपल्या-बरोबर. घेतला तंवर वास आणि दिलं मला या दगडावर फेकून. निर्दय–पण तू कसा आलास ते सांग ना—"

—" अग, आम्ही इथंच राहतो....."

—" पण नेमका ह्याच ठिकाणी....."

—" हं, हं ! ! ती गोष्ट होय; ती वरीच लांब आहे. काय करायचंय तुला ? ती सांगेपर्यंत तू सुकूनसुद्धा जाशील."

" असं काय करतोस. सांग ना ! एवढ्यात सांगूनसुद्धा झाली असती." —फुलाने ते कबूल केले.

—" तुला अगोदर हे सांगावयाचे राहिले की, आपण ज्या दगडावर बसलो आहोत त्याच्या खाली एक जीव आहे.

" जीव ? पण ते थडगं आहे ना ? —" कळीने मध्येच विचारले; तिला आश्चर्य वाटलेसे दिसले.

" तू ऐकून घे. एके दिवशी एका माणसाला शिडीवर निजवून इथं आणण्यांत आलं. व एक खड्डा खणून त्यात त्याला निजविल्यावर वर हे दगड ठेवले गेले. उद्देश हा की, त्यांची झोप कुणीही मोडू नये. इथं एक बाई अगदी नियमानं येत असे. या दगडावर हात ठेवून ती रोज हे दगड अश्रूंनी भिजवून टाकी. पण एवढा गाढ निजलेला माणूस नुसतं पाणी शिंपडल्यानं का कुठं जागा होतोय—

—" पुढं त्या बाईनं माझ्या आईला येथे आणून ठेवलं. आणि स्वतः येण्याचं बंद केलं. माझी आई लहानपणापासून इथंच राहू लागली; तिला कोणीही पाणी घालीत नसे. परंतु उन्हाचा तिला कधीही त्रास झाला नाही. परवाच तिनं आम्हांला सांगितलं की, या दगडाखाली झोपलेला जीव तिला सारं पुरवीत असे म्हणून ! ती आम्हांला नेहमी सांगते—' बाळांनो ! तुमचे वडील झोपले आहेत. खाली खेळावयास जाताना जपून खेळत चला."

—" ह्या दगडावर सापडलेल्या दवबिंदूंनी आमच्या वडिलांची तहान भागते. जोपर्यंत हे दगड त्या बाईच्या अश्रूंनी भिजत होते तोपर्यंत वडिलांना दवबिंदूंची कधीही गरज पडली नाही. पण आता मात्र त्याच थेंबांवर ते जगतात.

—" माझ्या आईवर त्यांचं खूप प्रेम आहे. तिचे हात नेहमी जमिनीत त्यांच्या हाती असतात. आमची आई देखील त्यांची खूप काळजी घेते. त्यांना वर येण्याची इच्छा होत नाही. म्हणून ती रोज आम्हांला त्यांच्याकडे खेळावयास पाठवून देते.

आम्ही निघून गेल्यावर आमचे कपडे येथे पडलेले असतात, ते वाऱ्याने उडून जातात. आमचे वडील आम्हांला दिसत नाहीत, पण ते आमचा खेळ पाहतात असे आई सांगते—"

"पण येथं तुम्हांला करमतं रे ?" मध्येच कळीने प्रश्न केला.

"न करमायला काय झाले ?" आम्हांला आमची कामे असतात. आम्ही तुझ्यासारखे कुणाबरोबर उगीच भटकत नाही. त्रास होतो आम्हांला. कुणाबरोवर गेलं म्हणजे त्यांना मुके द्यावे लागतात मग."

"तरी देखील एकटं तुम्हांला इथं कसं वरं वाटतं देव जाणे–" कळी आश्चर्याने उद्गारली.

"अग, पण आम्ही एकटे कुठं आहोत ? इथल्या प्रत्येक दगडाखाली कुणी-तरी झोपलेलं आहे. ते बाभळीचं झाड दिसतंय ना तुला ? तिथल्या दगडाखाली एक मुलगी निजली आहे. ती खदखदा हसली की त्या बाभळीला खूप फुले येतात. आणि वाऱ्यावर बसून ती फुले आमच्याकडे आली, की आम्ही खूप खेळतो त्यांच्याशी."

"त्या मुलीचं हसणे ऐकू येतं का तुम्हांला ?"—कळीला खूप जिज्ञासा उत्पन्न झाली होती.

"अहं, आई सांगते— "

"परंतु तुम्हांला इथून कुठंही जायला मिळत नाही—असंच..."

"नको आम्हांला कुठे जायला. उगाच फिरत बसण्यात काय अर्थ आहे ? तू इथं आमच्यात आलीस, ती केवळ सुदैवाने ! नाहीतर पडली असतीस कुठे एखाद्या गटारात लोळत आणि रडत ! इथं निजायला येणारी माणसं आपल्याबरोबर फुलं आणतात. तीसुद्धा अशीच आमच्यात मिसळतात—रमतात ! पण त्या फुलांशी त्यांचे भाईबंददेखील नीट बोलत नाहीत, त्यांना फुटक्या नशिबाची म्हणतात. काय कल्पना बिचाऱ्यांना येथील सुखाची ! आमच्या हसण्याफुलण्याने येथील लोकांची कितीतरी करमणूक होते, शिवाय आम्हांला त्यांच्यापासून त्रास मुळीच नाही. तुमच्या तिथं कोण आमचं एवढ्या सुखासुखी कौतुक करणार आहे ? –"

"देवा" —कळीला एकदम रडू कोसळले. "आम्हांलासुद्धा कशाला पाठविलंस त्या जगात ? आम्हांला लोक घेतात तेव्हा घेतात, आमच्याशी खेळतात तोवर खेळतात नि वाटेल तिथं फेकून देतात. मला जसं इथं पाठविलंस तसंच माझ्या बहिणींनाही इथंच पाठव. कुणीतरी नवीन माणूस थकूनभागून इथे येईलच. त्याच्याच बरोबर दे पाठवून. म्हणू दे त्यांना फुटक्या नशिबाची—"

.....गारगार वाऱ्याने माझे अंग शहारून आले आणि मी डोळे उघडले. त्या कळ्या त्या फुलांत मिसळून गेल्या होत्या.

—फुलाने सांगितलेली हकीकत खरी असेल का ? इथे सारे झोपायलाच येतात

का ? मग मरण कशाला म्हणायचे, इथल्या माणसांच्या सद्भावनांची फुले होतात का ? त्यांच्या आशा-आकांक्षा फळांच्या रूपाने झाडावर डवरून येतात का ?

—त्यांच्या संथ श्वसनाने वारा वाहतो. त्यांची सुखदुःखे चांदण्यांत लुकलुकतात, आणि त्यांच्या अंतःकरणाचा ओलावा झाडांना मिळून ती जगतात. इथे वाईट गोष्टींना, थारा नाही. यावयाच्या अगोदरच पूर्वीच्या मुक्कामी ते वाईट गोष्टी ठेवून देतात. चांगले तेवढेच येते त्यांच्यावरोबर इथे. लोक त्या प्रत्येकाबरोबर म्हणतात—" खरेच, किती चांगला होता तो ? "

—इथली झाडे, ती थडगी, ते हिरवे-कोवळे गवत, त्यावर वागडणारी फुलपाखरे, झाडावर भुरभुरणारे पक्षी,—जगात तरी आणखी काय असते ? ह्या साऱ्यात चैतन्य नाही असे कोण म्हणेल ? मरणाबद्दलच्या भीतिप्रद कल्पनेने डोळे थिजून मग कदाचित इथले ते सारे निर्जीव दिसत असेल. एरवी ते कसे शक्य आहे ?

—इथले दगड धोंडे—त्यांना जीव नाही असे वाटते.....की आपल्याला ? पण एका देहाचे-त्या देहातील चिरंतन शक्तीचे, त्याबरोबर विरून गेलेल्या अशा स्निग्ध, शुद्ध, पवित्र आठवणींचे ते रक्षण करीत आहेत. युगानयुगे ते तसेच राहतील; पाऊस पडेल तेव्हा ते भिजतील, उन्हाच्या चटक्याने ते तापतील, थंडीने गारठून जातील; पण त्यामुळे आतल्या जीवांना थोडीच दखल पोचणार आहे ? साऱ्या साऱ्या आठवणींना पोटाशी धरून ते जगताहेत. त्यावर स्मशानातील फुले पडताहेत व त्यामुळे ते सुगंधून गेले आहेत. तो सुगंध आतल्या जीवांना मिळतो व ते सुखावून झोपतात.

मी जागा झालो, तेव्हा सुशीला अर्थशून्य नजरेने वर पाहत असलेली मला दिसली. सूर्याची कोवळी किरणे खिडकीच्या काचेतून आत आली होती, व किंचित् धूसर असा प्रकाश पडला होता.

" कसला विचार करतेस ग ?—"

तिने माझ्याकडे पाहिले; पण त्या पाहण्यात उद्देश असा काहीच नव्हता. ती आपल्याशीच म्हणाली,—" माणसं मरतच नाहीत मुळी-"

तिलाही माझ्यासारखेच स्वप्न पडले असेल का ? तिच्या आणि माझ्या भावनांत काही साम्य आहे का ? मी तिच्याकडे अगदी एकसारखा पाहू लागलो—

मम व्रते ते हृदयं दधामि
मम चित्तमनुचित्तं ते अस्तु ।
मम वाचमेकमना जुषस्व
प्रजापतिष्ट्वां नियुनक्तु मह्यम् ॥

आमचे दोघांचेही डोळे ओले झाले होते !

२५।७।३५

२८

न बदलणारे वातावरण

तासाची घंटा झाली आणि रिफ्रेशमेंट रूममध्ये भराभर विद्यार्थी जमू लागले. दहा मिनिटांत अगदी रेल्वे प्लॅटफॉर्मचे स्वरूप आले त्या खोलीला. खुर्च्यांची खरखर, पुस्तके टेबलावर आपटल्यामुळे होणारा धप् धप् असा आवाज, मुलांचे हसणे खिदळणे, प्रोफेसरांची टवाळी--विषयांना तोटा नव्हताच मुळी !

एका पांढऱ्या स्वच्छ दगडी टेबलाभोवती खुर्च्यांवर तत्त्वज्ञानाच्या तासावरून नुकताच परत आलेला विद्यार्थ्यांचा एक घोळका बसला होता. वहीचे कव्हर दुमडून वारा घेताना हुश्श हुश्श करीत ते आपापसांत बोलत होते. थंड पेयाचे चार पेले पोऱ्याने आणून ठेवले, ते ओठाशी लावीत त्यांनी अगदी आरामात गोष्टी सुरू केल्या.

'ए, आज Economics (अर्थशास्त्राच्या तासाला) ला माझी Proxy (हजेरी) लावतोस का ? अगदी कंटाळा आला बुवा, काय ऊन ×× ' एक गोरटेला विद्यार्थी म्हणाला.

'No. Sorry (अहं, माफ करा.) ' त्याच्या मित्राने उत्तर दिले.

'पण हे पाहा, be cautious (जरा जपून) ! तुम्हा दोघांनाही तो लेक्चा प्रोफेसर आता चांगला ओळखायला लागला आहे. त्या दिवशी नाही का मार्क केलं ? पण रघ्या, रोज लेक्चा चाट मारायला काय झालं रे तुला ?' तिसरा मित्र साळसूदपणाचा आव आणून म्हणाला. त्याने केव्हाच आपला पेला रिकामा करून टेबलावर ठेवला होता.

'काय तेच तेच शिकायचं ? चार वर्षे झाली इथं हाच विषय असाच शिकतो आहे नाना मी ! हा नवीन प्रोफेसर आला तरीही तेच Change as such. (बदल असा) काही नाहीच; त्यापेक्षा घरी झोप ताणली तर जीवाला आराम...'

'परीक्षेत राम म्हणावा लागेल तो ? '

'आपण बोललात होय ? ' पहिला मित्र खो, खो, करून हसत उटला,--

'पर्वा नाही, जाईल एक वर्ष, आपल्या सारख्याच्या संगतीचा लाभ काय थोडा आहे म्हणून--'

माझे लक्ष सहजच त्या मुलांकडे वेधले. प्रोफेसरांच्या बाबतीत त्याने काढलेले उद्गार अगदी यथार्थ असे होते. माझे अर्थशास्त्राचे नोट्स विमललाही उपयोगी पडले. अगदी शब्द न् शब्द तेच. दोन वर्षांत कुठं फरक नाही !

त्या मुलांच्या गोष्टी तशाच चालू होत्या. पहिला मुलगा—त्याचे नाव देशपांडे असावे--एकेक शब्द अगदी तोलून तोलून फेकत होता व तसतशी त्यांची मैफल

जास्त रंगात येत होती. कशावरूनसे बोलणे सुटले, मला मध्यंतरी आठवत नाही, पण देशपांडे एकदम टेबलावर पुस्तके आपटून ओरडला, 'Honesty ? Bogus. It is merely an old 18th century fad..... (काय सचोटी ? हं, ते एक थोतांड आहे अठराव्या शतकातलं.)

' हे पाहा साहेब, प्रत्येक गोष्टीची जर अशी खच्ची करायला लागला तर आपल्या जिभेला कोण आळा घालणार ? आता उद्याची ६ तारीख, महात्माजी सत्याग्रह करायला आश्रमातून बाहेर पडणार; तू त्यांनाही नावे बोटे ठेवायला मागे पुढे पाहणार नाहीस--आपल्यावर जोपर्यंत घसरत नाही.....'

' नाना, हा तुझा Remark (ताशेरा) जरा विचित्र आहे, पण खरंच मला यात मोठंसं काही वाटत नाही. या गोष्टी आता जुन्या झाल्या आहेत. कालची टॉउन-हॉलची सभाच पाहा. तो ×× काय शिरा ताणताणून ओरडत होता, म्हणे Patriotism--Patriotism--Rubbish--! ' (देशभक्ती, देशप्रेम,--हं--)

' त्याला तुझ्यासारखी रिफ्रेशमेंट रूम दणाणून टाकायची नव्हती. देशभक्तीचं...'

' तुझ्या त्या देशभक्तीचं नको सांगू मला. नाना, मी तुला सांगतो, तू थोडा seriously (मन लावून) विचार कर म्हणजे कळेल तुला. This so called patriotism is nothing but a worn out sentiment fed by fools and exploited by hypocrites. Average man च्या दृष्टीने पाहा तू— we want something new. (ज्याला तुम्ही देशभक्ती म्हणता ती म्हणजे एक शिळी झालेली भावना आहे, जिला मूर्खांनी पोसली, आणि दांभिकांनी राबविली. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने तू पाहा; आपल्याला काहीतरी नवीन पाहिजे.)

तासाची घंटा झाली आणि बाकीची मुले उठून गेली. ' O.K. ' म्हणून देशपांडे देखील घरी जावयास उठला. कॉलेजातील अत्यंत तल्लख विद्यार्थ्यांत त्याची गणना होती, हे मला ऐकून माहीत होते. त्याच्या आजच्या बोलण्याचे मला जे आश्चर्य वाटले त्याचे कारण अगदी वेगळे होते; एरवी या असल्या गोष्टी म्हणजे रिफ्रेशमेंट-रूम-मधील पावबिस्किटांसारख्या रोजच्या होत्या.

पण त्या दिवशी मला जरा विचित्र वाटले. उद्या एप्रिलची ६ तारीख ! १९३० साल म्हणजे हिंदुस्थानच्या राजकारणाचा क्रांतिक्षण आणि त्याच्या आदल्या दिवशी एका तरुण पिढीचे हे उद्गार !

उद्या म्हातारा स्वराज्याचें वाण हाती घेऊन काठी टेकीत बाहेर पडेल; आकाशा-कडे नजर लावून परमेश्वराचे सहाय्य मागताना त्याचे प्राण कंठाशी येतील; विझणारी ज्योत उगीच मोठी होईल; आया-बहिणी, चिमणे जीव, सारे सारे रस्त्यावर गोळा होऊन, एकमेकांना बिलगून डोळ्यांच्या कडा ओल्या करतील...आणि देशपांडे बिचारा या सर्व गोष्टींना Sentimental म्हणून मोकळा होईल !

माझ्या घरी मी माझ्या सामानाची निरवानिरव केलीच होती. मन थोडे तयार व्हायचे होते. रोजच्या बातम्या चाळाव्यात आणि उगीच विचार करीत बसावे. किती दिवस चालणार हे ?

हे इतके लोक मरतात ते कुणाकरिता ? काय स्वार्थ असतो त्यांचा ? त्यांची भावप्रवण मनोवृत्ती त्यांना स्वस्थ बसू देत नाही म्हणून ? पण असले उत्तर आमच्या कॉलेजातील मानसशास्त्राचे एखादे प्रोफेसर देऊ शकतील. व्यवहार काय सांगतो ?

लोक मुठीने पैसे फेकतात. स्वतःची माया बाजूला सारून एका मिठाच्या पुडी-करिता चार-चार सहा-सहा महिने तुरुंगात जातात, आनंद वाटतो काय त्यांना ? तळमळतात, धडपडतात बिचारे ! !

युगानुयुगे झोपणारे जीव जागे होतात. घराबाहेर भडकलेल्या वणव्यात उडी घालताना त्यांना काय वाटत असेल ? आनंद ! पण जीव देऊन आनंद विकत घ्यायचा काय ?

अथांग पाणी पोटात घेऊन मस्तवालपणे मुसमुसणारा विस्तीर्ण जलाशय दिसला की पोहणाऱ्याला स्फुरण चढते. इतर लोक नको म्हणत असताना तो आपले शरीर झोकून देतो. त्या वेदरकार मगरूरीत काय असते ? आणि एखाद्या भोवऱ्यात गवसून तीन मिनिटांत गडप झाला तर ? तरीही इतरांनी जे केले नाही ते आपण केले याच उन्मादात मरण आणि चिरंतन सुख !

माझी भूमिका तयार व्हायला मला एवढे कारण पुरेसे होते. मला त्याबद्दल मोठासा विचार करावयाचा नव्हता. साऱ्या जगाचे मस्तक ज्याच्यापुढे नमते अशा विभूतीला अविचारी म्हणून स्वतःच्या स्वतंत्र प्रज्ञेचा टेंभा मला मिरवावयाचा नव्हता.

इतर लोक हसत हसत उडी घेतात, आपणही घेऊन पाहावी; काय आनंद आहे तो तरी कळेल ! इतर लोक 'देश' 'देश' करतात; आपणही तसे म्हणून पाहावे ! सारे लोक एकेक घागर नेऊन पाणी पुरवितात, आपणही ओतावी एक घागर नेऊन ! जळतील पाय ! आणखी काय ? ज्या गोष्टीत स्वतःला कवडीचा लाभांश नाही; किंबहुना ती करीत असताना कष्ट, अपमान, वेअब्रू प्रत्यही पदरात पडते, अशा गोष्टी-करिता राजबिंडे जीवसुद्धा प्रेमाच्या घरट्यातून बाहेर पडतात. आपल्याच जीवाची काय एवढी भीती येऊन पडली ?

विमनस्क स्थितीत मी मध्येच वर्गातून उठून आलो, गच्चीवरून पायऱ्या उतर-ताना एकदम वाटले, विमलेला भेटून घ्यावे. तिची आठवण होताच अंतःकरणाचा एक कोपरा दुखला, उगीच जीव घुटमळला. एकदा वाटे तिला यात काय कळवायचे आहे ? पुन्हा वाटे, बिचारी उगीच तळमळेल. नंतर आपली तिची भेटही होणार नाही. माझ्याशिवाय तिला दुसरा मित्र किंवा मैत्रीण नव्हती. माझे पाय आपोआप मुलींच्या खोलीकडे वळले.

विमल वाणेदार होती, धीट होती. कदाचित तिला आनंद वाटेल ल्याला पाहून !

तो तुरुंगाचा पोषाख, विमलचे ते किंचित उपहासगर्भ हसणे; आणि एकंदर अवस्था पाहिल्यानंतर करपलेला तिचा चेहरा ! एका क्षणातले माझे विचार हे सारे !

मुलींच्या घोळक्यात मिसळलेली विमल मला एकदम ओळखायला आली. मी जवळ येताच आपल्या मैत्रिणींना— 'Just one minute (आले हं जरा) असे काहीसे म्हणत ती माझ्याजवळ आली. तिचे तोंड आनंदाने फुलून गेले होते. समुद्रातील शिंपल्यासारखी मोती पोटात घेऊन बसलेली पोर ! .

कळवू का तिला ही बातमी ? काय वाटेल तिला ?

' कशाला बोलावलंस बापू ! तिनेच बोलावयास सुरवात केली.

' काही नाही, अगदी सहज—'

' मग चल त्या हौदावर गप्पा मारीत बसू, तुला त्रास नाही ?'

' बरं विमे, मी तुझा निरोप घ्यायला आलो आहे. पुढे कदाचित तुझी माझी भेट व्हायची नाही. ओळख असू दे. '

' बापू, डोकं दुखतंय तुझं ? '

' अशी गोंधळतेस काय ? जरा ऐकून तर घेशील; मी चळवळीत पडायचं ठरविलं आहे; केव्हा आणि कोणत्या तुरुंगात जाऊन पडेन याचा नेम नाही मुळीच. '

किंचित्काल कुणीच काही बोलले नाही. मी तिच्या काळवंडलेल्या तोंडाकडे पाहत राहिलो. रुईच्या झाडाचे एक पान जरी तोडले तरी दुधाच्या रूपाने त्यातून अश्रू टपकतात. विमलने एक निःश्वास टाकला आणि बाजूला तोंड वळविले.

' कशाला आलास मला भेटायला ? '

' मला राहावेना म्हणून ! पण त्यात—'

' अस्सं ! अन् मी इथं काय करावं ? '

' आपला अभ्यास ! विमे, मी तुला सांगतो, या वर्षी तू पहिला क्लास पटकाविला पाहिजे. '

' ठीक आहे. जा तू आता ! तुला काळीज आहे का रे ? ' माझ्या उत्तराची वाट न पाहता ती माझ्याजवळून निघून गेली.

पाच-सात दिवसांनंतरची गोष्ट ! पहाटे झेंडावंदन करून मी शिबिरातून बाहेर पडलो. पिकेटिंगला जाणाऱ्या स्वयंसेविकांची व्यवस्था माझ्याकडे होती. प्रभात-फेऱ्यांच्या प्रेमळ, मंजुळ पण स्फूर्तिदायक वातावरणात जीव फुलून निघत असे आमचा ! नेहमीप्रमाणे प्रभातफेऱ्यांना पटांगणात सोडून मी पिकेटिंग कॅम्पकडे वळलो.

स्वयंसेविका शिबिराच्या बाहेर कोवळ्या उन्हात हसत खेळत उभ्या होत्या. सूर्याच्या शांत किरणांनी तेजाळलेल्या त्यांच्या मुखांवर दिव्यतेची व पावित्र्याची झाक होती. त्यांना नाही का घरदार ? रोज रोज मला वाटे !

'वंदेमातरम्' म्हणून मी सर्व स्वयंसेविकांना नमस्कार केला. आता माझ्या नेहमीच्या तयारीला लागणार—इतक्यात माझ्या मागून मला कुणीतरी हाक मारली, 'बापू.' मी दचकून मागे पाहिले; आवाज ओळखीचा वाटला. मागे विमल उभी होती.

'कशाला आलीस ग ? '

'तुझ्यासारखंच दुसऱ्यांनाही काळीज नाही असं तुला वाटतं की काय ? '

'म्हणजे ? तू चळवळीत पडणार ? '

'मग नको करू का पिकेटिंग ? काय आज्ञा आहे अधिपती ? तू इथला मुख्य आहेस म्हणे ! '

'विमल.....' अगदी गदगदून आल्याने माझ्याने पुढे बोलवले नाही. एकदा वाटे, तिला सशासारखे पोटाशी धरून खूप खूप मुके घ्यावेत आणि एकदा वाटे तिच्या पायांवर आपले डोके ठेवावे. हसावे की रडावे काहीच मला समजेना. विमल ह्या दिव्यात उडी घालणार ?—

'रण माजले देखोनि,
वीर निर्भय अंतःकरणी
तैसी अग्नीसमोर विदेह नंदिनी
निर्भय मनी सर्वदा '

'विमल, कुठून ही दुर्बुद्धी सुचली तुला ? '

'हे पाहा, सध्या तुझ्याशी बोलायला मला वेळ नाही. मी आले ती एवढ्याच-करिता की, तो स्वयंसेवकाचा बिल्ला तू मला दे. दुपारी शिबिरातून घेऊन येशील. त्या पाहा निघाल्या देखील स्वयंसेविका...'

विमल निघून गेली.

त्या दिवशी पिकेटिंगच्या दुकानावर मी बराच वेळ होतो. एखाद्या ठिकाणी खूपखूप दिवे लागावे, तसे वाटले मला. आजची स्वयंसेविकांची तुकडी नवीन दुकाना-वर येऊन थडकली. पुरुषोत्तम वेलजी—एक मोठे प्रस्थ होते ! आणि त्याच्या दुकानात परदेशी कापड ! परवाच त्याने काँग्रेसला १,००० रुपयांची देणगी दिली होती. एका बाजूने देणग्या द्यावयाच्या आणि दुसऱ्या बाजूने स्वयंसेविकांना दुकानावर पिकेटिंग करावयास भाग पाडायचे. काय उद्देश होता त्याचा नकळे ! त्याचे ठाम उत्तर—' हा धंदा आहे. तुम्हांला वाटल्यास माझ्याकडून आणखी ५०० रु. उचलून न्या; पण दुकानातील माल आज मी बदलविणार नाही. '

मुली पिकेटिंग करू लागल्या म्हणजे वेलजीला आनंद होत असे. तो हसायचा, खिदळायचा, समजावणीचा पण रंगेल स्वर काढून मुलींशी हुज्जत घालायचा. एक-दोनदा त्याने इकडे तिकडेही केले पण विचाऱ्या मुली आपले कर्तव्य बजावीत राहिल्या. काँग्रेसला पैसे देणारा माणूस ! एकदम कसा संशय घेता त्याचा ? सच्ची दानत असेल; कदाचित् गमतीखातर उगीच तो आपलेपणाने वागत असेल तसा—

तिसरे दिवशी स्वयंसेविकांना मी बरोबर आणून सोडले. आदले दिवशी विमलने मला वेलजीबद्दल सांगितले होते. आज मी मुद्दाम साऱ्या गोष्टी पाहणार होतो. स्वयं-सेविकांच्या ऐवजी स्वयंसेवक घालावे ही साधी गोष्टही त्या वेळी माझ्या ध्यानात येणे शक्य नव्हते. माणसे इतकी नीच असू शकतात का ? हाच प्रश्न विचारीत असे मी मनाला नेहमी !

माझ्याबरोबर माझा मित्र नलिनीरंजन होता. त्याची नातेवाईक असलेली एक बंगाली तरुणी त्या पथकात होती. आम्ही दोघेही एका बाजूला उभे राहून खरा प्रकार पाहणार होतो. काय ते नक्की पाहिल्यावर मग पुढील व्यवस्था करावी, हा आमचा उद्देश !

वेलजीने त्याच दिवशी २०,००० रु. चा विलायती कपडा खरेदी केला होता. माझ्या व रंजनच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत तिडकली. ढोंगीपणाला शासन करायची प्रवृत्ती जास्त बळावली. गिऱ्हाईक यावयाला कचरतात हे ओळखून मुद्दाम स्वयंसेविकांनी पिकेटिंगचे काम उचलले होते. वेलजीसारख्या लोकांना तेच फावत असेल. स्वयंसेवकांना लाठ्या, बुटांच्या ठोकरा बसतात आणि शिवाय गिऱ्हाईक तुटत नाही ते नाहीच. म्हणजे मुलींचे पिकेटिंग जास्त सोयीचे; पण ते यशस्वी व्हावयास फक्त वेलजीसारख्यांचाच तेवढा अडथळा होता.

एकदा विमलच्या अंगाला खेटून जाताना मी त्याला पाहिले. मला संताप आला. विमलकडे पाहून बाईटही वाटले. मी जवळ आहे हे पाहून तिची नजर स्थिरावली. नलिनीरंजन हा प्रकार पाहून एकदम धावला; पण मी त्याला समजाविले. 'अरे, अशा गोष्टी उघड करता येत नाहीत. उद्या पाहिजे तर दुसरे लोक आणू इथे.' पण त्याचे रक्तच वेगळे होते ! कोरड्या दिमाखाचा नव्हता तो !

पुन्हा असाच काहीसा प्रकार झाला. वेलजीशेट हसत हसत गादीच्या खाली उतरला आणि—'बाई, जरा बाजू तो हो जावो' असे म्हणून त्याने एका स्वयं-सेविकेचा हात धरला. वेलजीच्या आतापर्यंतच्या हालचाली आम्ही दोघेही पाहत होतो. नलिनीरंजन पुन्हा उसळला—'कसली शांती धरून बसलास बापू तू ? सरकारला पाहिजे तर शांतीचे धडे शिकवू. चल सांग, हे काम तू करतोस का मी करू ?' त्याने मला जवळजवळ ओढतच एका बोळात नेले आणि माझ्या खिशात पिस्तुल कोंबले. मला काहीच सूचेना. थिजल्यासारखा मी तसाच उभा राहिलो. नलिनीरंजन पुन्हा

संतापला. 'कसला विचार करतो आहेस देव जाणे; साप सुंदर दिसला म्हणून गळ्यात घालून थोडाच मिरवायचा आहे ? त्याचे तोंडच ठेचले पाहिजे, नाहीच होणार तुझ्याने ते काम ! तरी बरं, तुझ्याच मैत्रिणीवर...'

पुन्हा डोळ्यांसमोर विमल उभी राहिली. ढोंगी आणि कमअस्सल अवलादीचा शेट आणि त्या स्वयंसेविका ! एका बाजूला सर्वस्वाचा त्याग, भडकलेली चिता आणि दुसऱ्या बाजूला त्याच चितेवर आपली पोळी भाजून तूपसाखरेशी खाणारा शेटजी ! काय करायचे त्याच्या श्रीमंतीचे ? काय उपयोग असली माणसे ठेवून ?

विचारांची आंदोलने स्थिरावली. आम्ही भावनेचे बळी होतो. कसला तरी निश्चय करावयाचा म्हणून आम्ही नलिनीरंजनच्या घरी गेलो.

त्याच्या घराच्या गल्लीला अर्ध्या फर्लांगावर काटकोन करणारी दुसरी एक गल्ली होती. आणि या गल्लीच्या शेवटच्या टोकाला वेलजीचे तीन मजली मोठे घर होते.

सबंध दिवसभर आम्ही दोघांनीही सर्वांच्या डोळ्यांत भरेल इतके काँग्रेसचे काम केले. आणि रात्री युक्तीप्रयुक्तीने शिबिरातून निसटलो.

रात्री दहा वाजण्याच्या सुमारास वेलजी दुकानातून घरी जावयास निघाला. गल्लीच्या काटकोनी बोळात अगदी तोंडावर एक इसम धुरकटलेले कपडे घालून उभा होता. वेलजीची चाहूल लागताच तो सावध झाला. बेसावधपणे वेलजी आपल्याच विचारात गुंगून चालला होता. दोघांची भेट झाली. वेलजीच्या तोंडावर हात ठेवला गेला. भुतासारखे कुणीतरी त्याला छातीशी धरून आपटले, काळाचे आलिंगन असेल बहुधा ! लागलीच त्याच्या हृदयाशी पिस्तुल दाबले जाऊन आकडा ओढला गेला. घुप्...घुप्...घुप्...असा कोंडलेला आवाज दबून बाहेर पडला—जणू वेलजीला उचकी लागली होती अंतःकाळची !

निमिषार्धात सर्वत्र शांत झाले. वेलजी छातीला हात लावून कसाबसा घरी पोचला आणि अर्ध्या तासात धरित्रीने त्याला पोटात घेतले !

दुसरे दिवशी पहाटे पुन्हा प्रभातफेऱ्या—झेंडावंदन—स्वयंसेविका—भूपाळ्या नेहमीची आमची आवडती ओळ—'आलो उगीच नाही अजमाविता न खोली.'

फक्त वेलजीशेट डागला गेला. कुणी डागला, केव्हा, कसा आणि का डागला हे कुणालाही माहीत नाही. ज्यांना समजायला पाहिजे ते समजले. पिकेटिंग व्यवस्थित सुरू झाले.

संध्याकाळच्या व्याख्यानात सविनय कायदेभंगावर आम्ही दोघांनीही मोठ्या जोमाने भाषणे केली !

ते दिवस संपले. वेलजी पुरुषोत्तमदासचा खून करणारा इसम सापडला नाहीच.....

आता तो काल कल्पनेने आठवावयाचा, पाहावयाचा ! नेहमीची चाकोरी सोडली आणि पतंगासारखी झेप घेतली. पण मला एक क्षणभर देखील त्याचा पश्चात्ताप झाला नाही. ज्या वेळी सारा प्रदेश वेचिराख होण्याची वेळ आली होती, त्या वेळी आपण आपल्याच घरराखणीवर वेळ दवडला नाही. लोकांची घरे ओस पडली, त्यांच्या घरी दिवा लावायलाही कुणी राहिले नाही, अशा वेळी आम्ही उगीच घरच्या दिव्यात तेल घालीत बसलो नव्हतो; ह्या – ह्या एकाच समाधानाने अगदी निवल्यासारखे वाटते. इतके विनम्र व्हावेसे वाटते की कुठेही दिव्य, उज्ज्वल पण पिचलेले, ठेचलेले दिसेल तेथे गरुडासारखी झेप घालावी आणि देहाच्या चिंधड्या करूनही वेळ आली तर त्यांचा दुवा घ्यावा. धडधडत्या होमकुंडात आमच्याकडून एकच का होईना पण समिधा अर्पण केली गेली ही कल्पनाच सुखाची, जीवाला मोहरून टाकणारी !

साऱ्या गोष्टी एखादवेळ आठवल्या म्हणजे मागच्या पाच-सहा वर्षांचा चित्रपट मनाच्या पडद्यावर उभा राहतो. इथे कुठेतरी आपली भूमिका होती. शोधता शोधता चेलजीशेट दिसतो ! आपण आपल्या तत्त्वाच्या विरुद्ध गेलो; अहिंसावादी मी ! मन सदान्कदा खात राहते. पण या आवेगात पिचत असतानाच आपण एक विशिष्ट कर्तव्य केले, आपल्याला काळीज आहे हे दाखवून दिले याबद्दल सुख वाटते. उन्हाने जीवाची काहिली झाल्यावर झुळझुळणाऱ्या झरीकडे पोहोचल्याचा आनंद होतो !

आणि विमल ? बिचारी ! बिचारी एवढ्याच अर्थाने की ती तिच्या जगातून उठून एका खेड्यात पडली आहे. ज्या गावी पत्र नाही, पोस्ट नाही, बातमी नाही ! ज्या यज्ञात आपण आहुती घातली त्याची सांगता झाली की नाही, कुठले कळायला हे ? एका छोट्या बछड्याला कडेवर घेऊन घराजवळच्या नदीच्या वाळवंटात सायंकाळी फिरावयाला जाण्याशिवाय तिला दुसरी करमणूक नाही. ढराविक टशाचे सुख आणि त्यात अंतर नाही !

आनंद हाच की आपणही काटेगोटे तुडविले आहेत; इतरांना जे कधी ऐकावयास मिळत नाहीत, ते आपण अनुभविले आहे; हृदयाच्या बऱ्याबाईट स्पंदनांची आपल्याला जाणीव झाली आहे ह्या सर्व गोष्टी तिच्या डोळ्यांपुढे उभ्या राहत असतील. तास, दोन तास करमणूक ! किती भुकेली असेल ती बाहेरच्या बातमीकरिता ? दात असतात तिथे चण्यांचा दुष्काळ !

आज आम्ही आपली शस्त्रास्त्रे शमीवृक्षाच्या कोटरात ठेवली आहेत. आगामी घटना कणाकणाने यशस्वी व्हावी हाच विचार रात्रंदिवस मनात घोळतो आहे. म्हातारा राजकारणातून अलग झाला. एका जबाबदार माणसाने ते जू आपल्या शिरावर घेतले. .....साऱ्या गोष्टी अचानक अनपेक्षित घडताहेत...हिटलर दमादमाने गोष्टी करतो.

मुसोलिनीची युद्धाशिवाय बात नाही, रूसची खबरबात काही औरच; कोणती गंजी कधी पेट घेईल, याचा 'नाही घडीचा भरंवसा !' कसा प्रसंग येईल कोण जाणे !

माझ्याबरोबर शिकत असलेला माझा एक मित्र पहिल्या वर्गात एम्. ए. पास झाला आहे, आणि ज्या कॉलेजात आम्ही शिकत होतो त्याच कॉलेजात त्याला प्रोफेसरची जागा मिळाली आहे. मी त्या गावी आलो आणि तातडीने मला दुपारची मेल गाठावयाची होती. त्याची भेट व्हावी म्हणून मी कॉलेजात गेलो. त्याला तास होता.

किती विचित्र आणि नवे वाटले मला ? एकदा कधीतरी टाकलेली वस्तू पाच वर्षांनी सापडावी, पाच वर्षेपर्यंत कधी आठवणही झाली नाही की आपले काही हरवले आहे म्हणून ! माझा मित्र यावयाला अजून २० मिनिटे अवकाश होता. मी रिफ्रेशमेंट रूममध्ये गेलो.

त्याच जुन्या पांढऱ्या स्वच्छ दगडी टेबलाभोवती खुर्च्यांवर चार-पाच मुले चहा पीत बसली होती; त्यांपैकी एकाची माझ्याकडे नजर जाताच तो हळूच म्हणाला—

'कोण दे. भ. आलेत हे ?'

'ऊं, nonsense (जाऊ दे रे) काय करायचंय तुला ? असेल कुणी.' कपाळावर खूपशा आठ्या पाडून एक मित्र म्हणाला.

'अरे बाबा, दे० म०, '...नुसता हशा.

'कुठला पंधराव्या शतकातला topic (विषय) काढला आहेस ! काहीतरी नवं हवं आपल्याला ! हे sentiments [भाव] मेले पाहिजेत लवकर.' त्याच्या नजरेत त्रासिकपणा भरलेला होता.

माझ्या बाजूला बसलेल्या एका विद्यार्थ्याला मी हळूच विचारले, 'कोण हो, तो ?'

'दिघे, यंदाचा expected first class आहे. [पहिला वर्ग पटकावील यंदा तो.] आमच्या कॉलेजच्या ज्यूबिलीचा सेक्रेटरी होईल बहुधा.'

दिघे ! कॉलेजची ज्यूबिली ! उगीच एक विचार मनात आला, विमलला दिलेले माझे अर्थशास्त्राचे नोट्स ह्यांच्यापैकीसुद्धा एखाद्याच्या उपयोगाला येतील !

काहीतरी नवीन पाहिजे, नाही का ?

३१।७।३५

२९

?

..... आज तुला त्याची कल्पना नाही. सारं जग उषेच्या सुषमेसारखं स्निग्ध आगि अस्फुट दिसत आहे. तुझ्या निरागसपणातच तू चूर आहेस.

..... पण कुसुम ! किंचित् समज आल्यावर तू आपल्या पापण्या वर करून जगाकडे पाहशील. तू म्हणशील, किती अनोळखी सारं हे !--

..... तुझ्या पुढच्या आयुष्यात असले प्रसंग वारंवार येतील. आणि वारंवार तुझ्या पापण्या ओलवून त्यांवरील केस थरथरतील—भिजून जातील.

..... अशा वेळी केवळ माझे म्हणून नव्हे तर एका भावविवश कलावंताचे पुस्तक तू विरंगुळा वाटावा म्हणून उचलशील--त्यातील शब्दांशब्दावरून ओळी-ओळीतून तुझी तरल दृष्टी हालत राहील. तुला आश्चर्य वाटेल—आणि किंचित् विस्फारून बघत नाही तोच तुझ्या ध्यानी येईल--

----त्यात कुसुम आहे ! अगदी अशीच--हसरी, चिडकी, विजेसारखी चंचल--अल्लड ! ! त्यातल्या टपोर मोत्यांना तुझ्या डोळ्यांशिवाय किंमत नाही; त्यातली फुले तुझ्याच उल्हासाने हसतात—सशाची उपमा तुलाच दिलेली आढळेल. तुझ्याच--तुझ्याच अवस्था परिणत झालेल्या दिसतील त्यात ! !--तुला वाटेल--

——खरंच कुसुम ! काय वाटेल, ग, तुला ? तुला भरून आल्यासारखं होईल; कुणाला कधीही सांगता येणार नाहीत अशा भावऊर्मी तुझ्या हृदयात हेलावतील; हळूहळू कमळाची एकेक पाकळी उमलू लागेल—

काही क्षणांपूर्वी ओले झालेले तुझे डोळे हसू लागतील. पावसाची सर ओसरून गेल्यावर कोवळी तिरीप पडावी आणि पानापानावर थबकून राहिलेल्या थेंबांतून किरणांचा खेळ सुरू व्हावा. त्यांतलेच तुझे हसणे !

— कुसुम ! देवाने त्या वेळी मला नेमके तिथे आणून उभे केले तर ?

——पण तू तिथे कुठली बसायला फार वेळ ! आपल्या आनंदात कुणाला तरी वाटेकरी करून घ्यावयाला तू पाखराच्या गतीने उडून जाशील आणि साऱ्या घरभर भिरभिरशील !

१३।८।३५

पदार्थांची चव

'दोन इसम, चार आणे' पोऱ्याचे कर्कश ओरडणे व लागलीच रुपयाचा आवाज कानी आला. हॉटेलच्या मालकाने वारा आणे एका इसमाच्या हातावर ठेवले व ते दोन इसम सिगारेटचे झुरके मारीत हॉटेलच्या बाहेर पडले.

—बाहेर जाणाऱ्या आणि आत येणाऱ्या माणसांची दारात भेट होत असे. कुणालाही कुणाकडे पाहावयास अवसर नसे. सारखी वर्दळ सुरू होती.

—चार विद्यार्थ्यांचा एक कंपू हसत खेळत आत घुसला. 'चार चहा' एवढे मालकाला सांगून ते एका टेबलाभोवती बसले. संपत आलेले सिगारेटचे तुकडे त्यांनी एकेका झुरक्याने बाजूला फेकले व आपसातील थट्टामस्करीला सुरवात झाली.

—दुसऱ्या बेंचावर दोन इसम बसले होते. पोऱ्याने 'दोन भजी' आणून ठेवली होती.'

—'का रे ? आणखी गरम काय आहे !'

—'आलूबोंडा, आलूबोंडा, पुडाची वडी, कचोडी, मिसळ—' रामरक्षेसारखे त्या पोराच्या तोंडून मंत्र बाहेर पडले.

'दोन पुडाची वडी–'

—'अच्छा साब–' लोकांच्या हाकेला ओ देता देता पोरगा भांबावून गेला होता.

—'ए पोऱ्या–'

—'जी साब—' पोरगा त्या दोन इसमांकडे भरकन् गेला.

—'ही भजी गरम आहेत का रे ?' —त्यांच्यापैकी एकाने चिडून विचारले.

—'आता संध्याकाळीच केली ती !' पोराचे उत्तर.

—'मग ती गरम आहेत असं कशाला सांगितलं ?'

—'महाराज, ती ताजी–'

—'ताजी म्हणजे गरम वाटतं ? उठाव, नको आम्हांला ही. त्यांना चव तरी आहे का ? माल खपावा म्हणून खोटे सांगतो वाटतं—?'

—'फेकून द्या वाटेल तर. परत कशी घेऊ ? पैसे मिळाले तर फेकून सुद्धा देईन मी–' पोरगा करड्या आवाजात म्हणाला.

—'पैसे फुकटचे येतात वाटतं ? खोटे बोलून मुजोरी ?' त्या दोघांच्याही रागाचा पारा वरवर चढत होता. पण मुलाला कुठे एक आण्यासाठी हुज्जत घालून बाकीची गिऱ्हाइके बुडवावयाला वेळ होता ? त्याने तिरस्काराने चिडून– 'कशाला

डोकं गरम करता साहेब ? जा आपल्या रस्त्याने सीधे–' एवढे म्हटले व दोन बशा उचलून तो पुढे गेला. जाता जाता त्याने त्यांना शालजोडीत गुंडाळून मारलेच. त्यांची पाठ फिरताच पोरगा आपल्याशीच कुरकुरला—

'दिमाख पाहा लेकांचा ! म्हणे चव नाही' अर्थात् असे म्हणताना त्याने चार विद्यार्थ्यांकडे मिस्किलपणे पाहून हास्य केले.

त्या चौघांचे लक्ष त्याच्याकडेच होते–

—'काय इल्लत आहे पाहा. स्वतःचीच चूक पण वर आणखी मुजोर–'

—'अरे, हे लोक असेच असायचे–' अनुभवाने पिकून गेला होता जणू तो असे म्हणताना !

—'अहाहा ! हरे राम !!–' एका विद्यार्थ्याने समोर आलेल्या चहाचा घुटका घेत उद्‌गार काढला.

—'What's the matter' ! बाकीच्यांनीही घुटके घेतले. सर्वांनी तोच उद्‌गार काढला.

--'साखर आहे की काय ही ? सरबत पाजतो आहे वाटतं आपल्याला हा छोकरा–' एकाने तिरस्काराने आवाज चढवीत म्हटले.

--'काय चव आहे ना पण–अहाहा !!' दोघांनी एकदम पुनः काढलेला उद्‌गार.

--'येता कशाला या हॉटेलात ? मी म्हटलंच होतं लघाटेकडे चला म्हणून–'

--'पण अझूनही कुठे बिघडलं ? द्या फेकून चहा हा, आपण जाऊ तिकडे. I will stand for you, पण ह्या चहाचे दोन आणे मात्र भरा कुणीतरी.'

--'मी भरतो' प्रभाकर चाचपत म्हणाला.

--'फुकटचे पैसे जातात.'

--'नको म्हणू बाबा असं. जाऊ दे. तो छोकरा लेकाचा आपलाच दिमाख काढील. मघाशी पाहिलं नाही का ?

--'शरद–ए'–आपल्या मागे पाहा' गोविंदा हळूच म्हणाला. सर्वांचे लक्ष तिकडे गेले. त्यांच्या शेजारच्याच टेबलावर एक काळेलासा इसम बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्यामुळे त्याच्या मूळच्या कुरूपतेत भरच पडत होती. डोक्याला बांधलेला मळकट रुमाल आतल्या चिंध्या बाहेर दाखवीत होता. सदऱ्याला म्हणण्यासारखा रंगच नव्हता. कपाळावर आलेला घाम तो बोटांनी पुसून खाली झटकीत होता, जगाची सारी चिंता त्याच्या चेहऱ्यावर सामावली होती. विमनस्क स्थितीत तो उदासवाणा बसला होता.

--दुसऱ्याच सेकंदाला त्याच्या मुखावर किंचित समाधान झळकले. अंधारात चमकलेल्या काजव्यासारखे दिसले ते !

--त्याने मागितलेला चहा टेबलावर येताच बशीत ओतून तो पिऊ लागला. एक घुटका घेताच तो थांबला. त्याने आजूबाजूला पाहिले. आपल्या उद्योगात धावपळ करीत असलेल्या पोराला हाक मारली.

'भाऊ, थोडी साखर आणता– ?'

'ठीक आहे' मुलगा निघून गेला, त्या चार विद्यार्थ्यांनी आपसातच एकमेकांकडे पाहिले. प्रभाकर एकदम हसून उठला. बाकीच्या तिघांनीही त्याला साथ दिली. शरद जरा खोडकर होता. साखर मिसळून चहा पीत असलेल्या इसमाला त्याने गंमतीने विचारले.'

'काय भाऊ, कसं आहे सरबत ?'

'काय म्हणता तुम्ही ?' त्याने गोंधळून विचारले.

'नाही, म्हटलं, साखर झाली की नाही ?' गोविंदाने स्पष्टीकरण केले. तो इसम उमगला. मघाशी त्यांचे चहाबद्दलचे बोलणे त्याला आठवले. त्याचा चेहरा किंचित् शरमिंदा होऊन खाली पडला. पण फारच थोडा वेळ. पुनः त्यात करुण, अनुकंपनीय भाव मिसळले. त्याने वर प्रभाकराकडे पाहिले व एकेक शब्द उच्चारीत तो हळूहळू बोलू लागला—

'नशीबवान आहात साहेब तुम्ही. त्या चहाला चव नाही म्हणून आणि साखर जास्त आहे म्हणून तुम्ही तो फेकून देता, पण आम्हांला कसली आली आहे चव ! उगीच कधी कधी वाटतं, जिभेला काहीतरी गोड मिळावं म्हणून ! घरी पाच-सात जीव आहेत; त्यांना सर्वांना पुरवितो म्हटलं तर एका वेळी चार-सहा आणे लागतात. दहा रुपये महिना आहे साहेब माझा ! त्यात सहा जीव पोसून चार-पाच आणे कसे वाचतील ? दोन पैशांत चहा मिळतो. त्यातच थोडी साखर घालावी झाले ! उगाच हौस ! आमची कसली चव — '

—त्याने मध्येच थांबून चहा घ्यावयाला सुरवात केली. ते चौघेही विचारमग्न स्थितीत बाहेर पडले. कुणीही कुणाशी बोलला नाही.

—'चार इसम, दोन आणे- ' त्यांना हॉटेलच्या दाराजवळ पाहताच छोकरा ओरडला.

—बाहेर जाणाऱ्या आणि आत येणाऱ्या माणसांची दारात भेट होत असे. कुणीही कुणाकडे पाहत नसे. सारखी वर्दळ सुरू होती.

--बाहेर विजेच्या दिव्यांचा प्रकाश मंदावला. रात्रीचे आठ वाजले होते !

२४।८।३५

३१

मृत्यूची कृपा

तेल संपल्यामुळे दिव्याची वात खाली खाली जात होती तसतसा बाहेरचा अंधार आत येत होता. भरलेल्या ढगांना स्पर्श करून येणाऱ्या गार वाऱ्याने खिडकीची तावदाने बर्फासारखी थंड झाली होती. वरील झरोक्यातून वाऱ्याची झुळूक आली, की टेबलावर पडलेल्या वर्तमानपत्राची पाने फडफडत. बाकी सगळे शांत होते.

सुधाकरने दिवा मोठा केला. पलंगावर पडलेल्या रोग्याकडे स्निग्ध आणि असहाय्य नजरेने पाहिले. मन रमेना. वाईट बरे काहीच वाटेना. सुखदुःखाची संवेदना जणू महिरून गेली होती. हा रोगी कुडी तशीच टाकून उडून जाणार ह्याबद्दल त्याची खात्री होती. आशेचा अंधुक आसराही तेल संपलेल्या ज्योतीसारखा निराशा पोटात घेत घेत नाहीसा होत होता.

खिडकीचे दार किलकिले करून त्याने बाहेर नजर टाकली. अंधाऱ्या आकाशातून चंद्राची निस्तेज किरणे आवारातील तगराच्या फुलांवर पडली होती. ती त्याला प्रेताच्या थिजलेल्या डोळ्यांसारखी दिसली. तो चपापला आणि परत पलंगाजवळ आला.

जवळ येताच त्याला एकदम घाण आली. पण त्याने मुळीच नाक मुरडले नाही. डोळ्यांची उघडझाप करीत असलेल्या पलंगावरील अस्थिपंजराकडे पाहून पुन्हा त्याला भडभडून आले. हळूच त्याच्या केसांवरून त्याने हात फिरविला व केविलवाण्या स्वरात हाक मारली, " जयंत. "

जयंतने डोळे उघडले. सुधाकरच्या ओठांच्या सुकलेल्या पाकळ्या थरथरत होत्या. दोघांची दृष्टी एकमेकात मिसळली.

" सुधा, वीणा आली का रे ? "

ह्या गोष्टीत ज्या कविता घेतल्या आहेत त्या वेचवेगळ्या कवींच्या आहेत. गोष्टीच्या विषयाशी व कवींशी काही संबंध नाही. रसिकांनी पूजिलेल्या अत्यंत सरस अशा त्या कविता आहेत. काव्यप्रांत मला वावडा आहे. सबब स्वतः केलेल्या रद्दी कविता वाचकांवर लादण्याऐवजी मी जातिवंत कवींच्या काव्याकडे धाव घेतली आहे. खाली कवींची नावे दिली आहेत.

कडवे १, ३, ४ विनायक. कडवे २ गडकरी.
कडवे ५, ६, बोरकर, श्री. रा.

काय उत्तर होते सुधाकरजवळ ह्या प्रश्नाचे ? जयंतपासून वीणा कितीतरी मैल दूर होती. सुधाकरच्या नादी जयंत बिघडला अशी इतरांप्रमाणे तिनेही समजूत करून घेतली होती. आपल्या प्रेमात बांधा आलेला कोणत्या स्त्रीने सहन केला आहे ?

जयंतच्या प्रश्नाला सुधाकरच्या अश्रूंनी उत्तर दिले. अर्धस्फुट शब्दांत सुधाकर म्हणाला,

" जयंत, खरंच मी तुला जगातून उठवलं का ? माझ्यामुळेच तू जगाला पारखा झालास का ? तुला पण असंच वाटतं का ? तू कशाला जीव लावलास माझ्यावर ? मी तर जाणूनबुजून अजाण पोर... "

कुणी काहीच बोलले नाही. असीम, भेसूर अशी शांतता अंतःकरण जड करीत होती. घरट्यातून खाली कोसळून पडलेल्या पिलाने जिव्हारी लागलेली जखम सहन न होऊन चोच वासावी तसे जयंतने तोंड उघडले. जर्जर झालेले शरीर हालू शकत नव्हते. हात उचलावयाची शक्ती नव्हती. मावळत्या प्रकाशात जयंतने सुधाला न्याहाळले. त्याचे ओठ हालू लागले.

" सुधा, उगीच वाटलं मरताना वीणा दिसावी. तुझा दोष नाही त्यात. सारं तुझ्यापासूनच शिकलो. आज मला जे करता आलं थोडंबहुत ते तुझ्यामुळेच. वाईट एवढंच, की तुला सोडून जात आहे. माझी कविता... "

जीवनाचे काव्य जीवावरोबर संपले. दोन वाजले होते. मघाशी उघडलेल्या खिडकीतून वाऱ्याचा झोत आत आला आणि आतला जीवन-प्रकाश घेऊन गेला. सुधाने आपले ओठ जयंतच्या कपाळाला लावले. रोगांनी कुजून गेलेल्या त्या मांसाला स्पर्श करताना त्याला किळस वाटली नाही. जीव गुदमरला नाही !

पण आपण प्रेताचे चुंबन घेतो आहोत हे त्याच्या फार उशिरा ध्यानी आले. ज्यांना जगात परस्परांवाचून दुसरा आसरा नव्हता त्यांचे जीवन वेगळे झाले !

पहाटेपर्यंत ते प्रेत तसेच राहिले होते. जगाने काहीच दखल घेतली नाही मृत्यूची. सुधाकर एकटाच तेथे बसला होता. त्याच्या डोक्यात थैमान माजले होते. अंतःकरण निराशेने, किंकर्तव्यतेने व्यापले होते.

माणूस मेल्यावरही त्याला पैसा लागतो. कसे विलक्षण आणि विदारक सत्य आहे हे ! प्रेताची व्यवस्था कशी करावयाची हा सुधाकरला प्रश्न पडला. घरात काहीच नव्हते. जगाने संबंध तोडल्यापासून घराच्या भरंवशावर आजवर निभले. पण काय, आज ना उद्या भुकेने तडफडून मरण्याचा प्रसंग यावयाचा होताच !

सुधाकरने आपला एक गरम कोट बाजारात जाऊन पाच रुपयांना विकला. शिडी, बास इत्यादि सर्व सामान आणले. पण प्रेत एकटे नेणार कसे ? त्याचा उपाय तेथे थकला. कोण येईल ? त्याला अनंतशास्त्र्यांची आठवण झाली. रोशनचा नाच जेव्हा

जेव्हा जयंतकडे झाला तेव्हा अनंतशास्त्री नेमाने हजर होता. आज जयंतला खांदा द्यावयाला बोलावणे जाताच अनंतशास्त्र्याने खर्रकन् आपले तोंड उतरविले. यावयाची उत्सुकता दाखवली, पण उपाय नव्हता. घरी पत्नी गरोदर ! पतीला प्रेताचा स्पर्श शास्त्राविरुद्ध आहे. पुत्रप्राप्तीसाठी आज सतत वीस वर्षे नवस करणाऱ्या अनंतशास्त्र्याची बायको जयंत मेल्याबरोबर एकदम गरोदर असावी ! सुधाकर चिडला, निरुपायाने बाहेर आला. खिडकीवाटे अनंतशास्त्र्याचे शब्द त्याला ऐकू आले. "आपल्या हराम संगतीने त्याला जगातून उठविला नि आता फिरतो आहे आमच्याकडे खांदा मागायला ! हा का नाही मेला लेकाचा... "

सुधाकरचा चेहरा कोमजलेल्या फुलासारखा करपून काळाठिक्कर पडला. अनंतशास्त्र्याच्या मुखाने सारे जग त्याच्यावर निखारे फेकीत होते. काय शोभा होती जगाची याचना करण्यात ? दाणे संपलेल्या कणसाकडे पाखरे कशाला येतील ?

तो सरळ दारूच्या गुत्त्यावर गेला. जन्या, डोमा, निंब्या ही पोरे तेथे नेहमीप्रमाणे बसली होती. त्यांना त्याने बोलाविले. ती पोरे धावतच आली. जयंतने त्यांना कित्येकदा मदत केली होती. त्यांच्या अडीअडचणी जाणल्या होत्या.

सर्वांनी मिळून तयारी केली. प्रेत शिडीवर ठेवून दोरी कडसून बांधताना सुधाकर कळवळला. बाकीच्यांचे हात थरथरले. जयंतची प्रेतयात्रा निघाली. त्या कलावंताच्या हयातीत चोरून मारून का होईना पण भोवताली जमणारे समाज-धुरीण नावाला बट्टा लागेल म्हणून प्रेतयात्रेला हजर नव्हते. फुलझाड उकिरड्यावर वाढल्याबद्दलचा सात्त्विक संताप जगाने अशा रीतीने व्यक्त केला होता. मुलांफुलांचे अंतःकरण असलेला जीवात्मा पापात पिचून पिचून नाहीसा झाल्यामुळे पुण्यवान जग त्याच्यापासून दूर राहू इच्छित होते.

सरण रचून झाले. अर्धी लाकडे ठेवून झाल्यावर मध्ये प्रेत आणि वर पुन्हा लाकडे. प्रत्येक लाकूड ठेवताना सुधाकर पाण्यापासून दूर झालेल्या मासळीसारखा तडफडत होता. प्रेताला त्याने प्रदक्षिणा घातली, नमस्कार केला आणि सरण पेटविले. जन्या, डोम्या, निंब्या देखील रडू लागले. कोण कोणासाठी रडतो !

कवटी फुटल्याचा आवाज झाला, लाल हिरवे जाळ उठले. आधी, व्याधी, उपाधी जळून खाक झाल्या. पापात्मा नाहीसा झाला म्हणून गावच्या पुण्यवंतांनी समाधानाचा निःश्वास टाकला ! " अमुचा राम राम घ्यावा ' असे म्हणत चार दोस्त जगाच्या पाठीवर पांगले.

आजवर जवळ केलेल्या आशा-निराशांच्या राखेकडे पाहत जयंतचा आत्मा थोडा वेळ घुटमळला. ज्या ज्या गोष्टी त्याने सोडलेल्या शरीराला प्रिय होत्या त्या त्या गोष्टींकडे त्याने सतृष्ण दृष्टिक्षेप केला. रोशनच्या घराबर त्याने घिरट्या घातल्या.

थकून भागून संत्रस्तपणे झोपलेल्या सुधाकरच्या केसांशी तो खेळला. दारूच्या गुत्त्यालाही त्याने मेट दिली. तो जरी जगाला दिसत नव्हता तरी जग त्याला दिसत होते.

सुधाच्या डोळ्यांतून झिरपणाऱ्या प्रेमात त्याने पुन्हा एकदा स्वरूप पाहिले. तितकेच मनोज्ञ आणि सुंदर होते ते ! जगात मोठ्या म्हणून गाजलेल्या व्यक्तीलाही हे सद्‌भाग्य लाभले नाही.

तो वर देवाघरी जावयाला निघाला. पापपुण्याच्या खतावण्या घेऊन देवदूत समोर निघाले. त्यांच्या मागून जयंत वर चढू लागला. सारंगीचे सूर मनसोक्त ऐकून घेऊन ज्या जगाने शेवटी त्याची सतार फोडून टाकली तेच जग पुन्हा त्याला दुरून सुंदर दिसू लागले. वस्तू दुरूनच चांगल्या !

त्या जगात अजूनही वावरणाऱ्या त्याच्या सुधाकरविषयी त्याची आसक्ती कमी झाली नव्हती. " माझा सुधा काय करीत असेल आता ? " हा प्रश्न त्याने हजारदा विचारला आपल्या मनाला.

तो जसजसा वर जाऊ लागला तसतसे त्याचे आश्चर्य वाढत गेले. आभाळाची नितळ पोकळी त्याला भुरळ पाडू लागली. हिमालयाची शिखरे त्याने पायांखाली पाहिली. सारा उत्तर प्रांत ओलवणाऱ्या सिंधू, गंगा त्याला दुधाच्या धारांसारख्या दिसू लागल्या.

जमिनीवरून एकमेकांना चिकटून दिसणाऱ्या चांदण्यात हजारो मैलांचे अंतर असलेले त्याला आढळून आले. फुलासारखी दिसणारी कौमुदी अग्नीपेक्षाही दाहक भासली. देवदूतांबरोबर जात असल्याने त्याला आच लागली नाही एवढेच ! ज्याच्यावर त्याने आपल्या काव्यातून हजारो उपमा फुलविल्या, ज्या शीतल चंद्रिकेने त्याने आपले काव्य स्निग्धसान्द्र केले आणि ज्या दिव्य वातावरणाकडे पाहात तो सारे जग विसरत असे, त्याचे विश्वव्यापी स्वरूप...! विश्वाचा जगड्व्याळ पसारा पाहताच अदृष्टपूर्व असे विराट रूप पाहून हृष्टव्याकुळ झालेल्या अर्जुनासारखी त्याची स्थिती झाली व आनंदाने उत्फुल्ल होतो न होतो तोच भयाने 'प्रसीद देवेश' म्हणून तो प्रार्थना करू लागला.

समुद्राच्या पाण्यावरून ओसंडून चाललेल्या फेसासारखी चांदण्यांनी खच्चून भरलेली आकाशगंगा. तिच्या दुग्धप्रवाहात जणू अप्सरा, यक्षकिन्नर विलास करीत आहेत ! फेसाने अधिकच शुभ्र दिसणाऱ्या अप्सरा पाहिल्यावरोबर आपले पंख पसरून तरंगलहरीवर हळूच झोके घेणाऱ्या राजहंसाची आठवण झाली व लागलीच त्याने थोड्या वेळापूर्वी पाहिलेल्या मानस सरोवराकडे दृष्टिक्षेप केला.

तो वरवर जातच होता !

देवांच्या राज्याची तटबंदी दिसू लागली. मोठा दरवाजा लागला. यमदूतांनी नवीन येणाऱ्या मर्त्य जीवाचे नाव, गाव, पत्ता वगैरे नीट सांगितला आणि जयंत वर गेला.

सर्वत्र शांतता पसरली होती. दुरून मंदपणे मंजुळ आवाज ऐकू येत होता. दीपमाला नसताही आसमंत प्रकाशात न्हाऊन निघाला होता. सुंदर गीतालाप निघत होते. मधुर गीते गाइलेली ऐकू येत होती. स्निग्ध गंभीर घोष...पण काय ! कारणावाचून कार्य घडत होते.

जयंत विस्मयाने आजूबाजूला पाहू लागला. त्याला सगळेच अभिनव आणि सुंदर वाटले. त्याने निरीक्षण सुरू केले. येथे आल्यापासून त्याची दृष्टी अत्यंत तीक्ष्ण झाली होती. कितीही दूरचे त्याला दिसे आणि कितीही लांबचा आवाज त्याला ऐकू येई.

'स्वर्ग' एका मोठ्या दारावर सुवर्णाक्षरे लाविली होती. दाराचे सर्व खिळे हिऱ्या-माणकांचे होते. त्याने दाराच्या फटीतून आत डोकावण्याचा प्रयत्न केला. गुलाबी प्रकाशात सर्व लोक अमृतपान करीत होते.

"मला आत जाऊ देता का ?" त्याने द्वारपालाला सभ्यपणे प्रश्न केला.

"तुला ? नि स्वर्गात ? एका पोरीच्या नादी लागून आपल्या घरादारावर तू तुळशीपत्र ठेवलंस त्याची नोंद आमच्याजवळ आहे. तुझ्यासारख्या पापी लोकांना आमच्या इथे परवानगी नाही."

"पण महाराज, माझी पत्नी, माझी मुलंबाळंदेखील मला तेवढीच प्रिय..."

"मला वाद नको आहे. पापी लोकांना आत यायची बंदी करणं हे काम माझं. चल, बाजूला हो. बाकीच्या लोकांचा रस्ता अडवू नकोस."

जयंत तेथून निघाला. फिरून त्याने भटकण्याला सुरवात केली. प्रत्येक दारावर तो जायचा आणि तेथून त्याची पापी म्हणून हकालपट्टी व्हायची. 'ह्या मूर्ख लोकांनी मला मग जगातून उठवून आणलं तरी कशाला जर ह्यांच्या जवळ जागा नव्हती तर ?' असा त्याला प्रश्न पडला. जगाची त्याला आठवण होताच त्याने पृथ्वीकडे पाहिले. जग अगदी मुंग्यांसारखे उद्योगात होते.

पुन्हा तो एका दाराजवळ पोहोचला. द्वारपाळाने त्याच्याकडे निरखून पाहिले व त्याला प्रश्न विचारला, "काय हवं आहे तुला ?"

"मला आत जाऊ देता का ?" अत्यंत सभ्यपणे व किंचित् केविलवाण्या स्वराने जयंतने विचारले.

"तूं ? पण हो, तूं पापी असलास तरी जगात तू जिवंत असेपर्यंत तुझ्या तोंडून दुसऱ्याला बोचणारा एकही शब्द निघाला नाही. तुझी वाणी साखरेसारखी राहिली. जा तू आत. देतो तुला मी परवानगी. पण एक गोष्ट मात्र नीट लक्षात ठेव. एकदा आत गेलास, की बरेच दिवस बाहेर यायला मिळणार नाही. तुला तुझ्या कलियुगाकडे पुन्हा एकदा पाहायचं असल्यास सांग..."

ज्या जागेहून मृत्युलोक चांगला दिसेल अशा जागेकडे देवदूताने बोट दाखविले. जयंत तेथे जाऊन उभा राहिला. विश्वाच्या अनंतत्वाची कल्पना मनात उभी राहताच पृथ्वी वामनाच्या पायाखाली कशी सामावली ह्याची त्याला कल्पना येऊ शकली.

आकाशात उंच उडणाऱ्या घारीला आपले घरटे जसे नेमके दिसते व आपल्या पिलांवर तिची दृष्टी चटकन् खिळते तद्वत् जयंतला पृथ्वीवर वावरणारा सुधाकर चटकन् दिसला. तो एकटाच भटकत होता. उन्हाने काळवंडलेल्या आणि निराशेने करपलेल्या त्याच्या मुखाकडे पाहून जयंत कळवळला, "अरेरे, सुधाकर माझ्याकरितां वेडापिसा झालेला आहे." हे शब्द उच्चारताना त्याचा कंठ दाटून आला. सुधाकर हळूहळू आपल्याच तारेत म्हणत होता. ती जयंताची कविता होती—

मात्सर्याचा भरला वारा, अहंपणाचा सर्व पसारा।
अज्ञानाची मिरवे द्वाही, रसिकत्वाला थारा नाही।
काय अशा जनतेत रहावें, काय पहावे, काय चहावे?
बरे राहणे निर्जन रानी, ओढ्यासंगे गाणे गाणी।
या परि वैतागून कवीने, ओसाडीत स्वच्छंदाने।
वाजवला जो सुस्वर पावा, त्याचा का हा वास असावा? ॥ १ ॥

बाजार करून घरी परत चाललेल्या एका माणसाचे सुधाकरकडे लक्ष गेले. भाजीची पिशवी नीट धरून तो सुधाकरला म्हणाला, "परवा जो कुणी वारल्याचं वर्तमानपत्रात आलं त्याचाच ना तू मित्र?"

"होय, काय काम आहे आपलं?" सुधाकरने उत्सुकतेने विचारले.

"नाही अगदी सहज. त्याचा दोस्त राहण्यासारखा दिसलास म्हणून सहज चौकशी केली. तुझ्या त्या कवीत एक तरी गुण होता का रे?"

"महाराज, जगाला संदेश दिले आहेत त्याने!"

"अहाहा, काय त्याचं दिव्य चारित्र्य पण! नि तो म्हणे आम्हांला संदेश देणार!"

सुधाकरला फार वाईट वाटले, पण काय करणार? त्या गृहस्थाच्या पिशवीत असलेल्या केळ्यांच्या फणीकडे त्याचे लक्ष गेले. तो म्हणाला, "कशाच्या उपयोगी आहेत हो ही केळी?"

"वेड लागलं की काय तुला! लोक केळी कशासाठी आणतात एवढंही कळत नाही तुला?"

"मूर्खा, वेड तुला लागलंय. मासळ्या सडवून जिथे खत पुरवलं जातं त्या केळ-बनांतील केली मात्र तुला बनतात नाही का?"

" कोण बोलेल तुझ्याशी ! खाताना ह्या गोष्टी मनात आणायच्या असतात का ? नि असल्या गोष्टी सुचतात तरी कशा तुला ? संगतीचा परिणाम. दुसरं काय ! "

हा सर्व प्रकार पाहून जयंत आनंदला. सुधाकरबद्दलचा त्याचा अभिमान शतपटीने वाढला. विस्मयगर्भ दृष्टीने तो जगातील एकन् एक दृश्य पाहत होता. क्षणा-क्षणाला त्याचा चेहरा बदलायचा. कधी तो गंभीर दिसे तर कधी त्याचे तोंड उतरे. कधी हर्षाचा फुलोर त्याचा चेहरा खुलवून टाकी तर कधी तो शांतपणे हातावर हनुवटी टेकून बसून राही.

" भल्या माणसा..." तो द्वारपाळाचा आवाज होता. तो त्याला हाक मारीत होता. " इथे काय बसला आहेस मघापासून. अजून जगावरची दृष्टी उचलावीशी वाटत नाही तुला ? मृत्युलोकात असतास तर एवढ्या वेळात कित्येक वर्षे निघून गेली असती तुझी..."

स्वर्गातले घटिका तास जगाच्या कालमानात वर्षांनी मोजले जातात हे जयंतच्या लक्षात आले, पण फारच थोडा वेळ. आणि पुन्हा तो खालची दृश्ये पाहू लागला.

" अरे चल. दूधगंगेतून स्नान करून अप्सरा आलेल्या आहेत. आता लवकरच नृत्याला सुरवात व्हायची आहे. " द्वारपाळाने त्याला पुन्हा बोलाविले.

" होऊ द्या सुरवात. नाचरंग मी जगातच पाह्यले आहेत. मला त्यांची भूक मुळीच राह्यली नाही. इथे पाहा किती सुख आहे ते. " त्याने द्वारपाळाला आपल्या-जवळ बोलाविले व तो त्याला मृत्युलोक दाखवू लागला, " ते पाहा तिकडे. "

नदीच्या वाळवंटी सायंताऱ्याच्या स्निग्ध प्रकाशात चार-पाच तरुण मंडळी जमली होती. पाखरे आपापल्या घरट्यांत गेली होती. वातावरण नीरव होते.

" नाना, पुन्हा म्हण एकदा ती जयंतची कविता. " नाना कविता म्हणू लागला.

" असता आनंदाची माया
वृद्धी क्षणभर तिची कराया
लागे ज्याचा तोच गावया
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल—"
परंतु जेथे उदासीनता
व्याकुळ करिते विषण्ण चित्ता
तिथेच त्याला द्याया समता
गाणे गावे हेचि अमोलिक ईश्वरतेचे काम ॥ २ ॥

एवढे म्हणून नाना थांबला. मंडळी निस्तब्ध झाली.

" अरेरे, जिवंत होता तोवर त्याला कुणी सुख लागू दिलं नाही. मन मानेल तसा त्याचा छळ केला ! "

" कुणाचा छळ केला नाही जगाने ! पण तो छळही एकापरी त्यानेच ओढून घेतला. माणूस गेला. छळ संपला. आता तर जग त्याच्या कविता वाचतं ना ? शरीराचा छळ झाला. जयंतलाही त्यामुळे फारसं वाईट वाटलं नसेल. त्याची कविता पुजतं आहे ना जग ? "

सर्व पाहणाऱ्या व ऐकणाऱ्या जयंतने हर्षोत्फुल्ल नेत्रांनी एकदा देवदूताकडे पाहिले. पुन्हा तो दुसरे दृश्य त्याला दाखवू लागला—

चाफ्याच्या पाकळीसारखी सुकुमार असलेली एक तरुणी विमनस्कपणे खिडकीत बसली होती. गौरीकरिता फुलांच्या परड्या घेऊन लहान लहान मुली आपल्याच आनंदात चिमण्यांसारख्या चिवचिवत रस्त्याने चालल्या होत्या. तरुणीचे तिकडे मुळीच लक्ष नव्हते. ती हातातील पुस्तकाकडे नजर लावून उसासून म्हणत होती,

" वागविली निज हृदयप्रांती
भक्तीने रमणाची मूर्ती
भजली अर्पण करून त्याला
प्रेमाच्या पुष्पांची माला.
काय होय ते परि पुरुषाला
नव पुष्पावरच्या....." ॥ ३ ॥

पुढचे तिचे शब्द हृदय पिळवटून निघालेल्या हुंदक्यात विलीन झाले.

" बाला भग्न-मनोरथ झाली
मौक्तिकांपरी अश्रू ढाळी.
दुःखाने एकाकी स्फुंदे
काय तेच या स्थानी गंधे ? " ॥ ४ ॥

हे म्हणताना तिला कितीतरी दिलासा मिळत होतासा दिसला. प्रत्येक शब्दाबरोबर तिचा जीव हलका होत होता. सहसंवेदनेचा तो आनंद होता !

जयंतने तिसऱ्या दृश्याकडे बोट दाखविले, " तिकडे पाहा आता..." तो देवदूताला म्हणाला.

पहाटेच्या प्रसन्न वातावरणात आपल्या खड्या सुराने स्वयंसेवकांची एक तुकडी जगाला जागवीत रस्त्याने जात होती. प्रत्येक शब्द तोलून म्हटला जात होता.

" अवधि न उरला मांगल्याची लग्नघटी भरली-"

जगाचे व्यवहार सुरळीत चालले होते. कोणी एखादा मध्येच लकेर मारायचा आणि ती आपल्या काव्याची आहे असे जयंतला आढळून आले, की त्याने देवदूताला त्याबद्दल सांगायचे असा क्रम कित्येक तास चालला होता.

" वृंदाजनी तुज भेटेल माधव नीट सरळ जा या वाटेने।
दिसतिल तुज हरिचरण उमटले यमुनेच्या काठा-काठाने " ॥ ५ ॥

" ही कविता मी..."

" थांब, मध्ये बोलू नकोस. ती बाई पाहा काय म्हणते ते..." जयंतच्या तोंडावर देवदूताने हात ठेवला. त्याचेही मन रमले होते. त्याला हा सर्व पहिलाच अनुभव होता. प्रेमाच्या ठरलेल्या गाण्याशिवाय त्याने अप्सरांना काहीही म्हणताना ऐकले नव्हते. देवदूत खालून येणारे आवाज एकाग्रतेने ऐकत होता.

" सांगितलेल्या कामाचा, दिलेल्या तुकड्यावरी
कुंकवाचा धनी माझ्या खाजगीवर चौधरी
सोन्याची पुतळी पोर सोने पेरुनि परणिली
देह गेला स्मशानात उरली घरी साउली
आली वेळ विवाहाची नावाचा पति जाहला
चितेच्या पूजनासाठी सतीचा आहुती दिला–" ॥ ६ ॥

आपल्या जीवाच्या आतल्या गाभ्यातून आपण आलाप काढावा आणि तो ऐकून सर्वांच्या चित्तवृत्ती तल्लीन व्हाव्यात, त्यांच्या सुखदुःखांना पाझर फुटावा व त्यांचे झरे सुरू होऊन जगाचा थोडा वेळ विसर पडावा...

जयंतच्या डोळ्यांतून त्याचे अंतःकरण झिरपत होते. ते अश्रू त्याच्या सुकलेल्या चेहऱ्यावर तिसांजीच्या काजव्यासारखे चमकले !

देवदूत गहिवरून दयेने त्याच्याकडे पाहू लागला. " किती वेळ दडणार तू इथे आता ? "

" नका हो, मला आत नेऊ नका. आत जे आहे ते सारं मी भोगून आलो आहे नि ते इथे भोगायचं सोडून मृत्युलोकी भोगल्याबद्दल जगाने माझा तिरस्कारही केला आहे. नयनांचा एवढाच सोहळा काय तो राह्यला होता. नको मला तुमच्या स्वर्गातलं दालन. ते पाहा...पाहा तर जरा..."

जयंत आपली भुकेली दृष्टी जगातील दृश्यांकडे लावून बसला होता. पर्याकुल, पर्यत्सुकतेमुळे त्याचे ओठ विलग झाले होते. आवेगाने त्याचा कंठ मधून मधून भरून येत होता !

आकाशगंगेतून विलास करून उल्लसित झालेल्या गंधर्वांनाही त्याचा ह्या सुखाचा हेवा वाटला. स्वर्गाचे दार उघडेच टाकून ते त्याच्याकडे क्षणभर पाहत राहिले.

जयंत स्वर्गात होता !
त्याचे यशःशरीर तेजःपुंज दिसत होते !

५।९।३५

३२

एक अनावश्यक गोष्ट

हस्त नक्षत्र संपत आले होते. पावसाचा संभव नाहीसा झाला होता. दिवाळीची सावली वातावरणात विरल विरल दिसत होती.

पहाटेचा कोरडा परंतु थंड आणि मंद वारा वाहावयास सुरवात झाली. झाडांची पाने सळसळ आवाज करीत आपल्या नादात नाचू-गाऊ लागली. दिवाळीचा आनंद त्यांच्यावरही टवटवला होता. जीव उघडा करून कुणालाही असेल नसेल ते सांगून टाकावेसे वाटे !

उन्हाच्या ऐन भरात उष्णतेने काहिलून सुस्कारीत असताना नांगराचा फाळ पोटात खुपसला गेला, त्या वेळी पृथ्वी विव्हळली असेल; पण आज धान्याचा कोंब फुटल्यामुळे जन्मदात्रीचा आनंद तिच्या मुखावर विलसत होता. कधीतरी जीव आसुसून डोळ्यावाटे अश्रू पाझरल्यावर आनंदाचा उन्मेष जिवाला हसवून जातो. बालरवीची उगवती कोवळी किरणे ओठ विलग करतात, पण मावळत्या किरणांनी उगीच डोळ्यात आसवे उभी राहतात ! निसर्गाच्या आपापतः घडणाऱ्या या दोन्ही परिणामांत सुख-दुःखाचे झिरपे झरतात. त्यांची सीमारेषाही दिसत नाही !

त्या प्रशस्त आणि भव्य बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावरील पश्चिमेकडच्या खोलीत एका पलंगावर तीस-बत्तीस वर्षांची तरुणी डोळे मिटून स्वस्थ पडली होती. आजारामुळे तिचा चेहरा सुकून गेला होता. पण ती कृशतादेखील तिच्या हेमकांतीला शोभा देत होती. तिने मऊशी दुलई छातीपर्यंत ओढून घेतली होती, त्यामुळे वातावरणातील गारवा तिला सुखदच वाटे. पश्चिमेकडच्या खिडक्यांचे निळे पडदे ओढल्यामुळे वारा आत येऊ शकत नव्हता. एखादी झुळुक आत डोकावून तिच्या केसांशी खेळून जाई. सूर्यकिरणेदेखील मार्ग बंद झाल्यामुळे पडद्याआडच थबकली होती. त्या वेळी त्यांच्या हसऱ्या डोळ्यांचा जेवढा प्रकाश पडेल, तेवढाच फक्त आत येत होता.

खोलीचे दार हळूच किलकिले झाले आणि पुन्हा लोटले गेले. एक सोळा वर्षांचा तरुण आत आला. त्याची कांती रसरसलेल्या लिंबासारखी मोहक होती. त्याच्या आणि तिच्या तोंडावळ्यात विलक्षण साम्य होते. फक्त गांभीर्याचा अंश तरुणीच्या डोळ्यांत थोडा अधिक दिसे !

त्याने हातांतले पुस्तक स्प्रिंगच्या खुर्चीवर ठेवले व तिच्या पलंगावर टेकून तिला हळूच हाक मारली, " ताई ! "

ताईने डोळे उघडले नाहीत. तो हलकेच उठला आणि खुर्चीवर बसून त्याने पुस्तक उघडले. तो भराभर पाने चाळीत होता. त्याचे विशाल डोळे प्रत्येक अक्षर आत खेचून घेत होते. थोड्याच वेळात तो भोवतालचे जग विसरला.

ताईचे डोळे हळूच उघडले गेले आणि तिची पहिली नजर अविनाशवर खिळली. जगाला संदेश सांगणाऱ्या प्रेषितासारखा तिला तो त्या वेळी दिसला !

किंचित् मान उंचावून तिने त्याच्या पुस्तकाकडे पाहिले, पण नाव दिसत नव्हते. आज तीन दिवसांपासून ती त्याला पुस्तक वाचण्यात मग्न झालेला पाहत होती. ती जागी होईपर्यंत तो ते पुस्तक वाची आणि नंतर परत जाई. तिला जिज्ञासा उत्पन्न झाली.

" अवि, कसलं आहे रे ते पुस्तक ? " अविनाश आपल्या तंद्रेतून जागा झाला. त्याने पुस्तक चटकन लपविले व हसत हसत तो ताईकडे आला.

" केव्हा जागी झालीस तू ? ताई, कसं वाटतंय् तुला आता ? आज बरं आहे नाही का ?

" मला पुस्तकाचं नाव सांग. नीटसं दिसलं नाही मला ते...Chemical... नि पुढे काय ? "

" काय करायचं आहे तुला ? खरंच तुला आनंदात पाहिल्यावर मला किती बरं वाटलं—माझी ताई तू ! "

त्याने ती गोष्ट सफाईने बाहेर फेकली. तिचे केस सावरण्याच्या मिषाने त्याने तिच्या डोळ्यांपुढे हात आणला. तिची शोधक दृष्टी आपल्यावरून काढून घेण्याची ती त्याची युक्ती होती.

" अवि ! माझ्याशी टाळाटाळ करतोस ? तुला काय वाटतं, मला त्या पुस्तकाचं नाव माहीत नाही ? माझ्याजवळून परवा नेलेले ५० रु. व त्या पुस्तकाचे पहिले अक्षर यांचा संबंध मला सहज कळू शकतो. "

" ताई, उगीच डोक्याला त्रास देऊ नकोस. आता कुठे तुला थोडंथोडं बरं वाटायला लागलं आहे. ते पुस्तक म्हणजे काय आम्हांला recommend केलेलं chemistry practical चं आहे. "

" अविनाश, " ताई त्याच्यावर नजर रोखून पण प्रेमळपणाने म्हणाली, " मला फसवू नकोस. चार दिवसांपूर्वी तुझ्याजवळ पोटॅशियम सायनाइड व अर्सेनिक आणण्याकरिता भिळविलेले परवाने पाहिलेत मी ! "

" मी सायन्सचा विद्यार्थी आहे, हे तू विसरतेस. बरं मी दूध आणतो तुझ्यासाठी. तू पड स्वस्थ. "

अविनाश जावयाला उठला. ताईच्या लक्षात ही गोष्ट चटकन आली. तिच्या

खोल हृदयात कसलीतरी चाळवाचाळव झाल्यासारखे तिला वाटले; परंतु वर काहीच न दाखविता ती शांतपणें म्हणाली—

" मला काही नको. फक्त तेवढ्या उश्या माझ्या पाठीशी लाव. मी टेकून बसते जरा ! "

विषयांतराची आयती आलेली संधी त्याने दवडली नाही. अगदी तत्परतेने ते सारे केले आणि आपण जावयास निघाला. तिने त्याला जवळ बसवून घेतले. तिची दृष्टी शून्यात विलीन झाली होती. मंद निःश्वासाशिवाय तिने किंचित्काल कसलीही हालचाल केली नाही. एखाद्या सुंदर आणि हृद्य देखाव्याकडे दृष्टीचा वेध लागावा आणि तिचे प्रतिबिंब नेमके आपल्या मुखावर उठावे तसे तिच्या डोळ्यांत सुखदुःखाचे भाव तरंगताना दिसले.

अविनाश तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहत होता. तिला ते जाणवले, तिने नजर वळविली.

" अवि, कसले उद्योग आरंभले आहेस तू ? आज मोत्यांचा घास तुला मिळतो आहे. "

" मघापासून मी तो विषय टाळण्याची शिकस्त करीत आहे; पण तू मात्र विसरली नाहीस. " तो एकदम म्हणाला–

" तुला काय म्हणायचं आहे, हे कळते मला. श्रीमंतीत मुरलेले हे भित्रे विचार..."

" अ हं, तसं नाही रे,—पण एका लक्षाधीशाचा मुलगा तू. बाबांना काय वाटेल उद्या तू असलं बरंवाईट करू लागलास तर ? "

" काय वाटायचं आहे ? वाईट वाटेल ! रडतील थोडा वेळ ! आणखी ? पण कर्तव्याचे सुख मला मिळेल. मेल्याचं दुःख नाही वाटायचं. दिव्यावर झडप घातल्याचीच धडाडी– न विझेना दिवा. "

हरवलेल्या मोतीमाणकांचा खूप शोध करूनही पत्ता लागू नये आणि एकदम ती हाती लागली, म्हणजे विस्मयचकित होऊन आपण त्यांच्याकडे संशयगर्भ दृष्टीने पाहत राहतो, तसलीच छटा ताईच्या चेहऱ्यावर उमटली; पण फार थोडा वेळ !

" मला नाही आवडत या गोष्टी अविनाश ! माझ्यापासून तू दूर राहावास ही कल्पनाच सहन होत नाही मला. "

" कशी होणार ताई ? माझ्यापरता जग माहीत नाही. कोणताही vision समोर नाही. श्रीमंताची पोर. तुला लोकांच्या उपासमारीच्या किंकाळ्या काय ऐकू

येणार आहेत ! फुलात लोळणारी तूं ! गुलालाच्या पडद्यातून तुला बाहेरचे रुधिरप्रवाह कसे दिसतील ? ”

“ पुनः आलास आपल्या मूळ पदावर. काय करावयाचं ते इथून करता येईल तुला. पैसे आहेत तुझ्याजवळ. परवा तुमच्या ××× करिता नाही तू मला ५०० रु. मागितलेस ? ”

“ आऽहा ! काय उपकार केलेस मोठे ५०० रु. दिले तर ! आतापर्यंत गरिबांचा पैसा दडपून बसलो. त्याचा एक सहस्रांशदेखील भाग नाही हा. कसली सहानुभूती नि आभार मानायचे तुझे ! ”

“ मला कळतं आहे सारं. ”

“ ताई, काही कळत नाही तुला—तुझं वाचन दांडगं असलं, तरी तुझं वातावरण तुला विचार करू देत नाही. मला राहून राहून माझ्याबद्दल धन्यता वाटते. देवाने माझं रक्त मात्र इतकं मेलेलं दिलं नाही. एरव्ही मी देखील तुझ्यासारखाच बोलला असतो... ”

“ अवि, मी काहीतरी बोलत नाही. सारं अनुभविलं आहे मी. काय अनुभवावयाचं राहिलं आता ?—” तिचा गळा भरून आला होता. अविनाशकडे पाहताच वात्सल्याचा उमाळा येऊन तिने वरील शब्द कसेबसे उच्चारले. “ तू लहान होतास. तुला कळत नव्हतं; पण तुझी प्रत्येक हालचाल माझ्या नजरेतून सुटली नाही. पिलाला पंजाच्या बाहेर सोडून त्याच्याकडे पाहत बसणारी सिंहीण !–त्याच नजरेने मी तुझ्यावर अवधान ठेवले होते. तुझाच वेध होता मला; पण या पंधरा दिवसांतली तुझी एकंदर वागणूक पाहून मला तुझी भीती वाटायला लागली. दुखलेलं मन कुणाच्यातरी आसऱ्याला धावून येतं—परवा तुझ्या वाढदिवसाच्या दिवशी तुला ओवाळताना माझा हात थरथर कापला. ”

“ ताई ! काय बोलतेस तू हे ? काय दिसलं तुला माझ्या वर्तनात ? तुला कुठे सोडून चाललो आहे मी ? कल्पना तरी कशी आली तुला ? त्या बाटल्या मी लॅबोरेटरीतून मुद्दाम नीट तपसावयास प्रोफेसरांकडून आणल्या आहेत. ”

“ तुझ्या पेटीत मला परवा विश्वास रानडेचा फोटो दिसला. ”

“ ते माझं दैवत आहे ताई ! त्यांची धडाडी दुर्दैवाने माझ्यात नाही. त्यांच्या मानाने माझे रक्त कमालीचं थंड आहे. मग ते काश्मीरला जन्मल्यामुळे की काय न कळे– पण मला जो विलक्षण आदर आहे त्यांच्याबद्दल, तो केवळ त्यांचा त्याग अलौकिक व बुद्धी असामान्य म्हणून ! ”

“ तुझा आदर अनाठायी नाही. बाळ, पण तो फोटो तुझ्याजवळ... ”

“ आलं तुझं स्त्रीहृदय तुझ्या मदतीला. मोठी धीराची म्हणवितेस आणि आता तुझ्या आवाजात कापरेपणा का म्हणून ? परवा तू मला नेपोलियनचं काव्य वाचून

दाखविलंस—What a ballad my life has been–ते वाक्य माझ्याकरिता नव्हतं वाटतं ?"

अविनाशच्या प्रेमळ शब्दांतून गर्भित असणारा उपहास तिला मुळीच सहन झाला नाही. अग्नीत प्रवेश करीत असलेल्या सतीच्या निश्चयाने तिने सारे दाबले. दृष्टी अंतर्मुख करून ती आपल्याशीच म्हणाली—

" जीवन-सूक्त लिहायला रक्ताचीच शाई वापरतात...हो असंच—"

" पण तुला हे वाक्य आवडलं, ते केवळ त्याला literary value आहे म्हणूनच ना !"

ती काहीच बोलली नाही. थोडा वेळपर्यंत तिच्या पापण्यांची उघडझाप चालली होती. तिने एक दीर्घ निःश्वास टाकला आणि कपाळावरची आठी नाहीशी केली.

" अवि, आज मी तुला एक पत्र देणार आहे वाचायला. आता तुला वाचायला काहीच हरकत नाही. माझ्या टेबलातील डाव्या खणात एक पाकिट आहे मोठं. ते आण इकडे माझ्याकडे."

अविनाश चटकन उठून तिकडे गेला.

वाचताना अविनाश अडखळत असे. अक्षर घाईने आणि क्षुब्ध मनःस्थितीने लिहिल्यासारखे स्पष्ट दिसत होते. तो अगदी मन लावून वाचीत होता.

मध्येच त्याने ताईकडे पाहिले. ताई डोळे मिटून स्वस्थ झोपल्यासारखी पडली होती. मंद वारा आत आला की, तिच्या पापण्या किंचित् विकसित होत; पण पुनः ती त्या मिटून घेई. हृदयात जागं झालेलं जगच पाहत होती जणू ती ! अविनाश वाचू लागला :—

" पावसाच्या मुसळधारांनी सारी चराचर सृष्टी सडकून निघत होती. क्षणोक्षणी चमकणाऱ्या विजा आणि त्या एकमेकांवर आपटून होणारा कडकडाट हृदयाला धक्के देत होता. आसरा सुटल्यामुळे भीतीने गांगरून जाऊन पृथ्वीने पाण्यालाच कवटाळले व ती त्याच्याबरोबर स्वैर धावू लागली...

" अशा प्रलयकालीही मनुष्याचे व्यवहार सुरळीत चालू होते.... राक्षसी गतीने एखाद्या चिडलेल्या नागिणीसारखी फुस्कारीत चालणारी आगगाडी निसर्गाच्या एकाही डुरकावणीला बिचकली नाही. काळ्याभोर रात्री ती पोटातले निखारे बाहेर फेकीत चालली होती. डब्याच्या सर्व खिडक्या लागल्या होत्या आणि आतल्या उतारूंनी पांघरूण अंगाशी लपेटून गप्पा माराव्यास सुरवात केली होती ...

" सेकंड क्लासच्या एका डब्यात दोन व्यक्ती बसल्या होत्या. एक सोळा वर्षांची तरुणी आणि दुसरा बावीसच्या घरातला तरुण. दोघांचीही मनःस्थिती मग्न दिसत

होती...पर्वत झेलावयाचा आपण निश्चय करावा, परंतु त्याखाली आपला चुराडा तर होणार नाही ना ? अशी शंका हृदयात डोकावून उगीच जीव व्याकुळ व्हावा, तसे त्या मुलीला झाले होते.....काचेतून तिने बाहेर पाहिले.....बाहेरचा अंधार आणि आतला...

"रजनी, किती भित्री आहेस तू. माझ्या सहवासाचा तुझ्यावर..."

..."नाही राहवत मला एकटं; अजूनदेखील पाहा. मी तुमच्यापुढे पदर पसरते...माझी स्थिती काय होईल..."

..."रजनी, माझा पाय मागे ओढतेस तू ! मी जर गेलो नाही, तर आज आमच्या चार वर्षांच्या प्रयत्नांवर पाणी पडेल आणि साठ-सत्तर लोकांच्या देहांच्या चिंधड्या होतील;..."

—"पण त्याकरिता दुसरा एखादा उपाय नाही का ?"

—"उपाय ! रजनी, एकच उपाय की, मी जाणं आणि पोलिसांची तुकडी माझ्या मागे लावून घेणं; इकडे ते गुंतले की, तिकडे आमचं काम फत्ते !... आज तू अशा परिस्थितीत असताना मी तुला मुळीच सोडून गेलो नसतो; पण करणार काय...साठ लोकांच्या प्राणांपेक्षा माझे प्राण तुला जास्त मोलाचे खात्रीने नव्हत... किती धीर सोडतेस तू ! किती मौज आहे असल्या मरणात ! येऊ दे लांडग्यांची तुकडी. बाहेरचा खवळलेला निसर्ग समोर आणि मागोमाग लागलेला लांडग्यांचा कळप...धडाडी दाखवावयास याच्यासारखी सुवर्णसंधी येणार नाही."

"पण तुम्ही गेल्यावर...खरंच मला माझ्या जिवाची भीती नव्हती, पण त्या अभद्रकाचं...मी काय करू ?"

"रजनी, तुला माझं कार्य पुढे करायचं आहे. चळवळीला पैसा पुरवायला तुझ्याशिवाय कुणी नाही."

"ते मी करीन; पण...उद्या...हा मुलगा जन्माला आला की, माझी दशा काय होईल ? तुम्ही राजरोस लग्न केलं असतं, तर या मुलाला घेऊन मी जन्मभर राहिले असते."

"खरं आहे तुझं म्हणणं ! पण लग्नाला तरी अवधी मिळाला का आपल्याला ! काय दैवाचे खेळ आहेत ! एक महिना सुटका झाली..."

"पण अजूनही अवकाश आहे. पुढच्या स्टेशनवर उतरून आपण लग्न..."

"छे, छे, या इथे मृत्यूच्या मांडीवर लग्न करण्याइतका मी शहाणा नाही... माझ्या आयुष्यात तुझ्याशी विवाह करण्याचंच कर्तव्य नाही मला...आणि तुलाही समाजात एवढीच खळबळ उडवायची नाही...उद्या फासे उलटे पडून मी जगातून कायमचा नाहीसा झालो, तर माझी आठवण करीत जन्मभर रडशील तू ! लोक चार

दिवस तुला मोठी धीराची अन् ध्येयाची म्हणून तुझी स्तुती करतील; पण भोग तुलाच भोगावा लागेल जन्माचा. मग तुझं कर्तव्य फक्त रडण्याचं...”

“ मग आज हा मुलगा जन्माला आला तर लोक नावे— ”

“ लोकांना नावं ठेवायला संधी द्याच कशाला ? माझ्याशी आता लग्न करून तुला चांगलं राहता येईल, असं तुला वाटतं, ते चूक आहे. माझी पत्नी म्हणून जन्मभर तुझ्या मागावर पोलीस राहतील आणि मग तुझी प्रत्येक हालचाल ते टिपून ठेवतील... तुझे पैसे कुठे जातात ... रजनी ! त्या मुलाचं काय घेऊन बसली आहेस ! रस्त्यात आडवी येणारी धोंड आहे. जन्मल्याबरोबर कापून काढ त्याला.....भलत्या वेळी भाववश होऊन चालणार नाही... ”

“ कापून ? ... ” रजनीच्या अंगावर शहारे उठले.

“ तुला कल्पना नाही. ते मूल जिवंत राहिलं, तर लोकांना तेवढाच बोलावयाला विषय मिळेल. आपल्याबद्दल विचार करताना ते या दृष्टीने विचार करतील, स्त्री पुरुष-संबंधावर व सुधारणेवर वेजबाबदार व्याख्याने झोडतील आणि वर्तमानपत्रांतून मारे ‘ खळबळ उडवून देणारा प्रश्न ’ म्हणून त्याची चर्चा सुरू होईल. कावळ्याला जखमच दिसावयाचा अवकाश. लोकांचे लक्ष मी भलत्याच दिशेने वेधू इच्छीत नाही. आपल्या कार्याच्या दुसऱ्या बाजू त्यांना दिसल्या पाहिजेत. माझ्या कार्याविषयी अविश्वासाची कल्पनादेखील मला सहन होत नाही. आपल्या जीवनाचे सर्वत्र धागेदोरे लोकांना दाखविण्यात काय अर्थ आहे... ”

...रजनीने सर्व गोष्टींचा विचार केला... पण मूल कापून काढण्याची कल्पना ! त्या वाक्याची दाहकता तिला कितीतरी वेळ जाणवली. तिने त्या तरुणाकडे एकवार पाहिले. अलौकिक बुद्धिमंताच्या आयुष्याची गुंफण किती एकेरी असते, याचा तिला अनुभव आला; पण म्हणून त्याच्याबद्दलचा तिचा आदर मुळीच कमी झाला नाही. प्राप्त परिस्थितीत तो सांगतो, त्याच्याशिवाय दुसरा उपाय नव्हता ...नीती ... अनीती ... पण आपण वाईट केले आहे, असे रजनीला स्वतःला स्वप्नातही वाटत नव्हते. तेव्हा प्रश्नच नव्हता... मग त्याला उगीच मागे खेचणारे विचार सांगा कशाला ?....ती इतर गोष्टी बोलू लागली...लवकरच त्यांचा हास्यविनोद सुरू झाला...

“ पुढे काय करावयाचे, कोणत्या दिशेने कार्याला हात घालावयाचा, यां-संबंधीची माहिती रजनीने लिहून घेतली. आगगाडी भर जंगलातून जात होती. कोणतेसे स्टेशन आले. त्या ठिकाणीं ××× उतरून पडला. त्या भीषण वादळात आणि पावसात त्याने तिचा निरोप घेतला. अंधाराच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या त्याला..... रजनीच्या हृदयाने ठाव सोडला....परंतु तिच्या डोळ्यांत आसवे नव्हती ! ”

“ आपण जे केले, ते का केले, हे रजनीला कळत होते. त्यात अनिष्ट जरी काही नसले, तरी केलेल्याचे परिणाम भोगणे भाग होते. पित्याच्या वात्सल्याचा ओघ

अविरतपणे तिच्याकडेच वाहत होता; परंतु ही गोष्ट ...! आईचा जिव्हाळा फार तर पाझरेल. तथापि यातून मोकळे होण्याचा मार्ग ?

" तिने आपल्या पित्याला सर्व गोष्टी स्पष्टपणे सांगून टाकल्या. तिने एक लांबलचक पत्रच लिहून दिले होते. वत्सल पिता तिच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाला– " रजनी ! सर्व गोष्टींकडे माझं पूर्वीपासूनच लक्ष होतं; परंतु विसूचं नि तुझं लग्न व्हावयाचे निश्चित असल्यामुळे मी..."

" आता ती गोष्ट पुढील जन्मी ! " रजनीचे मस्तक पित्याच्या बाहूवर विसावले होते. घाबरलेल्या हरिणीच्या अवस्थेची त्यांना आठवण होत होती.

तिचे वडील तिला म्हणाले— ' विसूनं सांगितलेल्या उपयाशिवाय त्याला दुसरा उपाय नाही. '

" बाबा, जन्मताच मुलाचा प्राण घेऊ ? " हे वाक्य उच्चारताना रजनीची जी अवस्था झाली हीती, ती पाहून पित्यालाही गहिवरले. त्याने आपला आवाज दाबून हळूच म्हटले—' जा, बेटा ! तुझ्या हिताचंच करीन ! काळजी करू नकोस. माझ्यावर विश्वास ठेव ! '

" जे घडले आणि जे घडावयाचे आहे, त्या दोन्ही घटना तिच्या डोळ्यांसमोर चित्रित झाल्या की, ती भ्रांतचित्त होऊन जात असे. ती म्हणे—' मी स्वप्नात तर नाही ना ? परवाच्या भयंकर वादळाची तिला आठवण होताच त्यात गडप झालेल्या जिवाच्या भवितव्याचा विचार तिला सोडून द्यावा लागे. पुढच्या अज्ञाताची कल्पना आल्यावर त्यात क्षणभर चमकून लुप्त होणाऱ्या ठिणगीची जाणीव तिला असह्य होई. तिला वाटे ' हीच ती अबला, जी जागी होऊ पाहत आहे. ' त्यातल्या त्यात एकच सुख होते. ज्याच्यासाठी आपण हे सोसणार, तो ढगासारखा स्निग्ध गंभीर होता.

जीवनातील छायाप्रकाश ती डोळे मिटून पाहत होती..."

हे सर्व वाचत असताना अविनाशला कसलीतरी शंका आली. त्याने आपल्या बहिणीकडे पाहिले. तिचे डोळे शांत, शून्य असे त्याला दिसले. तो पुढे वाचू लागला :–

" मातेचा जिव्हाळा म्हणजे काय, याची कल्पना रजनीला आता आली. पित्याबद्दलही तिचे सद्भाव वाढावयाचे होते..."

मधली बरीच अक्षरे अविनाशाला नीटशी निघेनात. ती मनाच्या विलक्षण चंचल, आवेगपूर्ण स्थितीत लिहिली गेली असावीत. हकीगतीतील तृतीयपुरुषी सर्वनाम आता प्रथमपुरुषी झाले होते, त्यामुळे स्वतःच्या भगिनीबद्दलचा त्याच्या मनातला संशयाचा दोरा जास्तीच पिळला गेला. वरवरून शांततेचा आव आणून तो वाचू लागला :—

"आम्ही काश्मीरला गेलो, आईची प्रकृती एकाएकी बिघडल्याचे निमित्त झाले. डॉक्टरांनी दीड वर्षांची विश्रांती सुचविली होती. अर्थात् तिकडे दीड वर्ष राहावयाचे. बाबा, आई आणि मी—आमची तयारी झाली. अण्णा, भाऊ वगैरेना सुट्टी नव्हती व त्यांना बरोबर घेण्याचे कारण नव्हते."

या वेळी तर कितीतरी वाक्ये निघत ना. अविनाशची दृष्टी वर ताईकडे गेली, तो त्याला दिसून आले की, तिच्या डोळ्यांच्या टपोऱ्या झाकणांतून आसवे झिरपत होती.

"ताई" परंतु अविनाशच्या या हाकेला ओ मिळाली नाही. "वाचून झाल्यावर बोल माझ्याशी" एवढे उत्तर मिळाले. त्याची दृष्टी अक्षरांवरून फिरू लागली. त्याच्या दोन्ही वडील भावांची नावे त्यातील नावांशी जुळत होती. त्याच्या बहिणीचे नाव रजनीच, याबद्दल त्याला आता संशय उरला नाही.

"लवकरच बाबांनी अण्णांना एक पत्र धाडले. त्यात लिहिले होते, आईला मुलगा झाला. माझी स्थिती विलक्षण झाली. असले माता-पिता मला माझ्या जन्म-जन्मांतरीच्या पुण्याईनेच लाभले होते. देवाचा विचार त्याच दिवशी माझ्या मनात आला. आमच्या हातून जे काही घडले त्यात ... पण देवावरच्या श्रद्धेची माझी विवशता माझ्या विश्वासला मुळीच रुचली नसती!

"दोन महिन्यांत ते अर्भक आकारावर आले. माझा व त्याचा तोंडवळा अगदी सारखा होता.

"परंतु बहीणभाऊ नाही का एकाच वाणावर जात? त्याला माझा भाऊ म्हणून ओळखायला इतरांना मुळीच पंचाईत पडली नाही.! 'आई—बाबा—' हे शब्द उच्चारताना अगदी जीव भरून येतो माझा!

"तत्कालीन पत्रांतून सारख्या बातम्या उफाळत. विश्वास रानडेला पकडावयास १०,००० रुपयांचे बक्षीस लावले होते; परंतु अजूनही कुणाला पत्ता लागला नाही. आज या गोष्टीला १६ वर्षे झाली. विश्वासच्या कामाकरिता आजवर बाबांनी कितीतरी पैसे खर्च केले.

"खंबीर मनाची, मोठ्या निश्चयाची व एक सुशील कुमारिका म्हणून जग माझ्याकडे पाहते. त्याला तसे पाहू देण्यातच माझे यश आहे. विश्वासचे वाक्य मला वारंवार आठवते.

"अनावश्यक, व्यर्थ गोष्टींकडे समाजाचे लक्ष केंद्रित करण्यात काय अर्थ? त्या गोष्टीने इष्ट कार्य मुळीच तडीला लागत नाही." कसे सोन्यासारखे वाक्य आहे हे? असल्या गोष्टीचा कुणाला तोल असतो का?

"आज आमचा अविनाश ..."

अविनाशने यापुढे मुळींच वाचले नाही.

"ताई ,विश्रास रानड्यांचा मी मुलगा आहे ?" हा प्रश्न विचारताना त्याच्या चेहऱ्यावर हर्ष, खेद, विषाद, चांचल्य यांपैकी कसलेही भाव उमटले नव्हते. उभयतांची दृष्टादृष्ट होताच हवे असलेले उत्तर त्याला मिळाले.

"ताई ? तूं कोण ? कशी ? कशाची बनली आहेस ?"

"म्हणूनच अवि, तुला विनविते रे की, मला सोडून तू दूर जाऊ नकोस. तुझ्या रक्ताची मला फार भीती वाटते. माझं मन कसं थरथरतं. मला काहीही म्हण अवि, पण जाऊ नकोस."

परस्परांनी आपले नवे रूप परस्परांच्या अश्रूंतून पाहून निरखून घेतले !

जगातल्या असंख्य माणसांपैकी एकाचेही या 'अनावश्यक' गोष्टीकडे लक्ष नव्हते !

२३।९।३५

३३

तुझ्याकरिता लिहिलेली

शकून ! किती वाट पाहावी मी तुझी ? तू आता येशील, मग येशील !

कुठेही काही ओळखीचे वाटले, कसलीही चिलबिल ऐकू आली की, माझी शून्यात विलीन झालेली पर्याकुल दृष्टी मी दाराकडे लावी; पण काय ? गवताची काडी उचलून एखादी चिमणी भुर्रकन् उडून जाताना दिसे. 'आपल्या घरट्याकडे जाईल ती' — असेच काहीतरी, कसेतरी मी म्हणायचे, पुनः आत नजर ओढायची, पुनः कसलीतरी चित्रे पाह्यची. पुसट पुसट, अर्धवट !

तथापि शकुन्तले ! जाऊ दे त्या गोष्टी. मी उदासीन व्हायचे सोडून देणार आहे. नाहीतर तो माझा एक स्वभावच होऊन बसेल. त्यातच मला आनंद वाटेल. आणि तुला ते सहन होणार नाही.

या साऱ्या यातना, ही सारी दुःखे मी काळजाच्या एका कोपऱ्यात दडपून ठेवणार आहे. कुठेतरी दृष्टीचा वेध लावीन; व तुझी आठवण — ती हिमतुषारासारखी सुखवेल मला त्या वेळी !

मी माझे कर्तव्य करीत राहीन. बरेच अंतर चालून जायचे मी ठरविले आहे.

सारे मनासारखे होईल — नव्हे. मी ते घडवून आणेन. कधीतरी आडवेउभे करून ठेवलेले विरविरीत धागेदोरे जवळजवळ येतील. आताचे हे झाकून दडपून

ठेवलेले निराशेचे क्षण—पण नंतर त्यांचे काय ! ते देखील झोपेतून उठल्यामुळे स्तिमित-दुःख होतील !

आजचे दिवस उद्या मी कल्पनेने पाहीन. शकून ! आज माझ्या ज्या ज्या निराशा तू केलेल्या आहेस, त्यांची त्यांची तुला मी आठवण करून देईन. तू कितीदा मला चुकविलेस, किती थोडक्या थोडक्या कारणांवरून रडकुंडीला आलीस — खरंच चिडणार आहे मी तुझ्यावर याबद्दल.

आणि तू ? —

तू मात्र मला चिडलेला पाहून हसत राहशील !

आणि मलासुद्धा हसावे लागेल !

पण छे ! मी नाही हसायचा !

२९।१०।३५

३४

" वास्तुदेवता "

" एक तुतारी द्या मज लागुनी "

कुणा बिचाऱ्याची उमेद व आशा तेवत होती कोण जाणे ! माझी मनःस्थिती मात्र ती ओळ समजून घेण्याची किंवा गुणगुणण्याची नव्हती !

थिजून गेलो होतो मी. इतके सारे जुळवून आणले, सुक्याबरोबर ओले जळले त्याचीही पर्वा केली नाही. एकदा हे संपू द्या, पाहून घेऊ पुढे – याच भरंवशावर सर्व गोष्टी केल्या – पण काय ?—

मनुष्यस्वभावाचे बरेवाईट अनुभव मला आले होते; परंतु आपल्या स्वार्थाची जिथे मुळींच आशा नाही अशा गोष्टींतही बिब्बे घालण्याच्या प्रवृत्तीमागे काय असावे याचा अंदाज मला होईना. हा देखील एक स्वभावच !

मी बिछान्यावर पडलो. रात्री दहाचा सुमार असेल. झोप येणे शक्य नव्हते. यापुढे आता झोपाच काढावयाच्या होत्या निवांत ठिकाणी—! भलभलते विचार मनात येत...

चांदण्यात बरे वाटेल ही आशा म्हणून बाहेर पडलो. पौर्णिमा होती ती. जिकडे तिकडे लख्ख प्रकाश पडला होता. दाराबाहेर पाऊल ठेवताच घरासमोरच्या

त्या अजस्र पिंपळाखाली हृदय कोंदाटून टाकणारा अंधार पडला होता. आता बरे वाटणार होते ! विचारांची साखळी नीट जुळविली व मी चंद्राकडे पाहू लागलो.

चंद्रलोकावरच्या साऱ्या कळ्या उमलल्या होत्या व त्या शीतल सुषमेने चराचर सृष्टी दूध शिंपडल्यासारखी शुभ्र आणि सौम्य दिसत होती. पृथ्वीवर चंद्रिका जणू कणाकणाने सांडते आहे असा भास होई व ते तुषार अंगावर उडून सर्वांग पुलकित होई. मनातील सुप्त संवेदना छेडल्या जात होत्या.

सुधासिक्त भासणाऱ्या रस्त्यावर मधून मधून एखादे ठिकाणी झाडांच्या काळ्या सावल्या लांबवर पसरलेल्या दिसत. तेवढेच ते काळे भाग बाकीच्या फेनिल प्रकाशात इतके विलीन होत की त्यांच्याकडे नजर जाताच गंगायमुनेच्या शुभ्र-शवल संगमाची चटकन आठवण होई.

आपल्या तंद्रीत मी चालत होतो. 'वॉकररोड' केव्हा संपला हे मला कळले देखील नाही. आणि पाण्यावरून आलेल्या वाऱ्याचा गारवा व पानलव्हाळीचा वास जर मला आला नसता तर 'शुक्रवार तलाव' नुसताच चांदीने भरल्यासारखा मला वाटला असता—किती शांत होते सारे वातावरण !

तलावाच्या भोवताली मी कितीतरी वेळ फिरलो. फिरून कंटाळलो देखील. कुणाला सांगावयाच्या ह्या गोष्टी ?-आणि मनात तरी काय व कसे ठेवायचे ! झगझगीत प्रकाशात बसावेसे वाटेना. आणि बसणार तरी कुठे ?—

तलावाच्या दक्षिण बाजूला 'गणपतीच्या बुरुजा' वर मी जाऊन बसलो. विचारांच्या धाग्यादोऱ्यांची वीण सुरू झाली. खरेच आमच्या हातून काहीच होणार नाही काय ?—ह्या प्रश्नाने माझा जीव सारखा दुखत होता. चंद्राकडे कितीही पाहिले तरी डोळे थोडेच निवणार होते ? ते तसेच मिटले आणि पडलो स्वस्थ !

झोपेची अर्धवट झापड माझ्या डोळ्यांवर असेल. डोळ्यांसमोर उभी राहणारी चित्रे पाहण्यापेक्षा दुसऱ्या कशावरही अवधान ठेवणे मला अशक्य झाले असावे. वाऱ्याचा स्पर्श झाला की उघडलेले डोळे मिटावेसे वाटत – तेवढेच सुख !

दक्षिणेच्या बाजूने 'निधाम पार्क' च्या अलीकडील झाडांची पडछाया पाण्यावर तरंगत होती. मधूनच चंद्राचे कवडसे नाचत; पाण्यावरून वारा भिरभिरला की तेवढेच पाणी वर येई;– इवलीशीच लाट उसळे आणि पाण्याचा तेवढाच फुगीर भाग चमकू लागे. गानलुब्ध फणींद्राने आनंदाच्या तंद्रीत आपल्या वेटोळ्या वळवळाव्यात व त्याच्या सतेज कांतीमधून प्रकाश परावर्तित झाल्यासारखा वाटावा–तसे दिसत होते सारे ते !

कसलातरी सौम्य प्रकाश पडला. शेषाच्या मस्तकावरील मणी चमकत असावा असे मला प्रथम वाटले. तो रक्तिमा वाढतच गेला. त्यातून अस्पष्ट अशी आकृती दिसू लागली. कमलासना लक्ष्मी प्रकट झाली की काय ? ह्या शंकेने मी अनिमिष नेत्रांनी त्या बाजूला पाहत राहिलो.

पुष्पपरागासारखी सुकुमार दिसणारी ती आकृती आता साकार दिसू लागली. तरंगाचा झोका मिळाला म्हणजे ज्या विलोलगतीने राजहंस पुढे सरावा — तसल्याच विलोल गतीने ती आकृती हळूहळू समोर येऊ लागली.

तिने हिमधवल वस्त्र परिधान केले होते. तिचे केस अनिर्बंधपणे वाऱ्याने उडत होते. तिच्या मुखावर उदासवाणी सावली सामावली होती. पाण्यातून बाहेर येऊनही ना तिचे वस्त्र भिजले की केस निथळले. वक्षःस्थळाचा भाग तेवढा ओलाचिंब झालेला दिसत होता. ती आणखी जवळ आली. तिच्या डोळ्यांतून आसवे गळत होती व ती तिच्या कपोलांवरून वक्षःस्थळावर झिरपत होती.

ती कोण असावी हे विचारण्याचे धैर्य मला झाले नाही. तिच्या प्रत्येक कृतीवर माझे अवधान खिळले होते. हळूच तिने मला खूण केली. माझ्या तोंडून अस्पष्ट असा प्रश्न फुटला—

"मी नागपूरच्या भोसल्यांची 'वास्तुदेवता'—" एवढच बोलून ती थांबली. दुसरा प्रश्न विचारण्याचे माझ्या मनात आले; मी विचारला मात्र नाही.

"माझे वसतिस्थान हेच. भोसल्यांची सर्व संपत्ती ह्या 'शुक्रसरा' त साठवून ठेवलेली आहे. आज पुनवेचा दिवस माझी फेरीची वेळ आहे. चल बाळ, मध्यरात्र उलटलेली आहे. उशीर होईल आपल्याला परत यायला—"

तिने माझ्या खांद्यावर हात ठेवला. आणि पाण्यातून वर येऊन ती चालू लागली. 'टिळक पुतळ्या' जवळ येताच थांबली ती थोडा वेळ ! आणि एक दृष्टिक्षेप करून तिने पाय उचलला. मराठ्यांच्या पडत्या काळात 'नागपूरचा किल्ला' हस्तगत व्हावा म्हणून दरवाज्यावर हल्ला करावयास इंग्रज सेनापतीने याच जागेवर मोर्चे बांधले होते. व इथूनच दरवाज्यावर तोफा डागल्या होत्या. याची तर तिला आठवण झाली नसेल ना ? 'शुक्रवार दरवाज्या' पर्यंतच्या रस्त्यावर तिची नजर खिळली होती. ज्या रस्त्यावर दरवाज्याचे रक्षण करण्यासाठी खंद्या अरबांच्या घरांची रांग पसरली होती, त्याच रस्त्यावर आज चार-दोन भटारखाने, एक-दोन चोळ्या-पातळांची दुकाने, मध्येच असणारे चांभाराचे दुकान, हे पाहून तिला काय वाटले असेल ? मी तिच्याकडे पाहिले. तिचे कुठेच लक्ष नव्हते. ती 'शुक्रवार दरवाजा' – च्या वरील भागाकडे पाहत होती. तोफेच्या भडिमारालाही दाद न देणारा तो दरवाजा आज तिला काय सांगत असेल ? दानवाशी चाललेल्या युद्धसत्रात असुरांच्या शस्त्रांनी रामलक्ष्मणांच्या शरीरांवर झालेल्या जखमा कौसल्यासुमित्रेच्या पहिल्याच स्पर्शाने उलून आल्या होत्या. दरवाजाने आपल्या छाताडावर झेललेले तोफेचें गोळे मालकिणीच्या सजल दृष्टिक्षेपाने असेच कदाचित टवटवून आले असतील— "

आम्ही पुढे निघालो. 'रुक्मिणी मंदिरा' जवळ येताच ती थबकली. जी जी ठिकाणे ओळखीची म्हणून तिच्या हृदयावर कोरली गेली होती – त्या त्या ठिकाणी

थांबावयाचा तिचा वेत दिसत होता. आपल्या मागल्या वैभवाची चित्रे फाटलेल्या पुस्तकातून पाहत असावी बिचारी !

मुख्य 'राजवाड्या' जवळ येताच तिला एक हुंदका आला. १८१८ सालची ३० तारीख आठवली असेल काय तिला ?—

—कल्पनेने उभ्या केलेल्या जगात तिला त्या वेळी 'बाकाबा' चे हुंदके ऐकू आले असतील. सरदार, मानकरी, मुत्सद्दी यांनी वरपांगी लवून इंग्रज रेसिडेन्टला कुर्निसात करताना सोडलेल्या कढत निःश्वासांची आच तिला पोहोचली असेल. तिने अंग शहारल्यासारखे केले. ती राजवाड्याकडे सारखी पाहत राहिली. तिच्या विशीर्ण मुखावर समोरील सिनेमागृहाच्या दिव्यांचा नीलिमा पसरला होता आणि डोळ्यांसमोर 'नरसिंह' ही अक्षरे काचेच्या चौकटीत निळ्या प्रकाशात आपल्याच हौसेत चमकत होती.—कुणाचे हास्य असेल ते कोण जाणे !

'पाताळेश्वरा' च्या दरवाज्याच्या गाभाऱ्यात तिने मान उंचावून पाहिले. चिमण्यांच्या घरट्यांतून कापसाचे सुताडे लोंबत होते, चार-दोन भिकारी खालच्या कपारीत झोपले होते. ती पुढे निघाली.

'नील सिटी स्कूल' ! 'बाकाबाईचा राजवाडा' म्हणून गाजलेली ती इमारत !! तिथे शिकूनसवरून तयार होणाऱ्या भावी पिढीवर वास्तुदेवतेने कोणत्या आशा उभारल्या असतील ?—

"नाही रे बाळ, 'बाकाबाई' ची इच्छा नव्हती राज्य जावे म्हणून ! 'आप्पासाहेबां' चा हेवादावा होता तिला. बाईची जात पडली बिचारी. ते पाहा तिच्या विशाल भालावरील केस कसे विस्कटून गेले आहेत; तिचे टपोरे डोळे पाहा कसे ओले झाले आहेत. महत्त्वाकांक्षी होती म्हणून फसली. तिच्यापेक्षा जास्त कर्तृत्ववान आणि राजकारणी म्हणविणाऱ्या पुरुषांनीही ह्याच चुका केल्या आहेत. कुणी कुणाला दोष द्यावा ?–" एक दीर्घ उसासा–अस्फुट का होईना–पण ती भराभर बोलून गेली आणि त्याच पावली 'केळीबागे' कडे वळली.

'केळीबागे' च्या देवळात दाराजवळ येताच तिला काय वाटले न कळे; पण ती आत गेली नाही—'माझी अन्नपूर्णा'* भरली कळशी घेऊन पूजेला आलेली थोडीच दिसणार आहे मला ? एखादी पाकोळी देवळाच्या गाभाऱ्यात भिरभिरत असेल– "

आता तिचा रोख कुठे होता हे मला कळले नाही. रस्त्याने ती काहीतरी पुटपुटत असे. मधूनच एखादा हुंदका येई तिला कधी कधी – ती खूप घाईने चालून जाई.

---

* तिसऱ्या रबुजीची पत्नी

'**रुक्मिणी मंदिरा**'च्या दारावर मला एकट्यालाच उभा करून ती आतून फेरफटका करून आली. आणि नंतर मला तिने सरळ '**राजाच्या कोठी**'जवळच थांबविले.

चांदण्यामध्ये ते काळे फत्तर अधिकच भेसूर दिसत होते. प्राण निघून गेल्यावर पूर्वीचा बाण फक्त तोंडावर घेऊन निस्तेज पडलेल्या प्रेताची कळा त्या जागेला आली होती. लांबवर दिसणाऱ्या दबक्या दरवाजात पहारेकऱ्यांचे घोरणे ऐकू येत होते–

"ती पाहा"–तेथील '**हत्तीखान्या**'च्या दरवाजाकडील एका साध्या जागेकडे तिने बोट दाखविले. काहीतरी सांगायचे होते तिला; परंतु तिच्या मुखातून शब्द बाहेर येत नव्हता. बराच वेळ ती नुसतीच रडत होती. हळूहळू ती एकेक शब्द बोलू लागली–

"माझा आवडता हत्ती '**माणिक**' या इथेच पुरला. माझ्याप्रमाणेच त्याचाही आत्मा इथंच कुठंतरी घुटमळत असेल. माझ्या माणिकने कितीतरी वेळी मला सुरक्षित पोचविलं होतं. माणिक गेला व माझा आधार तुटला. ही कपाळकरंटी मी आता येथे फिरते आहे वणवण. '**माणिक**'! केव्हा जिवंत होशील रे तू"—

आतापर्यंत धरून ठेवलेला सोस तिला असह्य झाला होता.

दर अवसेपुनवेला आपले डोळे असे झरविणारी बिचारी वास्तुदेवता कधीतरी कुणा मराठ्याच्या स्वप्नात आली असेल का? हिंदू विधवेसारखी असहाय्य आणि अगतिक झाली होती बिचारी.

'**सक्करदऱ्या**'च्या रोखाने वळून आणि जवळच्या बोळातून मार्ग काढून तिने भोसल्यांच्या स्मशानात पाऊल घातले. त्या '**छऱ्यां**'जवळ येताच ती देहभान विसरली. माझे अस्तित्वही तिच्या दृष्टीतून निघून गेले.

"ही महाराजांची स्वारी, * हा माझा रघू, § ही काशी–ही कमळजा, ही सकवार–" ती एखाद्या हरिणीसारखी ह्या समाधीपासून त्या समाधीपर्यंत धावत होती. त्या समाधी जुनाट झालेल्या–कधी कुणाचे त्यांच्याकडे लक्षही न पोचलेले. दाराच्या फळ्या मोडलेल्या. रस्त्याच्या बाजूच्या चिंचेच्या झाडावरून मधूनच एखादे घुबड ओरडावयाचे. कुणाला तमा होती या गोष्टींची?

मी तिच्याकडे पाहिले. तिची माझी दृष्टादृष्ट झाली.

—ती खदखदा हसत सुटे, तर कधी कधी सावर सोडून एखाद्या समाधीवर डोके आपटून ढसढसा रडावयास सुरवात करी. ज्यांनी आपल्या कणखर कर्तबगारीने तिला वश केले आणि राजविलासात तिच्याशी जलक्रीडा केली–ज्यांनी तिला मातेसमान मानून तिच्या पांघरुणाची आशा केली–ज्यांनी तिच्या सुखात सुख पाहिले त्या तिच्या पतीची, तिच्या मुलांची, तिच्या सख्यांची ती पुनर्भेट! कुणाला भडभडून येणार नाही ते सगळे पाहून!

---

* पहिले रघुजी भोसले

§ रघूजी

ती एकदम पुढे निघाली, व मागून यावयास तिने मला खूण केली. जवळच्या कण्हेरीची ओंजळभर फुलेपाने तिने मला दिली आणि स्वतः पण घेतली—" जाऊ दे रे ! आपणच करावयाच्या या गोष्टी. " —प्रत्येक समाधीवर भक्तिभावाने फुले वाहताना तिच्या कंठातून कसले तरी भरलेले उद्गार निघत होते.

त्या वेळी तिथे झोपलेल्या महाभागांच्या आत्म्यांना खरंच काय वाटले असेल ?

झाडावरून पुन्हा एकदा घुबड ओरडले. आम्ही. ' रघूजी 'च्या समाधीवरून दचकून डोके उचलले.

" देवी ! चलावं आपण ! " मी तिला नम्रपणे विनंती केली.

" येईन पंधरा दिवसांनी, " असेच काहीसे ती आवेगात म्हणाली.

आमचा रोख ' सक्करदऱ्या 'कडे होता. मध्यंतरीच्या वस्तीत कुत्र्याच्या भुंकण्या-खेरीज कसलाही आवाज ऐकू येत नव्हता. याच रणमैदानावर विजयाची मंगल वाद्ये कैक वेळा निनादली असतील; फितुरी लोकांची प्रेते याच भूमीवर घारी-गिधाडांनी फस्त केली असतील.

आज जग सारे बदलून गेले होते !

—' सक्करदऱ्या ' च्या अडव्या रस्त्याने आम्ही कंपाउंडच्या आत शिरलो. झाडांच्या पानांपानांतून पुनवेचा चंद्र आमच्याकडे पाहण्याचा प्रयत्न करीत होता. दिंडीदरवाजाजवळ आम्ही जाऊन पोहोचलो. आतल्या महालात राजेसाहेबांचा मुक्काम होता. आम्हा मराठ्यांचा अभिमानविषय सुखात आणि विलासात झोपला असेल—

" नाही ! नाही ! तो सुखात झोपला नाही. "

तिने जणू माझ्या मनात उद्भवणारे कल्पनातरंग अचूक हेरले होते. मी विस्मयाने तिच्याकडे पाहू लागलो.

" नाही बाळ ! तो सुखात निजला नाही रे; आतला काटा त्याच्याही जीवाला खुपतो आहे ! एखादे वेळी झोपेत मी त्याला दर्शन देते. काय त्याची अवस्था होते त्या वेळी, याची कल्पना नाही तुला. काळजाच्या आतल्या गाभ्याला जखम होऊन त्यातून रक्ताचा लोट वाहावा-त्याच वेदनेत तो विवळत राहतो. थांब तू जरा वेळ ! मी येतेच त्याला भेटून ! " तिच्या त्या वाक्यात मातेचा जिव्हाळा सामावला होता.

हिंस्र श्वापदांच्या पिंजऱ्यांतून जीव गुदमरून टाकणारी घाण येत होती. एक डुरकावणी ऐकू आली. पिंजऱ्यातला वाघ तो !... विचित्र कल्पना चमकून गेली.

मला फार वेळ उभे राहावे लागले नाही. ती संथ गतीने बाहेर आली. दर अवसेपुनवेला ही इथे येऊन काय बरे करीत असावी ?

नंतरचा रस्ता कोणता हे मला मुळींच समजले नाही. माझे पाय जमिनीवर नव्हते. आपण कुठेतरी उडून जातो आहो असा मला भास झाला. भास नव्हे, खरेच होते ते. कारण माझे पाय जमिनीला लागून मी आजूबाजूला पाहू लागलो तो मला आढळून आले की, आम्ही 'तेलंगखेडी'च्या बागेत दाराच्या कमानीत उभी असून देवी शून्य दृष्टीने तीं बाग पाहत आहे.

"हे आमचं विलासमंदिर!" आतील बंगल्याकडे बोट दाखवीत ती म्हणाली, "पण नको ती आठवण. 'अप्पासाहेबा' ला गादी मिळवावयाची होती–त्याचा स्वार्थ –त्याचा लोभ. ह्याच बंगल्यात इंग्रजांच्या कागदांत त्याने शाई भरली–तह झाला आणि माझ्या कपाळाचं...'

पुढे तिच्याने बोलवेना. जड पावलांनी ती बागेच्या बाहेर येऊन 'तेलंगखेडी' तलावाकडे जाऊ लागली. बुरुजाच्या त्या लांब फळींवर आम्ही दोघेही उभी राहिलो. तलावाच्या दुसऱ्या बाजूचा किनारा बिलवरी आरशाला बसविलेल्या काळ्या चौकटी-सारखा दिसत होता. वाऱ्याच्या गार झुळकीने तिचे केस विस्कटून उडत होते. तिचा पदरही निशाणासारखा फडफडत होता.

"विसरू या बाळ आपण ह्या साऱ्या गोष्टी. एखादे वेळी मन उगीच उबाळून येतं. त्या वेळी कुणीतरी सहानुभविता असावा असं वाटतं. आज तू माझ्याबरोबर आहेस. ज्यांच्या ज्यांच्याबद्दल मला विश्वास वाटला, त्यांच्या त्यांच्या स्वप्नात मी गेले. पण कुणीही मला आश्वासन दिलं नाही. प्रत्येकाने माझ्या पायावर डोकं ठेवलं आणि गाईसारखा हंबरडा फोडला. काय करतील बिचारे....."

दाटून आलेला आंवढा तिने कसाबसा गिळला. आणि गुदमरलेल्या आवाजात दोनच शब्द मला ऐकू आले.' "माझी प्राणप्रतिष्ठा...प्र–स्था...प–ना..."

ती गुप्त झाली!

पक्ष्याच्या कर्कश आक्रंदनाने मी जागा झालो. बहुधा तो पक्षी सापाच्या तावडीत सापडला असावा आणि साप त्याला गिळीत असावा! अंतकाळच्या वेदना त्याच्या त्या!

माझा जीव धडधडला; कासावीस झाला. झपाझप पावले उचलीत मी घरचा रस्ता कापू लागलो.

चंद्र पिवळा पडला होता. !

३५

नाग

स्वतःच्या लांबसडक जटा त्याने त्वेषाने मागे सारल्या व उत्तरेकडे कसल्यातरी उद्देशाने नजर टाकली. जणू काय, आकाशाच्या पोकळीत त्याला त्याच्या सर्व आशा ढगांसारख्या स्पष्ट आणि कांतिमय दिसल्या! दंडावरच्या मणिबंधाकडे पाहून त्याचे ओठ हालले आणि तो एकदम उठला.

कमंडलू, छाटी, कुबडी वगैरे सर्व वस्तू अगदी सहजगत्या त्याने उचलल्या; स्वतःचे भगवे वस्त्र अंगाशी चांगले लपेटून घेतले आणि 'जय भवानी' असे म्हणून तो चालू लागला. परब्रह्माचा ठाव लागलेल्या एखाद्या तपस्व्यासारखी त्याची त्या वेळची हालचाल निश्चयपूर्वक दिसली. कुठे आसरा मिळणार होता कुणास ठाऊक!

त्याचा वेष साधूचा असला तरीदेखील त्याच्या सुखावलेल्या शरीरयष्टीकडे आणि त्याच्या चंचल व भुकेल्या दृष्टीकडे पाहून तो कोण असावा याबद्दलचा विचार करणाराचे मन संदेहात पडत असे. वाणी किती गोड त्याची! जगातील प्रत्येक गोष्टीकडे पाहताना त्याची नजर किती साभिप्राय दिसे—आणि तो साधू!

चालताना त्याची गती आपोआपच मंद होई; त्या जोधपूरचे राजवैभव पाहताना त्याचे डोळे पाण्याने भरून येत; आणि आपणही एके काळी उधळलेल्या मोत्यांची त्याला आठवण येई. त्याला ते मुळीच सुखद होत नसे. भगव्या वस्त्रात झाकलेल्या त्याच्या काळजात त्याच रंगाचा अग्नी प्रज्वलित झाला होता.

एकेक पाऊल पुढे पडताच मागचा रस्ता कापला जाई, तसतशी त्याची आशा त्याला जवळ दिसू लागे. 'झाले! थोडेच अंतर बाकी! लाहोरला पोचले की संपलं–' हे वाक्य म्हणजे त्याचा विसावा होता.

आजूबाजूला त्याचे कुठेही लक्ष नव्हते. कुणी आपल्याला पाहतील, ओळखतील ही शंका देखील त्याच्या मनाला शिवली नाही. जोधपूरसारख्या राजधानीच्या शहरात एरवी तरी कोण कुणाला विचारतोय? चार लोक कामधंद्यानिमित्त रस्त्यावरून ये जा करीत असतात, चार बैरागी रामेश्वर, काशी करीत करीत कटोरा खांद्यावर टाकून— 'दे उसका भला; न दे उसका भला' असे म्हणत रस्ता झिजवीत असतात; भरली घागर घेऊन चाललेली सवाष्णबाई त्यांच्याकडून तोंडभर आशीर्वाद मिळविते; एखाद्या दुमजली घराच्या गवाक्षातून किणकिणत्या हातातील नाणे त्यांच्या कटोरीत पडते. लोक त्यांना भिक्षा घालतात.

... त्यातलाच तो एक बैरागी होता आणि तो रस्ता तुडवीत होता.

एका मंदिराजवळ येताच तो आपोआप थांबला. त्याने कानोसा घेतल्यासारखे केले. त्याच्या डोळ्यांतील पूर्वीचे सर्व गंभीर भाव विलीन होऊन ते आनंदाने विस्फारले व त्यांतून हर्षाची भावनाच तेवढी प्रतीत होऊ लागली. मंत्रमुग्ध होत्साता तो मंदिरात शिरला.

मंदिराच्या गाभाऱ्यात झगझगीत प्रकाश पडला होता. देवाची मूर्ती सोन्यामोत्यांनी सालंकृत केली होती. हंड्याझुम्बरांतून लावलेल्या मेणबत्त्या वाऱ्याच्या इवल्याशा झुळकेनेही लवलवत होत्या.

पांढऱ्या स्वच्छ विछाइतीवर शेलकी मंडळी बसली होती. बाकीचा दिवाणखाना जोधपूरच्या नागरिकांनी फुलून गेला होता.

जिच्याबद्दल त्यांनी पुष्कळ ऐकले होते ती गायिका आज पहिल्यानेच तिथे आली होती. तिच्या कंठातून निघणारा प्रत्येक आलाप यक्षिणीच्या कांडीसारखा सर्वांची अंतःकरणे भारून टाकीत होता. एखादी गंधर्वकुमारी इंद्रसभेत गात असल्याचा क्षणोक्षणी भास होई.

इतरांसारखा तो वैरागीदेखील येऊन बसला. नीट ऐकू यावे म्हणून शक्य तितकी जवळची जागा त्याने पसंत केली. एक वेळ पुनः केसांच्या जटा मागे सारल्या. स्वाभाविकपणे त्याने मिशीला पीळ भरला, थोड्याच वेळात तो गानलुब्ध नागासारखा डोलू लागला.

ती बुलबुलासारखी मादक रागदारी करीत होती. तिची प्रत्येक लकेर त्याच्या हृदयाचा ठाव घेत होती. त्याचे हृद्भाव जागे होत होते. लवकरच तो देहभान विसरला.

शेवटची म्हणून भैरवीची तान तिने छेडली; आणि बैरागी आपल्या तंद्रेतून जागा झाला. तो काय करीत होता हे त्याचे त्याला कळत होते किंवा नाही कुणास ठाऊक ! त्याने सर्रकन् आपल्या बोटातील अंगठी काढून त्या स्वरकिन्नरीच्या अंगावर फेकली, व ' और एक गाना ' असे आपल्याच नशेत तो म्हणून गेला.

गायिका ती अंगठी उचलून पाहू लागली. हिऱ्याचा सौम्य प्रकाश तिच्या मुखावर विलसत होता.

जवळच्या सरदाराने ती अंगठी मागून घेतली, व विस्मयचकित होऊन तो देखील त्या गायिकेप्रमाणे बैराग्याकडे पाहू लागला. हा हिरा कुणाचा ?

सरदार हळूच उठला आणि त्याच्याकडे गेला. ती गात होती. बैरागी ऐकत होता.

त्या सरदाराने त्याच्याकडे निरखून पाहिले. बराच वेळ दंडावर हात ठेवला त्याच्या. सर्वांचे लक्ष गाण्यावरून उडून तिकडे वेधले गेले. माना उंचावून ते त्या बाजूला पाहू लागले.

त्याच्या दंडावरचा मणिबंध सरदाराने उघडा केला. तो भानावर आला आणि त्याने चटकन सरदाराचा हात पकडला.

'कोण आहेस तू?' हुकमी आवाजात सरदाराने विचारले.

'मुशाफिर...'

'मुशाफिर?–हा हिरा कुणाचा?' त्याच्या समोर ती अंगठी धरताच तो गोंधळला आणि आपण काय केले याची त्याला कल्पना आली.

'मी...मी...'

'मी सांगतो तू कोण ते – नागपूरचा कारस्थानी राजा अप्पासाहेब भोसला!'

'पकडा–पकडा' रेसिडेंटच्या छावणीतून गाणे ऐकावयास आलेले शिपाई ओरडले.

शिवाजीचा मराठा हस्तगत झाला!

६।१२।३५

३६

आमचा राजा

काही विशेष प्रसंगीच अशा गोष्टी घडत असतात हे जाणून देखील प्रत्येकजण तेथे त्या रस्त्यावर गेला की थबकत असे. मुद्देवर उमटलेला प्रश्न एकदम विचारीत सुटायचा, की हे आहे तरी काय? कोण येणार आहेत आज? कसली तयारी सारी ही?

तसे म्हटले तर ठराविक ठशाचीच गोष्ट होती ती. तोफेची सलामी झाली, की त्या आवाजावरून आज एखादा महाराजा आला असेल हे ज्याप्रमाणे लहान मुलगा-देखील जाणू शकतो, त्याचप्रमाणे कंपाउंडच्या दगडासारखे रस्त्यावर उभे राहिलेले काळे पोलीस पाहूनही असाच अंदाज प्रत्येकाला बांधता येत होता.

त्या चौरस्त्यावर सक्त पहारा होता. समोरून येणारा एक आणि त्याला काटकोन करून कापून जाणारा दुसरा असे दोन्ही रस्ते पोलिसांनी अडविले होते. कोणालाही त्या रस्त्यावरून जाणे शक्य नव्हते. कारण त्या रस्त्याने राजाची स्वारी जायची होती व एका जीवाच्या संरक्षणासाठी हजारो जीवांच्या भिंती केलेल्या दिसत होत्या.

एखादा अंधळा, लंगडा भिकारी जरी त्या वाटेने जायला लागला तरीसुद्धा लालपट्टीचा जमादार त्याच्या बेचाळीस पिढ्या उजवून धक्के मारून त्याला काढून लावीत असे. "लेईये काबुली अंगूर ऽ ऽ" म्हणून ओरडणारी एखादी फाटक्या अंगाची बाईदेखील तेथे जायला धजत नव्हती. तिच्यापासूनही राजाला भीती होती?

परंतु ते तसे नसावे ! सिद्धार्थ ज्या रस्त्याने मिरवीत जाई त्या रस्त्याने त्याच्या दृष्टीला जीवनाची मेलेली बाजू पडू नये म्हणून त्याचा बाप काळजी घेत असे; न जाणो, लाडका सिद्धार्थ जगाची दुःखे हलकी व्हावीत म्हणून राज्यत्याग करून संन्यास घेईल आणि त्याने संन्यास घेतलाही ! त्याला म्हणे एक मेलेला, एक जर्जर झालेला, एक खंगलेला, असे तीन म्हातारे दिसले आणि जीवनाची सावली ही अशी भुतासारखी भेडसावते याची त्याला जाणीव झाली !

परंतु असल्या गोष्टी ह्या राजाला कळून काय उपयोग ? आणि त्या कळणार तरी कशा ? रस्ता झाडलेला, काळाभोर. रूप पाहून घ्या हवे तर आपले ! तारेच्या खांबाला टेकून बसलेला – ' अंधेको पैसा दे भगवान् ' – करीत भीक मागणारा कंगाल भिकारी – पण तो देखील आज तेथे नव्हता-

ठरलेल्या वेळी खाकी पोषाख चढवून वरिष्ठ अधिकारी देखरेख करायला आले. कितीही जरूरीचे काम असले तरी त्या वाटेने जाणे मना होते. रावसाहेब असो, रावबहादुर असो किंवा कोणीही असो, रहदारी बंद !

लाखांच्या गोष्टी करणारा सर शेठ आपल्या हिरव्या मोटारीत बसून मर्दा-सारख्या मिशा वर चढवून चालला होता. नेमलेल्या कक्षेत मोटार येताच एकदम अडविली गेली. ब्रेक दाबल्याचा खर्र्रखस् आवाज आणि सर शेठला एकदम धक्का पोचल्याने त्याची झालेली संतप्त मुद्रा...

तथापि विचारतो कोण ? एक पंधरा रुपड्यांचा काळा डगलेवाला पुढे झाला, " यह रास्ता बंद है, राजेसाब जानेवाला... " शेठजीची मिशी खाली पडली. दोन फर्लांगांवरूनच मोटार मागे वळली.

त्या रस्त्यापासून मोटारीच्या शिंगाच्या आवाजावर असलेल्या एका तिमजली इमारतीच्या गच्चीवरून एक भरलेल्या उंचीचा पुरुष तीक्ष्ण नजरेने खाली पाहत होता. त्याच्या मनात खूपसा मोठा विचार धुमाकूळ घालीत असावा आणि त्यातून सुटण्याचा प्रयत्न करीत असताना तो त्या जाळ्यात अधिकाधिक गुंतून पडावा अशी त्याची मनःस्थिती दिसत होती. एक प्रकारची अधीरता त्याच्या मुद्रेवर आढळून येत होती.

रुंदशा खादीच्या पंचाचा अर्धा कासोटा मारून सभोरचा पदर नुसताच खोचलेला, अंगात बिनागळ्याचा सदरा, त्यावर एक साधासाच कोट, डोक्यावर कोठेही ठेवलेली दोन बोटांची टोपी–त्याच्याकडे पाहिले, की वाटे, या गांधीने साऱ्या लोकांना हे असे पागल बनवून ठेवले आहे !

दिमाख मात्र मुरला नव्हता त्याचा ! ताठा तोच कायम ! अभिमान तसाच ! उभे राहण्याची ती ऐट म्हणजे एखाद्या उंच डोंगराच्या तुटलेल्या कड्यावर उभे

राहून चौफेर डोळा दाखविणाऱ्या वनराजासारखी. आव्हान द्यायचे ते देखील साऱ्या जगाला !

पाहता पाहता त्याची नजर त्या चौरस्त्यावर खिळली. त्याच्या कपाळावर किंचितशा रेषा उमटल्या.

" कसली तयारी आहे रे ही ? " जवळच उभ्या असलेल्या स्वयंसेवकाला त्याने विचारले.

" त्या वाटेने महाराजे जायचे आहेत म्हणून पहारा. "

" मग चारही वाटा बंद झाल्या की काय ?..."

" अंऽहं, फक्त दोनच. बाकीच्या आहेत, पण..." स्वयंसेवक अडखळत म्हणाला.

" ठीक आहे ना ? चला तर मग..."

एकेक पाऊल ठेक्याने टाकीत त्याने खाली उतरावयास सुरवात केली. बाहेर एक सुंदरशी लालबट पिवळी अशी शीड पाडलेली मोटार उभी होती. तो आत जाऊन चसताक्षणीच त्याने टोपी काढून ठेवली. किंचित रक्तिमा असलेला त्याचा गोरापान चेहरा ! पिवळ्या धमक सोन्याच्या अंगठीत बसविलेल्या खड्यासारखा राजसबाणा दिसत असे तो त्या मोटारीत !

"भर्र्र..." अगदी हळूच आवाज झाला. मोटारीचे शिंग वाजले आणि वेग सुरू झाला...

ज्या जागेपासून सर शेठजींची गाडी अडविली गेली होती त्या जागेजवळ मोटार येऊन थडकली. लांब आवाजात पुनः एकदा मोटारीचा कर्णा वाजला. हेतू हा, की असेल कोणी रस्त्यात तर बाजूला व्हावे ! एकदम एक शिपाई पुढे आला आणि...

...ती मोटार, त्यातला पुरुष !...

त्याचा हात तसाच राहिला. त्याच्यासमोरून सर्रदिशी मोटार निघून गेली. त्याचे मस्तक किंचित नमले. परंतु...

त्याला कसली आठवण झाली देव जाणे ! शिपाई ताठ उभा राहिला. जेवढी करता येईल तेवढी त्याने आपली नजर करडी केली आणि शिटी फुंकून पुढच्या पोलिसाला ती मोटार अडविण्यास खूण केली !

समोरचा पोलीस ! तो देखील त्याचाच भाऊ ! प्रथम आश्चर्य, नंतर नम्रता, नंतर बावरलेली मनःस्थिती, नंतर करडा चेहरा, पुनः शीळ आणि पुढच्या पोलिसाला खूण !

एक, दोन, तीन...! रुळाच्या दुतर्फा रांगेने उभ्या असलेल्या बाभळीच्या झाडांना मागे टाकीत अग्निरथ रस्ता कापीत जावा तशी ती मोटार फर्लांगभर अंतर धावून त्या चौरस्त्यावर जाऊन पोचली आणि मग...!

" ही मोटार आली कशी इथपर्यंत ? मेलेत की काय हरामजादे ? "

तेथे उभ्या असलेल्या छोट्यामोठ्या ऑफिसरांच्या काळजात हा प्रश्न भिनला. कोणाची मोटार ही ?...

दुसरा क्षण ! गोंधळलेली मुद्रा बदलून, आता दुसरा उपाय नाही असे जाणणाऱ्या एका शीख ऑफिसराने हात दाखविला. ती वेगवती थांबविली गेली.

तो पुरुष अगदी साध्या भावाने त्या सर्वांकडे पाहत होता. सर्कशीत शिकवून तयार केलेल्या जनावरांकडे पाहताना ज्या प्रकारचे सानुकंप कुतूहल माणसाच्या मुद्रेवर दिसून येते, तसलेच कुतूहल ! दयाशील वृत्ती...

" काय आहे ? " शांतपणे प्रश्न विचारला गेला.

" भाईसाब, यह रास्ता थोडी देरके लिये बंद किया है " अगदी नम्रपणे उत्तर.

" पण हा उजवा रस्ता मोकळा आहे ना ? "

" हां जी !... "

" मग हाच माझा रस्ता आहे, अच्छा, वंदे मातरम्..." मोटार चालू झाली.

त्या अधिकाऱ्याच्या ओठांवर आलेले शब्द तेथेच विरले. भावनांच्या आवेगात तो तसाच पाहत राहिला.

मघाशी आलेली मोटार कोणी अडविली होती ? आणि आत कोण बसले होते !

" वह कौन है ?..."

" लोकसभाका सभापती..."

बड्या अधिकाऱ्याने निबरपणे विचारलेल्या वरील प्रश्नाला शीखाने उत्तर दिले. तो अजूनही उजव्या रस्त्याकडे पाहत होता. ती पिवळी आणि किंचित् लाल दिसणारी वेगवती भरधाव पुढे जात होती. कितीतरी वेळ तिचा सोसाटा ऐकू येत होता...

... सूं ऽ ऽ ऽ...

सुवर्णशिबिकेत बसून जणू काय कुबेराची स्वारी अनिर्बंधपणे मिरवीत होती !

भक्ती आणि भावना परमेश्वराने प्रत्येकालाच दिल्या आहेत नाही ?

२५।१२।३५

३७

देवाच्या शाळा

परवा ताईच्या पत्रात एक वाक्य होते—'सुखाची साधने अपुरी पडली की असलेले दुःख वाढवावे—'

मी जेव्हा ते वाचले तेव्हा मला असे खचित वाटले की पत्र लिहीत असताना ताईच्या टेबलाभोवती मुलींचा घोळका जमला असावा आणि त्यांच्या किलबिलाटात काही न सुचून ते वाक्य लिहिले असावे. एरव्ही त्यात काही अर्थ तरी होता का ?

तिने असे का लिहावे ? असे काय तिला वोचत होते नि अपुरे पडत होते ? त्याच दृष्टीने पाहिले तर ती अगदी धडा घेण्यासारखी पोर होती. जीवनाकरिता काही अव्यभिचारी तत्त्वे तिने मनाशी बाळगली होती. आणि त्यांतूनच तिचे चारित्र्य उमलून आले होते !

पण आजचे तिचे लिहिणे म्हणजे तत्त्व थोडेच होते ? कितीतरी वेळ मी आपल्याशीच ते वाक्य म्हणत होतो.

वास्तविक मी ज्या प्रदेशातून चाललो होतो तो प्रदेश अगदी निर्भर अशा सौंदर्याचा गाभा होता. त्यातील एकेका दृश्याकडे पाहिले की मन कसे मोहून जात होते ! पुष्कळदा तर असेही वाटे की आपल्याला वेगळे अस्तित्वच नाही. इथे सर्व डुलते आहे—हसते आहे—त्यातलेच आपणही एक !!

इतके असून देखील ते सारे तेवढ्यापुरतेच ठरे. एखादी दूरची वस्तू आपल्याला अस्पष्ट दिसली म्हणजे बाकीच्या वस्तू स्पष्ट नि सुंदर दिसत असूनही त्या अस्पष्ट वस्तूबद्दलची आपली जिज्ञासा वाढावी आणि आपण वारंवार मागे वळून तिच्याकडे पाहत राहावे.

स्वर्गाच्या त्या मनोहर आणि अपरोक्ष सौंदर्यात मन रमल्यानंतर देखील ताईचे ते उपरोक्त वाक्य माझ्या मनातून वर उसळून येई.

सुखाची साधने अपुरी पडतात म्हणजे काय ? आणि असलेले दुःख वाढवायचे कसे ? दुःख वाढविता येते का ?

पण असे वाहवत जाणे योग्य नव्हते. स्वर्गाची सौंदर्ये कुणी पाहावयाची ? अशा वेळा नेहमी थोडयाच येतात आयुष्यात ?

गाईच्या आचळांना झोंबलेले वासरू जसे आपण ओढून घेतो तसे माझे विचार मी आवरले व भोवताली नजर टाकली.

साऱ्या पर्वतांचा राजा आणि पृथ्वीचा मानदंड म्हणून संबोधला गेलेला देवतात्मा हिमालय मला पाहायला मिळाला हा आनंद काही थोडाथोडका नव्हता. अल्मोडा सोडला आणि तिथून वनश्रीच्या शालूदुशाल्यांची विविधरम्य शोभा दिसू लागली. काथगोदामच्या स्टेशनावरून मोटारचा ८० मैलांचा प्रवास होता. मोटार वळणावळणाच्या रस्त्यावरून गरगरा फिरताना दिसे. उपमाच द्यावयाची झाल्यास, एखाद्या अजस्र पेचखिळ्याच्या आठ्यांभोवती ती वेगवती गिरक्या घेत असल्याचा भास होई.

तिथे विशाल शिळा नव्हत्या, किंवा झाडे–झुडुपेही फारशी नव्हती. लांब लांब उंच उंच पाईनची झाडे; त्यांची ती कारंज्यातून उडणाऱ्या फवाऱ्यासारखी दिसणारी हिरवीगार झुपकेदार पाने पाहिली की, इंद्राच्या उपवनाची कल्पना मनात उभी राहत असे. त्या झाडांपासून टर्पेंटाईनचे तेल काढायला त्यांच्या कमरेभोवती गोलगोल भांडी बांधली होती. ते सारे असे दिसे की, जणू सुरुचिर लग्ना कटिबंध बांधून कुणाची तरी वाट पाहत आहेत ! रंगीबेरंगी विपुल फुले–अगणित फळे, गोडसा सुगंध दरवळलेला; सारखा सुरू असलेला वेळवांच्या वनातून येणारा वाऱ्याचा मधुर आवाज; इंद्रसभेत कसला उत्सव होता न कळे ! कुणाकरिता चालली होती तयारी ही ? ?

—आणि सतेज धवलिमा अंगावर पांघरून आकाशात उभी असलेली ती हिमाच्छादित उत्तुंग शिखरे–! त्यांना उपमा त्यांचीच द्यावयाची ! सारे कसे उदात्त, शुचिर्भूत दिसे ! ! ढगांच्या काळ्या सावल्या त्या बर्फात तरंगल्या की कसा छान नीलिमा चढायचा त्याच्यावर !

–‘ माणसाला शिकावयाच्याच झाल्या तर तो किती तरी गोष्टी इथे शिकू शकतो’––मोटारीतून खाली पाऊल ठेवताच माझ्या मनात पहिल्या प्रथम विचार आला.

डिसेंबर महिना होता. असलेली जीवन-शक्ती गोठून जाईल इतकी थंडी आजूबाजूला पडली होती. पाच पाच इंचांचा बर्फाचा थर जमिनीवर पसरला होता; दोन-तीन दिवस तो थर तसाच साचत राहायचा आणि मग गारठा––! !

—त्याचे तर वर्णन करणेच दुरापास्त ! हवे त्याचे हवन करणारा अग्नीदेखील थंड व्हायचा तिथे—! !

परंतु देवाचे जीव तिथेही राहत होते, जगत होते ! त्यांच्या अंतःकरणात ऊबदार भावना होत्या. त्यांच्या मुखांवर सफरचंदासारखे हास्य खेळत होते. देव त्यांच्या अगदी जवळ होता आणि तेथून ते जग पाहत होते. पण जन्मभर जीवनात निमज्जन करूनही कमळाच्या पानासारखे कोरडे ! !

तो उभा होता. त्याचा तो सडपातळ बांधा; लालबट गोरा रंग; थोडेसे गोबरे असलेले नाक; आणि भोवतालचे विशाल देखावे पाहून निर्भय आणि अनागस बनलेली नजर !

कुणी शिकविले त्याला एवढे आनंदी राहावयाला ? जगाच्या दृष्टीने पाहिले तर कोणतेही वैभव त्याच्याजवळ नव्हते. पैसा ? त्याला बिचाऱ्याला नाणे देखील पाहायला मिळाले किंवा नाही याचीच वानवा. कुठून एखादा आवाज आला की हरिणाच्या उत्सुकतेने तिकडे डोळे फिरवायचे ! अंगावर लपेटलेली एकच घोंगडी उगाच जागच्या जागी चाळवावयाची–करावेसे वाटले ते करावयाचे– खावेसे वाटले तसे खावयाचे–राहावेसे वाटले तसे राहावयाचे—! !

जगातील एकाही विषमतेचा वारा नव्हता त्याला. मानव्याच्या उन्नतीकरिता देवाधर्माच्या नीतिकथा असतील याची त्याला जाणीव देखील नव्हती. त्याला एकच गोष्ट माहीत होती. आकाशाच्या जंगलातून ढगांची पालवी वाऱ्यावर भुरभुरली की, पर्वतांच्या डोक्यावर येऊन साचत असत. त्यांच्यामधून सूर्य आपले रूप पाहत असला की, याने त्याचे रूप पाहावयाचे; खूपच आनंद झाला की, टाळ्या वाजवावयाच्या—

उभ्या आसमंतात त्याची टाळी अगदी खोल खोल प्रतिसाद घेऊन उठे, एक दीर्घ गंभीर निनाद उत्पन्न होई आणि किती तरी नवीन आवाज येऊन त्यात विलीन होत !

त्याच्या अंगावर असलेले तेवढेच एक कांबळे;—की ज्याने तो आपली थंडी भागवू शकत असे, जे त्याला तिथे जिवलगासारखे वाटे, आणि ज्याला घट्ट घट्ट आवळून घेताना त्याला सुख होत असे.

—व ती थंडी ! तिला काही सुमार होता का ? तिचा एक एक बाण मर्मापर्यंत छिद्र पाडीत असे. एकदा अंगावर उभा राहिलेला काटा कायमचाच वर उठे.

त्या देवाच्या जीवाला थंडीची बाधा होत नसेल का ? मला किती तरी वेळ त्याला विचारावेसे वाटले; पण विचारणार कोणत्या भाषेत ?

तो काही वेळ तसाच उभा राही. थंडीने जर्जर करावे, त्याने आपले कांबळे अंगाशी गुंडाळून घ्यावे.

त्याची दातखीळ बाजू लागली. त्याच्या अंगात कापरे भरले ! !

काय त्याच्या मनात आले न कळे. ती घोंगडी त्याने भर्रकन् अंगावरून काढून फेकली. आणि तो तसाच उघडा थंडीला तोंड देत उभा राहिला !

' देवा ! ' माझा उद्‌गार किती तरी कापरा निघत होता. त्याच्यापेक्षाही माझे अंग शहारून आले होते. त्याला काय वाटत असेल त्या वेळी !

काही नाही ! तो तसाच उभा राहिला. त्याचे लवचिक परंतु प्रमाणबद्ध शरीर थंडीच्या माऱ्याने थरथरत होते !

पुन्हा त्याने घोंगडी उचलली, आणि अंगाभोवती गुंडाळून तिचे चुंबन घेतले भेटली त्याची प्रियसखी त्याला ! !

तो बराच वेळ तसा करीत राही. खूप थंडी वाजली की, ते कांबळे बाजूला फेकावयाचे आणि नंतर काही वेळाने उचलून अंगावर घ्यावयाचे—त्याला फिरफिरून कवटाळावयाचे ! ! खट्याळ मनाचे समाधान होत असेल का त्याने ?

होय !

एकटाच तो ! एकुलती एक त्याची घोंगडी—तेवढेच एक सुखाचे साधन !

मधूनच ताईच्या पत्राचा विचार मनात तरंगत असे--ऊर भरून जाई, पण कशाने न कळे !!

एरव्ही काहीही वाटले नाही तरी मला देवाचे राहून राहून नवल वाटे. माणसांना शिकविण्याकरिता आणखी त्याने कुठे कुठे शाळा स्थापन केल्या होत्या कुणास ठाऊक !!

२०।१।३६

३८

सौंदर्याचे सुख

ज्या गोष्टी काळजात अगदी खोल रुजलेल्या असतात त्यांना पुष्कळदा निजविल्या तरी जाग्या होतात; कोणी विचारल्या नाहीत तरी सांगाव्याशा वाटतात; कोणाला नको असल्या तरी लिहाव्याशा वाटतात.

खरेच, हे एक नवल नाही का ? त्या कधी जुन्या देखील होत नाहीत. खूपशी वर्षे जातात निघून. आपले मन किती किती नवनवीन गोष्टी शिकून घेते. ते मन मोठे होते. तरी देखील त्या गोष्टी मात्र तशाच. त्या नवीन कधीच नव्हत्या आणि म्हणून जुन्या होणे कदापि शक्य नाही.

नवीन म्हणजे चकचकीत, डोळे दिपविणाऱ्या !

कोणतीही एखादी बाई आपल्या अर्भकाला कडेवर घेऊन, 'तो पाहा चांदोबा' करीत त्याची फुकट करमणूक करीत असली, की मला जिजाची आठवण होते.

जिजा म्हणजे मला सर्वतोपरी सांभाळणारी, आमच्या घरी अन्नावारी काम करणारी एक दुर्दैवी स्त्री, जिने जगाची पुष्कळ नाटके पाहिली होती आणि शेवटी माझी भूमिका पाहत पाहत तिने डोळे मिटले होते. फार आवडला होता तिला माझा अभिनय !

ती आमच्या जातीची ना पातीची. आज तिच्या फोटोकडे पाहिले तर केस पिकलेले, नाक लक्ष्मीबाई टिळकांसारखे, कपाळाची पाटी पांढरी फटफटीत अशी ती दिसते. त्या फोटोतून देखील ती फक्त माझ्याचकडे पाहते. इतरत्र कोठेही तिचे लक्ष नाही. माझ्या आयुष्यात मी काय काय भोगले हे पाहणारे साक्षीदार म्हणजे तिचे दोन डोळे !

आज भाई, चंद्री, गुलाब माझ्याशी कितीही वाद घालीत बसले तरी जिजा सुंदर--कमालीची सुंदर--होती हे माझे मत इतके शिकून सवरूनदेखील बदलले नाही,

मी लहानपणी म्हणत असे तसेच व त्या शब्दांत अजून देखील म्हणतो, "आमची जिजा खूप छान – शुंदोल आहे."

जिजा माझी नि माझी होती व म्हणून मला सुंदर वाटत होती. माणसे बुद्धीने वाढली तरी भावनेने लहानच असतात.

हे सारे मला आजच कसे आठवले ह्याचे उत्तर सोपे आहे. सायकलच्या हँडलवर उजवा हात, डावा हात खिशात आणि ऐटीत शीळ घालीत मी चाललो होतो. उजव्या बाजूच्या तारेवर मला नीलकंठ पक्षी दिसला. मी त्याला नकळत नमस्कार केला व नंतर माझा मीच हसलो. तो पक्षी तेथून उडून गेला. त्याच्या आवाजाने झाल्या सर्व गोष्टी जाग्या !

आमच्या घरावरून नीलकंठ पक्षी जायला लागला, की जिजा मला चटकन उचलून अंगणात नेई आणि स्वतःबरोबर मला देखील नमस्कार करावयास लावीत असे. त्या वेळी तसे करण्यात तिचा उद्देश काय होता हे मला उमजत नसे. नाही म्हटल्यास तिचा एक उद्‌गार मला पुसट पुसट अजूनही आठवतो. एकदा तो पक्षी आमच्या अंगणातल्या सालईच्या झाडावर बसला होता. त्याच्याकडे तिचे लक्ष जाताच तिने मला त्या झाडाकडे नेले आणि त्याला तीन प्रदक्षिणा घातल्या. मी तिला जिज्ञासेने विचारले, "जिजा, कशाला हे सारे ?" परंतु तिने मला सरळ उत्तर दिले नाही. माझे जोडलेले हात तिने वेगळे केले व स्वतःच्या गळ्याभोवती त्याचा विळखा घालून मला जवळ घेत ती उद्गारली, "माझा सोन्या शहाणा होईल अशाने."

मला त्यामुळे मोठासा अर्थबोध झालेला नसला तरी तिच्या त्या विलक्षण वागण्याबोलण्याने त्या पक्ष्याबद्दलची आठवण मात्र तिच्याइतकीच मनाला घट्ट चिकटून राहिली.

त्या पक्ष्याला राजा म्हणतात. तो उजव्या हातावरून गेला म्हणजे आपल्याला म्हणे गोड खायला मिळते. एखादे काम करायला निघाल्यावर त्याने दर्शन दिले तर ते काम म्हणे खूप सफल होते. सर्वांच्याच आयुष्यात गोड गोड खायला देऊन त्यांची कामे सफल करून देणारा तो नीलकंठ भाग्याचा खरा ! किती तरी लोक त्याला नमस्कार करून कामाला लागतात.

त्याला नमन केल्याने माझे भाग्य उगवते असे नव्हे, परंतु त्याला नमस्कार करण्याची प्रवृत्ती माझ्यापासून इतकी दूर गेली आहे, की मला ती जवळची वाटते. ज्या गोष्टी दूर जातात त्या जवळच्या वाटतात !

जिजाच्या अंगावरून दूर होण्याइतका मी मोठा झालो होतो तरी देखील त्या पाखराकडे मी खूप वेळ पाहत असे. त्याच्या अंगाचा रंग अगदी स्निग्धश्यामल असा. पंख किंचित जांभळे. कदाचित खूप निळे असतील म्हणून जांभळे दिसत

असतील. हाताच्या मुठीत सहज मावेल व तोंड फक्त बाहेर राहील एवढाच त्याचा आकार. त्याची ती निळी गुबगुबीत मान. ती लांबशी बोथट चोच. ती ओठावर दाबली की कशी मौज वाटे !

आणि तो मधूनच उडून गेला म्हणजे त्याच्या पंखांच्या पोटचा गाभा कसा मखमलीसारखा दिसे. निळ्या मखमलीत शुभ्र पिसांचे पराग ब्रह्मदेवासारख्या कलावंताने स्वतःच्या निर्मितीचा विलास म्हणून कौशल्याने बसविले होते. त्याचा तो टँव टँव आवाज ' विचित्र बीन ' ची तार छेडल्यासारखा मधुर वाटे.

किती छान पाखरू ! इतकी सुंदर वस्तू ! कोणाला तिचे दर्शन शुभ व हवेसे वाटणार नाही ?

ते पाखरू माझ्या हाती लागावे अशी माझी फार दिवसांपासूनची इच्छा होती. मी लहान होतो तेव्हापासून त्याचे ते छान छान पंख एकदा जवळून पाहावे ही आस ! ते पाखरू मला इतके आवडे, की मला अगदी हवेसे वाटे. नेहमी ते माझेच असावे अशी विचित्र इच्छा होई. सुंदर वस्तूबद्दलची आसक्ती माझ्या मनात भिनली होती आणि कित्येक दिवस प्रयत्न करूनही ते पाखरू माझ्या हाती लागले नव्हते.

परंतु आता मी मोठा झालो होतो. तो नीलकंठ पक्षीच काय पण आणखी किती तरी पक्षी माझ्या हाती लागू शकत होते. वाटेल त्याला मी तीर मारू शकत होतो.

आता कोठे जाणार होता तो ? त्याला आता हाती घेईन. माझ्या डोळ्याला स्पर्श करतील इतक्या जवळून त्याचे पंख पाहीन. किती सुख होईल मला !

आपलेपणाचे सारे सोस निवतील आणि ती वस्तू, तो भाग्याचा राजा माझा म्हणून मला मिरविता येईल.

आणि तो माझ्या हाती लागला तेव्हा त्याला मोठीशी इजा झालेली नव्हती. सुपलीच्या फुलासारखे सुकुमार असलेले त्याचे पोट वर-खाली होत होते. मला व्याध कल्पून तो मधून मधून माझ्याकडे पाहत होता.

कोण धडपड त्याची माझ्या हातून सुटून जाण्यासाठी ! जगण्यासाठी त्याचा प्रयत्न. आपल्या सर्वस्वाची भीती. मोंगल सम्राटांच्या जनानखान्यात शिरताना रजपुतांच्या रूपराज्यांनी देखील इतका जीव तोडला नसेल. त्याच्या सौंदर्यावर, त्याच्या पंखांच्या आतील मखमलीच्या तुकड्यांवर माझीच सत्ता असावी हा केवळ माझा हव्यास ! त्याचा तडफडाट पाहून मला मनस्वी दुःख होई. मी त्याला मारणार नव्हतो. माझ्याने होईल तेवढ्या सुखात मी त्याला ठेवले असते. त्याला हवा असता तर हिऱ्या-माणकांचा चाराही त्याला खायला घातला असता. फार दिवसांची इच्छा पूर्ण हावयाची होती तो माझ्या हाती लागण्याने !

परंतु ती त्याची व्यर्थ धडपड. त्याचे अंग सर्रर्र....असा आवाज करीत थरथरत असे. माझ्या हाताला तसे झाल्याचा भास होताच आणखीही एक विचार मनात येई. माझ्या हातून हा सुटून जाणे शक्य तरी होते का ? माझ्या अहंपणाची मला झालेली जाणीव आणि त्याच्याबद्दलच्या नितांत आसक्तीने मनाला होणाऱ्या वेदना. दोन्ही भावांच्या सन्निवेशाने माझे मन द्विधा झाले होते. त्याचे सौंदर्य तो दाखवू शकला नाही. मी सौंदर्य मग कशात पाहिले ?

पिंजऱ्याच्या दारात त्याचे तोंड घालताच त्याने ते मागे वळविले. "नाही, नाही जाणार मी." त्याच्याने सांगवेल त्या प्रकारे आणि होईल त्या प्रयासाने त्याने मला हे सुचविले, सुचवीत राहिला ! पण...

वाटेल त्याला तीर मारू शकत होतो मी आता !

त्या पिंजऱ्यात तो डोळे लावून झिमत पडलेला असे. माझ्याकडे मित्रमंडळी आली, की ती त्याच्याकडे पाहत. मी त्यांना सर्व सांगे. त्याच्या सुंदर पंखांचे माझ्याने होईल तितके चांगले मी वर्णन करी. रोज रोज नवीन उपमा द्यायच्या ! सुख होत होते ना मला ?

सुख !...आणि खरेच, माझ्या डोक्यात हा विचार पूर्वीच यायला नको होता का ? कसे सुचले नाही मला ते ? त्याचे सौंदर्य... ! तो आनंदाने, हर्षाने, टँव टँव करीत उडाला असताना त्याच्या पंखांच्या आतल्या गाभ्याची विविधरम्य शोभा ! बाहेरून निळे, जांभळे, अगदी साधे दिसणारे त्याचे पंख आतून मात्र आकाशाच्या नितळ नीलिम्यात पसरलेल्या रत्नखचित चांदण्यासारखे...

...पण ते दिसायला त्याने या फांदीवरून त्या फांदीवर व तेथून पुन्हा एखाद्या फांदीवर स्वच्छंद भराऱ्या मारायला हव्यात सारख्या ! पण माझ्या आसक्तीने त्याला तसे उड्डू दिले नाही; आणि त्या पिंजऱ्यात ? तो धड खात नसे. पीत नसे. कधी सादही घातली नाही त्याने आणि कधी पंखही पसरविले नाहीत !

आमच्या घरची माणसे रोज त्या भाग्याच्या राजाला नमस्कार करीत. तरी देखील एकही गोष्ट शुभ अशी घडली नाही त्याला आणल्यापासून ! केवळ तेवढ्यामुळेच म्हणून गोड देखील खायला मिळाले नाही कोणाला ?

ज्या वेळी तो आपली विलोभनीय कांतिशोभा हवेत पसरवून देत असे आणि जी पाहून माझ्या चित्तवृत्ती तल्लीन होत त्या वेळी केवळ तो माझा नव्हता म्हणून त्याचे सौंदर्य मला उपभोगता आले नसेल का ?

आणि आजपर्यंत मनाशी बाळगलेली आशा, ती सौंदर्याची खाण, तो भाग्याचा राजा आता तर केवळ माझा नि माझा झाला होता. तरीही मला सुख दिले नाही त्यांने ! त्याचा कोंडमारा झालेला.

आज जिजा माझ्या दूर गेली तरी देखील ती तिची आठवण मला हवी का वाटते ? ती मला सुंदर का वाटते ? तिच्यापासून मला सौंदर्याचे सुख का मिळते ?

की सौंदर्याबद्दलची कल्पनाच अपुरी आहे माझी ?

११।२।३६

३९

तलाव

—' सखे, संपलं का तुझं ? देतेस का मला गोटा ? '

—हे वाक्य एकीचेच नव्हते, नवीन आलेली प्रत्येक स्त्री आपले धुणे घाटाच्या पायरीवर आदळून स्वतःच्या ओळखीच्या बाईला असे विचारीत असे; आणि ती बाई देखील—' हो, झालंच आहे, ' असे काहीसे उत्तर देई.

—तसा सर्व व्यवहार अगदी सलोख्याने चालला होता. मधून मधून भांडणे होत, पण ती स्वाभाविक आणि किरकोळ अशीच !

—त्या तलावाचे पाणी हिरवट्टून गेले होते. अगदी घाण. पण त्यातच त्या धुणी धूत असत. स्वच्छ आकाशाची पडछाया पाण्यात पडली की, ते थोडेसे चमके. परंतु ते चमकणे सुद्धा किती भेसूर ! सुंदर गुबगुबीत कबुतराला गिळल्यानंतर अजगर जसा समाधानी दिसतो तसे ! !

—प्रत्येक घाटावर खूपशा बाया धूत होत्या. घरचा मळ त्या तिथल्या जीवनात बुडवून साफ करण्याचा त्यांचा प्रयत्न. खरंच, कितपत साधत असेल याची त्यांनाही धडपणे जाणीव नव्हती. ! !

—लहान लहान उघडी नागडी पोरे, रडत रडत आईचा पदर धरून आलेल्या मुली, आईच्या रागाला न भिता तलावातील पाणकोंबड्यांना गोटे मारणारी उनाड मुले-आणि त्या बायका ! सर्वांचा एकच कलकलाट ! धुण्याची फडफड ! आणि क्षणाक्षणाला त्यात आणखी भरच पडत होती ! कमी नाहीच काही !

—गुढग्यापर्यंत पाण्यात पाय घालून त्या थडीवरच्या गोट्यावर धुण्याचे पिळे धपाधप आपटीत सुटत; बाजूच्या बायकांच्या अंगावर शिंतोडे उडत; लुगडी ओली-चिंबही होऊन जात कधी कधी—पण ठलट्टून कोण बोलेल ! भांडायला तरी वेळ हवा ना ? हे आटोपले की लगेच घरची कामे ! —घरी जाता जाता ते अंगावरचे दांड-खड सहज वाळून जाईल, त्याची कुठे एवढी पत्रास ! नासुकल्या कारणासाठी प्रकृती बिघडण्याचा संभव नव्हता.

—त्यांचे पाय पाण्यात बुडलेले होते. प्रत्येकीच्या हातचा पिळा त्यात बुडत असल्यामुळे ते पाणी देखील खूप खळबळत होते. त्यामुळे त्यात उमटलेल्या त्यांच्या सावल्या सारख्या हालत होत्या; त्यांना आकारही राहिला नव्हता !!

—जीवनात जाणूनबुजून पाऊल घालून त्यांनी स्वतःचे अस्तित्व अस्थिर करून घेतले होते !!

एक घाट ! दुसरा घाट !! त्या दोनही घाटांवर सारखीच वर्दळ होती. जुन्या दांडखडांचा बाजार मांडला होता जसा काही ! इकडचा गलबला तिकडे ऐकू जात नव्हता.

—हातांबरोबरच त्यांच्या जिभादेखील चालू होत्या. कोणत्याही सभासंमेलनांना दिसले नसतील इतके प्रश्न त्यांच्याकडे 'आ' वासून पाहत होते–वातल्या पावसाचे पीक नव्हते तिथे !!

एक जरत्कारू मुलगा पाण्यात दगड फेकीत होता. कुणातरी बाईला लागला ओझरता—

'ए पोरा, फुटले का रे डोळे तुझे ?'

'कुणाचा आहे ग पोरगा ?'

'असेल कुणाXXचा, केवढ्यानं लागला जसा ?'

'अग तुला माहीत नाही ? वजीचा मुलगा हा, पहिल्या नवऱ्याचा–'

'अयाई माय,' कुणाला तरी सहानुभूतीचा कळवळा आला. त्या मुलाचे दर्शनी रूप तसेच होते.

'बजीनं नवरा टाकला, याला कारण ?'

'कसलं कारण नी काय ! बाहेरख्याली होता म्हणे !'

'मग झालं काय ? तेवढंच ?? मनी नाही नांदनं, अन् उगीच दादल्या बद्दी मात्र फुकटची—'

'बाईचाच रंग बदलला असेल दुसरं काय—'

'असेल मेला, रोजच्याच गोष्टी आहेत ह्या. चलते का ग रंगे घरी ?'

'रंगूला काय घाई आहे ? म्हातारपणची बाईल, लाडाची राधा, नेलनची मालन्—'

'अहा ! काय राधा–मालन् पण !! इकडे बाई येते रूपात अन् तो बुवा चालला कुपात—'

—कुणाचा तरी दबका स्वर आणि दोघींचे हसणे उसळले.

कुणाचे एवढेसे व्यंग दिसले तरी त्यांना हसायबोलायला विषय मिळत असे. जगात सुखी काय त्या आपणच, ही त्यांची भूमिका. कदाचित दुःखानेच त्या सुखी झाल्या असतील, कदाचित सुखदुःखाच्या अर्थाची पाने त्यांच्या शब्दकोशातून फाटून गेली असतील ! !

पुन्हा कसलेसे बोलणे निघाले.

'अहाहा, या तुळसाबाई. आज नवं टाकलं जसं काही बहुता दिसा येता की–'

'गेली होती कर्म दाखवायला महादेवाला §'

'काय केलं ग तिथं ? मिळालं सोनंनाणं काही ? फुटका मणी तरी एखादा देवाच्या पायाजवळचा ?'

'जाई, चांगली तर बोल जरा ! देवाला काय वेडंविद्रं बोलतेस ? पण...!! गेली बाई यात्रेला, अन् गर्दीत पडल्या माइया पायांतल्या मासोळ्या; पावल्या महादेवाला.'

'बरी तुझी यात्रा ! आणखी...'

'थांब रंगे, त्या घाटावर कसला गोंधळ माजला आहे—' तिच्या अंगावर वसकन् कुणी तरी ओरडले. सर्वजणी दुसऱ्या घाटाकडे पाहू लागल्या.

'कोण पडलं ग तळ्यात ?'

'रामजीची सून !'

'कोण शांती ? कशी पडली ? आता परवाच पिवळी झाली होती बाई, अरे देवा !'

'लेकरू तरी कसं सोन्यासारखं—गेली बिचारी, कपाळी कुंकू घेऊन सुखी झाली !'

'घरचा कारभार तसाच टाकून आली असेल घावपळ करीत; पोटात तरी गेलं असेल की नाही घासभर...'

'कुढलं जाईल ग ? काल्ची एकादशी; आज पारणं नाही ? अन्न तसंच चुलीवर शिजत असेल...'

'जा माय ! वणवा !! बरी आठवण केलीस. वरण चुलीवर मांडून तशीच आले मी उभ्या उभ्या ! जाऊ दे बाई, नाहीतर घरी लागेल आग—

'अग थांब, माझं उरकलंच आहे. मलाही घाई आहे. चक्कीवर दळण ठेवून आले मी.. ते आणीन तेव्हा भाकरतुकडा—'

'इथं कोण मेलं बसायला आलं आहे ? निघालोच आम्हीही. थांबा गे बायांनो—'

'मलाही उशीर नाही आता, थांब ग बिजे; घरी गेलं पाहिजे, नाहीतर तोडून खातील सारे—'

---

§ नागपूरची प्रसिद्ध यात्रा

'अग, पण ? तो पाहा, रामजीचा लेक आलाय्; शांतीला पाण्याच्या बाहेर तर काढू दे. उतरेल कोणी पाण्यात—'

'तूं थांब बाई ! तिकडे घर गर्जेल माझं. आहे तंवर केलंच पाहिजे की नाही सारं ? जायचं तेव्हा आम्हीही जाऊ—'

एकेक जात असे आणि रिकाम्या झालेल्या दगडावर दुसरी आपले धुणे दडपत असे. सारखी वर्दळ–अविश्रांत धडपड !

गुढग्यापर्यंत पाण्यात पाय घालून त्या आपली धुणी फडफडा आपटीत होत्या. त्यांच्या सावल्या त्या हिरवट पाण्यात अस्थिरपणे हालत होत्या.

रामजीच्या सुनेचे प्रेत अजून बाहेर निघाले नव्हते.

ढगांच्या सावल्या त्या तलावात वरवर तरंगत होत्या.

२०।३।३६

४०

'आपुले मरण : नयनी सोहळा'

असेल नसेल ते सगळे जग आपल्या हाताने पेटवून द्यावे आणि आपण मात्र मजेत हात शेकत उभे राहून हसावे. खूप मोठा जाळ होईल; खूप हलकल्लोळ माजेल, आणि मग सर्वजण एक मोठी काळझोप घेतील—

ही कल्पना मनाला नुसतीच विचित्र वाटते, नुसतीच अभद्र वाटते असे नाही. त्या कल्पनेची भीती वाटते. जगाला भ्यालेला माणूससुद्धा असे म्हणायचा नाही. ज्याची भीती वाटावी ते जरी नाहीसे झाले तरी अभयाचेही भय वाटतेच !

मग माझ्याच मनात त्या वेळी असे विचार का यावेत ? मला ते समजेना. काय घडणार होते ? ज्या गोष्टी ज्या वेळी घडतात त्या त्या वेळीच का घडतात, हे कुणाला सांगता येईल का ?

माणसाची भीती–!! हो, वाटते खरी कधी कधी. कित्येक वेळा चांदीसारखा चंद्रदेखील भयप्रद वाटतो. आपले मन शांत असूनही हे विचार पुष्कळ वेळा बळावतात. कोणत्या वस्तूत कधी आणि कोणत्या कारणाने बदल होईल हे कोण सांगणार ?

त्याला मी पाहिले त्या वेळी तो ओरडत नव्हता. भुतासारखे चाळे करीत नव्हता, राक्षसासारखा माणसांचे लचके तोडून त्यांना खात नव्हता, दारू पिऊन जग विसरला नव्हता किंवा खून करून वाराही प्यालेला नव्हता.

—पण मला भीती वाटली मात्र त्याची !!

मी जसा भटकत होतो तसा तो देखील भटकत असेल. थकून थोडा वेळ उभा राहिला असेल एवढेच ! पण तो त्या तारेच्या खांबाशीच का उभा राहावा ? दिव्याकडे का पाहू नये त्याने---? ?

रात्री अकराचा सुमार. हत्तीएवढाल्या ढगांनी सगळे आभाळ गिळून टाकले होते. आपल्यावर आता काय प्रसंग येणार या भीतीने बिचारी धरणी काळीठिक्कर पडली होती.

अंधार काळाभोर. विजेचे दिवे रस्त्यात रांगेने लागलेले. सडकेच्या उजव्या बाजूला तलाव, त्यातले पाणी—पण ते स्वतःच्या रंगाने दिसत नव्हते. दिव्यांच्या जवळच त्या प्रकाशाच्या खांबांत त्याचे अस्तित्व ! स्वतःचे अस्तित्व ते उघडपणे दाखवू इच्छीत नव्हते.

आकाशाचे पांढरे पांढरे तुकडे, चंद्राचे शीतळ भ्रमण, चांदण्यांच्या गारगार कळ्या—ह्या साऱ्या वस्तू ढगांनी आपल्या घशाखाली घातल्या होत्या. पाण्याचे काळे कुळकुळीत हृदय देखील खदखदा हसत होते.

आता त्याच्याही लीला सुरू व्हायच्या होत्या !

सडकेवर तेवत राहणाऱ्या विजेच्या दिवट्या ! कंसाच्या दरबारात आरतीची ताटे घेऊन उभ्या असलेल्या गर्भगळित वारांगनांची शिस्त व: सोशिकपणा त्यांनी उसना आणला होता जणू कुणासाठी तरी !

दिवसभर लाखो माणसांच्या भारानेही डग न येणारा रस्ता त्या दिव्याच्या प्रकाशात आपले दगडी हृदय उघडे करून पडला होता. मधून मधून वरच्या वाळूतील काच, अभ्रक चमकत असत. त्याचे ते भेसूर हसणे ! !

डाव्या बाजूला असलेल्या इमारती स्वस्थ झोपल्यासारख्या दिसत होत्या. थकल्या भागल्या जीवांना पदराखाली घेऊन त्यांना ऊब कशी पुरविता येईल या विवंचनेत त्यांना बिचाऱ्यांना स्वस्थ झोप आली असेल किंवा नाही देव जाणे ! आजूबाजूला पसरलेल्या हिंसक वस्तूंची भीती होतीच पुनः ! चांगल्या वस्तूंना कुणी कधी सुख दिले आहे ?

मुलाला कुशीत घेऊन झोपणाऱ्या ओल्या बाळंतिणीच्या हृदयाचे आपल्या ओरडण्याने पाणी करणारे बुबड ! ते तरी कशाला जागे झाले होते ? कुणाला शोधीत होते ? ?

मी ज्या रस्त्यावर भटकत होतो तेथून ह्या साऱ्या गोष्टी दिसत होत्या. तथापि, मला ना त्या मेघांची भीती वाटली, ना त्या पाण्याने मी गुदमरलो—कशानेही नाही पण तो माणूस...

—त्याच्याकडे मी पाहिले आणि पाहतच राहिलो. भयाण...सारे भयाण... उजाड... ! !

तो त्या विजेच्या दिव्याखाली उभा होता. ओलसर जमिनीवर त्याचे पाय दबून उटले होते. आपला भार मधून मधून तो तारेच्या खांबावर टाकीत असे. कधी कधी नुसताच कपाळावर हात मारून पायाची चाळवाचाळव करी. किडामुंगीलाही प्यारा वाटणारा जीव हातोहात गमावितांना एखाद्या कैद्याने आपल्या कोठडीच्या बाहेर वाजणाऱ्या बुटांचा भीतीने कानोसा घ्यावा तशी त्याची हालचाल दिसत होती.

तो दिव्याकडे केविलवाण्या नजरेने पाही—व्याधाकडे टाकलेली हरिणाची दृष्टी जणू ! दिव्याने त्याचे काय केले होते ? जीविताला उजाळा आणणारी ती अग्निदेवता, पण तिचा देखील त्याला का हिचक वाटावा ?

अस्थिर जीवनाकडे पाहूनच्च जणू त्याचे डोळे स्थिर झाले होते. उघडझाप बंद होती. ती तारवटलेली नजर अवचित त्या कर्दम पाण्यावर खिळवून त्याचा तोच हुंदका देई, मटकन खाली बसे, पुन्हा उभा राही व आजूबाजूला पाहून उगीच आपल्याशी हसे. जगण्याची लाचारी त्याच्या त्या हसण्यात भरली होती.

वेड लागले होते का त्याला ? पण वेडी माणसे भीत नाहीत. तो का भीत होता ? कोणाला भीत होता ? आणि तो स्वतः भयानक पण का दिसत होता ?

चंद्राचे तुकडे तुकडे करून पुन्हा त्याचा ओलेपणी गोळा बांधावा; काचेची सुरई जागोजाग तडकवून डोळ्यांसमोर धरावी, तसा त्याचा चेहरा फुटलेला दिसे. नासल्या दुधासारखी त्याच्यावर खवले उठली होती; मोठ्या भेगा पडल्या होत्या. कशाने तडा गेल्या होत्या कुणास ठाऊक !

आपणच रक्त ओकावे आणि घाबरून त्याच्याकडे पाहत राहावे. त्याची मनःस्थिती त्याला देखील कळत नव्हती. शुद्धीवर असूनही तो वेशुद्ध झाला होता.

तो हसला. कायसे पुटपुटला. ' पैसा ', ' रांडापोरे ' कुणाची ? ' सगेसोयरे ', ' मसणात '—

त्या गुदमरलेल्या शब्दांनी त्या वेळी कुणाचेही कानठाळे बसले असते.

त्याच्याकडे पाहण्याचे मला नंतर धैर्य उरले नाही. भीतीने माझी गाळण उडाली; मला पळताही येईना. उभे राहणे तर शक्यच नव्हते.

माणूस माणसालाच भितो !

त्याने आपल्या अंगातले कपडे भराभर काढून फाडून टाकले. आपल्या काळजासारख्याच त्यांच्या त्याने चिंधड्या केल्या. सारा चिंध्यांचा पसारा ! !

पुनः तो हसला. तिथले ते दिवे, त्या इमारती, अगदी करपून गेल्यासारख्या दिसल्या. आभाळाची डुरकावणी फुटली. पाण्याचा फेस उसळला. तरंगांनी आपले जबडे वासले. कसले तरी अक्राळविक्राळ आक्रंदन सुरू झाले आणि कशात तरी विरले ! ! झाडांची पाने रक्ताच्या चिळकांड्यांसारखी सळसळत होती ! !

दुसरे दिवशी सकाळी मी त्याच रस्त्याने निघालो. वाटले, भेसूरता निवली असेल. प्रकाश फाकला असेल. जीवन जागे झाले असेल.

रस्ता तोच ! सारे तेच; तोच तारेचा खांब ! ! त्याच्याकडे पाहून मी थिजून गेलो.

तेथे पुष्कळ लोक जमले होते, जमत होते. मध्यंतरी एक निजलेले प्रेत—

होय, तोच तो माणूस ! आता तो निवला होता. कालची सचेतन भेसूरता गतप्राण झाली होती. जग त्याच्या पैशाअडक्याच्या, रांडापोरांच्या, सग्यासोयऱ्यांच्या गोष्टी बोलत होते.

खरंच, काय झाले होते त्याला ?

मरण्यापूर्वी माणसे अशी दिसतात तर !

१।५।३६

४१

वि स र्ज न

ज्या बागेचे कोणालाही समर्पक वर्णन करता यायचे नाही अशा एका सुंदर उपवनात पश्चिमेच्या टोकाला खूपशी फुलझाडे लाविली होती. त्या झाडांवर सोन्या-सारखी उज्ज्वल रंगाची व दुधासारख्या निर्मल कांतीची फुले रोज सकाळी उगवत आणि सायंकाळी गळून पडत.

त्यांच्या सुगंधाला सीमा नव्हती. त्यांना दिव्य म्हणून संबोधिले तर जे कधी 'डोळिया' देखिले नाही त्याची उपमा दिल्याचा वृथारोप पदरी यावयाचा. तेव्हा एवढेच सांगावयाचे, की ती फुले अनुपम होती.

त्यांच्या आयुष्याची मर्यादा एवढीच होती, की जोवर त्यांच्या शरीराची पाकळी नि पाकळी व पराग नि पराग गळून पडत नाही.

पण त्या क्षणिक, भंगुर मोजक्या अस्तित्वात देखील त्यांनी सृष्टीला धन्य करून डुलविले होते. असे वाटायचे, की त्यांच्या मुखाने अज्ञात किन्नर मुग्ध गूढ संगीत गात आहेत.

त्या उद्यानातील एका मोगरीवर सुंदर कळ्या होत्या. त्याचे सौंदर्य इतके उज्ज्वल होते, की त्यांच्यापुढे चांदण्या देखील वरमून गेल्या आणि ढगाआड लपल्या ! सदैव हास्य हाच ज्यांच्या मुखाचा विलास अशा निष्पाप बालकांचे दूध-दात देखील निष्प्रभ ठरले !

एका रात्रीत त्या कळ्यांची फुले झाली. पहाटे फुले तोडायला बागवान आला. त्याचे त्या फुलांकडे लक्ष वेधले. त्याला आपल्या श्रमांचे चीज झाल्यासारखे वाटले. तो आनंदला, हसला आणि त्या उन्मादात त्यातल्या एका फुलाशी बोलू लागला. तो म्हणाला, "सोनुल्या, तुझं लावण्य खुडून घेण्यास कोण धजेल ? तुझी इच्छा मला सांग. मी ती पूर्ण करीन."

आपल्या माणसांशी फुले बोलतात, हसतात, रडतात ! शकुंतला त्यांना सोडून गेली तेव्हा नाही का त्यांनी आक्रोश केला ? एवढ्या मोठ्या शब्दसृष्टीच्या ईश्वराने जे लिहून ठेवले ते खोटे थोडेच मानावयाचे आहे ?

त्या फुलाने उत्तर दिले, "बाबा, तुम्ही तर माझं संगोपनच केलं. माझ्या कसल्या आल्या आहेत इच्छा ! सम्राटांच्या मुगुटावर चढून आपल्या भाग्याचे देव्हारे थोडेच माजवावयाचे आहेत मला ? रूपसुंदर, मृदुमुखी तरुणींच्या गळ्यांत रुळून माझा काय लाभ ? नि इथे सुकून मरून जाण्यातही काय अर्थ ? उगीच मरायचं नि..."

फुलापानांच्या किती तरी गोष्टी आजवर ऐकल्या आहेत. पण हे कसले फूल ? आणि हे काय त्याचे बोलणे ? तो फुलमाळी विस्मयाने स्तिमित झाला असल्यास नवल कसले !

ते फूल पुढे बोलू लागले, "असं करा बाबा, मला आपल्या हाताने खुडून इथेच खाली टाकून द्या...त्यांची तरी पूजा कुणी बांधायची ?"

आता तर बागवानाच्या आश्चर्याला पार राहिला नाही. त्याच्या मनात असंख्य विचार आले. रात्रंदिवस कष्ट करून खतपाणी केलेल्या त्या पुण्यभूमीकडे त्याने अशा दृष्टीने पाहिले, की जणू...

जणू ती एक युद्धभूमी होती, जी आपल्या चिरंतन झोपेतून एकदाच जागी झाली होती आणि केवळ एकदाच तिने असहाय हुंदका दिला व रक्त ओकून पुन्हा निपचित पडली होती !...

जणू त्या धर्मक्षेत्रावरच ती बाग सजली होती. त्या फुलझाडांना त्यांच्या रक्तामांसाचे खत मिळाले होते, ज्यांच्या पराक्रमाची नोंद ठेवायला इतिहासाला फुरसत मिळाली नाही, परंतु ज्यांच्या रणकंदनानेच त्यांच्या मायभूमीने आपली चिरकालाची तहान अत्यल्प का होईना पण शमविली आणि जे शेवटी श्रांतविकल होऊन तिच्याच कुशीत तिच्याच बरोबर झोपून गेले.

आणि त्या महाभागांची पूजा बांधण्याची त्या फुलांनी अभीप्सा धरली होती जणू !

१६।७।३६

४२

आनंद-ग्रन्थी

किती किती पण कौतुक करीत होती ती त्याचे ! ना ओळख, ना देख ! त्याला जगात येऊन पुरते दहा दिवसही झाले नव्हते; परंतु ती त्याला नऊ महिन्यांपासून ओळखीत होती. त्याच्याबद्दलच्या सर्व गोष्टी तिने त्याच्या पित्याला सांगितल्या होत्या, त्याच्या आवडीनिवडी, त्यांचे घालणेलेणे हे सर्व तिला ठाऊक झाले होते त्याला शरीर नव्हते तेव्हापासून तिने त्याच्याकरिता कपडे शिवून ठेवले होते. मानवी हृदयात चिरंतन वास करणाऱ्या त्या भावना होत्या. आंब्याचे झाड लावणारा म्हातारा म्हणतो 'माझी नातवंडे त्या झाडाचे आंबे खातील.' त्या नातवंडांचा त्या वेळी मागमूस देखील नसतो,

कसासाच एक जीव—कसलासा लिबलिबीत गोळा बाहेर आला, त्या वेळी ती शुद्धीवर देखील नव्हती. त्याने, तिला प्राणांतिक वेदना सहन करावयास लाविल्या परंतु तिने एखाद्या परमहंसाप्रमाणे प्रेमाच्या मोबदल्याने त्या फेडल्या. काय पण तिला त्याचे कौतुक !

ही माझी मैत्रीण ! आज तिची दृष्टी कुणावर खिळली होती ? मी तिच्याजवळ गेलो तेव्हा ती त्या जिवाला विचारीत होती, तुला गरम कोट हवा तो काश्मिरी हवा की कसा ? आणि तो बिचारा तिच्या वात्सल्याचा गैरसमज करून संगीताची तालीम करीत होता.

मी तिला विचारले ' खरंच विमल, तुला काही वाटते का त्याच्याविषयी ? कुणासारखा आहे ग तो ? '

ती म्हणाली, ' खरंच रे ! मला अजूनही असं वाटत नाही की हा माझा मुलगा आहे. सारे लोक म्हणतात, हे ध्यान त्यांच्यासारखं म्हणून. '

तिच्या ह्या सर्व उत्तराचा मला उलटा अन्वयार्थ लावावा लागला. माता म्हणे नेहमी जिवंत काव्यात बोलते !

तिच्या डोळ्यांतले भाव, जवळच बसलेल्या तिच्या पतीच्या मुखावरील स्मिताची छटा, ह्या दोहोंचा अर्थ एवढाच होता की, झालं ! आता आम्हांला काही नको ! ! देवाने आमच्या हृदयांच्या गाठी बांधल्या !

ते अर्भक जर नेत्राच्या बाहुलीत ठेवण्याजोगी वस्तू असती तर त्या दोघांनाही आळीपाळीने आपली हौस भागवून घेतली असती. लाल लाल गाजरासारखे दिसणारे

ते बाळ एखाद्या पांढऱ्या चिरगुटात गुंडाळून पडले असायचे. पिकलेले तोंडले फुलांच्या आड दडलेले जणू ! डाळिंबाच्या फुलासारखी त्याची अंगकांती !

—आणि पुढे ते किती सुंदर होते हे फक्त ती आणि तो जाणोत !

झाली; बिचारी सुखी झाली ! मुलाचा आनंद एवढा असतो का ? ते डाळिंबाचे फूल जवळ घेताना विमलच्या अंगावर रोमांच उभे राहिले ते कसे ? बाराचे अंग चाटताना गाईला वाटते ते काय ? पिलांच्या तोंडांत चारा घालताना पक्षीण कसले गोड संगीत गाते ? मला कसलीही कल्पना होणे शक्य नव्हते. ' या जन्मी तरी आपल्याला हा असंभाव्य हे खास, ' मी स्वतःशीच हसून म्हटले, आणि ती संवेदना आनंदाची की दुःखाची याचीही कल्पना करायची ती दुसऱ्याच्या मुखावरूनच !

मी विमलचा निरोप घेतला. अर्थात् माझे रस्त्याचे विचार म्हणजे त्या अर्भकाबद्दलचे. मला विमलचा आणि तिच्या नवऱ्याचा चेहरा दिसला व भवभूतीच्या श्लोकाची आठवण झाली.

अन्तःकरण–तत्त्वस्य दम्पत्योः स्नेहसंश्रयात् ।
आनन्दग्रन्थिरेकोऽयमपत्यमिति बध्यते ॥

[परस्परांच्या हृदयांचा जीवाभावाचा विसावा होऊन पतिपत्नीच्या अंतर्भावांची प्रेमगाठ जर कुणी बांधीत असेल तर ते अपत्यच !]

विमलचा मनोविलास हीच प्रचीती दाखवीत होता की ही भावना हर्षाची, अगदी स्नेहसंश्रयी अशी असावी.

घरी येताच मी आईला सांगितले, ' आई, विमीला मुलगा झाला. ' छोट्या चंद्राला सांगितले, ' अरे, तुझ्या विमाताईला मुलगा झाला. ' उषाला मी जवळ उचलले व तिच्या ओठांना ही बातमी सांगितली.

पुनियालाच फक्त ही गोष्ट कळवायची राहिली होती. तिला मी हातचे काम टाकावयास सांगितले व जवळ बोलाविले. आली बिचारी ती व अन्नदात्यासमोर उभी राहिली.

' पुनिया, तुझ्या जन्माच्या वेळी तुझे आई-बाप असेच हौसेला आले असतील नाही ग ? '

ती काय बोलणार ? नुसती हसली, हसणे अवश्य नसते तर ती रडली असती.

तुम्ही पुनियाला जर विचारले असते, की तुझा जन्म कुठे झाला ? तर ती किंचित् कावरी बावरी झाली असती. तिचे गव्हाच्या रंगाचे गाल उगीचच लाल झाले असते. परंतु हाच प्रश्न तुम्ही तिच्या आईला विचारा. ती तुम्हांला अगदी लांबलचक उत्तर देईल. ती सांगेल ' बाबा, मी आणि माझा मरद छत्तीसगडचे राहणारे ' आणि मग ती एक निःश्वास सोडील.

तुम्ही पुनियाला विचारून पाहा, तुझी जात आणि पेशा कोणता ? ती काय उत्तर देईल असे तुम्हांला वाटते ? ती लाजून उभी राहील. आपल्या केराने भुरकट-लेल्या केसांवरून हात फिरवील. ती अकारण हसेल की जे हास्य तिच्या गोंडस तोंडाला खुलून दिसेल. गरिबांजवळ तेवढेच एक भूषण असते.

ती उत्तर मात्र काही एक देणार नाही ! !

तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुम्हांला तिच्या आईकडून मिळेल. ती आपल्या जातीचा उभा इतिहास तुमच्यापुढे धरील. ती म्हणेल ' जात कशाला म्हणतात हो ? काहीही विकून पोटाला मिळवायचे हा आमचा धंदा, पेशा; चार-दोन पैशांच्या हमालीत कुणीही घरी घेऊन जावे, धर्मात्मा असेल तर पैसे हातावर देऊन सोडून द्यावे, नाहीतर खुशाल हक्काने दार लावावे. आमची जात विचारता—असं होय ? ज्या जातीतील धडधाकट माणसांना पोटभर मजुरी मिळत नाही पण तरण्याताठ्या बायकांना लोक हमाली देतात ती आमची जात. आम्ही रौताई किंवा डबखे म्हणून ओळखले जातो. हे पाहा, माझ्या अंगावरचे वस्त्र ! आम्ही चोळ्या घालीत नाही. हा एवढा पांढरा पदर आमची जी लाज राखील तेवढीच ! '

आणखी ती पुढे म्हणेल, ' आम्हांला कपडे घालायला नसतात. आमचे अंग वस्त्राभावी उघडे असते. आणि तुम्ही सुखी लोक आमच्याकडे एखाद्या चित्र्यासारखे भुकेल्या नजरेने पाहता. '

आम्ही तिच्या ह्या स्पष्टोक्तीला काय उत्तर दिले असते देव जाणे ! आमच्या दृष्टीने ती अरसिक व अज्ञानी ठरणे असंभाव्य नव्हते.

पुनियाला मी जवळजवळ विकतच घेतली होती. तिच्या आई-बापांनी मोबदल्या-दाखल एवढेच सांगितले—

' बाबा, तुझ्या घरी गळाभर अन्नात तिला देतो. तिच्या पोटाला घाल. धर्माचा देव झाला आहेस तू. आमच्याने पोसवत नाही. '

पुनियाच्या आईला नसेल का काही वाटले ? आज पुनिया बारा वर्षांची होती. आणखी दोन वर्षांनी ती कुणीही पळवून नेण्यासारखी झाली असती. तिची आई याच प्रकाराला भीत होती.

पुनियाला जन्माबद्दल काय कल्पना ? पण तिचा जन्म झाला ते ठिकाण आणि ती परिस्थिती जर जन्माआधी तिला कळली असती तर ती पोटातच मरून गेली असती.

ती सारी हकीकत ऐकूनच मी तिला विकत घेतले होते.

त्या पोरीचा मागमूसही नव्हता त्या वेळची हकीकत ! ते पाहा, तिचे आईबाप त्यांच्या त्या झाडीतल्या घरात बापुडवाणे चेहरे करून बसले आहेत. त्या घरात दोघा माणसांनाही धड निवाऱ्याची जागा नाही, त्यांची कष्ट करायला तयारी आहे पण

तिथे काय काम मिळणार ? तिथे राहणारे त्यांचे भाऊबंद सारे तसेच ! पुनियाची आई गेंदी आणि तिचा बाप, असेल नसेल ते विकून पोट भरीत आहेत. प्रसंगी भुकेने जीव कासावीस होत असताना गेंदीने शीलही विकले. परंतु नेहमी शीलही पैसे देऊन विकत घेणारा कोण होता ? सर्व प्रकारचे दैन्य इतके की तिच्या अंगावर एकच चिंधी आहे. सूर्य त्यांच्याकडे पाहतो तोपर्यंत ती नेसायची आणि त्याने डोळे मिटले की घराची झोपट लोटून ती सोडून ठेवायची. हेतू हा, की ती लवकर फाटून जाऊ नये ! कोण कुणाला हसणार ? आणि कुणाची लाज बाळगणार ? धर्म, नीती, शील, मर्यादा असले नाजूक शब्द इतक्या दूरच्या जंगलात का कुठे ऐकू जातात ? झाडपाल्यांची सळसळ, कोल्ह्याकुत्र्यांचा आवाज; कावळ्या-घुबडांचे ओरडणे, परिस्थितीच्या किंकाळ्या, ह्या सर्व गोष्टी त्या शब्दांना त्या बाहेरचे गिळून फस्त करीत !

—आणि जेव्हा त्या दोघांजवळ विकून खाण्यासारखे काही काही राहिले नाही तेव्हा त्यांनी राहते घर पेटविले; शेवटचा पानगा त्याच्यावर भाजला, पुरेल तेवढा खाल्ला व ते बाहेर पडले. देवाला त्यांनी आपला वाटाड्या केला. त्यांच्या दृष्टीने त्याची योग्यता तेवढीच होती !

जाववेल तेवढे व मनास येईल तिकडे जायचे; भूक लागली की पाणी प्यायचे; अंगावर ना एक चिंधी की जवळ एक शिदोरी !

पण त्यात नवल नव्हते. एकदा असे झाले, काही कुत्र्यांनी पोटासाठी ग्रामांतर करावयाचा विचार केला. त्या वेळी प्रवासाकरिता म्हणून त्यांच्याजवळ दोनच गोष्टी होत्या. कोणी कितीही दगड मारले तरी ते सहन करण्याची लाचारी व खरजेने बरबटलेले रोडरोड शरीर !

अशा थाटात पुनियाची आई व बाप निघाले. आपल्या मायभूमीला त्यांनी चिडून रामराम ठोकला. त्यांना त्याबद्दल लवमात्र विषाद वाटला नाही. जिथे आपले शक्य तेवढे धिंडवडे निघाले त्या स्थानाबद्दल कसले आले प्रेम ! आणि त्यांच्या-सारख्याची माया असलेले ठिकाण तरी कोणते असणार ?

ह्या अवस्थेत प्रवास करीत करीत त्यांनी नागपूरच्या हद्दीत मुर्दाड चेहरे घेऊन मरतुकड्या जनावरांसारखे पाऊल टाकले. त्यांना असे वाटले आपण येथे चोर आहोत; इथल्या कुत्र्यांना देखील आपण दबून भिऊन वागले पाहिजे. इथल्या भिकाऱ्याने जरी सांगितले 'मी या गावचा राजा आहे' तरी त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

त्यांना असेही वाटले की आपण जन्मास यावयास नको होते. ज्या जिण्यात मरायची देखील हिंमत नाही ते जिणे कसले ? पण जन्माला यायची चूक त्यांची नव्हती !

एका झाडाखाली त्यांनी आपले बिऱ्हाड थाटले. अगदी दूर दूर, की जिथे फारसे कुणी फिरकणार नाही. त्यांची कल्पना ही की त्यांच्यात आणि घुबडांत काहीच

फरक नाही. साऱ्या मानवजातीचा आपण गुन्हा केला आहे. कुणी आपले तोंड पाहायला तयार नाही.

रोज सकाळी उठून पतिपत्नी परस्परांचा निरोप घेत. रस्त्याच्या कुठल्याही सार्वजनिक नळावर ते स्नान करीत. गेंदी दिसायला चांगली होती. ती अंघोळ करीत असताना रस्त्यावरच्या लोकांत एकदम बदल व्हायचा. नेमकी त्या वेळी कुणा विद्यार्थ्याची सायकल बिघडून तो उतरत असे, कुणाची चप्पल तुटून त्याला उभे राहावे लागे. कुणी दुर्दैवी प्राणी ठेच खाऊन थांबत असे--

—आपली विकृत लालसा पुरवून घेण्यास प्रत्येकजण निमित्त शोधू लागे !

प्रथम प्रथम एका भाकरीवर गेंदी कुठेही कामावर जायची. मग ते घर हिंदूचे असो अगर मुसलमानाचे असो. तिच्या परिस्थितीस आलेल्या प्रत्येक माणसाच्या धार्मिक वल्गना पार मरून जातात. तुकड्यातुकड्यासाठी मोताद व्हावयाची वेळ असते ती !

गेंदीचा नवराही कसेतरी करून आपले पोट जाळीत असे. संध्याकाळी दोघांनी एकमेकांच्या अंगाची ऊब घेऊन झोपायचे. हा त्यांचा दिनक्रम ! !

करकरीत तीनसांजा झाल्या आहेत. गेंदीचा नवरा आपल्या कोटरात येऊन पडला आहे. जरा कुठे आवाज झाला तरी त्याला वाटे, गेंदी आली. तो मधून मधून अस्वस्थ होतो आहे. कुणाचे ओझे उचलताना गेंदी मेली तर नाही ? त्याच्या मनात दुसरी शंका येते, कुणी तिला कायमची तर लांबविली नाही ? त्याला शहारून आले. गेंदी परत येत नाही याबद्दल त्याला खात्री वाटू लागली. त्याच्याने कल्पना सहन करवली नाही. त्याचा स्वतःचा जीव देऊन जर गेंदीला त्याच्या मनाप्रमाणे सुखी करता आले असते तर त्याने तसे सहज केले असते. पण त्याच्या जीवाचे मोल लाख रुपये थोडेच होते ?

ती पाहा-ती पाहा गेंदी ! एका काठीच्या आधाराने ती येत आहे. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत आहेत. तिचे सौंदर्य निमून गेले आहे. खूप झगडा करून आलेल्या माणसासारखी ती पावले टाकीत आहे.

काठी फेकून तिने नवऱ्याचा आधार घेतला आणि निपचित पडून राहिली. हळूहळू तिने सांगितले.

तिला एका गृहस्थाने घर सारवायला म्हणून नेले आणि तेथे सारवासारव चालविली. गेंदीला पळायला वाट नव्हती. ती खोलीतच सैरावैरा धावू लागली. त्याने तिचे वस्त्र ओढले. ती वरच्या खिडकीत कुदली व अर्धे अंग बाहेर काढून ओरडू लागली—

' .....धावा, बाईची अब्रू वाचवा, मी गरोदर आहे '.....

आतून तिचें पाय कुणीतरी ओढून धरले होते. येणारे जाणारे जमा झाले. कुणी पुढे होईना. शेवटी एका माणसाने तिला सोडविले. कसायाच्या हातून सुटलेली गाय परत जशी त्याच्याकडे धावते, तशी ती पुन्हा तिकडे धावू लागली. त्या माणसाने तिच्या अंगावर आपले उपरणे फेकले व तिची अब्रू झाकली.

गेंदी परत आली !

नवीन नवीन गोष्टीबरोबर जुन्या विसरल्या गेल्या. एवढ्यातेवढ्या गोष्टी जर आठवणीत ठेवल्या तर सर्वांत मोठी गोष्ट विसरण्याची भीती होती...जगणे !

उत्तरोत्तर गेंदीच्याने ओझे देखील उचलेना. दिवसेंदिवस तिला थकल्यासारखे वाटू लागले. तिने आणखी एक महिना कसाबसा रेटला. तिच्या नवऱ्यालाही पैसे मिळेनात. त्या कुटुंबासारखी शेकडो कुटुंबे पहिल्या पावसाच्या वाळवीसारखी नागपूरला त्या वेळी आली होती. ती वाळवी जशी आपले पंख दिव्यावर जाळून घेऊन पटापट मरते, तसे ते लोक साऱ्या बाजूंनी जळत होते !

मरत मात्र नव्हते ! मरण हातचे असते तर काही प्रयत्न न करताही लोकसंख्या कमी झाली असती.

गेंदीला आता दुसरी काळजी पडली होती. हे पोटातले पोर ?

तिने ते सारे दैवावर सोपविले.

एक दिवस तिला जरा बरी हमाली मिळाली होती. कुणीतरी बडा अधिकारी नागपूर स्टेशनवर येणार होता व त्याच्या स्वागतासाठी हारतुऱ्यांची स्टेशनवर अपूर्वाई चालली होती. बड्याबड्या लोकांकडून मेवामिठाई, हारतुरे, संत्री वगैरे जावयाची होती. त्यावर त्यांच्या रावबहादुऱ्या अवलंबून होत्या.

एका फुलांच्या ठेकेदाराने गेंदीला मजुरी दिली व तो तिच्या डोक्यावर सामान लादून स्टेशनवर निघाला. सकाळी आठ वाजता गाडी येणार होती. साडेसात वाजता ती व ठेकेदार पुलाचा उंचवटा चढावयाच्या वेतात होते. ठेकेदार तिला घाई करीत होता. शिव्यागाळीने त्याचे तोंड भरले होते. ती शक्य तितक्या वेगाने चालली होती. मागच्या हमालणी पुढे गेल्या की ठेकेदार गेंदीवर कातावत असे.

तिला प्राणांतिक वेदना होत होत्या. लोकांची गर्दी मनस्वी वाढत होती, मोटारी, सायकली, टांगे वगैरे भराभर धावत होते. पोलिसांनी रस्ता रोखला होता. साऱ्या लोकांत चैतन्य खेळत होते. त्यांपैकी प्रत्येकाला वाटत होते की अधिकारी आपल्याकडे पाहणारच आहे.

त्या गर्दीतच गेंदी झपाझप चालली होती. मोठ्या रामाच्या देवळावरून ती आली व आता मोठा पूल चढावयास सुरवात करणार तोच ठेकेदार ओरडला 'ए, पोनेआठ बजनेको आये.'

या वेळीं ती एकदम थबकली. तिला अवसान राहिले नव्हते. ती आता सर्व विसरली. ते सामान तिने डोक्यावरून फेकून दिले आणि कोपऱ्यातील पोलिसाच्या लाकडी झोपडीच्या आडोशाला ती गेली. एखाद्या हरिणीसारखी ती दीनवाणी विवळत होती.

हे सर्व एका निमिषात झाले. तो ठेकेदार रागारागाने तिच्याजवळ गेला व हात उगारणार...

...त्याला दिसले, गेंदीच्या पुढ्यात एक मूल पडले असून.....तो खिन्नपणे उभा राहिला.

तिच्या जातीचे चार-दोन लोक तिचे विवळणे ऐकून तिथे जमले व त्यांनी झाकदडप करून तिला जवळच्या मेयो इस्पितळात पोचविली.

...इथे जन्म घेतलेली हीच ती पूर्णिमा, जिला पुनिया म्हणून मी विकत घेतली होती.

गोड पोरगी. चुणचुणीत पण अशरणतेची मूर्ती जणू !!

गेंदीच्या व गेंदीच्या नवऱ्याच्या स्नेहसंश्रयाने निर्माण झालेली ही आनंद-ग्रन्थी पूर्णिमा !

सहज एक कल्पना माझ्या मनात आली--भवभूतीने जो श्लोक लिहिला तो कुणाकरिता ?

पुनियाचे नाव पूर्णिमा.

गरिबांना प्रकाश नको असतो !

५।९।३६

४३

शरयूची लग्ने

'आई, ते सारे फोटो परत कर ज्यांचे त्यांचे; त्यांपैकी मी एकाही मुलीशी लग्न करणार नाही.'

आपले सुंदरसे केस टोपीखाली दाबीत, अर्धवट आरशात पाहत एक तरुण उद्गारला आणि दुसऱ्या क्षणीच धोतराचा सोगा खिशात कोंबून त्याने वहाणा पायांत घातल्या.

त्याची चालण्याची ऐट, डोळ्यांतील चमक, ओठांची चाळवाचाळव या सर्वांत एक प्रकारचा जिवंतपणा होता. अगदी शिगेवर चाललेल्या डोहासारखा; परंतु आभाळी

हत्तीएवढाले ढग आले, तरी त्यांच्या सावल्या पोटात घ्यायची तयारी. आत असंख्य घडामोडी चालल्या असल्या, तथापि वरच्या लहरींवरून कुणाला फारसे काहीच कळू नये. दुर्दम्य आत्मविश्वास साऱ्या अंगात मुसमुसला होता.

रस्त्याने उकडायला लागले, म्हणून त्याने आपल्या कोटाच्या गुंड्या सोडल्या. कसलेतरी कागद खिशातून काढीत तो चालला होता.

तो एका घरासमोर येऊन पोहोचला व तेथे खेळत असलेल्या छोट्या चिमणीला त्याने विचारले, 'काका आहेत का ग घरी ?'

'हो, बसले आहेत.'

त्याने आत डोकावून पाहिले. काका सूत काढीत बसले होते. समोरच्या सुकवाशीवर एक पगडीवाले सद्गृहस्थ आणि त्यांच्या शेजारीच एक सोळा वर्षांची गोरीपान मृदुमुखी पोरगी.

तो चरकला. हे काय ? काँग्रेसभक्तांच्या घरी हे केळकर कसे ? आणि केळकरांच्या राजकारणाशी पोरीचा काय संबंध ?

आपले विचार त्याने आवरते घेतले. त्यांना सर्वांना सावध करावे, म्हणून त्याने हाक मारली—

'काका !'

'कोण, विश्वास ? ये, ये, मघाशीच तुझी मला आठवण झाली. तुझे ते Sugar questioneer आजच्या डाकेने आले. अरे, पण बैस ना ?'

तो बसला. त्याने अजूनही त्या गृहस्थाकडे किंवा त्या मुलीकडे पाहिले नव्हते.

'काका, Agriculture and Industries चा तो डायरेक्टर कोण आहे हो ? नाव काय त्याचं ?'

'भालजा–' त्या पगडीवाल्यांनी उत्तर दिले.

'का ? तू जाऊन आलास वाटतं ?'

"हो. पण उपयोग काय ? मी त्याला चांगला सुनावला. तो म्हणतो, 'प्रत्येकाला बत्तीस एकरांच्या वर उसाची लागवड करता येणार नाही. पाणीपुरवठा कमी आहे.' खोटे आहे हे. मी जातीने पाहून आलो आणि वर कारण काय सांगतो, म्हणे other crops suffer. तेव्हा उसाचे मळे-कसले तयार होणार सी. पी.मध्ये!"

"मग तू काय म्हणालास ? तू त्याला शहाणपण शिकविलं असशील. तू म्हणजे काय ! अरे हो, समजले का बाबासाहेब, हा आपल्या अप्पांचा मुलगा विश्वास मराठे. मोठा बागेदार, अगदी लाखात एक समजा.'

'असं होय ?'

'आणि विश्वास, हे रा. ब. बाबासाहेब केळकर. वर्ध्याचे राहणारे. माझे बालपणचे शाळासोबती. दिवस पाहा कसे असतात. हे रावबहादूदुर झाले आणि आम्ही सर्व गमावून बसलो. असे का रे बाबा...'

हा त्यांचा प्रश्न उत्तराकरिता नव्हता. नंतर दोघांची ओळखदेख, नमस्कार वगैरे झाले. त्या जवळच्या मुलीने दुसरीकडे पाहिले. तिच्या मनात कसलेतरी दुसरेच विचार चालले असावेत.

'तुमचे वडील म्हणजे दिनकरराव मराठे, रजिस्ट्रार आहेत ते. नव्हे का?'

'होय!'

'वा, वा, आनंद झाला आपल्याला पाहून! अनायासेच भेट झाली. मला थोडं जरा कामही होतं आपल्याशी. जरा एकीकडे बोलू आपण.'

बाबासाहेबांनी जवळजवळ त्याला उठविलेच.

'चल, ये बाळ शरयू!'

ते तिघेही जरा बाजूस गेले.

'हं, ही आमची शरयू. वय सतरा. यंदाच कॉलेजमध्ये गेली. शरू, हे आपले विश्वासराव मराठे; ज्यांच्याबद्दल मी आज आगगाडीत बोलत होतो.'

शरयूच्या तोंडावर 'असं का' चा भाव.

विश्वासाची मुद्रा गोंधळलेली.

शरयूने विश्वासकडे पाहिले. त्याने तिच्याकडे.

'तुम्हांला माझं पत्र पोचलंच असेल. दिनकररावांनी–'

'होय, बाबा म्हणत होते काहीतरी.'

'ठीक, ठीक. फार आनंद झाला. आता अनायासेच शरयू तुम्हांला दिसली. तुम्ही सुशिक्षित. अगदी मनमोकळेपणाने बोला हं. कशी आहे आमची मुलगी? पसंत ना? ठीक!'

शरयू आणि विश्वासचे ते चेहरे!

प्रत्येकाच्या तोंडावर संध्येची लाली. आणखी कशाकशाची, पण खूप!

'आपण कुठे असता सध्या?'

'मी यू. पी.मध्ये आहे.'

'अस्सं! खेळाचा वगैरे नाद?'

'टेनिसचा.'

'ब्रेव्हो, शरू, Congratulations! अगदी life companion घे तुला.'

विश्वास कावराबावरा होतो!

'तुम्ही खादी वापरता नव्हे का? पोरी, थोडा त्रास होईल तुला जरा...पण..."

शरयू चिडल्यासारखी झाली म्हणूनच वरचे तिच्या वडिलांचे वाक्य अपुरेच राहिले. बाबासाहेबांची कल्पना ही की, आपण आपल्या घरी बसून निवांतपणे बोलत आहोत.

'तुम्ही यू. पी.मध्ये आहात तर ! काय करता तिकडे हल्ली ?'

'मी साखरेच्या कारखान्यात आहे.'

'That 's it ! हे तर त्याहून छान ! मग शरू, तू खूप साखर खात जा ! अगदी साखरेसारखं जमतं विश्वासराव !'

त्या दोघांनी एकमेकांकडे पाहिले. तिला काय दिसले देव जाणे; पण तिचा गुलाबासारखा चेहरा पांढरा फटफटीत पडला.

'मग हे लग्न ? ...'

विश्वास काकाकडे जावयास निघाला.

खरेच शरयूचे हे लग्न ?

पण तिची अशी कितीतरी लग्ने रावबहाद्दुरांनी लाविली होती आजवर !

शरयूची दृष्टी पुढे जात असलेल्या विश्वासावर खिळली. त्याच्या कपाळावर मघाशी चढलेल्या आठ्या तिला आठवल्या.

तिचे डोळे डबडबले !

तिने बाबासाहेबांकडे निर्बल क्रोधाने पाहिले.

बिचारी शरयू !

१५।९।३६

४४

तिची जन्मठेप

नळ बंद ! गावभर ओरडा झाला, नळ बंद ! पाण्याचे मशीन बिघडले, आज पाणी मिळणार नाही. पाणी बंद !

कुठले आणावयाचे पाणी ? गावचे लोक नदीवर चालले. रस्त्यारस्त्यातून पाण्याची मिरवणूक, भरल्या घागरीच्या सुवासिनींचा सुकाळ—शकुन !—अपशकुन !!

आपल्या दाराचा तरटाचा पडदा बाजूला सारून ती बाहेर पडली. कमरेवर एक रिकामी घागर आणि नळाचा रस्ता पायाखाली.

तिने नळाची तोटी दाबली. उलटसुलट फिरवून पाहिली. नळोबा शांत ! बाजूच्या रस्त्याने बायकांचा थवा भांड्यांचा आवाज करीत चालला होता.

ती थोडा वेळ विचारात पडली. नदी कोणत्या बाजूला असेल ?

सहज म्हणून तिने समोरच्या कडूनिंबाच्या झाडाकडे पाहिले. त्याला फुलोर आलेला होता. सोन्याचांदीचे मणी पानांच्या शेंड्याशेंड्यांना झळकत होते. हिरवीगार पाने आणि त्याच्या आड दडलेले काऊ चिऊ ! !

तिचे डोळे विस्फारले. हा वृक्ष कधी निर्माण झाला इथे ? इतका कोवळा, रसरशीत, सुंदर ! तिची दृष्टी आसमंतात फिरली.

इथले लोक एवढ्यात इतके श्रीमंत झाले काय ? माझ्या वेळी मी मातीची, गवताची घरे पाहिली होती. इथे चुना, विटा, पन्हाळी पत्रे यांचे कारखाने तर निघाले नाहीत ना ?

आपण लहानपणी साहेब पाहिला की भिऊन पळत होतो. आपली आई आपल्याला त्याचा बागुलबोवा दाखवीत होती. हे तिला आठवले. आज तिला रस्त्याने साहेबी पोषाख शेकड्यावारी दिसत होते. हा जमाना कोणता ? आपण कुठे होतो ?

त्या बायकांबरोबर ती पाण्याला जाऊ लागली. एका बाईशी तिने ओळख केली. चौरस्ता लागला. चौरस्त्याच्या मौजा रोजच्या माणसालाच मौजेच्या वाटतात. मग तिला काय ? ती हुरळल्यासारखी झाली. तिला वाटले फिरून आपली जवानी टवटवली. मध्येच जागे झालेल्या माणसाची मुद्रा जशी बावरलेली असते तसे तिने तोंड केले. पिंजऱ्यातून पळालेल्या पाखराला जसे मोकळ्यावरही सुख भोगता येत नाही तद्वत् ती चंचलचित्त झाली होती ! !

रस्त्यावर एक आरसेमहाल दिसला. तिला ते एक मोठे मधुर स्वप्न वाटले. माणसाला सुखविण्यासाठी देवाने जशी स्वप्ने निर्माण केली, तसाच हा महाल देखील निर्माण केला असावा, असा तिने कयास बांधला. तिच्या घरी नेहमी ऐकू येणाऱ्या एका इमारतीचे नाव तिला आठवले. तिने शंकेने जवळच्या बाईला विचारले.

' बाई, हा ताजमहाल आहे का ? '

ती बिचारी अज्ञान, अशिक्षित; तिला काय कळणार ? तिने भसाड्या शब्दांत उत्तर दिले—

' मला नाही समजत बाई तुझी बोलणी. हे घर त्या सरजू शेटाच्या रंडकाडीचं आहे. कशाला आपली नजर बिघडवितेस तू ? चल पाण्याला. '

त्या बाईच्या उपदेशाने ती चमकली. पण तिची जिज्ञासा तिला स्वस्थ बसू देईना. पुष्कळ गोष्टी अशा होत्या की ज्यांचा तिच्या वेळी मागमूस देखील नव्हता. ती पुढे चालू लागली.

एका घरासमोर एका मोठ्या चबुतऱ्यावर एक झेंडा रोविलेला होता. लोक पांढरे स्वच्छ कपडे घालून त्याला नमस्कार करीत एक गाणे गुणगुणत होते. तिने फिरून विचारले—

'बाई, हे कोण आहेत ?'

'हे देखील तुला माहीत नाही ? कुठे राहतेस ग तू ? अग हे देशीवाले आहेत' असे म्हणून त्या बाईने देखील त्या झेंड्याला नमस्कार केला.

'देशीवाले म्हणजे कोण ?'

'हे जेलामधी जातात. पांढरे महाराऊ कपडे घालतात. आपली बायकापोरे सोडून देतात. अन् तुमच्या आमच्या घरचा केरकचरा फेकून रस्ते झाडतात.'

'कशापायी ?'

'आपल्याला हे राज्य मिळवून देणार आहेत. गांधीबाबा मग आपला राजा होईल. आपल्याला मग पैसे मिळतील. आबादी राहील. पाण्याचा काळ पडणार नाही. पोराबाळांना कपडे मिळतील; तो पाहा गांधीबाबा.'

तिने समोरच्या चौकातील उच्च स्तंभावर कोरलेला म. गांधींचा पुतळा तिला दाखविला.

'हा गांधीबाबा कोण ?'

'हा आपला माबाप ! हा पोलीसवाल्यांशी लढाई करतो. त्यांना आपल्या रहाटावर.गरगर फिरवून आपटतो. त्याने छूःमंतर केले की आपल्या रोगराई पळून जातात.'

त्या बाईने पुनः एकदा त्या पुतळ्याकडे पाहिले. चौकात तिची नजर खिळली. त्या संगमरवरी खांबावर फुलवेली खेळत होत्या. चौकभर गुलाब, जाई, फुले फेकत होत्या. कारंजी थुईथुई फवारे सोडीत होती. खालच्या हिरवळीला त्यामुळे अमृत मिळत होते. आपले अंकुर वर वर करून ती पाणी पीत होती.

'बाई, हा चौक कसला ?'

'इथे लाठी पडली होती सगळ्या गावावर ! सभा होती देशीची. देशीवाले बोलत होते. निमकाच्या पुडीचा सौदा चालला होता. त्या रांडलेका पोलीसावाल्यांनी साऱ्यांना झोडपले. अयाई ! तो बामणाचा पोरगा बाई—अवघा रक्तानं भरला होता की— ! ! त्याला त्यांनी जेलामधी नेला. मी देखील उभी होते माय एका कडेस. त्या पोलिसानं मलाही दोन धक्के मारून हाकलून लावला. हलकट लेकाचे ! पंधरा रुपडयांचे दिमाखचोर.'

त्या स्त्रीला त्वेष चेवला होता !

ती बाई मोठ्या हावरेपणाने सारे पाहत होती, सारे ऐकत होती, सारे समजून घेत होती. तिला वाटले आपल्यावर कुणी जादूचेटूक केले असावे. त्याविना हे

इंद्रजाल दिवसाढवळ्या दिसणे शक्य नाही. दुनिया इतकी कशी बदलली ? तिला स्वतःमध्ये यत्किंचित देखील फरक दिसत नव्हता; आणि आपण जिवंत आहोत याबद्दल तिची खात्री होती. ती अधिकच बावरली. आपण कुठे भूलून भटकून तर चाललो नाही ? इथली सारी नव्हाळी आपल्याला हिणविते आहे असा तिला भास झाला. तिला स्वतःची लाज वाटली.

भूकंपाबद्दल आता तिची खात्री झाली. त्यानेच हे बदलून गेले असावे. इथली पूर्वीची घरे गेली आणि जमिनीच्या पोटातून ही नवी सृष्टी पैदा झाली.

आणखी एक कल्पना तिच्या मनात आली. आकाश तरी खिल्लक आहे की नाही ? आकाशात चंद्राचा फिकट तुकडा ढगातून सरकत चालला होता. पांढुरके ढग शिंपल्यासारखे सूर्यकिरणांत चमकत होते. स्वच्छंद वारा वाहत होता. घारी उडत होत्या.

तिची शंका नाहीशी झाली. आकाश बदललेले नाही. रोजचेच होते !!

मग ही मायापुरी आली कुठून ? छे छे ! हे काहीतरी गौडबंगाल आहे खास !

पुनः एकदा तिने विचारले—

'बाई, हे सारे केव्हा पैदा झाले ?'

'म्हणजे ? कुठली राहणारी ग तू ?'

'इथलीच.'

'मग हे तुला कसे माहीत नाही ? काही दोष आहे का ?'

'पण मी पाहिलं तेव्हा नव्हतं काही इथे.'

'केव्हा पाहिलं होतं ?'

'अग, आता आता–पंचवीस वर्षं झाली असतील फार तर.'

'अं—?—?—?'

त्या बाईने तिच्याकडे शंकित नजरेने पाहिले. तिला तिची चीड आली. तिला वाटले ही चुडेल, डाकीण किंवा कुणीतरी असली पाहिजे. आपली मुलेबाळे खायला आपल्याशी दोस्ती करते आहे. तिने क्रोधाने विचारले—

'पंचवीस वर्षे कुठं गेली होतीस ?'

उत्तर नाही. चेहरा विचारमग्न, विकल झालेला, उदासवाणा !

'काळ्या पाण्यावरून येते आहेस काय ?'

'नको बाई असं बोलू'

'मग कुठं होतीस ते सांग ना ?'

'इथे, ह्याच गावात.'

'पण त्याचा अर्थ काय ?'

'अर्थ कसला आला आहे त्यात ? सोळाव्या वर्षी माझं लग्न झालं, सासर ह्याच गावचं. आज माझी उमर चाळीस वर्षांची आहे'

'बरं मग ?'

'कशी गवार आहेस कोण जाणे ! मी जवानीत कशी घराच्या बाहेर निघू ? आम्ही बुरख्याच्या बायका !'

एवढेच ती बोलली आणि रस्त्याने गुपचूप चालू लागली. त्या दुसऱ्या स्त्रीचा जीव खाली पडला.

'नाही, नाही, चोर चुडेल नाही बिचारी ती. उगीच मी तिच्यावर आळ घेतला,' ती मनात म्हणाली.

एक दयेचा कटाक्ष—आणि पुनः जीवन सुरू !

२५।९।३६

४५

गंगास्नान

त्या टापूत पटवर्धनांचे नाव घ्यायला एक तास लागत असे. त्यांचा तो विस्तीर्ण वाडा, त्या अश्वशाळा, ती खिल्लारे, धार्मिक विधींचा एकंदर थाट, देवांचा देव्हारा—गावातल्या लोकांना डोळे दिपवून घ्यायला मोठेच साधन होते ते एक !

जिला नोकरचाकर राणीसरकार म्हणून हाक मारीत, अशी एक गतधवा दुपारी दोनच्या सुमारास आपल्या आवडत्या झोपाळ्यावर बसली होती. त्या चांदीच्या झोपाळ्यावर मखमलीच्या गाद्या टाकल्या होत्या व रत्नखचित उपधाने अस्ताव्यस्त पडली होती. झोपाळ्याच्या रेशमी दोऱ्या एवढासा जरी झोका मिळाला, तरी कर्णमधुर सळसळ करीत असत.

ती स्वतःच आपल्या उजव्या पायाने झोका घेत होती. शेजारी बसून दोन दासी चवऱ्या ढाळीत होत्या. तिथल्या वैभवाला सीमा नव्हती. दृष्टान्त कदाचित अप्रस्तुत वाटेल; पण तिच्याकडे पाहिल्यावर बायकांना शिवलीलामृतातील महानंदेची आठवण होत असे.

चंद्रासारखी तिची अंगकांती आणि तारकांसारखे तिचे तेज. हसण्यात मार्दव, दृष्टीत गांभीर्य आणि एक प्रकारचा उन्माद ! अजून आयुष्याचे अर्धे दिवस जावयाचे राहिलेले. जवानी देखील अजून भरावल्न न ओसरलेली !

ती एक सुंदरसे शुभ्र वस्त्र नेसली होती की, जे तिच्या सौम्य स्थूल बांध्याला शोभून दिसावे. हाताने विणकाम चालले होते. डोळ्यांपुढे कसलीशी दृश्ये सरकत होती.

पावसाळ्याला आरंभ झालेला. आकाशात विविध रंग मिसळू लागले होते. निसर्गाची निर्भरता प्रतिदिन वाढत होती. सारी जीवसृष्टी आपापला आधार शोधायला निघाली होती.

मेघांचा घनगंभीर ध्वनी ! वळचणीच्या कबुतरांची मादक घुरघुर; चिमणे-चिमण्या घरट्यांत दडून चिवचिवत असलेली; भोवताली तरण्याताठ्या, हसऱ्या-खेळत्या तृप्त दासदासींचा घोळका—

तिला कसल्यातरी विचित्र संवेदना होत होत्या. मधूनच तिचे संथ श्वसन थांबत असे. उगीचच ती समोर दिसणाऱ्या आकाशातील धावत्या ढगाकडे पाहू लागे.

ती ओठांतल्या ओठांतच गुणगुणू लागली. काले वारिधराणाम्...'' द्राक्षासारखे तिचे ओठ, कोकिळेसारखा तिचा कंठ !

बाजूच्या आरशाकडे तिने नजर फिरविली. आपले सुंदरसे डोळे पाहिले, शुभ्र भालप्रदेश अवलोकिला, वस्त्रावृत स्फुट कोरकांवर दृष्टी स्थिरावली.

परमेश्वराने हे सारे दिले कुणाकरिता, हा तिच्या मनोव्यथेचा अर्थ !

पुन्हा मेघाने साद घातली. तिचा जीव भरून आला. ती आपल्या आयुष्यातील त्या दिवसांकडे पाहू लागली की, ज्या वेळी ती सधवा होती, ज्या वेळी नित्यनेमाने ती गंगेवर स्नानास जात असे आणि ज्या वेळी पाण्यात तासन् तास उभी राहून भरलेल्या ढगांकरवी मदनाला निरोप पाठवीत असे.

गंगास्नानाची आठवण ! तिचे मन बहरले. त्या वेळी तोच तिचा एकुलता एक मनोविलास होता. गंगालहरीच्या सतारीची छेड, हेच तिचे मनोविनोदन ! तारुण्याचे सारे खेळ ती गंगेबरोबरच खेळलेली होती.

मंदमंद पावलांनी ती वाळवंटात चालावयाची. तिच्या पायाने दबलेले वालुकाकण आपल्याला धन्य धन्य मानून घेत असत. गंगेच्या पाण्यात पाय घातला की तिचे अंग शहारून येई. पतीच्या पहिल्या स्पर्शानेही तिला कधी तसे वाटले नव्हते. हळूहळू ती पाण्यात उतरत असे. एक एक पाऊल पुढे पुढे न्यावयाचे, छातीपर्यंत पाणी आले की, पदर पाडून घाटावरची मौज पाहायची. घरच्या खानदानीतून मोकळेपणा मिळवायला तिला तेवढीच जागा होती.

पायाखालची वाळू हळूच सरकायला लागली की तिला गुदगुल्या होत. उरोभागी लाटा हेलकावे खाऊ लागल्या की ती त्या लहरींचे चुंबन घेत सुटे. आपले कोमल हात मृदू मृदू तरंगावरून फिरविताना तिची 'सूध' नाहीशी होऊन जाई.

गंगेची मरुस्थली स्नान करणाऱ्यांनी नेहमीच भरलेली असे. तिच्याच शेजारी थोड्या अंतरावर चार तरुण मुलगे पोहावयास येत. कित्येकदा ते पाण्यात खूप मस्ती करीत. एकमेकांच्या अंगावर शिडकावे उडवून त्या हबक्यांनी परस्परांना आधमुसे करण्याची त्यांची शर्यत लागे. कधी कधी ते हबके तिच्यापर्यंतही अवचट येऊन पोचत.

तिला तेच पाहावेसे वाटे. तिथून तिचा पायही उचलत नसे. ती पोरे गेल्याशिवाय पाण्यातून निघण्याचे तिच्या जिवावर येई !

लावण्याची खाण ! मदनाची शिकार झालेली ! तिला लवकरच कळून आले की, ती पोरेदेखील तिच्याविषयी उदासीन नाहीत. त्यांच्याही डोळ्यांत काहीतरी आहे. त्यांच्याकडून गंगेच्या लाटा तिच्यापर्यंत येत. तिच्या नाजूक हाताने हालणारे पाणी त्यांच्या हृदयापर्यंत जाऊन भिडे—

त्यांच्याकडे पाहता पाहता तिचेही डोळे भुकेले होत. ओठांना दातांनी दाबून ती त्यांची थरथर थांबवीत असे.

सूर्यग्रहणाचा दिवस ! गंगास्नानाची पर्वणी. सायंकाळी तीसुद्धा स्नानास गेली. सूर्याची प्रभा लोपली होती. क्वचित चांदण्याही आभाळातून डोकावत. तिला वाटले आपल्या सुखाने त्या तिला चिडवीत आहेत.

तिने गंगेत उडी घातली. अठरा वर्षांचे वय ! कुणीतरी हळूच म्हटलेले तिला ऐकू आले " काम्बोज–तुरगांगना..."

इकडेतिकडे शोधक दृष्टीने पाहता तिला आढळले की, ती पोरे आज देखील तशीच खेळत आहेत. तिच्या अंगावर आज जास्तच हबके नि शिडकावे येऊ लागले. प्रकाश धूसर झालेला ! जीव भरून आलेला ! ती निर्निमेष उभी राहिली. अधीरतेने तिचे अंग पुलकित झाले. तिचा पाय घसरला. ती वाहता वाहता ओरडली—

" धावा, धावा, मी बुडते आहे. "

त्या पोरांनी तिला अलगद उचलून पाण्यावर धरली. तिचे ते द्राक्षासारखे ओठ ... ! त्यांनी तिला ओलेत्यानेच घरी पोचविली. तिचे डोळे शांततेने विकल झालेले दिसत होते. पारिजातकाचे फूल थोडा वेळ हाती धरल्यावर जसे होते तसे—!

घरच्या माणसांनी त्या पोरांनाच धन्यवाद दिले. ती ज्या मंचकावर निपचित पडली होती, त्याभोवती सारी मंडळी गोळा झाली. शेजारच्या आयाबाया जमल्या—

" कशी बाई, चांगले पोहता येत होते, कसा पाय घसरला कोण जाणे. "

त्या राजीवनेत्रेने एकदा डोळे उघडून वरील वाक्य म्हणणाऱ्या बाईकडे पाहिले. किंचित स्मिताची रेघ तिच्या ओठांवर उमटली. जणू तिच्या ओठांनी व डोळ्यांनीच उत्तर दिले,—

" बाई माझ्यासारखी तू रोज मोतीमाणकं खात राहिली असतीस आणि तुझा नवरा माझ्या पतीसारखाच जरत्कारू व रोगी राहिला असता, तर तुझेही पाय गंगेत असेच घसरले असते ! "

हीच ती आठवण—हेच ते हास्य !

राणीसरकारनी भानावर येऊन एक दीर्घ उसासा टाकला. दासदासी झोके देत चवऱ्या ढाळू लागल्या !

२६ । ९ । ३६

४६

माणूस का रडतो ?

" किती धिप्पाड होता. पहाड जसा काही. "

" काही नेम नाही बाबा कधी काय होईल याचा. "

" आकाश फाटलं त्या पोरीवर. "

" दोन पोरं मागं टाकून गेला. काय करावं तिने आता ? "

" अजून बिचाऱ्यांचं अन्नालाही तोंड लागलं नाही. "

" ती पोरगी पाहा ना. तरणीताठी, काय विटंबना लिहिल्या आहेत बिचारीच्या नशिबी देव जाणे. "

" काय देवाचा न्याय ! "

" बरं, भाऊसाहेब, आता हातपाय गाळून कसं चालेल ? लावा काही व्यवस्था, बांधा कंबर "

" कसली कंबर बांधू अण्णा ? अरे, तीच तर खचली. "

" असं कसं ? नाना, तुम्ही जोशी वगैरे बोलवा. मी मडकं आणतो. प्रहर दिवस होऊन जाईल. मग..."

तो मरून दोन घटकाही झाल्या नाहीत तर सारा गाव उलटला. सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. दोन दिवसांच्या आजारात हा खतम झाला ! आपले कसे होईल ? हा आजार कोणता ?

आवारभर गर्दी माजली. त्याची बायको आपल्या दोन पोरांना पोटाशी घेऊन स्वस्थ बसली होती. अशा दुर्धर प्रसंगी रडावे लागते याचीही तिला शुद्ध राहिली नव्हती. ती आल्यागेल्याकडे टकमका पाही. पोरांकडे पाहून हसे. आजूबाजूच्या बायां-बद्दल शंका व्यक्त करी, की तुम्ही कशाला आला ? झाले आहे तरी काय ?

प्रेतयात्रेची तयारी झाली. शिडी बांधणे झाले. चार लोकांनी जड हातांनी दोऱ्या कसल्या. खांदे देणारे सिद्ध झाले. बायकांच्या जमावातून आक्रोश सुरू होता. आक्रंदन, हुंदके, कर्कश आवाज, छातीफोड !

" कसा गेला ? " सर्व म्हणत.

पोरी, मागच्या जन्मी कुणाचं सौभाग्य तुडवलं होतंस ? ये पिल्या, ये, रडू नकोस..." सर्व बाया कळवळल्या.

ह्या अर्भकांना अर्धमेले झाल्यासारखे वाटले. कोणीही त्यांना उचलून घेई. एका हाताचा आधार नाहीसा झाल्यावर हजार हातांनी आपली सहानुभूती दाखविली! असे तरी का होते ? पण पोरांना मात्र जणू काटे बोचत होते !

कलेवर उचलले गेले. बायको टाहो फोडून जमिनीवर पडली. आता तिला जाणीव झाली, की काहीतरी झाले आहे ! आता तिला वाटू लागले, की ज्याला आपण आपल्या हृदयान्तरी जपले त्याचा मागमूस देखील नाहीसा होणार आहे ! तिला एकदम मूर्च्छा आली. धैर्यमेरूंच्या डोळ्यांना पाझर फुटेल इतके ते दृश्य हृदय-द्रावक होते. मरण ! कल्पना केली तरी तोंड काळे ठिक्कर पडते. तेथे तर यमराजाने आपली लीला चालविली होती.

तिला शुद्धीवर आणावयाचे प्रयत्न सुरू झाले. पुरुष मंडळी स्मशानी गेलेली. बायकांनी तिच्याभोवती घोळका धरला. एक जरी आक्रोश करू लागली तरी हजार-जणींचा त्यात सूर मिसळत असे. जीव आला ! जीव गेला !

" कशी सोन्यासारखी पोरं आहेत ! "

" कौतुक तरी किती होतं त्याला ! रात्रंदिवस त्याचं मन त्यांच्यांतच असे. "

" चार दिवस आजारी देखील पडला नाही. संसार काय, तिला बिचारीला सेवाही करता आली नाही दोन दिवस ! कशी शुद्धीवर येईल ? "

" पोरं मागे आहेत ! "

" अग वहिनी, ती बाई पाहा कशी स्फुंदस्फुंदून रडते आहे. "

" कोण हो वन्स ? "

" ती. त्या झाडापाशी एकटी उभी आहे ती. "

" ती पांढऱ्या पातळाची ? "

" नाही ग, सडकेचं लुगडं आहे. उजळ चेहरा आहे. टळटळीत नाक-डोळे आहेत. "

" पाहा, जीव कसा खालीवर होतो आहे तिचा. तिच्या डोळ्यांची धार पाहा कशी अविरत... "

" हं ती ? कुणीतरी बहीणबिहीण असेल. आभाळाएवढा जीव गेला... "

" कुठली ग बहीण ? ती देशपांडे वकिलाची बायको नव्हे का ? "

" अंतःकरण कोवळं आहे तिचं. कुणी त्रास देऊ नये म्हणून वेगळी जाऊन उभी आहे. "

" हं, नि बाकीच्या बायकांसारखी उपदेश पण करीत नाही. "

" वन्स, चला बरं तिथे. "

त्या तिच्याजवळ गेल्या. ती आणखी दूर सरकली. तिला वाटले, आपल्याला मनसोक्त रडू देखील देत नाहीत. त्या तेथे गेल्या आणि तशाच उभ्या राहिल्या. त्यांना देखील रडे कोसळले.

तिची खात्री झाली, की ह्या आपल्याला त्रास द्यायला आलेल्या नाहीत. तिने त्यांच्याकडे पाहिले. त्यांनी निमित्त शोधले.

सुंदरबन्स म्हणाली, "खरंच बाई, कसा प्रसंग ओढवला !"

"कशाला उकरून काढता ? जिवापरी जीव गेला. आपण बसलो कर्मकपाळी. त्याचं वर्णन तरी कशाला ? बायको कशी मासळीसारखी तळमळती आहे. पदराला बांधलेली पोरं..."

तिचे ते अर्धे वाक्य हुंदक्यांत विरले. त्या दोघींनी गळ्यांत गळे घातले. तेवढ्यातही तिने कपाळाचे कुंकू नीट आहे किंवा नाही हे पाहिले आणि ती हुंदके दत बोलू लागली,

"काळ वेळ कुणाला सांगून आलेली आहे ? रडू नको तर काय करू सुंदरबाई ! ही वेळ ! मायबहिणी, तिच्यासारखीच माझी दशा आहे ग ! दोन लहान लहान चिलीपीली ... मन चिंती...देवा..."

तिने हंबरडा फोडला. सर्वांना पुनः उमळून आले व एकच आक्रोश सुरू झाला.

तिच्याकडे आलेल्या त्या दोघीही आता तिच्यासारख्याच विलाप करू लागल्या. ते दुःख सर्वांनी वाटून घेतले !

२९ । ९ । ३६

४७

नव्या रूढी

अवघ्या गावाने समाधान व्यक्त केले; आनंदाने टाळ्या पिटल्या.

परंतु नगरभवनातील सारे मेंबर्स एकदम नाउमेद झाले. सर्वांच्या पोटांत दुखू लागले.

शामरावनांना म्युनिसिपालटीचे अध्यक्ष निवडले गेले. कर देणाऱ्या लोकांना आशा वाटली की पुष्कळ सोयी होतील आपल्या इथे. बिचारा भला माणूस आहे. स्वतःच्या घराजवळचे रस्ते तेवढे काही सुधारून घ्यायचा नाही. घरधनीण काही दागिन्यांनी सजून उठणार नाही त्याची. त्याच्या घराचे मजले काही उंच होणार नाहीत, एवढे खास ! !

—आणि ह्याच वेळीं सभासदांच्या काळजांत ठोके पडत होते. आता हे आम्हांला स्वार्थत्यागाचे, निरपेक्षतेचे धडे शिकवणार ! हे म्हणणार, ही लोकसेवा आहे, सेवा-धर्म पाळला पाहिजे. कशाला अध्यक्ष झाला मरायला कोण जाणे ! जेलचा कंटाळा आलेला दिसतोय—

'अहो, तसे नाही. मागच्या चळवळीत १,५०० रु. दंड झाला ना ? तो भरताना कर्ज झाले असेल, ते फेडले पाहिजे. घरी चार-दोन सगेसोयरे बेकार आहेत, त्यांना नोकऱ्या लावून दिल्या पाहिजेत.'

आणखी असेच तारे तुटत होते. देशभक्ती करायची होती तर इथे कशाला ! आम्ही लावीतच होतो तिरंगी झेंडा सणावारी. मराठी शाळेतली पोरं आमच्याच हुकुमाने म्हणतात किनई–झेंडा ऊँचा रहे हमारा—!! आणखी काय हवी देशसेवा ? आता कशाला निवडणुकीचा खर्च निघून येतोय आमचा ! दोन पैसे मिळतील या आशेने ही यातायात केली. सारे नासून गेले या थेरड्याच्या येण्याने. शिस्त पाहतील हे. कागदपत्रे तपासतील. उद्योग काय सूत कातण्यापरता—

—खुद्द नानांच्या मनात काय चालले होते कोण जाणे ! लोकांनी घातलेले पुष्पहार हाती घेऊन पायीच ते घरी निघाले. अंगावर एक सदरा व उपरणे; डोक्यात पांढरी टोपी; चेहरा कृश झालेला, शरीर शिणलेले.

दृष्टी अंतर्मुख होती. कदाचित ते देखील विचार करीत असतील. मागच्या कायदे-भंगात बरबाद झालो. सरकारची इतराजी. बायका-पोरांकरिता काही नाही. ठीक आहे. चार-दोन टॉवर्स तर आपल्या नावाचे होतील. दहा-पाच इमारती तर आपल्या हाताने उघड्या होतील. दोन-तीन रस्त्यांना आपले नाव दिले जाईल !! पुरे झाली देशसेवा–भीच तेवढा मक्ता घेतला नव्हता.

—कदाचित असेही त्यांना वाटले असेल–ही जबाबदारी अंगावर आहे–कसे होईल ?—

त्यांचा चेहरा इतका शांत होता की, जणू ते एखाद्या सभेवरूनच परत आले असावेत. त्या वेळी लोक हार घालतात. आताही तसेच घातले—त्यात विशेष काय ?

—आणि एकंदर रागरंग, हावभाव पाहता असेच अनुमान काढणे उचित की, त्यांना आपण अध्यक्ष झालो ही मोठी महत्त्वाची गोष्ट नव्हे असे वाटले असावे.

—घरी येताच त्यांनी गांधीजींच्या फोटोला नमस्कार केला. कित्येक वर्षांचा त्यांचा तो क्रम ! तर्कवादी माणसांनी त्यांना त्याबद्दल हास्यास्पद देखील ठरविले होते. परंतु जसजशी म्हाताऱ्याविरुद्ध निष्क्रिय लोकांनी झोड उठविली होती तसतसे ते त्यात जास्त मन घालीत होते.

त्यांनी चटईवर पाय ताणून अंग टाकले. चार लोक अभिनन्दन करायला आले. प्रायमरी शाळेच्या मास्तरांनी येऊन पायाला डोके लाविले. म्हातारे रामजी मास्तर—नानांचे शिक्षक—त्यांनीही नमस्कार करावयास कंबर वाकविली.

—' मास्तर, हे काय ? मी तुमचा शिष्य, तुम्ही मला वडिलांसारखे— ' नानांनी त्यांच्या पायांवर डोके ठेविले. रामजी मास्तरांचा गळा भरून आला—

—' नाना, विसरला नाहीस बेटा--पण रूढी पाळावी लागते. तुला नाही. तुझ्या जागेला नमलं पाहिजे ! तुझे नोकर आम्ही--'

सर्व मास्तरांनी याच उद्गारांवर बोट ठेविले जणू !! त्यांत काही नानांचे बाळपणीचे दोस्त होते. आखाड्यातले लंगोटीयार होते. सर्वांना त्यांनी सुपारी दिली. साऱ्यांनी मोठ्या अदबीने त्यांचा निरोप घेतला.

नाना सूत काढीत बसले. जवळच त्यांची मुलगी सरला त्यांच्या रहाटाकडे एकाग्रतेने पाहत होती. बिचारी पोर. कसला गहन विचार चालला होता देव जाणे !! मुलगा विश्वनाथ अंगण झाडीत होता.

गडी मास्तर धापा टाकीतच आले व त्यांनी नमस्कार केला. नाना चमकले. कशाला आला हा गृहस्थ एवढ्याने धावत ? अंगावर मळके कपडे, दोन्ही ढोपरांवर फाटलेला कोट, दाढी वाढलेली, टोपीच्या बाहेर शेंडी निघालेली-धोतराला हळदीचे डाग—

—' माफ करा काकाजी ! घरी जरा अडचण होती म्हणून सर्वांबरोबर येऊ शकलो नाही—'

--' पण येण्याचेच काय कारण मास्तर ? मला उद्या त्या बाजूला यायचे होतेच. तुमच्या घरीही डोकावलो असतो. '

मास्तरांनी नानांकडे पाहिले. पूर्वीचे नाना कायमच आहेत का ?

—' मास्तर, काही विशेष काम ? '—

—' काही नाही, गरिबांवर लक्ष असू द्या. तुमचा नोकर आहे, अर्ध्या रात्री जरी काही काम पडलं तरी हाक मारा मला. सेवेला हजर आहे—'

—किंचित तिरस्काराची छटा नानांच्या चेहऱ्यावर अंमळशी उमटून गेली. परंतु पुनः त्यांनी तोंड मावळते केले. त्यांना वाईट वाटले—

—' कोणती सेवा घेऊ तुमच्या जवळून ? घरी रिकामा वेळ असतो का तुम्हांला ?—'

--' का ? बाबुरावांना शिकवायला येऊ का ? '

--' नाही हो ! तसं नाही. घरी किती माणसं आहांत तुम्ही ?—'

—' मुले तीन व आम्ही दोन माणसे. '

--' पगार तेवढाच की काही वाढ ? '

—'हं ! एकोणवीस—'

—'सारी कामे मग तुम्हांलाच करावी लागतात. सवड कुठे आहे ? आहे तेवढा तरी वेळ पुरतो का ?—'

—'वेळेचा काय प्रश्न आहे ? येऊ का उद्यापासून ?—'

नानांनी या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी मास्तरांकडे पाहिले. मास्तरचे लक्ष बापू अंगण झाडीत होता त्याच्याकडे होते. गडी मास्तरांना वाटले, आपण जर तेवढे अंगण झाडून दिले तर नाना आपल्यावर जास्त खुश होतील. परंतु नानांचे सार्वजनिक आयुष्य त्यांना तसे करू देईना.

इतक्यात, गाय हंबरतच दारात शिरली. वासरासमोर तिने जाऊन उभे राहू नये म्हणून बाबू हातची केरसुणी टाकून धावला. मास्तरांनी अंगणात उडी मारली.

—'बाबूराव, जनावर अवखळ दिसतं ! तुम्हांला नाही ऐकणार. मारेल, थांबा—'

त्यांनी गाईला धरले.

—'मास्तर, त्याला सवय आहे. राहू द्या तुम्ही. या इकडे—'

मास्तरांनी गाय सोडली पण केरसुणी उचलली—

—'मास्तर, मला राग आणू नका. या पाहू इकडे—'

गडी मास्तर गुपचूप चोरासारखे जाऊन उभे राहिले.

—'बसा खाली—'

मास्तर खाली बसले. दोघांची दृष्टादृष्ट झाली. गडी मास्तर घाबरले. नाना काही बोलावयाच्या विचारात होते तोच—

—'काकाजी, चूक झाली—'

—'मी मघापासून पाहतो आहे मास्तर, तुम्ही असे का वागता ? माझे नोकर आहात का तुम्ही ? काही देणे लागता का माझे ?—'

—'असं कसं—?—'

—'तर काय ? माझ्यात काही फरक झाला का ? मी तुम्हांला भयंकर दिसू लागलो का —'

मास्तर अबोल. दृष्टी नानांवर खिळलेली. डोळ्यांत आश्चर्य भरलेले !

—'बोला, बोला गडी मास्तर. असे लाचार का ? तुम्हांला वाटते मी तुमची नोकरी सोडवीन ?—'

मास्तरच्या चेहऱ्यावर भीती ? ...

—' असे नका पाहू ! अहो, तुम्ही आमच्या मुलाबाळांचे गुरू ! आमची मुलं आम्ही तुमच्याजवळ शिकायला पाठवितो. त्यांना चांगलं वळण लागावं—त्यांनी बाणेदारपणा शिकावा ही आमची अपेक्षा. तुम्ही हे शिकविणार का त्यांना ?—'

नानांचा कंठ हे म्हणताना रुद्ध झालेला होता.

—' महाराज- ! कसूर माफ ! गरिबीचा संसार आहे. दोन पोरं पोटी आहेत. नोकरी सांभाळली पाहिजे. वागावं लागतं असं—'

—' पण माझ्याशी का ? मी तुमचा काय अपराध केला ?—'

गडी मास्तरांच्या डोळ्यांत एकदम आसवे उभी राहिली. कसली तरी जखम उकलली असे त्यांना वाटले. नानांचे पाय त्यांनी घट्ट धरले.

' काकाजी, आज इतकी वर्षे नोकरी करतो आहे. तुम्ही एकच असे भेटलात, बाकी सर्वांच्या घरी अशीच हाडं रगडली आहेत मी ! चालीरीती पाळल्या पाहिजेत. मेंबरांच्या मुलांच्या तीन शिकवण्या, पण एक कवडी मिळत नाही. धडपणे जेवायला सवड नसते रोज. त्यातून हे सारे उघड बोलायची चोरी !—'

' —मास्तर, माझे पाय सोडा–' नानांचे पाय भिजून गेले होते. त्यांना गहिवर आला. डोळ्यांत पाणी आले. सरला ओक्साबोक्सी झाली. बाबू येऊन उभा राहिला.

गडी मास्तर हुंदके देत बोलत होते.- ' काकाजी ! त्यांच्या मर्जीने नोकरी संभाळावी लागते. आम्ही असेच वागले पाहिजे. एरवी आमच्या नोकऱ्या ? –ही रूढी पडली आहे –'

नानांनी आपले ओठ घट्ट दाबले. त्यांना संताप आला. पोलिसांच्या लाठ्यांचे तडाखे हसत झेलणारे शामरावनांना हे प्रहार सहन करू शकले नाहीत. ते आवेगाने उद्गारले-

' हे आमचे लोक नि ह्या संस्था ! ! अशा रूढी पडल्या का ? '

ते पुढे बोललेच नाहीत. मास्तरही मुकाट्याने थोड्या वेळाने उठून गेले.

सगळे मेंबर लोक नानांच्या नावाने खडे फोडत होते. आता आमचा निवडणुकीचा खर्च काही निघून येत नाही. वरं, हरकत नाही, ह्याच्याही नाड्या पाहू. गमजा कुठवर...! !

१८।१०।३६

४८

समुद्राचे पाणी

रात्री आठाला माझे सवें मित्र मला स्टेशनवर पोचवायला आले. बोलायला, भेटायला आले म्हणजे बोलायचे काय आणि भेटायचे कसे, हा एक मोठा प्रश्नच असतो. त्यात पुनः मी थोडा अस्वस्थच होतो. माझ्या घरचीच चित्रे माझ्या डोळ्यांसमोर दिसत होती.

आगगाडी आली. मी माझे सामान डब्यात रचण्यात वेळ घालविला. चहा मागवून सर्वांना निरोप दिला. गाडी आता सुटणार. माझ्या एका मित्राचे आकाशात वर आलेल्या चंद्राकडे लक्ष गेले. माझ्याकडे पाहून तो म्हणाला, 'चंद्राकडे पाहू नकोस रे ! नाहीतर आमच्या वहिनींना उचकी लागेल.'

परंतु त्याचा हा विनोदही मला मोठासा हृद्य वाटला नाही. मी दार लोटून घेतले.

मनस्थिती जशी असेल तसलीच चित्रे आपल्या मनात भरतात म्हणे ! दाराजवळच खाली बसलेला एक मनुष्य माझ्याकडे पाहू लागला. माझेही लक्ष त्याने वेधून घेतले.

त्याच्यात पाहण्यासारखे पुष्कळच होते. तो खाली बसल्यामुळे त्याच्याजवळ तिकिट नसावे असे अनुमान निघू शकत होते. त्याचा वर्ण आणि त्याचे डोळे दोन्ही श्यामल पण सतेज ! त्याच्या अंगातला एकुलता एक सदरा गंगेच्या पाण्यात धुतला होता. धोतर पण पांढरे होते. गावाला जावयाची त्याची ती तयारी ! जवळ सामान काहीच नाही. दुसरे धोतरसुद्धा नाही !

त्याला वाटले मी बडा माणूस ! माझ्याकडे फारसे पाहू नये. तो खाली पाहू लागला. चंद्राची किरणे दिव्याच्या प्रकाशातही त्या पर्यंत आंत आलेली दिसत होती. थंडीपासून बचाव करण्यास त्याने अंगाचे गाठोडे केले आणि गुडघ्यात मान खुपसून बसला. आपल्या हिंदुस्तानी भाषेत तो कसलेसे गाणे गुणगुणत होता.

'हे चंद्रा, तू आकाशात फार वेळ राहू नकोस. तू लवकर मावळून जा ! कारण तुझा मला काही उपयोग नाही ! माझी बायको तू असताना झोपडीत असते ! तू गेलास म्हणजे आमचा दोस्त जो सूर्य तो आकाशात येईल. मग माझी घरवाली झोपडीच्या बाहेर येऊन कामधंदा करील. मी माझ्या मित्रांकरवी तिला माझ्या खुशालीचा निरोष पाठवीन.'

त्याचे ते गाणे मोठे विचित्र होते. चंद्रापेक्षा सूर्यावर त्याचा जास्त जीव होता. चंद्रावर प्रेम करण्याची त्याची ऐपत नसेल !

तो पुनः गुणगुणू लागला—

'चंद्रा ! तू जा ! तू जा ! तू माझा कुणी नाहीस. तू मला समाधान देऊ शकत नाहीस. तू जा, तू जा आणि माझ्या सोबत्याला लवकर पाठव. माझी बायको माझ्यासाठी पाखरासारखी फडफडत असेल. '

त्याने मान उंच केली तेव्हा त्याच्या डोळ्यांत अश्रू आलेले दिसले. खरेच ! तो त्या गाण्याने आपल्या दुःखी मनाला समाधान देत असेल का ? बायका-पोरे सोडून त्याला किती दिवस झाले असतील ? त्याने पुढची कडवी म्हटली—

'तुझी कल्पना असेल चंद्रा, की तुझ्या सौंदर्याला भाळून मी तुझ्याकडे पाहीन. पण मी भुलणार नाही. तुझे आणि त्या रात्रीचे सख्य आहे, की जी रात्र आम्ही उपाशी निजलो असताना आम्हांला जागविते आणि रडावयास लावते—जी अवदसा आम्हा गरिबांना सुख देत नाही. तू देखील आमचा वैरी आहेस. तू जा. तू जा—'

आता, माझ्याने राहवेना. त्याला विचारावे तो कोठून आला नि कुठे चालला ते !

'माऊ. तू कुठून आलास ? '

तो दचकला. त्याला वाटले, आपण या डब्यात उगीच बसलो. त्याचे मन त्याला खाऊ लागले. तो निश्चयाने म्हणाला,

'माझ्याजवळ तिकिट नाही. मी जयपूरहून आलो. '

परंतु हे सांगण्याची गरज काय होती ? यापूर्वी त्याने कधीच पाप केले नव्हते का ?

'नसू दे तुझ्याजवळ तिकिट. तू इकडे ये व इथं वर बैस. नाहीतर एखादा पोलीसवाला येऊन तुला उगीच मारील. '

तो वर बसेना. मी त्याचा हात धरून त्याला जवळ बसवून घेतले तरीदेखील माझ्याविषयी तो शंकितच होता. विश्वास वाटेना त्याला माझा !

'तू आता जे गाणे म्हणत होतास ते पुनः म्हण ना !

'कसलं गाणं ? मन रमवीत होतो झालं ! मला अजून दोन दिवस काढावयाचे आहेत. '

'कुठं जातोस तू ? '

'मुंबईला ? '

'कोण आहे रे तुझं मुंबईला ? '

'कुणी नाही. कोण असायचं आहे ? ' तो एवढेच बोलला. पण त्याला दहा डोळे असते तर त्या दहाही डोळ्यांतून त्या वेळी कारुण्य पाझरले असते.

'मग मुंबईला कशाला चाल्लास ? '

'काही कामधंदा शोधायला. '

'तुझी बायकापोरं कुठं आहेत ?

'त्यांना कशाला बरोबर नेऊ ? पोटाची सोय कुठं आहे ? तिथं निभत नव्हतं म्हणून तर चाललो. '

'पैसे वगैरे किती घेतलेस बरोबर ?'

'चार पैसे होते कालपावेतो ! भूक लागली खर्च करून टाकले.'

'आणि आज काय खाल्लंस ?'

'काही नाही. आपण कमाई करीत नाही. खायचं काय ?–'

—म्हणजे हा दोन दिवसांचा उपाशी ? हा उद्या मुंबईला पोचेल, भुकेने मेला तरी याच्या बायकापोरांना पत्ता लागणार नाही. ती बिचारी कल्पना करीत असतील– आपला बाप आता पैसे मिळवील, मग आपण दोन वेळ जेवू....!!

काव्याच्या दृष्टीने हा विषय कितीही मनोज्ञ असला तरी त्यातील सत्याने माझे अंतःकरण फुटून गेले!!

—मग हा जगणार कसा ? दोन दिवस उपाशी असूनही हा चोरी का करीत नाही ? हा नीती कुणासाठी पाळतो ? सूर्याबरोबर खुशालीचा निरोप पाठविण्याइतकी माया त्याच्याजवळ आहे. सूर्यावर, देवावर याचा विश्वास का बसावा ?

––पण त्याविना तो जगणार कसा ? आमच्यासारख्यांना देवाची गरज नसेल. त्याला परमेश्वर हवा होता. तो देवाजवळ प्रार्थना करील–– 'माझी कच्चीबच्ची सुखात ठेव—' कशाला त्याच्या अंतःकरणाच्या चिंधड्या करा ?

जी सत्ये मला आकलन झालीत ती इतक्या विदारक स्वरूपात, की माझी गात्रे विकल होऊन गेली. हा इतका दुःखी आहे, पण याचे तोंड यत्किंचित् देखील मलूल नाही. तरणाताठा मनुष्य एकदम मेला तरी त्याच्या तोंडावर तजेला असतो. तसे त्याचे असेल का ? आणि तसे नसेल तर त्याला जीवन कोण पुरवितो ?

'पाषाणाचे पोटी बैसला दर्दुर—
तया मुखी चार कोण घाली ?––'

ह्या संतवचनांनी तो आपला जीव निववीत असेल का ? किती काहूर उठले होते माझ्या मनात!!

दुसरा कसलाही विचार न करता माझा फराळाचा डबा मी त्याच्यापुढे ठेवला.

'भाऊ, हे घे. माझ्या बायकोने हे पदार्थ स्वतः आपल्या हाताने केले आहेत. अगदी गरम आहेत. तू खा. उद्याची तुझी काळजी देव करील.'

कदाचित त्याला त्याच्या पत्नीची आठवण झाली असेल. त्या हळुवार मनःस्थितीत त्याला गद्गदून आले. तो गहिवरून म्हणाला,

'साहेब, सुखी राहो तुमची घरधनीण, पण मला ते खाण्याचा हक्क नाही. इतक्या उमरीत मी कधी दान घेतलं नाही. हात आहेत तोवर भिक्षा मागणार नाही. रागावू नका. देव तुम्हांला सुखी ठेवील!'

दोन दिवसांच्या उपाशी माणसाचे उद्गार ! माझ्या मनोदेवतेने मला डिवचले. माझी मलाच, का तर नकळे, लाज वाटली. किती पुण्यवान जीव हा ! माझ्या डोळ्यांत पाणीही आले आणि माझ्यावर मी चिडलोही--का चिडलो तेही मला कळेना !

'भाऊ, असं समज, देवानंच तुझ्या पुण्याचं बक्षीस दिलं. तू अनमान करू नकोस. खा, ही भिक्षा नव्हे.'

तो क्षणभर विचारात पडला. मला वाटले तो आता खाणार. मी डबा उघडू लागलो.

'साहेब, आम्ही लोक दुसऱ्याच्या हातचं खात नाही. हाताने करीन तेव्हा खाईन. माझा धर्म बुडेल.'

परंतु ते खोटे होते. त्याला वाटले असावे, गरिबांना स्वाभिमान असतो, दानत असते यावर या साहेबाचा विश्वास बसणार नाही, म्हणून त्याने धर्माची सबब पुढे केली. किती उज्ज्वल होता त्याचा मनोधर्म !!

मी खिशातून एक रुपया काढला.

'हे घे. आता तर आड येणार नाही ना धर्म तुझा ? मला मुंबईला भेटल्यावर मग लागेल तर परत कर.'

'त्याने रुपया पाहताच हुंदके द्यावयास सुरवात केली. माणसासारखा माणूस आणि त्याचा हा दीनवाणा हंबरडा ! कुणाचे मन इतके कठोर असू शकेल का की हे पाहूनही ते शांत राहील ?'

'नका, मला आग्रह करू नका. माझा देव मला ते घेऊ देत नाही. माझ्या कष्टाचे नव्हत ते पैसे. माझं तेवढं तरी सुख हिरावून घेऊ नका.'

तो रडता रडता थांबला. माझे तोंड त्याच्याने पाहवले नाही. तो एकदम म्हणाला,

'कशाला तुमची माझी भेट झाली ? तुम्ही माझ्या भावासारखे आहात. माझ्या जेवणापुरते दोन आणे द्या मला ! साहेब, तुम्ही रडावं एवढी माझी योग्यता नाही हो !'

ते दोन आणे मात्र त्याने अगदी आतल्या पाकिटात ठेवले. कदाचित ते पैसे तो खर्च करणार नाही असे मला वाटले.

'तुला शपथ आहे माझी, ते पैसे तू खर्च कर.'

भुका, कंगाल, दरिद्री असून सुद्धा त्याचा भाऊ म्हणवून घेताना मला अभिमान वाटला ! त्या वेळी मी अशा अवस्थेत होतो की ज्या वेळी आपल्याला वाटते देवाने कशाला निर्माण केले आपल्याला ? आपण गरिबांची दुःखे हलकी करू शकत नाही ! परमेश्वराने आपले हृदय असे हळुवार का करावे ? आणि दुर्दैवानेही आपला असा पाटपुरावा का चालवावा ? आणि असलेच प्रसंग वारंवार का दाखवावेत ?

भिकेचा पैसा घ्यायचा नाही ही त्या गरीब, निर्धन जीवाची तेजस्वी नीतिमत्ता होती. एखाद्या निरागस बालकासारखे त्याचे मन होते. एखाद्या रानझरीसारखा त्याच्या जीविताचा ओघ निर्मल आणि अखंड होता. कंठावरच्या वनस्पती जीवन शोषीत असतील त्याच्यातून--!!

थोड्या वेळाने माझा आवेग कमी झाला. त्यालाही माझ्याबद्दल आपलेपणा वाटला. तो मोकळेपणाने मला घरच्या गोष्टी सांगू लागला. पुढचे बेतही त्याने मला सांगितले—

'दादा, तुमची आठवण मोठी खोल राहील मला. आता मी मुंबईला जाईन. कुठंतरी काम धंदा मिळेलच. तिथं पुष्कळ पैसेवाले आहेत म्हणे! त्यांनी पुष्कळ कारखाने काढले आहेत पैशावर आपल्या! कुणीही ठेवील मजुरीला.'

मुंबईला जशी त्याच्याकरिता नोकरी राखूनच ठेवलेली होती. त्याला आत्म-विश्वास वाटत होता! आशा कशी असते?

मला भीती वाटे, उंचावरून कोसळणारी नदी पर्वतांच्या दऱ्यांत पुष्कळदा लुप्त होते. मुंबईसारख्या अफाट समुद्रात...!! त्याच्याबद्दलच्या आपलेपणाने मला कोणताही अभद्र विचार करावासा वाटेना.

पुढचे स्टेशन माझे म्हणून मी सामानाची आवराआवर चालविली. दोन आणे देऊन मी त्याचे हृदयच विकत घेतले होते जणू! तो मला म्हणाला,

'दादा! तुम्ही मुंबईला आलात की मला भेटा. मी तुम्हांला जेवायला बोलावीन. गरिबाची ओळख असू द्या. माझे हेही दिवस देव बदलून देईलच!'

गरिबांचे दिवस देव बदलून देईल? गरिबांच्या देवा! कोणत्या नवसाला पावून तू त्यांचे दिवस बदलून देशील रे? सतत रक्त, सतत अश्रू हीच जर तुझ्या अनुग्रहांची किंमत असेल तर तीं किंमत ते तुला युगानुयुगापासून देत आले आहेत...!!

माझे स्टेशन आले. त्याने सामान उतरवून दिले. मला नमस्कार केला. आपल्या सख्यासोयऱ्यांना सोडल्यासारखे त्याचे तोंड उतरले होते. त्याचे डोळे भरून आले.

आगगाडी माझ्या समोरून निघून गेली. आता हा जीव मुंबईला जाईल. मुंबईला समुद्र आहे. त्या समुद्राला असंख्य नद्या येऊन मिळतात. शीतल, मधुर पाणी असते त्यांचे!-पण तरी देखील समुद्र खारा, कडवटच!!

त्या समुद्रात मासे असतात. त्या समुद्रात मगर असतात. लहान माशांना मगर खाऊन टाकतात.

समुद्राचे पाणी खारे, कडवटच!!--

ही कोवळी, सुकेली मासळी त्या समुद्रात चालली आहे. ही कसली जगते! कुणाच्या तरी भक्ष्यस्थानी...!!

—मुंबईला पुष्कळ पैसेवाले लोक आहेत म्हणे!!

२९।१२।३६

४९

अबोध बोध

" खरंच, अजूनही तुम्हांला वेळ नाही का झाला माझ्याकडे पाह्यला !"
विभाच्या या वाक्याने मी एकदम भानावर आलो. तिचा आर्तध्वनी, तिची उत्सुक आणि करुण दृष्टी माझ्या डोळयांसमोर दिसू लागली. माझेच मला वाटले, मी अपराधी आहे.

स्टेशनवरून उतरल्यापासून जवळजवळ एक तास झाला. माझ्या आईशी, माझ्या शांताशी मी हवे तेवढे बोललो. तिनेच बिचारीने काय पाप केले होते ?

वाटेल तेवढी जरूरीची पत्रे असली तरी आता लिहिणे बंद, अशा निश्चयानेच मी पेन खाली ठेवले आणि नोटपेपर बाजूला सारले. तिच्या श्वसनाचा ध्वनी माझ्या कानी पडला. तिच्याकडे पाहण्याची मला भीती वाटली.

" किती अंत पाहणार आहांत तुम्ही ? असे निर्दय का झालात ?—आज वीस दिवस झालेत बाहेर गेल्याला आणि आज येऊन सुद्धा—"

ती पुढे बोलली नाही–काय वाटेल ती शिक्षा तिने दिली असती तरीदेखील ती भोगायला मी तयार होतो. तिच्या म्हणण्यातले अक्षरन् अक्षर खरे होते.

पण मी बोलणार काय ?

ती माझ्या खुर्चीमागे येऊन उभी राहिली. तिने हळूच दिवा बारीक केला. माझ्या केसांचा सुगंध घेतला.

तरी देखील मला बोलवेना.

" मी जवळ येऊ का तुमच्या ? "

पंधरा दिवसांनंतरच्या माझ्या स्पर्शाने तिच्या सर्वांगावर रोमांच उठले. चंदनाला विळखा घातलेल्या नागिणीसारखी ती पूर्णपणे माझ्या आटोक्यात आली. तिचे मंद निःश्वास माझ्या छातीला बिलगले.

अजूनही तिला डोळे उघडण्याची आवश्यकता वाटली नाही. तिची अपेक्षा मला परिचित होती. पापण्यांवरचे ओले केस पाकळ्यांनी पुसले गेले. पाखरासारखी नाजूक हालचाल झाली. तिच्या ओठांतून तेज छिटकले.

" झालेत ना बारा खून माफ ? "

" इश्श --"

तिचा तो परवलीचा शब्द होता. समोरच्या खुर्चीवर ती बसली.

" एक माणूस किती सुखात होतं पंधरा दिवस–त्रास नाही, ससेमिरा नाही--"

" होतं खरं वेटं--"

" मुंबईला काय पाहिलं, हेसुद्धा सांगायला तयार नाही काही--"

" सगळं काही पाहिलं. नागिणीचा विळखा पायाला नव्हता. वाटेल तिथे फिरलो. "

तिने माझ्याकडे संतापाने पाहिले; पण खरंच, ते ईषदुन्मीलित नेत्र कधीतरी मला आपली दाहकता कळू देतील का ? तिच्या डोळ्यांतल्या भावांकडे पाहून मला आध्यात्मरामायणातल्या दृष्टान्ताची आठवण झाली— " क्षीरमध्यगतं सर्पी यथा व्याप्यखिलं पयः--"

मी स्तब्ध राहिलो !

" आहे बुव्वा ! " तोंडाचा चंबू.

मला आलेला संताप मी वेगळ्या रीतीने चापून वेतला.

तिने डोळे वटारले.

आगगाडी पुनः रुळावर आली.

" माझी निर्मला भेटली का ? "

तिची मैत्रीण निर्मला ! होय, तिला मी पाहिले होते. अगदी एकाग्रतेने दृष्टीचा वेध लावून समुद्राच्या लाटांकडे पाहताना मी तिला डोळ्यांत साठविली होती. लावण्यसागराची लहरी, असे मी तिचे वर्णन करून गेलो होतो. वाऱ्याने कपाळावर भुरभुरणाऱ्या केसांच्या बटीने मला तिच्याकडे सारखे बघावेसे वाटले होते.

पण या सर्व गोष्टी सांगावयाच्या कोणत्या शब्दांत ? समयोचित शब्द मला हवे होते.

" तुझी निर्मला ? हो ती दिसली होती मला ओझरती. फोटोवरून मला तुझं म्हणणं खरं वाटलं नाही; पण खरंच ती अतिशय सुंदर आहे. तिच्या सौंदर्याला तुलना नाही—दोन मुलांची आई झाली तरीदेखील–! "

मी हे म्हणून गेल्यानंतर तिच्याकडे पाहिले. तिला आनंद झालेला दिसला. माझा जीव खाली पडला.

" तिला मी तीन-चार वर्षांत भेटले नाही, वाटतंय मला फार—"

' मग बोलाव की तिला इथं चार दिवस. मला जायचंच असतं नेहमी. पोचवून देईन. मलाही बरं वाटेल. '

परंतु हे म्हणताना माझ्या भावना एकेरीच होत्या का ?

तिला आश्चर्य वाटलेसे दिसले. आज मी इतकी उत्सुकता दाखविली तिच्या मैत्रिणीवद्दल.

" माझी निमा आहेच छान ! उद्या लिहिते मी तिला पत्र ! "

निर्मलेला टांग्यातून उतरताना मी नीट पाहून घेतले. ती वर आली व मेहुणा या नात्याने जेव्हा तिने मला विनयाने नमस्कार केला, त्या वेळीं तिच्या वोटांचा स्पर्श माझ्या पायांना झाला. ती उभी राहिली, त्या क्षणी तिची माझी दृष्टादृष्ट झाली. ती हसली, तेव्हा मला चांदण्या सांडल्याचा भास झाला.

" कसं काय, प्रकृती चांगली आहे ना ? "

" होय ! "

पण त्या उद्गारांत मला स्वर्लोकीच्या साऱ्या मधुर लकेरी भासमान झाल्या. माणसाच्या अंतःकरणात उपजतच काव्य असते की काय कुणास ठाऊक !

ती परत खाली जायला लागली. तेव्हा पुनः एकदा माझ्या नजरेने मला फसविले.

आणि माझ्या पत्नीची माझ्याकडे नजर जाताच मी असे नक्की ठरवून टाकले की, आता म्हणून निर्मलेकडे पाहावयाचे नाही. सौंदर्याच्या ठिकाणी अनासक्तीच असू शकते, असे नाही—माझ्या मनाने मला दटाविले. किती किती कटू वाटले मला ते वाक्य !

दुसरा दिवस उजाडला. सकाळी विभा माझ्याजवळून उठून खाली गेली. मी त्या गोड सुस्तीत बिछान्यावरच पडून होतो. मन जागे झाले होते. अगदी एखाद्या बालकासारखे ताजेतवाने ! त्याने आपली खेळणी काढली. त्यांत त्याला नावीन्य दिसले.

" चहाला चलायचं नाही ? "

" अं हं, मी इथेच घेईन चहा. "

विभा माझ्याकडे क्षणभर पाहत राहिली आणि ' बरे ' म्हणून निघून गेली.

" हे पाहा–" मी विभाला हाक मारली.

" खालीच येतो मी चहा घ्यायला–" विभा परतली.

हे तरी वाक्य मी का म्हटले ?

आणि म्हटले म्हणून काय झाले ? निर्मला सुंदर आहे. तिच्याकडे मला पाहावेसे वाटते. मी बेजबाबदार नाही. निर्मला पण नाही. मला माझे मन ताब्यात ठेवता येते.

आणि इतके कळत असताना मी माझ्या साध्यासुध्या इच्छा का दाबाव्यात ! माझे मन जास्त बंड करील अशाने ! झोपेला आसावलेला विद्यार्थी रात्री निजताना पहाटेचा अभ्यास पदरी पडावा म्हणून घड्याळाला गजर लावतो आणि दुसरे दिवशी अलार्म होताच त्याचे निद्रालोलुप मन हजार सबबी पुढे करून त्याला झोपाबयास लावितें.

त्याच अवस्थेत मी खाली आलो.

निर्मला आणि विभा पाटावर बसल्या होत्या. तिसऱ्या पाटावर मी जाऊन बसलो. काही कारण नसता विभाला मी माझे स्वेटर आणायला वर पाठविले.

" हा चहा तुम्ही केला का ? "

" होय—" निर्मलेचे उत्तर. नजर खाली.

" फार छान झाला आहे चहा ! "

" मग उद्यापासून मीच करीत जाईन की, त्यात काय आहे ? "

माझे अंतःकरण फुलले !

" स्वार्थी आहात फार. मुंबईच्या मुशाफराला बोलाविलं पण नाही घरी चहाला. "

" इश्श ! तुमचा पत्ता तरी होता का आम्हांला ? पण आता मिळाला ना ? माझ्या विभाचं घर आहे हे. तुमचं नाही. "

निर्मलेचा " इश्श ! " असा उद्गार आणि विभाचे घर !

तेवढ्यातल्या तेवढ्यात फुलोर मोहरला आणि लागलीच गळून पडला !

विभाचे घर !

पण मी निर्धार केला होता ना ? मग चहा पिताना बशीत अंतर राखून कोण निरखत होतं ? तथापि त्यात काय मोठंसं ? पुनः हवं तर नाही करू असं !

भीष्माचार्यांचे सहाय्य मागायला मन धावले !

" निमाला किनई शकूनकळीची फुलं फार आवडतात. आणाल का ?—" विभा आत येताच म्हणाली.

" कुठून आणायची ? " पाध्यांच्या वाड्यात फुले आहेत, हे माहीत असूनही मी प्रश्न केला.

" इश्श ! माहीत नाही वाटतं ? "

काय बोलू मी आता ?—" बरं पाहीन "

किती उदासीनता दाखविली मी ? मला माझ्याबद्दल विश्वास वाटला.

शकूनकळीची फुले !

अरे हो ! त्याबद्दल लिहून कळवायचं राहिलं आपल्या शेतवाल्याला ! एवीतेवी आणायचीच आहेत फुले !

पाच-दहा मिनिटांत मी निघालो. सुवर्णमृगाने आणखी एक हुलकावणी दाखविली आणि रामाला सीतेपासून दूर दूर नेले.

ती शकूनकळीची फुले ! निर्मलेच्या आवडीत नि रूपात किती साम्य होते ! खरेच मोठी रसिक पोरगी !

मोठी रसिक मुलगी !

रेशमाच्या रुमालातून मी तिला ती फुलं दिली. निर्मलेने त्यांचा स्वीकार केला; पण मी कल्पिले तेवढ्या औत्सुक्याने नाही, असे मला वाटले. तिने काय करायला हवे होते ?

हे एक व त्याच दिवशी तिच्या यजमानांचे खुशालीचे पत्र आले होते व मला त्यात त्यांनी प्रेमपूर्वक नमस्कार लिहिला होता. हे दुसरे कारण–

आणि ते वाचताच पुनः एकदा भीष्माचार्यांनी माझ्या मस्तकावर हात ठेविला.

" निमाकरिता सुंदरसं लुगडं आणायचं आहे–"

होय, हे उपचार पाळले पाहिजेत. माझे कर्तव्य होते ! त्या वेळी माझ्याजवळ होते तेवढे पैसे मी विभाच्या स्वाधीन केले. माझ्या पत्नीने निर्मलेच्या साऱ्या हौशी पुरविण्याचा हव्यास घेतला. मलाही बरे वाटले.

" आज आपण फिरायला जाल तेव्हा आम्हांला पण हाक मारा. निर्मलेला घेईन मी– "

" अंहं, आज फिरणं नाही होणार–" माझ्या निश्चयी मनाचे उत्तर.

" पण हे काय नेहमी ? इतका संकोच कसला ? ती ओळखीची नाही, की कुमारिका आहे ? "

" पण आज वेळ कुठं आहे ? व्याख्यानाचं आमंत्रण स्वीकारलं आहे मी. "

" मग आपण एकाच मोटारीतून जाऊ. "

" पटवर्धन मला परस्पर घेऊन जातील. तुमच्याकरिता मोटार अवश्य पाठवीन. "

" विषय काय ? "

" प्रज्ञावाद ! "

" आ–हा–! तुम्हांला काय वाटतं तुम्ही फार शहाणे आहात ?—" आणि उत्तराची अपेक्षा न करताच ती पळाली अन् आपल्या मागे दार लावून घेतले.

व्याख्यानाहून परत येतानाही मी एकटाच आलो.

तथापि निर्मलेचे माझ्या भाषणासंबंधीचे मत हवेसे वाटले, मला सर्व श्रोतृवृंदाने धन्यवाद देऊनही असे का वाटावे ?

माझ्या मनाने या प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे साफ नाकारले.

दिवस असे जात होते !

आता थोडेसे माझी पत्नी विभा हिच्याविषयी !

विभा ? ती ना ? ती धुतलेल्या तांदळासारखी स्वच्छ आहे ! माझ्या मनाने एकदम ग्वाही देऊन टाकली.

आजकाल ती माझ्या उद्गारांचा क्षणभर विचार करिते. ऊं ! असेल भांबावलेली थोडी मैत्रिणीच्या येण्याने ! नसेल सुचत थोडेसे !

तिच्या पायावर डोके ठेवावे मी ?

कुणी मला हा सल्ला दिला ?

माझ्या अधू आणि अपराधी मनाने ? की जबाबदार जाणीवेने ?

मी पुस्तक वाचू लागलो !

नाही ! नाही ! निर्मला कसली सुंदर आहे ! ते तिचे भंगुर सौंदर्य नि अदीर्घ तारुण्य ! त्याचं काय वाटून घ्यायचं ? माझी विभा अन्तर्बाह्य सुंदर आहे. उद्या निर्मला विद्रूप झाली, तर मला कसलाही ओलावा वाटणार नाही. काय फसवणूक चालविली होती मी वेड्यासारखी !

दोन तास विचार केल्यानंतर मी माझ्याशीच उपहासाने हसलो.

जिन्यावर दणदण पावले वाजली.

कोण ?

ती विभा होती.

" निमाला किनई आज ताप आल्यासारखा वाटतो–" तिचा आवाज गुदमरला होता.

निर्मला ? आजारी ? त्या क्षणी मी डॉक्टरकडे धावलो. निर्मला इन्फ्ल्युएन्झाने पंधरा दिवस विछान्यावर पडणार होती. तिची मैत्रीण डोळ्यांत तेल घालून जागत होती. मलाही झोप येईना. एक-दोनदा असेही मनात आले–स्वतः जावे न् चौकशी करावी ! पण काय ते न कळे, मी गेलो मात्र नाही–मला तिच्याविषयी काय वाटणार ? शिवाय, मध्यंतरी तिचे यजमान येऊन तिला भेटून गेलेच आहेत की !

" निमा तुम्हांला बोलाविते–" विभाकरवी निरोप. आजाऱ्याचे मन दुखवू नये. आज दहा दिवस ती फणफणते आहे तापाने.

एक शब्द न बोलता मी पलंगाशेजारच्या खुर्चीत बसलो. माझ्या बोटाची नखे मी पाहत होतो !

का ? ती जनावरांची होती की काय ?

" निर्मला, कशी झालीस ग तू–" विभाला कळवळून आले. " हिरवी गर्द वेल, पान नि पान गळून पडलं,–नुसता कोळपा झाला. "

माझ्या हृदयात कससेच झाले !

" नाही विभा, मी बरी होईन नि खूप सुंदर दिसेन मग. तू रडू नकोस. "

काही उद्देशाने म्हणून नव्हे, पण एक प्रकारच्या करुणार्द्र भावाने मी निर्मलेकडे पाहिले.

मी पाहिले.

" अरेच्या, ही अजूनही सुंदर आहे की ? "

पण माझा हा उद्गार कोठल्या सौंदर्यशास्त्राला धरून होता ? परंतु विचारशक्तीच गोठली माझी त्या उद्गाराने. माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. विभाकडे पाहण्याचेही धैर्य माझ्यात उरले नाही. गलितगात्र होऊन मी आबंटा गिळला.

आणि निमिषार्धात ताडकन् उठून मी माझ्या खोलीत आलो.

" विभा "--माझे मन चीत्कारले. सहस्र नागांच्या खंबीरतेने आवरलेल्या वेजबाबदार मनाचा तो चीत्कार होता !

माझ्या पाठोपाठ विभा माझ्या खोलीत आली. मला डोके दाबून बसलेला तिने पाहिला. माझ्या हृदयाचा आवेग तिला जाणवला.

माझे कढत निःश्वास सहन करण्याची शक्ती फक्त तिच्यात होती.

" माझ्याकडे पाह्यचं होईल का ? "

अंतःकरणाच्या एकाही चित्शक्तीने माझी कास बाळगली नाही.

" काय होतंय तुम्हांला ? मला सांगा ना ? "

मला संदेह उत्पन्न झाला, मी भानावर आहे की नाही याचा !

" मी तुमची ना ? सर्वस्वी तुमची ना ? "

अग्नीच्या साक्षीने तिने उच्चारलेले ते वाक्य " ते नो अर्यमा देवः इतः प्रमुंचतु मा पतेः " पुनः एकदा मला ऐकू आले.

" तुम्ही माझे आहात, मला सांगा तुम्ही तिथून एकदम का उठून आलात ? निर्मलेकडे तुम्ही पाहण्याचे का टाळता ? का ? मनाला बांध का घालता ? "

माझे मनोबल, माझ्या चैतन्यशक्ती, माझे हृदयधर्म, साऱ्या साऱ्यांचा लोप झाला होता ! तिने मला उठविले, उभे केले. माझ्या कपाळावर हात ठेवला. मला हस्तगत केले. तिच्या भुजलता माझ्या मानेभोवती पडल्या. तिचे डोळे थरथरत्या पापण्यांतून माझ्याकडे पाहू लागले.

तिला माझ्या हृदयाची स्पंदने ऐकू आली का ?

" सांगा, सांगा, मी ओळखलं ना ? ओळखलं ना सारं ? पाहा, माझ्या डोळ्यांत पाहा तुमचं रूप पुनः...मी "

एका अस्त्राने पाप जळाले. मंत्राग्नी प्रज्वलित झाला.

" नका, नका एवढा जिवाचा त्रास करू ! मी तुमच्याकरिता काय वाटेल ते करीन—" माझी अवस्था तिला पाहवली नाही.

ओठांच्या विलग झालेल्या पाकळ्या, आशंकेने अस्थिर झालेले डोळे, कढत ऊन ऊन निःश्वास--

आमच्या दोघांशिवाय सारे जग वितळून गेले !

पाखराने पिलाला पंखाखाली घातल्याचा प्रत्यय मला आला -- अज्ञातात प्रतिध्वनी उमटले--Children ! little children we are !

४।१।३७

५०

सरिता

गव्हाच्या रंगाचे पाणी कसे दुथडी भरून चालले आहे ! जणू प्रयोगवीराच्या अंतःकरणातील ज्ञानाचा साठाच !

नुकत्याच आईच्या स्तनापासून सुटलेल्या मृदुमधुर शिशूने दुधाभरल्या तोंडानेच खेळत राहावे आणि कुणाची पर्वा करू नये, त्याप्रमाणेच या सृष्टिमातेच्या मुली पर्वतस्तनमंडलाला सोडून धावत नाहीत का ?

जीवनाने मुसमुसलेल्या, सोज्वळतेने विनटलेल्या आणि सोन्याने भरलेल्या, ह्या तुझ्या मुली, हे सृष्टिमाते, केवळ तुझाच महिमा वाढवितात असे नाही, तर त्या आम्हांला जीवन पुरवितात, आरोग्य देतात, पावित्र्य शिकवितात !

निरागस राजसांना जसा आमच्या पापी वासनांचा गंधही नसतो, तद्वत् ह्या दुहितांना आमच्या मलिनपणाची कल्पना नसते, आणि निष्पाप अर्भके जशी आम्हांला स्वतःच्या चारुतम दर्शनाने शुद्ध, पुनीत करतात तशाच ह्या तुझ्या कन्यका आमचे मालिन्य हरण करून आम्हांला पवित्र करतात.

हे सृष्टिमाते ! तू त्यांना भरपूर वात्सल्य दे म्हणजे त्या आम्हांला मुबलक पाणी देतील. हे शेतकऱ्या ! तू ते पाणी घे आणि आम्हांला भाकर दे आणि हे मानवा ! तू कृतज्ञ राहा म्हणजे तो शेतकरी संतोष पावेल !

१४।९।३७

५१

आवाहन

भूदेवा, जागे व्हा आता ! या निसर्गाच्या पुण्याईत आपले पाप धुऊन टाका. वृक्षराजीच्या विशालतेत आपला दांभिकपणा, गर्विष्ठपणा विसरून जा. ही पाखरांची किलबिल ऐक. परमेश्वराचे हे प्रेषित ज्ञानाच्या सतारी छेडीत आहेत. अतिशय हळुवारपणे, विनम्रपणे त्यातले सूर हृदयात साठवून ठेवा !

मानवांवर अधिकार गाजविण्याचा जन्मसिद्ध हक्क तुमचा अशी तुम्ही आपली समजूत करून घेतली आहे.

जगाला उद्धरणारे आपण असे तुम्ही आजवर मानीत आला आहात--

नुसतेच समजत आला आहात !

ज्ञानामृत पाजण्याचे काम तुमचे हा आठव तुम्हांला राहिला नाही.

असंख्य दुःखितांच्या मुखाने ही पाहा आदिमाता आक्रंदन करीत आहे. आईला दुखवून मातृद्रोह करू नका !

ही आमची खपाटी गेलेली पोटे ! आम्हांला अन्न मिळत नाही. ही आमची सुकलेली शरीरे, मळलेले आत्मे ! आम्हांला जीवनोदक मिळत नाही. याचे कारण काय ?

कारण तुम्ही यज्ञ केलेला नाही.

आता यज्ञाची सांगता करण्याची वेळ आली आहे. त्यात आत्माहुती देण्याची वेळ आली आहे. प्रलयाचा काल समीपला आहे. यात पापे भस्म व्हायला हवीत. 'अमृताचा' अधिकार त्याविना मिळणार नाही !

ह्या ज्वाला, ही आक्रंदने पाहा किती जवळ आलीत. आता वेळ लावून चालायचे नाही. ब्राह्मणाचा पोर अकाली मेला म्हणून रामराजावर बोल आला. उद्या आम्ही असेच अमंगल अवस्थेत देवाच्या दरबारी गेलो तर ?

तर या पापाचे प्रायश्चित्त फेडणार कसे ? जिणे असह्य होईल तुमचे. त्यापेक्षा उठा. आम्हांला अंधारातून, संदेहातून प्रकाशाकडे, सत्याकडे न्या ! श्रद्धा. अभिवादन !

१९।९।३७

५२

त्या आणि त्यांची दुःखे

समोर जे एक लिंबाचे झाड होते, त्या झाडातून चंद्राचे कवडसे नेमके त्या झोपडीत पडत आणि वारा येऊन ते हालू लागले की फारच छान दिसत. सरस्वती त्या झोपडीत झोपली होती. तिच्या पांघरुणावर चार-दोन कवडसे पडले होते. जशा काही तिच्या ओढणीला टिकल्या लावल्या होत्या. गरिबांना कुठूनतरी--कसल्यातरी स्वरूपात वैभव मिळत असते, हे खरे !

सरूने पटकन डोळे उघडले. त्या उघडझापेत काहीही नव्हते; पण तारुण्यात काय चांगले दिसत नाही ? त्यातून आज तर तिचा आनंद ओसंडून चालला होता आणि त्या असीम सुखातच ती झोपली होती. तिने आपल्या नवऱ्याला एका अत्यंत घाणेरड्या आणि निंद्य व्यसनातून सोडविले, हा तिचा केवढा नैतिक विजय ! आज तिचा—संपूर्णत. तिचा असा--देवनाथ तिच्याजवळ सुखाने- न झिंगता झोपला होता.

रोजचे झोपणे आणि आजचे झोपणे ! हृदयात मावणार नाही, इतके समाधान तिला झाले होते या वेळीं ! दिवसाभराचा सारा शीण कुठे पळाला होता देव जाणे !

कापसासारखी शुभ्र पुनव बाहेर साऱ्या वस्तूंवर साखरेचे रांजण उपडे करीत होती. एकाएकी कावळे ओरडले ! अं ? सरूला आश्चर्य आणि एक प्रकारची भीती वाटली. ती उठली. बाहेर आली. बिचारे कावळे ! चटक चांदण्याच्या लख्ख प्रकाशात त्यांना वाटले दिवसच निघाला. ते जागे झाले—आपल्या कामासाठी कावकाव करू लागले. त्यांची ही कर्तव्यपरायण मूर्खता, हा निरपराध वेडेपणा, पण त्यातही सरूला केवढे सत्य दिसले ! यंत्राचा वेग वाढवून माझ्या देवनाथपासून असेच जास्त काम घेतात, त्याला काही कळत नाही. हा विचार तिच्या मनात आला.

परंतु आज मुळीसुद्धा दुःख करायचे नाही — शक्य तितके देवनाथला सुख द्यायचे, हा विचार तिला घरात घेऊन गेला. आपल्या बिछान्यावर पडणे तिच्या स्वाधीन होते; पण झोप ? एकदा तिला वाटले देवनाथला उठवावे—पण छे ! आज तो कितीतरी दिवसांनी सुखाने झोपला होता. लहान मुलासारखे तिने त्याला थोपटून निजविले होते. आपल्या कृतकर्मांचे हुंदके, आचके देत देतच तो झोपला होता आणि त्याला उठवायचे ? रात्रीचा प्रसंग तिच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. वासरू जसे गाईकडे धाव घेते, तसा आधारासाठी देवनाथ तिच्याकडे धावला. तिच्या हृदयात दुधाचे रांजण असतील, म्हणूनच ना ? --कधी कधी दुःखात देखील मनुष्य हसून देतो. गरिबीत सुखच नसते, असे जर त्या वेळी तिला कुणी सांगितले असते, तर ती तिरस्काराने—अविश्वासाने हसली असती.

जागेपणची स्वप्ने पाहण्यात दंग असणारी ही सरू कोंबड्याची पहिली बांग ऐकताच खडबडून उठली. आपल्या नवऱ्याला पांघरूण वगैरे घालून तिने एकदा हळूच थोपटले. त्याच्या सुखातच जणू तिचे सुख होते ! स्त्रीची सुखाची लालसा अशी आध्यात्मिक असते की काय—न कळे ! एरव्ही वात्सल्याची परमावधी तिच्यात आढळती ना ! सरूने सारे काम आटोपले. नवऱ्यासाठी पाणी तापविले. घर सारवून उरलेल्या शेणाच्या गोवऱ्या थापल्या. शेजारच्या बकीने म्हैस घेतल्यापासून तिला शेण भरपूर मिळत असे. दुधाची मात्र अर्थात ऐपत नव्हती. बकीलाच कधी दुधाचे चोपड-पण लाभले नाही—मग इतरांची गोष्ट कशाला ? पण आज सरू दूध घेऊन आली. देवनाथ जागा होईपर्यंत भाकर झाली पाहिजे. तो उठावयाच्या अगोदरच तिने सर्व तयार केले आणि त्याच्या जागे होण्याची वाट पाहत त्याच्या शेजारी जाऊन बसली. थोड्याच वेळात तो उठला. त्याचे सर्व यथास्थित तिने करून दिले आणि तो कामाला गेल्यावर झोपडीचे फाटक लावून मोठ्या उल्हासाने ती लोकांची उष्टी-खरकटी करण्यास निघाली.

रामनारायण नावाचा सालस गृहस्थ एकटाच राहत असे. रोज घरून निघताच ती प्रथम त्याचे काम करावयास जाई ! एक तर काम थोडे—शिवाय एक घर आटो-

पल्याचे समाधान मिळून तिचा जीव खाली पडे; पण आज तिला त्याच्याकडे जावेसे वाटले नाही. कारण काय हे मात्र तिला सांगता आले नसते. आज प्रथम अशाच भरल्या घरी जायचे की, जेथे आनंद, सुख, पाखरासारखी किलबिल दृष्टीस पडेल. आपल्या आनंदी, सुखी मनाचे प्रतिबिंब सृष्टीतही दिसावे, अशी तिची अपेक्षा !

आणि म्हणूनच तिने प्रथम इंदिराबाईंच्या घराचा रस्ता धरला. किती सुखाचा त्यांचा संसार ! म्हणावयाला दोन मुले आहेत; पण बाई किती हौशी ! नवरादेखील किती चांगला आहे बिचारीचा ! असल्या पुण्यवती सुवासिनीचेच आज प्रथम दर्शन घ्यायचे !

अर्थात इंदिराबाईंचे तोंड उतरलेले, मुद्रा त्रासलेली दिसताच तिला नवल वाटले —ती थोडी दचकली देखील ! किती गोड अपेक्षा व कल्पना करीत ती आली होती ! पण आज तिच्या मालकिणीने तिला एका शब्दानेही विचारले नाही. बिचारी सरू मुकाट्याने कामाला लागली.

चहाची भांडी उचलावयास दिवाणखान्यात जाताच तिला तेथे एक बाई दिसली. मोठी छान, तरुण, सुंदर व आनंदी अशी ! तिचा मालक त्या नवख्या बाईशी गप्पा मारीत होता. तिच्या मनात काय कल्पना आली देव जाणे ! पण तिने एकदम इंदिराबाईंकडे पाहिले. आणि पाहताच तिला कळून चुकले की, आजचा रागरंग जो फिरला तो या बाईमुळेच ! त्यातून ' आतापर्यंत पत्रांवर तरी निभले ! ही कसली कॉलेजची मैत्री अन् या कसल्या भेटी ! ' इत्यादि वाक्ये जी इंदिराबाई हळूच पुटपुटत होत्या, त्यांवरून सहज कयास बांधण्यासारखा होता. पुन्हा जिच्या लग्नाचा मांडव अजून सुकलाही नव्हता, त्या सरूला ही गोष्ट समजणे कठीण होते काय ? ती आपली पुन्हा कामाला लागली.

सरूचा उत्साह, कामाचा उरक वगैरे त्या नव्या बाईलाही आवडला. ' ही पोर मोठी छान मिळाली वरं का इंदिराबाई तुम्हांला ! ' ती म्हणाली. इंदिराबाईंशी बोलायचे निमित्त व विषय काय—तर सरू मोलकरीण ! समुद्राचे पाणी पोटात गेल्या-सारखे इंदिराबाईंनी तोंड केले. सरूला मात्र बिचारीला कधीही न मिळणारी दोन बोलणी खावी लागली.

' एकेक दिवस असाच निघतो. '

सर्वांवर ताण करणारे ते सरूचे तत्त्वज्ञान होते !

तथापि ही तिरसटपणाची वागणूक स्वतः इंदिराबाईंनाच असभ्यपणाची वाटली. खरेच ! त्या बाईने काय केले आपले ? ती आली, हसली, खेळली, बोलत बसली ! पण अजून ती अज्ञान, अल्लड आहे. पुढचे जीवन तिला फुलासारखे दिसते आहे. विवाह झाला की सारे कळेल तिला आपोआप ! पण आपले पतिराज ?

आणि इंदिरेचा मुख्य रोख आणि रोष पतीवरच होता. विनायकरावांनी येथे मुद्दाम माझ्यादेखत तिला आणून मला का हिणवावे ? माझ्यात सारे सुख पाहणारे ते,

त्यांनी असे का करावे ? मी नाही का त्यांच्याशी बोलतखेळत ? त्यांची मुले, त्यांचा सर्व व्याप मी नाही का सहन करीत ? असा विचार येताच तिला स्वतःबद्दल एक प्रकारचा मोठेपणा वाटला. संसारात आपली भूमिका किती अपरिहार्य आहे, विनायकरावांचे आपल्यावाचून किती अडून जाईल, याची तिला कल्पना आली व म्हणूनच विनायकरावांच्या अपराधांचीही जाणीव जास्त तीव्रतेने होऊ लागली. मैत्रीण झाली, म्हणून काय झाले ? मला एखादा मित्र असता तर त्याची पत्रास माझ्या पतीपेक्षा जास्त मी कधीच ठेवली नसती. माझं अंतःकरण त्यांना कळत नाही. मी द्वेष का करते कुणाचा ? मला माझ्या प्रेमात कुणी नको, असे का वाटते ? माझ्या असीम प्रेमाचेच ते द्योतक नव्हे का ?

परंतु एक शंका तिला बोचली. पुरुष पाहिला की ज्या सहज भावनेने, ज्या सहज जाणीवेने, आपण पदर नीट करतो – केस सावरतो त्याच स्वाभाविकतेने विनायकराव वागत—बोलत नसतील कशावरून ? पण ही कल्पना क्षणभरच ! पाण्याचा लोंढा ज्याप्रमाणे वाळूबरोबर त्यावरील चकचकीत शिंपाही वाहून नेतो, त्याप्रमाणेच ही कल्पनादेखील वाहून गेली. पुन्हा विचारचक्र सुरू झाले. विनायकराव—त्यांची मैत्रीण—स्वतः इंदिरा— तिचे प्रेम —मुले —त्यांची निष्पाप चिवचिव —किती किती प्रकारचे विचार होते देव जाणे ! आताच्च तर कितीतरी वेळ होऊन गेला. शरीराने मात्र काम, व्यवहार सारे सुरूच होते.

सर्वांची जेवणे झाली. कचेरीत जाताना विनायकराव इंदिरेजवळ आले. मोठ्या प्रेमाने, उल्हासाने, तिच्याकडे पाहून त्यांनी जातो असे सुचविले; पण त्यांच्या या सौहार्दाचे बक्षीस इंदिरेने त्यांना रोजच्यापेक्षा फार वेगळे दिले. तिची ती शून्य दृष्टी, तो अर्थबोधविरहित चेहरा पाहून विनायकराव थिजून गेले असतील यात नवल नाही. जास्त कर्दमात पाण्यासारख्या जीवनदायी पदार्थाचे देखील बर्फ होते. त्यातून विनायकराव पडले पुरुष ! संघर्षप्रिय, प्रत्याघात सहन करणारे खरे—पण उदासीनतेने वठणारे !

नवीन बाई बिचारी विश्रांतीसाठी पडली व झोपीही गेली. इंदिरा देखील पतीच्या खोलीत जाऊन पत्र, फोटो, मागील भेट, वस्तू वगैरे काढून मन रमवू लागली; पण आपणाला चांगले वाटणारे विचार मोठ्याही प्रेमाने त्यांना जवळ बोलाविले, तरी येतात का ? उलट दूर दूर पळून जातात आणि जे नको ते मात्र दारावरच्या लोचट भिकाऱ्याप्रमाणे त्रास देतात.

आणि जेव्हा खूप त्रासिक क्रुद्ध आवाजाने इंदिरेने सरस्वतीला हाक मारली त्या वेळी बिचारीचे काळीज थरारले. 'आणखी बोलणी बसणार की काय ? आपला आनंद परमेश्वर असाच विझविणार का ? आपल्या हर्षाचा पडसाद कुठेच उमटत नाही. आपला देवनाथ देखील सायंकाळपर्यंत आपल्याला भेटावयाचा नाही. '

हे विचार करीत भीतभीतच ती वर आली आणि आवडत्या मालकिणीकडे तिने अशा काही दृष्टीने पाहिले की, डोळ्याशी डोळा भिडताच इंदिरा विरघळून गेली. तिला जाणवले की आपण हिला सकाळी उगीचच बोललो. किती मर मर मरते बिचारी आपले काम करायला ! आपण त्याचा मोबदला काय देतो ?

' सरू, काय करू ग ? तुझ्याशी दोन गोड शब्द बोलण्याइतकेही माझे मन स्वस्थ नाही. तू तरी मला सुखी राहायला शिकव. '

' सरू मालकिणीला शिकविणार ? तिच्याजवळ काय होते ? होय, एक शक्ती होती-ज्या शक्तीने तिने देवनाथवर विजय मिळविला होता, ती त्यागाची, वात्सल्याची, आपल्यावर असलेल्या जबाबदारीची, पतीची सर्व प्रकारची भूक शमविण्याची शक्ती तिच्यात होती. त्या शक्तीचा थोडासा जरी अंश तिने इंदिरेला शिकविला असता, तरी इंदिरेचे मन आभाळाएवढे मोठे झाले असते व हिरवा चारा पाहून हरीण जसे धावत येते तसेच विनायकराव तिच्याकडे आले असते; पण हे मालकिणीला कसे शिकविणार ? सरू बिचारी लाजली.

' बाई, कशाला बोलावलं होतं मला ? '

' हं, तूं जा माझ्या दादाच्या घरी ! परवा गेली होतीस ना ? आणि त्याला म्हणावं वहिनीला आलचा दिवस माझ्याकडे राहायला पाठव. '

सरू लागलीच निघाली. वहिनीबाई आली तर आपली मालकीण खरोखरच थोडीशी खुलेल, या भोळ्या भावनेने व सुखाच्या कल्पनेने ती झपाझप पावले उचलू लागली, त्या रस्त्याच्या डाव्या बाजूने जो फाटा फुटत होता, त्याच्याच शेवटी सरूचे घर होते. देवनाथ संध्याकाळी पाचला घरी येईल, त्या वेळी घर चांगले दिसावे, म्हणून धावतच ती घरी गेली व मागल्या पावलीच परतली. इंदिरेच्या भावाच्या घरी पोचताच तिने दारावर थाप मारली. दरवाजा उघडला गेला. झर्रकन् ती इकडेतिकडे न पाहता सरळ घरात वहिनीबाईकडे जाऊ लागली—मोठ्या उत्कंठेने—एक प्रकारच्या समाधानाने !

अर्ध्या तासात सरू बाहेर पडली. एकेक पाऊल बेडीने जखडल्यासारखे जड पडत होते. फाटकाच्या बाहेर पडल्यावर तिला ते आपल्यामागे लोटून घेण्याची देखील शुद्ध राहिली नव्हती. तिच्या मघाच्या गतीत आणि चेहऱ्यात किती अंतर पडले होते. आपले सर्वस्व गेले, याची जाणीव झाली, म्हणजे जसे सारे शून्याकार दिसते आणि त्याकडे पाहत असताना दृष्टीत जसा अनर्थ भरलेला असतो—तशी तिची चर्या अभद्र झालेली होती. तिच्या कल्पनेतल्या साऱ्या गोष्टी उन्हात ठेवलेल्या फुलासारख्या करपून गेल्या होत्या. खरंच, असे काय घडले की वायुवेगाने, उल्हासाने गेलेली सरू अशी विचारमूढ गलितगात्र होऊन परत यावी ?

आता तिला वर जावेसे वाटेना. मालकिणीला निरोप काय सांगायचा ? निरोप सांगून अर्थ काय ? आणि वहिनीने निरोप तरी काय सांगितला ?

'का ग सरू—काय म्हणाला दादा ?'

सरू चूप !

'तू जाऊन आलीस ना ?'

'होय, वहिनीबाई घरी नव्हत्या.'

इंदिरेने तिच्या तोंडाकडे पाहिले. तिला चरकल्यासारखे झाले. सरू, अशी का दिसते ? तिला झालं तरी काय ?

'सरू, अग बोलत का नाहीस ? सांग, सांग ना ?'

तिच्यात बोलण्याची शक्ती उरली नव्हती.

'बेटा, सांग वहिनी कुठे गेली होती ?'

बेटा ! कितीतरी काम केवळ एवढ्या एका शब्दाने केले. सरू रडू लागली. तिचे चैतन्य परत आले आणि त्याबरोबर क्रोध, भीतीदेखील—

'बाई, माझी आपल्याला हात जोडून एक विनंती आहे.'

'काय ती ?'

'मला यापुढे तुम्ही आपल्या भावाकडे कधीही पाठवू नका.'

सरूची मुद्रा, तिचा त्वेष आणि अशा प्रकारची ही विनंती ! इंदिरेने — विवाहित इंदिरेने — सर्व काही ओळखले. तिला कारणांचीही कल्पना आली. स्वतःचे तुच्छ, चिमुरडे क्षुल्लक दुःख ती विसरली. तिचा भाऊ नी असा ?

'अरेरे, वहिनी'—

तिच्या हाती या वेळी जगाचे राज्य असते तर तिने सरूच्या अश्रूगणिक माणसांची खांडोळी केली असती, इतका तिचा संताप सात्त्विक आणि प्रखर होता.

'सरू, तुला पाठवायचे दूरच, पण मी देखील माझ्या भावाचे तोंड पाहणार नाही. अवघं जग त्याच्या तोंडावर थुंकलं तरी मला मुळीच वाईट वाटायचं नाही. मी आता या क्षणी त्याच्याकडे जाते आणि'—

'नका बाई, मी स्त्री आहे, मला संसार आहे.'

'तू काळजी नको करूस सरू. मी तुला जन्मभर अंतर देणार नाही. तुझ्या नवऱ्यालाही पाहिजे तर मी नोकरी देईन.'

'बाई, मला त्याची भीती नाही. देवाने हातपाय दिले आहेत. कुठेही काम करून—'

'मग तू अशी भितेस का ? सांग, मी काय करू तुझ्यासाठी ?'

केवळ सरूचाच नव्हे तर साऱ्या स्त्रीजातीचा कैवार घेण्याची इंदिरेची त्या वेळची भूमिका व क्रोध होता.

'एवढेच करा—तुमच्याशिवाय कुणालाही ही गोष्ट कळू देऊ नका. त्यानंच माझं कल्याण होईल. कालच माझा पती मला परत मिळाला. माझ्या जिवाची साक्ष देऊन हे मी त्याला सांगितलं तरी प्रत्येक वेळी त्याचं मन विचकेल. गरिबी नशिबी आली. घरी स्वतःला कोंडून घेता येत नाही. जे झाले ते माझ्या हातून झाले नाही. माझा त्याच्यात तिळमात्र दोष नाही. ही गोष्ट चार ठिकाणी केल्याने तुमच्या भावाची छीः थूः होईल आणि माझ्या सूडाची हौस भागेल हे खरे ! पण माझा नवरा मात्र माझ्यापासून कायमचा दूर जाईल. त्याच्याकरिता मी काय वाटेल ते पापदेखील करीन—मग एवढी गोष्ट लपवून ठेवण्याचे काय ? मला जगायला साधन आहे ते नाहीसे करू नका. मी पापी असलेच, तर देव मला पुढील जन्मी शिक्षा देईल; पण हा जन्म मला माझ्या देवनाथबरोबर सुखाने घालवू द्या. मेल्यावर मी एकटी दुःख भोगीन. पण नसते दुःख सध्या निर्माण करू नका.'

'पण सरू, येथे तू चुकतेस.'

'चुकू द्या, काय वाटेल ते होऊ द्या. बाई, एकतर आम्हा गरिबांत चांगली माणसं मिळत नाहीत. अवघ्या गोष्टींपेक्षा मला माझा पती प्रिय आहे. एवढ्याशा कारणासाठी माझं जन्माचं सुख नाहीसं करू नका. माझं नुकतंच लग्न झालं आहे—माझी हौस फिटली नाही.'

'सरू !'

'नाही—तुम्हांला मालकांची शपथ आहे. असे म्हणून सरू भराभर जिन्याच्या पायऱ्या उतरून खाली गेली. इंदिरा जागच्या जागीच स्तब्ध बसून राहिली. तिला आजच्या आपल्या स्वतःच्या वर्तनाची लाज वाटू लागली. सरूसारखी यःकश्चित मोलकरीण आपल्या पतीला सुखी करायला किती जिवापाड धडपडते.

आणि आपण ?—विनायकराव कचेरीत जाताना आपल्याकडे केवढ्या प्रेमाने आले आणि हिरमुसले होऊन परत गेले, त्या वेळचे आपले वागणे ? ते चित्र इंदिरेच्या जिवाला बोचू लागले. विचारतंद्रीतच ती पुढचे व्यवहार करू लागली.

संध्याकाळी विनायकराव घरी येताच नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे स्वयंपाकघरात न जाता सरळ माडीवर गेले. तो काय ? त्यांची खोली आरशासारखी चक्क आणि इंदिरा त्यांची वाट पाहत बसलेली ! पण विनायकरावांचा जीव तिच्याशी बोलायला धजावला नाही. ते मुकाट्याने कपडे काढू लागले.

हे पाहून इंदिरा स्वतःच म्हणाली— 'आपण रागावला होय माझ्यावर ! मी आहे ना इथे !'

विनायकराव आश्चर्याने स्तब्ध ! ही जादूची कांडी फिरली कशी ?

'खरंच, माझी चूक झाली.'

विनायकरावांच्या मनात असते, तरी त्यांना यापुढे गप्प राहणे शक्य नव्हते.

थोड्या वेळाने आनंदाने अश्रू पुशीत इंदिरा म्हणाली—'सुखात नसती दुःखं निर्माण करायची खराब सवयच आहे मेली मला ! एवढ्याशा कारणांनी मी माझ्या सुखाचा चंद्र—'

आणि याच्यापुढे कुणाला तरी बोलणे शक्य होते काय ?

६।१०।३७

५३

मिठाचे थैंब

त्या दिवशी मला अक्षरशः असे वाटले, की मी जर वर हात केला तर तो खात्रीने आभाळाला पुरेल.

आणि तसे तरी का वाटू नये ? आज माझ्या हाती २०० रुपये होते. संकटाची परंपरा कोसळली होती पण कधी कुणाजवळ बापुडवाणा होऊन मी याचना केली नव्हती. भुकेने पोटात तुटत असे पण कधी कोणाजवळ धर्माचा तुकडा मागितला नव्हता. लक्तरे व चिंध्या अंगावर घातल्या तरी थंडीवाऱ्यात कोणाच्या आसऱ्याला गेलो नव्हतो ! संकटे कोणावर येत नाहीत ? आली म्हणून काय रडायचे ? की धर्माचा आसरा घेऊन भीक मागायची ? ब्राह्मणजन्म आल्यामुळे दक्षिणा मागून त्या पैशाची आणि स्वतःच्या आत्म्याची विटंबना लोकांकडून कशी सहन करवते याचे मला त्या वेळी आणि आताही आश्चर्य वाटत आहे ! बापजादे इस्टेट कमवितात, त्या इस्टेटीचा वारसा पत्करून अप्रामाणिक संपत्ती गिळून एक प्रकारे कोळसे गिळणारांचा मला नेहमीच अचंबा वाटत आला होता ! देवा, ज्या लोकांना पैशाची कदर नाही त्यांना देतोस कशाला पैसा असे मी वारंवार म्हणत असे. पण अशाच माणसांना देव धार्जिणा असतो.

आजचे माझे पैसे ! कपाळाचा घाम तर्जनीने टिपला व भिजलेल्या हाताने ते पैसे मी घेतले होते. चोराने, अप्रामाणिक माणसाने जर त्या पैशांना हात लावला असता तर त्याचे हात जळण्याइतके प्रखर सत्य व तेज त्या माझ्या पैशांत होते ! लोखंडाचे सोने होते किंवा नाही हे मला ठाऊक नाही. पण घामाचा पैसा झालेला मी माझ्या आयुष्यात प्रत्यही पाहत आलो आहे. त्यांचा मोहक, मादक सुगंध !

तेच घामाचे पैसे घेऊन मी बाहेर पडलो. जवळच चहाचे दुकान होते. असे वाटले, की जरा जावे. पण छे ! त्या गढूळ पाण्यात ते पैसे बुडवायचे ? बिडा ? तो तरी चार-दोन मिनिटांत घशाखाली जाईल. जितके दिवस ते पैसे मिळवायला लागले तितके दिवस तरी ते पुरले पाहिजेत ना ?

त्या दिवसापर्यंत मी स्वतःला एक नुसता 'कर्मण्येवाधिकारस्ते' म्हणून काम करणारा समजत होतो. त्याचे फळ आज मला मिळाले. माझी तरी काय एवढी अपेक्षा होती ? जास्त काम केल्याने माणूस मरत नाही, उलट काम टाळल्यानेच एक प्रकारे तो मरतो हा माझा सिद्धान्त होता एवढेच !

घरी आलो. बाबा ओटीवर बसले होते. दाराच्या उंबरठ्यात अर्धी बाहेर आणि अर्धी आत बसून आई तांदूळ निवडीत होती. माझी चंपी नावाची कुत्री नाकावर पाय ठेवून डोळे मिटून पडली होती. बाबांच्या चेहऱ्याकडे माझे लक्ष गेले. रोज मी तो चेहरा पाहत असे. पण आज का कोणास ठाऊक, मी जास्त बारकाईने पाहू लागलो. हजारो सुरकुत्या त्या चेहऱ्यावर पडल्या होत्या. आम्हा तीन भावंडांपायी त्यांना ज्या खस्ता खाव्या लागल्या त्यांची एकेक खूण म्हणून एकेक सुरकुती त्यांच्या चेहऱ्यावर उमटली होती. अगदी निश्चलपणे शून्याकडे दृष्टी लावणारे डोळे हुबेहूब विहिरीसारखे दिसत, की ज्यातून जीवनाचे रांजण भरून काढावेत ! मूर्तिमंत कष्ट, क्लेश, दया, आयास, आघात यांची चालती बोलती प्रतिमा म्हणजे माझे बाबा !

मी सरळ जाऊन त्यांच्या पायांवर डोके ठेविले; रुपये त्यांच्या स्वाधीन केले. का तर न कळे, त्यांनी ते खाली ठेवले आणि ते उगीच त्यांकडे पाहत बसले. त्यांच्या डोळ्यांत पाणी चमकले. खारे, खारे, ऊन, ऊन पाणी त्यांच्या गालांवर ओघळू लागले !

आईच्या ते चटकन लक्षात आले, कारण तिचीही दशा तशीच झाली होती ! तिने संयम केला आणि कठोर मुद्रा करून ती बाबांना म्हणते, "हे काय ? आनंद झाला म्हणून तरी तो मुलांसमोर दाखवायचा असतो का ? दुःख आजपर्यंत दिसू दिलं नाही. आता तो आनंद तरी का असा दाखविता ? चल रे पोरा, आत चल..."

एखादा मोठा तेजोगोल दिसावा तसे मला झाले व मी गोंधळून गेलो. जीवनाशी झगडण्याचे आईचे तत्त्वज्ञान म्हणजे एक अमोलिक देणगी वाटली मला. सुख आणि दुःख ही देखील ज्याची त्यानेच अनुभवावी, नाही का ?

"नाही ग..." बाबा म्हणाले, "मला आनंद तर झालाच, पण वाईटही वाटलं. ह्या पोराने किती सोसलं हे माझ्या मनात आलं नि मी एकदम धीर सोडला. आता काय त्याच्यापासून लपवून ठेवू ? तो आता खांद्याला टेकला आहे."

"मी पुष्कळ सोसलं ?" बाबांच्या वाक्याने कधी वाटले नव्हते इतके हायसे मला त्या वेळी वाटले. माझा अहंकार जागा झाला व तेथेच उभे राहून बाबा काय बोलतात ते ऐकावे असे मला वाटले. त्यांचे मन कुमकुवत झाले होते. त्या कमकुवत क्षणांचा आपण फायदा घेऊ नये. पण आत्मस्तुतीचा क्षण कोणी आवरला आहे आजपर्यंत ?

बाबा जणू आपल्याशीच बोलत होते, "तसे नव्हे, पण आठवतात त्या गोष्टी कशा विसरायच्या ? पाच-दहा वर्षांपूर्वीचीच गोष्ट ! तू त्या वेळी आठ वर्षांचा होतास. आपल्या घरी चिमणीपुरतेही दाणे नव्हते नि जहर खायला देखील पैसा नव्हता. सबंध दिवसभर भूक सोसली. मी आणि ही तुझ्याकडे पाहत असू...

"शेवटी तू घरभर फिरलास. फिरून दमलास. हातापायांत त्राण राह्यलं नाही. घोंगडी टाकून उताणा पडला होतास. तुझी नजर वर गेली. शिंक्यावर घरच्या वेलीचे दोन लाल भोपळे ठेवले होते. पोटात कावळे तोडत होते. म्हणून ते सुचलं तुला !

"दोन दिवस आपण नुस्ते भोपळेच शिजवून खाल्ले होते. कसली चव नि कसलं काय ? पाण्याला तर आसरा केला ? कशा विसरू ह्या गोष्टी ? कसे दिवस तुम्ही काढले. आज तू कसा छान दिसतोस ! किती चांगले अंगभर कपडे घातले आहेस; पण तू दहा एक वर्षांचा होतास. आपटयांनी तुला घरकामाची नोकरी, अन्न नि दोन रुपये महिना दिला होता. त्यांच्या घरी पाव्हणे येणार होते. तुझ्या अंगातली लक्तरं पाहून बाईसाहेब लाजून जात. तू घरी येऊन आईजवळ रडलास. कारण काय ? तिचं पांढरं पातळ फाडलं व त्याचा तुला सदरा शिवला. बाजारू सदऱ्याला त्या वेळी देखील आठ आणे पडत. असले आठ आणे कित्येक वेळा तू आता खर्चून टाकतोस. त्या वेळी पोरा, वेळेला मोल असतं. एकेक दिवस... एकेक वेळ."

त्यांना एकदम अवघडले. त्यांनी आवरण्याचा खूप प्रयत्न केला.

बाबा रडतात! त्यांच्या डोळ्यांतून गळणारी ती ऊन ऊन आसवे, ते खारे पाणी ! ते मिठाचे थेंब !

समोर मूठभर पैसे पडले आहेत आणि त्यांतून बाबा गतायुष्याची प्रतिबिंबे पाहत आजच्या जीवनाला उजाळा आणीत आहेत !

होय, उजाळाच ! ते दुःखाचे रडणे नव्हतेच ! तसले दुःख हे सुख देणारेच असते. त्या ऊन पाण्याने जीवनाचे फुलबाग फुलतात. मृगाच्या पहिल्या पावसाने कदंबाची झाडे अशी बहरतात तसेच, तसेच !

आज माझ्या श्रीखंडपुरीच्या, दुधासाखरेच्या, तूपलोण्याच्या आयुष्यात त्या मिठाच्या थेंबांना अमोल महत्त्व नव्हते का ?

हे मीटच जीवन अवीट, स्वादिष्ट करीत असते आणि म्हणूनच मी सुरवातीस म्हटले आहे, की मी जर हात वर केला असता तर खात्रीने तो स्वर्गाला पोचला असता त्या वेळी !

१०।५।३८

५४

चार आघात*

लग्न होऊन वर्ष झाले नाही तोच तिला पहिले मूल झाले; आणि नंतर वर्षाच्या आत दुसरे देखील.

आता मात्र तिची अशी प्रामाणिक इच्छा होती की इतक्या लवकर आणि आणखी काही वर्षे मूल होऊ नये.

यासाठी तिने पूर्वीच जे प्रयत्न केले ते असफल झाले होते. तिने आता जो प्रयत्न करण्याचे ठरविले, तो प्रयत्न आणि त्याकरिता तिची धडपड, या दोन्हीही बिस्मयजनक होत्या !

तिची प्रामाणिक इच्छा ! किती साधी, किती सोपी, किती आटोक्यातली ती इच्छा ! जमिनीने म्हणावे मी काळी, कसदार राहीन, शेतकऱ्यांना मी कसलीही आडकाठी करणार नाही आणि अंकुर वृक्ष मात्र मी उगवू द्यायची नाही.

पण ही धरित्री शेतकऱ्याला प्रतिबंध करायला सज्ज झाली होती.

आणि म्हणून तिची ती इच्छा दिसली तितकी, भासली तेवढी सोपी आणि सहजपूर्त नव्हती; पण करणार काय ? ती समजदार होती. बरेवाईट तिचे तिला कळत होते आणि हाच तर तिचा गुन्हा होता.

त्याला पहिले मूल होताच वाटले, आता पुरे, इतक्यात दुसरे नको.
दुसरे मूल झाल्यावर तो म्हणाला, " अरे, हे तर भलतेच झाले. "
पण हे भलतेच झाले का ? कुणाला खरे वाटेल का हे ?
मग तो " भलतेच " असे का म्हणाला ?

मानसशास्त्रज्ञ याचे उत्तर देतील—तिसरे मूल झाल्यावर तो तसेच म्हणेल म्हणून ! ! भलत्या गोष्टीला " भलतेच " म्हणून चालत नाही. जेवढे करणे शक्य असते, तेवढे करूनही पुष्कळांना अपयश येते. जे होऊ नये, असे आपल्याला मनापासून वाटते, तेच नेमके होते.

आणि असे झाले, म्हणजे संसारातील मानसशास्त्राचा पहिला धडा सुरू होतो.

तिचे नाव कमला आणि त्याचे नाव विश्वास असे होते. दोघेही देवाब्राह्मणांसमक्ष शपथ घेऊन मोकळे झाले होते. दोघेही प्रामाणिक होते. म्हणजे, मोठेपणाचा आव नव्हता आणि ढोंगाचे नाव नव्हते.

---

* अविवाहितांना ही गोष्ट समजली नाही तर त्यांनी मला क्षमा करावी.

व या असल्या सुविद्य, प्रामाणिक, समजदार जोडप्याच्या संसारातच शहाण्या कमलने वरील गुन्हा केला होता.

हो, होय ! गुन्हाच म्हणतो मी ! तुम्ही दचकू नका हा शब्द ऐकून ! परिणाम जर एक असला आणि शब्द कोणताही वापरला, तर मग ' गुन्हा ' या शब्दाशीच वैर कसले ? दृष्टीमध्ये हरिणाचा भेदरटपणा सदाचा येऊन बसला. अंतःकरणात फाजील सावधगिरी घर करून बसली आणि या दोन्ही गोष्टींमुळे आयुष्य कृत्रिम, लपवा-छपवीचे, साचलेल्या पाण्यासारखे होत असले, तर वर लिहिलेला शब्द वापरणे हा अपराध नाही. जीवनात जर उपरोध असेल, तर त्याला ' संवादित्व ' म्हणूनही त्याचा परिणाम सौम्य व्हावयाचा नाही !

आता कमला व विश्वास यांची गोष्ट सुरू झाली !

तो ऑफिसमधून आला आणि उभा राहिला. ज्या गोष्टींची कमलला कधी आवश्यकता भासली नाही, त्या गोष्टींची तिला आता गरज वाटू लागली होती. आणि हे कधीपासून ? तर ज्या दिवशी ती इच्छा व तो निश्चय केला त्या दिवसापासून !

कमल सामोरी गेली. तिने त्याचा कोट घेतला; जागचे जागी ठेवला. टोपी खुंटीवर अडकविली, स्वतः चहा केला आणि स्वतःच आणून दिला. विश्वासच्या तोंडावर पसर-लेले अकारण औदासीन्य जेव्हा नाहीसे होत चालले, तेव्हा तिला कोण आनंद झाला ! स्वतः केलेल्या साखरपाऱ्याच्या वड्या तिने त्याला खायला दिल्या. छोट्या, चिमण्या, बाळसेदार मुलाला मुद्दाम उठविले आणि विश्वासला घ्यायला लाविले. विश्वासने त्याचे चुंबन घेतले. त्याने घट्ट धरिले आणि त्याच्याशी असंबद्ध अशा प्रेमाच्या गोष्टी केल्या.

ते प्रेमळ पोर आनंदाने हसू लागताच त्या वत्सल मातेच्या हर्षाला, उल्हासाला सीमा राहिली नाही !

" किती गोड आहे आपला विलास ! " मातेचा हा उत्कटतेचा उद्गार विश्वा-सलाही पटला, आवडला ! त्यानेही मुलाकडे हसत हसत पाहिले. तिच्याकडेही पाहिले व त्याच्या तोंडावरचे हास्य किंचित कमी झाले. डोळे तेच असूनही त्यांतील भाव बदलले आणि ...

आणि जी सावधगिरी कमलच्या हृदयात घर घेऊन राहिली होती, तिने स्वतःच्या अस्तित्वाचा पहिला ठोका, पहिला तडाखा कमलला दिला !

विश्वासचा मित्र सहकुटुंब त्याच्याकडे आला होता. तो आला अशा वेळी की, साऱ्यांची जेवणे उरकून गेली होती; विश्वासच्या आईला पुनः चूल भरावी लागली. कमलला पुनः पाटपाणी करावे लागले. अवेळी थोडेसे कष्ट अंगावर जास्त पडल्यामुळे सासूला त्रासल्यासारखे झाले होते.

आणि तिला यत्किंचित देखील नाखूष करावयाचे नाही, असा कमलने त्या— त्या दिवसापासून निश्चय करून टाकला होता !

" तातं नीट पुसून ठेवलीस ना ? "

" होय ! "

" पाण्याचं भांडं कोणतं दिलंस ?—ते विश्वासचं भांडं आहे ना ? "

" होय ! "

" मग ते पाहुण्यांना देतेस कशाला ? त्यांना चांदीचं भांडं काढून दे. "

पाहुण्यांना चांदीची भांडी मिळाली. जेवणे संपली.

" आता हे सारं आवरून टाक. थोडा वेळ स्वयंपाकघर पुजलं तर फारसं नुकसान नाही व्हायचं—"

हे बोल, जर सासू त्रासलेली नसती, तर तिने खचित उच्चारले नसते आणि कमलने निश्चय केला नसता, तर तिला देखील ते जाणवले नसते.

त्या मित्राची पत्नी कमलच्या मदतीला आली.

" नका हो ! एवढं काय काम आहे ! तुम्ही आता दमून आलात ! "

" एवढ्याने काय आता जास्त थोडाच थकवा यायचा आहे ? तुम्हांला सोबत करते; पण आई अशा रागवल्यातशा का दिसतात हो आज ? "

" छे, हो ! मला तर नाही कुठं तसं भासलं ! आणि रागावल्या असतील कधी-मधी त्या देखील बऱ्याकरिताच ! "

परंतु जे भासले, ते विमलने लपविले. विश्वासच्या डोळ्यांतले ते औदासीन्य बदलावे, म्हणून तिने निश्चय केला. विश्वासची आई विश्वासला मनापासून हवी होती. मग आईच्या बाबतीत कमलने हा निश्चय केला, त्यात बिघडले कुठे ?

तथापि, सासूचे पाऊल स्वयंपाकघराच्या बाहेर पडताच कमलच्या हृदयातील नव्या घरवालीने दुसरा ठोका – दुसरा तडाका दिला आणि स्वतःचे अस्तित्व तिला जाणवून दिले.

विलासच्या वेळेला जी डॉक्टरीण कमलला तपासून गेली तिच्याशी आणि त्या कुटुंबाशी या एक वर्षात फार घरोबा वाढला होता. ती बाई दर रविवारी हटकून विलासला पाहायला म्हणून येत असे. फार आनंदी आणि मोठी मानभावी होती. चहाच्या टेबलावर त्या तिघांच्या तासन्-तास गप्पा चालत. आताही संभाषणाला नुकतीच सुरवात झाली होती. निरपराधी हवेला आणि उन्हाला या वेळीही संभाषणाकरिता वेठीस धरण्यात आले होते.

' किती उकडतंय आज ? — ' विश्वास, वारा घेत आणि डॉक्टरणीकडे पाहत !

'आणि आता कुठे उन्हाळ्याला सुरवात–' डॉक्टरीण, घाम टिपत आणि कमलाकडे पाहत !

'आणि वारे पण किती गरम कसतात ? कालतर यांनाही नीटशी झोप आली नसेल.'—कमलचा उद्गार, विश्वासकडे पाहत !

'पण यांच्या झोप न येण्याचे कारण वेगळे असेल.'

असे म्हणून डॉक्टरणीने हसत हसत आणि मिस्किलपणे विश्वासकडे पाहिले !

विश्वासने कमलकडे पाहिले.

कमल दचकली.

आणि तिने ते लपविले.

" छे ! छे ! भलतेच काही, तसे नव्हे. "

" पण मग तुम्हांला तर एवढी प्रशस्त गच्ची आहे की. "

" पण गच्ची असली म्हणून ? अहो, मला तर आतच झोपावे लागते. यांना आताशा काम पडते फार; नि गच्चीवर पडले, म्हणजे साहजिकच त्यांना बरे वाटावे म्हणून मी आत झोपते. पुनः माझेजवळ विलास असतो व तो रात्री उठला तर रडतो; व मग यांची होते झोपमोड. शिवाय आताशा तर तो फारच रडायला लागला. काल सहज रात्री मी विलासला घेऊन बाहेर आले, तो हे देखील पंख्याने वारा घेत होते. आतापासून इतका उकाडा आणि ही तर उन्हाळ्याची सुरवात. "

तिघेही चहा पिऊ लागले. उन्हाळ्याचा उष्मा आणि विलासचे रडणे ही दोन कारणे जर सापडली नसती, तर कमलला वरचे चऱ्हाट खचित लांबविता आले नसते; पण तिला ती कारणे सापडून गेली.

आणि तिने तसे बोलून दिले. शरीराची ती डॉक्टरीण चिकित्सेत पडली नाही.

तथापि आपण ती कारणे का सांगितली, हे कमलचे कमललाच उमजण्यापूर्वी तिच्या काळजात तिसरा ठोका—आघात—तडाखा बसला !

कमलचा मामेभाऊ श्री. त्रिंबकराव देशपांडे हा विलायतेहून येताच पहिल्यांदा कमलकडे उतरला. त्याला कारणही तसेच होते. विश्वास यापूर्वीच जाऊन आल्यामुळे त्याचा अनुभव त्रिंबकरावाला उपयोगी पडला होता व विश्वासशी मन मोकळे बोलावयास म्हणून तो मुद्दाम आला होता.

जेवणे झाली आणि ही सारी मंडळी चांदण्यांत गप्पा मारू लागली. त्रिंबकरावाने सिगारेट काढली व तिचा एक झुरका मारला.

'त्रिंबक, पछाडलेलं दिसतंय त्या बयेनं तुला—'

'छे, नेहमी नाही मी पीत ! उगीच अवचट company's sake (मैफलीत उगीच.)'

' म्हणजे, माझ्यासारखंच तुझं. '

' पण मी म्हणते, ही व्यसनं अशी लाडविली, तर सदाची जडतात; तर त्यापासून मुळातच सावध राहिलेलं बरं नाही का ? '

' तथापि, हे प्रत्येकाच्या मनावर आहे. मी दिसलो का कधी तुला कमल नियमित ओढताना ? पण मी company's sake तर घेतोच. '

' तुमची गोष्ट एक वेगळी— ! तुमचा तेवढाच मी अपवाद पाहिलेला आहे. यांची गोष्ट किनई, त्रिंबकराव, अगदी मुलखावेगळी बरं का ? यांचं मन विलक्षण ताब्यात आहे. कोणत्याही इच्छेचा पगडा ते आपल्या मनावर सहसा बसू देत नाहीत. '

' विलक्षण ' हा शब्द उच्चारताना कमलने मोठा जोर दिला. हे वाक्य उच्चारून होताच तिने विश्वासकडे पाहिले आणि त्याच्या डोळ्यांत ते—ते—औदासीन्याचे भाव आहेत की काय, याची खात्री करून घेतली ...

पण पाहत असतानाच त्या तिच्या हृदयातील घरवालीने तिच्यावर चवथा आघात केला !

आता मला सांगा कमलची इच्छा प्रामाणिक होती किंवा नाही ? आणि याचेही उत्तर द्या की, त्यांच्या जीवन-प्रवाहाचे पाणी साचले होते किंवा नाही ?

ज्या वेळी झाडांना पालवी फुटावी, झऱ्यांना खळखळ सुटावी, उषेला लाली चढावी आणि संध्येला अनुराग यावा, ज्या वेळी शुद्ध, मादक, नैसर्गिक जीवनरसाने हृदयपुष्पे फुलून यावीत, त्या वेळी कमलच्या हृदयात ठोके पडत होते—आघात होत होते ! —आणि ते होत नाहीत, फुले फुलतात, झरे वाहतात, पालवी फुटते, हे ती दाखवीत होती.

आणि ते जगाला दिसत होते !

अजून कमलने आपली प्रामाणिक इच्छा सोडून दिली असे ऐकिवात नाही.

जीवनाच्या कोणत्या मैदानात आणि कोणत्या आघाडीवर आपल्याला झुंज खेळावी लागेल व आघात सोसावे लागतील, हे कधीतरी कुणी नक्की सांगेल काय ?

१७।९।३८

५५

परवाची दोन स्वप्ने

जी गोष्ट मी जन्मात कधी केली नव्हती, ती त्या दिवशी केली. घरी आलो. कपडे काढले व घर बांधल्यापासून ज्या खुंट्या धूळ खात पडल्या होत्या, त्या खुंट्यांवर

ते व्यवस्थित ठेवले. आतले बनियन घामाने चिंब झाले होते, ते लगेच नोकराला बोलावून धुवायला दिले. स्वतःचे केस नीट करून टेबलावरील पुस्तकेही रचून ठेवली. खोली स्वच्छ करविली. एक पुस्तक उचलले आणि विशिष्ट लकब आणून खुर्चीवर वाचीत बसलो.

तथापि, जो मी पुस्तक हाती पडताच एकाग्रतेने भराभर पाने वाचून जायचा, त्या मला त्या दिवशी एकाही पृष्ठावर काय लिहिले आहे, हे उमगेना !

माझी खोली स्वच्छ का झाली, याचे माझ्या धर्मपत्नीपेक्षाही मलाच जास्त आश्चर्य वाटले. कधी नाही ते आज झाले आणि हे झाले तरी कसे ?

मोपाँसाँ या वेळेला जन्माला आला असता व त्याने आजचा प्रकार पाहिला असता, तर तो मात्र माझ्या आजच्या वागण्याचे कारण खचित सांगता; कारण दुसऱ्या कोणत्याही लेखकापेक्षा जास्त खरे लिहिण्याची त्याची प्रवृत्ती होती !

आणलेला चहा पिऊन मी स्वतःच कप नीट पोचवून दिला.

आणि त्यानंतर नेहमीच माझ्या सर्व गोष्टी जिथल्या तिथेच व जशाच्या तशाच स्वच्छ आणि नीटनेटक्या राहू लागल्या...

पण हे विधान माझ्या हृदयाच्या बाबतीतही लागू पडले असते का ? देव जाणे !

ज्या गोष्टींची मी रोज चौकशी करीत असे, त्या गोष्टींची मला विचारणा करावीशी वाटेना; आणि ज्या विचारू नयेत, दाखवू नयेत, दिसू नयेत, त्या गोष्टी मात्र तीनतीनदा मनात येत.

आणि हेच त्यात विशेष होते !

कुणाला जी भजी आवडली, ती मला आवडू लागली. कुणाला एखादा रंग आवडल्याचे ओझरते जरी दिसून आले, तरी त्या रंगाचे मी कपडे शिवू लागलो.

माझ्या असल्या या जपणीच्या व चांगल्या वागण्यामुळे सर्वांना मी हवासा वाटलो; माझ्या आईला, भावंडांना मुलांना, पत्नीला—झाडून साऱ्यांना !

सूर्य उगवतो. त्याच्या प्रकाशाने सारे जग हसते. तो कुणासाठी उगवतो कुणास ठाऊक ! व मी देखील असा कुणासाठी वागत होतो, हे...हे ?

पहिल्यांदा— अगदी पहिलीवहिली अनू जेव्हा आमच्याकडे आली, तेव्हा तिचा तो अवतार पाहण्यासारखा होता. आमच्या शेजारी ती आल्यापासून तिच्याबद्दलची चर्चा हा आमच्या इथला एकमेव विनोदाचा विषय होता. कितीही कुणी म्हटले, तरी ती तशीच वागायची ! जणू काय तिचा तो हव्यास होता व कॉलेजातल्या मुली देखील तिच्या खिसगणतीत नव्हत्या. एकदा मी सहज तिला म्हणालो, "अनुताई ! तुम्ही थोड्या व्यवस्थित राहिलात, गळत्या पेनने पडलेले डाग धुऊन काढलेत व पातळांना रस्ते झाडण्याची बंदी केली, तर तुम्ही कितीतरी सुंदर दिसाल !"

दुसरे दिवशी ती आमच्याकडे आली असताना वरील गोष्टींपैकी एकही तिच्यात आढळली नाही !

मला नुसते आश्चर्यच वाटले नाही. बरे वाटले ! अभिमान वाटला आणि हीच गोष्ट माझ्या ध्यानी राहून गेली !

परवा जेवायला बसलो. स्वयंपाकघरात हास्याचे फवारे उडू लागले. अनुताईच्या गप्पा मी यायच्या अगोदरपासूनच सुरू होत्या.

जेवणाच्या बाबतीत मला ज्या सवयी आहेत, त्या पाहिल्या म्हणजे मला कधी कधी वाटते की, मोरांच्या जिभांची भाजी खाणारा 'नीरो' आणि मी कोणत्या जन्मी वंशज खात्रीने होतो. फणसाची भाजी एखाद्या अधाशासारखी मी खाऊन टाकीत असे व आज देखील अर्थात ती पानात दिसताच मी गोष्टीच्या भरातही तिच्याकडे दुर्लक्ष कधीच केले नाही.

'भाजी !' मी पुकारा केला.

'आता आमच्याकरिता थोडी असू द्या की चवीला–' माझ्या सुशील पत्नीचा मला निःस्वार्थी सल्ला !

'म्हणजे ? स्वतः करूनही तुझी तृप्ती झाली नाही ? आणि केलो तर इतकी थोडी ? असे का ?'

'आज घरात मुळी भाजीच झाली नाही. ही अनुताईने आणली हो ! व ती देखील तिने मुद्दाम स्वतः केली. परवा त्या सहज विचारीत होत्या तुम्हांला काय आवडते म्हणून. मी त्यांना भाजीचे सांगितले आणि त्यांनी करून पण आणलीन् ! फसलात पुरे !"

'असं का ?—' परंतु असा उद्गार काढताना मला ती भाजी चांगली झाली आहे, असे म्हणण्याचेही भान राहिले नाही. किंचित्काल मी स्तब्ध बसलो.

मला नुसताच विस्मय वाटला नाही. फार बरे वाटले आणि अभिमान पण तितकाच !

वरेरकर मला भेटले, त्या वेळी त्यांनी स्वतःच्या 'सवंगडी' ची फार तारीफ केली होती आणि आगगाडीत बसता–बसताही पुनः त्यांनी मला बजावले होते, 'तो खेळ जरूर पाहा—'

सुदैवाने तो खेळ आमच्या गावी लागला. पहिले दिवशी तो मी एकट्याने पाहावा आणि बरा वाटल्यास दुसरे दिवशी साऱ्यांना पाठवावे, असा व्यावहारिक विचार मी केला. माझ्यासारखी मध्यम स्थितीतील माणसे असाच विचार करतात व त्या विचाराचा उत्तरार्ध आठवणीने विसरून जातात.

खेळ संपला. साडे दहा वाजले होते. घरी आलो. दार बंद होते. जाळीतील तिन्ही बिऱ्हाडे अगदी शुक्क होती. बरेच दिवसांनी आपल्याला स्वस्थ झोप मिळेल, असा समंजस विचार आमच्या सुशील पत्नीच्या मनात येऊन त्यांनी स्वर्गापर्यंतची मजल गाठली होती. एक, दोन, तीन, दहा हाका मारल्या तरी त्या स्वर्गापर्यंत थोड्याच ऐकू जाणार ! शेवटी एक निकराचा प्रयत्न केला—एवढ्यात.

'थांबा अं ! मी आता उठविते बहिर्नींना' असे मृदू बोल ऐकू आले. त्यात काहीही नव्हते; पण मला ते आवडले.

थोड्याच वेळात दार उघडले गेले.

'अखेर जागी झालीस कशी ?'

'अनुताईंनी माजघराचे दार ठोठावून हाका मारल्या. म्हणाल्या, आपण कितीतरी वेळापासून उभे आहात !'

'काय ? काय म्हणाली — म्हणाल्या त्या ?'

'काही नाही, तुम्ही हाक मारून थकलात असे–'

मला वाटले पुनः एकदा विचारावे 'काय ? काय म्हणाली ती ?'

पण विचारले मात्र नाही.

आणि विचारणेही बरे नव्हते !

या वेळी मला विस्मय मात्र वाटला नाही. फार फार बरे वाटले ! खूप अभिमान वाटला !

त्या रात्री मी गाढ झोपलो. सुखाने मला हायसे वाटले. मला मधुर सुखस्वप्ने पडली. त्यात मला दिसत होते – मला सारे मान देत आहेत,- चांगले म्हणत आहेत– माझ्या बोलण्याची, माझ्या कृतीची सर्वजण वाखाणणी करीत आहेत !

असे स्वप्न कुणाला नकोसे होते ?

सकाळी जागा झालो आणि स्वप्नाची आठवण केली. सत्यसृष्टीतील माझ्या परिस्थितीत आणि स्वप्नाच्या जगात काडीइतकाही फरक नव्हता.

मला कामावर जाणे शक्य नव्हते. काही दिवसांपूर्वी पत्नीला आलेल्या तापाने पलट खाल्ली व तो तिच्या चांगलाच खनपटीस बसला. माझ्याशिवाय तिला कोण होते ?

अगदी कुणीकुणी नव्हते !

आणि मला ?

छे, छे !

मी तिच्या खाटेवर बसलो होतो. थोडा वेळ झाला, अनू बसून गेली होती. हाताने हलके हलके मी तिला कपाळावर थोपटीत होतो. तिला माझा हस्तस्पर्श हवासा वाटत होता— तिने ते स्पष्ट म्हणून दाखविलेही होते !

'या ना ! आणखी जरा जवळ या ना — '

'तू आता स्वस्थ झोप बरं- '

'अहं, मला अशानेच बरे वाटेल. बसा ना ! '

मला तिचा शब्द मोडवेना आणि इतके दिवसांचे जिवाचे लागेबांधे ! मी जवळ गेलो. मला अधिकच मोह, अधिकच आकर्षण वाटले तिच्याविषयी.

पती म्हणून तिला मी सर्वस्व होतो. मला देखील तिच्या परता...

पण याच्यापुढे लिहायला ही माझी लेखणी अडखळते का ?

'तुम्ही किती चांगले आहात. तुम्हांला कल्पना येणार नाही इतकं तुमच्याविषयी लोक आताशा चांगलं बोलतात. मला किती बरं वाटतं. तुम्ही असे एकदम निर्दोष कसे झालात ? कुणी जादू केली तुमच्यावर ? '

ती मला आणखी जवळ ओढू लागली—आणखी जवळ !

कुणाही प्रामाणिक माणसाला आपल्या प्राणप्रिय पत्नीचे हे उद्गार जीवनप्रद वाटतील. जिला आपण मनोभावानं सुशील म्हणतो—तसे म्हणताना आपल्याला अभिमान वाटतो, त्या पत्नीचे हे उद्‌गार !

मला कृतकृत्य वाटले ! पण आश्चर्य वाटले नाही. अभिमानही वाटला नाही—तसा अभिमान जसा...!

पण हे काय ? हे डोळे का भरून येतात ? ही गळती का लागली आहे ? मला बुजल्यासारखे का वाटते ? हृदय असे भरून का आले ? हा हुंदका मी कसा आवरू ? हे काय, हे काय ?—

त्या रात्री मी झोपलो. मला कुणीतरी सांगत होते. माझे मनच असेल बहुधा—ते वारंवार सारी रात्र मला सांगत होते, थांब ! इथेच थांब आता. तुला ओलावा देणाऱ्या झरीचा आता यापुढे शोध लावू नकोस. आणखी एक पाऊलही पुढे टाकू नकोस !

'कमले अशीच फुलतात. फुले अशीच टवटवतात. चातक असाच तृप्त होतो. चकोर अशीच वाट पाहतो. आता पुरे ! '

मी जागा झालो. सकाळी पाखरासारखी झोप उघडली, डोळे ओले होते. अगदी दवासारखे ! आणि माझे स्वागत कुणी केले ?

जिचे तोंड आजाराने मलूल झाले आहे आणि तरी देखील जे जीवनाच्या भरदार आनंदाने कदंब वृक्षाच्या उमलत्या कळीसारखे फुललेले आहे, अशा माझ्या परमप्रिय पत्नीने !

अनुताई शेजारच्या माडीत आपल्या छोट्या भावाला शिकवीत होती—Where ignorance is bliss it is folly to be wise !

१७।९।३८

५६

मीलन

बाई ग ! का अशी विलगलीस त्याला ? तू आता कितीही म्हटलेस की मी दूर होईन, तरी तुला ते आता शक्य नाही. पानापानांतून फांद्याफांद्यांतून तुझ्या पर्णशाखा गुंतल्या आहेत.

आणि तू तरी अशी दूर का होशील नि कशाला होशील ? ती तुझी फुले—एकेक कसे उंचावून आकाशाकडे पाहत आहे ! टिटवीचे सुंदर पाय देखील तुझ्या फुलाची बरोबरी करू शकणार नाहीत. मोठ्या विस्तीर्ण हरित पर्णांवर उठून दिसणारी ती तुझी प्रफुल्ल सुमने उफाळलेल्या समुद्राच्या मदमलिन फेसापेक्षाही सुंदर दिसतात.

अथांग जलधीवर शेषाचे अंथरूण पसरून योगनिद्रेत मग्न असलेल्या आदि-पुरुषाचे पीतांबर तर नाहीना इथे या समुद्रावर वाळत टाकले ? कुणाला वाटेल का की तू आनंदी नाहीस ? अशक्य, अगदी अशक्य !

पण बाई ग ! तो वृक्ष — ज्याला तू कवटाळलेस, तो तू नीट निरखलास का ? त्याची तू निवड केलीस ती तुला योग्य वाटली का ? तुला हवासा वाटला का तो ? की जन्माच्या साथीदाराबरोबर सुखाने राहावयाचे हाच तुझा त्यागमय सनातन नियम आहे ? — कुणाही कुलीन हिंदू स्त्रीसारखी तर त्यामुळे तुझी गत होणार नाही ना ?

सखे ! मला भीती वाटते. ते झाड ' हिवराचे ' आहे. त्याची पाने देखील कशी चिरमटलेली आहेत. त्याच्या त्या शेंगा बघ कशा खुरटलेल्या आहेत. त्याच्या गोरट्या सरस अंगकांतीवर बघ कसे फोड उठले आहेत.

आणि तरी देखील तू त्याला आलिंगितेस ?

ही पाहा आजूबाजूची झाडे ! कशी कोवळी आहेत. तुझ्याच बरोबरीची आहेत. कशी जीवनाने भरलेली आहेत. किती उत्सुक !—त्यांतले नाही का कुणी तुला आवडले ?

काय, काय म्हणतेस ? ते उंच नाहीत ? तुझ्या शक्तीचा, प्रेरणांचा, प्रसभाचा विकास त्यांना सहन व्हावयाचा नाही ? ते तुला जमिनीवर फेकून देतील ?

होय ! ते खरे आहे. जो तुला उंच नेईल, जो तुझ्या साऱ्या शक्ती अजमावील त्यालाच तू वरशील— मग असेनात त्याच्यात थोडे दोष ! जीवनाशी झगडावयाचे आहे. साथीदार खंबीर हवा ! गंगेने शंकरालाच वरिले ! एरवी त्या जोगड्यामध्ये तिच्यासारख्या चटकचांदणीला भुलावण पाडण्यासारखे होते तरी काय ?

खरंच ! म्हटल्यावाचून राहवत नाही—किती गुणाची तू !

पण तो पाहा वारा आला ! त्या पाहा शाखा शाखांना विलगल्या आहेत—तो आवाज, कसा मधुर, सुखनिर्भर--स्तिमित--अहं, लाजूनकोस. आम्ही पाहत नाही हं !

हे पाहा मिटले डोळे !

१।१०।३८

५७

" कडू जा....गोऽऽ ये "

आता खरोखरच चटके बसायला लागले. हे पाहा माझं रक्त कसं सर सर ओढून राहयलं. आहे. किती दिवस दम निघतो देव जाणे !

काय म्हणता ? अजून माझं वय झालं नाही ? मग मी कुठं म्हणतो ? पण आता माझ्यात काही त्राण राहिलं आहे का ? ज्या गोष्टी मोठ्या हौसेनं हाती घेतल्या, त्या देखील पुऱ्या झाल्या नाहीत. जी कामं उचलली, त्यांचाही भार सहन झाला नाही. आता का आणि कसल्या चाळवण्या दाखवू ? अरे, या रे कुणीतरी ! ही कामं संभाळा. आता किती अंत पाहता ?

डॉक्टरांनी सांगितलं—नव्हे, परमेश्वरानं सांगितलं, गोड खाणं या जन्मी सोडा. परमेश्वरानंच सांगितलं नाही तर काय ? अहो, त्यानंच तर माझी सारी सूत्रं हाती घेतली होती !

गोड खायचं नाही, ज्यात ज्यात म्हणून साखरेचा अंश आहे, तो तो पदार्थ खायचा नाही. फळं वर्ज्य ... !

" अरे, कोण आलंय् रे तिकडे ? कुसुम ? वा ! वा ! पोरी, अगदी वेळेवर आलीस ! किती दिवसांत भेटली नाहीस. ये, ये; खूप खूप बोलू. हं, किती लिहून झालं तुझं ?... "

" बापू, डॉक्टर म्हणाले की तुम्हांला काकडी खायला हरकत नाही. ही पाहा मी एक कोवळी सुन्दर काकडी आणली आहे; माझ्या घरच्या वेलीची ! देऊ ना मग मी सिरी लावून ? मग हवं तेवढं बोलू आपण. आज इथंच तुमच्याजवळ राहणार आहे मी. "

कशी पोर आहे ही ? अग, वेडे हे आता खाणंबिणं कशाला ? शरीर काम करायचं टाळतं, कशाला त्याचे लाड पुरवू ? मरू दे ना ?

" घ्या, घ्या, ही उशी मी भिंतीला टेकून ठेवते. उठून बसा ना ! -- एक एक फोड देते मी. "

बसलीच की चिरायला. एका बशीत मीठ, दुसरीत मिरपूड, कोवळ्या हातात कोवळी काकडी.

देठाजवळची वडी चिरली. काकडीवर घासून फेसाळली. काय म्हणतेस ?-- कड्डूऽजा, गोऽऽड ये-- कड्डू जा, गोड ये !"

" अग, अशानं का काकड्या गोड होतात पोरी ? "

" नाही, पण आपली इच्छा ही नेहमी चांगली असावी. "

अरे, पण हे काय ? माझे डोळे आत आत काय बघतात ? माझं हृदय पाहू ? काय आहे त्यात ? हा एवढा प्रकाश कशाचा पडला ? हे इतकं रक्त कुठून आलं माझ्या शरीरात ? ही उत्साहाची विहीर कुठल्या झऱ्यांनी भरून आली ? असं सशक्त झाल्यासारखं मला का वाटतं ? झालंय काय सारं ?

कुसुमचा हा शुभकामनेचा सिद्धान्त ! त्याचा तर प्रभाव नसेल ना ? ही जादू त्याने घडविली ?

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्य पाहो ।
जो जे वांछील ते लाहो । प्राणिजात ॥

आणखी ही कुणाची आकृती ? हा तो जर्जर झालेला, म्हातारपणाने खंगलेला कर्मयोगी यूलिसस ! नव्हे का ? काय म्हणतो तो.

" Something are the end ;
Some note of noble work
may yet be done ;
I will drink my life to the lees ! "

मग माझंच वय झालं की काय ? मी इतक्या लवकर का मरावं ? मी स्वार्थी नाही का ठरणार ? मरण्याची इच्छा हा अतिशय पापप्रद असा स्वार्थ आहे. चला उठा, लागा कामाला.

कोण आहे रे तिकडे ? अरे या पोरीला पुष्कळशा काकड्या आणून द्या व तिच्या वाणीने सारे लोक ऐका—

" कड्डू जा. गोड ये – कड्डू जा. गोड ये--"

हा मी जातो आणि आणतो माझ्यासारखे मरतुकडे बोलावून !

आपली कामना शुभ असावी ! असल्या भुलावणीने जर शरीरात रक्त येत असेल, जोम येत असेल, पिकली पानं गळून जर नवी येणार असतील, तर ही भुलावण देखील एक महान सत्य का समजू नये ?

५८

नवी बायको

ती गोष्ट जशी घडली, तशीच मी सांगणार आहे. त्यावर भाष्य करणार नाही. ती मला कुणी सांगितली, हे आता नीटसे आठवत नाही. ज्यांनी मला सांगितली, ते गृहस्थ मोठे मनोवेधक कथाकार असावे, हे निश्चित—कारण त्यांनी ते जसे सांगितले तसेच माझ्या मनावर अजून या घडीला ठसलेले आहे. ती गोष्ट अशी :—

कुठल्याशा प्रांतातला एक माणूस होता. तो प्रांत तुमच्या आसपासच आहे. गोष्ट वाचल्यानंतर तुम्हांला असेही वाटेल कदाचित की, " अरे, ही आपल्या गावची तर नव्हे गोष्ट ? कारण परवा आपला जानबा पाटील असेच म्हणाला होता. " काहींना वाटेल, दिली एक थाप झोकून—अखेर तर लघुकथा लेखक ! " या दोन मतांपेक्षा तिसरे मत निघायचे नाही; कारण जीवनाकडे पाहण्याच्या सध्या तरी या दोनच वृत्ती आहेत.

हो, तर एक माणूस होता. वय त्याचे पन्नास वर्षांचे होते. पांढऱ्या गंधाचा चांगला भलामोठा टिळा कपाळी लावीत असे, रुद्राक्षाची माळ होती गळ्यात, पंढरीचा वारकरी आणि गावचा प्रतिष्ठित माणूस म्हणून इतर गावचे लोक त्याला चांगले ओळखत होते. तो कुठे गेला की लोक त्याला उठून समोर येत. घोंगडी टाकून मोठ्या आदराने बसवीत. विडा-सुपारी देत. असे समजत, हा माणूस आला, हे फार चांगलं झालं !

तो देखील दुसऱ्याचे भले करणारा होता. तुळशीला पाणी, गाईला चारा, मुंगीला साखर, भिकाऱ्याला तुकडा आणि गावकऱ्याला प्रेम, इतक्या देणग्या तो नेहमी देत असे. संस्थेला देणगी मात्र त्याला द्यावी लागली नाही, कारण त्याच्या आसपास संस्था नव्हत्या आणि त्या संस्थांना देण्याइतके त्याच्याजवळ पैसे शिल्लक नव्हते; कारण त्याने कुटून तरी माती खणून घरचा उंबरठा केला नव्हता. शहरी भाषेच्या शब्दकोशात त्याचे वर्णन ' गरीब, भोळा, सालस, खेडवळ ' — असे केले जात होते. लोक म्हणतात, ' खेडवळ ' म्हणजे न सुधारलेला ! सुधारलेला म्हणजे काय, असे कुणाला विचारले, तर सांगता येणार नाही, हीच फक्त उणीव. बाकी काही नाही.

त्या माणसाला एक मोठी हुशार, कामसू आणि निरोगी अशी पत्नी लाभली होती. तिच्यापासून त्याला सुख मिळाले होते, मुले मिळाली होती. काम मिळाले होते ! दोन शेतांचा कारभार ती सहज सांभाळीत असे. घरचा भाकरतुकडा, पोरांची दुखणी खुपणी, गाईचा गोठा— सारी कामे तिची होती !

म्हणजे त्याच्या दृष्टीने त्याच्या वैवाहिक जीवनात कसलीच उणीव नव्हती. असायचे कारण नव्हते. सर्व गोष्टी ठीक होत्या.

परंतु त्या सुशील माणसाने अगदी एक वर्षापूर्वी म्हणजे तो एकूणपन्नास वर्षांचा असताना दुसरे लग्न केले होते. ते करताना त्याने आपल्या प्रथम पत्नीचा सल्ला घेतला होता. तिने त्या गोष्टीला मोठ्या व्यावहारिकतेने अनुमती दिली होती. मुलांना विचारले. त्यांनी 'हो' म्हटले. सर्वांनी लग्नात भाग घेतला. खीर-पोळी खाल्ली. नवे कपडे घातले. गावकऱ्यांना मौज वाटली.

पुनः सर्व सुरळीत चालू झाले. तथापि एक प्रश्न होता. त्याने दुसरे लग्न केले हा केवढा अन्याय ! नव्हे का ?

आणि हाच प्रश्न महत्त्वाचा म्हणून गणला गेला. जेव्हा गावच्या मालगुजाराची दोन्ही मुले डिसेंबरात सुट्टीनिमित्त घरी आली आणि त्यांना हे कळले तेव्हा ! मोठा मुलगा तर फार रागावला. म्हणाला— 'त्या तरुण मुलीचा केसाने गळा कापला. या वयात लग्न केले, पाटलाची बायको झाली म्हणून काय झालं ! अजून तिची तिशी उलटली नाही आणि हा तर आता म्हातारा झाला —छे छे ! आमच्या गावात हे असं' त्याने ते सर्व मोठ्या जोराने म्हणून दाखविले. त्याने चार-दोन पुस्तके वाचली होती. बायबल चाळले होते. दया, सहानुभूती यांच्या युरोपीय व्याख्या वाचल्या होत्या. मॅकमिलन कंपनीने प्रसिद्ध केलेले रामायण वाचले होते. सीतेची आयुष्य-कथा त्याने ओल्या डोळ्यांनी आणि ओल्या हृदयाने ऐकली होती.

रघुवंशातला कलह आणि रामाचा वनवास त्याला ठाऊक होता. स्त्रियांबद्दल त्याला फार कळवळा वाटायचा !

त्यामुळे त्याला खात्रीने वाटले, हा मोठा अन्याय झाला !

पाटलाला काय मुलं हवी होती म्हणून त्याने लग्न केले ?

छे, त्याला होती की मुलं !

मग ! सुखाकरिता ?

पण तो पन्नाशीला आलेला—पहिली बाईल निरोगी, चांगली.

मग आणखी तिसऱ्या लग्नाने तो काय मिळविणार ! दोघाही भावांनी सकाळी उठताच त्या माणसाचे घर गाठले. त्याने त्यांना मोठ्या प्रेमाने खाटेवर बसविले. कपिलेचे दूध प्यायला दिले. विडा दिला. सुपारी टाकली. विचारले—'मालिक, आज सकाळीच नवं टाकलंत ते !'

त्या दोघांना सुरवात कशी करावी, हे सुचेना. शेवटी मोठ्या मुलाने सुरवात केली. त्याने येण्याचे कारण सांगितले आणि मोठ्या आवेशाने तो म्हणाला—

'तुम्ही पंढरीला जाता, देवधर्म करता आणि एका बाईबापडीचा केसाने गळा कापलात, त्याचे काही वाटत नाही तुम्हांला ?'

एवढे बोलून तो थांबला. ते पाटीलबाबाही थोडा वेळ तसेच थांबले. कुणीच बोलेना. दारावर पोपटाचा पिंजरा होता. नुकतीच टाकलेली हरभऱ्याची डाळ तो खात होता आणि मध्येच म्हणे– 'लटपटपंची चतुरकी जान, पढो प्रभाते श्रीभगवान्—'

अखेर पाटीलबाबा शांतपणे म्हणाले—" मालक, तुमचं बोलणंच मला समजलं नाही. तुम्ही म्हणता मला मुलं होती. मग लग्न का केलं ? मला सुख होतं तर लग्न का केलं ? तसं काहीच नव्हे. मी केलं, त्यात काय झालं मोठं ? याच वर्षी मी आणखी दोन शेते घेतली. तुमच्याच वडिलांनी घेऊन दिली आणि घरच्या चार गाईपण वाढल्या. त्यांचं करावं कुणी ? हिला एकटीला ते झेपेना. मी विचार ठरविला. तिनं संमती दिली. बघा बरं कशी पिके उभी आहेत, शेतात नव्या ! —तुम्हीसुद्धा खूष व्हाल—चला की. अग,— जरा पागोटं आण. "

नव्या नवरीने पागोटे आणून दिले. मोठ्या हर्षाने आणि समाधानाने तो उठला, ते देखील उठले !

मी आरंभीच सांगितलं आहे की, मी जशी घडली तशीच गोष्ट सांगणार. मग आता पदरचं थोडंच लिहायचं आहे ?

५९

लोकसाहित्याचा निर्माता

'साहित्याचे मूलधन' या ग्रंथाची जुळवणी करताना बरेच लोकसाहित्य निरखावे लागले. त्या वेळी असे नेहमी वाटे की इतके उत्कृष्ट साहित्य निर्माण करणाऱ्या लोककवीची मनोभूमिका असते तरी कशी ? याचे समाधानकारक उत्तर मला बरेच दिवस सापडले नव्हते !

लोकसाहित्य सुंदर, सकस, उद्‌बोधक तर खरेच; परंतु त्यातील रस चाखणाऱ्याला देखील एक प्रकारची वृत्ती अंगी बाणून घ्यावी लागते. आपल्यात कृत्रिमता जेवढी कमी असेल तेवढे लोकसाहित्याचे मर्म जास्त कळेल. कृत्रिमता ही तर आपल्या रोम-रोमात खिळलेली आहे, आणि आता तर अशी भीती वाटते की कृत्रिमता हाच आपला स्वभाव बनून जाईल. अशा स्थितीत कोणतीही नैसर्गिक वृत्ती जागृत करावयाचे म्हटले तरी त्याऐवजी विकृती मनात उत्पन्न होणार नाही याची सतत काळजी घ्यावी लागते.

सहज स्वाभाविक साहित्य निर्माण करणाऱ्याची वृत्ती कशी असते हे मला बरेच दिवस कळेना हे वर सांगितलेच आहे. लोकसाहित्यात मन घालताना किंवा तद्विषयक लिखाण करताना माझ्या मार्गात ही एक मोठीच अडचण होती. आणि ती तशीच राहिली असती तर एक मोठी उणीवच राहून गेली असती.

परंतु एका अकल्पित रीतीने मला या गोष्टीचा उमज पडला. माझ्या आईने मला लोकवाङ्मयाची गोडी लावली आणि तिनेच मला लोककवीची भूमिका समजावून दिली. ज्या प्रसंगाने मला हे कळून चुकलं तो प्रसंग वाचकांनाही मनोरंजक वाटेल म्हणून मी येथे देणार आहे. तथापि तो देताना ओघानेच माझ्याबद्दल किंवा माझ्या नातेवाईकांसंबंधी वाचकांना काही वाचावे लागेल तेव्हा ते माझ्यावर आत्मस्तुतीचा आरोप न करता मला क्षमा करतील अशी आशा आहे.

घडलेला प्रसंग असा :

१९३६ साली बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर मी माझे मूळ गाव नरखेड येथे न जाता नागपुरासच थांबलो. आम्ही दोघेच भाऊ व दोघेही नागपूरलाच असल्यामुळे आईची इच्छा अशी की, वडील बंधूंना नोकरीमुळे शक्य नसले तरी मी निदान नरखेडला जावे. तिची प्रकृती बरेच दिवसांपासून कामचलाऊ झाली असल्यामुळे एवढीशीही मानसिक आणि शारीरिक अस्वस्थता तिच्याने सहन करवत नाही. आणि घरच्या गरिबीमुळे घरकाम तर तिला बरेच करावे लागे. तशातच मी येत नाही असे माझे पत्र गेलेले. तिला सहजच वाईट वाटले व तिने मला एक पत्र पाठविले. त्यात तिने जे लिहिले व जसे लिहिले ते वाचून मला लोकसाहित्याच्या निर्मात्याची भूमिका स्पष्ट कळली. ते पत्र त्यातला अनावश्यक भाग गाळून मी देत आहे. पत्र अगदीच लहान होते. त्यातली अशुद्धे सुधारली आहेतः

पत्र

श्री सांब प्रसन्न नरखेड

३०।५।३६

चि. बापू भय्यास आईचा कल्याण इच्छित आशीर्वाद,

पत्र लिहिण्यास कारण की, मला या दीड वर्षांत परमेश्वराने पाठीच्या रोगाने शोकसागरात बुडविले आहे. अशातही मी पोटाकडे पाहून आपले मन समाधान केले... तुम्ही दोघेही मला शोकसागरातून काढू शकाल असे जाणून लिहिले आहे.

तुझी,
आई

पुढे मला उद्देशून तिने चार ओळींची एक कविता लिहिली आहे. ती मी येथे दिली असती; पण एक तर संकोच वाटतो म्हणून आणि दुसरे ती आवश्यक नाही म्हणून टाळतो. परंतु त्या कवितेत माझ्या अशिक्षित आईने जे दोन-चार शब्द वापरले ते तिच्या संस्कारितेची साक्ष देतात. 'आत्मज', 'वपु', 'वार्धक्य' हे शब्द तिला जे आले ते तिच्या कुळाच्या देणगीने हे उघड आहे. कारण बालविवाह आणि कुळाची रीत यांमुळे पुस्तक तिच्या नजरेस पडले नाही, आणि 'ज्ञानेश्वरी', 'शिवलीलामृत' आणि 'तुळसी माहात्म्य' यांशिवाय तिला अजूनही काही वाचता येत नाही. असो.

तिचे हे पत्र येताच मी घाबरलो. याचे कारण असे की विहिरीतून पाणी ओढताच तिच्या मानेखाली रक्त आवळल्यामुळे पाठीवर एक गोळा उठलेला आहे. तो दुखत नसला तरी बेलफळा एवढा मोठा आहे. आणि तो तिथे बरेच दिवसांपासून होताही. मला अशी भीती पडली की तिचे हे 'पाठीचे दुखणे' बाढले असावे, आणि 'पोटाकडे पाहून' म्हणजे गरिबीमुळे ती सहन करीत असावी. मी लगेच गावाला गेलो. त्याच दिवशी रात्री आठाला पोचलो व पहिला प्रश्न अर्थातच तिला तिच्या दुखण्याबद्दलच विचारला.

ती म्हणाली, " माझ्या पाठीला काय झाले आहे असे ? "

" म्हणजे ? मग तू पत्रात लिहिलेस ते ? "

असे मी म्हणताच ती हसली व म्हणाली,

' म्हणे लेखक झालास व पुस्तके लिहिलीस. माझे पत्र तर समजत नाही ! "

भी घोटाळ्यात पडलो आणि आपल्याशीच विचार करू लागलो. थोड्या वेळाने माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला, आणि माझ्या आईबद्दल आदर दुणावला. सुमारे दीड वर्षांपूर्वी माझे मामा---म्हणजे आईचा आवडता पाठचा भाऊ – दिवंगत झाले होते. हे तिचे ' पाठीचे दुखणे ' आणि तशातही ' पोटाकडे पाहून ' म्हणजे आम्ही जी तिच्या पोटची मुले त्यांच्याकडे पाहून ती समाधान मानून घेत होती.

पाठ आणि पोट यांचे अलंकारिक अर्थ येथे अध्याहृत आहेत. कमीत कमी वाक्यांत जास्तीत जास्त अर्थ सुचविण्याची ही योजकता मोठी छान आहे, नाही ? तिच्या भावनेचा उमाळा व तिची शब्दयोजना ही दोन्हीही तिच्या वरील पत्रात दिसून येतात. आणि आटोपशीरपणा हा तर काव्यगुण समजतात. जे लोकवाङ्मय हजारो लोकांचे मनोरंजन करू शकते ते असेच असले पाहिजे व लोककवीची मनोभूमिकाही माझ्या आईच्या मनासारखीच असली पाहिजे याबद्दल माझी खात्री झाली. मला तिने लोकवाङ्मयाची गोडी लाविली त्याचे मर्म झाले तरी हेच असावे !

जे सांगावयाचे होते ते सांगून संपले. परंतु ओघानेच आणखी एक प्रसंग आठवला. तो अनाठायी होणार नाही असे वाटते.

माझ्या वडील बंधूंच्या लग्नाबद्दल मी एकदा माझ्या वडील अशिक्षित बहिणीला तिच्या सासरी पत्र पाठवून विचारले. त्याला तिने आपल्या अर्धवट व अशुद्ध भाषेत उत्तर दिले. त्या पत्रातले एक वाक्य खालीलप्रमाणे आहे :

'मुलगी जरी सुरेख नसली तरी आपण सर्व बहीणभावंडे किंवा आईबाप यांच्यात शोभेल अशी हवी. आपण सर्व असे आहोत की भाजी जरी घेऊ तरी पाव आण्याच्या ठिकाणी दोन पैसे गेले तरी हरकत नाही पण चांगली घेऊ. तर ही वस्तू म्हणजे वंशपरंपरेची...'

(यातील अशुद्धेच तेवढी सुधारली आहेत.)

हा दृष्टान्त देखील मोठा सुंदर, सूचक आणि योग्य आहे नाही का ?
लोकसाहित्याची जोपासना देखील ही अशी होते !

१६।११।३८

६०

महायात्रा

सध्याच्या घडीपुरते आपण असे धरून चालू या, की तुमचा, माझा, आपणा सर्वांचा देवावर विश्वास आहे. आपण सारे आस्तिक आहोत, देवाच्या अधिकाराची आणि मर्यादांची आपल्याला जाणीव आहे.

तथापि तुमची जर अशी कल्पना असेल, की देव भीत नाहीत, तर ती सपशेल चुकीची. संघटित, निश्चयी आणि प्रतापी अशा कोणत्याही मनसुब्याला देव भितात. पुराणांमधून हजारो वेळा माणसाच्या प्रतापाने देवांची सिंहासने हादरल्याचे दाखले मिळतात.

परंतु असे असले, तरी देव कधीही अयशस्वी होत नाहीत हे खरे ! याला अपवादात्मक असे एकही उदाहरण तुम्हांला शोधून सापडावयाचे नाही.

मांडवगडचे भवानीचे ग्रामदैवत मोठे जाज्वल्य होते. पुष्कळांच्या नवसाला पावले होते. भवानीचा दरारा आजूबाजूच्या पाच-पंचवीस गावांत होता. चांगला पीवरतनू बोकड देऊ करून कसलाही नवस केला तरी देवी पावत असे. तिच्या प्रसादाने पुष्कळांना मुले झाली होती. हजारो दुर्दैवी विधवांना आसरा मिळाला होता. हजारो ब्रह्मचाऱ्यांना खुराक मिळत होता. यापेक्षा आणखी काय हवे ?

पूर्वी असे सांगतात, की त्या देवीला नरबली लागत असे आणि तो तिला नियमाने पुरविण्यात येई. कोवळी अर्भके तिला फार आवडत. ती आपल्या प्रिय

भक्तांना दृष्टान्त देऊन पुत्र, भाऊ, सोयरा कोणी तरी मागत असे आणि स्वतःचे तोंड रक्ताने माखून घेत असे. देणाऱ्यांचा त्याग, घेणारांचे सुख ! रक्ताचा टिळा हा देवीचा प्रसाद. भिजलेली कट्यार हे देवीचे व्रत आणि मनोरथ पूर्ण होण्याची दृढतम 'आशा' हाच देवीच्या प्रसादाने मिळणारा मोक्ष !

आशा जगविण्यालाही किती सायास करावे लागतात !

इंग्रज सरकारच्या राज्यात जाहीरपणे माणसे मारता येत नाहीत. कारण हीच महादेवता सारी माणसे खाऊन टाकते. एखादा चुकून माकून उरलेला हविर्भाग भवानी देवतेला मिळावयाचा. पण तो मिळविताना देखील त्यात तिला किती किती कसब खर्चावे लागत होते. मँचेस्टरचे व्यापारी जितक्या शिताफीने हिंदुस्थानची माणसे त्यांच्या धंद्यासकट गट्ट करीत आणि तोंडावरचे अवचे रक्त संभावितपणे पुसून टाकीत त्याचप्रमाणे देवीलाही करावे लागत असे. देव झाले तरी परिस्थितीशी थोडेच झगडणार आहेत !

ह्या देवीच्या गावी म्हणजे मांडवगडला वर्षातून दोनदा यात्रा भरत असे. वर्षाकाठी मोजून ठेवलेला पैसा गरीब लोक देवीला अर्पण करीत असत. मग मुले उघडी असली तरी तिच्या कृपेचे पांघरूण आहेच ! रांडापोरे उपाशी मेली तरी पण मोक्षाची भूक शांत होणार ती ?

आणि तुम्हाआम्हांसारख्या काही लोकांनी देवीला बळी द्यायचे नाकारलेच तर ती येऊन किंवा आपले दूत पाठवून पोरे, बायका पळवीत असे. तिचे दूत हुशार असत. गावच्या साऱ्या विहिरींत ते विष टाकीत. लोकांना वाटे महामारी आली. देवीचे देऊळ दह्यादुधाने, भातारक्ताने भरून निघे. दोन्ही बाजूंनी फायदा. कधी कधी ते दूत असंख्य डास गावात सोडून देत. रात्री-रात्रीतून हजारो डबकी निर्माण करीत आणि बिचारे हवालदिल लोक हिवतापाने मरून जात. उंदरांची आणि घुशींची खास पैदास देवीने मंदिराजवळ केलेली असे. कधी दूत महारोगी बनून येत आणि सारा रोग पसरून चालते होत. करालवदना, लोलजिव्हा, चामुंडा, भवानी हजारो माणसे दरवर्षी या ना त्या निमित्ताने फस्त करीत असे. वरचा नैवेद्य तिला चटणीसारखा पुरे ! देवी तृप्त असे, लोक देखील तृप्त असत !

सणासुदी गोडधोड असते म्हणून मुले आनंदी असतात. संक्रांतीला तिळगूळ असतो म्हणून बायकांना हर्ष होतो. त्याचप्रमाणे महायात्रा जवळ येत चाललेली पाहून देवतेच्या मंदिराला कळा यायला लागली. मंदिर सुशोभित होऊ लागले. सतेज दिवे लावण्यात आले. घंटा रात्रभर बडविण्यात येत. टाळ, मृदंग आणि कोंबड्या-बकऱ्यांचा आर्त तडफडाट यांनी सारे वातावरण कसे दुमदुमून जाई. मोक्षाचे दरवाजे उघडे करण्यात येत. देवदूतांना मुद्दाम कामावर हजर राहण्यासाठी तंबी भरण्यात येई. लोकांना वेगवेगळी स्वप्ने पडत. स्वर्गाची द्वारे देवादिकांनी गच्च भरत. इंद्र, वरुण,

यांच्याशी तह होत आणि मिळतील ते बळी मुकाट्याने आपसात कसे वाटून घ्यावयाचे यासंबंधीचे लेखी करारमदार होत असत !

एरव्ही क्रोधसंतप्त असलेले भवानीचे मुखमंडल देखील या वेळी मोठे प्रसन्न, मोठे सुंदर, मोठे कोमल असे दिसत असे. शरद्ऋतूतील कमलेही त्यापुढे फिकी पडत. नितळ आकाशातील नक्षत्रेही मुखकमलांच्या कांतीने लाजून जात आणि लपत. कोवळी काकडी, पारिजातकाची फुले देखील त्या कोमलपणापुढे आत्मनिर्भर्त्सना करीत. त्या मुखाची अवर्णनीय शोभा काय वर्णन करावी ?

परंतु या खेपेला मात्र देवीचे मुखमंडल अगदी काळवंडून गेले होते. सर्व सुरळीत होऊनही जिकडे तिकडे औदासीन्याची सावली पडली होती. मंदिराच्या कळसावर घुबडे ओरडू लागली होती. कोंबडे, बकरे ओरडेनासे, मिळेनासे झाले होते. विहिरीत टाकायच्या विषाच्या पुड्या देवदूतांनी हरवून टाकल्या होत्या.

काय करावे हे देवीला आणि दूतांनाही समजेना. सण साजरा होत नाही. गरिबांना सणाचे काही वाटत नाही पण श्रीमंतांना कुळाचार असतात. स्वतःला नाही नाही तर नाही, पण ज्यांच्याशी करारमदार करून आपल्या सह्या आपण गुंतविल्या त्यांच्या गरजेपुरते निदान सात-आठशे नरबली तरी मिळायला हवेत !

हे नरबली आणायचे कसे ? हे अवघे झाले काय ?

नरबली कसे आणायचे हे देवीचे देवीने ठरविले आणि ती यशस्वी झाली !

जे घडले ते असे—

मांडवगडपासून सहा मैलांवर तहसिलीचे स्थान होते. तेथे ' जनसेवा-संघ ' स्थापन झाले होते. सर्व भेदभाव निमाले होते व हिंदू, मुस्लिम व काँग्रेस सर्वांचा एक दिलाचा मनसुबा ठरला होता, की मांडवगडच्या यात्रेतील मनुष्यसंहार थांबवावा. स्वयंसेवकांनी प्रतिज्ञा केल्या. .मेघगर्जनेपेक्षाही त्यांचे बोल अधिक निनादले. पितामह भीष्मांपेक्षाही घनघोर अशा आणाशपथा त्यांनी घेतल्या. स्वयंसेवकांच्या तुकड्या पडल्या. कोणी म्हणाले, " आम्ही सडका झाडून स्वच्छ ठेवू. उसाची चिपाडे देखील साचू देणार नाही. संत्र्यांची सालपटेही वेचून घेऊ. वीस हजार लोकांना यत्किंचितही त्रास पोचू देणार नाही. " कोणी म्हणाले, " आम्ही अवघ्या यात्रेकरूंना स्वच्छ पाणी पुरवू. नदीतले पाणी अगदी आरशासारखे स्वच्छ ठेवू. " कोणाला औषधे माहीत होती. कोणी रोगनिदान करण्यात पटाईत होते.

चौघांचा मनसुबा झाला. सर्व एकत्र जमले आणि निसर्गाविरुद्ध युद्ध करण्यास त्यांनी हात सरसाविले !

देवी घाबरून गेली. आता कसे करावे ? यात्रा हातातोंडाशी आली होती. क्षणक्षण जात होता. पृथ्वीची चाके फिरत होती. सूर्याचा प्रवास थांबत नव्हता.

युद्ध सुरू झाले !

लोकांना स्वप्ने पडली, की यात्रेला न आल्यास नापिकी होईल. वळी न दिल्यास मुलेमाणसे खाऊन टाकू. देवदूतांची अक्राळ विक्राळ तोंडे भेडसावू लागली. दरवर्षापेक्षा जास्त लोकांनी यात्रेला यायचा पण केला.

यात्रा भरली. दर वेळी यात्रेत जे घडते ते सारे घडू लागले. लाल लाल फुलांची दुकाने देवळांच्या पायऱ्यांवर गर्दी करून बसली. हजारो बैलगाड्यांनी गावगुलाल आकाशात उडविला. आजूबाजूची शेते माणसांनी गजबजली. नदीच्या काठीच देहधर्म सुरू झाले. भटाऱ्यांची दुकाने उघडली. रस्त्यातली धूळ त्यात जाऊन पडू लागली. भजी, चकल्या, शेव यांची संख्या आणि ऐवज वाढू लागला. देवीच्या मंदिरात भाविक बायका जमल्या. देवभोळे त्यांच्याकडे पाहू लागले. कारण आत रीघ नव्हती. बायका नवी लुगडी नेसल्या. मुलांनी अंगडी टोपडी घातली. माणसांनी नवा पोषाख चढविला. यात्रेची मिठाई मणाने खपू लागली. नवस पूर्ण झाले.

दूत आले. त्यांनी युद्धाची जय्यत तयारी केली. डबक्यातून, विहिरीतून, अन्नातून विष कालविले गेले. सारी सांगता यथास्थित झाली.

बिचारी सखू ! आपल्या लहानशा अर्भकाला घेऊन आली होती. ती गाडीखाली उतरली. मुलाने धूळ गेल्यामुळे डोळे चोळले, शिंका दिल्या. त्याच्या हाती मिठाईचा पुडा देऊन ती बिचारी देवीच्या देवळात जावयास निघाली. मुलगा तहानला. 'आई, पाणी...' ही त्याची हाक आईचे हृदय पिळवटू लागली. तिने आजूबाजूला शोधले. वाळवंटात डबके होते. त्यातला कचरा हाताने दूर केला. तिला तसे करू नको असे सांगायला तेथे कोणीही नव्हते. मूल पाणी प्याले, ओकले आणि त्याच्या जिवाचे सोने झाले. त्याला महायात्रा घडली !

बांगड्या भरणाऱ्यांनी मऊ मऊ हात दाबून घेतले. टारगटांनी अंगस्पर्श अनुभविला. पुजाऱ्यांनी सर्व प्रकारची फुले पाहून घेतली ... कोरांटीची, धोतऱ्याची, गुलबाक्षीची !

आणि सर्वांत नवलाईची गोष्ट अशी, की प्रतिज्ञा करून मेघांना घाबरविणारे भीष्मांचे वंशज तेथे कोणीही दिसत नव्हते. वाळवंटात त्यांचे झेंडे फडकत होते. फडकी फडफडत होती. वाऱ्याने फाटून गेली होती, धुळीने मळली होती. त्यांना वाली नव्हता !

करालवदना चामुंडीचे सर्वच डाव यशस्वी झाले होते !

हजारो लोकांच्या जिवाचे सोने झाले होते. त्यांना महायात्रा घडली होती !

आता तुमची अशी कल्पना असेल, की महाकाली प्रसन्न झाली असेल, तिचे मुखमंडल कमलासारखे सुंदर, नक्षत्रासारखे सतेज आणि पारिजातकासारखे कोवळे, हसतमुख झाले असेल !

पण आपण ज्या गोष्टी नक्की होतील असे म्हणतो त्या होतातच का ? हटकून खोट्या ठरतात !

देवीच्या देवळात गेलेला आणि जिवाचे सोने न झालेला प्रत्येक यात्रेकरू सांगत होता, " महाकाली रडत होती. तिच्या डोळ्यांतून टपटपा आसवे गळत होती. घामाने शरीर चिंब झाले होते. गरिबांच्या घामाने भिजलेला पैसा देवीच्या पायांजवळ पडला की तिला शहारून येई. गरिबांच्या रक्ताने, मांसाने पोसलेला पोटचा गोळा एका ओकारीसरसा पटकन मेलेला पाहिला आणि दूतांनी खबर दिली, की तिला हुंदका येत असे. "

हे रडणे स्त्रीसुलभ नव्हते. वादळापूर्वीची ती शिंपण होती. पुढल्या प्रलयाची चिन्हे तर नव्हत ? पुढे काय होणार ?

ती पाहा ! ती पाहा, मंदिरातील घंटा वाजत आहे. तिच्यातून स्पष्ट ध्वनी निघत आहे. ऐकून घ्या. ' आजच्या यात्रेचा संदेश ! माझ्या भक्तांनो, यात्रेतील तुमची मुले या ना त्या स्वरूपात तुम्हांला परत मिळतील. माझी भूक कशाने भागवावी हे आता मला नीट उमगले आहे. मी यापुढेही नरबली भक्षण करीन. रक्तामांसाने माझी भूक भागवीन पण ती भूक तुमच्या रक्ताने नव्हे. आशीर्वाद...! '

देवीचा नृसंहार बंद पडला नाही. परंतु त्यानंतर मांडवगडच्या आसपास भाकरीला भाकर म्हणणाऱ्या, कामाला काम म्हणणाऱ्या, एकाही प्रामाणिक माणसाचा, बाईचा, अर्भकाचा बळी देवीने घेतला नाही. स्वतःची भाकरी स्वतःच्या घामात बुडवून ते सुखाने खाऊ लागले आणि सुखाने राहू लागले.

महाकालीला त्यानंतर एकच गोष्ट सहन होत नसे आणि ती म्हणजे मेघगर्जनेपेक्षाही जास्त निनादणारे शब्द, नुसतेच शब्द ! ते शक्य तितके कमी ऐकू यावेत हाच तिचा प्रयास !

२२।२।३९

६१

भाकरीची गोष्ट

समोरच्या शेतात जो मांडव दिसतो, त्यालाच ' खळे ' असे म्हणतात. उन्हाळ्यात खेड्यातून आगीची फार भीती असते. गरिबांच्या झोपड्या गवताच्या असतात. पेटल्या तर गाव पेटते. म्हणून शेतातील कडबा, कुटार घरी नेत नाहीत. सायंकाळी शेतकरी जागली येतात. चांदण्या रात्री त्या मोकळ्या मैदानात मोठी मौज वाटते; परंतु ती कुणाला ? तुमच्या-माझ्यासारख्यांना, जे इथे विश्रांतीसाठी येतात त्यांना !

परंतु या सर्व फालतू गोष्टी मी तुम्हांस सांगत आहे. तसे सांगावेच लागते. लेख किंवा व्याख्यान सुरू करताना आरंभीची काही वाक्ये निरर्थक आणि निःसत्त्व लिहिण्याचा प्रघात पडला आहे.

हं, थांबा ! आता अगदी हळू, जपून पावले मोजीत चालावयाचे. हे पाहा ते शेत आले. ही त्याची शीव ! मातीची ढेकळे पायाला लागतात होय ? बघा, घसरू नका. किंचित देखील आवाज होऊ देऊ नका.

का नको ? तुम्हांला कारण सांगू ? कारण एकच. तुम्ही पाहता हे त्या दोघांना कळू नये, ही माझी अपेक्षा. मला माहीत आहे, इथे तुम्ही हालचाल केली, स्वतःचे अस्तित्व जाणविले, तर तुमचे नुकसान व्हायचे नाही. क्रौंच-मिथुनाचा संयोगभंग करणाऱ्या निषादाला शाप द्यायला इथे वाल्मीकी यायचा नाही.

तथापि, वैदिक धर्माच्या आज्ञेने तुम्हांला पाप लागणार नसले, तरी माणुसकीच्या धर्माने तुम्ही अपराधी ठराल आणि त्या अपराधाला प्रायश्चित्त नाही. तुमच्या हालचालीने ती दचकली व तिचे लक्ष जर तुमच्यावर गेले, स्वच्छ कपडे घातलेल्या एका शहरी माणसाने आपल्याला अशा स्थितीत पाहिले, हे जर तिच्या लक्षात आले तर—

ती काय करील ? करणार काय ? परंतु तिच्या हृदयाला एक जखम होईल. त्यातून वाहणारा रक्ताचा पाट तुम्ही पाहिला तर वेशुद्ध व्हाल. नका ते पाप करू !

अरे, हे काय ? तुमच्या डोळ्यांत ही सहानुभूती कुठून व कधी आली ? तुम्ही माझ्याबरोबर यायला निघालात तेव्हा फक्त जिज्ञासा होती तुमच्या मनात ! आताच ही नवी पैदास कशी आणली ? पूर्वजांची निष्क्रियतेची ही मिळकत घेऊन तुम्ही या शेतात पाऊल का घातले ? ज्याला काही करायचे नसते, तो सहानुभूती, दया दाखवितो. छे, छे, ते सारे काढून टाका. तुमच्या सहानुभूतीची गरज नाही इथे कुणाला. एखाद्या मरतुकड्या कुत्र्याला, लुळ्या-पांगळ्या भिकाऱ्याला किंवा देशासाठी मरणाऱ्या महाभागाला तुम्ही तीच, त्याच ठशाची सहानुभूती दाखविता व तिच्यामुळे एकही प्रश्न सुटत नाही. काढून टाका ती डोळ्यांतून !

चला ! पुढे व्हा ! दचकू नका असे. तुम्ही आता असे एक दृश्य पाहाल की, जे तुमच्या मनाला विस्तवासारखे चटके देईल. नवखे आहात. कच्चे दिसता. आपले डोळे स्थिर करा. तुमच्या डोळ्यांवर तुमचा विश्वास असू द्या. फार दिवसांपासून तुम्ही ती सवय सोडली आहे, जे पाहता ते कबूल करीत नाही.

तो झोपाटा दिसतोय. तो, त्या फटीतून पाहा. त्याच्या आड ती आणि तो दोघेही आहेत. पाच मिनिटांत ते बाहेर येतील. तो इथेच राहतो. त्याच्या हाती थोडी सत्ता आहे. तो इथला नोकर आहे की मालक, हे मी सांगण्याचा तुमचा माझा करार

नव्हता. तो सुंदर आहे की कुरूप दिसतो; तरुण दिसतो की म्हातारा आहे, हे तुमचे तुम्ही पाहून घ्या. देवाने डोळे दिले आहेत तुम्हांला.

आणि ती ? तिच्याबद्दलही तुम्हीच कल्पना करून घ्या. ती बाहेर येईल. थोडा वेळ थांबेल. कपडे नीट करील व सामान घेऊन चालती होईल. अगदी झपाझप पावले टाकील. पक्षीण जशी एकाच भरारीत घरटे गाठते.

तुम्ही कल्पना कराल, ती तरुण असेल, सुंदर असेल, गोरी नसली तरी सतेज असेल; परंतु शहरच्या कवींनी तुमची ही केलेली फसवणूक तुमच्या कामी पडणार नाही. तुम्ही असल्या बुरसलेल्या मवाळ कल्पना तिच्या बाबतीत करू नका. तिला तीन मुले आहेत. तिच्या हातापायाची चिपाडे झालेली आहेत. तरुण आहे की म्हातारी देव जाणे ! तुमच्या जवळून ओझरती गेली, तर तुम्हांला तिच्या अंगाची घामट घाण येईल. तिचे केस पिंजारलेले आहेत. तिच्या कपड्यांतून तुम्हांला तिचे कृश, खरुजल्या-सारखे अंग दिसेल—

—जे अंग तिने दोन पायल्या ज्वारी आणि दोन कडब्याच्या पेंड्यांच्या मोबदल्यात, काही वेळासाठी दुसऱ्याचे होऊ दिले आणि जे त्या खळेवाल्याने स्वीकारले.

मी तुम्हांला आता पुढचे शक्य तितक्या मोजक्या शब्दांत सांगतो. आता ती घरी जाईल. ती पाहा, ती निघालीच – जरा बाजूला व्हा – या ढिगाऱ्याच्या आड लपा. तिच्या मनात विचार करायला आता ठिकाणच राहिले नाही. घरी गेल्याबरोबर ती ज्वारी निवडून दळील आणि आज तीन दिवसांपासून अर्धपोटी असलेल्या आपल्या मुलांना खाऊ घालील. तिलासुद्धा भूक लागली आहे. तीन दिवसांची ती उपाशी आहे. तुम्ही हौसेने उपवास करता. या सक्तीच्या उपवासाची तुम्हांला कसली जाणीव राहणार ?

दुसरा दिवस उजाडल्यावर ती काय करील, तिचे काय होईल, ती मुले मरतील की जगतील, याचा तिनेच विचार केला नाही, तर तुम्हा-आम्हांला उगीच पुळका का ?

तिला काही वाटत नसेल, असे मात्र समजू नका, परंतु तिचे वाटणे वेगळे आहे. हे पोट भरण्याकरिता, या एका भाकरीकरिता जसा अंगातला सगळा घाम, अवघे रक्त, साऱ्या भावना, सारी नीतिमत्ता, सर्व द्यावे लागते, त्यातच हेही एक ! व या सगळ्या गोष्टी दिल्यानंतर एक भाकर, ढसढसा प्यायला पाणी, लोकांना दिसावीत म्हणून वस्त्रे, व निजायला जमीन, एवढे मिळते, हे तिला ठाऊक आहे व म्हणूनच तिची विचार करण्याची दिशा ही अशी आहे.

तिची एकटीचीच ही दशा आहे असे नव्हे. तुम्हांला किती उदाहरणे देऊ ? हे इमारतीचे तुमच्या शहराचे बांधकाम पाहा, ही संध्यांच्या बाजारातील रात्रीची पाळी पाहा, डोळे-कान शाबूत ठेवा व ही भाकरीची गोष्ट ऐका !

एक काम कराल का ? घरी गेल्याबरोबर हे सारे विसरून जा. नाहीतर काही नवीन पाहिले, ऐकले, म्हणून लिहाल आणि कागद खर्च कराल. लोकांची सहानुभूती मिळवावी, म्हणून स्वतःची बुरसलेली काव्यशक्ती शिणवाल. मघाशी तुमच्या डोळ्यांत ती भावना होती, म्हणून भीती वाटते. तुम्हांला माणुसकीची शपथ आहे.

हे पाप करण्यास सरसावलात तर तीच मघाची मरतुकडी बाई तुम्हांला कुठेतरी गाठून जबाब बिचारील आणि तिच्या डोळ्यांकडे पाहूनच तुमची गाळण उडेल; परंतु--

तुमच्याकडे बघण्याचेही त्राण तिच्यात राहिले नसले तर ? मग तुम्ही सुटाल आणि असेच तुम्ही आजवर सुटत आला आहात, नाही तर.....!

१२।४।३९

६२

अर्पण

अगदी नाजूक, मंद असा प्रकाश माझ्या डोळ्यांच्या झाकणांवरून हेलावल्याचा मला भास झाला. मी हळूच डोळे उघडले, डोळ्यांत झोप तशीच होती.

माझ्या उजव्या दंडावर विसावून झोपलेली कमल हलकेच आपल्या हातावर टेकून माझ्याकडे अगदी स्थिर दृष्टीने, तृप्त लोचनांनी पाहत आहे असे मला दिसले. तिच्या शांतपणाला उपमा नव्हती. मघाशीच तिने मला झोपविले व सारी रात्र ती दिव्याची वात सरकावून माझ्याकडे पाहत बसली असावी. मला जी जाग आली, ती तिच्या नेत्रज्योतीच्या प्रकाशानेच तर नसेल ?

उशाशी थोडया अंतरावर फुलवात मंदपणे तेवत होती. तिच्या प्रकाशलहरी हळूहळू सर्व खोलीभर पसरत आणि विचित्र अशा संवेदना निर्माण करीत. उदवत्तीचा धूर त्या उजळ अंधारात तरल वलये उत्पन्न करीत विलीन होत होता.

ते सगळे फार फार सुखद व स्वप्नमय होते ! सगळे मनोभाव डोक्याशी आणून, अवघ्या आनंदलहरी पापण्यांवर थोपवून माझ्याकडे तिने आपल्या दृष्टीचा वेध का लावला होता ? तिचे काहीतरी हरवले होते का ? ती काय शोधीत होती ? नितळ, स्पर्शसुखद, मृदू अशा तिच्या शरीराच्या गाभाऱ्यात दडलेले तिचे हृदय ! मला ते दिसत नव्हते असे थोडेच आहे ? लाल लाल अग्रे असलेल्या चमेलीच्या टपोर कळ्या ओल्या झिरझिरीत कपडयाने झाकल्या, तरी त्या दिसतात ना ?— उलट सुंदरच दिसतात !

कमल माझ्याकडे का पाहत होती ?

'तुम्ही जागे झालात ? धक्का लागला माझा ?'
'छे ग, पण तू झोपत का नाहीस ?
'तुम्ही झोपेतदेखील माझ्याचजवळ राहता किंवा नाही, हे मी पाहत होते.'
'बरं मग ... ?'
'तुम्ही झोपा पाहू ? — मिटा डोळे !'

माझी झोपायची मुळीच इच्छा नव्हती. तथापि मी डोळे मिटले. मला पुरेशी ऊब मिळाली. माझा श्वासही दबल्यासारखा वाटला. मनालाही तिच्या आज्ञा कळत होत्या आणि नंतर हळूच पुनः माझ्या छातीपर्यंत पांघरूण ओढले गेले. नीरव शांततेच्या वेळी झाडावर हळूच पाखरांचे पंख फडफड व्हावेत; नाजूक चिवचिव, आणि पुनः सर्व लोपले जावे !

ती फुलवात मंदपणे तेवत होती !

आणि हे असले तिचे पाहणे आजचेच नव्हते. श्रांतपणे मी झोपलो की, तसेच माझ्या निःस्तब्ध चेहऱ्याकडे पाहण्यात तिने रात्रीच्या रात्री घालविल्या होत्या. तो तिचा एक मनोविलास, एकमेव विसावा, जागेपणीची स्वप्नमधुर झोप होती.

असले कसले बंध होते तिच्यात नि माझ्यात ?

परंतु मला उत्तर मिळावे, म्हणून हा प्रश्न मी विचारला नाही. माझ्या आयुष्याच्या सुरवातीपासून मी हा प्रश्न विचारीत आलो आणि अंतापर्यंत कदाचित मी माझ्याच मनाला विचारीत राहीन. तथापि त्याचे उत्तर मला मिळू नये, हीच माझी अपेक्षा आहे. डोळ्यांवाटे माझ्या सर्वस्वाची ती साठवण करीत असली की मला किती विसावल्यासारखे होते, याची मला पुरेपूर जाणीव आहे. तिच्या मंद निःश्वासाचा स्पर्श माझ्या कपाळाला झाल्याबरोबर कोणत्या संवेदना माझ्या शरीराला कुरवाळतात, हेही मलाच कळते आणि हेच सुख पुनःपुनः मिळावे, म्हणून मी तो प्रश्न माझ्या मनाला विचारतो. या गोष्टी मी माझ्या मलाच सांगेन व माझ्या मीच ऐकेन.

लग्नापासूनच मी तिचा होतो असे नव्हे. ते एक एकत्र यायला निमित्त झाले. मनोभावाने आयुष्यभर पूजा करण्याचा संकल्प केला, त्याचे हे फळ, असेच कमल म्हणाली होती. आज तिला माझे वेड होते; याचा मला अर्थतरी लावता येतो. आज तिच्यात कमालीचा बदल झाला आहे. तिची अंगकांती सुगीतल्या धान्यासारखी सतेज आहे. तिचे अवयव लतिकेसारखे सुकोमल आहेत. तिचे डोळे रत्नज्योतीसारखे उज्ज्वल आहेत. तिचे सुंदर शरीर व हर्षनिर्भर विशाल हृदय याची मोहिनी माझ्यावर पडलेली आहे. कदाचित त्यामुळे आज मी तिचे ऐकत असेन, मी स्वतःला बांधून घेतले असेन व त्या बंधनात माझे मनही आनंद मानत आले असेल—तिला वेडी वेडी म्हणूनही मी तिच्या आज्ञा यामुळेच कदाचित् पाळीत आलो असेन !

परंतु ज्या वेळी ही फुलवेल नुसती अंकुरित झाली होती, त्या वेळी ?

तेव्हा तर मला हेही कळत नव्हते की, तिच्या शरीरात, तिच्या कांतीत, तिच्या नेत्रांत काही विशेष आहे. तिचे हृदय म्हणजे तिच्या पांढऱ्या शुभ्र दातांतून ओसंडणारे हास्य, असाच माझा समज होता; मनोविलास म्हणजे हवे ते, हवे तसे खेळणे व हसणे हाच होता.

तरी देखील तेव्हा तिने मला ताब्यात घेतले होते. त्याकरिता तिला कधीही सक्ती करावी लागली नाही. वायूची लहर जशी हवी तेव्हा तरळते व तिच्याबरोबर सुगंध वाहत जातो, तसेच तिचे व तसेच माझे जगणे !

मग तेव्हाच्या तिच्या माझ्याबद्दलच्या वेडाचा अर्थ काय?

ती आठ एक वर्षांची होती. एकदा तेव्हा तिला असा संशय आला की, मी पूर्वीसारखा तिच्यात मिसळत नाही, जास्तीत जास्त वेळ तिच्या सहवासात घालवीत नाही. तो संदेह तिला असह्य झाला होता. मला काहीतरी वळण लावणे तिला अवश्य वाटत होते. कसलातरी धाक, कसलीतरी जरब मला बसावी, अशी तिची इच्छा होती; पण ते काम किती कठीण ? कवीच्या भाषेत सांगायचे म्हणजे, ते फुलपाखराच्या पंखावरची धूळ पुसण्यासारखे होते !

तिने मला एकटे गाठले. माझ्या सदऱ्याचे टोक धरून मला फरफटत ती घेऊन गेली. तिच्या एका मुठीत काहीतरी वस्तू होती. ती एका झाडाजवळ मला घेऊन गेली. ते झाड कसले होते हे त्या वेळी मला कळले नाही. ते शेवरीचे झाड होते. त्यावर असंख्य पाखरांची घरटी फुललेली होती. ती पाखरे सायंकाळी किलबिल करीत आणि निजून जात. सकाळी उठत व हवेवर उडत जात. नुकतीच जन्मास आलेली त्यांची ती पिले, ते लालबुट गीद, असा भास व्हायचा की, त्या शेवरीची लाल फुलेच त्या घरट्यात पोसली जात आहेत.

ती क्षणभर थांबली; नंतर शांतपणे तिने माझ्याकडे पाहिले.

'तो तिथला दगड घे.'

मी तो दगड निमूटपणे उचलला.

'हा खिळा घे.'

मी ते देखील केले. तिने एकदा झाडावर पाहिले. जणू त्या चिमण्या जीवांना साक्षीला बोलावीत होती ती !

'हे पाहा राजा ! तू माझा आजपासून पक्का दोस्त ! आजपासून तू माझ्याशिवाय कुठे खेळायचं नाहीस. कुठे जायचं नाहीस. तू मला हवा आहेस. मी तुझ्यासाठी काहीही करीन. मैत्री मात्र तोडायची नाही. घे. हा खिळा त्या झाडाला ठोक व शपथ वाहा—'

माझ्याने शक्य होईल तेवढ्या उंचीवर मी तो खिळा अगदी पक्का ठोकला. बाजूला जवळच एक विहीर होती, त्यात तिने तो दगड टाकून दिला—व नीट बुडाला किंवा

नाही, याची खात्री करून घेण्याकरिता ती बराच वेळ विहिरीत डोकावत राहिली. असले दगड तरंगत असतील का?

'आणि राजा! आता तुला माझी गट्टी तोडता यायची नाही. तुला आता माझं एकाव लागेल. तुला गडी फू करायची असेल, तर हा दगड काढून द्या व तो खिळा हातांनी उपटून द्या!'

एखाद्या न्यायाधीशाप्रमाणे तिने मला निकाल सांगितला व त्याबद्दलची शिक्षाही सुनावली!

'हं, चल माझ्याबरोबर. जाऊ या आपण.'

मी निमूटपणे तिच्या मागून चालू लागलो!

हा कसला विधी होता? याला कोणत्या धर्मशास्त्राने संमती दिली होती? तो कुणी शोधून काढला? ज्या वेळी धर्म नव्हता, बंधने नव्हती, त्या वेळी उभी मानव जात असलेच विधी करीत आली असेल का? अनंत कालापासून, युगयुगांतरी मानव-जातीने आपली हृदये याच — असल्याच विधींनी एक दुसऱ्याला अर्पण केली असतील का? तसले काहीतरी अधिष्ठान त्याला असलेच पाहिजे. एरवी त्यात एवढे अद्‌भुत, अक्षय सामर्थ्य कसे येणे शक्य आहे?

नंतर बरोबर दहा वर्षांनी विवाहाच्या विधीचे मंत्र भटजी म्हणत असताना, तिने माझ्याकडे पाहून हसल्यासारखे केले व पुनः एकदा तिने तो निकाल आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी सुनावला.--तेव्हा, तेव्हाच ती मला सुंदर दिसली, तिच्यातला विलोभनीय बदल मला त्याच वेळी जाणवला व तिचे सारे व्यक्तित्व माझ्या डोळ्यांत भरले!

मला अजूनही नेहमी भीती वाटते. असे वाटते, मी कुठे गेलो, तिच्या मनाविरुद्ध माझ्या हातून काही घडले तर? अजून देखील ती मला कदाचित त्या विहिरीतील तो दगड काढायला लावील व तो खिळा उपटून आणायला सांगेल.

तिच्या कायद्याचे, निर्बंधाचे उल्लंघन करून समजा मी तो खिळा काढला तर?

त्या निष्पाप पाखरांच्या साक्षीने एकमेकांना दिलेले ते वचन निष्फळ होईल का? तिचा कायदा नाहीसा होईल का? हृदयाचे मोल देऊन तिने माझ्यावर जारी केलेल्या तिच्या त्या निर्बंधाचे बंध कधीतरी ढिले होतील का?

हे कमलचे वेड! स्वतःचे असेल नसेल ते सर्वस्व दुसऱ्याच्या स्वाधीन करून, त्या मंगल ठेवीची राखणदारी करीत फुलवातीच्या स्निग्ध प्रकाशात तृप्त डोळ्यांनी—त्या नेत्रज्योतींनी आपल्या प्रियकराला ओवाळीत बसण्याचे हे तिचे हवेहवेसे वाटणारे वेड–हेच वेड मला लागले—हेच वेड अवघ्या जगाला लागले तर?

या प्रश्नाचे उत्तर देण्याचे सामर्थ्य फक्त कमलमध्येच आहे!

३।९।३९

६३

तेवढा एक तास

छे, छे ! ती गोष्ट मी मनात देखील आणता कामा नये ! माझ्या भोवताली बसलेली ही माझी तरुण मित्रमंडळी मला सारखी हिणवीत आहे. त्यांना दुसरा विषय बोलायला नाही. तोच विषय ते तीन दिवसांपासून चिघळत आहेत. दुसरे किती तरी विषय आहेत विवाद करायला. युद्धाच्या गोष्टी मोठ्या मनोवेधक असतात म्हणे,–त्यांना त्याची क्षिती नाही. देशाच्या गोष्टी क्षोभक आणि स्फूर्तिदायक असतात; पण त्या देखील त्यांना व्यर्थ वाटतात. ते मला परवापासून सारखे म्हणत आहेत– 'तू चूक केलीस. तुझी भीती व्यर्थ होती. असली संधी कधी येत नाही. फुकट चालून आलेली ही अमोल वेळ तू घालविलीस. कसला भ्याड तू !'

आणि म्हणून मला वाटते की, माझे मन देखील तीन–तीनदा ती गोष्ट मनात आणल्याने मला म्हणेल, ती संधी सोन्यासारखी होती. तुझ्या सर्व कामना पूर्ण झाल्या असत्या. मग ही समोरची ध्येये आपोआप बाजूला सरतील, विरतील व एकच गोष्ट मला सुचेल; तो क्षण मी का सोडला ? आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट, कुणाकुणाला त्यातले अक्षर देखील कळले नसते.

हे शेवटचे वाक्यच सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. माझे सवंगडी मला म्हणतात, " लेका, कसा रे तू ! तुला कसलाही प्रतिबंध झाला नसता. आम्ही जर त्या दुकानात गेलो असतो तर..."

तर त्यांनी काय केले असते ? दुकानात वस्तू विकत मिळतात. त्यांतला हवा तो जिन्नस घेतला असता. पैसे मोजले असते व घरी आले असते. मी तेच केले. लोकरीत अशीच आहे. मी त्या दुकानात गेलो. मला जी वस्तू हवी ती विचारली व ती मला मिळाली. मला शंका होती; एवढेसे ते गाव; आता कुठे तिथे मोटारी उभ्या राहू लागल्या होत्या. आठ-दहा दुकाने, मित्राच्या लग्नाकरिता कालच इथे पाय ठेवला; ओळख नाही व आजच काम पडले. केशराचा डबा सामानात आला नाही; उद्या मेजवानी; जिलबीचा बेत; स्वयंपाकी रात्री आठाला सुरवात करणार; कोठी हुडकली; सायंकाळचे पाच वाजले. केशर सापडेना. सीताकाकूंना विचारले; त्यांनाही आठवेना; अण्णासाहेबांनाही विचारायला कमी केले नाही. तो काय, एकदम ते माझ्या अंगावर ओरडले. म्हणाले, " तुम्ही कसली व्यवस्था ठेवणार ! हे तुमच्या कॉलेजात थोडेच शिकवितात ! –' सिग्रेट्स ' नसशील विसरलास—इ."

तथापि त्यांचे व्याख्यान ऐकायला वेळ कुठे होता ? व उपयोग तरी काय ? कपडे घातले. नवेच होते. लग्नाकरिताच आलो होतो. जे शोभेल व इतरांना चांगले

दिसेल तेच आणले होते. धोतराचा काचा मारला आणि केसांवर हात फिरवीत बाहेर पडलो.

चार-पाच दुकाने धुंडाळली. कुठे तंबाखू, कुठे गूळ, कुठे शेंगदाणे ! पण केशर कुठे मिळणार ? त्या गावच्या संस्कृतीत केशराला वावच नव्हता जसा काही ! सगळे दुकानदार माझ्याकडे पाहायला लागले. केशर मागतो आहे हा. तो माझा कोट. ती केसांची ठेवण. अर्थात मी कुणीतरी परका, श्रीमंत होतो.

ते एकच दुकान असे निघाले, जिथे माझ्या प्रश्नाला ' आहे, ' असे उत्तर मिळाले, व एक प्रश्न विचारला गेला, ' कसे हवे, उंची की साधारण ? '

मला विस्मय वाटला. क्षणात मी दुकानातल्या सर्व वस्तू पाहून टाकल्या. काही फार मोठे दुकान नव्हते ते. अगदी साधारण पण सामान पुष्कळ. पोती, डबे, पिपे, सगळे भरगच्च भरलेले ! एक काचेचे कपाट, मळलेले, धुरकटलेले. त्यात सिगारेट्स, साबण, तेल ! हे सगळे इथे खपते ? अर्थात हा प्रश्न मनाला होता. डोळे दुकानदाराकडे लागलेले. ती मूर्ती ! ते भिजलेले धुरकट डोळे, ते बुटके स्थूल शरीर, पिढीजात मळके धोतर, उघडे बेडौल अंग, दाताची कवटी चंपकलेली; दात बरबटलेले, चष्मा व तेलकट चेहरा ! दोनच वस्तू स्वच्छ होत्या; हातातील सोन्याचे कडे व गळ्यातली कंठी. कमरेचा चांदीचा ' करदोडा ' धरायचा नाही. डोळ्यांतून कसले निर्बल भाव दिसत होते न कळे ! असे वाटे, या माणसाचा अपराध केला, तर याला सूड घ्यावासा वाटेल. त्याची खुषामत केली तर तो रागावेल. हसविले तर डाव धरील; रडविणे शक्य नाही. भिवविले तर भिईल, पण पुनः मनातून दंश कायम !

पुनः त्याने तो प्रश्न विचारला- " कौनसा चाहिए ? कीमती या साधारण ? "

" मला दोन्हीही पाहू द्या. "

त्याने कपाटातून एक डबा काढला व त्यातले केशर दाखविले. " हे साधारण, यापेक्षाही चांगले आहे, पण किंमत फार पडेल. चार रुपये तोळा. "

लग्नाचा प्रसंग. पैशापेक्षा बाकीच्या गोष्टी पाह्यच्या असतात. वधूवरांपेक्षा इतरांचीच मिजास संभाळावी लागते. ऐपतीपेक्षा प्रतिष्ठेला किंमत द्यावी लागते.

" मला हे नको. चांगले हवे व पाच तोळे हवे. "

त्याला बरे वाटले. त्याचा चेहरा निवला. मी देखील थोडा शांत झालो. मला आता त्याच्याकडे पाहवले.

" या, बसा. " मी एका पेटीवर बसलो.

" अरे, जरा बाहेर आवो. " आतून त्याला प्रत्युत्तर मिळाले. दार उघडले गेले. एक वीस-बावीस वर्षांची स्त्री बाहेर आली. मुलगी असेल कदाचित – पण ही विशिष्ट आज्ञाधारकता ? बायको असेल – पण मग इतके लहान वय ? ती आली. मला पाहताच तिने डोक्यावरचा पदर किंचित कपाळावर ओढला.

"बाबूको केशर चाहिए। उपरके बकसमे है! यह ताली लो। जितना उन्हे चाहिए उतना नाप दो। रुपया बजाकर लेना। मैं अभी ठैर नहीं सकता। मुझे जानाही होगा। लोटा कहाँ है?"

ती बहुधा सायंकाळच्या विधीची नोटीस असावी. तो निघून गेला. तिने माझ्याकडे पाहिले. माझ्यासारख्याला त्या पेटीवर बसविलेले तिला आवडले नाही. किंचित रोषाचे भाव तिच्या निमगोऱ्या पाणीदार चेहऱ्यावर उमटले. तिने ओठ मिटले, उघडले. सारे क्षणभरच; कारण तिला वस्तू द्यायची होती. दुकानातल्या गिऱ्हाइकाला घरच्या भानगडीत पडू देणे तिला पसंत नव्हते.

"आप गद्दीपर बैठिएगा। मैं अभी लाती हूं। आपका समय बरबाद नहीं होगा।"

मी तेथेच बसून राहिलो. ती आत गेली. ज्या दारातून ती आत गेली, तिकडे सहज मी पाहत होतो. दुकान म्हणजे घरचाच भाग. मालक पैसेवाला दिसतोय; पण राहणी... वगैरे जे रिकामपणी सुचतात, तसले विचार माझ्या मनात आले व दुसऱ्या क्षणी ती परत आली. जिन्याच्या पूर्ण पायऱ्या ती चढली होती किंवा नाही देव जाणे! किंचित संकोचाने तिने माझ्याकडे पाहिले.

"आपको उपर चलना होगा। बाकस यहाँ लाना मुष्किल है। मेरेसे नहीं आएगी। क्षमा कीजिएगा।"

मला तर चीडच आली. तथापि अडलेला नारायण होतो. शिवाय तिने गादीवर बसायला सांगितले होते. शिवाय पेटीही भारी असेल. घरवाल्याची शिस्त किल्ल्या-कुलुपांची असेल व केशर नसले, तर पुनः अण्णासाहेबांच्या शिव्या!

मी निमूटपणे उठलो. ती भराभर जिना चढून गेली. माझे काम लवकर व्हावे, म्हणून तिची ती तत्परता; तिचे वय व तिची सभ्यता. तिन्ही गोष्टी मला दिसताच माझा राग बराच निवाला होता. वर जाईपर्यंत त्याचा मागमूसही राहिला नाही. किंमती वस्तू कडीकुलुपात ठेवावयाच्या असतात. तिच्या सौंदर्याकडे पाहण्याची माझी मनःस्थिती नव्हती; पण तिची अपरिचित सभ्यता व सौजन्य मनात भरले. मला थोडे निःसंकोच वाटले. जिन्याच्या पायऱ्या चढताना मी अस्पष्ट अशी शीळ घालून गाणेही सुरू केले होते. थोडा चेहरा चढविला. शीळ घातली की आपण रुबाबदार, बेफिकीर दिसतो, अशी आपली कल्पना असते. मी तसेच दाखविले. मला घाई होती. सवड नव्हती.

हो – तर ती वर आली. बसायला तिने मला एक लोखंडी खुर्ची दिली. पुनः एकदा तसदीबद्दल क्षमा मागितली. घरमालकाच्या फाजील खबरदारीबद्दल थोडासा उल्लेख केला. 'असली किंमती वस्तू कुणी घेत नाही. दुकान उघडे असते, म्हणून वर ठेवावी लागते. तुमच्यासारखाच एखादा...'

तिला अचानक आठवण झाली. मला केशर हवे आहे. तिची पावले पेटीकडे वळली. अर्थात– " ही त्यांची रोजची वेळ. गिऱ्हाइके याच वेळी येतात. इ. " चालले होते.

एक भली मोठी लाकडी पेटी. तिथे ती उभी होती. किल्ल्या हातात—

पण ती पेटी उघडत का नाही ? आणि पाठमोरीच उभी का ? की तिला केशर कुठे ठेवले, हे माहिती नाही ? मालक येईपर्यंत ती मला अशीच झुलवणार का ? आहे तरी काय ? मला राहवेना.

" मुझे जलदी है । कृपा करके— "

तसेच पाठमोरे उभे राहून, पण अगदी अस्वाभाविक निश्चयाने तिने चटकन उत्तर दिले.

" नहीं, आप बैठिये । उन्हे एक घंटा है । यह उनकी आदत है । एक घंटा वे नहीं आएंगे । आप बैठ सकते है । आप—"

आणि ती विजेच्या वेगाने माझ्याकडे आली !

डोक्यावरचा पदर खाली पडला होता ! !

२१।१०।३९

६४

तीन पाने

तिचे मऊ, नाजूक आणि मांसल हात फुलांपेक्षाही सतेज आणि हवेसे वाटत मला ! मी तिच्या हाती पेन दिले. — ' सुधा, तुला हवे ते एक वाक्य यावर लिहून खाली सही कर. '

तिला मौज वाटली. किंचित थांबून तिने लिहिले, ' माझ्या जीविताचे लागेबांधे तुमच्याशीच गुंतले आहेत. ' तिचा त्या वेळचा एकमात्र विलास तोच. हातावर ठेवलेली संत्र्याची पाकळी पोपटाने अलगद उचलावी; त्याचा मृदू स्पर्श आपल्याला चिरवांच्छित वाटावा !

सुवेने माझ्या हृदयातून टिपलेल्या भावना !

तिच्या डोळ्यांतून फुलवातीची ज्योत तेवत होती. सुखाचे रांजण जीवनरसाने ओसंडत होते. मी हळूच तिला म्हणालो– " सुधा, आजही इथे एक वाक्य लिहून सही कर पाहू ! " क्षणाचाही विचार न करता ती लिहून गेली– " माझी कुंदाराणी, माझीच ती. "

कुणीतरी माझ्या हृदयातली फुले वेचून घेतली व कुणीतरी वाहून टाकली, जिथे त्यांचा सुगंध, त्यातला मध हवा होता.

त्यागाच्या पुण्यमय जाणीवेने डवरलेले तिचे मुखमंडल ! कुंदाच्या सुखासाठी गोळा केलेली मधुगंधी फुले– भरलेली ओंजळ !

गवताचा रंग बदलला होता. पाने हलकी झाली व गळू लागली. सुवेचे केस उगीचच वाऱ्यावर उडत. कुंदा नाही, मी नाही. एकटी सुधा बसलेली. हृदयातले जीवन-रसाचे झरे ! ओंजळी ओंजळीने कुणीतरी त्यातले पाणी पिऊन टाकले होते.

" सुधा ! आयुष्याचे तिसरे पान. आता सही कर ना ! "

तिचा तो श्रमांनी जर्जर झालेला हात थरथरा कापला. अक्षरे जागोजागी वेडी-वाकडी झाली. भीत भीत तिने लिहिले– " माझ्यापासून कुणी कुठे कुठे जाऊ नका. "

ती त्या वाक्यांकडे पाहत राहिली. मिठाचे थेंब त्यावर पटापटा पडले. आता कुठले दिसायला ते वाक्य ! केळीचे नाजूक झाड मुळापासून हादरले व तिने माझा आधार घेतला. घरट्यातून खाली पडलेल्या पिलाप्रमाणे भेदरलेली तिची नजर ! तिच्या काळजाचे झालेले पाणी–

एके काळच्या चंद्राच्या उपमा – फुलांचे साम्य ! !

२७।१०।३९

६५

घार

सगळे विलक्षण ! मला अजूनही कधी कधी वाटते, ते स्वप्न असावे; पण ते स्वप्न नव्हे ! स्वप्न आपण केव्हा म्हणतो ? जेव्हा त्यातली एखादी तरी घटना मनात कधीतरी तरंगून जाते. तथापि तसला विचार माझ्या मनात मुळीच कधी आला नाही व म्हणूनच ते सगळे विलक्षण !

सौ. लीला देशपांडे. वयाने बावीस वर्षांची. स्वतःबद्दल जिला काही विशिष्ट कल्पना आहेत अशी; स्वतःकरिता जिला काही विचार करता येतो अशी; सुखवादी. सुखानेच राहणारी. सुरेख नव्हे; सुरूप पण नाही; पण मोहकपणा जास्त; छानच दिसायची; पती कुठे शिकायला गेला होता. ही सुशिक्षित. घरी बसून करायचे काय आणि म्हणूनच या कॉलेजात आली. शिक्षणशास्त्राचा अभ्यास पुढल्या आयुष्यात कधीतरी कामी येईल निदान शिक्षकीण तर होता येईल हा उद्देश ! सुशिक्षित स्त्रीचे अंतिम ध्येय नोकरी, अशी आज नवी रूढी पडली आहे !

माझ्या ओळखीची; मैत्रीण मुद्दाम म्हणत नाही. मैत्रीण कुणाला म्हणणार? जिच्याशी आपले तादृश पटत नाही तिला ? जिच्या एकाही कल्पनेशी आपली कल्पना मिळत नाही तिला ?

आणि तरी देखील मला बोलल्यावाचून राहवेना. शिवाय तिने देखील त्याला कधी मोडता घातला का ? नाव नको ! संभाषणे देखील तऱ्हेवाईक ! मी एकदा तिला म्हणालो, ' तू पती निवडलास, तो अगदीच हा आहे. तुला तर मुळीच शोभत नाही. ' तिने चटकन उत्तर दिले, ' मी तो माझ्यासाठी निवडला. तुमच्यासाठी मुळीच नाही. '

तिचे म्हणणे खरे होते ! पण एक आपली सवय म्हणून मी मत दिले. जगातल्या कुठल्याही घटनेवर आपली मते ही असतातच !

पुनः असेच एकदा बोलणे निघाले. तिने स्वतःसाठी साडी आणली. जोखून, पारखून. मी म्हटले, हा रंग विटेल. तिने उलट विचारले, 'तुम्ही वापरून पाहिला का ? '

आणि हे म्हणणे देखील खोटे नव्हते !

असली ही भांडणे सदाची, रोजची. यात कसले स्वारस्य ? मी तरी का बोलावे तिच्याशी ? हा एक प्रश्न आहे. केवळ बोलावयाचे म्हणून मी बोलत नव्हतो, एवढे मात्र खास. माझ्या सगळ्या प्रिय माणसांपासून मी दूर पडलेला. इथे माझ्या सहाध्यायांशी बोलावे, तर त्याच त्या टरावि क गोष्टी. भांडणालाही उत्कटता लागते; पण इथे नुसताच चहा व नुसत्याच गोष्टी. त्यात मन रमले नाही तर ? तर मग काही नाही. शिवाय सगळे मनाचे पाश दुसरीकडे लागलेले !

पुरुष हा स्वतःला कधीतरी अपूर्ण समजून घेण्यात सुख मानतो. स्त्री ही त्याला हवी असते, ती याचकरिता. तिच्यावाचून त्याचे अनेक कारणांस्तव अडते – त्याच्या मनाचेही अडते. असे निर्बल होण्याची, असे निष्प्रभ, रोजच्या धक्काधक्कीत लागणाऱ्या वृत्तीपासून दूरदूर जाण्याची संधी त्याला सतत हवी असते.

ती संधी मला लीला देत आली होती का ? असेच असेल कदाचित. मला दुसरे काहीच नको होते. तिचे बुद्धिगुण; तिचे हृदयगुण, मला त्याचा काय उपयोग ? त्यांवर मालकी नव्हती सांगायची मला. ते तिने संपूर्णतया एका व्यक्तीला वाहून टाकले होते व पूर्ण सुखाचा उपभोग पण ती घेत होती. दुसऱ्याच्या बुद्धीची, हृदयांची, विभावांची तमा बाळगण्याचे तिला काही एक कारण नव्हते.

आणि हेच कदाचित आमच्यातल्या त्या सतत संघर्षाचे कारण असेल.— जे कारण माझ्या पथ्यावर पडले— जे कारण माझ्या बुद्धीला निष्प्रभ करण्यातच आपले ध्येय मानू लागले. कदाचित तिला जो मी हवा असेन, तो तिच्या बुद्धीचा निकष म्हणूनच ! माझ्या हृदयाला तिने कधी हात घातला नाही हे खरे.

मला मात्र मनाच्या त्या दुबळ्या अवस्थेत पुष्कळ वाटे. वाटे, हिने आपल्याशी चांगले बोलावे. चांगले वागावे. चार दिवसांसाठी आपली ही विद्यार्थिदशा. तेवढ्यात

संबंध वाईट व्हायला नकोत, पूर्वीची ओळख पुसायला नको. असे झाले तर चांगले, तसे झाले तर वाईट. पुष्कळ, पुष्कळ विचार येत.

खरेच, तसे झाले असते तर काय झाले असते कुणास ठाऊक !

या आणि असल्याच संबंधापासून संशयाचे, संघर्षाचे बीज माझ्या मनात सतत रुजल्यामुळे लीलेबद्दल मला आपलेपणा आणि भीती वाटत होती. ज्याच्याकडून आपण स्वतःला मुद्दाम भिववून घेतो, त्यांची देखील पुढेपुढे भीती वाटते आपल्याला. माझे एक शिकारी मित्र अजूनही उंदीर व बेडूक यांना भितात !

तात्पर्य, अशी ही सौ. लीला देशपांडे आणि असा हा मी !

आता ते स्वप्न की कायसेसे मी वर म्हटले ते सांगतो.

अर्थात् अशी ही बाई अवचित माझ्या खोलीत एक दिवस सायंकाळी पाच वाजता व्यवस्थित पोषाख करून आत आलेली पाहून माझ्या आश्चर्यास पारावार राहिला नाही. माझे ते घरेलू कपडे, तो सगळा अव्यवस्थितपणा. पण त्याकडे माझे लक्ष होते कुठे ? मी नुसताच पाहत राहिलो.

" माझे कपडे व्यवस्थित आहेत; दिसतात ? " चेहरा प्रसन्न; प्रश्नाच्या आवाजात खेळकरपणा. मी त्याबद्दलच विचार करीत राहिलो.

" मी म्हणाले, माझे कपडे व्यवस्थित आहेत. "

" बरं, मग ? "

" असले कपडे माणसे कधी घालतात ? "

" दुसऱ्याच्या खोलीवर छापा घालायला. "

" कोटी करण्याइतका माझा प्रश्न पाचकळ नाही. मी फिरायला जायला आले आहे. आपण जाऊ या. बरंच लांब जाऊ, का ? खूप फिरावंसं वाटतंय.

हे सगळे– इथवर ठीक आले. पण आता मला कपडे बदलायचे होते. ते इथे कसे बदलणार ? खोली ब्रह्मचाऱ्याची. आडोशाला काही नाही. दुसऱ्याच्या खोलीत जाऊन बदलविले तर त्याला यायचे कारण सांगावे लागेल, आणि त्यानेच फिरायला येतो म्हटले तर ... ?

" करा ना कपडे. "

" पण.... "

" पण काय ? मी इथे दारात उभी राहते बाहेर पाहत – चटकन करा पाहू कपडे. "

हा निःसंकोचपणा — हे सगळे काय प्रकरण आहे, हे माझ्या ध्यानात येईना. मला माझेपण राहिलेच नाही. कपडे कोणते घालावे ?

" हं, झाले का कपडे. पाहू मी ? "

शेवटी एक लांब सदरा, पायजमा – म्हणजे होते तेच कपडे, व तयारी झाली. आम्ही बाहेर पडलो.

" हा इथला ' मार्बल हॉल ' छान दिसतो नाही ? "

वर किंचित उजव्या कडेला सरकलेली शुक्राची तेजोधवल चांदणी त्या संगमरवरी महालावर तेजाचा शिडकाव करीत होती; त्यामुळे त्याला खरेच शोभा आली होती.

" या मोटारी फार वाईट. किती धूळ जाते नाकातोंडात ? "

कबूल. काय प्रत्युत्तर देणार ? पुढे पाहणे.

" या इथल्या इमारती म्हणे राजा गोकुलदासच्या; वार्षिक एक रुपया भाड्याने सरकारने वापरायला घेतल्या आहेत. "

या माहितीत देखील काही चूक नव्हते, मग उगीच कशाला मोडता घाला ?

" आज काय मौनाचा दिवस आहे गांधीबाबा आपला ? "

" छे, छे. "

" मग आम्हा पामरांशी बोलायला काय घ्याल ? "

मला भीती पडली. वाटले, आता आम्हा दोघांचे मूळ स्वभाव जागे होणार. जे टळावे म्हणून मी बोलण्याचे टाळत होतो, तेच नेमके !

" मग ? एका शब्दाला किंमत किती ? "

" छट, असं काय बोलता ? "

" मग कसं बोलू सांगा.— आपण फिरायला जातो आहोत. उल्हास वाटायला हवा. शिवाय मी मुद्दाम नाही का आले ? "

आता खात्री झाली. भांडण व्हायचा संभव नाही. बोलायला काहीएक हरकत नाही. बोलावे काय, याचा मी अंमळ विचार करू लागलो; पण—

पण पाणी प्यायला उतरलेल्या प्रवाशाकरिता आगगाडी थांवत नसते !

" एक गोष्ट सांगू ? "

" अवश्य; पण असं काय विचारता ? "

" नाही. तुम्हांला आवडेल म्हणून सांगते. "

" सांगा. "

" मी आज सकाळी उठले. अगदी पहाटे तुमची ती आवडती चांदणी पाह्यली. अगदी तुम्ही सांगता तसं वाटतं नाही आपल्याला ? मला भास झाला टपोरी टपोरी फुलं कुठूनतरी पडताहेत — अगदी जवळशी — तोडून घ्यावीत जशी. "

तिची ती तन्मयता ! तिच्याइतकाच मला आनंद झाला. आपला हव्यास कुणी उचलला तर आनंद दुणावतो.

" तुम्ही काही बोलला नाहीत ? "

" काय बोलायचं ? "

" मग बोलूच नाही आपण— "

" छे, असं नको. "

" आणखी एक गोष्ट सांगू ? "

" सांगा. आज पुष्कळच गोष्टी सांगण्यासाख्या दिसतात. "

" वरं, नाही सांगत. "

हा खोटा रुसवा. हा अकारण लोभ. ही विलक्षण वृत्ती. ही हुरहूर. उतावीळ ! मला याचा अर्थ कळेना. आम्ही परत यायला वळलो होतो.

" सांगा ना ती आणखी दुसरी गोष्ट. "

" माझे कपडे पाहिलेत आज तुम्ही ? "

" त्यात काही विशेष आहे ? "

" अं हं. मी नाही सांगत. "

" अरे, हे सगळे हिंदुस्थानमां बनेलो ... "

" अगदी तेच. मला वाटलं माझी रोजची पातळं वापरली, तर तुम्हांला बुजल्या-सारखं होईल, संकोच होईल – जसा नेहमी होतो व मग तुम्हांला बोलता यायचं नाही. कदाचित तुम्ही आलाही नसता माझ्याबरोबर आज. नाही ? "

" छे, पण तुम्ही कशाला हे कपडे घातले ? "

" का ? बरं वाटलं नाही तुम्हांला ? मी ते वापरायच्या..."

" मुळीच नाही. माझं समाधान मला व्यक्त करता येत नाही. हे मनाचं समाधान. हे दाखवायचं कसं ? मन उघडता येत नाही. मी कृतज्ञता दर्शविली तर ?– तसं करू ? "

" नाही. "

" म्हणजे ? "

" म्हणजे मला ती नको आहे. "

" याचा अर्थ ? "

" याचा अर्थ सरळ आहे. तुम्हांला कृतज्ञता वाटली. ती मला नको आहे. तुम्हांला आनंद झाला का ? मला तो हवा आहे. तुम्हांला आज बरं वाटावं, आनंद वाटावा म्हणून..."

" आनंद ? मला ? "

अगदी नकळत मला फुलल्यासारखे वाटले. का ते कळेना. कसे ते समजेना. माझ्या आनंदासाठी ही लीला देशपांडे धडपडते ? सौ. लीला प्रयत्न करते ?

कॉलेज जवळ आले होते. दिवे दिसू लागले. रस्ता शांत होता. धूळ कमी झाली होती. जाणारे लोक जड पावलांनी जात होते. पाखरे निजून गेली होती. पाकोळ्या फडफडत, किलबिल करीत, भराभर इकडून तिकडे भराऱ्या मारीत होत्या. छोटे छोटे दिवे रस्त्यावर गस्त घालीत होते. निराशेने दडपलेल्या लोकांना त्यांचाच आसरा वाटे !

आता चटकन कॉलेज येईल व ही हुरहूर अशीच राहील. ते झाड आले. इथून आता रस्ते वेगळे होतील आमचे. मला राहवेना.

" एक प्रश्न विचारू ? "

" हो. आज अगदी माझं अनुकरण चालवलं आहे ते. "

" तसं नाही. पण मघाशी तुम्ही म्हणाला, माझा आनंद...माझ्या आनंदाची तुम्हांला पर्वा असण्याचे कारण ? "

" ते तुम्हांला कळायचं नाही. "

" कळेल, सांगा. "

" सगळा विरस होईल तुमचा. "

" सांगितलं नाही तरी आता होईलच. "

ती शांतपणे उभी होती. आजूबाजूला पसरलेला अंधार बरा वाटला नाही. एखादे स्वप्न नजरेसमोर तरळावे व विलीन व्हावे;— धुक्याचे विरल आवरण देखता डोळा हळूहळू बाजूला सरावे आणि डोळ्यांवर कसलेतरी पडदे हलकेच पडून श्वास मंद मंद व्हावा.

असे उभे राहताना मला प्रशस्त वाटले नाही !!

" मग, सांगा ना. "

" मुळीच नाही. मी आज मनापासून प्रयत्न केला आहे तुम्हांला खेळकर करण्याचा. एरव्ही माझा स्वभाव तुम्हांला माहीत आहे. मी कशी आहे याची तुम्हांला चांगली कल्पना आहे. आज मला कसं विचित्र वाटत होतं— अजून वाटतंय. माझं मन देखील स्वस्थ नाही. आता इथून हॉस्टेलमध्येही मला परत जावसं वाटत नाही— तिथं तरी काय ... "

आज नाही म्हणता म्हणता ती तशीच बोलत राहिली.

... " आज त्यांच्या पत्राचा अखेरचा दिवस होता. कालपासून मी वाट पाहते. ते पत्र ! ते वाचायला देखील मी माझ्या मनाची तयारी करीत असते. पुरुषाच्या सहवासाची कशी भुरळ पडते— तो दर्प किती हवासा वाटतो याची तुम्हांला जाणीव नसेल, मला, आम्हां स्त्रियांना ते कळते. त्यांचे पत्र यायचा दिवस, त्यांचा तो अमूर्त सहवास— माझं मन अगदी आसावतं आणि कालपासून ते पत्र आलं नाही. माझे सगळे प्रयत्न फुकट गेले. मनच स्वस्थ होईना. शेवटी— आणि म्हणून माझ्या मैत्रिणी आज मला नकोशा झाल्या. शिवाय मला माझी जबाबदारी होती. म्हणून तुमच्या, बरोबर मी आले— तुमच्यावर माझा विश्वास होता. तेच कारण— तुम्ही बोलावे...'

अर्धे सोडलेले वाक्यसुद्धा तिने पूर्ण केले नाही. जशी ती बोलायला लागली, तशीच ती थांबली; पण अवचित व भराभर पावले टाकीत चालत गेली. तिला पुढे

सांगावयाचे नसेल, सांगावेसे वाटले नसेल, कदाचित जे सांगितले, ते देखील एका दुबळ्या ...

पण ती चटकन परतली !!

" आणखी एक गोष्ट सांगायला आले आहे. हे पूर्णपणे विसरून जा. यावरून काही आडाखे बांधू नका. तुम्ही थोडे फाजील हळवे आहात, म्हणून मुद्दाम सांगते. यात काही विशेष नाही-अधर्म नाही- दोष नाही. उद्या त्यांचं पत्र नक्की येईल- मी देखील त्यांना तितकंच चांगलं लिहीन- जा. जा, सगळं काही विसरून स्वस्थ झोपा."

माझ्या जाण्याची वाट न पाहताच ती जशी आली, तशीच झपाझप परत जाऊ लागली. ते पांढरे शुभ्र पातळ अंधारात दूर दूर सरकू लागले. पाण्यात सोडलेला सायंकाळच्या पुष्पदीप तरंगावर हेलावत पुढे जावा तसे...

मी तसाच पाहत राहिलो. काय झाले होते ? आकाशात दूर दूर अधांतरी उडत राहणाऱ्या घारीने भक्ष्याच्या लालचेने झडप घालावी व मिळेल तो लचका तोडून पुनः तितकेच उंच, तितकेच अंतराळी उडून आकाशाचा ठाव घ्यावा—

आणि आपण आपले काय हरवले म्हणून पाहत राहावे.

—नुसतेच पाहत राहावे !

६।२।४०

६६

शुद्धी !

मी सगळे काही सांगेन, पण एका अटीवर. ती एक अट एवढीच की, हे सगळे मला कुठून नि कसे कळले हा प्रश्न आपण मला विचारू नये. त्या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडून आपल्याला मिळावयाचे नाही. असल्या गोष्टी युगातूनदेखील एखाद वेळीच घडतात.

थांबा; इथे गॅलरीतच उभे राहू या आपण. आता दहा वाजून वीस मिनिटे झालीत. बरोबर पाच मिनिटांनी मी माझ्या हकिकतीला सुरवात करतो; कारण जिचे मी वर्णन करणार, तीच तुम्हांला आता पाहायला मिळेल.

असे समोर या. ती पाहा डाव्या बाजूने शांतपणे येत आहे. ती इथे येईल, तेव्हा साडेदहा वाजायला नक्की पाच मिनिटे असतील व बरोबर साडेदहाला ती आपल्या शाळेच्या आवारात पाऊल टाकील. तिच्या पावलात घाई नाही. डोळ्यांत चंचलता नाही. तिला पक्के ठाऊक आहे की, ती जायच्या अगोदर कुठल्याही घड्याळात साडेदहा वाजायचे नाहीत.

आणि इतक्याच नियमितपणे बरोबर सव्वातीन वाजता याच रस्त्याने परत जाताना ती तुम्हांला दिसेल. तशीच शांतपणे ती जाईल. प्रो. फडक्यांना तुम्ही तिचे वर्णन करायला सांगा. तुम्हांला वाटेल हिच्याशी आपला परिचय वाढलाच पाहिजे. खांडेकर वर्णन करायला बसतील, तेव्हा फुलबागेतील साऱ्या लिंबांची रसरशीत कांती आणि फुलवेलीची कृशता त्यांना वर्णावी लागेल आणि माडखोलकर तर 'एलिस' व 'ब्लॉच' चे निर्वाळे देत सुटतील.

कारण तिचे वर्णन करणे कठीण आहे. कोणतेही सुगंधी लेपन न लावता मुबलक गार पाण्याने अंघोळ केल्यावर शरीराला जसा एक प्रकारचा मंदिर थंडपणा येतो—सुगंध दरवळतो, तशा प्रकारचा विशिष्ट सुगंध तिच्याभोवती सतत दरवळलेला तुम्हांला भासेल. बकुळीची फुले सुकतात, पण सुवास सोडीत नाहीत. तिचेही तसेच काहीसे झाले होते !

होय, मी सांगत होतो—सव्वातीनला ती पुन्हा या रस्त्याने जाताना दिसेल. साडेतीनला घरी पोचेल. गेल्यांबरोबर अंघोळ करील व लिंबाचे सरबत घेऊन कामाला लागेल. स्वतःच्या खोलीत जातानाच ती डाव्या बाजूच्या खोलीकडे पाहून थबकेल व कुलुपावर तिची दृष्टी स्थिरावेल. ती खोली तिला आता मुळीच उघडावयाची नाही. तिने ती सकाळीच उघडली, झाडली; सारवली; आत फुले ठेवली आणि पुनः बंद केली. रोज ती असेच करते व अशीच त्या कुलुपाकडे पाहते. त्या काही सेकंदांत तिचे सगळे आयुष्य सामावले असते व त्या आयुष्याचा मूकपट ती झरझर पाहून घेते.

त्या खोलीत एक फोटो आहे. तो तिच्या सख्ख्या भावाचा. त्याचे नाव अरुणकांत. निष्ठेसाठी, तत्त्वासाठी तो जगला व तत्त्वापायीच गेला. त्याच्या जीविताची सगळी कहाणी पांढऱ्या शुभ्र वस्त्रासारखी आहे. पांढऱ्या कापसातून निघालेले, पिंजलेले, अनुभवांच्या कलाबतूने गुंफलेले व खळ न लावता बाजारात आणलेले खादीचे शुभ्र वस्त्र! त्याची उभी हयात ही अशी आहे. त्यागाची मूर्तिमंत प्रतिमा !—कुठल्याही मलिन वासनांचा व कल्पनांचा त्याला स्पर्श झालेला नव्हता—त्याने होऊ दिला नव्हता. कोणतीही वाईट गोष्ट नाहीशी करताना आपली शक्ती व आपले प्राण कितपत उपयोगास येतील, हेच पाहण्याची त्याची प्रवृत्ती होती.

म्हणूनच त्याच्या मृत्यूची बातमी सगळ्यांना दुःखद व अद्‌भुत वाटली. एका सकाळी अशी भूमका उठली की, त्याचे सगळे शरीर त्याच्या खोलीतच रक्ताने भिजलेले आहे व गळ्याला मोठी जखम—

सर्वांनी ते पाहिले !

त्याला कुणी मारले ? त्याला शत्रू तरी कोण होता ? कुणीच नाही. घरी एकुलती एक अत्यंत लाडकी—त्याच्यापेक्षा फक्त तीन वर्षांनी लहान असलेली त्याची बहीण निर्मला—जी मी मघाशी तुम्हांला दाखविली, जिचा त्याने प्राणाच्या जोखमेने प्रतिपाळ केला, जिला त्याने आईची आठवण कधी होऊ दिली नाही.

—आणि जिच्यासाठी त्याने स्वतः अंतकाळी रक्ताने अंघोळ केली व देह अर्पिला !

एवढी हकीकत ऐकल्यानंतर आता तुमची कल्पनाशक्ती मोकळी सुटायला हरकत नाही. तुम्हांला वाटेल एखाद्या गुंडापासून आपल्या आवडत्या बहिणीचे रक्षण करता करता त्याला मृत्यू आला असेल व त्याच्या जिवाचे सोने झाले असेल; दुसऱ्यांदा वाटेल, त्याच्या सख्ख्या बहिणीवर त्याचे प्रेम असेल; तिचाच त्याला सतत सहवास होता. स्त्रीचंद्रलच्या सगळ्या भावांची केंद्रता तिच्याच ठिकाणी झाली होती. त्याला तिचे आकर्षण असेल. त्याला ती हवी असेल; तथापि, त्याचे आतापर्यंतचे आयुष्य, त्याची तत्त्वे, समाज व माणुसकी या गोष्टीला संमत नसतील व या कारणामुळे त्याने मृत्यूला मिठी मारली असेल. तुमच्या या तर्काला पुष्टी देणारे बरेच वाङ्मय युरोपमध्ये निर्माण झाले आहे.

तथापि, तुमचा तर्क मोठा अजब व मौलिक असला तरी तो खोटा व असभ्य आहे.

तुम्हांला त्याच्या एकंदर चारित्र्याची कल्पनाच आलेली नाही. तुमच्या रोजच्या आयुष्यात तुम्ही पत्नीसाठी, मित्रासाठी, देशासाठी प्राण द्यायला तयार असता; पण पत्नीने तुसचे फाउन्टन पेन, मित्राने तुमचे चित्राचे अल्बम किंवा देशाने एक वर्षाची कैद मागितली, तर ती देण्याची आपली तयारी नसते. असत्य, ढोंगी नि निःसत्त्व अवडंबरांनी आपले आयुष्य बरबटल्यामुळे आपल्याला प्राण देणे म्हणजे खरोखरच मरणे, या शब्दप्रयोगाचा अर्थ कळू शकत नाही. तो कळण्याची आपली कुवतच नाहीशी झालेली असते आणि म्हणून असली तर्कटे आपल्या डोक्यात येतात.

खरी गोष्ट दुसरीच आहे व तीच ऐकण्यासारखी आहे.

तुम्ही या निर्मलेला ती पंधरा वर्षांची असताना पाह्यचे होते. पंधरा वर्षांच्या इतर पुष्कळशा मुली तुम्ही पाहिल्या असतील. उमललेली फुले सुंदर, हवीशी वाटतात—पण उमलती याहूनही लोभनीय असतात ! या वयात संध्याकाळचा पश्चिम दिग्भागाचा रक्तिमा आकलन करण्याची थोडी थोडी शक्ती उमलत असते. ऊबदार बिछान्यावर एकटे झोपताना अस्वस्थ वाटते व ते का वाटते ते कळत नाही; स्वतःच्या शरीरापेक्षाही दुसऱ्याची शरीरे चांगली वाटतात आणि याचेही कारण कळत नाही,

याच वयात निर्मलेचा इतिहास लिहिला गेला. नदीचे पाणी वाहत होते. ती शेतात गेली होती. थकली. तिला तहान लागली. तहानेने व्याकुळ होऊन ती गुडघाभर पाण्यात उतरली. पोटऱ्या उघड्या, ओंजळ भरायला ती वाकलेली. ओठांपर्यंत ओंजळ भरून आणीपर्यंत ती रिकामी होऊन जाई. (त्या कमळासारख्या नाजूक हातांत पाणी धरून ठेवण्याची शक्तीही आली नसेल.) तिची कोण तारांबळ ! धुणी धुवायला आलेल्या

बाया हसल्या; वैल पाण्यावर आणलेला शेतकरी हसला; नदीतल्या लहान मासळ्या तिच्या पायाशी जमल्या; ती घाबरली व ओली झाली !

त्या मुग्ध संभ्रमात ती असताना एक सोळा वर्षांचा मुलगा तिच्या जीवितकथेच्या या पानावर आला, त्याचे नाव मला विचारू नका. मी सांगणार नाही. तो आला. थोडयाशा गंमतीने, थोडयाशा गंभीरतेने तो पाण्यात उतरला. हिला त्याने धीर दिला व स्वतःच्या ओंजळीने तिला त्याने पाणी पाजले. ती आकंठ प्याली. तिने भोवताली पाहिले नाही व पाहिले ते पुनः नजर खाली करण्याकरिताच.

हे ओल्या मातीवरचे ठसे असतात. फार लवकर उमटतात. तिच्या ओठाला त्याच्या कराग्राचा झालेला नाजूक स्पर्श, फुंकरीने दुधाला खळी पडावी, तशी बोटांनी पडलेली ओठावरची वलये.

ती काही केल्या पुसली जाईनात. तिने ती पुनः चाचपून पाहावीत आणि पुनः ती उमटावीत – आणि तिच्या त्या वयात तर स्वतःपेक्षा दुसऱ्याचीच शरीरे सुंदर वाटतात. पुढे या व अशाच गोष्टी पुष्कळ घडत गेल्या. त्या कुणाला सांगाव्याशा वाटत नाहीत. सांगितल्या तर दिठावतील— करपतील, अशी भीती वाटते. पोटात ठेवल्यावर अननुभूत आनंद होतो. नवथर लहरी मनात उठतात. सगळे रोमांचित झाल्यासारखे वाटते, सगळे नवे – सगळे अद्‌भुत – सगळे हवेसे !

तथापि, अशा गोष्टी न सांगता कळत असतात. तशा त्या अरुणकांतालाही कळल्या. त्याने कोणती नीतितत्त्वे उराशी धरली होती त्यालाच ठाऊक; त्याने सगळ्या घटनेचा आनंदाने स्वीकार केला. या बाबतीत निर्मलेला काही सांगावे लागेल, अशी त्याला कल्पना नसल्यामुळे त्याला थोडा विषाद वाटल्यावाचून राहिला नाही. त्याने निर्मलेला बोलाविले; कोण संकट वाटले त्याला ! किती यातना झाल्या ! शब्द तोंडी येईनात; कितीही ' प्रज्ञा प्रतिष्ठित ' झाली असली, तरी अशा वेळी माणूस अखेर खचतो व विरघळतो. देवाने रक्ताचे संबंधच असे विचित्र करून ठेवले आहेत.

निर्मलेला तो त्याच ओढ्यावर घेऊन गेला, जिथे तिची तहान शमली होती. पाठीवरून हात फिरवीत अगदी वात्सल्याने गद्‌गदून त्याने सांगितले, ' वेडे पोरी, कधीतरी हे मला सांगावेच लागले असते, ते आता या घटकेला मी सांगणार आहे. तूतूं निर्मल, चारित्र्यशील व्हावेस, असे मला वाटते, ही माझी चूक नाही; पण तसे वागावेस म्हणून मी पूर्वजांचा, घराण्याचा दाखला बेटीस धरीत नाही. आपण सृष्टीची मुले आहोत. तिची इतर मुले जशी वागतात, तसे तुला नि मला वागले पाहिजे. हे पाहा तुझ्या पायाशी एक छोटेसे रानफुलाचे झाड आहे. तू त्याच्याकडे सुगंधाच्या दृष्टीने पाहतेस. मी श्रमाच्या. ते फूल हसते आहे, कारण त्याचे जीवितकार्य सफल व्हायला आले आहे. आज सायंकाळी ते सुकेल; पण जाताना एक बीज येथे ठेवून जाईल. पुढील वर्षी याच ठिकाणी तुला असेच झाड व फूल फुललेले दिसेल. ही नदी—ती तुला

सांगते— " तुझ्या प्रियकराला ओंजळीने पाणी पाज, त्याच्या ओठांना तुझ्या हातांचा स्पर्श होऊ दे– " पण ती स्वतः काय करीत आहे ! आजूबाजूचा सगळा भाजीपाला ती पोसते ! ही पालवी – ती सांगते आता थोड्या दिवसांनी आम्ही तुम्हांला फळे खायला बोलावू. निर्मला, सृष्टीची सगळीं बाळे उपयोग म्हणून जगतात. आपल्याला उपभोग म्हणून जगण्याचा अधिकार नाही. हे तुला पहिले आणि शेवटचे सांगणे आहे आणि तुझी दृष्टी एकदा अशी झाली की तू कशीही वागलीस, तरी मला त्याची फिकीर नाही. नीती आणि चारित्र्याच्या पोकळ व्याख्यांनी थोडेच जगाचे आहे आपल्याला ?"

हे त्याचे पहिले व शेवटचे सांगणे होते !

अरुणकांताचे वय चोवीस. तिचे एकवीस. निर्मलेच्या तारुण्याला अगदी बहर आलेला. घरी सगळी स्वतंत्रता, सोन्यासारखा भाऊ, त्याच्या धवल कीर्तीची पाठराखण. पाच वर्षांचे एक दीर्घ स्वप्न निर्मलेला पडले. त्या स्वप्नातला एक मोहक दिवसही तिने अनुभविला. त्या दिवशी घरी ती एकटी होती. कुणी कुणी परके नव्हते. प्रणयाच्या विभ्रम लीला तिला अवगत झाल्या होत्या व प्रियकराच्या मधुर सहवासाची तिची तहान शमत नव्हती.

आकाशातले ढग लाल झाले. सूर्य थकून खाली आला. चंद्राचा पत्ता नव्हता. त्यांची रात्र त्या दिवशी दोन घटका अगोदरच झाली. स्वतःच्या सुकोमल हातांनी तयार केलेला विस्तीर्ण मऊ बिछाना, त्यावर हातभर थरावलेली गुलाबाची उमललेली फुले – त्या फुलांच्या विलग झालेल्या पाकळ्या—

आणि असल्या बिछान्यावर एकटे झोपत नसते कुणी !

आयुष्याची सगळी कहाणी तिला एका शब्दाने सांगता आली – विलास—भोग !

ते अवघे स्वप्नापेक्षा मधुर होते; कारण सर्व खरे होते ! जीवनाचा यापुढील एकमेव हव्यास तोच – आयुष्याची परिणती तीच – जगण्याचे साफल्य तेवढेच – रोज रोज सुधा प्यायची आणि रोजची गुलाबाच्या शेजेची स्वप्ने !

हे ओल्या मातीवरचे ठसे असतात. लवकर उमटतात व त्यांच्याशिवाय त्या मातीला वेगळे अस्तित्व उरत नाही.

हे सगळे असे कसे व का झाले, असा प्रश्न जर तुम्ही मला विचाराल, तर आपण अननुभवी आहात, असे मला सांगावे लागेल. निर्मलेच्या भावाचा व तिचा जीवनविरोध दर्शविणार असाल, तर प्रतिक्रियेचे एक शास्त्र असते, याची जाणीव आपल्याला करून द्यावी लागेल. थोरल्या भावाने जीवनातली सगळी उत्कृष्ट तत्त्वे प्रयोगाकरिता घेतलेली, त्या प्रयोगवीराचे हटातटाचे सर्व प्रयत्न, त्याचा तो हव्यास आणि त्याच्याच खोलीजवळ याच्याच सान्निध्यात राहत असलेली निर्मला—पण यात विचित्र, विलक्षण काही असले, तरी ते खरे असल्यामुळे त्याचे पृथक्करण करण्याचे मला कारण नाही.

या घटनेला काळ लोटला. अरुणकांताचे मन इतके संकुचित कधीच नव्हते की, निर्मलेच्या रोजच्या वर्तनावर त्याने देखरेख ठेवावी. त्याला वेळही नव्हता. उलटपक्षी चारित्र्यशील भावापासून काही लपविता येण्यासारखी निर्मलेची मनोवृत्ती नव्हती. जे आपल्याला साधत नाही ते साधले, साधले, म्हणून प्रतारणा करण्याची तिची तयारी नव्हती. उलट ते सगळे कबूल करण्याचे धैर्य तिच्या रक्तातच होते !

म्हणून केवळ नाइलाज झाला—सांगावेच लागले म्हणून नव्हे तर त्याच्या फार फार पूर्वी तिने सगळ्या गोष्टी तितक्याच उत्कटतेने आणि प्रामाणिकपणे भावाला सांगितल्या. ते पत्र अरुणकांताने वाचले व त्याचाही स्वीकार केला. निर्मलेने सर्व गोष्टी स्पष्टपणे लिहिल्या होत्या—" दादा, रागावू नका. हे मला सारे हवेसे वाटते. सगळे शरीर थडथडते. सगळ्या भावना फुलून येतात; ही शरीराची भूक. असले प्रसंग इतक्या लवकर कुणावर येऊ नयेत, ही भूक ज्याला लागते, त्याच्या सगळ्या जीवनाची 'दारू' होते !—" तिने पुष्कळ पुष्कळ लिहिले.

अर्थात अरुणकांताने तेही स्वीकारले. जे सांगावयाचे ते शेवटचेच असल्यामुळे पुन्हा निर्मलेला काही सांगण्याची त्याला आवश्यकता वाटली नाही.

दुसऱ्या दिवशी त्याने निरवानिरव केली. सर्वांना ती एक सहज गोष्ट वाटली. त्यापेक्षा आपल्याला आणखी वाटणार तरी काय ?

तिसऱ्या दिवशी मनाच्या शांतीसाठी, स्थैर्यासाठी त्याने मौन स्वीकारले.

चौथ्या दिवशी बहिणीची नीट व्यवस्था लावून दिली. डोळ्यांतून टिपूसही न गाळतां सुखदुःख, यश, अपयश, सारखे समजणाऱ्या स्थितप्रज्ञाप्रमाणे त्याने बहिणीचा निरोप घेतला. दारूच्या धुंदीत असलेली निर्मला थोडा वेळ शुद्धीवर आली व बोलली.

त्या दिवशीचा त्याचा तो शेवटचा प्रयोग. आता पुढील प्रयोगाकरिता त्याच्या जवळ आयुष्य उरणार नव्हते. एका अमर तत्त्वाच्या सत्यतेची कसोटी तो त्या दिवशी पाहणार होता. तत्त्वाच्या सख्यत्वासाठी प्राणाची कुरवंडी करण्याची त्याने तयारी केली. त्याची त्या दिवशीची शांतता-गंभीरता-ते सर्व वर्णनातीत आहे. त्याने निर्मलेसाठी पत्र लिहून ठेवले व खोलीचे दार लावले. त्या पत्रातील वाक्ये आज निर्मला पुनः पुन्हा वाचते. सांजवाती लावल्या की, ती म्हणते—' प्रिय निर्मला, तू सगळे खरे सांगितलेस. तू माझीच बहीण आहेस. शरीराची न शमणारी भूक—तुझे वर्णन खरे असेल; पण अशी मुलखावेगळी भूक ज्या शरीराला लागते, त्या शरीराने स्वतःचेच रक्त-मांस खाऊन टाकावयास हवे. तुझ्या मृत्यूची कल्पना या वेळी तुला भिववील; कारण तू त्याला बळी पडली आहेस; तू आता ' मला जगण्याचा हक्क आहे, ' असली अपुरी तत्त्वे माझ्या तोंडावर फेकून देशील, शरीराच्या या भुकेच्या तृप्तीसाठी

शरीरच हवे. तुझी ते द्यायची मुळीच तयारी नाही. तेव्हा त्या शरीराशी रक्त-मांसाने जवळ असलेले माझे शरीर मला देणे आहे. त्यामुळे तुझी भूक शमेल व माझे सार्थक होईल. माझ्यापेक्षा तू नंतर पुष्कळ कामे तृप्त मनाने करू शकशील. '

निर्मला बाहेरून आली. तिने ते वाचले. तशीच ती अरुणकांताच्या खोलीत गेली.

तिथे सगळे रक्त ! त्या रक्ताचा रंग दारूपेक्षाही लाल होता. तिची नशा खाडकन उतरली. मुकेचा मागमूसही राहिला नाही.

हेच, हेच रक्ताचे डाग पुसले जावेत, म्हणून आता रोज सकाळी निर्मला अरुणकांताची खोली सारवून ठेवते, तो रक्ताचा वास नाहीसा व्हावा म्हणून ती रोज त्यात सुगंधी फुले ठेवते. बाहेरची अपवित्र हवा आत जाऊ नये, म्हणून रोज ती खोली बंद ठेवते.

दारूच्या सगळ्या बाटल्यांतून आता तिने गंगा भरून ठेवली आहे. पाच वर्षांचे सगळे 'कश्मल' त्या प्रसन्नपुण्य गंगाजलाने ती धुऊन काढील व दोन शरीरांची कामे आता ती एकटी करील. ती स्वतः जगणार आणि अरुणकांतालाही जगविणार.

दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यासाठी पर्वताच्या कडेकपारीतून खळाळत बाहेर येणारी ती नदी आहे. ती समुद्राला मिळण्याच्या अगोदर तिच्यातले सगळे 'जीवन' उपयोजिले जावे, अशी तिची प्रतिज्ञा. साता-समुद्राच्या पलीकडे राजाने पेरलेले ते केळीचे झाड आहे; ते हालेल; पण मोडणार नाही. त्याला पाणी मिळेल. मिळणारही नाही. तरी ते सुकायचे नाही.

ज्या नद्या हिमालयातून निघतात, त्यांना उन्हाळ्यात पूर येतो. जी झाडे रक्ताने पोसली जातात, ती पाण्याविनाच फुलतात व आपली फुले, फळे, सावली—असेल नसेल ते सगळे दुसऱ्याला देऊन टाकतात.

१६।१०।१९४१

६७

नागपूर ते बडनेरा*

जो प्रकार मला वर्णन करायचा आहे, तो अवघ्या चार तासांत घडला. तो एखादा अत्याचार नव्हे, की, त्याचे रसभरित वर्णन केल्याने तुमच्या चित्तवृत्ती थरारून जाव्यात. चकमक देखील घडली नाही काही. फक्त नागपूर मेल नागपूर स्टेशनपासून निघून बडनेऱ्याला पोचेपर्यंत जो प्रकार त्या दोन डब्यांत घडला, तोच मला सांगायचा आहे.

---

* हे प्रवासवर्णन नव्हे !

अगदी साधी गोष्ट, की जिच्यावर गोष्ट लिहिणे मुष्किल आहे.

पूर्वी मुंबईला जाणारी कलकत्ता मेल नागपूरहून ४–३५ ला दुपारी सुटत असे. वीस मिनिटे तिचा स्टॉपेज होता. त्या दिवशी काय कारण होते कळत नाही, पण ती दहा मिनिटे आणखी थांबायची होती.

स्टेशनवर तार देण्याच्या फळीजवळ एक अठरा–एकोणीस वर्षांचा मुलगा उभा होता. पायांत चांगले चकचकणारे जोडे, तलम धोतर, साधे उंची कपडे, हातात सोन्याचे घड्याळ.

कुणाची तरी तो वाट पाहत होता; तथापि ज्या व्यक्तीची तो वाट पाहत होता, ती व्यक्ती यावीच असे त्याला वाटत होते किंवा नाही, हे सांगणे फार कठीण होते. दोन-तीनदा त्याने खिशातले पाकीट चाचपून पाहिले व पाकिटावर हात असतानाच त्याने भोवताली नजर फिरवली. हेतू उघड होता. त्या पैशाचे त्याला काही-तरी घ्यायचे होते; पण इतक्या पैशाचे काय घेणार? व्हीलर फार तर आठ-दहा आणे खाईल. चहा-बिस्किटे पण त्यांच्यासाठी त्याच्याजवळ वेगळे पैसे होते. आइस्क्रीम-पण तेही मनसोक्त खाल्ले होते. अशी एकही वस्तू त्याला दिसली नाही की, जिच्या-स्तव त्याच्या पाकिटातले तीस रुपये त्याने खर्चावे. त्या पैशांचा त्याला कुणीही हिशेब मागणार नव्हते; आणि असले पैसे सत्कार्य व दानधर्म यांत कधीच खर्च करायचे नसतात.

मग हे तीस रुपये कसे खर्च करणार?

चांगला श्रीमंत होता तो. त्याला मुंबईला जायचे होते. त्याच्या वडिलांनी सेकंड क्लासच्या तिकिटापुरते भरपूर पैसे त्याला दिले होते.

—आणि त्याने काढले तिसऱ्या वर्गाचे तिकिट. नंतर त्याच्याजवळ तीस रुपये शिल्लक उरले. हेच रुपये खर्च करायसाठी तो कोणाची तरी वाट पाहत होता.

आगगाडी सुटायला अजून तब्बल १० मिनिटे होती. म्हणजे गाडीला आरंभा-पासून अखेरपर्यंत एक चक्कर देऊ शकत होता तो. त्याचे पाय चटकन वळले.

गार्डाचा, ब्रेकचा आणि त्याच्याजवळील दुसरा डबा यांत खास पाहण्यासारखे काही नसते. तो पुढे निघाला. एक, दोन, तीन आणि चवथ्या डब्याशी तो एकदम थबकला.

तरी ती त्याला पुरती दिसलीही नव्हती. डाव्या बाजूने उगीच थोडा चेहरा त्याने पाहिला. पाठमोरी होती ती. तरतरीत नाक, पाणीदार डोळे, विस्तीर्ण कपाळ वगैरे सगळे त्याच्या कल्पनेचे खेळ होते. त्याने फक्त तिचा नितळ, गोरापान, नाजूक असा सबंध उघडा हात, अंगात अस्मानी रंगाचा ब्लाऊझ व जरतारी किनारीचे, गडद हिरव्या रंगाचे तलम लुगडेच पाहिले होते व एवढ्यावरूनच ती जे पुस्तक वाचीत होती, ते मोठे गंभीर आणि तर्कशुद्ध असावे, असा त्याने कयास बांधून टाकला होता.

पण त्याला तिथे फार वेळ तसेच पाहत राहणे अर्थातच शक्य नव्हते. कारण ते असभ्य दिसले असते व फुकटच्या फुकट स्वतःला असभ्य म्हणवून घेणे कुणा शहाण्याला आवडेल ? त्याने जे पुढे पाऊल टाकले, ते याच विचाराच्या अनुरोधाने. तो पुढे गेला खरा, पण अगदी शेवट एंजिनपर्यंत त्याच्याने जाववले मात्र नाही. मधूनच तो परतला व आपण काहीतरी विसरलो असा, लोक पाहतात या जाणीवेने, आविर्भाव आणून आपली पावले त्याने झपाझर मागे परतविली. विशिष्ट डब्याजवळ थांबताना त्याला अर्थातच स्वतः पैसे मोजून पाहण्याचे निमित्त करावे लागले, हे वेगळे !

आणि एकदम असे वाटले त्याला की, आपण जवळचे तीस रुपये अगदी योग्य रीतीने खर्च करू शकू. रुपयांचा हिशेब विचारणारे जसे त्याला कुणी नव्हते, तद्वत त्याच्या वर्तनाचीही हिशेबतपासणी होणार नव्हती.

त्याने मनाशी ठरविले—आता हिच्याशी बोलले पाहिजे ! वाटेल ते होवो ! प्रथम असाच विचार त्याला सुचला की, आपले सामानच त्या डब्यात कोंबावे. तथापि तो डबा ' बानुओ माटे ' होता आणि मेल चार मिनिटांत सुटणार होती. मनाशी काहीतरी संकेत बांधीत तो स्वतःच्या डब्याकडे गेला आणि कसाबसा आत चढतो, तोच मेल सुटली. आपले सामान आवरून नीट ठेवायचेही त्याला सुचले नाही. तो काहीसा अस्वस्थ झाला. आता मेल थांबणार, ती एकदम वर्धेलाच, म्हणजे अजून एक तास.

डब्यात सभोवार त्याने नजर फिरविली. कुणी म्हणता कुणी ओळखीचे दिसेना. एखादा जिवलग मित्र असता तर त्याने या बाबतीत त्याला मसलतीत घेऊन त्याचा सल्ला देखील घेतला असता. स्त्रीच्या सौंदर्याचे केवढे आकर्षण असते, याची त्याला आजच जणू नव्याने कल्पना होत होती. आजवर रणांगणाची ही आघाडी त्याने पाहिलीच नव्हती. आतापर्यंत त्याच्या सबंध आयुष्याचा इतिहास एका प्रकरणात संपून गेला असता व त्या प्रकरणाचे नाव ' बाललीला ' असे राहिले असते. मात्र आज नवेच काहीसे त्याला वाटू लागले व जसजसे पैशाचे पाकीट तो चाचपू लागला, तसतशी त्याची इच्छा अनावर होत गेली.

त्याला काहीएक करायचे नव्हते—फक्त दोन शब्दांची तिच्याशी देवघेव. दोन शब्दच तिच्याशी बोलायचे. बाकी काही नाही. येथून त्याच्या विचाराला सुरवात झाली. त्याला वाटले, हे सर्व पैसे तिला द्यावे आणि म्हणावे, ' जरा बोल ! ' तथापि तिचे त्या वेळचे बोलणे म्हणजे चंडिकेचा कडकडाट झाला असता. मग काय करायचे ? त्याने असे कुठेसे वाचले होते की, रुबाबदार चेहरा आणि ऐटबाज पोषाख बायकांना आवडतो. तिकिट-कलेक्टरची दोस्ती लावावी आणि असा पोषाख करून तिकिटाच्या निमित्ताने तिच्यापुढे जावे; पण जर का तिकिट-कलेक्टर खमक्या मिळाला, तर सगळेच मुसळ केरात ! अर्थात हा विचार देखील मनातून काढून टाकावा लागला. त्याने आपले कपडे पाहिले. ते तर अगदी फडक्यांच्या भाषेत सांगायचे म्हणजे ' झकास '

होते; पण रुबाबदार चेहऱ्यासाठी मिशा कुठून आणणार ? तथापि ज्यांना मिशाच नसतात, त्यांच्यावर स्त्रिया लुब्ध नसतात, असा दाखला कुठेच सापडण्यासारखा नव्हता ! तेवढेच समाधान !

या व अशा रीतीने जसजसा तो विचार करायला लागला, तसतसे त्या स्त्रीशी बोलण्याचे निमित्त काढणे, त्याला जड जाऊ लागले. ती त्याची आई, बहीण, मावशी थोडीच होती की, त्याने तिचा पाण्याचा तांब्या भरून आणावा आणि दोन थापा हाणून द्याव्यात ? परस्त्री !–या एकाच शब्दाने त्याला अगदी नवे नवे पण अलभ्य अलभ्य काहीसे वाटले आणि जसे वाटत गेले, तसतशी त्याची तिच्याशी बोलण्याची इच्छा बळावत चालली.

सगळे डोके खर्च झाले. (म्हणजे होते हे उघड आहे !) डोकेही एकच ! उपाय सुचेना. नागपुरी मुले या बाबतीत जराशी कच्चीच असतात. उगीच कुणाशी सभ्यतेचा आव आणून चार शब्द बोलणे त्यांच्या रक्तातच नसते. ' अहो ताई ' किंवा –' बेन, बेन ' म्हणून ओळख चिकटविणारा पुण्याचा अगर मुंबईचा विद्यार्थी या बाबतीत खरेच वरचढ आहे.

पण दुर्दैवाने उभ्या गाडीत त्याला असा विद्यार्थी देखील भेटला नाही. तात्पर्य असे की, आहे या मनःस्थितीत, एक मन उगीच ' नाही नाही ' म्हणत असताना तिच्याशी बोलणे त्याला शक्य नव्हते.

म्हणजे, आता ही मनःस्थिती बदलणे अगत्य विवेकाची टोचणी कमी कशी करायची ?

हाच, हाच विचार नक्की करून वर्धेचे स्टेशन कधी येते, याची तो वाट पाहत बसला.

गाडी पूर्ण थांबलीही नव्हती, तरी तो खाली उतरला आणि ठरलेले बेत, संकेत सगळे विसरून त्या डब्याकडे त्याने धाव घेतली. तिथे तो पोचला. त्याने तिला पाहिले. तो दोन पावले पुढे देखील सरसावला. पण—

पण काय ? आली स्वारी परत पुनः !

आणि दुसरा काही एक विचार न करता गार्डाची पैशाने परवानगी घेऊन तो मेलच्या फराळाच्या डब्यात घुसला. वेटरला महागातले महाग पदार्थ त्याने आणायला सांगितले व एक चांगलीशी बाटली पण घेण्याचे त्याने ठरविले. मद्यमांसाने मस्तपणा, धुंदी येते, असे म्हणतात. तोच प्रयोग ' सत्याचा ' म्हणून तो आता करणार होता. पहिल्या वर्गाचे सगळे पदार्थ, परवानगीदाखलचे पैसे, बाटलीची किंमत, सिग्रेटचा टिन, वेटरला दिलेली श्रीमंत चिरिमिरी–एवंच, एकूण स्वारीने वीस रुपये तर कसेबसे रेटले.

हे सगळे फस्त करून पुलगावच्या स्टेशनवर तो जो खाली उतरला, तो अगदी तर्र होऊन. घाईघाईने तो पुढे गेला. त्या वेळेला कदाचित तो बोललाही असता; पण

त्या डब्यात त्या जागी कुणी नव्हते. सामान तेथेच, पुस्तके तशीच, वर्तमानपत्रही तेच ! आणि ही स्त्री गेली तरी कुठे ? परंतु तिची वाट पाहत दाराच्या दांड्याला धरून तिथे फार वेळ उभे राहणेही शक्य नव्हते इतके समजण्यापुरता तो खचित शुद्धीवर होता.

हे असे. बिचाऱ्याचे पुलगाव देखील गेले.

राहता राहिले बडनेरा ! चांगले मोठे स्टेशन. उतारूंची जेवायची वेळ म्हणून गाडी तेथे बरीच थांबते. आपण तिला जेवायचा आग्रहच करू. काय वाटेल ते झाले, तरी आता वीस रुपयांची ही किंमत दिली तर तिच्याशी बोलूच, हा विचार त्याने हालवून हालवून बळकट केला. त्याच्या निश्चयाच्या आड काही येता काही कामा नये, असे त्याने ठरवून टाकले व तास–सव्वा तास बडनेऱ्याची एखाद्या जिव्हाळ्याच्या मित्रा-सारखी वाट पाहत तो बसून राहिला.

आगगाडी स्टेशनात घुसली, आता तिला जेवायलाच बोलवावयाचे असल्यामुळे पहिली चार–दोन मिनिटे त्याने मुद्दाम उशीर केला व सावज हातात गवसलं, अशी खात्री झालेल्या शिकाऱ्याप्रमाणे तो सावकाश त्या डब्याकडे जायला निघाला.

कधी कधी हातात गवसलेली शिकार देखील जाळ्यासकट पळून जाते आणि येथे तर ' जाळे ' कशाचेच नव्हते. तो डब्यापाशी आला व त्याची भेट झाली.

पण ती मात्र एका म्हाताऱ्या हमालाशी. त्याच्या दृष्टीने डबा रिकामा होता व तो हमाल सगळे सामान बाहेर काढीत होता. आजूबाजूची सगळी हवा बंद झाल्या-सारखा त्याला भास झाला.

' कुणाचे रे हे सामान ? '

' त्या, त्या बाईंचे. '

त्या बाई. दूरवर पुलाकडे त्याने नजर टाकली. होय तीच. त्याच पोषाखात. तशीच पाठमोरी. तेच गोरेपान नाजूक हात ... दर पावलागणिक याच्या प्रत्येक आशेच्या दीपाला ती फुंकर घालीत चालली होती.

हमालाने सामान उचलले. झाले ! वीस रुपये खर्च झाले ! बाकी दहा राहिले !

ते देखील त्याला खिशात ठेवावेसे वाटेनात. हसणार तरी कसा ? व रडणार तरी कुणाजवळ ? जी हुरहुर इतकी वाढली, ती आता थांबणार तरी कशी ? ती आता परत यायची नाही व हे दहा रुपयेही त्याला खिशात ठेवणे शक्य नाही.

स्वतःच्या डब्यात तो परत आला. यंत्राप्रमाणे त्याच्या घडामोडी सुरू झाल्या. त्याच्याजवळ दोन ट्रंका होत्या. एक त्याने वाजूला ठेवली. वळकटीत दोन उशा होत्या. एक काढून त्याने त्या ट्रंकेवर ठेवून दिली. एक पुस्तक, एक शाल ! आणि बाकीचे सामान आवरून आपली वळकटी त्याने अंथरली. कुणाचे ते सामान !

घाईघाईने तो खाली उतरला. सरळ बाहेर गेला. पुनः त्याने भोवताली पाहिले. त्याला 'कुणीच' दिसले नाही. तिकिट ऑफिसात जाऊन त्याने मुंबईचे एक तिकिट काढले व लगबगीने परत येऊन वेगळ्या काढलेल्या सामानात त्याने ते ठेवून दिले !

स्वतःचे तिकिटही नीट जपून पाकिटात ठेवले. त्याला जेवायचे नव्हतेच !

आणि तो जो झोपी गेला तो एकदम इगतपुरीच्या चहावाल्याचीच हाक त्याने ऐकली.

अर्थात त्या सबंध रात्रीच्या गाढ निद्रेत त्याला जी स्वप्नं पडली, ती कळली असती, तर फार फार बरं झालं असतं !

१७।१०।४०

६८

जीवन तयासी कोण घाली ?

उन्हाळ्यात झाडांना पालवी फुटते तेव्हा त्यांना जीवन कोण घालतो ? तुकारामाने उत्तर दिले, 'देव घालतो.' जमिनीत पाण्याचे अनंत झिरपे असल्यामुळे तुकारामाचे बोल खरे वाटले...

पण जेव्हा जेव्हा मी या माणसाकडे पाहतो तेव्हा मला कोडे पडते, की हा इतका आनंदी कसा ? याचे उत्तर देखील मला काही केल्या सापडत ताही. कारण, याच्या घरची परिस्थिती पाहिली तर अक्षरशः 'विटंबिती पोरे रांडा...' अशी आहे. रोगांनी ग्रस्त झालेली बायको, जिच्याकडून कशाचीही अपेक्षा करता येत नाही, मानसिक आणि शारीरिक असे गृहसौख्य अगदी शून्य ! तीन-चार मुले; पण ती मेली नाहीत म्हणूनच केवळ जगत असलेली ! घरी सगळा हा असा थाट आणि नोकरी कोणती तर मास्तरची ... !

मास्तरची नोकरी ! आठवड्यातून सात दिवस समोर पडलेला वह्यांचा गठ्ठा ! हेडमास्तरांचे, इन्स्पेक्टरांचे, ज्याला शिक्षणाचे एक अक्षरही कळत नाही अशा म्युनिसिपालिटीच्या भडभुंज्या मेंबराचे व अध्यक्षाचे 'इन्स्पेक्शन !' मुलांच्या वागणुकीचे सप्तरंगी तक्ते ! रेकॉर्ड्स ! ज्यांची नावे उच्चारताच अन्नपचन होईल अशा एकेक अव्यावहारिक शिक्षण पद्धती... !

...आणि मिळत असलेला पगार अवघा चाळीस !

तथापि हा माणूस सदा हसरा. हसतो तेव्हा वाटते, मोती माणके सांडलीत ! ते कृश शरीर हर्षाने सदैव पुलकित झालेले असते. ते डोळे दिवाळीच्या रत्नदीपासारखे सदैव सतेज दिसतात. मास्तर शाळेत आले म्हणजे सगळी शाळा आनंदाने उचंबळू लागते. मी जर अठराव्या शतकातील लेखक असतो तर असेही वर्णन

करायला कमी केले नसते, की त्याचे पाऊल शाळेच्या आवारात पडले, की बागेतील सगळी फुले फुलतात !

हे आनंदाचे झिरपे याला कोठून मिळत होते ? देवाच्या घरून हा कोणते अमृत पिऊन आला होता ? त्याचे मन कसे अगदी तलख, हौशी, उल्हसित !

मास्तर शाळेत आले. वर्गातील सगळी मुले त्यांच्याभोवती जमली. कोणी त्यांची पुस्तके पाहू लागला. कोणी खिशातील खडू पळविले. कोणी नुसता त्यांच्या अंगाला हात लावून ते आपलेच मास्तर किंवा नाही याबद्दल खात्री करून घेतली. शिस्तीच्या एकाही तत्त्वाला संमत नव्हता हा प्रकार. पण मास्तर म्हणत, " आता या वयात मी कसली शिस्त शिकणार ? मला कसलं जमतं ते. हे तर माझं घर आहे. "

मास्तर वर्गात गेले. लहान मुले नीट बसली होती सगळी. सर्वांनी पुस्तके उघडली. वह्या काढल्या. तारखा घातल्या आणि मास्तर काय शिकवतात याकडे सर्वांचे लक्ष लागले.

मास्तरांनी कविता शिकविण्यास घेतली. बालकवींची कविता ती. ' श्रावण मास ! '

वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधले, नभोमंडपी कुणि भासे ॥
झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा ! तो उघडे
तरुशिखरावर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे ॥

अगदी शांतपणे मास्तरांनी ही कविता वाचली. मुलांना वाचायला सांगितली.

" कोण वाचतो गड्या ? "

सगळ्यांचे हात वर उठले. पण इतक्यांना एकदम कसे विचारणार ? एकालाच विचारणे शक्य होते. पुढे मास्तरांनी प्रश्न विचारला,

" देवाचं धनुष्य कुणी पाहिलं ? "

" आम्ही ! " सगळी मुले.

" ते कुठे असतं ? "

" आकाशात ! " सगळी मुले.

" आता मी ज्याला प्रश्न विचारीन तोच फक्त उत्तर देईल हं. आपल्याला पाऊस कोण देतो ? "

" देव ! " अनंताने उत्तर दिले.

" कुठून देतो ? "

" ढगांतून. "

" ढग कसे असतात ? "

ज्या ज्या मुलाकडे मास्तरांनी बोट दाखविले त्या त्या मुलाने मोठ्या ऐटीत आजूबाजूला गौरवाने पाहत चटचट प्रश्नांची उत्तरे दिली. दर वेळेला वर्गातील सगळे हात उठत आणि खाली जात. एका वेळी एकच मुलगा उभा राही. बाकीचे निराश !

पुढची कविता मास्तर वाचू लागले. एक मुलगा धीटपणे उठला. म्हणतो, " सर, आता मला प्रश्न विचारा. " मास्तरांनी ते कबूल केले. प्रश्न विचारला गेला.

पण मास्तरांची सगळी शिस्त गुंडाळून ठेवून दुसऱ्याच मुलाने उत्तर दिले ! तिसऱ्या प्रश्नाच्या वेळी देखील असेच झाले.

आणि चौथ्या प्रश्नाअगोदर झाडून साऱ्यांचे लक्ष उजवीकडील तिसऱ्या बाकावर लागले. आपल्या जागेवरून सगळी मुले तिकडे पाहू लागली. मास्तरांनाही क्षणभर काही सुचेना.

विनायक ओक्साबोक्शी रडत होता. त्याचे सावळे गाल आसवांनी भिजून गेले होते. त्यातच पुन्हा मास्तरांनी त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्याला रडण्याचे कारण विचारण्यात चूक केलेली ! अशाने कोठे मुले रडायची थांबतात ? विनायक अधिकच हुंदके देऊ लागला. रडत रडतच त्याने मास्तरांना कारण सांगितले. " सर, तुम्ही मला कालपासून एकही प्रश्न विचारला नाही. मी कालही हात वर केला होता. आज देखील प्रत्येक वेळेला तुम्ही दुसऱ्यांनाच विचारलेत. तुम्ही माझ्यावर रागावलात ? मी मट्ठ आहे असं तुम्हांला वाटतं ? " आणि बाकीची वाक्ये हुंदक्यांनी पुरी केली गेली !

ते सगळे हुंदके थोपवून धरणे मास्तरांच्या शक्तीबाहेरचे होते. विनायकाच्या जणू हृदयाला जखम झाली होती व सगळा जीवनरस डोळ्यांवाटे बाहेर ठिबकत होता. काय करावे हे मास्तरांना कळेना. त्यांना वाईट वाटले.

पण त्याच वेळी त्यांना असा भास झाला की, कोणीतरी आपल्या पाठीवरून मायेने हात फिरवून आपला शीण घालवीत आहे ! विनायकाचे ते कढत अश्रू, त्यांच्या सरीवर सरी ! चौदा चौकड्यांचे राज्य देऊन सुद्धा एखाद्या राजाला ही आसवे मिळाली नसती. कुबेराची सारी संपत्ती ओवाळूनही कुबेराला निराश व्हावे लागले असते. हे खारे पाणी दुधाच्या समुद्रातून निघाले होते. ज्यांच्या दैवी ते लाभणे लिहिलेले असते त्याला जगातील कोणतीही आपदा सहनीय वाटते.

हेच अमृत हा माणूस रोज रोज पितो आणि म्हणूनच याच्या डोळ्यांवर जगण्याची धुंदी सदा सर्वदा असते. असल्या बेहोष माणसाला पाहूनच कदाचित कोलरिजने रेखाटले असेल ते चित्र—

Beware ! Beware ! !
His flashing eyes, his floating hair !
Weave a circle round him thrice,
And close your eyes with holy dread,
For he, on honeydew hath fed
And drunk the milk of Paradise.

१९।१०।४०

६९

वर्षा

जमीन तापली आहे. भेगाभेगांतून वाफा निघताहेत. टेकड्या उष्णतेने सण-सणत आहेत.

कधी ढग जमतील ? कधी गर्जेल ? कधी ओला सुगंध मिळेल ?

आकाश काळे झाले. पाण्याचे पर्वत आकाशात भरले. काळे भोर. ढगांच्या सावल्या जमिनीवर पडल्या. सुग्रास अन्नाच्या सुगंधाने अर्धी तृप्ती होते. धरित्रीस धिवसा आला.

आणि मोठ्याने गर्जले—मोठ्याने पडले !!

वर्षा ! आकाशातल्या तारा सांडल्या. रत्नाचे रांजण उपडे झाले. धरित्रीची तृषा निमाली !

वर्षा ! सगळा भूभाग जलमय ! वृक्ष धुतले गेले. पवेंतांनी अंघोळ केली. सगळे शुद्ध, शुचिर्भूत–अखंड परिमल !

वर्षा ! जमीन सडकली गेली. यौवनाचा उन्माद ! त्याला सीमा नसते. त्याला घर नसतो. वेग. शक्ती !

आता हा भूप्रदेश जलमय झालेला आहे. रस्ता घसरंडीचा आहे. जपून पावले टाकली नाहीत तर तोल जाईल—पाय घसरेल !

शेतकरी चिखलाने भरलेल्या जमिनीत जपून, मोजकी पावले टाकीत बी पेरतो आणि वर्षाकाठी सोन्याची रास भरून घेतो.

आणि आता ही वर्षा सुरू झाली आहे !

४।१।४१

७०

जीवनशुद्धी

आमच्या नागपूरच्या तेलंखेडीच्या तलावावरील रम्य सायंकाळ. देखावा मनाला ओढ लावणारा, पण उदास करून टाकणारा. तीन बाजूंनी जंगल, अंधार पडलेला. तलावाचे पाणी काळे झालेले. पाण्यातील कोंबड्या वर उडत, आणि आकाशात ओळीने,

थव्यांनी घिरट्या घालीत. चित्रविचित्र अशा त्यांच्या आकृती ! पंखांची सळसळ आणि खाली येऊन एकदम त्या पाण्यात पसरत. अगदी थवाच्या थवा, सगळ्या एका हारीने उडत. एका हारीने पाण्यात पसरत !

काठावरील दगडावर काळी आकृती. भेसूर काळी सावली. उदासवाणे तिमिरचित्र एका स्त्रीचे. ती दगडावर फडाफड धुणे आपटीत होती. पाण्यात ओला पिळा बुडवायचा, आपटायचा, पुनः त्यातले पाणी काढून टाकायचे. प्रत्येक हालचालीत घाई.

सायंकाळ. पोरे घरी कदाचित रडत असतील. ज्याला सुसंस्कृत भाषेत पती म्हणतात, तो आला असेल. भाकर तुकडा झाला नसेल—

आणि ही इथे घरातील चिंध्या फडफडत होती. घाई करणार नाही तर काय ! मुलांची माया. नवऱ्याची भीती !

पुनः स्वतःबद्दल काही म्हणायचे नाहीच. स्वतःचा त्रास ? पण सगळाच जबरीचा त्याग. त्याला नावे कुणी ठेवावी ? आणि समर्थन तरी कसे करावे ?

कसे विचित्र ! 'कपडे' स्वच्छ व्हावेत म्हणून ते 'जीवना' त बुडवायचे. पुनः त्यातले 'जीवन' घासून, पिळून, सुकवून, घडी घालून नाहीसे करावयाचे-अशाने 'वस्त्र' स्वच्छ होते.

आणि हा मनाचा मळ धुवायला काढला तर ? पण तो बुडवायचा कशात ? आणि सुकवायचा कशाने ?

८।३।४१

७१

शैशव स्मृती

मी पक्का निश्चय केला होता, की मनाच्या पृष्ठभागावर पुन्हा म्हणून ह्या सर्व गोष्टी कधी येऊ द्यायच्या नाहीत. जीवनाचं हे सबंध भांडं पिऊन टाकायचं आहे. उसंत म्हणून घ्यायची नाही !

पण ह्या पराजयाच्या गोष्टीने माझं मन मात्र कमकुवत कधी झालं नाही. उलट, त्यामुळे मनाला एक प्रकारची विलक्षण हुरहुर वाटते.

त्या वेळी मी आठ-नऊ वर्षांचा होतो. अंगभर कपडे घालून, पुस्तकं घेऊन, साल्स मुलासारखा शाळेत जात होतो. हातातील पुस्तकं केव्हाही फेकून देण्याची तयारी असल्यामुळे सर्व मुलाचा आवडता होतो नि घरी तर विचारायलाच नको. मी पोसलेल्या मनीची देखील राजकन्येपेक्षा जास्त काळजी घेतली जात होती. आजूबाजूच्या दुनियेच्या

मानाने माझ्या सुखात उणेपणा असा काहीच नव्हता; नि ह्या दर्पपूर्ण जाणीवेने त्या वेळी माझा चेहरा सतत फुललेला राहत असावा असं अजूनही मला वाटतं, कारण त्याचे काही अवशेष आजतागायत शिल्लक राह्यलेले आहेत !

त्या शैशव-मुग्ध, स्नेह-स्निग्ध बाल्यातील सर्व स्मृतींचा इथे पुनरुच्चार करीत नाही. फक्त दिगंत विजयाच्या माझ्या त्या अवस्थेला कुठून नि कसा आघात पोचला हेच पाह्यचं आहे.

पण एक प्रश्न आज आणखी मनात थैमान घालतो. मन विचारतं, 'तू त्या अनुकूल परिस्थितीचा पुरेपूर फायदा का घेतला नाहीस ?' खरंच ! मी माझ्या उन्नती-साठी आणखी जास्त झटायला हवं होतं. तथापि, शिकण्यासारखं काही होतं का त्या वातावरणात ? ह्या प्रश्नाचं आज उत्तर अचूक 'नाही' असं येतं नि म्हणून त्या वेळीही त्या सर्व समृद्धीत सुद्धा माझं मन कशाकरिता तरी सतत भुकेलेलं असे !

अजूनही ती वेदना निमाली नाही.

त्या दिवशी शाळेत जायला घरून तसा मी लवकर निघालो होतो, पण रस्त्यात संभावितपणा करून एक भांडण मी अंगावर ओढवून घेतल्यामुळे शाळेत पोचायला उशीर झाला होता. तहान लागली होती म्हणून शाळेसमोरील नळावर पाणी प्यायला गेलो. फार घाई होती मला नि म्हणून नळावर त्या चिमुरड्या मुलीला सावकाश अंघोळ करताना पाहून मला फार राग आला. थोडयाशा तोऱ्यात मी तिला दरडावलं, " ए मुली, दूर हो, पिऊ दे मला पाणी. ही काय अंघोळ करायची जागा आहे ? "

सुखवस्तू घराण्यातला मी मुलगा. अंघोळीची जागा रस्त्यावर असते ही माझी कल्पना असणं शक्य नव्हतं. निदान तसं मला समजावून तरी देण्यात आलं नव्हतं. मी उच्चारलेलं ते वाक्य ! माझे आजोबा असेच खेकमत कुणावरही व हीच देणी माझ्यापर्यंत आली होती. ह्यापेक्षा जास्त देण्यासारखं, शिकवण्यासारखं त्यांच्याजवळ होतं तरी काय ? आम्ही काहीही म्हटलं तरी 'रस्त्यावर अंघोळ करणाऱ्यांनी' ते निमूटपणे सहन करावं नि दूर व्हावं हेच पाहायची आमची सवय !

पण ती राकट मुलगी काही एक मनावर न घेता जेव्हा अगदी स्वस्थ अंघोळ करू लागली तेव्हा माझं मिजासखोर चित्त चिडेला आलं नि मी तिच्या अंगावर धावणार तोच ती शांतपणे मला म्हणते, " थांब ना थोडा वेळ, माझी अंघोळ झाली की पी पाणी हवं तेवढं. फारच घाई असेल तर हा नळाचा दांडा ओढून धर म्हणजे मी दोन्ही हातांनी अंघोळ लवकर आटपत्ये. "

असल्या प्रतिकाराची मला मुळीच सवय नसल्याने मी थोडा वेळ वरमलो. जातीचं ब्राह्मण्य तसं जिभेवरच होतं. तरी देखील काय करावं हे मला काही वेळ सुचलं नाही.

माझ्या भोवतालच्या जगातली तर ती मुलगी खचित नव्हती, शाळेच्या पटांगणातच थोडा पलीकडे बलुच्यांचा एक तांडा मुक्कामाला होता. क्षणभर तिकडे नजर टाकली, तरी त्यांच्या राहुट्या नि उमदे घोडे दिसत होते. तिथलीच ती मुलगी होती. हे बलुची कच्ची वांगी खातात, लहान गोऱ्यागोमट्या मुलांना पळवतात, असल्या गोष्टी सांगून लहानपणी मला आईने भीती दाखवली होती. सबब एकदम तिचा हात धरून तिला दूर लोटण्याची—एरव्ही धीट असणाऱ्या मलाही—हिंमत झाली नाही. तिची मुद्रा अगदी बेफिकीर होती. अजूनही त्या दहा वर्षांच्या चिमुकल्या मुलीचा तो लालबुंद सुंदर मुखडा माझ्या डोळ्यांसमोर दिसतो. बालपणीचे मनावरील ठसे लवकर पुसले जात नाहीत. मी तिथे तसाच उभा राह्यलो. ती बालिशपणे माझ्याकडे पाहत, हसत हसत, आपलं गोरं गोरं अंग धूत होती. त्या वेळी ती माझ्या दृष्टीला कशी दिसली असावी हे इतक्या दिवसांनंतर आता माझ्याने वर्णन करणं शक्य नाही. तथापि आज लोक जेव्हा माझ्यासमोर 'शाकुंतला' तील वनलतेची स्तुती करतात तेव्हा, किंवा एखादी बाणेदार तेजस्वी स्त्री आज अवचट मला दिसते तेव्हा मात्र मला त्या नळावरील मुलीची आठवण येते. वाटतं, ही बाई ह्या मुलीसारखीच बालपणी कणखर नि धिटुकली असावी. तिच्या अंगावरचं रंगीत जीर्ण वस्त्र माझ्या आठवणीतूनही फाटून गेलं आहे. तथापि तिचा प्रत्येक खडा बोल मात्र आजही जसाच्या तसाच आठवतो.

आपली लहानशी तंगडी खरपूस दगडाने घासीत ती मला विचारते. "तुझं नाव काय रे ?"

खरंच सांगतो, त्या वेळी माझ्या मास्तरांनी देखील मला असं हडसून खडसून अरेतुरेच्या भाषेत कधी विचारलं नव्हतं. मी निमूटपणे माझं नाव तिला सांगितलं. लागलीच ती पुन्हा विचारते, "तू शाळेत काय शिकतोस ? त्या पुस्तकात काय आहे ? तुला घोड्यावर बसता येतं ?"

ह्या दुसऱ्या प्रश्नानंतर थोडा सावर धरून मी देखील तिला दिमाखाने विचारलं, "तुला करायच्या काय ह्या पंचायती ? लग्न करणार आहेस का माझ्याशी ?"

अर्थात लग्न बिग्न इत्यादि सगळे शब्द नि असले प्रश्न विचारण्याचा कुलाचार मी घरूनच शिकलो होतो.

तिला मात्र त्या शब्दांचा अर्थ समजला असावा. ती हसली नि डोळे भरून तिने माझ्याकडे पाह्यलं. मी किती लाजून गोरामोरा झालो होतो हे अजूनही मला आठवतं नि हसू येतं. ती मात्र ह्या एकंदर कल्पनेने खुश झालेली दिसली. ओलेत्यानेच उठून चटकन तिने नळाचा दांडा ओढून धरला नि म्हणाली, "हं घे; हा दांडा धरून ठेवते. पी पाणी."

रस्त्यावरचे नळ आपल्या परिचयाचे आहेत. जोपर्यंत दांडा ओढून धरला तोपर्यंतच पाणी येतं नि सोडला की पाणी बंद !

मी पाणी प्यालो व काही एक न बोलता मुकाट्याने निघालो. पण...

"ए मुला पळतोस काय ? धरून ठेव ना दांडा जरा. तोपर्यंत मी केस धुऊन घेत्ये. "

नुसते हुकमी हुकूम !

मी दुखावला गेलो नि तिला चक्क नाही म्हणून सांगणार तोच...तिने माझा हात धरला. ती आपल्या जातीची नव्हतीच. चढत्या सुरात मला म्हणते,

"तू कशाला मदत करशील कुणाला ? तुम्ही हिंदुस्थानी लोक. तुमच्या कायद्यात थोडंच हे येणारं आहे. हमालासारखं पुस्तकांचं ओझं घेऊन जातोस कशाला शाळेत ? फेकून दे ती पुस्तके. माझा घोडा तरी तुझ्यापेक्षा जास्त शहाणा आहे. "

आम्ही हिंदुस्थानी लोक ! ही अशी कायदेशीर भाषा मला कुणी कधी सुनवली नव्हती. मी पुष्कळ विचार करून पाह्यला. आमचा कायदा तो काय ? पुष्कळांना मी हा प्रश्न विचारला नि सर्वांनी मला मूर्खात काढलं. उत्तर मात्र मला मिळालं नाही.

त्यानंतर किती तरी दिवस तिचा मुक्काम त्या गावात होता. तिथे ती असेपर्यंत तिला रोज उंच, धिप्पाड अशा अरबी घोड्यांवर नुसते त्याचे केस धरून उघड्या पाठीवरून रपेट मारताना मी पाह्यलं होतं. वचकच बसला होता मला तिचा ! कोणत्या शक्तीने त्या वेळी तिने माझ्यावर अशी सत्ता जमविली कुणास ठाऊक. पुष्कळदा मला वाटे तिला थांबवावं नि म्हणावं "तू मला विसरू नकोस. माझी ओळख ठेव. "

आजवर किती तरी लोकांनी 'आम्हांला विसरू नकोस' असं मला विनवलं होतं; पण मला त्याबद्दल कधी काही वाटलं नाही. आज मी मनोमन तिला आळवीत होतो, " मी दुर्बळच का असेना; पण मला विसरू नकोस. मला धिवसा वाटेल त्याने " पण पुन्हा भीती वाटे. आणखी ती एखादा कायदा काढील नि मला पराभूत करील !

नि तसं झालंही ! आठ-दहा वर्षांनी पुन्हा ती मला भेटली. गावात चाकू कात्र्या विकायला आली होती. भरदार जवानीत पेरूच्या सरस कांतीने तिचं सर्वांग मुसमुसलं होतं नि तिच्या रंगीबेरंगी कपडयांतून आपल्या आरोग्याची साक्ष देत होतं. तिची पावलं पृथ्वीलाही जाणवत असत. रानात स्वैरपणे वाढणाऱ्या नि विपुल सूर्यप्रकाशात सुरंगलेल्या झाडासारखी तिची सर्वच ठेवण रानवट नि सुंदर होती. कच्ची वांगी खाऊन नि घोडयावर रपेट मारून जर असलं निर्भय सौंदर्य मिळू शकतं तर आम्ही वस्त्राभूषणांची नि प्रसाधनांची कास का धरावी हे मला अजूनही समजत नाही.

ती आमच्या घरावरून 'चाकू कात्र्या' ओरडत जात होती. दादा दुपारी जेवून ओटीवर बसले होते. त्यांनी तिला हाक मारून चाकू दाखवायला सांगितलं. ती आली. आपलं गवाळं तिने सोडलं नि एक चाकू दाखवून अवास्तव किंमत सांगायला लागली.

दादांना अर्थात राग आला नि ते मोठ्याने काही तरी बोलले. ती दबणार थोडीच होती ! ती अगदी तेवढ्याच चढत्या आवाजात म्हणाली, " तुम्ही दखनी लोक, कधी असल्या वस्तू पाहिल्या तुम्ही ? नुसत्या बोलायच्या कामाचे ..... "

मी आवाज ऐकून बाहेर आलो. चटकन तिला 'ती' म्हणून ओळखलं. तिनेही क्षणभर मला वाटतं आपली दृष्टी माझ्यावर स्थिर केली. ओळखलं असेल तिने मला ? हसतमुखाने डोळे भरून पाह्यलं होतं. ती परत जायला निघाली तेव्हा तिला दाराजवळ मी गाठलं नि विचारलं, " ओळखतेस मला ? लहान होतीस नि आमच्या शाळेच्या नळावर अंघोळ करीत होतीस. " मी त्या शाळेच्या नळाकडे बोट दाखवलं. ती हसली नि माझ्याकडे पाहून मला म्हणते, " ओळखणार का नाही ? आम्ही एखाद्याला मनात ठेवतो ते हमेशासाठी ठेवतो. विसरत नाही. पण इतक्या वर्षांत तू इतकाच वाढलास ? माझ्याकडे पाहा. मी कशी छान दिसत्ये. आता तुला एक ठोसा मारीन तर तू जाऊन पडशील तिकडे. चल, चल. काय इथे राहतोस ? मी तुला घोड्यावर बसायला शिकवत्ये. "

हे सगळं अवखळ खरं; पण मला मनापासून आवडलं. एका उसळीसरसं असं वाटलं, की जावं तिच्याबरोबर नि शिकावं सगळं. मन, शरीर बळकट तरी होईल. मग कुणी आपल्याला ठोसा मारणार नाही नि मनालाही असे धक्के बसायचे नाहीत.

नंतर ती एक-दोनदा उगीच चाकू-काड्यांच्या मिषाने आली होती; पण मी त्या वेळी घरी नव्हतो. ह्या आठ-दहा वर्षांत जे लाभलं नाही ते तिच्या एका निर्भर्त्सनेने नि तिच्या आड लपलेल्या सौहार्दाने मिळालं. जाऊ मी तिच्याबरोबर ?.....

पण भीती ! आईची, दादांची, माझी, माझ्या पुस्तकांची, तिच्या ठोशाची... भिता भिता उभा जन्म गेला. वाडवडलांपासून तीच देणगी मला मिळाली होती. मग त्या मुलीला—मजबूत, धिप्पाड जनावराला घामाघूम करून आणणाऱ्या, आता मोठ्या झालेल्या, आमच्या जातीच्या नसलेल्या त्या मुलीला—मी का भिऊ नये ?

जेव्हा जेव्हा हे सगळं आठवतं तेव्हा तो प्रश्न पुनः पुन्हा मनात थैमान घालतो. माझ्या देशाच्या कायद्यात दुसऱ्याला मदत करण्याचीही असू नये का ? नि आपल्या हिताच्या गोष्टी करून टाकतानाही मन भीतीने कचरावं का ? ह्या साध्या माणुसकीच्या गोष्टी ! पण त्यासाठीही इतरांकडून हिडिसफिडिस करवून घेण्याची वेळ यावी !

ह्या माझ्या खोलीभर पुस्तकं पसरली आहेत. सर्व वाचून संपवली. पण कुठे म्हणता कुठे प्रकाश दिसत नाही. वीरांच्या कथा वाचल्या. शूरांची गीतं गायली; पण अजून माझी खात्री आहे, की पुन्हा एक दिवस अवचित ती येऊन उभी राह्यली नि तिने विचारलं तर तिच्या एकाही प्रश्नाचं उत्तर मला देतां यायचं नाही. सर्व देशांचे कायदे पाह्यले. थर्मापलीच्या घाटाजवळ स्पार्टन लोकांचा स्मृतिलेख आहे. झर्झिस-

बरोबर झुंझून लिझोनिडस आपल्या एकूण एक वीरांसहित तिथे मरून गेला, आता फक्त काही वाक्यंच ह्या सर्व प्रकाराबद्दल इतिहासात नमूद आहेत...

"हे प्रवासी लोकहो, तुम्ही कधी ह्या रस्त्याने स्पार्टाकडे गेलात तर स्पार्टन लोकांना आमचा असा निरोप सांगा, की आमच्या देशाच्या कायद्याला अनुसरून ह्या ठिकाणी आम्ही आमचे देह ठेविले आहेत."

स्पार्टन लोकांच्या देशाचा कायदा, की सगळ्यांनी लढायचं नि रणभूमीवर सुखनैव निद्रा घ्यायची !

आणी आमच्या देशाचा...! खरंच, काय आहे आमच्या देशाचा कायदा ?

स्पार्टन लोकांच्या त्या देशाला जाण्याचं भाग्य लाभलेला प्रत्येक प्रवासी हटकून त्या ठिकाणी थांबत असेल नि ते स्मृतिचिन्ह पाहून स्वतःला धन्य धन्य समजत असेल.

आजवर पुष्कळ पाह्यलं, अनुभवलं. बलुची लोक, त्यांच्या त्या राहुट्या, ते उमदे घोडे—कितीदा तरी पाह्यलं—नि प्रत्येक वेळी तिच्या सांगण्याप्रमाणे सगळीं पुस्तकं फेकून देण्याचीच सतत इच्छा मनात राह्यलेली आहे.

पुन्हा ती मेटेल कधी मला ? भेटली तर मी खरंच भिणार नाही. तिला मी खचित विचारीन. म्हणेन, "मला सांग, तुझ्या त्या उमद्या घोड्यावर बसून तू किती प्रवास केला आहेस ? नि आमचा देश कितीसा पाह्यला आहेस ?"

ती खात्रीने उत्तर देईल. कारण तिचा घोडा भरधाव चौफेर उधळीत तिला कुठे नाही तरी लिओनिडसच्या देशाकडे खचित खचित घेऊन गेला असावा !...

२३।११।४२

७२

अग्निदिव्य

आयुष्यात सत्कार्यास्तव पुष्कळांशी पुष्कळ वेळा मेळावा साधला. आजही येथे झंझावाताने आमची वावडी केल्यामुळे जमलो आहोत. आम्हा परस्परांतील सर्व भेदभाव निमाले आहेत. बाहेरच्या सुखदुःखांपासून आमची राखण करणाऱ्या भिंती अकाळविकाळ व भेडसावणाऱ्या अशा आहेत. जीव तोडून आम्ही ओरडलो तरी देखील आमच्या हृदयाचा हाकारा ह्या भिंती सहज पचवून टाकतील, ही विदारक जाणीव आमचे मन खात असते. कोसळणाऱ्या पर्वताचा सर्व गुरुभार आम्हा सर्वांना सहन करावयाचा आहे, या एकाच तीव्र जाणीवेने आम्ही दडपून गेलो आहोत.

जे जे सुखाचे क्षण पूर्वायुष्यात वाट्याला आले असतील ते स्वप्नात जमा झालेले आहेत. या भिंताडांचे निःशब्द हिडिस आक्रंदन, मजबूत गजांचे खडाखडा होणारे आवाज आणि सर्व सद्भावनांना पचवून निगरगट्ट झालेली निर्घृणता, हे सर्व सत्य, त्याविना बाकी सर्व असत्य, ही खात्री झाल्यासारखी मनःस्थिती झाली आहे. सायंकाळच्या वेळी अवचित कोठूनसा सुगंधी वारा आला कीं सुख होते. मध्यरात्री, थकून अर्धवट ग्लानीत असलेल्या शेजाऱ्याचे कण्हणे ऐकले, की झोप भिऊन पळून जाते. अशा त्या जीव घेणाऱ्या शांत वेळी दुरून कोठून तरी हवेवर ऐकू येणारे कुत्र्याचे भुंकणे मनाला धीर देते. वाटते, ज्या जगात आम्ही आमची सुखःदुःखे पेरलेली होती, जेथे आमच्या शिणलेल्या शरीरावर मायेचे हात फिरले होते; जेथे आमच्या दुःखांना रत्नदीपांसारख्या तेजस्वी नेत्रांतून स्नेहकिरणे लाभली होती, ते सुजल, सुफल, मलयज-शीतल असे बाहेरचे जग अजून आहे. आमच्या आयुष्याची पाच-दहा वर्षे येथे, त्या जगापासून दूर अशी गेलेली असली तरी त्यांच्यात काही एक बदल झाला नाही आणि कधी काळी त्यांच्यात पुन्हा मिसळण्याची सुसंधी मिळाली तर मांडलेला डाव पुनः सुरू करता येईल. आज ते जग दूरदूरचे वाटत असले, स्वप्नमय भासले, तरी तेच सत्य आहे आणि हा काळ्या फत्तराचा, आमचे कोवळे जीव खाऊन टाकणारा पापाणदुर्ग कितीही सत्य भासला तरी तो असत्य आहे !

असत्याने संमूढ होणे यासारखे संकट दुसरे नाही व म्हणूनच जणू काय तेथे असणारे सर्व जीव या संकटाच्या काळसावलीत एकरूप झाले आहेत. कधी काळी आम्ही वेगळे होतो ही जाणीवही मनाला शिवत नाही. आमच्या सर्व शुभकामना, आशा, आकांक्षा आम्ही परस्परात पेरून दिल्यामुळे आमची सर्वांची हृदये भारावलेली आहेत व पाच वर्षांचे एक चिमुकले जग येथे निर्माण झाले आहे. छोटी सुखदुःखे येथे विस्तरित झालेली आहेत. आमचे सगळे सगेसोयरे, आमचे आप्तइष्ट आणि मायमाउली सर्व आम्हीच आहोत !

सायंकाळी पाखरे परतल्यावर थाळीत पडेल ते खाऊन आपल्या जागी बसलो, की एका दिवटीच्या अपुऱ्या प्रकाशात आम्ही सर्व मिळून, व्याकुळ, संभ्रमित चित्ताने ईश्वराला आळवितो आणि... स्वस्थ पडून असतो. पाखरे झोपून जातात. झाडाचे पानही हालत नाही. सर्वत्र नीरवता पसरते. परंतु आम्ही मात्र आमची सर्व शक्ती डोळ्यांत आणून व डोळे तारवटून दिसेल तितक्या दूर बघत बघत निपचित पडतो.

मध्येच एखाद्याला गतदिवसांचा आठव होतो !

हा आमचा एक शेजारी. चार वर्षांपूर्वी येथे आला तेव्हा कसा गोजिरवाणा, राजबिंडा दिसत होता. आज त्याची सगळी हाडे मोजून, शिकलेल्या गणिताची मला उजळणी करता येते. परवा तो म्हणाला,

" माझी आई माझ्या स्वप्नात आली होती. तिने मला कुरवाळलं. तिचे डोळे पाण्याने भरले होते. ती कळवळ्याने मला म्हणत होती, ' तू परत ये. आता पुन्हा म्हणून कधी तुझ्या हिताला मी माझ्या प्रेमाचं बंधन घालणार नाही. तुला हवं ते कर, पण माझ्या दृष्टीआड होऊ नकोस. हे शिणलेले डोळे आता एकदम मिटतील. मिटायच्या अगोदर तू मला दिसला नाहीस तर' ..."

त्याच्याने पुढे सांगवले नाही आणि आमच्याने धैर्य धरून ऐकवलेही नाही. त्याचे डोळे उष्ण आणि खाऱ्या जीवनरसाने भरून आले. त्या माउलीच्या स्मृति-गंगेत आमच्याही आसवांच्या कावडी आम्ही रिकाम्या केल्या !

स्वप्नात दिसलेली ही त्याची आई ! केवढ्या कष्टाने तिने त्याचा पिंड पोसला होता ! त्याच्या पायात एवढासा काटा जरी बोचला, तरी तिच्या नेत्राची बाहुली दुखावत असे. न्हाऊन, माखून, प्रेमाचे घास भरवून, एकदा त्याला शाळेत पाठवला, की ती सूर्याची प्रार्थना करीत असे, ' देवा, तुझ्या किरणाची उभारी त्याच्यावर पडू देऊ नकोस. ' त्याला कधी कोणी चांगले म्हटले, की हिचे थकलेले शरीर तारुण्याच्या जोमाने काम करू लागे. हा शिकेल, फार चांगला होईल, ही तिची महत्तम आकांक्षा !

त्यानेही आईच्या आज्ञेने निष्ठेने गायत्री जपली होती. सवित्याचे हिरण्मय तेज याच्या बुद्धीला चेतवीत होते. तिच्या सांगीने त्याने मुंगीला साखर घातली होती आणि आता संत्रस्त, उपाशी मानवजातीच्या पोटात अन्नाचे कण जावेत व त्यासाठी हवा असल्यास आपला जीवही खर्ची पाडावा ही तळमळ त्याला लागली होती. आईच्याच आज्ञेने त्याने पिंजऱ्यातील पोपटाला मोकळे सोडून दिले होते आणि आता सगळ्यांच्या लोहशृंखला तुटाव्यात म्हणून लोखंडी घण उचलण्याचा हटातटाचा प्रयास तो करीत होता.

ह्या वात्सल्याच्या उबदार घरट्यात आईच्या मांडीवर डोके टेकून स्वस्थ झोपला असताना एकाएकी त्याची आई विश्वव्यापी झालेली त्याला दिसली. तिची दिव्य, विशाल, पाशबद्ध आकृती...

...तो तसाच उठला, आईला तिच्याच प्रेमाची शपथ त्याने घातली आणि विनविले, " मला जाऊ दे. मी तुझीच सेवा करीन. तुझाच उपकार स्मरेन, पण ह्या तुझ्या पाशातून मला मोकळा कर. "

पण तिचे ते रक्तामांसाचे शरीर हा पोटचा गोळा दूर करायला तयार नव्हते, संगर सुरू झाला. अंगातल्या सर्व शक्तींनी पोसलेला देवाघरचा मातीचा हा गोळा तिने आपल्या बाहुपाशी घट्ट आवळून ठेवला होता. असत्याशी झगडता येते अन्यायाशी झुंज देता येते, पापाचे भांडे फोडता येते, पण प्रेमाचा, वात्सल्याचा, माउलीच्या मायेचा हा प्रतिकार. केवढा भयंकर संग्राम !

आमचे मेंदू या पलीकडे कल्पना करायला असमर्थ ठरले आहेत. इतक्या वर्षांच्या निष्क्रियतेने बधिर झाले आहेत (आणि म्हणूनच आम्ही जिवंत राहिलो आहोत), कल्पनाशक्ती आणखी ताणली, की स्मृतीच्या तारा छेडल्या जातात व सुखाची सवय निमून गेल्यामुळे तो झंकार सहन होत नाही.

माझ्या बाहूवर कढत अश्रू टाकणारा आणि शरीरस्पर्शाने धिवसा मिळवू पाहणारा हा माझा आणखी एक साथी हुंदके देत आहे व कोणाचे तरी नाव अस्पष्ट उच्चारीत आहे. गेल्या सहा वर्षांत या नावाचा उच्चार करण्याची त्याची सवय तुटली आहे. पण तत्पूर्वी अग्निसाक्ष, देवा-ब्राह्मणांच्या समोर त्याने ते नाव उच्चारले होते आणि जीविताच्या सातत्यासाठी त्या व्यक्तीला ध्रुवाचा तारा दाखविला होता. त्याचे जीवन मात्र अस्थिर ठरले व कोणाची तरी आर्त हात ऐकून ते सर्व रेशमाचे पाश त्याने सोडविले. ही आटवण त्याच्या अंतःकरणाच्या कोपऱ्यातून त्याला डिवचते. ही आघाडी त्याला केवढी जड गेली !

ह्यांची जीवनचरित्रे माझ्याने ऐकवत नाहीत. मी देखील अशाच लढाईत थकलेला एक सैनिक आहे. माझ्याही जिवावरचे दडपण जरा उचलले तर ? माझा आधार घेऊन वाढत असलेल्या, मोठ्या पहाटे कपिलेची धार काढून कोमट दुधाने भरलेला रुप्याचा प्याला मला आणून देणाऱ्या आणि माझ्या स्निग्ध दृष्टीने झालेले श्रम विसरणाऱ्या त्या चिमुकल्या, रुचिर, सुकोमल मुलीची ती आठवण ! ती बुजविण्यास केवढी झटापट करावी लागली !

आम्हांला कोणी हाक मारली होती ? कोठले आक्रंदन आमच्या कानी आदळले होते ? आज या तथाकथित मोठ्या युद्धाला तोंड देत आहोत. देह पडेपर्यंत ही झुंज चालेल व नंतर आमच्यापुरती संपून जाईल. देह पडण्याची मुळीच भीती वाटत नाही, कारण तो झिजविण्याची सवय झाली आहे व जसजसे शरीर झिजते, पिचते, तसतसा मनाला उजळा येतो, अंतःकरणाचे रत्नदीप प्रकाशतात.

पण यापूर्वीच्या झुंजेत सुगंधी मने आणि दीपज्योती यांच्याशी समर होता. तो आम्ही जिंकला. आमच्यापैकी प्रत्येकाला जीवनाच्या त्या आघाडीवर एक लढाई द्यावीच लागली. एक अग्निदिव्य करावेच लागले. म्हणून या आघाडीची तादृश्य भीती वाटत नाही, भीती तरी कशाची ? सोन्याला कस तर पूर्वीच लागला. अग्नीने ते पूर्वीच शुद्ध झाले ! आता केवळ या देहाचे हे फाटके चिरगूट फेकून देणे आहे. जीवन सफल करणे आहे. हे चिरगूट गेले रे गेले, की जीवपक्षी बंधमुक्त होईल. सगळ्यांची चिरंतन भूक शमेल आणि जिने आम्हांला हाक मारली, ती फळांफुलांनी, वस्त्राभूषणांनी, सुमंगल, समृद्ध आणि शुची होऊन आम्हांला दर्शन देईल !

१३।१२।४२

७३

आजचे काम

हे केवळ करमणुकीसाठी लिहीत नाही. तसा वेळ आपल्यापैकी कोणालाही असता कामा नये, असे दिवस आज आले आहेत. सर्व यंत्रे आज भराभर व अविरत चालत आहेत. सरळ चालतात, उलटीही चालतात. ज्यातून जे बनेल ते तयार होते, उमाप निर्मिती होते. तरीही कमीच पडते. अशी ही काळवेळ आहे. या दिवसांत तुम्हा आम्हांला फुरसत कोठली, उसंत कोठली ?

आणि म्हणून हा साधासुधाच प्रसंग निवडला आहे. लिहायला सोपा, वाचायला आटोपशीर. एक मुलगी होती सहा वर्षांची. अंगावर काही नव्हते तिच्या. कमरेला फक्त एक चिंधी गुंडाळलेली होती. तिच्या कडेवर एक मूल होते तान्हे. रडत होते. ती भिक्षा मागत होती.

आता पुढचे तर आपण आपल्या कल्पनेने रंगवून गोष्ट वाचण्याचे श्रम वाचवू शकतो. बंगालने फार वेगळ्या रीतीने आपल्या कल्पनेला धार (?) दिली आहे. पण या गोष्टीतल्या मुलीला मारायचे नाही. जगवायचे आहे. सबब, गोष्टीच्या शेवटाबद्दलची तुमची कल्पना कदाचित चूकही ठरू शकेल.

सायंकाळची वेळ. डिसेंबरची थंडी. हिरव्या बागेच्या शेजारून ती पोरगी त्या पोराला घेऊन चाललेली. कदाचित थंडीने असेल, कदाचित भुकेने असेल, ते कारटे जोरजोराने रडत होते व तिला बिलगत होते. ती त्याला घेऊन मधून मधून धावत सुटे, ऊब यावयासाठी असेल ! थकली, की हळू चालावयाला सुरवात करी. भुकेने तिची शक्ती संपुष्टात आणली असेल. तिच्या डोळ्यांतून पाणी तरारत होते; पण त्या मुलापेक्षा ती पुष्कळच मोठी असल्यामुळे तिला रडण्याची लाज वाटत होती.

ती त्या मुलाला समजावीत होती. पाठीवर हात फिरवीत होती. सांगत होती, " उगा ! रडू नकोस. ते घर दिसतं तिथे आपल्याला भाकरतुकडा मिळेल. तो तुला देईन. मग खाऊन झोप. "

खाण्यापिण्याची चौकशी आईला शोभते. आईचे आतडे या सर्व गोष्टींची विचारपूस करते. ही मुलगी त्या पोराची कोण ? कोणी नाही ? त्याची आई कोठे गेली ? कदाचित मेली असेल पाय घासून भुकेने ! जगविता आले तोवर जगविले असेल मुलाला. कदाचित मुलाला टाकून गेली असेल ! पण जाणार कोठे ? मसणातच ना अखेर ?

ते मूल त्या पोरीला रस्त्यावर दिसले. दुःखाच्या सहवेदनेने तिने त्याला कडेवर

घेतले. त्या पोरानेही तिला बिलगून आपली मनीषा व्यक्त केली. परस्परांच्या गरजा परस्परांना समजल्या आणि जगण्याच्या मोहिमेवर उभयता निघाली. एक वर्षाचे मूल व त्याची सहा वर्षांची आई ! जगतील तर दोघेही. मरतील दोघेही !

सायंकाळची वेळ. कोट घातलेल्यांना थंडी वाजत होती. भरल्या पोटावरही ऊब येत नव्हती. मग त्या दोघांच्या अंगावर तर काहीच नव्हते. अन्नाची ऊब देखील नव्हती. ती चार-दोन घरांच्या दरवाज्यांपाशी गेली. हाका मारल्या. भाकर मागितली. एका घरचे कुत्रे अंगावर धावून आले. एका घरचा मालक खेकसला. एका श्रीमंत पोराने त्यांच्या अंगावर पाणी फेकले व आपली करमणूक करून घेतली. दिले मात्र कोणी काही नाही.

आपले आदर्श अद्ययावत आहेत. भीक घालणे हा गुन्हा आहे असे सोयिस्कर तत्त्व आपण व्याकरणासारखे पाठ केले आहे आणि सनातन्यांसारखे त्याला चिकटून बसलो आहोत. सबब, आपल्या बुद्धीत, अंतःकरणात या नव्या आईची, तिच्या त्या मुलाची कसलीच भूक शमविण्याचे सामर्थ्य राहिले नाही. होय सामर्थ्य ! मी तर अशीच भाषा वापरणार ! आपण दुसरी भाषा वापरून आपल्या मतलबांवर शब्दांचे रेशमी पांघरूण घालू शकता !

अखेर ती बिचारी कष्टाने पाय उचलीत गेली दूरवर ! एक नळ होता रस्त्याच्या बाजूला. सुरू होता. त्यातले गार पाणी तिने मुलाला पाजले. स्वतः प्यायली आणि जवळच्याच दगडी पुलावर थोडा वेळ बसून राहिली. कोणाची वाट पाहत होती ? मृत्यूची ? ?

यापुढची तिची गोष्ट ऐकण्यात तुमचा आमचा फार फायदा होईल असे नाही. काही नवे मिळेल असे तर मुळीच नाही. आपली नावीन्याची भूक काही विलक्षण आहे. जे काल घडले ते आज झाले तर आपल्याला कंटाळा येतो. आपले लोक रोज भुकेने मरतात. म्हणून आता त्याचे आपल्याला काही वाटेनासे झाले आहे. हिमालय आपल्या शेजारी आहे. रोज दिसतो. पण त्याचीही बर्फाच्छादित शिखरे सतत परिचयाने आपले कुतूहल जागे करीनाशी झाली आहेत. ना आपली बुद्धी त्यामुळे विशाल झाली, की शरीरे पर्वत चढून गेली ! त्याने रोज दिसणे हा त्याचा अपराध. आपला थोडाच आहे ? तसेच त्या मुलीचे, त्या अर्भकाचे. त्यांचे दुःखान्त अल्पचरित्र नवीन नाही आपल्याला ! ती मरतील त्यातही नावीन्य वाटावयाचे कारण नाही !

पण त्यांच्या मरणात जर नावीन्य नाही तर जगण्यात तरी खास असेल आणि त्यांना जगवण्यात तर खचितच असले पाहिजे !

आज आशेने एक कल्पना आपल्यापुढे मांडण्याची धृती झाली आहे. डोळे, मन, बुद्धी असलेले त्या मुलीचे यंत्र फिरले आणि त्या मुलासाठी एक यंत्राची आई

निर्माण झाली. याचे श्रेय आपल्याला नाही. मराय मारायला जर माणसाच्या जागी माणूस येऊन यंत्रे चालवू शकतो तर जगाय जगवायला आईबापांच्या जागी आईबाप निर्माण होऊन हे मानवी यंत्र चालवू शकणार नाहीत का ? आई खायला देते, बाप ल्यायला देतो. दोन्ही गोष्टी साध्या आहेत. विसाव्या शतकात यंत्रांनी अनेक चमत्कार केले. चमत्कार त्या यंत्रांनी केले. ज्यांना बुद्धी, मन, डोळे नाहीत; सर्वांत महत्त्वाचे म्हणजे चैतन्य नाही. त्यांनी विश्वव्यापी संहारक शक्ती निर्मिली; पण चैतन्यशील, डोळस यंत्राच्या सहाय्याने विश्वव्यापी तारक शक्ती खास निर्माण करता येईल. वात्सल्याचे पाणी व संकल्पाचा कोळसा घालून हृदयाची कळ फिरविली तर या 'न भूतो न भविष्यति' अशा जगडव्याळ यंत्राची चाके फिरू लागतील. इतर यंत्रांनी उलटे करून दाखविले. हे मानवी यंत्र सुलटे करून दाखवील आणि भुकेल्या मानव जातीच्या भरण-पोषणासाठी, जीवितासाठी, आईबापांची रीघ लागेल !

हे तरी श्रेय आपण घ्यावे हा तसदी देण्याचा उद्देश !

८।१२।४३

७४

संघर्ष

तसं पाह्यलं तर त्या जाणीवेने बरं वाटायला हवं. पण माझा अहंकार जाईल तेव्हा ना ! मला वाटतं, मी कुसुमला शिकवलं, तर माझेच विचार तिने बोलून दाखवले पाहिजेत. साध्या साध्या गोष्टींत तिच्या आधुनिक मनाची मला जी ओळख होते, तेव्हा मी अस्वस्थ झाल्यावाचून राहत नाही. कदाचित सूक्ष्म रीतीने मी तिचा हेवा देखील करीत असेन. किती निर्भीडपणे ती आपले विचार मांडून दाखवते !

परवा तिला मी मोरूतात्यांची गोष्ट सांगितली. तिच्यावर देखील तिचं काही मत असेल ह्याची मला स्वप्नात देखील कल्पना नव्हती. मोरूतात्यांमध्ये न आवडण्या-सारखं असं खरोखरीच काही नव्हतं. गावचे सगळे लोक त्यांना चाहत. कुठेही गेले तरी त्यांना दोन पानांचा चांगला विडा मिळत असे. कोणतेही काम त्यांच्याकडून करवून घेण्यात कोणालाही कधी संकोच वाटत नसे. ते हवे त्याच्यासाठी रखडत, खस्ता खात; कधी त्यांना थकवा आला नाही. कधी दुःखाने कळवळून जातानाही कुणी त्यांना पाह्यलं नाही. हर्ष-खेदाचा तीव्रतर उमाळा त्यांच्यात कधी नव्हताच, राहणेही शक्य नव्हतं ! घरची गरिबी. पाठी-पोटाशी चार कच्चीबच्ची बांधलेली, भिक्षुकी संपुष्टात आलेली. लोकही हळूहळू साक्षर होऊ लागले होते. कुणाला वाचून दाखवीन म्हटलं, कोणाची लिखापढी करून निर्वाह करू म्हटलं तरी दिवसेंदिवस ते अशक्य होत होतं.

त्यांची पत्नी कुलीन, सालस होती. ती घरी धुणी-भांडी करी, शंभर ठिकाणी मुलांच्या कपड्यांना ठिगळे लावी. संसार तिने कधी उघडा पडू दिला नाही. देवाचा नैवेद्य कोरड्या भाकरीने कधी दाखविला नाही. मोरूतात्यांच्या वीस वर्षांच्या संसाराला ठणेपणा येऊ दिला नाही. ती मनमिळाऊ होती. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुली ह्या तिलाही मुलीमारख्याच वाटत. सर्वांची आई होऊ शकेल इतकी माया तिच्या पोटी होती.

त्यांच्या घरात कधी कुणाला धुसफूस ऐकू आली नाही. कधी त्यांची मुलं शेजाऱ्यांकडे खाऊ मागायला गेली नाहीत. श्रीमंतांच्या मुलांना खाताना पाहून कधी टुकली नाहीत...!

हेच तर सगळं मी कुसुमला सांगत होतो. माझं म्हातारं मन तिच्या मनावर असं ठसवून देऊ इच्छीत होतं की 'सुख सुख म्हणतात ते ह्याहून वेगळं असं काय आहे ?'

हा आमच्यासमोर राहणारा शहरचा मद्रासी. चार-पाचशे रुपये महिना मिळवितो, साहेब बनतो, पण सकाळ संध्याकाळ नोकर नि मुलंबाळं ह्यांच्यावर 'वेदवाक्यां' शिवाय कोणत्याही सामान्य शब्दांचा उपयोग करीत नाही नि भूदेव-साक्ष परिणिलेली जीवनसखी तीच वाक्यं घोकून घरची स्वयंपाकीण नि बागेची माळीण ह्यांचा उद्धार करीत असते. ह्यांचं शिक्षण, ह्यांचा बंगला, ह्यांचे पैसे, अधेले काय सुख देतात सांगा ?

तीच मोरूतात्यांची मुलं. ती बापाजवळ हट्ट घेतात. त्यांच्या अंगाला बिलगतात. अधेल्या पैशाच्या खाऊचा हव्यास धरतात. खाऊ मिळाला की आनंदतात. मिळाला नाही तर काही तरी शक्कल काढून मोरूतात्या त्यांना खुश करतात.

खेडयातलीच त्यांची गरिबीची राहणी नि खेड्यातलीच त्यांची सुखदुःखं ! जनी मराठणीचा मुलगा शिकायला गेला. त्याचं पत्र येतं. मोरूतात्या वाचून देतात नि दुपारच्या जेवणाला तिच्या मळ्यातून आलेला ताजा भोपळा भाजीला पुरतो. सोनबा कोष्टी तावात येतो नि मुलीचं ठरलेलं लग्न मोडून टाकतो. मोरूतात्या मुलाकडून मध्यस्थी करतात नि लग्न होतं. महिना पंधरा दिवस तरी मोरूतात्यांकडे गव्हाची पोळी रांधली जाते. सायंकाळी खाटेवर सतरंजी टाकली की तान्या महाजन, भिका गवळी, जागोबा तेली येऊन बसतात नि पानविडा चालतो. पानं कितीही वाईट असली तरी त्याकडे कुणाचं लक्ष जात नाही. जसं दाम तसं काम. टपोर दाणा असला तर ओंजळभर ज्वारीबद्दल मोठी कोवळी पानं बारीण काढून देते. बोंडाचे किंवा पेवबुडाचे दाणे तिच्या तरी काय उपयोगाचे ? ती बारीक उंदराच्या कानांएवढी पानं काढून देते. पण त्या लहान पानांचा विडा देखील तान्या महाजनासारख्या प्रतिष्ठित कास्तकाराने चुकू दिला नाही. ही मोरूतात्यांची पत !

तेच आम्ही ! लोकांना सभ्यतेने आमंत्रण देतो. शक्तीच्या बाहेर सरबराई करतो. माजघरापर्यंत त्यांना जोडे आणू देतो. चार-दोन काचभांडी धांदलीत फुटली तरी पर्वा करीत नाही. पण शेवटी जिवानिशी जाऊनही आमची सगळी पक्वान्नं 'वातड' ठरतात. याचं कारण तरी काय ? आमच्याच मुलांची गोष्ट घ्या ना ! त्यांनी मागितलेली वस्तू ते भोकाड पसरतील ह्या भीतीने त्यांच्या डोंबलावर घालावी लागते. पण तीच - शिवलेले, ठिगळलेले कपडे घातलेली—मोरूतात्यांची मुलं !

एकदा केव्हा तरी त्यांनी तात्यांचा पदर धरला नि दोघे-तिघे एकदम म्हणाले, "तात्या, आम्हांला मिठाई. मिठाई आणून द्या आम्हांला." मिठाई ! तात्यांनी सगळे खिसे चाचपून पाह्यले, एकही पैसा कुठे वाजला नाही. आता मुलांना काय रागं भरायचं ? उद्या आणून देईन म्हणून खोटी समजूत घालायची ? की बाजारची मिठाई खाऊन प्रकृती बिघडते असा त्यांना उपदेश करायचा ? तात्या उठले. 'हो' असं म्हणून बाजारात गेले. पाच मिनिटांनी परत आले नि सगळ्यांना मोठ्या विनोदाने, लटक्या लगबगीने बोलावून एकेकाच्या हातावर त्यांनी पांढऱ्या खडे मिठाचा एकेक खडा ठेवला नि मोठ्याने हसून दिलं. आपण बनलो म्हणून मुलंही खुश झाली नि ते खारं मीठ गोड झालं. त्या मुलांना नऊ नऊ महिने पोटी वाळगून शिणलेली त्यांची माउली दारवंठी उभी होती. तीही विषण्णतेने हसली नि खारा प्रसंग साखरेशिवाय गोड झाला !

आहे त्या परिस्थितीत वारा येईल तशी पाठ देऊन अठराविश्वे दारिद्र्यातही सुखाने राहण्याचा हा मोरूतात्यांचा कित्ता.....

तोच तर त्या दिवशी मी कुसुमला सांगितला नि अल्पसंतोषाची महती गाइली. खरंच सांगा, काय वावगं सांगितलं होतं मी ? वरील प्रसंग मी पाह्यला. ह्यातलं अक्षरही खोटं नाही. तथापि, ही पुस्तकं वाचलेली मुलगी चिडून मला म्हणते,

"काका, तुमचे मोरूतात्या आजवर सुखाने जगले. ते कदाचित मरतीलही सुखाने. मला त्यांचं सुखदुःख काही नाही. पण ती लहान लहान मुलं ! ती माझ्या-प्रमाणेच मोठी होतील नि त्यांच्या सुखदुःखाची आम्हांला पर्वा करावी लागेल. त्यांना मिठाईबद्दल मीठ देऊन तुम्ही सुखी राह्यला शिकवणार काय ? त्यापेक्षा ती ओरडत ओरडत मेली तर फायद्याचंच होईल. असलं वंचित जीवन जगण्याने लाचारी येते. हवे तसे दिवस वाढून मानवतेचा अपमान करीत जगण्याची सवय लागते. देव नि दैव ह्यांवर अवलंबून राहून इथली दुःखं सहन करण्याचं लांच्छन पदरी बांधताना खंत वाटत नाही. हाच तर आम्हा भारतवासीयांना शाप आहे ! मला सांगा, इतकी सततची दुःखं नि अवमानित जीवन पृथ्वीखंडावरील कोणती मानव जात सहन करू शकली ? ना खिरतांनी ते सहन केलं, ना बुद्धांनी. ह्याचं कारण हेच, की असली सवयच त्यांना बुणी लावली नाही; ना देवाच्या नावावर ना दैवाच्या."

असंच काहीसं ती चौथ्या वर्गात असतानाही बोलत असे. भारतीय युद्धाच्या प्रसंगातील अश्वत्थाम्याच्या बालपणीचं एक चित्र तिला मी दाखवलं होतं. पीठपाणी पिऊन दूध प्याल्याच्या आनंदाने अश्वत्थामा नाचत होता नि त्याची आई नि गुरू द्रोणाचार्य भिजलेल्या डोळ्यांनी त्याचा तो आनंद पाहत होते. हे चित्र पाहून तेवढ्या लहानपणी देखील डोळ्यांत पाणी आलं होतं. ती म्हणाली होती, "उगीच फसवलं बिचाऱ्याला !"

कुसुम म्हणते ते चांगलं की वाईट ह्याचा निर्णय लवकरच लागायचा आहे. आमच्या पिढीच्या लोकांनी आहे त्यात समाधान मानणारे मोरूतात्या पुजले. पण ही कुसुमची तरुण, ताज्या, गरम रक्ताची पिढी त्यांच्या मुलांना नि मोरूतात्यांना पण, असेल नसेल तेवढं बळ एकत्र करून ओरडायला सांगते, "छे, छे ! हे खोटं, खोटं सुख आम्ही मुळींच मानणार नाही नि असे पीठपाण्याने फसविले जाणार नाही. ओरडू, आमची दाद लागेपर्यंत ओरडू..."

कोण विजयी होणार कुणास ठाऊक ? नियतीने पेट्यांचे रंग निश्चित करून टाकले आहेत. उभी मानवजात आपल्या जीविताचं चिटोरं आपल्या मताप्रमाणे त्या पेट्यांतून भराभर टाकीत आहे. लवकरच पेट्या उघडल्या जातील !

पाह्यचं, कुसुम जिंकते की आम्ही !

केवळ तिच्याबद्दलच्या वात्सल्यानेच नव्हे, तर अगदी मनापासून मी सांगू इच्छितो, की हया मतमोजणीत जर मी हरलो तर सुखी होईन किंवा नाही कुणास ठाऊक, पण वाईट मात्र खचित वाटून घेणार नाही.

पेट्या उघडेपर्यंत वाट पाहावी आता !

२१।१२।४३

७५

अभिशाप

तो असं नेहमीच करी. ते त्याने सांगितलं तेव्हा मी देखील त्याच्याबरोबर हसलो. .करमणुकीचाच तो एक प्रकार होता. पण हसलो तरी मनाला चुकचुक वाटल्या-वाचून राह्यली नाही. माझ्या नीतिकल्पना दुखावल्या म्हणून नव्हे; समाजाचं हित बाधेल म्हणूनही नव्हे. एकाच गोष्टीची खंत वाटली. कावीळ झाली म्हणजे सगळंच पिवळं दिसतं नि सगळं पिवळं दिसायला लागलं म्हणजे कावीळ झाली असंही अनुमान काढायला हरकत नाही. डोळ्यांच्या बाहुल्या उलट्या लागाव्या नि सरळ गोष्टीही उलट्या दिसाव्या. भरल्या आयुष्याला शाप लागावा नि त्यातून सगळंच पापमय दिसावं !

असंच काहीसं वाटलं म्हणूनच ही चुकचुक. त्याचं चुकतं की माझं कुणास ठाऊक?

तो अगदी तरुण आहे. परिस्थिती त्याला अनुकूल आहे. कॉलेजच्या थर्ड इयरमध्ये तो शिकतो आहे. हवी तशी वापरायला त्याच्याजवळ एक सायकल आहे. ती पुसून चक्क ठेवायला त्याच्याजवळ नोकर आहेत. बराचसा वेळ अवांतर घालवून अभ्यासाची हानी होणार नाही इतकी त्याच्याजवळ बुद्धिमत्ता आहे. कुणी आदर्शांच्या, ध्येयाच्या गोष्टी त्याच्यापुढे करायला लागला तर त्यांकडे दुर्लक्ष करण्याइतकी बेदखलीही आहे.

नि अशा वृत्तीत तो जे आजवर करीत आला ते अपेक्षेपेक्षाही साधं आहे असं मला स्वतःलाही म्हणायचं आहे. पण...पण आता तो प्रेमकारच सांगतो म्हणजे झालं.

तो म्हणाला, " काल मी दुपारी साडेतीनला कॉलेजमधून परतलो. मन कसं ओकं ओकं वाटत होतं नि असंच मला बरेचदा वाटतं. इतर ख्यालीखुशालीची माझ्यात हिंमत नाही. घरी आई, वडील आहेत; लग्नाच्या बहिणी आहेत. त्यांच्या मनात माझ्याबद्दल जिव्हाळाही आहे. म्हणून मी असंच करतो जे काल केलं.

" सरळ घन्तोलीवर निघालो. तिथे सुंदर सुंदर बगले आहेत. बंगल्यांच्या समोर सुंदर बागा आहेत. त्यांत सुंदर फुलं आहेत. बंगल्यांना शोभा येईल इतकी फुलझाडांची रचना सुव्यवस्थित आहे. एखाद्या सडकेने जरी गेलं नि बंगल्यांकडे नजर टाकली तरी बरं वाटतं बंगल्यांच्या खिडक्या मोठ्या आहेत. खिडक्यांना रंगीत पडदे आहेत. दारांना कलाकुसर केलेले झिरझिरीत पडदेही आहेत.

" त्या बंगल्यांतून बरेचसे सरकारी नोकर राहतात. सगळे दुपारचे ऑफिसांत जातात. त्यांच्या घरच्या मंडळींना वेळही भरपूर असतो. सुखही भरपूर असतं. काम करायला नोकर चाकर असतात नि सबंध दुपारचा वेळ घालवायचं तेवढं एकच काम त्यांच्याकडे असतं. एखाद्या रुमालावर कशिदा काढीत किंवा एखाद्या गवसणीवर फूल काढीत त्या व्हरांड्यात येऊन बसतात. कामचं काम व्हावं, सडकेकडे पाहून वेळही जावा हा उद्देश ! कुंडीतल्या झाडांसारख्या तितपतच सजीव नीटनेटक्या नि व्यवस्थित अशा त्या दिसतात. त्यांच्याकडे पाह्यल्यास बरं वाटतं. एखादा दुसरा शब्द जर बोलायला मिळाला तर आणखी छान वाटतं !

पण सगळ्यांशी माझी ओळख नाही. ओळखीत मजाही नाही. उलट जबाबदारी वाढते. ओळख नसताना बोलण्यातच मजा आहे.

" काल असाच एका बंगल्यासमोरून गेलो. असंच एक कुंडीतलं झाड एका निळ्या कोचावर बसलं होतं कसलं तरी कलाकुसरीचं काम करीत. अगदी तरुण, अगदी नवं, नुकतंच कळ्याफुलांवर आलेलं. पाहावंसं वाटलं, बोलावंसं वाटलं. सायकलवरून खाली उतरलो.

"मला माहीत होतं, पक्कं माहीत होतं, की ह्या बंगल्यात अमके अमके राहतात. अमुक ऑफिसात ते नोकर आहेत. परंतु ह्या ज्ञानाने काम होण्यासारखं नव्हतं. अज्ञानानेच आनंद वाटणार होता. शहाणपण कामात पडणार नव्हतं.

"सरळ फाटक उघडून आत गेलो. नमस्कार केला. थोडासा हसलो. नम्रपणे विचारलं, 'का हो, दातार इथेच राहतात ना?' दातार तिथे राहत नव्हते. दातारांचा बंगला मला माहीत होता. त्यांचा परिचयही होता. पण...

"मला उत्तर मिळालं, 'छे, दातार इथे राहत नाहीत. आपली दिशाभूल झालेली दिसते. कुणीतरी चुकीने सांगितलेलं दिसतं.'

"मी विचारलं, 'पूर्वी कधी राहत होते का इथे? मला जरूरीचं काम आहे. जरूरीचा निरोप त्यांच्या घरी कळवायचा आहे. मला पत्ताच कुणीतरी चुकीचा सांगितला. आपल्याला माहीत आहे त्यांचं घर? सांगाल तर फार उपकार होतील.'

"एक मंद स्मित—जे मला हवं होतं—नि 'इश्श! उपकार कसले त्यात. इथून जवळच आहे की त्यांचा बंगला. इथून दिसतो तो तिसरा बंगला नि डावीकडचं ते त्यांचंच घर.'

'कोणता? तो निळा काय?'

'अं हं. त्या बाजूला डावीकडे. त्या निऱ्याच्या तिथूनच वळायचं. असे सरळ जा.'

"आता जावं लागणार. जावंसं वाटेना. उगीच थांबलो. घुटमळलो. असहाय चेहरा केला नि हसून दिलं.

'चला. मीच रस्त्यावरून दाखवून देत्ये.'

"हातचं विणकाम ठेवलं गेलं. पदर नीट केला गेला.

"नाजूक हालचाल झाली. हाताच्या बिलवरांचा आवाज झाला नि दोघेही फाटकाच्या बाहेर आलो.

'तो पाहा. तोच बंगला. तो सायकलवाला दिसतो आहे ना, तो त्यांच्या बंगल्यासमोरच आहे.

'बरं आहे, नमस्कार. त्रास दिला आपल्याला, माफ करा.'

'कसचं कसचं! बराय् नमस्कार.'

"मी निघालो. फाटक लोटून घेतल्याचा आवाज झाला. कुठले दातार नि कुठला निरोप. सरळ घरी आलो. बरं वाटलं. तेवढीच मौज. सुंदर दृश्य. चार-दोन शब्द बोलायला मिळाले हा केवढा फायदा. उभयपक्षी नुकसान कुणालाच नाही. असंच काही काही करुनी..."

हे असं त्याने सांगितलं. मी ऐकूनही घेतलं. पाठीवर थाप मारली त्याच्या. त्याला थोडा गर्वही वाटला, त्याने जी अक्कल लढवली त्याबद्दल.

त्याला ह्यात मौज वाटली. मला मौज वाटली नाही असं नाही. मला वावगं वाटलं ते फक्त त्याने सांगितलेल्या पदर सावरण्यात, नाजुकशा गोड हालचालीत, बिलवरांच्या मंजुळ आवाजात ! एरव्ही परस्परांनी परस्परांना मदत केली ह्यात करमणूक होण्यासारखं पुष्कळच असतं. ते सगळं सुंदर होतं ह्याबद्दल कुणीच वाद घालणार नाही. पण त्याने ते कुंडीतलं झाड अर्धच पाह्यलं. पूर्ण पाह्यलं नाही. जी शक्ती त्या झाडांना जगवते, नि सुंदर दिसायला लावते ती शक्तीच त्याने पाह्यली नाही. वास्तविक काय गरज होती त्या बाईला, की तिने आपल्या जागेवरून उठावं नि हा वाट चुकू नये म्हणून मोठ्या आनंदाने ह्याला रस्ता दाखवावा ? ती काही ह्याच्यासारखी ओकं ओकं, रिकामं रिकामं वाटून घेण्याच्या परिस्थितीत नव्हती. पण कुणीही चुकत असलं तर त्याला बरोबर करावं, पडत असलं तर त्याला उचलून घ्यावं, बुडत असलं तर त्याला वर काढावं हा जो मानवाचा धर्म, जो तिला, त्याला नि पर्यायाने सर्व समाजाला पोसतो, त्या धर्माचं एक साधं तत्त्व तिथे त्याच्या प्रत्ययाला आलं नि तेच नेमकं त्याने पाह्यलं नाही. इतकंच नव्हे तर पाहण्याचीही तयारी दाखविली नाही. सर्व दिसावं नि ही माणुसकीच पाह्यला त्याचे डोळे असमर्थ ठरावेत ह्यालाच शाप म्हटलं पाह्यजे. संपूर्ण जीवनाची मधुर प्याली प्यायला घेताना केवळ वरच्या नक्षीकडेच नि धातूकडेच पाहण्याचा हा करंटेपणा—हा अभिशाप कुणी दिला कुणास ठाऊक !

ज्या जीवनदेवतेशी प्रतारणा करून खोटं खोटं जगण्याचा आव आणला तिने तर चिडून तो दिला नसेल ?

२२।१२।४३

७६

लोकसाहित्याचा वारसा

एके काळी आम्ही शेतकरी होतो. आजोबा, वडील सर्व शेती करीत. खपत. घरी त्या वेळी धान्याची पोती भरलेली असत. हिवाळ्यात कापसाची शेते तोडीवर आली म्हणजे मजुरीच्या बायका कापसाचे गठ्ठे आर्णात व आमच्या अंगणात जमत. घरी मणाचा तराजू लागे. आजोबा जवळ बसत. नोकर कापूस मोजीत असे आणि कुणा बाईचा किती कापूस झाला हे टिपून ठेवण्याचे काम माझ्याकडे येई. कागद-पेन्सिल घेऊन माझे मराठी दुसरीचे ज्ञान मी त्या कागदावर उतरवीत असे. मला किती अभिमान वाटे ! सर्व मजुरिर्णांकडे, नोकरांकडे, माझ्या लहान भावाला कडेवर घेऊन खांबाशी उभ्या असलेल्या माझ्या काकूकडे मी ऐटीत नजर फेकीत असे. माझे

इवलेसे ज्ञान त्या वेळी किती उपयोगाचे, असे मला वाटायचे. आज माझ्या पुष्कळ परीक्षा पास झाल्या आहेत; पण माझ्या ज्ञानाचा उपयोग त्या वेळेइतकाही माझ्या घरच्या मंडळींना होत नाही. मोठे सुखाचे दिवस होते ते !

त्या वेळी आमचे आजोबा म्हणजे आम्हांला सर्वज्ञ वाटत आणि ते आमच्यावर कितीही रागावले तरी आम्ही त्यांच्यावर प्रेमच करीत असू. ते शेतावर जायला निघाले की आम्ही मागे लागत असू. त्यांनी मारले तर रडत असू, मग ते आम्हांला घेऊन जात. शिवारांत[1] तुरीच्या, पावट्याच्या, मुगाच्या शेंगा मनसोक्त खायला मिळत. मधून मधून आजोबा विचारीत, " कंटाळला का रे पोरांनो ? येतात वेटे मागे लागून आणि मग चेहरे होतात पाच जोडे मारल्यासारखे लाल लाल ! "

आजच्या व्याख्येत सांगायचे तर त्यांच्यावर भाषेचे आणि सभ्यतेचेही संस्कार मुळीच झाले नव्हते. पण त्यांनी जितक्या लोकांचे भले केले तेवढ्यांची मोजदाद ठेवण्याचीही आज आमच्यात पात्रता राहिली नाही आणि तरीही आजची आमची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा किती तरी पट चांगली आहे.

एकदा शेतात असताना त्यांनी आम्हांला एक उखाणा घातला. ते म्हणाले, " कोणता मास्तर शिकवितो रे तुम्हांला ? बळीराम जागोबा[2] का ? पाहतो त्याची अक्कल ! सांगा बरं माझा उखाणा. "

आमच्या मास्तरांची अक्कल पाहावयाची ! आज शिक्षणशास्त्राची चार-दोन बुके वाचल्यावर असे वाटते की किती महान तत्त्व त्यांच्या त्या बोलण्यात साठविले होते. मुलाच्या हुशारीवरून मास्तराची हुशारी पाहावयाची. मुलगा मठ निघाला तर तो मास्तराचा दोष. हे त्यांचे तत्त्व आज जर शिक्षणखात्याला लावले तर अर्धे शिक्षणखाते धोब्याकडे टाकावे लागेल.

बरे, त्या वेळी मास्तर श्रीमंत असत अशातला भाग नाही. खेड्यातले मास्तर, नऊ रुपये पगार. मास्तरीण देखील पिवळे गावरानी लुगडे नेसत असे. मास्तरांच्या घरी कोणी पाव्हणे आले की आमच्याच घरून लोणचे, भोपळ्याची फोड, सतरंजी, दुधाची लोटी भरून जात असे. मास्तर कधी मागत नसत. पण मास्तरांच्या घरी पाव्हणे आले आणि आमच्याकडून सामान गेले नाही तर आजोबा म्हणत, " आपले पाहुणे विमुख गेले. " भंगिणीलाही आमच्या लहानपणी आम्हांला 'काकी' असे संबोधावे लागत असे आणि महालक्ष्मीच्या सणांची आंबिल तिला द्यावी लागे.

पण हे विषयांतर झाले. मुद्दा होता उखाण्याचा. आजोबा म्हणाले, " या रे कारट्यांनो ! सांगा हा उखाणा— "

---

१. शिवार-शेत, (शिवेजवळ असलेले ?) गावाच्या बाहेरची शेतजमीन.

२. पूर्वी शिक्षकांचा उल्लेख आडनावाने न होता नाव व वडिलांचे नावच घेतले जाई. आता आतापर्यंत हा रिवाज आमच्याकडे होता.

आणि त्यांनी उखाणा घातला.

" चार पायाचा म्हणे तीन पायास, दो पायाचा कुठे गेला.
बत्तीस शिंगांचा हल्या[1] मेला त्यास भाजुनि खाया गेला— "

आम्ही पुष्कळ विचार केला. भूवर्णनाचे पुस्तक आठवले. बत्तीस शिंगांच्या रेड्याची माहिती कुठेच नव्हती. दादाच्या सहावीच्या बुकात गेंड्याबिंड्याची चित्रे होती. पण बत्तीस शिंगांचा रेडा जगाच्या कोणत्या भागावर असेल ? आजोबा तागाची दोरी वळीत होते. त्यांचे दोन आटे भरेपर्यंत वेळ मिळाला आणि त्यांनी विचारले– " जमते का रे ? थोबाडे पाहा लेकांची ! शाळेत जातात बेटे. कशाला रे ? आणि हा बळीराम जागोबा पण नुसती पुस्तकेच वाचवून घेतो आजकाल असे दिसते. शिकवीत नाही रांडीचा. "

आजोबा शिव्या द्यायला लागले की खुशीत आहेत असे आम्ही समजून असू. त्या वेळी मार मिळणार नाही अशी आमची खात्री असे. आम्ही त्यांना उखाण्याची फोड विचारली. त्यांनी चार-दोन आणखी शिव्या दिल्या, माझा लहान भाऊ त्यांच्या जरा जवळ होता, त्याचा त्यांनी गालगुच्चा घेतला (चांगले दिसत असे ते कारटे त्या वेळी !) आणि उखाण्याची फोड केली.

" बेट्यांनो, इतके वेळा शेतात येता. आपल्या बापाच्या इमानाने शेंगा खाता पण कधी खळ्यात[2] मात्र येत नाही. अरे, एकदा असे झाले, खळ्यात वाघ आला. रात्रीची वेळ. जेवणरात्र संपत आली होती. आपला गडी कोंड्या जागलीला यायचाच होता, वाघाने खळ्यातली चाहूल घेतली आणि त्याने [तो चार पायांचा] तिव्याला[3] [तीन पायाचा] विचारले, ' तिव्या, तिव्या ? दोन पायाचा [म्हणजे माणूस] कोठे गेला रे ? सांग, मी त्याला खायला आलो आहे. मला भूक लागली आहे. '

" तिव्याने विचार केला, कोंड्याला जर वाघोबा गट्ट करील, तर मग माझ्यावर उभे राहून धान्य कोण उडवील ? गव्हाचे सोने माझ्या पायांपाशी कोण टाकील ? गाणे कोण म्हणेल ? मला नवतीचे धान्य कसे पाहायाला मिळेल ? वाघाला परत लावले पाहिजे. पण मला ना हात ना शक्ती. मी कसा वाघोबाला पिटाळू ? त्याला शब्दांचीच दहशत घातली पाहिजे.

---

१ हल्या—हेला; रेडा.

२. खळे—शेतात हिवाळ्यामध्ये बैल बांधायला, शेताचे सामान, कणसे इत्यादि ठेवायला तयार केलेली जागा. तेथे नोकर जागलीला असतो. प्रत्येक शेतात खळं असतेच. मोठी मौज असते तेथल्या वातावरणात.

३. एका लांब फळीला तीन उंच उंच पाय लावतात. आणि तसला स्टँड धान्य उडविण्याच्या कॉमी करतात. वारा सुटला म्हणजे शेतकरी त्यावर उभा राहतो. धान्य उडवितो. भुसा वेगळा होतो आणि खाली नितळ सोन्यासारख्या धान्याची रास पडते.

" तुम्ही ओंब्या पाहिल्या आहेत ना ! कारे बांडी, (माझ्या धाकट्या भावाचे आजोबांनी ठेवलेले खास नाव) पाहिल्या किनाई ओंब्या ? त्या ओंब्यांना पुष्कळ शिंगे असतात ना वर डोक्यावर ! ती शिंगे तिव्याला आठवली. आणि तिव्याने दिली थाप—' वाघोबा, वाघोबा, अरे, थांबतोस काय ! कोंड्या गेला आहे बत्तीस शिंगांचा रेडा भाजून खायला. पळ, पळ ! तुला तर हंडीतच शिजवील. '

" वाघाला वाटले, दोन शिंगांचा रेडा मला कधी कधी दाद देत नाही मग बत्तीस शिंगांचा रेडा कुठे ? आणि त्याला भाजून खाणारा कोंड्या, म्हणजे भरलेच दिवस आमचे ! वाघ म्हणाला, ' तिव्या, सांगू नकोस रे कोंड्याला मी आलो होतो म्हणून. हा बघ मी पळतो. ' वाघ आल्या पावली परत गेला...

" असा आहे हा उखाणा; समजला ? एवढेही सांगता येत नाही वेड्यांना. ढोरांच्या मागे लावले पाहिजे तुम्हांला. जा, पळा. कोंड्या, दे रे यांना थोड्या शेंगा. भाजून खाऊ दे. "

कोंड्याही गोष्ट ऐकत होता. त्याला वाटले, आजोबांनी वाघाशी आपले नाव जोडले, आपले अजोबा किती छान ! त्यांनी जो उखाणा सांगितला त्यात आमच्या खळ्याचे नाव, खळ्यातला तिवा,–आम्हांला त्या वेळी सारे खरे वाटले आणि आम्ही त्या तिव्याकडे मोठ्या आदरभावाने पाहू लागलो. आम्हांला हे कळत होते की तो तिवा लाकडाचा. त्याला कोठे बोलता येणार ? पण तरीही का असे झाले कुणास ठाऊक, पण जेव्हा जेव्हा मी शेतात जाई तेव्हा तो तिवा मी नीट पुसत असे. तो वाकडातिकडा असला तर सरळ करीत असे आणि ' केवढा हा प्रताप याचा की याने वाघाला पळवले ! ' असे माझे मन म्हणे.

तिव्याचेच काय पण खळ्यातल्या कणसांच्या ढोल्या, विहिरीजवळ ठेवलेल्या बैलांच्या पाणी प्यावयाच्या ढोणी, नांगर, वखर सगळ्यांबद्दल काही ना काही गोष्टी सांगून किंवा उखाणे घालून त्यांनी आमच्या मनावर असा एक विलक्षण संस्कार करून ठेवला होता की या वस्तू निर्जीव असल्या तरी मोठ्या प्रतापी आहेत, मोठ्या कनवाळू आहेत, आणि या आसपास असल्या व आम्ही या खळ्यात रात्री एकटे जरी असलो तरी या वस्तू आमचे रक्षण करतील. केवढा धिवसा वाटे !

हा संस्कार चांगला होता की वाईट कोण जाणे. पण पुढे पंधरा वर्षांचा झाल्यावर कधी कधी रात्री जागलीला जावे लागे त्या वेळी माझ्या मनाला भीतीचा लवलेशही शिवत नसे आणि मी मळ्यावर चांगला डाराडूर झोप घेई.

यच्चयावत सर्व वस्तूंबद्दल सद्भाव निर्माण झाला तर, मला वाटते, भीती कमी व्हायला व धिवसा वाढायला हरकत नसावी. दोन्ही मानसिक अवस्था आहेत. आम्हांला त्या वेळी फक्त आजोबांचीच भीती वाटे, पण तिचे स्वरूप वेगळे होते

आमच्या मनाची कोणतीही हौस त्यांनी कधी अपुरी ठेवली नाही. त्यांचा मार देखील खाण्याची कधी कधी खरोखरच मनापासून इच्छा होई. कारण त्यानंतर ते आम्हांला पेरकंडाच्या[1] गाड्या करून देत, दिव्याचा पतंग करून देत, आमच्याबरोबर पतंग उडवू लागत. आणि या आनंदाची किंमत फारच अल्प द्यावी लागे एक-दोन रपाटे पाठीत !

वर उद्धृत केलेला उखाणा त्यांचा स्वतःचा खात्रीने नसेल. कारण तो पुष्कळांना ठाऊक होता. पण आम्हांला सांगून, आमच्यात मिसळून, असले वाङ्मय ते जगवीत, व त्यात भर घालीत. कदाचित त्यांची अशीही इच्छा असेल की आम्ही त्यांच्याकडे आलेला हा लोकवाङ्मयाचा वारसा नीट संभाळावा व हे साहित्याचे मूलधन जगवावे, पोसावे, वाढवावे !

या मूलधनाचा वारसा संभाळण्याची आमच्यात किती लायकी आहे कोण जाणे !

१४।९।४४

७७

सूनबाई

प्रास्ताविक

सूनबाई, असे मी स्वतःचे शीर्षक दिलेली ही एक लोककथा आहे. ती मी आईच्या तोंडून ऐकली. अनेकदा तिने ती मला अशीच सांगितली. त्यानंतर माझ्या आजीनेही जवळजवळ अशाच रीतीने पण थोड्याफार फरकाने ती सांगितली होती. तिने सूनबाईच्या तोंडी मारुतीरायाला शिव्या घातल्या होत्या.

या गोष्टीचा उद्देश काय ? हे मला आजही कळले नाही. पानगा खाणाऱ्या या गोष्टीतील सुनेबद्दल आम्हांला लहानपणी मोठा आदर वाटे. जुनी गोष्ट आहे. नास्तिकतेच्या प्रचारासाठी ती खास सांगितली गेली नसेल. असे वाटूनच मी त्यात दोन फरक केले. एकतर सुनेच्या तोंडच्या मारुतीरायाला दिलेल्या शिव्या काढून टाकल्या व सुनेला मारुतीरायाच्या चरणी डोई ठेवायला लाविले दुसरे तिच्या करवी मारुतीरायाचा निरोप पाटलाला सांगितला.

---

१. ज्वारीच्या धांडयाच्या कांडक्याला पेरकंड म्हणतात.

एवढे फरक माझे म्हणून मी नमूद केले. याचे कारण ते फरक गाळूनही गोष्टीचा मूळ उद्देश कुणाला सांगता आला तर मला हवाच आहे. कथानकातसुद्धा स्थानपरत्वे काही बदल वाचकांपैकी कुणाला जाणवला तर त्यांनी अवश्य कळविण्याची कृपा करावी. लोकसाहित्याच्या समृद्धीच्या दृष्टीने या गोष्टीचे फार महत्त्व आहे असे मला वाटते.

माझ्या मुलांना देखील ही गोष्ट फार आवडते व म्हणून त्यांनी कितीदा तरी ती माझ्याकडून सांगवून घेतली आहे

वामन चोरघडे

एक बारा वर्सांची धिटुकली पोर. लाडाची राधा. वासराच्या तडफेची. पाखराच्या झडपेची. गात लांब सडक. मन वेधडक. आवडती जनांची. आईच्या प्राणाची. आपुल्या बाबाची. आपुल्या भावाची. एकलीच. धाकलीच.

वरसं झाली बारा. नवतीचा लागला वारा. पोरीला द्या साडी. बसायला गाडी. सोबतीला हवा गडी. गडी शोधा. नोवरीला नवरा पाहा.

या गावी जा. त्या गावी जा. इकडे शोधा. तिकडे शोधा. शोधा नवरा आमच्या मालनसाठी. शोधा वर आमच्या शालनसाठी. जात पाहा. कूळ पाहा. धन पाहा. दौलत पाहा. सासू पाहा. सासरा पाहा. दीर हवा. नणंद हवी. गाडीघोडे. बैलखाटे. वासरूसिंगरू, नोकरचाकर. गावकरी. मानकरी !

दिसले असे घर ! दिसले असे दार ! हो हो दिसले. तो पाहा मजला. कसा छान सजला. पोरीला घर हेच. पोरीला सासर हेच !

झाले. लाडाची राधा परणिली. लगीन झाले. वाजंत्री वाजविते झाले. वारूद बंदक. भाले बरच्या.

मालनबाई काय करते ? गोऱ्या नवऱ्याला तूप वाढते. पाखरू कुठे भिरभिरते ? गोरिया जवानाला विडा देते. गुणाची सूनबाई काय करते ? सासूचे पाय धुते. कसे कसे गुण. कसे कसे काम. कसे कसे प्रेम !

मालनबाई सासरी आली. वरसांची बारा. गगनाची तारा. चांदणीचे तेज. बिजलीची तडफ. चमचम. छुमछुम. घरी आली सून. तिचे पाहा गुण. रूप पाहा. फूल वहा, आल्या शेजारिणी. पाहू द्या सून. अहा ! फुलासारखी नाजूक. तिला द्या दूध. तिला द्या पेढे. शिळे पाके घालू नका. दांडखड नेसवू नका. सुकेल ही वेली, कोमावेल कळी. संभाळा सासूबाई.

शेजारणी गेल्या. सकाळ झाली. सूर्य उगवला. सांज झाली. सूर्य मावळला. एकदा. अनेकदा. दिवसांमागून दिवस गेले. सुनेचे कौतुक पुरे झाले. लाडाची असेल, आपल्या घरची. गोडाची असेल, आपल्या बापाची. आम्हांला नको चाम, आम्हांला हवे काम. आमच्या घरची सून. घरी आहे सासू. तिला हवा मान. तिचे करा काम. या या सूनबाई. पाट मांडा. पाणी द्या. उष्टी काढा. शेण लावा. धुणे पडले, धुऊन काढा. नणंदेची लेक रडते, तिला घ्या. धाकटा दीर रडतो, त्याला समजावा. सासरा पूजेला बसतो, तयारी करा. नवरा पाणी मागतो, नेऊन द्या. रवी लावा, ताक घुसळा. लोणचे केले, मीठ मिसळा. सकाळ झाली, कामाला लागा. दुपार झाली, म्हणू नका. खाल्ले काय ? काही नाही. निभते कसे ? असे असे. नवरा आला, जेवून गेला. नणंद आली, जेवून गेली. सासरा आला, जेवून गेला. सासूबाई जेवायला बसल्या. आता या सूनबाई. जेवायला बसा. लागेल ते मागा. पोटभर जेवा. दूध घ्या. तूप घ्या. जेवू लागा सावकाश. उठले की काम. बसले की काम ! !

अशी एकंदर सुनेची स्थिती होती. सुखवस्तू आईबापांच्या घरी बालपण गेलेले. तहान म्हटली की दूध मिळे. भूक म्हटली की लाडू मिळे. तिच्या भाग्याने सासर बरे मिळाले. पण सून पडली. तहान लागो, भूक लागो, सगळ्यांची जेवणे झाल्यावर, सगळ्यांच्या मागून तिच्या पानात अन्न पडायचे. त्याच्या अगोदर काय मिळणार ?

सासरी गेल्यावर सुनेने काही दिवस भुकेपायी रडून घालविले. बारा वर्षांच्या मुलीची ती भूक. ती सूनबाईच्या डोळ्यांत खळखळ पाणी आणीत असे. ती सांदी-कोपऱ्यात पोटभर रडून घेई. परंतु या पोटभर रडण्याने तिचे पोट काही भरत नसे. कष्टापरी कष्ट करावे. धुणी-भांड्यांपासून सारा रावता व्हायचा. दहा जणांचा गराडा उचलायचा, आणि वेळ टळल्यावर दुपारी दोन वाजता अन्न पोटात पडायचे. ते सुग्रास असले तरी अंगी थोडेच लागणार ! भुकेच्या वेळचा कोंडा त्यापेक्षा खचित सरस ठरायचा.

आणि या भुकेसाठी सुनेच्या लहानशा डोक्याला दुसरा कसलाही उपाय सुचेना. सासूला म्हटले तर आईबापांचे घराणे खादाडाचे ठरणार ! सासूच्या अगोदर जेवून घ्यावे तर अमर्यादा होणार. सासूने थोडी दया दाखवावी तर तिचे सासूपण राहील कशात ? शेजीच्या बाया घालून पाडून बोलतील ते तरी सासूने का म्हणून सहन करावे ? कूळ, कुळाचार, गुण, मर्यादा या सगळ्या कडेकोट बुरुजांनी सूनबाईला गुदमरल्यासारखे वाटत होते. ह्या सर्व गोष्टींवरील तिची श्रद्धा उडते की काय याचीही तिला भीती वाटू लागली होती. भुकेला जे मिळेल, जसे मिळेल, ज्या गोष्टींमुळे मिळेल, ते तसे व ती गोष्ट सर्वांहून प्रिय वाटू लागते आणि तिच्याच आहारी आपण जातो.

तिने ठरविले. कोठीघरातील फडताळात तहान लाडू, भूक लाडू असतात. सासू-

बाई अंघोळ केल्यावर देव देव करीत बसतात. स्वयंपाकघरात कोणीच त्या वेळी राहत नाही. ही संधी देवानेच दिली. ती आपण आजवर शोधली नाही एवढेच. झाले. तहान लाडू, भूक लाडू कमी व्हावयास सुरवात झाली. सूनबाईची गरज भागली. आता चार वाजता जरी जेवण मिळाले तरी हरकत नाही.

देवाने संधी दिली असे जरी सूनबाईने मानले तरी तो देवच पुढील हेतूने दिलेल्या गोष्टी काढून घेतो. एक दिवस घरात विपरीत घडले. सकाळीच चुलीवर लोणी कढत होते. मोठी डेग भरून लोणी कढवून झाल्यावर ते कोठीघरात ठेवून सासू अंघोळीला गेली. सूनबाई तिची अंघोळीची तयारी जय्यत ठेवीत असे; व ती देव-पूजेला बराच वेळ बसेल असा पूजेचा थाट पण ठेवी; सासू पूजेला बसली की स्वयंपाकाचे पीठ, कणीक काढण्याच्या निमित्ताने सूनबाई कोठीत जाई. आजही ती गेली. पण तुपाच्या डेगीची आठवण न राहून तिचा पाय धाडकन डेगीला लागला. मोठा आवाज झाला. सासूला वाटले सूनबाईने कोठीचे दार चुकून उघडे ठेवले व मांजरीने तुपाची डेग पाडली. ती पूजा टाकून कोठीकडे धावली व पाहते तो—

लाडवाच्या फडताळापाशी सुनेचा फराळ चालला आहे !

सासूने प्रेमाने खा म्हटले असते तर कदाचित सुनेने प्रामाणिकपणे आपली अडचण डोळ्यांत पाणी आणून सांगितली असती. आणि या गोष्टीची ही लांबणही संपली असती. पण सासवा सुनांना मुलींसारखे वागविण्याचे उदंड अभिवचन देत असल्या तरी मुलीत आणि सुनेत मोठे अंतर असते. एखादी सवलत सुनेला दिली की आपण तिच्यावर फार उपकार केले अशी त्यांची भावना असते. त्याबद्दल सुनेने सदैव उपकृत राहावे असे त्या मानतात. तसे मुलींच्या बाबतीत नसते. सुनेचे एखादे वेळी चुकते तेव्हा आपण तिला किती चांगले वागविले हे चौघांना जाहीर करताना सासवा उचकणी देतात, टिपसे टाकतात आणि सुनेला मग ते उपकार नकोसे होतात. इथेही असेच झाले. लाडू चोरल्याचा सासूने पोवाडा केला व आपण मुलीसारखे वागवीत असूनही हिने आपल्या कुळाची खोड इथे आणली याबद्दल परोपरीने खेद व्यक्त केला. कोठीला कुलूप घातले, व सूनबाईवर सक्त नजर ठेवण्याची तिला गरज वाटू लागली.

सुनेला बिचारीला मेल्यासारखे झाले. कुळाचा उद्धार तर तिच्या जिव्हारी लागला आणि तिला मनस्वी चीड आली. भुकेचा सोस पुरविला असता पण ही फजिती नको असे विचार तिच्या मनात आले खरे; पण अपराध नसताना जर आपल्या कुळावर वाइटाचा बोल आला तर मग भूकच का भागवू नये असेही तिच्या मनात आल्यावाचून राहिले नाही. आणि या तिच्या विचारांना पुष्टी द्यावयाचे काम सासूने केले. रजतमाचा पगडा बसला म्हणजे माणूस स्वभावगत अहिंसा टाकतो व

हिंसेच्या आहारी जातो. सासूने असे ठरविले की पूजेला बसेपर्यंत सुनेवर नजर ठेवता येते आणि नंतर तिला अवसर सापडतो. पूर्वी जेवणे झाल्यावर दुपारी सून धुणी घेऊन नदीवर जाई. आता ती वेळ वदलण्यात आली. सासूची अंघोळ झाल्याबरोबर सुनेने धुणे घेऊन जावे असा हुकूम झाला. यातील उद्देश सुनेला ओळखू आला नाही असे नाही. तिला जास्तच चीड आली व चोरून खाण्याचा तिचा निश्चय जास्तच दृढ झाला. अट्टल चोरालाही आपल्यावर सर्व प्रकारे अविश्वास दाखविलेला खपत नाही. त्याला वाटते माझ्यात माणुसकी आहे. माझ्यावर माणसांनी विश्वास का ठेवू नये ? आणि कुणाला तरी आपल्या माणुसकीचा विश्वास वाटावा म्हणूनच चोर चोरी करतो ना ? सूनबाईच्या अंगाची तर आग झाली. भूक सोसवेना म्हणून, सासूबाईंचा धाक म्हणून, सासुरवाशिणीचा संकोच म्हणून, तिच्या हातून चुकीने विपरीत घडले. पण त्याचा परिणाम असा झालेला पाहून भूक न सोसण्याचे, सासूच्या धाकाला न जुमानण्याचे, सासुरवाशिणीच्या संकोचाला धाब्यावर बसविण्याचे तिने ठरविले.

नदीवर जाताना बरोबर घेऊन जाता येईल असे काही सापडेनासे झाले. नेणार काय ? रोजच्या स्वयंपाकाला सून सामान काढून देत असे. तिने ओच्यामध्ये ओंजळभर कणीक घेऊन जाण्याचा क्रम ठेवला. ती नदीवर जाई. धुण्याची दुरडी एका बाजूला ठेवी. मोठे पान, प्रसंगी कापड-मिळेल ते साधन वापरून ती कणीक भिजवीत असे. नदीवर विस्तव शोधीत असे. नदी म्हणजे साऱ्या गावचे जीवनतीर्थ. कुणीना कुणी चार पानगे टाकताना तिथे मिळायचाच. तिथलाच थोडासा विस्तव घेऊन तिचा पानगा तयार होई. आणि पोटाला अशा रीतीने आसरा करून धुण्याचे पिळे डोई ठेवून ती घरी येई. पुनः पडेल ते काम, मिळतील ती बोलणी आणि झाला तेवढा उशीर पचनी पाडायला तिला बळ येत असे. हवे ते काम सांगा, हवे ते बोला, हवे तेव्हा पानावर वाढा तिच्याकडून ना नाही. माझ्या पोटाला मी आसरा केला आहे असे तिचे बयान असे आपल्या मनाशी.

हे समाधान तिला सतत मिळत गेले. सासूला तिच्या कामाबद्दल कुरकुर नव्हती. नणंदांना तिच्या स्वभावाबद्दल तक्रार नव्हती. नवऱ्याला तिच्या शीलाबद्दल संशय नव्हता. तिच्या चतुरपणाबद्दल, तिच्या प्रसंगावधानाबद्दल त्याला वचक होता, सद्भाव होता.

एकदा अभिनव घडले. विचित्र वर्तमान प्रकट झाले. आकाश ढगांनी भरले. खूप पाऊस पडला. जमिनी ओल्या झाल्या, रस्त्यावर चिखल पसरला. हवा थंड झाली. सूनबाई नदीवर निघाली. धुण्याचे टोपले डोईवर, कणकीची गाठोडी ओच्यात. नदी आली. तिने धुणे दगडावर रिचविले. कणीक भिजविली. पानगा केला. आता विस्तव हवा. पण विस्तव कुठे दिसेना. खूप दूरवर नजर टाकली, पण काहीच नाही. धूर दिसेना की प्रकाशाची ठिणगी नजर येईना. शोध संपला. निराशेने ती धुणी धुण्याच्या उद्योगाला लागली.

इतक्यात नदीच्या वरच्या कडेला अगदी दूरवर तिला धूर दिसला, म्हणजे तिथे विस्तव असलाच पाहिजे. तिला कोलंबसासारखा आनंद झाला. ती निघाली. जरा वरच्या बाजूला गेली. आणि कितीतरी मोठा असा विस्तवाचा लोळ तिला दिसला. ती जवळ गेली. आजूबाजूला पाहिले. ते एक स्मशान होते. तो विस्तव म्हणजे एक प्रेत जळत होते त्याचा होता. कवटी फुटल्याचा आवाज झाल्यावर पोचवायला आलेली मंडळी निघून गेली होती. प्रेताच्या छातीवरील लाकूड धडाक्याने पेटले होते.

तिला भीती वाटली नाही. अनाचार वाटला नाही. का आणि कसा वाटला नाही कुणास ठाऊक. ज्याने मूळ गोष्ट रचून जनांत पसरविली त्याला विचारायला हवे, जिथून ती परंपरेने आली तिथे जायला हवे; पण जाणार कोण व कुठे ?

तिने थोडा विस्तव बाजूला ओढला. त्यावर पानगा भाजून तयार केला. पानगा चांगला खरपूंस तयार झाला, तिला वाटले, इतक्या मेहनतीने, इतके दूर येऊन पानगा भाजला. कोरडाच खाल्ला तर कसली रुची. तिने सभोवार पाहिले. स्मशानातच एक मारुतिरायाचे देऊळ होते. लोक प्रेतयात्रेला येत आणि जाताना त्या सेवेच्या मंगलदैवताचे दर्शन घेऊन जात. ती देवळात गेली. नुकतीच मंडळी तिथे येऊन दर्शन करून गेल्याची चिन्हे जागोजागी दिसत होती. एक तेलवात जळत होती. झाडपानावर गुळाचा नैवेद्य दाखविलेला होता. मारुतिरायाचे चरण नदीच्या पाण्याने ओले केलेले दिसत होते.

सूनबाईला विचार सुचला. येथे तेलही आहे नि गूळ पण. इथेच पानगा संपवावा. आणि तिने तसे केलेही.

भुकेची आग निवल्याच्या समाधानाने तिने मारुतिरायाकडे पाहिले तो काय– !

तिचा विश्वास बसेना. पुनः पाहिले तरी तेच. मारुतिरायाने तर्जनी तोंडात घातलेली ! हे कसे झाले ? ती आली तेव्हा मारुतिरायाची उग्र मूर्ती गंभीरपणे उभी होती. आणि आताच हे काय झाले ? तिने प्रेतावर पानगा भाजला म्हणून ? तिने मारुतिरायाचा नैवेद्य घेण्याचे साहस केले म्हणून ? तिने तिथली तेलवात वापरली म्हणून ?

सूनबाईला फार आश्चर्य वाटले. पण तेथे विस्मयचकित होऊन बसायला तिला वेळ नव्हता. सासूची पूजा आटोपण्याच्या अगोदर तिला पोचायचे होते. सासूने तिच्या कुळाचा उद्धार केल्यापासून तिला सासूची फार भीती वाटे. भूत, प्रेत, देवता यांच्या सान्निध्यात शांत राहणारे तिचे मन सासूच्या आठवणीने थरारत असे. ती भराभर पावले टाकीत धुण्याचे ओझे घेऊन घरी पोचली. सासूची देवदेव संपायचीच होती.

सूर्य साक्षीला होता तोवरच मारुतिरायाच्या देवळातील अभिनव गावभर झाले. एक दुसऱ्याला सांगू लागला. मारुतिराय कोपले. त्यांनी तोंडात बोट घातले. जागृत दैवत संतप्त झाले. आता गाव बुडणार. गावावर अरिष्ट कोसळणार. शांती केली पाहिजे.

पुण्य केले पाहिजे. तहानेला पाणी, भुकेला भाकर दिली गेली पाहिजे. मुंग्यांना साखर घाला, पाखरांना तांदूळ घाला. वासरांना उंडी घाला. देवा तूच तारणारा. आमचा अपराध तरी काय ?

सहस्राक्षाने देवाघरी निरोप पोचविण्याच्या अगोदरच गावात सर्वत्र हाहाकार झाला. गाव सगळा स्मशानाकडे लोटला. मारुतिरायाच्या चरणी सर्वांनी लोटांगणे घातली. मंदिराचा गाभारा पाण्याने भरून काढला. डोईवर अभिषेक केला. दह्या-दुधाच्या चरव्या चरणी घातल्या. भट आले. भिक्षुक आले. मंत्रपठण झाले. तंत्रविद्या अजमाविली गेली. गावपाटील आला. कान धरून त्याने करुणा भाकली. देवा, माझ्या नित्य दर्शनाचा क्रम चुकला नाही. तुला जे पाहिजे होते ते तू मला सांगायचे होते. आम्ही सर्व तुझी लेकरे, आमच्यावर रुसवा फुगवा कशाला ? तू सांगशील ते करतो; पण कोपू नकोस. तुझ्या कोपाला रावण टिकला नाही. महासागर टिकला नाही. देवा आमच्यावर कोप तो कशाला ?

पण पाटलाची लोटांगणे व्यर्थ गेली. ब्राह्मणांचे मंत्र काम करीनासे झाले. मारुतिरायाचे बोट निवेना.

सचिंत मने करून पाटील उठला. गावात व गावच्या पंचक्रोशीत दवंडी झाली. सर्व लोकहो, आपल्या रुचवाने, आपल्या सामर्थ्याने जो कुणी मारुतिरायाची शांती करील त्याला गावच्या पाटलाने अग्रपूजेचा मान कबूल केला आहे. मागेल ते देण्याचे कबूल केले आहे. पंचक्रोशी गजबजली. कुणाची तपस्या आहे ? कुणाचे सामर्थ्य आहे ? साधू, संन्यासी, सगळ्यांची चौकशी झाली. सगळ्यांचे प्रयत्न झाले. तथापि गावच्या अरिष्टाची भीती दूर होईना. मारुतिरायाचे बोट तसेच तोंडात होते.

रोजच्याप्रमाणे आजही प्रभातीचा कलरव सुरू झाला. सृष्टीचा क्रम बंद नव्हता. ढगाआडून सूर्याने बाहेर येऊन नजर टाकली. तो सूनबाई रोजच्याप्रमाणे नदीवर धुणे आपटीत होती. तिचे मन स्वस्थ नव्हते, ती मध्येच थांबत असे. आणि काहीतरी निश्चय करून पुनः धुण्याची फडफड सुरू करी. आज तिने पानगाही खाल्ला नव्हता. नियमित कार्यक्रम जणू ती विसरूनच गेली होती.

अखेर तिचा काहीतरी निश्चित विचार ठरला, व ती उपाशीच घरी गेली.

दुपारी सासूचा डोळा लागल्यावर नवऱ्याची गाठ घेतली. त्याला नमस्कार केला व नम्रपणे सांगितले—" तुम्ही पाटलांना सांगा की तुमची सून मारुतीचे बोट काढून द्यायला तयार आहे. "

नवऱ्याने ऐकले व तो जागीच उभा राहिला. ही बोट काढणार ? फडताळातले लाडू चोरून खाणारी ही मुलगी बोट काढणार ? त्याला त्याची बायको आवडत होती, तिच्या सुलक्षणी स्वभावावर त्याची श्रद्धा होती. तिच्या बुद्धिमत्तेबद्दलही त्याला विश्वास होता. ती चोरून कशाकरिता खाते हे तिने त्याला सांगितले होते. त्यामुळे त्याच्या

मनात तिच्याबद्दल किंतू नव्हता. पण म्हणून हे भलतेच अभिनव ती कसे करील ? मारुतिरायाचे दैवत किती उग्र. त्यासाठी केवढी तपस्या लागेल ?

त्याने तिचे म्हणणे हसण्यावारी नेले. नंतर रागावून पाहिले पण ती ऐकेना. ती म्हणाली, " तुम्ही जाऊन सांगा नाहीतर मी जाते आणि सांगते. त्याचा निरुपाय झाला. उठला विचारा. दुपारसाच पाटलाच्या वाड्यात त्याच्या येण्याची वर्दी पडली. पाटील बाहेर आला. विचारपूस झाली. त्याने सांगितले– " पाटीलबाबा, तुमची सून म्हणते मी माझ्या मंत्राने मारुतिरायाची शांती करते. मी सांगेन तसे मात्र सगळे झाले पाहिजे. मी तिला पुष्कळ सांगून पाहिले पण तिचे म्हणणे पडले की तिच्याशिवाय ते बोट कुणालाच काढता यायचे नाही. पाहा. तुमचा विचार कळवा. "

पाटलाला काडीचा आधारही पुष्कळ वाटला. तो म्हणाला, " येऊ दे सूनबाईला. ती माझ्या मुलीसारखी. तिला मी पालखी पाठवितो. ती जे म्हणेल ते करीन. माझ्या गावाची नासाडी होऊ नये म्हणून मला माझ्या गावदेवतेची –माझ्या मारुतिरायाची शांती केलीच पाहिजे. "

सूनबाईला पालखी गेली. तिने भरल्या हातांनी, भरल्या कुंकवाने वाड्यात प्रवेश केला. पित्यासमान असलेल्या पाटलांना नमस्कार केला. बोलली,– " पाटीलबाबा, आज रात्री बरोबर बारा वाजता मी मारुतिरायांच्या देवळात जाईन. त्या अगोदर तुम्ही गावातील सर्व मुले आणि मुली बोलवा. त्यांना खाऊ घाला. त्यांचे चेहरे हसरे करा. रात्री गावची सर्व मंडळी स्मशानात येऊ द्या. देवळापासून एका हाकेच्या अंतरावर सर्वांना जमू द्या. मी देवळात प्रवेश करीन तेव्हा कुणीही जवळपास असता कामा नये. जो राहील, त्याचा प्राण जाईल. मारुतिरायाने तोंडातून बोट काढले की मी बाहेर येईन. त्याचा निरोप सर्वांना सांगीन. मारुतिरायाची कृपा झाली तरच मी देवळाच्या बाहेर येईन नाहीतर तुमची ही लेक भरल्या कुंकवाने आपल्या जिवाचे सोने करून गेली असे समजा. "

पाटील गहिवरला. त्याने सुनेच्या कपाळी कौतुकाचा हात फिरविला. सर्व तयारी, सर्व सिद्धता झाली.

रात्रीचे बारा वाजले. स्मशानातील सर्व योनी जाग्या झाल्या. रातकिडे ओरडू लागले. मंदिरापासून एका हाकेच्या अंतरावर उभा गाव जमला. सूनबाई कधी देवळात शिरते याकडे सर्वांचे डोळे लागले.

रात्रीचे बारा वाजले. सूनबाई शांतपणे देवळात शिरली. तिच्या मुखावर आत्म-विश्वासाचे तेज होते. चेहरा शांत होता. तिने आजूबाजूला पाहिले. देवळाचे दार घट्ट लावून घेतले. आणि काही वेळ शांतपणे ती मारुतिरायाकडे पाहत राहिली आणि एकदम बोलू लागली:—

" मारुतिराया, माझ्यासाठी तू हे तोंडात बोट घातलेस. मी प्रेतावर माझा पानगा भाजला. तुझ्या दिव्यातले थोडे तेल व नैवेद्याचा गूळ वापरला याबद्दल तुला मोठे नवल वाटले आणि म्हणून तू आश्चर्याने तोंडात बोट घातलेस. पण हा विचार तुझ्या मनात आला नाही की या गावाची शीव तू राखतोस. रामराजाने या गावाची जबाबदारी तुझ्यावर सोपविली आहे आणि त्या गावात माझ्यासारख्या कित्येक मुलांमुलींवर या ना त्या कारणांनी भूक धरून ठेवण्याचे किंवा भुकेसाठी हवे ते करण्याचे प्रसंग येऊ शकतात. याबद्दल आम्ही जर नवल केले तर तुला कसे वाटेल ? गावचा पाटील तुझ्या दारी दिवा लावतो म्हणून तू मानतोस की तो सर्वांची काळजी घेत असेल, सर्वांचे भुकेने काळवंडलेले चेहरे तो सतेज करीत असेल; पण खरे ते तू पाहत का नाहीस ? तू तोंडात बोट स्वतःकरिता घालायला पाहिजे की तुला आम्हा लेकरांची भूक कशी दिसली नाही ! तुला नैवेद्य दाखविणाऱ्यांना तू कशी सूचना दिली नाहीस ! साऱ्या गावाचा तळतळाट तू माझ्यावर का बसवितोस ? तुझे थोडेसे तेल मी घेतले असेल तर हे घे तुझे तेल. मी तुझा गूळ घेतला असेल तर हा घे गूळ. पण माझ्यासाठी तू तोंडात बोट घातलेस असा बोल माझ्यावर यायला नको. मी चोरी करण्याच्या उद्देशाने काहीही वाईट केले नाही. सेवेसाठी शरीर राबवायला कमी केले नाही. माझी भूक तुला दिसली नाही म्हणून मला प्रेतावर मला माझा पानगा भाजावा लागला.

देवा, मी आता आण खाऊन आले आहे. माझा अपराध नाही. तू स्वतःला बोल लाव. पण हे बोट काढ. त्यावाचून मी परत जाणार नाही. मला तुझी फारशी पर्वा नाही. हा इथे नारळ फोडावयाचा दगड पडला आहे. तू बोट काढतोस का घालू तुझ्या डोक्यात व करू तुझा कपाळमोक्ष ? तूही भंगशील आणि त्याच दगडाने माझाही कपाळमोक्ष मला करून घेता येईल. तू देव झालास तरी प्रश्न माझ्या अब्रूचा आहे. गावकऱ्यांचा शाप मी सहन करणार नाही. काढ बोट–देवा, काढ बोट—"

असे म्हणून तिने हात उगारला, पण तिला तो लागलीच परत घ्यावा लागला. कारण मारुतिरायाने बोट काढले होते आणि त्याची मुद्रा सौम्य झालेली दिसत होती. तिने भक्तिभावाने त्याच्या चरणी डोई ठेविली व ती बाहेर आली.

पाटील वाटच पाहत होता. तो धावतच आला. देवळात डोकावून पाहतो तो मारुतिराय शांत झालेले ! त्याने उचंबळून हर्षातिरेकाने सूनबाईला उचलून घेतले व गावकऱ्यांच्या हातांच्या पालखीवरच सुनेची मिरवणूक निघाली.

वाडा आला. सूनबाईची सर्वांनी पूजा केली. प्रभातीचा सूर्य गावाचा उत्सव व गावकऱ्यांचा आनंद मोठमोठ्या डोळ्यांनी पाहू लागला. गावपूजेचा मान सुनेला मिळाला. तिने मारुतिरायाचा निरोप पाटलाला सांगितला :—

" पाटीलबुवा ! मारुतिराय म्हणाले, तुझ्या गावात मुलांची उपासमार होते. भुकेसाठी काहीही करताना त्यांना खंत वाटत नाही. गावचा पाटील जिवंत असून हे

होते कसे ? त्यापेक्षा गाव उद्ध्वस्त झालेला काय वाईट ? पाटीलदादा, गावाची अब्रू संभाळा आणि गावच्या मुलांना आपले माना—"

सर्वांनी तिचा शब्द देवाच्या वाणीप्रमाणे पूज्य मानला. गावपूजेच्या जागी सुनेचे आसन बसले. आणि रोज टोपल्या भरभरून नैवेद्य तिला मिळू लागला.

आणि त्या दिवसापासून गावातले कुणीही पोर गावपूजेच्या जागी गेले की त्याला ओंजळभर प्रसाद मिळत असे. भूक सोसण्याचा प्रसंग सूनबाईने त्यानंतर कुणावर येऊ दिला नाही. सर्व मुले सुखी झाली.

आमची गोष्ट सरो. तुमचे आमचे पोट भरो.

७।१२।४४

७८

लोकगंगेतील पुष्पदीप

बाळपणी सर्वच मुले हूड असतात, आणि आई म्हणे मी तर कुणाच्या बापाला बघत नसे. त्यामुळे सर्वांच्या नाकी नऊ येत. बंधू तर मला त्या वेळी 'सैतानची लंगोटी' च म्हणत !

अशा मुलाला सुधारणे किंवा त्याला जास्त बिघडू न देणे हे आईवडिलांचे कर्तव्य होते. ते पार पाडताना त्यांनी मला धाक दाखवून पाहिला, देवाचे भय घातले; पण माझ्यात 'ज्ञानाचा उदय' काही होईना, आणि ते देतील तो उपदेश मी 'सुखासुखी गिळेन' असेही चिन्ह दिसेना.

मला देखील थोडे थोडे ते दिवस आठवतात. देवांचा उपयोग माझ्या खेळात झाला तरच मला त्यांच्याबद्दल आपुलकी वाटू शके. शंकराच्या देवळातील नंदीशी माझी जी दोस्ती झाली तिचे कारण त्याच्या पाठीवर सुखनैव मला बसता येत असे, हेच असावे.

दूधतूप जसजसे माझ्या अंगी लागू लागले तसतसे शरीर वाढले. पण इतर लोक म्हणत, मन, डोके काही वाढले नाही. "अन्न खातोस की शेण ?" असे कित्येकदा मला माझ्या खोडकरपणाबद्दल ऐकून घ्यावे लागे. वडिलांची मात्र माझ्या बुद्धीवर थोडी निष्ठा होती व आठ वर्षेपर्यंत शाळेचे दार मला जे पाहावे लागले नाही ते त्यांच्याच कृपेने. त्यांना शाळेबद्दल नितान्त तिरस्कार. ते म्हणत, "ज्या दिवशी हा स्वतःहून म्हणेल, मी शाळेत जातो त्या दिवशी मी त्याला शाळा दाखवीन. तोवर तो बाहेर जर आपले मन रमवितो तर बिघडले कुठे ? उगीच आतापासून त्याचे डोके खराब करण्यात काय अर्थ आहे ?" शिक्षण म्हणजे डोके खराब करणे हे त्यांचे मत मला एकदम कबूल होते. त्याचा परिणाम असा झाला की, या देहाने वयाच्या

आठव्या वर्षी शाळेत प्रवेश केला व आठ वर्षेपर्यंत त्या लहानशा खेड्यातील लोकांना अगदी त्रस्त करून सोडले.

सातव्या वर्षी माझ्यात आणखी एक गुण (?) दिसू लागला. तो म्हणजे शिव्या देण्याचा. आमच्या शेजारी एक कजाग विधवा राहत असे. ती आपल्या दुःखाने जर्जर झाली होती. सबब ती फार कडवट बोले. साधे शब्द तिच्या कोशात नव्हते. आपल्या मुलाला 'जेवायला ये' असे ती कधीच म्हणत नसे. 'ए मढ्या, पानावर येऊन मर.' –असे ती म्हणे. असल्या भाषेत मला नावीन्य वाटले असावे आणि मी देखील फार सपाट्याने तो सारा शब्दसंग्रह आत्मसात केला. 'तुझे कधी बरे होणार नाही.' 'तू मरशील.' 'तुझा, रांडलेका, सत्यानाश होईल,' 'तुझ्या तोंडात किडे पडतील.' इ. शापवाक्ये मला पाठ झाली व त्यांचा उपयोगही सर्रास सुरू झाला.

ब्राह्मणजन्माला येऊन माझी वाणी बिघडली याची आईला मात्र खंत वाटली. तिने मला अनेकदा सांगितले; पण 'तसे बोलणे वाईट का असते?' असे तिला विचारता ती सांगू शकत नसे. राक्षसाची, भुताची भीती मला भिववू शकत नसे. राक्षस आणि भुते शोधायला त्या वयातही मी रात्री चोरून, पळून स्मशानात गेल्याचे मला आठवते. वडिलांना हे कळले तरी ते मला मारीत नसत. फक्त एवढे म्हणत की–'रात्री जाताना काठी घेऊन जावे, जोडा घालून जावे.' त्यांचा मारण्या-वर कदाचित विश्वासही नसावा.

वडिलांचे वागणे हे असे आणि माझ्या व्रात्यपणाला खंड नव्हता.

त्यामुळे आईला मोठा घोर असे.

तसा मी सर्वच दृष्टींनी त्या वेळी वाईट होतो असे मात्र नव्हे. मी एकतर दिसायला तेव्हा फार चांगला होतो. सहा-सात वर्षांच्या मानाने खूपच निरोगी आणि दणकट होतो. आणि पुस्तकात नसली तरी माझी बुद्धी अत्यंत तल्लख होती असे सर्व म्हणत. त्यामुळे माझा लोभ, कौतुक फार झाले. अर्थात या इतरांच्या लोभामुळेच त्यांना पुष्कळदा माझ्याकडून त्रास, उपसर्ग पोचत असे. लोकांनी मला जवळ घ्यावे, माझे मुके घ्यावेत. मला ते आवडू नये. मग मी त्यांचे केस ओढावे, मिशा उपटाव्या आणि माझ्या दांडगेपणाचा तेवढा डांगोरा पिटला जावा–असे चाले!

अशा वेळी माझ्या आईने एक युक्ती केली. युक्ती म्हणजे माझ्या दृष्टीने. तिने ते सगळे मनापासून सांगितले. ते सांगताना त्यात आपले अंतःकरण ओतले. अपत्य-वात्सल्याचा ओलावाही त्यात आणला.

सायंकाळी माझ्या झोपण्याच्या वेळी ती मला झोपवायला म्हणून आली. मला कुरवाळिले आणि आपण आपल्या बरोबरीच्या माणसांना जसे सांगतो तसे ती म्हणाली,

"हे पाहा, तुला सगळे लोक वाईट म्हणतात. ते म्हणतात, तू खाऊन खाऊन नुसता पेंद्या होणार आहेस. नुसता शिव्या बकतोस. तू काय हवे ते केलेस तरी आमची हरकत नाही. आमचे त्यात नुकसान नाही. लोक आम्हांला थोडेच वाईट म्हणतात ? तुलाच म्हणतात. एक मात्र लक्षात ठेव. तू लोकांना शिव्याशाप देतोस ते का ? परवा त्या शेवंतीच्या मुलाला तू म्हणालास, 'तुझ्या तोंडात किडे पडतील.' पण पडले का त्याच्या तोंडात किडे ? आपण म्हणतो तसे काही होत नाही. देव जसे म्हणेल तसे होते. आपण सर्व त्याची मुले आहोत. तू देवाचे काम आपल्यावर कशाला घेतोस ? तुझे काम इतरांनी केले तर तू रागावतोस. तसेच देव पण रागावतो. पण तुला ते कळत नाही. काल तू आपल्या सोनीला म्हणालास—'तुला ठेच लागेल.' पण लागली कुणाला ठेच ? तुला. फुटले कुणाचे बोट ? तुझे. असे का झाले ? देवाला तुझा राग आला म्हणून. देवाला तुझ्या एकट्याची थोडीच काळजी करावी लागते ? त्याला सर्वांची काळजी आहे. तो तुला एकट्याला थोडाच दिसणार ? पण त्याच्याकडे तुझ्या खोड्या मात्र सर्व कळविल्या जातात. त्याने खूपसे पक्षी स्वर्गातून आपल्या या जगात पाठविले आहेत. ते इतके आहेत की, प्रत्येक माणसाच्या वाट्याला दोन दोन यावेत. ते पक्षी फार फार सुंदर आहेत. त्यांचा रंग पांढरा स्वच्छ आहे. त्यांच्या पंखांना हिरे लावले आहेत. त्यांची चोच लाल माणकांची आहे. ते सारखे आपल्या डोक्यावर उडत असतात. आपल्याला दिसत नाहीत; पण आपल्यापासून दूर कधीही जात नाहीत. आपण जिथे जाऊ तिथे ते येतात. आपण झोपलो तर ते आपल्या जवळपासच कुठे तरी विश्रांती घेतात. आपण जे बोलतो ते त्यांना ऐकू जाते आणि ते सारखे 'तथास्तु', 'तथास्तु', 'तुझेही तसेच होईल,' 'तुझेही तसेच होईल' असे म्हणत असतात. तू जेव्हा दुसऱ्याला म्हणतोस की, तू नदीत पडशील तर ते पक्षी म्हणतात, 'तथास्तु ! तुझेही तसेच होईल.' आणि त्या दिवशी आपल्या या नदीत तू पाय घसरून बुडत होतास. तू जे जे इतरांना म्हणतोस ते ते तुला होईल. तू दुसऱ्याला म्हण—'तुला गोड खायला मिळेल.' तर त्याला मिळण्याऐवजी गोड खायला तुला मिळेल.' तू जे इतरांसाठी करशील ते तुझे होईल पाहा. असे पक्षी उडत असतात. सुंदर पक्षी पांढरे शुभ्र. मोती माणकांनी सजलेले. गोड गोड गाणारे. सारखे उडणारे, आपण जे जे करू ते देवाला सांगणारे—

"आणि याउपर तुला कुणाबद्दल वाईटसाईट बोलावयाचे असेल तर बोल बापडा. आपल्याला काय ? तू तुझ्या वडिलांना कुणावर रागावताना ऐकले आहेस ? मी कधी कुणाला शिव्या दिलेल्या तू ऐकल्या आहेस ? कारण आम्हांला तुझ्यासाठी जगायचे आहे. तुझे खूप करायचे आहे. आम्हांला वाटते तू आमचा. तुला मात्र नाही वाटत आम्ही तुझी म्हणून. नाही रे ?"

एवढे बोलून ती गपकन थांबली. मला त्या वेळी कितपत कळत होते कुणास

ठाऊक. पण मी रडायलाच लागलो. मला झोपेत त्या दिवशी ते दोन सुंदर पक्षी अगदी स्पष्ट दिसले.

आणि दुसऱ्या दिवशी माझ्याने कुणाला वाईट बोलवेनाच. मी अगदी खिन्न, उदास झालो. हळूहळू औदासीन्य गेले. पण मी जे इतरांसाठी करीन तसे माझे होईल, मी जे बोलेन तसे होईल, हा संस्कार माझ्या मनावर कायमचा उठल्यासारखा झाला.

या शुभ्र, विमलकांती पक्ष्यांची गोष्ट व त्यांचा अस्तित्वहेतू आईने स्वतः रचला होता की, तिलाही ते कुणी सांगितले कोण जाणे. तिला विचारले तर ती म्हणते, 'मला कुठून तरी कळले' पण मला वाटते असल्या सुंदर, संस्कारी गोष्टी सर्वांच्या मालकीच्या असाव्यात, त्यावर कुणा एकाची मालकी असू नये, हा लोकसाहित्याचा दंडकच असावा व लोककवी तो कसोशीने पाळीत असावेत! तिच्या अंतःकरणात वाहत असलेला लोकगंगेचा प्रवाह मी अनेकदा पाहिलेला आहे. त्यात मी अनेकदा निमज्जन केले आहे. वरील गोष्ट म्हणजे त्या प्रवाहात कुणी तरी किंवा तिनेच सोडलेला पुष्पदीप असावा!

तो संस्कार मी आज देखील पुसू शकलो नाही. माझ्यात जो अहंकार आहे, इतरांच्या मतांसंबंधी क्वचित जी वेदखली आहे आणि स्वतःबद्दलचा अवास्तव आत्मविश्वास आहे तो देखील या 'तथास्तु' मंत्राचे वैगुण्यात झालेले पर्यवसानच असावे. मी परीक्षा पास झाल्याबद्दल माझे कुणी अभिनंदन केले तरी मला राग येतो. माझ्या संकटकाळी कुणी मला सहानुभूती दाखविली तरी मला चीड येते. याचे कारण देखील हीच माझी भावना असावी की, यांच्या हाती माझे बरेवाईट करणे काहीच नाही. मग ही उगीच प्रदर्शने कशाला?

जे पटेल ते घेणाऱ्या, दिसेल त्यावरच विश्वास ठेवणाऱ्या माझ्या बुद्धीलाही माझ्या आईने त्या अद्भुत, कल्याणमय, गूढ आणि अत्यंत सुंदर अशा पक्ष्यांचा लळा लावून ठेवला आहे. ते पक्षी खरे नाहीत हे आज मला कळत असूनही त्यांच्याबद्दलचे माझे आकर्षण आणि श्रद्धा किंचितही कमी होत नाही.

१९।१२।४४

७९

संस्कार

तिच्या तेरा वर्षांच्या कोवळ्या अंतःकरणात जी ज्योती त्या वेळी होती ती आता असेल किंवा नाही मला माहीत नाही. पण अनुमानाने काही गोष्टी सिद्ध होण्यासारख्या असतील तर अजूनही ती ज्योती मालवायला तिने काही एक कारण घडू दिले नसावे असे वाटते.

आणि त्या वेळी तर तिचे अंतःकरण मृदू असूनही गुलाबकलिकेसारखे होते. अंतरीचा प्रकाश तिच्या मुखावर खेळत होता की मुखाची दीप्ती हृदयात फाकली होती कुणास ठाऊक. पण सलीमाचा एक मात्र अढळ विश्वास होता, मुख प्रसन्न असले तर मन नक्की प्रसन्न असते.

माझ्याच शाळेत असूनही तिचा सहवास मला फार उशिरा घडला. आमच्या अनवर पाटलांची ती मुलगी. अनवर अब्बा नावाचेच मुसलमान. त्यांच्यात दुर्गुणाचे नाव नव्हते. त्यांचे दुकान आम्हांला आमचे दुकान वाटे आणि अनवर पाटलांनीही आमचा दुजाभाव कधी केला नव्हता. एकदा तर त्यांनी मोहरमच्या सणात माझ्या अंगाला रंग लावून मला वाघ बनवून नाचायला लाविले होते. त्या रुपड्यात मी माझ्या घरी अंगणात येऊन नाचू लागलो, तो काय ? मी बोलेसतोवर मला कुणी ओळखले नाही. आईचा आपले मूल ओळखून काढण्याचा अभिमान त्या दिवशी बराच जिरला.

अनवर पाटलांचे घर मात्र आम्हांला वर्ज्य होते. मुसलमानांच्या घरी हिंदूंनी जायचे नसते असा माझ्यावर संस्कार होता. त्यामुळेच सलमा मला दिसली ती एकदम शाळेतच आणि ती प्रथम बोलली तो प्रसंग ?

आत्मस्तुतीचा क्षण जसा माणसाला सुख देतो तसेच आत्मनिंदेनेही कधी कधी बरे वाटते.

प्रायमरी मराठी शाळेत मी जात असे. शाळा म्हणजे एक मोठ्या उंच पडलेल्या किल्ल्याच्या खिंडारातील एक खोली व त्या समोरच पडवी आणि बाहेर खूप विस्तीर्ण मैदान आणि आवार. त्यात दूधमोगऱ्याची पांढरी स्वच्छ फुले फुललेली पहाटे तोडली तर त्यांचा मादक मंद गंध मनाला भुरळ घालून जाई. शाळेच्या खोलीत दोन वर्ग असत. खोली लांब होती. एका कोपऱ्यात मराठी चौथी आणि दुसऱ्या टोकाला उर्दू. बाहेरच्या पडवीत मराठी दुसरी आणि दुसऱ्या कडेला उर्दू दुसरी. मी मराठी दुसरीत होतो. सलमा उर्दूत होती आणि त्याच वर्षी येऊ लागली होती.

खेड्यातील मुलगी. अनवर अब्बांचा पानमळा होता. मोकळ्या हवेत सलमाचे दिवस जात. घरी खाणे पिणे व्यवस्थित. त्यामुळे अंगाने आम्हा खेड्यांतील मुलांसारखी ती पण थोराड दिसे. आजच्या संस्कृतीच्या तुलनेने सांगायचे म्हणजे ती चांगली सोळा वर्षांची दिसे. उंचपुरे गात. शरीरावर यौवनाच्या खुणा उमटत असलेल्या. रेशमी निळा पायजमा आणि वर फुलांचा सदरा व फडकी पांघरून ती शाळेत येई. रूप तिचे नितळ होते. डोळ्यांत संकोच नव्हता. गहरी नजर पण निष्पाप होती. बोलताना नाकातील लांब मोती हालत असे आणि त्याचे इवलेसे किरण तिचे ओठ आपल्याकडे ओढून घेत. चेहऱ्यावर देवीचे व्रण होते चार-दोन. पेरूला वाघळे कधी कधी चोचेने टोचतात आणि त्याचे सौंदर्य वाढवितात. कोवळ्या पालवीने भरलेल्या

वृक्षावर चांदणे नाचते तसे तिचे मंदमंद स्मित ! झाडावर जसे सोनचाफ्याचे फूल तशी ती मुलांत बसलेली असे. उर्दू शाळेत मुले-मुली एकत्र शिकत. खेड्यात असेच असते. शिक्षक म्हातारे, पितृतुल्य. मुलामुलींनाही कसलाच तिथे संकोच, भीती वाटत नाही. सलमा त्या कोपऱ्यात बसून मुनीर मास्तरांजवळ अलिफ बे, पे, से, म्हणत बसे. आम्ही इकडे आमच्या मास्तरांच्या अध्यक्षतेखाली 'रामाने आपला पोपटाचा पिंजरा पुढल्या दारी टांगला होता,' अशी पोपटपंची करीत असू.

सलमाकडे वारंवार लक्ष जाईल, धड्यात, खेळात किंवा खोड्यांत त्यामुळे व्यत्यय येईल अशी मनःस्थिती त्या वेळी मुळीच नव्हती. सबब तिचा तिकडे अभ्यास चाले. आमचा इकडे अभ्यास चाले. मधली सुट्टी झाली की उन्हात आम्ही गोट्या खेळत असू. सलमा पडवीच्या खांबाशी टेकून आमचा खेळ पाहत असे.

विजयाचा उन्माद मला त्या वेळी सतत हवा असे. एकदा गोट्या खेळताना माझी मार्क्याची गोळी हुकली. मुले हसली. मी चिडेने इकडे तिकडे पाहिले. सलमालाही हसू आलेसे दिसले. तिचे हसरे डोळे विस्फारले होते.

मग काय ! तिच्याबद्दल अढी बसायला तेवढे कारण पुरे होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता ती शाळेत आली. अंगणातून येत होती. आमचे टोळके पडवीखाली पाय टाकून अंगणाकडे पाहत बसले होते. बरी सापडली सलमा. मास्तर नाही आले अजून. ठीक, आमचेच राज्य. सुंदर असेल, आपल्या घरची मोठी असेल, पाहून घेऊ. मलाही जिवाला जीव देणारे दोस्त आहेत. हे साधे सुलभ विचार आणि आम्ही तीन-चार जणांनी बाजारच्या चव्हाट्यावर ऐकलेल्या अशा शेलक्या रंगेल ललकाऱ्या मारून 'हायरे' केले की त्यातला अर्थ न उमगूनही सलमा जिरल्यासारखी झाली व चेहरा पाडून वर्गाच्या जागी जाऊन बसली मीही विजयोन्मादात मुलांना पाटीवर गणित घ्यायला सांगितले. कप्तान होतो मी वर्गाचा !

मधली सुट्टी झाली. गोट्या भराभर अंगणात पडल्या. सलमा खांबापाशी येऊन उभी राहिली. तेच हास्य, तिच प्रसन्नता, किंचित गांभीर्य. डोळे थोडे अभ्राच्छादित.

मी भराभर गोट्या उडविल्या आणि 'बीस की चोट' मारून राज्य जिंकले. इतर गडी खेळायला गेले. मला काम नव्हते. माझ्या दोन्ही मोठ्या गोट्या मी आकाशात उंच उंच फेकीत वेळ घालवू लागलो आणि छपरीच्या सावलीत आलो. सलमा जवळच उभी होती. तिने शांतपणे मला तिच्याकडे येण्याची खूण केली—

हिलाच आपण आज शिव्या दिल्या, चिडविले—

छे, जाणे शक्य नाही. मन खोटेच म्हणू लागले '—मी काय डरतो तिला ?' पण पाय उचलेनात. पुनः गोटी वर फेकली. जणू ऐकलेच नाही.

तिने हळूच पण स्पष्ट अशी हाक मारली.

पुनः हाक मारली.

गेले पाहिजे. मुलगी हाक मारते आहे. गेले पाहिजे.
चेहरा बेफिकीर. जणू आता एक मोठा वाघ मारून आणला.
मन मात्र सशासारखे. गेलो नि सलमाच्या समोर उभा राहिलो.
" काय ? कशाला बोलाविलेस ? "
" तुला नीट ऐकायलाच येत नाही का ? "
" का ? "
" मी तुला तीन हाका मारल्या ! "
ही अशा रीतीने जिरविणार का माझी ? ठीक आहे. पाहू या.
" मला फालतू गोष्टी ऐकायला येत नसतात. "
" अरे, पण तुझेच नाव घेत होते मी, ते फालतू नाही ना ? "
आणि निरागस स्पष्ट हसणे. आम्ही मारलेला वाघ मेलेला होता हे लक्षात आल्यासारखे माझे तोंड झाले.
" बरे, पुढे, कशाला हाक मारली ? दिसत नाही मला राज्य घ्यायचे आहे माझे ते ? "
" घेशील रे. अन् हे गोष्ट्यांचे राज्य. दुसऱ्याला देता पण येते. देऊन टाक ना कुणाला जरा—"
" हं. फुकटचेच तर आहे. "
" बरं, नको देऊ. आज सकाळी मी येताना अभद्र बोललास तो तूच ना ? "
अशा वेळी चक्क नाही म्हणता म्हणता माझे मन निर्ढावले होते. पण त्या वेळी ते तयार झाले नाही नाकबूल करायला. मनातला ससा थरारला आणि चेहराही त्यामुळे थोडा पडला माझा. तथापि—
" पण तुला त्याची पंचाईत ? "
" म्हणजे ? मलाच अभद्र बोललास आणि मलाच पंचाईत नको ? मग कुणाला तुला ? काय बोललास ते तर सांग ! अर्थ काय त्याचा ? "
" असेल काहीतरी, मलाही माहीत नाही. बरं मी जातो. "
" थांब थोडा, का दिल्यास मला शिव्या तू ? मी गुपचूप येत होते म्हणून ? "
" त्या दिवशी तू मला हसलीस गोटी हुकली तेव्हा ? "
" मग त्यात काय झाले ? मी पाय घसरून पडले तर तुला नसते का हसायला आले ? हा कुठला तुझा स्वभाव की तुला अपयशच येऊ नये आणि दुसऱ्या कुणाला यशच मिळू नये ? आणि मुले हसली ती ? "
" ती हसली तर हसली पण तू हसायचे नव्हते ! "
" असेच मी म्हणते. इतरांनी दिल्या तर दिल्या शिव्या पण तू अभद्र बोलायला नको होते. "

"मी फार थोड्या दिल्या. इतरांनीच तुला पुष्कळ शिव्या दिल्या. त्यांना म्हण ना!"

"पण तू का दिल्यास? ते मला मुळीच आवडले नाही."

"ते का?"

"कारण तू सुंदर आहेस. तुझी आई तुझे कपडे स्वच्छ धुते पण तू ते कपडे येथे घाणेरडे करतोस. तुला देवाने चांगले मन दिले पण ते तू इथे खराब करणार आहेस. तुझा चेहरा सुंदर आहे पण तो तू बिघडवणार!"

मी तिच्याकडे पाहिले आणि बोलेतोवर पाहतच राहिलो.

"तुला माहीत आहे, वाईट वागले म्हणजे आपले मन वाकडे होते आणि मग चेहराही वाईट होतो. माझे बाबा मला विचारतात, तुझ्या शाळेत कोण कोण येतात? मी त्यांना तुझे नाव सांगते. तुझे वर्णन करते. तुझे सुंदर दात, उंच उंच बांधा, काळेभोर केस, सगळे वर्णन करते मी. त्यांना काय असे आता सांगू मी की तुझ्यासारखा सुंदर मुलगा अभद्र, वाईट बोलतो? त्यांना किती वाईट वाटेल तुला माहीत आहे?

"बरे, माझ्याबद्दल तू कधी तुझ्या आईला सांगून पाहा. तुला असेच सांगावे लागेल की सलमा नावाची मुलगी आमच्या शाळेत आहे. ती सुंदर आहे, चांगलीही आहे. ती नेहमी हसते. आमचे खेळ पाहत निमूटपणे उभी असते. खेळता खेळता तिच्या वर्गात आमची गोटी गेली तर ती आणून देते. आम्हांला मदत करते—"

ती थोडी थांबली. मी तिच्यावरून माझी दृष्टी खाली केली. तिच्या पायांत काळ्याभोर सपाता होत्या. तिची तलम ओढणी हवेत लहऱ्या मारीत होती. ती पुन्हा बोलू लागली--

"हे पाहा, तू मला फार आवडतोस, तुझा खेळ मी तू दिसावा म्हणून केवळ पाहत असते. रविवारी शाळा बंद असली की मला बरे वाटत नाही."

मला आठवते, मलाही हेच म्हणायचे होते.

"माझे बाबा म्हणतात, 'सलमाचे लग्न लवकरच करावयाचे. माझ्यालायक या गावात मुलगा नाही. मला सुंदर, शिकलेला, श्रीमंत नवरा पाहून देणार आहेत ते. माझे लग्न होईल लवकर. मुलींचे काय, लग्न झाले की संपलेच सर्व. मग मला माझा नवरा शाळेबद्दल विचारील. मी त्याला तुझ्याबद्दल सांगेन. तू असा आहेस, तसा आहेस, छान खेळतोस, खूप आनंदात राहतोस. पण माझ्यावर मात्र एक गोष्ट सांगावयाची पाळी आणू नकोस. ती ही की तू अभद्र बोलतोस. तुझे मन मळले आहे. मी खोटे बोललेले तुला आवडायचे नाही ना? सर्वांचे तू ऐकतोस, राज्येच्या राज्ये कमावून लोकांना देतोस; मीही तुझा खेळ रोज पाहते. मला एवढे तर दे. देशील ना?"

मी काय बोलणार ? ओली माती कुंभाराच्या चाकावर आकारित होताना तिला काय वाटत असेल ? दगडातून मूर्ती कोरली जात असताना दगडांना काय वाटत असेल ? विलक्षण वेदना ! पण विलक्षण संतोष !

"तू आमच्या दुकानावर येतोस. माझ्या घरी का येत नाहीस ? आज येशील ?"

"नाही."

"का रे, तुला माहीत नाही घर ? माझ्याबरोबर चल—"

"छे, तू मुसलमान, तू कोंबडी खातेस, बकरी खातेस."

"कुणी सांगितले तुला ? माझे बाबा तर ह्या वस्तू घरात येऊ देत नाहीत. तेवढीच अडचण असली तर मग ती दूर झाली—"

"पण तरीही मी येणार नाही."

"बरं, ठीक, जा. एका सुंदर मुलाची त्याचे मित्र वाट पाहत आहेत." असे म्हणून ती प्रसन्न मनमोकळे हसली आणि वर्गाकडे वळली. मी परतलो. माझे राज्य कुणी घेतले याचीही मी चौकशी केली नाही आणि शाळेत पण मला बसावेसे वाटले नाही.

आणि त्यानंतर माझ्या गोष्टी हुकल्या तरी मी इतरांचे डाव निमूटपणे आणि आनंदाने दिले. त्यात त्यांनाही मौज वाटली आणि आमचा खेळ खूपच रंगू लागला.

सायंकाळी एकदा शाळेत हुतूतू खेळत होतो. लिंबाची सावली गर्द होती. पाण्याने पाटी ओढली व खेळ सुरू झाला. ते मैदान थोडे दूर होते. सलमा तिथून बरीच दूर दिसत होती.

खेळ रंगात आला. मला एका मुलाने पकडले. तो दंश मी मनात धरला आणि संधी येताच त्याला पकडून खूप खूप गुद्दे दिले, पाठीत रगडे दिले. इतरांनी भांडण सोडविले व पुनः खेळ सुरू झाला.

लागलीच दुसरे दिवशी सलमाने एकटे पाहून मला बोलाविले.

"तू खेळत होतास काल की मारामारी करीत होतास ?"

"पण तू मला एकट्यालाच का म्हणतेस ? मला दुसऱ्याने अगोदर पकडून मारले ते तुला दिसले नाही. मी मारले तेवढे—"

"त्याच्या जवळून तेवढेच शिकायला तू खेळतोस का ? तू त्यांना शिकवायचे तर तूच त्यांच्याजवळून शिकतोस ? आणि ही मारामारी ? हा राग ? साधी बकरीसुद्धा आपल्यापेक्षा शहाणी असते. ती बाभळीची फांदी तोंडात धरून पालवी तेवढी अलगद खाते व काटे सोडते. एकही काटा बोचत नाही तिला आणि आपण बकऱ्या पोसणारी माणसे पालवी सोडून काटेच का खाणार ? छे ! असे नाही. उद्यापासून तुझा हा खेळ पाहायला मला येऊन त्या झाडाशीच टेकून उभे राहावे लागेल.

कुणी अरे म्हटल्यास कारे म्हणून मला चटकन प्रतिकार करता येत असे, पण सलिमाचा प्रतिकार करावयाचा तो कसा ? तिच्या सामर्थ्यापुढे माझा मुळी टिकावच लागेना. अमर्षाने प्रतिकार करून नंतर खंत करण्याची जी अनेकदा पाळी येते तसली पाळी मात्र ती असेतोवर तिने माझ्यावर कधी येऊ दिली नाही. त्यानंतर माझ्य तेथील संबंध शालेय जीवनात खांबाला किंवा झाडाला टेकून उभी असलेली तिची ती कल्याणमय शुभमूर्तीच मी सतत पाहिली ! फुले टाकून माती सुगंधित करणारी तिची दृष्टी कोमेजलेल्या पुष्पवल्लरीवर पावसाची सर ओतणारे तिचे धवल हास्य विधात्याने दिलेले सुंदर मन आणि रेखीव शरीर त्याच्या चरणी जसेचे तसेच का पण आणखी विकसित, विलोभनीय करून अर्पण करण्याचा निश्चय दाखवीत असलेले तिचे ओठ—तिची जिवणी !

पुढे माझ्यावर खेड्यातले संस्कार फार होऊ नयेत म्हणून वडिलांनी मल तेथून शहराच्या शाळेत मामाकडे पाठविले.

या नव्या शाळेतील पडवीचे खांब राक्षसासारखे निर्लज्ज, विरूप वाटत. झाडांच बुंधेही भुतासारखे अशुभ दिसत.

आणि जवळून उडवून दिलेल्या पाखरांचा क्षितिजाकडे जाताना प्रतिक्षणी कम कमी होत जाणारा तो आवाज–तो मधुबोल !

२–५–४

८०

स्नेहदीप

बाबांचे मत उत्तरोत्तर माझ्याविषयी कलुषित होत गेले. त्यांची समजूत अश की मी आता वयात आलो आहे तेव्हा त्यांच्या अंगावर खाऊ नये. आपले वेगळे पाहावे. आईसुद्धा बाबांना वारंवार तसेच सांगत होती.

आणि ते स्वाभाविक होते. माझी आई वारली त्याच वेळेला माझे मायेचे असे कुणी राहिले नाही. बाबांचे अंतःकरण पुरुषी आणि पुन्हा ही नवी आई !

मनुष्य मोठ्या आवडीने बागेत झाड लावतो. वाऱ्याच्या लहरींनी ते झ हालत डुलत झोके घेते. दवाचे थेंब त्यावर पडले म्हणजे ते मोत्यासारखे पानाव थबकून राहतात. झाड उत्तरोत्तर मोठे होत जाते. त्याला कळी येते, फूल पुलते माणसाला वाटते आपल्या श्रमाचे सार्थक झाले.

नंतर सहज एक टोळधाड येते आणि फुलांचा व झाडांचा सत्यानाश करून जाते. मशागत करणाऱ्या जीवाला वाईट वाटते. तो हताश होतो. तथापि जगायचे तोवर त्याला आराम हवा असतो. विसावा, सुख ही त्याला शोधावी लागतात.

मिळाले तर तेवढेच सुंदर झाड पुनः बागेत लावावयाची त्याची तयारी असते. तो तसे करतो. पुनः त्याच्या आयुष्यात वसंताचा मोहोर बहरतो.

पण एक मात्र खास. एकदा टोळधाड आली तशी पुनः येऊ नये आणि आल्यास आपले सर्वस्व तिला हिरावित येऊ नये याबद्दल तो फार जागरूक असतो, सबब या झाडाची तो मागच्यापेक्षा जास्त आणि विशेष काळजी घेतो.

बाबांची तशीच स्थिती झाली. त्यांचे ठीक होते सारे. पण माझी स्थिती ?

त्या वेळी मी सोळा वर्षांचा होतो व आता विसाच्या घरात आलो होतो. पण हा फरक माझ्या आईला तितकासा जाणवला नसता. फरक जाणण्यासारखी स्थिती निर्माण झाल्यामुळेच जितक्या लवकर मी स्वतंत्र होईन तितक्या लवकर मला हवे होते. आणि खरे सांगतो मला परमेश्वराने सर्व दिले होते. सुंदर रूप होते. उंच पुरा बांधा होता, मनगटात जोर होता. डोक्यात मेंदू होता. अंगात रक्त होते. त्यामुळे आत्म-विश्वासही भरपूर वाटत असे की लाथ मारीन तिथे पाणी काढीन.

तथापि भोवतालची परिस्थिती तशी नव्हती. लाथ मारायला जावे तो ती जमिनीवर जोराने आदळावयाची आणि जमिनीतून निघण्याऐवजी डोळ्यांतून पाणी निघायचे.

कसेही असले तरी–घरातून–त्या वणव्यातून बाहेर पडल्यावाचून गत्यंतर नव्हते.

असेच माझ्या मनाने एक दिवस घेतले. जी पहिली गाडी मिळाली तिच्यातून माझा प्रवास सुरू झाला. एक नाही हजार तऱ्हेचे विचार मनात थैमान घालीत होते. अशाच एका स्टेशनामधे गाडी शिरली. तिथवरच माझ्याजवळ तिकिट होते. पण मी उतरलो नाही. गाडी प्रत्येक स्टेशनावर थांबत असे. काही लोक उतरत, काही लोक पुन्हा बसत, काहींचा प्रवास संपत असे. काहींचा सुरू होई. माझ्या प्रवासाला मात्र खरी सुरवात झाली होती.

असंख्य स्टेशनांनी माझ्या प्रवासाला खंड पडत होता. त्यांपैकी एका स्टेशनवर गाडी थांबली. मी खिडकीतून बाहेर पाहिले. चहा मागविला व सहज डब्याखाली उतरलो. तोच—काहीशी गोंधळूनच मी हाक मारली—" शर्माजी–"

त्यांनी माझ्याकडे पाहिले. मी सामान घेऊन खाली उतरलो.

" ओहो, हेमंत, किती दिवसांनी भेट ? या पाच वर्षांत अगदी पत्ता नव्हता तुम्हा मंडळींचा. बरे, तुझे सामान हेच ना ? "

त्यांनी एका पोर्टरला हाक मारली आणि माझे सामान त्याच्या हवाली करून ' इन्हे घर ले जावो ' असे म्हणत ते माझ्याकडे वळले—

" मी एवढी गाडी सोडून आलोच, तू चल तोवर घरी. " जवळ येऊन उभा राहिलेल्या गार्डाशी ते बोलू लागले. मी पोर्टरच्या मागून निघालो.

शर्माजी या लाइनवर आहेत हे जर मला माहीत असते तर मी आरंभी इथे उतरायचे ठरविले असते.

घरात पाऊल घालताच सरलादेवी मला पाठमोरी टेबलाजवळ उभी असलेली दिसली. मी एकदम हाक मारली, तिने चमकून मागे पाहिले.

" ओहो तू ? " आणि टेबलावर आपल्या मुलाकडे पाहत ती हसून माझ्याकडे व्यंग करीत करीत म्हणाली,

" रतन, पाहा रे बाबा जरा, सूर्य आज कुणीकडे उगवला तो ! " तिने माझ्यासमोर खुर्ची केली.

पाच वर्षांपूर्वी देवी जशी प्रेमळ व विनोदी होती तशीच ती आजपण दिसली. त्या वेळी रतन झाला नव्हता. आमच्या गावावरून बदली झाली तेव्हा किती हट्ट घेतला होता तिने माझ्याबद्दल ? शेवटी आईने शपथ घेऊन सांगितले होते: " चार-पाच महिन्यांत सरल, तुझे सारे ठीक जमल्यावर मी जरूर येईन. आणि मग हेमला ठेवून जाईन. "

आई मला ठेवून गेली एवढे मात्र खरे !

" हेम, हे आईचे चार महिन्यांनी येणे असेल नाही ? एका पत्राने तरी चौकशी करावयाची होती माझी ? " तिच्या प्रश्नात खोच असली तरी ती स्नेहाने भरलेली आणि माझ्या येण्याच्या आनंदाने अगदी बोथट झालेली अशी होती.

पण माझे तोंड काळे ठिक्कर पडलेले तिला दिसले असावे. माझ्या तोंडून कसे-बसे वाक्य फुटले, " मला वाटले होते की, बाबांकडून तुम्हांला कळले असावे. सरलादेवी, आई गेली—" आणि मी गप्प बसलो.

ती माझ्याजवळ आली. एव्हाना शर्माजीपण येऊन पोचले होते. ते मुकाट्याने माझ्याजवळ येऊन बसले.

स्त्रीचे अंतःकरण ! माझ्या पाठीवरून तिचा हात फिरत होता. दुसऱ्या हाताने ती रतनला संभाळीत होती. सर्वच अनपेक्षित पाहून तो गोंधळून रडू लागला होता.

" तुमची बदली झाल्याच्या चार महिन्यांनी आईने रस्ता सुधारला आणि तेव्हापासून—" तेव्हापासूनची सारी हकीकत मी थोडक्यात सांगून टाकली.

आठ-दहा दिवस माझा मुक्काम तिथेच होता. मधूनमधून वाटे किती दिवस इथे राहणार ? पण जायचे कोणत्या निमित्ताने हा प्रश्नच होता. तिथे मला शीतल चंद्रिका लाभली होती. चार वर्षांची तहान मी तृप्त करून घेत होतो.

तरी देखील फार दिवस राहणे प्रशस्त वाटेना.

" देवी, मी उद्या जाईन म्हणतो. "

एक दिवस आम्ही माजघरात बसलो असताना मी गोष्ट काढली.

" कुठे ? "

" कुठे म्हणजे ? " मी विचारले.

" कुठे म्हणजे कुठे ? कुठे बाबांकडे जाणार ? "

एखादी जखम दुखत असताना त्या दुखण्याचा त्रास काही दिवसांनी जाणवत नाही माणसाला. असेच माझे झाल्याने मी शांतपणे उत्तर दिले,

" आता कशाला जायचे बाबांकडे ? घातल्या पावसाने कधी पीक आले आहे का ? मी जाईन म्हणतो येथून, एवढेच संध्या पक्के आहे. मेल्या मढ्याला जागा मिळते. मग माझ्यासारखा काहीच का करू शकणार नाही ? कुठे तरी जावे, दोन पैसे हक्काने मिळवावेत. उन्हात काम करावे आणि विसाव्यासाठी सावलीत यावे. "

तिने माझ्याकडे एकवार पूर्ण दृष्टी टाकून सहानुभूतीने माझ्या देहाला जणू आपल्या दृष्टीने कुरवाळिले. माझा चेहरा अगदी म्लान झाला होता. तिच्या सरळ, स्नेहार्द्र दृष्टीशी मला दृष्टी देता आली नाही. ती शांतपणे म्हणाली,

" मी जेव्हा तुमच्या तिथून इथे आले तेव्हा तुझ्या आईने मला पोटाशी धरून वचन दिले होते की, सरला, हेमला मी तुझ्या स्वाधीन करीन, तो तुझा मुलगा मान त्याला. राधाकाकी गेली हे खरे. मला माझी आई गेली त्या वेळीही इतके भकास वाटले नाही. काय संबंध असतात. पण कसे का असेना तू सुखरूप मला मिळालास. हेम, माझ्या तारुण्याच्या उमेदीत मी आठ वर्षे तुझ्यावर जीव लावला. अपत्यनिर्विशेष तुला संभाळले. रतनही माझा—माझ्या मनाला तुझ्याइतका जवळचा वाटत नाही. इतके ते दिवस माझ्या मनावर ठसले आहेत आणि आता तर देवानेच तुला माझ्या स्वाधीन केले आहे. मला दोन मुले जड नाहीत; हेम ! तू राहण्याचा संकोच का करतोस ? आम्हांला तू इथे परका नाहीस. तुला का असे वाटावे ? "

देवाने मला माझ्या विपन्न अवस्थेतही हिच्या स्वाधीन केले याची हिला धन्यता वाटावी आणि बाबांना ? जशी माझी नवी आई मला तितकीच किंवा त्याहूनही दूरच असलेली सरलादेवी. केवळ रोजारसंबंध एवढेच !

सरलादेवीचे बोल मोठे निवविणारे असे होते. मला किती शांत वाटले. त्या रात्री मला किती सुखाची अनंत स्वप्ने पडली आणि कित्येक दिवसांचा शीण गेल्यासारखा वाटला.

अखेर एक दिवस शपथेवर परत येण्याचे कबूल करून मी शर्माजींचे पत्र घेतले व आग्रा शहर जवळ केले. पत्राने माझे काम झाले. मला एक बऱ्यापैकी नोकरी लागली. मला माझी हक्काची भाकर मिळू लागली. पण मनाची तृष्णा ? मी बाबांना पत्र घातले. त्यांनी मला काढून दिले असले तरी मला ते दूरचे नव्हतेच. त्यांचा राग

शांत होण्यापुरते मला आपल्या पायावर उभे राहता आले होते. मला आईची आणि सरलादेवीची फार आठवण येई आणि माझे एकाकी जीवन अधिकच खायला धावे. मी नियमितपणे शर्माजी आणि सरलादेवी यांना पत्रे घालीत असे आणि त्यांची उलट डाकेने पत्रे येत.

बाबांची पत्रे इतकी नियमित नसत, पण त्यांना माझी आठवण येत असेल असे मला उगीचच वाटे.

असा क्रम वर्षभर चालला. मध्यंतरी दुर्गापूजेच्या वेळी आणि आणखी एक-दोनदा मी सरलादेवींना भेटून आलो होतो. सर्व ठीक चालले होते.

पण उगीचच मला कालपासून रुखरुख लागून गेली होती. शर्माजींकडून माझ्या दोन्ही पत्रांची उत्तरे नव्हती. देवीचेही मागचे पत्र अनुत्तारित होते. बाबांचे एक पत्र पंधरा दिवसांपूर्वी आले होते. त्याचा मथितार्थ एवढाच की, त्यांना आराम नव्हता.

अगदी धीर निघेना म्हणून चार दिवस रजा मागून मी सरलादेवीकडे जायला निघालो. दोन दिवस राहून एकदा बाबांकडेही चक्कर मारण्याचा इरादा होता.

त्या दिवशी गाडीही भलतीच हळू चालत होती. विचारही वेफाट वेछूट येत. स्टेशन येताच मी घाईने ऑफिसात शर्माजींकडे गेलो. ते स्टेशनचे काम करीत होते. मला पाहताच त्यांनी मान खाली घातली.

" हेम, घरी जा, " एवढेच म्हणून ते उतारूंची तिकिटे घ्यावयास बाहेर आले.

मी तडक जावयास निघालो. दारात पाऊल घातले. मोलकरीण खसाखसा भांडी घासत होती. एंजिन आगगाडीपासून सुटून पाणी घ्यायला तेवढ्यातच भक्‌भक् करीत निघाले होते. रतन कापराच्या भावलीशी खेळत होता. मी त्याला वर उचलले. तो मला बिलगला.

मधल्या घरात कसलीशी घाण येत होती. रतन त्या बाजूला बोट दाखवीत होता. मी तिकडे जाऊ लागणार तोच—

मोलकरीण जवळ आली. तिने खुलासा केला. आठ दिवसांपूर्वी देवी अपुऱ्या दिवसांची बाळंत झाली. इथे डॉक्टर चांगलासा मिळाला नाही. बाळ जिवंत निघाले नाही. रक्तस्राव खूप झाला आणि देवी.....!

मी खालीच बसलो. मस्तक भणभणू लागले. रतन रडू लागला. माझे अश्रू सुकले.

जिच्या भरवशावर माझी जन्मदात्री विसरण्याचा मी प्रयत्न करीत होतो, तीही राहिली नाही. या निधनाने मला माझ्या अंतरी खोल डोकावण्याची संधी मिळाली.

माझ्या मनात असा विचार आला की शरीरशास्त्रदृष्ट्या जे अंतःकरण सरला-देवीजवळ होते तसेच अंतःकरण माझ्या सध्याच्या आईलाही देवाने दिले असेलच. मग मी माझ्या घरच्या ज्योतीची वात सारण्याचा प्रयत्न का करू नये? आजवर

तसा प्रयत्न माझ्याकडून नको होता का व्हायला ? माझ्या स्नेहाने माझ्या या आईच्या हृदयीचा रत्नदीप प्रकाशणार नाही का ?

आणि काय असेल ते असो पण तो विचार माझ्या मनात असा फोफावला, की मी दोन दिवसांनी रतनला घेऊन बाबांकडेच जायला निघालो. रतनचे तोंड चिमणी-सारखे इवलेसे होऊन गेले होते. त्याचे गोंडस मुखकमल कोमेजले होते.

किती दिवसांनी मी माझे घर पाहत होतो. मला माझ्या आईची एकदम तीव्रतेने आठवण झाली. मी दारात पाऊल टाकताच बाबा बसलेले दिसले. जाऊन मी त्यांना नमस्कार केला. त्यांनी मला घट्ट छातीशी धरले.

बागेतील नवीन झाड दिसत नव्हते.

इथेही आणखी काय वाढून ठेवले आहे ?

बाबांनी प्रत्यक्ष सांगायलाच हवे होते असे नाही. सर्व माहिती कळण्यासारखी होती.

त्या झाडाचा दुसऱ्या बागेत मूळ धरण्याचा प्रयत्न चालला होता. आणि तेथे पांढऱ्या कुंपणाने त्याचे रक्षण केले जात होते.

माझ्या हृदयींचा सोसाटा आता माझा मलाच आवरेनासा झाला. अनेक भावनांचे कल्लोळ माझ्या डोक्यात माजले. मला काही समजेनाच.

जो विचार मी घेऊन आलो होतो तोही सदोषच होता का ? ही दुसरी आई दूरची ? मग मला जवळचे कोण ? ज्याच्या अंतःकरणात मला माझी आई दिसेल आणि माझ्या अंतरीच्या स्नेहाने मला तेथले दीप उजळता येतील असे कोण ?

बाबांच्या आलिंगनातून सुटून मी आजूबाजूला पाहिले. पडवीतच भिंतीवर माझा आणि माझ्या आईचा असे दोन मोठे फोटो टांगलेले मला दिसले.

सुखे गोलगोल फिरतात की आपण, कुणास ठाऊक ! पण आमची एक प्रदक्षिणा झाली होती व आमचे आम्ही पुनः एकदा आम्हांला सापडलो होतो.

१८।८।४५

८१

जीवनधर्म

आगगाडीत पुष्कळदा वेळ जात नाही. बाकावर पसरलेल्या वळकटीवर पडून आपण गाणे गुणगुणत असतो. किंवा एखादे पुस्तक समोर असते. अशा वेळी एखादी मनोहर व्यक्ती त्या डब्यात असली, तिच्याकडे आपले लक्ष वेधले, तिच्या हाल-

चालींचे कुतूहल आपल्या मनात भरले, ओठावरच्या लालीने मनाला आल्हाद वाटला, डोळ्यांतील चमक मन ओढून घेऊ लागली, म्हणजे त्या व्यक्तीची आठवण मनात राहून जाते. जे पुस्तक आपण वाचीत पडलो असतो किंवा जे गाणे गुणगुणत मनाची करमणूक करून घेत असतो त्या गाण्याशी अचानक, अजाणता त्या व्यक्तीचा संबंध जोडला जातो.

शाम गाडीने प्रवास करीत होता. बाहेर पाहण्यासारखे काही नव्हते म्हणून त्याने आपले तोंड आत घेतले व दिव्याकडे पाहत गाणे गुणगुणत तो पडून राहिला:

" वृषभानु लली की दशा सुनो ' दासजु '
देत ठगौरी ठगाई गई
बरसाने गई दधी वेचनको
तहँ आपही आप चिकाई गई ॥ "

राधा दही विकायला गेली आणि ती स्वतःच विकली गेली. ज्याला मोहविण्यासाठी तिने शृंगार केला त्याला पाहून तीच मोहित झाली. ज्या जादूने ही ठगविणारी ठगविली गेली ती जादू आणि तो जादूगार !

एका स्टेशनवर एक व्यक्ती डब्यात शिरली. शामचे लक्ष तिकडे वेधले गेले ! तिने केतकी रंगाचे रेशमी वस्त्र परिधान केले होते. तिचा वर्ण तिच्या वस्त्रासारखाच गोरा होता. तिचे कपाळ बरेच मोठे होते. नाक थोडे लांबट, ओठ सुंदर असून डोळे टपोरे आणि सतेज होते.

ती शीख तरुणी शामच्या समोरील बाकावरच बसली. शाम उठून बसला आणि तिच्या मागून आलेल्या शीख तरुणास त्याने जागा करून दिली.

त्यांची ओळख आणि गप्पासुद्धा सुरू व्हायला एका स्टेशनाच्यावर अवधी लागला नाही. त्या तरुणीशी बोलता बोलता शामने तिच्या लांबसडक केसापासून तो तिच्या नैसर्गिक गुलाबी रंग असलेल्या नखांपर्यंत व तिच्या उघड्या मानेपासून तो तलम ओढतूणीन दिसणाऱ्या तिच्या गळ्यातील टपोर मोत्यांच्या माळेपर्यंत जो जो भाग दृष्टीस पडेल तो तो त्याने आपल्या मनात भरून ठेवला होता.

दुसरे स्टेशन आले. तिसऱ्या स्टेशनवर त्याला उतरायचे होते. मुक्काम येताच त्याने त्या मंडळींचा निरोप घेतला. त्या तरुणीकडे पाहून त्याने अभिवादन केले. दोघांच्या नजरा भिडल्या. तिचे मुखकमल फुलल्यासारखे विकसित झाले. शामपण हसला आणि समाधानाने खाली उतरून चालायला लागला.

सरळ घाईघाईने येऊन आपल्या खोलीचे त्याने दार उघडले. कपडे तसेच फेकले व लाकडी फळीवर ठेवलेल्या पांढऱ्या कागदावर त्याची पेन्सिल फिरू लागली. ज्या आकृतीने त्याला वेड लावले होते ती आकृती, ती व्यक्ती कागदावर स्थिर होत होती.

तीन दिवस सारखे बसून त्याने ती आकृती पूर्ण केली. कधी त्याला वाटे भुवया चुकल्या,कधी त्याची कल्पना होई, डोळ्यांत तेज पुरेसे आले नाही. ओढणीचा पदर व्यवस्थित झाला नाही. पुनः त्याने ते गाणे गुणगुणावे, पुनः ती आकृती मनाच्या डोळ्यांसमोर यावी. पुनः त्याचे अवलोकन आणि तदनुषंगिक फरक सुरू व्हावेत.

चित्र त्याच्या अगदी मनासारखे झाले; नंतर तो उठला. त्याने खोली स्वच्छ केली व बराच वेळ तो चित्राकडे पाहत राहिला.

त्याची ती खोली व एकट्याचा संसार. एका कोपऱ्यात स्वयंपाकाचे सामान, दुसऱ्या कोपऱ्यात रंगाच्या बशा, ड्राइंगपेपर आणि त्याचा बोर्ड, तिसऱ्या कोपऱ्यात कपडे, दाराजवळ केरसुणी, शेजारीच त्याच्या वहाणा. एवढाच त्याचा संसार आणि हेच त्याचे सगेसोयरे. त्याच्याकडे येणार कोण ?

तथापि त्याच्या सौंदर्याच्या उपासनेत कसलाही प्रत्यवाय आला नाही. ज्या कलेच्या आसक्तीने ही दशा आणली तिचीच उपासना करण्यात त्याला जीवनसाफल्य वाटू लागले.

या त्याच्या उपासनेत त्याला कुणी कधी प्रोत्साहन दिले नव्हते. कुणी साथ दिली नव्हती. कुणी त्याची पाठ थोपटली नव्हती. निव्वळ समाधानाचे शब्दही आपल्या म्हणून मानलेल्या माणसांनी कधी काढले नव्हते. उलट उपहासच त्याच्या वाट्याला आला होता.

तो जगात एकटाच होता अशातला भाग नव्हता. त्याला एक कमावता वडील भाऊ होता. एक बरोबरीची बहीण होती. घरी स्थिती दिवंगत वडिलांच्या कृपेने बरी असल्याने घरचा आधारही होता.

त्याची बुद्धी बरी होती. शिक्षकांचाही तो आवडता होता. लहानपणी त्याने एखादे चित्र काढावे. ते पाहून शिक्षकांनी म्हणावे—' सुंदर '. शामला तेवढ्याने समाधान वाटावे. त्याने उत्साहाने चित्रे काढावीत. चित्रकलेची त्याला बालपणापासूनची हौस. साधी सुंदर दृश्येही स्वतःची करून सोडल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. एखादी सुंदर चिमणी एखाद्या चिमुकल्या जाईच्या फांदीवर तोंडात चार-दोन जाईच्या कळ्या घेऊन बसलेली दिसली तरी सर्व कामे आणि अभ्यास टाकून तो ते दृश्य आपलेसे करी. आणि याच वेळी त्याच्याशी आणि भोवतालच्या जगाशी संघर्ष सुरू होई. लहान मुलांचे संघर्ष त्यांच्या मानाने महानच असतात. आजूबाजूची माणसे नित्यकर्मांना कर्तव्य समजतात. त्या कर्तव्यापासून पराङ्मुख होणे म्हणजे महादोष. सबंध आयुष्य कर्तव्यपर घालवूनही चेहरा न फुललेली माणसे जगात असंख्य असतात. पण त्याचे जगाला काय होय ? आई आणि ईश्वर दोनच असे असतात की त्यांच्या राज्यात मुलांना आणि भक्तांना नित्यकर्माच्या कर्तव्यातून ढळल्यामुळे शिक्षा होत नाही. शामला आई नव्हती आणि देव आजवर फार थोड्यांना दिसला आहे.

घरच्या माणसांना शामची ही कर्मच्युती पसंत नव्हती. त्यामुळे त्याला त्याची आवड सर्वांच्या मनाविरुद्ध चालवावी लागली. आपण काढलेली, आपल्याला सुंदर वाटलेली चित्रे आपल्या खोलीत व्यवस्थित लावण्याच्या गुन्ह्याबद्दलही त्याला बाळपणी मार खावा लागला. मारल्याने कच्च्या मडक्यांना आकार जरूर येतो पण मारणाऱ्याच्या मनासारखा येत नाही एवढेच.

शाम चित्र काढीत बसे. त्याची बहीण सुभद्रा आत येई—"शामू, मला लेस आणून दे आत्ता. मला बाईंनी विणून आणायला सांगितले."

"सुभाताई, तू आता मला मुळीच त्रास देऊ नकोस. सायंकाळी गाडाभर कामे करीन."

सुभद्रेचा विरस व्हावा. तिने संतापावे. गोंधळ करावा आणि दोघांनी मिळून यथेच्छ मार खावा. चित्रही गेले. लेसही बाजारात राहिली.

शामचे मन पक्के झाले. सुभीचे बिथरले. शामची कागाळी तिच्या नित्यकर्मात सामील झाली. त्यामुळे परस्परांची मने उतरून गेली.

तो आता सोळा वर्षांचा झाला होता. त्याला आता समजू लागले होते. एक दिवस असा निघाला की, त्याच्या दादाने त्याची आजवरची सर्व चित्रे संतापून फाडून फेकून दिली. शाम आततायीपणाने बाहेर निघून जावयास सिद्ध झाला. सुभाताईची एकदा भेट घ्यावी म्हणून तो तिच्याकडे गेला.

सुभाताई, आजवर मी तुला काही बोललो असेन ते विसरून जा. तुझी-माझी भेट आता तुझ्या सासरी..."

मध्येच सुभद्रेने तोऱ्याने उत्तर दिले,

"काही नको भेट व्हायला. सख्ख्या भावाची मर्जी राखता आली नाही. तू बहिणीला काय सांभाळून नेणार आहेस ?"

जन्मापासूनचे राहते घर सोडताना शामचा गळा दाटून आला. त्यात पुनः या उत्तराची भर पडली.

त्या दिवसापासून त्याने नागपूरच्या या आपल्या खोलीत मुक्काम ठोकला होता. त्याची दैना होत होती. पण कसेही, कितीही आणि केव्हाही खाऊन तो जगू शकत होता. त्याची दिवसेंदिवस प्रगती होत होती, व त्याच्या कलोपासनेत खंड नव्हता. तेच त्याचे सुख होते.

आणि ज्या दिवशी शामने ती कलाकृती पूर्ण केली, त्या दिवशी त्याला कितीपण समाधान झाले. कुणाशी तरी बोलावे, कुणाबरोबर तरी फिरावे असे त्याला फार फार वाटले. त्याच्या प्रसन्न चित्तवृत्तीच्या प्रसभासाठी त्याला सहानुभविता हवा होता.

पण त्या वेळी आपले मायेचे असे कोण मिळणार ? " आज सुभद्रा असती तर इतके सुंदर चित्र पाहून ती खात्रीने माझ्याशी आनंदाने बोलली असती. " इतके दिवसांनीही तो आपल्या बहिणीला विसरू शकला नव्हता.

पहाटे उठून त्याने चित्राच्या चौकटीत रंग भरला. आणि सहज फिरायला म्हणून तो बाहेर पडला. पहाट संपत आली होती. ढगाआडची सूर्याची करामत जगाला दिसू लागली होती. सूर्य शुचिर्भूत होऊन हसतमुखाने वर येत होता. शाम बराच वेळ उगवत्या दिशेला चालला होता.

परत येताना त्याचे मन उल्लसित झाले होते. तितक्यात त्याला संभाषण ऐकू आले. एका दारात दोन व्यक्ती बोलत होत्या–

" दादा, ही का रे तुझी माया ? " एका युवतीचा आवाज.

" प्रमे, असं बोलायचं नाही. पण आज राहून तरी काय होणार ? तुला कालच सासरचे बोलावणे आले. "

" पण दादा, राहीनास का ! मी राहत्ये आणि तूसुद्धा. उद्या तू पुण्याला जा नि मी सासरी—"

आणि पुढचे बोल आत जाऊन विरले. शाम पुढे चालू लागला. एक दिवस राहत नाही म्हणून ही प्रमिला आपल्या भावाला प्रेमाची आण घालते. आणि आपण घरातून कायमचे निघून जात असताही सुभद्रेचे तोंड शुभ बोलत नाही. आपल्या जन्माबरोबर आपल्या वाट्याचे वात्सल्य मेले...

त्याला जसजसे प्रमिलेचे चित्र दृग्गोचर होऊ लागले तसतशी त्याला सुभद्रेची जास्त आठवण होऊ लागली. त्याच्या मनात कल्पना आली, सुभीच्या गावाला जावे. ती आता सासरी गेली आहे. आपल्यासारखीच आपल्या माणसांपासून आता दूर झाली आहे. तिच्या मनातील अढी आता निघून गेली असेल. तिला कदाचित आपली आठवणही येत असेल. अखेर कितीही झाले तरी बहीण आहे, रक्ताचे नाते कधी ना कधी सांधले हे जायचेच. हवा तो छळ केला तरी पुत्राच्या मुखी दुधाची अमृतधारा घालणाऱ्या मातांच्या, लाथेने तुडविले तरी ती लाथ दुखावली म्हणून चोळणाऱ्या बहिणींच्या कथा परंपरेने त्याच्यापर्यंत पोचलेल्या होत्या. आपल्या बहिणीच्या बाबतीतही हजारो वर्षांचे सत्य एकदम खोटे थोडेच होणार आहे ?

हा विचार त्याला फार समाधानकारक वाटला. त्या दिशेने त्याची कल्पना त्याला सुभद्रेकडे नेऊ लागली.

सुभद्रेला देणार काय ? हेच सुंदर चित्र देईन तिला. त्याने आपल्या अप्रतिम कलाविलासाकडे पाहत मनाशी ठरविले. ती माझ्या या चित्राला तरी वाईट म्हणणे शक्य नाही.

किती आतुर झाला होता तो ? त्याने आपल्या मनाच्या मापाने सुभद्रेचे मन मोजले आणि निष्कर्ष काढला की, सुभद्राही आपल्या भेटीसाठी आतुर झाली आहे.

तो स्टेशनवर उतरला आणि पत्ता काढीत त्याने सुभद्रेचे घर शोधले.

"कोण पाहिजे तुम्हांला ?" एका पंचवीस वर्षांच्या तरुणाने त्याच्याकडे निरखून पाहत प्रश्न केला. त्याला आपल्या पत्नीच्या आणि समोरच्या चेहऱ्यात साम्य दिसले.

"सुभाताई आहे का ?" शामने विचारले.

"होय, आत या ना ! मी पाठवितो."

शाम तेथेच थोडा वेळ घुटमळला. सुभद्रा बाहेर आली.

"सुभाताई," त्याने उमाळ्याने हाक मारली.

तिने एकदा विस्मयाने त्याच्याकडे पाहिले व त्याला प्रश्न केला, "कुठून आलास ?"

"नागपूरहून सरळ—"

"का ? दादाकडे गेला नाहीस ?"

"नाही, का ?"

"मग माझ्याबद्दल एवढा उमाळा ? तो देखील तुझा भाऊ ना ? बरं, आत येशील की..."

तिच्या मनातील अढी अझून निघाली नव्हती. तहान लागली म्हणून ओढ्यावर जावे व पाण्यात किडे झालेले असावे. इतका वेळपर्यंत तळमळणाऱ्या माशाला उन्हाचा चटका सहन झाला नाही.

"सुभद्रा, उमाळा नसता तर असा अनाहूत आलोच नसतो. तुला माझी कधी गरज पडली होती किंवा पडणार आहे म्हणून तू मला भाऊ म्हणावे ? असंच तुझं म्हणणं ना ? ठीक..."

तो आल्या पावलीच परतला. शोक, विरस, उद्वेग यांनी तो अभिभूत झाला यात नवल नाही; पण त्याच्या डोळ्यांतील रंग बदलले. ताजमहाल कोसळल्याची जणू त्याच्या कानी वार्ता आली. हजारो वर्षांच्या परंपरेने जे सौंदर्य टिकून राहिले तेच निखळल्याचे जणू आज त्याच्या प्रत्ययास आले.

आगगाडीत बसल्यावर त्याने आपल्या मनाचे डोळेच तेवढे उघडे ठेवले.

दुसऱ्याच्या बहिणी किती चांगल्या ! पण तेही दूरचे डोंगरच असतील !

त्याने आपल्या खोलीचे दार उघडले. प्रकाशाचा मोठा झोत समोरच्या भिंतीवर पडला. त्याच भिंतीला त्याचे आवडते नवे चित्र उभे केले होते.

त्याने त्या चित्रावरील कापड दूर केले. जे दिसते, जे असते, ते असत्य भासले की जे दिसत नाही आणि भासत नाही ते सत्य मानावे लागते. मानवी जीव एकदम असा अंधाराने, निराशेने गडप होत नाही. विशाल वृक्षाच्या मुळ्या जवळ पाणी नसले तर आणखी लांब होतात, खोलवर जातात, आणि तेथून पाणी शोषून झाडाला जगवितात. त्याला सुकू देत नाहीत. त्या पाण्याकडे जातात आणि पाणी-जीवन-त्यांच्याकडे येते.

त्या शीख तरुणीच्या सतेज नयनकमलांतून त्याचे सर्व जीवनार्थ काढावयाची त्याच्या मनाची आता तयारी झाली होती. तिच्या उमलत्या ओठांतून जणू अमृततुल्य मधुर शब्दांचा वर्षाव होत होता. ती त्याच्याशी हितगुज करीत असल्याचा भास होत होता.

वहीण जिवंत आहे; पण तिचे दार भाऊबीजेलाही बंद असते. या माझ्या खोलीचे दार मीच उघडले. मनाच्या खिडकीतून जी जी दारे उघडी दिसतील त्यातून विजेच्या अक्षता आपल्या डोक्यावर पडतील. आई नाही. तिचा या शरीरावर कधी हात फिरला नाही. शरीराची दारे बंद केली तर मनाच्या भांडारातून दुधाच्या धारा मुखी पडतील !

म्हणून जे जे अंतर्मनाच्या प्रेरणेने प्रत्यक्षात फुलले ते ते माझे—माझेच !

त्याची नजर त्या अप्रतिम कलाकृतीवर आपलेपणाने स्थिर झाली. खिडकीतून एक चिमणी आत येऊन अढ्याच्या लाकडावर बसली. तिच्या चिवचिवीतून निसटून काहीसे त्याच्या जवळच पडले. तांदळाच्या चार-दोन कण्या होत्या त्या ! दुधासारख्या शुभ्र, निर्मल ! त्याच्या खोलीतील सर्वच वस्तू सजीव झाल्या जणू !

आणि त्यानंतर त्याच्या कलाकृतीला सर्वोत्तम बक्षीस मिळण्याची त्याच्या व्यवसायबंधूंनी खात्री भरली होती.

पण मग तो एकटाच राहिला असता.

आणि तीच व्यथा त्याला टाळावयाची होती.

३०।८।४५

८२

अतिथी देवो भव !

कालपासून पावसाचा थेंब खंडला होता. जरूरीच्या ठिकाणी पाऊस पडायला ढग निघून गेले होते. आकाश रात्रीपासूनच स्वच्छ होते. हवेत सुखद असा गारवा आला होता. गाढ झोपून सकाळी त्या गावची माणसे जेव्हा उठली तेव्हा गावच्या टेकडीवरून प्रसन्नपणे सूर्यबिंब वर येताना त्यांनी पाहिले.

बायजा शेतातून पहाटे परत आली आणि घाईघाईने तिने आपली कामे यंत्रापेक्षाही चांगली आणि जलद रीतीने आटोपण्यास सुरवात केली. यंत्रापेक्षा चांगली अशा अर्थाने की त्यात तिने आपले हृदय ओतले होते. प्रत्येक उरकलेल्या कामात तिचा, तिच्या पतीचा, तिच्या मुलाचा, तिच्या पांढऱ्या आणि लाल बैलजोडीचा संबंध येत होता. गेल्या कित्येक वर्षांपासून आपले मानलेले ते जीव होते, त्यांना तिने आपल्या हातचे अन्न आणि हृदयातला जिव्हाळा देऊन पुष्ट, प्रसन्न, सुखी केले होते.

आणि गेल्या आठ-दहा महिन्यांत तर तिच्या कामाला जणू भर आला होता. वीस ते तीस वर्षांच्या ऐन उमेदीत, ज्या उत्साहाने, हिरिरीने, आशा-आकांक्षेने माणूस कष्ट करतो त्याच उमेदीने तिने आपल्या घरचे आणि शेताचे काम केले होते. कष्टच केवळ ज्यांच्या वाट्याला आलेले आहेत. त्यांना हे उमेदीचे वय लाभत नसते. म्हणूनच केवळ त्याची उपमा द्यावयाची. आमच्या या गरीब देशाच्या अनुभवाच्या विज्ञानशाळेत अनेकांनी खपून जे आराखडे तयार केले, त्यांतून असा एक निष्कर्ष निघून पक्का झाला आहे की, या देशातील कष्टाळू वर्गातील स्त्रियांना वीस ते तीस हे वयच नसते. वीस वर्षेपर्यंत त्या वाढतात आणि त्यानंतर एकदम त्यांच्या वयाचा आकडा एकतीसपासून सुरू होतो. ज्या वयात स्त्रीने प्रौढेचे, अनुभवाचे, उपभोगाचे जीवन विश्वस्तपणे घालवावे ती दशाच हजारो कारणांमुळे त्यांना लाभत नसते. सकाळी सूर्य कासराभर वर यावा आणि पुढे ढगांची, अंधाराची, श्रमाची पटले एकाएकी आकाशी झाकळून येऊन चार वाजता पिवळे ऊन पाडीत सूर्याने अस्तगिरी उतरू लागावे अशी स्त्रीच्या आयुष्याची करुण कहाणी डोळे असलेल्या अनेकांनी पाहून-सांगून ठेवली आहे. सवत 'कुंकवाचा टिळा' लावून 'दुहेरी कासोटा' घालणारी व 'भाग्यवंताची लक्ष्मी' दिसणारी स्त्री ध्येयस्वप्नातील असावी असा या किसान मजुरांच्या देशातील असंख्य जनतेने निर्वाळा दिला आहे.

म्हणूनच, उमेदीच्या वयाने बायजेने गेले आठ महिने जे अविश्रांत श्रम केले ते एका हृद्य, विलोभनीय, आशादायी अपवादरूप अशा कारणानेच !

ते कारण असे की, ज्या पाटलाच्या घरी बायजेचा नवरा पैकू याने वीस वर्षे काम केले; उन्हातान्हातून, पाऊसपाण्यातून, खाचाखळग्यांतून, काट्या-गोट्यांतून कष्ट उपसून पाटलाचे मळ्याच्या मळे शिंपले; मालकाच्या घरी सुवर्णधान्याच्या, रसदार फळांच्या, कसदार भाज्यांच्या पाट्याच्या पाट्या, गाड्याच्या गाड्या भरल्या तो पाटील जनदृष्टीने 'मूर्ख' निघाला होता. दुर्दैवाने शिक्षणाचे संस्कार झाले नसल्यामुळे कधी न सुधारता येणारी 'एक चूक' त्याने करून ठेवली होती. मरते वेळी बायजेला बोलावून त्याने तिला आपल्या हाताने कुंकू लावले होते व एक आठ-दहा एकरांची गादलेली, उस्तवारी न केलेली, जमिनीची काळी चादर पांघरूण म्हणून देऊन टाकली होती. तिचे कृतज्ञ हात त्याच्या पायाला लागल्यावर त्याने प्राण सोडला होता.

त्याच जमिनीची मशागत बायजी आणि पैकूने गेले आठ-दहा महिने केली होती. पैकूने मालकाच्या घरची नौकरी त्याच्या परवानगीने जिव्हाळा कायम ठेवून सोडून दिली होती. व आपले स्वतःचे शेत उठविताना सूर्याला जरा उशिरा अस्तास जाण्याची तो सतत प्रार्थना करीत आला होता. शेत खणण्यास आरंभ करताना त्या पडीत जमिनीत त्याने दसऱ्याच्या दिवशी पहिली कुदळ मारली, त्या वेळी निघालेली ओलसर माती पैकू आणि बायजेने ओंजळीत घेऊन मनमुराद हुंगली होती. ओल्या भुईमुगासारखा त्या मातीचा सुगंध उभयतांनी जो हुंगला त्याने विलक्षण धुंदी, विलक्षण जोम, आशेची मधुर स्वप्ने त्यांच्या नेत्री तरळत होती, व ती स्वप्ने प्रत्यक्षात आणायला मुंगीसारखे, श्रावणातील चिमण्यासारखे सतत श्रम, शीण मुळीही न जाणवता केले होते. त्या घामाच्या धारांनी पोषण मिळून यंदा ज्वारीचे हिरवे धांडे त्यांच्या शेतात जे उभे राहिले होते त्यांच्या मांडीभर उंचीत आणि सळसळणाऱ्या पानांत सारी दुःखे आणि कष्टमपे, लोपून, लपून गेली होती.

याच सुखाच्या धुंदीत बायजेने आज सकाळपासून आपली कामे उरकली होती. बैलांचे दाणापाणी करून, मुलांसाठी आणि नवऱ्यासाठी भाकरी भाजून ती बाहेर आली, तेव्हा सूर्याची तिरीप कोवळीच असलेली दिसली. पैकू बैल घेऊन शेतात गेला. जाताना त्याने आपल्या बैलांकडे आणि बायजीकडे भरलेली नजर टाकली. तथापि त्याच्या तोंडून आज नेहमीचा आशेचा, हुरुपाचा उद्‌गार निघाला नाही. बायजीच्या ते ध्यानात आले पण त्याबद्दल वाईट वाटून घेण्यापेक्षा आपल्या सात-आठ वर्षांच्या मुलाला बाजारात नेऊन एखादे अंगडे विकत घेणेच तिला परवडले.

सायंकाळी पैकू आला. थोड्याशा उदासपणेच त्याने जेवणबिवण केले व बायकोची आवराआवर संपण्याअगोदरच खोलीच्या कोपऱ्यात पथारी पसरून तो आडवा झाला.

बायजेने काम आटोपले. मुलाच्या अंगावर पांघरूण घातले. आपल्या बाकळीच्या अलीकडील कोपऱ्यावर त्याला सरकावून ती अडवी होण्याचा विचार करू लागली, मुलाला गाढ झोप लागल्याची खात्री होताच तिने दिवा मालविला व पैकूच्या पथारीवर गेली, अतिश्रमांनी थकून विभक्त झोपूनच त्यांनी आज कित्येक रात्री घालविल्या होत्या. सवय आज त्याच्या शेजेवर स्वतःहून जाऊन बसताना तिच्या चिरपरिचित मनालाही एक सुखाची, नावीन्याची चमक जाणवून गेली.

तिने पैकूच्या कपाळावर हात ठेवला. त्याला झोप लागली नाही हे तिच्या ध्यानात आले व जरा हळू सलगीने तिने प्रश्न केला.

" आज उदाससे ? का लाल्याने पुनः आज चारापाणी नीट घेतले नाही का ? काही कारण ? "

" अंहं, तसे काही नाही. "

" मग दुसरे तर मला काहीच कारण दिसत नाही. उलट आज तर आनंदात असायला हवे. उद्या दिवस आनंदाचा आहे. सण आहे. उद्या लाल्याढवळ्यांना साज घालावयाचा आहे. उद्या हात मोठे करायचे आहेत. पोटही रिकामे ठेवायचे आहे उद्यासाठी ! मग असे का ? "

" म्हणूनच विचार करतो आहे. "

" कसला ? "

" उद्या पोळ्याचा सण. लाल्याढवळ्यांचा पहिला पोळा उद्या साजरा करावयाचा आहे. घरचाही हा पहिलाच पोळा आणि माझ्याजवळ पैसाही नाही. हाच थोडा विचार पडला आहे. "

असे म्हणून पैकूने थोडे हास्य केले आणि बायजेच्या खांद्यावर हात ठेवला.

" मग ? झाला विचार तुमचा ? काय ठरले ? "

" काही तर नाही. परवा बांधी सुधारायला दगड हवे होते. त्यासाठी जे तीन-चार रुपये खर्च झाले ते उगीच केले असे वाटते. "

" बरे मग ? "

" मग काय ? तू अशी काय विचारतेस आज ! जरा आनंदातही दिसतेस ! थकलीभिकली, मलूल पण दिसत नाहीस, स्वतःहून माझ्याजवळ आलीस ! काय, आहे काय ? "

" तसे काही नाही. पण उद्या लाल्याढवळ्यांना ते अगदी खुश होऊन जातील अशी पुरणपोळी खाऊ घालायची एवढेच सांगायला आल्ये. आज बारकूला नवीन अंगडे घेतले. पाहिलेही नाही तुम्ही ! विचारलेही नाही. दुःखे देखील उभयता भोगली, मग आजचा माझा आनंद ? एवढेच विचारायला आणि सांगायला आल्ये. "

" खरे ? हे सगळे आणले कसे ? सांगशील तर ! "

" आणले आपले. बांधी नीट करायला तुम्ही पैसे खर्च केले त्या दिवसापासून घुऱ्याचे गवत लाल्याढवळ्यांना थोडे कमी घातले आणि त्यांच्या पोटावर पाय देऊन गवत विकून चार-पाच रुपये जमविले होते. तेवढ्यात उद्याचा सण सहज होईल. मुक्या जनावरांच्या उपासाचे पारणेही फिटेल. आज गूळही आणून ठेवला आहे. आता बोला, कशी काय आहे मी ? "

" सगळे हे खरे ? " आणि या दोन अक्षरांत सहजीवनाच्या शास्त्राची पुण्य-सूक्ते व्यक्त होऊन गेली. त्यांची ती रात्र श्रावणाचा कृष्णपक्ष असूनही चांदीसारखी गेली. घरच्या दुधावर तापलेली बोटभर जाडीची साय भाकरीशी खावी, ताज्या रवीतून झेलून काढलेला लोण्याचा गोळा तोंडात टाकावा, इतक्या सुखाने आणि उल्हासाने त्या सबंध रात्री त्यांनी पुढील कार्यक्रमाचे बेत करण्यात वेळ घालविला. डोळ्याच्या पापण्या न लावताही गाढ झोप, शरीर न विसावताही शीणाचा शम—अशी ती त्यांची रात्र गेली !

कोणत्या उद्देशाने हे आजवर कुणी सांगितले नाही, पण पहाटेचा कोंबडा ज्या उमेदीने वाग देतो तसे पैकूने बायजेला शुक्राची चांदणी उगवताच सांगितले, "चल ऊठ, आज सूर्याला जरा लवकर हाक मारू." उठून शुक्राच्या सांद्र प्रकाशात तो शेताकडे गेला. पळसाचे चार 'मेढे' (फांद्या) त्याने तोडून आणले. बायजेने तोवर अंगण झाडून स्वच्छ केले होते. दारात त्याने मेढे उभे केले. आपल्या बैलजोडीला त्याने रात्री हळद लोणी खांद्याला लावून जेवायला येण्याचे आमंत्रण दिले होतेच. उजाडताच बैलांचे कासरे सोडून त्यांच्या शिंगांना गुंडाळले व त्यांना बाहेर काढले.

पोळा म्हणजे आमंत्रण देऊन आपल्या घरी बैलांना अतिथी म्हणून जेवायला बोलाविण्याचा सण. त्या दिवशी बैलांकडून काम घ्यावयाचे नाही. त्यांचे काम माणसाने संभाळावयाचे. त्या कामाने वर्षभराच्या त्यांच्या कष्टांचा कृतज्ञतेने मोबदला चुकवावयाचा. मुलाला संभाळतो तसे त्यांना त्या दिवशी सांभाळावयाचे. ईश्वराची अनंत, अमर्याद, मुक्तहस्त, अशी विराट दातृता, तिचा उपभोग घेणाऱ्या मानवाने ज्या भावनेने पत्रं, पुष्पं, फलं, तोयं त्याच्याच चरणी अर्पण करून सबंध जीवन उपनिषदाच्या मंत्राप्रमाणे त्यागाने भोगमय करण्याची भावना धरायची, त्याच भावाने एक दिवसाची सबंध सेवा बैलांच्या चरणी वाहून आपले जीवन विशाल, भूतदयाप्रेरित करावयाची इच्छा धरावयाची असा हा पोळ्याचा दिवस–कृषिदेवतेची आज्ञा पाळावयाचा हा दिवस !

त्यातल्या त्यात गेले आठ महिने खपून पैकूचे शेत ज्या लाल्या-ढवळ्यांच्या जिवावर उभविले गेले त्यांच्याबद्दल मनात केवढी कृतज्ञता भरली असेल ? तिचा प्रत्यय त्याने उठताक्षणीच बैलांच्या अंगावरून जो हात फिरवला त्यातून त्या मुक्या जनावरांनाही आला.

पैकूने आपली बैलजोडी आपल्या मालकाच्या वाड्यात नेली. तरुण मालकाला आणि नव्या पाटलिणीला त्याने नमस्कार केला. आपल्या हक्काच्या घरी येऊन कारभार करावा त्याच प्रत्ययाने त्याने आपल्या हाताखालून मोठ्या झालेल्या घरच्या गाईच्या दोन जोड्या काढल्या व त्या सहाही बैलांना घेऊन तो नदीवर गेला.

डोहामध्ये त्याने बैल सोडले आणि आपले वय विसरून काचा मारून धडामदिशी पाण्यात उडी मारली. बैलांच्या सर्वांगावर हात फिरवून चोळून चोळून त्यांना अगदी स्वच्छ केले. बाहेर काढून त्यांचे अंग काठावर ठेवलेल्या कोरड्या उपरण्याने पुसून काढले. शेपटीचे गोंडे हातांवर ठोकून कोरडे केले आणि ओलेत्याने तो घराकडे परतला. परतताना हिरव्यागार शेताकडे पाहून त्या बैलांनी असा हंबार केला, की आजचा आमच्या पारण्याचा दिवस आम्ही समजलो हेच जणू त्यातून स्पष्टतया व्यक्त झाले. ह्या देशातील ही मुकी जनावरे अनंत काळापासून अपौरुषेय वाङ्मयाच्या मंत्राप्रमाणे नुसत्या हंबारानेही अनेक अर्थ व्यक्त करीत आलेली आहेत !

उन्हात बैलांची अंगे पूर्ण कोरडी झाल्यावर त्यांचे रंग अधिकच तळपू लागले आणि हिरव्या रानात मनसोक्त चरायला म्हणून जेव्हा ते डोंगरामाथा चढू लागले तेव्हा हिरव्या दाट पर्णांच्या चाफ्यावर पांढरी लाल फुले फुलल्याचा भास वनदेवतेलाही झाल्यावाचून राहिला नाही !

पोटभर चरून आपल्या मनानेच बैल घराची वाट चालू लागल्यावर पैकू त्यांच्या मागून घरी आला. त्याने बैल अंगणात उभे केले. मुलगा गेरूचे भांडे घेऊन बाहेर आला आणि गेरूच्या पाण्यात आपले चिमुकले हात बुडवून त्याने बैलांच्या पाठीवर पंजे मारले. पैकूने गाडगे बुडवून त्याच्या गोल तोंडाने बैलांच्या अंगावर गोल ठिपके दिले. आकाशगंगेचा संपूर्ण पट्टा स्पष्ट दिसण्याइतक्या नितळ आकाशात मंगळाची चांदणी तसे ते पंजे आणि ठिपके !

नंतर त्याने बैलांची शिंगे लाल करून त्यांवर निळ्या, चंदेरी वेगडाच्या गोल गोल पट्ट्या चिकटविल्या. शिंगांच्या छिद्रांतून पांढरी लाल सोनतागाची झुंबरे लेवविली. सोनतागाच्याच फुलमाळा कपाळावर सोडल्या. त्या 'माथाट्या' वाऱ्याने हालत आणि जास्तच फुलल्यासारख्या वाटत. कवड्यांचे पट्टे गळ्यांत घातले. रानफुलांच्या रंगीबेरंगी माळा, गुलबाक्षीचे गजरे गळ्यांत चढविले. पायाला विविधरंगी दोऱ्यांची पैंजणे बांधली, शेपट्या रंगविल्या आणि बैलांच्या विशाल डोळ्यांत आपले, आपल्या मुलांचे, अंगणात येऊन उभ्या राहिलेल्या बायजेचे उमटलेले प्रतिबिंब पाहून पैकू अगदी खुश झाला. तोवर त्याच्या मुलाने बैलांच्या शेपट्यांचे गोंडे तोंडावरून फिरविण्यास सुरवातही केली होती.

तिसरा प्रहर टळला. वड्यापुरणाने भरलेल्या पत्रावळी टोपल्यात भरून त्याने लाल्या-ढवळ्यांना जेवू घातले. बायजा हवे नको ते विचारायला दारात येऊन उभी राहिली आणि अतिथी तृप्त झाल्याचा कौटुंबिक सहभाव सर्वांनी अनुभवला.

पुरणाच्या दोन-चार पोळ्या केळीच्या पानात बांधून त्याने बासनात गुंडाळल्या व कुंकवाचे डाबले घेऊन तो पाटलाच्या घरी आला. मूर्ख पाटलाच्या भावड्या पोराने या विसाव्या शतकातही त्या प्रसादाचा स्वीकार केला आणि पैकूच्या डोईस गुलाबी फेटा बांधला.

नव्या अंगड्याने मुलगा सजला होताच. आपल्या बैलजोडीचे नवे रंगीत कासरे मोठ्या ऐटीत धरून बायजेची तृप्त नजर पती, पुत्र, अतिथी यांच्यावर खिळली असतानाच पोळ्याच्या तोरणात उभे करायला म्हणून त्याने बैल नदीच्या वाळवंटाकडे काढले.

आज वाळवंटातील ओली वालू बैलांच्या खुरन्यासाने पवित्र झाली होती. आसमंतीचे वातावरण हंबार व ललकाऱ्यांनी निनादून गेले होते. बैलांच्या गळ्यात घातलेल्या घुंगुरघंट्यांचे आवाज आपल्याला हुबेहूब उठविता यावेत म्हणून इंद्रपुरीच्या नर्तकी आकाशात गोळा झाल्या होत्या,

आंब्यांच्या पानांचे मंगल तोरण लांब, उंच, दूरवर उभारले होते. खाली एका हारीने शृंगारलेले, सजलेले, सुंदर बैल उभे केले होते.

हा सर्व सोहळा पाहावयाला सूर्य उंच डोंगरमाथ्यावर येऊन बसला होता.

पाटलांच्या, गावच्या मानकऱ्यांच्या, झूल घातलेल्या, शिंगांना पेटत्या मशाली लावलेल्या, हृष्टपुष्ट, सकस, सुंदर सजलेल्या, तूपकणीक खाऊन सौष्ठव कमाविलेल्या मस्त बैलांच्या जोड्या, शेपट्या उंच करीत, आपले कासरे संभाळणाऱ्यांना फरफटत हैराण करीत, थयथय नाचत वाऱ्याला आव्हान करीत, हुंकार हंबार देत फडात येऊन ठाकल्या व मधोमध येऊन उभ्या राहिल्या. त्यांची यथासांग पूजा झाली. प्रसाद झाला. बैलांच्या पाठीवर थाप पडली. बंदुकीचे बार निघाले. बुजलेले बैल, धूमधडाक्याने उन्मत्त झालेली माणसे – सर्व मरुभूमी रणांगणासारखी वीरश्रीने ओतप्रोत झाली. सर्वांनी तोरण लुटले. तोरणाच्या पक्क्या दोरीच्या तुकड्यातुकड्यासाठी शेतकऱ्यांनी हटातट केली, हात काचून घेतले. आणि ते तुकडे कंकणासारखे, वीरभूषणासारखे मनगटांना बांधून आपल्या जोड्या चौखूर उधळीत ते गावाकडे परतले.

आता सगळ्यांनी परस्परांच्या जोड्यांची पूजा करावयाची. प्रत्येकाच्या अंगणात ओळखीच्या शेतकऱ्याची जोडी उभी राहावयाची. बैलांना जो साजशृंगार चढविला गेला त्याचे कौतुक व्हावयाचे आणि समृद्ध जीवनात विलीन झालेल्या या कलाशृंगाराची प्रशंसा म्हणून जोडी आणणाऱ्याला आपल्या ऐपतीप्रमाणे द्रव्य द्यावयाचे आणि खाल्लेल्या अन्नाला कृतज्ञ राहावे म्हणून बैलांची पूजा करावयाची. कृषिप्रधान संस्कृतीच्या शेतकऱ्यांचा या दिवशीचा हा सायंकाळचा कार्यक्रम !

तोरणातून जोडी घेऊन पैकू घरी आला. बैलांना घरी बांधून बायजेने त्यांची पूजा केली. दिवसभराचा उपवास त्या तीन माणसांच्या कुटुंबाने एका पात्रात जेवून सोडला. आणि दोन पानांचा विडा खाऊन पैकू जोडी घेऊन मिरवायला ओळखीच्या घराकडे निघाला. पाटील, मानकरी, ब्राह्मण सर्व आटोपले. प्रत्येकाच्या घरी बैलांच्या कपाळी कुंकवाचा टिळा आणि पायावर फुले पडली. पैकूच्या हातावर गुळाचा खडा, कानांवर गोड शब्द आणि मुलाच्या हातावर अनुकूल असलेले द्रव्य पडले.

बैलजोडी डॉक्टरांच्या घरी जाऊन उभी राहिली. पाटलांच्या घरामुळे इथेही पैकूची ओळख होती. आपल्या मुलाचे गेल्या दुखण्यातले औषधपाणी त्याने याच डॉक्टरांकडून केले होते. त्यांच्या घरी वानगीची कणसे, वेलीचा भोपळा, नवतीचे पावटे अनेकदा त्याने पोचविले होते आणि ह्याच ओळखीने त्याने त्यांच्या दारात पूजेला बैलजोडी आणली होती. डॉक्टर बाहेर गेले होते. पैकूने बाईला हाक मारली,

" बाई, दारी देव आणले आहेत. पूजा करा. "

" कसली रे पैकू ? कोणते देव ? " बाईने येऊन विचारले. केसांचा अंबाडा बांधीतच ती बाहेर आली.

" कसली पूजा करायची रे ? या बैलांची ? "

" हो जी. "

" कशाला रे ही पूजा ? त्या जनावरांना त्यात काही कळते तरी ? अशिक्षितांचे हे खेळ आणि या समजुती. आम्हांला यात विश्वास नाही. पूजा बीजा काय करायची ? तू आमच्याकडे आलास. तुला आम्ही ओळखतो. हा घे तुझा इनाम ... " असे म्हणून पोटी खोचलेला एक कागदाचा चिटोरा तिने पैकूच्या हातावर ठेवला आणि " डॉक्टर घरी नाहीत " असे सांगून ती आत गेली.

पैकूने इतके दिवस आनंदाने साजरा केलेला हा सण ! या बाई अन्न खातात की कडू औषधच पिऊन राहतात याबद्दल अचंबा करीत पैकू तेथून निघाला. घरी येता येता रात्री अकराचा सुमार झाला. अंगणात तेलवातीच्या जवळच त्याने बैल बांधले. थकलेला मुलगा नव्या कपड्यानिशीच आपल्या वाकळीवर जाऊन झोपला. पैकूने बैलांच्या अंगावर तांदूळ टाकले. आपले नवे कपडे काढून ठेवले आणि लोटाभर पाणी पिऊन त्याने आपली पथारी जवळ केली,

बायजा १५-१६ तासांच्या श्रमांनी दमून मुलाला पोटाशी घेऊन अडवी झाली होती.

मूल घोरू लागले. पैकूने दिवा विझविला आणि बायजेच्या अंथरुणावर जाऊन त्याने तिला जोराने गदगदा हालविली. त्याला माहीत होते तिला झोप लागली नाही, तिने झोपेचे सोंग केले म्हणून !

" बजे, आज इतक्या लवकर झोपायला या चोवीस घंट्यांत म्हातारी झालीस होय ? "

" का ? खुशीत दिसतायसा ? खूप कमाई करून आणलेली दिसते. आल्यावर बोलायलाही वेळ झाला नाही ! झोपा आपले जाऊन, नाहीतर उगीच कालच्या-सारखे तुमचे मन आपले काळे बिळे होऊन येईल ! "

" बरे, बरे ! फार बोलतेस आज ? चल ये इकडे. "

" किती कमाई आणली आज ? काय दिले कुणी कुणी ? "

पैकूने सगळे सांगितले. कुणी काय दिले याचा हिशेब केला.

" आणि हे पाहा... "

" काय ? "

" डॉक्ट माहीत आहे तुला ? "

" तो औषधवालाच की नाही ? "

" होय. त्याच्या घरी जोडी नेली होती पूजेला. "

" बैलांच्या गळ्यातील ती लाल माळ तिथलीच ना ? "

" नाही ग ! बयेने पूजाच केली नाही लाल्या-दवळ्याची. "

" म्हणजे ? "

" म्हणाली, ती जनावरं. त्यांची काय पूजा करावयाची ? आम्ही तुला ओळखतो. "

" मग तुम्ही निघून नाही आलात ? "

" होय. तिने एक रुपयाचा कागद दिलाय ? "

" बैलांची पूजा केली नाही आणि चिटोरे दिले ? "

" म्हणे आम्ही शिकलेले आहोत ! "

" पण खाते बैलांच्याच पायाचे ना ? " दोघेही काही वेळ चूप राहिले !

" पैकू.... " बायजेने अगदी एकेरी नावाने सलगीच्या, मनसुभ्याच्या स्वरात निश्चयपूर्वक उद्गार काढला.

" का ग बजे ? " पैकूने तिच्या दंडावर हात ठेवला.

" लाल्या-ढवळ्या आज आपल्या घरचे पाव्हणे. ती काही आज जनावरे नव्हत. त्या बाईने अपमान केला त्यांचा. हे गोडपण नव्हे. कुठाय तो कागद ? तो जहर आहे आपल्याला. त्याचा पैसा होणार नाही कधी ! "

पैकू उठला. अंगणातील तेलवात त्याने आणली. अंगड्यातला तो कागद काढला आणि बायजेच्या स्वाधीन केला.

" आमचे पाव्हने. त्यांना सगळे समजते. ते आम्हांला सर्व देतात. हा कागद कडू आहे ! " तिने तो सबंध एक रुपयाचा – सोळा आणे किंमतीचा – कागद सरळ त्या तेलवातीवर धरला आणि नंतर तेलवात अंगणात नेऊन ठेवली.

सदऱ्यात शिरलेला ढेकूण पकडून काढून टाकल्यावर गार वाऱ्याच्या झुळकीने जशी सुखावून झोप लागावी...!

झोपता झोपता बायजेने पैकूच्या कपाळावर हात ठेवला व विश्वस्त स्वरात म्हणाली,

" पैकू ! आज ' मारबत* ' नाही ओरडलास ? ' कर* ' सुरू झाली असेल. ओरड. मग आपण झोपू.

पैकूने उठून बसत उच्चारले.

" माशामुरकुट्या, खरूजखोकला, मानअपमान घेऊन जा रे मारबत—! "

६-९-४५

---

* विदर्भात पोळ्याच्या दुसऱ्या दिवसाला म्हणजे श्रावण महिन्यातील अमावास्येच्या दुसऱ्या दिवसाला ' कर ' म्हणतात. तो सबंध दिवस लोक खेळण्यात, आनंदात घालवितात. आमचे आजोबा या दिवशी कधी नाही ते धर्मकर्म म्हणून जुगार खेळत असत. वाईट गोष्टीचे, रोगराईचे प्रतीक म्हणून एक देवता कल्पितात किंवा तयार करतात व तिची मिरवणूक काढून विसर्जन करतात. हाही एक विधीच समजला जातो आणि कर सुरू लागते त्या रात्रीपासून माणसे जागली करून सारखी ओरडतात– " माशामुरकुटे, डासचिलटे, खरूजखोकला, इडापिडा घेऊन जाऽऽरे मारबत. " त्या दिवसानंतर माशा, डास, रोगराई कमी होते. या विश्वासाने मग दुसऱ्या दिवसापासून नित्यकर्मे सुरू होतात.

८३

परिवर्तन

आज सण नव्हता तरीही लोकांनी नवे कपडे घातले होते. दिवाळीला बराच अवधी होता व लोकांनी घरे स्वच्छ केली होती. पांढऱ्या मातीने भिंत सारवून त्यावर गेरूने चित्रे काढली होती. स्त्रियांनी अंगणातील तुळशीची वृंदावने लिंपून पोतून स्वच्छ केली होती. तुळशीचे अळे पाण्याने भरून दिले होते. गावच्या लोकसभेने विहिरी स्वच्छ केल्या होत्या. आजूबाजूचे खड्डेखुड्डे भरून बुजवून टाकण्यात आले होते. गुरेढोरे नदीवरून अंघोळ घालून आणली होती. रस्त्यावरची घाण दिसेनाशी झाली होती.

आकाशात ढग नव्हते, पण लोकांच्या मनाचे मोर नाचू लागले होते. वैशाखाचा संताप निववीत मृगच्छाया पसरावी आणि पक्षांनीही चिवचिवाट करू लागावे. हस्त नक्षत्र संपून सांजसकाळ गारवा यावा आणि दिवाळी जवळ आल्याचे गाईबासरांनाही ओळखता यावे.

कोणतेही संभाव्य कारण नसताना अवचित एकाएकी त्या खेडयाचे मन आणि शरीर दोन्ही उत्साहपूर्ण, प्रसन्न, उल्हासमय दिसू लागली होती. जणू यशोदा घरीचा नंदलाल बालगोपालांशी खेळायला येणार होता. जणू देवकीचा चोरटा मुलगा बाजाराला निघालेल्या गवळणींची वाटमारी करू येत होता. काय होते कुणास ठाऊक ! मुले हसत बागडत होती, माणसे ख्यालीखुशालीत होती, बायका गात नाचत होत्या आणि गुरेवासरे देखील आनंदाला साथ द्यायला शेपट्या उंच करून कानी वारा गेल्यागत मस्तवालपणा करीत होती.

" सता धाता, निगमगुणगौतः " असे ज्याचे वर्णन केले जाते तो शरण्य श्रीकृष्ण यायची वेळ झाली होती किंवा नाही न कळे, पण गावकऱ्यांना या चार-पाच दिवसांत अशी एक बातमी कळली होती की, ज्याने त्यांना आपले मानले, ज्याने त्यांच्यासाठी सर्वस्व त्यागिले, स्नेह, दया, सुख हे तृणवत मानले आणि उलटपक्षी त्यांनीही ज्याच्यासाठी पराकाष्ठेचा त्याग केला तो त्यांचा भरत या चार दिवसांत कधी तरी येणार होता. ते गाव त्याने आपले म्हणून मानले होते. यच्ययावत स्त्रियांना माता मानूनही आपली म्हणून आई असते. भुवनत्रय स्वदेश मानूनही आपले म्हणून एक गाव असते, तशी ही भरताची धनवाडी, जिच्यासाठी त्याने आईपेक्षाही जास्त खस्ता खाल्ल्या होत्या.

असा हा भरत येणार, आपली सर्व कामे बाजूला सारून इथे चार दिवस राहणार, आपले सर्व मोठेपण विसरून सर्वांत मिसळणार ! आता ' दिसतील तुज हरिचरण उमटले यमुनेच्या काठाकाठाने ! ' आता आखाडयाची माती तेल, लिंबू,

देऊन करून ठेवायला हवी. आता नांगराच्या पासा परजून ठेवायला हव्यात. आता दळणकांडण भिजवून वाळवून ठेवायला हवे.

त्याची ती सजल, श्यामल, सुदृढ, विनयमूर्ती! गावची चिडीमुंगीही तिचे स्वागत इच्छित होती. तो बोलेल ते झेलायचे, तो सांगेल ते करायचे, वागेल ते उचलायचे, म्हणेल ते ऐकायचे! आमचे बरे व्हावे म्हणून तो झगडला. राक्षसांचे बळ असणाऱ्यांनी त्याला चिणला, चेंदला. त्याच्या सगळ्या जखमा आम्ही चोळून देऊ! आम्हांला पोटभर मिळावे म्हणून तो शिणला. राक्षसांचा आहार असणाऱ्यांनी त्याला भाकर-पाण्यासाठी हैराण केले. त्याची भूक इथे निववू. तो शिणलेला येईल तर त्याला विसावा देऊ. जागलेला येईल तर त्याच्या झोपेसाठी गाणी म्हणू. भुकेला येईल तर आमच्या घरी जेववू. आणि जखमांनी जर्जर होऊन आला तर आमच्या रक्तात औषध खलून त्यावर मलमपट्टी करू.

त्याला एकदाचा येऊ दे! त्याला एकदाचा पाहू दे!

गावकऱ्यांच्या ह्या सर्व इच्छा साकार झाल्या. आणि एक दिवस ती सगुणमूर्ती गावची वेस ओलांडून आत आली. पायी काय आहे? साध्या वहाणा! हाती काय आहे? बांबूची उंच काठी! खांद्यावर काय? काळी घोंगडी! शरीर सुकलेले, चेहरा फुललेला!

आणि त्या कृश देहातही ग्रामवासीयांना शिवाचा आणि सौंदर्याचा साक्षात्कार झाला.

पारांना पाणी घातले म्हणूनही असेल कदाचित पण आंब्यालिंबाची झाडे हिरवा बहर हालवू लागली. मंद मंद वारे! शकुंतांचा मधुरतर स्वर! अशा थाटात तो आला, गावकऱ्यांनी पाहिला. कासव जसे पिलांकडे पाहते. शरदाच्या चंद्रगोलातून चकोर अमृत कण वेचून घेतात!

त्याने कुणाला हार घालू दिला नाही. कुणाला पाया लागू दिले नाही. सर्वांसमवेत तो नदीवर गेला आणि अंघोळ केली. सर्वांना घेऊन तो देवळात गेला आणि भजन केले. "अघाडी चले रामराजा, पिछाडी संतनका फौजा!"

दुसऱ्या दिवसापासून आखाड्यात जागा कमी पडू लागली. शेतीवरचे काम माणसांना पुरेनासे झाले. सायंकाळचा नगारा, लाठी, बोथाट्यांची फैर – आणि सर्वत्र जसा हा असेच, सर्वांना जणू हा दिसेच!

भरताची ही लोकप्रियता त्या गावापुरतीच मर्यादित नव्हती. त्याने सर्व आसमंत भारून टाकले होते. सर्वांच्या हृदयी तो कोरला गेला होता. लोक म्हणत त्याला आतले कळते आणि ऐकू येते. तुळसा म्हातारी म्हणे, त्याच्या कानाला पंख आहेत. एरवी माझी सून दुपवली, आणि तिला औषधपाणी मिळाले नाही हे त्याला कसे कळले असते? तो तर इथे नव्हता त्या वेळी! इस्माईल पिंजारी म्हणे, त्याच्या मनाला

डोळे आहेत. तसे नसते तर माझा गुदस्ता पाय मोडला तो त्याला इतक्या दुरून कसा दिसला असता ? आणि त्याने डॉक्टर कसा पाठविला असता ? राधा मराठीण म्हणे, त्याला गुप्त विद्या येते, नाहीतर माझ्या राजारामाला झंडयात गोळी लागली, सारा गाव पोलिसांनी पहाऱ्याखाली दाबला, माझ्या घरची गाडगी, मडकी, विळे, कोयते, चांडाळांनी नेले तेव्हा काळाला चुकवून डोक्यावर इनाम असता अवसेला मध्यरात्री ' राजाराम, ' ' राजाराम ' करीत माझ्या दारावर कशी थाप मारली असती त्याने ! आणि राजारामाला मांडी कशी देववली असती त्याच्याने ?

त्या सर्व लोकांची अशी निष्ठा होती की त्याचे हात आमची दुःखे दूर करण्यासाठी, त्याचे पाय आम्हाकारणे धावून येण्यासाठी, त्याचे डोळे आम्हांला निवविण्यासाठी !

याच कारणाने धनवाडी त्याच्या कटाक्षावर झुलत होती !

हृदयपरिवर्तनाचा त्याचा सिद्धान्त ! तो स्वतः वागला आणि त्याने आपलेपणाने इतरांकडे पाहिले. नदीला वाघ, सिंह, गाईगुरे सारखीच ! चोरांनी कधी त्याला विष घातले नाही. मारेकऱ्यांनी त्याला इजा केली नाही. उलट आपल्या घामाने आपली भाकरी भिजविण्याची करामत त्याच लोकांनी भरतास्तव करून दाखविली.

आकाशात चंद्र येतो आणि सरोवरातील कमले फुलतात. क्षितिजावर सूर्य येतो आणि सूर्यमुखींचा बारा तासांचा कार्यक्रम निश्चित होतो. तशी धनवाडीची सर्व कामे प्रसन्न चित्ताने अविरत कुशलतेने चालली होती.

चार-दोन दिवस सर्वच धामधूम होती. भरताला सर्वांना भेटता भेटता दिवस-रात्री अपुऱ्या पडल्या होत्या. चौथ्या दिवशीच्या पहाटे तो नवीन उपक्रमासाठी निघाला. वाटेत येताना शेतांच्या पांघणीजवळचा रस्ता अगदी खराब झालेला त्याने पाहिला होता. उसंत मिळताच चार-आठ दिवसांत सर्वांच्या मदतीने तो नीट करून टाकण्याची त्याची मनीषा होती. तो गावाबाहेर पडला तेव्हा क्षितिजावरचा सूर्य आणि तुळसा म्हातारी दोघेही त्याला एकदम भेटली. सूर्याला त्याने नमस्कार केला. आणि तुळसाचे हात आपल्या डोक्यावर ठेवले. तिच्या हाताला कढत पाणी लागले आणि —

" मला म्हातारीला रडायला येत नाही आणि तू माणसाचा जन्म घेऊन या तरण्याताठ्या उमरीत डोळे ओले करतोस ? दौलत गेला म्हणून काय झाले ? तू माझा कान्हया आणि जयरामही घेऊन जा. माझी ना नाही. "—

लाकडांची वखार असलेले कर्णपूरचे स्टेशन जाळल्याच्या आरोपाने प्रथम फाशीची आणि नंतर जन्मठेपेची शिक्षा झालेल्या दौलताच्या म्हाताऱ्या आईचे

ते वेदवाक्य आणि ज्याच्या पायी दौलती हे सर्व करू गेला होता तो समोर उभा असताना !

"छे, मोठी माय ! मी रडत नाही. पहाटच्या दवाने ओले झाले तुझे हात ! सकाळपासून मी भटकतो आहे. पण मोठी माय, परवापर्यंत लोखंडाच्या भांड्यात खाऊन खाऊन कंटाळलो. भूकही गेली नाही. तू कधी घालणार जेवू ?"

"आज, आता चल घरी. चटणी-भाकर तयार आहे. कान्हा-जैराम थोड्या वेळात आता जेवायला बसतीलच."

"आता नाही, अझून थोडे काम करून पोट रिकामे करतो आणि दुपारी येतो. अट एक. रोजचे जे होते ते खाईन. नवीन काही नाही."

दुपारी बाराला कान्हा आणि जैरामने म्हातारीला त्याच्या येण्याची खबर दिली. तिने त्याला पाय धुवायला पाणी दिले. कान्ह्याने घोंगडे आंथरले. जैरामने थाळे घेतले. म्हातारीने रोजचे अन्न वाढले. जाड एकेक ज्वारीची भाकर आणि लाल सुरंग तिखटाचा चरचरीत ठेचा, सर्वांनी पाण्याच्या लोट्यावर हात ठेवला आणि जेवायला सुरवात केली.

भरताने पहिला घास उचलला आणि त्याला असा चटका बसला की त्याची तिडीक अगदी ब्रह्मांडापर्यंत जाऊन पोचली. एका घासाबरोबर त्याने अर्धा लोटा पाणी पोटात घातले. डोळ्यांतून धारा, जिभेला फोड, घशात खवखव आणि ठसका-!

"का रे, रोजचेच अन्न पाहिजे होते ना ?"

"मग ? कुठे काय झाले ? अग, हा नुसता ठसका लागला. दौलतच्या जेवणाची जेलमधील हीच वेळ बरे ! त्याने आठवण केली माझी. त्याला दिसले मी इथे आहे म्हणून."

तुळसा काही बोलली नाही. पण आईच्या मनाने तिने जाणून घेतले. लगबगीनं शेजारी जाऊन मूठभर भुईमुगाच्या शेंगा आणल्या तिने व त्याच्या थाळीत टाकीत ती म्हणाली,

"हे खा जरा स्हणजे तुझी जीभ निवेल."

"मोठी माय ! या पाच-सात वर्षांत मी तिखट बिलकूल सोडून दिले आहे. तिखटाने तब्येत बिघडते. तिखट खाण्याचे धर्मात लिहिले नाही, उलट खाऊ नये असेच आहे. मी पुष्कळ विचार केला आणि आता सगळ्यांना सांगत सुटतो की तिखट सोडून द्या. आहात त्या परीस चांगले दिसाल आणि शक्तीही वाढेल. शत्रूला शहाणपणाने जिंकता येईल."

आहारशुद्धीचा सिद्धान्त आज त्याने स्वतःच्या किंमतीने तेथे सांगून टाकला. त्या डोळ्यांतील धारा बराच वेळ बंद झाल्या नव्हत्या. आणि त्याचा परिणाम जवळ बसलेल्या तेरा आणि पंधरा वर्षांच्या कान्हा-जैरामवर फार झाला. आपल्या पहाडा-

सारख्या भावाने ज्याची आण पुरी व्हावी म्हणून बहादुरी केली होती आणि जिची किंमत तो देत होता, ज्याला सारे गाव देवासारखे मानते तो आमच्या भावाच्या नात्याने आमच्याकडे यावा व त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहावे !

त्यांनी त्या दिवसापासून तिखटाची बीही पानात घेतली नाही. गावचा रस्ता नीट करायला सर्वांबरोबर तेही मोठ्या उत्साहाने जात आणि मन लावून काम करीत.

पांधणीजवळचा रस्ता पूर्णतः दुरुस्त झाला होता, खाचखळगे बुजले होते. वरून कोरड्या मातीची चादर टाकण्यात आली होती. सुंदर बैलांचे छकडे जोडीजोडीने भरधाव रस्त्यावरून धावून गेले व गावकऱ्यांनी हसून खेळून दिवस साजरा केला.

त्यानंतरचा दुसरा की तिसरा दिवस. भरत आखाडयाच्या ओटीवर सूत कातीत बसला होता. भोवती मंडळी बसून चर्चा करीत होती. इतक्यात कान्हा-जैराम गुपचूप येऊन बसले. तो सांगत असलेल्या गोष्टी लक्ष लावून ऐकण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण काही केल्या मन एकाग्र होईना. भरताने त्यांची चलबिचल ओळखली आणि शंकित मनाने विचारले—

" का रे ? दौल्तचा कागदबिगद आला का ? त्याचा हातपाय ठीक आहे ना ? "

" कागद आला नाही, अझून वेळ आहे यायाला— "

" मग कशाला आला ते सांगा. काही काम आहे माझ्याशी ? "

" होय. "

" जरूरीचे ? "

उत्तर नाही. मुलांनी आजूबाजूला मंडळींकडे पाहिले आणि ती चूप बसली.

" सांगा इथंच, काही हरकत नाही. "

" तुम्ही आमच्या आईला काही व्रत सांगितले ? "

" मी ? नाही बुवा ! "

" पण ती म्हणाली, तुम्ही जेवायला आलात त्या दिवशी दौलती लवकर सुटावा म्हणून व्रत सांगितले. "

" असे ? बरे मग ? "

" काही नाही. त्या दिवसापासून ती सकाळची कोरभर भाकर खाते. सायंकाळी पाणी पिऊन राहते. चेहरा सुकला आहे तिचा या सहा दिवसांत. काल आम्ही बाहेर गेलो तेव्हा पांघरूण घेऊन निजून होती. आम्ही येताच कामाला लागली. "

" बरं जा तुम्ही. संध्याकाळी विचारीन मोठी मायला. "

मुले उठून गेली. भरत अस्वस्थ झाला. आपली सर्व कामे उरकून त्याने दौलताच्या आईचे घर गाठले. कान्हा-जैराम घरी होते. आई गवताचा भार घेऊन घरी परतली नव्हती.

" कुठे जाते रे गवत द्यायला ? "

" त्या शिवटेकडीच्या खाली नदीकिनाऱ्याने. "

भरत त्या बाजूला निघाला. तिन्हीसांज झाली होती. पक्षी परतले होते. गुरांच्या पावलांनी उडालेली रस्त्यावरची धूळ खाली बसत चालली होती. थोड्या अंतरावर एका झाडाखाली गवताचा भारा ठेवून तुळसा विसावा घेत होती. भरताने तिला गाठले.

" मोठी माय ! हे व्रत तुला कोणी सांगितले ? "

" कोणते ? "

" हे कोरभर भाकर खाण्याचे. असल्या उपासतापासाने या जमान्यात माणसे सुटत नाहीत. मला माहीत आहे, त्या दिवशी माझ्या येण्याने तुला दौलतीची खूप आठवण झाली असेल व... "

" हे कळले कसे तुला ? "

" आज कान्हा-जैराम म्हणत होते. "

" नाही राहवले त्यांच्यांनी ? तरी मी सांगितले होते त्यांना. काय करावं ह्या पोरांचं ? "

" त्यांचं काही करायचं नाही, तुझं काय करू सांग. उपाससतापास सोड्डन दे. "

" कसे सोडू ? "

" का ? त्यात काय अडचण आहे ? "

" त्यात बांधा काहीच नाही ? कान्हया-जैरामने तुझ्या सांगण्यावरून तिखट सोडलं ! "

" मग काय, चांगलंच झालं. कशी शहाणी भाऊजोडी आहे माझ्या दौलतची ! "

" शहाणी खरी पण पोटभर जेवतात ना ? "

" म्हणजे ? तू काय म्हणतेस तेच समजत नाही मला. "

" असं ! हं, खरं आहे ते, माझ्या दौलतीच्या दोस्ता ! या तीन-चार वर्षांत तू झाला आहेस तालेवार. तुला नाही समजणार गरिबांचे बोलणे आता. मी थकली आहे. कान्ह्या-जैरामला अझून कामाला लावीत नाही. माझी कमाई ती काय ? चार भाकरींची ज्वारी आजच्या दिवसात कशी तरी जमविते; तिखटाचा पेंड असला की एकेका भाकरीत मुलांचे जेवण आटपे. लोटा दीड लोटा पाणी पोटात जाई व पोट भरून ते ढेकर देत. पण आता अर्धा लोटा पाण्यात त्यांचे होते आणि दोन भाकरींनीही त्यांचे पोट भरत नाही. खपाराकडे पाहून खाली मान घालून उठतात. कोर अर्ध कोर माझ्यासाठी उरते. माझ्याने चार भाकरी संपेपर्यंत त्यांना उठा म्हणवत नाही रे बाबा ! त्यांचे वाढते वय; माझे म्हातारीचे काय ? "

ती भारा उचलायला लागली. भरताने स्वतःच्या डोक्यावर तो घेतला आणि म्हातारीच्या खांद्यावर हात ठेवून सुन्न मनाने चालू लागला. तुळसा त्याच्या आश्रयाने पावले टाकू लागली...

" भरत, तू म्हणतोस सगळं एकदम बदललं पाहिजे. सगळं एकदमच चांगलं झालं पाहिजे. आम्हांला घोड्याच्या पायानं कसं चालता येईल ? आमची मने तुझीच आहेत. आजूबाजू बदल दे. आम्ही तर तुझीच ना ? आणि तूही आमचाच... दौलताचा कागद कधी येईल रे आता ? "

आता भोवताली सर्व अंधार होता. शुक्राची चांदणी वर येऊन टपोऱ्या कळी-सारखी आकाशात फुलली होती. तुळसाच्या घरी भरताने भारा खाली ठेवला; तरी त्याची नजर त्या चांदणीवरून ढळली नाही आणि तो एक शब्दही बोलला नाही !

२२।९।४५

८४

लोककलेचे मूल्य

इतके दिवसांनी, येईन येईन करता करता अखेर आज आजोबा माझ्या घरी येऊन दाखल झाले. आम्हांला मनापासून आनंद झाला. म्हाताऱ्या माणसांच्या आग-मनाचा आनंद नव्यानेच लग्न झालेल्या जोडप्यांना होत नाही असे दाखविले, की ते जोडपे फार सुखी आहे असे अनुमान काढविण्याची लेखकांनी एक नवीन रूढी पाडली आहे. पण तसे आम्हांला काहीच वाटले नाही. त्याला विशेष असे कारणही होते. मी आजोबांचा लहानपणापासूनचा लाडका. शिवाय त्यांच्या सर्व विक्षिप्तपणात सामील व्हायला मी सदाचा तयार असे. एकदा ते सायंकाळी शेतातून येत होते. रस्त्यात त्यांना एक वाघरू आडवे आले. त्यांच्या हाती छत्री होती ती त्यांनी छटकन उघडली. वाघरू पळून गेले. तेव्हापासून ते घरातील सर्व मंडळींना बाहेर जाताना छत्री घेऊन जायला सांगत. मी त्यांचीच छत्री या निमित्ताने पळवून भर दुपारी वाघरू शोधायला जात असे. अशासारख्या त्यांच्या मनासारख्या केलेल्या किती तरी गोष्टींनी मी मोठा कर्तबगार पुरुष होऊन त्यांच्या घराण्याचे नाव राखीन असे अनुमान त्यांनी बोलून दाखविले होते. सबब स्वतःच्या पायावर उभे राहून थाटलेला संसार पाहावयास ते आल्याने मला आनंद होणे स्वाभाविक होते.

माझा अहंकार सुखावल्यामुळे त्यांचे येणे मला सुखाचे वाटलेच, पण पुण्या-मुंबईचे शहरी संस्कार असलेल्या माझ्या पत्नीला मी त्यांच्या ज्या अनेक गोष्टी सांगितल्या होत्या त्यांचा प्रत्यय येईल म्हणून तिला देखील बरे वाटले होते.

त्यांची आम्ही स्वतंत्र व्यवस्था लावून दिली, त्यांच्या खोलीत सर्व सुखसोयी करून दिल्या, स्प्रिंगचा किर्लोस्करी नवा पलंग, त्यावर मऊ मोठी नवी गादी, इत्यादि

सर्व अगदी चोख होते. दिवसभर गप्पागोष्टी झाल्या. माझ्या पत्नीचा परकेपणा पार गेला आणि आजोबांची कळी खुलायला कसलाही प्रत्यवाय राहिला नाही.

पहिला दिवस त्यांनी शहराचा परिचय करून घेण्यात घालविला. हरदा म्हणजे हिंदी मध्यप्रांतातील तहसिलीचे एक लहानसे गाव. तरी त्यांना ते शहर वाटले. सडका वगैरे व्यवस्थित आणि स्वच्छ असल्याने सडकेवर भिंतीशी लघुशंकेला बसतानाही त्यांना संकोच वाटला व तो वाखा त्यांनी अगदी कटाक्षाने बोलून दाखविला.

दुसरे दिवशी ते उठले सकाळी आणि मला एकदम म्हणाले, 'तो तुझा पलंग की काय आहे तो फेक रे बाबा माझ्या खोलीतून. मला तो नको.'

'का ? किती मऊ आणि हलके वाटते त्यावर आजोबा !'

'तुला मऊ वाटत असेल तर तू आपला दोन्ही पलंगांवर झोप. मला नको. लेकाचा तो मला श्वासही घेऊ देत नाही. सारखा ओरडत असतो. कड देखील परतविण्याची चोरी होते तिथे ! एकदम ओरडतो. पंधरांदा माणूस जागा होतो. ढेकणांचाही इतका त्रास होत नाही माणसाला. फेक बाबा तो.' आणि त्या दिवशी नोकराचे आल्याबरोबरचे पहिले काम म्हणजे त्यांच्या खोलीतून पलंग काढणे हेच झाले.

माझी फिरतीची नोकरी असल्याने मी शेजारच्या खेड्यावर गेलो होतो. त्या दिवशी ते गड्याबरोबर स्वतःच बाजारात गेले. त्यांनी शोधून, धुंडून, पत्ता लावून एक खाट विकत आणली. आमचे घर सडकेवरच होते. त्यांनी ती खाट बाहेर ठेवली. अडीच तीन शेर नारळाच्या दोरीचा बिंडा तिच्यावर ठेवून दिला आणि दिवसातील सर्व वेळ ओसरीतील झोपाळ्यावर बसून काढला.

मी सायंकाळी परत आलो, तेव्हा मला त्या खाटेचे प्रयोजन कळले.

'मग काय ! सकाळपासून कुणीच मिळाले नाही खाट विणायला ?'

'नाही.'

'काय रे राम्या ?' मी शिपायाला खडसाविले, 'आणले का नाही कुणाला शोधून ?'

'शोधावयाचे कशाला रे ? इथल्या लोकांना डोळे नाहीत का ही खाट दिसण्याइतके ? चार-दोन आले होते; पण पैसे मागत होते रांडीचे. आणि म्हणे, आमचे इतर काम आटोपून आमच्या सवडीने करून देऊ. बारा आणे द्या म्हणे !'

'मग ! दिले का नाही आजोबा ? पैशांचे काय ? गरज आपली आहे. त्यांनी फार मागितलेही नाहीत पैसे !'

'म्हणजे ? खाट विणण्याचे पैसे का द्यावे लागतात तुमच्याकडे ! मग का रे, तुमच्याकडे कुणी सहज येऊन बसले तर तेही पैसे मागतात का ? आणि का गे ए पोरी ! (तिला उद्देशून) तू याला चांगली शेकून, खरपूस, फुगलेली गरम पोळी

करून वाढतेस त्याचेही पैसे मागतेस का याला ? सुग्रण पदार्थ केला की तूही पैसे देत असशील नाही रे ? अरेच्या, बदलले वाटते सारे जग ? '

त्यांची एकंदर दृष्टी माझ्या ध्यानात आली. आणि गेली आठ-दहा वर्षे मी ज्या जगाला विसरलो होतो ते जग माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. अखेर मला लहानपणी जशी ओबडधोबड पटाडी खाट विणता येत होती तशी आठवून आठवून तीन चार तासांत मी त्यांना ती खाट विणून दिली. पण तेवढ्या अवधीत माझे सबंध बालजीवन व खेड्यातील संस्कारांचे वातावरण – त्यातली रम्य चित्रे माझ्यासमोर तरळू लागली. त्याच जीवनाचा इथेही प्रत्यय यावा अशी आजोबांची अपेक्षा होती.

त्या वेळचे मला आठवते ! आमच्या खेड्यात खाट विणण्याचा असा रिवाज होता की, सुताराने खाट आणून अंगणात ठेवावयाची. सोनतागाची शंभर हात दोरी विणून तिचे बंडल त्या खाटेवर आपण ठेवून द्यायचे. एक नारळ ठेवायचा. रस्त्याने जो कोणी मनुष्य जाईल त्याने खाट विणता येत असल्यास तिथे थांबावे. कुणाला न पुसता, न विचारता खाट विणावी आणि नारळ उचलून चालू लागावे. ओळखीचा असला आणि घरात ललकारी दिली तर दोन पानांचा विडा मिळे, चार-दोन गोड गोष्टी होत. कुणी एखादा चांगला विणणारा पाहण्यात किंवा ऐकण्यात आला असला तर त्याच्यासंबंधी दोन स्तुतिपर शब्द बोलले जात. तो कलावंत तरुण असला तर त्याची कला वाढावी म्हणून सद्भावप्रदर्शन आणि निरोप. तो अनुपस्थित कलावंत जिथे कुठे असेल तिथे त्याच्या कानी हे शब्द वाऱ्याच्या वाहनावर बसून जातील ही श्रद्धा. नाही तरी कलेचा निर्माता अज्ञात अशा भूमिभागावरील परोक्ष स्तुतीचीच वांछा करीत आलेला आहे. पैशाने त्याची हौस पुरली नाही. वैभवाने त्याचे मन निवले नाही. कधी तरी कुणी तरी मी जे निर्माण केले आहे ते पाहील, वाचील, शुभ उद्गार काढील आणि त्याने माझे तप्त मन शांत होईल. भोळ्या समजुतीने बोलावयाचे तर असे किती तरी कलावंत आकाशात तारे होऊन चमचमत असतील आणि असल्या धन्योद्गारांनी निवून आपल्या अंतःकरणाची शीतल सुषमा पसरवीत असतील.

खाट विणून मिळालेला नारळ आणि मनाच्या सद्भावांनी दिलेला विडा यांची किंमत आजच्या जगाने मोजली तर ती दोन-तीन आण्यांपेक्षा जास्त भरणार नाही. आणि एवढ्या पैशाच्या तुकड्यात कुणी मला शब्द उच्चारलेला जगाला आढळणार पण नाही. ' मी याला पैसे दिले, याने माझे काम केले ' अशीच भाषा वापरली जाणार असेल तर किती कलावंत कलेचा हव्यास लावून घेतील कुणास ठाऊक ! आणि जीवनाचा सर्वच आनंद पैशांनी मोजता आला तर मग...?

तर मग माझ्या बाळपणी त्या खेड्यात आमच्या शेजारी राहत असलेल्या सगुणेला आम्ही किती पैसे द्यावे ? तिने अनेकदा आमच्या हृदयाचे रांजण भरले.

त्याच्या मोबदल्यात रांजण भरून जरी पैसे दिले तरी ती ऐकायची नाही. आज ती कुठे असेल कुणास ठाऊक ! या वेळी काय करीत असेल अशी मनाला जरी तळमळ लावून घेतली तरी आजच्या सर्व सुधारलेल्या साधनांनी माझी जिज्ञासा निर्वेधपणे पुरी होण्याचा संभव नाही, पण त्या वेळी ?...

कुंडीतून जपून वाढविलेले कर्दळीचे झाड. उंच बांध्याचे, हिरव्या लांब पानांनी आकाशाकडे उजळ माथ्याने पाहणारे, जीवनरस शेंड्यांना येऊन वाऱ्याच्या स्पर्शाने लहरीला आला असलेला—अशी सगुणा बाहेर यायची. सकाळी अंगणी वासरू हंबरते, पोपट साद घालतो तशी ती येऊन आईला हाक मारायची. आमचे अंगण सडा घालून स्वच्छ केलेले असायचे व मध्यभागी रांगोळीचे डाबले ठेवून आई इतर कामाला लागलेली असायची. आणि तांदूळ पसरले की चिमण्या येतात तशी सगुणा तिथे येऊन गुणगुणत प्रसन्न मनाने आपल्या नाजुकशा चिमटीत रांगोळी घेऊन रेघा काढायची. रोज एक नवीन रांगोळी, रोज नवीन कलाकुसर ! कोण तिला सांगत होते ते सारे ? कशासाठी करीत होती ती हे सर्व ? आणि आजूबाजूच्या पंचवीस घरांतील बायकांना देखील सगुणाच्या चिमटीसारखी रेघही जेव्हा सरळ काढता येत नसे त्या वेळी ती लहानशी चिटुकली पोर—अहा, काय पण थाट तिचा ! डोळे कसे टपोर, मोत्यांचे पाणी घेऊन आलेले ! मुखावर तृप्तीची कांती आणि ज्या जगाने आजवर आपली स्तुती केली त्याबद्दल कृतज्ञता ! अशी भरलेली नजर ती सहज कुणाकडेही लावीत असे—आज ते सगळे आठवते व मन हुरहुरते !

कधी आठवणी मनात खुपतात पण ती खुपरीही सुखद वाटते. विचार करतो आहे की इथे सत्यकथन करीत असताही तिचे नाव सांगावे की नाही ? कारण त्याची किंमत कुणाला कशी चुकवावी लागेल याचा आजच्या जगात नेम राहिलेला नाही. हे जग श्रावणाच्या रात्रीसारखे, आत्मस्वकीयांनी आपल्या प्रिय माणसाजवळ असावे अशी ओढ लावणारे एक विश्वकुटुंब असते तर ह्या श्रावणरात्रीच्या गोष्टीही जशाच्या तशाच सांगायला संकोच वाटला नसता. सगुणाचे ठीक आहे. ती लहान होती. सुंदर रांगोळ्या व रंगीबेरंगी फुलांचे जोडे गुंफून कलेची साधना करीत होती आणि तिचे लग्न तिच्याजोग्या एखाद्या हुशार मुलाशी व्हावे म्हणून आम्ही सर्वच सारख्या जिव्हाळ्याने काळजी करू शकत होतो. पण तिच्या नावाचा उच्चार जिच्याबरोबर श्रावणाच्या रात्रीच्या रात्री नुसत्या झोपाळ्यावर—आकाशपाळण्यावर झुलण्यात घालविल्या !—

स्त्रियांच्या श्रावण जागणीच्या रात्री ! कुठे मंगळागौर, कुठे काजळतीज, कुठे डोहाळ दिवस. हौसेला, इच्छेला, आकांक्षेला ओढ्यासारखा पूर आलेला. आसमंती सर्वच हिरवे तृणांकुर. मनात नव्या भावना अंकुरित झालेल्या, जुन्या नव्या झालेल्या, बहराला आलेल्या. चांदण्यासारख्या लुकलुक करणाऱ्या ! जमिनीवर वसतीच करावीशी

करून वाढतेस त्याचेही पैसे मागतेस का याला ? सुग्रण पदार्थ केला की तूही पैसे देत असशील नाही रे ? अरेच्या, बदलले वाटते सारे जग ? '

त्यांची एकंदर दृष्टी माझ्या ध्यानात आली. आणि गेली आठ-दहा वर्षे मी ज्या जगाला विसरलो होतो ते जग माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. अखेर मला लहानपणी जशी ओबडधोबड पटाडी खाट विणता येत होती तशी आठवून आठवून तीन-चार तासांत मी त्यांना ती खाट विणून दिली. पण तेवढ्या अवधीत माझे सबंध बालजीवन व खेड्यातील संस्कारांचे वातावरण – त्यातली रम्य चित्रे माझ्यासमोर तरळू लागली. त्याच जीवनाचा इथेही प्रत्यय यावा अशी आजोबांची अपेक्षा होती.

त्या वेळचे मला आठवते ! आमच्या खेड्यात खाट विणण्याचा असा रिवाज होता की, सुताराने खाट आणून अंगणात ठेवावयाची. सोनतागाची शंभर हात दोरी विणून तिचे बंडल त्या खाटेवर आपण टेवून द्यायचे. एक नारळ ठेवायचा. रस्त्याने जो कोणी मनुष्य जाईल त्याने खाट विणता येत असल्यास तिथे थांबावे. कुणाला न पुसता, न विचारता खाट विणावी आणि नारळ उचलून चालू लागावे. ओळखीचा असला आणि घरात ललकारी दिली तर दोन पानांचा विडा मिळे, चार-दोन गोड गोष्टी होत. कुणी एखादा चांगला विणणारा पाहण्यात किंवा ऐकण्यात आला असला तर त्याच्यासंबंधी दोन स्तुतिपर शब्द बोलले जात. तो कलावंत तरुण असला तर त्याची कला वाढावी म्हणून सद्भावप्रदर्शन आणि निरोप. तो अनुपस्थित कलावंत जिथे कुठे असेल तिथे त्याच्या कानी हे शब्द वाऱ्याच्या वाहनावर बसून जातील ही श्रद्धा. नाही तरी कलेचा निर्माता अज्ञात अशा भूमिभागावरील परोक्ष स्तुतीचीच वांछा करीत आलेला आहे. पैशाने त्याची हौस पुरली नाही. वैभवाने त्याचे मन निवले नाही. कधी तरी कुणी तरी मी जे निर्माण केले आहे ते पाहील, वाचील, शुभ उद्गार काढील आणि त्याने माझे तप्त मन शांत होईल. भोळ्या समजुतीने बोलावयाचे तर असे किती तरी कलावंत आकाशात तारे होऊन चमचमत असतील आणि असल्या धन्योद्गारांनी निवून आपल्या अंतःकरणाची शीतल सुषमा पसरवीत असतील.

खाट विणून मिळालेला नारळ आणि मनाच्या सद्भावांनी दिलेला विडा यांची किंमत आजच्या जगाने मोजली तर ती दोन-तीन आण्यांपेक्षा जास्त भरणार नाही. आणि एवढ्या पैशाच्या तुकड्यात कुणी मला शब्द उच्चारलेला जगाला आढळणार पण नाही. ' मी याला पैसे दिले, याने माझे काम केले ' अशीच भाषा वापरली जाणार असेल तर किती कलावंत कलेचा हव्यास लावून घेतील कुणास ठाऊक ! आणि जीवनाचा सर्वच आनंद पैशांनी मोजता आला तर मग...?

तर मग माझ्या बाळपणी त्या खेड्यात आमच्या शेजारी राहत असलेल्या सगुणेला आम्ही किती पैसे द्यावे ? तिने अनेकदा आमच्या हृदयाचे रांजण भरले.

त्याच्या मोबदल्यात रांजण भरून जरी पैसे दिले तरी ती ऐकायची नाही. आज ती कुठे असेल कुणास ठाऊक ! या वेळी काय करीत असेल अशी मनाला जरी तळमळ लावून घेतली तरी आजच्या सर्व सुधारलेल्या साधनांनी माझी जिज्ञासा निर्बंधपणे पुरी होण्याचा संभव नाही, पण त्या वेळी ?...

कुंडीतून जपून वाढविलेले कर्दळीचे झाड. उंच बांध्याचे, हिरव्या लांब पानांनी आकाशाकडे उजळ माथ्याने पाहणारे, जीवनरस शेंड्यांना येऊन वाऱ्याच्या स्पर्शाने लहरीला आला असलेला—अशी सगुणा बाहेर यायची. सकाळी अंगणी वासरू हंबरते, पोपट साद घालतो तशी ती येऊन आईला हाक मारायची. आमचे अंगण सडा घालून स्वच्छ केलेले असायचे व मध्यभागी रांगोळीचे डाबले ठेवून आई इतर कामाला लागलेली असायची. आणि तांदूळ पसरले की चिमण्या येतात तशी सगुणा तिथे येऊन गुणगुणत प्रसन्न मनाने आपल्या नाजुकशा चिमटीत रांगोळी घेऊन रेघा काढायची. रोज एक नवीन रांगोळी, रोज नवीन कलाकुसर ! कोण तिला सांगत होते ते सारे ? कशासाठी करीत होती ती हे सर्व ? आणि आजूबाजूच्या पंचवीस घरांतील बायकांना देखील सगुणाच्या चिमटीसारखी रेघही जेव्हा सरळ काढता येत नसे त्या वेळी ती लहानशी चिटुकली पोर—अहा, काय पण थाट तिचा ! डोळे कसे टपोर, मोत्यांचे पाणी घेऊन आलेले ! मुखावर तृप्तीची कांती आणि ज्या जगाने आजवर आपली स्तुती केली त्याबद्दल कृतज्ञता ! अशी भरलेली नजर ती सहज कुणाकडेही लावीत असे—आज ते सगळे आठवते व मन हुरहुरते !

कधी आठवणी मनात खुपतात पण ती खुपरीही सुखद वाटते. विचार करतो आहे की इथे सत्यकथन करीत असताही तिचे नाव सांगावे की नाही ? कारण त्याची किंमत कुणाला कशी चुकवावी लागेल याचा आजच्या जगात नेम राहिलेला नाही. हे जग श्रावणाच्या रात्रीसारखे, आप्तस्वकीयांनी आपल्या प्रिय माणसाजवळ असावे अशी ओढ लावणारे एक विश्वकुटुंब असते तर ह्या श्रावणरात्रीच्या गोष्टीही जशाच्या तशाच सांगायला संकोच वाटला नसता. सगुणाचे ठीक आहे. ती लहान होती. सुंदर रांगोळ्या व रंगीबेरंगी फुलांचे जोडे गुंफून कलेची साधना करीत होती आणि तिचे लग्न तिच्याजोग्या एखाद्या हुशार मुलाशी व्हावे म्हणून आम्ही सर्वच सारख्या जिव्हाळ्याने काळजी करू शकत होतो. पण तिच्या नावाचा उच्चार जिच्याबरोबर श्रावणाच्या रात्रीच्या रात्री नुसत्या झोपाळ्यावर—आकाशपाळण्यावर झुलण्यात घालविल्या !—

स्त्रियांच्या श्रावण जागणीच्या रात्री ! कुठे मंगळागौर, कुठे काजळतीज, कुठे डोहाळ दिवस. हौसेला, इच्छेला, आकांक्षेला ओढ्यासारखा पूर आलेला. आसमंती सर्वच हिरवे तृणांकुर. मनात नव्या भावना अंकुरित झालेल्या, जुन्या नव्या झालेल्या, बहराला आलेल्या. चांदण्यासारख्या लुकलुक करणाऱ्या ! जमिनीवर वसतीच करावीशी

वाटत नाही त्या वेळी. घरे अपुरी ठेंगणी वाटतात. श्रावणाच्या ढगांची उशी करून झोपावेसे वाटते. साधी संगीताची तान कुणी छेडली तरी बाहेर यावेसे वाटते. अशा वेळी गावचे कलावंत पुढे सरसावतात. उंच उंच पाळणे झाडांच्या फांद्यांना बांधून त्यांचे दोर फुलमाळांनी सजवायचे, एखाददुसरी चार पावले टेकू शकतील अशी पाटी आधाराला घ्यायची, तिच्यावरही गावच्या सुताराने आपली कुसर चार-दोन रेघांनी चित्रित केलेली असायची, आणि मग अशा पाळण्याचे ते दोन दोर चार हातांनी धरायचे आणि आपल्या गतीने झोपाळ्याला गती देऊन, उंच अंतराळी – इतके उंच की चार मैलांवरचे गाव दिसले पाहिजे, शेजारच्या गावातील दीपमालेचा दिवा दिसला पाहिजे ! आबालवृद्धांनी आपली वये विसरायची ! कोण स्त्री, कोण पुरुष !..

अशा प्रफुल्ल रात्रीच्या त्या आठवणी. दोन हातांतील बांगड्या, बिलवरांची किणकिण, झोपाळ्याच्या उंच खाली होण्याने वरखाली होणाऱ्या हृदयफुलांच्या पाकळ्या ! अशा हालत, अशा चोलत, अशा मान टाकून आधाराला येत ! एकदा उंच जायचे, आपल्या गतीने खाली यायचे, झोपाळ्याच्या गतीने. पळभरच ! आणि डोळ्यांनी पाहायला जग नुरे ! विचार करायला तर्क नुरे ! सगळ्या मनाच्या पक्ष्यांच्या भराऱ्या, पंखांची फडफड आणि असा सोसाटा ! सर्व निमून जायचे !

यापेक्षा आणखी स्पष्ट रीतीने ही आठवण शब्दित तरी कशी करायची ? चंद्राची शीतल सांद्र सुषमा, शुक्राच्या चांदणीचा गार गार शिडकावा, चिमणीची नाजूक चिव-चिव, चंडोलाचे हृद्‌बोल हे जितके मुठी गवसता येतील तितपच या स्मृती शब्दित कराव्याच्या, आणि तितपतच ती स्मृती धुक्यासारखी मनी तरळू द्यायची. ती जे काय बोलली असेल, जशी काय हरखली असेल, ज्या दृष्टीने तिने पाहिले असेल, ते बोल, तो हरीख, ती दृष्टी, आपल्या मनीच साठवायची, अगदी गुपचुप, न सांगता, न बोलता !

रात्रीचे दोन वाजले होते. झोके घेऊन घेऊन गात्रे शिणली होती. अशा वेळी आसावल्या मनाने तिने केलेली--

‘ माळिणीचा माळी, माळी गेला पुण्या
केळीला आल्या फण्या..... ’

या ओवीची आळवण ! त्या वेळी जो जीव काळवला, जसे मन खळखळले, तो अनुभव कुणास ठाऊक कधी पुसला जाईल तो; आणि आज किती किंमत देऊन ती सबंध जीवनकला – सर्वांनी झोपाळे बांधण्याची, सर्वांनी झोके घेण्याची, मनाचे धागेदोरे गुंफण्याची कला – साध्य करता येईल ती ! आज तर श्रावणाच्या रात्री दोन वाजता या समोरच्या घड्याळाचा काटा मनावर ठाण् ठाण् करून घाव घालतो आणि यंत्राची ठक ठक सुरू असते !

त्या जगाने कोणत्या रीतीने लोककलांची जोपासना केली होती कुणास ठाऊक ! पण त्या वेळी सर्व कला फुल्ल्त, फळत आणि त्यांचा सर्व समाजाला उपयोग होई. जे जे आपल्याला जमले, नित्य कर्मातून विशेष अवगत झाले, ते ते आपल्यासाठी नाही, सर्वांसाठी आहे. आपण एकट्यानेच ते उपयोगिले तर कदाचित ते साचलेल्या पाण्यासारखे तुंबेल आणि नाश पावेल, ही विलक्षण श्रद्धा त्या जगाने टिकविली होती. साधी पत्रावळीची गोष्ट जरी घेतली तरी मोहा-पळसाची हिरवी पाने ओसरीवर ठेवली जात आणि जो जो जोडण्याची कला जाणत असेल तो तो एरव्ही रुतणाऱ्या चोयट्या घेऊन पाने सांधीत असे. पानाला पान जोडून असा घाट बनवी, असा आकार आणी, चोयटयांची रांगोळी अशी खुलवी की जेवणाऱ्याने दोन घास जास्त खावेत आणि जोडणाऱ्याच्या कलेची स्तुती करावी.

तसाच साप चावण्याचा तो रोमान्स ! मंत्रतंत्रांनी सापाचे विष उतरत नाही हे खरे आहे. पण आमच्या गावी अशी श्रद्धा होती की, ज्याला म्हणून सापाचा मंत्र येत असेल त्याच्या मंत्राने विष उतरलेच पाहिजे. साप चावला असेल त्या घरच्या मंडळींनी ' पान लागले, पान लागले ' असा हाकारा द्यावा. ज्या मांत्रिकाला हाकारा ऐकू जाईल त्याने हातचा घास टाकून उठलेच पाहिजे, असेल त्या स्थितीत धावलेच पाहिजे. पंचवीस पंचवीस मांत्रिक जमत. त्यांच्या मंत्राच्या घोषाने, एकसंध शब्दांनी सर्व वातावरण दुमदुमून जाई. जो मांत्रिक त्या वेळी तिथे धावणार नाही त्याचा मंत्र निःसत्त्व व्हायचा, अशी कल्पना, अशी श्रद्धा ! त्यामुळे ही विनामूल्य धडपड, धावपळ ! समाजजीवनात आपल्या कलेची साखर घालून ते मधुर करण्याचा प्रयत्न ! जाईला जेवढी फुले येतील तेवढी तिने स्वतःसाठीच ठेवता कामा नये. वसंताचे आगमन झाले की कोकिळाने आपली कलामाधुरी ओतूनच द्यायला हवी. आकाशात ढग भरून आले की मयूरराजाने आपला पिसारा पसरून हजारो डोळ्यांनी आपल्या मनीचा आनंद व्यक्त करीत साद दिली पाहिजे. सगुणेला रांगोळी काढता येते मग ती तिने काढायला पाहिजे ! मग गोमयसंमार्जित अंगण कुणाचेही असो. मला अमुक एक कला येत आहे तिचा मी उपयोग केलाच पाहिजे, मग तो कुणाकारणेही असो !...त्याचा मोबदला जो काय मिळेल तो खण् खण् ऐकू येणार नाही हे खरे; पण तो जाणवत असे आणि असा जाणवायचा की जणू चंद्रोदयापूर्वीची शीतल वायुलहरी ! सर्व तप्तांना शांत करणारी, उदासीन असलेल्यांच्या मुखावर हास्य फुलविणारी !

त्या जगात दिवस दिवसभर कुणाचा खाटेचा सांगाडा अभद्रपणे दारी कधी पडून राहिला नाही. कुणाचे नितळ अंगण रांगोळीच्या कुंकवावाचून भोंडे, अभद्र राहिले नाही.

आणि आज कुणाचे घर पेटत जरी असले तरी लोक जे जागचे हालतात त्यात तमासगीर किंवा अन्योद्देशीच जास्त ! कुणाचे घरी मृत्यूची स्वारी झाली तरी पैशाशिवाय पाय उचलीत नाहीत !

म्हणूनच आमच्या आजोबांना भीती पडली आहे की, त्यांच्या सूनबाईला त्यांनी जर त्यांच्या दातांनी चावेल अशी मऊ, लुसलुशीत ताजी पोळी करून मागितली तर ती त्यांना पैसेच मागेल व त्यांच्या गळी मग एक घासही उतरायचा नाही.

तो माळी कुठे गेला कुणास ठाऊक, माळीण मात्र केळीच्या फण्या तोडून त्याची सारखी वाट पाहत आहे. तो आज येईल...आता येईल...येईल...!

३०।९।४'९

पा ण थ ळ

८५

दिवसातून दोन वेळ भरपूर पाणी मिळणारी फुलबाग फुलांनी बहरते, फळांनी लवते, आजूबाजूने पहाडपर्वत वाऱ्याच्या हातांनी तिला आशीर्वाद देतात. तिच्या कल्याणमय चिरजीवनाची इच्छा करतात.

—आणि जमिनीच्या पोटातून जाळ फुटतो. हादरा बसतो. सर्व अग्नये स्वाहा होऊन जाते. हाहाकार माजतो. जिथे जे असते ते जाते. जे नसते ते येते. नवे प्रकट होते.

जीवन-यात्रेच्या एका विपरीत क्षणी सातपुड्याच्या एका सधन राईत चिंचोळ्या नदीच्या खडकावर बसून दिवस घालविण्याचा प्रसंग आला. त्या वेळी समोरच्या कपारीत एक वहीसारखे कागदाचे पुडके सापडले. तिच्यातले बरेच कागद फाडले गेले होते. काही पानांवर काय लिहिले होते हे समजणे दुरापास्त होते. कारण त्यात संकेत लिपी वापरली होती. काही पाने सुसंगत मजकुराने भरली होती. अमेरिकेचा शोध लागेना, किती दूर जायचे याचाही अंदाज होईना. मृत्यू समोर येऊन थयथय नाचू लागला. त्या वेळी तत्काळपर्यंतच्या हकीकतीचे टाचण मेणाने चोपडून बंद पिपात घालून कोलंबसाने समुद्रात सोडले होते. हेतू हा की जगाला आपली खबर कळावी.

तथापि प्रस्तुतच्या वहीत असा काही हेतू नव्हता. हा अज्ञात जीव या नदीकाठी कधी तरी येऊन ओंजळभर पाणी पिऊन गेला असावा एवढेच काय ते त्यावरून कळावयाचे. अशी ही टाचणे, त्यांतील तारखांवरून फारसा अंदाज होत नाही. सबब आवश्यक जुळणी करून त्यातील खालील मजकूरच तेवढा मिळवला:

ता०—१

" आजपासून चार दिवसांनी मी अशा ठिकाणी जाणार की तेथून कधी परत येणे नाही. माझ्या नावाची चिठ्ठी पडली आहे. ती कधी तरी अशीच माझ्या नावाने

अवचित पडणार असे मी माझ्या मनाला कधीपासूनचे बजावून ठेवल्यामुळे मला त्याबद्दल काही वाटत नाही हे खरे आहे. चिठ्ठीत माझे नाव येताच अगदी सहजगत्या मी माझ्या तळहाताचे रक्त काढले व त्या कागदावर सही केली.

" सर्व पाश तोडले मी. कसलाही मोह नाही मला असे किती विश्वासाने मला वाटायचे. पण ही वसुंधरेची आठवण ! परिचय झाला तेव्हा या तरुण मुलीला घरकाम करताना, अन्नपूर्णेसारखे आम्हा क्षुधार्त मंडळींना वाढून तृप्त करताना पाहिले होते. आज ती माझ्याकरिता आत्मार्पण करायला तयार आहे.

" एका गावी माझे विशिष्ट काम असे. तिथे ठराविक घरी ओळखीने उतरावे लागे. ते गृहस्थ प्रसंगवशात माझ्या वडिलांचे स्नेही निघाले. तिथेच त्यांची वसुंधरा आमची पंगत वाढायला आली असताना दिसली. इतर कामे करूनही तिला हे काम करावे लागल्याने थकून तिचे मुख घामाने डबडबले होते. तिचा चेहरा त्या वेळी मला अतिशय आकर्षक वाटला. आणि स्त्रियांकडे फारसे बारीक लक्ष देण्याची सवय मला नसताही तिने मला जे जे वाढले ते मी भराभर संपविले होते.

" आठ दिवसांनी मी त्या गावाहून निघून गेलो. ही त्या गावाची माझी पहिली खेप होती.

" आयुष्यात एकदाच ताजमहाल पाहावा व जन्मभर आठवणींचे शिंपले मोत्यांनी भरून ठेवावेत. आणि वसुंधरेला त्या माझ्या मुक्कामात मी कित्येकदा बघितली होती.

" मला तेथे काम फार असे. गावाची वस्ती बारा हजार. वेगवेगळ्या लोकांशी वेगवेगळ्या रीतीने वागावे लागे. ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणे कामे निवडून द्यावी लागत. शिवाय आपल्या वेगवेगळ्या भूमिका. सध्याच्या परकीय सरकारने नेमलेल्या जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा संभाळताना जेवढे श्रम पडत नाहीत त्यापेक्षा शंभरपट जास्त खस्ता, त्रास ! त्यामुळे मला माझा वेळ नसे. रात्री पुनः सर्व हकीकतीची टाचणे करून केंद्राकडे पाठवावयाची !

" पण या सर्व घाई-गर्दीत जेव्हा वसुंधरेच्या स्मृतीची फुलबाग दिसे तेव्हा वाटायचे, थोडा विसावा घ्यावा. एवढ्या माळा गुंफून टाकाव्यात. माझ्या मनाचा संगर वाढे. त्यात मोहाचा भाग किती होता याची त्या वेळी कल्पना येत नसे. "

" माझे राजकीय काम. पुनः सर्वसंमत नसलेले. आमचा मार्गच काट्यावरून. ती सुळावरची पोळी. आमच्या दुःखाबद्दल कुणाला सहानुभूती नसावयाची. सुखाचे, श्रेयाचे वाटेकरी मात्र सर्वच होऊ इच्छितात. एखाद्या हिंस्र श्वापदाकडे लोक ज्या दृष्टीने पाहतात त्याच दृष्टीने आमच्याकडे त्यांचे बघणे.

"त्यांची कल्पना अशी की, आम्हांला काळीज नसते. त्यांना वाटते की आमच्या कोमल भावना मरून गेल्या आहेत.

"त्यांचा समज असा की, जे सात्त्विक आणि शुद्ध असते ते आम्हांला वर्ज्य असते.

"त्यांचे म्हणणे खरे आहे. कारण त्यांना आमचे फक्त बाह्य शरीर दिसते. मन, हृदय दिसण्याचे किंवा दाखविण्याचे यंत्र अझून निघाले नाही. आणि ज्या रीतीने लोकांना आपली हृदये दाखविता येतात ती रीती आम्हांला परवडत नाही.

"वास्तविक आमची स्थिती अशी असते की, स्वतःच्या कोमल, शुद्ध, सात्त्विक भावना अंतःकरणाच्या कोपऱ्यात ठेवून द्यावयाच्या. त्यावर द्यावयाचे पक्के बसवून कर्तव्याचे झाकण !

"असे घट्ट बसवायचे की, आमची नित्यकर्मे करीत असताना आतली आरडा-ओरड ऐकू येता कामा नये. घराबाहेर पडताना आम्हांला आमच्या घरावर निखारा ठेवावा लागतो. त्यामुळे लोक म्हणतात आम्ही आततायी आहोत.

"सूर्याजीने दोर कापण्याचे तत्त्वज्ञान मावळ्यांना शिकविले होते.

"कमी अवधीत जास्त आणि पुष्कळांच्या वाट्याची कामे आम्हांला करावी लागतात म्हणून तेच तत्त्वज्ञान आम्हांला परवडते.

"वसुंधरा मला हवीशी वाटे आणि तिच्या सान्निध्यात आयुष्याची दिवाळी भोगण्याचा मोह कधी कधी मनाला अभिभूत करी; पण कर्तव्याचे काय ? प्रेमाच्या सान्निध्यात कर्तव्याचे काटे खुपत नाहीत, कर्तव्य त्यामुळे सुकर होते असे म्हणतात. असा प्रत्यय येणाऱ्यांना माझे शतशः प्रणाम. त्यांनी आपले जीवन सार्थकी लावले.

"पण हा प्रयोग एकदाच करावयाचा असतो आणि तो फसला तर ?—"

घरी फुलांची शेज तयार असताना मला कुणी काट्यागोट्यांतून चालू देईल ? छे, छे, असे करणे युक्त नव्हतेच—"

"ह्या सर्व एकतर्फी गोष्टी आहेत अशी माझी कल्पना. वसुंधरा या बाबतीत अश्राप आहे. अपराध माझाच. माझ्याच मनाचे हे सर्व खेळ ! ते विसरण्यात माझे आणि इतरांचे कल्याण.

"विसरलेच पाहिजे, हा निश्चय जेव्हा केला तेव्हा मनाला एक मोठे काम केल्याइतके समाधान लाभले.

"माझा प्रयत्न सफलही झाला. मी सर्व विसरलो. शिवाय आमच्या कामाचा सीझन सुरू झाला होता. त्या वेळी क्षणाची उसंत नव्हती. वसुंधरेच्या गावाचेच काम गाडाभर पडले होते. वेळी अवेळी जेवायला वाढणारी वसुंधरा प्रेमाने वाढते की कसे, ते अन्न गोड आहे की कडू याचीही मला शुद्ध नसे.

"आणि नवीन मिळालेल्या दीड लाख रुपयांची विल्हेवाट लावण्याचा तो आठवडा. वसुंधरेच्या मुखाकडे नजर उचलून पाहण्याचेही भान त्या वेळी नव्हते मला. समोरची भिंत, जवळचे टेबल, हातालगतचा दिवा, खिशातले पेन, तशी वसुंधरा—

"मला माझीच स्तुती करावीशी वाटली. मला संयमाचा, कार्यतत्परतेचा उन्माद चढायची वेळ आली होती."

"हे असेच चालू शकले असते. पण ते वसुंधरेने मैत्रिणीला लिहिलेले पत्र! दुसऱ्यांची पत्रे दृष्टीला वर्ज्य समजावीत. नकळत चुका झाल्या तरी फळ भोगणे येतेच. दशरथाने जाणतेपणी श्रावणाला बाण मारला नव्हता. पण 'हाय राम! हाय राम!' करीत त्याने जीवित त्यागिले.

"स्त्रीची नजर सूक्ष्म असते हे खरे. एरवी—'ज्यांच्या ज्यांच्यात ईश्वराने प्राण ठेवला आहे त्यांना सकाळी हुरूप येतो आणि सायंकाळी विसाव्याला ते आसावतात. पण यांच्या जीवनात इतके दिवसांच्या परिचयानंतरही असली सायंकाळ असल्याचे आढळले नाही मला. त्यांचा कोरा करकरीत चेहरा. ना त्यावर दवाची कलारेखा की जीवाचे दुःख! तथापि मी स्त्री असल्याने एवढे मात्र नक्की सांगू शकत्ये की त्यांचे हृदय कितीही अथांग असले तरी मी त्यांच्यापासून दूर नाही.....' ही वाक्ये तिने पत्रात कशी लिहिली असती?

"तिचे पत्र माझ्या हातात आहे हे पाहताच तिने माझ्या डोळ्याला डोळा दिला नाही आणि तिने पाहिले असते तरी मला नजर उचलता आली असती किंवा नाही याबद्दल मला संशयच आहे.

"माझ्या मनाच्या कोपऱ्यातले पक्के झाकण घालून कडी-कुलपात बंद करून ठेवलेले माझे विचार तिला कळले ही जाणीव तर माझ्या जीवाचा थरकाप करून टाकू लागली.

"मी ते विचार येऊ दिले, त्यांची जपणूक केली हीच चूक. मौल्यवान वस्तूच माणूस कडी-कुलपात ठेवतो ना? माझी तोवर कल्पना अशी की हे विचार माझेच एकट्याचे! इतरांना यापासून कसला उपद्रव!"

"पण बुरूज फोडून बारुदीचा गोळा आत गेला होता. आता काय करावे?

"माझ्या मनात हळूहळू प्रकाश पडू लागला. त्या गावाचे काम मी अंगावर घेऊनच पार पडले असते असे नाही. इतके नियमित जाऊन केले नसते तरी चालू शकत होते आणि ते काम व्हावे या कटाक्षानेच केवळ माझे येणे निर्भेळपणे होत होते असेही आज वाटत नाही.

"मौज अशी की, जे मी वसुंधरेजवळून लपवू इच्छित होतो तेच माझ्याजवळून लपविण्याचा तिचा प्रयत्न होता."

"दोन दिवसांनी वसुंधरेशी बोलण्याइतकी माझ्या मनाची घडी मी घातली. तिला परिस्थितीचे चित्र अत्यंत भेसूर करून दाखविले. परोपरीने ठसविले तिच्या मनावर की तुझ्या आयुष्याचे मातेरे मी करू धजणे शक्य नाही.

"पण हे सर्व बोलतानाही मला तिच्या सान्निध्यात वाळवंटातील वाटसरूची आठवण होई. पाणथळी आली म्हणजे त्याला असाच आनंद होत असेल, अर्धा मुक्काम जवळ केल्यासारखे वाटत असेल तथापि मनात हे सर्व चालू असताना मी तिला समजावीत होतो, 'यात कल्याण नाही.'"

"या माझ्या देशात अशा स्त्रिया आहेत की ज्यांनी धैर्यवंतांनाही धीर दिला. मनोदुर्बळाला सबळ केले! वसुंधरा बराच वेळ बोलली नाही. ती तशीच माझ्यासमोर धरणीवर मोती पसरीत उभी होती. जरा वेळाने सावर धरून बोलली, ती मात्र विजेसारखी तेजस्वी, अमृतासारखी संजीवक अशी– 'ते पत्र हा माझ्या मनाचा चोरकप्पा होता. त्यातले तुम्हांला काही कळावे किंवा कळेल याची मला कल्पना नव्हती. माझ्याने होईल तो प्रयत्न मी तुम्हांला मदत करण्याचाच केला. उलट मला तुमचीच भीती होती की माझ्यामुळे तुमच्याच हातातले धनुष्य गळेल आणि तुम्ही रथाखाली उतराल. कितपत साधले मला माहीत नाही, पण मी ते टळावे असेच वर्तन केले. तुमच्यासमोर मी कधी संभ्रम दाखविला नाही. विभ्रम तर नाहीच नाही. फुलांचा हव्यास मी धरला नाही. आणि प्रसंग पडल्यास मी तुम्हांला हेही सांगावयाची माझ्या मनाची तयारी करून ठेवली होती की माझ्यापेक्षा तुमची कटयार, तुमचे पिस्तुल जास्त तेजस्वी आहे, सुंदर आहे. त्यांची उपासना तुम्ही अंगीकारिली आहे. ती निष्ठा कमी होऊ द्याल तर पापाचे धनी व्हाल... सिद्धी भंगेल! पण आता झाले ते असे! झाले ते विपरीत! योगायोगाने! पण याला मी उपाय योजिला आहे. द्या; एकदा तुमच्या चरणांवर डोके ठेवते आणि तुमच्या कार्यात यश चिंतिते. असले शुभ चिंतन जगातल्या फार थोड्या स्त्रियांनी केले आहे. त्यांच्यात मला माझे नाव नोंदविण्याची संधी मिळाली याचा मला अभिमान आहे. तुमचे शुभ इच्छिण्याचा, आशीर्वचन देण्याचा माझा हक्क मी कोणत्याही रीतीने डागळू दिला नाही...

'हे स्त्रीचे मन! परमाणूपेक्षाही सूक्ष्म व तितकेच शक्तिशाली! माझ्या उद्दिष्टापेक्षाही मोठी क्रांती मला पहावयाला मिळाली!

"आणि म्हणूनच त्या स्मृतीची उदात्तता, पवित्रता, मंगलमय कमनीयता, आजच्या शेवटच्या कल्याणघडीला स्मरण्याची तिची पात्रता.....

"माझा निर्णय घेणे मला त्यामुळे किती सुलभ झाले, स्मृतिसुमने–त्यांची माला, अश्रुफुले – त्यांची पखरण, औदासीन्य, त्यांचे उन्ह इत्यादि सर्व शब्दच त्यामुळे निमाले."

" केवढे वादळ शांत झाले ! एकही झाड कोसळले नाही. एकही घर पडले नाही ! एकही जीव दगावला नाही !

" तथापि – ही – ह्या काळ्या फत्तराच्या कपारीतून ही झरी वाहते आहे ती ?

" पण त्याची दखल फत्तराने घेतली नाही. वारा पाऊस धैर्याने सहन करीत स्थितप्रज्ञासारखा तो 'प्रसन्न' आहे.

" वाळवंटात पाणथळीच्या विसाव्यावाचून चालविलेली दौड ! ती तर्कावर घासून बहुधा निरर्थक ठरते. पण कुणाच्या तरी अनर्थकारी कृत्यावरच पुढचा सर्व अर्थ उभारला जातो असा मानवजीवनाचा अनुभव इतिहासाने नमूद केला आहे.

" आणि वाळवंटातील पाणथळांचा विसावा सुखदायी कोणाला ? आम्हांला ? आमच्या हृदयांना ? सर्वच प्रश्नांची उत्तरे उपमा-रूपकांनी मिळत नसतात.

" अनेक संघर्षांनी आमचे हृदय तापलेले असते. असे तप्त की जसे लोखंड लाल होते; असे तप्त होते की जशी काच तापते ! आणि या तप्त काचेवर तुमच्या त्या उपमेतील पाणथळ जलाचे थेंब पडले की तिचे तुकडे होतात.

" आणि या चार दिवसासांठी एवढा वितंडवाद कशाला ? सायंकाळ होत आली आहे. झाडाचा हिरवा रंग काळसर झाला आहे. थंडी झोंबत आहे. आणि ती पाहा सातपुड्यातील वाघाची गर्जना कानी येत आहे. भव्य गर्जित !

त्याने पुढे काय केले व त्याचे काय झाले हे कळले नाही.

त्यानंतरचे त्याच्या वहीचे एक पान जरी वाचता आले असते तरी त्या अज्ञात प्रयोगवीराचे जीवनसूक्त कळणे सुलभ झाले असते. तथापि—

तृषार्त जेव्हा ओंजळ भरून निर्मल गंगेचे पाणी तोंडाला लावतो तेव्हा ही नदी कोणत्या समुद्राला मिळाली असेल याचे संपूर्ण ज्ञान झाल्याने त्याच्या तृष्णेचा जास्त उपशम होतो असे थोडेच आहे ?

८६

तिच्या आईचे अक्षर

सरकारच्या खात्यात काम करणारा हा एक गरीब कारकून. चार कच्चीबच्ची त्याच्या पदरी आहेत. गेली वीस वर्षे इमानेइतबारे तो आपली दोन रुपये रोजाची नोकरी बजावीत आहे. फारशी खुशी कधी त्याला वाटली नाही आणि तीव्र दुःखाचा किंवा अनुतापाचा त्याला उमाळा आलेलाही कधी कुणी पाहिला नाही.

तो परवा माझ्याकडे येऊन मला हे कागद देऊन गेला.

यापूर्वी मला तो अनेकदा भेटला होता. तीन वर्षांपूर्वी कस्तुरबांनाही सरकारने पकडून नेले. त्या दिवशी सायंकाळी तो आला तेव्हा त्याचे मन बरेच अस्वस्थ झाले होते. त्या वेळी तो मला म्हणाला होता, "काय हो, नक्की हे सरकार जाणार का? तसे सांगा म्हणजे त्याची भीती नको. मलाही परवापासून वाटते आहे, मारावी लाथ नोकरीवर!"

मुलाबाळांच्या उपासमारीपेक्षाही सरकारची भीतीच त्याच्या उरावर जास्त बसली होती. आणि म्हणून त्याचे मन कितीही देशाच्या बाजूने असले तरी शरीराचे यंत्र सरकारची कामे सुरळीत करीत होते.

त्यानंतर मीच बेपत्ता झालो. पुढे सापडून पकडला गेलो. सुटल्यावर, स्थिरस्थावर झाल्यावर मग त्या रात्री तो आला. मला कडकडून भेटला. यात्रेवरून आलेल्याचे चरणरज जसे भाविक आपल्या माथी घेतात तसे त्याचे त्या दिवशीचे वागणे. ते कागद देताना त्याने विलक्षण हकीकत सांगितली!

"तुम्ही गेला व त्या खोलीत मग एक मुलगी राहायला आली. फार सुंदर होती दिसायला. व्यवस्थितपणे राहत असे. मुखावर गांभीर्य सदाचे असे तिच्या. फारसे वय नव्हते. असेल सोळा-सतरा वर्षांचे. काय करीत असे हे मला अजूनही कळले नाही. खोलीचा जिना चढायची ती मात्र पुस्तके घेऊन. कुठे शाळा-कॉलेजात जात असेल. आमच्या छोट्या सोनीची तिच्याशी चांगली गट्टी जमली होती. सोनीच्या निमित्ताने सोनीची आईही तिच्याशी एखाददुसरा शब्द बोले. तरुण, सुंदर, अबोल, सुजन अशा व्यक्तीबद्दल सहजच आकर्षण वाटते. आमच्या तिला व मलाही तिच्याबद्दल वाटे, ती वेळी अवेळी स्वतःच्या खोलीवर येई. तांब्याभर पाणी, कपभर दूध, असे कधी कधी तिला लागे. आणि जसे निःसंकोचपणे आईवडिलांजवळ आपण मागतो तशी ती येई व हवे ते घेऊन जाई. पण सगळे तितपतच. तिच्याबद्दल आम्ही फारसे विचारावे अशी कधी संधीच दिली नाही तिने. आम्ही तिची कामे करीत असू याचे कारण आम्हांला तिच्याबद्दल खूप आपलेपणा, आकर्षण, दरारा वाटे, एवढेच!

"एक दिवस ती सायंकाळी माझ्याकडे आली. मुले बाहेर गेली होती. जरा सावधगिरीने तिने आजूबाजूला पाहिले आणि म्हणाली, 'अडीअडचणीच्या वेळेला तुमच्या इथली माणसे माझ्या गरजेला उपयोगी पडली. तुम्हा मंडळींकडे मी आई-वडिलांच्या नजरेनेच पाहते. दिवस वाईट आहेत. कधी माझ्यावर पकडले जाण्याचा प्रसंग येईल सांगता येत नाही. हे पाकीट मी तुमच्याजवळ देते. त्यात गुप्त असे काही नाही. माझ्या आईचे अक्षर आहे त्यात. माझ्याजवळ असले आणि पोलिसांना सापडले तर त्यातून ते हवे तेवढे अर्थ काढू शकतात. तुमच्याकडे असले तर त्याला

किंमत नाही. मी परत आले तर मला द्या किंवा मग तुम्हांला वाटेल त्या जबाबदार माणसाजवळ देऊन तुम्ही मोकळे व्हा.'

"एवढे म्हणून ती गेली आणि त्याच रात्री पोलिसांनी तिच्या घराची झडती घेऊन तिला पकडले. तिच्या खोलीला कुलूप घातले. त्यानंतर गेली तीन वर्षे तिच्याबद्दल काहीच ऐकू आले नाही. कुठल्या तुरुंगात आहे की किल्ल्यात देव जाणे! आम्हांलाही चौकशी करणे शक्य नाही. विजया हे तिचे नावच तेवढे आम्हांला ठाऊक. शिवाय आमच्या मागे ही कच्चीबच्ची. मनात कितीही वाटले, आणि वाटतेच हो, तरी भिऊन राहावे लागते. अहो, हे पाकीट घेतानाच तर मन ठोके देत होते. तुम्ही आता सुटून आल्यावर तुमच्यापेक्षा जास्त जबाबदार असा कोण सापडेल की, ज्याच्याजवळ हे पाकीट मी द्यावे? तुम्हांला कदाचित तिचा पत्ताही लागेल. पाहा, जपून असू द्या. आली बिचारी परत तर आईच्या अक्षरासाठी तळमळेल. मला वाटते, तिची आई, जग सोडून गेली असावी. वडील नव्हते हे तर तिच्याच तोंडून ऐकले होते. फार चांगली मुलगी बरे का! दिसायची अगदी हरणासारखी पण मन वाघासारखे निघाले तिचे. काय आमची पात्रता तिच्याबद्दल बोलायची! आम्ही असेच— उकिरड्यावरील छत्र्यांसारखे!"

तो उठून गेला. मी ते पाकीट उघडले! तिच्या आईचे अक्षर!

अशी अद्भूत हकीकत आहे! मला तुरुंगात असता असे वाटे, की ही जी मोठी आग भडकली ती एकदमच! पण अशा ठिणग्या जागोजागी चमकत होत्या. आणि तो कारकून!– त्याचीही राख चांगलीच गरम झाली होती.

विजयाताई! जिथे कुठे तू असशील त्या ठिकाणी वृत्तपत्रे मिळाल्यास त्यावरून सध्यापुरते एवढेच तुला जाणता येण्याची व्यवस्था करीत आहे की तुझ्या आईचे 'अक्षर' आम्ही आमच्या हृदयाच्या पेटीत जपून ठेवले आहे. ते सध्या तुझ्याकडे पाठविणे शक्य नाही, तरी नुसते वाचूनच तुला दिलासा मिळू शकेल अशी आशा आहे. हा आवाज कुठेही ऐकू जाईल तुला! तो कारकून होता तरी तुझे पाकीट त्याने भिऊन नाहीसे केले नाही. हे तुला कळावे आणि तत्सम जातीबद्दल तू जर मनात अढी धरली असेल तर तीही काढून टाकावीस!

त्या पाकिटातील कागदात आरंभी पुरुषी थाटाचे अक्षर होते. विजयेच्या आईला मावशी म्हणणाऱ्या कुणाचे तरी ते असावे. त्याने लिहून ठेवले आहे :

"चौदा वर्षांपूर्वी मावशी जेव्हा आमच्याकडे राहत होती तेव्हा ती किती चांगली दिसायची! किती आशा लावल्या होत्या सर्वांनी तिच्यावर! खेळात, अभ्यासात, साहित्यिक चळवळीत, कॉलेजची सर्व वर्षे पहिली असलेली शशिकला सर्वांचीच आवडती होती. तेव्हाची टांग्यातून घरी येणारी शशी आणि आता एकदम एका खेडेगावात गडप झालेली मावशी यांच्यात जमीनअस्मानाचे अंतर पडले होते. स्वतःचे कुंकू ठसठशीत

दिसावे म्हणून काळजी घेणाऱ्या शशीला ते चारेक वर्षांनंतर कायमचे पुसून टाकावे लागले होते. वसंतऋतूत बहरलेले तिचे संसाराचे उद्यान परिस्थितीच्या झंझावाताने उद्ध्वस्त झाले होते. आरंभीचे तिचे आयुष्य म्हणजे मोगरीची फुललेली फुले ! आणि नंतर ती म्हणते, ' ही आता निर्माल्य राहिली आहेत ! '

" आज गुरुवार ! सात वर्षे झाली बरोबर तिची भेट झाल्याला. आता कधी भेट होईल कुणास ठाऊक ! ही लढाई संपेपर्यंत आपला देश दिसणे शक्य नाही. आणि त्यानंतर देखील कुणाचा जय होतो यावर आमचे भवितव्य अवलंबून !

" मागे एकदा आली होती तिच्या कॉलेजच्या समारंभाला. तीच तिची शेवटची भेट ! विजया त्या वेळी पाच वर्षांची होती. त्या दोघींचे तेच शेवटचे चित्र माझ्या मनावर ठसले आहे.

" समारंभाचे यश आपल्या पदरात घेऊन शशी घरी आली त्या वेळी पूर्व-स्मृतींनी म्हणा, किंवा मानवसुलभ भावनांनी, पण तिचे मुख आनंदाने कसे बहरून आले होते. चार वर्षे हसली नव्हती ती जणू ! त्या वेळी हसली. ती आणि तिची विजू ! विजूचेही चित्र किती मनोहर दिसते आज ! तिच्या अस्मानी रंगाच्या झग्यावर मावशीच्या गळ्यातला मोठा पांढरा हार ! आकाशगंगेचा प्रवाह जणू ! मावशीला मिळालेला विडाही तिनेच बोकणल्यामुळे ओठावर फुटून निघून सफर-चंदाला लाली चढली होती.

" आपल्या माणसांची ही चित्रे या रणगाड्यांच्या पार्श्वभूमीवर कशी उठून दिसतात ! पूर्वी ती कधीच इतकी लोभनीय दिसत नसत. इथे आपले म्हणायचे म्हणजे ही बंदूक आहे. तिला आता संगिनी म्हणायचे !

" विजूसाठी लिहून ठेवलेले कागद ज्या रात्री तिने माझ्या स्वाधीन केले ती रात्र ! छटान् छटा आठवतात मला तिच्या ! मावशीच्या खेड्यातील दुमदार घराच्या मागील अंगणातील बागेच्या विहिरीवर आम्ही बसलो होतो. आकाशात चंद्राचे स्वच्छंद भ्रमण सुरू होते. काही तुरळक ढग वाऱ्याने इतस्ततः विखुरले होते. इतक्यात एका ढगाचे अणीदार टोक चंद्रबिंबाच्या मधोमध घुसले. पोलादी चाकूने पदार्थाची दोन शकले करावीत व तो चर्रकन आत घुसलेला चाकू तसाच राहावा त्याप्रमाणे तो ढग बराच वेळ तशा स्थितीत होता.

" मन निवविण्याचा प्रयत्न करीत असताना ते दृश्य असह्य होऊनच जणू तिने संथपणे आपली जीवनकथा सांगून टाकली !

" आज कितीतरी दिवसांनी मी माझ्या गतस्मृतींना उजळा देत आहे. ते सगळे दिवस केवळ स्वप्नासारखे, थरारून सोडणाऱ्या अनुभवांनी भरलेले.

" कॉलेजच्या माझ्या जीवनात माझ्या बुद्धिमत्तेचे कौतुक होते. मलाही जाणीव होती त्याची. इंटरच्या परीक्षेत माझा नंबर सर्वांत वर यावा अशी सगळ्यांची माझ्या-

कडून अपेक्षा होती. नुसता अभ्यास करून मला ते सहज साध्य करता आले असते. पण त्यात स्वारस्य काय ? कॉलेज सुटले की सर्व गोष्टीच मग सुटायच्या. खेळ, वाद-विवाद यांतही मन घालायला मला आवडे अगदी मनापासून !

" त्याच वर्षी मुलींनी नाटक करून दाखवावयाचे ठरविले. त्यात मुख्य काम करणे आणि इतर कामे बसविणे माझ्याच वाट्याला आले. तब्बल दोन महिने त्यात घालवून बसले मी. शेवटी कसून अभ्यास करावयाचे ठरवून रात्रीचा दिवस करायला सुरवात केली.

" त्याच वेळी आमच्या भाऊंच्या बंगल्याजवळून अर्ध्या फर्लांगावर समोर गच्ची असलेल्या एका खोलीत राहत असलेल्या हेमंत देशपांडे नावाच्या एम्. ए. च्या विद्यार्थ्याशी माझी ओळख झाली. आमच्या कॉलेजच्या वादविवाद सभेत त्यांची दोन-चार भाषणे मी ऐकली होती. त्यांच्या इंग्रजीच्या व्यासंगाबद्दल व भाषेबद्दल भाऊंचे मित्र प्रो. पाध्ये आमच्याकडे आले म्हणजे खूप चांगले बोलत. ते म्हणत, ' इतके चांगले समालोचक ज्ञान मी फार थोड्यांत पाहिले. '

" त्यांची इंग्रजीत मदत घेऊन आपणही इंग्रजीत नंबर मारावा असे वाटून मी त्यांची ओळख करून घेतली. आणि वाढविली पण ! ते म्हणत, मीच त्यांच्यापेक्षा काव्यपरीक्षण चांगले करते. मी मात्र थोड्याच परिचयात त्यांच्या बुद्धितेजाने दिपून गेले होते.

" पुढचा इतिहास सर्वांनी उघड्या डोळ्यांनी पाहिला आहे. आम्ही उभयतांनी लग्न करण्याचा निश्चय केला. भाऊंना ती कल्पना पसंत पडली. त्यांनी माझ्या आईला सांगितली. आई म्हणजे काय बाईमाणूस ! तिने उलट माझेच मत घेतले. भाऊंनी पुढाकार घेतला. त्यांनी व ताईनेच देवक बसविले. आणि मोठ्या थाटात आमचे दोघांचे लग्न झाले. माझं नाव बदलून घेतानाच ते मला म्हणाले होते, ' तुझे जीवन बदलले याची तुला नक्की कधी तरी जाणीव होईल ! '

" त्यांना परीक्षेत पहिला वर्ग मिळाला ! मलाही पण ! इतके शुभ लागले हे लग्न आम्हांला. किती किती कौतुक झाले आमचे. गंगेसारखे निर्मल आणि पोषक असे आमचे जीवन चालू झाले. ना कधी उणीव, ना मनोमालिन्य. उदासवाणे राहण्याचा कधी प्रसंग आला नाही. परस्पर सहकार मनापासून होत असल्याने जे काव्यशास्त्र-विनोदाचे जीवन कॉलेजात जगलो तेच पुढे अप्रतिहत सुरू झाले. जास्त विश्वस्तपणे, जास्त विश्रब्ध असे.

" त्यांच्या इस्टेटीच्या गावीच आम्ही राहिलो. तिथली दुमदार बंगली सुबक, शोभिवंत करण्याचा माझ्याने होईल तेवढा मी रात्रंदिन प्रयत्न करीत असे. त्यांचा शरीरश्रमावर विश्वास, ते स्वतः खादी वापरीत. आपले कपडे स्वतः धूत. शेतावर

जाऊन नांगर वखर धरीत. मोटेने पाणी देत. मलाही घरच्या बागेला पाणी द्यावे लागे. त्यामुळे माझी आणि त्या फुलझाडांची प्रकृतीही चांगली असे.

" आयुष्यात हसतमुखाने ज्या ज्या वेळी जितके सुख मिळविणे शक्य आहे तेवढे भोगून घ्यावे असे त्याचे सदाचे सांगणे. ' एक क्षणही सत्य आणि त्या अवधीतील आनंदही सत्य ! तो क्षण औदासीन्यात गेला की मग मात्र पदरी असत्याचा दोष येतो, ' असे ते म्हणत ' सुखच फक्त आपल्या हाती असते. दुःखे, त्याग कधी येतील आणि कधी आपला वाटा घेऊन जातील याचा आपल्याला अंदाज बांधता येत नाही. म्हणून त्यासाठी सदा तत्पर असले पाहिजे. पस्तावा नको. साधुसंत सांगत. मृत्यूसाठी तयार राहा; याचा अर्थ जीवनाचा उपयोग काटेकोर करा असा घ्यावयाचा.'

" त्या वेळी त्यांच्या या सांगण्यात काही गूढार्थ असेल असे मला मुळीही वाटले नाही. कदाचित त्या वेळी काही नसेल देखील त्यांच्या मनात.

" पुढे माझ्याने झाडांना पाणी देणे होईना. ते म्हणाले, ' आता मी होतो माळी आणि तू हो माझी मालन. मी पाणी वळवीन, तुला सुंदर फुले देईन. त्याच दिवसांत रोज सायंकाळी अंगणात बसून रविबाबूंचे ' मालंच ' हे पुस्तक वाचून काढले. त्यातली माळीण मला आवडेना. हेमंत म्हणत, ' तुला आवडली नाही ना ? मग गुरुदेव सफल झाले. त्यांचाही तोच अंदाज होता. गुरुदेवांना, माझ्या मालनवर पुस्तक लिहायला सांगेन ! " माझ्यावर पुस्तक ! त्यात माझ्या माळ्याचे वर्णन ! मला काहीतरी लिहिण्यासारखे चरित्र करून दाखवायला हवे नाही ?

असे ते दिवस आनंदाचे व सुखाचे गेले. सीतेचे ' त्वया सह निवत्स्यामि वनेषु मधुगंधिषु " हे स्वप्न स्वप्नच राहिले. माझे मात्र खरे झाले !

" आणि अशा अनेक ' कुसुमयुतसुगंधी ' गोष्टींनी मनाचे रांजण काठोकाठ भरले असताना एका रात्री विजूचा जन्म झाला. त्यांनी आपल्या आवडीचे विजया नाव ठेवले आणि मलाही ते आवडले.

" त्याच दिवसांत एकदा हेमंत महिनाभर बाहेर गेले. त्यांचे जुने स्नेही-सोबती जबलपूरला एकत्र होणार होते आणि त्यांचे एक छोटेसे संमेलन मदनमहालाच्या प्रांगणात भरावयाचे होते. विजू पुरती एक महिन्याचीही नसल्याने मला बरोबर नेण्याचा प्रश्न नव्हता व मला त्यात काही वाटलेही नाही.

" परत आले ते एक सुंदर संगमरवरी ताजमहाल व एक पुतळा घेऊन. तीन-चार वर्षांत आम्ही वेगळे असे कधीच राहिलो नव्हतो. त्यामुळे त्यांना व मलाही तो वियोगाचा महिना फार जाणवला. आणि आल्यानंतर क्षण क्षण मोलाचा करून आम्ही इतक्या सुखात व सहजीवनात घालविला की त्यावरून स्वर्गसुखे ओवाळून टाकावीत.

" पण पुढे असे झाले. माझ्या ध्यानी हळूहळू एक गोष्ट येऊ लागली. ते कधी कधी आताशा एकटे बसत. चेहरा विचारमग्न असा असे. येताना त्यांनी पन्नास-साठ

पुस्तके आणली होती. अर्थशास्त्र आणि राजकारणाची सर्व होती ती रूक्ष अशी. माझ्या प्रकृतीच्या नाजुकपणामुळे ते एकटेच वाचत बसत. परीक्षेच्या वेळेसारख्या रात्री रात्री जागून काढीत. त्यांच्या वृत्तीतील अल्लडपणा पार लोपून जाई. कधी रात्रीचे थकल्यासारखे वाटून मला किंवा विजूला हाक मारून जागे करीत.

" मित्रांकडे म्हणून आताशा त्यांचे जास्त जाणे घडू लागले होते. चार-दोन दिवसांनी स्वारी परत आल्यावर इतकी आनंदात असायची की कसले काम होते, कशाला गेला होता असले प्रश्न विचारायची गरजच पडत नसे आणि सुचतही नसे विचारायला !

" पण तो आनंद नुसता वरपांगी होता. गवताच्या गंजीत अग्नी धुमसत होता. बाहेरून आनंदी दिसणाऱ्या अंतःकरणात स्फुल्लिंग उठत होते. कल्पनारम्य ध्येयांची सुमधुर स्पप्ने होती आणि त्याच गर्दीत मी व विजूने थारा घेतला होता.

" बरेच दिवस मला कसलीच कल्पना नव्हती. वादळ होण्यापूर्वी सर्वत्र शांतता असते तसेच चालले होते सारे ! काही दिवसांनी मला सर्व गोष्टींचा खुलासा हळूहळू करून द्यायचा झाला. असे जिवंत निखारे, इतकी जहाल, ज्वलंत, भयंकर मते, आजवर कुठे दडली होती हेच कळेना मला ! माझ्या जीवाचा थरकाप होई. तेव्हा ते माझ्याजवळ येत व म्हणत, ' वेडे, उगीच शिकलीस तू. अग, तुला त्यात यत्किंचितही त्रास होणार नाही आणि मलाही होईलच असे नाही. तू माझे सर्वस्व ! तुझी भूमिका स्फूर्तिदेवतेची.

आमच्या मित्रमंडळींचे फार दिवसांपासून शपथविधीने असे ठरले होते की प्रत्येकाने लौकिकार्थाने जीवनात श्रेष्ठपण मिळवावयाचे आणि एक अपत्य होईपर्यंत संसार करायचा. त्यानंतर इष्टकर्तव्ये अंगीकृत करावयाची. आपल्या देशाच्या हीनदीन स्थितीची आठवण ठेवून ह्या वानप्रस्थाश्रमाची कालमर्यादा इतकी लवकर पाळावयाचे ठरले आहे ! आपले कर्तव्य जास्त मोठे आहे. सुखाचा वाटा संपून आता दुसरे वाटेकरी आले आहेत.

" मला पुष्कळदा वाटे, मी सुशिक्षित नसते तर फार बरे झाले असते. पण त्यांच्याकडे पाहून मन विचार करी, आपले काहीच कर्तव्य नाही का ? नुसत्या सुखाला सहजीवन थोडेच म्हणायचे ! पुनः ते तर आपल्याला स्फूर्तिदेवता मानतात.

" नंतर दोन वर्षांनी काय घडले हे सर्वांना ठाऊक आहेच. हंपीयार्ड बॉंब केसचा फटका फुटला. सर्व मध्यप्रांत हादरला. दिसेल त्याला पकडून सरकार तुरुंगात टाकू लागले.

" त्याच दिवशी रात्री मला जागी करून सांगायचे झाले, ' शशी, उद्या मी जाणार निघून. निरपराधी लोकांची धरपकड सुरू झालेली आहे. आपल्या लोकांना छळ सोसायची किंवा मानवी मूल्ये ओळखावयाची सवय झालेली नाही; सबब मी फार दिवस मोकळा राहणार नाही. इतके लवकर तुरुंगात जाऊन सडत राहण्याची माझी बिलकुल इच्छा नाही, अजून पुष्कळ कामे आहेत. मी एकदा इथून गेलो की कुणाच्या

देवालाही सापडणार नाही. तुला भेटायला येईन सवडीने, परिस्थिती जशी असेल तसे तारतम्य संभाळून ! तरी आता तुझ्या शिक्षणाची व संस्काराची कसोटी आहे. लोकांना आता यापुढे तुझी किंमत कळवून घेण्याची वेळ आली आहे. तुला पैशाअडक्याची ददात पडणार नाही. तुला लागतील तेवढे रुपये दोन बोटांच्या चिठ्ठीवर मिळण्याची व्यवस्था मी करून जाईनच. कुणी विचारायला आल्यास खुशाल सांग, घरी नाहीत, माहीत नाही. झडती घेतली तर घेऊ दे. काही मिळायचे नाही कुणाला. उलट त्या निमित्ताने घर स्वच्छ होईल ! '

" पुनः ते त्याच रात्री म्हणाले, ' शशी ! विजूचे जीवन तुझ्या हाती आहे. तिला पडद्यातली रोशनबिबी बनवू नकोस. तिच्या सौंदर्याचा तुला मोह पडेल, पण नुसत्या सुखाने व सुरक्षित जीवनानेच सौंदर्याचे सार्थक होते असे नाही. '

" एवढे सांगून मग इतर गोष्टी सुरू केल्या. मला अजूनही नवल वाटते, की मी त्या वेळी रडले कशी नाही ! काय जादू केली होती त्यांनी न कळे !

" दुसरा दिवस माझ्या तपस्येचा. गंगावतरण सहन करणाऱ्या शंकराची मूर्ती मी सकाळी पूजिली. त्यांनी आणलेला ताजमहाल मधल्या हॉलमध्ये आणून ठेवला व त्यांना निरोप दिला. लोक म्हणत, मी फार नाजूक आहे, सुकुमार आहे. पण हेच माझे सुकुमार हात त्यांना निरोप देताना कल्याणार्थी वर उठले. विजूनेही टाळ्या वाजविल्या. मानवी अंतःकरणात इतक्या अजस्र शक्तीची धारा कुठे साठविली असते कळत नाही !

" अंधार कापीत अदृश्य होणारी त्यांची मूर्ती पुनः माझ्या दृष्टीला पडली नाही ! माझ्या गतस्मृती व विजूचे डोळे—यांची मात्र सारखी सोबत रात्रंदिवस !

" नंतर त्यांच्या मित्रांची तातडीची बैठक पुढल्याच वर्षी भरली. त्यांची मी पत्नी म्हणून मलाही आमंत्रण आले.

" आता लढाई सुरू होऊन एक वर्ष झाले आहे. प्रभा सिंगापूरला गेला आहे. हा सिगरेट पिण्याचे सोंग करून तिथेही आग पेटविणार !

" या वर्षाची बैठक अगदी सोक्षमोक्षाची. मी तिथे हजर राहणार ! भाग घेणार ! विजू आता चवदा वर्षांची आहे. आपल्या मानाने ती सर्वच बाबतींत आता मोठी झाली आहे. ती ताईजवळ राहील. ताईच माझी आई झाली माझ्या बालपणी. आता विजूचीही तीच होईल. ताईला प्रभाची पत्रे येतात. गरज लागली तेव्हा हेही ती विजूला देऊ शकेल. माझ्या लाडक्या विजू ! तुला भेटायला येईन वाळ मीही सवडीने व परिस्थितीचे तारतम्य पाहून ! तोवर तुझ्या आईचा हा कल्याणार्थी आशीर्वाद ! "

—त्या पाकिटात एवढाच मजकूर होता. यापेक्षा जास्त आणखी काय असायला हवे होते ?

—विजूताई ! तुझ्या आईच्या येण्याची व आशीर्वादाची आम्ही वाट पाहत आहोत !

१५ । १० । ४५

सन्मार्ग

या भूभागाच्या इतर दुसऱ्या ठिकाणी त्या उद्देशाने खपणाऱ्यांच्या श्रमांना चांगली फळे आली असतील. एवढेच काय, पण ही घटनाच केवळ अपवादरूप असेल. सबब तिचे वर्णन करून त्या प्रयत्नांना दूषण लावण्याचा उद्देश नाही. जे होत आहे ते एकदम वाईट किंवा अगदी अव्यंग असाही अभिनिवेश हे लिहिण्यात नाही. किंबहुना घटनेला प्राधान्य देण्याचा प्रयत्नच मी करणार नाही. जे थोडे रंगाचे सामान मला उपलब्ध आहे त्याने मी केवळ भाऊरावांचे चित्र काढण्याचा प्रयत्न करणार आहे. साधले तर किती चांगले होईल !

भाऊराव मला अपरिचित नव्हते. माझे कपडे मला वेळेवर शिवावयाचे झाल्यास मी त्यांच्याकडे देत असे. त्यांनी कधी कुणाची मुरवत करून धंदा बिघडविला नाही. आज त्यांच्याकडे कापड दिले तर मोजून चौथ्या दिवशी सकाळी ते कपडे देत असत. रोज आठ तास खपून जे काम होणे शक्य आहे तेवढेच ते घेत. " निकडीचे ", " जास्त भाव पडतील " इत्यादींच्या गमजा त्यांच्याजवळ नसत.

" भाऊराव, लग्नाची तिथी परवा आहे. एकच दिवस अगोदर तुम्हांला कपडे द्या म्हणतो. "

" साहेब, आपण एक दिवस अगोदर आला असता तर कसेही करून तुम्हांला मी कपडे दिले असते; पण इतर ग्राहक...'

" प्रत्येकाच्या घरी लग्न थोडेच आहे ! ते थांबू शकतात. तुम्ही हवे तर जास्त पैसे द्या..."

" लोक कपडे करतात ते गरजेने किंवा आनंदासाठी; त्यांचे मोजमाप जास्त कमीच्या मापाने कसे करणार ? जास्त पैसे घेण्याची सवय साहेब, मला लावून यावयाची नाही. "

त्यांना धंद्यातून जे पैसे मिळत ते अगदी पगाराइतके नियमित. पैसे घेतल्याशिवाय त्यांनी कपडे कधी दिले नाहीत.

" भाऊराव, पैसे चार दिवसांनी पाठवून देईन. "

" साहेब, आपण इतमामाने थोर दिसता. माफ करा. पण पैसे मिळायला हवेतच. तुमचे कपडे वेळेवर मिळाले तर आम्हांला आनंद–"

" अहो, पैसे किंवा मी कुठे पळून का जाणार आहोत ?–"

"असेच मलाही म्हणता येईल साहेब! पण मला आपले पैसे द्या म्हणजे झाले—"

त्यामुळे काही ग्राहक तुटत, पण बरेच नवे लागून राहत. आलेल्यांचे हसून स्वागत करावयाचे. जाणाऱ्यांचीही हसून बिदागी करावयाची ही त्यांनी आपली स्वभावगोष्ट करून टाकली होती.

मी त्यांच्या दुकानाच्या पायरीवर पाऊल ठेवले तेव्हा ते दुकान बंद करण्याच्या तयारीत होते. सायंकाळचे सात वाजले होते. प्रश्नार्थक मुद्रेने त्यांनी माझ्याकडे पाहिले—

"दुकानासंबंधीचे काम नाही. पण तुम्ही आता जाण्याच्या तयारीत आहात. थोडे बोलावयाचे होते एवढेच! बरे, उद्या येईन. मग बोलू!"

"मी बाहेर म्हणून जात नाही. दुकान बंद करून घरी जात आहे. तुम्हांला अडचण नसेल तर आपण दोघे घरी जाऊन चहा घेऊ. पण बोलण्यासारखे असे माझ्याशी तुमचे काय काम आहे न कळे! बरं चलता?"

माझ्या चेहऱ्यावरूनच त्यांना माझी संमती ओळखू आली. त्यांनी दुकान व्यवस्थित बंद केले. दारावरचा साइनबोर्ड खिशातल्या रुमालाने स्वच्छ करून रुमाल पँटच्या खिशात ठेवला. जणू त्यांच्या गैरहजेरीतच त्या बोर्डाचे खरे काम!

आम्ही निघालो. चार कदमांवर त्यांचे घर होते. दाराला कुलूप होते. दाराजवळच्या वळचणीला एक शिंके तारेने पक्के केले होते. शिंक्यावरच्या भांड्यात गवळी दूध घालून गेला असावा. कारण दुधाची हिसळ भांड्यावर ओघळत होती. दार उघडताच किंचित हसून त्याने मला 'या' म्हणून आत घेतले. खोलीला तीन खिडक्या होत्या. प्रत्येकीला निळ्या उजळ रंगाचे पडदे घातले होते. पडद्यावर हातकाम करून कुंड्यांतून फुले काढली होती. दोन स्वच्छ अभ्राच्छादित अशा प्रशस्त खुर्च्या ठेवलेल्या होत्या.

त्यांच्या झालरी वाऱ्याच्या मंद झोताने हालत होत्या. एक छोटे टेबल, त्यावर कव्हर घातलेली चार-दोन पुस्तके, खाली एक मोठीशी सतरंजी. खोली फारशी सजलेली नव्हती. परंतु प्रत्येक वस्तूवर भाऊरावांचा हात फिरल्याच्या खुणा मात्र सर्वत्र दिसत होत्या. जी वस्तू ज्या ठिकाणी ठेवली ती वस्तू स्थानांतराने शोभली नसती याचाही प्रत्यय येत होता.

कपडे बदलून झाल्यावर भाऊराव माझ्याजवळ आले आणि हसले. या वेळी मात्र त्यांचे हास्य माझ्या लक्षातून सुटले नाही. टपोऱ्या कळीमध्ये करांगुली घालून, फुंकर घालून आपण ती फुलवितो तसे—आणि ते म्हणाले—

"माझ्या हाताने शिवलेले कपडे तुमच्या अंगावर आहेत. माझ्याच हाताने केलेला चहाही तुम्हांला देतो आता. ही माझी खोली आणि या खोलीचेही सर्वस्व मी

म्हणून हा थोडासा विनोद करून तुम्हांला आपली सूचना देतो.” एवढे बोलून दुसऱ्या कोपऱ्यातील टेबलावरचा स्टोव्ह त्यांनी पेटविला.

एक साधा ट्रे. त्यावर पांढरे स्वच्छ कापड. बिस्किटांनी भरलेल्या वशा आणि दोन स्वच्छ कपांतून चहा एवढे सर्व साहित्य सजवून त्यांनी मधल्या टेबलावर ठेवले. आपण एकटे आहोत म्हणून थोडा अव्यवस्थितपणा दाखवून आपल्या एकलेपणाचे, प्रतिष्ठेचे समर्थन करावे – थोडासा चेहरा पाडून “पहा बुवा कसा तरी गोड करून घ्या” म्हणावे असले भाव त्यावर उमटविण्याचा त्यांनी यत्किंचित प्रयत्न केला नाही. उलट जी तयारी इथे केली गेलेली आहे त्यात कसलीही उणीव नाही हाच विश्वास त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. समग्र जीवन त्याच्या विविध अंगोपांगांनी जगायला घ्यावे आणि त्या सर्वांत सौंदर्य ओतण्याची साधना करावी आणि मग त्या साधनेचे समाधान!

इतक्या सर्व तयारीनंतर चहाचा कप हाती देऊन भाऊराव हळूच ‘आता बोला’ असे म्हणाले, तेव्हा काय बोलावे याची मला पंचाईत पडली. इतक्या चांगल्या, शांत, विश्वस्त, विश्रब्ध वातावरणात बोलण्यासारखा माझा विषयच मुळी नव्हता. सुरवात कशी करणार?

“का? आणखी काही हवे तुम्हांला?”

आता सुरवात करणे भाग होते. मी सरळच त्यांना सांगितले—

“माझ्या कपड्यांवरून, माझ्या नित्य व्यवसायावरून माझा पेशा तुम्हांला माहीत आहे. चार सहादा या ना त्या अवांतर कारणांनी मी तुम्हांला भेटलो आहे. तेव्हा सरळच सांगतो. मी तुम्हांला अशी विनंती करायला आलो आहे की, तुम्ही येत्या निवडणुकीत आपले मत काँग्रेसला द्यावे. काँग्रेसने जनतेसाठी खूप केले आहे आणि जनतेनेही तिला अपेक्षेबाहेर साथ दिली आहे. काँग्रेसला असे दाखवावयाचे आहे की, या देशाची उभी जनता तिच्या मागे आहे. तिला दडपून, ठेचून तिच्या-प्रीत्यर्थ जनतेचे रक्तरंगण करूनही ती दबली नाही. आणि जनताही भ्याली नाही. आईने मुलाला हाक मारली आणि मुलांनी आपल्या जखमांवर हात ठेवून तिच्या हाकेला ओ दिली, या गोष्टीचा प्रत्यय आज सरकारला आणून द्यावयाचा आहे. ज्या वेळी सर्वांची आहुती पडत होती त्या वेळी त्या यज्ञाला विस्तव समजून इतर पक्षांनी त्यावर हात शेकून ‘शीत-त्राण’ केले. तेव्हा ते पक्ष जनतेच्या हिताच्या दृष्टीने खरे नव्हत हेही यातून दाखवून द्यायचे आहे. गोष्ट अगदी साधी आहे. मतच देण्याचा प्रश्न आहे; पण या बाबतीत बुद्धी आणि भावना यांची साक्ष घेऊन हे काम तुम्ही करावे अशी माझी तुम्हांला विनंती आहे.”

इतके बोलून मी थांबलो आणि त्यांच्या चेहऱ्यावर काही परिणाम होतो किंवा काय हे पाहू लागलो.

भाऊराव अगदी शांत होते. चेहरा निर्विकार होता. एक शब्दही ते बोलले नाहीत. याचा अर्थ माझ्या मनाप्रमाणे समजून मी अवांतर गोष्टीने विषय बदलवून त्यांची रजा घेण्याचे ठरविले. आणि शक्य तितक्या आपलेपणाच्या आवाजात मी त्यांना सहज विचारले—

तुमच्या घरी कुणीच नाही ? एकटेच तुम्ही ? सर्व तुम्हांलाच करावे लागते ? फार ताण पडत असेल नाही ? ”

“ मुळीच नाही ! ताण उलट कमी होतो. मला सर्व प्रकारची चांगली सवय आहे. एकटेपणाविषयी म्हणाल तर काही दिवस मी दुकटा होतो आणि आज पुनः एकटा आहे. ”

माझ्या चेहऱ्यावरचा प्रश्न त्यांना दिसला असावा. म्हणूनच ते हसले – अगदी मधासारखे आणि–

“ तुम्हांला थोडी उत्कंठा वाटत आहे. माझ्या पत्नीच्या मृत्यूचे दुःख दर्शवाये अशी तुमची मनीषा दिसते आहे. पण तसे, काही नाही हो ! तुम्ही बुद्धी. भावना वगैरे मघाशी काही म्हणालात आणि मतासंबंधी काहीतरी बोलल्लात. पण तसल्या भावना मला आता फारश्या राहिल्या नाहीत. मी थोडा स्वार्थी आहे आणि त्या गोष्टी मी माझ्यापुरत्याच वापरतो. त्याव्यतिरिक्त त्यांचा उपयोग करण्याची माझी प्रवृत्तीही राहिलेली नाही. एकदा काही सराव नसता अशाच भावना वापरण्याचा मी प्रयत्न केला आणि तो अक्क फसला. मी आपला आता हसतो आणि इतर गोष्टींत मन घालतो. मला थोडे गाता येते. चांगले साहित्य वाचण्याचीही आवड आहे. बऱ्यापैकी चार-दोन मैदानी खेळही येतात. आठ तास मन लावून मी माझे शिवणकाम करतो आणि यातच सर्व वेळ निघून जातो. साहित्य, संगीत, कला सगळे साधते आणि,– अगदी मजा आहे ! ”

ते हसले पण माझ्या चेहऱ्यावर त्यांना प्रकाश दिसेना. म्हणून ते पुढे बोलू लागले.

“ तुम्हांला काही फारसा बोध होत नाहीसे दिसते. आणि ते खरेही आहे. तुम्ही त्या वेळी इथे नव्हता. तुरुंगात असाल. पण ते सर्व वर्तमानपत्रांतून आले होते हो ! तथापि इथले पेपर्स तुम्हांला कदाचित त्या वेळी मिळालेही नसतील. अहो ! मी तीन वर्षांपूर्वी लग्न केलं होतं. बायको मिळविली आणि घालविली पण ! आणि जसा होतो तसाच राहिलो.” भाऊराव अगदी मनापासून हसले आणि—

“ सांगतोच तुम्हांला सगळं आता. एक दिवस दुपारी दोनच्या सुमारास तुमच्या एका राजकीय पक्षाचे एक गृहस्थ माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, “भाऊराव ! अमुक एक मापाचा एक ब्लाउझ अगदी आताच्या आता शिवून द्या. मी चौपट पैसे देतो. ” मी त्यांना सांगितले–“शक्यच नाही, पैसे एकपटच द्या, ब्लाउझ तीन दिवसांनी नक्की देईन.” तेव्हा ते गृहस्थ म्हणाले,–अहो, तसं नाही. तिला आम्ही

मुसलमानांच्या कचाट्यातून सोडविली आणि आता चार वाजता तिला शुद्ध करून तिचे हिंदू नाव निर्मला ठेवावयाचे ठरविले आहे. दिसायला ती सुंदर आहे. तिला एखादा छानसा नवरा शोधून देऊ आणि सन्मार्गाला लावू. तुम्ही ब्लाउझ करून द्या. तुम्हांला हे सर्व कळू शकतं. तुमच्या चांगुलपणाबद्दल आम्ही पुष्कळ ऐकलं आहे. तुमच्याकडून नकार घ्यायला मी मुळीच आलो नाही. इ....."

" पूर्वसंचितानेच म्हणाना, पण माझं हे परीटघडीचं मनसुद्धा थोडंसं हाललं. त्या भावनाविना ज्या म्हणतात त्या जागल्या आणि मी ब्लाउझ कापायलाच घेतला. दोन तास मन आणि हात चालत होते. सुंदर ब्लाउझ शिवून झाला. माझ्या कलेवर मीच खुश झालो म्हणा – मी ओढलाच गेलो. आजच्या माझ्या मनाची भाषा वापरायची म्हणजे घसरलोच म्हणा आणि काहीसे साहस म्हणून, पुरुषी अवखळपणा म्हणून, आजवर वाचलेले उन्मादाचे अनुभव घ्यावे म्हणूनही असेल कदाचित – पण चार वाजता जेव्हा ते गृहस्थ आले तेव्हा मी म्हणालो–

" का हो ! मुलगी सुंदर आहे म्हणता, तरुण आहे म्हणता, तिला उपरतीही झाली आहे. हे पाहा, मी जातीने हिंदू आहे. अव्यंग, निर्दोष आहे. घरी थोडीशी मायाही आहे. धंदा छान चालतो. शरीर दणकट आहे, चार-दोन घावसुद्धा सहन करता येतील. देताही येतील. माझ्यामागे व्याप नाही, पाश नाही. मी करतो तिच्याशी लग्न. पाहा जमलं तर. तुम्हांलाही बरं आणि मलाही ठीक !

" आणि आता तुम्हांला सांगू काय !–तो गृहस्थ जवळ जवळ नाचतच गेला—

" त्या सायंकाळी आमचे लग्न झाले. मारे बातम्यांवर बातम्या, हारांवर हार, माझे नीतिधैर्य, धडाडी, आजवर न केलेली ' लोकांची, ध्येयांची, देशाची सेवा ! '— स्तुतीची, अतिशयोक्तीची सगळी सुमने, फुले, अगदी पाट्याच्या पाट्या निर्माल्य भरतील इतकी ! मी बिलकुल हरभऱ्यावर चढलो होतो. कधी नाही ते तीन-चार दिवस दुकान बंद ठेवले. निर्मला मला फार बरी दिसली व मीही तिला आवडल्याचे तिने तेवढ्यातल्या तेवढ्यात पुष्कळदा म्हणून दाखविले.

" सहा महिने अगदी धुंदीत गेले. खूप प्रवास, खूप मजा. तिचा स्वभाव खूप विलासी होता. मलाही सर्व काही अनुकूल होते. दिल्लीला गेलो, लाहोर आटोपले, अमृतसर पाहिले, आगऱ्याला राहिलो – किती तरी ठिकाणी हिंडलो, फिरलो, मौज केली. सगळी चांगली विशेषणे निर्मलेने मला लाविली. आणि मी तिला तिच्या सहाय्याने एक मोठा सामाजिक आणि म्हणून राजकीय प्रश्न मी भावनेने सोडविला होता.

" तसे तिच्यात दोष पुष्कळच होते. उभयतांच्या भरदाट तारुण्याशिवाय दुसऱ्या एकही गोष्टीचा आम्हा दोघांत मेळ नव्हता. तिला जीवनाची सर्व अंगे प्रिय होती. त्यावर आसक्ती होती " फूल घ्यावे, हुंगावे, फेकून द्यावे ! अहो, साधी गोष्ट

पाहा ना – मी तिला माझी सर्व कलाकुसर खर्च करून कपडे करून देई. पण ब्लाउझ अंगातून काढून टाकल्यानंतर, खुंटी, टेबल, स्टोव्ह, चुलीजवळचे भिंतखंड, न्हाणीतला हौद यांपैकी तो कशावर ठेवावा याचा निर्णय ती माझ्याजवळ वर्षभर राहूनही तिला घेता आला नव्हता. आता तुम्ही बसलात ही खुर्ची कधी कपड्यांवर असे तर कधी कपडे हिच्यावर असत. घर आणि जंगल या दोन्हींचा प्रत्यय याच खोलीत अगदी इंग्रजी दैनिकासारखा नियमित येत होता. पण याबद्दल मी एका शब्दानेही निर्मलेला दूषण लाविले नाही. उलट मी तिला म्हणत असे— "निर्मला ! हे घर अगदी रान झाले असले तरी तू त्यातले रानफूल आहेस. मला आपली तू आवडतेस." तीही असंच म्हणायची.

"त्यानंतर एकदा आम्ही मसुरीला गेलो. पैसे वगैरे खूप खर्च झाले. तिनेच तिथे काही ओळखी लावल्या. अगदी आठ-पंधरा दिवसांत, अगदी हॉटेलच्याच मुक्कामात ! त्या ओळखीच्या गृहस्थांपैकी कुणी तिच्या कुठल्याशा काकाचे, मामाचे मित्र निघाले. मीही आपला त्यांचे स्वागत करून माहेरच्या माणसाच्या नात्याने त्यांना चहा, सिगारेट्स दिल्या; गप्पागोष्टी, फिरणे, खेळणे, पोहणे — सगळे यथास्थित होत होते.

"आणि आता संपवावयाचे म्हणजे ती एक दिवस जी गेली ती काही परत आली नाही. रात्रीपर्यंत वाट पाहून मी सामान शोधायला लागलो तेव्हा तिचे म्हणून असलेले नित्याचे सर्व सामान ती घेऊन गेली होती. एक चिठ्ठीही ठेवली होती. तिने त्यात लिहिले होते—

"'मी मसुरीतच आहे. तुमच्याजवळ मात्र राहणार नाही. माझा शोधबीध केला तर मी सापडेनही; पण पुनः माझ्या शुद्धी वगैरेची खटपट करावी लागेल तुम्हांला. नाव बदलविले की गावही बदलावे लागेल. तेव्हा उगीच त्रास करून घेऊ नका. तुम्ही फार चांगले वागविले मला – थँक्स—'

"हे थँक्स तिने मला देवनागरीत लिहिले होते बरं का ! मी त्यातले सर्व इंगित आपल्या स्वभावाप्रमाणे ओळखले. परत गावी इथे आलो. सगळे कपडे धोब्याला दिले, भांडीबिंडी सगळी चक्क घासून टाकली. खोलीला सफेती केली. पुस्तकांना कव्हरे घातली. सर्व नीट केले.

"कधी कधी वाटून जातं की एक वेळ निर्मला येथे होती आणि आज ती नाही. पण आपणच आपल्याबद्दल दया दाखविली की लोकही दाखवितात. त्या मार्गाने जाणे मला आवडत नाही. आता ही माझी खोली आणि माझे दुकान. भावना वगैरें-सारख्या गोष्टींकडे माझे लक्ष आता जात नाही. एवढेच काय, पण माझ्याकडे निर्मलेसाठी ब्लाउझ शिवायला आलेले ते गृहस्थ माझ्याशी बोलले नाहीत तरी मी त्यांच्याशी बोलतो.

" आणि अगदी सीमेची गोष्ट सांगावयाची म्हणजे या महिन्याच्या आत दोन-तीनदा मी पाहिले, निर्मला ही अशी टांग्यात बसून माझ्या दुकानासमोरून गेली. मी आपला पाहतो एवढेच. ती अशीच इथल्या कुठल्यातरी पुऱ्यातच राहत असावी. तिच्या रूपाने राजकारण, समाजकारण, धडाडी, नीतिधैर्य, देशभक्ती, सेवा, सगळे टांग्यातून हिंडत असते. मी आपला हसतो आणि लोकांचे कपडे वेतून त्यांना ते तीन दिवसांत परत करतो. पैसे नगदी, व्यवहारात विलंब, उधारी नाही. जाऊ द्या. पुनः एकदा आपण चहा घेऊ नाही का ? —"

भाऊराव अगदी झक्क हसले व त्या हास्याचे पृथक्करण करता करता माझी पुरेवाट, त्रेधातिरपिट उडाली. एक शब्द बोलला नाही. खुर्चीच्या गवसणीवर काढलेल्या फुलांशी खेळत मी चहा संपविला आणि आपाततः त्यांना नमस्कार करून बाहेर पडलो.

दाराशी त्यांनी मला निरोप दिला, " अहो, त्या ब्लाउझच्या दिवशी जसं झालं तसंच काहीसं आज माझ्या मनाचं झालं आहे. कसं चाळवल्यासारखं होतं आहे, तुमच्या कामाबद्दल मात्र सांगून देतो. तुम्ही मेहेरबानी करून मला वेळेवर आठवण करून द्या. मी देईन तुमच्या मंडळींना मत – मित्र, स्नेही म्हणून – अच्छा, नमस्कार, पुनः भेटू—"

भाऊराव भेटतात, हसतात —अगदी पूर्वीसारखे. परवा जरा खवचटपणे ते म्हणाले–" काय हो ! तुम्ही जपूनबिपून तर नाही वागत ना माझ्याशी ? "

याचे उत्तर काय देणार ?

१३।१२।४५

८८

पुनर्जन्म

आटपाट नगर होते. त्या नगरावर निसर्गाची फार कृपा होती. गावाच्या भवती उंच उंच टेकड्या होत्या. पावसाळ्यात त्या टेकड्यांवर ढगाचे पुंजक्याच्या पुंजके जमत, आणि ते टेकड्यांशी मनसोक्त खेळून आपले सगळे पाणी त्यांना देऊन टाकीत. लागेल तेवढे पाणी स्वतःसाठी ठेवून त्या टेकड्या उरलेले सर्व पाणी खालच्या तलावाला देत. लोकांना वर्षभर पुरेल इतके पाणी तलाव पण आपल्याजवळ साठवून ठेवीत असे. या तलावातून दोन छोट्या छोट्या नद्या वाहत होत्या. आपल्या काठचा प्रदेश त्या

---

* पुनर्लिखित लोककथा

सुपीक करीत पुढे जात. सुपीकतेमुळे लोकांना तृप्ती असे. जरासे खणले की विहिरीला नवे झरे फुटत. जरासे ओलीत केले की बागाईत येई. थोड्याशा उपयोगी शरीर-श्रमांनीही त्या गावात समृद्धी होई. लोकांना असे वाटे की आपल्यासाठी पृथ्वीमातेने भरपूर अन्नपाणी साठविले आहे. एवढेसे कष्ट करावयाचाच अवकाश की ताटभर अन्न सहज मिळेल. त्यामुळे लोकांना हाव नसे. ते बिनघोर असत. स्वतःला गांजीत नसत. शेतातील नवतीची वानगी पाखरांनी चाखली तरी त्यांचे धान्य कमी होत नसे. कापणीला आलेल्या शेतात चुकून एखादा गाईचा कळप गेला तरी मालकाला काठी उगारावीशी वाटत नसे. धरतीमातेकडून भरपूर अन्नाचे आश्वासन ! नदीकडून भरपूर पाण्याचा पुरवठा.

लोकांची घरे स्वच्छ सारविलेली, लिंपलेली असत. रस्त्यावर घाण, केरकचरा यांचे नाव नसे. सकाळी गाई-म्हशी शिवारात चरायला जात. त्यांचे शेण रस्त्याने पडलेले दिसले तर ज्याला दिसेल तो ते उचलून टाकी. ज्याच्या त्याच्या घरासमोरची घाण ज्याची त्यानेच उचलून टाकली पाहिजे अशी अपेक्षा असली तरी नियम नव्हता. घाण दिसली की स्वच्छ करावयाची अशी तेथील रूढी होती. त्यामुळे टेकडीवरील वाटा आणि नदीकाठही अगदी स्वच्छ असत. नदीच्या वाळवंटातील मैदानात स्त्रिया आपली रंगीबेरंगी लुगडी वाळवीत. पाण्याच्या घागरी घासून पुसून चक्क ठेवीत. सकाळचे सूर्यकिरण त्यांतून आपले रूप पाहत. ऋतुमानाप्रमाणे नदीच्या निर्मळ वाहत्या पाण्यात टोपल्यातून पेरलेले गव्हाचे पिवळे वाण सोडीत. पावसाळा संपला की कार्तिकात पुष्पदीप आणि वसंत ऋतूत गुलालाच्या मुठीच्या मुठी !

प्रत्येक घरासमोर तुळशीची वृंदावने होती. त्यांत सतेज लवलवणारी श्यामल तुळशीची रोपे वाऱ्याबरोबर खेळत असत. वृंदावनात सायंकाळी तुपाची फुलवात लागे. वाऱ्याचे मंद मंद वाहणे, पक्ष्यांच्या थव्यांनी झाडे भरून आसमंत चिवचिवाटाने भरून जाणे; लोकांचे नेहमी उद्योगात रत असणे; सायंकाळचे सर्वांचे विश्रामास्तव घरी येणे; गाईगुरांच्या कळपांचे हंबरणे--सर्वच जणू खूप थकलेले, निवाऱ्याला, आसऱ्याला घरी आलेले.

सर्वांनी आपापल्या वाट्याचे कष्ट करावेत आणि सुखासमाधानात राहावे अशी त्या गावच्या देवतेची आज्ञा होती. ती तिने अनेक सत्पुरुषांच्या मुखाने व्यक्त केली होती. त्या बाबतीत गावदेवी डोळ्यांत तेल घालून जपत असते असा वयोवृद्धांचा अनुभव होता. कुणी कुणाच्या वाट्याचे श्रम करून इतरांना फुकटचे खाऊ घालता कामा नये. उलट सर्वांनी खपावे, आपला वाटा मिळवावा, त्याचा आनंदाने उपभोग घ्यावा, सर्वत्र तृप्ती असावी या गोष्टीवर देवतेचा कटाक्ष असे.

कित्येक वर्षेपर्यंत ही व्यवस्था त्या गावात सुरू होती. तरुण स्त्रिया फुलझाडांना पाणी घालीत आणि फुलांच्या शेजेवर झोपत. तरुण पुरुष फुलझाडांची जोपासना करीत

आणि सरस, मधुर फळे स्वतः खात, आपल्या प्रिय माणसांना देत. गाईची सेवा करीत आणि दूध–तूप भरपूर खात.

अशा त्या सुंदर आणि सुखी गावात एकदा एक नवलपूर्ण गोष्ट घडली. ज्या गोष्टीचा कधी प्रत्यय नव्हता त्या गोष्टीचा प्रत्यय येणार की काय अशी भीती पडली म्हणून....

ऐका ऐका श्रोतृवृंदानो, महाशिवरात्रीची कहाणी. शंकर-पार्वतीची कहाणी.

त्या गावात एक दिवस एक शेतकरी आला आणि त्याने तेथे आपली वस्ती केली. तो अतिशय कष्टाळू होता. प्रातःकाळच्या सूर्यकिरणांनी त्याला बिछान्यावर पाहिले नाही. सायंकाळी मावळतीला काळोख पडल्यावाचून तो कधी शेतातून परतला नाही. दिवसभर काम, रात्रभर आराम. पहाटे उठावे. देवाचे नाव घ्यावे. आपली बैलजोडी घेऊन चालू लागावे. सायंकाळी परतावे. बैलांना दाणापाणी द्यावे आणि कोरडी भाकर लोटाभर पाण्याने पोटात ढकलून पथारी जवळ करावी हा त्याचा नित्य नेम असे. कधी त्याचा क्रम बदलला नाही. कधी त्याचे श्रम कमी पडले नाहीत. कधी त्याची कोरडी भाकर सुटली नाही. त्याच्या शेतात कमी पिकले तर त्याला कधी पोट मारावे लागले नाही. जास्त आणि तऱ्हेतऱ्हेचे पिकले तरी त्याने त्याचा कधी उपभोग घेतला नाही. एवढेच काय पण तेलातुपाचे चोपडपणही त्याने आपल्या भाकरीला कधी लावले नाही.

प्रथम त्याने मोठ्या कष्टाने जमिनीची एक लहान पट्टी मिळविली. गादलेली, उस्तवारी न केलेली अशी. पण रोज रोज त्याची कुदळ आत खुपसू लागली. काळी, ताजी कसदार माती वर आली. चादरीसारखे शेत स्वच्छ झाले. आणि त्या गावची ती जमीन ! मग काय विचारावयाचे ! पावसाचा पहिला शिरवा आला. त्या नव्या जमिनीने थेंबन् थेंब पिऊन टाकला. दुसरा शिरवा आला. जमीन भिजून तर्रर झाली. शेतकऱ्याने बी फेकले. काळ्या जमिनीत अंकुर फुटले. मनातील आशांप्रमाणे वाऱ्याने हालत, डुलत ते मोठे झाले. फुले आली. कणसे आली. ओंब्या आल्या. धरणीने हजारो मुठी भरून सोने वाटले. सोन्याचा मोठा ढीग जणू खळ्यावर जमला आहे असे ते धान्य पाहून वाटले !

कष्ट केलेल्या शेतकऱ्याची पत्नी म्हणाली, " देवाने कृपा केली. एक गाय घ्या. दुधातुपाला आसरा होईल. शेणखत घरी पडेल. " पण त्याच्या मनात ते भरले नाही. घरी भाकरीपुरते धान्य ठेवून त्याने सर्व विकून टाकले. आणि दुसरा जमिनीचा तुकडा विकत घेतला.

एक शेत झाले. दुसरे झाले. तिसरे झाले. सुंदर शेत, सुंदर फुलवाडी, सुंदर मळा, सुंदर बाग. जो कष्ट करील त्याच्या उपभोगासाठी अनंत हस्ताने त्याचे माप टाकावयाचे वचन ईश्वराने दिले आहे. शेतकऱ्याच्या कष्टांना सीमा नव्हती. पण त्याने ईश्वराच्या देणगीचा स्वीकार करूनही कोरडी भाकरच खाल्ली.

आणखी धान्य पिकले. आणखी द्रव्य साचले. त्याचे काय करायचे ! त्याच्या बरोबरीने कष्ट केलेल्या बैलांनी त्या राशीकडे पाहिले व तशीच नजर शेतकऱ्याकडे वळविली. जणू त्यांना म्हणायचे होते — " धनी, तुझ्याबरोबर राबलो. रात्र म्हटली नाही. दिवस म्हटला नाही. कधी थकून अडलो नाही. नाठाळपणा केला नाही. आणि हे आपल्या दोघांच्या कमाईचे समोर पडले आहे. आम्हांला चांगले कासरे घे. आमच्या गळ्यांत सुंदर पट्टे घाल. गळ्यांतील घुंगरे चांगली वाजू देत. तू आपल्यासाठीही चांगले अंगडे घे, पागोटे घे, चार दिवस विश्रांती घे, तुझे शरीर राबले आहे, थकले आहे. त्याचा कोंडा पडतो आहे. त्याला तेलाचा हात लाव. ईश्वराने जसे दिले तसे राबवू नकोस. तू आपल्याकडूनही त्याचे जतन कर, त्याचे वैभव वाढव. त्यात देवालाही संतोष होईल. कढत पाण्याने अंघोळ कर. मऊ वाकळीवर अंग टाक..."

पण शेतकरी दुसरीकडे नजर वळवितो असे दिसताच बैलांनी बोलणें बंद केले.

तथापि आज त्याला सर्वांनीच छेडण्याचा जणू कट केला होता. सकाळी घरधनिणीने त्याच्या भाकरीवर लोण्याचा गोळा टाकला. तो त्याने काढून ठेवला होता. तिचे मन दुखले होते. जीवाला गांजल्याबद्दल तिने त्याला दोष दिला होता. घरी सर्व असून कोरड्या भाकरीशिवाय स्वतःला काहीही आरजू न देण्याबद्दल त्याचा जो कटाक्ष होता तो सोडण्यासाठी तिने डोळ्यांत पाणी आणून त्याला सांगून पाहिले होते. पण एक ना दोन. त्याने काहीच ऐकले नाही. दुपारी तो बागेत गेला. सुरवातीला प्रवेशद्वाराजवळच पपईची झाडे फळांनी भारावली होती. ज्याने खतपाणी घालून आपल्याला एवढे मोठे केले त्याच्याबद्दलच्या कृतज्ञतेने ती जणू लवली होती. त्यांतील एक झाड अधिकच लवले, व पिकली पपई त्याने शेतकऱ्याच्या पायाजवळ टाकली आणि जणू सांगितले—" आमची ही नम्र भेट; एवढेच आम्ही तुझ्यासाठी करू शकतो. त्याचा स्वीकार कर. तुझ्या जीवाची तृप्ती होईल आणि आमची फळे अधिक पिकतील, घे–"

पण ती पपई उचलून त्याने नोकराबरोबर बाजारात विकायला पाठवून दिली. पुढे गेला. संत्र्याची झाडे पाचू आणि सोन्याच्या रंगाच्या फळांनी जणू मढलेली होती. वारा आला. सुगंध पसरवून गेला. झाडापासून संकेत घेऊन त्याने सुंदर, पिकलेली संत्री खाली टाकली. केळवनातील सुंदर पिकून फुटलेले केळ्याचे घडही शेतकऱ्याला सांगते झाले की, " हे तुझ्यासाठी आहे. इतरांना पुष्कळ मिळालेले आहे. आता तुझाच वाटा राहिला आहे. यांतले काही तरी तुझ्या अंगी लागू दे. "

पण लवलेल्या पानांची नम्र प्रार्थनाही त्याने ऐकली नाही सर्व फळे उचलून बाजारात पाठविली. फळांची तोंडे खर्रकन् उतरली. झाडे खिन्न झाली. त्यांनी माना टाकल्या. पाने खाली गळाली.

पुनः पैसा साठला. पुनः शेत घेतले, जमिनीचे पट्ट्याच्या पट्टे, चादरीच्या चादरी. त्याच्या कष्टाची फळे इतर सर्वांना मिळाली. त्याच्या मात्र कोणत्याही कार्यक्रमात—

बदल झाला नाही. मातीच्या खापरातील कोरडी भाकरच नित्याची त्याच्या पोटात जात होती. त्याचा अंतरात्मा त्याला शक्ती देत होता, शरीराचे व्यापार त्याच्या इच्छेप्रमाणे करू देत होता. जे जे तो करील त्यात यशही मिळत होते. त्याने मात्र अंतरात्म्याला काहीच दिले नव्हते. त्याच्या घरी तेलातुपाच्या घागरी भरल्या जात होत्या; पण ज्या अन्नाला पूर्णब्रह्म म्हटलेले आहे त्याची अंतरात्म्याला पडणारी आहुती कोरडीच पडत होती.

इतके असूनही आजवर अंतरात्मा—त्याचा जीव—सर्व काही सहनच करीत गेला. आपल्यातील स्नेहाने शेतकऱ्याचे शरीर तो टिकवीतच गेला. शेतकऱ्याला आज वाटेल, उद्या बुद्धी होईल, अशी वाट पाहत तो दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस करीत होता.

मधून मधून मात्र त्या जीवाला वाटे, "आत्मपीडन हे असुरांचे काम. हा सर्व कृती माणसासारखी करतो. सर्व सद्‌गुण याच्यात आहेत. भुकेलेल्याला हा भाकर देतो. चुकलेल्याला कठोर बोलत नाही. इतरांच्या कमावलेल्या चिजेला कधी स्पर्श करीत नाही. देवाचे नाव घेतल्याशिवाय अंथरुणाला पाठ लावीत नाही. कधी खोटे बोलत नाही. उणे-दुणे तोंडावाटे काढीत नाही. कोणाच्या अध्यात नाही, मध्यात नाही. आचारविचार सर्व मानवासारखे आहेत. आणि तरीही हे देहधातूचे शोषण याच्या हातून का व कसे घडते? ही सवय याला का व कशी लागली? हा असेच करीत राहिला तर जगण्याचा हक्क तरी याला का मिळत राहावा? याच्या अतिश्रमांनी इतरांचे श्रम वाचतील. अन्न उत्पन्न करायला इतरांना कष्ट करावे लागणार नाहीत. ते ऐतखाऊ आणि आळशी बनतील. हळूहळू तसे बनण्याचा त्यांचा हक्क ते शाबीत करू लागतील. असा हक्क सांगणाऱ्यांची एक जातच बनेल. आणि कष्टात खर्च न झालेली आपली सर्व शक्ती ते असली परपुष्ट जीवन राहणी सतत टिकविण्याचा खटाटोप करण्यात खर्च करतील. हा शेतकरी कष्टच करीत राहील. आज त्याच्याजवळ सर्व आहे. उद्या तेही राहणार नाही. आज ही कोरडी भाकर तरी आहे. उद्या ही देखील त्याला मागूनच खावी लागेल. एक वेळ गुरे सुखात राहतील; कुत्र्या-मांजरांना दूधतूप मिळेल, पोपट-मैनांना मेवामिठाई चारली जाईल; परंतु हा मात्र कष्टाचा, केवळ कष्टाचाच धनी होऊन बसेल...

"छे, छे, याला जगू देण्यात याचेच नुकसान आहे, हा रोज आत्महत्या करतो तीच योग्य. याचे पोषण होऊ देण्यात अर्थ नाही. याच्या मृत्यूत याचे आणि याच्या जातीचे कल्याण आहे....."

जीवाचा अखेर निश्चय झाला. जीवाने शिवाला जाऊन सांगितले. शिव म्हणजे संहाराची शक्ती. कल्याणास्तव संहार करणारा तो महादेवजी! शिवाने जीवाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि 'तथास्तु' म्हणणार तोच.....

जगन्मातेने तो शब्द तोंडातून निघू दिला नाही. ती म्हणजे जगाचे धारण करणारी, चुकल्यामाकल्यांना संभाळून नेणारी. ती शिक्षा करील पण आईच्या हाताने. ती वाईट इच्छील पण मातेच्या हृदयाने. म्हणूनच ती जगन्माऊली—

शिवाला संहाराची काळजी लागली. जगदंबेला उद्धाराची !

इकडे काय झाले ? महाशिवरात्रीचे नवरात्र आले. शंकराची मंगलमय आराधना करण्याची पर्वणी आली. शंकराच्या दर्शनाला मेळे निघाले. दऱ्याकपारीतून, रानाडोंगरातून—' हर बोल, हर हर महादेऽऽव ' चा निनाद उठला. अत्यंत बिकट अशा रानाच्या मध्यभागी ध्यानस्थ बसलेल्या शिवाचे दर्शन घेण्यासाठी भक्तजन निघाले. रस्ते कठीण होते, काट्यागोट्यांनी भरलेले होते. कोस कोस भर पाण्याचा पत्ता नव्हता. डोळ्यांना सर्व विपरीत दिसत होते. पण भक्तीच्या डोळ्यांना सर्वत्र मंगलाचा साक्षात्कार होता. ठिकाण निर्जळ असायचे पण—

" महादेवी जातां घोटा घोटा पाणी
बैल लागले पोहणी हर बोला... "

असा चमत्कार शिवाच्या दर्शनास जाणाऱ्यांना भासायचा. तिथे दगड-धोंड्या-शिवाय काहीसुद्धा दिसू नये पण–

" महादेवी जाता सोन्याचे गंगाळ
त्यांत सांबाची अंघोळ हर बोला... "

होत असल्याचा प्रत्यय यावा. भक्तांचा सोहळा अशा थाटाने निघाला होता की जणू त्या उजाड नि दुर्गम वाटा समृद्धीचे राजरस्ते बनलेल्या होत्या.

नवरात्राच्या दुसऱ्या दिवशी शेतकऱ्याच्या दाराशी अगदी सकाळी एक यात्रेकरू येऊन उभा राहिला. नाजूक देहयष्टी, नितळ रंग, सात्त्विक चेहरा, कपाळी कुंकवाचा पट्टा लावलेला आहे. हाती त्रिशुळ आहे. मुखी शंकराचे नाव आहे.

शेतकऱ्याच्या कानावर नामजप पडला. त्याने यात्रेकरूला आदराने बोलाविले. बसविले. यात्रेकरू म्हणाला, "भल्या माणसा, जीवाचे सार्थक करण्याची वेळ आली आहे. शंकराच्या दर्शनासाठी 'पोहा' निघालेला आहे. आपली कामे रोजचीच आहेत. ती साधता येतील; पर्वणी मात्र साधली जाणार नाही. चल, ऊठ, दर्शनाला जाऊ. महादेवाचा प्रसाद घेऊ. जन्माला आल्याचे सार्थक करू. देह आणि मन कारणी लागेल."

यात्रेकरूच्या दृष्टीत जणू दूध भरले होते. बोलण्यात अमृत होते. स्पर्शात जणू आईचा साक्षात्कार होत होता. मृगाचे ढग येऊन मन प्रसन्न व्हावे तसे काहीसे शेतकऱ्याला झाले होते. जन्मोजन्मीचे त्याचे शुभसंचित जणू जागे झाले आणि शेतकरी यात्रेच्या तयारीला लागला.

तथापि त्याच्या 'जीवाला' चुटपूट लागली. तो विचार करू लागला की शेतकऱ्याचे जर असे कल्याण झाले तर यात शुभ नाही. याची जीवनराहणी त्यामुळे आदर्श होऊन बसेल आणि इतरांच्या आळसालाही भले स्वरूप येईल. तसे होता कामा नये. अगदी नये !

शेतकऱ्याची तयारी झाली. यात्रेकरू निघाले. मजल दरमजल रस्ता जवळ येऊ लागला. काटेगोटे भासले नाहीत. संकटे जाणवली नाहीत.

चवथा दिवस उजाडला. वाट चालून चालून शेतकरी थकला. दोघेही प्रवासी एका विशाल वृक्षाच्या सघन छायेखाली आश्रयाला आले. दोघांनी आपापल्या शिदोऱ्या सोडल्या. शेतकऱ्याने कोरडी भाकर पाण्याबरोबर ढकलली आणि ते झोपले.

पहाट फुटली, पाखरे जागी झाली. प्रकाशाचे किरण सर्वत्र पसरले. पण शेतकरी जागा झाला नाही. त्याचा साथीदार त्याला हाक मारू लागला--

" बाबारे, ऊठ, पुष्कळ दूर जायचे आहे. वाट पुष्कळ संपवायची आहे. चल."

शेतकरी उठला नाही. कसलीही हालचाल नाही.

साथीदाराने पुनः हाक मारली, " शेतकऱ्या, ऊठ. शिवरात्रीला शंकराचे दर्शन घ्यायचे आहे. झोपायला वेळ नाही. "

शेतकरी उठला नाही. कसलीही हालचाल नाही.

साथीदाराने पुनः हाक मारली, " मित्रा, आज तुला काय झाले ? तुला सुखरूप तुझ्या घरी पोहचविण्याचे मी तुझ्या घरधनिणीला कबूल केले आहे. पतिव्रतेला सौभाग्याचा आशीर्वाद दिलेला आहे. माझा शब्द माझ्या प्राणापेक्षा मी नेहमीच जास्त मानला आहे. ऊठ. "

शेतकरी जागा झाला नाही. बोलला नाही. कसलीही हालचाल नाही.

पण हालचाल वर वृक्षावर झाली. झाडाच्या फांद्या हालल्या. झाडावरून शब्द आले-" हे प्रवाशा, तू शेतकऱ्याची वाट पाहू नकोस. तुला वेळ होईल. तू दर्शनाला निघून जा. शेतकरी उठायचा नाही. "

प्रवाशाने वर पाहिले. आकृती दिसेना. शब्द येत होता. फांद्या हालत होत्या. त्याने विचारले.

" तू कोण आहेस ? "

" मी ? मी शेतकऱ्याचा जीव. मी त्याच्या देहाला सोडून शिवाकडे जातो आहे. देह आता इथेच पडून राहील. तू आपल्या प्रवासाला लाग. "

" तसे होणार नाही. शिवाचे नवरात्र आहे. त्याचा प्राण जाणे शक्य नाही. तरी तू याच्या देहाचा त्याग का केलास ? याने काय अपराध केला ? "

" याने अनंत अपराध केलेले आहेत. आणि म्हणून याचे कल्याण झालेले जगाला दिसता कामा नये. "

" याने कोणते अपराध केले ? गाय मारली ? "

" नाही. "

" ब्रह्महत्या केली ? "

" नाही. "

" परस्त्रीच्या ठिकाणी वासना धरली ? "

" नाही. "

" मग याने महान अपराध तो काय केला ? "

" हा राबला. नुसताच राबला. जनावरापेक्षा याने जास्त कष्ट केले आणि माझी गांजणूक केली. "

" म्हणजे ? "

" याला हा सुंदर, दुर्लभ असा मानवदेह मिळाला. मी यात राहिलो, पण याने मला कधी नीट खाऊ पिऊ घातले नाही. सतत गांजले. कष्ट करायला सुरवात केली तेव्हापासून याने काल खाल्ली तशी कोरडी भाकरच मला चारली. मी प्रत्येक बाबतीत याला यश दिले. पण याने मला कधी तृप्त केले नाही. म्हणून याला जगू द्यायचे नाही. यात त्याच्या जातीचे कल्याण आहे. सबब हे प्रवाशा, तू इथून जा. आणि शंकराचे दर्शन घे. तुझा प्रवास सुखाचा होईल. "

" जीवा, तू ईश्वराचा अंश आहेस. तुला मी वंदन करतो. आणि विनवून तुझी करुणा भाकतो. मी शंकराच्या दर्शनाला जात आहे. एक शब्दही अनाठायी बोलणार नाही. शेतकऱ्याच्या पत्नीला मी सौभाग्याचा आशीर्वाद दिलेला आहे. आणि त्याला सुखरूप घरी पोचविण्याचे वचन दिले आहे. ते वचन प्राण असेपर्यंत मी पाळीन. तुला शेतकऱ्याच्या शरीरात प्रवेश करावयाचा नसेल तर माझेही प्राण घेऊन जा. मी इथून जाणे शक्य नाही. "

" ते कसे शक्य आहे ? असुरांनी देखील मला इतके छळले नसते. "

" आता यापुढे तसे होणार नाही याची काळजी मी घेतो. महादेवजींची शपथ आहे. शिवाय याचा काळ आला नाही. भक्ताचा संहार देव करीत नाही. साध्वीच्या सौभाग्याकरिता तरी तू पुनः या देहात प्रवेश कर.

" याने माझी गांजणूक करता कामा नये. "

" कबूल. "

" याने मला अतृप्त ठेवता कामा नये. "

" कबूल. "

" याने आपल्या कष्टांच्या फळाचा योग्य वाटा स्वतःसाठी ठेवायला हवा. "

" हेही कबूल ! हे प्रभूच्या अंशा ! तू फक्त एकदाच याच्या देहात प्रवेश कर. "

"तथास्तु" असा शब्द उमटला व इकडे शेतकरी झाडाखाली खडबडून जागा झाला !

"मित्रा, किती उशीर झाला. निघाले पाहिजे."

"होय, चला. तुझ्याचमुळे झाला उशीर. आजपासून आपल्याला उपवास. तो आता एकदम मुक्कामीच सुटेल."

"चला ! हर बोला हर हर महादेऽऽव."

प्रवाशाने जे घडले ते शेतकऱ्याला सांगितले. जंगलाची कठीण वाट संपत आली. हातापायाचा थकवा नाहीसा झाला. काट्यागोट्यांनी झालेल्या जखमा बऱ्या झाल्या. मन हरखले. पाखरांची गायकी सुरू झाली. वाऱ्याने आपली गती सुखद अशी केली. फुलांचा सुगंध दरवळला. झाडावर फळांचे घोस दिसू लागले. फुलांचा पाऊस पडू लागला. तरुपर्णे शिवाशिवीचा खेळ खेळू लागली. असे वाटले, सर्वत्र मंगल, सर्वत्र कल्याण व्यापून राहिले आहे. कारण शंकरजीचे देवालय जवळजवळ येऊ लागले होते.

भक्तांचा जयघोष कानी आला. मंदिराच्या पायऱ्या भक्तांच्या देहाच्या पायघड्यांनी आच्छादित झाल्या. सर्वत्र नामाचा गजर--"हर बोला हर हर महादेऽऽव."

शंकरजीचे दर्शन झाले, शेतकऱ्याने शिवाच्या मूर्तीला घट्ट कवटाळून धरले. अंतःकरण उजळले. तम गेला आणि प्रकाश आला. सत्त्व जागले.

पारण्याचा दिवस आला. आत्मारामाची तृप्ती करावयाची. यथासांग नैवेद्य शंकरजीला अर्पण करावयाचा. शेतकरी घरी पोचला. शेतकऱ्याच्या पत्नीने त्याच्या व यात्रेकरूच्या पायाची धूळ आपल्या माथी लावली.

"बाई, आज पारणे सुटावयाचे आहे. जे जे अनुकूल असेल त्याचा उपयोग करून पाकसिद्धी करा. आज तुमच्या पतीचा अनेक वर्षांपासूनचा उपवास सुटावयाचा आहे. त्याच्या हृदयात ईश्वराने प्रवेश केलेला आहे. ईश्वराची तृप्ती होण्यालायक जे जे अर्पण करायला असेल ते ते आणा."

"करत्ये. सर्व पाकसिद्धी करत्ये. आज तुमच्या रूपाने माझ्या घरी जगदंबा आली आहे."

पारण्याचा तो थाट ! गाईंनी भराभर दूध दिले. बागेतील झाडांनी मधुर रसदार फळे दिली. पंचपक्वान्नांची सिद्धता झाली. नैवेद्य वाढला गेला.

शंकराला नैवेद्य अर्पण करून शेतकऱ्याने षड्रसयुक्त भोजन केले. आपल्या कष्टाच्या फळांचा योग्य वाटा घेण्याची त्याने शपथ घेतली.

सर्वत्र तृप्तीची, साफल्याची मंगल भावना पसरली !

अंतरात्मा शांत झाला !

आमची गोष्ट सरो ! तुमचे आमचे पोट भरो !

२३।२।४६

८९

पराभव

गेल्या सबंध कृष्णपक्षातील ही जागरणे. वॉर्डरने माझ्या कोठडीवरून किती फेऱ्या घातल्या, त्याचे बूट कितीदा वाजले, त्याच्या घशाला कोरड पडून तो कितीदा खाकरला हेही मला सांगता येऊ शकेल इतक्या आलोचन रात्री मी काढल्या. डोळे थकले पण मिटले नाहीत, शरीर शिणले पण विसावले नाही. आजवरचा अभ्यास, संयम सर्व निरुपयोगी ठरले.

हा असा पराभव कबूल करायचा ? आजवर मोजून पावले टाकली, निश्चायने, धडाडीने, हिंमतीने पुढे झालो. इतरांनी माझ्याकडून दिलासा घ्यावा आणि मला आज बेदिल वाटावे. माझ्या मार्गावर इतरांनी डोळे मिटून पुढे चालावे व माझा मार्ग मला अंधारून आल्यासारखा वाटावा.

आणि आज तरी काय ! बाहेर सर्वत्र माझ्या यशाचा डिंडिम वाजत आहे. धैर्याचे सर्वत्र पोवाडे गायिले जात आहेत. या तुरुंगातील चारशे राजबंद्यांपैकी एकाचेही माझ्यावाचून पान हालत नाही. नवा मनसुबा मी करीन, नवे डाव टाकीन तेही मीच !

दोन हजार कैद्यांच्या जीवनराहणीवर तात्पुरते का होईना पण स्वामित्व गाजविणारा तुरुंगाचा अधिकारी विडा उचलून आला होता, मला नामोहरम करीन, भीतीने, दराऱ्याने अर्धमेला करीन म्हणून ! जेवढी शस्त्रे त्याला उपलब्ध होती तेवढी सर्व माझ्यावर फेकली. माझ्या अंगावर घोंगडी टाकून सदंड अशा आठ वॉर्डरांकडून त्याने माझी "कंबल--परेड" करविली; माझ्या सेलमध्ये पाच पाच काळे विंचू सोडले; माझ्या गात्रांना विसावा मिळू नये म्हणून दंडाबेडी दिली. गुप्त भागी मर्मावर मार दिला, शरीराची शुद्ध नाहीशी होईपर्यंत एका जागेवर खिळून ठेवले आणि या सर्व छळाची कुठे नोंद न करता तो सर्व करू शकला इतकी सत्ता त्याच्या ठायी केंद्रित झाली होती. त्याचा उद्देश प्रामाणिक होता--मी नमावे, मी हरावे, त्याला मोठे मानावे. हा तुरुंग आहे, हॉस्टेल नव्हे, एवढीच फक्त कबुली द्यावी. त्याच्या दृष्टीने ती अगदी साधी गोष्ट होती. राजबंदी हसत ते त्याला सहन होईना. ते विजयाची गाणी म्हणत व त्याच्या कपाळात तिडीक उठे. आम्ही कसे हसू शकतो, आमच्या प्राणज्योतींना कुठून स्नेहाचा पुरवठा होतो याची चौकशी करण्याचे त्याला कारण नव्हते. तिथवर त्याची पोच नव्हती. सरळ धोपटमार्गाने त्याने छळ सुरू केला. मी सर्वांचा म्होरक्या म्हणून प्रसादपुष्पांजलीचा वाटा प्रथम माझ्याकडे आणि तोही भरपूर.

पण परिणाम ? जो ईश्वराने निर्मिला तो यांच्याने कसा नाहीसा होणार ? अन्नपाणी, जीवित एक नव्हे, दोन नव्हे, चार आणि तीस दिवस मला त्याने विष केले, पण नियमित वेळी जेलची शिस्त म्हणून माझे वजन घ्यायला आलेला तुरुंगाचा डॉक्टर नोंद करून गेला. " वजन एक औंसही कमी झाले नाही, " त्याने माझ्या तिकिटावर लिहिले, प्रकृती अगदी निकोप आहे. " तुरुंगाला भेट देणारे बाहेरचे सुखवस्तू प्रतिष्ठित आले आणि त्यांनी बाहेर बातमी नेली, " प्रबोधचंद्राच्या चेहऱ्यावरील हास्य पूर्ववत आहे, त्याच्या मुखावरची दीप्ती कमी झाली नाही, विनोदबुद्धी कायम आहे. काळ्या मातीतल्या गुलाबाच्या ताटव्याने गेंदेदार फुले द्यावी, बालकाने ज्या उत्साहाने, वेफिकिरीने बाह्य जग न्याहाळावे, सायंकाळी रानातून चरून आलेल्या गाईच्या पाडसाने कानांत वारा भरून उनाडणे सुरू करावे, त्याप्रमाणे प्रबोधचंद्राच्या शारीरिक आणि मानसिक क्रिया उमेदीने, उत्साहाने सुरू आहेत. "

वृत्तपत्रांनी छापले. जनतेने वाचले. कित्येकांनी त्या दिवशी गोडधोडही करून खाल्ले असेल !

इकडे अधिकाऱ्याने आपला विडा खाली ठेवला. घशातील अवंढा गिळला आणि मुठीत नाक धरून माझ्याशी सामोपचार केला. व्यवस्थापक म्हणून त्याची नालायकी शाबीत झाली व त्याच्या जागी दुसरा मोठा अधिकारी पाठविला गेला. तुरुंगाचा संबंध नसलेला, मन, बुद्धी, समर्थ, निरोगी असलेला.

माझ्या समदुःखीयांनी टाळ्या वाजविलेल्या मला त्या वेळी माझ्या कोठडीत ऐकू आल्या होत्या. पाय पडेल तेथे फुले फुलावी, दृष्टी पडेल तेथे मांगल्य, यश दिसावे, शब्द पोचेल तेथे आवेश चढावा--केवढा विजय, केवढा उन्माद !

आणि याच विजयी वीराने घालविलेली कालची परवाची रात्र ! अहंकार नको नको म्हणत असताना मनाने कबूल केलेला पराजय ! " ती अहंता गळाली ", " तो आत्मविश्वास गेला ", " ते दैन्य कपाळी आले. "

मग काय ? मला जगता आले नाही असे म्हणावयाचे ? मी जगलो, इतरांना जगविले ही केवळ फुशारकीच म्हणावयाची ? इथे या चार भिंतींच्या आतील आवारातही माझे जगण्या जगविण्याचे उद्योग मी सोडले नव्हते. माझ्या कोठडीच्या समोर कुठून तरी बी पडून उगवलेला तो ज्वारीचा रोपा ! ऑगस्टात मी आलो त्या-वेळी त्याचे देठ पोवळ्यासारखे लाल होते. पोपटासारख्या नाजूक त्याच्या पानोळ्या होत्या. तासातासाने, दिवसा दिवसाने तो वाढत होता. ९ सप्टेंबर आला, रोप मोठे झाले. पानोळ्या लहरू लागल्या. मला जेव्हा जेव्हा कोठडीतून बाहेर काढले गेले तेव्हा तेव्हा माझ्या भांड्यातले पाणी मी त्याला घातले; त्याच्या भोवतालची जागा स्वच्छ केली; त्याच्या पानोळ्यांवर हात फिरवून सुख अनुभविले. वॉर्डरला सांगितले याला उपटू नकोस. त्याला पोटरी पडेल, कणीस येईल. तू शेतकऱ्यांच्या देशाचा

रहिवासी आहेस. अर्धवट रोप उपटून कृषिदेवतेचा शाप घेऊ नकोस. त्याने तुरुंगाची शिस्त तेवढ्यापुरती संभाळून त्याला जगू दिले होते. ऑक्टोबर आला, रोपा माझ्या-पेक्षाही उंच झाला. मातेचे वात्सल्य, सुहृदांचा सहवास, सवंगड्यांचे क्रीडानर्तन अशा थाटात त्याची जीवनयात्रा भराने, उमेदीने चालली होती. तो ढगाशी बोले, वाऱ्या-बरोबर निरोप पाठवी. तिथल्या एका चिमणीच्या जोडप्याला त्याने आमंत्रण देऊन ठेवले होते की पुढील महिन्यात माझ्या घरी मेजवानीला या. दुधासारखे मधुर मोती-दाणे खाऊ घालीन. या सस्यश्यामल देशाचे निर्मल जल, मलयजशीतल असा पुण्यसरितावरून येणारा मधुर वारा, फळांना पिकवून त्यात गोडी भरणारे ऊन-! आणि त्याला पोटरी फुटली, नंतर कणीस आले. मिटलेल्या नाजूकनाजूक शिंपल्या एकत्र होऊन आकारून आल्या. अगदी मिटलेल्या--ईश्वराची आज्ञा झाल्यावाचून अंतरंगातले मोती दाखवायचे नाहीत असे नम्रपणे हसून सुचविणाऱ्या, " आज उद्या विश्वंभराच्या दरबारातून वारा निरोप आणील आणि मग तुम्ही या. चिऊताई येईल, चिमणेदादा येतील ! "

असे हे मंगल दृश्य ! माझ्या जखमांवरून त्या रोप्याने हात फिरविला होता. मला बरे वाटले म्हणून कणसाचे दाणे हसले होते.

अगदी कालपरवापर्यंत म्हणजे आपले कणीस दुसऱ्याला देऊन स्वतः नामशेष होईपर्यंत मी त्याची जीवनलीला पाहिली होती. दुःखाचा लेश नाही, कसलीही उणीव नाही. परिपुष्ट, आत्मतुष्ट असे त्याचे सबंध जीवन--जलसिंचनाने, किरण-स्पर्शाने समीराच्या हिंदोळ्यांनी सुखावलेले त्याचे जीवन मी बघितले होते.

आज त्या रोप्याचा संजीवक सहवास नाहीसा झाला म्हणून ही अस्वस्थता ? माझ्या या अभागी डोळ्यांनी दुष्टांनी निवटलेल्या हजारो जीवांचे विनाश पाहिले होते, व त्या वेळी गलितगात्र होण्याऐवजी मला आवेश चढला होता.

मग ही रुखरुख का व कसली ? सुखाचे जीवन आले म्हणून ? नव्या अधिकाऱ्याने प्रसंगी कायद्याचे उल्लंघन करूनही जास्त सवलती दिल्या त्या वोचतात म्हणून ? पण जेव्हा हे शरीर गुलाबाच्या शेजेवर झोपले, कमलासारख्या नाजूक हातांनी जेव्हा ते वेष्टिले गेले तेव्हा ही टोचणी कुठे होती ! मग दुखते काय !

परवा परवा नवा अधिकारी आला. त्याच्याबद्दल आपलेपणा, सद्भाव वाळगण्याची मला गरज नव्हती. त्यानेच स्मित केले, तोच अभिवादन करता झाला. त्यानेच ही स्वतंत्र मोकळी सेल दिली. त्यानेच रोज सुवासिक फुले माझ्या खोलीत ठेवायला वॉर्डरला हूकूम दिला. माझ्या सहकाऱ्यांच्या सुखाशिवाय मला हे वर्ज्य असे म्हणताक्षणी त्यानेच त्यांनाही सवलती दिल्या. शेवटी तो म्हणाला--

" आणखी मी तुमच्यासाठी काय करू शकतो ? "

" तुमच्या हाती काय आहे करण्यासारखे ? "

" फक्त तुमची सुटका सोडून बाकी या दोन चौरस मैलांच्या आवारातील सर्व काहीही लागले तर सांगा, मी हवा तेव्हा येईन. "

मी किंचित उपहासाने हसलो.

" सुखाने, भलेपणाने मिंधे करून आमचे सत्त्वहरण करणार ? "

" शक्य तेवढे सुखात ठेवू इच्छितो. मिंधेपणाची, सत्त्वहरणाची शंकाही तुम्हांला माझ्या बाबतीत येता नये. तुमचे शंकित मनच त्यामुळे उघडे पडेल. "

" तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल मी संशय घेणार नाही. "

" पुरे आहे तेवढे मला. आणि माझ्या हाती असे आहे तरी काय ? शरीराला मानवणारे चांगले अन्न, शुद्ध ताजे पाणी, भरपूर प्रकाश व हवा, एवढ्यापुरतीच तुमची व्यवस्था मी करू शकतो. त्यात माझ्याने कसूर व्हायची नाही. "

" रागावू नका, एक विचारतो, यात उद्देश काय ? "

" उद्देश फार उच्च नाही. परदुःख दूर करून मला स्वर्ग मिळवायचा नाही. मी स्वार्थी आहे. माझ्यापुरते मी पाहतो. मला असे वाटते की मी तुम्हांला ओळखले आहे. दिव्यात तेल भरपूर आहे. आम्ही संघर्षाची आगकाडी ओढली तर तुमचा प्रकाश फाकतो आणि आमचे हात मात्र काळे होतात. मी माझ्या हाताने कधी काडी ओढणार नाही. शपथेवर सांगतो. सर्व बुद्धी तुम्ही खर्च केली तरी माझ्याकडून संघर्षाची अपेक्षा करू नका. बरे, तुमच्यासाठी दूध येईलच इतक्यात--"

तो शांतपणाने चालता झाला. कोण जिंकले आणि कोण हरले ? या विचाराने का मला काल परवापासून झोप आली नाही ? या अधिकाऱ्यापुढे माझी इतके दिवसांची साधना अपुरी पडणार ?

छे, मला काहीएक उणे पडणार नाही. सर्व काही जिथल्या तिथे आहे. फक्त माझा सहचारी रोपा नाही एवढेच. पण त्याचे निर्गमन दुःखद नाही, त्याचे जीवितकार्य संपले. त्यात कसले वाईट वाटायचे ?

तथापि नित्यनियमाप्रमाणे कंपौंडर नोंद करून गेला तेव्हा त्याने लिहिले-- " वजन कमी झाले आहे. " डॉक्टरांनी तीन तीनदा विचारले- " काय होते आहे ? काय कमी पडते ? " तुरुंगाला भेट देणाऱ्यांनी विनोद केला पण त्यांना प्रत्युत्तर मिळाले नाही.

आणि हायरे दैवा ! या अधिकाऱ्याशी बोलताना मला संकोच व्हावा ? माझी नजर खाली जावी ? माझी ?

" मी माझ्या हाताने दिव्याला आगकाडी लावणार नाही. कारण दीती तुमची फाकेल. हात माझे काळे होतील. "

काडी लावल्याशिवाय जगता येणे—जीवन ज्योत उजळणे ! भरपूर अन्न आहे. शुद्ध हवा, ताजे पाणी आहे. कल्याणतम रूप असलेल्या सूर्याचा रश्मिसमूह आहे.

ते रोज लाभेल, त्यासाठी शपथ होऊन चुकली आहे.

आणि माझे मन अधू होणार, शरीर खंगणार याचीही शपथ होऊन चुकली आहे का ?

गेले कित्येक दिवस हा अधिकारी येतो. पाणी मागितले की दूध देतो आणि माझी विषमाची मानगी वाढते.

जागरणाने शरीर कणकणते, पाय उठत नाहीत. कुणी बोलायला नाही, हुकूम चालविणारे वॉर्डर हुकुमाचे ताबेदार झाले. ज्वारीचा तो रोपा— !

आता तिथे फक्त मुळापासून वीतभर उंच असा ज्वारीच्या धांड्याचा फणाच तेवढा राहिलेला आहे. वरचा धांडा कणसाच्या भाराने मोडला व वॉर्डरने उचलूनही नेला होता. आता फक्त विदीर्ण, जमीन धरून उभा असलेला तो फणा—माझ्या रोप्याचा तो अवशेष !

इथेच चार-आठ दिवसांपूर्वी सजीव सुंदर मोत्यासारखे दाणे ओंजळीत घेऊन उभा असलेला रोपा होता. अमरपथाकडे निघालेल्या प्रवाशाच्या पूर्वपुण्याईच्या संकेताने एखाद्या देवदूताने रस्त्यावर पाथेय घेऊन उभे राहावे आणि आपले काम होताच वाट सोडावी !

पण ह्या फण्याच्या जोडावर, दोन्ही कांड्यांवर हे काय ? नवे हिरवे अंकुर ?

यांचेही पोपटी रंगाच्या नाजूक पानोळ्यांत रूपांतर होईल ?

मुलांनी घरून ठेवलेल्या नुसत्या पाण्याने, साध्या हवेने, नुसत्या प्रकाशाने हे अंकुर पालवतील ?

" वॉर्डर ? "

" जी साहेब. "

" कंपौंडरला वजनाचा काटा घेऊन बोलाव. "

" डयूटीवरच्या कैद्याला पाठवितो. "

" आणि त्याला सांग म्हणावं की माझं वजन वाढलं आहे. "

३०।३।४६

हादरा

गेल्या पंधरा दिवसांत रशीदमियाँ बाजारसडकेनेही गेल्याचे कुणी पाहिले नव्हते. त्यांची नित्याची ठिकाणे त्यांच्यावाचून सुनी होती. त्यांच्या बकऱ्या त्यांनी विकून टाकल्याचे कळले होते. हंगामाचे दिवस असून खुडणावर*ही त्यांची हाजरी लागली नव्हती. त्यांच्या नावाचा हारा † आमच्या खळ्यातून घरी येऊन पडला होता. वडील दोन-तीनदा म्हणालेही--"अरे, हा मिया गेला तरी कुठे ? खुडण नेणार नाही तर बारा महिने खाईल तरी काय ? हात थरथर कापतो आता त्याचा. डोळ्याने दिसत नाही. मशीनवर शिलाईही सरळ येत नाही."

मला येऊन काही तासच झाले होते. पाच वर्षांनी, हजारो मैलांवरून नाना देशांचा अनुभव घेऊन मी परत आलो होतो. आई दृष्टीआड होऊ देईना. मलाही बाहेर पडावेसे वाटेना.

तरी देखील सायंकाळी फिरायला म्हणून बाहेर पडलो व रशीदमियाँचे घर गाठले.

दार लोटले होते. ओसरीकडील दुकानाची खिडकीही बंद होती. मोठ्या उत्साहाने पाच वर्षांच्या गप्पा मारायला म्हणून आलो होतो. रशीदमियाँ माझ्या बाळपणीच्या, अवखळपणाच्या गोष्टी काढतील, मी नशीब काढले म्हणून माझ्यावर मनापासून स्तुतीचा वर्षाव करतील अशा अपेक्षेने मी घरून निघालो होतो. पण दार लोटलेले पाहताच मन चरकल्यावाचून राहिले नाही. म्हातारा आजारी असेल, कण्हत कुथत पडला असेल. ज्यापासून दूर आलो, पुनः तेच ! आजार, मृत्यू, रक्त, विवळणे, किंचाळणे, निराशा, खेद, उद्वेग यांनी परिपूर्ण अशा वातावरणातून मी आलो होतो आणि घरच्या आमराईत, सुखाच्या शब्दांनी, मायेच्या घासांनी शीण घालविण्यासाठी मन आसावले होते. कुणी कितीही जवळचा असो, त्याची सेवाचाकरी करण्याची इच्छाच नव्हती. जणू केले ते फार, जन्मभर पुरेल इतके. आता करण्यासारखे जणू काहीच नाही ! म्हणून मी पाऊल परत घेतले.

---

* शेतात ज्वारीचे धांडे कापून झाल्यावर त्यांची कणसे खुडून रचतात. ती चुरण्याच्या अगोदर हक्कदार, सालकरी इ. येऊन कणसे नेतात. न्हावी, धोबी, शिंपी इ. नित्यनेमाने शेतकऱ्यांच्या घरीं येणाऱ्यांना पैशाने मोबदला मिळत नाही. ते खुडणावर येऊन ज्वारी, कणसे घेऊन जातात व वर्षभर कामे करतात.

† मोठे शिंदीचे टोपले ज्यात पुष्कळ कणसे मावतील असे.

परंतु यात भीतीचा अंश होता. ती भीतीच नाहीशी करावयाचे शिक्षण मी घेत होतो. थोडेसे आपल्याशीच मला हसू आले. ते घर म्हणजे काही तोफेचा गोळा नव्हे की पोचल्याबरोबर धडाड् धूम असा आवाज होऊन आपला प्राण जाईल. घरात जरा डोकावून पाहू. ठीक असले तर आत शिरू. आजारी असला म्हातारा तर पाहू काय करावयाचे ते...असा विचार करून मी हळूच दार लोटले. उभे राहण्याचा पवित्रा असा होता की जणू आत डोकावताच आपल्याला परत फिरायचे आहे.

तथापि तो पवित्रा तसाच राहिला आणि विस्मय करीत मी थबकलो जागच्या जागी !

रशीदमियाँ आजारी नव्हते. कधी आजारी असतील अशी घराला अवकळा नव्हती. एक पांढरी चादर पसरून, मक्केकडे तोंड करून गुढगे आणि डोके जमिनीला लावून मोठ्या आवाजाने म्हातारा काहीसे म्हणत होता. आवाज गदगदलेला व म्हणून अस्पष्ट, त्यावरून म्हाताऱ्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले असावे असे अनुमान निघत होते.

थोडया वेळाने त्यांनी मान वर केली. हात छातीवर ठेवले. डोळे मिटलेलेच होते. आसवे वाहत होती आणि अगदी मक्केपर्यंत ऐकू जाईल अशा आवाजात म्हातारा आक्रंदत होता :—

" या अल्ला ! आता या दुनियेत राहण्यात मजा नाही. तुझे हुकूम पाळण्याची या लोकांनी माझ्यात ताकद ठेवली नाही. तू सांगितलेस की " तुझ्याजवळ पाणी मागायला आलेल्यांना तुझ्या तोंडचा भरलेला पेला तू दे. तुझ्या तोंडची भाकर तू भुकेल्याला दे. तुझ्या अंगचा कपडा तू गरजूला देऊन टाक. मी हे सर्व निर्माण केले आहेत. त्यांना जगव ! त्यांना जगव. "

" बिसमिल्ला हिर्राह्मा निर्रहीम ! * या खुदा ! मी सगळे करतो पण माझ्या हातचा पेला कुणी घेत नाही. माझ्या भाकरी कुणी शिवत नाही. माझे कपडे खुंटीला टांगलेलेच राहून जातात.

तेवढे शब्द काही वेळ तसेच घुटमळत राहिले आणि पुनः —

" इय्याका ना आबोदो व इय्याका नस्त्वअीन। अेॅहदे नस् सेरात्वल् मुस्त्वकीमा ! † या अल्ला ! माझी भूकतहान नाहीशी झाली आहे. दुसऱ्याला देण्याची मला इच्छा राहिलेली नाही. पंचवीस वर्षांचा शेजारी आजारी पडला, आणि मी खोटे बोललो. हे तुला कधीच सहन होणार नाही. तुला सहन न होतील अशा पुष्कळ गोष्टी माझ्या हातून यापुढे घडू शकतील.

---

* अल्लाच्या नावाने संकल्प करीत आहे, अल्ला दयाळू, कृपाळू आहे.

† " तुलाच आम्ही नमन करतो आणि तुझ्याकडूनच मदतीची अपेक्षा करतो. आम्हांला सन्मार्गी लाव. "

" या खुदा ! पागल माणसांवर तू रहमदिल ‡ होऊ नकोस. त्याला या दुनियेतून घेऊन जाण्यानेच त्यांच्यावर रहम केली जाईल. मरणाची ताकद माझ्यात नाही. म्हणून तुझ्याजवळ भीक मागत आहे. "

त्यांनी आपल्या सदऱ्याची समोरची दोन्ही टोके उचलून झोळी धरल्यासारखे केले व एक हुंदका देऊन डोळे उघडले. तोवर दार पुरते उघडून मी आत आलो होतो. रशीदमियाँचे लक्ष माझ्याकडे गेले. त्यांनी पुनः डोळे मिटले. प्रार्थना पुरी केली आणि मग माझ्याकडे पाहून मला बसण्याची खूण केली.

" कधी आलास ? "

" आज सकाळी. "

" आता तू बडा माणूस झाला आहेस ! "

" गावच्या लोकांसाठी नाही, आणि रशीदमियाँसाठी तर मुळीच नाही, तुमच्यासाठी मी तेवढाच आहे. "

" असे ? मग एक काम करशील ? "

" हो ऽ ऽ. "

" आता पळत शिवजीकडे जा. काल त्याची नवरी आली होती. त्याच्या शेतात कणसाचे चुरण मांडले आहे, शिवजी जागली जात असे, पण परवापासून त्याचा ताप हटत नाही. तापाच्या भरात सारखा बडबडतो. त्याची बायको मला मदतीला बोलवायला आली होती. म्हणत होती– ' शेतात जागली जा किंवा शिवजीजवळ बसा, मी जागली जात्ये ' –साठ वर्षांत मी कधी खोटं बोललो नाही ते काल बोललो. तसेच बोलण्याची बुद्धी झाली. तिला मी सांगितले की माझी उसण भरली आहे, माझ्याने उठणे बसणे होत नाही, मी येऊ शकत नाही. ती निघून गेली. पण माझे मन थांबत नाही काल-पासून. त्याची बिचाऱ्याची काय स्थिती असेल ! ती पोरगी मदत मागायला आली आणि मी तो हक्क पुसून टाकला. आता मला तिथे जायला तोंड नाही, तू जा लवकर. तिला विचार कसे आहे शिवजीचे ते. आज शेतावर जागली हवा असला तर रशीदमियाँची तयारी आहे म्हणावं. लवकर जा. परत आल्यावर मी मिठाई देईन. "

जाऊन परत आलो तेव्हा रशीदमियाँ आतुरतेने माझी वाट पाहत होते, त्यांना मी सांगितले की शिवजीचा ताप बरा असून त्याने तुम्हांला बोलावले आहे. फार अंधार पडण्याच्या अगोदर येऊन जा असे सांगितले आहे.

रशीदमियाँचा जीव खाली पडला. त्यांनी उठून शिवणाच्या यंत्राच्या पुडातून एक पुडी काढली आणि गुळात पाकवलेले शेंगदाणे लहान मुलासारखे खरोखरच माझ्या हातावर ठेवले.

---

‡ रहम—दया, कृपा.

"राजा, अल्ला मोठा दयाळू आहे. माझ्या मनात पाप आले म्हणून तो शिवजीच्या दिलात जाऊन बसला. आणि तिथं त्यानं मला बोलावलं. बरं, चल सांग तुझ्या हकीकती. कुठे हिंडलास ? काय काय पाहिलंस ?"

"इराकमध्ये गेलो होतो. इराण, बगदाद पाहिले. आणि मग पुढे लढाईवर गेलो आफ्रिकेत. माझ्या बरोबर रशीदबाबा, तू आला असतास तर तुला मक्केला पोचवून दिलं असतं मी."

"मुंबई पाहिलीस का रे ?"

"हो ऽ ऽ"

"काय काय आहे तिथं ?"

"तिथं ? समुद्र आहे. मोठमोठ्या हवेल्या आहेत. श्रीमंत व्यापारी आहेत. तिकडल्या गाड्या बिजलीनं चालतात. लोक मोटारीतून धावत असतात."

"बरं ! तिथं आमचा जातवाला एक माणूस दिसला की तुला ?"

"म्हणजे काय ? पुष्कळच माणसं आहेत तुझ्या जातीची तिथं ! मोठमोठ्या मशिदी पण आहेत."

"तसं नाही विचारत मी तुला. तिकडे आमचा जातवाला एक माणूस आहे. तो सांगतो म्हणे आम्हांला की आता तुम्हा लोकांबरोबर आम्ही राहू नये. त्याने आमच्यासाठी एक पाक देश मागितला आहे. तिथं आम्हा सगळ्यांना तो नेऊन ठेवणार आहे."

मला बोध होईना. रशीदमियाँ सांगतो काय आणि त्याचा माझ्याशी संबंध काय ? कशाचाच पत्ता लागेना.

"आणि काय रे ? आम्ही साठ साठ वर्ष आमची उमर इथं घालविली ती ? या खेड्यातल्या अर्ध्या लोकांच्या अंगावर मी शिवलेले कपडे आहेत. इथं लोक बिमार झाले मोठ्या मानगीनं तेव्हा मी रात्री रात्री जागून त्यांचं दवापाणी केलं. तुझ्या बापानं माझ्याकडे ताट पाठविल्यावाचून कधी सण साजरा केला नाही. आणि आता तुम्ही चार पुस्तकं शिकून मला सांगायला आला की मी निघून जाईन म्हणून ? तिकडं कुठं राहायला जाईन म्हणून ! ज्याचं नाव मी कधी ऐकलं नाही, ज्याचं तोंड मी कधी पाहिलं नाही त्याच्या सांगीनं मी निघून जाईन आणि अल्ला मला जाऊ देईल असं तुम्हांला वाटतं ? कुणी शिकवलं हे सगळं तुम्हांला ? मीच म्हातारा सापडलो का तुम्हांला आपलं ज्ञान दाखवायला ? दुसरीकडे कुठे दगड मारायला जागाच नव्हती ? मसणात जायचे आता माझे दिवस, मी आणखी कुठं जाणार ?"

त्यांच्या चेहऱ्यावर संताप, चीड आणि या सर्वांना झाकून टाकणारी असहाय्यता भरली होती. कुत्र्याच्या इमानदारीला खोट आणावी; गाईला दुष्ट

म्हणून बोल द्यावा; पतिव्रतेच्या शीलाचा संशय घ्यावा. ज्या झाडाने साठ साठ वर्षे आपली पाने, फुले, फळे वसल्या जागेहून लोकांना दिली ते झाड बज्जात, अवलक्षणी आहे असे मानावे; जो झरा निदाघार्तांना आजवर जगवीत आला, उन्हाळ्यातही ज्याची धार खंडली नाही, ज्याचे पाणी पिऊन दोन पिढ्या जगल्या त्या झऱ्यातून विष वाहते अशी आवई उठविली जावी; पाखरांना म्हणावे तुम्ही कर्कश ओरडता; वैद्याला म्हणावे तू आपपर भेद करतोस...

रशीदमियाँ कोलमडून पडल्यागत भिंतीला टेकले.

" आता बोल मी तुझ्याशी तरी कसा वागू ? तू म्हणशील आता तू खात असलेली मिठाई पण कडू आहे. काय नेम सांगावा आता तुम्हा मडंळींचा. "

मी स्तब्धच होतो. मुंबईच्या ज्या माणसाची चौकशी रशीदमियाँनी केली त्याचा बोध मला हळूहळू होऊ लागला. परंतु इतक्या कडवटपणे या म्हाताऱ्याने हे सर्व का बोलावे याचे मला कोडेच राहिले.

" तुला बंदूक चालविता येते आता, नाही ? "

" होय, तोफही डागता येते. गोळे भरभरून शेकडो वेळा मी तोफा डागल्या आहेत. "

" किती माणसं मेली तुझ्या गोळ्यांनी ? "

" कोण मोजतो ? हजारो मेली असतील. रशीदबाबा ! आता आणखी जोरदार गोळे निघाले आहेत. एक गोळा विमानातून टाकला की वीस वीस मैल त्याचा हादरा बसतो. वीस मैलांच्या टापूतील लोकांना इजा होते. "

" त्यांचे प्राण कशाला घेता ? "

" आम्ही मुद्दाम घेत नाही. "

" मग काय, ते येऊन सांगतात आमचे प्राण घ्या म्हणून ? "

" तसे नाही. शत्रूला मारायला आम्ही बॉंब टाकतो. आणि त्या टापूतील इतरही माणसं मरतात त्या तडाख्यात. "

" आपली शेतीवाडी करीत असलेलीही माणसं मरतात ? "

" होय. "

" आणि जी लोकांसाठी घरे बांधतात ती ? "

" तीही मरतात. "

" आणि जी कापड विणतात ? "

" ती देखील मरतात. जीव जनावरं पण वाचत नाहीत. "

" मग आजकाल काय, हेच सगळ्यांना शिकवितात ? "

" सर्वांना नाही. जे लढाईवर जातात त्यांच्यापैकी काहींना शिकवितात. "

" चला, तेवढे तरी बरे. हं, मग तो माणूस पाहिला का तू मुंबईचा ? "

" होय, तुम्हांला काय करायचंय त्याच्याशी ? "

" मला ? मला काय करायचं म्हणा. पण मला वाटते मी जाऊन त्याला एकदा भेटावं. "

" छट् काही तरीच. तुम्हांला उगीच कुणीतरी मर्मी वार मारल्यासारखे भलतंच सांगितलेलं दिसतं. तुम्ही म्हणता तसं काही नाही. "

" म्हणजे त्याचं नाव सांगायची तुझी इच्छा नाही म्हणेनास !

" नाही. "

" बरं, त्याला बायकामुलं आहेत का रे ? "

" बायको होती ती वारली. मुलीनं जातीबाहेर लग्न केलं व निघून गेली. "

" म्हणूनच, म्हणूनच, त्याला घरादाराचा पाश नाही. आज इथं, उद्या तिथं असं करता येतं. लोक आजारी बिजारी झाले तर याचा दिल कधी दुखतो का ? "

" माहीत नाही मला. "

" त्याच्या दारावर कुणी भिकारी गेला तर त्याला भाकर मिळते का ? "

" हेही ठाऊक नाही. रशीदबाबा, पाच वर्षं तुमच्या देशात मी नव्हतो. मला काही फारसं माहीत नाही आणि तुम्ही विचारू पण नका. मी आलो इथं तेव्हा मला कळलं की तुमचा खुडणाचा हारा घरी पडला आहे. तुम्ही आजारी असाल असं वाटून सहज आलो. हे असंच बोलणार असाल तर मी जातो. मग येईन. "

रशीदमियाँ बोलले नाहीत. मीही उठलो नाही.

" रशीदबाबा, दुसरं काही तरी बोल ना ! मशीन कशी काय चालते आजकाल ? "

" महिना झाला मशीनला हात लावला नाही. "

" ते लहान पांदरं रेशमी झबलं कुणाचं आहे ? मोठं सुंदर बेतलं गेलं आहे आणि कपडा कुठून आणला हा रेशमी ? "

" काय सांगू राजा, माझं कपाळ ! "

मी जणू पळून जाईन अशा आशंकेने त्यांनी माझे दोन्ही हात गच्च धरून ठेवले.

" ह्या झबल्यानेच सर्व घोटाळा केला. आणि शिवजीला मदत न करण्याचे पापही त्यामुळेच घडले. तुला माहीत नाही, एक दीड महिन्यापूर्वी या आपल्या खेड्यात एक नवलाची गोष्ट घडली. तेव्हाच त्या आमच्या मुंबईच्या जातवाल्याचं नाव निघालं होतं. आणि गेल्या सात वर्षांत या रशीदमियाँला कधी कुणी उपदेश केला नाही, शिव्याशाप दिले नाहीत, ते पोरासोरांनीही देऊन घेतले. तुझ्या वडिलांनी तुला सांगितलं असेलच....."

" नाही, मी त्यांच्याशी अजून फार बोललोच नाही. "

" बरं, या आपल्या गावखारी जवळ एका झोपडीत विठ्या राहत होता आंठवतो तुला ? भाडं-भुसार करून राहत असे—"

" अंहं ! "

" अंहं काय ? तुला देखील त्यानं कित्येक वेळ स्टेशनवर पोचविलं असेल. त्यानं दोन वर्ष झाली एक पाट केला होता. कुठून तरी एक खुबसुरत गोरीपान बायको आणखी होती. विहिरीवर पाण्याला गेली की लोक तिच्याकडे टक लावून पाहत. ब्राह्मणांच्या बायकाही तिच्यापुढे काही माल नव्हत्या.

" माझ्याकडे ती— बायनी—कपड्याबिपड्यांच्या निमित्ताने बरेच वेळा येई. नाडलेली, गरजेने आलेली, अशी काहीशी ती वागे. गावात एखादं नवखं माणूस यावं आणि त्याला चुकल्या चुकल्यासारखं वाटावं अशी ती राहावयाची, विठ्या तिला चांगलं ठेवीत असे.....

" पण चार-सहा महिन्यांतच ती निघून गेली. पहिले पहिले काही दिवस ती माहेरी गेली असे विठ्या सांगत असे. पण चार-दोन महिन्यांनंतर एक दिवस कुडतं शिवायला म्हणून विठ्या माझ्याकडे आला आणि त्यानं खरी हकीकत मला सांगितली. त्याची नवरी दुसऱ्या गावी कुणा जवानाकडे राहत होती. आणि विठ्यानं तिच्यापायी खर्च केलेले पाचशे रुपये व्यर्थ गेले होते. तो दुसरा जवान लढाईवर मोटार चालवीत होता, आणि आजारी पडला म्हणून काही दिवस आला होता.

विठ्या त्या वेळी मिशीवर पीळ देऊन म्हणाला होता, रशीदबाबा, मी बायनी-साठी पाचशे रुपये बरबाद केले पण ती धड नांदली नाही माझ्याशी. तिच्या हाताची पोटभर भाकर देखील खाल्ली नाही मी. तिच्याशी मनभर बोललोही नाही. तिचा दिल इथं लागला नाही. ती मोटारवाल्यापाशी राहते खरी पण एक दिवस तिला आणीन तरच नावाचा विठ्या. आणखी सांगतो—तिला जबरदस्तीनं आणणार नाही. ती आपखुशी, आपसुख चालत येईल माझ्या घरी—'

" नंतर पुढल्याच महिन्यात त्याने आपली बंडीबैल विकून टाकली आणि महिना दोन महिने गाव सोडून गेला कुठंतरी. मोठा खुशरंग माणूस होता बेटा. हाडपेर लेकाचं चांगलं मजबूत होतं. रंग तमाशा सगळं जाणतो तो. अवंदा तो नव्हता तर होळी कशी सुनी वाटली.....

" दोन महिन्यांनी विठ्या परत आला. आणि नवल असं की एक दिवस... महिनाही झाला नाही पुरा—एक दिवस जुम्माच्या दिवशी रात्री अकरा वाजता त्याची नवरी—बायनी—माझ्या घरी आली. मी जेवून नुकताच चिलीम पीत खाटेवर बसलो होतो. तिला पाहून दचकलो. तिच्या खांद्यावर एक लहान परीसारखी मुलगी होती दोन अडीच महिन्यांची. तिनं माझ्याजवळ मुलगी दिली आणि मडक्यातील दोन लोटे पाणी पहिले

पिऊन टाकलं. मी तिला क़ाही विचारण्याच्या अगोदरच तिने सांगायला सुरवात केली. 'रशीदबाबा ! या गावात हे पहिलं पाऊल तुझ्याच दारात ठेवलं. वर्षभर मी दुसऱ्याजवळ राहिल्ये. वाटलं त्याच्याजवळ जास्त सुख होईल. मोठा गोड बोलत असे तो. चांदण्यारात्री दूध पेढे खायला देई. या पोरीच्या वेळेस मला दिवस होते. आणि काय नशीब माझं, मी आपसुख त्याच्याजवळ चालत गेल्याचं फळ मला मिळालं. तो जणू मला आपली मोटारच समजला आणि माझं साजरेपण आणि जवानी विकायला मांडावयाचा विचार करू लागला. जोवर दुसरा इलाज नव्हता तोवर बाईमाणसाच्या शक्तीनं त्याच्याशी झगडत भांडत बचावून राहिल्ये मी. दिवस जा म्हटल्या जाईनात. ही पोरगी झाली तेव्हा मोठा वाखा झाला माझा. पण दोन महिन्यांपूर्वी विठ्या पुनः आला. गुपचूप येऊन भेटला. सर्व अपराध पोटात घालतो म्हणाला. तुझ्याशी चांगली नांदीन असा मीही त्याला शब्द दिला...

'पण रशीदबाबा ! ही पोरगी त्याला नको आहे. तो माझी जिम्मेदारी घ्यायला तयार आहे पण पोरीची याद कडू आहे म्हणतो. सगळं त्याला विसरता येणार नाही. हिची व्यवस्था लागली तर आम्ही गाव सोडून निघून जाऊ. काय करू या पोरीचं सांग–'

"आणि राजा, ती पोरगी माझ्या मांडीवर होती. ती मलाच बिलगली. माझी उमर, माझी ताकद, पैशाअधल्याची कमजोरी सगळं काही मी विसरलो आणि तिला सांगितलं की राहू दे पोरगी माझ्याजवळ. संभाळीन मी तिला.

"तिनं एक वेळ पोरीला पाजलं आणि दहाची नोट माझ्याजवळ दिली. मी ती फेकून तिचा कान धरला आणि दटावलं तिला की रशीदमियाँ मेल्या आईचं दूध प्यालेला नाही. अझून दहा माणसांची कमाई करण्याची धमक त्याच्या अंगात आहे.

"ती निघून गेली पोरीला ठेवून. दुसऱ्या दिवशी विठ्यानं गाव सोडला. पोरगी माझ्याजवळ राहिली. चिंधीनं मी तिला बकरीचं दूध पाजीत असे. चोवीस घंटे सारखी अंगाखांद्यावर तिला खेळवीत होतो. रात्री तिला छातीशी घेऊन झोपी जाई. एक क्षणभरसुद्धा तिला कधी विसंबलो नाही. तिच्यासाठी हे अंगडं शिवलं. सारी कलाकुसर खर्च केली. अंगडं घातलं की नर्गिसच्या फुलासारखी दिसे पोरगी. नावच तिचं मग मी नर्गिस ठेवलं. तिच्यासाठी एक पोपटही पोसला होता."...

रशीदमियाँच्या तोंडून शब्द निघत ना. अंमळ थांबताच त्यांचे डोळे भरून आले. प्रयासाने आंवढा गिळून त्यांनी पुढे सांगितले,

"नंतर चार-आठ दिवसांतच कशी कुणास ठाऊक पण ही गोष्ट इथं कळली. तुमच्या जातीची चार-दोन माणसं परगावाहून आली इथं. त्यांनी इथल्या गावकऱ्यांशी काही मनसुबा केला व विठूच्या बायकोला आणून जबरदस्तीने त्यांनी पोरगी आपल्या ताब्यात घेतली. बायनीची इच्छा नव्हती. तिला त्यांनी धाक दाखविला, दम दिला,

कायदा सांगितला. मला चार शिव्या दिल्या—"या बांडुकल्याला आपली जात वाढवायची आहे म्हणून आमच्या पोरी पोसतो. नाहीतर हिंमत काय साल्याची. ठोकला पाहिजे चांगला. पोलिसांच्या ताब्यात दिला पाहिजे."— काय नाही नाही ते बोलले. कमीन अवलादीचा, लफंगा, सर्व जे काय म्हणण्यासारखं होतं ते म्हणून घेतलं. मी त्यांचा एक शब्दही उलटविला नाही. त्यांना सांगितलं, तुम्ही पोरीला चांगलं संभाळण्याचं वचन द्या व घेऊन जा. जातबीत तुम्हीच काढता आणि मानता. हिला कोणत्या जातीच्या हवाली करणार ते सांगा व तिला जगवाल अशी तुमच्या देवाची शपथ घ्या—

"त्यांनी काही एक मानलं नाही. ठेवली आहे पोरगी तुझ्या बापाने, असे म्हणून त्यांनी माझ्या हातून नर्गिसला हिसकावून घेतली आणि निघून गेले.

"त्या रात्री त्यांनी ती पोरगी शिवजीच्या घरी ठेवली. विठूची बायको रातोरात निघून गेली होती. मी तडफडत रडत कुढत पहाटेची अजान* ऐकली. दुसऱ्या दिवशी बकरी विकून टाकली. पोपट उडवून दिला. पोरीच्या अंगावरचं ते नवं अंगडंही त्यांनी काढून फेकलं होतं ते उचलून ठेवलं. अझूनही रात्री झोप येत नाही. खुदाकसम, उशी छातीशी घेऊन झोपतो नर्गिस नर्गिस करीत.—

"तिला नेलं त्याचं वाईट वाटलं नाही मला. चार-दोन दिवसांत माझं मन ताळ्यावर आलं असतं. पण राजा, त्यांनी त्या पोरीची गती गती केली रे! तुमच्या जातीतल्या ज्या लोकांजवळ अन्न-पाणी भरपूर होतं त्यांच्याजवळ ते गेले पण त्यांनी कुणी मुलगी ठेवून घेतली नाही. मदत करतो म्हणाले. त्यांच्यासमोर जातीचा प्रश्न येऊन उभा राहिला. दुसऱ्या दिवशी त्यांनी ती मुलगी एका भिकारणीला दिली. तिच्या अंगावर पितं मूल होतं. दोघांना पुरेल इतकं भरपूर दूध तिला यावं म्हणून तिच्या खुराकीची व्यवस्था चार मंडळींनी अंगावर घेतली आणि रोज आठ आणे तिला दुधासाठी देण्याचे ठरविले. पण या अल्ला! ती भिकारीण माझ्या नर्गिसला रडत ठेवीत असे व आपल्याच मुलाला पाजी. तिला कसं समजविणार? एक दिवस मी तिला आठ आणे दिले पण त्याची तिनं दारू घेऊन पिऊन टाकली.

"पुढे तिला आठ आणेही कुणी नियमित देईना. माझं मन तुटत असे. बायनी माझ्याकडे शुक्रवारी आली होती. तिनं ज्या दिवशी नर्गिसला टाकली त्याच दिवशी खुदानं माझ्या मनात तिच्यासाठी जागा केली. माझ्या म्हाताऱ्याच्या घरात सतार आली होती. माझं एकटं आयुष्य...! राजा, तुला तर खुदानं आपल्यासारखे नेक आईबाप दिले आहेत आणि तरी तुला मी लहानपणी माझं मन रमावं म्हणून सकाळपासून संध्याकाळपर्यंत खेळवलं आहे...

माझं मन थांवेना. मी पुनः त्या शरीफ† माणसांकडे गेलो. त्यांना विनविले की

---

* पहाटेच्या नमाजाची पुकार.

† सभ्य माणूस

तुम्ही एक पैसा देऊ नका. मुलगी मला द्या. मी संभाळतो. माझे दिवस थकले आहेत. मोठी झाल्यावर तुम्ही हवे तर घेऊन जा. मी इमान करतो. पाहिजे तर माझी सही घ्या कागदावर...

" त्यांनी मात्र मला मुलगी दिली नाही. मोठी झाल्यावर तर त्यांना आणखीच पंचाईत पडली असती. चार शिव्या हासडून मला त्यांनी सांगितले, " ती अशी मेली तरी चालेल पण ती माझ्या जातीत राहून जगता कामा नये. आपली जात वाढविता आणि वर रहमदिलीच्या गोष्टी सांगता ? तुम्हांला आता वेगळी जागा पाहिजे राहायला नाही का ? त्या जागेत राहायला आता बरेच लोक लागतील. तो तुमचा मुंबईचा बापा ओरडतोच आहे. जायचे असेल तर जा नरकात कुठेही, पण असा कावा आम्ही चालू देणार नाही. खबरदार, हरामखोर—"

" मी त्यांच्या पाया पडलो. पदर पसरला पण त्यांनी काढून लावले.

" काही दिवस मी रोज त्या भिकारणीला पैसे देत असे व माझ्या देखत नर्गिसला पाजून घेत असे. तथापि हेही सुख माझ्या नशिबी नव्हते. एक दिवस ती भिकारीणच बेपत्ता झाली. या थकलेल्या पायांनी मी सतत आठ दिवस आसपासची गावे शोधली पण पत्ता लागला नाही. नर्गिस जगत असेल असे मला वाटत नाही. तिचं अंगडं पडलं आहे इथं वाऱ्यानं फडफडत. पोरगी मात्र मारली त्यांनी...

" अल्लाचे जीव जगविण्यातही आता तुमची व आमची जात यायला लागली. अनाथ अपंगांचा आसरा गेला. आणि खुदाच्या कामात खलल§ आला. आणि तुझ्यासारखी शहाणीसुरती पोरं आता तोफेचे गोळे फेकून लाखो माणसे केवळ मारायलाच शिकत आहेत. मुंबईला म्हणे बाप आहे माझा. तिथल्या गोष्टी इथं रे कशाला ? आणि माझ्या बापाने मला काही शिकविलं असेलच की नाही ?

" मला मात्र शिकायचं नाही म्हणूनच मी अल्लाला सारखा मागतो की बस्स् ! जाऊ दे मला इथून. तुमच्याकडून आता शहाणपण शिकायचं नाही मला. तुम्ही एक गोळा टाकता आणि शेकडो मैलांवर त्याचा हादरा बसतो. ज्यांनी भरणपोषणाची कामे उचलली आहेत ते मरतात आणि गोळा टाकणाऱ्याला मात्र दखल येत नाही. हे तुमचं शिक्षण आमच्या गावापर्यंत आलं आहे पण माझ्यापर्यंत त्याला मी येऊ देणार नाही. मला हादरा बसू देणार नाही. टाका किती गोळे टाकता ते. त्याच्या अगोदरच मी..... "

" चल ऊठ. शिवजीनं बोलावलं आहे मला ना ! त्याच्या शेताची आज जागली करायची आहे..."

रशीदमियाँने एका हाताने काठीचा व दुसऱ्या हाताने माझा आधार घेतला. तो साठ वर्षांचा महावृक्ष !

२।६।४६

---

§ बाधा, खंड, रोक.

तीनशे दोन

'कर नाही त्याला डर नाही' असे म्हणतात. पण काही एक न करताही आमच्या बरॅकमध्ये पाणी भरून जाणाऱ्या त्या कैद्याचा मात्र आम्हांला वचकच वाटायचा. त्याच्या कैदी होण्याला आम्ही खासच जबाबदार नव्हतो, हे एक आणि त्या ठिकाणी आमच्या जीवाला तो काही इजा करू शकत नव्हता हे दुसरे; पण भीती शेवटपर्यंत मात्र वाटत राहिलीच.

तो आलाच मुळी अशा थाटात की आल्या दिवसापासून त्याचे येणे सर्वांना जाणवले. एकतर तो अतिशय तरुण होता. वीस वर्षांचेही त्याचे पुरते वय होतेसे दिसत नव्हते. त्याची अंगकाठी अत्यंत सुडौल, पीळदार अशी होती. चित्रांमधूनही इतकी चांगली शरीराची ठेवण आम्ही पाहिली नव्हती. ग्रीकांच्या वेळचे पुतळे दिसतात तसे त्याचे शरीर दिसे. रुंद खांदे, एखाद्या भक्कम मजबूत ढालीसारखी छाती. एवढीशी जरी वस्तू हाताने इकडे तिकडे हालविली तरी दंडांत चढून येणारे गोळे. स्नायूंचा पूर्ण विकास--या सर्वांमुळे त्याच्याकडे पाहावेसेच वाटे. तीन पिपांची कावड घेऊन बरॅकमध्ये शिरायचा तोही अशा आविर्भावात की जणू सर्वांवर स्वामित्व गाजवायलाच तो आत शिरत आहे. दैन्य, लाचारी, बंदिस्त जीवनाची लाज यांचा त्याच्या ठिकाणी मागमूसही नव्हता. त्याचा निर्भीक, निडर चेहरा हाच आमच्यापैकी कित्येकांना बोचत असे. आम्ही अशी कल्पना करून बसलो होतो की, हा तुरुंगवास जो आम्ही पत्करिला तो अत्यंत अनुपम अशा ध्येयदृष्टीने प्रेरित होऊन. हा त्याग जो आम्ही केला त्यापुढे सर्वांनी अगदी दिपले पाहिजे. आम्हांला पाहताच विंचवांनीही आपली नांगी टाकायला हवी. त्यागाचा उन्माद आणि नशा आमच्यावर इतका चढला होता की, ज्या ज्या कृतीत किंवा व्यक्तीत आमच्याबद्दल मोठेपणाची भावना दिसणार नाही, ती कृती आणि व्यक्ती जगात राहायला नालायक असे आम्ही समजत असू. आम्हांला मिळणाऱ्या भाकरीत एवढासा ज्वारीचा दाणाही सापडला तरी आमच्यापैकी कित्येक अन्नसत्याग्रह करू जात. आम्हांला भाकरी खराब मिळते म्हणजे काय? वस्तुस्थिती अशी होती की, आमच्या घरच्या स्थितीला आणि संस्कृतीला ज्वारीचा दाणाच काय पण मूठभर खडेही चालू शकत होते.

सबब अशा नाजूक देशभक्तांच्या या बरॅकमध्ये या पाणीवाल्या कैद्याने यावे आणि सिंहासारखी निर्भय नजर सर्वत्र फेकावी, म्हणजे केवढी उपेक्षा आमची!

१९४२ चे दिवस होते. जी वर्तमानपत्रे वाचायला मिळत त्यांतून देशभर लूटमार, मोडतोड, जाळपोळ होत असल्याच्या बातम्या येत. इतर उद्योग नसल्याने आमच्या

इथे शब्दांचीच वादळे उठत. "गांधींनी 'करा किंवा मरा' चा संदेश दिला, लोकांना मरायचे नव्हते म्हणून त्यांनी कृती केली. आता या हिंसेची जबाबदारी टाळता येणार नाही." असे म्हणून काही प्रतिपक्षाला दूषणे लावीत. काहींचे अंतःकरण देशात घडणाऱ्या हिंसेमुळे अहिंसेसाठी तिळानेच काय पण अगदी गव्हागव्हाने तुटत होते आणि जेवणाची घंटा होईतोवर त्यांच्या वेदनांना विशेष कळा लागत असत. "जो सांगतो त्याने सर्व परिणामांची कल्पना करूनच सांगितले पाहिजे, आणि सर्व फळाची जोखीम पत्करली पहिजे," असा सर्व चर्चेचा निष्कर्ष निघत असे.

एक दिवस हा पाणीवाला कैदी आमचे भांडण अगदी लक्षपूर्वक ऐकता होता. नुकताच चहाफराळ झाल्याने आम्हांला विशेष जोम आला होता. त्या कैद्यालाही काही बोलण्याचा उमाळा मधूनमधून येतोसा दिसत होता. एक-दोनदा तो काही पुटपुटलाही. पण वेदांचा अर्थ सांगण्याचा हक्क फक्त ब्राह्मणांचा, शूद्रांचा नव्हे! काहींनी त्याची शिकायत करण्याचा धाक दाखवून त्याला पिटाळून लावले.

दुसऱ्या दिवशी मात्र तो काहीशा तयारीनेच आला. आपली कावड त्याने सर्वांच्या अगोदर आणली. उद्देश असा की, इतर कैद्यांचे येऊन पाणी भरून होईतोवर त्याला वेळ मिळावा. त्याने कावड ठेवली. वॉर्डर इतर पाणीवाल्यांच्या मागे आहे असे पाहून एक समाधानाचा सुस्कारा सोडला आणि अगदी निःसंकोच भावाने तो माझ्या बर्थवर येऊन बसला. मी वरमून त्याच्याकडे पाहतच राहिलो. माझ्याकडे न पाहता त्याने प्रथम माझ्या सर्व वस्तू न्याहाळल्या. जवळच्या खुर्चीवर माझा लंगोट वाळत होता. त्याकडे पाहत त्याने अगदी सहज विचारले:—

"काय भाऊ! जेलाच्या अगोदरपासूनच तुम्हांला कसरतीचा शौक दिसतोय. किती जोर काढता, पाचशे? चांगलं कमावलं आहे शरीर तुम्ही. उंचीही आहे तुम्हांला. जोड मात्र दिढीचा लागेल. दंगलीत खेळला तर दुप्पटीच्या जोडीदाराबरोबर कुस्ती खेळावी लागेल तुम्हांला."

काय बोलावे हे मला सुचेना. काही वेळाने जरा सावरून आणि देशभक्ती विसरून मी त्याच्याशी बोलण्याच्या अवसानात आलो.

"काय, काय म्हणालास तू?"

"काही नाही, शरीर चांगलं कमावलंय् तुम्ही. मर्दासारखे दिसता."

"आणि तुझं काय वाईट आहे रे? तुझ्यासारखी काठी तर शंभरांत एखादीच सापडेल."

"छे हो, इथं काय टिकतंय आता या सुक्या भाकरीवर?"

"तुझं नाव कायरे?

"तीनशे दोन."

"अरे, नंबर नाही, नाव?"

" या सहा महिन्यांत नावाचं कामच पडलं नाही. माझं नाव वार्लू आहे. "

" कशात आला रे ? "

" डाक्यामध्ये. "

पण हे संभाषण तितकेच राहिले; कारण वॉर्डरची नजर त्याच्यावर गेली आणि कावड घेऊन वार्लूने धूम ठोकली.

दुसऱ्या दिवशीही असाच तो आला. माझ्या शेजाऱ्याच्या ओट्याजवळील शेल्फवर विडीचा कट्टा होता. त्यातली एक विडी अगदी सहजगत्या त्याने काढली व आगपेटी घेऊन मजेत शिलगावली. कुणाला विचारण्याची त्याला आवश्यकताही वाटली नाही. चार-दोन झुरके त्याने घाईतच मारले आणि शेल्फवर ठेवलेली साबणाची वडी कुणालाही न विचारता उचलून तो चालायला लागला.

ज्याचे ज्याचे लक्ष त्याच्याकडे होते, त्या सर्वांनी अगदी निर्ढावलेला, चोर, डांबीस म्हणून त्याची संभावना केली.

तथापि त्याच्याशी कसे वागावे हे आता मला समजले होते. म्हणून दुसऱ्या दिवशी जेव्हा तो आला तेव्हा मी आपणहून त्याला जवळची सिगरेट दिली आणि म्हटले,

" अरे, वार्लू, तू परवापासून त्या लंगोटाकडे सारखा पाहतो आहेस. तुला त्याची गरज दिसते. घेऊन जा तू. "

तो माझ्याकडे पाहतच राहिला. काही वेळाने लंगोट उचलत काहीसा हसून म्हणाला, " गरज तर होती बाबू पण, तुमचं हाडपेर मजबूत पाहिलं अन् हिय्य झाला नाही उचलायचा. "

" मग त्या गृहस्थाची साबणाची वडी कशी उचललीस रे ? "

" बाबू ! ते आपलं काय करणार आहेत बिचारे ? नुसता हात धरून ठेवला तरी त्यांच्यानं सोडवून व्हायचा नाही. "

" पण अशी बिनदिक्कत वस्तू उचलण्याची काही लाज तरी ? ही चोरी टरते ना वेड्या ? "

" ठरली म्हणून काय झालं ? म्हणून चोरी थोडीच होणार ती ? अन् बाबू, बाहेर चोरी केली म्हणून इथं आलो. आता इथं चोरी केल्यानं आणखी कुठं नेतील, मसणांत ? इथंच ठेवतील. पाहिजे तर हे काम काढून घेतील व दुसरं देतील. चोरीबिरी काही नाही. आपल्याला गरज लागली, समोर वस्तू दिसली, उचलली, झालं. त्या साबणानं शेटजीचे कपडे स्वच्छ होतील आणि आमचे काय मळतील ? जाऊ द्या हो, दुसऱ्या गोष्टी काढा. तुम्ही कुस्त्यांच्या दंगलीत कधी कुणाला ' धोबी पछाड ' मारली की नाही ? ....."

त्यानंतर वॉर्डरचे लक्ष जाईपर्यंत तो असाच सारखा बोलत राहिला.

आणि मग एक दिवस तर वार्लूने आम्हा सगळ्यांना आश्चर्याचा धक्काच दिला. त्याने सरळच विचारले.

"बाबू, तुम्ही पुस्तकं वाचत असता. वाचा म्हणा, आपलं काय? अन् त्यात माझ्या कामाचं काही निघालं तर 'वेसच' झालं. नसलं तरी पण मी तुम्हांला सांगतो की, तुम्ही मला इथून सोडलं पाहिजे. अवंदाची नागपंचमी मला घरी पडली पाहिजे. तुम्ही कॉंग्रेसवाले आता लवकरच आमच्यावर राज्य करणार असं आमचा 'बॉर्डर' सांगत होता. तसं झालं तर तुम्ही मोठं माणूस व्हा आणि मला सोडून द्या. परवा तुमची वादावादी झाली अन् तुम्ही म्हणाला की, ज्यानं सांगितलं त्याच्यावर करणीचा बोल जातो. मग मी तर बिलकुल गुन्हा केला नाही. माझ्या करणीचा बोल आमच्या गावशिष्टावर जातो. तुमच्या राज्यात तुम्ही मला कैदेत ठेवलेलं माझ्या कामास येणार नाही."

"म्हणजे काय? अरे डाका तू मारलास ना?"

"हो."

"मग तू गुन्हेगार नाही कसा? चांगलं चक्क कबूलही करतोस वर..."

"कबूल करायला काय लाज आहे? त्या पाटलानं माझी खानदान काढली. माझ्या बापाला चोराचा बाप म्हटलं. मी तोंडावरच त्या पाटलाला सांगितलं की, दोन पैसे जवळ आहेत म्हणून लई गमजा करतोस; तुझे पैसेच लुटतो थांब, अन् रात्री बांधला धरून पाटलाला व लुटले पैसे लेकाचे."

तुरुंगाबाहेर असताना एखाद्या मित्रापासून त्याला बनवून चहा उकळल्यावर ज्या फुशारकीने आम्ही आपल्या कृतीचा वृत्तान्त सांगत असू तितक्या सहजपणे त्याने त्या डाक्याची गोष्ट सांगितली. आमची बरीच मंडळी चिडून गेली होती त्याच्यावर.

"पण वार्लू, पाटलावर चिडून का होईना, पण तू डाका मारलास हे खरे आहे. तूं चिडायचं नव्हतं..."

"मग काय, घरी जाऊन गूळ-खोबरं खायचं होतं? आपल्या बापजाद्यांना दिलेल्या शिव्या ऐकून घ्यायच्या? मला पोटाला नव्हतं म्हणून काही मी चोरी केली नव्हती. मला पहिली शिक्षा का झाली हे पाटलाला माहीत होतं...."

"का झाली पहिली शिक्षा तुला?"

"ते मलाही माहीत नाही बाबू! तुम्ही, माझ्या जागी असता तर तुम्हांलाही झाली असती आणि मी जे केलं तेच तुम्हीही केलं असतं. नसतं केलं तर तुमच्यात पाणी नाही असं म्हटलं असतं दुनियेनं."

"अरे, पण असं केलंस तरी काय तू?"

"आमच्या गावपंचाला विचारा. वस्तादजीही होते त्यात सामील."—वस्तादाचे नाव निघताच त्याने मनोमन नमस्कार केल्यासारखे डोळे मिटले; पण त्याचा राग

तसाच होता– "त्यांनी नागपंचमीच्या कुस्तीच्या दंगलीसाठी सावकाराच्या पोराशी माझा जोड लावला. बाबू, न्याय पाहा ! सोळा वर्षांचा होतो मी आणि सावकाराचा दौलत विसा वर्षांचा होता. वस्ताद म्हणाला–"अरे, डरतोस काय भागूबाई. तुझा बाप वाघाच्या छाताडावर लाथ मारत होता. जरा दंड बैठक, लढत जास्त कर. उद्यापासून तुला 'असली' पेच शिकवीन नवे."

"पण बाबू ! सावकाराचा दौलत म्हणजे कढीखाऊ बामण नव्हता. तो पंजात मोठा पक्का आहे. त्यांच्या वस्तादानं त्याचं कानशील रगडून रगडून पक्कं केलं होतं. पावभर जवसाचं तेल तो रोज खात होता. दुधात मुरवलेला आखा नारळाचा डोल सकाळच्या मेहनतीवर आणि पावभर तेलात भाकर कुस्करून संध्याकाळच्या मेहनतीवर तो खात असे. अन् माझ्या घरी काय होतं ? बापू जंगलातून गठ्ठा आणून विके आणि आईचं निंदण-खुरपण मोलमजुरी. मला रिकामी मेहनत करू देत हेच मोठं समजा. मग आमच्या घरी तेल कुठून येणार ? नागपंचमीला अवघा एक महिना होता आणि बाप म्हणाला, 'वाल्या, कुस्ती खाल्लीस तर लेका पोरगा म्हणणार नाही तुला माझा.'

"मी दोन-चार दिवस विचार केला. सकाळ-संध्याकाळ मेहनत. कसरत तर वाढवून बसलो होतो. शुक्रिर निघाल्यापासून आखाड्यात जात असे. पोटात आग भडकल्यासारखं होई. थंड पाणी पिऊन काय दौलतबरोबर कुस्ती जिंकणार होतो मी ? शेवटी एका वाण्याच्या दुकानात गेलो आणि जवसाच्या तेलाचा पिपाच उचलून आणला एक. चांगलं मसकून तेल खायला सुरवात केली. अंगाला मालिश होतीच. दौलतचा भाव पाहावा म्हणून त्याला एकदा चव्हाट्यावरच भर बाजारात छेडला आणि तो अंगावर आला तेव्हा पानाला चुना लावत नाही तेवढ्यात लोकांच्या समोर त्याला चीत केला चारी तक्ते. माझ्या बापानं पाठीवर थाप मारली त्या दिवशी माझ्या...

"पण काय बाबू ! आमचं कर्म खोटं होतं हो ! दुकानात पिपा चोरला म्हणून वाण्यानं पोलिसांत रपोट दिली. मी पिण्याचा भाव विचारला म्हणून माझ्यावर शक घेऊन पोलीस आला विचारायला. मी सांगितलं की, आणला पिपा उचलून. दंगलीत जिंकलो तर पैसे फेकून देईन. पण तो लेकाचा हातच धरायला लागला म्हणे. ढाण्यावर चल. मग आपण काय समजतो पोलीस बिलीस. त्यांच्यात तर दौलतच्या अर्धीही ताकद नव्हती. गोष्टीच बहू ! पाडला लेकाला टांग मारून आणि दाखवला त्याला बजरंगबलीचा हिसका."

"... पण एकाचं असं झालं म्हणून सारे पोलीस एक झाले व मला पकडून त्यांनी दिलं सहा महिने बंद करून ...

"बाबू, पंचांनी जोड लावला. तेलातुपातला दौलत कुस्तीला दिला. त्यांच्यावर नाही का काही बोल ? पण आम्ही गरीब म्हणून दिलं मला पाठवून. नागपंचमीही

होऊ दिली नाही. थांबा म्हणावं, आमचेही दिवस दाखवील्च बजरंगबली ! सांगा हो बाबू, जिम्मेदारी माझी की पंचांची ? ”

त्याचे आणि माझेही, वॉर्डर कधी येऊन उभा राहिला तिकडे लक्ष नव्हते. वार्ल्यूच्या पाठीत एक दंडुका बसला आणि “ स्वराज्यवाल्यांशी ” गोष्टी करतो म्हणून त्याला दंडाबेडी मिळाल्याचे आम्हांला दुसरे दिवशी कळले.

८।६।४६

९२

वाट बघतो आहे

उत्तम वेळी सुचलेले चांगले कथानक कोणाला नकोसे वाटेल ? पण मला ते नकोसे वाटले होते...कारण...?

कारण काय सांगणार ? कष्टाने सुगीचा माल घरी आणावा, गव्हाच्या दाण्याला जीव फुटलेल्या सोन्याची उपमा शोभावी, बाजारचे मोलही भरपूर असावे आणि एखादा घेणारा...

त्याने असे काही करून जावे की मग ती सोन्याची उपमा नको, तो गहूही नको !

मोलाचा म्हणून टाकवत नाही आणि कोणाला देववतही नाही !

चित्रपटासाठी मला एक कथानक मागण्यात आले होते. फार आनंद झाला होता त्या वेळी. कथानक निवडावयाचे ते उत्तम, सजीव शुभ मोलाचे ! असल्या प्रसंगी चांगल्या वाईटाच्या कल्पना किती तीव्र असतात !

एका रात्री मला आपोआप जाग आली. घड्याळात दोन वाजले होते. हुरहूर... काहीतरी सुचले, कोणीतरी सुचविले. लिहून काढायला भाग पाडले. त्या विलक्षण स्थितीतून मी पहाटे पाचला बाहेर आलो. हीच ती स्फूर्तीची सूचना का ?

मी लिहिले; पण यश मिळाले नाही. नशीब अबोल ठरले ! विषाद वाटला, कशाला लिहिले ? पण...

हवी असलेली वाऱ्याची झुळूक यावी, चंद्राचे किरण सुखवायला यावेत तसे ते कथानक मजकडे आले. त्याचे नशीब अबोल नाही ना ? त्याची कसूर काय ? समजा, त्याला वाचा असती, त्याला डोळे असते तर त्याचे बोलणे, बघणे माझ्याने सहन करवते का ?

मला वाटते, कथानकाला जीव असतो. त्याची कदर केली नाही तर...

कित्येक दिवसांपासून एक प्रश्न मला भंडावून सोडीत होता. छोट्या चिमण्या जगापासून तो मोठ्या कावळ्या जगापर्यंत माझा वावर आहे. छोटी छोटी पाखरां-सारखी मुले वर्गात आपल्याकडे अधीर होऊन पाहतात. त्यांना आपण सांगतो— "आज अगदी झकास निबंध लिहायचा, अगदी कोणी लिहिला नसेल असा फक्कड निबंध लिहायचा. विषय–'मी मोठेपणी कोण होणार–!' आपण प्रश्न विचारतो आणि त्याची सुबोध उत्तरे मिळतात–'मला डॉक्टर व्हायचंय्!', 'मीं लेखक होणार!' 'मी नेहरू होणार!', 'मी शिपाईच बरा!', 'मी मोटारवाला होईन', 'मी ...' अरे हो! तू, तुम्ही! असली रंगीबेरंगी उत्तरे मिळतात. मन आसावते, वाटते–होऊ दे बिचाऱ्यांना कुणीतरी, खरंच होऊ दे!

पण तो बालबोध कधी असे म्हणत नाही की मी चोर होणार, मी खुनी होईन, मला लुटारू व्हायचंय्! मग हे गुन्हे का घडतात? लक्षावधी लोक अपराधी जीवन का बरे जगतात? तसे व्हावयाचा मुळीही संकल्प नसता ते तसे का होतात? कसे होतात?

विचारवंत म्हणतात, 'भुकेमुळे पाप घडते'. धर्म म्हणतो, 'बुभुक्षितः किं न करोति पापं क्षीणा नराः निष्करुणा भवन्ति!' अतिशय दुःख, सतत जाळणारी भूक, अतिशय सुख, सतत मिळणारा आनंद; ज्यांच्या इच्छा पुरत नाहीत ते आणि ज्यांना स्वेच्छादमन करावं लागत नाही तेही—सगळ्या थरांतून, सगळ्या घर्मांतून गुन्हेगारांची जात दिसून येते.

मग अपराधाचे खरे कारण काय?

सतत प्रयत्न केल्यावर मी स्वतःला उत्तर दिले की, खरे कारण सुखदुःख, भूक, स्वेच्छादमन नव्हे. जीवनातले प्रमाण, ताल, तोल (प्रपोर्शन) गेला की अपराध होतो! अन्न चांगले, त्याला ब्रह्म म्हणतात; पण प्रमाणाबाहेर पोटात गेले तर? पाण्याला जीवन म्हणतात पण प्रमाण सुटले तर? ताल, तोल म्हणजे जीवन, तो सुटणे म्हणजे अपराध!

तीन-चार वर्षांनंतर जेव्हा हे उत्तर सजीव, साकार होऊन रात्री दोन वाजता माझ्यासमोर उभे राहिले त्या वेळी काय स्थिती झाली ते कसे सांगणार?

हेच ते आकाराला आलेले उत्तर!!

एक तरुण. प्रकृतीने निकोप. खानदानीचे रक्त नसानसांतून भरलेले. तारुण्याची अवखळ रग, मस्ती नुसती ओसंडते आहे. उमदा घोडा थयूथयू नाचतो तशी! त्यातून देखणा, सौंदर्याचा वारस जणू! तरुणाचे नाव महेंद्र!

त्याच्या तारुण्यासाठी; त्याच्या अवखळपणासाठी उपमा, दृष्टान्त धावून धावून आले होते. महेंद्राची आई म्हणजे तोलाच्या खानदानीची, इजारदारांची मुलगी. तिला स्वतःला घोडा थकविता येत होता. संपत्तीचा उपयोग व उपभोग तिच्या रूपात आणि गुणात मुरलेला.

अशा मातेचा मुलगा महेन्द्र. त्याचे सोळा वर्षांचे वय. ओठांवर काळसर लवही आली नाही आणि हा मस्त बोकडाची शिंगे धरून त्याला पालथा पाडतो; एडक्याची टक्कर हातावर पेलतो, बुजालेल्या बैलाला हाताच्या ठोशाने सरळ आणतो. अवलक्षणी घोडा देखील त्याने रिकिबीत पाय ठेवला की निमूट दहा मैलांच्या रपेटीत मान खाली घालतो.

महेन्द्राच्या सगळ्या हौशी पुरवायला त्याचा एक दूरचा मामा मदत करतो. बहिणीकडे आसरा मिळालेला हा दुर्दैवी प्राणी महेन्द्राचा दोस्त बनतो. महेन्द्राच्या वडिलांना स्वतःची इस्टेट व स्वतःचे छंद या पायी मुलाकडे बघायला उसंत नसते. आई लक्ष द्यायची, त्याच्या मामाला सांगायची – "भाऊ, तू महेनला भलभलत्या छंदांत पाडू नकोस. एखाद्या दिवशी होऊ नये ते होऊन जाईल. त्याच्या वडिलांच्या इस्टेटीला तो एकुलता एक वारस आहे. परवा त्यानं भर पुरात उडी घेतली अन् तू त्याला शाबास म्हणालास."

बहिणीच्या प्रेमाने मामा बांधला असला तरी स्पष्ट बोलायला मोकळा होता. तो उत्तर देई, "बाई, इनामदाराची लेक तू. मुलीची जात असूनही असल्या गोष्टी तुझ्या पोरवयात तू करायच्या सोडल्या नाहीस. तुझं रक्त त्याच्यात आहे. दिठावेल म्हणून बोलत नाही; पण याची ही ताकद, रग अशी जिरली नाही तर बाई, मालकाचं जे झालं तसं याचं व्हायला वेळ लागायचा नाही. म्हणून मी जे करतो तेच ठीक आहे." आई यावर काहीच बोलत नसे. महेन्द्राच्या वडिलांचा उल्लेख अशा तऱ्हेने झाल्यामुळे ती उदास होई.

महेन्द्राला वडिलांचीही मनाई नसे. त्यांना उलट असे वाटायचे की, आपल्या लहानपणी जे आपल्याला साधले नाही ते महेनला साधले पाहिजे. त्याच्या पुढे पट्टीच्या पहेलवानाने नांगी टाकली पाहिजे. वाघाला मारलेली माझी गोळी कधी चुकली नाही पण महेन्द्राने वाघिणीच्या दाढा मोजल्या पाहिजेत.

जातिवंत मराठ्यांच्या मर्दानगीत जे असू शकते ते सगळे वातावरण महेन्द्राच्या अवतीभवती होते. वडिलांचे सारे शोक मर्दानी. उंचेपुरे अंगठाण; चाळीस इंच छाताड, उमदा चेहरा. आपल्या बैलगाडीच्या जोडीला तूप कणीक घालून कशी जय्यत ठेवायची ! कासऱ्याचे चाळ वाजले की गाडी रथाच्या वेगाने निघाली पाहिजे. बैलांना इशाऱ्याचे काम नको. शेतीवाडीची, स्वारीशिकारीची मनापासून हौस. दिल दरिया, बदन चुस्त ! नांगर धरला तर बैलजोडी जेरीस यायची आणि बंदूक धरली तर श्वापदांना पळता भुई थोडी व्हायची !

अशी आई, असा बाप, असा एकुलता एक महेन्द्र आणि असा त्याचा मामा ! तालेवार, दौलतदार, खानदानीच्या विशिष्ट कल्पना असलेले आणि त्या कल्पना आकाराला आणण्याची ताकद असलेले ते कुटुंब ! बाप शेतात जागली जायला कमी

करीत नसे. धान्याची ताटे शेतात उभी आहेत, रानवारा सळसळतो आहे. पानाला पान, फांदीला फांदी चिलगते आहे. रात्रीची वेळ, माणूस झोपलेला. शिवार जागा झालेला.

हा शिवार ज्याला ज्याला हाक मारतो ते सगळेच 'ओ' देतात असे नाही. शिवारचा मोकाट वारा पिऊन धुंद झाला महेन्द्राचा बाप. खरे म्हणजे एक बायको त्याला पुरत नसे. एका बंदुकीने त्याचे काम भागत नसे. आणि खानदानी कल्पना अशी की, अंगवस्त्र असणे म्हणजे मर्दाचं लक्षण ! बागेच्या बंगल्यात ठेवणीच्या दोन बायका होत्या. जपणीच्या गाईसारख्या ताज्या तवान्या ठेवल्या जात होत्या. अर्थात् मोठ्या मालकाचा उरलेला वेळ दिवसाचा आणि रात्रीचा, बागेत जायचा. बागेतील बंगलीत काय होते अन् काय नव्हते ? हवे ते आणि नको ते—सगळेच होते ! शिवारचा पैसा तिथे वाजायचा; रानची तबियत तिथे गाजायची; शिकारीची मर्दुमकी तिथे बोलली जायची !

इकडे महेन्द्राच्या आईची दशा. मालकात तशी खोट नव्हती पण मालकाची ही करणी म्हणजे आईच्या मनात सतत बोचणारे शल्य ! नेहमी उडणारे घाव ! त्यावर औषधही नाही. घाव अशा जागी झालेले की कोणाला दाखविणेही कमीपणाचे. खाणे-पिणे, वसने लेणे सगळे होते. जे हवे होते ते मात्र नव्हते.

पण ही पडली इनामदाराची पोर. दुःखाचा बोल तोंडावाटे निघून जाईल म्हणजे काय विशाद ? आत्मक्लेशाचा शब्द मुखावाटे निघता कामा नये. हृद्रोग लागला तरी तो दिसता कामा नये. रक्ताची गुळणी उरी फुटली आहे आणि ती परत गिळावी लागत आहे, पाखरांच्या वर्मी बाण लागला आहे आणि पाखराला चोच वासायची मनाई आहे. दर दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी नोकर यायचा, अदबीने मालकिणीचे पाय शिवून निरोप सांगायचा की, मालक आज बागेत राहणार आहेत. जेवण झोप तिकडेच ! मालकीण ऐकते आहे आणि पुनः नित्यक्रम सुरू होतो आहे.

पण असा निरोप जेव्हा जेव्हा येई तेव्हा त्या मातेचे अगतिक तनमन महेन्द्रा-भोवती घुटमळायचे. ती महेन्द्राला बोलावी, त्याला रिझवी, त्याचे खाणेपिणे स्वतः करी. एका म्हशीच्या दुधावरील साय त्याच्या पोळीवर टाकी. त्याचे अंथरूण आपल्याजवळ घालून भक्ताच्या नामस्मरणाच्या उमाळ्याने महेन्द्राला कुरवाळी. नंतर मायलेक गोष्टीत दंग होत. खानदानीच्या, पूर्वजांच्या, सासर-माहेरच्या, स्वारी-शिकारीच्या, राउळा-देवळाच्या गोष्टी, देवादिकांच्या, साधुसंतांच्या गोष्टी आई सांगायची, लेक ऐकायचा. आईची दुःखाची रात्र महेन्द्राला फार सुखाची वाटायची !

जेवणरात्र टळली आहे. देवघरातील समई सोडून सगळे दिवे मालवले आहेत. देवळात घुमत असलेला अनाहत नाद ध्वनी-प्रतिध्वनीचे सूर आळवीत आहे आणि मायलेक गोष्टीत दंग आहेत.

महेन्द्राच्या डोळ्यांवर झोप फुंकर घालते आहे आणि आई सांगत आहे– "महेन्द्र, तू रे बाबा कोण होणार ? तुझ्या चहूबाजूला सगळा उमदेपणा भरला आहे. महेन्द्र, राजा, तुला राम व्हायचं आहे, अगदी खरोखरीचा राम व्हायचं आहे. रामानं राक्षस मारले, यज्ञ जगविला. राम एकवचनी होता, एकबाणी होता, एकपत्नी होता. महेन् ! जागा आहेस ना ? राम एकवचनी, एकबाणी, एकपत्नी होता. तुला तसंच व्हायचं आहे. तू तसाच होणार आहेस. तसाच...तसाच."

शब्द निघत, शब्द विरत. महेन्द्राच्या मनात स्थिर होत होत त्याच्याच बरोबर झोपून जात !

ही आईची जखम आणि हे त्या जखमेवरील औषध ! औषधाला जखमेचा मात्र पत्ता नाही !

लहान कोवळ्या वयात महेन्द्राला आईची व्यथा कळत नसे. तिच्या कढत निःश्वासांनी त्याला कुठेतरी, कसेतरी दुखल्या-खुपल्यासारखे जाणवायचे. पण हा बोध अबोधच होता !

घरात एकच मूल ! वंशाचा दिवा. तोही चांगला, उजळ, दीप्तिमान, सुलक्षणी– मायेने सर्वांना हवाहवासा वाटणारा. कुठे ठेवू नि कुठे नाही ! वडिलांचाही लाडका. मालकाच्या हौशी ज्या काही असतील त्या असतील, पण त्या सोडून माणूस मात्र लाखातला ! कुणीही त्याच्या आसऱ्याला जावे; कुणालाही पाठीशी घालून आपल्या छातीवर वार घ्यायची तयारी. बागेच्या बंगलीत त्याचा वेळ जायचा हे खरे; पण तो त्याच्या कलाने, त्याच्या मर्जीने. बाईलवेडा ज्याला म्हणतात तसली कल्पनासुद्धा मालकाच्या बाबतीत कोणी करू नये !

महेंद्र बापाचा जीवप्यार. त्यामुळे बागेत राहणाऱ्या त्या बाया त्याच्यावरही प्रेम करीत. मालक राजी राखायचा म्हणजे त्याच्या आवडत्या गोष्टींवर प्रेम केलेच पाहिजे. त्यात प्रतारणा नको, खोटेपणा नको. मर्दापुढे कुचराई चालायची नाही. आपल्याला इथे असे कोणतेच बंधन नाही की जे तोडले गेले तर देवब्राह्मण रागावतील, एवढे त्या दोघीही पक्केपणी जाणून होत्या. म्हणूनच महेन्द्राच्याबद्दल त्यांचे प्रेम अकृत्रिम होते. या बंधनामुळे मालकाला बांधले जाऊ शकते, एवढा हिशेब त्यांना कळत होता. शिवाय राजबिंडा जात्याच ओढ लावून घेणारा होता. हरणाचे पाडस कुणालाही लोभडा लावू शकते. वैऱ्यालाही क्षणभर वैरापासून विचलित करील इतके आकर्षण महेन्द्रात होते.

बागेतल्या बायका 'बंगलीवाल्या' म्हणून ओळखल्या जात. त्यांचा उल्लेख 'मोठी बंगलीवाली', 'छोटी बंगलीवाली' असा केला जाई. शेतीच्या, कास्तकारीच्या, आत बाहेरच्या सर्व गोष्टींत त्या दोघींनी आपला जीव गुंतवून टाकला होता. खऱ्या

अर्थाने हृदयात आणि पोटात घुसून त्या राहत होत्या. अंतरीची वेदना सोडली तर महेन्द्राच्या आईलाही त्या दोघींमध्ये उणीव शोधता आली नसती. मालक त्यांचा तर मालकाचे कुटुंब, संसारही त्यांचा ! तेच त्यांचे बंधन, तोच त्यांचा करार, तोच त्यांचा हिशेब ! अशा प्रकारच्या स्त्रिया कधी कधी गरती बायकांपेक्षाही संसाराला अधिक अपरिहार्य असतात. आपला मानलेल्या पुरुषाचा संसारगाडा त्या नीट रस्त्याला लावतात.

बागेतील छोटी बंगलेवाली महेन्द्राला जीव की प्यार करीत असे. तिचे नाव यशवंती. या घरात ती चार वर्षांपूर्वी आपल्या देखणेपणाच्या व यौवनाच्या उभारीवर आली होती. जवानीचा भर, सावळी सूरत, नवतीचे लावण्य, संध्याच्या बागेतले राहणे ! मृग लागला की झाडे फुलावर येत. स्वातीनंतरची कोवळी थंडी पडू लागताच फळांच्या भाराने झाडे लवून जात. चंडोल पक्षी चय् चय् करून कुणाला तरी साद घालीत, काही तरी, कसे तरी करायला इषारा देत. यशवंती अधिकच आकर्षक दिसू लागे. महेन्द्रावर तिचा जीव जडून गेला. नाते वेगळे पडले म्हणून नाहीतर... !

याच यशवंतीकडे जाण्याचा जेव्हा कधी महेन्द्रावर प्रसंग येई, तेव्हा त्याला आपल्या आईचे कढत निःश्वास आठवत. तो गुदमरून जाई. त्याचे कोवळे मन ढवळून निघे.

याच यशवंतीसाठी त्याच गावच्या एका तोलाच्या मातबर कास्तकाराने प्रयत्न केला होता. पण यशवंती त्याला बधली नव्हती. रूप, सामर्थ्य, रुबाब यांमध्ये महेन्द्राच्या बापाशी त्या दुसऱ्या कास्तकाराचा पाड नव्हता, यशवंती त्याची झाली नाही हे एक व तिने आपल्या देहाची आरती महेन्द्राच्या बापावरून ओवाळून टाकली हे दुसरे ! ठिणगीने आग लागते, इथे तर सतत दिवा जळत होता. आग पेटली मत्सराची, तूप पडले ईर्षेचे, इंधन मिळाले द्वेषाचे ! महेन्द्राच्या बापाचा अस्कारा पंचक्रोशीत गाजलेला. वैराला, सूडाला आणखी काही नको होते.

ही दोन घराणी परस्पर चुरशीने एवढ्या एवढ्याशा कारणांनी हट्टाला पेटू लागली. एकाने बैलजोडी घेतली तर दुसऱ्याने आपला आब राखण्यासाठी चढीची जोडी घेतली पाहिजे. गावात दोन पक्ष. बैलांचा पोळा दोन ठिकाणी. रंगपंचमी दोन वाड्यांत. वैऱ्याने घोडा आणला काय ? मग मला त्याहून सरस तेजी आणलाच पाहिजे. अशी कडीवर कडी चालायची. नव्हाळीचे मुजरे दोन ठिकाणी. कलावंतिणी आल्या तर दोन्ही ठिकाणी त्यांचे पैंजण वाजले पाहिजेत. उद्देश एकच, वैरी कसा खाली पाहील, कसा जेरजिकिरीस येईल !

महेन्द्राच्या बापापुढे वैऱ्याचे काहीच चालत नसे. पैसा, प्रताप, पराक्रम सर्वच बाबतीत तो थिटा पडायचा. त्यामुळे त्याच्या डोळ्यांत सूड, जिभेवर सूड, नखोनखी सूड ! त्याला वाटायचे की, माझ्या शेताने देखील वैऱ्याच्या शेताकडे सूड भावनेने

पाहावे; माझ्या धुऱ्यावरचा आंबा वाऱ्याने वैऱ्याच्या शेतात टाकला तर तो जहर व्हावा !

या वैऱ्याला महेन्द्रापेक्षा तीन वर्षांनी लहान अशी एक मुलगी असते. तिचे नाव रूपा. महेन्द्र सोळा वर्षांचा तर ती तेराची. महेन्द्र आठ वर्षांचा तर ही पाचची आणि महेन्द्र जेव्हा विशीत उतरेल तेव्हा रूपाला सतरावे भरेल ! रूपा म्हणजे नागीण, कांतिमय, नितळ ! जाईल तिथे सळसळ निर्माण करील; वळवळेल तिथे खुणा ठेवून जाईल ! गुलाबाची कळी तिच्यापुढे फिक्की ! सोनचाफ्याची कळी तोडली की कोमावते, नाहीतर रूपाने तिच्याकडे पाहिले असते ! रूपाला सतरावे लागेल तेव्हा म्हाताऱ्यानेही तिच्या श्वासाने संजीवन मिळवावे ! काहींच्या लावण्याची परीच वेगळी असते. जिकडे पाहतील तिकडे फुले सांडवतील. जातील तिथे नाग नाचवितील आणि ज्याला स्पर्श करतील त्यातून लकेरी छेडतील. रूपाची ठेवण ही अशी निरोगी, रसरशीत ! महेन्द्र तिच्याकडे पाहायचा. ती त्याच्यावर डोळा लावायची. पण क्षणभराने दोघांनाही जाणवायचे की, आपण वैऱ्यांची मुले आहोत. आपल्याला सर्वच गोष्टींची मनाई आहे. अपने लिये यह मुनासिब नहीं ! यह सब मना है । दोघांची शेते शेजारी शेजारी. त्यामुळे भेट तर व्हायची; पण बोलायचे ते डोळ्यांनी, इशाऱ्यांनी. ही इशाऱ्यांची भाषा कुठेही टिणगी पाडू शकते. शब्द तिच्यापुढे नांगी टाकतात.

रूपा रूपात येते. तारुण्य उमलू लागते. रूपाच्या बापाला तिच्या लग्नाची काळजी. पण सूडाच्या भावनेने अंध झाल्यामुळे त्याला हिताहित कळत नाही. असा माणूस घरातील कोणतीही वस्तू वैऱ्याचा निःपात करायला उपयोगी पडेल किंवा नाही याच दृष्टीने सर्वत्र पाहणार ! देवघरातील ज्योतिर्लिंग वैऱ्याला फेकून मारले तर त्याच्या डोक्याला किती इंच खोक पडेल हाच हिशेब तो करणार !

रूपाच्या बापाला वाटत असते सारखे की, आपण जे करतो ते आपल्यावरच उलटते; आपलेच हसे होते. काय करू ? कसं करू ? वैरी बधत नाही. त्याच्या काळजाला हात घातला पाहिजे, त्याचे मर्म विंधिले पाहिजे. हे मर्म कसे ? कोणते ? कसे गवसेल ? त्याची संपत्ती ? त्याची अब्रू ? त्याची यशवंती ? छट् ! हे तर वैऱ्याने स्वतः जिंकिले, कमावले आहे. ते गेले तर परत मिळवायची त्याच्यात रग आहे. छप्पन यशवंत्या त्याच्या नजरेनं फणा टाकतील. नव्हे, हे काही अचूक मर्म नव्हे !

मग काय, महेन्द्र ? होय, महेन्द्रच ? वैऱ्याचा लाडका, प्यारा, जिवाचा कलिजा, कुलदीपक म्हणजे महेन्द्रच !

हा महेन्द्र रूपाकडे पाहतो काय ? पाहू दे. या पाडाच्या आंब्यानेच वैऱ्याची वसने डागळतो ! पाहू दे. डोळे थिजतील तेव्हा त्याचे पाहणे आपोआप बंद होईल.

महेन्द्राच्या जीवावर रूपाचा बाप उठतो. पण त्याचे आडप्रयत्न सफल होत नाहीत. वीस वर्षांचा महेन् शरीराने जबर, कुस्तीशिकार जाणणारा, आईबाप, मामा व घरचा म्हातारा नोकर कादर यांच्यावाचून कोणाला न आटोपणारा ! त्यामुळे सूपभर मोती देऊन भाडोत्र्यांकरवी महेन्द्राचा खून करणं रूपाच्या बापाला जमत नाही. पण जोवर महेन्द्र आहे तोवर वैऱ्याचा उजळ माथा काळवंडणार नाही !

तो दुसरे कारस्थान रचतो. त्याच्या शेताच्या लगतच वैऱ्याचे शेत असते. त्या शेतात कास, कुंदा, हरळी माजलेली असते त्याची खणती सुरू असते. उन्हाळ्याचे दिवस. महेन्द्र एक दिवस कुदळ घेऊन येतो आणि शेताची आतडी सूर्याला दाखवितो.

इतक्यात वैऱ्याची गुरेढोरे महेन्द्राच्या शेतात शिरतात. मागोमाग रूपा येते !

रूपा आली ? आपल्या शेतात आली ? जिच्याकडे पाहता डोळे अधिकाधिक भुकावतात ती रूपा आपल्या शेतात आली ?

पण हे सगळे क्षणापुरतेच ! दुसऱ्या क्षणी गुरे अडविली जातात. महेन्द्र अडवा होतो. रूपा रागावते, म्हणते, "तू कोण माझी गुरं अडवणार ?"

"बऱ्या बोलानं शेताबाहेर ने त्यांना. नाहीतर हा इथं खड्डा खणलाच आहे. तुम्हा सर्वांवर माती लोटायला मला वेळ लागणार नाही."

"माती लोटणाऱ्याची सूरत !"

कुणाला न आटोपणाऱ्या महेन्ला पेटायला एवढे गवत पुरे असते. तो रूपाचा हात खस्कन् हिसडतो, तसाच धरून ठेवतो.

सतरा वर्षांचे रूपाचे वय. उमलती उमर. तिच्या मनात येते की, हे शिकविलेले, पढविलेले सगळे विसरून जावे; महेंद्राला असाच हात धरू द्यावा आणि जीव डोळ्यांत आणून त्याला सांगावे की, तुला माझ्या काळजाची शपथ आहे, हा माझा हात सोडू नकोस. महेंद्रा, हा माझा धरलेला हात सोडू नकोस । हे एकच खरे आहे. बाकी सगळे झूट ! महेंद्राला सांगून टाकावे की, मी तुझ्या शेतात आले तो दगा आहे. माझ्या शेतात बाबा आणि त्यांचे साथीदार यांनी दबा धरला आहे.

महेंद्रालाही असेच काहीसे वाटते. तो किंचित्काल संभ्रमित होतो, तिच्याकडे पाहत राहतो.

इतक्यात रूपाचे लक्ष तिच्या शेताकडे जाते. तिला आठवते की, आपल्याला ओरडायचे आहे. तरी ती हळूच महेन्ला इषारा देते की इथून पळ !

डोळ्याचे पाते लवते न लवते एवढ्यात हे सगळे घडून जाते. दबा धरून बसलेले बाहेर येतात. साक्षीदार उभे होतात. बलात्काराच्या, अपहरणाच्या कलमाखाली महेंद्रावर खटला भरला जातो.

वैऱ्याला बळ चढते. महेंद्राच्या बापाचे बळ जाते. खानदानीचा वारस या असल्या लाजिरवाण्या गुन्ह्याखाली धरला जातो. पंचक्रोशीत चर्चा होऊ लागते. मरण-प्राय दुःखाने महेंद्राचा बाप खचतो. पैसा, प्रतिष्ठा सगळे इरेस घालूनही काही उपयोग होत नाही. तीन महिने खटला चालतो. महेंद्राला लांब मुदतीची शिक्षा होते.

रूपाच्या बापाला असुरी समाधान होते हे खरे, पण रूपाचा सत्यानाश होतो. वैऱ्याची इज्जत गेली पण ती रूपाच्या इज्जतीला नख लावूनच !

महेन्द्राचे घर सुने होते. घराच्या लक्ष्मीला अवकळा येते. खटला चालू असतानाच महेन्द्राची आई आजारी पडते. तिला हे मानसिक क्लेश सहन होत नाहीत. ती मरते. मरताना महेन्द्राला जवळ बसवून सांगते, " महेन्द्रा, तू शुद्ध आहेस. तुझा अपराध नाही. तू विचलित होऊन हट्टाला पेटू नकोस. तुला तोल संभाळायचा आहे. स्त्रीच्या ठिकाणी डावी भावना धरू नकोस. तुला राम व्हायचं आहे. एकवचनी राम, एकबाणी राम, एकपत्नी राम. तोल जाऊ देऊं नकोस. तुझ्या करणीची फळं इतरांना भोगायला भाग पाडू नकोस. संभाळ महेन्द्र, संभाळ ! माझा आशीर्वाद आहे तुला ! " ती प्राण सोडते.

एवढे नांदते घराणे ! पण घरात राम नाही. महेन्द्र तुरुंगात; आई परलोकी, बापाचे मन उडालेले ! बंगलीतल्या बायका संकटातही एकनिष्ठ राहतात. संकट पेलून धरण्याचा आपल्या मगदुराप्रपाणे प्रयत्न करतात. सगळा नूर गेलेला, अवकळा आलेली. गुरेढोरे दीन झालेली. बाप कारभार करतो; पण मेल्या मनाने, खचल्या उमेदीने ! बंदुकीला वापर नसतो, भालेबरच्या गंजून जातात. बाप आजारी पडतो. खंगून खंगून मरतो. म्हातारा कादर घर संभाळतो.

बापाच्या मृत्यूची बातमी महेन्द्राला तुरुंगात कळते. त्याच्या मनावर वेगळाच घाव बसतो. सगळे पाश तुटल्यासारखे त्याला वाटते. आता आपल्याला कोणी नाही; जे होते ते गेले; जे आहेत ते आपले नव्हत. त्याचे मन कष्टी, अधू, निराधार बनते आणि जो महेन्द्र पूर्वी कधी इतर कैद्यांत मिसळत नव्हता तो हळूहळू त्यांच्यात मन रमवितो.

उन्हाळा येतो. या एक वर्षात महेन्द्राची दुनिया बदलते. तुरुंगात, विशेषकरून उन्हाळ्यात, बलात्काराच्या गुन्ह्याखाली अधिक कैदी येतात. असा कुणी नवा कैदी आला की, इतर कैदी त्याला तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारून बेजार करतात; विचारतात– " कशी होती रे ? बघली का रे ? शिक्षेच्या तरी मोलाची होती ना ? " त्या कोंडलेल्या वातावरणात ते प्रश्न अशा असोशीने विचारले जातात की, जणू सगळे जण आपली भूक भागवीत आहेत ! या वातावरणात महेन्द्र गुदमरतो, चिडतो, तळमळतो.

कधी कधी त्याच्या मनात विचार येतात की, हे सगळे का झाले ? माझा दोष कितपत आहे ? वैर माझ्या व रूपाच्या बापाचे; वैराला कारण यशवंती. माझ्या बापाचा तोल गेला. अपराधी मी नाही. आईही असेच म्हणाली ना ? मला फक्त राग आला होता. रागात मी रूपाचा हात धरला. पण रूपा तिथे नसती आणि तिच्या जागी एखादा नोकर असता तरीही मी त्याचा हात धरला असता, मुडदा पाडला असता त्याचा !

महेंद्राची तुरुंगातील वागणूक. चांगल्या कुळातून तो आलेला. इतरांना जरवेत ठेवण्याची कला त्याच्यात असते. तुरुंगात शिस्त ठेवायला अधिकाऱ्यांना महेंद्राचा उपयोग होई. कैद्यांनाही त्याच्याबद्दल आपलेपणा वाटे. तेथील वातावरणावर त्याची इतकी सावली असते की, तो सुटतो त्या दिवशी कैद्यांना आणि अंमलदारांनाही चुक्, चुक् वाटते. महेंद्राचे हे आकर्षण पुढेही कित्येक वेळी प्रत्ययास येते.

तुरुंगातून सुटून महेन्द्र घरी येतो आणि घराचे वासे मोजत बसतो. आईचा पायरव नाही, बापाची चाहूल नाही. कादरचे पांचरूण फाटके आणि अपुरे ! मामाची माया लंगडी– पांगळी ! महिनाभर कसा तरी तो त्या घरात तग धरतो.

त्याच्या सुटून येण्याचा अनेकांवर अनेक रीतींनी परिणाम होतो. वैऱ्याला धास्ती बसते. महेन्द्राच्या सामर्थ्याची, कुळाची त्याच्याइतकी स्पष्ट कल्पना दुसऱ्या कुणालाच नसते. वर्ष दोन वर्षांत महेंद्र सगळे सावरील, गेले ते कमावील आणि आपले होत्याचे नव्हते करील ! म्हणून पुनः एकदा नेट धरून त्याचा गुन्हा वाजविला पाहिजे. पिटविला पाहिजे. त्यात पैसा जाईल; पण जीव राहील !

वैऱ्याचा होरा असा धावतो, वारा विपरीत वाहतो. पण रूपा महेंद्राला विसरू शकत नाही. महेंद्र तुरुंगात असतानाच तिचे लग्न होते; पण ते एका अगदी सामान्य फाटक्या माणसाशी ! बदनाम झालेल्या रूपाला नावरूपाच्या घरात ठिकाणा कसा मिळणार ? कर्तव्यबुद्धीने ती संसार करते. पण उत्कटतेच्या क्षणीच तिला वाटते, या सगळ्याला कारण महेंद्रच ! ती चिडते. चिडून चिडून महेंद्रावरच प्रेम करते.

महेंद्र गावी आलेला असतो. रूपा माहेराला आलेली असते. दुपारच्या वेळी ती शेताच्या पांधणीवर महेंद्राला अडविते. त्याला सांगते–" माझ्या मनात होते काय नी झाले काय ! माझ्या काळजावर कट्यारीचे घाव पडतात, जिणे रक्ताने माखले जाते. तुझा हात कोणत्याही रीतीने माझ्या हाताला लागावा एवढ्या एकाच आशेने मी अंधळी झाले होते व बाबांच्या कटात हां भरली होती. "

आजवर बोलायला मिळाले नाही. आज ती बोलली. पण त्या बोलण्याचा महेन्द्राच्या मनावर ठसा उमटत नाही. ती त्याच्या पायावर डोके ठेवते, सांगते, " तू अन् तुझ्या आवडत्या वस्तू, तुझे आवडते छंद यांचा लळा व तोच चाळा यापुढे माझ्या नशिबी आहे. "

महेन्द्र निश्चल राहतो. अगदी निर्जीव आवाजात म्हणतो--"जाऊ दे! जे झाले, ते झाले. तुझ्या डोळ्याच्या इषाऱ्याला मी माझे काळीज दिले होते. आज ते करपून गेले आहे."

ती भेट संपते. पण तिचा परिणाम महेन्द्राची निराशा अधिक वाढण्यात होतो. तो आता वारंवार कादरला म्हणत असतो--"कादर, आता तर माझ्या जिण्यात अर्थच उरलेला नाही. मी कशाला जगू रे?"

इमानी कादर काय बोलणार? तो मालकिणीची आठवण करून देई. पण त्याची ती इमानी भाषा! इमान असे असते की, ते फक्त देऊ शकते, त्याला अपेक्षा करता येत नाही. महेन्द्राचा उबग वाढत जातो. जिणे त्याला खुपू लागते, असह्य होते. इथे राहायचे कशासाठी? आपण इथे राहिलो तर रूपाचा बाप आपल्याला सुखाने राहू द्यायचा नाही आणि पुनः मानपान, आणबान, यातच वडिलांसारखे दिवस जातील. काही अर्थ नाही इथे राहण्यात!

आणि एक दिवस!—

एक दिवस तो वडिलांच्या वेळेपासून इमानेइतबारे काम करीत असलेल्या सगळ्या नोकरांना बोलावितो आणि आपली सगळी शेतीवाडी त्यांना त्यांच्या गरजेप्रमाणे वाटून देतो. मामाची तरतूद करून देतो.

संपूर्ण भूमीचे दान नोकर डोळ्यांत पाणी आणून स्वीकारतात. थोडीशी नगदी रक्कम महेन्द्र बरोबर घेतो व सगळ्यांचा निरोप घेतो.

घर सोडताना त्याला भडभडून येते. नोकर रडत असतात. कधी नव्हे ते महेन्द्राच्या डोळ्यांतूनही पाणी येते. आजवर तो कधीच रडला नव्हता. त्या खाऱ्या पाण्याने, का तर कुणास ठाऊक, त्याला बरे वाटते. त्याला उमेद वाटते की, आपल्याला आईच्या इच्छा पूर्ण करता येतील!

मामांच्या पायांवर डोके ठेवून महेन्द्र गाव सोडतो. अगदी जड पावलांनी! कुठे जायचे? कुठे पोचायचे? गावाच्या शिवेवरचे वाघाईचे दगड! जिथवर वाघ येतो ती वाघाई! तिथून सगळ्या गावाला, त्याच्या सुखांना, त्याच्या दुःखांना नमस्कार!

पुढे जाणार हे ठरलेले; पण पाय उचलत नाही. मन माघारी येते फिरफिरून! दृष्टी पुनः पुनः गाव न्याहाळते भिरभिरून! परत परत त्याला वाटते, कुठे तरी दुरून का होईना अंधुकशी, अस्पष्टशी रूपा दिसेलच. पण नाही!

सांज होते. सांज काळवंडते. रात्र होते. रान झोपते. शिवार डुलक्या घेते. पाखरे झोपी जातात. चांदण्या-तारे दिसू लागतात. रूपा मात्र दिसत नाही.

जायचे बहू दूर! जाणार कुठे? उगीच भटकत राहतो महेन्द्र. या गावी तर त्या गावी. कुणात मिसळणार? आपण गुन्हेगार. ज्या गावात आपण जातो तिथेही कदाचित

आपल्या कलंकाचा डांगोरा पिटला गेला असेल. म्हणून सर्व दूर दचक, दडपण, संकोच !

त्याला आठवते की, तुरुंगात त्याच्या वयाचाच एक गुन्हेगार होता. महेन्द्राची व त्याची विशेष ओळख झाली होती. महेन्द्र सुटला तेव्हा सर्व कैदी सांगतात तसा त्यानेही निरोप सांगितला होता की, तू माझ्या गावी जा. घरी जा. एवढेच नव्हे तर महेन्द्राला एकटे गाठून तो म्हणाला होता, "तू जा माझ्या घरी. माझी भोळी, कोवळी, लाजरी बायको. तिला निरोप कळवायला साधन नाही. माझे वडील अशिक्षित आहेत. पण फार चांगले आहेत. तुला ते आवडतील. तू त्यांच्याशी बोलत असताना दाराआड उभी राहून माझी बायको माझ्याबद्दलच्या गोष्टी तुझ्या तोंडून ऐकेल. तुला मनोमन दुवा देईल."

महेन्द्राला त्याचा तो आसवलेला चेहरा आठवला. खोटी आळ येऊन तुरुंगात आलेला तो जीव. गेले पाहिजे त्याच्या गावाला, भेटले पाहिजे त्याच्या माणसांना. आपली मायेची माणसं नाहीत. दुसऱ्याच्या मायेने तरी पोट भरावे.

प्रवासी जीवनात तन नि मन चालतच राहते. महेन्द्र त्या गावी जातो. त्या तरुण कैद्याने स्वतःच्या घरची वर्णन केलेली स्थिती खरी असते. महेन्द्राला तेथे संकोच वाटत नाही. तो सर्व हकीकत व खुशाली कळवितो त्या मंडळींना. तुरुंगातले ते वातावरण. तो वधस्तंभ.

त्या कैद्याची ती तरुण पत्नी महेन्द्राबद्दल आपुलकी दाखविते; पण त्याच्यासमोर यायला, त्याच्याशी बोलायला लाजते. भोवरीसारखी त्याच्या भोवती भिरभिरते पण बोलत मात्र एक शब्दही नाही. त्याला मोठी गंमत वाटते. निरागस, अनिर्वचनीय अशा आनंदाचा अनुभव त्याला येतो. तेथे त्याचा जीव रमतो. त्यांच्या सुखदुःखांत तो सामील होतो. घरकाम, बैलांचे चारापाणी, लाकडे फोडणे, इ. सगळी कामे हौसेने, उमेदीने, निरपेक्षपणे तो करतो.

पण– ! जायचे बहू दूर !

पंधरा-वीस दिवसांनी जायच्या गोष्टी काढतो. दिवस निघावेसे वाटत नाही. तो आपले दुःख मित्राच्या वडिलांना सांगतो. तो ते गाव सोडतो.

दुसऱ्या गावाला पोचताच सायंकाळ होते. गोडधोड खाऊन निघालेला महेन्द्र तहानेने व्याकुळ होतो. मित्राची आई त्याला म्हणते की, तांब्या-दोरी बरोबर असू दे. मित्राची बायको त्याच्यासमोर त्या वस्तू आणून देखील ठेवते. तो नेत नाही. आणि आता ही तहान !

फार तहान लागली आहे महेन्द्राला !

दुसऱ्या गावाच्या आमराईतून सांजवेळी जात असता त्याला विहीर दिसते. तो पाणवठ्याला जातो. पण दोर-बादली दिसत नाही. तो थकून तिथेच बसतो. कोणीतरी सायंकाळची घागर भरायला येईल ही आशा.

फार तहान लागली आहे महेन्द्राला !

इतक्यात कुणीसे घागर घेऊन येताना दिसते. दुःखद अशा गाण्याची सुरावट कानी दडते. तो आशेने तिकडे पाहतो.

फार तहान लागली आहे महेन्द्राला !

ती येणारी व्यक्ती म्हणजे रूपाच असते. त्या गावात तिचे सासर असते. दोघांची दृष्टभेट. तिला पाहताच तो तहान गिळून मुकाट्याने जायला लागतो. ती त्याला अडविते आणि म्हणते, " तू मोठ्या कुळाचा असशील, पण मलाही खानदान आहे. मी मराठ्याची मुलगी आहे. माझ्या हाती घागर असताना तू तहान घेऊन जातोस. हा एवढा अपमान करण्याचा हक्क तुला नाही. हा अपमान मी सहनही करणार नाही. तुला बोलायचं नसेल तर बोलू नकोस. माझ्या हातचं पाणी चालणार नसेल तर तू घागर ओढून घे. पण असा तहानेला परत जाऊ नकोस पाणवठ्यावरून. माणूस पाहून जनावरं देखील जवळ येतात, पण तू मात्र दूर जातोस. तुझा हा मुकामार मी का सहन करू ? मी माझं दुःख सहन करते ते पुरे ! हे कसं सहन करू ? माझं दुःख तुला ठाऊक आहे, पण तुला त्याचं काय ? कुठेही जा तू, पण ही सुवासिनीची भरली घागर ! पाणी पी. शकुन घेऊन जा. तुझ्या आशीर्वादाला मी पात्र नसेन, पण तुझ्या भल्याची इच्छा करायला माझी पात्रता माझ्या आड येत नाही. "

महेन्द्र सगळे ऐकून घेतो. त्याच्या अंतरात कालवाकालव सुरू होते. तिला तो विचारतो, " तुला हवं तरी काय ! "

" तू हवा आहेस. मागेही तुला मी हेच सांगायला आले होते, पण तुला ते ऐकायचे नव्हते. "

या निःसंकोच उत्तराने महेन्द्राचे धीट मन देखील बावरते. तो म्हणतो, " हे कसं शक्य आहे ? "

" त्यात अशक्य काय आहे ? "

" तू काय बोलतेस हे तुझं तुला तरी कळतंय् का ? "

" कळतं, अगदी चांगलं कळतं आणि आता तर अधिक चांगलं कळायला लागलं आहे. तुझ्याकडे पाहून माझी खात्री झाली आहे की, तुला माझ्याबद्दल तिरस्कार नाही. महेन्द्र, तू खरं बोल, तुला भरल्या घागरीची शपथ आहे. तू देखील माझी पदोपदी आठवण करतोस की नाही ? तू माझी वाट पाहतोस की नाही ? तुझं मन मी

जाणते. म्हणूनच इतक्या धिटाईने मी बोलत आहे. महेन्द्र, सध्याच्या घटकेला माझी तुला गरज आहे, फार गरज आहे."

"रूपा, तू घरी जा. तू शुद्धीवर नाहीस. सगळीकडे अंधार आहे, अशक्य आहे."

"अशक्य ? तुझ्या नसांत रक्त आहे की पाणी ? छातीत लोखंड आहे की दूध ?"

"पण त्याचा इथे उपयोग काय ?"

"म्हणे उपाय काय ! माणूस म्हणवतोस स्वतःला, उचल मला अन् ने पळवून."

नसांतले रक्त ! छातीतले लोखंड ! महेन्द्राच्या वेगुमान वृत्ती जागतात. बरेच दिवसांत त्याला कसलेही धाडस करायला मिळाले नव्हते आणि रूपाबद्दलच दाबलेला, दडपलेला सोस !

त्याला त्याच्या आईचे वाक्य आठवते. पण—! रूपा आपलीच आहे. हिलाच आपण आपली म्हटले होते. हिच्याशिवाय दुसऱ्या कुणाबद्दलही आपल्या मनात विचार आला नाही, पुढेही येणार नाही.

त्याच्या नसांतून रक्त सळसळू लागते. घागर विहिरीवरच राहते आणि महेन्द्र रूपाला घेऊन जातो.

त्याच्या उच्छृंखल शरीराची व मनाची रग जिरविणारे काम आता त्याला मिळाले. त्याच्या वृत्ती पुन्हा पहिल्यासारख्या पुन्हा बहराला येतात. औदासीन्य नाहीसे होते. त्याला वाटते, आपली रूपा आहे, तर आई, बाप, माम, कादर सगळेच आहे ! काही बिघडले नाही. काही हरवले नाही.

खेड्यापाड्यात राहून संकट विकत घेण्यापेक्षा मोठ्या शहरात गेलेले बरे. ते मुंबईला जातात. मुंबईत सर्व आपापल्या कामात, कुणाला कुणाची वास्तपुस्त करायला सवड नाही. तिथल्या घाईगर्दीत हे मिसळतात व एका खोलीत संसार थाटतात.

असे काही दिवस जातात. एक दिवस दुपारी शेजारच्या खोलीतून किंकाळी ऐकू येते. महेन्द्र तसाच उठून तिकडे धावतो. दारावरची घंटा वाजवितो. दार बंद असते. किंकाळ्या सुरूच असतात. शेवटी दोन खोल्यांच्या मधले ते दार तो लाथेने मोडतो. आत एक तरुण स्त्री स्टोव्हजवळ जळत आहे. तो स्टोव्ह विझवून तिची सुटका करतो.

"तुम्ही मला वाचविलंत, फार उपकार झाले. ते घरी येतील तेव्हा तुमचे फार उपकार वाटतील त्यांना. तुम्ही मला जीवदान दिलं. देव तुम्हांला सुखी ठेवील."

आपल्या कृतीबद्दल कृतज्ञता प्रकट केल्याचा महेन्द्राच्या आयुष्यातील हा दुसरा प्रसंग. त्याच्या डोळ्यांतून पुनः एकदा अश्रू येतात. तो एवढेच म्हणतो— "बहिणी संकटांत सापडल्या की त्यांच्या भावांना ईश्वर बळ देतो."

त्या तरुणीचा नवरा चांगला सुशिक्षित असतो. मोठी नोकरी असते त्याला. त्यांचा घरोबा हळूहळू वाढत जातो. मोडून पडलेले दार पुनः बंद होत नाही, खेड्यातला महेन्द्र त्या सुशिक्षित जोडप्यापासून पुष्कळच गोष्टी शिकतो.

पुढे पैसे संपतात. आता काय करायचे ? त्याच्या डोळ्यांसमोर ब्रह्मांड दिसू लागते. आई दिसते, आईचे शब्द ऐकू येतात. तुरुंग दिसतो. तुरुंगातील कैद्यांच्या हाका ऐकू येतात. पट्टीच्या चोर-दरवडेखोरांच्या युक्त्या त्याला आठवतात. नोकरी करणे, मिळणे शक्य नाही. मग पुढे काय ?

एका रात्री तो असाच बाहेर पडतो. मनात संघर्ष चालू असताना संभ्रमात घोटाळतो. गस्तवाल्या पोलिसांना त्याचे घोटाळणे संशयास्पद वाटते. पोलीस हटकतात. महेंद्र मोजकी उत्तरे देतो. पोलीस पत्ता विचारतात, पण पळवून आणलेली, लौकिक दृष्टीने दुसऱ्याची बायको घरी असल्याची आठवण होऊन महेन्द्र उत्तरे देताना चाचरतो. "मी नागपूरकडचा आहे. मला इकडची माहिती नाही." एवढेच सांगतो. पोलीस पकडतात. नागपूरकडची चौकशी येते आणि पुनः महेन्द्राच्या नशिबी तुरुंग येतो.

रात्री बाहेर पडलेला महेन्द्र सकाळपर्यंत घरी न आल्याने रूपा घाबरते. वाट पाहून पाहून अगदी जेरीस येते. शेवटी नाइलाजाने महेन्द्राच्या त्या मानलेल्या बहिणीजवळ खरी हकीकत सांगते. बहीण रूपाला आश्रय देते आणि रूपाचे धिंडवडे वाचतात. *

देशातील स्वातंत्र्याच्या चळवळीला जोर येतो. लोक देशाच्या कारणे भराभर तुरुंगात जातात. कैद्यांची संख्या काबूत ठेवणे अधिकाऱ्यांना जड जाते.

तुरुंगात एका सायंकाळी आपल्या कोठडीत जात असताना महेन्द्राला एक विलक्षण दृश्य दिसते. गुन्हेगारांच्या बराकीकडे चार-दोन पोरसवदा मुले येताना दिसतात. मुलांची नजर राजकीय कैदी ठेवलेल्या बराकीकडे असते. तिथून ओरडून ते एका पुढाऱ्याचे नाव घेतात. आणि ओरडून सांगतात—"गावकऱ्यांना सांगा, आमच्या पंचाला सांगा की, श्रावणच्या डोक्यावर पाच वर्षे, सख्याच्या तीन, माझ्या चार."

---

* इथवर पोचल्यावर कथानकाला देशातील सार्वजनिक चळवळीची पार्श्वभूमी देऊन गती द्यावयाची. १९४२ च्या चळवळीची फळे आता घशाखाली उतरल्यामुळे कोणाला तिची आठवण असायचे कारण नाही. पण आता ज्यांची नावेही ऐकू येत नाहीत अशा कित्येक सामान्य माणसांनी असामान्य शौर्य दाखविल्याचा इतिहास पुढारी नसलेल्या जनतेला अवगत आहे. त्यांपैकी एकाचे रूप महेन्द्राला द्यावयाचे.

हे सांगताना ते आनंदाने नाचत असतात. जणू त्यांना कोणी शिक्षा दिली नाही, खाऊ दिला आहे, पेढे वाटले आहेत--कुणाच्या हातावर पाच, कुणाच्या तीन !

महेन्द्रावर या दृश्याचा फार परिणाम होतो. असेही तुरुंगात येणे असू शकते. कलंक नसूनही लोक तुरुंगात येतात, नाचत-गात येतात. ते कशासाठी ? ते ध्येय कोणते ?

संधी साधून महेंद्र त्या मुलांशी बोलतो. ते सांगतात, "आम्ही आमच्यावर जुल्म करणाऱ्याचे अमुक अमुक केले आणि इथे आलो. आमच्या देशासाठी आम्हांला शिक्षा झाली. सर्वांच्या भल्यासाठी आम्ही तुरुंगात आलो. आमच्या घरी खायला प्यायला भरपूर आहे, आमची प्रिय माणसे आहेत. ती आमच्यावर आपला जीव ओवाळून टाकतात."

महेन्द्राला नवी दृष्टी मिळते. तो दुसऱ्यांदा तुरुंगातें आला, पण त्याचे येणे आणि जिणे व्यर्थच ! तुरुंगात येऊनही हसता आले पाहिजे, छाती फुगवून चालता आले पाहिजे. विलक्षण कल्पनांचा पगडा त्याच्या मनावर बसतो. त्याचे अंतर्विश्व बदलून जाते.

पावसाळी दिवस सुरू होतात. विजा कडाडतात. ढग गडगडतात. मुसळधार सुरू, पावसाळ्यात बराकीत कोंडलेले जीवन अगदी असह्य होऊन जाते. कैदी तुरुंग फोडतात ते याच दिवसांत !

महेन्द्राच्या मनात काहीतरी विचार पक्का होतो. त्याच्या निश्चित हालचाली सुरू होतात. तुरुंगातील वॉर्डर्सशी त्याची मैत्री असते. तो संधान बांधतो आणि राजकीय कैद्यांच्या दिमतीला जाणाऱ्या कैद्यांमध्ये आपले नाव नोंदवितो. तेथे त्याला सहवासाने व जिज्ञासेने बाहेरच्या जगाचे आजवर न झालेले ज्ञान मिळते. त्याचा उत्साह दुणावतो. जगण्याला दिशा मिळते. भूमिगत चळवळीची त्याला माहिती होते. त्याचे शौर्य व आपला कलंक धुऊन काढण्याची जाणीव जागी होते, तीव्र होते, असह्य होते.

आणि एक दिवस वादळ्या रात्री तो तुरुंगाची भिंत ओलांडून पळून बाहेर येतो.

महेन्द्र मुंबईला येतो. त्याच्या दाढेमध्ये रुपये असतात. निर्ढावलेल्या दरवडेखोरांकडून दाढेत रुपये लपविण्याची युक्ती त्याला माहीत झालेली असते. मुंबईला रूपा आणि त्याची मानलेली बहीण भेटतात. सुदैवाने ती माणसेही शक्तीप्रमाणे चळवळीला मदत करीत असतात. महेन्द्राच्या वृत्तींना योग्य ते काम मिळावयास भरपूर क्षेत्र. तो खूप काम करतो. अचाट धाडस हा त्याचा नित्यक्रम. पोलीस त्याच्या मागावर असतात.

महेन्द्राच्या कार्यक्षेत्रातल्या एका गावात अशीच काहीतरी घटना घडते. पोलीस येतात. महेन्द्र सापडत नाही म्हणून जिवाचे रान करून हैराण होतात. ही घटनाही

महेन्द्राच्याच प्रेरणेने घडली हे जाणून त्याचा पत्ता सांगण्यासाठी गावातील निरपराध लोकांवर अत्याचार सुरू होतात. महेन्द्र त्याच गावात असतो. सगळे पाहत असतो. तो पोलिसांच्या मागोमाग त्यांना नकळत फिरत असतो. लोक अत्याचार सहन करतात, पण कुणीही महेन्द्राचे नाव सांगत नाही.

एका घरी बाप, भाऊ आणि बहीण अशी तीन माणसे असतात. बापाचा व मुलाचा संशय घेऊन पोलीस त्यांना त्यांच्याच घराच्या पडवीत बेदम मारतात. काही न बोलता ते मार सहन करतात. महेन्द्र रस्त्यावरून हे पाहत असतो. शेवटी पोलीस बहिणीचा हात धरतात, म्हणतात–"हिच्या विटंबनेने तुमचं तोंड उघडेल." महेन्द्राच्याने हे पाहवत नाही. त्याचा क्रोध उसळून सावर सुटतो. त्वेषाने पुढे येऊन तो अधिकाऱ्याच्या पेकाटात लाथ मारतो–'बाईबापडीवर हात टाकायला तुझे हातच ठेवीत नाही जागेवर.' असे म्हणून एका हाताला हिसडतो. इतक्यात पोलिसांची तुकडी येते. महेन्द्र पकडला जातो. बापलेक त्याला म्हणतात—"दादा, तू राहिला असतास तर लाख कामं केली असतीस. आम्ही राहिलो काय नि गेलो काय! आमची मुलगी आमच्या रक्ताची आहे. ती जिवंत त्याच्या हाती लागलीच नसती. तू घाई केलीस अन् घात झाला."

अशा प्रकारच्या असीम भावनांचा अनुभव महेन्द्राला विचलित करतो. तो गहिवरतो. ही माणुसकी त्याच्या डोळ्यांतून तिसऱ्यांदा खारे पाणी झरविते. हे जग असे आहे, हे जग सुंदर आहे, फार चांगले आहे. जगावे तर याच जगासाठी, मरावे तेही त्याच्याचसाठी ! बाकी सगळे खोटे ! हे जग, ही माणसं, व यांच्यासाठी काही करावेसे वाटणारा मी एवढेच खरे आहे !

गहिवराने जड झालेल्या आवाजात महेन्द्र उत्तर देतो, "रामजी, तुझ्यासारखी नेक माणसं असली तर माझ्यासारखे लाखो दगड देवाचं काम करू शकतील. आजवर देवानं माझं काही एक ऐकलं नाही. पण तो जर ऐकणार असेल तर त्याला मी एवढेच मागेन की काय वाटेल ते कर, पण तुझ्यासारख्या माणसांना या जगात कायम ठेव. रामजी देव माझ्यावर रुसला आहे. पण तुझं तो ऐकणार असला तर माझ्या वतीनं तू एवढंच त्याला माग."

चार महिन्यांच्या आत पुनः तुरुंगात. पण या वेळी कडेकोट बंदोबस्ताने महेन्द्राला कोंडले जाते. खटला चालू होतो. ज्ञात अज्ञात सगळे आरोप त्याच्यावर ठेवण्यात येतात. त्याला फाशीची शिक्षा होते. त्याची रवानगी फाशीच्या कोठडीत होते.

तुरुंगात त्याचा नवा दिनक्रम सुरू होतो. त्याचा पुनर्जन्मच झालेला असतो. जणू ! तो पार बदलून जातो. पूर्वी तो नुसता कैदी होता; लाचार ! आता वनराजाला कोठडीत कोंडले होते !

मृत्युतिथीची वाट पाहत असलेल्या फाशीघाटातील कैद्यांचे जीवन, त्यांची सुखदुःखे, त्यांच्या आशाआकांक्षा, त्यांची जगण्याची इच्छा व त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या क्षणाक्षणाने जवळ येणाऱ्या मरणाच्या तारखा !

त्या वातावरणाने महेन्द्र उबगतो. एकदा येऊ दे मरण असे त्याला होते. जीवनापेक्षा मृत्यूच त्याला हवासा वाटू लागतो. एक दिवस नित्य फेरीवर आलेल्या अधिकाऱ्याला तो विचारतो, " माझी फाशीची तारीख कोणती ? "

हा अधिकारी महेन्द्राबद्दल सहानुभूती बाळगून असतो. त्याच्या बोलण्यात महेन्द्राला ओलावा मिळतो. अधिकारी उत्तर देतो, " तुझ्या मृत्यूची तारीख आज सांगत नाही. कारण तुला भेटायला माझ्या ऑफिसात दोन तरुण आणि सुंदर स्त्रिया आलेल्या आहेत. "

रूपा आणि त्याची बहीण त्याला भेटायला आलेल्या असतात. क्षणभर महेन्द्र विचार करतो आणि म्हणतो, " माझी मृत्यूशी मैत्री चालू आहे. मी त्याच्या पूजनात गुंतलो आहे. मी त्यांना भेटून काय करणार ? मी भेटणार नाही. त्यांना माझा नमस्कार सांगा. माझा नकार मऊ शब्दांत कळवा. "

,' शूर माणसा, आज तू इतके दिवसांत माझ्याशी बोललास. तुझे माझे पक्ष भिन्न आहेत. पण मी आज तुला कसलाही वेडेपणा करू देणार नाही. इतके दिवस जे जीवन आपलेसे केलं आणि मर्दासारखं जगून दाखविलं त्याचं इमान मोडू नये. निदान तू तरी इमान राखलं पाहिजेस. कुणी सांगावं, तुझ्या या उत्कट अवस्थेत तू त्यांना भेटलास तर त्यांच्या मनावर तुला हवा असलेला संस्कार होईल. तुझ्या शब्दांना या वेळी तेज आहे, मोल आहे. तू जे बोलशील ते खरे होईल. जीव गेला म्हणजे जीवन संपत नाही. त्याची जबाबदारीही संपत नाही. त्याच्या समृद्धीसाठीच तर तू मृत्यूच्या तिथीची वाट पाहतो आहेस. तू जरूर भेट त्यांना. त्या फार लांबून आल्या आहेत. "

हा अधिकारी म्हणजे आपला वैरी ! मग कोण बोलतो त्याच्या मुखातून ! महेन्द्राला चवथ्यांदा गहिवर येतो. माणुसकीच्या प्रत्ययाने तो ढसाढसा रडतो. म्हणतो,

" आजवर एकाएकी माझ्याच सल्ल्यानं मी जगलो. तुमच्यासारखं असं वडीलपणाच्या नात्यानं मला कुणी सांगितलं नाही. सगळे माझंच ऐकत ! पण कुणाकडून ऐकवून घेण्याची माझी भूक आई गेल्यानंतर तशीच राहिली. तसे तुम्ही माझे कोण ? पण तुमच्या मुखानं मला जगाच्या भलेपणाचा प्रत्यय येत आहे. मी जगाबद्दल उणे बोललो असेन तर क्षमा करा. चला, मी तुमच्याचबरोबर त्यांना भेटायला येतो. "

रूपाचे आणि बहिणीचे तो हसून स्वागत करतो. कुशलक्षेम विचारतो आणि काही वेळाने जणू आपल्याशीच बोलत असल्यागत--

"आजवर मरावंसं वाटत होतं, पण आता मला फार जगावंसं वाटतं, खरंच जगावंसं वाटतं. मला नाही का एकदा पुनः जगायची संधी मिळणार ? रूपा, तुझ्यासाठी, या माझ्या वहिणीसाठी, ज्याच्या उंबरठ्यावर मी पकडला गेलो त्या रामजीसाठी, ज्यांनी माझी जमीन स्वीकारून मजवर उपकार केले त्या माझ्या इमानी मंडळीसाठी मला फार फार जगावंसं वाटतं. रूपा, इथं मला विचार करायला फार वेळ मिळाला. माझ्या आयुष्यातील गत क्षणाक्षणाचा मी हिशेब करून पाहिला. दुःखापेक्षा सुखच माझ्या वाट्याला अधिक आलं आहे. मनापासून रडता येईल असे चार-दोन प्रसंग माझ्या भाग्यानं मला गोळा करता आले. रूपा, खूप वेळा आताशा वाटतंय् की, मी होतो कोण ? आणि आज झालं काय ? कसा जगलो मी ? तुम्ही सगळे मला आपला म्हणता पण मी तुमच्यासाठी केलं काय ? कसली पत्नी ? कसली बहीण ? पण तुम्ही मला माणुसकीचा प्रत्यय दिलात. तुम्हांला सुखी करण्यासाठी तरी मला जगावंसं वाटतं, फार वाटतं... !

"कोण झालो मी ? माझी आई मला म्हणायची की, महेन् तुला राम व्हायचं आहे. एकवचनी राम, एकबाणी राम, एकपत्नी राम ! पण माझा तोल गेला. माझ्या वडिलांचा तोल गेला. त्याचं फळ मला भोगावं लांगलं. मी ते भोगलं, पितृऋणातून मुक्त झालो. माझा तोल गेल्यामुळं कुणाला काही भोगावं लागू नये हीच आशा. त्याची शिक्षा मीच भोगतो आहे, त्याचं मोल मीच चुकवीत आहे...

"रूपा, हे मोल चुकवीत असताना पुनः एकदा मी देवाची प्रार्थना करणार आहे. त्यानं माझं ऐकावं असा माझा आग्रह नाही. पण तुम्ही भली माणसं आहात. तुमचं तो ऐकेल. तुम्ही त्याच्यासाठी पुष्कळ केलं आहे. माझ्या वतीनं तुम्ही त्याला कंळवा की देवा, ज्यांनी माणुसकी दाखवली त्यांना तू जगव, ते जगले नाहीत तर जगात अन्नपाणी दिसणार नाही, सूळच सूळ दिसू लागतील, रक्तच रक्त दिसू लागेल..."

भेट संपते. महेन्द्र आपल्या कोठडीत परत जातो. जाता जाता पुनः एकदा वळून पाहतो.

हा तरुण, सुदृढ, कुलीन महेन्द्र, हा गुन्हेगार अमुक अमुक तिथीला निश्चल मनाने, शांतपणे हरिः ॐ चा जप करीत फासावर लटकला. त्याला सगळे विसरले असतील, तो मात्र कोणालाच विसरला नव्हता. त्याला फार जगावेसे वाटत होते म्हणून तो मेला !

एका विलक्षण क्षणी हे कथानक इमानी साथीदाराप्रमाणे मजकडे आले. त्याचा संकल्पक्षण विलक्षणच.

आता वाट पाहतो आहे की अशाच एखाद्या शांत, निवांत क्षणी हा महेन्द्र येईल. बोलू लागेल. कदाचित् त्याचे डोळे ओले असतील. त्या अश्रूंनी या संकल्पाला संजीवन मिळून जाईल !

त्या क्षणाची वाट बघतो आहे !

९३

अंजली

जे प्रसंग कल्पनेनेही चितारणे शक्य नाही त्यातून त्या बाल्यकाळात मी पार कसा पडलो ह्याचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. तो काळ आणि ते प्रसंग पुन्हा आज माझ्याकडे चालून आले तर मी त्यांचे स्वागत करीनच असे नाही; एवढेच काय पण ज्याच्या व्यक्तित्वाने मी त्या वेळी भारला गेलो होतो तो माझा मित्र सर्जा पुन्हा आज तेवढ्याच हक्काने, आपलेपणाने माझ्याकडे येऊन मला तसेच ठासून सांगू लागला तरी मी त्याचे एकेन किंवा नाही कुणास ठाऊक ! एवढेच काय पण त्याच्याशी मला बोलता देखील येईल किंवा नाही हे पण मला आज सांगता यावयाचे नाही. गेल्या पंधरा वर्षांत माझा आणि सर्जाचा संबंध अजीबात तुटलेला आहे. तो आज कुठे आहे, आहे किंवा नाही, असल्यास काय करतो ह्यापैकी काही एक मला ठाऊक नाही. काही वर्षांपूर्वी त्याच्याबद्दल मला एवढेच कळले होते की तो कुठल्याशा एका खेड्यात आहे. जगातली सगळी व्यसने त्याला जडलेली आहेत. आणि माणसाला जेवढे उच्छृंखल वागता येईल तेवढ्या अनिर्बंधपणे तो दिवस घालवीत आहे.

एक मात्र नक्की की, तो आजही त्याच्या आजूबाजूच्या मंडळींना भारून टाकीत असेल, त्यांच्यावर त्याचे अजूनही वर्चस्व असेल ! त्याच्याजवळ ती अद्‌भुत शक्ती होती. स्वतःबद्दलचा त्याचा विश्वास विलक्षण होता. साहस, धडाडी हे गुण त्याच्यात बालपणापासूनच होते. मला त्याच्यावर एवढासा तरी पगडा बसविता आला असता तरी त्याच्या गुणांचा पुष्कळ उपयोग होऊ शकला असता. असे आजही मला वाटते. त्या वेळेलाही कचित् वाटून जाई.

पण वाटून उपयोग काय ?

माझी ओळख झाली तेव्हा त्याचे वय सोळा वर्षांचे होते. माझे चौदावेही संपले नसेल. एका वर्गात आम्ही होतो. म्हणजे तो एक वर्ष नापास झाल्यामुळे मी त्याच्या बरोबरीला आलो होतो. तो फार कमी बोलत असे. काही करावे, धडपडावे अशीही त्याची वृत्ती नव्हती. जेव्हा जेव्हा वर्गात शिक्षकाचे त्याच्याकडे लक्ष जाई तेव्हा तेव्हा तो कुठेतरी पाहत असलेला, शरीराने वर्गात, मनाने कुठल्यातरी अद्‌भुत साहसी जगात वावरत असलेला आढळून येई. शिक्षक काही म्हणू जात तेव्हा तो त्यांच्याकडे अशा तऱ्हेने पाहावयाचा की जणू काय त्याला म्हणायचे होते– " सर, किती क्षुल्लक, किती छोट्या गोष्टी तुम्ही इथे सांगता आहात ! सांगता तेही किती खोटे खोटे ! आणि एवढ्यासाठी मी तुमच्याकडे लक्ष द्यावे असे तुम्हांला वाटते ! "

शिक्षक फारसे वोलत नसत. त्यांचे शिकवणे आणि ह्याचा अन्यथा मनोवेध पुन्हा सुरू होत.

एका वर्गात होतो. एका वसतिगृहात होतो. ओळखीला सुरवात झाली तीही भांडणाने. खेळाच्या मैदानावर कसला तरी वाद झाला. शब्दाने शब्द वाढला व फारसे न वोलणाऱ्या त्याने माझा शक्तीचा सर्व गर्व जिरवून क्षणार्धात टांग मारून मला उलथविले. त्या वेळी डोक्याला पडलेली खोक अजूनही कायम आहे. पुढे कित्येक महिने शत्रू म्हणून वागलो. शरीराच्या जखमेपेक्षा मनाचीच आग जास्त झालेली होती. ती हळूहळू शांत झाली. त्याला कारणेही घडत गेली. मी मी म्हणणाऱ्यांना सर्जाने आपल्या अंगाला हात लावू दिला नव्हता. त्याच्यापेक्षा वयाने, शक्तीने वरचढ असलेल्यांनाही त्याने कित्येक वेळेला निमिषार्धात माती खायला लावले होते. सबब माझी अपमानाची आग निवायला तेवढे कारण पुरेसे होते.

ती आग मग एक दिवस सपशेल निमाली. आमच्या शाळेत कसले तरी ऐतिहासिक नाटक होते. निरोगी, धडधाकट, चपळ आणि धीट एवढ्या आमच्या गुणामुळे आम्हा उभयतांना त्यात कामे मिळाली होती. नाटकापुरतेच आमचे संभाषण व्हायचे. सर्कशीतल्या रिंगमास्तरासमोर दोन वाघांनी एक भांड्यातून पाणी प्यावे तसे आमच्या नाटकाच्या तालमीचे होई. एके दिवशी वसतिगृहाची सर्व मुले " वॉर्डन-" बरोबर सिनेमाला गेली होती. आम्हांला रात्री तालमीसाठी शाळेत जावयाचे असल्या-मुळे आम्ही दोघेच काय ते राहिलो होतो. एका खोलीत राहायचे; बोलायचे मात्र कुणी नाही ! मला वाटते सर्जाच्या स्वभावाला ते मोठे जाचक होत असावे. तो काहीसा आपल्याशीच पण मोठ्याने म्हणाला,

" आता नाटक सुरू असते तर आम्ही संभाषण करीत राहिलो असतो. नाटक नेहमीच सुरू का असत नाही कुणास ठाऊक ? "

मी फक्त कान टवकारून ते ऐकून घेतले. बोललो काहीच नाही. अंमळशाने तो म्हणाला,

" इतके जुने वैर आहे. मनात आणले तर मैत्रीही तितकीच जुनी होऊ शकेल."

त्या वयातल्या भावना मोठ्या उत्कट असतात. माझ्याने राहवले नाही. मी चटकन जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवला. त्याच्या डोळ्यांत पाणी तरारले. माझ्या आसवांना तर धारच लागली.

आणि त्यानंतर जी मैत्री झाली ती अशी की जणू जन्मोजन्मीचे लागेबांधेच ओळखले गेले. त्याचा तात्कालिक परिणाम असा झाला की त्या वर्षी आमच्या 'मिडल स्कूल'च्या संमेलनाचे ते नाटक अतिशय चांगले वठले आणि आमची कामे उत्कृष्ट ठरून आम्हांला बक्षिसेही खूप मिळाली.

पुढे आमच्या मैत्रीला राहिला ना घर ना बंध ! जे-काय करावयाचे ते एक-मनसुभ्याने करणे, शाळेच्या तासांना बुट्टी देऊन दूर दूर भटकावयास जाणे, रात्र नाही, दिवस नाही, वेळ नाही, अवेळ नाही. सर्जाला फक्त बातमीच लागायला हवी, की कुठल्याशा टेकडीवर दोन काळे नाग आहेत, ते फक्त सायंकाळीच दिसतात, की सर्जा मला घेऊन निघालाच. शाळेजवळच स्मशान होते. तिथे सर्जाला कळले की रात्री भुते नाचतात. त्याने मला सांगितले,

" आज जायचे. चल, पाहू तर भुते कशी असतात ती. "

माझा जीव धसकन उडाला. भूत म्हणजे केवढी भयंकर गोष्ट !. आपण आपल्या स्वतःच्या घरी असूनसुद्धा ती आपल्या उरावर येऊन बसायला कमी करीत नाहीत व सर्जा म्हणतो, त्यांच्या राज्यात चल आणि तेही मध्यरात्री, गुपचूप कुणाला पत्ता न लागता ! तो म्हणावयाचा " मी आहे. तुला भ्यायचे काय कारण ? "

एवढ्याने मला धिंवसा आला नाही. तो म्हणाला, " मला मंत्र येतो. आपल्या-जवळ जोडा असला तर भूत पळून जाते. चल, चल ! "

त्याला नकार भरण्याची माझ्यात हिंमत नव्हती. निघालो.

मध्यरात्रीच्या त्या भीषण वेळी स्मशानातली ती शांतता; किड्यांचे वेगवेगळे आवाज; शेजारच्या नदीतील सडक्या पाण्याची वाऱ्याबरोबर येणारी घाण !

तिथल्या त्या शांततेने सर्जाही काही वेळ अगदी गप्प बसला. एक तास झाला. दोन तास झाले. पण भुतांचा पत्ता नाही. मधूनच कुठूनतरी कुत्री भुंकत, आगगाडीची लांब वरून येणारी शीळ ऐकू येई. झाडाच्या पानोळ्यातून वाळकी काटकी सरसर करीत खाली येऊन पडे. एखादे पाखरू भिरभिर करून कानाजवळून निघून जाई. पण सर्जाचे दोन आणि माझे दोन असे चार डोळे तारवटून आम्ही तास न् तास पाहत राहिलो–भुतांचा मात्र पत्ता नाही. तिथे एक मोठे वडाचे झाड होते. त्याची काळी घनघोर भीतिदायक सावली दूरपर्यंत पसरली होती. एक मोठी गूळ ओतण्याची कढई कितीतरी वर्षांपासून बुंध्याशी उभी केलेली आम्ही पाहत आलो होतो. सर्जाला बातमी लागली होती की तिथेच त्या झाडाखाली भुते येतात. मग तिथे दिवे लागतात. भुतांचा नाच सुरू होतो.

पण त्या दिवशी मात्र काही म्हणता काही दिसले नाही. दुसरा कुणी जर आला असता तर आम्ही मात्र त्याला भुतासारखे दिसलो असतो. बसून बसून कंटाळलो. बोलण्याची, फिरण्याची माझ्यात हिंमत नव्हती, सर्जाही नुसता बसून होता. मला झोप यावयाला लागली. मी त्याच्या अंगावर भार टाकला आणि डोळे मिटले. त्याने कुणालातरी चार-दोन शिव्या हासडल्या. नंतर भुतांनाही पुष्कळ शिव्या दिल्या. जवळचा मोठासा दगड घेतला आणि जोराने त्या बुंध्याशी टेकविलेल्या कढईकडे भिरकावला. खूप मोठा आवाज झाला. घाण ! मी तर ओरडलोच. सर्जाही भ्याला. पण

मला म्हणतो कसा, "अरे, भितोस काय, भागूबाई ! बूट आहे ना चांगला तुझ्या पायात ?"

नंतर तिथून परतलो. मी इतर सर्वांच्या बरोबर सर्जालाही शिव्या द्यायला सुरवात केली. तो निमूटपणे ऐकून घेत होता. फार झाले तर मध्येच एखादा दगड तो उचली आणि कुठेतरी झाडाबिडावर भिरकावून देई, कधी एखाद्या मोठ्या दगडावर फेकून त्यातून ठिणगी काढी.

स्मशानाची हद्द ओलांडून आल्यावर माझ्याही शरीरात त्राण आले होते आणि मीही दगड उचलून इतस्ततः भिरकावीत होतो. आमची शाळा लागली. काळ्या दगडाने बांधलेली. त्या काचेच्या खिडक्या चमचम चमकत. सर्जाला आणखी अवसान आले. त्याने एक दगड खिडकीवर फेकला. धाडदिशी आवाज आला. खळखळ काचा फुटल्या. मी तितक्याच जोराने त्याच्या पाठीत एक गुद्दा दिला. समोरच एक बुचाचे झाड होते. नुसते खराटा होऊन उभे होते. त्यावरून एक घुबड विचित्र आवाजात ओरडले. माझ्या हातातला दगड खिडकीवर फेकायचा तो मी दोन-चार शिव्या हासडून घुबडावर भिरकवला. सर्जाने एकदम माझा हात पकडला, "अरे— "

"का रे, तू दगड मारतोस ते ? "

"तसं नव्हे, तू मार दगड; पण घुबडाला मारू नकोस. "

"का ? "

"तुला माहीत नाही, आपण फेकलेला दगड घुबड झेलते. आणि ठाऊक आहे काय करते ते ? "

"काय करते ? "

"तो दगड घेऊन ते नदीवर जाते आणि पाण्यात बुडवून बुडवून दगडावर घासते. जसजसा दगड झिजतो तसतसे आपण झिजून मरतो. "

घुबड दगड झेलते ? आणि मी तर आताच दगड भिरकावले जोरजोराने त्याच्याकडे !

माझ्या अंगावर शहारे आले. मी मरणार म्हणजे काय होणार ! कल्पना होईना. मी सर्जाचा हात अगदी घट्ट धरला आणि अशा असहाय्य आवाजात 'सर्जा' म्हणून म्हटले की त्याने माझ्या खांद्यावर आपला हात ठेवला आणि मला धीर देत तो तसाच चालू लागला.

घुबडाच्या बाबतीत सर्जावर अविश्वास दाखविणे शक्य नव्हते. त्याला जणू त्या पक्षाची खडान्‌खडा माहिती होती. एक दिवस त्याने असेच दुपारी मला शाळा बुडवून फिरावयास नेले होते. म्हणाला, "चल; तुला घुबड आणि हुम (नर-मादी) यांचा जोडा दाखवितो. "

एका शेतात खूपशी आंब्याची झाडे होती. त्यांपैकी एकावर उंच दोराव्यांमध्ये त्याने वोट दाखविले—

" ते पाहा, काय थाटात बसले आहेत ! "

खरोखरच ते जोडपे तेथे बसले होते. आम्ही त्याच्याकडे पाहिले तो त्यांनीही आमच्यावर नजरा रोखल्या. घुबड पक्षी तसा फार भेसूर दिसतो दिसायला; आकाराने मोठा असला तर विशेषच. मी बराच वेळ पाहत राहिलो वर त्या जोडप्याकडे. त्याचे ते मटमट डोळे आणि एकटक पाहणे. सर्जा म्हणाला—

" तुला जर गंमत पाहायची असेल तर पायातील बूट काढून त्यांना दाखीव. "

मी तसे केले; तो काय ! हिंदू जसा गोमांसावरून आपली दृष्टी काढून घेईल, तशा त्या जोडप्याने आपल्या नजरा वर केल्या. असे मी कित्येकदा केले आणि दर वेळी मला तोच प्रत्यय आला.

किती माहिती आहे घुबडाबद्दल सर्जाला !

आणि आज त्याने एवढ्या रात्री मला सांगितले की घुबड दगड झेलते म्हणून !

" सर्जा, चल लवकर परत जाऊ आपण आता. "

" अरे, भितोस काय ! मी आहे ना ? तुझ्यासाठी मी मारुतीला अठ्ठावीस प्रदक्षिणा जास्त घालतो. तुझे रक्षण करण्याची शक्ती मला त्याने दिली आहे. "

त्याची देवभक्तीही तऱ्हेवाईक होती. ते सगळे पुन्हा कधी तरी स्वतंत्रपणे सांगावे लागेल. तो देवाशी बरोबरीच्या नात्याने भांडत असे– " मी तुझ्यासाठी इतके करतो, तू माझ्यासाठी इतके केले पाहिजेस " असे तो देवाला साकडे घाली. पहाटे उठून आणि सायंकाळी तो नियमाने दर वेळी १०८ प्रदक्षिणा मारुतीला घालून येत असे. कपाळाला भला मोठा शेंदराचा टिळा आणि हातात मूठभर कसला तरी झाडपाला अशा थाटात स्वारी परत यायची. रोज मला झाडपाला तो खाऊ घालीत असे—

" हा पाला तुला खाल्ला पाहिजे. याने शक्ती येते. कुस्तीत हार येत नाही. देवापुढे ठेवून आणला आहे. "

माझ्यावर जुलूम होता सगळा. पण त्याच्या संगतीत मी मुठीच्या मुठी कडू लिंबाचा पाला सवयीने खाऊ शकत असे. जास्वंदीची फुले तर त्याने मला रोज खाऊ घालावी. बरे, त्याचे ऐकले नाही तर भयंकर परिणाम होत असे. एकदाचे मला आठवते, मी अंघोळ न करता तसाच जेवून शाळेत गेलो. ते सर्जाला मानवण्यासारखे नव्हते. शिवाय मधल्या सुट्टीत एका मित्राने विडा दिला तो मी खाऊन टाकला. मग काय ! सर्जाचे लक्ष जाताच त्याने आपले डोके दाणकन् शाळेच्या भिंताडावर मारून घेतले ! मी निमूटपणे हॉस्टेलमध्ये गेलो. तोंड धुतले. अंघोळ केली आणि मग त्याला तोंड दाखविले.

त्याच्या त्या दोन वर्षांच्या मैत्रीचा माझ्या मनावर इतका विलक्षण पगडा बसला होता की मी कित्येक दिवस माझी कामे अगदी यंत्रासारखी करीत असे. नियमित व्यायाम, देवदर्शन, शनिवारचा उपवास, कडूलिंबाचा पाला हे सर्व माझ्या अंगवळणी पडून गेले होते, एवढेच काय पण पुढे हायस्कुलात प्रवेश केल्यानंतर देखील मी एखाद्या मंत्राने भारलेल्या माणसासारखा वागत असे. कुठून तरी कळ फिरावी आणि माझे यंत्र चालू व्हावे. त्याचे म्हणणे मी कधी तर्कावर घासले नाही. माझ्या कर्मेंद्रियांना जणू त्याचे शब्द प्रमाण होते.

हे पुढे कित्येक दिवस टिकले !

भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना फाशी दिले तो दिवस सर्व हिंदुस्थानने सुतकासारखा पाळला. जतींद्रनाथ दासच्या मृत्यूपासूनच मी क्रांतिकारक विचाराचा झालो होतो. त्यांचे वाङ्मय अप्रकाशित, सरकारजमा सर्व मी वाचले होते. भगवे कपडे वगैरे वापरीत असल्याने सी. आय. डी.च्या लोकांनी मला एक-दोनदा हटकलेही होते. महादेवाच्या ओसाड देवळात मी दर्शनाला जातो. यात त्यांना काही विपरीत दिसायचे. १९३० च्या सत्याग्रहात माझे नाव घाला म्हणून बॅ. अभ्यंकरांना मी विनविले. तेव्हा ते म्हणाले की " तू लहान आहेस. वानरसेनेत जा. " आणि या सी. आय. डी. च्या दृष्टीने जणू सोळा वर्षांचा मुलगा राज्य उलथून पाडणार होता !

आणि अशा मनःस्थितीत माझ्या कानावर भगतसिंगाच्या फाशीची वार्ता आदळली. मी क्षणभर सुन्न झालो. आणि नंतर सूडाची भावना माझ्या मनात अत्यंत प्रबळ झाली. खुनाचा बदला खून ! भयंकर विचार होते ते. त्या आवेगात मी सर्जाने सांगितलेली विद्या साध्य करून घेण्याचा निश्चय केला.

ती विद्या म्हणजे हवे तेव्हा गुप्त होण्याची व हवे तेव्हा प्रकट होण्याची विद्या होय.

त्याचा विधी त्याने सांगितला होता. तो असा—

" शुक्ल पक्षातील एकादशीपासून व्रत सुरू करावे. आपला अखंड कार्यक्रम नित्य चालवावा. दिवसातून दोन वेळ अंघोळ करावी. एकदा अंगात घातलेला कपडा धुतल्याशिवाय पुन्हा घालू नये. स्त्रियांकडे पाहू नये. त्यांच्याशी बोलू नये. सायंकाळचे जेवण सोडावे, शंकराचे दर्शन घ्यावे. अशा व्रताने कृष्ण पक्षातील एकादशीपर्यंत म्हणजे पंधरा दिवस घालवावे. सोळाव्या दिवशी घारीचे घरटे शोधावे. त्या घरट्याच्या आढ्याचे लाकूड काढून आणावे. मध्यरात्री एकांतात नदीकाठी जाऊन ती काटकी भिजवावी आणि न पुसता घरी आणावी. ती कुणाला दिसता कामा नये ! असे तीन दिवस करावे. नंतर अमावास्येच्या मध्यरात्री एकटे नदीकाठी जावे. ती काठी तीनदा शंकराचे नाव घेऊन नदीत फेकावी. फेकताक्षणी एक मोठा साप पाण्यातून फोफावत वर येतो. आपण भ्यालो तर सगळे गेले. न भिता त्याला हात लावला तर त्या सापाचे

पुनः त्या काटकीत रूपांतर होते. नंतर ती काटकी दगडावर घासून त्या चंदनाचा टिळा कपाळी लावावा. जोवर टिळा कपाळी आहे तोवर आपण कुणाला दिसत नाही. आपल्याला मात्र सर्व दिसते. टिळा पुसला की पुनः दिसायला लागतो."

आज हे सगळे मूर्खपणाचे, अद्‌भुत, हास्यास्पद असे वाटते. त्या वेळी ते वास्तव, गंभीर आणि इष्ट वाटत होते. गुप्त झाले की कुणाचाही मुडदा पाडता येईल ! त्याप्रमाणे मी व्रत पाळले. दुसऱ्या एकादशीपर्यंत कसेतरी पंधरा दिवस गेले. पण पुढे उपासमारीने म्हणा, मनावर फाजील ताण पडल्याने किंवा माझ्या सुदैवाने म्हणा मी सडकून आजारी पडलो. एकदम ताप आटोक्याच्या बाहेर जाऊन मी तीन-चार दिवस बेशुद्धच होतो. ते दुखणे एक महिना टिकले आणि मी मनाने व शरीराने खिळखिळा, जर्जर होऊन गेलो.

त्यामुळे त्या व्रताची पूर्ती अजमाविता आली नाही. काळ पुढे सरकताच सूडाची भावनाही निमाली व हळूहळू जसजसा मी बरा होत गेलो तसतसे इतर विचार माझ्या मनात येऊ लागले.

आणि त्यानंतर महिनाभराने मी जेव्हा शाळेत गेलो तेव्हा माझ्या नावावर मी " केशवसुतांची कविता " हे पुस्तक वाचनालयातून घेतले.

१९।९।४६

९४

पंकज

सर्वांबरोबर प्रमदा देखील सभामंडपाच्या बाहेर पडली खरी पण तिच्या चेहऱ्यावर इतरांसारखा हुरूप, उत्साह असा कुणालाच दिसला नाही. मनाला झालेला आनंद, नवा प्रत्यय आल्याची सुखद जाणीव, कुणाला दिसू नये म्हणून ती कटाक्षाने दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत असताना जे भाव उमटतात तसलेच भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होते. पण कठोरतेची, निग्रहाची छटा मात्र त्यात आढळून येत नव्हती. आणि तिने प्रयत्न करूनही कठोर भाव तिला उठविता आला असता किंवा नाही कुणास ठाऊक ! तिच्या लावण्याचे, सौष्ठवाचे, सौंदर्याचे वर्णन काय करणार ! एवढे मात्र खरे की, एखादा चित्रकार तिची प्रतिकृती तयार करू म्हणेल तर त्याचे कौशल्य कसास लागल्यावाचून राहावयाचे नाही.

वास्तविक आज तिच्या आनंदाला पारावार असायला नको. ज्याचे भाषण ऐकण्यासाठी तिचे पंचप्राण गोळा होत त्याचे प्रभावी वक्तृत्व आज विवाहानंतर जवळ-जवळ तीन वर्षांनी तिने ऐकले होते. पण त्यामुळे झालेला आनंद आपल्याला

दाखवावासा का वाटत नाही याचे कारण मात्र तिला काही केल्या सुचेना. हा संकोच, ही लज्जा कशाचे द्योतक आहे याचा उमज तिच्या मनाला पडता पडेना. विवाहित स्त्रीला याचे जे कारण माहीत असते ते आपल्या बाबतीत खरे नसून तसल्या प्रकारचा संकोचही आपल्याला वाटत नाही याबाबत तिची खात्री होती. उन्हाने काहिलून गेलेल्या पिकावर जलवृष्टी व्हावी; त्रस्त, दुखलेल्या मनाला आराम लाभावा म्हणून आम्रवृक्षाखाली आसरा घ्यावा आणि वसंतातील वहराच्या सुगंधाने भारावलेल्या समीराचा अंगाला स्पर्श होऊन मोतीचुराच्या वर्षावाने सर्वांग पुलकित व्हावे; पाण्यासाठी आसावलेल्या वाटसरूने शीतल जलाची आशा करावी आणि हिमतुषारांचा अवसेक त्याला लाभावा–अशी काहीशी प्रमदेची स्थिती झाली होती.

मनाच्या ह्या असल्या अवस्थेतच ती बाहेर पडल्याने तिला आपली दृष्टी कुणाकडेच लावावीशी वाटली नाही. ती खाली पाहत चालली होती. जणू बाहेरचं हे जग तिच्या आनंदाला दृष्ट लावायला टपले होते. तिला बाह्य जगाचा संपर्क नको होता. अंतरीच्या विश्वात उभविलेल्या गगनचुंबी सुवर्णमंदिराकडे तिला वेध लावावयाचा होता.

गेली तीन वर्षे तिने आपल्या अंतरीचा संसार व्यवस्थित केला होता. अंतःकरणातील सर्व वस्तूंची नीट लावालाव करून जेवढ्या म्हणून चांगल्या गोष्टी तिजजवळ होत्या त्या आपल्या सुकोमल अंजलीत भरून अर्पण करण्याची तिने तयारी केली होती.

बागवानाने तऱ्हेतऱ्हेची फुले फुलवावी, प्रत्येक फुलाने विकसित होऊन अर्पणोत्सुक व्हावे आणि मागणी मात्र विशिष्ट फुलांची–गुलाब–गेंदाचीच व्हावी !

प्रमदेजवळ काय नव्हते ? रूप, गुण, सर्वच तिला लाभले होते. संपूर्णता, संगती, साम्य जणू तिच्या रूपाने आकाराला आली होती. तिने सर्व परिस्थितीत आपला तोल संभाळला होता !

आणि त्यामुळे आज तिला राहून राहून वाटे ते हे की, जे तिने गेल्या तीन महिन्यांत रचले, उभविले ते ढासळून पडले की काय ? एखाद्या राजमंदिरातील मूल्यवान सामानाची सतत जतन-जोपासना करीत राहावे आणि त्याचे कधीच काम पडू नये–अशी तिच्या अंतःकरणाची स्थिती झाली होती. तिने किती तरी गोष्टी तिथे जतन करून ठेवल्या होत्या पण राजमंदिराच्या धन्याला त्याचे कधीच काम पडले नव्हते. हीच, हीच जाणीव आज तिला इतक्या तीव्रतेने झाली की, त्यामुळे तिच्या हृदयाचा थरकाप झाला. काही वेळापूर्वीच जीवन-स्तोत्राचा उद्गाता ज्या सूक्तातील पुण्यमय शब्द शिंपून गेला, त्यातील कित्येक ऋचा तिने कायावाचामनसा आपल्या अंतरी सगुण करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्या सगुण मूर्तीकडे तिचा राजा पाहायलाही तयार नव्हता.

'मग आपण जगतो आहोत ते जीवन कोणते ?' एक अस्फुट उद्गार तिच्या ओठातून बाहेर पडला.

लौकिक दृष्टीने जीवन असे होते की, प्रमदेच्या असमाधानाबद्दल तिला कुणीही नावे ठेवावी. कन्या वरते ते रूप, माता इच्छिते ते वित्त, पिता पाहतो ते सुख आणि इतरेजनांची स्वादतृप्ती या साऱ्या लोकरीतीला मान्य असलेल्या गोष्टींनी तिचा विवाह सिद्ध झाला होता. मधुकरात शोधूनही न्यून नव्हते. रूपयौवनाची देणगी, पैसा, प्रतिष्ठित अशी सब्-जज्जाची नोकरी, राजाराणीचा संसार, आनंदग्रंथींनी दोघे निगडित झालेली !

म्हणून अशा या आनंदात प्रमदा आज जे असमाधान घेऊन आली त्याची कल्पना मधुकरला होणे दुरापास्त होते. जी वाक्ये ती आज आपल्या मनाशी आळवीत होती ती लौकिकाच्या कक्षेबाहेरची होती. —‘ जे जीवन व्यापक नाही ते जीवन नव्हे, तू आपल्या मुखाने दुसऱ्याच्या कल्याणाचा संकल्प कर, हजारो मुखे तुझे कल्याण इच्छितील. शेणात वाडे बांधून राहणारे शेणकिडे कितीही भोठे असले, सुंदर असले तरी अखेर ते शेणकिडेच. ’—

मधुकराला हे सगळे अगम्य आणि म्हणून अप्रस्तुत होते. म्हणूनच प्रमदेने दारात पाऊल टाकताच त्याने उद्‌गार काढला—

“ ओऽहो, पमा आज इतका उशीर ? आम्ही किती वेळ झाला, घरी आलो, तुझी वाट पाहून थकलो अगदी. ”

“ असं ? ”

“ म्हणजे काय ? गेली कुठं होतीस तू ? ”

“ व्याख्यानाला. ”

“ कुणाच्या ? ”

“ सकाळी आलेली निमंत्रण-पत्रिका एवढ्यात विसरायचं झालं ?

“ अरेच्या ! आता आठवले. राणी, तू समोर असलीस की श्रुतिस्मृती पळून दडी मारून बसतात. ”

एरवी या विनोदाने मधुकर जो हसला त्यात प्रमदेने गुलाल फेकला असता. आज मात्र त्या हिरकण्या जणू तिने गिळल्या होत्या !

“ मग काय, व्याख्यान चांगले झाले ? ”

याचे उत्तर मधुकर अर्थांशाने ऐकेल असा तिचा पूर्वीचा अनुभव नव्हता.

“ फार छान झालं व्याख्यान. ”

“ आवडलेलं दिसतंय राणीला. चेहराच सांगतोय तुझा. ”

चेहेराच सांगतो ! स्लेट पाटीवर जणू खिळा घासला गेला !

“ बरं, आत येशील की नाही ? ”

या प्रश्नाचे नाही असे उत्तर प्रमदेच्या ओठांवर येऊन गेले.

“ कपडे बदलावयाचे असतील ना ? ”

नुसत्या तिमिरचित्रावरूनही एखाद्या तरुणीच्या यौवनपूर्ण दशेची संपूर्ण कल्पना यावी तद्वत् तेवढ्या एकाच प्रश्नाने तिचा नित्याचा कार्यक्रम उभा राहिला. आता सूर्य मावळला आहे. 'मित्र' आता बारा तासांनी येऊन आपला प्रकाश देण्याचा कार्यक्रम सुरू करील. तोवर कुणाच्या तरी आश्रयाने जीवयात्रा आक्रमावयाची व उजाडेपर्यंत वाट पाहावयाची. आता कपडे बदलावयाचे, नंतर जेवण, नंतर विश्रंभालाप, नंतर गुजगोष्टी. आणि निदान आजच्या दिवसापुरती प्रमदेने अशी इच्छा केली की, आपण आपल्या मनाशी विचार करीत स्वस्थ निवान्त पडावे तर ते अशक्य होते !

" छे, छे, आपण जगतो ते नुसते उकिरड्यावर. हे जीवन नव्हे. आपले शरीर जगते. मन जगत नाही. हा नुसता कर्दम. येथे खळखळणारा प्रवाह नाही. कोरडी जमीन पण नाही. चिखल, नुसता चिखल ! यात पाऊल टाकायचे म्हणजे प्रगतीची आशा नाही. पाय अधिकाधिक खोल जाणार ! उद्धाराच्या प्रयत्नांनी अधःपातच होणार !"

नित्य उपयोगाच्या, नित्य उपभोगाच्या, नित्य विलासाच्या सर्व उपकरणांचा तिला आज उबग आला. कुठूनतरी सतत घाण यावी व सुगंधी द्रव्यातूनही तो भपकारा येत राहून जीव घाबरा व्हावा.

मध्यरात्रीनंतर प्रमदेला निवान्त वेळ मिळाला. ती आपले कमलनेत्र मिटून थकल्यागत निपचित पडली. आपल्याला आज काय झाले हे तिचेच तिला कळत नव्हते. एक असह्य हुंदका तिच्या ओष्ठसंपुटांना न जुमानता बाहेर पडला. आणि कितीतरी वेळ तिची आसवे उशी भिजवीत राहिली.

किती वेळ गेला कुणास ठाऊक ! तिच्या छातीवर कुणाचा तरी नाजूक हात पडला. तिने नित्यपरिचयाने हळुवारपणे कुरवाळला. तिच्या शेजारी झोपलेल्या तिच्या बाळाचा तो झोपेतील चाळा होता नुसता.

अंधारात चाचपडणाऱ्याला दीपक दिसावा, बुडत्याला मृणालनालाचा आधार सापडावा. प्रमदा बाळ होता त्या कुशीवर वळली. बाळाला तिने अधिकच जवळ घेतले. त्या प्रेमवर्षावात अपराधाची जाणीव होती. सायंकाळपासून तिने त्याची सेवा नुसत्या हाताने केली होती. मनाने नव्हे. मातेचा नाजूक स्पर्श बालकांना सुखाचा असतो. पण ते बाळ एकदम रडायला लागले. साधूवर संकट आले तर त्याची सहनशीलता जागते. बालकाजवळ त्याच्या अश्रूंचे शस्त्र असते.

प्रमदा पार विरघळली. आपल्या जीवयात्रेला चिखल संबोधून या कमळाला अव्हेरिले या टोचणीने तिने बाळाला स्नेहभराने कुरवाळिले. या कर्दमी आपण जरी जास्त फसणार असलो तरी हे कमल वरवरच जाईल. त्यात सौंदर्य भरेल. उज्ज्वलता येईल. आपल्या अंतरी सगुण केलेल्या ऋचा आपले सर्वस्व घेऊन आलेल्या या जीवनपुष्पात सौरभाच्या रूपाने आपले अस्तित्व प्रकट करतील. हे पुष्प सौरभ निर्माण

करणाऱ्या ईश्वराच्या चरणी वाहिले जावे असा श्रद्धारूप प्रयत्न करणे तर आपल्या हाती खासच आहे.

तिला निवल्यासारखे वाटले. आणि गार वाऱ्याच्या झुळुकेने जणू ती विश्रब्धपणे निद्रेच्या स्वाधीन झाली !

२०।९।४६

९५

पायात काटा, जीवाला व्यथा

किती तरी वर्षांनी आज मी मधूला पाहिले. आता तो फारच चांगला दिसायला लागला आहे. ठसठशीत नाकडोळे, उंच, मजबूत हाडपेर. तारुण्याचा विकास व्हावा तर असा, असे विचार त्याच्याकडे पाहून मनात येतात. लढाईनिमित्त तीन-चार वर्षे या देशाच्या बाहेर काढून तो परत आला आहे.

मी त्याचा शिक्षक होतो. माझ्याबद्दल त्याला सद्भाव होता. मीही याला अगदी लहानपणापासून पाहत आलो होतो. त्याच्या व्रात्यपणाबद्दल, नाही नाही त्या युक्त्या शोधून काढून वर्गामध्ये गोंधळ करण्याबद्दल, त्याला सहन करावे लागले हे खरे; पण मला त्याच्यापेक्षाही जास्त मानसिक त्रास झाल्यावाचून राहिला नाही. त्याच्या अंगाला माझ्या कमकुवतपणामुळे मला चार-दोन वेळा हात लावावा लागला. सात आठ वर्षांचे ते खोडकर पण कोवळे पोर, एवढासा कान धरला तरी अगदी कळवळत असे ! आणि माझे मन त्यामुळे कित्येक दिवस कष्टी होई. मी स्वतःला अतिशय संभाळले, शिकस्त केली. पण मानव आपल्या जीवनाच्या प्रयोगात अल्प-सफलच राहिलेला आहे.

आज मधूच्या आगमनाच्या आनंदाबरोबरच त्याच्या भरदार चेहऱ्यामधून पंधरा वर्षांपूर्वीचा त्याचा कोमल मुखडा माझ्यासमोर उभा राहिला. शरीराच्या जखमा भरून निघतात, मनाची जखम मात्र सततची खुपत राहते, ह्याचे प्रत्यंतर मला त्या दिवशी अतिशय तीव्रतेने आले.

"मधू, तू खरोखर नशीब काढलंस. आपल्या शिक्षणाचा उपयोग केलास. आयुष्याच्या खाचाखळग्यातून तू स्वतःला सुखरूपपणे निभवून नेलंस. मला तुझ्या यशानं, उत्कर्षानं फार फार बरं वाटतं. तुझ्या यशाबद्दल ईश्वराची प्रार्थना करण्यात मला अनुपम आनंद नेहमीच वाटत आला आहे.

माझा आवाज काहीसा गदगदून आला होता. आणि पुष्कळसे जग पाहून

आलेल्या मधूचेही अंतःकरण भावविवशतेपासून मुक्त झाले नव्हते. त्याने सरळ माझ्या पायांवर डोके ठेवले आणि–

" हे सगळं तुमच्यामुळं, तुम्ही केलेल्या संस्कारांमुळं. " एवढेच शब्द कसेबसे त्याच्या मुखातून निघाले.

मला वाटते, ह्यापेक्षा जास्ती सुखाची आणि मोबदल्याची अपेक्षा गुरू कधीच करीत नसावा. मला त्या वेळी ज्या निरुपम आनंदाचा प्रत्यय आला, त्याचे वर्णन करणे शक्य नाही.

एका दृष्टीने मधू खरोखर भाग्यवानच. त्याला त्याच्या गुरूबद्दलची भावना बोलून दाखवायची संधी मिळाली. मला माझ्या गुरूविषयी बोलताच आले नाही. क्रिया आणि प्रतिक्रिया यांच्या संघर्षाने माझ्या गुरूपासून मला जे काय शिक्षण मिळविता आले, त्याच्याच मोबदल्यात आज मधुकराच्या तोंडून निघालेले सोन्याचे बोल मला लाभले.

आणि म्हणून मधूच्या शब्दांनी गत दिवसांच्या कितीतरी आठवणी माझ्या मनाच्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या.

आज जग पुष्कळ सुधारले आहे, असे मोठमोठे लोक सांगतात. शिक्षकाच्या दुनियेत देखील नवे आदर्श, नवे संस्कार, नवे विषय, नवे विचार मांडले गेले आहेत, अशी ग्वाही दिली जाते. आजचा शिक्षक मनाने अधिक समंजस, संयमी, आपल्या आचरणामध्ये शिक्षणशास्त्राचे नियम आणणारा, असा मानला जातो. कुणास ठाऊक काय असेल ते ! आज विद्यार्थी होता आले असते, तर या गोष्टीचे प्रत्यंतर अजमावण्याची संधी मिळाली असती. पण ते आता शक्य नाही.

माझ्या बालपणी आम्हांला शिकविणाऱ्या रामजी मास्तरांनी शिक्षणशास्त्राशी ओळख करून घेतलेली होती किंवा नाही, हे कळायला आज मार्ग नाही. शिक्षकाची नोकरी करावयाची ती पंधरा-वीस रुपये मिळतात म्हणून, खेड्यात प्रतिष्ठा मिळते म्हणून, एवढा एकच प्रामाणिक उद्देश त्यांच्यापुढे असावा. नाहीतर आजच्या शिक्षणाच्या साधनांपैकी एकाचा तरी उपयोग त्यांनी केला नसता काय ?

त्यांची सततची आठवण माझ्या शरीरावर कायमची राहील, इतके त्यांनी मला मारले आहे आणि तरीही त्यांची आठवण मला सुखद वाटत आहे ! त्यांच्या माराबद्दल घरी तक्रार करायची सोय नव्हती ! माझे वडील गुरूला ब्रह्मा, विष्णू, महेश मानणाऱ्यांपैकी होते. शिक्षकांनी मारले आणि घरी तक्रार केली, तर तितकाच मार घरी मिळत असे. आईची तेवढी निरपराधीपणाबद्दल खात्री होती.

मी मार खाण्याइतका व्रात्यपणा खरोखरच करीत नव्हतो असे मला वाटते. वर्गाचे कप्तानपद मला मिळाले होते. आमच्याकडे खेळल्या जाणाऱ्या देशी खेळांत

देखील माझ्या वयाच्या मानाने मी पुष्कळच निष्णात होतो. जे जे शैशवकाळी शोभा देईल, तेवढे सगळे माझ्यात होते.

फक्त एकुलते एक वैगुण्य होते, आणि ते म्हणजे सकाळी सात ते दहा आणि दुपारी दोन ते पाच सतत वर्गात बसून राहण्याचा मनस्वी कंटाळा !

तो वेळ ज्या ज्या रीतीने सह्य होईल त्या त्या सर्व गोष्टींचा मी अवलंब करायचे सोडीत नसे. माझ्या शिक्षकांना रोषाचे आणि ताडनाचे कारण त्यामुळे सापडत असे.

ह्या विरंगुळ्यासाठी करावयाच्या गोष्टींपैकी एक प्रमुख गोष्ट म्हणजे खाद्यपदार्थ खिशात भरून नेणे आणि 'सहनौ भुनक्तु' च्या तत्त्वाचा अगदी बालपणापासून अवलंब करून विद्यार्थ्यांची मैत्री वाढविणे ही होय !

दुपारी दोनला शाळा सुरू होई. वडील बंधू इंग्रजी शिकण्यासाठी मावशीकडे राहत असे. वडील कामावर जात. घरी आई आणि मीच तेवढे असू. आईची झोपेची वेळ आणि आमची शाळेची वेळ या बरोबर जुळत. जाताना आईला खायला मागावे आणि अर्धवट झोपेतून तिने उठण्याचा कंटाळा करून 'फडताळाच्या अमक्या अमक्या डब्यातून काढून घे' असे म्हणावे. मला सदर परवाना मिळत असे. आणि डब्यातील वस्तू 'खलास' झाली नाही तोवर मी आईच्या मागे भुणभुण लावीत नसे.

घरची आमची गरिबी. तहानलाडू किंवा भूकलाडूसाठी गोडधोड आमच्याकडे नसे. कुठे चणे, कुठे चुरमुरे, कुठे लाह्याफुटाणे, असेच असायचे. पण त्यालाही पैसे लागतात. काही नसले की आई म्हणायची 'आज आपल्याकडे काहीच नाही. तुझ्या काकूचे एखादे कठीण काम कर म्हणजे ती देईल तुला.' या उत्तरावर रुसण्या-फुगण्यात अर्थ नव्हता. घरी नसले म्हणजे ते रडून जाजावून येत नसते ही समज मला वाटते, माझ्यात फार लहानपणापासून असावी. आज आई त्या प्रसंगाची आठवण काढते आणि सांगते की, 'तुला वेळी बिछान्यावरची चादर फाडूनसुद्धा चड्डी, सदरे शिवून दिले; पण हे बाईट दिसतात किंवा घालत नाही, असे तू कधीही म्हणाला नाहीस !' हे सांगताना तिचा आवाज भरून येतो आणि अत्यंत जवळिकेच्या भावनेने मला फार बरे वाटते. असो.

माझ्या खाऊच्या मोबदल्यात काकू झाली तरी रोज कुठले काम देणार ? रोज तिच्या घरावर संसार मांडून बसलेल्या वेलीवर भोपळा थोडाच लागणार की माकडाने उड्या मारीत घरावर चढावे आणि भोपळा तोडून शाबासकी आणि खाऊ मिळवावा ?

असे 'फुक्की' चे दिवस कंटाळवाणे जात. रामजी मास्तर दुपारच्या तासाला मला गणिताची उदाहरणे द्यायला सांगत आणि आपण खुशाल टेबलावर पाय ताणून घोरू लागत. असली नामी संधी काही खायला-प्यायला नसले, तर फुकट जाई. मी

गरीब होतो हे खरे; पण माझ्या वर्गातील मुले माझ्यापेक्षाही गरीब होती. रोज त्यांनाही काही आणणे शक्य नव्हते.

त्यामुळे आम्ही खाण्याच्या वस्तूंच्या व्याख्याच बदलवून टाकल्या. आमच्या घरी वर्षभर पुरतील इतके चिंचेचे गोळे मीठ मिसळून भरून ठेवले जात. आटाळ्यावर दोन मोठी गंगाळे त्याने भरलेली असत. हा रतीब मला आणि माझ्या मित्रांना बरेच दिवस पुरला. आणि कितीही चिंच खाल्ली तरी खोकला होत नाही, याबद्दल आम्हा सगळ्यांची खात्री झाली ! पुढे एक दिवस आईच्या लक्षात येताच तिने डोळा दाखवून मला मोडता घातला. शेवटी घट्ट वरणाचा गोळा आणि पोळ्याच न्यायला मी सुरवात केली. पण सोवळ्याओवळ्याच्या कल्पनेने तेही लवकरच उघडकीस आले व बंद झाले !

शेवटी मी जे केले ते माझी चूक नसताही माझ्या अगदी अंगाशी आले.

आमच्या घरी फार नामी अशी आंब्याची झाडे होती. स्वादिष्ट, टिकाऊ आणि विपुल असे आंबे आमच्या घरी येत असत. माझ्या मोठ्या बहिणीसाठी सासरी पाठवावयाला आई चांगल्या दोन मोठ्या बरण्या भरून लोणचे करून ठेवीत असे. मीठमसाला भरून चवदार केलेली आंब्याची फोड देखील शाळेत न्यायला वाईट वस्तू नाही, असे माझ्या मनाने एक दिवस घेतले व आईचा डोळा लागताच मी एक मोठा पळसाचा द्रोण लोणच्याने भरून खिशात कोंबला व शाळेत पळालो.

नित्यनियमाप्रमाणे रामजी मास्तरांनी तीन वाजता घोरण्यास सुरवात केली. त्यांचे घोरणे आम्हांला कोकिळेच्या मधुर कूजितासारखे भासत असे. मी नित्याप्रमाणे मुलांना एक गणित सांगितले आणि शांत राहण्याची खूण करून खिशातला द्रोण काढला. सर्व लोणचे खिशात पालथे झाले होते. तेलाने व हळदीच्या मसाल्याने खिसा बरबटला होता. मी एकेक फोड प्रत्येकाला दिली.

खेड्यापाड्यातून गरिबांना लोणचे हे देखील त्या वेळी पक्कान्नापेक्षा मोलाचे वाटत असे. त्यांच्या घरी ते कुठले असणार ? आणि ते करण्याची उसंत व उरक तरी कुणाला ? कुठे पांढरपेशाच्या घरी खाल्ले तेवढेच ! आमच्या मास्तरांच्या तोंडाला 'चव' नसली की त्यांच्या सांगण्यावरून मला त्यांच्या घरी वर्षातून कितीतरी वेळ लोणचे नेऊन द्यावे लागे. मला कसानपद मिळवून द्यायला त्याचा काही कमी उपयोग झाला नाही !

अशी दुर्मिळ मोलाची वस्तू वर्गात मुलांच्या हातावर पडताच मग काय ? सर्वांच्या तोंडाला अक्षरशः पाणी सुटले. चोखून, चोखून, जिभेने 'प्ट प्ट' असे आवाज करून, ओठांवर आलेले पाणी आत ओढीत, त्यांनी ताव मारायला सुरवात केली. एरवी चणे-मुरमुऱ्यांचा आवाज न होऊ देण्याची दक्षता घेणारी मुले; पण त्या दिवशी त्यांचा संयम सुटला आणि त्यांच्या तोंडचे आवाज अजाणता इतके जोराने होऊ लागले की रामजी मास्तरांची झोप उघडली.

त्यांनी चिडून आमच्याकडे पाहिले. आमच्या स्लेटपाट्या समोर पडलेल्या आणि हातातील लोणच्याची फोड प्रत्येक जण चोखीत असलेला—असे दृश्य त्यांना दिसले. सर्व मुले या वज्रपाताने भिऊन माझ्याकडे पाहू लागली. हातावरील फोडी मात्र कुणी लपवीना. क्षण दोन क्षण मास्तर चूप होते. नंतर माझा अवतार, रंगलेला खिसा, फोडी वाटताना भरलेले हात आणि ते चोखीत असताना तोंडावर पडलेले डाग—सर्व प्रकार त्यांना कळून चुकला ! काय म्हणावे, काय करावे, असे त्यांना किंचित काल झाले असावे. कारण त्यांनी मोठा विचित्र प्रश्न मला जरा वेळाने विचारला.

" अशी लोणच्याची नासाडी करायला तुझी आई देते तरी कसे रे इतके लोणचे ? "

माझी भीड एकदम चेपली. मला वाटले, शाळेची शिस्त बिघडल्याबद्दल मास्तर काही रागावत नाहीत. अगदी सरळ म्हणालो,

" आमच्या घरी दोन बरण्या भरल्या आहेत सर. उद्या तुम्हांला हवे तर आणखी आणून देईन. "

याचा परिणाम मात्र फार विपरीत झाला ! ते एकदम चिडून माझ्यावर ओरडले. मी ब्राह्मण. ते चिडले की मला ' बामण्या ' म्हणून संबोधीत. ते एकदम म्हणाले,

" ए बामणा, चूप राहा. नाक ठेचून हातात देईन ! "

मला त्यांचा राग समजलाच नाही. नाक ठेचण्याबद्दल मला काहीच म्हणायचे नव्हते; पण ते ठेचलेले माझे नाक माझ्याच हातात देण्याचे प्रयोजन मला कळले नाही आणि " माझे नाक माझ्या हातात घेऊन मी काय करणार सर ? " असे मी सहज म्हणताच टेबलावरचा रजिस्टर आखावयाचा रूळ दाणकन माझ्या पाठीत बसला. मला त्यांनी दोन्ही कान धरून उचलले, स्वतः टेबलावर उभे राहिले आणि तेवढ्या उंची-वरून सात-आठ वर्षांच्या मला त्यांनी तसेच धाडकन खाली सोडले. माराबद्दल घरी तक्रार करायची नसल्याने रडण्यात अर्थ नव्हता. मी जसजसा निमूटपणे निश्चयाने सहन करीत गेलो, तसतसा निगरगट्टपणाचा दोष येऊन मास्तरांचा राग वाढत गेला व मी ज्या कडेवर पडेन त्या कडेवर त्यांनी माझी कणीक तिंबून काढली.

सामर्थ्यांचा साक्षात्कार झाला की माणसाची प्रवृत्ती सहजच भीतीने समर्थ माणसाला अनुकूल अशी होते. आमच्यापैकी चार-दोन मुलांनी तेथल्या तेथे माझ्या गणिते न घेण्याचा, रोज चणे-मुरमुरे, घट्ट वरण, चिंचेचे गोळे आणण्याचा सर्व प्रकार सांगितला. अभ्यास होत नाही, विश्वासघात, घाणेरडे कपडे, आपल्यापेक्षा लहान मुलांना जरबेत ठेवणे, माझ्या वडिलांनी लाडावून ठेवून आठ वर्षांच्या घोड्याचे उशिरा शाळेत नाव घातल्याने मी ' बैलोबा ' ठरणे—काय नाही नाही त्या कागाळ्या निघाल्या आणि पुनः पुनः अवसान येऊन रामजी मास्तरांनी तास दीड तास माझ्यावर हात निवविले. शेवटी केवळ सहन होईना म्हणूनच मला कळवळ्याने रडू कोसळले.

दाबण्याचा प्रयत्न करूनही ते दबता दबेना. आजूबाजूला सर्वत्र प्रतिकूलतेच्या नजरा माझ्याकडे पाहत होत्या. मला बसवेना. सर्वांग दुखत, भाजत होते.

मी पाटी उचलली आणि एकदम बाहेर धूम ठोकून पळत सुटलो.

घरी लवकर गेलो तर कारण सांगावे लागणार, या विवंचनेत माझी गती हळूहळू मंदावली. बाजारचव्हाठ्यावर आलो, तेव्हा मला विचारच पडला. माझ्या घशाला तहानेने कोरड पडली होती. जवळ विहीर होती. एक गोंडाची बाई पाणी काढीत होती; तिला पाणी मागितले. ओंजळीने घटाघटा पाणी प्याल्याने अंमळ बरे वाटले. चालण्याचा, खेळण्याचा उत्साह नव्हता. रडके तोंड पाणी लावून कोटाच्या बाहीने पुसून काढले व शाळा सुटण्याची वेळ होईपर्यंत उदास, विषण्ण मनाने मी तिथेच बाजारातील ये-जा पाहत बसून राहिलो.

या वेळी माझ्या मनात काय विचार चालले होते, हे आता आठवत नाही. पण एवढे नक्की आठवते की, मला हळूहळू अंधारी आल्यासारखे वाटू लागले. माझे डोके दुखू लागले, डोळे जळू लागले, पाय उचलण्याची शक्ती राहिली नाही. असे का होते, कळेना. हळूहळू कसाबसा तोल संभाळीत मी घराच्या रस्त्याला लागलो. उंबऱ्यावरच ठेच लागण्याचे निमित्त होऊन धाडकन पडलो आणि संयम सुटून मला पुनः रडू कोसळले.

आई एकदम धावली. तिने मला जवळ घेतले. अंगाला हात लागताच ती ओरडली, "किती तापले आहे अंग तुझे ! कधी भरला ताप तुला ?"

माझा उमाळा अनावर झाला. बिछान्यावर पडताच सावर सुटला आणि अश्रू गाळीत मी कधी बेशुद्ध झालो, हे मला कळलेच नाही.

रात्री वडील आले. त्यांनी काय हवे, नको, असे एक-दोन प्रश्न विचारले. डोक्यावर हात फिरवून मला कुरवाळले.

"कसे वाटते ? का ताप आला ?" इत्यादि प्रश्नांना माझे डोळेच उत्तर देत होते. अंमळशाने काकाही आले. माझे उन्हात खेळणे, हूडपणा करणे, ओल्या कपड्यानिशी शाळेत जाणे, खेळून येताबरोबर ढसाढस पाणी पिणे, इत्यादि सर्व कारणे वडील माणसांच्या दृष्टीने माझ्या आजाराला कारण झाली होती. मी का रडतो याचे उत्तर खोदून खोदूनही मी दिले नव्हते. कारण तशा परिस्थितीत कागाळी करण्याबद्दल वडील रागावले, तर ते सहन करण्याचे त्राण माझ्यात नव्हते.

दुसऱ्या दिवशीही ताप म्हणावा तसा कमी झाला नाही. हातपाय दुखू लागले. आजारी असल्याने मी शाळेत येत नाही असा रामजी मास्तरांना निरोप गेला. चांगला असतो तर शाळेत जाण्याची पंचाईतच पडली असती. आजारी पडलो, बरे झाले, असे वाटून गेल्याचे मला नक्की स्मरते.

शाळेत निरोप जाऊन तास दोन तासही झाले नाहीत, तोच "कसे आहे वापूचे ?" अशी घाबरून विचारणा करणारा रामजी मास्तरांचा आवाज माझ्या कानांवर आला आणि दुसऱ्या क्षणी वडिलांना औपचारिक नमस्कार करून ते सरळ माझ्या बिछान्यावर येऊन बसले. त्यांचा हात थरथर कापत होता. श्वासोच्छ्वास जोराने होत होता. लागलीच त्यांनी माझे डोके आपल्या मांडीवर घेतले आणि मस्तकावर हात फिरवीत ते काही विचारू लागले. तेवढ्यात त्यांच्या डोळ्यांतून एक थेंब पटकन माझ्या मस्तकावर पडला.

"वापू, रागावलास माझ्यावर ? बोल ना माझ्याशी."

मी उत्तर दिले नाही. आता आपल्याला खूप रडे कोसळणार या भीतीने मी ओठ दातांखाली दाबले.

"आता मी तुला कधी मारणार नाही. पण तू अबोला नको धरू माझ्याशी. माझे चुकले रे. काल माझ्या अंगात भूत शिरले होते—अरेरे—"

मी त्यांच्या कुशीत मान लपविली.

"वापू—" ते एकदम रडायला लागले.

माझे रडे तर अनावरच झाले !

या सबंध प्रकाराला एखाद दुसरे मिनिट लागले असेल. हा काय प्रकार आहे हे आई-वडिलांच्या लक्षात येईना. वडिलांचे वय पुष्कळच असल्याने त्यांनी मास्तरांना एकेरीनेच विचारले,

"का रे, रामजी, काय झालं याला ? कालपासून अंग दुखते एवढेच म्हणतोय आणि रडतोय आपल्याशीच."

"काय सांगू कपाळ माझे ?" असे म्हणून मास्तर मला अधिकच आवळून धरू लागले.

"अरे, पण झाले काय ते तर सांग—"

"म्हणजे ? याने तुम्हांला काहीच का शाळेतले सांगितले नाही ?"

"शाळेतले तो कधीच काही सांगत नाही. का मुलांशी मारामारी झाली का ? तो जरा खोडकरच आहे."

मास्तरांनी आवंढा गिळला आणि माझ्या कपाळावर थोपटत एका हाताने आपले अश्रू पुशीत घडलेला सर्व प्रकार त्यांनी निवेदन केला. मी निमूटपणे सर्व मार सहन केला, हे सांगताना मास्तरांचा आवाज इतका भरून आला की ते काही वेळ स्तब्धच राहिले.

नंतर वडिलांना म्हणाले,

" काकाजी, माझ्या मारण्यानेच याला ताप आला आहे. एवढासा पोर ! माझ्या-सारख्या राक्षसासमोर मार सहन करण्यावाचून करू तरी काय शकत होता ? "

" अरे, पण तू असा रडतोस का एखाद्या लहान पोरासारखा ? मी तर तुला काहीच म्हटले नाही. "

" म्हणूनच तर वाटते इतके ! हे पोर तसे फार चांगले आहे. मन ओढून घेते. पण माझाच तोल जातो कधी कधी. हवे ते म्हटले तरी सर्व निमूट सहन करते आणि मला लाजविते नेहमी. आजपासून कानाला खडा--"

" तो काय म्हणून ? जोवर त्याच्यासाठी तुझ्या डोळ्यांत पाणी आहे, तोवर तुझ्या मारण्यात अहित नाही. तू वाईट वाटून घेऊ नकोस. अरे, आजकाल कुणी कुणाला मारीत नाही व कुणी कुणासाठी रडत नाही. जा, घरी जा. तो उद्या बरा होईल आणि येईल शाळेत. तुझ्यापेक्षा त्याला माझीच भीती जास्त वाटते असे दिसते. कालपासून त्याने ब्रही काढला नाही तोंडून. माझेच चुकतेय--"

आता डोळे ओले करण्याची वडिलांची पाळी होती. आपल्यापेक्षा सामर्थ्याने मोठी असलेली मंडळी आपल्यासाठी रडताहेत ह्या कल्पनेने त्या वेळीही माझ्या मनाला इतके बरे वाटले की, माझे रडे थांबूनच गेले !

बरेच झाले मला मार बसला तो ! किती विलक्षण कल्पना होती ती !

कित्येकदा सांगूनही रामजी मास्तर माझा ताप हटेपर्यंत माझ्या खाटेवरून उठले नाहीत. आणि त्यांच्या डोळ्यांचा थेंबही खंडला नाही !

ही आठवण माझ्या सतत स्मरणात राहिल्यानेच मधूचा सगळा व्रात्यपणा मला अनेकदा सहन करता आला आणि माझ्या संयमाचे श्रेय मला मिळाले. आज वाटते रामजी मास्तर जिवंत असते तर त्यांच्या पायांवर मीही डोके ठेवून माझा उत्कर्ष त्यांना अर्पिला असता आणि त्यांच्या नेत्रांच्या पाझराने माझ्या हृदयाचे मळे मी शिंपले असते.

पण आता बाटून उपयोग काय ?

३।१०।४६

९६

ज्योतिर्मयी

मनस्वी कंटाळा आला आहे. मन व शरीर थकून गेले आहे. गार वाऱ्याने, थंड पाण्याने, शीतल छायेने बरे वाटण्याचे चिन्ह दिसत नाही.

आजच हे असे का वाटावे ?

आजवर जे ज्ञान मिळविले होते ते केवळ पुस्तकी. आजवरचे अनुभव म्हणजे केवळ इतरांच्या सांगीचेच ! इतरांनी जनता-संपर्काच्या गोष्टी केल्या, मी त्या ऐकल्या आणि मला बऱ्या वाटल्या. इतरांनी आजवर सांगितले--" खेडयातील जनता भोळी-भावडी आहे, खेडी जागली तर देश जागायला आणि या देशातील परकीयांचे उच्चाटन व्हायला वेळ लागणार नाही. " मला हे खरे वाटले. या आदर्श स्वप्नमधुर गोष्टीसाठीच जगावे आणि त्यासाठीच प्रसंग पडल्यास मरावे !

परंतु प्रत्यक्ष अनुभवाने जेव्हा हे सगळे इंद्रजाल विरायला लागले आणि ग्रीष्माचा दाह चटके देऊ लागला तेव्हा जाणवले की, जे करावयाचे ते साधे, सरळ, सोपे नाही खेडी जागवायची म्हणजे प्रत्येक ठिकाणी नवी ज्योत, नव्या पद्धती, नवे तंत्र हवे एकसंघ, एक साचा कामाचा नाही.

आजपर्यंत आठ खेड्यांतून १९४२ चा संदेश पोचविला. दरेक खेड्यात, दरेक वळी नवे नवे चूड वापरावे लागले. जे वाचले, जे कल्पिले, जे ऐकले त्यांपैकी एकही कामास आले नाही. आधुनिक शिक्षणाने चेहरा चिक्कणचोपडा, नीटनेटका ठेवायचा सराव झाला होता. त्या चेहऱ्याचा रंगही या देशाच्या जमिनीसारखा करून घ्यावा लागला.

जे कधीच मनाने व शरीराने केले नव्हते ते करावे लागल्याने कदाचित हा थकवा, हा उबग आला असेल. शरीर आणि मन कदाचित मला सांगत असतील— " इथून परत चल; तुझा महिमा जेथे वाढेल तेथे तू जा. "

म्हणून कदाचित हा अंधार, ही अप्रवृत्ती !

एरवी इथे ही जागा किती चांगली आहे ! आजूबाजूला सधन आमराईची गर्द सावली आहे. जवळून जाणारा शांत, निवान्त रस्ता. छोटीशीच विहीर पण स्वच्छ पाण्याने तुडुंब भरलेली. पाणी अमृतासारखे मधुर. गाव एका हाकेच्या अंतरावर. पाखरांच्या लल्कान्यांनी नुकतेच जागे झालेले. सूर्यनारायणाच्या स्वागतासाठी गृहिणींनी दारे उघडली आहेत. झोपड्यांतून निघणारा धूर वाऱ्याशी शिवाशिवी खेळत आहे. ग्राम-देवतेने जणू प्रभातसमयीच्या प्रसाधनांसाठी आपले केस मोकळे सोडले आहेत.

इथे मला कुणी संशयग्रस्त दृष्टीने पाहणारा नाही. पोलिसांचा ससेमिरा मागेच राहिलेला आहे. भीती नाही. कार्यारंभाला अडथळा नाही. सर्व परिस्थितीची अनुकूलता. फक्त अंमळ विसावा घेऊन गावात शिरायचे. वेचाळीसचा संदेश पोचवायचा एखादे महावस्त्र तुपात भिजवून त्रिपूर उजळावयाचा व त्या गावापुरता अंधार नाहीसा करावयाचा. चार-दोन फुलवाती, हाताच्या बोटांवर मोजण्याइतके दिवे मिळूनच जातील. ठिणगीने निर्जीव गवत पेटते. सजीव माणसाला प्रज्वलित करायला

कितीसा वेळ लागणार ? आठ गावांचा अनुभव आहे. घवघवीत यश लाभले आहे. नवव्या गावात असा काय त्रास पडणार ?

हे शेवटचे गाव. एवढे झाले की मग पोलिसांनी पकडले काय, मारले काय, कैद केले काय, सारखेच ! अंदमानात मग घर करावे लागो की देहाची चाळणी होवो, तमा नाही !

इतका दृढनिश्चय केला असताना, मृत्यूचे भय नाहीसे झाले असताना, साधना पूर्ण होत आली असताना हे असे आज खचल्यासारखे का वाटावे ? पहाटेपर्यंत काट्यागोट्यांनी भरलेली वाट अपरात्री तुडवीत असतानाही मन हुरूपात होते आणि आताच त्याला काय झाले ?

एक प्रश्न अवचित मनासमोर उभा राहिला, हे सगळे केले ते टिकेल का ? ह्या ज्योती क्षणात मंद, निस्तेज झाल्या तर ?

पण याचे उत्तर अगदीच सोपे होते. इथवर विचार करणारा मी कोण ? जे थोडया सद्‌गुणांनी मिळविले ते पुष्कळ दुर्गुणांनी नाहीसे व्हायला नको ही फलाशा धरणारा मी कोण ?

तथापि या उत्तराने मन निवले नाही.

मग काय ? इथे काहीतरी अशुभ घडणार ? मी पोलिसांच्या हाती लागणार ? त्याची ही रुखरुख आहे का ? की यापेक्षाही अशुभ असे काही घडायचे आहे ? मन जास्त संवेदनाक्षम असले की कुणाच्याही अपराधाचा, चुकीचा, पापाचा बोल आपल्यावरच आहे असे वाटू लागते. असे तर आज होत नाही ?

चाहूल कसली ही ? सशाच्या कानांनी ऐकले पाहिजे. आजूबाजूला बीळ शोधून ठेवले पाहिजे. माझ्या या असल्या मनःस्थितीत ही चाहूल ? कोण येत आहे ?

आमराईतून गावाकडे जाणाऱ्या निरुंद रस्त्याने खूप दूरवर नजर टाकली. लाल वस्त्र दिसत आहे. वसंतऋतूत फुलांच्या ज्योतींनी आसमंत दिपवीत असलेले पळसाचे झाड असेल कदाचित !

आकृती दिसू लागली. काखेत कळसा आहे. डोक्यावर चुंबळ आहे. स्त्रीची आकृती !

गावातून पाणी भरायला एक स्त्री येत आहे. तिच्याच पावलांची चाहूल आली होती. भिण्याचे कारण नाही. या जातीतील कुणाही व्यक्तीला 'माते,' म्हणून हाक मारताच मला दुपारच्या वेळी गोड घास मिळालेला आहे, माझ्या या भूमिगत अवस्थेत रक्षण मिळाले आहे. थंडी-वारा बाधू नये म्हणून माझ्या जन्मदात्या आईने मला बाळपणी पदराखाली घातले असेल ते मला आठवत नाही. पण तसा निवाऱ्याचा अनुभव मला या जातीच्या सान्निध्यात आलेला आहे.

माझ्या आईची जात आहे. भिण्याचे कारण नाही. या देशाने पूज्य मानलेल्या मातृदेवतेचे प्रभातीच्या मंगल समयी हे शुभदर्शन आहे !

आकृती पळसाच्या फुलांसारखी सुरंगी. वय वीस-बावीसपेक्षा जारत नसेल. आरोग्याची सर्व लक्षणे दिसत आहेत. हे असले निरागस, नितळ मांगल्य माझ्या दृष्टीस पडून मला शकुन देते आणि मी अभागी खिन्नविषण्ण होऊन बसतो !

ती आली आपले अस्तित्व जाणवीतच ! काखेतील कळशावर ताल धरीत, पावलाने साथ देत, झाडावरच्या पाखरांकडे सस्मित पाहत, प्रभातीच्या किरणांमुळे आपले अंतःकरण उजळले असल्याची ग्वाही देत देत ती आली. जणू भोवतालची सर्व चराचर सृष्टी तिला बोलावीत आहे, 'इतो इतो भगवति' असे म्हणत आहे आणि दोन डोळ्यांनी सर्वांकडे कटाक्ष टाकता टाकता तिची पुरेवाट झाली आहे.

विहिरीवर पोचताच तिने कळसा खाली ठेवला. आणि आनंदाने, उत्साहाने सर्वत्र पाहत रोजच्या सरावाने तिने आपला पोहरा विहिरीत टाकला. विहिरीच्या आरशात जणू वाकून तिने आपले रूप पाहिले. पोहरा बुडावा म्हणून त्याला एक-दोन हेलकावे दिले. विहिरीच्या तळझऱ्यापर्यंत मुळ्या गेलेल्या वृक्षाची फांदी फळभाराने वृक्षावर वाकावी--

--आणि तिने पहिल्याच हाताने जेव्हा सर्रकन् पोहरा ओढला तेव्हा तो विहिरीच्या अर्ध्यावर तरी आला असेल. कारण हाताची दुसरी खेच संपताच पोहरा भरून बाहेर निघाला. ते पाणी तिने जवळच असलेल्या सदाफुलीला व तुळशीला घातले. दुसऱ्या पोहऱ्याने तिने जनावरांना पाणी प्यायला लाकडाची एक छोटीशी ढोण होती ती भरली. तिसऱ्यांदा मात्र तिने पोहरा विहिरीत टाकला खरा. पण एकदम ओढला नाही. बराच वेळ विहिरीच्या काठावर उभी राहून आजूबाजूला ती पाहत राहिली.

आज कुणीच वाटसरू दिसत नाही. माझा तिसरा पोहरा फुकट जाणार काय?" ती आपल्याशीच म्हणाली, पण मोठ्याने ।

या क्षणाला अगदी मोह झाला की आपण पुढे व्हावे व त्या अमृतमधुर जलासाठी ओंजळ पुढे करावी. पण वैयक्तिक इच्छा दाबायला मी पुष्कळच शिकलो होतो.

तिला फार वेळ वाट पाहावी लागली नाही. समोरच्या पाऊलवाटेने कुणी तरी येताना तिला दिसले.

डोळ्यांसमोरचे झाड बाजूला होताच त्या वाटसरूला जे दृश्य दिसले ते त्याने आजवर जणू पाहिलेच नव्हते. दिवसचे दिवस अन्न न मिळालेल्याला जणू पंच-पक्वान्नांचा सुगंध आला. विषमाचा आजार झालेल्याला रुचकर खाद्य-पदार्थ दिसले.

विहिरीवर एक अनिंद्य सुंदर तरुणी उभी आहे. नाक-डोळे ठसठशीत आहेत सालईच्या झाडासारखे आरोग्य आहे आणि प्रसन्न मुखाने, स्वागताच्या भावनेने तृषार्ताला पाणी पाजायला हाती पोहरा घेऊन ती उभी आहे !

तिने स्वागत करावयाचे आणि आपण आपल्या मगदुराप्रमाणे, प्रवृत्तीप्रमाणे प्रत्युत्तर द्यावयाचे !

दुःशासनाला एकवस्त्रा, रजस्वला, करुण, सात्त्विक द्रौपदी अस्पर्श्य असूनही स्पर्शनीय वाटली आणि द्रौपदीला त्याला 'अनार्य' म्हणून देवाचा धावा करावा लागला.

"वाटेच्या वाटसरा, तहान लागली आहे ना तुला ?"

"होय, फार तहान लागली आहे."

"थांब. ताजा पोहरा काढते तुझ्यासाठी."

सर्वच अगदी अनुकूल. कोकिळासारखा मधुर स्वर, आंबेमोहराचा रंग, वारा वाहतो तोही शीतल सुखदायी !

वाटसरूचे ध्यान पोहऱ्यावरून उडाले. स्थिर झाले, ते तिच्या हातावर, तिच्या हावभावावर, कामाचा आटोप साधताना पदर सरकून उघड्या पडलेल्या उरोजांवर !

त्याची ओंजळ ढिली पडली. डोळ्यांची संपुटे उघडी झाली. काय पाहत होता तो ? काय हवे होते त्याला ? माझीच नजर लाजेने खाली गेली.

पोहरा वर निघाला. "घे पाणी."

त्याने ओंजळ पुढे केली. डोळे मात्र वर तिच्या मुखकमलाकडे. कोल्ह्याने क्षुधार्त होऊन हरिणीकडे पाहावे आणि जिभल्या चाटाव्यात !

ती दृष्टी ! त्या दृष्टीचे निदान करायला निमिषार्धही लागत नाही. ती बावरली. पोहरा ढिला पडला, त्यातले जीवन खाली जाऊ लागले. तिचे लक्ष नव्हते; त्याला पर्वा नव्हती !

तिला असह्य झाले. शरीराचा जो जो भाग अनवधानाने उघडा होता तो तो तिने क्षणार्धात झाकला, तिच्या हातचे पाणी पिऊन तृप्त झालेल्या तुळशीकडे व गाईकडे तिने नजर टाकली. तो भरलेला पोहरा सगळा जमिनीवर ओतून दिला आणि निर्भयपणे, निःशंकपणे आपली नजर त्या वाटसरावर रोखली—

"जा, जा, प्रवाशा ! आलास तसा आपल्या वाटेने जा. माझ्या हातच्या पाण्याने तुझे जहरच वाढत आहेसे दिसते. पाडाचा आंबा तुझा नसूनही तू त्याकडे आपली नजर लावतोस. आता येथे थोडा वेळ जरी घुटमळलास तरी माझ्या हातच्या दोराचा फटकारा बसेल."

प्रवासी स्तंभित झाला. हालला मात्र नाही.

" तू जा येथून. माझ्याजवळ माझ्यापुरते भरपूर बळ आहे. शिवाय सूर्यही वर आला आहे. वाईट वाटते ते तुझ्याबद्दल, तुझ्या जातीबद्दल. "

" कुणीही सुवासिनी देवाचे काम म्हणून वाटसरूंना पाणी पाजायचे अशाने सोडून देईल. ज्यांना ज्यांना जगण्याची इच्छा आहे त्यांना जिणे कठीण जाईल.....

" तू जा, अधर्माने धर्माला जिंकण्याचा तुझा प्रयत्न फळणार नाही. तू हे विष आता विहिरीविहिरीवर नेणार. तुझ्यासारखे वाटेचे वाटसरू येऊन पाणी मागतील. विहिरीतले पाणी विहिरीत राहील. हातचा पोहरा हाती आणि प्रवाशाला जीवन मिळणार नाही. कुणी कुणाशी बोलणार नाही. "

यानंतर ती काही एक बोलली नाही. तिच्या हातचा दोरखंड गरगर फिरत राहिला. प्रवाशाने आपली नजर फक्त एकदाच तिच्याकडे वळविली आणि त्यानंतर जणू त्याने पेटलेले रान पाहिले व तो अधोमुख होऊन निघून गेला.

मी त्याची वाट पाहून ठेवायला विसरलो नाही.

आता रस्ता वाहू लागला होता. गाई-म्हशी परस्पर विरुद्ध दिशांनी येत आणि निमूटपणे समोरासमोरून निघून जात. उत्तर-प्रत्युत्तर, साद-प्रतिसाद काही नाही. गुराख्याचा दंडुका मागे आहे म्हणूनच चालावयाचे, झाले !

तिने कशीबशी घागर भरली आणि पाऊल उचलले.

ते भगवे वस्त्र, तो उतरलेला आरक्त चेहरा, ती पावलांची मंदगती-पळसाची फुलज्योत दूर दूर पसरत चालली !.....

माझ्याशी बोलेल ती ? माझ्या माथी आताच कलंक फासला गेला आहे. तो पुसून काढावयाला मला संधी मिळालेली नाही. तरी देखील बोलेल का माझ्याशी ती ?

माझे सर्व नैतिक बल, सर्व सात्त्विक भाव, सर्व श्रद्धा पणाला लावून मी आडोशातून बाहेर आलो आणि तिला हाक मारली—

" ज्योतिर्मयी ! "

तिने मागे वळून पाहिले.

" ज्योतिर्मयी, थांब. "

आणि ती थांबली !

आता माझे नवचे गाव पेटायला कितीसा उशीर लागणार ?

१९।११।४३

९७

गोरी बायको

कोळशाच्या खाणीमधील काळ्याकुट्ट अंधारात देखील चमकून उठतो, त्याला हिरा म्हणायचे. पाऊल पाऊल धुळीने माखलेल्या रस्त्यावरसुद्धा जे चटकन दिसून येते त्याला नाणे म्हणायचे. सर्व घाण वाहून नेत असूनही जिच्या पाण्याला मळ लागत नाही तिला गंगा म्हणायचे.

याच अर्थाने डोमा हमालाचा कष्टाचा संसार रेटत दिवस काढणाऱ्या सखूला देखील रूपवती म्हणता येईल. डोमाची सखू आपले दिवसभराचे सर्व व्यवहार कुणाची ना कुणाची नजर पडल्यावाचून करूच शकत नसे. घराची झाडलोट लगबगीने आटोपताना, आपल्या दोन लहान मुलांचे नीट करताना आजूबाजूच्या स्त्रिया तिच्याकडे पाहत. तिच्या खोपटापासून एका फर्लांगावर असलेल्या नळावर किंवा अर्ध्या फर्लांगावरील कारखान्याच्या आवारातील विहिरीवर पाणी भरायला जाताना लोक तिच्याकडे टक लावीत. असे पाहणे बरे नाही याची जाणीव प्रत्येकाला असली तरी लढाईच्या जमान्यात पैसा स्वस्त झाल्यामुळे या गोष्टीची कोणी दखल घेत नसे.

अशी ही सखू जेव्हा काल रात्री अचानक वारली तेव्हा अनेकांना अनेक प्रकारे हळहळ वाटली. एक दिवसाच्या कामात चार दिवसांचे पोट निभेल इतके पैसे मिळाल्यामुळे उरलेले तीन दिवस रिकामटेकडेपणाने घालविणाऱ्या आणि स्वतःला तरुण रंगेल समजणाऱ्या मंडळींना सखू पुनः त्यांच्या गल्लीतून जाणार नाही म्हणून दुःख झाले; संसाराचा गाडा असा जड असतो आणि रस्त्याची चढण किती जिकिरीची असते याची कल्पना असणाऱ्या बाया-बापड्यांना सखूच्या मुलांकडे पाहून तिचा मृत्यू भयंकर वाटला नि त्यांच्या डोळ्यांत टचकन पाणी आले; नुकतेच लग्न झालेल्या आजूबाजूच्या तरुण मुलींना सखूचा धिंवसा गेला म्हणून भीती वाटली. माणूस जगतो तेव्हा कुणी फारशी दखल घेत नाही. मेल्यानंतर मात्र अनेक लोक परोपरीचे उद्‌गार काढतात.

डोमाला काय वाटले याची कल्पना येणे कठीण आहे कारण असे, की त्याच्याइतकी पत्नीच्या सहकार्यांवर व कष्टावर विसंबून राहणारी माणसे आजकाल फार थोडी राहिलेली आहेत. दुसरे, गरीब आणि विपन्न स्थितीत चांगली आणि नांदणारी बायको वारंवार मिळणे दुर्मिळ असते. शिवाय वस्तू दुर्मिळ झाली की तिचा बाजारभावाशी संबंध राहत नाही !

डोमा आपल्या मुलांकडे पाही, आपले हात बघे; घराच्या कोपऱ्यात ठेवलेल्या दांडक्याकडे पाही आणि लांब लांब सुस्कारे टाकून रडे आवरण्याचा प्रयत्न करी.

मेलेल्या माणसांना घरात ठेवता येत नाही ही साधी गोष्टही त्याच्या ध्यानात राहिली नाही.

वाईट वाटण्याचा हेतू कोणताही असो, सखूच्या मरणाने सगळ्यांना हळहळ वाटली एवढे खरे ! पण ती का मेली ? कशाने मेली याबद्दल एखाद-दुसऱ्या प्रश्नापलीकडे कुणी फारसे लक्ष दिले नाही. अप्रस्तुत गोष्टीसाठी वेळ तरी कुणाला ? शिवाय मरण हे शरीरधाऱ्याची प्रकृती मानतात, तेव्हा तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिल्यास एक वेळ माणूस का जगला असे विचारता येईल; पण माणूस का मेला ? छे ! हा प्रश्न आमच्या धर्माच्या, संस्कृतीच्या, आमच्या विशाल औदार्याच्या परंपरेला अगदी अगदी विरुद्ध आहे.

पण जमाना उफराटा झाला आहे तो ! सबब ज्यांना जगणे आहे त्याने इतरांच्या मरणाची कारणे शोधलीच पाहिजेत, नाहीतर स्मशानात जशी झाडांची पाने हालतात तद्वत जिणे पदरी पडेल.

सखू का मेली ? ती आपल्या इच्छेने मेली नाही हे नक्की. कारण तिचे डोळे आपल्या निःसहाय मुलांकडे व विपन्न नवऱ्याच्या तोंडाकडे पाहत पाहत थिजले होते. डोमाच्या मारण्यानेही ती मेली नाही. कारण परवा त्याने रागाच्या तिरीमिरीत दांडक्याचे एक-दोन तडाखेच फक्त मारले होते. यापेक्षा किती तरी जास्त मार यापूर्वी सखूने सहन केला होता आणि डोमाच्या पश्चात्तापाने जळत असलेल्या हृदयाच्या डागावर भुईलोण चोळले होते.

शेजारच्या डॉक्टरला विचारले, तर तोही सखू का मेली हे नीट सांगत नाही. त्याला त्यासाठीही पैसे द्यावे लागतील की काय कुणास ठाऊक !

खरेच ! अगदी एका दिवसात सखू का मेली ? तिच्या जीवनात या चार-आठ दिवसांत काही विशेष असे घडले नव्हते. ती रोजची म्हणून जी कामे करीत होती ती तिला थोडी जास्त करावी लागली एवढेच !

रोजच्यासारखी काल देखील ती सकाळी उठली आणि झाडलोट आटोपून पाण्याला निघाली. आदले दिवशी दवंडी झाली होती की, पाण्याचे एंजिन बिघडल्यामुळे उद्या नळ येणार नाहीत. आता ही गोष्ट कॉलऱ्याच्या दिवसांत पटापट मरणाऱ्या लोकांच्या बातम्यांप्रमाणे जनतेच्या नित्य परिचयाची झाली होती. निरुपाय झाल्यामुळे दोन शिव्या देऊन मिळेल तेथून पाण्याच्या घागरी आणण्याचा सरावही लोकांना आता झाला होता. सखू देखील जवळच्या कास्तकाराच्या आवारातील विहिरीवर पाण्याला म्हणून गेली. दिवस पुरेसा उजाडला नव्हता. वैशाखाच्या तडाख्यामुळे एवढ्या पहाटेही गार झुळकेचे नाव नव्हते. झाडलोट केल्यामुळे सखूच्या कपाळावर घामाचे थेंब जमून येत होते. ती विहिरीवर पोचली तेव्हा पंचवीस बायका विहिरीच्या तोंडावर वाकून पाणी उपसत होत्या. आणि विहिरीची मालकीण त्यांना

शिव्या देत उभी होती. साठवलेल्या धनावर नागाची राखण असते आणि तो दुसऱ्यावर फुसकारण्यात आणि त्याला चावण्यात आपल्या जीवनाचे सार्थक मानतो असे म्हणतात. मालकिणीचा तो फुम्फाट !— " कशाला आल्या पाण्याला ? विहीर आटली माझी तर मग तुमच्या डोळ्यांतील पाण्याने आपली वापर करू ?...एवढ्या मानाच्या आहात तर आल्या कशाला आवाराचे फाटक उघडून ? आपल्या अंगणात विहीर खणा आणि मग चढीने गोष्टी करा. निघा येथून. दिमाखखोरीच्या— तुमच्या बापाची विहीर नव्हे. "

विहीर तिच्याही बापाची नव्हती. तिच्या नवऱ्याच्या बापाची नव्हती. मालकी मात्र तिची झाली होती खास !

सूर्य नुकताच आपली प्रभा उजळीत होता. पाखरे जागी झाली होती. त्यांच्या किलबिलीतून निरनिराळ्या प्रवृत्तींची माणसे निरनिराळे अर्थ काढीत होती. सगळे अर्थ मंगलसूचक होते आणि इकडे अशा सुप्रभाती ज्यांना ज्यांना एक घागर पाणी हवे होते त्यांच्या त्यांच्या बापाचा उद्धार होत होता. काही गरिबांना असली बोलणी लागून जातात. एका थंड देशातील गरिबांना असली 'बापाच्या मालकी' ची बोलणी असह्य झाल्यामुळे त्यांनी कुणाच्याच बापाची मालकी शिल्लक ठेवली नाही. आमच्या देशात अजूनही गरम बोलणी 'उन्हाळ्यातील चहाप्रमाणेच' परिणाम करतात.

सखू पाणी न भरताच घरी आली. दोन-तीन घागरी तिने घेतल्या आणि चार फेकीच्या अंतरावर असलेल्या विहिरीवर ती पाणी आणायला गेली. स्वाभिमानाचे जीवन वाहायला मोठे जड असते. तिने तीन घागरी डोक्यावर नि काखेत आणल्या. किंचित घेरी आल्यासारखे होऊन ती अंगणात पोचताच खाली बसली. पण असेही बसणे तिला परवडणे शक्य नव्हते. अन्नधान्याच्या दुष्काळामुळे कंट्रोल सुरू झाला होता. आणि तो तिला पोरांची आणि नवऱ्याची कामे लगबगीने करवीत होता. धान्य आणायचे. शिवाय आज काही कपडा मिळाला तिच्या कार्डावर तर तिला हवाच होता. दुपारच्या स्वयंपाकात आज गूळ वापरणेही भागच होते. डोमाची भाकर पोचवायची होती ती वेगळीच. कारण परवापासून त्याला पळभर फुरसद मिळाली नव्हती. एका गोऱ्या साहेबाची नोकरी संपल्यामुळे त्याच्या सामानाची विल्हेवाट लावावयाची होती. अंग मोडून काम करणाऱ्या डोमाला त्या साहेबाने दोन दिवसांच्या राबणीचे दहा रुपये देऊन टाकले होते—अगदी सहज रीतीने, कामाचे तास न मोजता ! डोमाच्या हाती जणू जपान्यांप्रमाणे सिंगापूर आले होते ! आणि आज सामान स्टेशनवर पोचविल्यानंतरही डोमाला पैसे मिळणारच होते. खरे म्हणजे तो साहेब मुलखावेगळाच. म्हणूनच हिंदुस्थान सोडून जाण्याची पाळी आली त्याच्यावर !

डोमाला लवकर जायचे होते म्हणून एक भाकर खापरावर टाकल्याबरोबरच सखूने त्याची थाली मांडली. तो खाता खाता दोन-चार शब्द बोलला तेवढेच !

"तू आज लवकर येशील ना कंट्रोलातून ? पोरांच्या अंगड्यासाठी झकास कपडा आण. भाकरही झकास झाली पाहिजे. साहेबाच्या बंगल्यावर भाकर आणायची आहे. त्याचा मोटार पुसायचा पालव वरठ्याच्या घरचा असतो. धुतलेल्या पालवात माझी भाकर आण. बोलत का नाही ? करशील ना हे सगळं ?"

"कंट्रोलवाल्यानं मेहेरबानी केली तरच ना आणू ? नाहीतर दीडदुपारपर्यंत पोरट्यांनाही तुकडा मिळणार नाही. आज शुक्रवार. कंट्रोलचा शेवटचा दिवस आहे."

"अग, तुला कंट्रोल लवकर मिळेल. त्या दिवशी कशी अर्ध्या घंट्यात वापस आलीस ?"

"अं, ते एखाद्या दिवशी."

"अग, एखाद दिवशी कसं ! तुझ्याकडे पाहून तुला लौकर कंट्रोल देतील. तू काळी असतीस तर माझी राहिली असतीस. सखे, तू गोरी आहेस....."

त्याने विनोदाच्या भावनेने सखूकडे पाहिले. पण तिचे तोंड उतरलेले दिसताच तो चूप बसला. सकाळच्या रामप्रहराला तिचा 'बाप' निघाला. दोन मैलांची धावपळ करून तीन घागरी पाणी आणल्यावर सखूचे 'रूप' निघाले. 'काळी बायको आपली, गोरी बायको लोकांची' हा विनोद डोमा करील अशी तिने थट्टेत देखील कल्पना केलेली नसावी !

घर आवरल्यावर पोरांना शेजारणीवर सोपवून सखू कंट्रोल आणायला गेली.

दुकानावर मनस्वी गर्दी होती. बाबू लोक लवकर येऊन अगोदर धान्य घेऊन जात होते. एक म्हातारा लोकांच्या अंगावर वस् वस् करीत कार्डे नोंदीत होता. भंग्याची गाडी गेली की नाकाला रुमाल लावतो. सखूने तसेच तोंड केले आणि ती बसून राहिली.

दहा वाजले, साडेदहा वाजले, अकरा वाजून गेले. दुकान बंद झाले. सखूच्या कार्डावर घरचा नंबर नव्हता. तो तिने इन्स्पेक्टरकडून टाकवून घ्यायला हवा होता. तिने दवंडी ऐकली नाही हा सरकारचा अपराध नव्हे. सरकारी कागदांत दवंडीची तारीख होती. कायद्याचं अज्ञान सबब म्हणून थोडेच गणले जाते ?

सखू सर्व गिळून साहेबाच्या ऑफिसात गेली. तीन तास बसूनही तिची दाद लागली नाही. सूर्याला काहीच काम नसल्याने तो आपल्या सात घोड्यांच्या गाडीत बसून आकाशाच्या चोपड्या रस्त्यावरून धावत निघाला होता.

अखेर घराचा नंबर कागदावर टाकला गेला. अडीच वाजता दुपारी लोकांवर उपकार करण्याच्या अभिनिवेशाने दुकानदाराने दुकानाचे कुलूप उघडले. तीन मैल पाय जाळून व निथळत्या घामाने आपले जागजागी फाटलेले लुगडे-चोळी भिजवून सखू दुकानापाशी आली. दहा रुपये तिच्याजवळ होते. कंट्रोलच्या दुकानात धान्याचे बंधन सोडून बाकी सर्व अनिर्बंधच असते. एका नोकराचे लक्ष जाऊन त्याच्या

हसण्याने सखूची दाद लागली. तिने दहा रुपयांच्या गुर्मीत उत्तम तांदूळ मागितला. दोन चांदीचे तुकडे देण्याची तिची ऐपत होती. त्यामुळे ते तुकडे खण्‌खण् वाजवून घेण्यात आले. तांदूळ मात्र मागच्या आठवड्यासारखाच मिळाला.

धान्य हाती पडताच तिला मुलांची आठवण झाली. शेजारणीने त्यांना उपाशी ठेवले नसेल ह्याबद्दल तिची खात्री होती. पण चार वाजून गेले; नि डोमाची भाकर ?—

तथापि नवऱ्याला समजाविता येईल. पण कपडा मिळाला नाही तर ? आणि मिळाला तर सगळ्यांचाच राग जाईल. पोरांना अंगडी मिळतील. नवऱ्याला नवी बंडी मिळेल. नुसत्या कल्पनेने तिचे काळवंडलेले मुख फुलले.

ती घरी न जाता कापडाच्या दुकानात गेली. दुकानातील कपाटात भरगच्च माल भरला होता. गर्दी मुळीच नव्हती. कपाटातून कपड्याचे विविध रंग उठून दिसत होते. आता तर काचेच्या तंतूचेही कापड निघाले म्हणे ! पण ते विचारायला सखूला धीर झाला नाही.

दुकानदाराने सखूला नीट नजरेखाली घातले. सखूच्या मनात दुसरा कोणताही विचार येण्याच्या अगोदर, आपल्याला शांतपणे निवड करून चांगले कापड मिळणार ही आशा वाटून गेली. तिने मंद स्मित करून दुकानदाराकडे पाहिले. आपले कपड्याचे कार्ड त्याच्या हातात दिले. त्याने ते निरखून पाहिल्यासारखे केले. वेरीज करण्याच्या मिषाने काहीतरी त्यावर लिहिल्यासारखे केले. एक मोठे चामड्याच्या बांधणीचे रजिस्टर काढून त्याची आजच्या तारखेसारखी दहा-वीस पाने उलटविली. तेथे नंबर पाहिला आणि आपले सारे गणगोत भूकंपाच्या धक्क्यात मेल्याची बातमी ऐकल्या-सारखे तोंड करून तो सखूला व्यापाऱ्याच्या मिठ्ठ्या बोलाने म्हणाला —

" बाई, तुमच्या कार्डावर तर कपडाच नाही. तुम्ही आपला कपडा मागेच नेला आहे. "

" बाबाजी, मी तर कधीच कपडा घेतला नाही. "

" पण बाई, त्याला माझा काय इलाज ? आमच्या बुकात नंबर लिहिला आहे. कपडा अन् पैसाही लिहिला आहे. तुमच्या कार्डातही मांडले आहे. "

" पण आमच्यापैकी कुणालाच कपडा—"

" दुसरं कोणी वापरलं असेल कार्ड तुमचं चोरून. आता काही उपयोग नाही. जा तुम्ही आता. येथे वेळ बरबाद करण्यापेक्षा घरी काही काम तरी होईल. हातमागाचा कपडा घ्या. त्याला कार्ड नको. ते समोरचे दुकान आपलेच आहे. "

सखू दुकानाच्या पायऱ्या उतरू लागली. दिवसभराचे काम संपवून आपल्या कार्डावर कपडा घ्यायला मोलमजुरीच्या दुसऱ्या बायका लगबगीने दुकानाच्या पायऱ्या चढत होत्या.

सडकेवर येताच सखूला ब्रह्मांड आठवले. पोटची पोरे परवयाच्या स्वाधीन घरात चूल पेटली नाही, डोमाची भाकर गेली नाही. हांडक्यातले पाणी संपले असेल. अंगावरचा घामही जमीन ओली करण्यापुरता राहिलेला नव्हता. जवळच्या विहिरीवर बापाचा उद्धार होतो. उन्हाळ्यातच एंजिनला रोग होऊन नळ आटलेले, पुनः तीन मडकी घेऊन मोटेच्या विहिरीवर जायचे. सकाळी पोरांना दूध पाजून छाती रिकामी झालेली. छातीखालचे पोट – त्यातलेही कावळे ओरडून ओरडून मरून गेलेले! पूर्वीच्या काळी निरपराध स्त्रियांच्यासाठी जमिनी दुभंग होत. विहिरींना दया येई. पण ज्या विहिरीवर पाणी भरता येत नाही तेथे मरू तरी कोण देणार ?

शक्य तेवढा शान्त चेहरा करून सखू घराकडे परतली. डोमा येऊन बसला होता. त्याचे हावभाव, त्याचे डोळे—लक्षण ठीक दिसत नव्हते. तांदळाची गाठोडी खाली ठेवत नाही तोच पोरांनी रडून आक्रान्त केला.

" कुठे होतीस इतका वेळ ? "

" कंट्रोलात. "

" दुकान विकत घेत होतीस का ? "

उत्तर नाही. पाण्याची घागर उचलू लागणारी सखू.

" दुकानात राहायलाच का नाही गेलीस ? "

" काय उत्तर देऊ कपाळ ? आता चूल पेटविते. आज तरी रागावू नका. "

" मग काय पूजा करू या गोऱ्या बायकोची ? कंट्रोलचे निमित्तमात्र..... "

सखू अतिशयतेने खाली बसली.

या मुकाट बसण्याचा अर्थ डोमाने आपल्या कुवतीप्रमाणे समजून घेतला आणि साहेबाचे सामान बांधून बांधून शिवशिवलेले हात सखूच्या सापडेल त्या अंगावर शेकून घेतले. सोबतीला स्टेशनचा काळा रस्ता तुडवून माखलेल्या लाथाही वापरल्या. शिवाय घराच्या कोपऱ्यात निर्मम निरहंकारी दांडगा होताच. त्यालाही त्याने स्वस्थ बसू दिले नाही.

कष्टाचे शरीर असले तरी असीम झाल्याने सखूला भोवळ आली. तिचा घसा खरखरला. डोमाच्या डोळ्यांत रक्त असल्यामुळे त्याला यापैकी काहीच दिसले नाही. तो तिला आणखी बडवून बाहेर निघून गेला.

रात्री दहाच्या सुमारास परत आल्यावर त्याने घागरीतील पाण्याने पाय धुतले. थाळीत वाढलेली भाकर गुपचूप खाल्ली. गुळाचा खडाही तोंडात टाकला. लोटाभर पाणी प्याल्यानंतर त्याला बोलावेसे वाटले. पण रात्रीच्या चांदण्याला चंद्राची जोड असूनही उन्हाळ्याचा गरम वारा वाहतच होता. थकल्यामुळे पथारीवर पडताच त्याला झोप लागली.

तो सकाळी उठला तो आपले कपाळ ठोकीतच. ज्या शेजारणीने काल दिवसभर सखूची मुले संभाळली तिनेच प्रथम त्या मुलांच्या गोऱ्या व सुरूप मातेच्या मृत्यूची बातमी ऐकली. पाणी भरायला निघालेल्या बायकाही आपल्या रिकाम्या घागरी खाली ठेवून हळहळल्या. एकीची तर त्या घाईत घागर पडून फुटूनही गेली.

सखूच्या मरणाचे कारण डॉक्टरलाही सांगता आले नाही. कारण सांगायला सखू जिवंत नव्हती. आपल्या ज्ञानाच्या अहंकाराने तो जे काही बडबडला असेल तेवढाच.

कालच्या रागाने आणि आजच्या शोकाने डोमाची सुधबुध जर हरपली नसती तर त्याने सकाळच्या विहिरीला, बिघडलेल्या एंजिनच्या सूत्रधाराला, नळाच्या ठणठणीला, कंट्रोलच्या दुकानाच्या पायऱ्यांना, रेशन ऑफिसच्या टेबलाला, तापलेल्या रस्त्याला दरडावून विचारले असते की— 'सखू, माझी गोरी, कष्टाळू बायको का मेली ?'

पण मग लोकांनी त्याला मूर्ख म्हटले असते !

१७।५।४७

९८

त्याग

"हे घ्या मिस्टर, तुमचं तिकिट."
"थँक्स. फार काम केलं तुम्ही माझं."
"कसचं, कसचं."
"बरं, तुम्ही चला पुढे. मी आणतो तुमचं सामान प्लॅटफॉर्मवर."
"एकाच डब्यात बसू. भुसावळलाच उतरावयाचं आहे आपल्याला."

प्लॅटफॉर्म चिकार भरला होता. एवढे लोक आगगाडीत बसावयाचे म्हणजे बाकेच मोडून पडतील की ! बॉम्बे मेल यायला तब्बल दीड तास असूनही प्रत्येकाचा पवित्रा आणि तयारी आगगाडीत जागा मिळविण्याची दिसत होती. गर्दी इतकी की जवळचे चहाचे दुकान आणि प्लॅटफॉर्मवरची छोटी बाग पण दिसत नव्हती. नळ बिघडल्यामुळे जो आवाज येत होता त्यावरून नळाचे अस्तित्व जाणवत असे एवढेच !

संध्याकाळची वेळ. उकाड्यामुळे अंगातून घाम निथळत होता. समोर फलाट-खाली रूळ, आजूबाजूला लोकांची गडबड; पानबिडीवाल्यांच्या आरोळ्या; मागच्या

बाजूला स्टेशनच्या दगडी भिंती. त्यांच्यावर निरनिराळ्या कंपन्यांच्या जाहिराती लाकडी चौकटीत मढवून बसविलेल्या होत्या. त्यामुळे त्या भिंतींचा भकासपणा कमी होऊन रेल्वेला पैसेही मिळाले होते.

एका जाहिरातीत लोकांनी पैसे वाचवावे म्हणून सरकारने उपदेश केला होता. जाहिरातीच्या चित्रातील म्हातारा हजार हजारांच्या नोटा हातात धरून हसतमुखाने जणू लोकांना सुचवीत होता की "पाहा, मी पैसे वाचविले म्हणून म्हातारपणी मला हसता येते." इतक्या वयापर्यंत ज्यांना जगण्याची आशा नव्हती त्यांच्यासाठी त्या म्हाताऱ्याच्या हसण्याचा काही उपयोग नव्हता.

दुसऱ्या जाहिरातीत लोकांनी आपले सामान डब्यात कसे ठेवावे आणि आगगाडीत कसे व्यवस्थेने चढावे यासंबंधी सचित्र शिकवण सुचविली होती. पण त्यातील हमालाच्या डोक्यावर चांगली मजबूत सुटसुटीत ट्रंक आणि चापूनचोपून बांधलेली वळकटी होती, आणि चित्रातील डब्यात चढणाऱ्यांची संख्या आजच्या प्लॅटफॉर्मवरील गर्दीपेक्षा किती तरी कमी होती. शिवाय, फळांच्या टोपल्या, तुपाची पिपे, सरकारच्या हुकुमाप्रमाणे प्रवासात आपल्याबरोबर न्यावी लागणारी दोन शेर दहा छटाक रेशन धान्याची गाठोडी, कुठे तरी लग्नास जात असलेला बँडबाजा, पाणी झिरपून बर्थखालील लोकांचे सामान खराब करणारे खुजे हे सगळे कुठे आणि कसे ठेवावे याबाबत जाहिरातीत कुठेही सूचना दिसत नव्हत्या.

तिसरी जाहिरात एका अत्युत्तम मिलमधून निघणाऱ्या सुंदर कपड्यांची होती. त्या जाहिरातीला शीर्षक दिले होते—"ब्यूटी लेट लूज." एक स्त्री हातपाय दोरीने ओढल्यागत बसविलेली दाखविली होती. तिच्या अंगातील सर्व कपडे वाऱ्याने इतस्ततः उडवून दिले होते. चोळीची घट्ट आवळून बांधलेली गाठसुद्धा सुटून फडफडत होती. म्हणजे त्या मिलच्या कपड्यांनी शरीराच्या आच्छादनाच्या मिषाने हवेचेही आच्छादन कसे छान होते याचे स्पष्ट दिग्दर्शन त्या चित्रात होते. असले सुंदर नि तलम कपडे घातलेली तरुण स्त्री जर डब्यात चढली तर तिने कुठे आणि कसे बसावे यासंबंधी रेल्वे अधिकाऱ्यांनी काहीच हुकूम जारी केलेला नव्हता. पण इतक्या लोकांच्या गर्दीत फक्त आपल्यावरच असल्या डब्यात बसण्याचा प्रसंग येईल असा विचार करणे म्हणजे उगीचच निराशावादी होण्यासारखे होते.

चवथ्या जाहिरातीचा वरचा कोपराच तेवढा दिसत होता; कारण बाकीचा भाग नागवेली पानांच्या पेटाऱ्यांनी झाकून टाकला होता. पाचवी जाहिरात दिसायला बऱ्याच उंचीची आवश्यकता होती. सहावी जाहिरात.....

"अहो मिस्टर, काय पाहता? खाली सामान लांबवेल ना कुणी! बरं हे पाहा, आम्ही तुमच्यासाठी जिवाचा आटापिटा करून तिकिट मिळविलं; तुम्ही आता थोडा वेळ आमचं सामान संभाळा. मी काही खायला आणतो."

" हो, हो ! जा की ! मी आहेच. "
थोड्याच वेळात तो भजी, चिवडा, शेव घेऊन आला.
" घ्या ना ! वेळ आहे अजून गाडी यायला. "
" नको, नको. अगदी इच्छा नाही. "

त्याने खायला सुरवात केली. मेल मागील स्टेशनवरून सुटल्याची वर्दी देणारी घंटा घण घण वाजली. सर्वांचे अनुकरण म्हणून माझे व्यवस्थित असलेले सामानही मी आवरू लागलो. त्यापैकी एका बांधलेल्या वळकटीवर मला उपकृत करून बसलेले मित्र बसल्यामुळे तेवढी फक्त आवरता आली नाही.

" अहो मिस्टर, जरा एवढा लोटा तर भरून आणा. च्यायला ही भजी फारच तिखट आहेत. "

" हे देखील त्या तिकिटाच्या उपकारातच की काय ?..... "

पण तेवढ्यात त्याला ठसका लागल्यामुळे मला गर्दीतून रस्ता काढावा लागला. माझ्यासाठी केलेल्या त्यागाचा मोबदला चुकविण्यात म्हणजे सत्कार्यी वेळ गेल्यामुळे मनाला बरे वाटले.

लोक अस्तन्या सावरून तयारच होते. बिचारी मेलगाडी एकटीच असल्यामुळे भीत भीत दबत दबत स्टेशनवर आली. भीतीने थरथरत तिने एक शिटी दिली. लोकांनी क्षणाचा विलंब न लावता दारावर झडपाझडपी केली. आमच्या सामानाबरोबरच आम्हांलाही हमालाने डब्यात कोंबल्यामुळे आम्ही त्याचे उपकार मानून पैसे चुकते केले. मित्रवर्यांच्या दाढेत राहिलेले भज्यांचे शेषावशेष त्यांनी आपल्या जिभेच्या टोकाने काढून घशात घातले आणि धसक्याने रिकामी झालेली छाती एक मोठा श्वास घेऊन भरून काढत नाही तोच मेल सुरू झाली.

डब्याला खिडक्या होत्या आणि त्या खिडक्यांत तीन तीन लोकांची डोकी घट्ट बसवून टाकलेली होती. खिडकीवर लावलेल्या 'थुंकू नका' च्या पाट्यांपैकी एकच दिसत होती. संडासाजवळच्या फळीला एक चौकट मढवून तिच्यात 'डासांपासून आपला बचाव कसा करावा' यासंबंधी सूचना होत्या. पण तिथे गर्दीत डासांनाच माणसांपासून अपाय होण्याचा संभव जास्त होता. वर दोन दिवे लटकत होते. समोरच्या बाजूला डब्यात " अठ्ठावीस जणांनी बसावे " असे सुचविणारी अक्षर-मालिका होती. परंतु काही वेळाने दिव्याभोवती घोंघावणारे किडे खायला म्हणून एक पाल नेमकी त्या अक्षरांवर येऊन बसल्यामुळे आम्हा चाळीस-पन्नास जणांवर नियम तोडल्याची कारवाई होण्याचा तात्पुरता तरी संभव नव्हता. काही मंडळी सामानावर बसली होती. काहींनी सामान आपल्या वर घेतले होते.

चार बाकांपैकी एकाच्या कोपऱ्यात एक बंगाली म्हातारी होती. तिच्या हाती स्मरणी असून ती मधूनमधून मणी चाळवीत असल्यामुळे तिने व्यापलेल्या अघळपघळ

जागेवद्दल काही म्हणण्याची सोयच नव्हती. दुसऱ्या कोपऱ्यात चार-दोन मुसलमान बंगालीत जोरजोराने बोलत होते. कलकत्त्याच्या दंगलीत वाचविलेला आपला जीव या डब्यात सुखात ठेवण्याची त्यांची इच्छा असल्याच्या बातमीमुळे तिथेही डाळ शिजण्याचा संभव नव्हता. सर्वत्र कलकलाट. हुश्श हुश्श ! गर्दीने घाबरून गेलेल्या चार-दोन कारट्यांची चँपँ ! त्यामुळे जॉन मथाईच्या लेखी परवान्यावाचून प्रवास करावयाचा नाही अशी प्रतिज्ञा करण्याच्या वेतात आम्ही होतो. बेंचाच्या अलीकडील टोकावर बसलेले एक वयस्क जोडपे जोरजोराने आपल्या मराठीत बोलत होते. झाडांवर लटकलेल्या फणसांप्रमाणे त्यांची चार-दोन कच्चीबच्ची अंगाखांद्यावर लोंबत होती. पतिराजांच्या टोपीतून त्यांची शेंडी बाहेर निघाली होती आणि चिडून चिडून ते काहीतरी बोलत होते.

" तुला तेवढी माझी औषधाची बाटलीही घ्यायचे सुचले नाही; कसला संसार संभाळता कुणास ठाऊक ! "

" पण तुम्ही का नाही घेतले ? मी सारखी सकाळपासून मरमरत होत्ये. पोरांचे कर, दीड पायलीच्या भाकरी बडव, मोलकरणीला रोग झाला म्हणून धुणी आपटून घे; पुनः तयारी कर आणि वर त्यातून तुमचे ऐकून घे इथे या चार लोकांदेखत....."

" पण पोचल्याबरोबर बाटली विकत आणावी लागेल ती ! पण तू सगळं नीट केलंस तर उगीच आपल्या संसाराला बट्टा लागेल. "

" पण या तुमच्या संसारापायीच तर इतकं सगळं करत्ये ना मी ? एवढी हाडांची काडे करून मोबदला हा असा. "

तेवढ्यातच त्यांचे अनेकांपैकी एक कारटे जर केकाटले नसते तर तो संवाद आजचे स्त्रीपुरुष आणि त्यांच्यापुढील प्रश्नासाठी उपयोगी पडला असता.

त्या मुलाचे केकाटणे एका धक्क्याने बंद करून त्या वत्सल मातेने माझ्याकडे पाहिल्यामुळे चोरटेपणाच्या जाणीवेने भिऊन दुसऱ्या बेंचाकडे नजर लावणे मला भाग पडले.

त्या बेंचवर एका प्रवासी वाचनालयाचा उद्घाटन समारंभ नुकताच झालेला दिसत होता. नागपूरची तीन-चार मोजून साडेतीन मिनिटांत वाचून होणारी एक आणा छाप दैनिके काही लोकांनी तोंडासमोर धरली होती. वाचनालयाच्या सदस्यांचा ज्ञानप्रसाराचा स्तुत्य हेतूही स्पष्ट ऐकू येत होता. परवा परवा शिक्षकसंपाच्या वेळी मध्य प्रांताच्या एका मंत्र्याने केलेले भाषण ज्ञानप्रचारार्थ मोठमोठ्याने वाचले जात होते...

" शिक्षकांची काळजी आम्हांलाही आहे. त्यांच्याच शिकवणीमुळे आम्ही आज मंत्री होऊ शकलो आहोत. त्यांचे हित आम्हांला कळत नाही की काय ? आम्ही सर्व करणारच आहोत. अंमळ धीर धरा. आमच्यावर अविश्वास दाखवू नका. आम्ही वीस वीस वर्षे देशासाठी आणि जनतेसाठी हालअपेष्टा सोसल्या आहेत. देश मागेल तेवढ्या

त्यागाची आणि बलिदानाची खंडणी चुकविली आहे. त्याचा या दोन वर्षांत तुम्हांला विसर पडावा ?....."

या मंत्र्यांचे आमच्या गावी आम्ही परवाच घडाकून स्वागत केल्यासुळे ते भाषण ऐकण्याचा आमच्यापुरता प्रश्नच मिटला होता, कारण त्यांना दिलेल्या मानपत्रात त्यांना मंत्री बनवूनही त्यांच्या, अपार त्यागाचे मोल जनता चुकवू शकली नाही यावद्दल आम्हांला होणारे मरणप्राय दुःख आम्ही मोठ्या जोरदार शब्दांत व्यक्त केले होते.

एक तास सारखी धावून थकल्यामुळे आगगाडी एका स्टेशनवर थांबली. तिथे फक्त बाहेरच्या लोकांनी डब्यात शिरावे असा जणू नियम असल्याचा प्रत्यय दाराच्या खिडकीतून आमच्या अंगावर आलेल्या एका होल्डऑलने आणून दिला. एक गृहस्थ कसेबसे आत शिरले. नंतर एक अर्भक त्यांनी आत घेतले. त्याला मांजरीच्या पिलासारखे एका हाताने संभाळून एका तरुण स्त्रीला दुसरा हात दिला. मुलगी अगदी कोवळी. पहिल्याच वेळची ओली बाळंतीण दिसत होती.

गृहस्थाच्या हातांत असलेले मूल रडू लागले. आपला भार तोलून त्या अर्भकाला घेण्याइतकीही जागा त्या स्त्रीला मिळाली नव्हती. तिने कसेबसे मूल घेतले. कोपऱ्यातील बंगाली म्हातारी माळ जपत होती. वाचनालयाचा कार्यक्रम व्यवस्थित चालू होता. कलकत्त्याच्या दंगलीची भाषणे कोपऱ्यातील असेंब्लीत जोरजोराने होत होती. पण त्यांपैकी त्या अर्भकाला काही एक न कळल्यामुळे ते रडतच होते.

त्या स्त्रीने मूल सावरून धरले. त्याला पाजण्यासाठी आपला एक स्तन उघडा केला. परंतु तेवढ्यातच तिचा तोल गेल्यामुळे तिचा सर्वच पदर अस्ताव्यस्त झाला. बऱ्याच मंडळींनी ते दृश्य पाहण्यासाठी आपापला कार्यक्रम जरा वेळाकरिता उदारपणे स्थगित केला आणि पुनः उद्योग आरंभिले.

त्या मुलाला खरे म्हणजे हे सगळे समजायला पाहिजे होते. पण ही नवी पिढी अशीच वेसमज निघणार हे त्या अर्भकाच्या पायांवरूनच काय पण रडण्यावरूनही दिसून येत होते.

एका बाकावर एक तरुण आपली जागा संभाळून बसला होता. त्याला काय वाटले कुणास ठाऊक, तो आपल्या जागेवरून उठला आणि.....

"भाऊसाहेब, बाईंना माझ्या जागी बसू द्या. मी थोडा वेळ तुमच्या जवळ उभा राहतो."

ती तरुण स्त्री कृतज्ञतेच्या भावनेने एकवार त्याजकडे पाहून नाइलाजाने त्याच्या जागेवर बसली आणि तिने मुलाला नीटपणे स्तनाला लाविले.

तो तरुण निमूटपणे उभा राहून डब्यात बघण्यासारखे काहीच नसल्यामुळे वर दिव्याभोवती घोंघावणाऱ्या किड्यांकडे पाहत राहिला. तेवढ्यात वाचनालयातील मंडळींची बरीच ज्ञानवृद्धी झाल्यासारखी दिसली. कारण :—

" या हो, इथं एक जागा सहज करून देऊ. कुठवर उभे राहणार असे ? "

तेवढ्यातच आणखी चार-दोन मंडळी त्या तरुणाशी बोलण्याचा प्रयत्न करू लागली—

" आइये, आइये बाबूजी, अरे क्या इतनी सी जगह तो हम भी कर देते हैं। आप क्यों कष्ट उठाते. आइये। "

" पान लीजिएगा बाबूजी ? "

" सिगारेट पीजिएगा ? "

तेवढ्यात बंगाली स्त्रीसुद्धा ईश्वराची वाणी ऐकल्यासारखे स्वतःला सावरून बसली. एका माणसाला सहज बसता येईल एवढी जागा आपल्याजवळ करून दिव्याशी घोंघावणाऱ्या किड्यांकडे पाहत उभ्या असलेल्या त्या तरुणाकडे तिने आपलेपणाने एक कटाक्ष फेकला. बंगालची असेंब्ली मोठा ठराव पास करून उठल्यासारखी चळवळली आणि तिथूनही ' आमच्यात या, आमच्यात या ' असा पुकार झाला.

चार–दोन मंडळींनी फराळाचे डबे उघडले. पण ' बाबूजींना ' दिल्यावाचून त्यांच्या गळी घास उतरेना. खाली जमिनीवर बापाच्या मांडीवर बसलेल्या एका मुलाची लाथ चुकून बाबूजींना लागली. त्यासरशी त्याच्या कर्तव्यदक्ष पित्याने त्याच्या थोबाडीत चांगल्या कसकसून दोन थपडा लगावल्या आणि–" गधेके बच्चे, इतनी भी अकल नही, बाबूजीको पैर जो लगाता है ? बाबूजी, बच्चा गँवार है. माफ कीजिएगा. "

तरुणाच्या पायाला हात लावून त्या अपराधी मुलाच्या बापाने नमस्कार केला. त्या बाबूजींचे नशीबच खोटे ! पान, तंबाखू, सिगरेट, फराळ यांपैकी कशाचाही फायदा त्यांनी घेतला नाही. बंगाली म्हातारीच्या आपलेपणानेही त्यांचे मेणाचे मन विरघळले नाही. आपल्या जागेवर बसलेल्या बाईचे मूल खेळत असलेले पाहून कृतकृत्य झाल्यासारखी त्याची दृष्टी विनम्र झाली आणि जवळच उभा केलेल्या होल्डऑलचा आधार घेऊन तो एका पायाला विसावा देत उभा राहिला. त्याच्या तसे उभे राहण्याने सर्वांनाच दुःख झाले होते. पाच-पंचवीस इतर मंडळीही त्या तरुणासारखीच उभी होती; पण त्यांचे अस्तित्व त्या बाबूजींच्या उभे राहण्यात विलीन झाल्यासारखे वाटत होते. " बाबूजी, आइये, अजी यहाँपर बैठिए ना ? " च्या आवाजाने डबा कितीतरी वेळ निनादत होता. त्या वेळी बाबूजींनी लोकांना धावत्या गाडीतून उडी टाकायला सांगितले असते तरी त्यांचा शब्द अवमानिला गेला नसता.

आगगाडीने तिसरे स्टेशन सोडले. डब्यातील एका कुटुंबाची बांधाबांध सुरू झाली. सामान आवरल्यामुळे जी थोडी जागा झाली होती तिथे मघापासून ताटकळत उभा असलेला एक मनुष्य बसण्याचा प्रयत्न करू लागला तोच—

" अरे ए, शरम नहीं आती ? बाबूजी खडे है और तू बैठा रहा है ? "

पण बाबूजी उभेच होते. उलट त्या माणसाला त्यांनी बसायला सांगितले. बाबूजींच्याच त्या हुकुमापुढे सर्वांचा नाइलाज झाला.

आगगाडी अतिशय वेगाने धावत होती. पाच पाच मिनिटांनी मेलने सोडून दिलेल्या चिल्लर स्टेशनांचे दिवे दिसत नि नाहीसे होत. वाऱ्याचा सोसाटा किंवा तीरातून सुटलेला बाण याशिवाय दुसरी कोणतीही उपमा त्या आगगाडीला त्या वेळी देणे शक्य नव्हते.

मेलचे चवथे की पाचवे स्टेशन आले. गाडी थांबली. स्टेशन कोणते हे समजायला किंवा खिडकीतून डोकावून पाटी पाहायला जरा देखील जागा नव्हती आणि तरी देखील—

" ए हमाल, यहीं लाव सामान ! हो जायगी जगह." दोन-तीन वळकट्या आत आल्या व तसल्याच आकाराची दोन-तीन माणसेही आत घुसली. त्यांनी आपल्या कर्तव्य-गारीने डब्यातील वाचनालयाची १९४२ सालासारखी मोडतोड करून टाकली. त्यातच एका सदस्याच्या पायावर नवागताच्या बुटाची लाथ पडल्यामुळे तो विवळला आणि —" पाहा हो बाबू, कुठले मवाली आहेत हे ! "

बाबूजी संथपणे दिव्याकडे पाहत होते. किडे दिव्याभोवती घोंघावतच होते. ती पाल अजून त्याच ठिकाणी शांत निश्चल चिकटून ' तमसो मा ज्योतिर्गमय ' म्हणून दिव्याला प्रार्थीत होती. बिचारी कितीतरी वेळापासून कळ सोशीत कष्टत शिणत होती. पाहायचे किती किडे तिच्या कष्टाची, प्रतीक्षेच्या त्यागाची कदर करतात ते ! वास्तविक एव्हाना तिचे पोट भरून जायला हवे होते. त्यागाचे मोल पोटभराच्या मापाने चुकविणे फारच सोपे असते एवढे कळण्याइतकी अक्कलही त्या किड्यांना असू नये म्हणजे मोठीच पंचाईत !

आणखी चार-दोन स्टेशने गेली. चार-दोन उतरले. आठ-दहा चढले. डब्यातल्या सगळ्या संस्था सर्वांचा ज्युबिली उत्सव नुकताच संपल्यासारख्या पेंगू लागल्या. गाडी भरधाव जात असली म्हणजे कित्येकांचे घोरणे ऐकू यायचे !

बाबूजी अजून उभेच होते. आजूबाजूचे लोक उभ्या उभ्याच डुलक्या घेऊ लागले. त्यांचा आपल्यावर कलंडणारा तोल संभाळीत संभाळीत बाबूजी कसातरी तग धरून होते. त्यांनाही ईश्वरानेच बनविल्यामुळे त्यांचे अंग विश्रांतीसाठी आसावल्यासारखे झाले. शेवटी समोरील बेंचाच्या दोन-तीन इंच जागेवर आपले एक पाऊल ठेवून आणि जवळच्या होल्डऑलवर आपला भार देऊन त्यांनी आपले नश्वर शरीर विसाव्याकरिता....

" अरे ए ! दिखता नहीं तुमको ? जूतोंकी लाथ बेंचपर रखते हों ? अगर कहीं लग जाय तो ? "

" ठीक खड़े रहो जी ! बडे आये होल्डऑलमें भार डालनेवाले ? उसमें टेनिस रॅकिट है ! अगर टूट जाये तो जिम्मेवारी तुम्हारी... "

" सोते सोते सफर करना हो तो सेकंड क्लासके डब्बेमें क्यों नहीं जाते जी ?... "

" अरे, बाबूजीको क्या सुना रहे हो भैय्या... "

" बाबू होंगे तो अपने घरके ! अगर तुम्हारे होंगे तो अपने सिरपर बैठा लो ! अगर हमको लाथबाथ लग गई तो बता देते है ! "

असेच बोलणे बराच वेळ चालून बंद पडले. सर्वांच्याच डोळ्यांवर निद्रेची झापड आली होती. ती ओली बाळंतीण मुलाला कुशीत घेऊन तेवढ्याशा जागेतच झोपून गेली होती. तिच्या बरोबर असणारा गृहस्थ संडासाच्या दाराच्या कोपऱ्यात डोके खुपसून घोरत होता. वाचनालय जवळजवळ बंद होते. फक्त एक गृहस्थ एक आणा छापाचा एक अंक डोळ्यांसमोर धरून नाइलाजाने काहीतरी वाचीत होता. समोरच्या पानावर छापलेल्या शिक्षकसंपाबाबतच्या मंत्र्याच्या भाषणाकडे त्याचे मुळीही लक्ष नव्हते. ' मोहिनी कवच ', ' अर्के जादू ', ' जवान मर्द मोदक ' असले काहीतरी महत्त्वाचे साहित्य तो वाचीत होता.

बाबूजी म्हणजे तो तरुण आपला सर्व संयम एकवटून खिळ्याने ठोकलेल्या येशू खिस्तासारखा डब्याच्या लाकडी भिंतीला टेकून उभा होता. दिव्याभोवतीच्या किड्यांवरून आपली नजर खाली वळवून त्याने डब्यातील माणूस माणूस न्याहाळला. पण या चार-पाच स्टेशनांच्या अवधीनंतर कुणालाही त्याच्याकडे पाहायला फुरसत नव्हतीशी दिसली.

मेलचा वेग कमी झाला. आगगाडीने शिटी दिली. हे मोठे स्टेशन म्हणजे भुसावळच. आम्हांला उतरावे लागले. माझ्या मित्राचा होल्डऑल मीच काढून हमालाच्या डोक्यावर उचलून दिला. खिशातून तिकिट काढून हाती घेतले. आम्ही उतरेस-तोवर तो तरुण उभाच होता. पुढे तो लोकांशी किंवा लोक त्याच्याशी काही बोलले किंवा नाही कुणास ठाऊक !

गर्दीच्या लोंढ्यात आम्ही प्लॅटफॉर्मच्या बाहेर ढकलले गेलो. हातचे तिकिट हातीच राहिले. समोरच एका मोठ्या फलकावर रेल्वे कंपनीची सचित्र जाहिरात होती.

" तुमच्यासाठी या सैनिकांनी रक्त सांडविले आहे. त्यांना आराम व आश्रय देणे तुमचे कर्तव्य आहे..... "

जनतेला कर्तव्याचे नि माणुसकीचे धडे देण्याची सरकारने आपल्याकडून लाख कोशिस केली पण अखेर आम्ही ते आम्हीच !

६ । ७ । ४७

क्रव्याद *

त्या गावच्या बाजारपेठेत म्हणण्यासारखा कोलाहल नव्हता. दुपारची तीन साडेतीनची वेळ. गावातील लोक आपापल्या कामाला निघून गेलेले होते. बाजाराकडे त्यांची सकाळी एक फेरी लागून गेली होती, आणि सायंकाळच्या फेरीची वर्दी म्हणून काही शाळकरी पोरे टोळ्याटोळ्यांनी चाललेली होती.

सडकेच्या एका बाजूला एक पेरूवाला आपले दुकान मांडून बसला होता, आणि पक्ष्यांनी अर्धवट खाल्लेले पेरू अतिशय स्वादिष्ट असल्यामुळे मुलांनी ते घेतले पाहिजेत असे तो आपल्या भोवतालच्या बालगोपालांना पटवीत होता. त्याच्या दुकानाच्या समोरच सडकेच्या दुसऱ्या बाजूला एक बलुची तरुणी आपले चाकू-कातऱ्यांचे दुकान थाटून बसली होती. मुले तिच्यापासून चार हात दूर उभी होती. तिचे धारदार नाक, पाणीदार डोळे, सुंदर रंग, यांपैकी कशाकडेही त्यांचे लक्ष जात नव्हते. समोरच्या चाकू-कातऱ्या त्यांना भिववीत होत्या. आणि समजा, गावगप्पा खरी ठरून एखाद्या मुलाला तिने आपल्या घागऱ्यात लपवून पळवून नेले तर? जिवाचे मोल देऊन सुख किंवा करमणूक विकत घेण्याचा व्यवहार अजून त्या मूर्ख मुलांना सुचला नव्हता.

किंचित पुढे एका झाडाखाली पुष्कळच मुले गोळा झाली होती. दुकान नव्हते तिथे. झाडाखाली पाच-सहा चिमण्या मरून पडल्या होत्या. त्यांची मुंडकी त्यांच्या धडापासून वेगळी झाली होती. अंगातल्या रक्ताने जमीन भिजली होती. झाडाच्या वर आकाशामध्ये एक ससाणा गिरक्या मारीत होता. त्याच्या पंखांच्या हालचालीत त्याची शक्ती दिसत होती. तो कधी झाडावर विसाव्यासाठी बसतो, आणि कधी त्या समर्थ शिकाऱ्याचे दर्शन आपल्याला होते, या उत्कंठेत काही मुले बरच पाहत होती. आता त्याने जास्त चिमण्या मारू नये असे करुणोद्गार काहींच्या तोंडून निघत होते. काही मुले हातवारे करून ससाण्याचे शौर्य बखाणीत होती.

झाडालगत एक तंबाखूचे दुकान होते. त्यात लोकसंख्येच्या मानाने सुखवस्तू असलेली एक-दोन माणसे बसून गप्पा मारीत होती. एका तरुण पुरुषाच्या हाती शिळे वर्तमानपत्र होते व त्यातील मजकूर आपल्या शिक्षणाच्या मानाने निवडून तो मोठ्याने आणि समरसतेने वाचून दाखवीत होता. वर्तमानपत्राच्या बातम्यांप्रमाणे

---

* क्रव्याद म्हणजे कच्चे मांस खाणारी हिंस्र दे.

कुठल्याशा गावात एका शिकाऱ्याला वाघाने फाडून खाल्ल्याचे सविस्तर वर्णन आले होते. आणि जगातील आणखी कुठल्याशा गावात एका तरुण पुरुषाने एका तरुण स्त्रीला बलात्काराने पळवून नेण्याचा घाट घातला होता, पण त्या स्त्रीने आपल्या हातातील कोयत्याने त्या पुरुषाच्या मानेवर घाव करून आपली सुटका करून घेतली होती. आणखी एक बातमी अशी की, अलाहाबादच्या एका बाईला हत्तीचा तोंडवळा असलेले मूल झाले होते व कराचीच्या एका म्हशीला माणसाचा तोंडवळा असलेला एक टोणगा झाला होता.

तिथल्या साक्षर लोकांच्या गप्पा याच बातम्यांच्या रोखाने सुरू होत्या. वाघ ज्या अर्थी माणसाला फाडून खातो त्या अर्थी माणूसही वाघाचे मांस खात असावा किंवा नाही ? या विषयाचे काही तज्ज्ञ सांगत होते की, वाघाचे मांस फार गरम असल्यामुळे ते कुणी खात नाही. चरबीचा फक्त लकवा झालेल्या माणसासाठी उपयोग करतात. दुसरे तज्ज्ञ असा निर्वाळा देत होते की, त्यांनी स्वतः जरी वाघाचे मांस खाल्ले नाही, तरी वाघाच्या मांसाची मेजवानी त्यांनी प्रत्यक्ष पाहिली होती. वादाचा निकाल लागणे कठीण होते. आणि समजा, वाघाला खाणारी माणसे जगाच्या पाठीवर काही असली, तरी त्यामुळे आमच्या प्रगतीच्या युगाला बाध येण्यासारखा नव्हता. उलट तोही एक खाद्यपदार्थ उत्पन्न झाला हे आजच्या टंचाईच्या दिवसांत एक प्रगतीचे लक्षणच मानले जायला हरकत नव्हती.

बातम्या आणि गप्पा लवकरच संपून गेल्या. कारण शिळ्या वर्तमानपत्रात असणार तरी काय ? आणि शिळे वर्तमानपत्र फार वेळ वाचत बसणे हे अद्ययावत् माणसाला शोभण्यासारखेही नव्हते. म्हणून त्या तरुणाने वर्तमानपत्राची घडी करून तिने वारा घ्यायला सुरवात केली. काहींनी तंबाखूच्या पोत्यांना बोटाने टोचण्याचा उद्योग आरंभिला तर काही नारळाच्या पेटाऱ्याच्या कमच्या काढून दात कोरू लागले. असे करणे बरे नव्हे, हे काही स्वच्छ कपडे घालून बसलेल्या मंडळींच्या ध्यानात येऊन त्यांनी सडकेवरील बाजाराच्या गर्दीकडे पाहण्याचे ठरविले. काहीही, कुठेही आणि कसेही पाहणे हे समाजनीतीमध्ये तितकेसे गर्ह्य न मानले गेल्यामुळे त्या मंडळींच्या शिकलेपणाची अब्रू जाण्याचा संभव नव्हता.

चार साडेचारचा सुमार झाला. बाजारात हळूहळू गर्दी होऊ लागली. बकऱ्यांसाठी झाडपाला घेऊन तो विकायला गावच्या मुली आल्या. तोंडल्याची एक पाटी घेऊन एक म्हातारा मुसलमान येऊन बसला. तेवढ्यात एका तरुणीने आपले कच्च्या पपयांचे दुकान थाटले. इतर दुकानेही ग्राहकांना बोलण्याइतकी आकर्षक होऊ लागली.

ती बलुची तरुणी आपल्या भारी किंमतीच्या चाकू-कात्र्या व पोतडी तिथेच टाकून या बाजूला यावयास उठली. चार दिवस जरी तिने आपल्या दुकानाकडे न फिरकण्याचे

ठरविले तरी तिच्या मांडलेल्या वस्तू इकडून तिकडे करावयाची त्या गावच्या वाऱ्याचीही ताकद नव्हती, असा रुबाब तिच्या हालचालीत होता. नुकतेच विशीचे वय, जीवनाची स्वतंत्रता, बेदरकारी आणि असल्या प्रकारचा आत्मविश्वास ! तिच्याकडे पाहतच राहावेसे वाटत असे. लहान मुले दुरून पाहत आणि मोठी माणसे दुरून पाहूनही जवळून पाहण्याची उत्सुकता दाखवीत.

तंबाखूच्या दुकानासमोर बसलेल्या तोंडलेवाल्याकडे यावयाला तिने आपला मोर्चा वळविला. येऊन पोचताच खळखळत्या प्रवाहाच्या आवाजाने तिने त्याला तोंडल्यांचा भाव विचारला आणि तो कळण्याच्या अगोदरच चार-दोन तोंडली उचलून खायला सुरवात केली. दाताखाली चिरडल्या जाणाऱ्या तोंडल्यांची करकर बहुधा तंबाखूच्या दुकानापर्यंत ऐकू गेली असावी. नाहीतर सर्वांच्या नजरा तिच्यावर खिळल्या कशा ? वर्तमानपत्राच्या घडीने वारा घेणारा तरुण किंचित सावरून बसला. आपण काहीतरी खरेदी केले पाहिजे अशी त्याला स्फूर्ती झाली. बाकीच्या मंडळींनाही त्याची ऐपत माहीत असल्याने त्यांनी त्याच्या निश्चयाला मोडता घातला नाही. काठीसारखी हाताळलेली एका दिवसाच्या शिळ्या वर्तमानपत्राची घडी मांडीवर लीलया ठोकीत तो तिथून उठला व समोरच बसलेल्या मुसलमान तोंडलेवाल्याकडे आला.

गावचा इज्जतदार माणूस तोंडली पुसायला येतो हे ओळखून दुकानदाराने भाव सांगितला. पण बाजारभावाची दखल त्या तरुणाने घेतली नाही. तोंडली जास्त खाल्ल्याने बुद्धी मंद होते हेही कदाचित त्याने वर्तमानपत्रात वाचले असेल.

त्या तरुणीची तोंडल्यांची खरेदी अजून संपली नव्हती. ती कमी भावाने मागत होती. आणि आपले म्हणणे त्या म्हाताऱ्याला हडसून खडसून समजावीत होती. तो म्हातारा मात्र तिच्या तोंडली भराभर खाण्याने अस्वस्थ होत होता. एवढ्यातच तो तरुण येऊन पोचला. आणि त्याने अर्थशास्त्राचा विषय बंद करून बोलणे समाज-शास्त्रावर नेले.

"तुझी फेरी पडली पुनः गावात ? कितीजण आहात या वेळी ? तंबू कुठे दिला ! "

त्याच्या या विचारपूस करण्याने ती अंमळ विस्मयचकित होऊन त्याच्याकडे सरळ नजर भिडवून उभी राहिली.

" देखती क्या हो ? बोल तो जरा ! मागील वेळी तुझा तो बाप की काका माझ्यासाठी चांगला घोडा आणण्याचे वचन देऊन गेला होता. "

" तो दोन-चार दिवसांत येईल. जवळच्या गावचा पाटील घोड्याचा सौदा करीत असल्यामुळं तो तिथं थांबला आहे. आम्ही काल इथं आलो. मी आणि माझी म्हातारी आजी. शाळेमागच्या बगीच्याजवळ उतरलो आहोत. "

" अस्सं. बरं, मी सांगितले होते तसले चाकू तरी आणलेस की नाही ? "

"कसले चाकू?"

"विसरलीस इतक्यात? अग, ते लांब पात्याचे, तिखट धारीचे, महाग चाकू?"

तिने किंचित काल कसला विचार केला, कुणास ठाऊक! पण अंमळशाने ती म्हणते कशी—

"हं, ते? हो आणले आहेत बरं! तिकडे दुकान आहे, चला पाहून घ्या. पटला भाव तर ठेवा."

"छे, छे, मला तर वेळ नाही. आता घरी गेलंच पाहिजे. मी सांगितलेले चाकू असतील तर मला हवेच आहेत. तू असंच करीनास? ते चाकू घेऊन तू माझ्या घरीच चल-"

ती किंचित घुटमळली नि "बरे" म्हणून आपल्या दुकानाकडे जायला वळली. जाता जाता तिने हळूच विचारले, "संध्याकाळ होत आली आहे. तुमचं घर फार लांब तर नाही ना?"

"छे, अर्ध्या तासात सौदा संपवून तुला परत येता येईल, रुपये राहतील तुझ्याजवळ परत येताना—"

ती चाकू घेऊन आली. दुकान तिथेच राहिले. दोघे भराभर पावले टाकीत निघाली. कधी तो पुढे नि ती मागे, कधी ती पुढे नि ते मागे. उभयतांना जणू घाई झाली होती. दोघांच्या मनांतील विचार एक होते की वेगवेगळे, हे कळायला मार्ग नव्हता. दिवसाभराचे उद्योग आटोपून रानातील हिंस्र श्वापदे जशी गुहेकडे जातात! त्यांच्या चालीतसुद्धा असे दिसते की, ही पावले त्यांना सुखाकडे नेत आहेत. कारण त्यांची गुहा अशा ठिकाणी असते की, शिकाऱ्याला सहसा ती सापडत नाही. सुख! दिवसभर गरीब श्वापदे मारून सायंकाळी मिळालेले समाधान! मरतात त्या जनाबरांना काय वाटत असेल? मृत्यूचे ज्ञान नसणे हेच बरे!

तो आपल्या वाड्यात पोचला. उजव्या हाती असलेले वृत्तपत्र त्याने डाव्या हाती घेऊन आत हात घातला आणि कडी काढली. अंगणात गुरे बांधली होती. अंगणातूनच जिन्याचा रस्ता होता. अंगणातील वेलीवर चार-दोन चिमण्या चिवचिवत होत्या. त्या त्यांना पाहताच उडून गेल्या. दावणीत बांधलेली गाय आपल्याच कक्षेत पण बाजूला झाली. तिचे वासरू देखील थोडे कोपऱ्याकडे सरकले व त्यांना त्याने वाट करून दिली. एका खांबाला बांधलेली पहाडी मोठी म्हैस! म्हशीची जात कधीच कसल्या प्रकारची दखल घेत नाही म्हणतात, कोट्यवधी बायकामुलांची हत्या होत असता वक्तव्य काढीत स्वस्थ बसणाऱ्या पुढाऱ्याप्रमाणे म्हैस आपल्या पुढ्यातला चारा खात असते. पण ती म्हैस देखील आज या दोघांकडे त्यांचे जिना चढून होईपर्यंत पाहत होती

आणि मोठमोठ्याने श्वास टाकीत होती. अंगणातील दोन खांबांवर एक वेळू उभा केला होता तो वाऱ्याच्या झोताने आपोआप खाली पडला.

ती दोघे माडीवर गेली. त्याने तिला आत घेऊन दार लावले.

आता अर्ध्या तासाच्या आत चाकूची खरेदीविक्री संपवून तिला वाटेला लागायचे होते. काही रुपये मोजल्याचा पाच मिनिटांतच आवाज झाला. बाजारात दुकानाचा पसारा तसाच पडला असल्याने 'झालेझुली'च्या अगोदर तिथे पोचण्याची तिला घाई झाली असावी.

थोड्याच वेळात विड्याच्या चार पानांची देठे खुडल्याचा आवाज झाला. काही जोरजोराचे बोलणेही ऐकू आले, आणि नंतर शांतता !

नंतरचे संभाषण मात्र स्पष्टपणे ऐकू आले.

"हे वाघाचं चामडं कुठून आणलं ?"

"मी शिकार केली त्याची."

"बंदूक पाहून वाघ अंगावर नाही आला ?"

"नाही. बरं, तुझे पैसे पोचले ना ? ते चाकू ठेवून जा. तुझे उपकार मी कसे मानू ? पुष्कळ दिवसांनंतर मला आज इतकं बरं वाटत आहे. आज मला इच्छापूर्तीचं समाधान खरोखरीनं लाभल्यासारखं वाटत आहे."

"तेवढ्यानं कसं भागेल ? नुसत्या तुमच्या इच्छेचा प्रश्न नाही. तुम्हांला समाधान झालं असेल. माझी इच्छा अजून तृप्त झाली नाही. ती तसली आता तुम्हांला करून द्यावी लागेल, हे मी तुम्हांला स्पष्ट बजावून सांगते."

त्याने तिच्याकडे कोणत्या नजरेने पाहिले असेल हे कळायला दार बंद असल्यामुळे मार्ग नव्हता, पण त्याचे वाक्य तेवढे ऐकू आले—

"म्हणजे काय ? वेडी आहेस का तू ! आता...? तू उद्या ये. उद्या पाहिजे तर आणखी पैसे देईन."

"उद्या ? हा काय तमाशा आहे ? चल उठतोस की खुपसू हा चाकू छातीत तुझ्या ?"

दरडावणीचा आवाज आणि त्यानंतर एक भ्यालेला चीत्कार !

"अग, ऐकून तर घे..."

"हा चाकू ऐकून घेईल आता. चल ऊठ. दुकान मोकळे आहे माझं. तुझा निकाल लावते आणि बदनामीसाठी मीच ओरडते."

काही मिनिटेपर्यंत एक चढता आणि एक पडता आवाज. बराच वेळ संभाषण ऐकू येत होते. नंतर पुनः पाच-पन्नास रुपये वाजले. फडक्यात रुपये बांधल्यासारखा आवाज होऊन जिन्याच्या रोखाने पावले वाजली.

---

१ सायंकाळ

" ठीक आहे. गाव माझा आहे. लक्षात असू दे. "

" मी चाकू-सुऱ्या विकते हे तुझ्याही लक्षात असू दे. आपला गाव सात आठशे मैल दूर टाकून मी माझ्या हिंमतीवर येथे आले. तुझ्यासारख्या षंढांना भ्यायला लागले तर निकालच लागला माझा. पटेल-चिमण्या खात जा चिमण्या... "

एकदा मोठ्याने हसून ती बाहेर पडली. तो बाहेर आला नाही. कागद उघडल्याची सळसळ ऐकू आली. वृत्तपत्रे उघडून त्या शिव्या बातम्यांवर तो नजर फिरवीत असावा. त्याच बातम्या-शिकाऱ्याने वाघ मारल्याच्या आणि वाघाने शिकारी मारल्याच्या !

माडीच्या खिडकीतून एक-दोन चिमण्या आत येऊन जोरजोराने चिवचिवून गेल्या. पक्षांची भाषा आपल्याला कळत नाही. पण ससाणा आकाशात उडत नव्हता, एवढे त्यांच्या आवाजावरून सहजच ओळखले जाऊ शकत होते.

माडीच्या खिडकीतून नोकराला हाक मारताना तो डोकावला. विसाव्या शतकातील सर्व बाह्यःप्रसाधनांनी युक्त असूनही त्याच्या चेहऱ्याला या वेळी काहीच खुलून दिसत नव्हते.

काय त्याचा चेहरा !

बाजारातील झाडाखाली त्या मरून पडलेल्या चिमण्या कदाचित गिधाडांनी उचलून नेल्या असतील, तिचे ते चाकू-सुऱ्याचे दुकान !

आजची तिची विक्री !

परंतु विक्रीचा आकडा उद्याही तिला विचारता येईल, आणि परवा तिचा बाप की काका घोड्यांचा सौदा करायला येऊ घातलाच होता !

१५।९।४७.

१००

मधू बोल

विमल ! तुला ते तीन-चार शब्दच केवळ उच्चारायला एवढा वेळ अस्वस्थ व्हावे लागले ! त्या शब्दांचा परिणाम होईल किंवा नाही याबद्दलही तू साशंक होतीस. किंबहुना परिणामाच्या अपेक्षेने तू ते वाक्य उच्चारलेच नसावे. जलभाराने लवलेले ढग जेव्हा वृष्टी करतात तेव्हा ते परिणामाचा विचार करीत नाहीत. सर्व जग झोपले असताना जेव्हा कोंबडा बांग देतो तेव्हा तोही परिणामाची दखल घेत नाही.

आच लागूनच सुफलाचा संभव निर्माण होतो. आम्रवृक्ष वसंताच्या पाखरांसाठी फुलतो, तो उन्हाची तिरीप पिऊनच. ज्वारीचा धांडा, गव्हाची पोटरी मोती उगळते ती तततेने अस्वस्थ होऊनच !

अर्धा तासपर्यंत तू सर्व बोलणे सहन करीत होतीस. हातचे पुस्तक तू तीनदा खाली ठेवलेस. नाजूक बोटांत धरून ठेवलेल्या कॉपिंग पेन्सिलीच्या जांभळ्या रंगाने ओष्ठ-संपुट रंगले, त्याचीही विचारांच्या अस्वस्थतेत तुला शुद्ध नव्हती. एकदा दारही घट्ट लावावयाचे ठरवून तू उठलीस नि दार लागलेच आहे आणि तरीही आवाज येतोच आहे हे कळल्यामुळे अधिकच कावरीबावरी होऊन तू परत आपल्या खुर्चीत येऊन बसलीस !

पितृवत आपले पालन करणारे आपले काका बोलत आहेत, शेजारचा शरद येऊन बसला आहे हे तू खूप वेळ विचारात घेऊन घुटमळीस. तुझी भीड चेपेना. काकांनी तुझ्यासाठी आजवर जे केले त्याचीही स्मृती तुझ्या नेत्रदीप्तीत तरळली. धीर धरवेना अशी परिस्थिती आणि तसल्या प्रकारच्या गोष्टी तुझ्या कानांवर येतील इतक्या मोठ्याने तू हजर असताना का व्हाव्यात असेही तुला वाटले. सहृदय पण असहाय्य माणसाला कोवळ्या अर्भकाची किंकाळी ऐकू आल्यानंतर तो जसा लाचार व कासावीस होतो तसे !

पण खरेच विमल ! त्या गोष्टी किती हसत खेळत लीलया सुरू होत्या ! त्यांच्या तुलनेने तुझी अस्वस्थता मापली तर आजचे जग हसेल की तुला ! फाजील भावना-प्रधान म्हणेल की ! तू देखील मग गोरीमोरी होशील, तुझे सुंदर मुखकमल लालीने रंगेल. तुझे टपोरे डोळे धरणी न्याहाळतील. समजा, तू धीर धरून म्हणालीस की, सुसज्ज, सुप्रतिष्ठित अशा असेंब्लीच्या बैठकीत बॉंब टाकायच्या अगोदर जग काय म्हणेल म्हणून भगतसिंगाने तुझ्याहीपेक्षा जास्त अस्वस्थता सहन केली—तर जग तुला अधिकच हसेल. सबब तू बोलू नकोस, समर्थनही करू नकोस ! जे नि जेवढे मनात आले ते सर्व बोलून टाकल्यानेच सफल होते असे नाही.

पाच पांडव नि शत कौरव यांचे क्रंदन सुरू होते. अन्नाने मारलेले, द्रौपदीच्या श्यामलसुंदर तनूवरची वस्त्रे फेडली जात असताना ते घडतच नाही असे मनाला समजावीत अधोवदन झालेले नीतिज्ञ धर्माच्या विरुद्ध झुंजत होते. निसर्गाच्या नियमाने आणि म्हणून उजळ माथ्याने वाढणाऱ्या तरुलतांनी न देखिलेले, न कल्पिलेले ते असह्य पाहून माना खाली टाकल्या होत्या. आणि त्या ' दिहांचि दिन थोकविणाऱ्या ' प्रसंगी, सर्व विनाशासही एका समरमत्त हत्तिणीच्या घाटेखालचे पाखराचे घरटे सुरक्षित राहिल्याची गोष्ट आपल्या संस्कृतीच्या पाचव्या वेदात नमूद आहे. मृत्यूच्या थैमानातील जीवनाची ती अदम्य सृजनलीला महाभारताने वगळली नाही.

म्हणूनच तुझ्या वाक्याने, समजा, काका किंचित ओशाळले किंवा शरद अस्वस्थ झाला तरी पुढच्या पिढीतील सर्वच नवे लोक अस्वस्थ होतील असे मानण्याचे कारण

नाही. ह्या आशंकेनेच केवळ तू इतकी निराश होणार? नियती इतकी निर्घृण नि अविचारी नाही वरं! पूर्वेचे तांबडे फुटते, क्षितिजाच्या कडा जशा तेजाळतात त्या उत्साहाने आणि सौंदर्याने नटून नवी पिढी येत असते!

तोवर तुला तुझी अस्वस्थता सहनच केली पाहिजे.

काका आणि शरद ओशाळले तरी तुझ्याबद्दल त्यांच्या मनात दुजाभाव थोडाच टिकणार आहे? अग, तुझे ते प्रेमळ काका व तुझा म्हणवून घेण्यासाठी आपल्या प्राणांची पंचारती घेऊन उभा असलेला तो शरद! आजच्या समाजमूल्यांनी अभिभूत झाल्यामुळे त्यांच्या मनातील कोमलता अगदी संपली असेल असे मुळीच नाही!

ते अगदी सहज बोलत होते. शरदचा आवाज तर तुला त्याचे अस्तित्व जाणवावे म्हणूनच इतका मोठा होत होता. तू नुसती ओझरती, समीराच्या आल्हाददायी झुळकेसारखी त्यांच्या स्मोरून गेली असतीस, तर तो तृषार्ती इतका वेळ बसलाही नसता. आणि क'कांना पण ह्या गोष्टी तुझ्यासमोर बोलाव्याशा वाटल्या नसत्या.

विमलने आपल्या अभ्यासाच्या खोलीत येऊन पुस्तक हाती घेतले न घेतले असेल इतक्यात शरद फेरी टाकायला आला. काका नुकतेच सकाळच्या गोड थंडीत हवाहवासा वाटणारा चहाचा कप संपवून शालीच्या उबेत शरीर सुखवीत बसले होते. शरद आपल्या कॉलेजच्या गप्पा सांगत होता. आपण आपले तास कसे चुकवितो, प्राध्यापकांच्या शिकविण्यात रंग कसा नि का भरत नाही, नेमलेली पुस्तके आपल्यालाच वाचून कसे भागवावे लागते, इ. गोष्टी त्याच्या सुरू होत्या. त्या सगळ्या बोलण्यात आपले स्वावलंबन नि बुद्धिमत्ता दिसावी, कुणाला तरी ती ऐकू जावी असे त्याला फार वाटत होते. त्यातील बरेचसे आत्मपर बोलणे विमलसाठीच होते. फाजील अभ्यासू नि पुस्तकातील किडे असलेल्या विद्यार्थ्यांबद्दल त्याला कसा तिरस्कार वाटतो आणि संधी सापडली म्हणजे आपण त्यांची कशी जिरवतो याचे उदाहरण म्हणून बोलता बोलता त्याने एका करमरकर नावाच्या विद्यार्थ्याची गोष्ट सांगितली. तो फार अभ्यासू. पुस्तकावाचून त्याला दुसरे जग नव्हते. रस्त्यात काल त्याची व शरदची भेट झाली. शरद टेनिसची रॅकेट हाती खेळवीत क्लबात जात होता. त्याने करमरकरला हटकले की, चल तुला माझे टेनिसचे कसब दाखवितो. करमरकर म्हणाला, तुझ्या कसबावर मला कुणी परीक्षेत प्रश्न विचारणार नाही. त्यावर शरद म्हणाला की, तुझे प्रोफेसरही टेनिस खेळतात, त्यांच्यापेक्षाही तू विद्वान झालास म्हणायचा, इ. इ.,

त्याच्या बोलण्याला मुद्दा नव्हताच. आपले कॉलेजचे जीवन स्वैर, स्वतंत्र, सुखाचे कसे आहे हे तो काकांच्या मनावर ठसवीत होता. काकांनाही थोडी ईर्षा होत होती. उल्हासमय प्रभातवेळा त्यांची पूर्व स्मृती उजळीत होती. त्यांच्या वेळच्या एका विद्यार्थ्याने एका पुस्तकी किड्याची कशी सपशेल जिरविली हे सांगायला ते

उत्सुक झाले होते. त्या जिरविण्यापुढे आजचे कॉलेजचे जिरविणे काहीच नाही असा त्यांचा आविर्भाव होता. त्यांच्या कॉलेज जीवनातील त्या पुस्तकी किड्याचे नाव परांजपे असे होते. तो असाच कुणात मिसळत नसे. अभ्यास, पुस्तके, बक्षिसे, नंबर, हेच त्याचे विश्व ! त्या वेळच्या दुसऱ्या एका विद्यार्थ्याचे नाव देशपांडे होते. देशपांडे विद्यार्थ्यांचा फार आवडता. खेळ, नाटक, प्राध्यापकाची हजेरी व कामापुरता अभ्यास या सर्व बाबतींत देशपांडे मोठा दक्ष. त्याला कुणी उत्तर दिले नि त्याच्याकडून प्रत्युत्तर मिळाले नाही असे कधीच होत नसे. कित्येक वेळी तर त्याच्या अजब टाळक्यातून निघणाऱ्या कोट्यांसाठीच इतर विद्यार्थी मुद्दाम त्याला डिवचीत. एखाद्या झाडाखाली विद्यार्थ्यांचा फड जमवून देशपांडेमहाशय आपली रसवंती नेहमी स्वैर चालवीत असत.

असाच एक दिवस उगवला. काका त्याच कॉलेजात व त्याच वर्षात त्या वेळी होते. देशपांडेसमवेत कॉलेजचे चार-दोन विद्यार्थी कॉलेजच्या कांपाउंड गेटजवळील पुलावर बसले होते. कॉलेजचे स्नेहसंमेलन सुरू होते. सायंकाळचे साडेचार वाजले होते. परांजपेला मिळालेले पहिल्या नंबरचे चाळीस रुपयांचे बक्षीस घेऊन तो बाहेर पडत होता. खुशीत असल्यासुळे त्याने त्या टोळक्याकडे नजर जाताच थोडेसे स्मित केले. तोच—

" अरे परांजपे, लेका माहीत आहे चाळीस रुपये तुझ्या खिशात खुळखुळताहेत ते ! आम्हांला काय त्याचा उपयोग ? वेड्या, काही खिलवून तोंड गोड तर करशील ! नाव घेऊ तुझं जिभेवर चव रेंगाळेतोवर—"—देशपांडे.

" अरे वा रे वा ! श्रम आणि अभ्यास माझा अन् तुला रे कसली मिठाई. गप्पाव्यतिरिक्त काही करून दाखव म्हणजे मग आपण देऊ हवी तर..." परांजपे.

" काय करून दाखवू ? नागवा नाचू ? की पक्षासारखे बोल काढू ? की प्रोफेसरांसमोर बकरीसारखा चेहरा करून मँ मँ करू ? म्हणशील ते करून दाखवितो. पण ते आता होण्यासारखे सांग. कारण मिठाई आता हवी. संमेलनाच्या टापरघाईत तोंड कसे वेचव झाले ! माझ्या योग्यतेवर व कर्तृत्वावर विश्वास ठेवून अगाऊ मिठाई खाऊ घालणार असलास तर मग प्रश्न नाही. कोणतेही काम सांग. देशपांडे सेवेला हजर असून हुजुरांच्या आज्ञेची प्राण कानांत आणून किंकर जेव्हेत्ते वाट पाहत आहे "—देशपांडे.

" हं ! अगाऊ देतोय् मिठाई ! आता सांगण्यासारखे एकच काम आणि ते तू सुचविले आहेस. इथून आपल्या या तलावापर्यंत धावत जा. पाच रुपयांची मिठाई लागली आपल्याकडे. तूच म्हणतोस ना की नागवा नाचतो—" परांजपे.

अग्नेयास्त्र फेकणाऱ्या विजयी वीराप्रमाणे परांजप्याने छाती फुगविली. हे अस्त्र आपल्या खिशातील पैसा सफै वाचविणार याबद्दल त्याची बालंबाल खात्री

होती. देशपांडयाला निरुत्तर व नामोहरम केल्याचा विजयोन्मादही चेहऱ्यावर झळकत होता.

देशपांडे काय उत्तर देतो याकडे सर्व मंडळींचे लक्ष लागले. त्याने बिनतोड उत्तर देऊन बक्षिसाने शेफारलेल्या परांजप्याला चूप बसवावे अशी त्यांची मनापासून इच्छा होती.

चार–पाच सेकंद स्तब्धतेत गेले. नंतर लागलीच देशपांडे म्हणाला—

"कबूल आहे. लेका, तुझे ते एवढे मोलाचे पाच रुपये करतोच वसूल. तुला काय वाटले मी कच खाईन व तू माझ्यावर कडी करशील ? एक अट. तुझ्या कामाचे स्वरूप पाहता ते पाच रुपये तू अगोदर दुसऱ्याजवळ ठेव. दहा मिनिटांत मिठाई आणतो चांगली सहा शेर—"

परिस्थिती बिनतोड होती. वखत बाका येऊन ठेपला. गत्यंतर नसल्याचा देखावा होता. सायंकाळचे पाच वाजलेले. कॉलेजसमोरचा हमरस्ता माणसांनी गजबजलेला. चार-दोन मिनिटांत मिलचा पोंगा होईल व कामावरून सुटलेल्या मजुरांचीही एकच गर्दी उसळेल. काका आणि इतर सर्व विद्यार्थी स्तंभित झाले. तलाव अर्धा फर्लांग अंतरावर आणि हा देशपांडे बोलतो काय नि करू पाहतो काय !

पाहता पाहता परांजप्याने पाच रुपये काकाजवळ दिले. देशपांड्याने कोट काढला. नंतर सदरा, नंतर बनियन—

—आणि सगळे जग आपापल्या कामाच्या भाऊगर्दीत रस्त्यावर वावपळ करीत असता डोळ्याचे पाते लवते न लवते तो देशपांडे धोतर फेकून तीरासारखा धावला व लोक शुद्धीवर येऊन वळून पाहतात न पाहतात तोच तलावावर पोचून पाण्यात उडी मारता झाला–

काका अगदी रंगात येऊन चित्रासारखे वर्णन करीत होते. ते पुढे म्हणाले "आम्ही—"

पण हे वाक्य पुरे झालेच नाही. कारण विमल एकदम दार उघडून दिवाणखान्यात आली आणि तीव्रतेने म्हणाली–

"आणि होणार हे सगळे माहीत असूनही तुम्ही त्यात सामील झालात ? नि फक्त पाहतच राहिला ? आणखी काहीच करवले नाही तुमच्याने ?"

काका आणि शरदचे चेहरे पाहायलाही ती थांबली नाही. निमिषार्धात अंतर्धान पावल्यासारखे फक्त दार वाजले.

हेच ते विमलचे वाक्य जे उच्चारण्यासाठी अर्ध्या तासापासून ती अगदी अस्वस्थ बेचैन झाली होती–आणि जे बोलल्यावाचून तिच्याने राहवलेच नाही !

२१।१२।४७

१०१

ते जुने पुस्तक

दुसऱ्या स्वातंत्र्य-दिनाला अजून आठ-दहा दिवस तरी अवधी होता. त्या कॉलेजातील सर्व प्राध्यापक उत्सवाच्या तयारीत गुंतले होते. परवापासून रोज तीन तीन तासांच्या हिशेबाने दुपार-सायंकाळ त्यांच्या सभा प्रिन्सिपलसाहेबांच्या खोलीत होत होत्या. आजवरच्या निष्क्रियतेला आणि विरोधबुद्धीला जी सरकारी नोकरीची सबब सांगता येत असे ती यापुढे चालण्यासारखी नव्हती, म्हणून सर्व अकर्तृत्व या स्वातंत्र्य-दिनाच्या गंगेत धुऊन काढण्याचा जणू प्रत्येकाचा पण होता.

आपल्या देशात एखाद्या कामात व्यग्र असल्याची खूण म्हणजे दुसऱ्या सर्व कामांत दुर्लक्ष करणे. परवापासून केवळ नावाला म्हणूनच कॉलेज होते. अशी पर्वणी अवचित आल्याचा आनंद प्रत्येक विद्यार्थ्याच्या मुखावर विलसत होता. कॉलेजमध्ये तर यायचे, तासांना तर हजर राहायचे. जबाबदारी ना विद्यार्थ्यांवर, ना प्राध्यापकांवर ! सरकारी कॉलेजचा हा उत्सव पातिव्रत्याची नव्याने शपथ घेतलेल्या स्त्रीच्या कुंकवा-सारखा ठळक उठून दिसायला हवा ! उद्देश स्वच्छ उघड होता !

आता येत्या चार-आठ दिवसांत कॉलेजात मुले-मुली तर असणार, प्राध्यापक असणार, तासांची वर्दी द्यावयास घंटाही असणार; पण काळजी फक्त नाव झाले पाहिजे याची; फिकीर फक्त निष्ठा दिसली पाहिजे याची; तिडीक मतलबाची, हौस नावीन्याची–आम्हीही काही करून दाखवू शकतो !

कॉलेजचे परिसर खूप विस्तृत होते. मधूनमधून मोठमोठी झाडे पार देऊन बांधली होती. एका बाजूला सुंदर बाग होती. त्यातील फुलांचा सुगंध मुलींच्या कॉमन रूमपर्यंत जाऊ शकत होता. मुलींच्या संख्येच्या मानाने ती कॉमन रूम लहान पडल्याने गर्दी, दाटी, कलकल यांबद्दल आश्चर्य प्रकट करण्याची सोय नव्हती. त्यांच्या कल्लोळ लहरींच्या हेलकाव्यांनी बागेतील नाजूक सुपलीची फुले हालत, असे काही कॉलेजचे कवी लिहून गेले होते. फुलांनी त्याबद्दल कधी तक्रार केल्याचे ऐकिवात आले नव्हते. बागेतील फुलांफुलांवर बागडत असलेली तऱ्हेतऱ्हेची फुलपाखरे मुलांसारखीच स्वैरसंचार करीत होती. त्यांचा त्यांच्यातील विद्यार्थिनींबद्दल काय दृष्टिकोण होता हे कळायला मार्ग नव्हता. सर्वत्र निर्भय, निर्लेप, स्वच्छंद, सुन्दर वातावरण पसरले होते. प्राध्या-पकांच्या अवचट दिसणाऱ्या चेहऱ्यावरील ओढून आणलेले गांभीर्य वगळल्यास त्या सर्व वातावरणाला खोट ठेवायला जागा नव्हती.

अशा या अनुकूल स्थितीत पुष्कळ दिवसांपासून वेगवेगळ्या कारणांनी आमच्यापैकी पुष्कळांच्या मनात भरलेल्या त्या मुलीचे वर्णन करून टाकण्याचे मी ठरविले होते. अनिंद्य लावण्याचे वरदान घेऊन आलेल्या त्या तरुण मुलीला तसे मी कित्येकदा पाहिले होते. जवळजवळ रोज पाहत होतो. वर्गातून आमच्या अगोदर बाहेर पडताना आणि वर्गात आम्ही सर्व स्थिरस्थावर झाल्यावर प्रवेश करताना तिचे प्रत्येकाने अवलोकन केले होते. एवढेच नव्हे तर अनेक भाषांनी युक्त असलेल्या पण आंग्लभाषेच्या बंधनाने एकत्र आलेल्या त्या वर्गात तिने प्रवेश करताच भिन्नभिन्न मातृभाषांतून रसिकतेचे उद्‌गार कित्येक वेळी प्रतिध्वनित झाले होते. आमच्या गुरुजनांच्या लक्षात हे आले नव्हते असे नव्हे. पण आम्हांला यासंबंधी चार उपदेशाच्या गोष्टी सांगण्याऐवजी त्यांनी स्वतःची नजर खाली केल्याचा पुरावा आमच्या दप्तरी दाखल होता.

तथापि रोज पाहणे निराळे आणि वर्णनासाठी पाहणे निराळे ! एकदा त्या-त्या दृष्टीने पाहण्याची गरज होतीच. दुसऱ्या तासाला हजेरीनंतर सुट्टी मिळाल्यामुळे ती लायब्ररीत गेली होती. परत येईलच आणि याच रस्त्याने कॉमन रूममध्ये जाईल. कंडेला असलेल्या या झाडाशी एकाग्रतेने वाचनात गढल्याचा बहाणा करून बसल्यास सर्व मंगल कामनापूर्ती करणाऱ्या ईश्वराच्या कृपेने काम साध्य होण्या-सारखे होते.

निश्चय आणि कृती करण्यात माझ्याकडून कसूर झाली नाही. कागद, पेन्सिल, वही सर्व जय्यत करून चाफ्याच्या झाडावर फुललेली लाल फुले, आकाशातील भावना प्रस्फुटित करणारे ढगांचे पुंजके, फुलपाखरांची चंचलता, शेवग्यावरून झडत असलेल्या सोनेरी पालवीची भुरभूर, मुंग्यांची उद्योगपरायणता, सृष्टीचा आनंद या सर्वांकडे वाचकाच्या दृष्टीने पाहत बसलो.....

पण विघ्न आणणार नाहीत ते सहाध्यायी कसले ? आणि मधेच तोंड घालून अप्रस्तुत बोलणार नाहीत तर त्यांच्या उच्च शिक्षणाला बट्टा नाही का लागणार ? शिवाय माझ्या चहासाठी त्यांनीही कित्येकदा खर्च केला होता. भीष्म-द्रोणापेक्षाही आपण नीतिमत्तेने बलवान असल्याचा मला आव थोडाच आणायचा होता ? आणि द्रौपदी-वस्त्रहरणासारखा हा प्रसंगही नव्हता म्हणा ! बरे, मी माझा उद्देश कितीही प्रामाणिक-पणे सांगितला तरी त्यांची ती तोंडे, त्यांवरचे ते हास्य, आणि माझी मॅगसल्फ घेतल्या-सारखी अवस्था.....

ते टाळणे भागच होते. सबब माझ्यावर चाल करून येणाऱ्या त्या टोळक्याचे सहर्ष स्वागत-जणू एखादा काँग्रेसचा महान पुढारी आला आणि मी त्याचे सहपरिवार स्वागत करीत आहे.....

" या मंडळी, आपलेच झाड आहे. बसा. "

"या हो, एवढ्या इतमामाचे बोलावणे आहे–बसा !"

"बसतोच की. पण हे फार समोर झाले बुवा; सिगारेट पेटविता येणार नाही."

"हे पाहा, हे मला पसंत नाही. जे करायचे त्याची लाज कसली ? सब खुल्लं खुल्ला––"

"सद्गुरू ! तुमचे सर्व उद्योग–म्हणजे जे करायचे ते सगळे अगदी चव्हाट्यावर चालते वाटते ?"

हास्याचे फवारे, विजयाच्या टाळ्या आणि टोळक्यापैकी कुणाचे तरी उत्तर—

"धूम्रपान इतर कामासारखे एका बाजूला करण्यासारखे काम नव्हे म्हटलं."

"अरे काणे ! त्या शंभ्याला हाक मार—"

"अहो शंभूराव ! इकडे या की. आज काय अभ्यासाची एवढी घाई ! माउंटबॅटनने राज्याचा बंदोबस्त आज आपल्यावरच सोपविला आहे."

"आणि पंधरा तारखेपर्यंत हे असेच चालणार !"

"स्वतंत्र्य-दिनाचे केवढे हे फायदे हो !"

"आणि किती सदुपयोग हो !"

"अहो शंभूराव ! वा ! तुम्ही सरळ निघालात ते ?"

"इकडे येता की नाही बोला ! आम्ही अहिंसेची शपथ घेतली नाही बरं—"

"आणि तुम्ही शेंडी पण वाढविली आहे. पाहा रे बुवा ! तुम्ही जा पण *at Owner's risk.*"

"अरे, लायब्ररीच येईल इकडे आता. मग पी किती ज्ञान पितोस ते–"

"आणि तिकडची कॉमन रूम लहान पडली म्हणून त्यातले अर्धे सामान लायब्ररीत शिफ्ट केले आहे. काही होल्डऑल्स, काही छत्र्या, काही डबे, काही सूटकेसेस....."

"अरे गंमत नाही, कालचे पुस्तक तेवढे परत करून येतो. दंड पडेल उगीच."

"इश्श ! असे काय बरे बोलायचे गडे ! मग नाही का....."

"अय्या ! राणे, हे कधीपासून... ?"

"ग ऽ ऽ बा ऽ ऽ ई ऽ ऽ"

पुनः एकदा खूप हशा. त्यातले वरील उद्गार काढणारे हिंदुस्थानचे भावी आधारस्तंभ आपल्या अभिनयावर खुश होऊन जमिनीवरील हिरव्यागार सुखद दूर्वांकुरांवर आपल्या देहाचे अनेक भाग टेकविते झाले. शंभूरावाची बिशाद काय की तो लायब्ररीत जाईल ? स्वर्गाचे विमान खोळंबले तरी तुकाराम जाणे शक्य नाही !

माझे डोळे लायब्ररीच्या इमारतीकडे लागले होते. पण त्या दारातून आतापावेतो बाहेर पडलेले सर्व माझ्या लेखी अवर्णनीय होते. हा बाहेर पडला तो बर्वे !

त्यामागून सुर्वे, नंतरचा मोहनसिंग, त्याच्या लागून फिरोज, मागचा सत्तार; सर्व येऊन आमच्या धर्मजातिनिरपेक्ष संमेलनात सामील झाले.

गोष्टीचे विषय अपुरे नव्हते. तासाची घंटा व्हायला वेळ होता. धूम्रपानासाठी इतर विद्यार्थ्यांच्या पाठीचा आडोसा मिळाला होता. गोष्ट शंभूरावावरून निघाली...

" केम शंभुराव, तुमची चोटी तुमच्या केपमधून बाहेर येत आहे–"

" आणि फौंटनपेनने खिसा खराब झाला आहे ! "

" अन् दाढी काय मून केले नाही ! "

" ते पुस्तक दावा की आमास्नी. "

" हो रे बाबा ! खरंच ते पुस्तक परत करायचं आहे. जाऊ द्या ना मला–"

" पाहू पाहू ! अहा हे पुस्तक ! "

" कोणतंय रे ? "

" *What the students of other countries have done* ! "

" *By* ? "

" आहे कुणी सोम्या वल्लद गोम्या. "

" आता वाचता शंभुराव हे पुस्तक तुम्ही ? या वयात ? फर्स्ट इयरला काय मुलींचे चेहेरे पाहत राहिलात ? "

" अरे, हे पंधरा वर्षांपूर्वी निघालं पुस्तक ! मी प्रायमरीत होतो तेव्हा--"

" अन् आहे काय त्यात ? आम्ही नाही का बेचाळीसमध्ये दाखविला इंगा ? पळाले किनाई इंग्रज ? "

" आम्ही म्हणजे कोण, आपण वाटते ! "

" सिगरेटचा धूर पळवता येतो का जी ? "

" आणि नाकावरची माशी बेटा ? "

" तुम्हांला असे बोलायचे असेल तर कोण थांबविणार म्हणा ! पण *One thing is sure* ते पुस्तक फार जुनं आहे. *There is nothing new* ! आपण यापेक्षा पुष्कळ पुढे गेलो आहोत. "

" *I also agree* ! आता हैद्राबादचा प्रश्न रंग धरतो आहे. तुम्हांला काय वाटते आपली *Student world* मागे हटेल ? "

" छे छे ! इथे बसून एका फुकेने निजामाला गारद ! "

" काय आनंद, फार शौर्याच्या गोष्टी चालल्या आहेत. आज लायब्ररीत 'काही मधुर मधुर—मधुर ऽ ऽ "

" अजी जावो जी ! आपण काय असे उल्लू आहोत पोरींमागे धावायला ? "

"मग काय, पोरी धावतात होय तुमच्या मागे?"

"अरे हम कुछ समझतेही नहीं! अपने लिए सब बराबर! अपना हिसाब सीधा—"

"हे कुठवर माहीत आहे का बर्वे? मिस् कमला दिसत नाही तोवर! मग सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति..."

"त्या दिवशी नाही का पाहिलं! नुसता तिला प्रोफेसरांचा निरोप सांगायचा होता तर स्वारी चारदा दाढी करून न् तीनदा कपडे बदलवून बेजार झाली–"

"काय उगीच मागे लागता रे बिचाऱ्यांच्या? रडून बिडून देईल–"

"खरंच काय अर्थ आहे उगीच असे चिडविण्यात?–"

हा शंभूरावांचा आवाज. त्यांनी महत्प्रयासाने एव्हाना ते लायब्ररीचे पुस्तक दुर्दशेतून वाचवून हस्तगत केले होते.

"नाही रे! हा लेकाचा अशाच फुशारक्या मारतो नेहमी. प्रसंग पडला की–"

"अरे जा रे, मी असा डरतो का? म्हणू दे ना त्याला मनमें आये सो–"

"मी खोटे म्हणत नाही. *I challenge*!"

"काय *challenge* ××× तुझे! मी त्या मिस् कमलला भितो? झेपतो!"

"हो हो! हो म्हणायला काय भीती वाटली तुझी मला? नांगी टाकतोस लेका–"

"पण ही हमरीतुमरी कशाला? घोडामैदान जवळच आहे. चल रे कर *accept challenge*."

"अरे, पण *challenge* च्या नावाने त्याचे थोबाड उलत नाही ते?–"

"उलत नाही कसं? जा नि धर तिचा हात आणि ये परत. नाही–तर जाशील नि बाटाचा कारखाना तोंडावर उमटल्यासारखा चेहरा करून परत येशील."

"ती पाहा, ती येतच आहे!"

सर्व डोळे आणि काही प्राण लायब्ररीच्या रस्त्यावर विस्तारले.

ती येत होती, अस्मानी पातळ नेसून, आपल्या पदविन्यासाने मार्गाला धन्य करीत, आपल्या मधुर मंदस्मिताने आसमंत उजळीत, आपल्या विनयाने विद्यावंतांना लाजवीत, आपल्या भरूक्षेपांनी हिरवळीच्या, पाखरांच्या, पुष्पांच्या अस्तित्वाचे व विकसनाचे सार्थक करीत...

ती येत होती! तिची पुस्तके तिने छातीशी दाबून त्यावर आपल्या डाव्या हाताचे दडपण ठेवले होते. दृष्टी निर्भय, निर्मळ, स्नेहार्द्र होती. तिने आपल्याकडे पाहावे, तिने आपल्याशी बोलावे, तिने आपल्याला एखादे काम सांगावे...

ती आली ! मंदगतीने, आत्मप्रत्ययाने ती अंतर तोडीत झाडाजवळच्या रस्त्याने जाऊ लागली. सर्वांच्या आनंदाचे स्वागत करायला जणू झाडाखाली बसलेल्या सर्वांवर तिने दृष्टी टाकली. ही ज्योत पुढे गेली की आपण विवर्ण होणार...?

" हं ! घे रे challenge. हो ना पुढे आता. "

" अरे बस ! जोवरी न पाहिला— "

" अच्छा ठीक है— "

तो खरेच उठला ! त्याला मोठ्याने हाक मारून दाबणे सभ्यतेच्या विरुद्ध झाले असते. आपले वागणे दिसू नये तेथे असभ्य दिसण्याची भीती होती. शिवाय आपण अशा वेळी कसे वागावे यासंबंधी विचारविनिमय करायला एखादी सभा—

पण त्याने तर चार-सहा टांगा मारूनच तिला गाठले. हाक मारली. निमिषार्धात तिचा हात धरला आणि किंचित आणखी जवळ जाऊन त्याचे चुंबन घेतले. नंतर लागलीच आपल्या शौर्य-धैर्याचे वाभाडे काढणाऱ्या इतरांकडे तुच्छतेचे कटाक्ष टाकीत वीरोचित पदन्यासाने तो परत आला !

त्यानन्तर त्या मुलीचे काय झाले; ती रडली की दिङ्मूढ झाली, की पिस्तुलाच्या गोळ्या बसल्यासारखी विद्ध झाली; त्या विद्यार्थ्यांचे काय झाले; तो पस्तावला की त्याला शिक्षा झाली; की इतरांनी त्याचा धिक्कार केला.... हे सर्व जाणण्याची आवश्यकता नाही, इच्छाही नाही. त्या झाडाखाली किंचित काल शांतता पसरली. सर्वांच्या कानांत घणघणल्यासारखे झाले. खालच्या हिरवळीचा रंग काळवंडला. उगीचच कुरतडत असलेल्या गवताच्या काड्या दातांतच अडकून पडल्या. गवतावर ठेवलेली अभ्यासाची पुस्तके वाऱ्याने फडफडली.

शंभूरावाचे ते जुने पुस्तक पालथे पडले होते आणि त्याचे कव्हर फडफडल्यामुळे आवाज होत होता.

तासाची घंटा अजूनही झाली नव्हती. स्वातंत्र्य-दिनाच्या महोत्सवासंबंधीची प्राध्यापकांची सभा अजूनही संपली नसावी बहुधा !

१।८।४८

१०२

हा तरी जगायला हवा होता !

कधी वाटलं नाही, ते आज वाटतं आहे. वाटतं, ते पोर जगलं असतं तर फार बरं झालं असतं. डोळ्यांदेखत त्याने प्राण सोडला. काय वाटेल ती किंमत द्यावी

लागली असती तरी ती द्यायला हवी होती. पण माणसाला मारण्याचं जसं आजच्या विज्ञानाला साधलं आहे तसं हमखास त्याला जगविण्याचं साधलं नाही !

आणि तसं म्हटलं तर त्या भिकारी, विपन्न, चारीकडून ज्याला 'मर' 'मर' असेच शब्द ऐकू येत होते त्याच्या जगण्याला किंमत ती काय ? एक डोझ औषधाचे तरी मूल्य आहे त्याच्या अस्तित्वाला ?

तो कसा डोळ्यांदेखत मेला ! त्याच दिवशी काही तासांपूर्वी त्याची आई वारली. त्याचा लहान भाऊ त्याच्या नि माझ्या देखता मेला. पण मला वाईट वाटलं नाही. मृत्यूच्या विराट दर्शनानं माझे डोळे निवले आहेत. मुडद्यांना गतीला लावता लावता माझ्या खांद्यांना घट्टे पडले आहेत. एकेका दिवशी तीनतीनशे लोक मेलेले मी बघितले आहेत. त्यांची प्रेते बैलगाडीत खताच्या ढिगासारखी भरून एकाच खड्ड्यात 'जात जाते', 'धर्म जातो' अशा आरोळ्या ऐकत मी मातीखाली दाबली आहेत. मृत्यूची जरब आणि मृताबद्दल व त्याच्या रडणाऱ्या माणसांबद्दल हळहळ माझ्या मनात शोधून सापडत नाही. परीक्षेचे पेपर सोडविताना जसे एकेका प्रश्नाचे उत्तर संपले की मनावरचे दडपण कमी होते तशी वृत्ती या प्रेतांबद्दल मी बाळगली आहे.

पण हे पोर !

तसा या नवख्या स्टेशनावर गाडीतले माझे सामान तसेच टाकून मी जो उतरून पडलो तो तरी एका बाईच्या प्रेताची विल्हेवाट लावायलाच ना ! ती आगगाडीत मेली. कशाने मेली ? का मेली ? एकाही प्रश्नाने मला सतावले नाही. इच्छा एवढीच होती की डब्यातील लोकांचे भेदरलेले चेहरे शांत व्हावे आणि ज्या जमिनीने त्या बाईला आजवर ओलाकोरडा तुकडा दिला तिच्या कुशीत तिला झोप मिळावी.

स्टेशन मास्तर भीतीने वर्दळीवर आला नसता तर मला माझा प्रिय आणि चिर प्रवास सुखेनैव सुरू ठेवता आला असता. आता जवळ सामान नाही. खिशात असेल तेवढीच मोड म्हणजे सहा रुपये नऊ आणे, अंगावर असतील तेवढेच कपडे, सामान व पेटीत असलेल्या पैशाचे काय होईल याबद्दल थोडी रुखरुख—

दुःखात सुख एवढेच की त्या बाईची सद्गती करण्याची जबाबदारी त्या कंगाल स्टेशनवरच्या एका दयाळू पोर्टरने घेतली होती. काय गंमत आहे. ज्यांच्यासाठी रडायला कुणी नसतात ते मेले म्हणजे 'रडायला कुणी नाही याचेच दुःख होऊन या जगातली काही भाग्यवान माणसे रडू लागतात. तेही माझ्या नशिबी नाही. तिची जिम्मेवारी संपली. राहिलो केवळ मी. कठीण नव्हते ते काम ? माझे तोंड त्या बाई-सारखे काही कायमचे बंद झाले नव्हते व ते माझे सोबती सहा रुपये नऊ आणे ! नेपोलियनच्या पोलादी सैन्यापेक्षाही जास्त मदार त्यांच्यावर होती.

राहावयाचे कोठे ? चोवीस तास, म्हणजे दुसरी आगगाडी परत कृपा करून त्या स्टेशनाला लागेपर्यंत वेळ काढायचा. आता रात्री सात वाजलेले. मास्तर-साहेब माझ्यावर रागावून नि माझ्याकडे एक अत्यंत तुच्छ कटाक्ष टाकून निघून गेलेले...

ज्या पोर्टरने त्या बाईची जबाबदारी घेतली होती त्याच्यावरच आपला थोडा भार...

गावाचे नाव तर वाचले पण अक्षरांपेक्षा जास्त बोध झाला नाही. कोल्ह्यांची गायकी एव्हानाच सुरू झाली होती. म्हणजे गावाची भौगोलिक परिस्थिती कळली. स्टेशन मास्तरसाठी एंजिनातले पाणी आले होते. तात्पर्य, अन्नधान्य परिस्थितीची चौकशी करण्याअगोदर डोळ्यांतून थोडे पाणी काढल्याशिवाय तोंड ओले होणे अशक्य होते.

" बाबा ! मैं ठेसनपर ठर सकता हूं ? सामान तो मेरा रेलके डिब्बेमेंही रह गया. "

" बाबू ! यहाँ क्या करोगे ? सभी ओर गोली की बीमारी फैली हुई है। गाँव यहाँसे चार-पाँच मील दूर है । यह लकडीका तो ठेसन है । मास्तरसाबने भी बालबच्चे भेज दिए हैं । और मैं अभागी क्या कहू बाबू अपनी राम कहानी ! इस मुडदेको गांडकर कब आऊं पताही नहीं. "

यातील अर्थ स्पष्ट होता. स्टेशनवर असे पडून राहण्यापेक्षा गावात निदान कुत्र्याचे तरी भुंकणे ऐकू येईल.

आणि प्लेग ! पण सफर करायला निघालेला मी ! कोण रडणार आहे माझ्या-साठी ? एक दिवसाचा उपवास नवीन नव्हता !

गावाकडे पाऊल वळविले. चंद्र-तारका यांचे सहाय्य आजवर कित्येक कथांच्या बायकांना मिळाले आहे; पण भाग्यरेषा उमटविण्याच्या वेळी गैरहजर असल्याने सर्वांना मुक्त हस्ताने दान देणाऱ्या सर्वसाक्षी ईश्वरानेच ज्याच्यावर कधी मेहेरनजर ठेविली नाही त्याला चांदण्या झाल्या तरी कशा वाट दाखवितील ?

झाडे भुतांसारखी दिसत. प्रत्यक्ष भुते दिसली असती तर त्यांच्या हातापाया पडून थोडेसे पाणी मिळविण्याचा उपाय तरी केला असता.

समोर काळे कायसेसे दिसत आहे. टेकडी असेल बहुधा ! तीवर चढून आजू-बाजूला पाहावे दिवाबिवा कुठं दिसतो की काय तो ! जवळ गेलो. टेकडी नव्हती. ते घर होते. इंद्रमहाल देखील मला त्या घरापेक्षा त्या घडीला तुच्छ वाटला असता !

आणि आत मुलाचेर डणे

जिवंत प्राणी आहेत एकून आत--!

शिवाय हा माझा देश. यात पावलोपावली भली माणसे मिळून जातात ! दारातून प्रकाश येत होता. डोकावून पाहिले तो करंजीच्या शेंगा कुठून त्यावर चिंधी पेटविली होती. एका बाजूला एक बाई कण्हत होती. तिच्याजवळचे एक वर्षाचे मूल रडतच होते. थोड्या अंतरावर सहा-सात वर्षांचा मुलगा निपचित पडून त्या मुलाकडे आणि स्त्रीकडे पाहत होता.

झोपाट लोटून आत गेलो. तसे एक कुत्रे केकाटून बाहेर पळाले. मुलाने आपली दृष्टी माझ्याकडे वळविली !

साधा शिष्टाचार-कोण कुठून आले ? त्या गावंढळाला काय एवढे कळणार ? एवढे स्वच्छ कपडे असूनही त्याला वचक बसलेला दिसला नाही. दाढी केलेला माझा गुळगुळीत चेहरा ईश्वराने नुकसानभरपाई दाखल बऱ्यापैकी निवडून चेहऱ्याच्या कोंदणात बसविलेले नाक-डोळे ज्यांपायी तरुण, सुकोमल, यौवनभाराने आळसावलेल्या युवतींनी माझ्या दोन शब्दांची अपेक्षा केली होती....

सारे वाया गेले. जणू एक नोकर त्या मालकासाठी त्याच्या बलवत्तर नशिबाने पाठविला होता.

" ए बाहेरच्या भाऊ ! त्या मडक्यात पाणी असलं तर त्या पोराच्या तोंडात घाल बरं जरा. जांघेत गाठी आहेत माझ्या. मायला सुधबुध नाही. सगळ्यांना गाठी आहेत. "

म्हणजे हे माझे-या देखण्या अभागी जीवाचे-नशीब ! स्टेशनचे दगड काय आसरा देऊ शकले नसते ? मी इथं आलो का ? आणि या हातांनी यांना नुसते पाणीच द्यावे लागणार की !...

मडके उचलले. घोटभर पाणी होते त्यात. " आत्मानं सततं रक्षेत् " हा माझ्या संस्कृतीचा महामंत्र ! माझा कोरडा पडलेला घसा—पण ते अर्भक तर...?

" अरे बाबा ! पाहतोस काय ! का तुलाही गाठबीठ आली ? तापात तर चालत नाही ना आलास ? मग निजून तरी जा...पण त्याच्या तोंडात थोडे पाणी...! "

मी पाणी शिंपडले. त्या अर्भकाचे किंचाळणे बंद झाले. मातेच्याही तोंडात पाणी दिले. तिने डोळे उघडले. त्या माझ्या हुकूमशहालाही पाणी हवेच होते पण भांडे उपडे करूनही थेंब पडेना.

" पाणी संपलं रे बाबा ! विहीर कुठाय् ? "

" विहीर ! हँ ! ठेसनच्या इंजिनाचं पाणी काल एक माणूस देऊन गेला; ताकत होती तंवर मी सरकून सरकून पाणी पाजलं अन् प्यालो. शेवटी दिवा लावताना चक्करच आली. आता उठता येत नाही. विहीरबिहीर काही नाही. "

चला, निकाल लागला ! आता घराचे निरीक्षण करणे बरे ! आजाऱ्याच्या शुश्रूषेचे आणखी काही सामान सापडू शकेल.

हे तीन जीव ! अंगावर धड कपडे नाहीत. पांघरायला नाही. आईचे अर्धे वस्त्र मुलाच्या खाली. घरातील हांडकी उपडीतिपडी पडलेली. कुत्र्याने आपल्या आगमनाने त्यांना धन्य धन्य केलेले ! चुलखंडात नुसतीच राख !

पाण्याचे रिकामे ओलसर मडके ! त्या मुलाचे एकटक पाहणे ! आईचे कण्हणे ! अर्भकाचे निपचित पडणे ! मला शिष्टाचारास्तव त्यांची माहिती विचारा· वयाची होती. सहा रुपये नऊ आण्यांचा भरवसा होता. तुम्ही कोण ? इथे कसे ? तुमचा पालनकर्ता कोण ? तुमचे दुखणे कोण काढतो ? औषध–पाणी करायला डॉक्टर येतो की नाही ?...

तेवढ्यात आई किंचाळायला लागली. आतापावेतो मुलाचे डोळे धीर देत होते, तेही मिटून त्याने कण्हायला सुरवात केली होती. दिव्याची ज्योत,–तिच्यावर फुंक मारली असती तर थोडा प्रकाश तरी दिला असता तिने !

माझ्या पायांनी तीन–चार मैल चालून आल्याची तक्रार नोंदविली. तिचा पुढे विचार केला जाईल असे सरकारी थाटाचे उत्तर खडसावून मी पाण्याचे मडके उचलले. तोच पोर्टर–मृत्यूची गती करणारा ! कदाचित त्यानेच दिले असेल काल पाणी इथे ! आजही देईल. थोडी आपलीही सोय !—

निघालो. पुनः सगळी भुते दिसायला सुरवात झाली. पक्षी त्या भागात नसावेतच. सन् सन् एवढाच आवाज आणि वाऱ्याच्या सोसाट्याने एखाद्या ठिकाणची काटकी दुसऱ्या ठिकाणी उडे तीच फक्त चळवळ ! सोबत अंधाराची ! ज्या ईश्वराने हे जग निर्मिले आणि ते चालते की नाही म्हणून पहारेदार नेमून जो शेषावर शेज करून झोपता झाला त्याच्या पहारेदारांपैकी एकाचाही पत्ता नाही.

आणि एवढ्या श्रमानंतर तो पोर्टर घरी मिळाला असता तर ईश्वरावरचा विश्वास ढळण्याची भीती नव्हती का ? त्या बाईसाठी केलेल्या खडुयात चुकून तो तर पडला नसेल ? कदाचित त्याचे हे बंद दार उद्या उघडलेही जाणार नाही.

आता परत त्या झोपडीत जाण्याचे प्रयोजन नव्हते, प्रवृत्ती पण नव्हती.

तथापि हे दुसऱ्याचे मडके ? आणि तो माझा मालक हुकूम सोडील तेव्हा ते माझ्या अभावी कोण ऐकणार ? माझ्यासारख्या पराधीन माणसाला कधी सुखशांती मिळाली आहे ?

तसे हे शरीर पुष्कळ राबले आहे. घाम पिऊन आणि भूक खाऊन अनेकदा त्याने माझी जीवयात्रा रेटली आहे. आज त्याने कुरकुर करायला नको होती. गरम होण्याचेही त्याला कारण नव्हते. स्थळ, काळ, वेळ यांपैकी कशाचाही

पत्ता नसताना, अग्नीच्या एकाही रूपाचे ज्ञानसत्र उघडे नसताना आपण किती अंतर चाल्लो नि शिणलो हे सांगावयाचे असते का ?

कसातरी परत पोचलो. सार्थक झाले. कारण माझी गरज होतीच. आईने राम म्हटला होता. अर्भकाने थान बदलून तिच्याबरोबर जाण्यासाठी आपले सामान बांधले होते. कदाचित त्याचा प्रवास सुरूही झाला असेल.

" भाऊ ! कुठं गेला होतास ? " किंचित शुद्धीवर येऊन आणि माझ्या चाहुलीचे ज्ञान होऊन माझ्या मालकाने शिणलेला आवाज अगदी आतून आतून काढला.--

" आई मेली आहे. त्या पोराला तिच्या जरा दूर कर..." मी स्तब्ध !

" अरे, हो ना पुढं ! भीती कशाची ? मेलेलं माणूस काय करणार तुझं ? त्या पोराला दूर कर--"

पुनः त्याला ग्लानी आली, डोळे मिटले आणि त्याने आपले कण्हणे सुरू केले.

" पाणी ऽ ऽ --" आता त्याला स्वतःची आठवण झाली.

" बाबा, थोडा वेळ काढ आता. उजाडल्यावर करतो पाण्याची काही व्यवस्था. "

" बरं आहे ! हरकत नाही. त्या पोराला सात्र आपल्याबरोबर पाजून द्या हं ! बरं आहे. "

बरे आहे ! बरे आहे ! हे वेशुद्धीतले उत्तर नव्हते आणि तरी या घडीला केवळ ' बरं आहे ! '

म्हणजे अजून हा जगायला समर्थ आहे. जगला तर वाटेल त्या क्षणी ' बरं आहे ' म्हणून मृत्यूला दहशत बसवू शकेल !

म्हणूनच कित्येक वर्षांनंतर आज या निर्घृण अंतराला पाझर फुटून ही आसवे बाहेर आली ! मरतात तर सर्वच. त्यात नवल नाही, त्याचे दुःखही नाही. पण जगायला सर्वस्वी लायक असलेला हा एवढा मुलगा जगला असता तर कितीतरी लोकांना सुखाने मरता आले असते !

८।८।४८

१०३

तू मला जागे केलेस !

—नर्तकी ! तुझ्या नृत्याने मी जागा झालो.

—माझे डोळे तुझ्यावर खिळले होते, पण तू मला दिसली नाहीस.

--भासला तो कंप, कल्लोळ, थरार, लवलव, तेजोवलये !
--आणि तुझ्या अंग अंगातल्या तालसुरांच्या लहरी--
त्यांची झुळझुळ श्रवणांना जाणवत होती. नर्तकी ! मी तुझ्याकडे पाहत होतो.
पण तू मला दिसत नव्हतीस.
तुझ्या नेत्रदीप्ती किरण फेकीत. ते माझ्या जाणीवेपर्यंत जात.
पण तिथला अंधार तसाच होता.
केवळ तो ताल आणि त्या सुरलहरी ऐकू येत.
देहभान हरपले होते माझे !
पण तुझ्यासाठी नव्हे, तुझ्यामुळे नव्हे !
मी शोधीत होतो, जे मला कळत नव्हते.
मी पाहत होतो, जे मला आकळत नव्हते !
माझ्या जीवाची तळमळ, माझ्या हृदयाची तगमग, माझ्या मनाचे हरपलेपण !
मी शोधीत होतो या सर्वांचे कारण, निमित्त, प्रयोजन !
माझ्यात ताल नव्हता.
माझ्यात सूर नव्हता.

म्हणून माझ्या हृदयाच्या या पोकळीत तेवढेच साठत होते, तीच संवेदना पोहोचत होती. तोच रंग चढत होता !

आणि त्या तालसुरांच्या निर्झरातून हळूहळू तू साकार झालीस.
आणि त्या लवलवीतून दिसू लागलीस !
नर्तकी ! मी तुला पाहिले.
तुझ्या हाती खंजीर होता.
असीम दुःखाने उन्मत्त झाल्यामुळे असीम आनंद तुझ्यातून ओसंडत होता.

तृषार्ताने अमृताकडे, अर्भकाने मातेकडे, सीतेने धरणीकडे, नवोढेने प्रियकराच्या वाटेकडे दृष्टी लावावी--

तसे तुझे त्या कट्यारीकडे पाहणे !
स्तनाला लावलेल्या अर्भकाचे जावळ आईने कुरवाळावे.
--आणि खंजिराच्या धारेवर तू हात पांघरलास !
त्याचे ते सापाच्या कांतीसारखे पाते--चकचकीत नितळ !
त्यातून तू न्याहाळीत होतीस--आपल्या गतसुखाच्या स्मृती, गतदुःखांची क्षते !
नंतर करांच्या अग्रा--अग्रातून तू नको असलेले सोडून दिलेस.
आत्मा देह सोडतो तसे !
आणि करांच्या अग्रा--अग्रातून तू हवे असलेलेही सोडून दिलेस.
सती सौभाग्य सोडते तसे !

तुला खूप आनंद झाला होता, नर्तकी !
कारण तुझ्या दुःखाला पारावार नव्हता.
तरी तुझा ताल कायम !
तरी तुझा सूर कायम !
पुन्हा एकदा तू खंजीर कुरवाळलास.
दृष्ट लागू नये म्हणून पदराआड केलास.

आणि फार जपून, त्याला इजा होऊ नये इतक्या हळुवारपणे, अगदी जपून, तुझ्या नाजूक हातांनी तुझ्या त्याहून नाजूक हृदयात तू त्याला ठाव दिलास !

रक्ताची चिळकांडी उडाली.

डोळ्यांतील किरण झाकळले.

पण नर्तकी ! तुझा ताल कायम होता. सूर, कंप, कल्लोळ, थरार, लवलव, कायम—

अगदी अखेरपावेतो—
सर्व शान्त होईस्तंवर—
असीम दुःखाने तुझे भान हरपले.
पण तोल तसाच, ताल, सूर संगीत तसेच !
नर्तकी ! ही तुझी साधना !

आणि माझी तळमळ, तगमग, हुरहूर गवसली नाही तरी मी तोल सोडला होता.
वेताल, बेसूर गात होतो मी !
डोळे असून पाहत नव्हतो !
संज्ञा असून बधीर झालो होतो !
नर्तकी ! ही माझी साधना !
म्हणून तुझ्या तालाने, तुझ्या सुराने, जागा झालो !
नेणत होतो ते जाणवले !
दिसत नव्हते ते दिसू लागले !
गवसत नव्हते ते गवसले !
नर्तकी ! तू मला जागे केलेस !

१।१२।४९

१०४

ही काय माणसे आहेत ?

देश स्वतंत्र होऊन एक वर्ष झाल्याच्या पताका जेव्हा मोठमोठ्या सरकारी कचेऱ्यांवर फडकू लागल्या, देशाची अधिकारसूत्रे हातात असलेले मान्यवर पुढारी

जेव्हा भाषणे देऊ लागले, मिरवणुकी काढून हा दिवस साजरा करण्यासंबंधीच्या आज्ञा जेव्हा पाळल्या जाऊ लागल्या, तेव्हा या देशातील प्रत्येक नागरिकाला जाग येणे अपरिहार्य होते. वातावरणालाही आनंद झाला होता. पृथ्वीने गुंडाळलेले वस्त्र त्या दिवशी नितळ, स्वच्छ असे होते. ढगाचे डाग शोधू जाता दिसत नव्हते. किरणांच्या शलाकांनी त्या वस्त्रातील जर चमचमत होती.

पाखरांच्या आवाजातून काय वाटेल तो अर्थ काढता येत असल्यामुळे, त्यांची आनंदगीते सुरू होती, हेच खरे ! व्यक्तिगत कारणामुळे का असेना, पण त्या दिवशी पुष्कळ जनावरांच्या शेपट्या उंच व कान टवकारलेले दिसत होते. स्वच्छ कपडे घातलेल्यांच्या फेऱ्या अस्वच्छ मोहल्ल्यांतून स्वातंत्र्याची जाणीव देत फिरत होत्या.

ठरलेल्या कार्यक्रमातून आनंद निथळत होता. तीस कोटी लोकांचा दैनंदिन कार्यक्रम बदलला की काय, हे अजून कळले नव्हते. 'जितं मया'च्या आनंदाने कितींच्या छात्या फुगल्या, कितींच्या डोळ्यांतून अभिमान ओसंडला, कितींची भूक-तहान हरपली, कितीकांनी आपल्या टोप्या उंच उडविल्या हे अजून दिसायचे होते. किती मुलींनी बापाला सांगितले की, आपण स्वतंत्र झालो, किती स्त्रियांनी आपल्या पतीला स्वातंत्र्याच्या दृष्टिक्षेपाने कुरवाळिले, किती पित्यांनी अपत्यांच्या पाठीवर कर्तव्यगारीची थाप मारली, किती बहिणींनी भावांना सांगितले, किती भावांनी बहिणींना जाणीव दिली, किती मालकांनी मजुरांना हा दिवस आनंदाचा जाऊ दिला, किती मजुरांनी मालकांसमोर निर्भयपणे मान ताठ केली, किती गरिबांना धिंवसा मिळाला, किती दलितांना दिलासा मिळाला आणि हा स्वातंत्र्याचा आवाज, निनाद, ध्वनी, कुठवर पोचला, कुठे आदळला, कुठून प्रतिध्वनी निघाले—हे सर्व अझून कळायचे होते !

मोठमोठ्या ठळक अक्षरांच्या पाट्या भिंतीवर दिसत–"लाच घेऊ नका", "सभ्यतेने वागा, कारण तिला किंमत द्यावी लागत नाही", "स्वच्छ राहा", "आपले पैसे बँकेत टाका", "अधिक धान्य पिकवा", "कुणालाही निरक्षर ठेवू नका", "बिनतिकिटाने प्रवास करू नका", "सैन्यात भरती व्हा", "सरकारी नोकरांना लोकसेवक म्हणा", "नोकऱ्यांसाठी अर्ज करा...."

म्हणजे यापुढे या देशातील चिटपाखरू देखील जागे होणार ! कणकण शक्तिमान होईल. कुणी कुणाला नाडणार नाही. कुणी कुणाला फसविणार नाही. कजाग बायका नवऱ्यांजवळ नांदतील. मध्यमवर्गाचे खर्च उत्पन्नाशी मिळतील. गरिबांचा पैसा चहाचिवड्यात जाणार नाही. प्रेतांना पुरेसे इंधन मिळेल. कुणी म्हणता कुणी पाप करणार नाही. करील त्याला प्रायश्चित्त भोगावे लागेल. पुण्यवंतांना पुण्याचे फळ मिळेल. नळांना भरपूर पाणी येईल. गरीब आणि मुले श्रीमंतांच्या मोटारीखाली

सापडणार नाहीत. तरुण सुवासिनी भरल्या घागरी डोक्यावरून आणतील. त्यांच्या कपाळावरील घामाचे बिंदू श्रमांनी व उत्साहाने सुंदर दिसतील.

कुणीही पाप करणार नाही. पाप करणाऱ्यांचे वाईट होईल !

आणि म्हणूनच जणू काय चैत्र प्रतिपदेच्या यात्रेला त्या लहानशा खेड्यात देखील लाखाच्या संख्येने लोक जमा झाले होते.

यात्रेत काय नसते ? एक देऊळ असते. त्यात एक प्रमुख देव असतो. त्याची पूजा करणारे एक कंगाल कुटुंब असते. देवळाच्या मोडक्या सभामंडपात कोनाड्या-कोनाड्यातून अनेक निर्गुण निराकार मूर्ती असतात. देवळाचा वरचा कळस पडून गेलेला असतो. खांब निखळलेले असतात. बांधकामाच्या फुटलेल्या चरांमधून गवत वाढून उन्हाच्या काहिलीने वाळून पिवळे झालेले असते आणि या जीर्णशीर्ण अवस्थेमुळे दैवताला जागते स्वरूप जेहेत्ते प्राप्त झालेले असते. अंगणातील दीपमाळ तेलाने बरबटून निराकार झालेली असते; देवळाच्या पायऱ्या झिजलेल्या, फुटलेल्या असतात. देवपण येण्यासाठी दगडाने सोसलेले टाकीचे घाव शेंदराने बुजून गेलेले असतात !

असंख्य लोक पुण्याच्या उमेदीने दर्शनाला येतात. त्यांच्यामागे त्यांच्या गरजेच्या वस्तू येतात. नदीचे पाणी गढूळ होते. विहिरींजवळ चिखल माजतो. आंब्याच्या झाडांना फळे असल्यामुळे मारलेल्या दगडाचे घाव सोसावे लागतात. बैलखाटे, दुकाने, राहुट्या, आरशीडाबली, कुंकू–बुक्का, शेव–चिवडा, मिठाई-खटाई, सोडा–लेमन, कापडचोपड, गाणारे-वाजविणारे, नाचणारे, नाचणाऱ्या, टाळ-पखवाज, सर्कस-सिनेमा, जादू-टोणे—

आणि खास मंडळींसाठी त्यांच्या सांस्कृतिक गरजेप्रमाणे परवडल्यास उघड, तसे नसल्यास अन्य मिषाने, दारू व ती पाजणाऱ्या, दलाल–गुरांचे नि माणसांचे, कुंटिणी–बाजारू नि गरती !

यात्रेत काय नसते ? हवे ते व नको ते; भले ते व बुरे ते ! पापाचे, पुण्याचे. कारण सर्वांच्या सर्व प्रकारच्या गरजा भागल्याच पाहिजेत. कारण पुष्कळ यात्रेकरूंना येथेच प्रवास थांबवावा लागतो; म्हणजे, दैवत जागते असल्यामुळे त्यांपैकी काही स्वर्गात जातात; काही नरकात जातात. ईश्वराने दोन्ही जागा आपले ऐश्वर्य खर्च करून तयार केल्यामुळे त्या भरल्या पाहिजेत. स्वर्गाचे धनी किती व नरकाचे किती, त्यांचे परस्पर प्रमाण काय, परिणाम काय ? इत्यादि विषय जिव्हाळ्याचे असले तरी ते आपले किंवा आपल्या सरकारचे नव्हत.

एक मात्र खचित की, यात्रेकरू ज्या मार्गाने जेथे जातात आणि जिथून जातात त्याच मार्गाने तिथे व तिथूनच जगल्यावाचल्यास परत येतात. सदेह परतणाऱ्यांची संख्या बैलगाड्यांनी, आगगाड्यांच्या डब्यांनी, लॉऱ्यांनी, घोड्यांनी, व रस्त्याच्या झिजेने मोजता येते. सर्व संख्या मोजणे शक्य नसल्यामुळे आगगाड्यांच्या डब्यांची

मोजदाद सोपी व आवाक्यातील असते. कारण प्रत्येक डब्यात किती उतारू घ्यायचे, हे चक्क लिहिले असते.

तथापि हेही काम वाटले तेवढे सोपे नव्हते. यात्रेच्या ठिकाणाजवळ असलेल्या त्या किरकोळ स्टेशनात जेवढ्या आगगाड्या येत, तेवढ्या आपल्यातील माणसे तिथे ओतून आपला भार हलका झाल्याचा सुस्कारा टाकीत आणि डब्यात खिडक्या आहेत याची फक्त जाताना खात्री करू शकत. डब्यात डोकावयाला मार्ग नसे. बाहेरची हवा आत जाण्याऐवजी आतली हवा बाहेर येई व रुमाल लावलेल्या नाकातूनही तिचा भपकारा मेंदूपर्यंत पोचे. डब्यातून ओतली जाणारी माणसे लिहिलेल्या संख्येपेक्षा जर जास्त मानावयाची, तर बाकीची माणसे डब्यात एकमेकांच्या पोटात गडप झालेली असावी, असे अनुमान निघत होते. या देशात मानव प्राण्याच्या पोटात एकापेक्षा अधिक जीव वळवळण्याच्या सत्यकथा कित्येक देशी वर्तमानपत्रांनी जाड टाईपात छापून प्रसिद्ध केल्यामुळे अविश्वासाला जागा नव्हती. आरोळ्या, कलकलाट, बरोबर आणलेल्या स्त्रियांना व स्टेशनमास्तरला शिव्या, पाणीवाल्याच्या नावाने शंख ! तसेच आपण पुण्यकर्मास्तव आल्यामुळे समाधानाचे निःश्वास ! खांद्यावर असलेल्या डोक्यात एकच गोंधळ उडाल्यामुळे लठ्ठ पगार घेणाऱ्यांनाही शिरगणतीचे काम अशक्य झाले होते.

यात्रेला जाताना तिथी संभाळावी लागते, म्हणून गर्दी मोजणे शक्य नसले तरी परतताना मोजता येण्याची आशा होती. कारण लोक सावकाश जातील आणि विशेषतः स्वातंत्र्य मिळाल्यामुळे एक दुसऱ्याचा मुलाहिजा करीत जातील असे देशातील थोर थोर लोक, ज्यांनी आजवर फार त्याग केल्याची बोलवा होती, म्हणत होते.

म्हणूनच देशाची व त्याच्या हिताची जबाबदारी स्वखुशीने, नशापाणी न करता व पुढच्या निवडणुकीत सेवेचे प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रामाणिक उद्देशाने अंगावर घेतलेल्या चार-दोन महाभागांनी यात्रेहून परतणाऱ्यांच्या डोक्यांची मोजदाद करण्याचे ठरविले होते. यात्रेची तिथी संपताच आणि यात्रेकरू परत जाण्याच्या तयारीला लागताच ते महाभाग त्या किरकोळ स्टेशनात स्टेशनमास्तरला एक पासिंग शोचे पाकिट देऊन घुसले. गाड्या येत व खिडक्या भरभरून जात. डब्यांच्या दारांत व खिडक्यांत जीव असलेल्या विटा चिणल्या जात. तिकिटे संपली. पंचवीस-पंचवीस माणसांना लॉरी-सारखे एकच परवान्याचे तिकिट मिळे व माणसांचा ओघ व जमाव शिल्लकच राही. झाडाची चार-दोन पाने गळली म्हणून काही सबंध झाड निष्पर्ण होत नाही. चांदण्यांनी भरलेल्या अमावास्येच्या आकाशातून चार-दोन उल्कापात झाले, तरी बाकीच्या चांदण्या मोजणे सोपे जाते असे नाही. समुद्र भरलेला असावा व टिवटिव करणाऱ्या टिटवीने आपल्या चोचीने रिकामा करण्याचा प्रयास करावा. तात्पर्य सगळ्यांचेच हसे— मोजणारांचे, मोजले जाणारांचे व चोचीएवढ्या आगगाडीचे !

पहिल्या दिवशी सूर्य उगवला व मावळला. दुसऱ्या दिवशी तो मावळताना दिसला. तिसऱ्या दिवशी प्रकाशामुळे तो उगविल्याचा भास झाला. चौथ्या दिवशीची सायंकाळ— पण ती देखील पावलांच्या धुळीत मळलेलीच होती.

पण हे काय ? सूर्य, समुद्र यांसारखी महाभूते आणि चंद्र, चांदण्या यांचे दाखले, दृष्टान्त या देशातील लोकांसाठी ? छेः, स्वतंत्र झाला म्हणून काय झाले ? देशाचे पंत-प्रधान देखणे असले म्हणून काय झाले ? हे लोक, यांचे कपडे, यांची खपाटी गेलेली पोटे, काहींच्या अपचन झाल्यामुळे निघत असलेल्या ढेकरा–हे सर्व काही अजून नाहीसे झाले नाही. हे पाहतात, म्हणूनच यांना डोळे आहेत म्हणायचे, श्वास घेतात म्हणून चेहऱ्याला दोन छिद्रे आहेत म्हणायचे आणि आपल्या गरजा न बोलता दाबून ठेवतात म्हणून तोंडावर दोन फळ्यांचे दार आहे असे म्हणायचे. देवाला काय हवे हे या सगळ्यांना कळते. यांना काय हवे आहे एवढेच कळत नाही; नाहीतर देशकार्य करायला निघालेल्या तरुणांचा तो शिरगणतीचा स्तुत्य उपक्रम त्यांनी अशक्य म्हणून टाकून दिला असता होय ? अरे, ही काय माणसे आहेत ?

चार दिवस झाले. आगगाड्या थकल्या, पण स्टेशन भरूनच राहिले. सायंकाळी तीन तीन दगडांच्या चुली पेटत आणि सर्व धूर स्टेशनात भरून जाई. काही वेगळे असत, काही जथ्थे जमाव करून असत. काही भजन गात, काही शिव्या देत, काही तंबाखू पीत. काही पाण्यासाठी ओरडत.

आणि मृगाच्या सरीसारखी आगगाडीची वाट पाहत एका कडेला गोळा झालेला तीस–पस्तीस माणसांचा हा मेळावा. याचे काय वर्णन करावयाचे ! साधने अपुरी. लिहायला फक्त दोन हात, त्यांतूनही एकाचाच उपयोग. बोलायला, वर्णन करायला एकच तोंड. चार तोंडांचा ब्रह्मदेव ईश्वराचा महिमा वर्णन करता करता थकतो म्हणतात. आमच्या या स्वतंत्र देशात येऊन पाहा म्हणावे. गप्प बसला नाही, तर इहलोकीच्या अस्तित्वाची पैज हरल्याचे कबूल ! त्या मेळाव्यातील त्या दहा–बारा स्त्रिया, आठ–दहा मुले, दहा–वीस माणसे या देशाच्या अगणित जनतेचे खास ' आपणां देशमा बनेलो ' असे प्रतिनिधी होते. मूर्तिमंत दैन्य दाखविण्यासाठी त्यांची शरीरे व लाचारी दाखविण्या-साठी त्यांचे डोळे होते. स्त्रियांना हात होते अर्भकांना मारण्यासाठी. मुलांच्या अंगाला प्रत्येकी पाच पाच काटे असलेल्या दोन काटक्या लावल्या होत्या. त्या त्यांच्या शरीरावर उठलेले फोड खाजविण्यासाठी. पुरुषांना हात होते, ते तिकिट मिळत नाही म्हणून नखे खाण्यासाठी, स्त्रियांनी त्यांच्या कर्तबगारीबद्दल संशय व्यक्त केल्यास त्यांच्यावर उगारण्या-साठी, शरीर स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने नाकातील त्याज्य पदार्थ उकरण्यासाठी !

यांपैकी काही पुरुष आपला मानून जवळ केलेल्या शेजाऱ्याच्या खिशात निर्भयपणे हात घालीत होते आणि उघडकीला आल्यामुळे नेति नेति म्हणत होते. काही स्त्रिया सतत आणि परम उद्योगाच्या अभिनिवेशाने एकमेकींच्या डोक्यातील

उवा काढीत होत्या आणि सवड, संधी सापडताच शेजारणीच्या वळकटीतील खाद्य-पदार्थ थोबाडात कोंबत होत्या. उघडकीला आल्यास समशक्ती स्त्रियांबरोबर व हजर असल्यास त्यांच्या नवऱ्यांबरोबर मारामारी करण्याची त्यांची हिंमत होती. खोटे बोलणे किंवा चोरी करणे यांच्या व्याख्या, तत्त्वज्ञांनी निश्चित केलेल्या, त्यांच्या कानी न आल्यामुळे देवाच्या न्यायदिनी त्यांना संशयाचा फायदा मिळण्याची आशा होती.

शिस्त व सुव्यवस्था कायम करण्यासाठी नियुक्त केलेला एक पोलीस आपले बूट वाजवीत आला. एका तोफेच्या आवाजाने हजारो लोक अर्धमेले होतात. एका साधाच्या अस्तित्वाने सर्व जमाव पांगतो. एका बॉंबच्या भीतीने सर्व दडून बसतात ! तो घोळका अगदी देवासारखा ताठ आणि साळसूद चेहेरे करून बसला.

" ए साला लोग, ठीक बैठो "—पहिली आज्ञा व तिचे पालन.

" कितनी औरते हैं यहाँ ? " दुसरी आज्ञा व संख्येची मोजदाद.

" तुम पैसे चुराता है ! वो साहाबका रुपिया गया. चलो, निकलो. "

" हम नहीं–हम नहीं–" भीत भीत प्रत्युत्तर.

" वह औरत क्या छुपा रही है ? ए बुद्धी, मारेगा. जेलखानेमें भेजेगा. तुमने रुपिया लिया. निकालो सब चार चार आना—"

सरकारशी सहकार्य करण्याच्या धोरणामुळे सामुदायिक दंड एकदम वसूल ! जणू त्या पैशांत अन्न मिळणार नव्हते. जणू ती नाणी खोटी होती. जणू ढेकणासारखी चावत होती आणि एक सुकृत घडणार होते. ज्या अनामिक साहेबाचे पैसे हरविले त्याला न्याय व सुरक्षितता मिळणार होती. शिवाय इतके लोक एका शिवीने शिस्ती-खाली दाबता येतात, गवतासारखे चेपता येतात, हा पोलिसांना येणारा आत्मप्रत्यय-या विश्वासानेच सैन्ये विजयी होतात !

स्टेशन मास्तर तीन दिवसांत कुणाला दिसलाच नव्हता. निळे कपडे घातलेला एक पोर्टर तीन दिवस ' बाबू ' म्हणविला जात होता. प्रस्तुत मेळाव्यातील लोक तिकिट मिळण्याच्या आशेने त्याला ' बाबूजी ' म्हणत आणि त्याने दोन शिव्या हासडल्या की धन्य धन्य म्हणत !

आणखी एकदा गाडी आली. पण यांना कुणीच नेले नाही. तिकिटही मिळाले नाही. पोलिसाचा बूट वाजल्याचा भास होई. बाबूजी येत व निघून जात. साता-समुद्रापलीकडील भाषेचा एखादा तुटका फुटका शब्द अधिक अशुद्ध करून वापरीत. एकदा त्यांनी त्या घोळक्याला महाकृपेने विचारले,

" कहां जाता है तुम लोग ? "

" बाबूजी, येथून फक्त तीन ठेसन. तिकिट द्या, बाबूजी ! "

" दो दो रुपिया देना है ? "

"सरकार, येताना फक्त दोन रुपये आणले होते. यात्रेत संपले. पोलीस-बाबाला दिले. तिकिटाचे सात आणे वाचवून ठेवल्यामुळे तीन दिवसांपासून पोटाला आधार नाही."

"आणि बाबूजी, पाणी प्यायला इथून विहीर पण दूर आहे."

"तो फिर जाव, कुछ नहीं हो सकता !"

बाबूजीकडे सहानुभूतीने पाहणारा एक संत एकनाथासारखा दिसण्याचा प्रयत्न करणारा माणूस तिथे उभा होता. त्याला उद्देशून बाबूजी बिडीचे थोटूक फेकून देत म्हणाले,

"साला लोग ज्यादा पैसा भी नहीं देता और बिगरटिकटका भी नहीं जाता. ठेसन साहेबको कैसा पुरायेगा ? इतना लोग बिगरटिकटका चला गया. इनको बोला तो जाता नहीं. इनका कपडा तो मैला है और गरीब दिखता है. वो जानेवाला सफेद कपडेका था. सब ठेसन साला खराब कर दिया. सरकार झाडू लगानेको भी जादा पैसा नहीं देता."

बाबूजींचे म्हणणे अक्षरशः खरे होते. सबब संत एकनाथ खोट्याचा उद्धार करण्यास्तव द्रवले व देशाच्या प्रतिनिधिसभेत दाखल झाले.

"बाबांनो, कित्येक लोक तिकिट नसताही निघून गेले. तुम्ही का निघून जात नाही ? किती दिवस असे राहणार ?"

सर्व सभेने पोलिसाची चाहूल घेतली.

"साधूबुवा, कसे जाणार ? बडे होते ते जास्त पैसे देऊन गेले. सापडलो तर पोलीस मारतात, भलतीकडे नेऊन सोडतात. तीन तीन दिवसांत काही न करताही मारून घेतले. भंग्याने अंगावरच्या पालखाने जागा साफ करायला सांगितली. एका पांढरे कपडेवाल्याचे पैसे हरवले, तर त्याने सर्वांना छडीने झोडपले. दुकानात वस्तू घ्यायला गेलो तर चोर घुसले म्हणून त्याने काचा मारल्या, आणि तुम्ही सांगता बिनातिकिटाने जा—"

"आणि माझ्या भावांनो, बिनातिकिटाने प्रवास करणे पाप आहे. शिवाय तुम्ही यात्रेहून देवदर्शन व प्रसाद घेऊन आलात, बाबांनो ! देवच तुम्हांला ही पुण्याची बुद्धी देत आहे. अहाहा ! ईश्वरा, तुझी लीला अगाध आहे ! काय महिमा ! नावाचा आंबुखा सहन होत नाही अशांच्या हृदयात तू वास करतोस ! बाबांनो, पुण्य करा. सभ्यपणे वागा."

"साधूमहाराज, पाया लागतो तुमच्या ! देवाचे दर्शन घेतले पण तिकिटा-बाचून....."

"पोलीस, पोलीस,.....नशीब आमचे !"

" अरे, देव तुमच्या पाठीशी आहे, पोलिसांची काय भीती ?... "

म्हणजे पुण्य जोडण्यासाठी काही चार दिवसांचा हा उपवास नव्हता. बाबूजींशी जोराने बोलण्याचे त्यांच्या अहिंसा धर्माला मानवत नव्हते. नशीब खोटे असल्यामुळे जास्त पैसे देणे परवडत नव्हते. आगगाडीत विनातिकिटाने बसण्याचे पाप ! अवज्ञेने चंडाळी करून या देशाचा ब्रह्मदेश करण्याची त्यांची इच्छा नव्हती. पुण्याचा उमाळा ओसंडत होता !

त्यानंतर त्या स्टेशनातून हे पुण्यवान प्रतिनिधी किती दिवसांनी गेले, की अझूनही तिथेच सुकृताचे प्रायश्चित्त भोगत पडले आहेत कुणास ठाऊक !

दुसऱ्या दिवशी सायंकाळच्या वेळेला स्टेशनच्या हद्दीतील कडूलिंबाच्या झाडावर निवाऱ्याला आलेल्या चार-दोन डोमकावळ्यांनी यात्रेत मिळालेल्या तुष्टपुष्ट भोजनावर व मानवांच्या नियत पापपुण्यावर चर्चा केल्याचा मजकूर त्यांची भाषा जाणणाऱ्या या अद्भुत देशातील काही वार्ताहरांनी आपापल्या वृत्तपत्रांसाठी तारेने पाठविल्याचे फक्त वाचण्यात आले होते.

५।४।४९

१०५

परिमार्जन

त्या गावात जे पुष्कळसे निष्कलंक लोक होते ते त्या गृहस्थाशी बोलत नव्हते. कारण त्यांची वाणी विटाळण्याची भीती होती व त्यामुळे त्यांचे परलोकसंचित कमी होणार होते. जे थोडे जनरीती संभाळून वागणारे अब्रूदार लोक होते तेवढे त्याच्याशी बोलत. निष्कलंक लोकांपैकी काहींना त्याच्याशी दिवसा बोलण्याची भीती वाटे. आपल्याला त्याच्याशी बोलताना कुणी पाहू नये एवढाच किरकोळ उद्देश ह्या वागण्याच्या पोटी होता.

तसा त्या गृहस्थात जन्मतः काही दोष नव्हता. त्याचे हाडपेर चांगले मजबूत होते. जन्म अतिशय उच्च कुळात झालेला होता. बोलायचालायला तो फार सरळ होता. साठीला टेकला होता. पण त्याची कोणतीही शक्ती कमी झाली नव्हती. एका चंद्रमौळी झोपडीत तो राहत असे. त्याच्या छोट्याशा अंगणात एक गाय बांधलेली असे. तिचे दूध तो स्वतः दोहूनही, निष्कलंक लोकांच्या घरच्या गाईसारखे पांढरेच निघे. शेजारची एक कामकरी बाई त्याच्या घरचे दूध विकत घ्यायची; त्या दुधाने तिच्या घरचे कोणी दगावल्याची बोलवा नव्हती. अंगणाच्या कोपऱ्यात असलेले जाईचे झाड श्रावणात फुले देई आणि उन्हाळ्यात मोगरीही फुलत असे.

तसे त्याच्याबद्दल विचारायला जावे तर कुणाला नीट सांगताना कुणी ऐकले नव्हते. 'माणूस वागून चांगला. एवढ्या दैन्यात, गरिबीत, लाचारीतही तो कधी कुणाच्या लफड्यात पडत नाही. एक लफडे फक्त त्याने मागे लावून घेतले आहे. तेवढे नसते तर साऱ्या गावाचे नाव राखण्याजोगे गुण त्याच्यात होते' असे लोक म्हणत. त्याला एक मुलगा होता. तो त्याच्याजवळ राहत नव्हता आणि त्याची सुस्थिती असल्यामुळे त्याने कित्येकदा सुखाने आपल्याजवळ येऊन राहण्याविषयी बापाला लिहिले होते. सुखाची मात्रा लागू पडली नाही, तेव्हा त्याने असेही सांगून पाहिले की, 'ह्या कुणब्याधाणब्यांच्या मोहल्ल्यात त्यांच्यापेक्षाही वाईट रीतीने तुम्ही दिवस घालवीत आहात. जात जाईल म्हणून या वयातही स्वतःचा तुकडा स्वतः करून खात आहात. चार लोक मला विचारतात. मला ह्या सर्व प्रकारामुळे मोठी लाज वाटते. घराण्याला कमीपणा येतो. झाले गेले जाऊ द्या आणि आता तरी घरी चला.'

पण त्याच्या चेहऱ्यावर या सर्व विनंतीचा कसलाही पडसाद उठत नसे. नदीचे पाणी असंख्य मापांनी रोजरोज वाहून जावे, आणि त्यातील विशाल दगड जिथल्या तिथेच राहावा तसे त्याचे होते. त्या कुणब्यामाळ्यांच्या वस्तीतील लोक त्याला काका म्हणत. काका गेल्या वीस वर्षांपासून तेथे राहून त्यांचे लिहिणे-पुसणे करून देई, लिखाईबद्दल जे आणा दोन आणे मिळत तेवढ्यात जसे निभेल तसे निभवून घेई. अडीअडचणींना कुणाच्या उपयोगी पडावे, हाडपेर मजबूत असल्यामुळे एखादा हमाल आजारी असला तर त्याची पोती उचलून द्यावी, म्हातारीचे लाकडाचे ओझे बाजारापर्यंत नेऊन द्यावे, खंगलेल्या लाकूडतोड्याची लाकडे फोडून द्यावी. त्या सबंध वस्तीत लिहिणे-वाचणे जाणणारा काकाशिवाय दुसरा कुणी नसल्याने वस्तीच्या मास्तराची, वस्तीच्या वैद्याची, वस्तीच्या जोश्याची आणि वस्तीच्या निवाड्याची जबाबदारी त्याच्यावरच पडली होती. त्याचे इतर नातेवाईक त्याच गावातील उच्च वस्तीत आपल्या इस्टेटी व मुलेबाळे संभाळून राहत. काका त्यांच्याकडे कधी जात नसे. कारण त्याने गेलेले नातेवाईकांना आवडत नसे. त्यांच्याकडील एखादे अजाण मूल शाळेत जाताना सहज म्हणून काकाकडे आले तर काका त्याला वाटीभर दहीसाखर देई आणि असलाच तर खाऊसाठी एखादा पैसाही देई; पण हा खाऊ त्या मुलाला घरी पोचल्यावर दुप्पट चुकवावा लागत असे आणि गालावरचे वळ सायंकाळपर्यंत दबत नसत. 'त्याने आपले कूळ बुडविले आणि तू त्याच्या घरी जाऊन खाऊन येतोस!' असे त्या मुलाला दटावण्यात येई. मुलांची कल्पना अशी की, काकांनी अंगणातील विहिरीत कूळ नावाचा कसला तरी पदार्थ बुडविला आणि त्यामुळे सर्वांनी त्यांना घरातून काढून लावले. ती कधीकधी काकांना विचारीत, 'काका, तुझ्या विहिरीत तू बुडविलेले आमच्या घरातले कूळ काढून दे. म्हणजे मग आई-बाबा रोज आम्हांला तुझ्याकडे येऊ देतील.'

काका आपल्या दूर गावी नोकरीला असलेल्या मुलाकडे व आता पन्नाशीला टेकलेल्या आपल्या बायकोकडे जाण्याचा विचारही मनात येऊ देत नसे. 'माझे जे काय व्हायचे ते इथेच होईल. माझ्या मढ्याला ब्राह्मणाचा हात लागला नाही तरी ते मढे ह्या वस्तीतील कुणी ना कुणी मसणात नेऊन टाकतीलच. ते काही इथे सडायचे नाही.' काकाच्या म्हातारपणातील या कणखर निश्चयापुढे कुणाचे काही चालत नसे. राहत्या वस्तीतील सर्वांशीच काकाचे पटे असे नाही. काका कुणाच्या हातचे खात-पीत नसे आणि त्यामुळे जातीबद्दलची जाणीव असलेले कुणबी कास्तकार चिडून म्हणत, 'आमच्या जातीची पोरगी पळविली; तिच्याबरोबर संसार केला; तिच्या पोटचा पंधरा वर्षांचा पोरगा लहानपणापासून अंगाखांद्यावर खेळवून पोसला; फक्त तिच्या हातचे खाणेपिणे घेतल्याने ह्या बामणाची जात जाते. ह्याने आपलीही जात बाटविली आणि आमच्याही जातीचे नाक कापले.'

काकाच्या कानी हे फारसे येत नसे; पण हे सारे सोसावे लागे, त्याच्याजवळ राहून त्याचा संसार करणाऱ्या त्यांच्या त्या कुणबिणीला! कारण पोटाला मिळविण्यासाठी तिला रोज लोकांच्या शेताखेतावर काम करायला जावे लागे. विहिरीवर पाण्याला जावे लागे, दळायला चक्कीवर जावे लागे, आठवड्याच्या बाजाराला सौद्यासाठी जावे लागे, गाईच्या दाणागोट्याची व्यवस्था करावी लागे, आणि तिचा तो पंधरा वर्षांचा गोरा-गोमटा मुलगा बामणाच्या बीजाचा असल्यामुळे गाईढोरे चारायला जाईना म्हणून त्याला घरचे खाऊ घालून शाळेत पाठवावे लागे. काका, ती बाई, तो मुलगा–एकाच झोपडीत राहत. चुली दोन होत्या. पाण्याची मडकी दोन होती. गेली पंचवीस वर्षे तिने काकाचा संसार सांभाळला होता आणि ज्या काय हालअपेष्टा, जे काय उणेदुणे सहन करावे लागले त्याबद्दल तिने ब्रही काढला नव्हता. कधी चार-आठ आणे काका मिळवी, चार-आठ आणे तिच्या कमाईचे असत. दोन चुलींवर कशीतरी हांडकी चढत आणि दुपार-संध्याकाळ निभत असे.

आणि ह्याचमुळे काकाच्या जातीत आणि सख्ख्या जातीत तीव्र असंतोष माजला होता. त्यांची उपासमार झाली असती, त्यांचा मुलगा अंधळा-पांगळा झाला असता, त्यांनी दारोदार भीक मागितली असती किंवा निदान अंगणात येऊन तरी ती एकमेकांशी कचकचा भांडली असती तरी देखील चालले असते. आपल्या कर्माच्या फळाचे तत्त्वज्ञान दोन्ही जातींना सांगता येऊन धर्माचा व जातीचा बोज राहिला असता.

काकाचा पहिल्या घरचा मुलगा येई, तो आपल्या नातेवाईकांकडे उतरे. त्याला ते सांगत, 'ने तुझ्या बापाला एकदाचा इथून. म्हणजे आमचीही अब्रू वाचेल आणि आम्हांला कुठे तोंड दाखवायची मोकळीक होईल."

त्या मुलालाही इकडे आड, तिकडे विहीर असल्यासारखे झाले होते. आपला काहीच अपराध नाही. इकडे बापाची लाज, तिकडे सग्यासोयऱ्यांची लाज, इतरही जनांचे मानभावीपणाने टोचून टोचून बोलणे!

म्हणूनच तो ह्या वेळी आला तो काकांना नेण्याचा कृतनिश्चय करूनच. सखू मोलमजुरीला गेली होती. मुलगा–बाजीराव–शाळेत गेला होता. काकांची भांडी चुलीवर चढली होती. अशा वेळी काकांचा मुलगा आजूबाजूला पाहत झोपडीत शिरला आणि—

"काका, तुमच्या पाया पडतो. तुमच्या अशा राहण्याने माझी मोठी वेअब्रू होते. माझे वरिष्ठ अधिकारी माझ्याकडे तुच्छतेने पाहतात. चला, आज मी तुम्हांला येथून नेल्याशिवाय राहणार नाही."

काकाने त्याला बसायला पाट दिला. गुळाचा खडा व पेलाभर पाणी त्याच्यापुढे ठेवले. वरण बुडी लागू नये म्हणून चुलीतील लाकडे ओढून घेतली आणि हातातील जपाची माळ ठेवून देऊन ते स्वस्थ बसले.

"मग चलणार ना आज संध्याकाळच्या गाडीने?"

"इतकी तुझी बेअब्रू होते? मी एकटा चलू की सगळ्यांना घेऊन?"

"अर्थात एकटा."

"आणि हा माझा मुलगा बाजीराव, ही माझी घर संभाळणारी सखू?"

"त्यांचं काय? आजही ती मोलमजुरी करते आहे, तशीच उद्या करील. वीस वर्षं ब्राह्मणाला बिघडविले. अजून तिची हौस भागली नाही का?"

"म्हणूनच मी येत नाही. अठरा वर्षांची होती त्या वेळी ती माझ्याखातर सर्वांचे शिव्याशाप खात माझ्याजवळ आली आणि आता या वयात तिला कुणाच्या भरवशावर सोडू? तिचे जातवाले तिला जिवंत ठेवतील? आताच तर 'घरनिघी–घरनिघी' म्हणतात."

"मला तिची पर्वा नाही. माझ्या अब्रूसाठी मी तुम्हांला नेत आहे. तिच्याबद्दल तुम्ही असा विचार करता; माझ्या आईबद्दल करता कधी इतक्या ओलाव्याने विचार? तिने बिचारीने वीस वर्षं हद्रोग लावून घेतला."

"रागावू नकोस. मला वाटते, ह्या गोष्टीचा निकाल लागायचा नाही. उन्हातान्हाची वेळ आहे; अधिकउणे बोलण्यात फायदा नाही. मी येणे शक्य नाही. जा तू!

मुलगा चरफडत, शिव्याशाप देत कपाळ पिटीत निघून गेला. "हातपाय घासून मरणे तुमच्या नशिबी आहे. मढ्याला महारा–मांगाचा हात लागेल तेव्हा समजेल," इत्यादि तापलेले शब्द त्याच्या तोंडून निघत होते.

काकांनी सावकाश जेवण आटोपले आणि थोडीशी झोप घेतली. दुपारचे पाणी पिऊन ते विडा खात बसले असतानाच गावच्या पाटलाचा तरुण मुलगा मुलाच्या वतीने काकांचे मन वळवायला आला. आपल्या परीने त्याने पुष्कळ सांगितले आणि काकानेही आपल्या परीने सर्व सांगून टाकले.

"तुझे वय आज माझ्या मुलाएवढेच आहे. पंचविशीत मी वाळूचे पोते दंडावर बांधून नदीतून धावत जात असे. दुधाने भरलेला अख्खा नारळ, दोन शेर दूध पचवीत असे. सकाळ-संध्याकाळ पावशेर तेल माझ्या अंगाला जिरत होते. गावची कुस्ती मी कधी पडू दिली नाही. पाचपंचवीस पट्टे माझ्या आवतीभोवती असत. रग, मस्ती माझ्या अंगात एखाद्या सांडासारखी मुसमुसत होती. पांडेपणाची नोकरी, खेड्यापाड्याचे दौरे, मनसोक्त खाणेपिणे, फिकीर कशाची नाही.

"तू माझे दुःख समजू शकणार नाहीस. तू पाटलाचा पोरगा आहेस; सुदैवाने बामण नाहीस, मी बामण होतो. शौक पहेलवानीचा केला. विसाव्या वर्षी लग्न झालं. माझ्या घराप्रमाणेच शूद्राची सावली घेणार नाही. अशा घरची मुलगी माझी बायको झाली. मला आधी दाखवली गेली नाही. ज्या रात्री तिची माझी भेट झाली, त्या रात्री तिची ती बामणाऊ तब्बेत मी पाहून घेतली. एक घागर उचलताना तिला दम लागे. सोळा वर्षांच्या वयात साधे गंध उगाळतानासुद्धा तिच्या कपाळाला घाम येई. बरं, त्यातूनही घरातला कारभार सीधा नव्हता. कूळकुळाचार म्हणे श्रावणात जाऊ नये, ज्येष्ठात राहू नये. आपलीच बायको आणि आपल्यालाच भेटायची चोरी. रात्री उपरण्याने वारा घ्यावा आणि चिडत संतापून झोपावे.

"पुढे मी दुसऱ्या खसऱ्यावर बदली मागितली आणि कामावर रुजू झालो. त्या गावात बामण कुणीच नव्हता. कुणब्या-माळ्याच्या वस्तीत घर घेतले. समोर सखू राहत होती. तिच्या तब्बेतीला खोट नव्हती. पाडाच्या आंब्यासारखी दिसे. कोसभर विहिरीवरून एक कळसा काखेत नि दोन घागरी डोक्यावर तोलत जमीन दाबत दणकावत येत असे ती. लमाण्या बैलाचा गाडा ती सरळ धुऱ्यापर्यंत नेई, ती सुंदर नाही आणि माझ्यावर तिने करणी केली असं माझे नातेवाईक म्हणतात. पण त्या वेळी खरंच मला तिचं वेड लागलं होतं. मी तिच्याशी बोलचाल सुरू केली, तिची छेडछाड सुरू केली. गावच्या तरुणांपेक्षा मी नक्कीच सुंदर दिसत होतो. सखू माझ्यावर भाळली. मला रस्ता सापडेना, तिला बोलता येईना.

"इतक्या दिवसांपूर्वीच्या गोष्टी, पण अजून कशा ताज्या फुलाप्रमाणेच वास देताहेत. सखू घराच्या दरवाजातून लवून जायला लागली आणि बापाने तिचं लगीन लावण्याचं ठरविलं. गावातल्याच एका मुर्दाड माणसाशी तिचं लग्न ठरलं. सखूने लहानपणी छेडछाड केल्यावरून ज्याला वहाण मारली होती तोच आता सखूचा हात धरायला येत होता. सखू रात्री येऊन मला भेटली आणि मी तिला 'घाबरू नको' असे विश्वासाने सांगितले.

"लग्न लागायला दहा-पंधरा मिनिटे असतील. संध्याकाळ झाली होती. जीव हातावर घेऊन सखूला पळवून आणले आणि रातोरात डोंगरदऱ्यांनी गाव सोडून, नडक महादेवाच्या जंगलाची वाट धरली. एका मारवाड्याचा कागद फाडून त्याच्या-

कडून पैसे लाटले होते. पळवून आणण्याच्या अगोदर चार-आठ दिवस अशाच उचापती करून रक्कम जवळ केली होती. चार-सहा वर्षे तिकडेच राहिलो. पुढे सगळे स्थिरस्थावर झाले. नोकरी गेलीच होती. मग एक दिवस पुनः हिंमत करून ह्या गावात आलो. सर्वांना कळले. सखूला नेण्याची कुणाची हिंमत होईना. इथेही आखाड्याची चावी माझ्याचकडे मी घेतली होती.

आता हिच्यावरोबर वीस वर्षे मी काढली. सुख-दुःखाची दिवसरात्र न कुरकुरता भोगली. हा मुलगा झाला. सखूने कोणत्याच गोष्टीला कधीही कोणत्याही निमित्ताने मोडता घातला नाही. भाड्याच्या घरात मुदत टळली तर ते घरही कायद्याने आपले होते. सखूने माझ्याशी लग्न केले नाही, म्हणून काय तिचा माझ्यावर विश्वास नाही? आणि माझ्या जातीच्या अब्रूसाठी मी गेलो तर तिला काय अब्रू नाही? जिवाचा धोका पत्करून कमावलेली माझ्या कमाईची ती बायको आहे. भटांच्या तोंडाने नाही, माझ्या तोंडाने मी तिला संभाळण्याचे वचन दिले आहे! तिला अधांतरी सोडून देऊ? माझे दहा गेले, पाच राहिले. मी कधीही इतर कुणा बाईबापडीकडे वाईट नजरेने पाहिले नाही. दगडधोंडे खाऊन जगलो. माझ्या जातीने कधी केली नाहीत ती कामे करून मी कमाई केली. आता म्हातारपणीच्या सुखासाठी मी माझी दानत उगीच बिघडवू? मी तिथे मेलो तर कोण रडेल माझ्यासाठी? इथं मेलो तर सखूच्या नजरेत, तिच्या डोळ्यांतून पाणी वाहत असता सुखाने मरता येईल. मेल्यानंतर पुढचं कुणी पाहिलंय? पाप केलं असेल तर तेही इथे आनंदाने भोगतो आहे आणि पुण्य केलं असेल तर तेही इथेच फळून राहिलं आहे. जे केलं त्याचे दुःख नाही. आहे तसा सुखात आहे. आता कोणत्या सुखाची आशा नाही. इमान सोडून पोरा, कशाला मला समजावतोस? तुझ्या गावात राहतो, पण तुझ्या गावाच्या नावाला बट्टा लावण्यासारखे मी काही केले नाही. घे, हे गूळपाणी पी. सखू, पाटलासाठी पैशाची पानं घेऊन ये."

काकाचा आवाज भरून आला होता. ऐकत असलेल्या सखूच्या अंगावर मूठभर मांस आले होते आणि तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागल्या होत्या. पाटलाच्या पोराचा धर्माचा व नीतीचा अभिनिवेश जिरला होता आणि—

झोपडीच्या बाहेर सर्व संभाषण चोरून ऐकत असलेल्या काकाच्या औरस मुलाची लाजेची व बेअब्रूची टोचणी कमी होण्याची आशा राहिली नव्हती.

त्या गावचे जे बहुसंख्य निष्कलंक लोक होते ते काकाशी बोलत नसत. जे थोडेसे जनरीत समजणारे होते, तेवढे काकाशी बोलत.

१९।४।४९

एक होती म्हातारी !

ह्या साध्या कथेत एक फार मोठे रहस्य आहे. म्हातारीच्या फुटाण्याने फार मोठा अनर्थ केला. सापडलेल्या पैशाचे फुटाणे ! आपल्या समाजात जे म्हातारी-सारखे लोक आहेत त्यांनी समजावे की फुकटच्या पैशाचा माल पचत नाही. राजा म्हणजे समाजाचे नेतृत्व करणारा. त्याने स्वार्थं पाहू नये. किरकोळ लोक म्हणजे मुंगी ! पण तेही सामर्थ्यवान असतात. आजच्या समाजातील सर्वांना ह्या कथेपासून धडा घेता येईल.

आपला बहुसंख्य मराठी समाज अशिक्षित आहे. त्याच्याबद्दल, त्याच्या भाषेबद्दल आपल्याला आपुलकी, जिव्हाळा नि प्रेम आहे. हा समाज कोणत्या प्रकारच्या भाषेने आपली जीवन-यात्रा चालवितो याबद्दल आपणा सर्वांना कुतूहल आहे. ही लोकभाषा म्हणजे रोजच्या वापराची मराठी किती सूचक, गोड आणि अर्थवाही असते याचा नमुना म्हणून मी आपल्याला त्यांच्या भाषेत एक गोष्ट सांगण्याचा व तिचे रहस्य समजावून देण्याचा प्रयत्न करीत आहे.

एक होती बुढी. ती गेली कुपं कुपं. तिस सापडला पैसा. त्याचं काय केलं बा ! त्याचे तिनं घेतले फुटाणे. अन् पोट्यापाट्याइनं हैरान करू नये म्हणून जाऊन बसली एका झाडाच्या शेंड्यावर. त्या झाडास मिठ्ठूनं आपल्या पिलाईंसाठी एक ढोण केली होती. बुढीचा एक फुटाणा खाता खाता त्या ढोणीत जाऊन पडला. बुढीस वाटलं, गेला माय फुटाणा ! एक दाणा झाला की कमी ! बुढी झाडास म्हणते– " झाडा झाडा, दे रे माहा फुटाणा. "

झाडास गंमत करायची होती. याच्या मनात आली बद्दी. झाड म्हणते— " बुढे, देत नाही तुहा फुटाणा. वाटन् थे कर जा ! " बुढी म्हणते—" थांब, थांब, रांडलेका—"

बुढी गेली वाढ्याकढे. वाढी म्हणे–' बुढे, कसी आली व ? ' बुढी म्हणते– " वाढ्या, वाढ्या, झाडास तर तोड रे. " वाढी म्हणते–" काहून बा ! " बुढी म्हणते–' झाड माहा आयकत नाही. ' वाढी म्हणते–" आपण नाही तोडत बा ! आम्हाले का करावं लागते ? "

बुढी झाली बा गरम. म्हणत कसी वाढ्यास–" थांब थांब रांडलेका. तुही खट काहाडतो. तुहा वाखा करतो ! "

बुढी गेली राजाकडे. राजा बसला होता रानीसंग गुलगुल गोष्टी करत. राजा बोल्ला " का व बुढे, कसी आलीस व ? " बुढी म्हणते-" राजा राजा, वाढ्याची खट काहाड. " राजानं म्हनलं-" मी नाही काहाडत. त्याचा काही अन्याव ! मज का करावं लागते ? "

बुढी गेली रानीकडे. रानी नेसत होती लुगडं जरीच्या काड्याइचं. रानीनं विचारलं. बुढीनं सांगितलं. बुढी म्हणते-" रानी रानी, राजासी अबोला धर. " रानी म्हणते-" माय, माय, भली आहेस व तू ! मी नाही धरत अबोला. मज का करावं लागते ? त्याचा काही अन्याव ? "

बुडी झाली गरम. म्हणते—" थांब, थांब; तुही खट काहाडतो. तुहा वाखा करतो. "

बुढी गेली मामूजीकडे. " मामूजी, मामूजी, रानीचे कपडे तर कातर रे ! माहा आयकत नाही. बहुच बोलते. " मामूजी म्हणे-" मी नाही जा. मज का करावं लागते ? "

बुढी म्हणते-" थांब रांडलेका, लांबतोंड्या, तुही खट काहाडतो. तुहा वाखा करतो. "

मग बुढी गेली मांजरीकडे. पण तेथेही थेच. कोण आईकते ! मग गेली, कुत्र्याकडे. तेथेही थेच, तेथेही कोन आईकते ! मग गेली सोट्याकडे, " सोट्या सोट्या, कुत्र्यास मार. " पण सोट्या काह्यचा आईकते ! मग गेली इस्त्याकडे. " इस्त्या, इस्त्या, सोट्यास तर जाळ रे ! " इस्तो म्हणे-" मी नाही जा. माहं काय केलं सोट्यानं त मी सोट्यास जाळू ? "

बुढीही आली सन्नाट्यात. म्हणते—" थांब रांडलेका, तुही खट काहाडतो. तुहा वाखा करतो. "

मग गेली पाण्याकडे. नदीनंही थेच म्हनलं. अन् तिथून गेली हत्त्याकडे. " हत्त्या, हत्त्या, नदीचं पानी त आटव रे आपल्या सोंडेनं. "

हत्ती का बुढीचं आयकायस् बसला का जी !

बुढीनं त्याजही सोडलं म्हनता ? हट् ! त्यालेही दटावलं-" थांब, थांब मिचकडोळ्या ! तुही खट काहाडतो. तुहा वाखा करतो. "

मग गेली बुढी मुंगीकडे. मुंगी बसली होती साखरीच्या ढिगावर. म्हणते कसी बुढी-" मुंगे; मुंगे, हत्त्याच्या सोंडेत जावं ! मस्ती चहडली त्यास. माहा आयकत नाही. धस त्याच्या सोंडेत. पाड त्याचं मढं. मरू दे रांडलेकास. मुंगे, कर बाई येवढं. दिवसभर खुरं घासले माय आज. कोन आइकते माहं रांडीमुंडीचं, म्हातारीचं ! तुह बरं होईन मुंगीबाई. तुज मी मावशी म्हनीन. "

मुंगीनं हत्त्यास मारण्याचं कबूल केलं उगीचच. फजूलच ! घेनं न् देनं अन् मनीं बद्दी आननं !

बुढी मुंगीस घेऊन आली. हत्त्यानं पाह्यली. त्यानं ठाव सोडला. अरे बापा ! आली जीवावर आता ! हत्ती म्हणते— "बुढे मी नदी आटवतो." नदीनं आइकलं. नदी म्हणते— "नको, नको, माय, मी इस्त्यास इझवतो." इस्तो म्हणे—"नको, नको, मी सोट्यास जाळतो." सोट्याने आइकलं, सोटा म्हणे–"नाही नाही नाही नाही ! मी कुत्र्यास झोडपतो." कुत्रा म्हणे–"नाही नाही नाही. मी मांजरीस मारतो." मांजर म्हणे—"नाही नाही व माय, मी मामूजीस खातो." मामूजी बोंबलला—"नाही रे बापा ! मी रानीचे कपडे कातरतो."

रानीनं आइकलं. अन् घायबरली ! कपडे कातरले तर घालू काय, तरट नेसू काय, दांडखंड ? नवरा जवळ नाही करनार ! म्हनली–– "नाही नाही माय व ! मी राजासीन अबोला धरतो."

राजानं आइकलं. मनात म्हणते–"माही नवी तुरनी रानी, लाडाची कुडाची नवसाची सायसाची; "बुढे बुढे, मी वाढ्यास सजा देतो."

वाढ्यानं आइकलं. त्यानं उचलला वासला अन् म्हणे, "चालवं बुढे, दाखव तुहं झाड ! करतो खांडं त्याचं."

झाडानं पाह्यलं. सड सड पानं गळली त्याची. नाही रे बापा ! बुढे घे तुहा फुटाणा !

बुढीचा फुटाणा मिळाला !

एक फुटाणा अन् सारा गाव उताणा !

ही जी गोष्ट मी आपल्याला सांगितली तिच्यात मोठे रहस्य आहे. म्हातारीच्या फुटाण्याने मोठा अनर्थ केला. सापडलेल्या पैशाचे ते फुटाणे ! या आपल्या समाजात जे म्हातारीसारखे लोक आहेत त्यांनी असे समजावे की फुकटच्या पैशाचा माल पचत नाही. त्यामुळे उचापती कराव्याशा वाटतात आणि "खट खट होते."

राजाजवळ म्हातारी गेली. राजा म्हणाला, मला काय त्याचे ? समाजाचे नेतृत्व करणाऱ्यांनी असे स्वार्थी होऊन आपल्यापुरते पाहण्यात अर्थ नाही.

मुंगीने केवळ आत्मप्रौढी व बडेजावासाठी हत्तीला मारण्याचे पत्करले. नुसतेच कुणाचे वाईट करणारे लोक मुंगीसारखेच किरकोळ क्षुद्र आणि आपल्या सामर्थ्याचा दुरुपयोग करणारे असतात. त्यामुळे समाजाचा वाखा होतो.

या गोष्टीतील शेवटचा इषारा सर्वांनाच आहे की आपल्या जीवावर बेतली म्हणजे तत्त्वे, बढाई काही चालत नाही. सबब अगोदरच जे काय बोलायचे-करायचे ते आपला मगदूर ओळखून जबाबदारीने बोलावे, करावे !

एवढ्याशा या गोष्टीत किती महत्त्वाची तत्त्वे नि उपदेश आहे. हा उपदेश लहानपणापासूनच नित्य सांजवातीच्या प्रकाशात म्हातारी माणसे गोष्टींच्या मिषाने आपल्या बालकांवर बिंबवितात; आणि मानवी स्वभावाचे व समाजाचे सर्वदर्शन घडविण्यास मदत करतात. असल्या गोष्टीतून करमणूकही होते, उपदेशही मिळतो आणि मनाचीही भूक शमते. लोककथांतील शेवटचे वाक्य मोठे सूचक असते. गोष्टीच्या शेवटी इच्छा केली असते की " तुमचे आमचे पोट भरो ! "

बरोबर आहे ! कारण व्यवहारज्ञान शिकविणाऱ्या या गोष्टी ! त्यांच्या मननाने जगात पोट भरणारच !

आमची गोष्ट सरो, तुमचे आमचेही पोट भरो !

२९।४।४९

१०७

निरुपाय

" हे तारकांनो ! हजारो, लाखो वर्षांपासून तुम्ही आमची सुखदुःखे पाहिली आहेत. जेव्हा जेव्हा आम्हांला आसरा हवा असतो आणि आमची भरून आलेली मने रिती करायला आम्हांला जागा नसते तेव्हा आम्ही तुमच्याकडे पाहून आमची मने रिझवितो. आनंदाचे, उत्साहाचे, सहजीवनाच्या सुखाचे, कितीतरी रांजण तुमच्या उल्हासात आम्ही रिकामे करतो. "

" चांदण्यांनो ! हे तुम्हांला कधीच जाणवले नाही का ? आमच्या आनंदाच्या लहरी तुमच्या सागरापर्यंत कधीच पोहोचल्या नाहीत का ? जेव्हा आमचे एखादे असीम, निरुपाय दुःख तुमच्या डोळ्यांनी दिसते तेव्हा तुम्ही दोन अश्रू आमच्यासाठी गाळत नाही काय ? ही साधी देवघेव आहे. एखादे वेळी असे करायला काय हरकत आहे ? "

" सहानुभावाने दुःखे कमी होतात. तुमच्या सुषमेने भिजलेला हात एखाद वेळ तरी तुम्ही हताश, जर्जर दिलाशासाठी हपापलेल्या दुःखावर फिरविता ना ? एकदा तरी तुमच्या नजरेने, तुमच्या स्पर्शाने आमच्या पोळलेल्या हृदयांना तुम्ही कुरवाळता ना ?- "

अशा व्यर्थ बडबडीने आणखी किती भरकटलो असतो, माझे मलाच माहीत नाही. पाय नेत होते, डोके ठिकाणावर होते, पण शुद्धीवर नव्हते.

ठेच लागली. दगडाची लागली असती तर ओंजळभर रक्ताची किंमत देऊन कळा कमी करता आल्या असत्या. पण ठेचाळलो तो एका माझ्यासारख्याच रक्तामांसाच्या माणसावर.

झालझुलीच्या शांत वेळी, त्या सामसूम रस्त्यावर त्या माणसाचे धूड अस्ताव्यस्त पडले होते. पण त्याने दखल घेतली नाही. किंचित गोंधळलो. मग त्याला उठविण्याचा प्रयत्न केला. ते धूड तसेच पडले होते. नुसते तारवटलेल्या डोळ्यांनी त्याने माझ्याकडे पाहिले. लाल लाल चढलेले डोळे, सुस्त, सुन्न झालेले हातपाय, बधिर झालेले डोके– त्याचे अस्तित्व मला जाणवले. माझे त्याला कसे जाणविणार ?

त्याला उठवायचे तरी कसे ? चार-दोन माणसांची चाहूल आली. मदत मिळण्याच्या आशेने त्यांच्याकडे पाहिले. ते जवळ आले. एक बाई आणि दोन माणसे. घाम अंगावर जिरल्याची ते जवळ येताच घाण आली.

" ए बामणा ! त्याला कशाला उठवितो रे ? मरू दे. पिऊन आला आहे तो. जमाना उलटा आहे. उगीच आफत विकत घेऊ नकोस. जा. कपडेच्या कपडे खराब होतील आणि पोलीसवाला आला तर चावडीवर जावे लागेल साक्षीसाठी. "

" पण बाई, याला बाजूला तर करून टाकू. मोटार, गाडी अंगावरून जाईल बिचाऱ्याच्या. "

" त्याची तुला रे कशाला काळजी ? "

" चाल व बजे, बामणही प्याला आहे. त्याचा साथीच दिसतो, नाहीतर कशाला एवढा अमुळा ? "

तिन्ही माणसे निघून गेली !

मदत करायला गेलो व दारू प्यायचा आळ आला. मी जीव तोडून सांगितले तरीही कोणाला खरे वाटायचे नाही. जे केले नाही ते केले असे सिद्ध होणार; आणि जे करीत आहे ते करीत नाही असे वाटणार. जगात आपण राहतो आणि त्याच्याच बरेवाईट म्हणण्यावर आपली सुखदुःखे अवलंबून असतात. आणि या जगात तर सुधारण्यासारखे पुष्कळच आहे. माणसे बिघडली आहेत. अशी चव्हाट्यावर दारू पितात घरे पडली आहेत. पुष्कळ ठिकाणी सांजवात लागत नाही, शेते उद्ध्वस्त झाली आहेत. शेकडो टन धान्य परदेशांतून येते.—

हे सगळे सुधारले पाहिजे !

खूप अवसान, खूप अभिनिवेश अंगात भिनला होता. सुधारणा चढल्यासारखी मनात संचारली पण हे समोर पडलेले धूड – ते तर बाजूला केले पाहिजे. मग होत राहील भुकेल्याला अन्न देणे, उघड्याला वस्त्र देणे, निराश्रिताला आश्रय देणे. अवसानाची शक्ती एकत्र करून एकदा पुन्हा त्याला उठविण्याचा प्रयत्न केला. एखादे

प्रेत उठविणे सोपे गेले असते. पण त्याचा तोल संभाळेना. माझा वर उचलण्याचा प्रयत्न आणि त्याची खाली जाण्याची इच्छा व म्हणून गती. उपाय काय करायचा ? समोरून एक-दोन मोकाट गुरे येत होती. एक कुत्रे धावत येऊन नाकाने हुंगून निघून गेले होते. मानवांच्या आणि अतिमानवांच्या पुष्कळशा गोष्टींतून पाखरांनी त्यांना मदत केल्याचे पुरावे मिळतात, पण तीही या वेळी आपापल्या घरट्यांत स्वस्थ झोपली होती. मघाशी माझ्यातला कवी जागा झाला, तेव्हा चांदण्यांना आळविलेच होते. पण आमच्या दुःखाची दरकार त्या इतक्या दुरून कशाला घेतील ? जवळ आहेत तेच जर होत्याचे नव्हते करतात तर जे दूर आहेत त्यांना का आणि कशी हाक मारायची ? आणि या आकाशातल्या टिकल्या रात्रभर निळ्या स्वच्छ अंगणात खेळतात, खिदळतात. पण त्या आमच्या दुःखाने कळवळल्या व कधी आम्हांला मदत करायला आल्या असे ऐकिले, देखिले नाही. सर्व बाजूंनी निरुपाय झाला म्हणजे आपोआप उपाय सुचतो. सर्वदूर असमर्थता दिसली की आपोआप शक्ती येते. मला उपाय सुचला व शक्ती आली. त्यासरशी त्या माणसाच्या सुस्तावलेल्या थोबाडात असेल नसेल तेवढे बळ खर्च करून मी दोन-तीन भडकावून दिल्या. तोंडानेही पुष्कळसे अनुच्चारणीय शब्द उच्चारून गेलो. माझ्या हाताच्या झिणझिण्या मला जाणवल्या. बोटांच्या अग्राअग्रांवर रक्त गोठल्याच्या कळा आल्या. आणि त्या माणसानेही जग दिसेल अशा प्रकारे डोळे उघडले. त्याची सुधबुध जागी झाल्यासारखा तो आपसूक उठून उभा राहिला. काहीशा विचित्र, निर्ढावलेल्या, पण भेदरलेल्या नजरेने माझ्याकडे पाहून न बोलता चालायला लागला.

निजलेल्यांना जागे करायला इतका सोपा आणि अचूक उपाय गवसल्याबद्दल मला अपरिमित आनंद झाला. खिशातील पेनची शाई आपोआप वर उसळून आली. चेहऱ्यावर दिव्य प्रभा फाकली. नजरेसमोर कागदाची रिमेच्या रिमे दिसू लागली. नंतर छापखाना, नंतर हजारो पुस्तक-विक्रेत्यांचे याचनेने केविलवाणे झालेले चेहरे, नंतर आपापले कॅमेरे सरसावून नीट जागा सांभाळीत असलेले फोटोग्राफर्स, वृत्तपत्रांचे बातमीदार, सह्या घ्यायला आलेल्या सुंदर, सुडौल रमणी—कुणी शब्द टिपून घेत आहेत, कुणी चेहऱ्यावरचे हावभाव निरखीत आहेत, कुणी येशूशी, बुद्धाशी, गांधींशी तुलना करीत, त्या सर्वांना तुच्छ लेखीत आहेत ! इतका सोपा उपाय आजवर कोणाला कसा सुचला नाही, याबद्दल थोर थोर लोकांना दूषणे दिली जात आहेत !

—आणि आता जग सुधारायला वेळ कितीसा लागणार ? आसमंतातील सायंकाळ कसल्या तरी तेजाने स्वच्छ दिसू लागली. नव्या शक्तीचा संचार झाला. रस्त्यावर दगड पडले आहेत, बुटाची एकेक ठोकर खाताच निमूटपणे कडेला जाऊन पडताहेत. कचरा, धूळ, मुलांचे, जनावरांचे नित्याचे देहधर्म—एवढा शक्तिमान पुरुष हजर असताना हे घडले कसे ? यावरही तोच उपाय लागू केला पाहिजे.

हात शिवशिवत होते. चेहरा तमतमत होता. अंगातून उत्साहाच्या लहरी शिगेवर आल्या होत्या. दातओठ खाऊन पाहिले. मुठी वळवून पाहिल्या, शक्ती कमी होण्याऐवजी वाढतच चालली. चार-दोन दगड उचलले. एक भिरकावला समोर दिसणाऱ्या तिमजली इमारतीवर. वरच्या तावदानाच्या काचा ताडकन फुटल्याचा आवाज झाला. आणि घरावर बसलेले घुबड उडून गेले. दुसरा दगड झोपलेल्या झाडावर भिरकावला. सात-आठ कावळे जागे होऊन ओरडू लागले. तिसरा भिरकावला उंच अंतराळी आकाशातल्या चांदण्यांना, त्यांच्या उन्मत्त हसल्याबद्दल तडाखा मारायला म्हणून.

--आणि हे समोरून काळेसे काय येत आहे ? बैलगाडी दिसते. रस्ता जणू काय हाकणाऱ्यासाठी बांधला आहे ! कोणत्या बाजूने चालावे याची काही अक्कल ? जग सुधारण्याची संधी तशी भराभर चालून येत होती. आणखी मागून कोण येत आहे ? म्हैस. तिला देखील समाजात कसे वागावे हे शिकवायलाच हवे !

जग मुठीत गवसल्याच्या उन्मादात तसाच पुढे निघालो. रस्ता वस्तीशी टेकायला आला होता. त्याला फाटे फुटत होते. एक वस्तीत, एक बाजारात, एक देवळाकडे. घरी जाण्यात अर्थ नव्हता. कारण कोणत्याच समर्थ पुरुषाकडून त्याचे घर सुधारत नसते. ही शक्ती व स्फूर्ती लोककल्याणासाठी उपयोगात आणणे कर्तव्य होते. म्हणून वस्तीचा रस्ता सोडून बाजारवाट पकडली.

---आणि ही लागलीच दुसरी संधी. रडण्याचा आवाज. कोवळ्या अर्भकाचे आक्रंदन. मधूनच एखाद-दुसरे घाईत बोललेले कोवळेच वाक्य. मी जिवंत आहे आणि या जगातील मुले रडतात ! पावले झपाझप उचलली. रस्ता सामसूम होता. सायंकाळ काळवंडली होती. घोंगडीला किनारीचा पांढरा धागा भरतात तसा दिव्यांचा प्रकाश कुठून कुठून येत होता.

दोन आकृती दिसायला लागल्या. एक, दोन अडीच वर्षांच्या कोवळ्या अर्भकाची आणि दुसरी चार वर्षांच्या लहान मुलीची. मूल रडत होते. आणि मुलगी त्याला काहीतरी म्हणत ओढीत होती. जवळ जाताच मी मुठी वळविल्या. पण विस्तवा-समोर मेण वितळते, वाघासमोर घोडा हतबद्ध होतो, अणीदार कामठी पाहताच घोरपड ढिली पडते, तसा काहीसा मला अनुभव आला. आता सापडलेला उपाय, अंगात संचरलेली शक्ती, सगळी सायकलमधल्या हवेसारखी फस्कन निघून गेली. मी त्या मुलीला एका हाताने धरून त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिलो.

" पोरी, कोण आहे ग हा पोरगा ? "

" माहा भाऊ आहे जी. "

" कुठे नेतेस त्याला ? "

" बाजारात. "

" कशाला ग ? "

" भातकं घ्यायला. "
" आता एवढ्या संध्याकाळी ? "
" हो जी. "
" कोणी पाठवलं ? "
" मायनं. "
" तुझी माय काय करते ? "
" गोष्टी करून राह्यली. "
" कोणाशी ? तुझ्या बापाशी ? "
" नाही. एका माणसाशी. "
" बाप कुठं गेला तुझा ? "
" कामावर. ठेसनात. "
" अन् तो माणूस कोण होय ? तुझा काका ? "
" नाही. काका नागपूरला राह्यते. "
" मग कोण मामा होय ? "
" नाही. "
" मग कोण होय ? "

" मायले मालूम हाये. थो मानुस आला की मले मिठाई देते. या भाऊले टाळ्या वाजवून दाखवते अन् उचलून आभाळात फेकते. मायचं कामधाम झाल्यावर माय छपरीत येऊन त्याच्यासंगं गोष्टी बोलत बसते. "

" मग तू काय करतेस ? "

" तो मानुस आमाले पैसे देते अन् सांगते, चार पैशाची हलवायाच्या दुकानात मिठाई घे. अन् चार पैशाचा फुगा घेऊन ये. भाऊले पैसा देल्ले की भाऊ हासते. माय त्या मानसाकडे पाहून हासते अन् मला म्हनते, अंजे वजेनं जा जो. अन् मग आम्ही बाहेर गेलो की माय म्हणते, अंजे, आली की हाक मार. दरवाजा उघडीन. "

" पैसे कुठे आहेत ? "

" येका आन्याचे माह्याजवळ अन् येका आन्याचे भाऊच्या अंगड्यात. "

" अंजे, तुला अंधाराचं भेव नाही वाटत का वं ? "

" लागते जी. पन माय म्हनते, जा भेव कायचं ? गाव त जागाच आहे. भाऊ लडते. पाय दुखते म्हनते, अन् येत नाही. "

" तो माणूस कुठे राहाते वं ? "
" माह्या मायले माहीत आहे. "
" काय करते व तो ? "

" मायशी गोष्टी सांगते अन् लाडात येऊन हासते. "

हे सगळे ऐकून होईस्तवर मी जमिनीच्या अर्धा आत गेलो होतो. माझे मलाच उठता येईना. आणि कर्तव्य तर होते की, अंजनीच्या भावाचे दुखत असलेले पाय आपल्या हातावर तोलून त्याला बाजारापर्यंत पोहोचवायचे व अंजनीला माहीत असलेल्या हलवायाच्या दुकानात सोडायचे. या कर्तव्याने कोणाचे काम साधेल? आणि कोण सुधारेल कुणास ठाऊक ! टाकून दिले आणि उठून चालायला लागलो तर अंजनीचा भाऊ असाच रडत चालायला लागणार. त्याला चार पैशांची किंमत नाही. त्याला खाऊची गोडी नाही. त्याला भीती आहे अंधाराची आणि दुःख आहे पायाचे.

गंगेतील वाळू घ्यावी आणि जसजशी मूठ दाबावी तसतसा कणकण गळून यावा. मुंगसाचे शेपूट धरावे आणि त्याने ते आवळून काढून घ्यावे. हाताने फुगा दाबावा आणि दुसऱ्याच बाजूने त्याचा फुगीर भाग हाताबाहेर जावा...

आत्ता उपाय सुचला होता. आत्ता शक्ती संचारली होती. अगदी काही वेळा-पूर्वीच या शक्तीच्या सामर्थ्यानेच चांदण्यांना दगड मारले होते. कावळ्यांना उडवून दिले होते; काचा तडकावून धुबडांना भीती दाखविली होती. गाडीवानाला समज दिला होता आणि म्हशीला डाव्या बाजूने चालण्याचे शिक्षण दिले होते. आणि एक जिवंत असून नसलेला, झिंगलेला जागा केला होता.

डोळ्यापुढून अंजनी नाहीशी झाली होती. तिचा भाऊ बाजूला झाला. काही वेळ काजवे चमकले. पुढे तेही दिसेनासे झाले. छापखान्याची यंत्रे माझे डोके थडाथड ठेचून काढीत आहेत, कुणीतरी जाडजूड ग्रंथांच्या हजारो प्रती डोक्यावर फेकून मारीत आहेत, सुंदर निळे, गुलाबी कागद टरकावले जात आहेत, खिशात कोंबलेले दहा-वीस टाक मोडले जात आहेत, दौतीतील शाईची वाफ होत आहे, एक दार धाडकन लावले जात आहे, बांगड्यांचा आवाज...आत प्रवेश नाही...नको असलेले बाहेर घालविले आहेत...त्यांच्या हाती पैसे आहेत...हवे तर त्यातले चार दोन तू घे...हलवायाच्या दुकानातला पेढ्याचा तुकडा घे आणि एखादा फुगा...पाहा फोडू नको...

आणि नंतर अंजनी आली. तिने भावाचा हात सोडला. माझे पाय दुखायला लागले. अंधाराची भीती वाटायला लागली आणि तिने मला फरफटत ओढायला सुरवात केली. मी किंचाळू लागलो. व कुणीतरी विचारू लागले..." हा तुहा कोन व्हय वं ? " आणि अंजनी म्हणाली—" माहा भाऊ " आणि पुन्हा अंधाराची भीती आणि रडणे—! !

१६।८।४९

१०८

रीतभात

आपल्या येथील गांवढळ लोकांना रीतभात शिकविण्याचे जे आटोकाट प्रयत्न आज रस्तोरस्ती होत आहेत ते पाहून कोणाचे मन उचंबळून येणार नाही? जेवतेवेळी कढी भुरकताना किती आवाज करावा लागतो, सकाळी तोंड धुतेवेळी जिभेवरून घशात बोटे फिरविताना आवाज करावा की नाही, नाक म्युनिसिपालिटीच्या कचेरीइतके घाणीने अंतर्बाह्य भरले असता ती सबंध घाण रुमालात शिंकरून तो रुमाल खिशात ठेवावा की सडकेच्या कोपऱ्यात नाक शिंकरावे...

आणि आता असे ऐकले जाते की यासंबंधीची सूचना–फलके रस्तोरस्ती थुंकलेल्या पानांच्या पिचकाऱ्यांसारखी भिंतीवरून मिरविली जाणार आहेत!

शिवाय हे रीतीभातीचे शिक्षण येथील अशिक्षित जनतेला किती आवश्यक आहे याची विदारक कल्पना कोणालाही किंचित डोळे उघडे ठेवताच येण्यासारखी आहे. रीतीरिवाज शिकलेली स्त्री आणि दही विकायला आलेल्या राधी–दोघींचे वागणे बोलणे अगदीच उलट! पहिली संस्कारवती छातीपर्यंतचा सगळा भाग कपड्यांच्या साह्याने उघडाच ठेवील तर दुसरी पाऊस नसतानाही आपले लुगडे पोटरीपर्यंत वर सरकावून नेसेल. म्हणून थोर लोक म्हणू लागले आहेत की, 'बाबांनो, सभ्यपणा, मॅनर्स शिका!'

माणसावर शिक्षणाचा परिणाम झाला की निसर्गावरही झाल्याशिवाय राहणार नाही. सभ्य माणसे आजच्या समाजात जशी भलत्या वेळी दारू पीत नाहीत तसा पाऊसही ऐन आगगाडी सुटण्याच्या वेळी येणार नाही व भाद्रपदातील अवचट पावसाची सर ओसरून गेल्यानंतर पुनः पाण्याची वाफ करून लोकांना उकाड्याने घामाघूम करताना सूर्यालाही लाज वाटेल!

तसेच मग नागपूरची दुपारची साडेचार वाजताची पॅसेंजर चक्क उन्हात, गार सुखद हवेत सुटेल; स्टेशनवरचे चहाचिवडे, पानवाले आपल्या ललकाऱ्या यमन कल्याणात बुडवितील. केळ्यांची सालटी प्लॅटफॉर्मवर न पडता लोकांच्या खिशात जमा होतील आणि अन्न वाचवाच्या चालीवर एखादी सुगरण गृहिणी नुकत्याच गावाहून परत आलेल्या नवऱ्याच्या खिशात हात घालून जेवणाचे वेळी केळ्यांची कोशिंबीर तयार करून नेहरूंच्या स्फूर्तीने उपदेशाचे चार चार घासही अधिक वाढील. एकाच शरीराची एक तंगडी आगगाडीत चढण्याच्या घाईत समजा दुसऱ्या तंगडीला लागली तर ती म्हणेल–'क्षमा करा, मला फार दुःख होत आहे.' आणि रिकामपणी आगपेटीच्या कार्डाने दात कोरताना हातांची बोटे हिरड्यांना म्हणतील, 'आपण

कृपावंत होऊन आपल्याला अप्रत्यक्ष स्पर्श करण्याची मला परवानगी द्याल काय ?'

असे झाले म्हणजे कसा छान देश होऊन जाईल आपला ! मग तो सुजल, सुफल नसला तरी आपले काही अडणार नाही. तथापि असे जोवर होत नाही तोवर...

तोवर काय ? असाच चार साडेचारला ऐन वेळी पाऊस कोसळणार, प्रवाशांची मुलेबाळे आणि बिछाने भिजणार आणि आगगाडीच्या डब्यात आरडाओरड, चिखल, दमटपणा विपुल भरून असणार !

दिवसाभराचे काम आटोपून साडेचारला आपल्या घरी जावयास गाडी सोयीची असल्यामुळे जवळच्या स्टेशनची माणसे याच गाडीने गर्दी करतात. केळ्यांच्या, भाजीच्या, मोसंबीच्या रिकाम्या पाट्या, दह्याची, दुधाची, लोण्याची, तुपाची भांडी– आणि त्यातून पाऊस असला की हे वसुधेला कुटुंब मानून बसलेले प्रवासी आपले ओले कपडे डब्यातच वाळत घालतात.

नागपूर स्टेशनवरून गाडी सुटायला पंधरा मिनिटे अवकाश होता. एक उमदा तरुण गडी आत शिरला. प्रसन्न मनाने त्याने आजूबाजूला पाहिले. आपल्या आगमना-संबंधी डब्यात आसपास जे बोलणे झाले ते ऐकून त्याची करमणूक झाली. जागा मिळविण्याच्या आशेने तो दारापासून आत जाऊ लागला:--

'हत्तं माय, आता कुठं बसते की हा दादा--'

'हे ऽऽ देशीन का गा लेकराच्या अंगावर पाय ?'

'आ ऽ बा. त, जागा बी आहे त सामने चालला ?'

'सफेत कपडे पेहरले म्हून काय तूनच टिक्कस फाडली अन् आम्ही का लेक मुफ्तातच येऊन बसलो असन् का गा ?'

या सर्व उद्‌गारावर हास्याशिवाय दुसरे उत्तर त्या तरुणाने दिले नाही आणि एका खिडकीजवळ तो जाऊन उभा राहिला. दोन म्हातारे, एक म्हातारी, एक मध्यम-वयाची स्त्री, एक सहा-सात वर्षांची मुलगी, आणि बहुधा त्या मुलीचा बाप इतके सगळे त्या खिडकीजवळ बसले होते. त्या तरुणाने चटकन त्या छोट्या मुलीला उचलले व आपले स्वच्छ कपडे हे रीत-भातीसाठी आहेत हे विसरून तिला मांडीवर घेऊन तिची जागा काबीज केली--

'मावशे, मला ओळखत नाही का ? मामाला जागा देत नाही तर तो तुझ्या लग्नात कसा येईल गं ?'

अर्थात् भाऊच येऊन बसल्यामुळे मुलीच्या आईने थोडे अंग चोरून स्वच्छ कपड्यावर शोभलेल्या आपल्या मुलीकडे अभिमानाने पाहिले व आपल्या गांवढळ कटाक्षाने नवागताला आपली कृतज्ञता जाणवून दिली.

त्या तरुणाने खिशातून चंची काढली. त्यात पाने, सुपारी, काथ सर्व होते तरीही चुना म्हाताऱ्या आजीकडून, तंबाखू आजोबाकडून, लवंग बहिणीकडून घेऊन तेथे एक पानसुपारीचा छोटासा समारंभ जणू मुलीला मांडीवर घेतल्याच्या निमित्ताने उरकवून टाकला. सगळ्यांनी त्याच्या चंचीतील विडा उचलल्यामुळे व तंबाखूचा बार भरल्यामुळे तंग वातावरण निवळले. गंभीर व कौटुंबिक मनसुभ्याच्या गोष्टी सुरू व्हायला अडचण नाहीशी झाली. त्यामुळे आजीने त्या मुलीसंबंधी निर्माण झालेली अतिबिकट समस्या त्या तरुणासमोर मांडली की--' या पोट्टीची माय दो महिन्यानं बाळंतपणाला जाईल तवा या पोरीला कुठं ठेवावं. वावरात नेलं त उन्हापान्यात वाळून जाईल माहा फूल. तंवरिक जर तिचं कुठी जमलंच उजवायचं तर अवंदाच उरकून टाकू. वल्या मारे-वावरात खंडीभर कापूस नाही पिकला समजू. '

यावर नवागत तरुणाने सुचविले की, ' या मुलीचं जमण्यास अडचण काहीच राहिली नसती. त्यानेच तिच्याशी जमवून घेतले असते; फक्त ती मुलगी तीन-चार वर्षांनी आणखी लहान असायला पाहिजे होती.—'

या त्याच्या समस्या समाधानाने त्या कुटुंबी जगात निर्मल हास्य फुलले व म्हाताऱ्या आजीने मुलाची दृष्ट काढून कानांवर कडाकड बोटे मोडली !

इतक्यात गाडी सुटायची वेळ झाली. घाईघाईने ऐन वेळी एक सभ्य कपडे घातलेले कुटुंब आत शिरले. एक पस्तीस वर्षांचा फाकडा तरुण, त्याची ' हात् मेलं ', ' इश्श मेलं ' छापाची फटाकडी, हातावर छोटेसे घड्याळ बांधलेली बायको आणि तिच्या जरबेच्या कारभाराने फक्त दोनवरच थांबलेला संसाराचा व्याप ऊर्फ बुशकोट व निळ्या बटनाच्या चड्डया घातलेली दोन मुले !

फाकडे तरुण पूर्वीच्या तरुणाच्या-गुलाबरावच्या-ओळखीचे दिसले. कारण डब्यात शिरताच त्यांना ओळख देण्यासाठी गुलाबरावाने जो आविर्भाव दर्शविला तो, ' कसं काय ? कुठं निघाला पंडितराव ? ' असा होता. पंडितरावांचेही गुलाबरावांकडे लक्ष गेले ते म्हणजे किराण्याच्या दुकानात दालचिनी, लवंग, मिरे, चिकनी यांच्या डब्यांतून बदामाच्या पोत्यावर जाते तसे. पण ते त्यांनी न दाखविता दळलेल्या हळद-तिखटाचे भावच पोत्यांच्या दूर उभे राहून विचारायला सुरवात केली—

' म्हातारबाई, थोड्या सरकून बसा ना. आमच्या बाईसाहेबांना जागा होऊन जाईल... '

' असा काहून बोलते गा ? अन् तुह्या बायकोपरीसही उतरली दिसते का गा मी ? चाल्ला म्हातारी म्हनाले ! अन् अव्हारी कुठं सरकू ? जागा तरी आहे का ? तिकडे लेकरू झोपलं आहे. भला सांगतंस गा !—'

' पण बाई, माझीही लेकरं आहेत ना ? आम्ही सगळेच तर उभे आहोत. '

' तुझ्या लेकराचं तू पाह्य. मले का उपकार सांगते--'

जवळच एक पंधरा दिवस दाढी न केलेला व नुकत्याच आलेल्या पावसाच्या सरीने ओले झालेले कपडे अंगातल्या वाफेने वाळवून राष्ट्रीयच काय, पण सूर्यालाही कष्ट न देता विश्वात्मक बचतीच्या धोरणाचा पुरस्कार करणारा घामट, कुबट माणूस बसला होता त्याला उद्देशून पंडितराव--

'बघा हो भाऊसाहेब, हे काय बोलणं झालं या बाईचं? आमच्या लक्ष्मीला थोडी जागा द्या--मी तर उभाच आहे--खरं की नाही हो दादा?'

भाऊबरोबर दादाला संभाषणात ओढल्यामुळे उत्तर देण्याची जबाबदारी एक-समयावच्छेदेकरून दोघांनीही पत्करली--

'तुले जागा नाही म्हून सायब म्हनते का गा आम्हांले? अन् उभी राह्यली तुही लक्ष्मी घडीभर त काय गव्हावरून गेरवा जाणार आहे का तुरीले किडा मारणार आहे?'

'दीज आर ऑल मॅनरलेस ऑफेंसिव्ह ब्रूट्स, लता; आय् ॲम् सो सॉरी—'

ही वेदोक्ती अर्थातच उभी राहून त्रासलेल्या आणि जागेची व्यवस्था न करू शकणाऱ्या नवऱ्याकडे तृतीय नेत्र उघडून पाहत असलेल्या पत्नीला उद्देशून होती.

'हं, डॅम इट, बिजेन्, इट इज ऑल डयू टु यू, यू डोन्ट नो हॉउ टु...'

'मला—वाटते मी आपल्याला ओळखतो. आपण गुलाबराव गोडे का?—'

'होय आपल्याला योग्य तेच वाटत आहे. या ना. कुठे निघालात?'

'थँक यू—पण आमच्या हिला जरा...'

'येऊ द्या. होईल जागा—मावशे, तू बस आता मायच्या मांडीवर' असे म्हणून गुलाबराव उभा राहिला. सालंकृत सहपरिवार सुविद्य लताबाई येऊन बसत्या झाल्या. गुलाबरावला आभार प्रदान करायला त्यांना बराच वेळ लागला. तो उभ्या उभ्याच आजीजवळची तंबाखू घेऊन हातावर चुना घेऊन त्याचा गुटका करीत होता, आणि नुकत्याच जोडलेल्या बहिणीला—" तुम्ही बसा, मला वर्धेस उतरायचेच आहे. पुढच्या स्टेशनवर होईल जागा--' असे समजावीत होता.

मुलाचा आजार बरा झाल्याबर डॉक्टरचे बिल देणे हे कर्तव्य म्हणून सर्वांनीच काही मान्य केले नाही. पंडितराव रोडयांना गुलाबराव गोडयाशी बोलणे आवश्यक वाटले नाही. त्यापेक्षा निरीक्षण परीक्षणात वेळ घालविण्याचा थोरांचा संदेश पाळण्याच्या उच्च ध्येयाने प्रेरित होण्याचे ठरवून ते पत्नीची कटाक्षसंमती अजमावून चौफेर नजर टाकू लागले. एक माणूस दाराची खिडकी उघडत नाही म्हणून काचेवर थाड् थाड् बुक्क्या मारीत होता. दुसरा एक आर्थिक बचत करण्याच्या शपथेने सामान ठेवण्याच्या वरच्या बर्थवर पथारी पसरवून फक्त चड्डीच तेवढी ठेवून बाकी कपडे ढोक्याखाली घेत आढ्याकडे पाहत होता. त्याच्या प्रतिष्ठेचे रक्षण त्याच्या नेसू चड्डीपेक्षा इतरांच्या न पाहण्यानेच केले जात होते. मागच्या बेंचवर बसलेले एक टारगट

पोर नुकतेच संडासातून जाऊन आल्याने आपल्या मित्राला तेथील वाङ्मयाचा व सचित्र माहितीचा लाभ देत होते, आणि त्याला वाचता येत नसल्याबद्दलचे दुःख त्याच्या चेहऱ्यावर उमटले होते.

इतक्यात लतिकाबाई इंग्रजीत साभिनय उद्गारल्या--' काय मेलं उकडतं आहे. ही बया खिडकीजवळ मारे फतकल मारून बसली आहे. घरी तर छिद्रही नसेल भिंतीला, पण म्हणू नका मात्र—'

पण त्या बाईला म्हणून पाहण्याचे शौर्य पंडितरावात असल्याचे लताबाईंच्या प्रत्ययास आले कारण—

' बाई, जरा खिडकी मोकळी करता ? आमच्या बाईंचा जीव घाबरा होत आहे. तेवढीच हवा जरा —'

एम्. एल्. ए. च्या उपस्थितीने सेक्रेटरिएटमधील अंडरसेक्रेटरी नियमबाह्य कामेही चटकन करतात तद्वत ती गवाक्षनिवासिनी गुलाबरावांकडे पाहून खिडकीची जागा रिकामी करती झाली. एवढेच नव्हे तर वर ऑफिसात चहा मागवावा त्याप्रमाणे— ' अंजे, मामाजवळ उभी राहा.' असे म्हणून तिने पंडितरावांच्या भावी आधारस्तंभांना जागा मिळवून दिली.

एक स्टेशन जाताच लतिकाबाईंचे गोरे गोरे पाय वळून आले म्हणून—

' बुढे बाबा ! जरा पाय मोकळे करू द्या ना बाईला. प्रवासाची सवय नाही. फार आभारी होईन--'

आणि पाय पसरण्याची व्यवस्था निजामावरील पोलीस कारवाईसारखी चटकन अमलात आली.

पुढे लतिकाबाईंच्या मानेचे फळ झोपेच्या गुंगीत खिडकीच्या कठड्यावर लटकू लागले तेव्हा--'

' माऊसाहेब, बाईमाणसाकडे पाहून तरी थोडी जागा करून द्या ना--'

--आणि बाईची देहलता ऐसपैस लवंडून दवबिंदूच्या अवसेकाने जणू शांत, श्रांत होऊन सुखावून झोपी गेली. समोरच बसलेले पंडितराव तृप्त लोचनांनी आपल्या कर्तबगारीवर खुश होऊन एकांत सापडल्याप्रमाणे स्त्रीकडे पाहू लागले. लताबाईंचे ते इवल्याशा झुळकेने लहरी मारणारे वायलचे पातळ, त्यातूनही प्रस्फुट होणारा स्वप्ना-सारखा गोरा रंग; सौष्ठव न ढळल्यामुळे दाबून दडपून अधिकच उठावदार दिसणारे शरीराचे काही भाग--

पण लागलीच पंडितरावाने डब्यात चौफेर चवताळलेली नजर फेकली आणि आपले रागावलेले डोळे किंचित काळ वरच्या बर्थवरील द्विवस्त्रधाऱ्याकडे व संडास वाङ्मयाची चर्चा करणाऱ्या दोन असभ्य मुलांकडे रोखले !--

' लोकांना मॅनर्स नाहीत अगदी—' पंडितराव.

'शिक्षणाचा अभाव. दुसरे काय !' गुलाबराव.
'काय होणार राष्ट्राचे, कुणास ठाऊक !'
'शेवटपर्यंत मजुरी करणाऱ्या स्त्रीचे बाळंतपण जसे होते तसे.'
'मोठे मजेदार बोलता बुवा, गोडे.'
'ते कळायलाही हृदय रसिकाचे असावे लागते.'
'हो ते तर खरेच.'

पंडितरावांनी पंडिताबाईंकडे फुशारकीने पाहिले पण झोपेत तिला काहीच ऐकू न् आल्याने त्यांचा चेहरा किंचित मळला.

'काय आजोबा, एक गुटका तयार कराना. ही तंबाखू घ्या अन् काढा चुना--'

'मामा, तू इकडे माझ्याजवळ बस गा, त्याबिगर जमत नाही लमचं ! अन मजाही येत नाही तंबाखाची. कुठवर उभा राह्यशीन गा ?'

'हो हो, बरोबर आहे आजोबाचे म्हणणे, गोडे, पण इथे तर माझ्याजवळ जागा...'

'तू राहू दे सायबा. येवढी बायकोच्या नावानं जागा कमावली ते काढून खोवते. ये गा मामा, इथं बस.'

आजोबाने चंची उघडली. सुपारीचे खांड फोडले. काथाचे खडे बारीक केले अन् चंची पंडितरावकडे--

'पान खाता काजी सायबा ?'

'नको, थँक्स्. आमच्या बाईला आवडत नाही.'

आजोबांनी नामसदृश्य लतिकाबाईंच्या देहाकडे पाहिले आणि मेंढराकडे पाहतात तशी पंडितरावकडे नजर टाकून चंची उचलली. मग हळूच तंबाखू हातावर चोळून, ठोकून, चिमटी धरली अन् आखा डोस दातांच्या खाली, ओठाच्या पोकळीत भरून पिचकारी मारली--

'मामा, एक गोष्ट इचारू ?'

'एक का दोन विचारा की.'

'जरा सरकून बस माझ्याजवळ. कान कर, का गा, हो सायबा तुझ्या माझ्या-सारखा मानुसच आहे ना !'

'म्हणजे काय, आजोबा ?'

'नाही म्हनलं, बोलला त लमचा लोन्यावानी नरम पर समदी लक्ष्मीचीच कमाई; अनू थे निजली तिकडं म्हशीवानी. हे पोहे त याचेच व्हयना गा ? हत् लमचं-हा कायचा मानूस गा...'

गुलाबरावाने तंबाखूचा बार तोंडात कोंबला आणि कोणते स्टेशन आले म्हणून बाहेर पाहण्याच्या निमित्ताने-नुसतेच निमित्त बरे !

१८।९।४९

१०९

भर माध्यान्हीची वेळ

त्याने वाचले—

माझे जीवनसर्वस्व घेऊन जाणाऱ्या पाखरा,
तू माझ्या जवळून उडून गेलास !
आणि मी येथेच सतत तुझ्यासाठी,—
तिष्ठत, कष्टत, शिणत, वाट बघत,—
तुझ्या येण्याची आशा करीत,
तुझ्या वाटेकडे डोळे लावून,—
थकले रे !
तू कधी येणार हे तरी सांगून जायचे होतेस !
तू येणार की नाही हे तरी सांगून जायचे होतेस !
माझ्या फुलराजा, गार गार वारा सुटून,—
माझ्या कुन्तलांशी खेळत, चुंबीत—
माझ्या अंगाला स्पर्श करील—
आणि माझ्या जीवाची काहिली—
मला असह्य होईल—
तेव्हा मी सारे कसे सहन करू ?
हे तरी सांगून जायचे होतेस ?
माझ्या मनमयूरा, श्रावणाच्या सरी कोसळून
घनगंभीर गर्जना —
माझ्या जीवाला भिडतील,
हृदयाच्या तारा छेडतील,
त्यातून तुझा टाहो ऐकू येईल
आणि–विसर–विसर–असे,
मी माझ्या मनाला आर्जवून, विनवून,
दाबून दडपून—
सांगत असताही —
तू दिसशील—
तूच आठवशील—

आणि माझा जीव कासावीस होईल,
तेव्हा मी माझ्या मनाचे डोळे
कोणत्या पुष्पदलांनी झाकू ?
हे तरी सांगून जायचे होतेस !
—आणि रात्रीचा गार वारा सुटेल,
श्रावणाच्या सरी सरसरतील,
पागोळ्याचे थेंब, सर थांबल्यावरही—
एकेक एकेक ठिबकत राहतील,
डोळ्यांवर शिणल्याची झापड येईल,
उशीचा सुगंध असह्य होईल
—आणि त्या सुधबुध निमाल्याच्या अवस्थेत—
माझे मन तुला हाक मारीत सुटेल—
तेव्हा मी त्याला कसे समजावू
येवढे तरी सांगून जायचे होतेस !

आणि विचारले--

श्याममोहनसाठी आसावलेल्या राधेच्या कोवळ्या अंतःकरणावर ओघळणाऱ्या अश्रुबिंदूंची जाणीव करून देणारे तुझे पत्र आता या क्षणीच पोचले. त्यामुळे आजवर जे मी टाळले, ज्याची आठवण होऊ दिली नाही, ते अनावर झाले आहे. गेली पाच वर्षे मी माझ्या भावनांभोवती मजबूत लोहदंड उभारले. फुलबागा तणकटांनी माजू दिल्या. स्मृतीच्या पाखरांची आबाळ करून त्यांचा तळतळाट साहिला. जेव्हा ती पाखरे चिवचिवाट करून उठत तेव्हा मी त्यांना दाबले. त्यांच्या बोलण्यातून वेगळेच अर्थ काढून साळसूदपणाचा आभास उत्पन्न केला.

अशा स्थितीत तुझ्याबाबतीतले माझे गुंजन गूढच असावयास हवे. ते माझ्या खोलीतील सुवर्णमृगाचे चित्र ! त्या मृगाच्या चपळ हालचालींनी आणि नितळ रंगाने मी माझे मन आजवर निवविले. आणि ते मलाच पाहता यावे म्हणून एका कोपऱ्यात दूर टांगून ठेविले.

आज देखील या प्रयत्नात खंड पडण्याचे प्रयोजन नव्हते. सगळ्या बाजूंनी मी आज बद्ध झालो आहे. बंधनाचे काच आपले अस्तित्व क्षणाक्षणाला जाणवीत आहेत.

तू कशाला बोललीस माझ्याशी ? आणि बोललीस तेही मुलखावेगळे. असल्या भाषेत तू कधी बोलली नव्हतीस. पूर्वीची तू—

एके दिवशी ती सायंकाळची वेळ ! कॉलेज युनियनच्या सभेत भाषण आटोपून मी बाहेर आलो. तू अंधारात उभी होतीस. तुझी प्रत्येक हालचाल माझ्या परिचयाची होती. तू मला ओळखलेस आणि--

" आता घरापर्यंत इतके अंतर पायी चालत जावं लागणार ! आपण तास तास भाषणं करायची नि लोकांना पायी रखडायला लावायचं ! म्हणे वीस मिनिटांत भाषण संपेल. संध्याकाळ होणार नाही—"

" बरं, पण म्हणणं काय शेवटी ! "

" कोण काय म्हणतो आहे ? स्वतःच्या सायकल दिव्याची एवढी काय ऐट करायची ! आम्हांला सायकल हाती नेता यायची नाही वाटतं ? हवं असेल त्यांनी जावं समोर. "

" हे सगळं संधान कुणावर आहे ? "

" ज्याला लागतं त्याच्यावर—"

" मग दिवा देऊ का माझा ? नाहीतर मलाच शापामुळे सायकलचा अपघात होईल. "

" बरं झालं बाई ! शापाचं सामर्थ्य तरी कबूल आहे. "

" हो, म्हणूनच भिऊन वागतो आहे. पोचवायला येऊ का ?

" उपकाराची मालगाडी डोक्यावर घ्यायची नाही मला—"

" मग एवढं करा, हा दिवाच घेऊन जा आणि जा इथून एकदाच्या. सायंकाळ आहे. आपण स्त्री आहात. करा काळं एकदाचं. "

" या प्रकाशात मला काळं म्हणणाऱ्यांनी आपली नजर तपासून घ्यायला हवी–"

" ठीक आहे. सकाळी दिवा परत न्यायला येईन तेव्हा डॉक्टर पाहतीलच. "

हे एक साधे चित्र. ते त्या वेळीं पाहण्याची मी माझ्या मनाला परवानगी दिली नाही. तू देखील ते पाहू नयेस म्हणून तुला दाखविले नाही. याचे कारण एकच. तू पुढे जावेस, मध्ये थांबू नयेस, कसलाही मोह तुला पडू नये. माझी कल्पना, खात्री होती की तू सारे विसरलीस. यातच मला समाधान होते. माझे...पण मी कधी ते कबूल करणार नव्हतो. आकाश चांदण्यांनी खच्चून भरलेले, मोगरीच्या वेली कळ्यांनी बहरलेल्या आणि मी सुतकी चेहरा करून काळे दगड आणि डोंगरदऱ्या माझ्या भुकावलेल्या डोळ्यांना दाखवीत होतो.

दुसरेही चित्र असेच साधे आहे. पण त्याचा तुझ्यावरील परिणाम आणि माझ्यावरील ? तथापि सुरीचे पाते खुपसल्यावर काय वाटेल ह्याची कल्पना करणे किंवा करून देणे मोठेसे हृद्य नसते.

एक चांगली सजवलेली, शोभविलेली खोली. मी दारावर टकटक केले. ते उघडले गेले. मोजके सामान. सुबक आरसा. सुंदर फुलपात्र. दोन निळ्या छटेची पोलकी. एक रेशमी कोट. एक 'फोटो'. त्यावर रेशमी फुलांचा हार—अशाने कुठे जिवंत फुलांचा सुगंध येतो ?

—आणि दिसली ती एक यौवनभाराने लवलवणारी मुलगी. माझ्या येण्याने नव्हे तर कसल्या तरी खुपरीने चेहरा आरक्त झालेला. कानशिले तापलेली. नाकपुड्या थरथरत असलेल्या.

" दिवा न्यायला आलो आहे. "

" तेवत असलेला की विझलेला ? "

" तेवत असलेला, पण मला प्रकाश सहन होईल इतपत ! "

" हे पाहिलंत ? घ्या, पाहा नीट. "

माझ्या हाती एक पुस्तक दिले गेले. त्यात एक गुलाबाचे फूल होते. सुकलेले, दुमडलेले, सुगंध पानाला लागलेला, रक्ताचा जणू पानाला डाग लागलेला. फुलांचे मरण इतके सुगंधी असते ? आणि ज्यांच्यासाठी ती आपले जीवन अर्पितात त्यांचे ?

ते फूल एके काळी—एके काळी कशाला, परवाच—सतेज होते. ते जिने दिले, तिच्या यौवनाला ते प्रत्यादेश देत होते. माझ्याच हाती होते ते. मला ते सुकोमल हस्त-कमलाच्या नाजूक अंगुलिद्वयांनी कॉलेजच्या मधल्या सुट्टीत खुणेने पाचारण करून कुणीतरी दिले होते. देतानाचे ते हास्य ! कॉलेजचे इतर तरुण पाहतात ह्याचीही दरकार घेतली नव्हती. तसे सर्वांच्या देखत मुद्दामच दिले गेले होते. रेशमाच्या गाठी अशाच बांधावयाच्या असतात का ? जो समाज उजळ माथ्याने साक्ष द्यायला तयार नसतो, त्याची साक्ष अशीच त्याला प्रसंगात गवसून घ्यावयाची असते, नाही ?

पण मी कोट आणला नव्हता. पुढचा तास तत्त्वज्ञानाचा होता. तेथे आत्मा, अद्वैत यांचा कीस काढावयाचा होता. जे कधी झाले नाही त्याची वार्ता छातीवर हात ठेवून सांगायची होती. त्यात खोटे बोलण्याचे पाप लागायचे नव्हते. तिथे हे फूल घेऊन जाऊ ? आणि त्याने रंगीत गोष्टी करायला सुरवात केली तर ? आणि झाडा-खालच्या गर्द सावलीत बसून पाहत असलेली ती मुले ? ती मला जिवंत ठेवतील ? शिवाय इतक्या उघड उघड असल्या नाजूक वस्तू वापरण्याची मला भीती वाटत होती. देणाराचे साहस होते, पण घेणाराला ते सहन होत नव्हते. सदऱ्याच्या खिशात ठेवावे तर लवकर सुकेल. शिवाय कापडाच्या व्यवधानातूनही त्याने माझ्या अंतरात बोलायला सुरवात करण्याची शक्यता--

हाताच्या मुठीत ठेवावे तर कोमेजून जाईल. किंचित घोटाळलो. समोरून मंदा येताना दिसली.

" मंदा, हे एवढं फूल तुझ्या केसांच्या फुलदाणीत ठेव. तास संपल्यावर मी परत नेईन. "

" अडलं आहे माझं परत करायला. दिलं दान घेतलं दान पुढल्या जन्मी मुसलमान ! दादा—"

" मंदे, गंमत नाही, परत करायचं हं—"

" का ? काही विशेष ? "

" ए फर्स्ट इयर, लक्ष्मणाच्या रेघेबाहेर जायचं नाही—"

" कोणता सुवर्णमृग रे ? की कस्तुरी—"

तथापि डोळ्यांआड ठेवलेल्या फुलाला राखणदार कोण ? आणि मंदाला मी उघड उघड असे कसे म्हणू की तेवढ्या माझ्या हृदयमोलाच्या फुलासाठी तू खेळू नकोस ! मंदा किती लहान माझ्यापेक्षा ! तिला खूण पटविता कामा नये.

मला फूल मिळाले नाही.

ते तर हे फूल नव्हे ? असली फुले हरवू नयेत, सुकू नयेत, म्हणून काय करायचे असते ? जिला सांभाळिले तिला ते सांभाळायला दिले. तिने ते हरविले. तिला चार पैशांत अशी किती तरी फुले मिळत असल्याचे माहीत होते !...

" पाहता काय, बोला ना ? दिसलं नीट ? "

" होय. "

" काय आहे ते ? "

" एक फूल ! "

" कसं दिसतंय ? "

" ते सांगायला मी तयार नाही. "

आवाज फुटलेला. चेहरा पडलेला. अपराधी मन. त्या अपराधाची स्वतःलाच असह्यता जाणीव.

" नाही. तुम्हांला सागावं लागेल. माझा--"

" तू रागावून घे. पण मी सांगायचा नाही. "

" ते चालणार नाही. "

" चालवून घे माझ्या-- "

" किती दिवस ? "

" कदाचित जन्मभर. "

" मी थांबू ? "

" काय होणार त्यानं ? "

" आणि तुमच्या निर्दयतेचा नमुना असाच मी राखून ठेवला तर काय म्हणाल ? "

या प्रश्नाचे तिला उत्तर मिळाले नाही. तिने खाली वाकून ते फूल आणि पुस्तक उचलून घेतले.

" खरंच तू थांबली होतीस माझ्यासाठी ? "

नंतर याही जखमा बुजल्या. शर्तींची औषधे वापरली गेली. पुनः सगळे रान टवटवले. जीवनरस होता. वणवा पेटला तरी पुनः पालवी फुटली. ढगांनी जीवन पुरविले !

ही दोन्ही टोकांची चित्रे ! त्यांच्यामधील सगळा पट तू रंगवून घे. त्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. कदाचित माझी चूकही झाली असेल. फुलपाखरांचे पंख तोडण्याचा प्रमादही घडला असेल. मला एकच वाटत होते की जोवर तुझ्या पायांत शक्ती आहे, तुझ्या डोळ्यांत रत्नदीप आहेत, ओठांवर मधुशब्द आहेत, आणि नखाग्रावर कलाकुसर आहे तोवर तू खूप पुढे जावेस; जितके चढता येईल तितके चढावेस आणि आम्ही सर्वांनी तुझ्या यशाच्या हिमधवल शिखराकडे पाहत राहावे. तुझ्या उन्नतीने सुखी व्हावे. आमच्या आकांक्षा सफल झाल्याचे समाधान लुटावे.

प्रामाणिकपणे सांगतो–याहीपेक्षा अन्य कल्पना माझ्या मनात आल्या नव्हत्या, असे नव्हे. पण तुझा माझा पाड नाही. झंझावाताशी टक्कर देणाऱ्या वृक्षाने मोडून पडायची तयारी करायची असते. लतावेलींच्या नाजूक पाशांनी स्वतःस बांधून घ्यायचे नसते. लतावेलींच्या कल्याणासाठीच—!

हा सर्व विचार करून जे मी तुझ्यासाठी केले ते तुलाही नाकबूल नाही. जीवनाच्या पांढऱ्या वस्त्रावर तू कितीदा शाई सांडविलीस; पायाच्या धक्क्याने कितीतरी फुलपात्रे तू डावललीस. पण मी त्या सगळ्या काचा वेचल्या. पुनः ते वस्त्र स्वच्छ केले. तुझी यशोमयी प्रतिमा रेखायला कुंचले तयार करून ठेवले. कुठून कुठून रंग आणले. बगळ्यांना दूध मागितले. हंसाने माणके दिली. भ्रमरांनी काजळाचे वचन दिले. तुझी रजतशुभ्र आकृती त्यांनाही पाहायची होती. त्यांनाही आपल्या डोळ्यांना गोड गोड घास खाऊ घालायचे होते !

माजलेल्या रणात मी उडी घेतली ती याच आशेने की, परत येऊन तुला पाहीन–अशीच शुभ्र, अशीच नितळ !

पण तू परवा भेटलीस ती कशी ? आणि भेटलीस तरी का ? इतके चांगले नृत्य तू पाहायला आली होतीस पण एकदाही तू स्टेजकडे पाहिले नाहीस. सगळे पाहत होते म्हणून तुला निवांतपणे माझ्याकडे पाहायला फावले ! का ? यापूर्वी तू मला पाहिले नव्हते कधी ?

"कसं काय ? किती वर्षांनी भेट ?"

"ठीक पाच वर्षांनी."

"किती किती लौकिक मिळविलास तू ?"

"तो नको आहे मला."

"का ? याचा अर्थ ?"

"याचा अर्थ तुम्हांला सांगून काय उपयोग ?"

"आमचं समाधान."

"दुसऱ्याचा बळी देऊन–कसायासारखं ?"

"म्हणजे ?"

" का हो, का दूर गेलात तुम्ही ? का टाकलीस मला एकटी ? "

" एकटी ? तुझ्या दूर जाण्यातच कल्याण होतं. "

" कुणाचं ? तुमचं की माझं ? "

" तुझं. "

" कसं कळलं ? मला का येऊ दिलं नाही ? आणि पाच वर्षं कुठे दडी मारली होती ? तुम्हांला वाटलं, माझी दृष्ट लागेल तुमच्या नव्या जीवनाला ? आणि असला हा संकल्प ? इतक्या लहान वयात हे असं का ठरवलं ? जग फार मोठं आहे. विविध आहे. तुम्ही त्याला स्थिर का मानता ? "

" असं काय बोलतेस आज इतक्या लोकांदेखत ? "

" बोलू द्या मला, लोकांची भीती कधीच बाळगली नव्हती. तुम्हांलाच भीत होते आणि तेच भोवलं मला—"

" मला फक्त भीतच होतीस ? "

" होय. आणि म्हणूनच मला काही करता आलं नाही. "

" आता काय करणार ? "

" नोकरी. मला दोनशे रुपयांची नोकरी सांगून आली आहे. यापुढं चढणं बंद. तुमची तरी आस का पुरवावी ? काय केलं तुम्ही माझ्यासाठी ?

" दोनशे रुपयांची नोकरी ? आणि मग लग्न करणार ? "

" का ? होय म्हटलं तर बोचेल मनाला ? "

" बोचलं तर करणार नाहीस ? "

" अवश्य करीन. पण मुद्दा तो नाही. मी लग्न करणार नाही. "

" काही ध्येय म्हणून ? "

" छट्, कंटाळा—"

" मग जन्मभर काय करणार ? "

" हे विचारायचा हक्क ठेवला आहे असं अजून वाटतं तुला ? "

" सहज जिज्ञासा म्हणून—? "

" मारेकऱ्याची जिज्ञासा काय पुरी करायची ! शिवाय माझं जीवन आहे की मला जगायला. "

एवढेच बोलायचे होते ? आणि हेच बोलायचे होते ? म्हणूनच मी विचारतो, हे कोण बोललं ? तू की तुझ्यात संचारलेली कुणी दुसरीच ? सगळे झरे आटले की काय ? सगळी शक्ती निमाली की काय ? छे ! शक्ती निमाली असती तरी तुझे मन तसेच राहिले असते ! आणि हा जीवनाचा पेला संपूर्ण पिऊन टाकण्याची वांछा त्याने धरली असती; पण तुझा तर हा तृप्तीचा निःश्वास आहे. ज्यांना जगायला मिळत नाही ते नेहमीच तरुण असतात. पण तू ? तुझे केस काळेभोर असताना तुझी ही तृप्तीची भाषा आणि हा थकवा—

हे सगळे अद्‌भुत वाटूनच मी तुला विचारतो की, तुझे हे तारुण्य निमावे अशी तू जगलीस कुठे ? ते सांगून टाक. आज तू लिहायला लावलं आहेस हे. म्हणूनच तुला हे सांगून टाकणं शक्य आहे !

म्हणून तिने सांगितले--

रागावलास होय माझ्यावर ? पण हा राग तुझा मनस्तापच वाढवील ! किती यातना झाल्या असतील तुझ्या मनाला हे सगळे लिहिताना ! आजवर प्रतारणा केलीस स्वतःशी; जे बोलावयाचे होते ते बोलला नाहीस, जे करावयाचे होते ते केले नाहीस ! आणि जे बोललास, जे केलंस, ते सर्व विपरीत ! माझा जीव हे सर्व वाचताना कालवला असे जर मी लिहिले तर तू विश्वास ठेवशील ?

तू विचारतोस–कुठे जगलीस अशी की, ही म्हातारपणीची भाषा माझ्या तोंडी यावी ? मी जगले. तूच मला ह्याची आठवण प्रथम करून दिलीस की, मी जगले ! जगत असल्याची जाणीवही तूच दिली होतीस ! आणि आता स्मृती पण तूच जाग्या केल्यास !

तू रंगविलेली विगत स्मृतींची ती चित्रे ! खरेच सांग, इतके कठोर होते का रे ते हृदयाचे बोल ? हृदयाच्या सर्व स्निग्ध भावनांनी फुलविली गेलेली ती चित्रे ! किती ओबडधोबड मांडल्यास त्या भावना तू ! मला वाटते गेल्या पाच वर्षांत एकदाही कधी मनाच्या डोळ्यांनी तू ती चित्रे अवलोकन केली नाहीस ! एरवी तुला इतका कठोरपणा करवला नसता !

मला तो फार फार बोचला ! ती चित्रे मी रोज रंगविली आहेत–पाहिली आहेत. सर्व कल्पनाशक्ती पणाला लावून मी त्यांत रोज नवे नवे रंग भरते, आणि त्यांतच दंग असते. तुझ्या प्रश्नाचे उत्तर दिले तर तू रागावणार नाहीस ना ? आज कित्येक दिवसांनी मला तुझी अनावर आठवण झाली आहे. सजीव, रक्तामांसाचा तू आज कित्येक दिवसांनी माझ्या पुढे उभा राहिला आहेस ! तसाच, तितकाच मनोहर, तितकाच तरुण, फक्त किंचित काळवंडलेला, अंतरी कसले तरी रान पेटलेला ! म्हणूनच तुला राग येऊ नये हीच माझी इच्छा. तुझे मला हवे हवेसे वाटणारे सर्वस्व असेच हसते कायम ठेवायला आज माझे जीवित खर्च होणार असले तरी मला सुख आहे. तू मला आजवर हवे असूनही काहीच मागितले नाहीस, म्हणून तर मी त्यागाला उत्सुक आहे.

मी तसे बोलले–तृप्तीची, थकल्याची भाषा वापरली म्हणूनच मला जाब विचारतोस ! पण तुला खूप खूप हवी असलेल्या माझीच शपथ घेऊन सांग मला, की ज्या वेळी माझ्यात उभेद होती त्या वेळी तू त्यागाच्या, पावित्र्याच्या, ध्येयाच्या, प्रगतीच्या, विकासाच्या गप्पा का मारल्यास ? जे हवे ते नको म्हटल्याने खरेच तू प्रगती साधलीस असे अजूनही तुला वाटते ? आणि आपल्या जिवाचे ओझे का रे होते कुणाला ? मी तुला झंझावाताशी लढू देणार नाही असे वाटते तुला ? तुझे इतके

प्रयत्न अखेर फसले. आज तुला तुझे सर्वस्व हरवल्यासारखे वाटते–तू कबूल करू नकोस, आजवर ढोंग केले म्हणून तू कबूलही करणार नाहीस म्हणा–पुरुष तू, पण या सर्व गोष्टींना जबाबदार कोण ?

तूच मला शिकवलेस आणि मोठे केलेस. मन कधी आणि कसे चाळे करते हे तू सांगत होतास. आयुष्यात मनासारखा जोडीदार ज्याला लाभला नाही तो इतर स्त्रियांवर आपली कल्पना–मंदिरे आणि जीवनस्वप्ने रंगवितो आणि अशाने त्याच्या जोडीदाराची त्याला गरज भासत नाही. तो सुखात राहतो आणि त्याचा जोडीदारही सुखी होतो, असे कायसेसे तू मला एकदा सांगितले होतेस. मी आता जर असे म्हणाले की, तसली चित्रेच मला माझ्या जिवाच्या विसाव्यासाठी वापरावी लागली तर तुला काय वाटेल ? त्या चित्रांतून आदर्शांचे रंग भरणे–त्यांतली तुझी आकृती, त्यांतले माझे स्थान ! तुझ्या आकृतीचे मी रंग बदलले, तुझे कपडे बदलले–कारण दुसरा इलाज नव्हता. तू त्या चित्रात ओळखू येणार नाहीस असे मी केले. माझा जोडीदार मी असा रंगविला.....

—त्यामुळे तुझ्यापासून मला दूर दूर जाता आले. तुझी खरी मूर्ती माझ्या मनाच्या डोळ्यांसमोर येईनाशी झाली. मला तू नकोस. चित्रातल्या त्या मुलीला चित्रातलाच तो हवा आहे. मी सर्वस्वी त्यातच जगते, तेच मला शक्य आणि हृद्य आहे. ते सुखेनैव साधावे म्हणून ही नोकरी—म्हणूनच चढणे बंद ! कारण प्रगती म्हणजे तुझी आठवण, विकास म्हणजे तुझा प्रत्यय ! ती टोचणी सोसत नाही रे !

या माझ्या चाळ्यांना तू हवे ते म्हण. जे तुझ्यामुळेच घडले त्याचे नामकरण तूच कर ! एका तरुण मुलीला एके काळी तरुण आणि सुंदर हृदय होते, हे सत्य सततचे पायदळी तुडवून माझ्यावरच तेवढे ओझे लादलेस ! हाय ! तुला मन भरून 'तू' म्हणून हाक मारायलाही तू तुझ्या चिरेबंदीत फट ठेविली नाहीस ! कसे रे सांगू तुला की, माझे मन काय आणि कसे हे सगळे सहन करते आणि बधीर होते !

आता मला तुझी गरज नाही. तुझी पोषाख बदललेली सुंदर रेखाकृती माझ्या-जवळून तुलाही हिरावून घेता येत नाही. जशी अनेक जगतात तशी मीही जगेन. त्यांना बोलता, दाखविता आले नाही तेवढे तरी समाधान. मी बोलले-दाखविले तेही आता लाजिरवाणे वाटते !

तू लिहितोस–ज्यांना जगायला मिळत नाही ती सतत तरुण असतात. मी जगले, माझे जगून झाले म्हणून–अगदी तुला बोचावे म्हणूनच स्पष्ट लिहिते–मी म्हातारी झाले ! म्हातारपण वयावर नसते हे तुला माहीतच आहे !

२३।९।४९

११०

जखम

"—आणि आता या ठिकाणी बोलाव तुझा कोण परमेश्वर आहे तो ! जगातील सद्‌गुणांचे रक्षण करण्यास तुझा कुणी पाठीराखा असेल त्यालाही पाचारण कर, सुमती ! त्या सर्वांच्या देखत मी आज तुझे उमललेले तारुण्य कुस्करून टाकतो. तुझ्या सद्‌गुणांचा चेंदामेंदा करतो. तुझ्या पुण्याचा पालापाचोळा उडवून लावतो. बोलाव, हाक मार सगळ्यांना ! हाच तो तुझा हात ! त्यालाच या माझ्या पंज्याने पकडून—"

आणि त्यानंतर एक विकट विजयाचे असे दुमजली हास्य ! आवाज आणि शक्ती क्षीण झाल्यामुळे यांपैकी काहीच कुणाला फारसे दूरवर ऐकू गेले नाही. बिछान्यावरून हात उचलले गेले होते. निपचित गात्रातून अवसान संचरल्यासारखे झाले होते.

असाच पाच-दहा मिनिटे पुन्हा वेळ गेला आणि त्यानंतर—

"नका रे, माझ्या देवांनो ! नका टाळ्यांचा कडकडाट करू. आता माझ्यात शक्ती राहिली नाही. दारू प्यालेल्या माणसासारखा मी अवसानाला आलो आहे. आणखी अवसान चढवू नका. थकलो रे ! थकलो ! तुमच्या सर्वांच्या आज्ञेने फक्त एकदा म्हणून मी या रंगभूमीवर प्रवेश केला, पण शक्ती नाही रे ! नका टाळ्या वाजवू"--

दवाखान्यातील त्या वॉर्डात शिरायला कुणाला फारशी परवानगी नव्हती. समाचाराला येणाराने दाराजवळ उभे राहावे आणि २० फूट अंतरावर खिडकी-जवळच्या पलंगावर कालपासून बेशुद्ध स्थितीत असलेल्या त्या रोग्याकडे पाहून परत जावे, असा दवाखान्याच्या इंग्रज डॉक्टरांचा हुकूम होता. सेवेसाठी नेमलेल्या परिचारिका मांजराच्या पावलाने प्रवेश करीत, जातिपुष्पाच्या कोमलतेने त्याच्या नाडीला स्पर्श करीत. शेजारी बसलेल्या एका म्हाताऱ्या दुःखी माणसाशी इशाऱ्याने, हावभावाने काही बोलत आणि हवे-नको सर्व करून निघून जात.

दवाखान्याच्या बाहेर मैदानातील हिरवळीवर पुष्कळ लोकांची गर्दी जमली होती. रामराव लवकर बरे होवोत अशी सर्वांची इच्छा व प्रार्थना होती. इतकी गर्दी असूनही गलका नाही, गोंधळ नाही, जवळच झाडाखाली सचिंत बसलेल्या तरुण, सुंदर, श्रीमंत स्त्रियांच्या घोळक्याकडे पाहूनही थट्टा, मस्करी, विषारी उद्‌गार नाहीत ! न्यायाधीशाने जणू सगळ्यांना काळ्यापाण्याची शिक्षा फर्मावली होती आणि ती त्यांनी निमूटपणे ऐकून घेतली होती.

मधूनच एखादी परिचारिका औषधे घेऊन आत जाताना दिसली की सर्व तिच्याकडे पाहू लागत. तिच्या सोनेरी केसांकडे नव्हे, तिच्या पांढऱ्याशुभ्र फ्रॉककडे नव्हे, तिच्या गोऱ्या, मांसल प्रकोष्ठाकडे नव्हे, तिच्या उघड्या असलेल्या भरीव पोटऱ्यांकडे नव्हे. ते पुरुष आणि त्या स्त्रिया तिच्याकडे पाहत ते म्हणजे तिच्या अस्तित्वाकडे, तिच्या सेवेच्या शक्तीकडे. तिने किंचित सहानुभूतीने हसून त्यांच्याकडे पाहिले की, त्यांचे चेहरे कदंबाच्या वृक्षाप्रमाणे फुलून जात आणि तिचा चेहरा गंभीर झाला की, इकडे सूर्यप्रकाश असूनही अंधारल्यासारखे होऊन जाई. त्यांना खूप बोलायचे होते म्हणूनच कोणी बोलत नव्हता. खूप विचारायचे होते म्हणून कुणात प्रश्न करण्याचे त्राण नव्हते, आपल्याला हवे असलेले उत्तर हमखास मिळेलच अशी खात्री नसल्यामुळे कुणाला विचारण्याची हिंमत नव्हती.

दुपारचे अकरा वाजले. भाद्रपदाचे पिकांना हवे असलेले ऊन चटके देऊ लागले. स्त्रियांचे चेहरे काळवंडले. पुरुषांनीही घामाच्या धारा पुसून काढण्यासाठी रुमाल भिजविले. मधून मधून "रामराव शुद्धीवर आले पाहिजेत, देवाने आमच्या आयुष्यातून हवे तर त्यांना आयुष्य द्यावे." असले उद्‌गार निघत होते.

अकरा वाजले. स्टेथास्कोप गळ्यात अडकवून मुख्य इंग्रज डॉक्टर तिसऱ्यांदा पाहणी करायला आले. बाहेर लोकांचा थवा पाहून नेहमीच्या सवयीप्रमाणे त्यांना त्यांनी शांत राहण्याची खूण केली. बाजूला उभ्या असलेल्या स्त्रियांच्या घोळक्याकडे जाऊन त्यांना घरी जाण्याचे सांगून पाहिले. एक सुशिक्षित मध्यम वयाची स्त्री समोर आली.

"डॉक्टर, कशी आहे त्यांची प्रकृती?"

"सुधारेल; काळजी करण्याचे कारण नाही. एकदा ते शुद्धीवर आले म्हणजे सर्व काही ठीक होईल. त्यांच्या मेंदूला धक्का पोहोचला आहे."

"डॉक्टर, कालपासून ते काहीच बोलले नाहीत का हो?"

"शुद्धीवर येऊन बोलले नाहीत. मधूनमधून असंबद्ध वाक्ये मात्र उच्चारतात."

"तुम्ही आत्ताच त्यांची प्रकृती तपासली. कधी येतील ते शुद्धीवर? जखमेतून रक्त वाहणे बंद झाले ना?"

"हो. सकाळीच झाले. आणि आज संध्याकाळपर्यंत सर्व ठीक असल्यास ऑपरेशनही संपवून टाकू!"

"डॉक्टर, तुम्ही एकटेच ऑपरेशन करणार?"

"नाही. शहरातून आणखी दोन व्यवसायबंधू येतील माझे."

"काय वाटेल तो खर्च लागला तरी हरकत नाही. डॉक्टर, ते बरे झाले पाहिजेत. हे घ्या—"

आणि डॉक्टरांच्या हातावर हातातील दोन सोन्याचे बिलवर ठेवण्यात आले.

"थँक यू. पण याची गरज नाही. कारण आज सकाळीच कुणीतरी पाचशे रुपये यांच्यासाठी जमा केले आहेत. अंऽऽ एक्स्क्यूज मी! पण तुम्ही त्यांच्या कोण?"

"मी कोणी नाही. पण माझ्या वडिलांची व त्यांची ओळख होती आणि मी त्यांना लहानपणापासून ओळखते. डॉक्टर, तुम्ही काल नाटकाला आला होता?"

"कसा येणार? So sorry! मला मराठी तितकेसे समजत नाही आणि—"

"तुम्ही यायला हवं होतं, डॉक्टर! तुम्ही इंग्रज लोक रसिक आहात. तुमच्या स्टेजवर लहानसहान कामे करणारांनाही तुम्ही डोक्यावर घेऊन नाचता. हा आमच्या महाराष्ट्राचा नट! तुम्हांला मराठी कळत नसले तरी अभिनय तर कळला असता—"

"तुम्ही गेला होता नाटकाला?"

"होऽ! त्यांचा अभिनय पाहण्याची संधी मी कधीही चुकू दिली नाही. आज वीस वर्षे मी त्यांची कामे पाहत आहे. पण माझी तृप्ती झाली नाही."

"केवढे नवल! आणि कालचे नाटकं देखील वीस वर्षांनंतर तुम्हांला आवडले म्हणता!"

"हो. काल डोळ्यांचे पारणे फिटले आमच्या. कालचा त्यांचा शेवटचा खेळ होता, रसिकांनी आग्रह करकरून त्यांना आपल्या भाग्यवान गावात काम करायला लावले होते. गेली पाच वर्षे त्यांनी काम करायचे सोडले होते. रसिक मित्रांनी जेव्हा आग्रह केला तेव्हा त्यांनी हातापाया पडून त्यांना सांगितले—"बाबांनो! मी म्हातारा झालो आहे. मला जमायचे नाही. आजवर मिळविले ते सगळे वाया जाईल. तुम्ही नका आग्रह करू.—तुम्हांला माहीत नाही त्यांना काम करायला लावायचे म्हणून त्यांच्या मित्रांनी काय युक्ती केली ती?"

"काय युक्ती केली?"

"ते आता सांगत नाही. तुम्हांला ड्यूटीवर जायचे आहे. तुम्ही संध्याकाळी आमच्याकडे चहाला या म्हणजे मी सर्व सांगेन आणि त्यांचे फोटोही दाखवीन. मी येथील उद्योगखात्याच्या डायरेक्टरची पत्नी आहे. खरंच या डॉक्टर."

"Thank you. अगदी अवश्य आलो असतो. पण नक्की वेळ मला देता येत नाही. शिवाय या ऑपरेशनला किती वेळ लागतो कुणास ठाऊक! आणि आता या केसला माझ्या दृष्टीने वेगळाच अर्थ आला आहे.

"मला एकदा तुम्ही पेशंटकडे जायला परवानगी द्याल? मी मुळीच बोलायची नाही, नुसती पाहून परत येईन."

"अवश्य! पण आता मी घरी जात आहे. २॥ वाजता परत येईन. तुम्ही त्या वेळी आलात तर माझ्याच बरोबर घेऊन जाईन,"

" ठीक आहे. Thank you. मी इथेच थांबते तोवर. "

" इथे ? या उन्हात थांबणार ? "

" काय हरकत आहे ? आता मला घरी जायचे नाही. ऑफिसातले काम लवकर संपवून ३-३॥ चे सुमारास माझे पतीच इथे यायचे आहेत. "

" तुम्हांला हरकत नसल्यास विनंती करतो. तुम्हांला आता माझ्याबरोबर घरी येता येईल तर पाहा. आपणे थोडे खाऊपिऊ. माझी मोठी मुलगी लिली नुकतीच तिच्या बी. ए. च्या परीक्षेसाठी इथे आली आहे. तिलाही हे सर्व ऐकायला आवडेल. चला—नाही म्हणू नका. "

डॉक्टरांच्या घरी गेल्यानंतर त्यांच्या दिवाणखान्यातील सोफ्यावर लिली व लिलीची आई आणि एका खुर्चीवर डॉक्टर बसले होते. किती तरी वेळ तिघीही एकाग्रतेने सर्व ऐकत होते आणि ती सांगत होती—

" मी दहा-बारा वर्षांची असेन तेव्हापासून वडिलांबरोबर नाटके पाहायला जात असे. वडिलांजवळ संपत्ती आणि रसिकता दोन्ही होती. त्यामुळे उत्तमोत्तम गायक, कलावंत, नट आमचे घरी येत. लग्नानंतर माझ्या पतींनीही तेच वातावरण कायम ठेवले. कारण त्यांचेही शिक्षण आमच्या घरी आणि बाबांच्या तालमीत झाले आहे. मला लहानपणी नाटक फारसे समजत नसे. पण रामराम स्टेजवर आले की, सबंध नाटकगृहातून टाळ्यांचा कडकडाट होई, स्टेजवर फुलांच्या माळा येऊन पडत. मी त्यांची कामे पाहत असे. पण मला ती मुळीच आवडत नसत. त्यांना एकदा वडील घरी घेऊन आले त्या वेळी मी त्यांच्याशी बोलले नाही. कारण ते नेहमी दुष्ट माणसांची भूमिका करीत आणि त्यामुळे मला त्यांचा खूप राग येई. असे वाटे की स्टेजवर जाऊन त्यांना ओरबाडावे, चावावे आणि नोकरांकडून हाकलून द्यावे. वडिलांना मी हे सांगितले तेव्हा ते म्हणाले, " मीना, म्हणूनच मी त्यांना बोलावतो. त्यांच्यासारखा नट आजवर झालाच नाही. " त्या वेळी मला वडिलांचे म्हणणे पटले नव्हते--पण पुढे पटले आणि जिथे जिथे त्यांच्या कंपनीची जाहिरात लागे तिथे तिथे वडिलांच्या मागे लागून जाऊ लागले. तुम्हांला मराठी रंगभूमीची कल्पना नाही. पण या असामान्य माणसाने सतत वीस वर्षे आमची रंगभूमी आपल्या अभिनयाने जागती ठेवून रसिकांना वेड लावले आहे आणि त्या वेडापायीच काल त्यांची ही अवस्था झाली. गेली पाच वर्षे म्हातारपणामुळे रंगभूमीवर त्यांनी पाय ठेवला नव्हता. एकदा पुन्हा त्यांना पाहावे म्हणून गेल्या वर्षापासून त्यांच्या शेकडो चाहत्यांनी त्यांना स्टेजवर आणण्याची खटपट चालविली होती. ते कबूल होईनात. आठ दिवसांपूर्वी त्यांनी ज्या नाटकमंडळीत आजवर कामे केली होती तिचा खेळ बघायला माझ्या पतींनी आग्रह करून त्यांना इथे आणले. कलावंताचे मन जागे करण्याचा त्यात हेतू होता. जे नाटक त्यांनी आपल्या भूमिकेने गाजविले होते तेच

त्यांना दाखविण्यात आले. समोरच्या रांगेतील खुर्चीवर ते जाऊन बसले. प्रेक्षकांनी भरगच्च भरलेले ते थिएटर, दिव्यांचा लखलखाट, मान्यवर कलावंतांच्या छाया-चित्रांनी पवित्र झालेली ती रंगभूमी, ऊद जाळल्याचा परिचित वास, नारळ फुटल्याचा स्फूर्तिदायक आवाज--

"आणि समोरचा पडदा वर जाऊन खेळ सुरू झाला. त्यांच्या वेळचे जुने परिचित नट त्यांना दिसले. नटांनी प्रेक्षकांना कळणार नाही अशा रीतीने अभिवादन करून त्यांना सलामी दिली. पण त्या खेळातील खलनायकाची भूमिका त्यांना बोचली. अर्ध्या तासाच्या आत दूर अंतराळातून आवाज यावा तसे ते उद्गारले, 'अरे, या नाटकाची माती करू नका रे! हा नाटककार समोरच्या भिंतीवरील फोटोतून माझ्याकडे पाहतो आहे. पुढच्या खेळात मी करीन व्हिलनचे काम!'.....

"झालं, त्यांच्या चाहत्यांचा डाव साधला. गेल्या आठ दिवसांत सर्वत्र हीच चर्चा! मोठमोठ्या मंडळींनी अविश्रान्त खपून सर्व व्यवस्था चोख केली. पुढल्या खेळाची तिकिटे दर वाढवूनही दोन दिवसांत संपली. थिएटरमध्ये मुंगीलाही शिरायला जागा राहिली नाही.

"काल खेळ मनस्वी गर्दीमुळे अर्धा तास उशिरा सुरू झाला रामराव स्टेजवर आले. नायक आणि नायिकेचे काम करणाऱ्यांनी त्या नटश्रेष्ठाला मनोमन अभिवादन केले आणि पहिला अंक पार पाडला.

दुसऱ्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशात असे दृश्य आहे की, नायिकेला आपल्या जाळ्यात पकडण्याचे खलनायकाने केलेले आजवरचे प्रयत्न सफल होतात आणि ती खलनायकाच्या कचाट्यात सापडते. तो तिला आपल्या मनाप्रमाणे वागण्याचे सांगून पाहतो. ती त्याची विनवणी करते. आपले रक्षण करण्याकरिता ती जगातील साऱ्या शुभशक्तींना आवाहन करते आणि खलनायक त्या सर्व लाथेखाली तुडवून तिच्यावर हात टाकण्यापूर्वीचे भाषण करतो. ते भाषण जणू इंद्रजिताच्या शक्तीने रसरसलेले, सहस्र अहिराजांच्या विषाने माखलेले—

"प्रेक्षक जसे स्वतःला विसरले होते त्याप्रमाणे नटही दिव्य औषधी प्याला-सारखा देहाचे अस्तित्व विसरून गेला होता. कलेशी इमान राखून साध्य केलेली ती तन्मयता! प्रेक्षक सती साध्वीवर ओढवलेल्या त्या प्रसंगाने कळवळलेले, आणि खलनायकाने तिच्या केलेल्या अगतिक अवस्थेमुळे खवळलेले!—

"शुद्धबुद्ध कुणालाच नव्हती. पडद्यातून प्रसंगाला उठाव देण्यासाठी डग्ग्याची थाप पडली आणि खलनायकाने पुढे सरसावून 'हा पाहा तुझ्या सतीत्वाचा चेंदामेंदा करतो,' असे वाक्य उच्चारून तिचा हात तो धरणार—

"तोच प्रेक्षकांतून बेभान त्वेषाचे उद्गार तोफेसारखे कडाडले आणि एक फूटभर लांबीचा टॉर्च वज्राच्या वेगाने स्टेजकडे गेला. नेम बरोबर खलनायकाच्या

डोक्यावर बसला, टॉर्चच्या काचा ताडकन फुटल्या आणि डोक्यावर मार लागून दिव्याचेही तुकडे झाले, रामराव रक्तबंबाळ होऊन स्टेजवर कोसळले !

" खेळ बंद पडला. कालपासून ते तुमच्या येथे त्याच अवस्थेत पडून आहेत."

तिन्ही स्त्रियांच्या डोळ्यांना अद्‌भुत आणि असामान्य श्रवणाच्या परिणामाने ओल आली होती. शेवटी ती बाई म्हणाली—

" डॉक्टर ! महाराष्ट्राचा प्रत्येक रसिक तुमच्या पायावर कुबेराचे धन आणून ओतील. काय वाटेल ते करा आणि त्यांना वाचवा. "

डॉक्टर ऑपरेशन थिएटरमध्ये आले. रामराव शुद्धीवर आले होते. वार्धक्याने जर्जर झालेल्या त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण समाधान विलसत होते. पांढऱ्या शुभ्र बँडेजने वेष्टिलेला त्यांचा चेहरा आणि डोळे धन्यतेच्या, सार्थकतेच्या भावनेने चमकत होते. डॉक्टरांकडे रामरावांनी मनमोकळे हास्य करून पाहिले आणि घरी आलेल्या पाहुण्यासारखे त्यांचे जणू स्वागत केले—

" डॉक्टर, आता काय ऑपरेशन करणार तुम्ही ? काय गरज आहे हो ! यापुढे मला जगण्याची मातबरी वाटत नाही. अरे, मीना ! तू आलीस ? आणि वसंतराव नाही आला ? या डॉक्टरांना इंग्रजीतून समजावून सांग की मला मरण्यातच भूषण वाटते. माझ्याइतके भाग्याचे मरण एखाद्याच कलावंताच्या वाट्याला येते. खरे आहे ना बाळ हे ? पण डॉक्टर, माझं कुणी ऐकणार नाही. मला माहीत आहे. पण एक तरी माझी विनंती ऐका. या जखमेची खूण तरी राहील ना हो ? मला असंख्य बिरुदांपेक्षा तीच जास्त भूषणाची वाटते. माझ्या कलेच्या उपासनेचे हे सुखविणारे हवेहवेसे वाटणारे दुःख आहे ! जो प्रेक्षक माझ्याशी समरस झाला होता त्याला माझे नमस्कार सांगा — आणि —"

तो नटश्रेष्ठ बोलत असतानाच क्लोरोफॉर्मचा मास्क डॉक्टरांनी त्यांच्या नाकावर ठेवला. हळूहळू ते शब्द विरत वितळत, मीनाच्या डोळ्यांत विविध भावांची आसवे तरंगवीत खोल खोल— !

२८।९।४९

१११

अंतरी दीप उजळले

सतत शिकवून शिकवून तत्त्वज्ञानाची पुस्तके आता मला पाठ झाली आहेत. भौतिक शास्त्रे या शिकविण्याच्या नादानेच मी अभ्यासून टाकली आहेत. माझे गेल्या दहा वर्षांतील विद्यार्थी आणि माझे सहव्यवसायी माझ्या शिकविण्याची मला अरुची

वाटेल इतकी स्तुती करीत आहेत. सोनेरी कागदावर छापलेली व चांदीच्या करंड्यात गुंडाळून दिलेली चार-दोन मानपत्रेही या इथे माझ्या टेबलावर पडलेली आहेत. अहंकार वाटूनच घ्यायचा झाला तर त्याबद्दल मला कुणी दोषही देणार नाहीत.

या अहंकारावरून आठवण झाली. माणसाच्या अहंकाराला काही अंत, किनारा, सीमा असते काय ? तत्त्वज्ञ उत्तर देतात, अहंकाराशिवाय माणूस जगू शकत नाही. मानवाची धडपड, खटपट, तळमळ सगळी या अहंकाराच्या पोटी आणि त्याच्या तृप्तीसाठीच असते. पण तो चांगला की वाईट याचे उत्तर कोणी दिलेले नाही. माझ्या विद्यार्थ्याने मला प्रश्न विचारला, तर त्याचे समाधान मला करता येणार नाही. इतके वाचून अभ्यासून माझ्या मनातले साधे साधे प्रश्नही आजतागायत उत्तरा-वाचून धूळ खात पडले आहेत.

पुष्कळदा वाटते, उपयोग काय या ज्ञानाचा ? कोट्यवधी माणसे सकाळी उठतात, पाखरांच्या चिवचिवाटासारखी हसतात, खेळतात, सायंकाळी आपापल्या घरट्यांत येतात; खाऊन पिऊन झोपून जातात. पुन्हा दुसऱ्या दिवशी उठतात, काही उठतही नाहीत; त्यांच्यापैकी कुणाच्याही मनात प्रश्न उमटत नाहीत, साचत नाहीत; मग आपल्याच मनात ही अडगळ का ? अहंकार तृप्त झाला की बरे वाटते; म्हणून मनाची अवस्था साधक निरहंकारी ठेवण्याचा प्रयत्न करतात.

पण या मनाचा, त्याच्या अस्तित्वाचा, त्याच्या अवस्थेचा असा पत्ता तरी लागतो का ? मन म्हणजे काय ? काही उत्तर मिळत नाही. कधी हे मन कुणावर जडते; कधी कोणावरून उडून जाते; कधी हसते. कधी रडते, कधी कुढते आणि शरीर चांगले धडधाकट असतानाही हे मन म्हणे कधी मरूनही जाते ! हे सगळे का आणि कसे होते ते काहीच कळत नाही. मनाचे खेळ आपण पाहतो की मन आपल्याला आपले खेळ पाहायला लावते, कुणास ठाऊक ! कधी ते मोठे होते, कधी लहान होते, कधी संकोच पावते. ही खरोखर एखादी वस्तू असती तर झिजली असती, फुटली असती.

सध्या मी माझ्या खोलीत, माझ्या चिरपरिचित वस्तूंच्या सान्निध्यात पडलो आहे. गेल्या कित्येक वर्षांपासूनचा हा पलंग, त्यावरचा बिछाना, मी स्वच्छ धुतलेल्या चादरी, सुंदर नाजूक फुलांनी थकवा कमी करून टाकणारे हे उशांचे अभ्रे, पांढरी स्वच्छ मच्छरदाणी, हे टेबल, ही पुस्तके, हा दिवा या सर्व वस्तू माझ्या नित्य सहवासाने मला प्रिय झाल्या आहेत. या खोलीबाहेर विश्रांतीचे चार क्षण मला कोठे घालवावे लागले की कसे चुकल्यासारखे, थकल्यासारखे होते. आणि मी म्हणे गेली दहा वर्षे तत्त्वज्ञानाचे श्रवण, चिंतन व मनन करीत आहे !

आताच पाहा. या करकरीत तिन्हीसांजेच्या वेळेला मी असा एकटा पडलो आहे. काही करण्याची प्रवृत्ती नाही, आणि कशापासून निवृत्तीही नाही. क्षणभर

उठून दिवा लावला तर माझ्या या स्वच्छ खोलीचा कोपरान्‌कोपरा उजळून निघेल, पण दिवा लावण्याची प्रवृत्ती नाही. आणि गंमत अशी की, दिवा लावावा असे मला क्षणाक्षणाला वाटते आहे. हे सर्व मनाचेच चाळे समजायचे काय ? सूर्य मावळतीच्या उतारावर लागला नव्हता, तेव्हापासून मी असा येथे मऊशी शाल अंगावर घेऊन पडलो आहे. ढगांच्या काळोखीने अगोदरच निस्तेज झालेल्या किरणांचा प्रकाश कणाकणाने, क्षणाक्षणाने कमी होताना मला जाणवला आहे. चंद्र–सूर्य उगवतात आणि मावळतात. त्या वेळी मंदमंद, स्पर्शसुखद अशा वाऱ्याच्या झुळका अंगावरून जातात. ती झुळूक माझ्या अंगाला स्पर्श करून गेली आहे. पण तरीही असेच पडून राहावेसे वाटते. काहीतरी आठवावे आणि कमली तरी चित्रे डोळे मिटून पाहत राहावी, अशी एक विलक्षण इच्छा सध्या माझ्या मनात थैमान घालीत आहे. कधी पर्वताएवढे काळे भारावलेले ढग आकाश व्यापून टाकतात ना ? प्रकाशही पिऊन टाकतात ते, वाराही पचवून टाकतात आणि मग सर्व जणू असह्य होऊन मधूनमधून हळूच एखाद दुसरा थेंब टपकन पडतो. अगदी तसे—तसे वाटते ! मनात असे विचार आणले पाहिजेत की, ते डोळ्यांवाटे हळू, मला न कळत झिरपू लागतील.

कसे वाटते कोणास ठाऊक ! आज सकाळपासूनचा दिवस मी आठवून पाहिला. अगदी सकाळी एका ओळखीच्या गृहस्थाने दार ठोठावले आणि माझ्या हाताच्या रेषा पाहून, माझ्या उज्ज्वल भविष्याची कल्पना मला दिली––बरे वाटले; ताजे वर्तमानपत्र उघडून पाहताच कोठले तरी बांधकाम कोसळून शेकडो माणसे मेल्याची बातमी आली—उदास वाटले. थोड्या वेळाने माझ्या एका विद्यार्थिनीचे पालक येऊन ती विद्यार्थिनी एकाएकी घरातून नाहीशी झाल्याची खबर कळली—काळजी वाटली. नंतर माझे जेवण मीच तयार केले. भाजी स्वादिष्ट झाली होती. एकटे बसून खाण्यास गंमत वाटेना. कोणी आत्ता येईल तर—! उगीच हुरहूर वाटत राहिली. नंतर दुपारी माझा एक जुना विद्यार्थी आला आणि त्याने नम्रपणे, आपल्या अश्रूंच्या साक्षीने मला बातमी दिली की––" सर, मी या गावात गेल्या महिन्यापासून पोलीस अधिकारी म्हणून बदलून आलो आहे. तुमची सार्वजनिक सभेतील भाषणे जहाल असतात असा रिपोर्ट केला गेला आहे. सर, जपून राहा. ज्या गुरूच्या पायाजवळ बसून अक्कल शिकलो, त्याला हातकड्या घालण्याच्या प्रसंग माझ्यावर आणू नका. " त्याच्या अनपेक्षित प्रेमाने भारावल्यासारखे वाटले. त्यानंतर काही काळ अनेकदा ओळखीच्या झालेल्या तुरुंगाच्या भिंती दिसल्या, लोखंडाचे गज आडवे उभे डोळ्यांसमोर नाचू लागले. पहारेकऱ्यांच्या बुटांचा आवाज कानांवर आला आणि हसावेसे वाटले. पुढे ऊन चमकू लागले––आणि श्रमाने लालबुंद झालेली शेजारची लहानगी वासंती " काका, काका " करीत ताजी सुगंधी फुले घेऊन आली. तिला पोटाशी धरून रडावेसे वाटले, आणि आत्ता अगदी काही वेळापूर्वी उन्हाची तिरीप कोवळी असताना, या माझ्या खिडकीत एक चिमणी चिवचिव करून थोडासा कापूस,

गवताच्या एक-दोन काड्या टाकून उडून गेली. तेव्हा काय वाटले कोणास ठाऊक! मनात विचार आला, ही चिमणी अशी याच वेळी नेमकी माझ्याच खिडकीत का आली? इतकी जवळ असूनही मला न भिता का चिवचिवली आणि या वस्तू तिने येथेच का आणून टाकल्या?

हे सकाळपासूनचे संस्कार एखाद्या वस्तूवर झाले असते तर तिचे अस्तित्व नामशेष झाले असते; पण हे मन, ही काय चीज आहे की, जे हरखते, हसते, कष्टी होते, कुढते, रडते आणि न शिणता पुन्हा जसेच्या तसेच राहते?

आता करकरीत कातरवेळेला मला दिवा लावावासा वाटत नाही. कोपऱ्यातून कोंदलेला अंधार साद घालीत असता मला काय वाटते, सांगू? असे वाटते, कसलाही विचार करू नये. एखादा खूप दुःखद प्रसंग, जो कधीतरी घडलेला आहे आणि मनाच्या पृष्ठभागावर मासळीसारखा श्वास घ्यायला वर येतो आहे, तो आठवून डोळ्यांसमोर उभा करावा व ढगासारखा एखाद दुसरा थेंब नाही—अगदी सरीच्या सरी, धाराच्या धारा गळू द्याव्या.

पण काय मौज आहे! एकही अशी वाहती जखम वेदना देत नाही. ज्या प्रसंगाने एके काळी मला दिवसदिवस रडविले, ते असे अंजनासारखे मी माझ्या डोळ्यांत खुपसतो. पण एक थेंबही येत नाही.

फार दिवस नाही झाले त्या गोष्टीला! घडली तेव्हा कोणाला सांगावीशी वाटली नाही आणि म्हणून सतत तीन दिवस, चोवीस त्रिक बहात्तर तास माझ्या डोळ्याचा थेंब खंडला नव्हता. आज तो प्रसंग आठवतो आणि इतक्या गोष्टीसाठी एवढा हपाप मी का सोसला होता, असे माझे मन मला विचारते. प्रसंग अगदी साधा. काही दिवसांपूर्वी एक तरुण, सुंदर, अनिंद्य अशी कुमारिका आली होती. मी तिला बोलावले नव्हते. याच समोरच्या खुर्चीवर ती बसली होती. इथल्याच टेबलावरील हीच पुस्तके तिने व्यवस्थित लावून ठेवली होती. तिच्या नाजूक पावन करणाऱ्या स्पर्शाची आठवण या माझ्या दिव्याच्या काचेलाही असेल. माझ्या उशीच्या अभ्र्या-वर काढलेली सुपलीची फुले कदाचित सुगंध देतील म्हणून तिने त्यांचा वास घेऊन पाहिला होता. या खोलीचा भाग नि भाग तिच्या हास्याने निनादला होता.

आणि जशी ती एक दिवस सकाळी आली तशीच चार दिवसांनी संध्याकाळी जायला निघाली. ती "जाते" म्हणाली आणि मी तिला "जा" म्हणून सांगितले. परंतु हे दोन शब्द उच्चारले गेल्यानंतर तिचे हुंदके आवरेनात. तिच्या शरीरात तिचे आक्रंदन मावेना. ती शेकडो मैल दूर निघून गेली असेल आणि इकडे माझे डोळे आणि कान प्रलय पाहत आणि ऐकत होते. माझ्या हातून सातासमुद्रापलीकडे कुबेराने सुरक्षित ठेवलेल्या गुप्त खजिन्याची जणू चोरकिल्लीच हरवली होती! नदीचे निर्मल, अथांग पाणी सतत धारेने वाहून जणू दगड, धोंडे उघडे पडले होते;

आकाशातल्या अगणित चांदण्या काळ्याठिकर पडून ताडताड कोसळत होत्या; दिग्गजांनी आपले कर्तव्य सोडून आकाशाचे शेत खुंदून, उपटून होत्याचे नव्हते केले होते;—आणि या सर्वांचा बोल माझ्यावर येऊन मी सतत तीन दिवस हीच उशी ओली केली होती !

आज या दुःखाच्या आठवाने आपल्या पाकळ्यात अश्रू साठविण्यास माझे डोळे कोणाच्या सांगीने नकार भरीत आहेत कोणास ठाऊक !

आणि आता ढगातून पावसाच्या सरी कोसळल्याशिवाय मला दिवा लावणेही अशक्य आहे. काय करू ? कसे करू ? कोणीतरी दारावर थाप मारावी म्हणजे त्याच्या साहाय्याने माझ्या खोलीतील दिवा उजळण्याची मला प्रवृत्ती तरी होईल.

दारावरची थाप !—

काय आयुष्य असते पाहा ! कधी कोणत्या अवस्थेतून आणि कोणत्या प्रसंगातून जावे लागते ! ह्याही प्रसंगाला फार दिवस झाले नाहीत. एका ढगाळलेल्या रात्री, शुक्राची चांदणी बुडण्याच्या वेळेला अशीच दारावर थाप पडली. नुकताच तुरुंगातून सुटलो होतो, आणि या खोलीत नवी विटी, नवे राज्य स्थापिले होते. राज्याचा बंदोबस्तही ठीक होता. शांत, नीरव वातावरणात कोठून तरी " पिया गये परदेस " चे सूर भरून मला पर्याकुल करीत होते. पावसाची सर सुरू झाली होती आणि दारावर थाप पडली !— कोण असेल ?

ओळख नव्हती पण उगीचच वाटले की, प्रवासी अपरिचित नाही. कृश, खंगलेले शरीर व स्नेह जिव्हाळ्याने भरलेले डोळे, डोक्यावरचे केस वाढलेले, रंग गोरा, सुकलेला, जशी चंदनाची राख असते; ही विभूती ओळखीची नसेल पण कधीतरी, कुठेतरी, या जन्मी नसेल तरी मागच्या जन्मजन्मांतरी नक्की पाहिली असेल. ओळख पटायला वेळ लागला नाही. त्या व्यक्तीच्या हास्याने दिव्याची वात उगीच मोठी झाल्यासारखी वाटली. वाऱ्याची गार गार झुळूक जाणवली; चांदण्या अगदी हाताने तोडता येतील इतक्या जवळ आल्याशा वाटल्या.

त्या माणसाच्या मागोमाग असे एक तिमिर चित्र, रेखीव, साकार उभे असल्याचे जाणवले. नेसते वस्त्र अंगाला चिकटलेले, केस ओलेचिंब निथळत असलेले, आकृती स्त्रीची, वय, मला वाटले आणि जाणवले तेवढे ! आकर्षक, जे कधी कधी एखाद्या कल्पनेबद्दल, भावनेबद्दल, विचाराबद्दल वाटते तसे ! जणू त्याचा ऐहिक जगाशी संबंध नाही. आकाशातून दवबिंदू कोणाच्या तरी हृदयावर शिंपडले जावेत आणि गुलाबाच्या कळ्या उमलून याव्यात !

क्षण दोन क्षण हे सर्व जाणवले, व त्या व्यक्तीने त्या तरुणीला आधार देऊन आत आणीत मला म्हटले, " तुम्ही मला ओळखलेच आहे आणि तुमच्या दृष्टीतून मलाही तुमची ओळख जाणवली आहे. पण तुम्ही इतके बेसावध कसे ? गावाच्या

एका टोकाला राहता, नदीतलावावर फिरायला जाता आणि त्यांच्या सुखदुःखाची भाषा तुम्हांला आकळत नाही ? मला पाच मैलांवर हाक ऐकू आली आणि तुम्ही इथे इतके जवळ कुठल्यातरी गाण्याची लकेर आळवीत, हुरहुरत बसला होता ! पण हे काय ? क्षण क्षण महत्त्वाचा आहे. या मुलीला रडतीचे हसते करायचे आहे. तुम्ही एकटेच आहात. निदान तुमचे एक धोतर द्या. म्हणजे ती ओले कपडे बदलून सुकत घालील आणि असे पाहा—मला उत्तम साधा स्वयंपाक तयार करता येतो. तोवर तुम्ही हिच्याशी बोलत बसा. तुम्ही बोलावे म्हणून मुद्दाम तिला मी इथे आणले. ही जवळजवळ पाच मिनिटे पाण्याच्या तळाशी होती. तिला ऊब हवी आहे.

क्षण दोन क्षण असेच गेले. परिचिताने अपरिचिताची नाजूक, थंडगार हनुवटी वर उचलली आणि त्या स्त्रीने माझ्याकडे पाहिले. नवल असे की, कित्येक दिवसांपासून मला हे डोळे आणि हा सोस परिचयाचा वाटला. डोळे आसवांनी भरले होते, ते सुकून गेले आणि माझ्या स्मिताने ती ऊब मिळाल्यासारखी प्रसन्न झाली. तो माणूस तिच्याशी बोलू लागला,--

" बाळ, बरं झालं ना मी तुला वर काढले ? तुला इथेच यायचे होते ना ? हे तर तुला माझ्या अगोदरपासून ओळखत असल्याचे दिसते. चल आटप, कपडे बदलून घे. थोडीशी ऊब, ताजा ओला घास आणि तुला आपोआप असा सुगंध यायला लागेल आणि मग अशी वाट चुकणार नाही तुझी !--"

" ठीक आहे, पटले मला ! "

पाच दहा मिनिटांत आवश्यक ती सर्व व्यवस्था झाली. तासाभरात नाजूक हातांनी भांडी वाजली. पिठले–भात तयार झाला. फारसे न बोलताही जणू असे वाटत होते की, जिव्हाळ्याची माणसे आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी एकमेकांना सांगून समजावीत आहेत. शब्द निघत नव्हते म्हणून काय झाले ?

एक मोकळे, निर्मल, आंब्याच्या मोहोरासारखे हास्य माझ्या खोलीभर निनादले आणि--

" अहो, तुम्हांला काय सांगू ? ही सोन्याची पुतळी आजच्या अंधाऱ्या रात्री जीव द्यायला निघाली होती. पोरीची मोत्यांची हौस पाण्याच्या तळ्यात जणू भागणार होती ! आणि मला म्हणाली कशी—" मला जगायचे नाही. जिथून मी आले तिथे मला जायचे नाही. कशाला मी जगू ? कुणासाठी जगू ? मी सगळ्यांना नकोनकोशी झाले आहे. " अहो, ही स्वतःला नकोशी झालेली माझी राजबाळी आता अन्नपूर्णेसारखी आपल्याला वाढीत आहे, पाहा ! काही वेळापूर्वीची ती--आणि आताची ही !

" आणखी एक सांगतो. कुणी कुणाला नकोसे होत नाही हो, आणि हवेसेही वाटत नाही. हे सगळे आपले आपल्यासाठीच असते. मलाही सगळे विचारतात की,

"तू का जगतोस ? कुणाला तुझी गरज नाही." मलाही नंतर असेच वाटू लागले होते. काही दिवस उन्मुत फिरूनही अंधारात चाचपडल्यासारखे होई. वाऱ्याच्या झुळकीने मी गुदमरत असे आणि असाच रानोवनी, नदीडोंगरातून भटकत असे. जणू उद्देशाला आदी नाही, अंत नाही, किनारा नाही, काठ नाही.—

"आणि असाच एकदा अंधारात रडण्याकण्हण्याचा आवाज ऐकू आला. चाचपडले तेव्हा कोवळा लुसलुशीत देह अंगाला बिलगला. खिशातली आगपेटी काढून अंधार घालविला, आणि ते अभंक स्तनाला लावल्यासारखे हसायला लागले. त्या क्षणी मला असे वाटले की, आकाशात हजारो सूर्यांच्या प्रकाशाने उज्ज्वल उत्सव मांडला आहे. नित्य परिचयाची गार झुळूक त्या दिवशी अंगाला स्पर्श करून गेली —जाणवली आणि मला सांगून गेली की, तुझ्यासारख्याच असंख्य लोकांकडून मी आले आहे. तुला हा माझा सुगंध जाणवत नाही !.....

"तुम्हांलाही हा सुगंध कित्येकदा आला असेलच. फुलापेक्षा तो वेगळा असतो आणि धरित्रीकडून जणू संदेश आणीत असतो. तिचे काम जगविण्याचे, टिकविण्याचे, क्षमा करण्याचे, सुगंध पसरविण्याचे असते ! ज्यांनी ज्यांनी ह्या कामाला हातभार लावला त्यांच्या त्यांच्या अंगावरून सुकृताचा सुगंध घेऊन हा वारा येतो आणि तो जाणवला की असे वाटते,—किती किती जगण्यासारखे आणि करण्यासारखे आहे ! आपण आपल्यालाच हवेहवेसे वाटतो !

"आणखी असं पाहा, ही माझी सोनाबाई जशी दुःखाने भारावून आज या वाऱ्याला टाकून चालली होती, तसेच माझेही झाले होते. निरतिशय दुःखभाराने आणि काळवंडलेल्या निराशेने अभिभूत होऊन जेव्हा एका काळरात्री निघालो, तेव्हा याच वाऱ्याने मला वाचविले आणि मला जाणीव झाली.....

"तुम्हांलाही पटत असेल की, जगातील काही सुखं आणि दुःखे शाश्वत आहेत. आता तुम्ही आम्हांला जेवायला घातले हे सुख जगातली केवढीही जुलमी राजसत्ता काढून घेऊ शकत नाही, आणि आईला मुलाच्या मरणाने वाटणारे दुःख जगातील कितीही कल्याणमय अधिसत्ता भरून काढू शकत नाही. कळलं ना ? कधी मला वाटायचं की, मी काही अपराध केला नाही, मग ही दुःखे माझ्याच वाट्याला का ? याचेच दुःख जास्त असते माणसाला ! पण शाश्वत दुःखे असली तर ती कुणा ना कुणाला भोगलीच पाहिजेत. मी जर ह्या मुलीसारखा नदीचा तळ शोधला तर ती दुःखे दुसऱ्या कुणाला तरी भोगावी लागतीलच. सुटका नाही. भार कुणाला तरी वाहिलाच पाहिजे. माझ्या वाट्याला आलेल्या दुःखाने कुणाचा तरी भार उचलला जात असलाच पाहिजे आणि तो सुखी व्हायलाच पाहिजे. तेव्हापासून ही दुःखेच मला सुखवितात.

"ही मुलगी ! केवढी कळ आली होती मला हिला वर काढताना ! पण आपली मंडळी भेटली. परिचितांचा मेळ साधला; पाहा, नीट ऐका, ती पाहा ती झुळूक आली. येतो ना सुगंध तुम्हांला ? नक्की येईल आणि ऐका ती काहीतरी बोलून गेली....."

" भ्रमर जसा फुलातला मधू नेतो तद्वत ती आपल्याकडून काही तरी नेईल ! म्हणूनच, अगदी म्हणूनच कुणासाठी नाही, माझ्यासाठी तर नाहीच नाही, हा मधू या झुळकेसाठी मला साठवीत राहिलेच पाहिजे. जीवनाचा कणकण शक्तिमान करून, रस शोषून मला जगलेच पाहिजे. हा माझा यज्ञ, हे माझे दान, हे माझे तप—मी मला हवा आहे, जगलेच पाहिजे मला.....पाहा, पुनः आली ना ती झुळूक ?"

ती व्यक्ती असेच सतत अविरत बोलत होती. प्रकाशाचा झोत सर्वांचे चेहरे उजळवीत होता. म्हणूनच मला ओळखीचे वाटले ते दोघे, चिरपरिचित, जन्मजन्मांतरीचे—यांची ओळख मला त्या बाऱ्यानेच करून दिली असली पाहिजे—"

हा प्रसंग असा मनाच्या पात्रावर कमलासारखा तरंगत, डुलत, झोके घेत स्थिर पात्राला लहरवीत होता—

डोळे झर झर झर झर पाणावले माझे—दुःखाने नाही, सुखानेही नाही.....

मग मी उठून दिवा लावला. दाराची कडी हळूच वाजली—आणि अशी या जवळच्या खिडकीतून, त्या चिमणीच्या चिवचिवाटासारखी, वासंतीच्या फुलांसारखी, ज्योतिष्याच्या भविष्यासारखी, विद्यार्थ्यांच्या नम्रतेसारखी नाजूक, मंद, गारगार, सुगंधी झुळूक मला अगदी हळुवारपणे स्पर्श करीत, कुरवाळीत आली व किंचित अशीच कोठेतरी—कुणाकडे—कुणास ठाऊक !!

२९।९।४९

११२

कष्टांची कहाणी

ऐका ऐका भावांनो ! ऐका ऐका बहिणींनो ! भगवान विष्णूची कहाणी. जपी ब्राह्मणाची कहाणी; तपी ब्राह्मणाची कहाणी; रानावनाची, कष्टाकामाची, निढळाच्या घामाची—अंतरीच्या रामाची !

या कहाणीत काय घडले ? तपी ब्राह्मणाला आपल्या कष्टाने, शुद्ध बुद्धीने विष्णूचे पद प्राप्त झाले !

ऐका ऐका भावांनो ! ऐका ऐका बहिणींनो, कहाणी देशाची; काशीपूर गावाची; सोन्याच्या वडाची, भद्रकळी गंगा; बावन आड—तिथे एक ब्राह्मण राहत असे. त्याची ही कहाणी. स्वतंत्र देशातील जन हो ऐका ! कहाणी ऐकल्याने काय होते ? आपल्या कष्टाची किंमत कळते; माणसाला देवपण येते; यज्ञाचे, दानाचे, तपाचे पुण्य लाभते—

देशाची, धर्माची, जनावरांची उन्नती होते. दुःखाला थारा राहतं नाही; सुखाचा वारा वाहतो.

काशीपूर गावात एक गरीब ब्राह्मण राहत असे. तो तप करीत होता. तप कशाचे? आपल्या नित्य कर्माचे! तप कशासाठी? देवपण मिळविण्यासाठी! विष्णूची प्राप्ती करून घेण्यासाठी! तो काय करीत असे? सकाळी उठत असे, स्नानसंध्या करीत असे, अंगी भस्म लावीत असे. उगवत्या सूर्याचे गायत्री मंत्रांनी ध्यान करीत असे, आणि इतके झाल्यावर कामाला लागत असे.

काम कोणते? जंगलात जाण्याचे; नेसतो काय? तिबोटी लंगोटी. दिसतो कसा? जमिनीसारखा. खांद्यावर काय आहे? धारदार कुऱ्हाड; कुऱ्हाड घेऊन काय करतो? जंगलातील लाकडे तोडतो. त्यांची करतो मोळी, उत्तमोत्तम फळे आणतो, फुले आणतो, घामाच्या धारा जमिनीवर सांडतात, अंगची अशुद्धी निघून जाते. दुपारचे बारा वाजतात, सूर्य डोक्यावर येतो आणि त्याला सांगतो "जपी ब्राह्मणा, तपी ब्राह्मणा, घरी जा—"

ब्राह्मण घरी येतो. कंदमुळं, फळे शिजवून त्याचा उत्तम पाक तयार करतो. पण एकटा कसा खाणार? एकटा खाणारा तर चोर समजला जातो! ज्यांनी ज्यांनी आपल्यावर ऋण करून ठेवले आहे, ज्यांनी ज्यांनी आपला पिंड पोसायला मदत केली आहे, त्यांचा वाटा आपल्या कष्टांत, आपल्या कमाईत असतो. त्यांचा वाटा चुकविला नाही तर पाप लागते–इथे सुख होत नाही आणि मेल्यावरही गती मिळत नाही.

आपल्या कमाईत वाटा कुणाकुणाचा? मानवाचा जन्म दिला म्हणून देवाचा वाटा. कारण त्याविना तो जन्म सफल होत नाही. देशोदेशी फिरून भटकून वाऱ्यावरील सुगंधासारखा जो आपल्याला ज्ञान आणून देतो त्या अतिथीचा दुसरा वाटा. तो चुकता केला नाही तर समाज चालणार नाही! जिने आपल्याला अन्न पुरविण्यासाठीच जणू देह धारण केला आणि आपल्याला तुष्ट–पुष्ट करण्यासाठीच जी झिजते त्या गाईचा तिसरा वाटा. तो चुकविला नाही तर धनधान्य भरपूर होणार नाही. मग उपासमार, रोगराई यांना ऊत येईल. चौथा वाटा ब्राह्मणाचा, कारण समाजाला शिकविण्याचे व शहाणे करण्याचे व तेही केवळ भिक्षेवर संतुष्ट राहून–ते काम धर्माने त्याच्यावर सोपविले असते. ते काम इमानेइतबारे जो करतो त्याला आपल्या अन्नातून चौथा वाटा गेलाच पाहिजे—यातून उरलेला जो पाचवा वाटा, तो आपला. तो घास आपल्या कमाईचा, कष्टाचा असतो. तो शुद्ध असतो, पवित्र असतो. त्याच्यावर कुणाची वासना जात नाही. तो खाताना कुणाची दीठ लागत नाही. असा हा आपल्या देशाच्या संस्कृतीचा रिवाज तो ब्राह्मण पाळीत असे आणि स्वतः जगत असतानाच धर्माला, ज्ञानाला, संपत्तीला, अनुभवाला जगवीत असे. या त्याच्या रोजच्या कृतीने देव संतुष्ट, धर्म संतुष्ट, ऋद्धिसिद्धी संतुष्ट—कुणाला कुणाचा

हेवा नाही ! ज्याला जगायचे असेल त्याने ब्राह्मणासारखे सकाळी उठावे, नित्य कर्मे करावी, उन्हातान्हात कष्ट करावे, आपल्या कष्टांची भाकर भाजावी, देवाचा भाग देवाला, अतिथीचा अतिथीला, ब्राह्मणांचा ब्राह्मणाला, गाईचा गाईला व उरलेला भाग आपण खावा !

हाच त्या जपी तपी ब्राह्मणाचा रोजचा नियम; हाच त्याचा जप, हेच त्याचे तप. यात कधी खंड पडला नाही. दिवसांमागून दिवस गेले, महिन्यांमागून महिने गेले, वर्षांमागून वर्षे गेली; दुःखाचा काळ लोटला पण ब्राह्मणाची कुऱ्हाड ब्राह्मणाच्या खांद्यावर ! सगळ्यांनी खाडे केले. सूर्याने कित्येकदा ढगाआड लपून ब्राह्मणाला सांगितले— "भल्या माणसा, आज अंधार आहे. घरी जाऊन आराम कर !" ब्राह्मण म्हणे— "माझ्या तपात खंड पडेल." वरुण देवाने पावसाची संतत धार धरून पाहिली. किडा, मुंगी, चिटपाखरू सगळे आपापल्या घरट्यात दडून बसले, नद्यांनी वाटा अडविल्या, झाडांनी माना टाकल्या. पण ब्राह्मणाची खांद्यावरची कुऱ्हाड तशीच ! रोज त्याच्या कमाईचा सर्वांना देऊन उरलेला हक्काचा घासच त्याच्या पोटात गेला.

आपल्या कष्टाचा वाटा चुकवीत, कर्तव्य करीत करीत नुसत्या जगण्यानेच आपल्या नावे पुण्याच्या राशी जमा होतात. अनेक वर्षे गेली, जपी ब्राह्मण कसा दिसतो ? तपी ब्राह्मण कसा दिसतो ? नखे रूपली आहेत, बोटे खुपली आहेत, मस्तकी जटा वाढल्या आहेत, मुखी आपल्या कष्टाचा जप आहे, हृदयात कर्तव्याचे समाधान आहे, शरीरावर निथळत्या घामाचे आरोग्य आहे, असे त्याचे तप किती वर्षे ? एक नाही, शंभर नाही, हजार नाही तर अठ्ठ्याऐंशी हजार वर्षे ! अरे ब्राह्मणा, एक दिवस विश्रांती घे. सर्वच थकतात रे, सर्वच पिकतात रे, सर्वच त्रासतात रे ! मग तुलाच काय झाले ? हे तू कुणासाठी करतोस ? तो म्हणे—

"हे मी माझ्याचसाठी करतो, हे माझ्या देशासाठी, माझ्या देवासाठी, माझ्या समाजासाठी–अशानेच मला देव भेटेल—"

"अशाने तुला देव खरेच भेटेल ?"

"होय."

"अशाने देशात सुकाळ होईल ?"

"होय."

अठ्ठ्याऐंशी सहस्र वर्षे झाली. ब्राह्मण एके दिवशी सायंकाळी मोळी घेऊन येत होता. कपोत-कपोतीचा जोडा वृक्षावर बसला होता. ही पाखरे कोण ? आपल्या सुख–दुःखाचा, आपल्या बऱ्या-वाईटाचा, आपल्या कर्मा-धर्माचा, पाप–पुण्याचा हिशेब ठेवणारी, आपल्या संस्कृतीने कल्पिलेली सर्व संचारी, सर्वसाक्षी पाखरे. ती आपल्या जीवनाच्या क्षणाक्षणाचा हिशेब ठेवतात. आपण झोपलो तरी ते जागे राहतात. त्या संध्याकाळी कपोत–कपोतीने ब्राह्मणाला विचारले—

—" भल्या ब्राह्मणा, जपी ब्राह्मणा, तपी ब्राह्मणा, माळी ब्राह्मणा, अरे पायाने तर चालतोस, मुखाने तर बोलतोस, तुला हवे काय ? एवढे तप कुणासाठी करतोस ?

" माझ्या कष्टांनी, माझ्या कर्तव्याने मला देवाकडे जायचे आहे. महाविष्णू भेटण्यासाठी हे माझे तप आहे. "

कपोत-कपोतींनी ब्राह्मणाच्या कर्माकर्माचा हिशेब तपासून पाहिला. त्यात अडक्याचीही चूक नव्हती. ते जोडपे विष्णूकडे गेले. सर्पाच्या शेजेवर, सोन्याच्या चादरीवर महाविष्णू झोपले होते. लक्ष्मी पाय दाबत होती, नारद तुंबरू गायन करीत होते. कपोत-कपोती जाऊन सांगू लागली:—

" देवाधिदेवा, तुमच्या चरणी नमस्कार, तुम्ही धनाचे देव आहात, धान्याचे देव आहात, तुम्ही सृष्टी रचियली-चालविली आहे. देवा, तुमच्या चरणी नमस्कार; ऐका ऐका देवा ! भारत देश, काशीपूर नगर, सोन्याचा वड, भद्रकळी गंगा, तिथे एक ब्राह्मण तप करीत आहे—"

" काय करतो ? "

" सकाळी उठतो, स्नान-संध्या करतो; भस्म लावतो. तिबोटी लंगोटी नेसतो ! खांद्यावर कुऱ्हाड घेतो. जंगलात जातो. फुले, फळे आणतो; त्यांचा उत्तम पाक करतो; त्याचे पाच भाग करतो; देवाचा देवाला, अतिथीचा अतिथीला, ब्राह्मणाचा ब्राह्मणाला, गाईचा गाईला व उरलेला पाचवा भाग स्वतः खातो; पायांनी चालतो, मुखाने बोलतो, डोळे शाबूत आहेत, अंगव्यंग काही नाही; दोष-दुर्गुण काही नाही—"

" एवढे तप कशासाठी करतो ? "

" महाविष्णूच्या भेटीसाठी—"

" चला, मी रचलेल्या सृष्टीच्या अखंडतेसाठी ज्याने आपली नित्यकर्मे संभाळून खांद्यावर कुऱ्हाड घेतली, जो आपली भाकर आपल्या कष्टाने मिळवून खातो, त्या कष्टाळू, जपी तपी महापुरुषाला भेटलेच पाहिजे. "

महाविष्णू उठले. पायी खडावा नाही, गंधलेपनाची शुद्ध नाही, वस्त्रप्रावरणाची काळजी नाही. मनाच्या वेगाने स्वर्ग लोकातून खाली आले. पाहतात तो ब्राह्मण जंगलात दुपारच्या उन्हात लाकडे तोडीत होता.

" भल्या ब्राह्मणा, जपी ब्राह्मणा, तपी ब्राह्मणा, थांब थोडा—"

" मला थांबायला वेळ नाही. "

" माळी ब्राह्मणा, अरे, तुझी पोथी कुठे आहे ! तुझं पुराण कुठे आहे ? "

" सगळे माझ्या कुऱ्हाडीत आहे. "

" माळी ब्राह्मणा, हे कशासाठी करतोस ? "

" महाविष्णूच्या दर्शनासाठी. "

"पण तुझा जप, तुझ्या जातीचे ध्यान, धारणा, समाधी–हे का करतोस–ते कर !"

"नाही. त्याने देवाचे दर्शन होत नाही. आपल्या कमाईची भाकर सगळ्यांचे ऋण चुकवून ज्यांनी ज्यांनी खाल्ली त्यांना त्यांना देवाने दर्शन दिले. मी माझी नित्यकर्मे करतो आणि शरीर श्रमाचे व्रत घेऊन पुण्यसंचय करतो. ज्ञान सांगणारे पुष्कळ आहेत, ध्यान करणारे पुष्कळ आहेत. नाहीत कष्ट करणारे, नाहीत कष्टाची किंमत ओळखणारे, नाहीत कमाईची लाज राखणारे. मी कष्ट करतो, कमाई करतो. आज ना उद्या मला महाविष्णूचे दर्शन होईलच. पण भल्या गृहस्था, तू आपल्या कामाला का जात नाहीस ? तुझ्याशी बोलायला मला वेळ नाही. माझ्या कष्टात, माझ्या व्रतात खंड पाडू नकोस."

"माळी ब्राह्मणा, मी साक्षात महाविष्णू."

"थांब, एवढी मोळी बांधू दे. ओळखावा कसा ? पायी पद्म नाही, डोई मुगुट नाही, गळा वैजयंती नाही, हाती चक्र नाही. पाहू कसा ? भेटू कसा ?"

"माळी ब्राह्मणा, असाच ओळख, असाच भेट. पाहा पाहा–"

ब्राह्मणाने वर पाहिले, तो शंख-चक्र-गदा-पद्मधारी, पीतांबर वैजयंती धारण केलेली महाविष्णूची साक्षात मूर्ती समोर दिसली. ब्राह्मणाने देवाच्या चरणी कुऱ्हाड ठेवली आणि मस्तक नम्र केले.

"माझ्या भक्तश्रेष्ठा, मी प्रसन्न झालो. काय हवे ते माग. राज्य माग, भांडार माग, संसाराचे सुख माग–"

"मला राज्य नको, मला भांडार नको, मला संसाराचे सुख नको."

"मग हे तप कशासाठी ? काय हवे ?"

"देवाधिदेवा, जगात कष्टांची किंमत वाढू दे; श्रमाचे मोल कळू दे, कमाईची लाज कुणाला वाटू देऊ नकोस. जे कष्ट करतील, जे कमाई करतील, आणि आपल्या कमाईतून देवाचा, धर्माचा, देशाचा, ज्ञानाचा वाटा चुकवून जे आपल्या कमाईचे खातील, त्यांना तू आपले मान, त्यांना तू दर्शन दे."

"तथास्तू ! पण माळी ब्राह्मणा, तू स्वतःसाठी काही माग."

"मला काही नको, आणि देणार असशील तर तुझे माझे एक आसन; तुझा माझा एक जीव, जिथे जिथे भक्त शरीर श्रम करीत असतील, तिथे तिथे तुझा माझा एक वास—"

"तथास्तू !"

महाविष्णूच्या चरणांवरील कुऱ्हाडीतून आणि तपी ब्राह्मणाच्या कुडीतून फुलासारखी प्रसन्न, तुपासारखी नाजूक, कोंबासारखी कोवळी अशी एक ज्योती निघाली आणि देवाधिदेवाच्या हृदयात विलीन झाली.

ऐका ऐका भावांनो ! ऐका ऐका बहिणींनो ! महाविष्णूची कहाणी–त्रिभुवनी पुण्याची, सुखाची, हिताची ! कहाणी, कहाणी, त्रिभुवनी कष्टाच्या खनी आणि तुमच्या आमच्या मनी ! आमची कहाणी सरो. तुमचे आमचे पोट भरो; ही साठा उत्तरांची कहाणी, पाचा उत्तरी संपूर्ण !

९।१०।४९

११३

सखी

सर्वांनाच कधी कधी हा अनुभव आला असेल की एखादी व्यक्ती पाठमोरी समोर जात असली आणि आपल्याला उत्कटतेने वाटले की तिने मागे वळून पाहावे तर ती जरा वेळाने सहज कसल्याशा निमित्ताने मागे पाहते आणि निरुद्देश तिची आपली दृष्टादृष्ट होते.

आणि दुसरा अनुभव असा की, एखाद्या व्यक्तीकडे पाहिल्यानंतर का कुणास ठाऊक, पण आपल्याला वाटते हिच्याशी आपण खूप बोलावे. अंतरातल्या अगदी आतल्या सुख-दुःखाच्या दाबून ठेवलेल्या गोष्टी हिला सांगाव्यात. हे सगळे का होते कुणास ठाऊक !

आणि तिसरा अनुभव असा की, कुणी आपल्याकडे येऊ नये, बोलू नये असे जेव्हा मनापासून वाटते तेव्हा भक्ष्य शोधायला निघालेल्या मुंग्यांसारखी माणसांची रीघ लागते आणि क्षणाचीही उसंत न मिळाल्यामुळे जीव आतल्या आत कालवायला लागतो.

स्वच्छ गच्चीवर सहज उभे राहावे; खालच्या अंगणात पांढरी शुभ्र फुले फुलली आहेत; सांज काळी झाली आहे; आकाशात प्रतिपदेचा चंद्र कोवळ्या कळीसारखा उमलायला आला आहे आणि त्याच्या बाललीला चांदण्या जणू कौतुकाने डोळे भरून पाहत आहेत; चांदण्या सुंदर दिसतात—टपोऱ्या, लुकलुकत असलेल्या आणि आकाशाच्या निळ्या वस्त्राची शोभा वाढविण्यात परस्पर स्पर्धा करीत असलेल्या.

पण हे सर्व पाहत असताना मला एकदम असे विलक्षण वाटले की, समजा, यातील पाच–पन्नास चांदण्या आपल्या अंगावर एकदम कोसळल्या तर काय होईल ? त्या शांत, नीरव, सुभग अशा वेळी जीव अगदी गुदमरून निघाला. असे का झाले–कळेना. आणि तीच नेमकी कल्पना का वर्षाव करून गेली याचे देखील आकलन होईना. जीव घाबरा झाला आणि आतल्या खोलीत थोडासा विसाव्याला आलो, तोच खोलीतील चारही दिवे जणू कोसळत आहेत असे वाटले. म्हणून तिसऱ्या

अंधाऱ्या खोलीत डासांची संगीताची तालीम ऐकत आणि त्यांना परोपकारी माणसासारखे शरीर अर्पण करीत पडलो. हातापायाची सारखी चुणचुण आग व्हायला लागली. एक चावा हाताला बसावा, दुसरा पायाला, तिसरा गालाला, चवथा आणखी असाच कुठे तरी आणि कदाचित आता मलेरिया सुद्धा होईल.

उठून गार पाण्याने हातपाय भिजवले. तोंडावर शिडकावा घेतला आणि दिव्याकडे व चांदण्यांकडे न पाहण्याचे ठरवून, ना खोलीत ना गच्चीत असा, दारातच उभा राहिलो.

आणि समजा, मिनिटा मिनिटाच्या, तासा तासाच्या अंतराने लागोपाठ सात-आठ व्यक्ती येऊन, डोळ्यांत प्राण ओतीत सांगू लागल्या की, 'मला तू फार आवडतोस. तू मला हवा आहेस. माझे तुझ्यावर प्रेम आहे' तर—? डासांच्या स्वाधीन शरीर करून मोकळे होता येते. पण इथे तोही उपाय व्यर्थ! आणि म्हणून अधिकच जीव घाबरा होतो. चांदण्या आकाशाच्या वस्त्रावर चिकटून चमकू लागल्या म्हणजे त्या सुंदर दिसतात. गारगार हव्या हव्याशा वाटतात. पण कोसळल्या–आणि अगदी आपल्या अंगावर कोसळल्या तर!

आता इतके सगळे पाहिले–अनुभवल्यावर, केल्या–करवल्यावर, देखल्या–दाखवल्यावर असा हा स्त्री-प्रेमाचा पूर लोटला तर इलाज काय? उपाय काय? पृथक्करण करून विचार करण्याइतपत सुद्बुध जागेवर राहत नाही. डोळे बंद करून बाहेरचे जग टाळावे तर आतले जग, म्हणजे बाहेरच्या जगाच्या साचलेल्या प्रतिमा कुठला तरी प्रकाश घेऊन दिसायला, नाचायला लागतात.

आणि पेढे–बर्फीपासून तो लाडू-करंज्यांपर्यंत पक्वान्नांनी भरलेली ताटे आपल्या निवडीसाठी पुढे यावी आणि त्या सगळ्यांना डावलून आपल्याच आवडीचा कधी तरी जिभेवर ताना बसलेला साधासा पदार्थ खावासा वाटावा.

आज मला तिची आठवण का होत आहे कुणास ठाऊक! तिच्या वागण्या-बोलण्यात कसलीही उत्कटता नव्हती. तिच्या चालण्या–करण्यात कसलेही हावभाव नव्हते. तिच्या दृष्टी-चेहऱ्यात कसलीही लकब नजाकत नव्हती. आणि गुलाब-पाकळ्यांनी फुलविलेल्या मिष्टान्नांच्या तुलनेने तिचा अगदी पाड नव्हता. म्हणूनच कदाचित आज इतक्या तीव्रतेने, इतक्या उत्कटतेने असे वाटते की, तिचे नाव घेऊन आपण मोठ्याने हाक मारली तर तिला ऐकू जाईल आणि आपल्याला तिची फार फार गरज आहे हे तिला जाणवेल.

खरंच नवल आहे! चार वर्षांच्या सहवासात मोजून तीनदा किंवा चारदा ती माझ्याशी बोलली, फारशा सुखदुःखाच्या गोष्टीही केल्या नाहीत. शरीर जसे ती आटोपशीर कपड्यांनी झाकीत असे, तसेच मनही कधी तिने मला दिसण्याइतके उघडे ठेवले नव्हते. तरी देखील फार फार वाटायचे मला. अगदी कॉलेजच्या पहिल्या दिवशी मी

वर्गांत पाऊल घातले व ती मला दिसली. त्या क्षणापासून वाटले की हिची आपली ओळख व्हावी–ती काही बोलली नाही तरी चालेल. त्या इच्छेतही एवढे मला पक्के माहीत होते की, ती बोलायला आली तरी आपल्याला तिच्याजवळ बोलता येईल असे काही सुचणार नाही. एखाद्या छोट्याशा टेकडीवर चाफ्याचे झाड असते–फुललेले, रसरसलेले–आणि आपल्याला जमिनीवरूनच वाटत असते की तिथे गेले पाहिजे. जाऊच असे नाही; गेले नाही तर अडेल असेही नाही. एखादी सुंदर मोटारगाडी मनात भरते आणि ती जन्मभर मिळाली नाही तरी आपल्याला विषाद, हायहाय वाटत नाही व तिच्याबद्दलची आवड, आकर्षण कमी होत नाही. एखादी गाण्याची कोठून तरी कानी पडलेली सुरेल लकेर, आपल्याला ते गाणे म्हणता आले नाही तरी मन सारख्या ताना आलापीत असते, व आपले दिवसभराचे व्यवहार बिनबोभाट, उत्साहाने सुरू असतात. बाहेर आकाश भरून येते. पावसाच्या आगमनाचा गारवा जाणवतो. वारा मातीचा वास घेऊन येतो. आणि पोळ्या बडवीत असलेला स्वयंपाकी एखाद दुसरे गाणे गुणगुणायला लागतो.

हे असेच काहीसे आणि ती मुलगी अशी समोरच्या बाकावर बसायची आणि आम्ही किती तरी दूर मागच्या बाकावर. मध्ये किती तरी पाठमोऱ्या आकृती. उंच, निंच, कुणाच्या डोक्यावर केस आहेत, कुणाच्या नाहीत. कुणाच्या डोक्याला टोपी आहे, कुणाच्या कानात पेन्सिल आहे. कुणी मानेवरची मुंगी झटकतो आहे. कुणी जमीन ओरबाडल्यासारखे डोके खाजवतो आहे. इकडे प्राध्यापकांचे व्याख्यान चालू असायचे आणि ती मुलगी एकाग्रतेने ऐकत असल्याचा भास होऊन आपणही स्वस्थपणे व्याख्यान ऐकण्याचा प्रयत्न करायचा.

एक सबंध वर्ष उलटून गेले. मी आणि तिने कॉलेजमध्ये प्रवेश केला. तेव्हा पावसाच्या चार दोन सरींनी जमीन हिरवी झाली होती. वृक्षांना जीवदान मिळाले होते. बागेतल्या टाक्यात कारंजी थुई थुई उडत होती. काही दिवसांनी असंख्य रंगी-बेरंगी फुले दिसायला लागली. नंतर निरनिराळ्या रंगांची व आकाराची पाखरे अंतराळी मिरवू लागली. त्यानंतर एक दिवस सकाळच्या वाऱ्याने दसऱ्या-दिवाळीची जाणीव दिली, व पुढे वारा अंगावर वाळलेला पालापाचोळा फेकू लागला. पुढे परीक्षा आल्या; संपल्या, तीही पास झाली आणि मी देखील. सबंध वर्षात गाट नाही, भेट नाही. ध्वनी-प्रतिध्वनी काही नाही.

दुसरे वर्ष उजाडले. झाडाच्या बुंध्यागत हिरवळ फुलून आली आणि एक सहाध्यायी प्रसन्न चेहरा घेऊन मजजवळ येऊन बोलला–

"तुला अडचण नसेल तर मी माझ्या एका परिचित व्यक्तीची ओळख करून देतो."

"व्यक्ती तो आहे की ती?"

" ती. चल, भिऊ नकोस. सूचना माझी नाही. तिचीच आहे. "

" अरे पण कारण–प्रयोजन ? "

" काही नाही. सहज. परवा तुझ्या गोष्टीतील एक–दोन घटना मी इंग्रजीत तिला समजावून सांगितल्या व ती म्हणाली की, मला या लेखकाला एकदा पाहायचं आहे. ती तीनदा म्हणाली. चल रे बाबा. नाहीतर मधल्यामधे माझ्यावरच बोल यायचा—"

त्यानंतर उन्हाच्या पिवळ्या पार्श्वभूमीवर नुसती औपचारिक ओळख. साधे शब्द–आभार–आनंद–निरोप.

पण एवढ्या साध्या प्रकारानंतर मला ती दिसायला लागली. साधा एक स्कर्ट, उघड्या निरोगी पोटऱ्या, उंच टाचेचे बूट, विपुल केशभार आणि गोरापान परंतु साधा प्रमाणबद्ध चेहरा. डोळे नेहमी धरणी न्याहाळत असलेले. किंचित वर उचलले तर पापण्या भिजल्यासारख्या भासायच्या. आपल्याकडे पाहिले तर वाटायचे ही आता नक्की बोलेल. चेहऱ्याच्या मार्दवात एक प्रकारचे औदासीन्य–तितिक्षा. एकंदर व्यक्तित्वात संयम. नीटनेटकेपणा. वर्गात यायची ती छातीशी पुस्तके दाबून. पुस्तकांना पांढरी स्वच्छ कव्हरे घातलेली. त्यांवर ठळक पुस्तकाच्या लेखकाचे नाव घातलेले. दोन बोटांत पेन दुमडलेले व कराग्रे पुस्तकांशी किंचित चाळा करीत असलेली. आपण बरे, आपले काम बरे. आजूबाजूला इतके पाणी आहे पण आपल्याला शिंतोडा बाधायचा नाही याची खात्री. आता ही पाने दिसतात, नक्की कमल उमलणारच आहे असा विश्वास. हर्ष नाही; खेद नाही; कमीजास्तीचे हावभाव नाहीत.

इतके सगळे वर्णन हे कदाचित माझ्या मनाचे असेल. कारण माझ्या गोष्टीतील एखाद दुसरी घटना माझी ओळख करून घेण्याइकी तिला जर आवडली असली तर काही भाव, जिज्ञासा, आपुलकी डोळ्यांत तरंगली तर असती. उलगडा होईना. आणि मी त्या टेकडीवरील चाफ्याच्या झाडाकडे पाहत जिथला तिथेच. येईल कधी वेळ आणि जाता येईल त्या झाडाकडे.

दुसऱ्या वर्षाचा जुलैचा महिना गेला. त्यानंतर हेमंताची ओळख झाली. पण ती बोलली नाही. शरदही येऊन गेला, पण तिने ओळख दिली नाही. आणि शिशिर आपल्या येण्याची वर्दी देण्याची लक्षणे दिसू लागली.

डिसेंबरची एक पहाट. खूप थंडी. हीव धरवेना–म्हणून एका सदऱ्यानिशी सायकल बाहेर काढली आणि उजाडेपर्यंत मोकळ्या शांत रस्त्यांनी फिरून आलो. घरी जाण्याचे कारण नव्हते. कॉलेजच्या फाटकात शिरलो. अजून मुलांची येण्याची वेळ व्हायचीच होती. बागेतल्या हौदावर टेकून अंगातील उबेने खुश होऊन शीळ घालीत होतो, तेव्हा राजहंसाच्या पंखासारखे पांढरे शुभ्र कपडे दिसायला लागले. आणि

चार दोन मिनिटांत तीही त्या हौदाजवळ आली. दोन वर्षांनंतर पुनः तेच निर्मळ स्मित. डोळ्यांच्या पापण्या वर उचललेल्या आणि न बोलताही पुष्कळसे मनातले समजावता येईल असा विश्वास ओसंडत असलेला.

" आज खूप थंडी आहे, नाही ? वारा कसा झोंबतोय ! "

" असं ! मला मुळींच भासत नाही. कारण मी आताच चार-सहा मैलांची रपेट मारून आलो आहे सायकलवर. माझ्या अंगात चांगलीच ऊब आहे —"

" खोटं ! "

" छे ! अगदी खरं ! "

तिने सहज माझा हात हाती घेतला. आणि किंचित दाबला.

" खरंच, ऊब आहे. "

" आहे ना ? मी तर म्हणालोच होतो ! "

" पण खूप गारठा आहे असे म्हण ना ! "

" का ? "

" म्हणजे आपण आज तासाला चाट मारू. आज अगदी शिकावंसं वाटत नाही. माझ्याबरोबर चलतोस ? "

" कुठे ? "

" कुठेही -! "

" म्हणजे ? "

" असं काय बोलतोस ? चल ना ! मी माझ्या घरीच नेते तुला. "

" खरं ? "

" हो, अगदी खरं ! "

ती मला घरी घेऊन गेली. मागे माझ्या मनात आले होते तसा अनुभव मला आला. तिला किंवा मला बोलायला काहीच सुचेना. मनात पुष्कळ येऊन गेले. प्रोफेसरांबद्दल, पुस्तकांबद्दल, परीक्षेबद्दल, हवामानाबद्दल, महागाई, देशाची परिस्थिती, सायकलचे ऐन वेळी पंक्चर होणे, घाईत चपलेचा पट्टा तुटणे, समारंभात कपड्यावर आइस्क्रीम सांडणे. हे सगळे तसे पाहिले तर बोलण्याचेच विषय होते. पण मन म्हणाले, इथे नको. आता नको. हिच्याजवळ नको. मग दुसऱ्याही गोष्टी बोलता येतील. त्या दिवशी पहाटे हाती येतील इतक्या जवळ वाटणाऱ्या टपोर फुटलेल्या चांदण्या, तेलंखेडीच्या बागेतील. पुष्पगंधांचा आल्हाद, तलावात शांतपणे पोहत असलेल्या पाणकोंबड्या, टिटवीचा आवाज, कीट्स, बायरनची कविता. आंद्रे मर्वा, झोला, टागोर, शरद् यांच्या अमरकृती-पण मन म्हणाले आता नको, इथे नको. हिच्याजवळ नको. त्यामुळे अगदी जवळ एका कोचावर बसूनही दोघांना काहीच बोलता येईना. तिने आपल्या टेबलाच्या खणातून ब्रँडीची बाटली काढली. एकेक औंसाने दोन पेले भरले आणि —

"बरं वाटेल जरा. खूप थंडी आहे रे! आणि मग आपण ऊन ऊन चहा घेऊ, पण तू बोल्त का नाहीस?"

"तू तरी कुठे बोलतेस?"

"तू मुलींना लाजतोस वाटतं?

"तू मुलांना लाजतेस की काय?"

"तसं नाही रे!"

"मी लाजत नाही, पण तुझ्याजवळ बोलायलाच काही सापडत नाही."

"असं ना? म्हणूनच आपण खूप बोलणार आहोत. शब्द कशाला वापरायचे? चलायचं आता कॉलेजात?"

"जाऊ या. पण तुला शिकायचा कंटाळा आला ना आज?"

"पण तिथवर तुझ्याबरोबर येते. आपण दोघे मिळून जाऊ. मग हवी तरी मी घरी येईन."

"तू रागावू नकोस. मी खरंच तुझ्याशी खूप बोलायचे ठरवितो. पण बोलताच येत नाही."

"माझंच वाक्य तू म्हणालास! तसं काही नाही रे! चल ऊठ. तू बरोबर पुस्तक-बिस्तक आणलं होतंस का?"

"छे!"

"मग मीही घेत नाही पुस्तक. चला—"

रस्त्यात माणसांची वर्दळ नव्हती. आणि वेगात असलेल्या दोघांच्या सायकली अगदी एका तालाने सरसर करीत जात होत्या.

"तू माझ्या पुढे जाऊ नकोस. अगदी माझ्या बरोबरीने चल."

"आणि तू माझ्या मागे राहू नकोस. अगदी माझ्या जवळून चल.—"

"कसा बोल्तोस रे!"

"का?"

"नाही उगीच. मला फार बरं वाटतं."

"पण हे माझंच वाक्य तू बोल्लीस."

"तुझं नाव काय?"

"आणि तुझं?"

कॉलेजच्या आवाराचे फाटक आले. तिने मला तिथवर पोचवून सायकल वळविली. आणि अशा विलक्षण रीतीने पाहून माझा निरोप घेतला की माझ्या सभोवतालीचे जग वितळून तास न् तास तिच्याशीच बोलत असल्याचा मला भास होत राहिला.

दुसऱ्या दिवशी नित्य कार्यक्रम सुरू झाले. ती पुस्तके घेऊन वर्गात यायला लागली आणि मी मागच्या बेंचावर बसून प्राध्यापकांचे व्याख्यान ऐकायला लागलो.

मधे येणारी तीच डोकी. त्याच टोप्या. त्याच पाठमोऱ्या आकृती. नेहमीसारखी सायकल कॉलेजातून घरी आणि घरून कॉलेजात मला पोचवीत असे. हसणे. खेळणे. बागेतले टाके कारंजाच्या फवाऱ्याने मोती माणके उधळीत असलेले. गवतावर लाल निळी फुले फुललेली.

पुनः एकदा झाडांची पालवी गळायला लागली. परीक्षा आल्या. संपल्या. रिझल्ट लागला. पास झालो. तीही पास झाल्याचे माझ्या मित्राने सांगितले. अगदी साधा " वा छान ! " एवढाच उद्गार माझ्या मुखातून बाहेर पडला.

चवथे वर्ष कोरे करकरीत गेले. नाही म्हणावयास टिळक जयंती आली. पुढे श्रावणी सोमवाराच्या नियमित सुट्ट्या मिळाल्या. दिवाळीच्या लांब सुट्टीत मुंबईला जाऊन आलो. तिथून एक सुंदर होल्डॉल विकत आणला. एक नवे पेन घेतले. पहिल्या पुस्तकाची प्रुफे त्यानेच तपासली. मार्चमधे परीक्षा सुरू झाल्या. भगतसिंगाला फाशी दिले गेले. दोन दिवस खाणे–पिणे सुचणार नाही इतके रागद्वेष मनात उचंबळून आले. त्यानंतर शेवटचे वर्ष म्हणून सर्वांचा निरोप घेतला. प्राध्यापक, आचार्य अगदी चपराशापासून सगळ्यांना हसत खिदळत भेटून आलो. तिची भेट झाली नाही आणि द्यावयाचेही सुचले नाही. माझा मित्र मधूनमधून तिच्याबद्दल बोलत असे. खुशालीचा समाचार कळत असे.

पुढची दोन वर्षे अशीच गेली. पोटापाण्याचे उद्योग मागे लागले. नोकरी लागल्यानंतर थोडेसे प्रेम करून लग्न उरकले. आणि वरण, भात, भाजी, पोळीचा संसार सुरू झाला. अशाच कुठल्याशा सुट्टीत मुंबईला फेरी मारण्याचे काम काढले. पत्नी म्हणाली, माझ्यासाठी जाळीच्या पाटल्या आणा. मैत्रिणींपैकी कुणी फ्लॉवरपॉट, कुणी नव्या तऱ्हेच्या बांगड्या, कुणी हातमागाचे वेडकव्हर्स अशा वस्तू सांगितल्या. आणि एखाद्या मोठ्या माणसाला निरोप दिल्यासारखे मित्र-मैत्रिणी मेलच्या वेळी स्टेशनवर आल्या. पत्नी गाडी सुटल्यानंतरही दारात उभा असलेल्या माझ्याकडे कितीतरी वेळ पाहत होती. पुढे नागपूर जंक्शनच्या पाटीआड ती दिसेनाशी झाली. गाडीने वेग धरला. आणि माझे मन आगगाडीच्या अगोदरच मुंबईला पोचले.

पहिल्याच स्टॉपेजला दिवसा पाच वाजता गाडी एका स्टेशनात घुसली. कपभर चहा घेऊन पुनः डब्यात येऊन बसण्यासाठी खाली उतरलो. आणि नवल असे की ती मुलगी तीन वर्षांच्या दीर्घ कालानंतर त्या स्टेशनवर मला दिसली अगदी माझ्याच डब्याकडे झपाझप पावले उचलत ती येत होती. तेच साधे कपडे, त्याच निरोगी पोटऱ्या, प्रमाणबद्ध, साधा, निर्मळ चेहरा. किंचित उचललेल्या पापण्या आणि चेहऱ्यावर खेळणारे मंद मंद स्मित.

" इथे कुठे ? "

" इथे माझे नातेवाईक राहतात त्यांच्याकडे आले. तू कुठे निघालास ? "

" मुंबईला ! "
" तू आज जाऊ नकोस ! "
" ते कसं शक्य आहे ? मी थेट तिकिट काढलंय. "
" असू दे. जाऊ दे तिकिट. "
" अग पण माझी सुट्टीही मोजकीच आहे. "
" तरी तू जाऊ नकोस. हवा तर रात्रीच्या गाडीने जा. "
" का पण ? "
" मला खूप बोलायचंय तुझ्याशी. खरंच खूप बोलायचंय ! "
" त्या डिसेंबरच्या सकाळसारखं ? "
" तू खाली उतर म्हणजे सांगते. खरेच जाऊ नकोस. काढ तुझे सामान. "
मेल बिचारी निघून गेली.
" कुठे जायचंय ? तुझ्या नातेवाइकांकडे ? "
" अं हं ! "
" मग कुठे ? माझी इथे कुठे ओळख नाही. "
" तुझे सामान क्लोकरूममध्ये टाकून दे आणि चल माझ्याबरोबर. "
" पण कुठे ते तर सांगशील ! "
" सांगते. स्टेशनच्या बाहेर पड. "

तोवर सायंकाळ झाली. दूरच्या वस्तू अंधुक दिसू लागल्या. रस्त्याने शहर सोडले. आजूबाजूची शेते मोकळी सपाट दिसू लागली. मळ्यातून वलिताचा गारवा जाणवू लागला. माणसांची चाहूल बंद पडली. तुरळक एखाद दुसरी बैलगाडी, एखाद दुसरी मोळीवाली, बस एवढाच संपर्क.

तिने अगदी सहज माझा हात आपल्या हातात घेतला.

" आपण या पुलावर बसू या ! "
" पण तुला बोलायचंय काय माझ्याशी ? "
" काही नाही रे ! काय बोलतात अशी माणसं ? "
" आता मात्र शर्थ झाली तुझी ! "
" बरं बोलते. रागावू नकोस. इतका बोलायला उतावीळ झाला आहेस ? "
" तसं नव्हे ग ! पण मुद्दाम उतरवून घेतलंस —"
" मग त्यात काय झालं मोठंसं ? तू उतरशील अशी माझी खात्री होती आणि उतरलास ना ? झालं तर. बरं पण मला सांग तू कधी प्रेम केलंस का रे ? "
" हो. "
" कुणावर ? "
" माझ्या सध्याच्या पत्नीवर. "
" म्हणजे ? तुझं लग्न झालंय ? "

" हो. "

" कधी ? "

" दोन वर्षांपूर्वी ! "

" म्हणजे तू पुढे गेलास माझ्या. मी तुला सांगितलं होतं ना पुढे जाऊ नकोस म्हणून ! "

" आणि मीही तुला सांगितलं होतं ना तू मागे राहू नकोस म्हणून ! "

" म्हणजे आपल्याला बरोबर जाता आलं नाही. "

आणि ती अशी छान, निर्मळ, स्वच्छ हसली व माझा तिच्या हाती असलेला हात तिने एकदा दाबून अगदी हळुवारपणे कुरवाळला.

" बरं पण तुझं कसं काय ! "

" मी नाही सांगत जा ! "

" का ? "

" तू हसशील म्हणून ! "

" नाही हसायचा. सांगशील तर. "

" नाही, कारण तू प्रेम केलंस आणि तुला लग्न करता आलं. मी प्रेम केलं, पण मला अजूनही लग्न करता आलं नाही. "

" कुणाशी ? "

" आहे एक मुलगा. तो इतका छान आहे रे ! मला तो खूप आवडतो. तुलाही तो आवडेल. त्याला मी पण आवडते. त्यांनी मला वचन दिलं की तो अगदी माझ्या मनासारखा वागेल म्हणून. आणि मी पण त्याला कबूल केलं. तो खूप छान आहे रे ! "

" मग लग्न का करीत नाही त्याच्याशी ? "

" पण कसं करणार ? कारण मी श्रीमंत आहे. माझे सगळे नातेवाईक मोठमोठ्या हुद्द्यांवर आहेत. माझे आईवडील म्हणतात, की आपल्या तोलाचा माणूस हवा. तो गरीब आहे; आणि माझ्या जातीचा पण नाही. सगळीजणं खूप हट्टाला पेटली आहेत. म्हणतात आमची प्रतिष्ठा जाईल. आणि ती जाण्याच्या अगोदर काय वाटेल ते करायला आम्ही कचरणार नाही. "

" तो मुलगा काय म्हणतो ?

" तो काहीच म्हणत नाही. त्याचे आईवडील म्हणतात की त्याला माझ्यापासून सुख लाभायचं नाही. आणि हे प्रेम नुसतं चार दिवसांचं, श्रावणाच्या सरीसारखं असतं. आम्ही तुला त्याच्याशी लग्न करू देणार नाही. "

" पण तुम्हा दोघांनाही इतरांची पर्वा करण्याचे काय कारण ? "

" कसा बोलतोस रे तू ! तो मुलगा मोठा शांत आणि समंजस आहे. उतावळा नाही. आणि मी इतकी शिकले त्याचा काही उपयोग तर केला पाहिजे ना ? माझ्या एकटीच्या सुखासाठी सगळ्यांना दुखवलं तर कदाचित या सुखापेक्षा ते दुःखच बोकांडी बसेल माझ्या. आणखी तो काय म्हणतो सांगू ? "

" सांग ना. "

" तो म्हणतो की आपण असंच प्रेम करीत राहू आणि सगळ्यांना हवेहवेसे वागू. आपल्या नातेवाईकांचे जर आपल्यावर प्रेम आहे तर ते ओळखतील. थोडं थांबायला काय हरकत आहे ? हे सगळं मलाही कळतं. मी अतिशय संयमानं आणि चांगुलपणानं वागते आहे. पण—"

" पण काय ? "

" पण मनावर पुष्कळ ताण पडतो रे ! किती थांबायचं ? मी त्याच्या मागे राह्यची नाही, पण आम्ही दोघंही जगाच्या मागेच राहू की काय असं वाटतं. उगीच भीती वाटते. मन गुदमरून जातं. मी थांबायला तयार आहे रे ! पण किती थांबायचं ? माझं चुकतं का रे ? पण मी काय करू ? माझी आणि त्याची सगळी माणसं फार चांगली आहेत. तू त्यांच्याशी ओळख करून घे ना ! "

" आणखी काय करू मी ? "

" आणखी तुला काय करायचंय यात ? मी तुला कधीतरी त्रास दिलाय ? असं काय बोलतोस ? तू फक्त एकच करायचंस. असाच कधी भेटलास आणि मी तुला उतरायला सांगितलं की उतरायचं आणि असंच मी सांगेन ते ऐकून घ्यायचं. व मी जर मागे राहिले तर हसायचं नाही बरं ! नाही ना हसणार ? "

तिच्या पापण्या ओल्या झाल्या होत्या. संयमाला धर्म मानणाऱ्या माझ्या त्या निर्मळ मैत्रिणीने अगदी न कळत त्या क्षणी आपले मनाच्या भराने सुन्न झालेले डोके माझ्या खांद्यावर टेकले आणि माझा हात आपल्या कढत मस्तकावर फिरवला. अगदी चार-दोन क्षण व त्यानंतर—

" चल, तुझी गाडीची वेळ झाली. तुला जायला हवं, खूप बोलले आज मी तुझ्याशी. आजवर मी इतकं कुणाकुणाजवळ बोलले नाही. तू मला शहरापर्यंत पोचती करून दे आणि स्टेशनवर जा. उतरशील ना असाच मी म्हणेन तेव्हा ? "

मी 'हो' म्हटले आणि अगदी आवेगाने तिचा नाजूक मांसल हात हातात घेऊन कुरवाळला.

खरोखरच गाडीची वेळ झाली होती.

२०।३।५४

हरीख

"तुझं नाव काय रे?"

"माहा नाव इसऱ्या."

"अरे विश्राम म्हणत जा."

हे वाक्य इसऱ्याने आपल्याशीच दोन-तीनदा उच्चारले. तो आवाज, तो कोमलपणा नीटसा न वठविता आल्यामुळे तो आपल्याशीच हसला. आपल्या खटाऱ्याला जुंपलेल्या बैलांच्या शेपट्या त्याने पिरगळल्या. त्यांची लांब, उभट शिंगे त्याच्या अठरा वर्षांच्या तरुण मनाला आज फार सुंदर दिसली. खटाऱ्याची खडखडही कंटाळवाणी वाटली नाही. कच्च्या वाटेवरची धुळीने भरलेली ती झाडे, टाकळीची ती पांढरी फुले, चंद्रज्योतींची पिवळ्या पिवळ्या फळांनी लदबदलेली झाडे, सर्व जणू पहिला शिरवा प्याल्यासारखी टवटवीत दिसू लागली. टाकळीच्या फुलांचा सुगंध त्याने मनमुराद छाती भरून जाईपर्यंत आत घेतला आणि आपली गाडी नदीच्या रस्त्याने वळविली.

कासरे धरून करकचलेल्या हाताकडे त्याचे लक्ष गेले. मुंडाश्यात बांधलेल्या भाकरीने तो पिवळा झाल्याचेही त्याला जाणवले. त्याचे बाजारू अंगडे मळाने चिकट झाल्याचे त्याला कधी वाटले नाही ते वाटले व म्हणूनच त्याने आपला खटारा बाजार रस्त्याने वळविला. दसरू वाण्याच्या दुकानात शिरल्याबरोबर तेथील उदबत्त्यांचे रंगीबेरंगी पुडे, लाल गंधाच्या वाटल्या आज त्याला घ्याव्याशा वाटल्या. दोन पैशांचा गूळ विकत घेऊन त्याने तिथल्या तिथे खाऊन टाकला. साबणाची पाच पैशांची वडी त्याने विकत घेतली. दसरू वाणी "आ" वासून त्याच्याकडे पाहत असताना "भाईच-लग्नचे कपडे खकान्यानं गादले गा" असे म्हणून म्हातारीला काही न सांगण्यासाठी त्याने दशरथ वाण्याची काकुळूत केली. रस्त्यावरची एक नरोटी आपल्या मुंडाश्याने पुसून त्यात त्याने दोन पैशांचे गोडे तेल घेतले व तो नदीवर येऊन पोचला. येता येता बैलांच्या शेपट्या पिरगाळीत, त्यांच्या पाठीवर थापा मारीत तो आपल्याशीच हरखून पुटपुटला होता-"नीट उभा राहा. बैलाच्या पाठीवर एक हात ठेव. हालू नकोस. तुझा छान फोटो निघेल" पुनः त्याला जाणीव होई, की आपला आवाज भसाडा आणि कर्कश आहे. भाषाही अशुद्ध आहे. आपल्याशीच मोठ्याने हसून तो रस्त्याच्या झाडाकडे पाहत राही.

नदीवर पोचल्याबरोबर तेलाची नरोटी दगडाच्या आसऱ्याने त्याने सरळ ठेवली. बैलाचे कासरे सोडले. डोक्याचे मुंडासे कंबरेला गुंडाळून अंगातील सर्व

कपडे त्याने भिजविले. एक चिंधी तेलात बुडवून खटाऱ्याला वंगण दिले. कपड्यांना साबूची सबंध वडी घासून खलास केली. एक एक कपडा आपटताना दगडाच्या खाली पिळलेली घाण नदीच्या पाण्यात पांढुरकी होऊन वाहायला लागली व त्यामुळे त्याला आणखीच अवसान येऊन तो आपले कपडे जोरजोराने आपटू लागला. शेवटी कपड्यांतून मळ निघेनासा झाला व त्याने ते पिळून वाळवंटात सुकत घातले.

त्यानंतर नरोटीतील तेलाने आपल्या अंगाला चांगली मालिश केली. नाकातोंडात, नखाकानांत तेलाचे थेंब सोडले व उरलेले तेल डोक्याला माखून टाकले. कपडे सुकून होइतोवर त्याने आपला खटारा नदीत नेऊन धुतला.

बैलांचा पेंढीभर कडबा खाऊन झाला नाही तोच त्याचे कपडे वाळले. मग त्याने मनसोक्त अंघोळ केली आणि व्यवस्थित रीतीने धोतर, सदरा, मुंडासे अंगावर घातले. त्याचे त्यालाच स्वच्छ, शुद्ध वाटू लागले. तशा अवस्थेतच तो काही काळ बसून राहिला. चिकण्या सुपारीची लावणी त्याच्या ओठांवर तरळत होती. वाळवंटातील चापट गोटे घेऊन त्याने वाहत्या नदीत तिरपे फेकले व एक, दोन, तीन, चार अशा त्या गोट्यांनी छलांगी मारताच तो मोठ्याने हसला. मग त्याने बैलांच्या मानेवर आपला हात रगडला आणि अगदी त्यांच्या गालाशी गाल घासला. नदीवर दांडखडे आपटावयास आलेल्या चार दोन म्हाताऱ्या व पोरसवदा मुलींकडे त्याने बराच वेळ पाहून घेतले व मग त्याला स्वतःलाच आरशात पाहण्याची इच्छा झाली. त्याने आपला खटारा जुंपला व बाजारवाट धरली. दसरू वाण्याच्या दुकानात मळका मोठा आरसा होता तेथे जाऊन आरशासमोर उभे राहत त्याने एक पैशाच्या बिड्या मागितल्या. दसरू वाणी आज त्याच्या थाटाकडे पाहतच राहिला.

"कुठं पाहुणपणा चालला कागा ?"

"नाही बा !"

"मग खुशीत आहेसा ? अन् बैल बदलले का रे ?"

"नाही त ! भल्ले गादले होते. नेऊन डुबकलं लमच्याइले नदीत. दसरूमामा, जरा डब्बी त दे."

त्याने विडी पेटवली आणि सवय नसताही लागोपाठ चार-पाच झुरके घेऊन धूर पिऊन टाकला. जवळच बायजा बुढी पानाची पाटी घेऊन बसली होती. तिच्याजवळ जाऊन—

"काकी, आज त पान वरच्या खुडनीचे दिसतेत व ?"

"काहुन पन ! ही लाडीगोडी काहुन गा ?"

"काकी, जरा चंची दे ना !"

त्याने एक चांगली पट्टी तोंडात चढवली. बिडीतलाच तंबाखू काढून बार भरला व चव्हाट्याच्या चबुतऱ्यावर उगीच बसून पुनः एक विडी पेटवली. भाजी घेऊन आलेल्या

माळणी, मोळ्या घेऊन आलेल्या गोंडणी, मडकी घेऊन आलेल्या कुंभारणी या सगळ्या त्याला नव्यानवतीच्या वाटू लागल्या. उगीच एका लठ्ठशा गोंडिणीला त्याने मोळीचा भाव विचारून छेडले आणि तिनेही त्याच्या पोरसवदा छेडछाडीला आपले दाच्छना लावलेले दात काढून हसून प्रत्युत्तर दिले. पुनः त्याने एक बिडी पेटविली आणि बोलता बोलता त्याला जोराचा ठसका लागला. त्याबरोबर तो शुद्धीवर आला. ऊन पिकायला आल्याची त्याला जाणीव झाली व कदाचित म्हातारा आपल्याला उशीर झाला म्हणून रागावेल या आशंकेने त्याने खटाऱ्याच्या धुऱ्यांवर बसून बैलांच्या शेपट्या पिरगाळल्या; त्यांनी वेग धरावा म्हणून चार-दोन शिव्या द्याव्या म्हणून तोंड उघडले. बैलांची आई-बहीण त्याच्या तोंडावाटे बाहेर पडतच होती तोच त्याला काय वाटले कुणास ठाऊक, त्याने आवरते घेतले. आपण रोज विनाकारण बैलांना अचकट विचकट शिव्या देतो याबद्दल त्याला स्वतःचा राग आला आणि त्या रागातच त्याने जवळ उरलेली एक बिडी मोडून फेकून दिली.

त्याचा खटारा त्याच्या वडिलोपार्जित खोपटाजवळ जाऊन उभा राहिला. खोपटाचं झडप बाहेरून बंद होतं. म्हणजे त्याचा बुढा, बुढी व मागच्या वर्षी पन्नास रुपये देऊन करून आणलेली त्याची बायको सुभी अजून शिवारातून परत आली नव्हती. त्याने सरळ खटारा वावराकडे हाकलला. शेताच्या पांधणीतून आंब्याच्या सावल्या थंडगार पसरल्या होत्या. त्याने उगीचच शीळ घातली. कुठलेसे दंडारीतले एक गाणे एका ललकारीने म्हणून टाकले. दुसऱ्या पांधणीच्या पलीकडे त्यांच्या शेताची तीन एकरांची पट्टी होती. अवंदाच्या वर्षी शेताची डाव बुजवून कासकुंदा काढायचे त्याच्या म्हाताऱ्याने ठरविले होते व म्हणून महाजनाकडून मागल्याच आठवड्यात एक टिकास उसनी आणली होती. त्यामुळे त्याची म्हातारी व सुभी स्वतःच्याच शेतात काम करीत होत्या.

इसऱ्या शेतावर पोचला तेव्हा म्हातारा घामाने डबडबून जमिनीस टिकास खुपशीतच होता. म्हातारी आणि सुभी उपसलेल्या ढेकळातून कास वेचून काढीत होत्या. इसऱ्याला पाहताच म्हातारा म्हणाला:—

"काय करत होता गा शहरामधी ? गावाचा सौदा का ?"

"नाही गा, कंटोलवाल्यानं देर लावली."

"बैल नदीवर नेले होते का ?"

"हं !"

"अन् कपडे ?"

तेवढ्यात सुभीचे त्याच्याकडे लक्ष गेले. ती त्याच्याकडे डोळे फाडून पाहू लागली. कपाळावरचा घाम तिने हाताच्या कोपराने निपटला व उगीचच इसऱ्याकडे पाहून एक मुरका मारल्यामुळे तिच्या नाकातील मोठ्ठी पितळी गाठल्याची नथ हालत

राहिली. इसऱ्याने सुभीकडे पाहून तिला आपल्याजवळ येण्याची खूण केली. सुभीने सासू-सासऱ्याचे लक्ष नाही असे हेरत त्याला " नाही " म्हणून इशारा केला. इसऱ्याने रागाने गाल फुगवून तिच्याकडे पाहिले व हात उगारण्याची बतावणी केली. सुभी खुशीत आली आणि तिने सासूच्या बाजूला पडलेला टिनाचा पोहरा उचलून पाणी पिण्याच्या मिषाने ती शेजारच्या खारीतील विहिरीकडे निघाली. तिच्या मागोमाग इसऱ्याही गेला.

" हं, काय म्हननं आहे ? आज त नजर नाही ठैरत."

" चूप राहय्."

" माय, मघापासूनचं हे दाबनचं दाबनं कायचं व्हय की ? "

" सुभे ! "

" काय ? "

" ए सुभे ! "

" त, आता बोलसीन् का नुसता हाकाराच देसीन् ! "

" सुभे ! "

" आज काय झालं का जानं की."

त्याने जरा पुढे होऊन तिच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवले. तिने ते आजूबाजूला पाहत लटक्या रोषाने झटकून टाकले.

" आज झालं का गा तुले? असा दिवसाढवळ्या कायचा व्हय लाडप्यार ? अन् हे समदे लोक का म्हणतीन् मले ! "

" सुभे, अजपासून मले इसराम म्हणत जा. "

" काहून ? "

" माहा नाव तसंच हाए. इसऱ्या म्हनलं तर याद राख. "

" इसऱ्या ! इसऱ्या ! "

" चूप राह्य पोट्टे ! एका थपडीचा ते जीव नाही अन् रिक्कामी मुजोरी. म्हणते का नाई इसराम ? "

" बरं बाई, इसराम. पन झालं काय ? "

" आव आज गेल्लो नाही का शहरात ? तिथी काय झालं सांग बरं ? "

" काय झालं ? होटलात भजे खाल्ले असतीन् ! "

" हात् पोट्टे ! बोलून बोलून हेच बोलली. आव आज महा फोटू काढला. "

" असं ? कोनं ? "

" चार साहेबा होते. दोन-तीन साहबिनी होत्या. अन् एका साहेबिनीजवळ एक काळा फोटूचा संदुक होता, "

" मायबिन म्हनजे मड्डम का रे ? "

"नाही व. आपल्या सारख्याच बायका होत्या. पर मलमलीचे कपडे नेसल्या होत्या. अन् गोऱ्या गोऱ्या पिकल्या मोहावानी. अन् मारे लाडात येऊन साहेबाईशी मस्करी करत होत्या. मोराच्या पंखावानी लुगडं नेसल्या होत्या."

"पण तुहा फोटो काहून काहाडला ?"

"आवं, मी उभा होतो. आंबराईजवळच्या हीरीजवळ. ते साहेब आले अन त्याहीनं माझ्याकडे पाहून साहेबिनशी गिटपीट यस्पॅस् केल अन् मले एक साहेबिन पुढं होऊन बोलली–"

"कोणाशी ? तुझ्यासीन् ?"

"नाही त, का तुझ्याशी ? आयकत बी नाही लमची ?"

"बरं सांगा गा माझ्या इसराभा."

"त' मग थे साहेबिन म्हनते कशी–ए गाडीवाल्या, तुह नाव काय रे ? म्या सांगलन् इसऱ्या. त' दुसरी म्हणते–अरे इसराम म्हण. त' मंग साहेब म्हनला–इसराम, तुहा अन् तुझ्या बैलाइचा फोटो उताराचा आहे. तू बैलाचे कासरे धरून जुवाड्यावर बस. अन् मंग एक साहेबीन बसली धुऱ्यावर. अन् दोन साहेब बसले खटाऱ्यात. अन एक चाकावर पाय देऊन कलून उभा राहयला. मी आपला बसलो बा चोरावानी. काय लमचे माहे कपडे ! तुही आन बा. मले सरमल्यावानी झालं. अन् माही नजर गडली जिमिनीत. इतक्यात ते दुसरी मोठी साहेबीन माझ्या जवळ आली अन् तिनं आपल्या हाताइनं मले ठीक ठीक बसवलं. असे साजरे हात होते तिचे सुभे, अन् सस्याच्या अंगावानी नरम नरम."

"इसऱ्या, तुले साहेबीननं हात लाऊन बसवलं ?"

"हो !"

"इसऱ्या !"

आणि सुभीने इतक्या लोभाने, इतक्या अनुरागाने, इतक्या आपुलकीने इसऱ्याकडे पाहिले की त्याने खुदकन् हसून तिच्या गालांना हात लावला आणि गळ्याशी खोट्याच गुदगुल्या केल्या.

"इसऱ्या, तू खरंच साजरा आहे रे !"

ती कौतुकाने त्याच्या अगदी जवळ आली.

"अन् आयकशीन् त' जरा. त्या साहेबिननं फोटू उतरला अन् माह्याकडे पाहून हासली. अन् म्हनते कसी-इसराम, तुहा फोटू छान निघल. निघाल्यावर तुला आम्ही पाठवून देऊ डागीतून. साहेबही बोलला. अन् मले म्हने अगल्या सनवारी डाकखान्यातून तू आपलं पत्र घेऊन जा, त्यात राहील फोटू. अन् दुसऱ्या साहेबानं मले आठ आण्याचे पैसे देल्ले. म्या समद्याइले रामराम केला अन निघाले."

"इसऱ्या, ते आठ आन खर्चू नको."

" आइकशीन् बी ? "

" बरं सांग, सांग. "

" मले मोठी सरम आली. म्या दसरू वान्याकडं पैसे मोजून साबन घेतला, तेल घेतलं अन् बैलाइले अन् मीनं बी खूप साफ अंग धुतलं. त्या पैशातले दोन आने उरले."

" इसऱ्या, आन ते दोन आने."

इसऱ्याने ते दोन आणे तिच्या हातावर ठेवले. तिने ते उचलून आपल्या पोटच्या बटव्यात टाकले.

" सुभे, सनवार कई येईन व ? "

" पर्वाच्या त्या रोजी ! "

" तवा मी शहरात जाईन. डागवाल्याले दोन आने पैसे दीन अन् माहा फोटोवालं पत्र मागून घेईन."

" इसऱ्या, मले नेशीन का रे ? "

" इं. मोठी शायनीच की नाही ? बुढा बुढी कच्चा खातीन् आपल्या दोघाइले."

" इसऱ्या असं नाही. तू सांग काइवी. लाडाचा त' बोपा हायस् एकला. कस्संही कर अन मले घेऊन जा. तुहा फोटू मी पाहीन अन् मंग आपुन एक आरसा घेऊ अन् त्यात तो फोटो ठेवू. माह्याजवळ भातक्याचे दहा आने पैसे आहेत. "

" बरं पाहीन ! "

त्यांचा ' परवाचा तो रोज, उजाडला. विश्रामने कसली शक्कल लढविली कुणास ठाऊक, पण तो आणि सुभी निघाले शहराकडे जायला. अगदी सकाळी. जणू त्यांना स्टेशनवर गाडी पकडायची होती. कावळ्याच्या अगोदर जणू त्यांना शहर गाठायचे होते. बैलांच्या बरगडीत रट्टे मारूनही जेव्हा ते सुभी इसऱ्याच्या मनोवेगाने धावेनात तेव्हा पुनः एकदा इसऱ्याला शिव्या हासडण्याचा मोह झाला पण तो त्याने आवरला आणि सुभीची नथ किटली म्हणून रागावून घेतले.

शहर आले. सुभीला सर्वच नवलाचे वाटू लागले. इसऱ्याने डाकखान्याकडे खटारा घेतला. समोरच मोठी लाल पेटी खांबाला पक्की केली होती. पोस्टमन खाकी ड्रेसात इकडे तिकडे फिरत होता. पोस्टमास्तर नाकावर चष्मा ओढून, नसाची चिमूट कोंबीत लिहीत होते. चार-दोन माणसे खिडकीशी उभी राहून कायसेसे बोलत होती.

इसऱ्या त्या खिडकीजवळ गेला. त्याने दोन आणे हाती घेऊन खिडकीमध्ये हात सरकविला. मास्तरांनी वर पाहिले.

" काय पाहिजे ? "

" माहा पत्र ! "

पोस्टमास्तरने दोन आण्यांचा एक कोरा लिफाफा त्याच्या हातावर ठेवला.

" अजी हा नही जी. माहा पत्र, फोटूवालं, साहेबिननं पाठवलेलं—"

पोस्टमास्तर त्याचेकडे चष्म्यावरून पाहतच राहिले.

" कसलं पत्र ? "

" अजी त्या साहेबाइचं. त्याहीनं सांगलन् होतं की सनवारी 'तुहं पत्र डाकखान्यात येईल. "

" नाव काय तुझं ? "

" इसऱ्या. "

" बापाचे नाव ! "

" दमड्र ! "

" तुझं पत्र नाही. फोटो कशाचा रे ? "

" अजी त्या साहेबानं माहा अन् माझ्या खटाऱ्याचा फोटू काहाडला. म्हने आम्ही छापेवाले आहोत अन् छाप्यात तुहा फोटू द्यावाचा आहे. अन् मले सनवारी डाकखान्यांत त्याहीनं येवाले सांगलन्. "

पोस्टमास्तरांनी काहीशा करमणुकीच्या पण बऱ्याचशा कीव भरल्या नजरेने त्याच्याकडे पाहिले.—

" नाही रे बाबा. तुझं पत्र नाही. अन् इसऱ्या तू गधा आहेस झालं, अरे ते साहेब लोक गेले आपलं काम करून. असे पुष्कळ साहेब इथे येतात गांधीबाबामुळे आणि फोटो काढून आपली खुशी करून घेतात. जा, उगीच बैलांना थकवलंस तू. "

इसऱ्या चिमणीएवढे तोंड करून परतला. सुभीने त्याच्याकडे पाहताच विचारले :—

" नाही आला फोटू ? "

" नाही. पन आज त, सनवारच आहे ना व सुभे ? "

" इसऱ्या, आपन जरा अगुदर आलो. बसू आपन सांजच्या पहारेवरी. येईन, साहेबिननं म्हनलं. ते शिकलेसवरलेले गिटपिटवाले लोक, ते आपल्यासारखे अनाडी नाहीत. तू पाहून घे. सांजच्या पहारी येईन फोटू. चाल त्या हीरीवर भाकर खाऊ आपुन्. "

सुभीच्या या सोबतीच्या बोलण्याने इसऱ्याचा चेहरा थोडासा धीरावला. त्याने खटारा आमराईच्या विहिरीकडे वळविला.

त्यानंतर संध्याकाळी त्याचा कागद आला की नाही, ते परतले की नाहीत, की पुढच्या शनिवारी आले, की त्यानंतर येतच राहिले, आणि शेवटी विश्रामला सबंध साबणाची वडी खलास होईपर्यंत कपडे धुवायला लावणाऱ्या, त्याच्या तोंडच्या शिव्या आवरायला लावणाऱ्या साहेब-साहेबिणींनी काढलेला फोटो सुभीला पाहायला मिळाला की नाही, कुणास ठाऊक !

३०।३।५०

सती

त्याच्या जीवनातील तो युध्दाचा प्रसंग होता की प्रेमाचा याचा निर्णय त्यालाच घेता आला नाही—तेव्हा मलाही तो शोधलाच पाहिजे असे नाही. किंबहुना त्याच्या दैनंदिन आयुष्यक्रमात एवढ्या कठीण प्रश्नाचे उत्तर देण्याचे कधी प्रयोजनच उत्पन्न झाले नाही. एखादा अंगावर वेतलेला, अद्‌भुत, रोमांचकारी प्रसंग सांग म्हणून त्याला कुणी विचारिले असते, तर नुसती आठवण करण्यापलीकडे त्याचेकडून काहीच घडले नसते. तसे पाहिले तर प्रत्येकाजवळ काही ना काही चार मंडळीत सांगण्याजोगे असतेच! कुणाच्या पायावरून साप जातो, कुणाच्या उशीखाली विंचू निघतो, कुणाला भर दुपारी जुनाट भयाण वाड्यात नूपुरध्वनी ऐकू येतात. कुणाच्या प्रत्ययाला घराचे स्मशान झालेले येते – तर कुणाला तिथे भुते नाचलेली दिसून येतात. आणि हे सगळे प्रसंग आजूबाजूच्या अनुभवाचे तिखटमीठ लावून चार मंडळींजवळ सांगण्याचे सुख कधी ना कधी प्रत्येकाने अनुभवले असते. पण ज्याचा उल्लेख मी वर केला आहे त्या माझ्या मित्राच्या आयुष्यात असले कधीही काहीही घडले नव्हते; व हे कबूल करताना त्याला नेहमीच मोठा संकोच वाटत आला होता. तलम रेशमाचे वस्त्र चोळामोळा झाले तरी त्यावर सुरकुती उमटत नाही. आणि सडकेवरचे खड्डे गिट्टी डांबराने बुजविले तरी ठिगळासारखे ते नेहमीच उठून दिसतात. काहींच्या हातावर देवीची लस टोचूनही खुणा उमटत नाहीत! यांत अभागी कोण? व सुदैव कुणाचे? कुणास ठाऊक!

तसा त्याचा जीवनक्रम कुणीही त्याच्यावर गोष्ट लिहावी इतका क्षुद्र दयनीय असा होता. दोन अडीच रुपये रोजाची मजुरी मिळवून देणारी बँकेतील कारकुनाची नोकरी; एक हजाराचा उतरविलेला विमा, तेवढ्या पैशात मिळू शकणारे जाडे धोतर, पट्टा तुटलेल्या कोकणी चपला, ठिकठिकाणी रंग उडून गेलेला कोट आणि अशा नोकरीत मिळू शकत असलेली सामान्य बायको—जी लग्नापूर्वी इंग्रजी तिसरीत शिकत होती आणि लग्नानंतर दोन-तीन वर्षांत जिला दोन मुले झाली होती. आपटायला फारशी भांडी नाहीत; फेकायला फारसे कपडे नाहीत. सुरैय्या, निगार, गीताबाली यांची कामे पाहायला पैशाची अनुकूलता नाही. रविवारी सुट्टी म्हणून कुठे जायचेच झाले तर पायीच जायचे. पायीच परत यायचे! इतके आपण चालू शकलो याबद्दल स्वतःची पाठ स्वतःच थोपटायची! आणि बरोबरची जोडपी मागून पुढून रिक्षातून जाताना दिसली तर त्यांच्याकडे न पाहण्याचा प्रयत्न करायचा!

तुपाचा भाव पाच रुपये शेर झाला तेव्हापासून त्याला पुन्हा म्हणून भाव विचारायचे काम पडले नाही; व त्यामुळे आठ रुपयांवर कडाडलेला भाव ऐकून

त्याला वाईटही वाटले नाही. तिळाचे तेल दोन रुपये शेर झाल्यापासून त्याने जवसाचे तेल खायला सुरवात केली होती; व थोड्या तेलात वासामुळे काम भागते असा अनुभव त्याची बायको इतरांना सांगू लागली होती.

कधी तरी शाळेमध्ये बरोबर शिकलेला त्याचा वर्गबंधू मोठ्या हुद्द्यावर चढून त्याच्याशी दोन शब्द बोलू शकला, तर त्याला फार बरे वाटायचे आणि त्याने सहजही, औपचारिकपणे "ये एखादे दिवशी सवडीने" असे म्हटले तर त्याला तेवढाच अभिमान वाटायचा. हर्षाचा उमाळा नाही—खेदाची वेदना नाही! सकाळी एक कप चहा, दुपारी पिठले-भाताचे जेवण—एखाद दुसरे सुपारीचे खांड. सायंकाळी फिरायला म्हणून बाहेर पडणे आणि सिनेमा थिएटरवरून एखाद-दुसरी चक्कर मारून घरी येऊन झोपणे! एवढ्या गरजा त्याच्या भागल्या की इतर कसलीही कुरकुर त्याच्याकडून कुणी ऐकली नाही. वर्तमानपत्रे मिळाली तर तो वाचायचा! कोरियाचे युद्ध, पॅलेस्टाईनचे राजकारण, काश्मीरचे भिजत घोंगडे त्याला ठाऊक होते. आणि ते सगळे मोठ्या आवेशाने इतरांना समजावून देण्याचा उत्साहही त्याच्यात होता. लंडनच्या टेम्स नदीचे स्वतः जाऊन पाहून आल्यासारखे चित्र तो आपल्या बायकोसमोर उभे करू शकत असे. आणि तीही त्याच्या फाटक्या सदऱ्याला शिवण मारता मारता मध्येच थांबून आपल्याला जणू चार-आठ दिवसांत टेम्सच्या किनाऱ्यावर जायचे आहे अशा आविर्भावाने ऐकत असे! अशी ती खुश झाली की तो तिला सांगत असे,—"पाहा, आपण कसे सुखी आहोत; आपल्याला पैसे कमी मिळतात. हे चंद्रमौळी झोपडे असले म्हणून काय झाले? पण माझ्या मित्रांपैकी कित्येक मोठ्या हुद्द्यावर असलेले लोक मला बोलावतात, अरे तुरे म्हणू देतात—मला आपली पुस्तके सप्रेम भेट देतात—तो कवी तर मला आपल्या कविता वाचून दाखवितो, माझे मत विचारतो, आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी मला तासन् तास सांगतो. परवा त्याने चंद्रमुखी शब्दाबद्दल कोणता शब्द घालायचा म्हणून मला विचारिले आणि मी सुचविलेला शब्द आपल्या कवितेत घातला....."

त्यानंतर ती अधिकच खुश व्हायची, त्याच्याकडे कणकीने बरबटलेल्या हाताने बघत बसायची व गरम गरम पोळ्या करून वाढायची!

मग पैसे असले, तर दोघं सिनेमाला जात—नसले तर त्याच आनंदाच्या गोष्टी करीत पोरांना पोटाशी घेऊन झोपून जात.

एकदा तो मला म्हणाला—'मी माझ्या बायकोला एक स्नोची बाटली, एक पॉवडरची व एक कुंकवाची डबी आणून दिली. मला वाटते तिचे कमळासारखे डोळे प्रसाधित मुखाच्या कोंदणात नीट खुलून दिसावे. मी तिला तसे म्हणून दाखविले तेव्हा ती म्हणाली ' मला काय करायचे आहे आता?-तुम्ही आहात, मला संसारात सुख आहे—मी त्यात दंग आहे.'

त्याच्या भरून आलेल्या आवाजाला उत्तर म्हणून मी त्याला त्याच्या पत्नीच्या सुशीलपणाची ती साक्ष आहे, असे सांगितले. माझ्या मनासारखे एवढ्या एवढ्याशा गोष्टींनी चढाउताराला येणारे त्याचे मन नाही—म्हणून मी त्याची पाठ थोपटली. असे मन असले म्हणजे जगात सुखच सुख असते असेही सांगायला मी कमी केलं नाही. कारण माझ्या जगाच्या हिशेबात मला तोटाच तोटा येत होता आणि नफ्याच्या खाती शून्यच उरत गेले होते.

एक दिवस मी त्याला सल्ला दिला, " तू थोडेसे जग पाहून ये. इथे एकाच गावात पडून पडून कंटाळशील आणि हे सुखच तुला खुपेल. " बायरन आपल्या पत्नीचे प्रेम टिकावे म्हणून विरहाने ते हवेसे करीत असल्याचे त्याच्या कवितावरून मी समजावून दिले. त्याच्याजवळ पैसे नसल्यास मी देण्याचे कबूल केले.

पण मला पैसे द्यावे लागले नाहीत. कारण तो गेला नाही. गेल्या वर्षी तो मुंबईला गेला होताच. इतक्यात भटकण्याची गरज नाही असे त्याचे मत होते.

" कशाला गेला होतास तू ? "

" बँकेची कॅश पोचवायला. वर्षातून कुणाला ना कुणाला तरी असे जावेच लागते--"

" पण चार-दोन दिवसांत कसली मुंबई पाहून होणार ? "

" खूप पाहिली. मजजवळचा अर्धा पगार मी खर्च केला. चाळीस रुपये म्हणजे काही कमी होत नाहीत. शिवाय रेशीमकाठी धोतर, नवा बूट आणि लग्नाचा कोटही मी नेला होताच की ! "

" अरे ! पण तेवढ्यावर कोण खुश होणार तुझ्यावर ? कुणाला खुशबिश केलंस की नाही ? "

तो अडखळला, घुटमळला आणि म्हणाला--" ते मी आजवर कुणाजवळच बोललो नाही. "

" पण मजजवळ बोलायला काय हरकत आहे ? सगळे तर सांगतोस मला ! "

" पाहाऽ बरं ! गैरसमज करून घेऊ नकोस रे बाबा--"

" छे रे ! सांग ना. मी कसला गैरसमज करून घेणार ? "

" मी असाच रस्ता शोधीत जात होतो मुंबईला ! कोणत्या भागात होतो याची कल्पना नव्हती. पण तो भाग चांगला नसावा असे मला वाटत होते मनातल्या मनात. माड्यांवरच्या खिडक्या उघड्या होत्या. त्यातून रंगविलेले चेहरे सडका न्याहाळीत होते. वर्तमानपत्रे वाचतो त्या जिज्ञासेने मी वर पाहिले. मला एका खिडकीतून खूण केली गेली. तोपर्यंतही मला फारसे काही वाटले नाही. मी सरळ वर गेलो. आपण गरीब, आपले कोण काय घेणार ? सर्व पैसे संपलेच होते--दहा एक असतील शिल्लक ! असल्या स्त्रियांबद्दल वाचले ऐकले खूप होते. त्यांचा तिरस्कार

करायलाही शिकलो होतो. त्यांच्याबद्दलचा तिरस्कार बोलून दाखविल्याने पुण्य व प्रतिष्ठा लाभते, हेही मला ठाऊक होते.

" पण हे काहीच त्या वेळी आठवले नाही. वारा आला म्हणजे पानोळी उडते, तसाच वर गेलो. दार उघडले गेले. अंदाजे एकोणवीस वीस वर्षांची गोरी बाई सामोरी आली. रंगविलेले ओठ उघडले गेले आणि पांढरे स्वच्छ दात दिसले. तिला इंग्रजीशिवाय दुसरी भाषाच येत नव्हती आणि मॅट्रिकनंतर वॅंकेच्या इंग्रजी-शिवाय मला इंग्रजी येत नव्हते. येस, नो, धिस, दॅट करीत उत्तरे देत होतो—

" पण काय रे मनात संकोच वाटला नाही ? भीती वाटली नाही ? "

" तेच तर नवल आहे. माझं काही वाईट होईल असं सुद्धा वाटलं नाही. चार पैसे जास्त खर्च झाले तरी घरी कुणी रागावणार नाही असे श्रीमंताच्या मुलाला वाटते ना–तसेच मला वाटत होते.–हंऽ पण ऐकून तर घे—"

" सांग–सांग ! "

" तिने माझे स्वागत केले. म्हणाली ' गुड आफ्टरनून ! ' मीही आत शिरून नमस्कार केला. तिने माझ्या मागे दार लाविले. मजकडे हसतच पण काळजीपूर्वक पाहिले. " चहा घेणार की कॉफी ? " असे विचारले. मी " कॉफी चालेल " असे सांगितले. मऊ सुंदर सजविलेल्या सोफ्यावर ती अतिशय सभ्यपणे बसली व मलाही आरामशीर बसायला तिने सांगितले. खिडक्यांना गडद निळे पडदे होते. फुलदाणीत ताजी फुले होती आणि सर्वत्र मदिर मधू मधू गंध दरळवला होता. तिच्या अंगात सैलसा झगा होता—एखाद दुसरा बंद सोडताच तो अंगातून खाली गळून पडेल इतका सैल ! तिचे गोरे गोरे हात–कपाळावर भुरभुरत असलेले केस–टप टप बूट वाजवीत चपल गतीने चालण्याची ऐट आणि तिचे वय—गड्या रे ! खरंच सांगतो, मला तिथून उठावेसेच वाटेना. सर्वच गोष्टींचा विसर पडल्यारखा झाला. तिने कॉफीचा कप माझे हाती दिला व विचारले--" मी काय करू शकते तुमच्यासाठी ? "

" तुझा दर काय आहे ? "

" पंचवीस रुपये. "

मी गपकन् कॉफीचा कप समोरच्या टेबलावर ठेवला व उठायला लागलो. ती पुढे झाली व हात धरून परत तिने मला बसविले व म्हटले, ' का ? जायचे कारण ? '

" मी नागपूरकडला ! मला यातले काहीच कळत नाही. पाच रुपयांपेक्षा ज्यास्त माझी ऐपत नाही. हे कपडे देखील माझे ठेवणीचे आहेत. "

" असे पहिल्यांदाच आलात ? "

" होय ! शपथेवर ! "

ती हसली व अगदी ममतेच्या भावनेने तिने माझ्याकडे पाहिले. " इथे सोल्जर लोक येतात. तीस तीस रुपये देतात–पण तुम्ही खोटे बोलत नाही. हवे तर

पैसे द्या नाहीतर तुमची खुशी ! मीही या तुमच्या देशात नवीनच आले.—जाऊ नका असे. ”

मी थांबलो; पण मन माझे उतरल्यासारखे झाले होते. ती म्हणाली, “ वाईट वाटून घेऊ नका. पण एक गोष्ट प्रामाणिकपणे सांगा. तुम्हांला काही रोग बीग आहे का ? ”

“ छाट् ”

“ मला वाटलंच होतं. बरं, थोडा वेळ बसायचे की आत चलायचे ? ”

“ जाऊ या आत ” गोड धुंद शिरशिरी मला झिणझिणून गेली.

“ चला, पण हे कपडे तुम्ही वापरता कामा नये. तुम्ही न्हाणीघरात जा. तुमच्यासाठी तिथे सर्व तयारी केली आहे. नीट वॉश घेऊन कपडे बदलवून या—मी आतच आहे. ”

न्हाणीघरात परीट घडीचे धोतर, सदरा तयार होता. टर्किश टॉवेल, साबण, तेल, सेंट–मी अंघोळच केली म्हणाना ! बाहेर येताच तिने माझा हात आपल्या हाती घेऊन दाबला. “ निष्पाप पोर ! ” की असेच काही ती म्हणाली; व आतल्या खोलीत तिने मला नेऊन बसविले. एका प्रशस्त बिछान्यावर रबरशीट तिने आंथरले–त्यावर जाड टॉवेलची चादर घातली, फवाऱ्याच्या बाटलीतून कायसे सुगंधी सर्वभर शिंपडले. अगदी जवळ येऊन हसतच तिने माझ्या छातीला, हाताला सेंट लावला. आणि अगदी बिलगून मला उठविले व उभे केले—

नंतर वीस–पंचवीस मिनिटांनी मी बाहेर आलो. तीही पुन्हा वॉश घेऊन, तशाच द्रुत ऐटदार टापा टाकीत मजजवळ येऊन बसली. खालून वर्खाचे विडे बोलाविले होते. त्यांपैकी एक उचलून तिने माझ्या तोंडात घातला; व स्टेट एक्सप्रेसचा डबा माझ्यापुढे धरून त्यातली एक सिगारेट स्वतःही घेतली आणि—

“ माझ्या गोड मुला, तुला थांबायचे असल्यास तू थांबू शकतोस—माझी हरकत नाही, पण तू आता या क्षणी अगदी आनंदात आहेस असे मी समजू ना ? ”

तिचा अर्थ मला समजला आणि मीही मनापासून हसत—खरे सांगतो – अगदी कृतज्ञतेने तिच्याकडे पाहिले व मोठ्या अनिच्छेने उठलो—खिशातली नोट टेबलावर ठेवली—

तिने आपल्या दोन्ही मऊ मऊ हातांनी माझा हात धरला, कुरवाळला आणि अगदी हिंदी भाषेत निरोप दिला—अच्छा, पहचान रखना ! भूलना नही. ”

मला परतावेसे वाटेना. पण परतलो व खाली उतरून सडकेवर पाऊल टाकल्यानंतर मला आठवण झाली की आपण एक बँकेत काम करणारे सामान्य कारकून आहोत आणि तरी आपल्या मनाला कुठेतरी कुणीतरी गुदगुदल्या करीत आहे.

त्या पंचाहत्तर रुपये मिळविणाऱ्या कारकुनाची ती अस्मान ताऱ्याची कहाणी, त्याने ती–क्रीडाप्रेमी माणूस वॉरेलच्या खेळाचे वर्णन जसे करील तितक्याच सूक्ष्म रसिकतेने–सांगितली आणि तल्यारखानाच्या वर्णनासारखी मी डोळे, कान एकत्र करून ती ऐकून घेतली. काय वाटले मला याचे वर्णन करायला शब्दच सुचत नाहीत. आणि ज्या वर्णनासाठी शब्द सुचतात, ते इथे देणे शक्यही नाही.

किंचित्काल तो किंवा मी काहीच बोललो नाही. मग तो म्हणाला––

" कुणाला सांगू नकोस रे बाबा. नाहीतर मज गरिबाचे मरण आणशील. "

" तू कुणाला सांगितले नाहीस ना हे ? फक्त मलाच सांगितलेस ना ! "

" हो, बाहेर अशा फक्त तुलाच आणि माझ्या बायकोला–"

" काय म्हणतोस ? बायकोला सांगितलेस तू हे ? "

" हो ! का ? "

" खरंच सांगितलंस ? अगदी असं ? "

" हो. याहीपेक्षा स्पष्टपणे ! कारण तिच्याजवळ कसला संकोच मला ? एवढी आनंदाची माझ्या मनात न मावणारी गोष्ट मी तिला नाही सांगू तर कुणाला ? "

" गाढवा, अक्कल आहे का काही ? यापेक्षा आत्महत्त्या का केली नाहीस ? तू कारकुंडा असाच मरशील ! भोग आपल्या कर्माची फळे पुढे ! चांगला सुखाने घरी नांदत होतास––"

" पण हे सगळं काय म्हणतोस तू ? तुला इतकं वाईट वाटतं हे ऐकून पण––"

" पण काय माझं कपाळ ! बायको काय म्हणाली तुझी ? "

" अरे बाबा, सांगतो काय ! तिने सगळं ऐकून घेतलं, खूप प्रश्न विचारले, सगळे वर्णन पुन्हा पुन्हा करवून घेतले–ती कशी हसली–कशी बोलली आणि आतल्या खोलीत काय कसे––ते तुला कसे सांगू––? "

" हं ! लाडू नकोस मूर्खा ! ती काय म्हणाली तेवढे सांग. "

" ती त्या वेळी काहीच म्हणाली नाही. आम्ही अगदी आनंदात मुंबईतल्याच गोष्टी करीत झोपलो. दुसरे दिवशी ती लवकर उठली व अगदी स्वयंपाकघर स्वच्छ करून चहा झाल्यावर हसत हसत उठवलं तिनं—"

" लवकर सांग मला—पाल्हाळ नको."

" आणि स्वतः हसत पण निग्रहानं म्हणाली––"

" काय म्हणाली ? "

" म्हणाली, मी आजवर कसलेच काही तुम्हांला मागितलं नाही. पण माझी एक हौस पुरवा. माझी पातळं अगदी विटली आहेत. मला चांगली छान दोन पातळ आणून द्या. हवी तर चार महिने आपण मोलकरीण बंद करू. "

" मी विचारले– अग पण का ? " तेव्हा ती म्हणाली, " एवढे कराच तुम्ही ! व मग पाहा—"

"काय ?"

"की तुम्हांला असं कधीच कुठंच जावंसं वाटणार नाही."

माझ्या अवकळा पसरलेल्या विफल चेहऱ्याकडे त्याने जिज्ञासेने पाहिले आणि--

त्या क्षणी मी मिळविलेल्या साऱ्या पदव्या, मानसशास्त्राचे सगळे ज्ञान शेगडीत घालून त्यावर चहा करून प्यावासा वाटला मला--!

२३।१०।१९५०

११६

लक्ष्मणाची रेघ

सुमारे चार वर्षांपूर्वी एका कोवळ्या सकाळी कसले तरी महत्त्वाचे काम घेऊन मी नुकताच आरामखुर्चीवर बसलो होतो. काम मला न आवडणारे बहुधा असावे. कारण काहीसा चिडलेला; उबलेला असा माझा रोख होता. आणि दुसरे एखादे काम येऊन हे माझ्या हातून बाजूला होईल, तर ते मला हवे होते.

अशा वेळेला दारावर कोणी तरी टिचक्या मारल्याचा आवाज आला आणि एक सुंदर, उंच, तल्लख, सतरा-अठरा वर्षांची मुलगी हसत व नम्रपणे मला नमस्कार करीत आत आली. 'बसा' म्हणायच्या अगोदरच माझ्यालगतच्या खुर्चीवर बसत ती म्हणाली,

"मी आपणांकडे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे असे एक काम घेऊन आले आहे. इथे येण्याच्या अगोदर मी जी माहिती काढली त्यात असली कामे घेऊन तुमच्याकडे येऊ नये हे कळले व म्हणून तर मी मुद्दामच आले."

माझ्या डोळ्यांत जिज्ञासा व आश्चर्य भरलेले तिने आपली दृष्टी स्थिर लावून बघितले आणि पुन्हा म्हणाली, "मी एक गोष्ट लिहिली आहे. ती चांगली व्हावी म्हणून तंत्रासंबंधी माझ्यापरीने काळजी घेतली आहे. तथापि ती तुमच्या नजरेखालून गेली तर मला आनंद व्हायचा आहे. कित्येकांना 'गोष्टी फाडून टाका आणि पुन्हा या फंदात पडू नका!' असे तुम्ही सांगितल्याचे मी ऐकले आहे व त्यामुळे तुम्ही सांगितल्यास इथल्या इथे ही गोष्ट फाडून टाकण्याच्या तयारीनेच मी आले आहे."

"पाहू तुमची गोष्ट. मी आत्ताच वाचावी अशी इच्छा आहे काय ?"

"होय. तुम्हांला वेळ असल्यास आणि अडचण नसल्यास."

"तुम्ही किती वेळ बसणार आहात ?"

"तुम्ही म्हणाल तितका वेळ."

" चहा–कॉफी काही घेणार ? तसे असल्यास मागवावी लागेल. तुम्ही जी काही माहिती मज़संबंधी काढली आहे, त्यांत हेही तुम्हांला कळले असेल की, या माझ्या घरात बाहेरून मागविल्याखेरीज चहा–कॉफी काही मिळायची नाही !"

" होय ! ही माहिती मी काढली आहे. पण मला चहा–कॉफी काही नको."

" आणि असली सर्व माहिती काढूनही तुम्हांला ओळख नसताना इथे माझ्याकडे यावेसे वाटले ?"

" या प्रश्नाचे उत्तर मी दिलेच पाहिजे असे नाही. तसल्या प्रकारच्या माहितीची जिज्ञासा आणि गरज मला नव्हती. कारण माझे आई–वडील जरूरीपेक्षा जास्ती समंजस आहेत आणि त्यांचा त्यांच्या या सुंदर, शिकलेल्या, एकुलत्या एका मुलीवर इतर लोक नावे ठेवतील इतका विश्वास आहे."

" तुम्हांला तुमच्या सौंदर्याची जाणीव आहे तर !"

" असली म्हणून काय झाले ? यात दोष आहे की अभिमान आहे ?"

" तसेच काही नाही...पण..."

" म्हणजे तुम्हांला याचे उत्तर देता येत नाही ! तुम्ही ते दिलेच पाहिजे असे नाही• कारण तुम्हीसुद्धा याच मुद्द्यावर स्वतःला अहंकार चिकटवून घेतला आहे."

" तुम्हांला कसे कळले ?"

" एवढे कळले नसते तर गोष्टी लिहिण्याचा फंद मी माझ्यामागे लावून घेतलाच नसता. मला माझ्या अनेक सहाध्यायांनी अनेक प्रकारे वर्णन केलेले दोन डोळे आहेत आणि तुमच्याकडे, तुमच्या खोलीतील चित्रांकडे, या फर्निचरकडे आणि या तुमच्या बसण्याच्या पद्धतीकडेही सूक्ष्मदर्शक यंत्रातून पाहिले पाहिजे असे नाही."

" शाबास ! मग आता मला एवढे सांगा की, इतरांसारखा तुम्हांलाही मी असे सांगू शकेन की, गोष्टी लिहू नका व या फंदात पडू नका–असे वाटते तुम्हांला ?"

" या प्रश्नाचे उत्तर मी किंचितसे हसून, लाजून 'नाही, असे द्यावे, अशी तुमची अपेक्षा आहे काय ? पण जाऊ द्या. तुम्ही गोष्टच वाचायला लागा."

" तुझे नाव काय ?"

" तुझे ?"

" हो तुझेच. या माझ्याजवळ बसलेल्या सुंदर मुलीचे नाव काय ?"

" अनुराधा."

" लोक राधा म्हणतात की नुसते अनू ?"

" लोकांचे जाऊ द्या. तुम्ही काही म्हटलेत तरी चालेल."

" अंहं ! तसे नाही. लोक ज्या नावाने हाक मारीत असतील ते नाव मी वापरणार नाही."

" असे आहे का ? पण या प्रश्नातून...जाऊ द्या. लोक मला अनू म्हणतात. "
" मग मी राधा म्हणेन ! "
" परत उत्तराची अपेक्षा नाही ना ? गोष्ट वाचा. "
" अंहं. वाचणार नाही. "
" का ? माझे अक्षर वाईट नाही. आणि अशुद्धही लिहिले नाही. "
" ते कारण नव्हे, पण— "
" पण काय ? "
" इतरांच्या गोष्टी वाचतो. तुझी गोष्ट ऐकायची आहे. "
" मग मी वाचते की ! "
" वाचून नाही. नुसती ह्यातली थीम सांग. आहे ना विचित्र मी ? "
" मुळीच नाही. कारण मी सांगत असताना तुम्हांला–मी नाही बोलत... "

अगदी किंचित लज्जेची छटा तिच्या मुखावर तरळली. आणि उषेच्या लालीत अधिकच कांती झळकल्याचा भास झाला. तिने स्वतःला सावरून गोष्ट सांगायला सुरवात केली. ती म्हणाली, " माझ्या या गोष्टीत मी आरंभीच एका जोडप्याची ओळख करून दिलेली आहे. एक सुंदर, सुदृढ तरुण आणि त्याला शोभणारी त्याची तीन-चार वर्षांपूर्वी लग्न झालेली पत्नी. "

" नाव काय दिलेस ? "
" शोभा. "
" आणि त्याचे नाव ? "

" विनायक. सुखी जोडपे आहे ते. दोघांच्याही सौंदर्याचे, सुस्थितीचे, प्रेमाचे मी वेगवेगळ्या घटनांनी वर्णन केलेच आहे व शेवटी म्हटले आहे की, त्यांच्या वैवाहिक सुखाचा कोणालाही हेवा वाटावा इतके ते चांगले होते. "

" मग त्या संसाराला दृष्टबिष्ट काही लागते की काय ? "

" ऐकाल तर ! हं ! मी सांगत होते की, ती दोघे फार सुखी होती. शोभेच्या भावना दुखवू नयेत; तिचा जीव एवढासाही खाली–वर होऊ नये याची विनायक फार काळजी घेत असे. हॉकी खेळताना मार लागतो आणि शोभेचा जीव कासावीस होतो म्हणून, तर पोहताना शोभेला आपल्याबद्दलची फार काळजी वाटते म्हणून, विनायकाने खेळणे, पोहणे सोडून दिले होते. "

" असला नवरा तुझ्या शोभेला आवडत होता ? "

" तुमच्यासाठी ते तिला विचारून ठेवीन ! सध्या मी काय सांगते तेवढे ऐकून घ्या म्हणजे झाले. पुढे त्यांच्या घरी आणखी एक जोडपे येते. कोणाच्या तरी ओळखीने ते त्यांच्या घरी उतरते, दोघेही परस्परानुरूप अशी असतात. पतीचे नाव राजाराम आणि पत्नीचे नाव कमल. राजाराम तेथील कॉलेजात बदलून आलेला

असतो आणि महिना दोन महिने घर मिळत नाही म्हणून त्यांच्याकडेच त्यांचा मुक्काम असतो. चार-दोन दिवसांतच त्यांचे खूपच सूत जमते आणि यांना घर मिळाले नाही तर बरे असे शोभा-विनायक यांना वाटते. इतकी त्यांची मैत्री परस्परांना हवीहवीशी. जणू ते दोघे सख्खे भाऊ आणि या दोघी जन्मजन्मांतरीच्या मैत्रिणी."

"ही असली सुखाची जोडपी रंगवून काय करणार?"

"त्यांचे स्वभावचित्रण. शोभा आणि कमल यांच्या स्वभावात एक फरक असतो. राजाराम आपल्या वयाच्या मानाने अत्यंत हूड, बेछूट, कसलीही पर्वा नसलेला, कशाचीही तमा न बाळगणारा. तो असा साधा जरी बोलला तरी त्याचे बोलणे सतत ऐकत राहावेसे वाटायचे. त्याने कित्येक शर्यतींत भाग घेतला होता, कुस्त्यांचे दंगल पूजिले होते, वाघांची शिकार केली होती, भेडाघाटाच्या धुवांधारमध्ये खाली उतरून अंघोळ केली होती, भुताटकीच्या घरातून रात्र रात्र भुते शोधायला तो हिंडला होता—इत्यादी कितीतरी गोष्टी त्याच्या नित्याच्या बोलण्यातून शोभेला जेव्हा ठाऊक झाल्या तेव्हा ती एकदा कमलला म्हणाली, 'कमल, याच्यासारख्याशी मैत्री जोडून आयुष्य घालवायचे म्हणजे तारेवरची कसरतच आहे! मी तर काळजी करून करून पापड झाले असते!' त्यावर कमल म्हणाली, 'काळजी करायला काय झाले? आपण काय शेणामेणाच्या थोड्याच आहोत. उलट मलाच राजाचा कधी कधी हेवा वाटतो. आणि त्याला सांभाळायचे म्हणजे—अग, तो म्हणजे एक पोर आहे! त्याचे केस विंचरण्यापासून तर अंघोळीची आठवण देऊन ह्याचे कपडे काढून देण्यापर्यंत सगळे आपल्यालाच करावे लागते. तो कॉलेजात काय शिकवतो, कोणास ठाऊक! त्याचे त्यालाच माहीत! पण पोरांचा घोळका दारापर्यंत आणून त्यांना निरोप दिल्यावर तो जेव्हा आत येतो, तेव्हा अगदी एखाद्या लहान मुलासारखा 'भूक लागली' म्हणून ओरडत सुटतो! कपभर दूध आणि बशीभर खायचे त्याच्या-समोर ठेवून त्याच्याकडे पाहत राहण्यात मला तर नेहमीच असे वाटते की, हा असाच भूक भूक म्हणत घरी यावा, कधी खेळून थकून घरी येतो. डोक्याला जखम झालेली, पायाला Sprain आलेला आणि मग ओरडतो की, 'आम्हांला कुणी औषध लावून देत नाही! कुणी आमचा पाय शेकून देत नाही!' जणू काय धडपडून पाय मोडून घ्यायला मीच पाठविले होते!'

"या कमलच्या बोलण्यावर शोभा विचारीत असे—'म्हणूनच तर मी म्हणते की, सतत काळजी करायची, त्यांना उशीर झाला की आपण दारात पळी घालायची—'

'छे! तसं मुळीच नाही. उलट मला स्वानुभवाने असे वाटते की, तो जोपर्यंत धडधाकट आहे तोपर्यंत काय वाटेल ते करील. पण दुखलाखुपला तर माझा क्षणाचाही विलंब त्याला सहन व्हायचा नाही. मागे त्या भुतांच्या शोधासाठी तो तीन दिवस गेला आणि परत केव्हा आला सांगू?'

'केव्हा?'

'एका रात्री स्मशानात समोर पाहत असताना खालच्या खड्ड्यात कोसळून स्वारी सगळे अंग खिळखिळे करून आली तेव्हा ! आणि मग म्हणतो कसा, 'जाऊ दे. मरोत ती भुते ! तू आता मला बरा करणार आहेस की नाही ?' आणि मग सबंध दिवसभर त्याने मला जेवायलासुद्धा आपल्याजवळून उठू दिले नाही."

"कमल आणि शोभेच्या राजासंबंधी अशा कितीतरी गोष्टी रोजरोज व्हायच्या. कमल सांगत असे म्हणून आणि शोभा ऐकत असे म्हणून. दोघींनाही फार आनंद व्हायचा आणि विनायक व राजाराम घरी सायंकाळी कामावरून परत आले की चहाच्या टेबलावरच गोष्टींचा फड तास, दोन तास रंगायचा.

"असा त्यांचा जीवनक्रम नित्याचा मी रंगविला आहे. कंटाळा येणार नाही इतपत मी काळजी घेतली आहे. पुढे पुढे एक मात्र परिवर्तन शोभेमध्ये दिसायला लागले की, ती विनायकाची अतिशय काळजी घ्यायला लागली. ती त्याच्याकडे अशी पाहायची की, जणू आपण एखादे चित्र कल्पीत आहोत–एखादी मूर्ती साकार करीत आहोत. एक दिवस तिने विनायकाला एका अतिशय जवळिकेच्या क्षणाला सांगितले की, तू पूर्वीसारखा हॉकी खेळायला सुरवात कर. पोहायलाही आपण जाऊ. विनायक म्हणायचा की, नको रे बाबा ! माझी सवय तुटली आता. माझी सुखे, माझ्या हौशी, माझे सर्वस्व मी तुझ्यात पाहतो–"

"या वाक्यानंतर काय लिहिले आहेस ते वाच पाहू, राधा––"

"काहीच लिहिले नाही. विनायकाचे मन सुखावले आणि शोभेच्या मनात कोठे तरी, काही तरी दुखले–इत्यादीचा उल्लेख मी मुद्दामच केला नाही. कारण, माझी इथवरची गोष्ट जर चांगली झाली तर मी लिहिण्याच्या ऐवजी वाचकच असले उद्‌गार काढतील."

"मग काय लिहिलेस तू ?"

"मी मुळी एक नवीनच प्रसंग छेडला. तो असा की, ती चौघेही शेजारच्या खेड्यात एका पाटलाच्या गावी हुरडा खायला जातात. तेथील रानवट वातावरणात, अशिक्षित पण राकट माणसांच्या सहवासात त्यांचा सबंध दिवस मोठ्या मजेत जातो. ते सगळे वर्णन मी काळजीपूर्वक केले आहे. हुरडा खाऊन झाल्यावर पाटलाचा नाठाळ घोडा तबेल्यात बांधलेला असतो. पाटलाचा भाऊ बारल्यापासून त्या घोड्यावर फारसा कुणी मन लावून जीन कसला नव्हता आणि तो घोडाही कुणाला दाद देत नव्हता. राजाला उसळी येते आणि तो घोड्यावर बसायला तयार होतो. त्याला सर्वच मनाई करतात. पाटलापासून तर कमलपर्यंत नको नको म्हणत असताही तो बसतो. आणि घोड्याला टाच मारतो. घोडा चौखूर उधळून दिसेनासा होतो. अर्ध्या पाऊण तासात घामाने निथळत असलेला आणि मांडेच्या कसाने जेरीस आलेला घोडा परत येतो आणि राजाही जिद्दीस पेटलेला चेहरा निवळून खाली उतरतो. पहिल्या प्रथम

त्याची दृष्टी कमलकडे जाते आणि लगाम धरून उभ्या असलेल्या राजाला पाटील शाबासकी पुरती देत नाही त्याच क्षणी तो घोडा परत उधळतो आणि राजाला लाथ लागून तो खाली पडतो व बेशुद्ध होतो. सर्वांसमोर एक नवेच संकट उभे राहते.

" राजा शुद्धीवर येताच पहिल्यांदा कमलला हाक मारतो. कमल इतरांसारखी त्याच्या बिछान्यावरच बसलेली असते. तो तिच्या मांडीवर हात ठेवून पुन्हा निपचित पडून राहतो आणि हलक्या आवाजात पण चिडून म्हणतो ' खबरदार ! माझ्याजवळून बिलकूल उठायचे नाही ! ' कमल त्याला दिलासा देते आणि किंचित हसून सर्वांकडे पाहते.

" मार जिव्हारी लागलेला नसतो. तसे काळजीचे काहीच कारण नसते. पाटील आपल्या आतिथ्यशील स्वभावाप्रमाणे सर्वांना थोडे थोडे जेवून घेण्याचा आग्रह करतो. सर्व तयारी त्याच्यासाठीच असल्यामुळे न जेवणे बरे दिसत नाही. शोभा म्हणते, ' कमल तू जेवून ये. मी आहेच व आम्ही दोघे इथे बसतो. ' शेवटी असे ठरते की सर्वांनीच आळीपाळीने जेवण उरकून घ्यावे. या ठिकाणी मी असा प्रसंग आणला आहे की, सर्वजण जेवायला जातात अन् त्या खोलीत फक्त शोभा राजारामाजवळ बसलेली असते. ती कितीतरी वेळ श्रांत, विकल अशा राजाच्या चेहऱ्याकडे पाहते आणि हळूच त्याच्या कपाळावरून हात फिरविते. एवढ्यात आपल्याजवळ कमलच बसली आहे अशा भावनेनं राजा तिच्या मांडीवर हात ठेवतो. ती हळूच म्हणते, 'राजा, नको रे असला वेडेपणा करीत जाऊस ! ' राजा डोळे उघडतो. शोभाला ओळखतो. आपला हात बाजूला घेतो—"

" आणि तो एकदम दचकतो, असे दाखविले आहेस ना ? "

" छे, मुळीच नाही. कारण तसा दचकलेला त्याला दाखविले असते तर त्याने इतके जग पाहिल्याच्या माझ्या गप्पा निव्वळ लेखीच ठरल्या असत्या ! "

" मग काय लिहिलेस बाई तू ? "

" मी लिहिले की, राजा हळूच जाणूनबुजून तिचा हात हाती घेऊन तो आपल्या छातीवर दाबतो आणि हळूच अन् शांतपणे म्हणतो की, ' शोभाताई, तुझे वाक्य मी ऐकले. सीतेसाठी देखील लक्ष्मणाने रेघ ओढली होती. त्या रेषेच्या मर्यादेनेच तू हे म्हणालीस तर मला तू हवीच आहेस. माझ्या जीवनात कधी काय घडेल याचा माझाच मला भरवसा नाही. अशा स्थितीत तुझ्या उच्चारलेल्या वाक्याचा मी अव्हेर केला तर माझ्यासारखा मूर्ख मीच... '

" इथे मी गोष्ट संपविली आहे. तिच्यातल्या वर्णनात, घटनांच्या क्रमात विसंगती नाही. गोष्टीचे नाव दिले आहे ' लक्ष्मणाची रेघ ! ' कशी वाटली सांगा ना तुम्हांला ? अगदी फाडून देण्यासारखी नाही ना ? "

मी काहीच बोललो नाही. आत्मविस्मृतीचे व अर्पणाचे कित्येक क्षण ज्यांच्या आयुष्यात येत असतील ते अशा वेळी काय बोलत असतील याचाच मी विचार करीत होतो. एवढ्यात—

"सांगा ना ! नुसते माझ्याकडे पाहून मला थोडेच उत्तर मिळायचंय !"

"ते मिळायला हवंय तुला ?"

"तसे नाही. मला ते वदवून घ्यायचे आहे."

"ते आत्ता नाही. मला विचार करायला तरी वेळ देशील ? की तोही मी इथेच तुझ्या अध्यक्षतेखाली करावा !"

"असेच नाही ...."

"मग ती गोष्ट ठेवून जा. म्हणजे—"

"म्हणजे मी पुन्हा आलेली तुम्हांला हवी आहे. पण त्यात काय ? मी तशीही येईन. त्यासाठी तोंड एवढे गोरेमोरे करायला नको. चिडू नका हं माझ्यावर ! मी क्षमा मागते तुमची. तुम्ही किती थोर. मला तुम्ही एवढा वेळ दिला हेच मी म्हणते पुष्कळ ....."

माझे तिच्या क्षमायाचनेकडे लक्षच नव्हते.

"राधा, खरेच येशील तू ? खरेच येशील ?"

"हो."

पण हा 'हो' माझ्या अपेक्षेसारखा नव्हता म्हणून अधीरतेने मी विचारले,

"कधी येशील ?"

"पुन्हा अशीच एखादी गोष्ट लिहून झाल्यावर ....."

तिला थांबविण्यात अर्थ नव्हता. प्रयोजनही नव्हते. वारा येतो आणि गारवा देऊन जातो. पाऊस येतो आणि तुषार शिंपडून जातो. त्याला 'ये' ही म्हणता येत नाही आणि 'जा' म्हणूनही सांगण्याचे प्रयोजन असत नाही. फार तर दार उघडून तावदानावर टिचकी पडते की काय, याची सतत वाट पाहायची.

ती वाट मी फार पाहिली. कित्येकदा उठून बोलवावेसेही वाटले. पण गेल्या चार वर्षांत विचार करूनही अजून मन उत्तर देत नाही की, आपण लक्ष्मणाची रेघ ओलांडावी की टिचकीची वाट पाहावी !

१।११।५०

११७

औषधी जान्हवीतोयम्

वंजर लोक असतात ना, त्यांच्यासारखी त्याची जगण्याची रीत त्याच्या इष्ट-मित्रांपैकी पुष्कळांना पाहवत नसे. ते सहानुभूती दाखवून त्याची करमणूक करीत. त्याच्या कल्पना, त्याचे वागणे तसे अगदी स्वैर अनिर्बंध असे ! सुखदुःख व्हायचे ते

त्याचे त्यालाच. इतरांना नकळतही संपर्क होऊ नये याबद्दल तो दक्षता घेत असे. तेवढाच त्याच्या आयुष्याला नियम ! असल्या जगावेगळ्या रीतीबद्दल त्याला जेव्हा कधी विचारले जाई तेव्हा निर्मल हास्यापलीकडे त्याच्याकडून प्रत्युत्तर मिळत नसे. मान, अब्रू, पैसा, जिव्हाळा, प्यार सर्व काही, फळांनी लवलेल्या वृक्षावरील आंब्यासारखे त्याला मिळाल्यामुळे त्याच्या यशाचा, उमेदीचा, आनंदाचा थांगपत्ता त्याच्या म्हणविणाऱ्या मित्रांनादेखील लागेना, म्हणून ते सहानुभूतीने कळवळत. कधी इशारा देत की, 'ध्यानात ठेव, एखादे दिवशी या सगळ्यामुळे दुःखच दुःख वाट्याला येईल !' असल्या इषाऱ्याचेही प्रत्युत्तर तो हसूनच देत असे !

पण असाच एकटा, वेगळा, स्वतःला स्वतःशी तो सापडला म्हणजे असली वाक्ये त्याच्या मनासमोर चांदण्यातील सापाप्रमाणे चमकून जात, इतक्या जणांसमोर, त्यांच्या अनुभवसिद्ध उद्गारांना मोडता घालीत हसायचे म्हणजे नर्मदेच्या लाटांना कपारी फोडून देण्यासारखे होते. मग सर्व विचार अशाच वेळी त्याला अगदी अस्वस्थ करून टाकीत. त्यामुळे एकटे स्वतःला गवसण्याचे प्रसंग तो निक्षून टाळीत असे. त्याने आपल्या मनाशी असा संकेतच रुजविला होता की, त्याचे सर्व सुख हे त्याच्या सतत कामात, सतत हालचालीत, अविरत उद्योगातच आहे ! दिवस दिवस कामाला जुंपूनही लहान मुलांशी, रूपसुंदर तरुणींशी, महत्त्वाकांक्षी मनांशी, कार्यसफल प्रज्ञावंतांशी त्यांच्या त्यांच्या वृत्तीनुसार व स्वभावानुसार बोलत राहणे म्हणजे सार्वजनिक नळावर कुणाही तृषार्ताला पाणी पिता यावे, तसलेच काहीसे !

त्याला वचक एकाच गोष्टीचा आणि तो म्हणजे स्वतःला एकटे पकडण्याचा. अशा वेळी त्याची त्यालाच कीव येई. दुःखाचे कढ शिगेवर येऊन उकळत. भिंतीवरचे सगळे फोटो पाहून टाकणे, खुर्च्यांच्या वेतविणीची छिद्रे मोजणे, तबकातील सगळी सुपारी कातरून ठेवणे—अशांसारखे उद्योग करून तो पाही. तरीदेखील गुदमरल्यासारखे, कोंडल्यासारखे, गळा दाबून श्वास रोधल्यासारखे वाटणे, असह्य. अनावर झाले की तो बाहेर पडे. जणू बाहेर, चौघांत चव्हाट्यावर त्याच्या मनाला रुंजी घालणारे नूपुरध्वनी होत आहेत. उंबरठा ओलांडला की मग त्याला सगळे आठवे, सुचे. झाडावरची फुले. पाखरे दिसत. आकाशातील ढग दिसत, सडकेवरचे दगड दिसत, दिव्याचे खांब नि त्यांच्यावर मुलांनी आवाज काढण्यासाठी मारलेल्या दगडाचे ओरखाडे दिसत !

आताशा तो कित्येकदा असा बाहेर पडे. कोरियाचे युद्ध, कॉमनवेल्थ मंत्र्यांची परिषद, पाकिस्तानातील हिंदू स्त्रियांवरील अत्याचार हे सगळे त्याच्या खोलीत डासांसारखे घोंगावून त्याला असहाय्य करीत. त्याला असे वाटे, सर्व समाजाचे वस्त्र अंगाभोवती पांघरावे म्हणजे आजाराची भीती राहणार नाही. घशाची खवखव असह्य झाली म्हणजे व्यसनी दारूचे पेले गटागटा घशात ओततो तसा तो मार्ग कापीत सुटे. कुणाचे धक्के लागले, वाहनांची ब्रेक दाबून झालेली कुंठित गती आपल्यामुळे झाल्याचे त्याला कळले तर तो त्याचा दोष सहन करीत करीत मनात निवत असे. आणि पुनः समाज

पांघरायला तो भराभर पुढे जाई—जणू एखादे दुःख भूत होऊन मानगुटी बसले आहे आणि ते धूड त्याला सर्वांदेखत दूर लोटायचे आहे.

आजदेखील ती मागची वाक्ये त्याच्या मनात गर्दी करून ओरडली. कानठळ्या बसल्यागत तो बाहेर पडला. उसने हास्य, उसना जोम, सवयीमुळे साधला तरी त्याला आज अगतिक, असहाय्य, असल्याचे जाणपण सहन होईना. मोठ्या सुखांनी छोटी दुःखे नाहीशी होतात की मोठ्या दुःखांना छोट्या सुखाची मात्रा पुरते ते त्याला निश्चित उमगेना. आणि समजा, जगात काहीच घडले नसते तर ? रशियाची माणसे सकाळपासून सायंकाळपर्यंत शेतकारखान्यात राबली असती; अमेरिकेच्या अपार धनवंतांनी धनाचा यज्ञ केला असता; इंग्लंडमध्ये कच्चा माल भरपूर उपलब्ध झाला असता आणि हिंदुस्थानात सगळ्या दुःखाचे परिमार्जन गांधींचे नाव घेण्याने न झाले असते; तर ? तर आपली दुःखे सह्य झाली असती का ? की आपण आपले डोळे तापल्या सांडसाने फोडले असते आणि श्रवणेंद्रिये ठेचून काढली असती तर ?— त्याला निर्णय घेता येईना. त्यामुळे झाडांची सळसळ ऐकू येई, पण पानेच दिसत ना; रस्त्यावरील स्त्रीपुरुषांचे कपडे दिसत, पण चेहरे ओळखायला येत ना. त्याला एकदा वाटले–जपान, जर्मनी, कोरिया, अमेरिका, इंग्लंडमध्ये आपल्याला लोक बोलवताहेत. मॅकआर्थरशी आपले बोलणे झाल्याशिवाय काहीच व्हायचे नाही ! तोवर असेच कपडे दिसतील आणि माणसांचे चेहरे अंधुक होतील–पण दुसऱ्या क्षणी त्याचे मन त्याला हिमालयातील, अमरकंटकमधील शांत निवांत स्थळी, कमीत कमी रामटेकच्या बाहुबलीच्या चबुतऱ्यावर जाण्याचा आग्रह करू लागे !

म्हणूनच एकेक कल्पना पिंजत त्याने सर्व असह्यतेला झोपविण्याचा प्रयत्न चालविला होता. मध्येच एक लाउडस्पीकरची मोटर एका सिनेमाच्या अप्रतिमपणाची जाहीरात करीत त्याच्यासमोरून गेली. कुठल्याशा चावून चावून वेचव झालेल्या घासा-सारखे गाणे त्याच्या कानांवर आदळले. चिनिया बदाम विकणारा निर्वासित त्याला दोन आण्यांचे शेंगदाणे देऊन गेला आणि पुढे पानाच्या ठेल्यावर उभा असता भाजल्या शेंगांनी आपले ओठ काळे झाले की काय म्हणून त्याने आरशात पाहून घेतले. विडा तोंडात धरताच तो च्युइंग गमसारखा वाटून त्याने थुंकून टाकला. उन्हाळ्याची संध्याकाळ थंड पेयाने सुसह्य होईल या कल्पनेने तो 'शीतघरात' शिरला. पेलाभर लस्सी पिऊन उरलेले बर्फाचे खडे त्याने दातांनी भरडून खाल्ले. पण कॅलशमचे इंजेक्शन नसेतून घेतल्यागत त्याचे सर्वांग गरम वाफेने शिणकून निघाले. तो तसाच उठला. बसणे होईना. घामावर वारा घेण्याची, भुकेवर जेवण घेण्याची, थकल्यावर बिछान्याला अंग लावण्याची त्याला सवय नव्हती. कारण तसे सुख त्याला नेहमीच बोचले होते. त्यामुळे रिक्षातून हसत जाणाऱ्या तरुण जोडप्यांकडे, आइस्क्रूट चोखीत बेदरकारपणे चाललेल्या मुलांकडे, भाजीचा भाव समंजसपणे करणाऱ्या तरुणीकडे पाहून त्याला कसलीही सूचना न मिळता उलट त्याला त्यांची व स्वतःची कीव येई.

म्हणूनच ही तगमग वाळवंटात पडलेल्या मासळीसारखी त्याला भासत होती. पुनः प्रवाहात जाऊन पडायचे आणि किनाऱ्यापासूनचे अंतर फार असल्यामुळे धडपडीचेही त्राण नसायचे !

एक रिक्षावाला ओरडत होता, " ए इतवारा, एक सवारी ! इतवारा, बाबू इतवारा ? " त्याने त्या रिक्षावाल्याकडे अहेतुक पाहिले. रिक्षावाला आपल्या मनाशी मतलब समजून म्हणाला , " बाबूजी, इतक्यात चलायचं आहे ना ? चला, जेवढे तुम्ही द्याल तेवढेच पैसे."

रिक्षात अगोदरच एक बेंगरूळ माणूस बसला होता. त्याच्या सहप्रवाशाने कवडीसारखे हसून त्याचे स्वागत केले आणि व्यापलेल्या जागेपेक्षा थोडी अधिक जागा व्यापली. तंबाखू चोळण्याच्या निमित्ताने दोन्ही गुडघ्यांवर दोन्ही ढोपरे टेकून त्याच्या-साठी अगदीच थोडी जागा ठेवली. तंबाखूला चुना लावून झाल्यावर सहप्रवाशाच्या नात्याने त्याने नवागताला विचारले,

" काय राव, शोक करता का थोडा ? "

" कशाचा ? "

" अहो, हा तंबाखूचा. "

" द्या. "

" पान आहे का तोंडात ? "

" होतं, पण थुंकून टाकलं. "

" अहो, पान म्हणजे काय भाजी होय, की ती थुंकून टाकता येईल ? "

" तुम्ही भाजी थुंकून टाकता वाटतं ? "

" हो. बायकोवर रागावायचं झालं तर भाजी थुंकण्याशिवाय गतीच नसते. "

" बायकोवर रागावता वाटतं पुष्कळ ? "

" होय, असं का विचारता ? म्हणजे तुमचं लग्न झालेलं दिसत नाही ? "

" लग्न रागावण्यासाठी करायचं असतं वाटतं ?

" मग काय तर ? रागवायचं तरी कुणावर ? रेशनवाल्यावर ? कन्हैय्यालाल मुन्शीवर ? दूधवाल्यावर ? रिक्षावाल्यावर ? धोब्यावर ? चांभारावर ?—साहेब, जगायचं आहे म्हटलं मला ! "

" बायकोवर रागावून जगता येतं ? "

" हो ऽ ! चांगल्या रीतीनं."

" आता कुठं निघालात ? "

" इतवारीत. आपल्या घरी. "

" घरी जाऊन रागावणार ? "

" अर्थातच ! "

" कशाकरिता ? "

" तिचं तोंड बंद करण्याकरिता ! "

" म्हणजे ? फार बोलतात त्या ? "

" फार नाही बोलत. पण बोलू नये तेव्हा बोलते. "

" तेव्हा म्हणजे ? "

" तेव्हा म्हणजे रात्री नऊ वाजता ! "

" रात्री नवानंतर तुमच्याकडे बोलण्याची बंदी असते वाटतं ? "

" नाही, पण मला जायचं असतं. "

" कुठं ? "

" तुम्ही कोण विचारणार हो ? "

" म्हणजे, आता माझ्यावर रागावणार की काय ? "

" वा वा ! छान ! पकडलं बुवा तुम्ही आम्हांला. आवडलं आपल्याला, मस्त दिसता तुम्ही एकंदरीत. पण का हो, तुम्ही कुठं निघालात ?

" असाच, रिक्षावाला नेईल तिकडे. "

" असं ? म्हणजे तुमचंही आमच्यासारखं—"

" आमच्यासारखं ? "

" म्हणजे आपलं हे हो ! नवानंतर दिल रमविण्यासाठी असंच कुठे तरी ! अहो, त्यात काय ? तुम्हांला वाटतं तितकं नुसतं जगणं, जिवंत राहणं सोपं राहिलेलं नाही बरं ! हे मन असतं ना आपलं ? हे दिवसभर काऊन जातं, दम घेऊन घेऊन घावरून जातं अन् दुसऱ्या दिवशी पुनः तेच नेहमीचं जगणं, जिवंत राहणं. म्हणून जावं आपलं घटकाभर तव्यत तर्र करायला. "

" असं म्हणता होय ? "

" अरे, आम्हांलाही बनवता राव ? आम्ही माणसाचे पाय ओळखतो. त्याचे डोळे ओळखतो. ओठावरून पारख करतो. तुमच्या ओठावर खुणा आहेत म्हटलं ! "

" कशाच्या ? "

अरे, बऽस् ! ह्या बोलायच्या गोष्टी नव्हत. ओळखायच्या असतात फक्त. चला, आज आमच्याबरोबर चला. "

" छे, आज नाही. "

" अरे, असं कच खाऊ नका. आम्ही दिलाला दिल देऊ तुमच्या. अहो, आजच भेटला म्हणून काय झालं ? दोस्तीला काळवेळ लागत नाही. चला, तुम्हांला ठिकाणं माहीत नाहीत आणि आमचं प्रकरण आम्हांला एकट्याला दाद देत नाही. अरे यार ! तकदीरानं खुबसुरती मिळाली अन् हे दणकट अंग—अरे, आमचाही थोडा फायदा करून द्या. "

"पण आज—"

"आजबीज काही नाही. आज काय एकादशी आहे?"

"अं हं! खिसा रिकामा आहे."

"वा! मग आम्ही हो कशासाठी आहोत? अहो राव, पाच दहा रुपडे आणखी! चला. घरी चला आमच्या. फर्मास कपडे देतो. कनोजी अत्तर देतो. साखरेचं दूध देतो. ठिकाना दाखवतो. तुम्ही पुढं, आम्ही मागं. येऊ द्या जरा मजा. देवानं आमचा नंबर शेवटी लावला, त्याला काय करायचं? डोक्यावर टोपी घालावी तर टोपल्यासारखी दिसते. गरम कोट घालावा तर तेलाच्या ड्रमसारखं हे रूप ढणढण करतं. अन् दिल सालं, मारे अस्मानात धावतं आणि आम्ही हे असेच सडकेवर गडगडत असतो. चला, चला. आज आमचं तगदीर भलं आहे. ए रिक्षावाला, चलो जी."

"मग ते दोघेही 'ठिकाणा'वर गेले आणि चार-दोन मिनिटांत तो आल्या पावली परतल्यागत जिन्यावरून उतरला. नऊ वाजताचा चंद्र सगळे ढग त्याच्या डोक्यावर फेकून अस्मानात फिरत होता. चांदी-सोन्याच्या दुकानात पैशाची मोजदाद सुरू होती. हॉटेलच्या तोंडावर रेडिओ ओरडत होते आणि किंचाळून किंचाळून रिक्षावाले थकत आले होते.

मधूनच तो कावराबावरा होऊन मागे पाहत असे आणि आपल्याला कुणी मारीत नाही या समाधानाने पाऊल पुढे उचलीत असे. जणू तसे पाऊल उचलून समोर जाण्याने त्याचे दोन-चार प्रश्न सुटणार होते.

"ए भाऊऽऽ! अरे भाऊराव!"

त्याच्या कानांवर हाक आदळली. आवाज नाजूक होता. स्त्रीचा होता. आपलेपणाचा होता. तरी देखील त्याने मागे न पाहताच पावले उचलायला सुरवात केली.

"ए भाऊ, अरे भाऊराव, थांब, थांब जराऽऽ!"

आता त्याला भान असल्यासारखे झाले. तो थांबला. त्याने वळून पाहिले. एक स्त्री काखेत मूल अन् हातात भांडे घेऊन भराभर चालत त्याच्याकडे येत होती.

"अरे, किती हाका मारल्या तुला?"

"मले, तू विठाबाई नाही का? पण तू इथं कुठं!"

"अरे, मी इथंच राहत्ये. सहा महिने झाले. बदली झाली परासियाहून यांची इथं. पण तू कसा इकडे? मावशी कुठाय्? लखुअण्णा कुठाय्? सोनीचं लग्न झालं का रे? आणि तो टाम्या आहे की नाही तुमचा अजून? अन् तुमच्या विहिरीला पाणी लागलं का मग? मावशीनं काशीला जाऊन काय सोडलं रे?"

"थांब, थांब विठाबाई. तुझ्या कडेवर मूल असलं म्हणून काही एकदम असे ओरडायचा अधिकार तुला कुणी दिला नाही. दहा वर्षे झाली, तुझी माझी

भेट नाही. आणि पाच वर्षांपासून मी माझ्या घरी गेलो नाही. मावशीची मुलगी झालीस म्हणून एकदम विम्याच्या ए फॉर्मवरचे सगळे प्रश्न मी तुला विचारू देणार नाही. तो तुझा बाळ्या रडतो आहे, भांड्यातलं दूध हिसळत आहे. कुंकवाच्या फराट्यानं विठीचा विठोबाजी झाला आहे अन् ओच्याचं धोतर होऊन डोक्यावरून वारा गेला आहे. अन् निघाली कुठं अशा थाटात ? नेपाळचा राजा पळून दिल्लीस आला अन् तू पायी निघालीस वाटतं त्याला भेटायला ? ”

“ तुझंही काय पण एकेक बोलणं ! अरे, इथे या पलीकडच्या गल्लीत राहत्ये मी. चल घरी. चुलीवर भांडं ठेवून आल्ये अन् पोरांना जेवायला वाढलं आहे. चहासाठी दूध नव्हतं म्हणून या हॉटेलात आले होते. ”

“ पोरांना ? म्हणजे किती मुलं झाली ग तुला या दहा वर्षांत ? दहा ? ”

“ चल. घरी चल म्हणजे दाखवत्ये. जसा होता तसा आहे अगदी ! ”

“ थँक यू माय विट्ठलराव ! ”

आणि मग तो विठीच्या घरी गेला. दरवाज्यातून वाकून घरात शिरला. कोटाची बाही दाराच्या खिळ्यात अडकली ती त्याने सोडवून घेतली. चूल धडधडून पेटली होती. तिच्यावर ॲल्युमिनियमचे भांडे सूं सूं वाजत होते. दोन मुलांची भोकाड पसरण्याची शर्यत सुरू होती आणि तिसऱ्याला कडेवरून खाली ठेवल्यावर तोही तिच्यात भाग घ्यायला मोकळा झाला होता. भाऊरावसमोर विठाबाईने पाट सरकावला आणि—“ अहो, पाहिलं का, कोण आलं ते ? ” अशी हाक दिली. शेजारच्या बसक्या दाराच्या खोलीतून एक बनियनवर कोट घातलेला पुरुष बाहेर आला. तीन मुलांच्या एकूण रोदन आघाडीत जो शांतपणे येऊन पाहू शकतो तो अर्थातच विठाबाईचा पंढरीनाथ असला पाहिजे याबद्दल संशय नव्हता.

“ हा आपला भाऊराव, लखुअण्णा हिवरगाववाल्यांचा मुलगा, माझा भाऊ. तो पाहा रे भाऊराव, तू मला लग्नात दिलेला आरसा ! ”

“ या या, भाऊरावजी. आज अगदी अलभ्य लाभ ! तरी म्हटलं, आज मला चहाची हुक्की का आली होती ? या या, बसा. वाऱ्याच्या झुळुकीसारखे आलात. पाहा, पाहा, आरसा–तो त्या भिंतीवर— ”

भाऊरावाचे येऊन, बसून, पाहून झाले. चहाही तयार झाला. चुलीवर व ॲल्युमिनियमच्या सर्वकामी भांड्यात केल्यामुळे त्यात षड्रस उतरले होते. त्या चवीत व मुलांच्या ‘ अनियतरुदिता ’ च्या पार्श्वभूमीवर सुखदुःखाच्या गेल्या दहा वर्षांतील गोष्टी सुरू झाल्या. भाऊरावांच्या घरची कपिला गाय लखुअण्णांनी विकून टाकली होती. विठाबाईची दोन मुले गेल्या साथीत दगावली होती. आणि ती जिवंत मुलांपेक्षा फारच सुंदर होती. विठीच्या नवऱ्याचे धोतर फाटले होते. आणि त्याच्यासाठी मागच्या हिवाळ्यात विणावयास घेतलेला स्वेटर काश्मीरच्या प्रश्नासारखा टाक्याटाक्यांनी व

गाठीगाठींनी विणला जात होता. मध्ये सुया तुटल्या तेव्हा विठाबाईने जुन्या पैठणीचा पदर सव्वा दोन रुपयाला विकून नव्या सुया विकत आणल्या होत्या. सुया बनविणाऱ्यांना जिव्हाळ्याची माणसे नसल्यामुळे त्यांनी मुद्दाम सुया महाग केल्या होत्या. तरीपण या उन्हाळ्याअखेर स्वेटर पूर्ण करण्याची तिने भारत सरकारच्या अन्नधान्य-आयातीसारखी भीषण प्रतिज्ञा करून टाकली होती. शेवटी विठीने भाऊरावाच्या हातांवरील सोन्याच्या घड्याळ्याची किंमत विचारली आणि भाऊरावाला प्रस्तुत प्रश्नाची जाणीव करून दिली.

" बराय विठाबाई, जातो मी आता. बराय जावईबुवा—आणि या पोरांना खाऊ व्यायचा वर का दोन रुपयांचा. "

" अरे, बसा हो. अजून अवघी रात्र आहे. कसली घाई आहे ? आम्हांला तरी आता काय काम आहे ? "

" छे, छे ? आता मला गेलंच पाहिजे. "

" भाऊ, अगदी आहे तस्सा आहे. नेहमी घोड्यावरून येतो जसा काही ! दहा वर्षांनी आलास. बैस की, आत्ता वरणाला फोडणी घालत्ये. जेवून जा. "

" नाही. विठे, मला जायलाच हवं. "

" कुठं जायचंय् ? "

भाऊरावच्या पाच मिनिटं स्तब्ध राहण्याने विठीने चटकन कढई चुलीवर ठेवली व तेलाचे भांडे उचलले.

" विठाबाई, खरंच मी जेवणार नाही. मी सिनेमाला जाणार आहे. तिकिट काढून ठेवलं आहे म्हणून, नाहीतर खरंच जेवलो असतो. "

" एकटाच ? आम्हांला पाहावासा नाही वाटत वाटतं सिनेमा ? "

" मग नाही कोण म्हणतंय ? चल की, मोठ्या आनंदानं. चला, जावईबुवा, आज माझ्याकडून हेच आग्रहाचं निमंत्रण होऊ द्या. नाही म्हणू नका. "

" आलो असतो भाऊराव. तुम्ही म्हणायचं मोठ्या माणसांनी आणि आम्ही यायचं नाही म्हणजे काय गोष्ट आहे ? पण जायचं कसं ? "

" अहो, त्यात काय आहे ? विठाबाईकडे पाहू नका. माझ्याकडून आमंत्रण आहे ना ? मी तयार करतो तिला ! नाही तरी ती माझा बाळपणीचा विठोबाच आहे. हं ! चल विठे. फर्माशीचा सिनेमा आणि जेवायलाही घालतो तिकडेच. लवकर आटोप, वेळ फार नाही. "

" कसं येणार रे ? हा सगळा फौजफाटा, हे लटांबर, आणि हे दांडखड—'

" ते काही नाही. तुझा फौजफाटा मी सांभाळतो, आणि दांडखड असलं म्हणून काय झालं ? आरव्या सिनेमात जावईबुवा सोडून तुझ्याकडे कुणी पाहणार नाही याची गॅरंटी माझी. हं चल. हा पाहा उचलला मी तुझा फौजफाटा. "

आणि दहा मिनिटांच्या अवधीत दोन रिक्षा–एकीत एक जोडपे आणि दुसरीत एक पुरी आणि वाकी तीन एक–तृतीयांश सवाऱ्या भरून–निघाल्या. माणिक सिनेमात वरच्या गॅलरीची मऊ खुर्ची विठाबाईने आपल्या पदराने पुसून आपल्या नवऱ्याला बसायला करून दिली.

सिनेमा सुरू झाला होता. शांता आपटे " किती किती सांगू तुलाऽगऽऽ—" म्हणून कुणाला तरी बजावीत होती. आपल्या परिचयापेक्षा तो आवाज वेगळा वाटून विठीच्या फौजफाट्याने युद्धाचे रणशिंग फुंकायला सुरवात केली होती. आणि विठी निळ्या अंधारात भाऊरावाला सांगत होती,

" पाहिलंस भाऊराव, मी म्हटलं होतं ना की तुझे पैसे जातील म्हणून ? हे दावेदार घरीच चैन पडू देत नाहीत तर मग इथे काय ? तुम्ही पाहा दोघं. मी बाहेर गप्प करते त्यांना. "

" छे विठाबाई, अग हा सिनेमा मी सातव्यांदा पाहतोय. हा तुझा लवाजमा मी नेतो आता आइस्क्रीमच्या शेतावर आणि करतो गप्प त्यांना सरदेशमुखी देऊन. तुम्ही दोघं पाहा. "

नंतर तो एक क्षणभरही थांबला नाही. ते तीन जीव उचलून त्याने अलगद बाहेर आणले आणि त्यांची युद्धाची साधने पेढ्याच्या बुचाने बंद करून टाकली, शिळा पेढा एकदम सात–आठ प्लेट खपल्यामुळे हॉटेलच्या मालकाने भाऊरावाला वेताची खुर्ची बसायला दिली आणि ' पुढील खिदमती ' साठी मधुमधुर हास्य केले.

" साहेब, ताजा थंड आइस्क्रीम आहे. बाबा लोक खुश होतील तुमचे. "

" माझे बाबा लोक ? "

" अरे साहेब, ही काय आपल्या हातची गोष्ट आहे ? ही तर देवाची मेहरबानी ! "

" असं होय ! बरं. ' मध्यंतरात ' दोन खुर्च्या, एक टेबल, खायलाप्यायला अन् सहा प्लेट आइस्क्रीम अन् तीन पान—"

" बहोत बहोत ठीक, साहेबजी. "

सिनेमा अर्धा झाल्याची घंटा झाली. विठाबाई आणि तिचा नवरा बाहेर आला. हॉटेलात येऊन दोघंही अगदी जवळ खुर्च्यांवर बसली. मुले मजेत होती. प्रत्येकाच्या हातात एकेक आणा होता. आणि द्रव्याचे मूल्य त्या वयातही त्यांनी ओळखून घेतले होते. विठाबाईच्या चेहऱ्यावर लहानपणी परकर खोचून पाडाचा आंबा चोखल्यागत समाधान झळकत होते. चेहऱ्यावरच्या पाच मुलांनी पाडलेल्या सुरकुत्या क्षणभर नाहीशा झाल्या होत्या. डोळे आनंदाने भरले होते. नवऱ्याने चमचाभर आइस्क्रीम तोंडात घालताच तिच्याने बोलल्यावाचून राहवेना.

" भाऊ, आज अगदी देवासारखा आलास ! विचार यांना––गेल्या दहा वर्षांत जोडप्याने मिळून निवांतपणे आम्ही सिनेमा पाहिला नव्हता. विचारले ते खरे ना ?"

नवऱ्याला त्याच्या पुरुष असण्याची जाणीव झाल्यामुळे त्याने कर्तबगारीचे उत्तर दिले,

"वा वा ! :पण भाऊसाहेबांचा सिनेमा गेला की ! हे काही बरं झालं नाही. तुम्ही पाहा हो भाऊराव सिनेमा आता. मी सांभाळतो मुलांना. माझं काय, मी हवा तर उद्या येऊन पाहून घेईन."

विठाबाईचा हात आखडला गेला. आईस्क्रीमचा चमचा तोंडातच राहिला आणि तिचा चेहरा एकदम पडला.

"हे पाहा. ठरलं ते ठरलं. विठे, तुझी पोरं माझ्यावर खुश आहेत. जोडप्यानं अर्धा नाही पूर्ण सिनेमा पाहावा. नाहीतर एकेका वर्षात चार मुलं होतात नव्या शास्त्राप्रमाणे !"

हॉटेलच्या मालकाला यात हसण्यासारखे काय दिसले कुणास ठाऊक ! पण तो मोठ्यांदा हसला, आणि मग मुलांसहित सर्वांना हसणे भाग पडले. मध्यंतर संपल्यावर फौजची फौज भाऊरावांच्या ताब्यात राहिली आणि हॉटेलच्या मालकाचा तीन प्लेट पेढा आणखी खपला.

सिनेमा संपला. विठाबाई नवऱ्यासहित बाहेर आली. तिला सिनेमा फार आवडला होता आणि ती खुशीत येऊन नवऱ्याच्या जवळून जवळून चालत होती. भाऊरावने एक टांगा ठरविला. पैसे अगाऊ देऊन टाकले. पेंगत असलेली मुले विठीच्या आणि तिच्या नवऱ्याच्या मांडीवर दिली आणि कितीतरी वेळ हळूहळू जात असलेल्या टांग्याकडे तो सारखा बघत राहिला. विठाबाई म्हणत होती, "भाऊ, एकदा जेवायची सवड काढून ये. मग तुला घाई करू देणार नाही. आणि तुला पावट्याची उसळ आवडते ना ? ती करीन आणि पोटभर खाऊ घालीन."

नवरा म्हणत होता, "भाऊराव, अवश्य या बरं. बहिणीचं आमंत्रण आहे. ते टाळलं तर देव शिक्षा करील. चिंतू, दाम्या, ठमे, अरे मामांना नमस्कार करा ना ! आणि ते पैसेही हातात ठेवले वाटतं ?"

तथापि भाऊरावला यांपैकी काहीही ऐकू आले नाही. आणि ऐकण्याच्या स्थितीत तो आला तेव्हा टांगा दृष्टीआड झाला होता.

तो परतला. समोरच्या ठेलेवाल्याने पुनः एकदा मोतिया तंबाखूचे पान खाऊन जाण्याची याद दिली, पण त्याला पान खावेसे वाटले नाही. घरी येताना उगीचच एक फार दिवसांपूर्वी आवडलेल्या गाण्याची लकेर ओठांवर आली. खोलीवर येताच दारावरचे कुलूप हसत असल्याचा त्याला भास झाला. आणि खोलीतील एकलेपणाची भीती नाहीशी झाल्यागत त्याला वाटले. काही वेळापूर्वीचे त्याचे दुःख–असह्य भार–त्याची "जवाशीही" तुलना करताना त्याला संकोच वाटला.

आणि काही क्षणांनंतर--खरोखरीचच काही क्षणांनंतर--बाहेरच्या कपड्यांनिशीच, फार दिवस रुसवा धरलेल्या पण आता बिनशर्त तडजोडीला उत्सुक असलेल्या प्रेयसीच्या अधीरतेने झोपेने त्याला का, कसे नि केव्हा आपल्या बाहुपाशात घेतले हे त्याला कळले, जाणवलेही नाही.

२८।१०।५०

११८

चोरी

माझ्यापासून कुणी आनंद चोरतात की नाही हे कळायला मार्ग नाही. माझ्यावर काही चोरण्याची कधी पाळी येईल असे मात्र मला स्वप्नातही वाटले नव्हते.

कारण, ज्याला उच्च, सुशिक्षित, सुखाचे जीवन म्हणतात ते मी गेली पंधरा वर्षे जगत आहे. ज्या जीवनाच्या हव्यांसाठी जगडव्याळ अशी दोन युद्धे झाली आणि तिसरे होण्याची वादळे जागोजागी उठली आहेत ते सभ्य आणि सुसंस्कृत जीवन, अगदी आदर्श असे, मला लाभले आहे. मोठमोठ्यांची चरित्रे वाचून, अभ्यासून मी माझ्या कुटुंबाचे वेळापत्रक तयार केले आहे. समृद्ध संसार करणारी आवडती बायको, ज्यांच्या शरीर व स्वभावाचा सुगंध दरवळेल अशी गोजिरवाणी मुले, नोकरचाकर, सुंदरशी बंगली, सुबक मोटार, हवे तसे, हवे तेवढे झकास कपडे, लागेल तेव्हा सोन्याचा घास आणि माझ्या हाताखालच्या लोकांनी आपली घड्याळे लावून घ्यावी अशी माझी दिनचर्या—थोडक्यात म्हणजे स्तालिनपेक्षा सुखाचे, ॲटलीपेक्षा सरस आणि ट्रूमनपेक्षा नेटके असे माझे जीवन आहे. त्याबद्दल स्तुतीचा रतीबही मला आहे.

आणि तरीही माझ्यातला हा उच्छृंखल माणूस ! तो कधी कधी नाठाळ घोड्यासारखा मध्येच अडून बसतो; वाईट शिवलेल्या बुशकोटासारखा अडस होतो; कार्बोरेटरमध्ये कचरा अडकलेल्या मोटार-सायकलसारखा स्टार्टच घेत नाही. तो मला म्हणतो की, घरी केलेला पत्री–विलायचीचा विडा थुंकून टाक नि चौरस्त्यावरील ठेल्यावर पानपट्टी, विकत घेऊन तंबाखू चोळीत उभा राहा; चार दोस्तांना घेऊन एखाद्या कोपऱ्यातल्या हॉटेलात चहा पीत बैस; गर्दीतून वाट न काढता तेथेच थांब अन् रस्त्यावरचे भांडण पाहत उभा राहा. जाऊ दे तुझे ते ऑफिस, जळो तुझे घर, आग लागो तुझ्या रविवारच्या शिस्तबद्ध आउटिंगला...

आणखी माझ्या बायकोमुलांवरूनही तो मला शिव्या मोजतो. तो म्हणतो--कसले मॅनरलेस नि कसले काय ! एखाद दुसरा दिवस तुझ्या बायकोला वेणीफणी न करता चहा करू दे. तोंड न धुता तुझ्या मुलांना तो पिऊ दे. ट्रे नको, टेबलक्लॉथ नको;

अगदी स्वयंपाकघरात बैस पाट मांडून. आजूबाजूला मेंड्यांची, वांग्यांची डेखे पडली आहेत, रात्रीची उष्टीखरकटी तशीच आहेत, साखरेच्या डब्याचे झाकण हरवले आहे. मुले साखरेचे बोकाणे मारताहेत, मोठी मुलगी वोट बुडवून तीर्थासारखा पाण्याचा पेला हाती देत आहे आणि असेच काही काही होता होता आपला चहाचा कार्यक्रम आटोपतो आहे.

हे सगळे मी केले असते. पण त्याची अट अशी की, मी हे सगळे चांगुणे-सारखे पार पाडावे हसत गात ! आंबा चोखल्यागत त्याचा रस गिळावा आणि विॅटॅमिन ' सी ' मिळाल्यासारखे समाधान मानावे.

तसे म्हटले तर तो माणूस म्हणजे मीच नाही का ? मग त्याचे म्हणणे मी ऐकणार नाही असे कसे होईल ? बायको रुसली तर तिला आपण एखाददिवस गर्दीतूनही मोटार हाकू देतो ना ? मुलांसाठी आपण सर्कस पाहतोच की नाही ? किती बरे वाटते हे सुखेसुरवाडे पार पडले म्हणजे ! मुले सर्कस पाहतात आणि ' काय मूर्ख आहेत बेटे " असे म्हणत म्हणत आपल्याला आनंद होतो.

अशाच मोठेपणाने मी काल कोपऱ्यावरच्या हॉटेलात जाऊन बसलो होतो. मला जणू कुणी तरी सांगत होते. मी ऐकत होतो. माझेच मला जणू कर्तव्य-पालनाचे कौतुक होते.

आरंभी आरंभी तर--" काय ही घाण, कसे येतात लोक इथे ? कसले हे बकाली जीवन ? फुकट दिला तरी इथला चहा नको. दुगीच मोटार आणली. मॅनेजरच्या कपड्यांनी तर आपण आपली मोटारही पुसणार नाही. " असे सगळे आत्मगत भाषण मी चालविले. नंतर कुणी तरी चापल्यागत गप्प बसलो, आणि " चला, त्यातल्या त्यात बरे " असे म्हणत स्वतःची समजावणी करू लागलो.

समोरच्या टेबलावर दोन पोरसवदा इसम पोमेडने केस चापून बसविलेले, पान चघळीत बोलत होते. नर्गिस व कामिनी कौशलबद्दल इतके कौतुक व हव्यास मला नवीनच होता. समजा, आपण असे नटच झालो असतो तर--? विचार बरा होता. पण एकदम ब्रेक दाबून गाडी थांबावी तसा धक्का बसून मी सावरलो.

माझ्या ऑफिसातल्या सर्वसामान्य कारकुनांच्या जातीचे दोन जीव माझ्या अंगावरून जाऊन जवळच्या बेंचावर बसले. एकाचे वय बत्तीस, दुसऱ्याचे अट्ठावीस. दोघांच्या दाढ्यांचे खुंट वाढलेले. एकाची शेंडी टोपीबाहेर आलेली. वोटांनी घासण्याची सवय असल्याने दातांवर किटण बसलेले. एकाच्या हातच्या पिशवीतील कोथिंबीर डोकावत होती. दुसऱ्याच्या हाती ठिगळे लावलेली छत्री होती. एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून ते आत आले आणि मी माझ्या मनाशी त्यांना ' मॅनरलेस ' न म्हणता बसू दिले. त्यांचे संभाषण सुरवातीपासूनच माझ्या मेंदूच्या रेषांवर पिनसारखे गरगरू लागले :

" हे पाहा, सदाशिव, आजचा हा चहा माझ्याकडून. किती दिवसांत भेटलास ! परवा दसऱ्याचं सोनं द्यायलाही आला नाहीस. "

" छे रे, मी मोठा आहे तुझ्यापरीस. शिवाय पैसे आहेत मजजवळ आज. भाजीतून साडेचार आणे उरले. पालेभाजीच घेतली मी. "

" अरे, पैशाचा प्रश्न नाही. "

" मग कशाचा आहे ? मानाचा ? मान तर माझा आहे. आनंदही मलाच जास्त. अन् तू रे कुठून आणणार पैसे ? घरी आजार, भावाची नोकरी सुटलेली. चाळीस रुपयांत सहा जीव तू पोसतोस. ते काही नाही. ए पोऱ्या, दो सिंगल चाय, आणखी काही घेतोस ? खाऊ या काही. "

" नको रे बाबा, आज भरपूर झालंय. शेजाऱ्यांनी ओल्या शेंगांची वानगी पाठविली होती. उसळ रगड खाल्ली. "

" बरं, असू दे. आपण काय असे नबाबाचे वेटे लागून गेलो आहोत नको तेव्हा खायला ? हं, चल, सांग तुझी सुखदुःखं, बरं वाटतंय इथं, नाही का रे ? "

" आपण दोघं कुठंही भेटलो असतो तरी असंच वाटलं असतं. "

" तेही खरंच. मुलं काय म्हणताहेत तुझी ? "

" ठीक आहेत. लहानीला डांग्या खोकला आहे आणि मोठ्याच्या पायाला जखम आहे. रात्री जागरणं चालू आहेत. पण मला फारसा त्रास नाही. "

" मग बायकोच जागत असेल नाही ? "

" हो, ती म्हणते तुम्हांला दिवसभर कचेरीत काम असतं, माझं काय, घरीच असते मी—"

" चांगलं वाटतं असं आपल्या बायका म्हणतात तेव्हा. नाही ? "

" हो, अन् आपल्यालाही तास दोन तास जागावसं वाटतं. काल तर दोन वाजेपर्यंत गोष्टी करीत होतो आम्ही. काही विषय नाही, ताळ नाही, तंत्र नाही. हसणं, खिदळणं नाही. ती म्हणत होती की, मला फार कष्ट होतात आणि मी म्हणत होतो की, तिला फार राबावं लागतं. "

" खरं आहे. त्याच आपला संसार टिपतात, शिवतात, झाकतात. कोंड्याचा मांडा करतात. दांडखडांची पैठणी करतात. आपल्या बायका म्हणजे औषधासारख्या असतात. नाही का रे ? "

" आणखी काल काय म्हणत होती सांगू ? ती म्हणाली, 'शेजारची यशोदाकाकूची निर्मला अगदी माझ्याजोगती होती. तिनं माझा संसार सुखाचा केला असता.' अन् मी तिला सांगितलं की, 'माझ्यापरीस तालेवार नवरा तिला मिळाला असता तर तिची कष्टानं खारीक झाली नसती.' लग्नाच्या वेळेस कशी चांगली दिसत होती नाही ? '

"आपल्याला आपल्याच बायका नेहमी चांगल्या दिसतात. दिसायलाही पाहिजेत म्हणा. नाहीतर शरीर इकडे आणि मन दुसरीकडे. जमत नाही, परवडत पण नाही. जिच्यावर मन जडतं तिचंच सगळं संभाळावं लागतं. मग मुलाबाळांचं कसं निभणार, बाबा !"

"अन् ती तर मुलांना आणि मला पण संभाळते. मला तर काकणभर जास्तच. मुलीचं खोकणं कमी झालं पाहिजे, का ? तर रात्री माझी झोपमोड होते म्हणून. तिचं जरा विचित्रच आहे. जसा काही तिचा त्रास, तिची दगदग अशी काहीच नाही."

"दगदग असते रे त्यांना; पण आपण नुसतं म्हटलं तरी त्यांना बरं वाटतं. माझी बायको तर म्हणते, माझ्या केवळ शब्दानं तिला तूप साखर खाल्ल्यासारखं वाटतं."

"कोणतं तूप रे बाबा ?"

"अरे, कल्पनेतलं तूप निर्भेळ असे साजूकच असणार ! मी तर गेल्या पाच वर्षांत खरं तूप पाहिलं नाही की आणू शकलो नाही. दर महिन्याला ठरवितो की, आता नक्की अर्धा शेर तरी आणू. पण कसं नि काय, जमतच नाही."

"होतं रे बाबा, तसंच होतं. अरे, असं काही विचित्र त्रांगडं होऊन बसलं आहे की, तुपापेक्षा सिनेमाच फार महत्त्वाचा होऊन बसलाय्. आम्ही सिनेमाला का जातो सांगू ?"

"न गेल्यानं लोक मूर्ख म्हणतात, नावं ठेवतात म्हणून. आहे माहीत मला. कधी कधी तर पैसे नसले म्हणजे आम्ही नुसतेच फिरायला जातो. अन् गाजावाजा असा करतो की, सिनेमात अगदी फर्स्ट क्लासमध्ये बसलो होतो."

"सांगतोच मुळी तसं ! बाकी अशा थापांत आनंद असतो नाही का ? लोक आपल्याला मूर्ख म्हणतात व आपण त्यांना मूर्ख बनवतो अन् रात्रभर छान हसत हसत झोप लागते."

"तेवढंच समाधान. बाकी आपली हैसियत अशी की, भाजीवालीवर रागावणंही आपल्याला परवडत नाही. अन् मुलांचंही पाहावं लागतं ना ?"

"म्हणजे काय ?"

"माझ्या मुलांची म्हणजे गंमतच आहे बरं का ! त्यांची आई त्यांना मोठं वळण लावते. सकाळी उठावं, तोंड धुवावं, अंघोळ करावी, अभ्यास करावा. जेवणाचे वेळी कुरकुर करू नये,--हे करावं अन् ते करू नये. अरे, अशा बंधनात मुलं कधी राहू शकतात काय ?"

"राहतात बरं, आणि मोठ्यामोठ्यांची राहतात."

"ऊं ! ढापणं लावलेल्या टांग्याच्या घोड्यासारखी. एक पैशाचा सौदा बाजारातून आणता येत नाही अन् शाळेत पोचवायला नोकर हवा. मोहरमचा वाघ आला तर हे भोकाड पसरणार आणि आईच्या कुशीत दडणार !"

"मग तू त्यांना आई सांगते त्याच्या उलट सांगत असशील ?"

"मला काय गरज ? अन् असं आहे, आईंच्या उलट मी सांगितलं तर माझा अन् तिचाही आब राहत नाही त्यांच्याजवळ ! शिवाय मला ठाऊक आहे की, ती काही वाईट सांगत नाही. आणि मुलंही आपला मार्ग शोधतातच ना ? अगदी आईचं म्हणणं न टाळता !"

"तो कसा ?"

"आई सांगते ना सकाळी उठावं म्हणून ! तशी ती उठतात. त्यांना माहीत आहे की, या घरात बाबा नावाच्या संस्थेला उपदेश नाही. आई केरपोतेरे करायला गेली की दोघेही अगदी हळूच माझ्या बिछान्यात दडतात. एक एका बाजूला व दुसरी दुसऱ्या बाजूला. माझी झोप मोडू नये म्हणून हळूहळू बोलतात—

—यमे, ओरडू नकोस बरं का ! बाबा जागे होतील—=आणि त्यांच्या गळ्यात हात कशाला घातलास ? – पेंगू नकोस बरं, नाहीतर आई म्हणेल की, मुलं जागीच झाली नाहीत.

——मग मी बोलू कुणाशी रे ? झोप येतीय् मला, अन् बाबांच्या गळ्यात हात घातला म्हणून रे काय झालं ? तुझी नाही वाटतं तंगडी त्यांच्या मांडीवर ? बाबा आपले काही इतके वाईट नाहीत की एवढ्याशानं जागे होतील; मी हाक मारू का रे बाबांना ? —अरे, नाही बरं का यमे, मी सांगतो तुला –

——पण मला एक गंमत सांगायचीय् त्यांना, मग कुठं दिवसभर वेळ सापडतो ? बाबा, अहो बाबा, तुम्ही आज किनई, मॅच पाह्यला जा हो, अन् आईलाही घेऊन जा. उगीच नको त्या बेबीची ऐट. आमचेही बाबा जातात म्हणावं मॅच पाह्यला. मी हवा तर भात मांडीन. अन् तुम्हांला नि आईला रात्री जेवूपण घालीन——

—अग यमे ? मॅच कसली बेटा !

——मला काय माहीत ? ती बेबीच म्हणते की, मोठी मॅच आहे. तिथं खूप टाळ्या वाजवाव्या लागतात, डोळ्याला यंत्रं लावावी लागतात. ते काही नाही ; आज रात्री तुम्ही मॅचलाच जा—

पण यमे, मॅच दिवसा असते—

खोटं, बेबीचे बाबा तर रात्रीच गेले होते काकूंना घेऊन. तुम्ही पण रात्रीच्याच मॅचला जा. मग पाहिजे तर मला मोटार नको, अन् बापूला शिट्टी पण नको. होय ना रे बाबू ?—

हो, मला काय करायची शिट्टी ! मी पोलीसवाला नाही, इंजनचा व आगगाडीचा गार्ड होणार आहे—

गार्डच हो रे तू आपला. मग मी आपली दिल्ली–आग्रा पाहून येईन तुझ्या गाडीत. नाही तरी मला पाह्यचीच आहे दिल्ली एकदा. जाता जाता रस्त्यात मुंबई आणि कलकत्त्याला पण उतरू एक दिवस. आमच्या मोठ्या बाईच्या भूगोलात आहे दिल्ली न् कलकत्ता अन् त्यांच्या नकाशात रूळही आहेत, आमच्या नकाशात मेलं फक्त कोदामेंढी, तिवसा, गुमगाव, खापरी...

"...अशी सारखी बडबड चालते त्यांची. मी आपला अर्धवट झोपेत गुंगीत बोलतो, हुंकार देतो. एकजण इकडून बिलगतो, एकजण तिकडून. अंधारात ना त्यांचे कपडे दिसत, ना त्यांचे सुकलेले चेहरे, दुःख–खंत वाटायला कारणच नसतं. बोलता बोलता पुनः ती दडून दमडून झोपतात आणि झोपता झोपता मी सुखानं जागा होतो. मग हिची हाक येते. अन् थोड्या वेळानं ती स्वतःच येते. थोडंसं रागावते, मग हसून देते. तिला वाटतं, जणू आम्ही तिघंही तिची मुलंच आहोत. अन् मलाही वाटतं की, ही कुणीतरी माझी आईअक्का आहे व तिला म्यायला पाहिजे. मग उठून रोजची आह्निकं सात-साडेसातर्यंत; थोड्या वेळानं ती आपोआप माझी बायको होते व मी तिचा नवरा बनतो. आणि मुलं तर आमची असतातच, सकाळ येते, दिवस जातो, सायंकाळ होते अन् पुनः पहाट फुटते—आपली पाखरं, चंद्र, तारे, फुलं, तुळशी, सगळं काही घरीच— नाही का रे?"

"मालक, थे रस्त्यातली मोटार तुमच्यावाली व्हय का जी? जरा अव्हाटी. करान् ते बेस व्हईन वेटं; भरतीची बंडी आहे जी माही–"

अर्थात मला उठावेच लागले. कसल्या तरी जोशात मी उठलो. जणू मी त्या दोघांजवळ चोरण्यासारखे असलेले सर्व चोरले होते आणि इतके बेमालूम की कुणालाही त्याचा सुगावा नाही. उठण्याची आणखी घाई अशासाठी की, जमली तर एखादी सुंदरशी मीनाकाम केलेली चांदीची डबी घ्यावी आणि अंतरात कुठे कपाटखण असेल तर त्यात ती डबी हे सगळे डबोले भरून ठेवून द्यावी—जशा सुवासिनी करंडयात कुंकू ठेवतात तसे, जसे कुलवतीच्या पदराआड मंगळसूत्र असते-जशी आईच्या देवघरातील फुलोरीत चमेलीची फुले असतात तसे—!!

१८।१०।५१

११९

चार अध्याय

"डेला, एक मिनिट."

"आता कशाला बोलावता तिला? सगळं तर आटोपलंन् बिचारीनं."

"माझं एक जरूरीचं काम आहे."

"म्हणजे गप्पा मारायचं ना? तिला वेळ नाही म्हटलं रिकामटेकड्यांशी चकाट्या पिटायला."

"म्हणूनच ती तुझ्याशी बोलत नाही."

"माझं काम सगळ्यांना कामाला लावायचं आहे. चकाट्या पिटायचं नाही."

"मग बोलावलंच पाहिजे तिला. एखादं काम निघेलच तुझं. ए डेला, डेली ऽ ऽ"

"अच्छा, 'आ' चा 'ई' झाला तिच्या नावात?"

"त्यामुळे आ-ई च झालं ना? 'ध' चा 'मा' तर नाही केला?"

"मी नसत्ये तर तेही केलं असतं."

"पण तिला मंजूर कुठाय्?"

"व्हॉट्स द मॅटर नाउ?"

"डेला, वीस दिवसांपासून सारखी तुला मराठीची प्रॅक्टिस देतोय्. निदान गुरूच्या देखत तरी इंग्रजी बोलू नकोस."

"बरं, काय काम आहे आता?

"विचार त्यांनाच."

"तुम्हांला काही हवं मिसेस राजू?"

"मला काही नको. यांनाच काम आहे तुझ्याशी फार फार महत्त्वाचं."

"अशी पाहू नकोस माझ्याकडं डोळ्यांचं प्रश्नचिन्ह करून. काम आहे, पण ही म्हणते, तुला मंजूर नाही."

"कसली मंजुरी? मी कालच सांगितलं की, मला आज पिक्चरला यायचं जमायचं नाही. तीन सीरियस केसेस अन् नाइट ड्यूटी माझी."

"अस्सं! म्हणजे सिनेमाला नेणार होते तुला! आणखी काय काय करणार होते ग?"

"ते त्यांनी अजून सांगितलं नाही. म्हणूनच मला भीती वाटते नव्या औषधासारखी. बरं, कशाला बोलावलं ते तर कळू द्या."

"हेच सांगायला, की डेला फार गोड आहे. ती कशी कर्तव्यदक्ष आहे. आपल्या कामात कसं मन घालते. बरंच झालं, बायकोचं ऑपरेशन याच दवाखान्यात केलं—एक नी दोन! माझे कान किटले आहेत ऐकून ऐकून. आता तुझे कान हवे आहेत त्यांना."

"खरं का हो हे?"

"तुम्ही दोघीही असं सुंदर हसून एकी करायला लागला म्हणजे माझं मन गोंधळून जातं. खरं म्हणजे तुमच्यापैकी कुणीतरी एकीनं वाईट दिसाय-वागायला पाहिजे. नाहीतर जगातलं अर्धं काव्य नाहीसं होईल. बरं, जाऊ दे. आता सांग, काय कामं आहेत तुला यापुढे?"

"आता घरी जात्ये, वॉश घेऊन छानसा कपभर चहा घेत्ये आणि थोडीशी झोप."

"चहाच ना? मग मी करतो की मस्तपैकी."

"आणि झोपेचं काय? की तीही घेणार तुम्हीच तिच्या वाटची?"

"झोप? एक आजारी डॉक्टर आणि एक नर्स यांच्या देखरेखीत झोप? कोणत्या रोग्याला हे साधेल!"

"तुमच्यासारखा रोगी वणव्यातही झोप घेईल. माहीत नसेल त्याला सांगा. पण आता जात्येच मी. गप्पा मारू मग सायंकाळच्या राउंडच्या वेळी."

"डेली! मला बरं वाटावं अशी तुझी इच्छा आहे ना?"

"मग त्यात शंका कसली आली तुम्हांला डॉक्टर?"

"शंका नाही म्हणून सांगत्ये. यांना तू घेऊन जा तुझ्याकडं. तास दोन तास तरी मला आराम मिळेल; आणि जमलं तर कुणा एखाद्या हुषार सर्जनकडून यांच्या जिभेचं ऑपरेशन करून घे."

"हं चला महाराज; पेशंटची मर्जी राखण्यासाठीच मला पगार मिळतो. शिवाय ह्या डॉक्टर-पेशंट, शिवाय यांची मी शिष्या. पण अगोदरच सांगत्ये, मी फार वेळ नाही देऊ शकणार तुम्हांला."

"अग मलाच वेळ नाही फार. ही इथं अशी विश्रांतीसाठी धडपडत असता मी बाहेर वेळ दवडू? का नवरा आहे की कोण मी? चार-दोन तासांपेक्षा मीही अधिक वेळ देऊ शकणार नाही तुला. व्हेरी सॉरी."

"गुरुजी, मराठी, मराठी!"

"बरं चल; अच्छा मॅडम राजू, लवकरच परततो मी. तोवर झोप आराम, सर्व चालू द्या निर्विघ्न."

"डेली, तुझ्याबद्दल सहानुभूती व्यक्त करून मी आपलं भाषण संपवित्ये."

* * *

"पायीच जायचं?"

"नाही तर काय? फर्लांगभर अंतरासाठी विमान हवं तुम्हांला?"

"छान, तू नेहमी माझ्या मनासारखंच करतेस, बोलतेस, डेला."

"या वेळी मात्र केवळ मिसेस राजूंच्या म्हणण्याप्रमाणं सगळं करीत आहे. एक सांगू?"

"काय?"

"तुमच्या पत्नीच्या हसण्याबोलण्यात सर्वांचे मानसिक रोग नाहीसे करण्याचं सामर्थ्य आहे."

"अग, डॉक्टर आहे ती. मनापासून नाही हसत. शिकली आहे तसं हसायला."

"म्हणजे शिकून पुष्कळ गोष्टी येतात तर! मग तुम्ही का नाही शिकत?"

" काय शिकू सांग."

" फाजील बोलणं कमी करणं ! "

" ठीक आहे. तू शिकवतेस ? "

" हो, आज, आत्तापासून."

" बरं आहे. आलीच तुझी खोली. हो पुढं. तू सांगशील ते करतो, सांग."

" मग प्रथम या खुर्चीवर बस. मी वॉश घेत्ये. पाच मिनिटांनी तीन कप पाणी किटलीत ठेवून प्लग लाव. चहा ह्या डब्यात; साखर ही इथं. दूध डब्यातून तयार करायचं. चहा वाईट झाला तर सरळ खोलीबाहेर पडून मला किंवा डॉक्टरला आपलं तोंड दाखवायचं नाही. "

" ते तर मी....."

" चूप. बोलायचं नाही अगदी चहा होइसतोवर. "

" चहा तयार आहे मिस्सीबाबा. "

" मिस्सीबाबा पण तयार आहेत. बॉय त्यातली बिस्किटं काढून घे. "

" यस् मॅडम. "

" छान, आजपासून पगारात पाच रुपये बढती."

" नो मॅडम. "

" मग काय ? "

" मॅडमबरोबर बसून चहा पिण्याची परवानगी. "

" ओ यू स्वीट टायनी मॉन्स्टर."

" डेली ! तू असं हसावं म्हणून मी काय हवं ते करीन. "

" मी एकटीनंच हसावं म्हणून ? "

" नाही, मला आवडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनं. "

" मी आवडत्ये तुला ? "

" शंका आहे त्यात तुला कसली ?

" नाही. तरी पण..... "

" तू फार आवडतेस, अतिशय हवीशी वाटतेस. का ग ? एकदम गंभीर झालीस ? "

" व्हावं लागतं कधी कधी. "

" का ? "

" आवडत्या माणसाच्या अहंकाराला बरं वाटावं म्हणून, त्याचं स्वतःवरचं लक्ष दुसऱ्याकडं ओढलं जावं म्हणून. "

" अग ! माझं लक्ष सदाच दुसऱ्याकडं असतं. "

" नाही, कधीच नाही. "

" तू डॉक्टरला विचारलंस ? "

"हो. म्हणूनच सांगत्ये. डॉक्टर म्हणाले, तुझ्यासारखी अहंकारी माणसं अतिशय मतलबी असतात. दुसऱ्याचा उपयोग आपल्या स्वार्थापलीकडे त्यांना नको असतो."

"म्हणजे तुम्ही माझ्यामागं माझी निंदा करता तर!"

"दोघींना एकटं बोलायची संधी देतोस तेव्हा बोलतो तुझ्याविषयी. डॉक्टरचं म्हणणं की राजू फार अप्पलपोटा आहे. आपण नुसती पाखरं आहोत भोळी भाबडी; जाणून सवरून त्याच्या खांद्यावर बसतो."

"डोक्यावर बसतात चांगली, नुसत्या खांद्यावर नाही."

"जग हसलं असतं डोक्यावर पाखरं बसली असती तर!"

"माझं फार मोठं काम झालं असतं. चार-दोन माणसं मनापासून आनंदून हसली तरी मरायला तेवढं भांडवल मी पुरेसं समजेन."

"राजू, तू फार वाईट आहेस. असं कशाला बोलतोस?"

"डेली, मी फार चांगला आहे. सारं जग म्हणतं."

"म्हणजे तुझी बायको म्हणते ना?"

"नाही. सगळे माझ्याशी चांगले वागतात."

"हाच तो अहंकार."

"कालची सायंकाळची गंमत सांगू?"

"कसली गंमत?"

"काल घरी गेलो होतो. तुझी, वासंतीची म्हणजे तुझ्या डॉक्टरची आठवण मनात होती. खुशीत होतो. दुःख एवढेच की, मनापासून शोक, खेद वाटावा असं काही घडत नव्हतं. विचार केला की, जावं अन् एखादं तत्त्वज्ञानाचं पुस्तक वाचून संपवावं—"

"त्यापेक्षा लिहून संपविणं बरं."

"ऐक तर. दाराला कुलूप होतं, कारण घर दवाखान्यात बिछान्यावर पडलेलं. कुलूप उघडणार, तो त्या कुलुपात काय दिसलं सांग पाहू."

"कुणीतरी येऊन गेल्याची चिठ्ठी."

"अगदीच अरसिक नर्स आहेस तू, डेली! त्यात एक जाईची कळ्याफुलानं भरलेली चार-दोन पानांची नाजूक डहाळी—एक उमललेलं फूल, चार-दोन उमलत्या कळ्या, तीन-चार कोवळी पानं..."

"खरं? कुणी ठेवली असतील रे?"

"ते कळलं असतं तर मला फार वाईट वाटलं असतं. चांगल्या गोष्टी फार कमी वेळा घडतात व नावानं त्या डागळतात. कुणाच्या तरी वेणीतला तो घोस होता एवढं

खास. व्यक्तीबद्दलचा विचार मी माझ्या मनाला शिवू दिला नाही. डेली, सत्कृत्याचा कर्ता नेहमी अज्ञात असावा, हाच जगातला सगळ्यात अद्‌भुत रोमान्स."

"तू काय केलंस त्या फुलांचं?"

"उदबत्तीच्या घरात खोवून ठेवली सुगंध यावा म्हणून."

"सुंदर! खरंच, कोण आहे असं तुझ्या ओळखीचं?"

"मला माहीत नाही. माझी बायको पूर्वी असं कधी कधी सुंदर करून जात असे माझ्यामागं. आता तिला तशी गरज उरली नाही. आता सगळं घरच तिनं सुगंधानं भारून टाकलं आहे. डेली, तुला असं नाही वाटत का, की माझ्या मागेही लोक मजबद्दलचे आपले सद्‌भाव असे व्यक्त करून जातात?"

"हाच तो तुझा अहंकार पुनः, राजू!"

"म्हण तुला काय हवं ते."

"बरं, एक प्रश्न विचारू?"

"नाही."

"का रे?"

"तू असं गोरंमोरं व्हावंस म्हणून. बरं, विचार."

"खोटाड्या बॅड बर्ड. बरं, मला सांग, तू किती मुलींवर प्रेम केलंस आजवर!"

"पुष्कळांवर. किती नावं सांगू?"

"आणि त्यांनी पण तुझ्यावर प्रेम केलं?"

"हो, अगदी मनापासून."

"त्याचा परिणाम?"

"तोच प्रश्न अजून सुटला नाही. प्रेमातून दुःखच निर्माण होतं असा संकेत आहे. म्हणून मला वाटतं, माझं सगळं प्रेमाचं प्रकरण खोटं आहे."

"असं का म्हणतोस?"

"मग काय म्हणू! अग, मीही आनंदात आहे अन् त्या सगळ्या मुलीही सुखात आहेत. कुणाची लग्नं झाली आहेत. कुणाची व्हायची आहेत. कुणी कुणी आपला प्रवासही संपवला आहे."

"कसा बोलतोस रे!"

"अग, त्यात काय! मी खरं तेच सांगतो!!"

"त्या कधी भेटतात तुला?"

"हो, नेहमीच. खूप मजेत आहेत. संधी सापडली की निःसंकोचपणे बोलतात, हसतात, विषाद नाही. क्षतीची जाणीव नाही."

"मग सांग ना एखादीचं नाव?"

"एखादीचं का? सगळ्यांचीच सांगेन. ज्या भेटण्यासारख्या आहेत त्यांच्याकडे तुला घेऊन पण जाईन. ज्या भेटणार नाहीत....."

" म्हणजे ? "

" म्हणजे ज्या दूर आहेत–ज्यांना भेटणं तुझ्यासारख्या सुंदर नि शिकलेल्या मुलींच्या रीतिरिवाजात बसत नाही..."

" अशांवरही तू प्रेम केलंस ? "

" प्रेमाला काही विशिष्ट असं क्षेत्र वाटून दिलेलं नाही. का तर कुणास ठाऊक ! डेली, मला आज सकाळपासून एका मुलीची आठवण येतीय्, गेल्या पाच वर्षांत कधी आली नाही. तिला नक्की काही तरी अडी-अडचण आली असावी. एरवी माझी अशी गरज तिला भासली नसती."

" कुठं राहते ती ? "

" दूर एका खेड्यात, जिथं माझं बालपण गेलं, जिथं मी वयाच्या दहा वर्षेपर्यंत खेळलो, जिथं मी माझं पहिलं वहिलं प्रेम ओतलं. "

" नाव काय तिचं ? "

" अलोकी. जात मला वाटतं गोंड किंवा भोयर."

" नक्की जातही माहीत नाही ? "

" कधी काम पडलं नाही; कसलीही अडचण आली नाही. "

" प्रेम कसं जडलं ? "

" जडलं नाही, जडवलं."

" कुणी ? "

" सगळ्या गावकऱ्यांनी. "

" मला नाही कळलं ! "

" तू आमच्याकडल्या खेड्यात चल एकदा. तू आता आमची झालीच आहेस. आम्हीही तुझ्या तिकडे येऊ. होय, तर तिचं नाव अलोकी. तिचा बाप आमच्याकडे अर्धा हिस्सा कबूल करून शेती करायचा. त्यामुळं दोन्ही कुटुंबं एक झाली होती. माझे लाड करायची अलोकीची आई आणि तिचे करायची माझी आई. त्यामुळे अलोकी आमच्यासारखी दिसायला लागली आणि मी त्यांच्यासारखा दिसू लागलो. "

" म्हणजे कसा ? "

" माझा रंग मऊ, गोरा, सपिटासारखा होता तो उन्हातान्हात जरा लाल करडा झाला व मी मुलगा दिसू लागलो अन् अलोकी अशीच माझ्या आईच्या सावलीत मुलगी दिसू लागली. खेळणं, चिंचा खाणं, गावभर धुमाकूळ घालणं यांमुळे आमच्या दोस्तीला उपयोगाचं स्वरूप आलं. दोन आया कौतुक करीत भांडू लागल्या म्हणजे मी होत असे अलोकीचा नवरा व ती बने माझी नवरी. "

" दोन्ही आयांनी शिक्षणविषयक मानसशास्त्राचा मुळीच व्यासंग केला नव्हता म्हणेनास. "

"तसं असतं तर माझी एकदम शहरात उचलबांगडी झाली असती. पण या नवरीचा संबंध जडायचा होता. अलोकीला कधी कधी लाडात येऊन 'नवरी' म्हणून हाक मारी; आणि मग ती मला मारायला धावे,"

"त्या वेळी तुमची वयं काय होती?"

"ती होती आठ वर्षांची व मी दहा. दोन-तीन वर्षांनी अलोकीचं लग्न झालं. तेही आमच्याच एका तिच्या जातीच्या दोस्ताशी. त्याला मी कित्येकदा चिंचेच्या झाडावरून खाली पाडलं होतं आणि अलोकीनंही चांगलं बदडलं होतं. पण तो लेकाचा आमच्यासाठी जीव टाकायचा आणि अजूनही टाकतो."

"आता कुठाय तो?"

"तिथंच आहे. मोलमजुरी करतात दोघंही. पण डेला, दोस्ती कशी असावी हे मी त्याच्या म्हणजे सुक्कूजवळून शिकलो. मागे भूमिगत व्हावे लागले ना? तेव्हा तीन महिने त्यानं मला लपविला होता."

"म्हणजे इतक्यात भेट झालीच नाही."

"नाही. त्या वेळेचंच सांगतो. तो कामाहून आला की म्हणायचा: 'राजू' ही तुझी बायको संभाळ बाबा. मला नाही आटोपत. तुझ्या आईनं हिला सावलीतलं काम शिकवलं. ही उन्हात जाते कोमेजून अन् हिनं माझी चवही बिघडवलीन्.' त्यावर अलोकी म्हणायची: 'अन् स्वतः? स्वतःमध्ये शहरातल्या माणसावाणी दुर्गुण आणले व मला स्वयंपाक करावा लागतो दीड वुटली. त्यातून एवढंस काही गोडधोड केलं तर म्हणतो, राजू नाही; हे राजूला आवडत होतं अन् ते आवडत होतं. जसं काही राजूशीच निका लागला याचा.'"

"मग तू काय उत्तर देत होतास राजू?"

"मग कोण बोलू देणार? सुक्कू मग रागावून म्हणे—'अलोके, खोटं बोलू नकोस. देव काही उठून गेला नाही माणसांतून. हीच म्हणते रे की, राजूला हे पाहिजे अन् ते नको. झोपेतही मला वाटते राजू राजून्न करते.'

"कधी ऐकलं होतं?'

"ऐकायला कशाला पाहिजे? राजूचं नाव काढलं की मुखडा होतो तुझा पळसाच्या फुलावाणी."

"अन् तुझा तर बिब्यावाणीच होतो, नाही? देव खोटं बोलणाऱ्याच्या तोंडावर गरम पाणी का टाकत नाही कुणास टाऊक!"

"बायको टाकते म्हणून."

"हं! अन् नवरा उठल्यासुटल्या जातो मी शहरात राजूकडे म्हणून धमक्या देतो तो?"

"राजू, पाहा रे बाबा, ही मला काही बघत नाही. खरं म्हणजे ही तुझीच बायको शोभते. घेऊन जा शहरात. जरा साफसूफ करून नवं लुगडं नेसवलं की तुझ्या जातीतही उठून दिसेल. थोडं इंग्रजी शिकवून दे अन् नांदू दे."

"हं अडलं माझं खेटर! तिसऱ्या दिवशी इकडे बुवाजीचा हातपाय वागत नाही अन् म्हणे जा घेऊन शहरात अन् नांदव. जाईन मी त्याच्याकडे त्याचं दुखलं खुपलं तर. आज तर चांगला दिसतो बोक्यावाणी. घरी बसून खायचं अन् रानावनात हिंडायचं. स्वराज्य कमावणार म्हणे."

"तुझ्या कमाईचं खात नाही तो. मी घाम गाळतो, रक्तही गाळीन त्याच्यासाठी."

"अहा रे रक्त गाळणाराची सुरत! एवढी तयारी आहे तर जा ना त्याच्या-बरोबर शहरात अन् शिकून ये बायको कशी वागवावी ते..."

"असं चालायचं नेहमी. आणि मग गरम साधं जेवण व बाळपणीच्या गप्पा. सुक्कूला वाटतं अलोकी आजही माझ्या लायक आहे. म्हणून तो तिच्यावर खूप जीव लावतो आणि अलोकी म्हणते, सुक्कू माझा दोस्त आहे त्या अर्थी तो चांगलाच आहे अन् घटकाभरही विसंबत नाही त्याला. कामालाही दोघं एकाच ठिकाणी जातात. पण एक सांगतो, डेली, मला काही झालं सवरलं तर तुझ्या त्या फुलवाल्या न् गुलाबी पत्रवाल्या पोरी राहतील एका बाजूला आणि रक्त देईल माझा सुक्कू व जीव टाकील माझी अलोकी."

"हो, टाकील. खात्री आहे माझी. मलाही घेऊन जा एकदा त्याच्याकडे. पाहावंसं वाटतं तुम्हा तिघांना एकत्र. त्यामुळं कितीतरी पुस्तकं वाचण्याचा त्रास वाचेल माझा. बरं पण का रे?"

"काय?"—

"तुझ्याकडून काय अपेक्षा आहेत त्यांच्या?"

"तेच कळत नाही. अलोकी म्हणते सर्वच तिचं आहे. गरज पडली तर येईल ती माझ्याकडे. आणि सुक्कू तर कधीचाच मला हिंदुस्थानचा बादशहा बनवून चुकला आहे व स्वतः झाला आहे सेनापती!"

"छान—तुझ्या बायकोला ठाऊक आहे हे सगळं?"

"नाही तर काय! तिला सगळंच ठाऊक आहे. पाच वर्षं सगळं पाहून, अनुभवून मग एक दिवस तिनं हे असं मला फसवून माझ्याशी लग्न लावलं."

"फसवून काय? अरेरे बिचारा, गरीब! पण तू बरा बिचारा फसलास?"

"गत्यंतरच नव्हतं. तिनं एकदम ठासून सांगितलं की तिच्यावाचून माझं निभायचंच नाही. मग करता काय? पण आता तिच्याजवळ अलोकीची आठवण काढू नकोस बरं."

"का ?"

"का म्हणजे ? शहाणीच आहेस ! आता तिला दवाखान्यातून नेलं म्हणजे डॉक्टर म्हणणार विश्रांती व हवापालट. मग ही म्हणणार, मी जात्ये अलोकीच्या झोपडीत. जायला हरकत नाही. पण सुक्कू पडला मुलतानाचा शहाजादा. एक कवडी घेणार नाही आमच्याकडून आणि मग दोघंही रात्रंदिवस राबतील कर्ज फेडत. त्यांच्या संसाराचं सगळ सुखदुःख श्रमावरच उभं आहे. मजकडून काही घ्यायचं म्हणजे त्याचा अपमान होतो अन् पुरुष म्हणून त्याची समजूत पडली तर ती माझी अनामत अलोकी माय--ती आम्हा दोघांनाही जिवंत ठेवणार नाही. त्यांच्या महत्त्वाकांक्षाही कमी नाहीत."

"कोणत्या आहेत ?"

"वासंतीचा पहिला मुलगा अलोकीच्या घरी जन्माला येईल आणि सेनापती सुक्कूजी त्याला शिकार करायला शिकवतील."

"का ? बाप तर चांगला शिकारी आहे !"

"अग, ही अशी शिकार नाही. चांगली खरोखरीची."

"डॉक्टर कबूल आहे याला ?"

"ती ? ती म्हणते, तिचा नवरा खेड्यात राहून तिला मिळाला तर मुलालाही तसं राहणं भागच आहे."

"तुमचं कधी भांडण होत नाही का रे ?"

"होतं ना !"

"कधी ?"

"मी जरा चार बुकं वाचत असतो. कधी वाटतं त्यांच्याप्रमाणं आपला संसार करावा. मी मग ठरवतो, आता कुणाशी भेटाय-बोलायचं नाही. सर्व प्रेम आणि इत्यादी बायकोवरच लादायचं. अशा वेळी ती मला भूत म्हणते अन् सांगते की, तिला जिवंत राहायचं आहे व एवढं ओझ नको आहे. चार दिवस आमचं भाषण, संवाद बंद. सगळं स्वगत. आणखी पुस्तकं चुलीत जाऊ नयेत म्हणून आम्ही ती लायब्ररीत परत करतो."

"तिला कधी वैफल्य वाटत नाही ?"

"हे पाहा, मिस्सीबाबा, आता झालाय उशीर. तुझीही ड्यूटीवर जायची वेळ झालीय. चल, आपण जाता जाता बोलू."

"जाण्याचा विषय काढलास अगदी ?"

"विषय नाही, वस्तुस्थिती."

"आणखी थोडा वेळ बसलास तर ?"

"माझी हरकत नाही, तू आपली ड्यूटी पाहा. मला तर आनंदच आहे."

"कशात ?"

"तुझ्याशी बोलण्यात, तुझ्याबरोबर राहण्यात, तुझ्या सहवासात."

"हे डॉक्टरला माहीत आहे ?"

"हो. तिला हेही ठाऊक आहे की, तुझ्याशिवाय आताशा मला करमत नाही म्हणून. यासाठीच तर तिनं माझी धिंडका आज तुझ्याबरोबर काढली."

"बरं, जाऊ या, चला."

* * *

"मग सांग ना ?"

"काय ?"

"तुझ्या बायकोला कधी वैषम्य वाटत नाही ? कधी भीती वाटत नाही ?"

"कशाची ?"

"तूं तिच्या हातून जाशील याची."

"तिला ? आणि भीती ? मला भीती वाटते तिची."

"कशाबद्दल ?"

"तीच माझ्या हातनं जाईल याची ! आता मी तुझ्याबरोबर आलो नसतो तर तिनं म्हटलं असतं, भेकड, मित्रा !"

"पण समजा, मी आता म्हटलं की, माझं तुझ्यावर प्रेम आहे, मला तू खूप हवासा वाटतोस—तर ?"

"तर तिचं म्हणणं खरं ठरून ती अधिक फुशारकी मारील, दुसरं काही नाही !"

"पण...?"

"पण काय ?"

"कुणास ठाऊक काय बिचारायचं ते !"

"न विचारताही मी सांगतो; डेली, हे पाहा, एकमेकांबद्दल काही वाटल्याशिवाय कुणी असा जीव टाकीत नाही. शिवाय अशा जीव टाकण्यातून दुःखच निर्माण करावं अशी माझी, वासंतीची किंवा तुझीही प्रतिज्ञा नाही."

"माझ्याबद्दल कसं बोलतोस तू ? समज, मीच तुझ्याशी लग्न करायला तयार झालये तर ? मी वाईट नाही. तुला अभिमान वाटेल इतकी चांगली आहे व हे तुला माहीत पण आहे."

"पण लग्नाला एवढ्याच गोष्टी पुऱ्या नसतात. तू सुंदर आहेस व मजबर प्रेम करतेस म्हणूनच चार-आठ दिवसांत तुला कळेल की, तू बोलतेस ते बोलणं नव्हे."

"मला नाही कळवून घ्यायचं."

"अग, ते कळवून घ्यावं लागत नाही. आपोआप कळतं. आठ दिवसांनी भेटू ना आपण ! त्या वेळी आपणा उभयतांना परस्परांच्या सहवासाचे क्षण देतील शांती-समाधान-तृप्ती ! थंडीत ऊब मिळावी, वाळवंटात गारवा लाभावा, विसंगतीत संगती साधावी तसं वाटेल आपल्याला. कारण आता झाकलेलं काहीच नाही. जे उघड झालं त्याला बाहेरची हवा लागेल नि ते टिकेलही."

"ठीक आहे. तुझी व माझी आशा सफल होवो."

"पण डेली--"

"काय रे ?"

"तू आज असं का बोललीस ? असा तुझा स्वभाव नाही. पाण्याचे थेंब कमलपत्रावर मोत्यासारखे शोभतात. त्याला ते ओले करीत नाहीत. मग तू असं का म्हणतेस ?"

"तुला बरं वाटावं म्हणून."

"मला ?"

"पुरुषांना स्त्रीच्या प्रेमाच्या कबुलीनं बरं वाटतं. निकरानं, निक्षून, तळमळीनं सांगितलं तर तुझ्यासारखे अहंकारी अस्मान चढून जातात आणि—"

"आणि काय ?"

"काही नाही."

"आता काय लपविण्यासारखं राहिलं आहे राजा, मला नाही सांगणार ?"

"तसं नाही रे ! पण माझ्या राजा, मलाही मानवाचं मन दिलं आहे देवानं ! मी काही संत-महात्मा नाही. मलाही सुखाची, समाधानाची हाव आहे. मीही स्वार्थी आहे. त्यासाठी माझ्या जीवनात मी बेरीज, वजाबाकी, गुणाकाराची गणितं योजीत असत्ये आणि ती सोडवीत बसत्ये. ती अशी कुणाला सोडवून दाखविली तर मनाचा गाळ धुऊन निघतो. माझं तर सगळंच व्हायचं आहे, राजू ! आता मी केरकचरा साचवीत राहिल्ये तर तू कित्येकदा म्हणतोस ना की, मी आल्ये म्हणजे सुगंध पसरतो-तसं काही एक व्हायचं नाही."

"डेली, यू सिली स्वीट बर्ड !"

"राजू, यू प्राउड स्वीट डेविल !"

"आणखी काय ?"

"काही नाही. चल, तुझ्या बायकोला सांगत्ये सगळं अन् पाहत्ये तिची तपस्या."

"चल, माझं काय ! विश्वामित्रालाही जमलं नाही तर तू त्या वसिष्ठाला विचलित करणार ?"

* * *

"डॉक्टर, हा घ्या तुमचा नवरा. संभाळा."

"का ? एवढ्यातच अगदी जिकिरीला आलीस ? मला वाटलं कमीत कमी आज तरी तू त्याला परत करणार नाहीस."

"राजू, तू असा उपहासानं पाहू नकोस माझ्याकडे. तुझं काही एक चालू द्यायची नाही मी. डॉक्टर, हा तुमचा नवरा माझ्यावर प्रेम करतो हो !"

"माहिती आहे मला. एरवी त्यानं तुला इतकं माझ्याजवळ येऊ दिलं नसतं."

"आणि माझ्याशी लग्न करायचीही त्याची तयारी आहे"

"तुझी असली की मग हरकत नाही. मलाही मग हायसं वाटेल."

"तुम्ही दोघेही वेडे झाला आहात. साधं माणसासारखं वागणं-बोलणं तुम्हांला जमायचं नाही. मी जात्ये. आज तुम्हांला भरपूर विश्रांती दिली मी. संभाळा हे भूत तुमचं !"

"पण माझी विश्रांती माझ्या अंगी लागावी अशी तुझी इच्छा असली तर याला घेऊन जा सिनेमाला किंवा तू तरी बैस इथं !"

"कशाला ?"

"म्हणूनच तर म्हणत्ये की, तयारी असायला हवी म्हणून ! हे इतकं सरळ प्रकरण नाही. या पुस्तकाचे सगळेच अध्याय मला कळले असा गर्व मलाही नाही. आता तू गेलीस की हे भांडं रितं व्हायला लागेल. यांच्या घरी एक मोठा हौद आहे. हा आपला कुठून कुठून कावडी आणतो नि सारखा त्या हौदात रिचवीत असतो. तुझ्यामागं तो लग्नासाठी लागलाच असला तर बाई, अगोदर असल्या एखाद्या हौदाची व्यवस्था कर नि मग मीच हवा तर आशीर्वाद देत्ये की, 'नांदा सौख्यभरे.'"

"थांबा, चांगली चरचरीत इंजेक्शन्स दिल्याशिवाय तुम्ही ताळ्यावर येणार नाही दोघंही. मी आणत्येच सिरिंज उकळवून आणि यांचं हे हसणं नि पाहणंही बंद केलंच पाहिजे..."

"आणि राजूच्या जिभेचं ऑपरेशन पण !"

२५।२।५२

१२०

घरट्याबाहेर

"काकाजी, बायकाईचा डब्बा त' मांगच गेला जी..."

"थांब गा, थे पाह्य तुपाची बरनी हेक्कोडी झाली, पाह्यतं कुनीकडं अन् चालतं कसा ! मानसाईच्या डब्यांतच बसा सारे एकासरी. बरोबर मोठं मानूस नाही."

"अजी, पर म्या पाह्यलं ना नापकूर चांगलं ! गुदस्ता तर पंधरा रोज मामानं मले बालसिकलीवर घुमवला संगं संगं ऽ ऽ"

"म्हुन का तू मोठा बाकेलाल होऊन गेला का गा ? संभ्या, वजेन जाजो, तुही माय सांगन् तसा बसजो, काक्याईले हैरान नोको करू. हा डब्बा लमच्चा इरकामा दिसते. एकच मानूस बसला आहे. हं, चाला या वं, इथी चहटा अन् थ्या कोंड्यात जमवा सामान, डब्याले डब्बा भिडून आहे. एकच दरवाजा मधी आहे संगती आहे चांगले मानसं."

"ह्या समद्या मानसाईत बसावं का जी ?"

"वेस आहे इथीच. बायकाईचा डब्बा येकला बरा नाही. दिवस कसा आहे दिसत नाई ? संभ्या, सामान पाह्यजो बे. संदुकात भांडे बासनं अन् लहानीचं जड जोखड आहे. वैनी, तू दबकावजो साऱ्याइले !"

"भाऊजी, बिनघोर राहा तुम्ही. दिवस असतानीच त' जाऊन पोहोचू. येवढं का असं."

"आवं, तसं नाही, कोनी शायनं मानूस संगं असतं त' मंग फिकीर नव्हती. अन् नागपूरले पांडुरंग ठेसनावर येईन्. त्याची वाट पाह्यजा. नाही त' बस्, चार जावा जान् कुनीकडं तर पत्ता नाही लागाचा एकीच्या एकीले. घरी गेल्यावर दाझीले समजावून द्या की वावरात माल आहे म्हना अन् अक्तीजीले मानसाईचे साल भरतेत, त्यापायी रिकामपन झालं नाही म्हना. बस्तरवारकडं फुरसद झाली त' पाव्हनपन करीन, तुम्हाले वापस पन् घेऊन येईन."

"समदं सांगीन. उतरा तुम्ही आता, गाडीनं शिट्टी देल्ली."

"पाह्य जा. खिडकीच्या बाहेर लोंबकाळू नोका देऊ अंजी रुखीले."

"का बापा भावजी, दोन दोन लेकराईच्या आया झाल्या त' त्याहीले का बसता बी येत नसन् का जी ? अन् वच्छीले नाही काही सांगलस् ?"

"तुले त' वैनी मस्करी करन्यापरता रोजगारच नाही. माहा अन्यावच तसा झाला की मी मोठ्या मालकाचा भाऊ झालो. तुह्या पोटी आलो असतो त' बसली असती गप ! बरं बा, तिले बी घेऊन जा वजेनं."

"हं, अन् आइकलं नाही त' देईन धकावून आदल्या ठेसनावर. बरं उतरा तुम्ही. आता चौघीपैकी समद्याच इथी आहेत. घरी कुनी नाही. चार रोज रहा सारे भाऊ गुमान मजेनं. दह्याच्या धागरी घुसळून घेजो म्हना ईसरामले अन् तुळसीले पानी घालाजा अन् मिट्ठूची दाळ पन् नेमानं भिजवत जा म्हना !"

"बरं वैनी, पाया लागतो. वडील जावेचं आइकायचं साऱ्याईनं. चाललो मी आता."

"मोठी मालकीन् कनाई रुखे, त्याहीले सरमावून टाकते मस्करी करून करून."

" अयई माय्, घावच पडले की वं तुह्या दाल्ह्याच्या आंगभर. वापसी आल्यावर निरगुडीच्या पाल्यानं शेकून देजो बाई. "

" हं, म्हंजे माह्यावर घसरल् मंग—"

" हो, मोठा जाच आहे वं ' या लहान जोवेले माहा. बयेले सक्कळी उठून त ' वासरावानी भूक लागते अन् मग दुशा खाता खाता माहा जीव होते हैरान. "

" देईन, अद्दिक दुशा देईन्. खाल्लं नाही त ' मालकिनची नजर वली होते अन् खाल्लं त ' उचकनं देते. मागून पुढून बाप नवरा अन् लेक बुहारा. "

" म्हूनच त ' म्हणतो की माही हरनी कसी सनकाडीवानी सुकून गेली ! तरी बरं म्हनतो मी, की बसते त ' गड्डा पडते अन् निजते त ' पलंग वाजते. "

" अन् घडीभर दिसली नाही तर नवरा रुसते. "

" रुखे, तुझ्या जिभेले काही हाडगीड ? "

" माहा काहून हाड काहाडते. तिकडे मालकिनले म्हन नं ! "

" वच्छे, जाऊबाई..... "

" रुखे, काहून, मोठी मालकिन म्हनशीन् त ' का तुही जीभ लुली पडन् का ? "

" राह्यल बाई ! त ' समजली का वच्छे, आज मोठी मालकिन् देहावर नाही. श्या पांढऱ्या सायब्रानं हिरवी झंडी दाखवली तवापून मालकिन् झाली सत्रा वर्साची जवान ... "

" आता बोलन् करन् ते खरं अन् झेलन् धरन् ते गोरं— समजली बाई ? "

" हो, तरी बरं का, पोटचे चार अन् बाहिरच्या आमी तीन–सात भरन्याघागरीनं कंबरीले बाक आला..."

" करून घ्या माय मस्करी. माय माय म्हणते अन् मस्करी करते. इथी काय आंगठ्या येवढ्या पोरी अन् कोनी नाही घरी."

" ए संभ्या, तुहा कान काहून इकडं उची होऊन राह्यला ? "

" ए मा, मी श्या डब्यात बसू का व ? थो देसमुखाचा पंजा बसला आहे थो बलावते. अन् त्याच्यापाशी चिटुकलं पन् आहे वाजवायचं. "

" बसतं का नाही उगामुगा भाता ? तुहा काका कोकलन् माह्या नावांनं. फुटले होते का कान थो ठेसनावर अट्टावत होता तव्हा ? "

" जाऊ दे न व', मोठी मालकिन्. लेकराची जात लेकरासंगं मन तरी रमवन. "

" तू काकी का मायपरीसवी मायेची झाली का व ? असं काहून नाही म्हणत का तुले चांदन्यातलं बायान द्यावाचं आहे म्हून ! जारे का न ! तुही काकी लाडात आली आहे. "

" मालकिन् आज झालं का व ' तुम्हाले ? धाकटं नाही, नकटं नाही ... "

" येळ नाही, वखत नाही...."
" अन् जिभेचा थेंब सुकत नाही. "
" वच्छे, मी सांगू ? "
" काय सांगते व ? "
" मालकिन् रागो भरन् माय..."
" आवं, आज बारा खून माफ आहेत. "
" नाही बाप्पा, गाडीच्या खाल्या धकावून देईन्. "
" आता नखरे केले रुखे त ' जिती गाडन् मालकिन् तुले, सांगतं का नाही ? "
" आव, आंग धुतलं तवा पून मोठ्या मालकानं पुसलं नसन्. दिसत नाही ? आज लगामाले हात लावाचं काम नाही ! "
" अस्सं काऽऽ ? अन् तुमच्या माड्याइले त ' कुलपंच ठोकले असतीन दाल्ल्याईनं तुमच्या नाही, वं ? एक दिवस जागली गेला त ' माह्या अंगाचा कुस्करा करते वया, अन् बाता पाहून घ्या लंब्या लंब्या. झालझूल पडत नाही त ' चार चकरा होतेत रांधनीतून छपरीकडं अन् बस् ऽ वाजली कडी की चढली माडी. "
" पन् मंग का वं मालकिन्, इचं नागपूरले कसं होईन का बापा.... "
" अन् तुव्ह ? "
" काय व्हायचं आहे ? आवं, तिसऱ्या दिवसा उतरतेत समदे ! पाह्यजो तू. कायची अक्तीज अन् कायचं काय ? दम निघन् म्हनतं हप्ताभर ? आवं नाव सोड..."
" अंजीनं त ' काल आन घातली म्हने गळ्याची लहान मालकाले... "
" कायची आन ? तू कवाडावर कान ठेवूनच बसली अस्शीन् रातभर आमच्या ? काय काय आयकू आलं सांग तरी. जिरू दे तुह्याबी जिभेची खाज. "
" अंजे, रुखी इथंच आहे म्हनलं रुजुवात कराले. त्याच त ' सकाळसा सांगितलं की लहान मालक बस्तरवारी येऊन तुले शनिमा दाखवनार आहे म्हून. "
" चुलीत गेला शनीमा. एक पाह्यला अन् शौक वाह्यला."
" कवा पाह्यला वं ? "
" त्या साली नाही का व. "
" न्याआले आल्ते उमरावतीले तेव्हा. "
" मले नाही सांगितलं त्या... "
" मोठी मालकिन् अन् माय झाली म्हून हे बी सांगावं लागतं का ? अन् त्याहीनं मना केलं होतं. म्हने मोठ्या मालकानं आइकलं त ' कल्ला करन्. वच्छी, रुखीले ठाऊक आहे. "

" काय पाह्यलं व' शनीमांत ? "

" वच्छीले मालूम आहे. सांग वं. "

" मी काहून सांगू ? मजा तुले अन् सजा मले ? तूच सांग आपलं कवतिकमारे जोड्या घोड्यानं गेल्ते त' ठाऊक आहे. "

" जाऊ दे वं, तू काहून हीरस करते तिचा ? या उमरीत नाही पाहीन त' मग का हीर आटल्यावर पोहरा टाकन् का ? सांग वं अंजे, मले सांग काय पाह्यलं थे. "

" काई नाई वं बाई, शनीम्यांत एक होती नवी तुरनी अन जवानगोरी छवेली. नदीवर अंग धुऊन दोन झाडाइले सुडकं बांधून चोळी घाल्त होती आडपं, तीचा थो आला अन्..."

" बरी आहे व तू, येवढंच राह्यलं तुह्या देराच्या यादीत. "

" माह्या नाही राह्यलं, राह्यलं देराच्या यादी अन् मंग रातभर डोळा नाही लागू देल्हान् का दम नाही घेऊन देल्हा ! वच्छे हासशीन् त ' दात पाडीन्. सांगून ठेवतो. मोठीगिठी पाह्यनार नाही मी..."

" ए माय, नापकुर आलं वं, थे पाह्य उडानखटुलं, थे पांढरे मकानं दिसतेत कनाई, तेथं उतरन् थे. माय, मामाजीले म्हना, आमाले उडानखटुल्यात बसव—"

" मामाजी दाखवते उडानखटुलं ! देव दाखवतीन् आणखीन त' काही नाही. कायचा शनीमा अन् काह्यचं उडानखटुलं ! गर्ती बायकाईची दुनिया गाडीचीन् माडीची, अन् जिनगानी पेजेचीन् शेजेची. संभ्या, लक्ष ठेवजो. पांडुजी यावाचा आहे ठेसनावर. त्याले डब्बा दावजो. चला व, लेकी व्हा, आपले वटे अन् पदर सावरा. खानदानीनं उतर जा...."

१३।६।५२

१२१

शासन

" रामू, मालीशी आज बोलायचं नाही. "

" मी तर बोलणार आहे. ती नवा परकर नेसून आलीय् अन् फुलं पण कशी छान छान आहेत, नाही रे ? "

" पण पाहा मग, मी तुला पेपरमिंट अन् लिमलेटीच्या गोळ्या देणार नाही मुळी. "

"नको देऊ रे, रामू. मला आई दुपारी वडी देणार आहे. माझा आठवा वाढदिवस आहे; त्यातली अर्धी वडी मी तुला देईन मग."

"पण तुझ्याजवळ नवा परकर असला तरी पतंग कुठाय्?"

"अहा रे, मुलींनी पतंग खेळायचा असतो वाटतं? अन् मला पण मुळी बोलायचं नाही या घाणेरड्या शिदूशी."

"माले, मला घाणेरडा म्हणतेस का?"

"नाही तर काय? माहीत आहे, माहीत आहे म्हटलं, काल आईनं तुला चांगला धपाटा दिलाय् तो, तोंड धुतलं नव्हतं म्हणून."

"आणि रामूला नाही का त्याची आत्या रागावली. आम्ही नाही जा."

"किती खोटाड्या आहे गड्या हा शिदू! रागावली वाटतं आत्या? आत्या तर नुसतं म्हणाली की, एवढा सात वर्षांचा घोडा झालाय्. नुसता घोडा म्हणणे म्हणजे रागावणं वाटतं?"

"अन् मी सांगू का माले? आमची आत्या पण खोटाडीच आहे. मी का घोडा आहे का ग? आत्यानं मुळी घोडा पाहिलाच नसेल."

"आहे कुठं तुमच्या घरी घोडा? रामूच्या घरी तर नुसती म्हैस आहे. अन् तुझ्या घरी नुसती कुत्री. आमचा घोडा कसा छान आहे!"

"काय करावयाचा तुझा घोडा अन् टोडा? आमची म्हैस दूध कसं छान देते! त्या दिवशी कशी मग तुझी आई खर्वस मागायला आली होती."

"अन् बाई, आमची चंपी पण कशी यू यू आहे. ए रामू, आमच्या चंपीला पण आवडतो खर्वस. मी वडी दिली की तू खर्वस आण तिच्यासाठी."

"नको रे रामू, ती चंपी टंपी चावरी आहे. त्या दिवशी नाही का?"

"अरे, पण ती मला नुसती चाटत होती. माझ्या ओळखीची आहे."

"आता मी कोण्णाला नाही माझ्या टांग्यात बसवायचा. दसऱ्याचं सोनं पण जा आता पाहायला पायी रखडत! आता कशाला हवाय् आमचा टांगा! खा तुम्ही तुमच्या वड्या, ठड्या, मुड्या, खड्या. आम्ही मस्त टांगा; अन् मला बाबा डम्डम् घेणार आहेत."

"मी देईन रे शिदू तुला माझ्यातली वडी. मग तर दसऱ्याला येऊ देशील ना?"

"आम्ही खोटाडे तर मग आमच्या टांग्यात कशाला?"

"मी तुला म्हटलं का रे शिदू खोटाड्या? मी तर आत्यालाच म्हटलं आत्या कसली आहे! खर्वस नाही, वडी नाही, लिमलेट पण नाही."

"तुझी आत्या वाईट पण आहे रामू! परवा मला अस्सं पिचकलं तिनं. मी पळत पळत आल्ये अन् मग किनई मी नि शिदूच खेळत होतो चिंचेखाली. शिदूनं

मला कित्ती चिंचा दिल्या तोडून. कसा पण सरसर भरभर चढतो शिदू झाडावर मला कित्ती कित्ती आवडतो तो. नाही तर रामू ! झाडावर चढता येत नाही न् काही नाही. ”

“ मी त्याच्या एवढा झालो की चढणारच आहे मुळी आपोआप. पण मुलींना कुठाय् येतंय् चढता ! ”

“ का नाही येऊ ? येऊच मुळी. आमच्या पुस्तकातली दुर्गावती तर किल्ल्यावर चढली होती. ”

“ पण ती आपोआप थोडीच चढली होती ! ती घोड्यावर बसून गेली होती. ”

“ पण मी मात्र आपोआप चढणार आहे. अन् बाबा म्हणाले की, मी त्यांच्या एवढा होईन तेव्हा आपोआप मोटार पण चालवीन. मग मी तुम्हा सगळ्यांना मोटारीत बसवीन. आमचं असं नाहीच मुळी. मालीला अन् शिदूला अन् चंपीला पण बसवीन. ”

“ मग मी देईन रे तुला शिदूतल्या चिंचा थोड्या. ”

“ नको मला. शिदूच देणार आहे. होय ना रे ? तू काय, मुलगी बाई मुलगी. शिदू माझा मित्र आहे. ”

“ आहेच मुळी मी, आहेच. आमच्या मित्रप्रेमाच्या धड्यासारखा. पण रामू, तू आत्याला देऊ नको चिंचा, सांगून ठेवतो. ”

“ मी देतोय कशाला. मला घोडा म्हणते नाही का ? खोटाडी तर खोटाडी. ”

“ मला पण किनई बाई, त्या आतिटली घातिटलीचा अस्सा राग येतोय म्हणून सांगू ! माझ्या चंपीला त्या दिवशी तिनं ओसरीतून हाकून लावलं अन् आईला म्हणाली की, माली चटावली आहे. आम्ही नाही जा ! ”

“ माझं मत आहे आत्या फार वाईट आहे अन् खोटी पण आहे रे. ”

“ आहेच, आहेच मुळी. ”

“ मग रामू, आपण या आत्याला शिक्षा का नाही रे करू ? ”

“ तू गोष्टीतला राजा आहेस वाटतं वाईट माणसाला शिक्षा करायला ? त्याला राजा लागतो म्हटलं ! ”

“ पण राणी ? मी त्याच्याशी लग्न केलं तर मी राजाची राणी नाही का रे व्हायची शिदूदादा ? राणी तर सगळंच करू शकते म्हटलं ! राजाला देखील विष घालू शकते. ”

“ मग आपण आत्याला विषच घालू. ”

" पण विष आणायचं कुठून ? ते तर आई म्हणते साता समुद्रांतल्या सर्पाच्या पोटात असतं. "

" मग आपण त्यालाच बोलावू आत्याला शिक्षा करायला. "

" पण समुद्रात रे कसं जायचं ? "

" अग, नकाशात नाही का मुंबईजवळ समुद्र ? तिथेच तो साप पण आहे. रोज सायंकाळी फिरायला येतो तो. "

" त्याला म्हटलं राण्या असतात चार ! कृष्णाच्या फोटोत आम्ही पाहिल्या. "

" आत्याला आपण मुंबईला घेऊन जाऊ. "

" वारे वा बाबळट ! मग आत्याची तर पाळीच होईल आगगाडीतून. शिक्षा करायची म्हणजे पाळी रे कशी करायची ? "

" माझी जिम्मत सांगू ! मी आत्याच्या बिछान्यात विंचू सोडणार आहे. मग कशी भोकाड पसरून ओरडेल. "

" पण विंचू कसा पकडायचा ? "

" आमच्या घोड्याच्या पागेत दिसला होता मला परवा. पण सईसानं मारून टाकला. "

" आता कुठून रे आणायचा ? मेलेला विचू थोडाच चावतो वाटतं ? "

" आत्याचा गळा दाबू अन् प्राण घेऊ. "

" अहा रे प्राण घेऊ ! आत्याच येईल जवळ गेलो तर. "

" मग एका मोठ्या काठीनं मारू. "

" पण काठी तर लहान असते. आपण तर बास घेणार. "

" आमच्याकडे आहेत की पुष्कळ बास. एक लांब दोरी आण तू माले ! आपण दोन लांब लाब बास बांधू पक्के. "

" पक्के नाही नुसते करकचून ! "

" पण दोरी रे कुठून आणायची ? मी बास देईन हवा तर, तीन तीन बास बांधू. दोरी तू आण रे रामू ! तुझ्या तिथे तर खूप आहेत. "

" पण आम्ही तर सगळं आत्यालाच मागतो; ती देईल वाटतं स्वतःला मारायला ? "

" अन स्वतःच बास हिसकून आपल्याला मारील. आत्या किती मोठी आहे. मला अन् शिदूला तिनं एकदम उचललं होतं त्या दिवशी. "

" आता मला कळलं म्हटलं. आम्ही नाही जा ! "

" नको सांगू जा. तू आहेसच मुळी तसा. "

" अग पण सांगतो ना ! तुझीच तर युक्ती आहे. "

" युक्तीपेक्षा शक्ती चांगली. "

" अहारे मट्टोबा, उल्टं म्हनतो आहेस. शक्तीपेक्षा युक्ती लिहिलं आहे आमच्या बुकात. काही तर येत नाही. "

" पण सांग रे युक्ती ! "

" अग, तुझ्या चंपीकडून आपण चावू आत्याला. "

" पण ती चंपीटली कशी चावणार ! ती तर आत्याच्या अंगावर चढते अन् शेपूट हालविते. "

" मग तेव्हाच चाव म्हणावं. तुझं ती ऐकेल. "

" ती मेली नाही चावायची. महा आततायी, दळभद्री आहे मेली. आमचे बाबा म्हणतात, तिला फक्त खायला अन् शेपूट हालवायला हवंय्.'"

" ती ऐकणार नाही तर तिलाच मारू आपण. आपलं कुणी ऐकलं नाही म्हणजे राग नाही का येत माणसाला ? तिलाच चांगली शिक्षा करू.'"

" ती जर चावत नाही तर आत्यापेक्षा मी म्हणत्ये तिलाच शिक्षा करणं चांगलं. "

" मग ठरलं तर ! याच्यात अंतर व्हायचं नाही. "

" ठरलं म्हणजे ठरलं. माहीत नाही का आमचे बाबा कसे म्हणतात ते ? "

" पण तेच म्हणतात हे कुठाय् ठाऊक ? नुसतं ठरलं म्हणत नाहीत, ठरलंच म्हणतात. "

" मग आण ग तुझ्या चंपीला. मारूच तिला आपण ! "

" आज तिची चांडगली खरड काढू. "

" आज तिचं चांगडलं टाळकं सडकू. "

" खेटरानं मारलं पाहिजे तिला. जळलं मेलीचं लक्षण.'"

" थोबाडीत तर देणारच मी तिच्या एक चांगली ठेवून. "

" पण त्यापेक्षा पाठीत लाटणं मारलं तर ? "

" पण त्यापेक्षा तिला उघडी करून तिच्या ढुंगणावर फटके मारायचे—"

" अहारे, ठोंबोजी ! ती कपडे घालते वाटतं ? तिचं ढुंगण उघडंच म्हटलं. "

" मग नुसतेच फटके मारायचे. "

" नुसते फटके मारून काय कामाचे ? माले, तिला तुझा परकर नेसवू अन् मग—"

" नाही तर शेपूटच तोडू तिचं. "

" पण त्याअगोदर तिच्या अंगावर शाई टाकायची त्या बाबूसारखी अन् शिव्या पण द्यायच्या. या शिदूला येतात चांगल्या शिव्या. "

" सालीला डुकरीला अशा शिव्या देईन की पाहतच राहील. आमचा सईस देतो त्यापेक्षा पण एकेक. "

" अन् आमचा गडी म्हशीला देतो त्या शिव्या कशा झकास आहेत म्हटलं."

" ए पण मी शिव्या नाही देऊ द्यायची तिला. बाकी काय वाटेल ते करा. शिव्या घाणेरड्या असतात, आई म्हणते. "

" हँ रामू, माले! बोलायचं नाही. ती पाहा चंपी येतीय्. आता हा दगड चांगला तिच्या टाळक्यात... "

" अय्या! खरंच की माझी बाबी! यू यू चंपी. माझी सोनी, माजी हिरी, माझं छकडं, माझं बकडं. "

" तो शेपूट पाहा ग कसं छान हालवते! यू यू चंपी. "

" रंग कसा मऊ आहे ग तिचा? मी नाही हं चंपे दगड मारणार तुला. यू यू. "

" हिऱ्यापेक्षा रत्न चांगलं. मी रत्नच म्हणणार मुळी तिला. यू यू चंपी. "

" मी तर देशरत्न म्हणणार. यू यू चंपी. "

" ए, पण मला हात लावू दे ग जरा. मी काही करणार नाही. टांग्यात बसवीन तिला. यू यू चंपी. "

" पण मजजवळ दे तिला म्हणजे मग पाहा कसा दूध पाजीन ते. यू यू चंपी. "

" चंपी माजी ठकडी, चंपी माजी मकडी. "

" चल ग माले, मी तिच्यासाठी चिंचा तोडतो. "

" मी वेचून देईन ग तिला. म्हणजे त्रास नको. "

" नुसता त्रास नाही दगदग. "

" पण तिच्या जिवाला आराम मात्र मिळायला हवा हं! सांगून ठेवत्ये. मी हिला उचलून घेत्ये मुळी. "

" अग, पण मी पढ्या तिला अशी डोक्यावर घेईन की एकदम आभाळात. "

" अन् माझ्याबरोबर तिला झाडावरच चढवलीन् तर आम्हा दोघांनीही चिंचा तोडायला येतील. एकपट अन् दुप्पट. "

" माले, तुझ्या परकरात सगळ्या चिंचा द्यायच्या. अन् आज चंपी करणार वाटणी. "

" हो ग हो, माझी बाळी आहेच तशी गुणांची अन् पायलीभर चुनाची. "

" चला मग. यू चंपी यू. "

" टू चंपी टू. "

" भूः चंपी भूः! "

४।१०।५२

दुवा

दशमीच्या चंद्राच्या मावळतीच्या गार झुळका, निळे नितळ झुळझुळते नभोमंडल, गच्चीवरून स्वप्नासारखी दिसणारी चमेलीची फुललेली वेल, दगड-धोंड्यांना अस्पष्ट जीव फुटलेला, वलिताचा दांड सापासारखा थंड, तृप्त कांतिमय... !

आणि ज्याला सर्वस्व देऊन टाकण्याचा विधी अगदी परवा परवा आटोपला त्याच्या बाहूवर फुलपाखरांच्या हळुवारपणे हात ठेवून खिळविलेली तृप्तीची भिजलेली, मघासारखी नजर ! जणू त्याला आजवर पाहिलेच नव्हते, जणू पाहिले ते आताच, अगदी काही क्षणांपूर्वीच ! आणि कदाचित फार पाहिले तर दीठ लागेल !

हा समत्वाचा अनुभव, मी जेवढे पाहिले, ऐकले व भोगले त्याची साक्ष देऊनही फार फार थोड्यांना आल्याचा निर्वाळा निःसंकोचपणे द्यायला हरकत नाही. कारण या अशाच दृष्टीत, जेथे मी शाश्वत समाचा साक्षात्कार अनुभविला, इतरांनी तिरस्कार पाहिला आहे; " झाऽऽलं बाई एकदाचं " म्हणून खंडीभर केर काढल्या-नंतरच्या समाधानाचा उद्गार ऐकला आहे; द्वेषाचा फूत्कारही बऱ्याच जणांना भोवला आहे; दगडाची निर्जीवता ज्यांच्या अनुभवी साचली नाही असेही फार थोडे !

हे भाग्य मी कोठून कमाविले ? की न कमाविता मिळाले ? की मी खूप किंमत दिली ? की आणखी कुणाला खूपसे मोल द्यावे लागले ? कळत नाही. साप पकडल्यानंतरच्या कुशलतेचे वर्णन मी वाचले आहे; पण चावल्यानंतरच्या निर्विकारतेची कल्पना मात्र केल्याचे ऐकिवात नाही.

श्रेय कुणाचे आहे माहीत नाही. कळवून द्यावयाची इच्छाही एवढ्यासाठीच नाही की, उंबराचे फूल पाहिल्याचा मूर्खपणा लादला जाऊ नये ! किंवा कमलदलाची वांछा चिखलात बुडविली जाऊ नये.

हे श्रेय माझ्या कमाईचे नाही एवढे मात्र, अभिमानाचा ज्वालामुखी उद्रेकापर्यंत येऊनही कबूल करायला कमीपणा वाटत नाही, एवढे खरे !

कृतघ्न नाही मी. म्हणूनच आठ-नऊ वर्षांनंतरही रत्नी जिवंत आणि होती तशीच असल्याचे मला ठाऊक आहे. या कालावधीत शहरात आल्यावर मी तिची वास्तपुस्त ठेवण्यावाचून इतर काही केले नाही. माझ्या मनाला लाखोली वाहूनही मी शुक्राच्या तेजाने उजळलेल्या आसमंतासारखी तिची आठवण ठेवली आहे. कृतघ्नता व्यक्त केली नाही, दुवा उघडपणे दिला नाही. कारण ज्ञान, शहाणपण (?) वाढले;

त्यामुळे रत्नीला ती झेलता येईल की नाही याचा संशय मनात उठला. नशिबाचा दगड तिच्याकडे फेकला आणि चूकून तो तिच्याच कपाळाला लागला तर? किंवा...

किंवा घुबडासारखा तो तिने नदीच्या पाण्यात बुडवून घासायला सुरवात केली तर !

एकदा चिडून संतापून बारा-तेरा वर्षांच्या हातात जेवढी शक्ती असू शकते ती एकवटून मी एक दगड, तिने झेलावा म्हणून नव्हे, तर तिने याद राखावी म्हणून तिच्याकडे फेकला होता आणि डोळ्याच्या वरच्या बाजूस लागलेल्या रक्ताच्या धारेची खूण अजून तिच्या कपाळावर आहे. त्या वेळचे ऊन ऊन रक्त तिने झाडपाला चोळून बंद केले होते. अजून ते रक्त गरम असेल की थंड झाले असेल? गोड असेल की कडू असेल? समजा, थंड झाले असेल तर ?

तर मजसाठी सूर्य असून नसल्यासारखा होईल. चंद्र उगवून विरळ्यासारखे वाटेल, चमेलीला कोळसे उगवतील, शेगडीत फुले तडतडतील. ही जाणीव एवढी क्लेश देऊ शकते हे पूर्वी कळते तर उभा जन्म नेणिवेतच काढण्याची मी शपथ घेतली असती.

पण आता त्याचा काही उपयोग नाही. गरजही नाही; आणि नवल असे की, जे घडून गेले ते जर पुनः घडले तर तेवढी शक्तीही राहिली नाही. कारण ते नुसते घडणे नव्हते ! शेकणे, बेतणे, येऊन पडणे, जीव जाणे होते !

कारण रत्नीने मजवर जेवढे अत्याचार केले, तेवढे आजवर कुणी कुणावर केले नसतील. मला संताप येत असे तो हाच. बारा–तेरा वर्षांच्या माझ्या मनाशी व शरीराशी ती एखाद्या वाघिणीसारखी खेळली. बारा हातांची उडी तिची ! मी पळून पळून त्या पन्नास घरांच्या पलीकडे कुठे जाणार ? इतक्या निर्वेधपणे मला तिच्या हाती सोपवून देणाऱ्या माझ्या व तिच्या माणसांचा तिरस्कार करावा की कीव करावी हेच मला कळेना. सगळ्यांना माहीत होते की, त्या एवढ्याशा जंगली खेड्यात रत्नी-इतके लाडके कोणी नव्हते. सोळा–सतरा वर्षांच्या रत्नीला लग्न करून मदारीने आपल्या घरी आणली. ती आणली कसली, निखारा आणला होता निखारा ! तो तिला हातावर झेलू शकत असे म्हणून त्याला वाटायचे, की इतरांना का नाही तसे करता येऊ ! भर चव्हाट्यावर त्या निखाऱ्याने ज्यांची ज्यांची अंगे भाजली गेली ते सगळे अजून जिते नांदते आहेत. पाणवठ्याच्या विहिरीवर रत्नीची घागर आली म्हणजे मोटेवरच्या माणसाची मजाल नव्हती की, तो मोट आडात सोडील ! एक मदारी सोडला तर रत्नीची बकरी काय अन् सासू काय, गावचे लोक काय नि तिचे वासरू काय–सगळ्यांनी पुढ्यात टाकलेला चारा खायचा, दाखविलेले पाणी प्यायचे, गळ्यात दावण अडकविताना तिचा हात लागला तर शेपूट हालवायचे !

दोन वर्षांच्या सहवासात तिने एकदा मजबद्दल दयेचा उद्‌गार काढला होता. त्या दयेची लाचारी जाणवण्याइतपत मी त्या वेळी घडवाकट असतो तर मी माझा तरी जीव दिला असता किंवा तिचा तरी घेतला असता. त्या दिवशी सकाळी आमच्या घरचा घोडा नाटाळला होता. मालकालासुद्धा हात लावू देत नव्हता, म्हणून मदारीला बोलावून आणावयास त्याच्या घरी जावे लागले. तो आला तसा त्याने घोडा मोकळा करून त्याची आयाळ पकडली व खाडकन् त्याच्या मुस्कटात दिली. जनावर म्हणून जनावर, पण मेले नाही हे नवल. त्याच्यावर मांड कसून त्याने शेजारच्या तहसिलीतून मिठाई आणली आणि तासाभरात तो घोडा की गाय हे ओळखू येईनासे झाले ! पागेच्या आवारात येताच मला ओढून त्याने घोड्यावर घेतले आणि– "आता पाहा रे छोट्या मालका तुझा घोडा" असे म्हणून रिकीब टोचली. थैमान घालणारे जनावर साध्या केरव्याच्या चालीत बगीच्यापर्यंत जाऊन निमूट मदारीच्या घराजवळ थांबले, तो उतरून घरात गेला. मी मात्र बाहेरच थांबलो. कारण सगळे भीत म्हणून मी देखील रत्नीला भिणे भागच होते. तो रत्नीला बाहेर घेऊन आला आणि...

"ही मित्री बामणीन अंगणातच उभी आहे, पाहा ग !" असे हसत हसत गोंडी भाषेत म्हणाला, बंदुकीचा दस्ता छाताडात गेल्यागत माझ्या डोळ्यांसमोर काळे-निळे काजवे चमकू लागले आणि रत्नीचा आवाज ऐकू आला—

"असा उतावलास का म्हणून ? माजला का ? जा, मालकाचं घोडं बांधून वावरात जा. छोट्याले राहू दे माह्याजवळ. खाईन् भाकर माह्यासंग अन येईन जंगलात. मालकीन् ले इपारा करून देजो. येरे छोट्या ! अन् याद राख रे माह्या धन्या, वर्सा सहा महिन्यांत म्हनून पाह्यल्याले बामनीन, मग मीही पाहीन् जिता राह्यशीन् का मरशीन् ते ! लहान् झाला म्हून तू त्याले काही म्हणशीन् तर सांगून ठेवतो."

तिच्या भाषेत हे उद्गार असे काही जोरकस होते की, मदारी मला तेथेच टाकून घोडा घेऊन गेला, आणि मी अक्षरशः निराधार असा तिच्या हातात गवसलो. आपल्या पंजाने पाठीवर घेतलेल्या शिकारीचे मत वाघिणीने कधी विचारल्याचे ऐकिवात नसल्याने माझे जंगलात जाणे न जाणे अर्थातच माझ्या हाती नव्हते.

पाडव्याचा चांद अष्टमीत देखील आला नाही आणि मला रत्नीचे वेड लागले. ज्या जंगलात आजवर कधी एकही पांढरपेशा गेला नव्हता त्यात मी आणि रत्नी उन्हाने तडकणाऱ्या दगडांतून विंचू-साप मारीत, पाण्यावर आलेल्या जनावरांना गोफणीने घायाळ करीत, अनंत वर्षांपासून माणसाचे पाऊल न लागलेल्या अजस्र झाडांवरून दहा कोसांवरची गावे पाहत सकाळ ते सायंकाळ दिवसचे दिवस आणि महिनेच्या महिने परतवीत हिंडत राहिलो. मेतकूट भाताचे बामणाऊ अन्न मला वर्ज्य

झाले. पिवळ्या टपोऱ्या मोहाशी तळहाताएवढी जाड भाकर खायची. भांड्यातून पाणी प्याल्याने माणसे ढिली होतात म्हणून सहा मैल दूर जंगलात दडलेल्या वाघाईच्या नाल्यातले पाणी ओंजळीत भरून प्यायचे, चालताना पायाखालचा दगड कलथून दहाचा आकडा असलेला नाग फुस्कारला आणि त्याची मान पकडताना जीव कचरला तर रत्नी वस्करायची—

"बामणा, या किडुकल्या पुदं जीव टाकतोस तर बायको कशी वागवशील रे?"

पन्नास नागांचे डंख पुरविले पण रत्नीचे बामणा म्हणणे जिव्हारी लागत असे.

आणि मग दुपारचा सूर्य माथ्यावरून ढळायचा; थंड सावलीत, माणसाचा वारा नसलेल्या वाळूत, मोळीची लाकडे तोडता तोडता शिणलेले अंग झोकून द्यायचे! रत्नीने काय पण तिच्या बापाने सांगितले तरी आता उठायचे नाही. वर भोवऱ्या घूं घूं करीत आहेत, शांततेचा सोसाटा जाणवतो आहे, अशा वेळी रत्नीने डोक्यावरची मोळी खाली आदळावी. मांडीपर्यंत पाय व छातीपर्यंत हात धुवावे, अंगात चोळी नाही. थिट्या पदराने हातपाय पुसावे, भाकर सोडावी आणि अगदी अलगद असल्यानसल्या हलकेपणाने मला मांडावर उचलून 'छोट्या' असे दबल्या आवाजात म्हणावे. याचे उत्तर जे काय मिळे त्यामुळे डोळे वटारून ती म्हणायची—

"छोट्या, तू चांगला आता जड व्हायला लागला आहेस. तुझ्या पंजातही जोर आला आहे. अरे ऽ ऽ छोट्या जीव घेईन तुझा. काढतोस की नाही हात?"

मोहाच्या फुलांचा भर महिन्या दीड महिन्यात संपून जातो; पण तेवढ्या अवधीत कष्टांनी निथळत असलेल्या तिच्या घामाचा वास मला हवा हवासा वाटू लागला, आणि—

आणि अशाच एका दिवशी त्याच ओढ्यावर भर दुपारी पाण्यात अर्धी बसून खरखरीत दगडाने अंग चोळीत असताना मी तिला विचारले—

"रत्ने, घरून अंघोळ करून सकाळीच आलीस. आणि आता पुनः कशाला?"

"छोट्या, आज नको लेका विचारूस! दहा वर्षांनी तूच असं करशील. गंगाळभर पाण्यात घरी अंग धुतल्यानं नवरा ताब्यात नाही ठेवता येत इब्लिसा!"

मी एक दगड उचलून तिच्या पाठीत मारला, आणि 'मेली व माय' असे न रागावता रत्नी ओरडली. तशीच बाहेर येऊन माझा कुस्करा करणार तोच काकडीचा हारा उचलावा तसे अधर उचलून मी तिला पाण्यात फेकले.

काय होणार आता माझे?

काहीच झाले नाही, त्यानंतर निमूट विलक्षण अशा तृप्तीने तिने मला भाकर खाऊ घातली. कधी नव्हे, तो माझा हात धरून दाबीत दाबीत व आपल्या लग्नाच्या थाटामाटाच्या गोष्टी करीत तिने मला सांजवातीला घरी पोचविले.

यानैतर तिच्या कामात माझी तिला मदत होऊ लागली. तिचे 'बामणा' म्हणणे बंद पडले व खरोखरच्च वर्ष सहा महिन्यांनी एक दिवस सायंकाळी मला पोचवायला म्हणून ती आमच्या वाड्यात मला घेऊन घरी आली आणि—

"मालकिण, छोटा मालक आता तुमच्या जातीचा राहिला नाही. या चंदनाच्या झाडाची रोज सांजच्या प्रहरी दीठ काढीत जा. पाच-दहा वर्षांनं याचं लगीन झालं म्हणजे तुम्हा साऱ्यांचा अन् नव्या मालकिणीचाही दुवा घेईन मी."

जाता जाता तिने माझ्याकडे पाहिले व नजरेला नजर लागताच्च ती खाली पाहू लागली.

असे आजवर कधीच झाले नव्हते. त्या डोळ्यांत काय होते, हे मी माझ्या मनाला कधी विचारले नाही, विचारणारही नाही. अपराध मात्र नव्हता. खंत नव्हती, ओशाळ नव्हता. ताकदीच्या हाताचा फणा उभारून निडरपणे समोर बसलेल्याच्या धीट नजरेने पराभूत होऊन नागीण मान टाकते तेव्हा तिला अपराध, खंत, लज्जा अगदी शिवत नाहीत.

तिच्या नजरेचा अर्थ लावण्याची गरज मलाही नाही व तिलाही नाही.

फक्त होते एकच्च-नवी छोटी मालकीण तृप्तीची मधासारखी नजर लावते तेव्हा अगदी नकळत, सहज ते दिवस, तो ओढा, ती रत्नी, तो मदारी, खरपूस दगड, घामाचा हवाहवासा वाटणारा वास, चंदनाचे झाड आणि दुवा...

बस्स एवढेच ! फक्त एवढेच ! !

६।१०।५२

१२३

भागाबुढीच्या मताने

"सारा बजार खरीदून आनला का व ? कईच्ची बसली मी तुही वाट पाहात."

"हो बाजार खरीदतो ! तुहा सासरा देते कनाई पैसे मले !"

"माहा सासरा काहून देईन ! दाल्ला कमावते दोई दोई हातानं तुहा. तुले काय कमी आहे व !"

"म्हूनच त' बसली होती भदाडवाल्यासीन् घंटाभर घासाघिसी करत ! रांडीच्यानं सात आने घेतले एका हांडक्याचे."

"बेस मिरालं पन तुले हांडकं. मांगच्या सोम्मारी म्या अकरा आने मोजले माय !"

"आताबी थो आयकत होता म्हनते का? आव नाव सोड. बारा गंडे टाक म्हने."

"तुह्या तोंडाकडं पाहून देल्लं का मंग हांडकं सात आन्यांत?"

"त्या काहून नाही दाखवलं आपलं तोंड? मुफ्तात देल्लं असतं त्यानं."

"मने, अवलखने, दात पाडीन अवघे, याद ठेव, तू म्हनशील की--"

"अन् तुहे राह्यतीन मंग दात? तू कसी म्हनते व मंग? पाच आन्यांचा जीव दुखला तुहा अन् माहा तोंड काहाडतीस!"

"खरंच व! अर्ध्या रोजाची मजुरी अकारज गेली माही! आपल्या अड्यान्याईस कोनीबी फसवते बाई!"

"आदिक कोनं फसवलं गे?"

"म्हने आज त' शनीमा देखवाल्यानी बकतिस व तू! कोन भेटलं बाजारात?"

"भागाबुढी! थे वी म्हने माय् की तुहे दातच पाडतो."

"काहून? तिचे दात गेले म्हणून का?"

"म्हने मलेबी आनून दे भदाड! मी काहून आनू? तिचा बुढा होता तिच्या सवं; त्याले का धाड झाली जावाले अन् आनाले?"

"भागाबुढी आपल्या बुढ्याले संदुकातल्या बासनावानी ठेवते, नाही व? सच्या पाह्यरी त्याले झटक झुटक पन् करत असन्."

"तूच पाह्य माय, थे त्याले झटकते की थो तिले झटकते त! तुले आहे आदत इरकाम्या कथा करायची."

"अन् तू संतीन लागून गेली कनाई? मांगच्या बजाराचं कहाडू का तुह?"

"काय कहाडशीन व? काहाड, पाहू दे मले!"

"त्या अगुदर चंची दे तुही, खांडसुपारी खातो न् मंग सांगतो, कसी रकेता करत होती थ्या बामनीनीची त' त्या रोजी."

"का मनलं व म्या? थे भटकत होती त' म्या मनलं भटकते! आखीन का केलं? झोटे धरले का तिचे?"

"पन् मी म्हनतो गरज काय तुम्ही? थे भटकन, नाचन नाही त' अदिक काही करन्. दाल्ला कमावते तिचा—"

"हँ, अन् एक गध्याचं वझं बी वागवते, तिच्या संगं गाठोडं तिच्या बासनाईचं आन् हा बायल्या चालला तिच्या मांग मांग! जसी काही लग्नाची नव्हंच!"

"भारी किमती बासनं खरीदले अन् बाई-मानसाच्यानं पडले, कोनं हिसकले..."

" आन् भाजीची थैली व ? थे नसन् दिसली तुले ! डोरे फुटले होते कनाई ? आन माही चंची. मोठी आलीस बामनीन त ' जा तिच्या घरी ! म्हने हिसकन कोनी. आन् का व पुने, कोसभर बाजार तू नेतं त ' तुले लोक झोंबते व ? का माय बोलते...!"

" आपल्या अड्ड्यान्याइतले कोन हात लावते व ? "

" हो, त्याहीले लावते त ' मग पायांत वहान नाही का त्याहीच्या ? "

" हँ, दहा रुपाचं पायतन ह्या कामासाठीच त ' घेतेत् थे लोक ? अन् हिसकाहिसकी करनं त्याहीच्या जातीले सोबतेबी ? सिकली सवरली त ' का हेच करन् का ? "

" काही बी करो, मले का करा लागते म्हना ! पन् तू देऊन पाह्यनं एक रोज टोपलं आपल्या दाल्ल्याच्या डोक्शावर; जिती गाडन का नाही थे मी बी पाहीन. "

" थो काहून उचलन् ? मले का धाड झाली, का हात मोडले माहे ? "

" थेच त ' मनलं मीनं ! मंग काहून थ्या सिकलीच्या नावानं खिजली ? बह्याडच आहे. "

" हं, उगी राह्य, बहु बोलनं बरं नाही. चालत नाही का आता ? झालझूल बी त ' बातच होते मंग. थे भागाबुढी बी आली; चाल उचल बाजार आपला. "

" बापा, बापा ! आता निगते माहे पितर भागाबुढीच्यानं. "

" आता नाही बोलणार थे. पाहून घेजो तू. कोलू बुढा आहे न संग तिच्या. "

" येऊन पाह्य कसी राह्यली बागत बागत. इकतं वझं आहे पन् बुढा इरकामा चालन् डागा टाकत गावापावतर. पाह्यजो तू. "

" झालं नाही का व पोट्याव्हा तुमचं ? चलाचं नाही का गावाकडं ? का झाडाखालतंच गोटे मांडान् इथं ? चला उटा, विगी विगी; मंग झालपडल्या माह्या नजरेनं वाट नाही वरखत बाई. "

" हे मनी उठतच नाही. कईची म्हनून राह्यली पन म्हनते माही भागाबुढी येईन तवा मी उठन्. आता तरी बांधनं माय चंची. "

" हो, तू उपरी माही चंची खाली करसीन् आन् माही भागाबुढी जरासं पान बी घेनार नाही; नाही वं ? बस गे भागाबाई, पान खा; कोलू काका आहे संग ! वाट नाही दिसन् त ' धरजो ह्याचा हात. "

" दो लेकराची माय झाली हे मनी, पन् इब्लिसपना गेला नाही तिचा. सांगतो तुह्या मानसाले थांब ! "

" काका, माह्या दोईबी लेकराईले भागाबाईचाच हात लागला. तिनंच सिकवलं मले असं बोल् म्हून. "

" हो, म्याच शिकवलं व ! करा त ' करा आन् भरूनश्यानी बी द्या. अन् का व, तू वली बारातीन पंधरा रोजाची आन्...कोसभर वझं घेऊन जासीन ? तुहा दाल्ला कोनाचं वझं उचलाले गेला गे ? आन् थे टोपलं माह्याकडं, देतो फेकून नाल्यामंधी."

" माहा काका इरकामा चालन् आन् माहा टोपलं काहून बा नाल्यात जाईन ? मी त्याले काका काहून म्हनीन मंग ? "

" तुहा काका उचलन् मी मेल्यावर. मी ठेंगनी आहे का ? "

" पन् एखांद्या डाव घेतलं त ' का झालं व ! मी येईन काकासंग. तुम्ही व्हा पुढं."

" मानसाची जात वझं वाहीन् आन् जाईल इरकामी भटकन् ! कोनत्या मुलखातला न्याव्..."

" मी दाखवतो भागाबाई, मुलूख तुले. थे पाह्य थ्या रस्त्यानं..."

" थे राह्यतेत सयरासवानात आन् आपुन रा.ह्यतो वावरासिवारात ! पिसी आहे मने तू. डाव्यानं वझं घ्याव् अन् उजवा इरकामा ठेवाव. येळवखत सांगून येते का व ? "

" पन् काकानं त '.."

" आइकनं व ' सांग व ' भागाबाई ? "

" का सांगाचं आहे. माहा म्हननं असं, रानाजंगलाचा रस्ता आन् आपुन चाललो आहो समज. त ' माहा म्हननं, चाल्ता चालता, म्या म्हनलं, आलं एखादं जनावर आडवं अन् मी म्हनतो बुढ्याच्या डोक्यावर म्या वझं देलं आन् माहा हात इरकामा, त ' मंग म्या काय कराव, सांग. मी बाईल का जनावर हाकलीन का व ! बुढा इरकामा असला त ' काही उपाय करन्. येळावखताचं कोनं सांगलं मायबइनी ! येड्यावानी सयरात आलं त ' सयरातलं नाही व्हाव्. मानसाचं काम मानुस करते, बाईचं बाईनं कराव्. म्हून म्हनतो पिसे, डावा गुतवाव् आन् उजवा इरकामा ठेवाव्. बेस म्हनलं कनाई व पुने मिनं ? "

" आता चालान् बी का करान् जेवनरात इथंच ? उठाना वा पोरीव्हा ! "

" मने, तुहं गाठोडं जराक् मी घेतो आन् जराक् पुनी घेईन. तू नो को घेऊ हं, चला, उठाव ' ! ! "

१८।१०।५३

१२४

दुर्बीण

" आइकलं का ? येता वक्ती बाजारातून कोरड्याचं काही घेऊन ये जा. "

आडकूने ' हो ' म्हणून आपला रिक्षा बाहेर काढला. त्याच्या एरव्ही निश्चयी चेहऱ्यावर विषादाची एक रेघ उमटली. ती रेघ दाखवायची नाही असे एकदा ठरल्यानंतर त्याला बायकोच्या वरील सांगण्यावर काही म्हणणेच शक्य नव्हते. जाता जाता तो तिच्येच वाक्य स्वतःच्या कमावलेल्या भाषेत पुटपुटत राहिला—

" ऐकलं का, येताना बाजारातून डाळ, भाजी, काही घेऊन या. "

त्याची बायको मधूनच बोलताना अशा हेंगाड्या चुका करते हे त्याला फार बोचत असे. तिची भाषा, तिचा पोशाख, तिची राहणी — सगळे आमूलाग्र बदलून जावे; तिने अगदी शहरी होऊन जावे म्हणून गेल्या वर्षापासून तो कसून प्रयत्न करीत होता. प्रयत्नांत आग्रह असला तरी क्रोध, चीड, मुळीच नव्हती. दुर्बिणीतून पाहिल्यानंतर आसमंत मोठे दिसावे, डोळ्यांनी न दिसणाऱ्या गोष्टी दिसून याव्या तसे काहीसे त्याचे झाले होते. त्याअगोदरपासूनच आपण आहोत त्या स्थितीतून वर जावे अशी त्याला टोचणी लावणारी त्याची मनःस्थिती होती.

आडकूचे खरे नाव हाडक्या. शहरात आल्यावर त्याने त्या नावाचे शक्यतो शुद्ध रूप करून घेतले होते. लहानपणी आईबापांनी त्यांची दोन–तीन मुले होऊन गेल्यानंतर हा जगला म्हणून काही दिवस त्याचे नावच ठेवले नाही. नाव ठेवले म्हणजे मुले जगत नाहीत ही समजूत. हाक मारावीच लागली तर " कवड्ड दमड्ड " अशी नावे घ्यावीत. आपण मुलाला महत्त्व दिले तर यम त्याला लवकर नेईल म्हणून आमच्या दृष्टीने त्याची किंमत कवडी–दमडीचीच आहे असे ती मातापितरे यमाला भासवीत होती. मूल वाढू लागले, चालू लागले. त्याच्या किडकिडीत अंगाकडे पाहून इतर लोक त्याला " हाडक्या " म्हणू लागले. त्या म्हणण्यात उपहासापेक्षा कौतुक अधिक असल्याने तेच नाव त्याचे पाळण्यातले म्हणून रुळले.

या नावाची उपहासात्मक जाणीव हाडक्याला पहिल्या प्रथम सक्तीच्या शाळेत जातानाच झाली. इतर जातीची मुले कोणी सखाराम, दयाराम अशी तर त्याहून वरच्या थरातील कोणी चंद्रकांत, विश्राम, अशी असत. आडनावाच्या बाबतीतही हाडक्याला समाधान नसे. नाव हाडक्या, आडनाव चांभारे. मास्तरांनी मोठ्याने हाक मारावी ' हाडक्या ' म्हणून; मुलांनी चिडवावे ' चांभार ' म्हणून.

ही उणीव भरून काढण्यासाठी त्याचे छोटे मन तयार झाले. त्यामुळे अभ्यास, खेळ, शाळेतील इतर प्रवृत्ती या सर्वांत हाडक्याचा नंबर पहिला किंवा कधी पहिल्या पाचांतला राहू लागला. वार्षिक उत्सवात त्याच्या नावाने किती तरी बक्षिसे निघत. चार लोक सभारंभाने जमावेत, मास्तरांनी शाळेच्या अभिमानाने ' हाडक्या चांभारे ' असे नाव उच्चारावे, मुलांनी टाळ्या वाजवाव्या आणि हाडक्याने मात्र सुतकेल्या चेहऱ्याने बक्षीस घ्यावे, असा प्रकार सक्तीचे शिक्षण संपेपर्यंत चालला. परिस्थितीने त्याला चवथीपलीकडे जाऊ दिले नाही. मास्तर आणि हाडक्याचे आईबाप यांना त्याबद्दल फार वाईट वाटले. पण हाडक्या खुंश झाला. त्याला बक्षिसेही नकोत आणि ते नाव उच्चारणेही नको असे झाले होते. इकडे पुढच्या शिक्षणासाठी कसे करावे याचा विचार मोठी माणसे करीत होती, तर आपल्याला फारसे कोणी हाक मारणार नाही असे कोणते काम आपण निवडावे याची चिंता हाडक्या करीत होता.

म्हणून पाटलाच्या गाई-म्हशी राखण्याचे काम त्याला मिळताच त्याला सगळी बक्षिसे एकदम मिळाल्यागत आनंद झाला. त्याच्या मनात शंका, भीती अगदीच नव्हती असे नाही. एखाद्या वासराने कान टवकारून त्याच्याकडे पाहिले की एकदम त्याला वाटून जाई की, आता हे वासरू आपल्याला हाक मारणार ! तो लागलीच काठी उगारी.

त्याचे नाव न उच्चारता कोणीही त्याच्याकडून गाडाभर काम करवून घ्यावे. पाटलीण त्याला गडी म्हणे. एकतर ती त्याला फार आवडायची. पाटलाची दुसरेपणाची बायको. सुखाने कसत गेलेला कमरेचा करगोटा. चांदीची चमक, ' गडी ' म्हणणारी ही बाई हाडक्याला जे जे काम सांगे ते चटकन होई. नावाचे वैगुण्य वगळून सगळे गुण हाडक्यात होते.

याच गुणांच्या भरवशावर हाडक्या आपल्या एक नातेवाईकाबरोबर शहरात आला. आल्याबरोबर त्याने नाव बदलले. मोलमजुरीचा जम बसल्यावर रेशन कार्डावर तो एकदम आडकोजी सांबारे झाला. आजही त्याला मधूनच वाटून जाते की, त्याच वेळेला आणखी एखादे चांगले नाव घ्यायचे सुचले असते तर ? त्याच्यासारख्या कित्येक मजुरांनी आपली नावे चांगली ठेवून घेतली होती. पण आता काय ? एकदा बनलेला आडकू शेवटपर्यंत आडकूच राहणार होता.

चार इयत्ता उत्तम पास झाल्याने त्याला वाचन, हिशेब चांगले जमत. मजुरांच्या लायब्ररीत काही पुस्तके असत. त्यांतून त्याने विचित्र नावाचे थोर पुरुष निवडून त्यांची चरित्रे वाचावी; पण त्याच्या नावाचा कुणीच थोर पुरुष, संत, मुत्सद्दी त्याला दिसला नाही. मनातल्या मनात त्याने गाडगेमहाराजांसारखे आडकूजीमहाराज जुळवून पाहिले; पण ते जमेना. काहीतरी केले पाहिजे, काहीतरी झाले पाहिजे !

म्हणूनच आडकू इतरांहून जरा वेगळा झाला. इतर मजूर कामे चुकवीत; आडकू इमानाने राबे. इतर अवांतर पैसा खर्च करीत, तर आडकूला पानतंबाखू खाण्यात कमीपणा वाटे. त्याला दोन पैसे इतरांहून अधिक मिळत. त्या पैशातून कमीत कमी सखारामाच्या घरच्यासारखी राहणी व्हावी असे त्याला वाटे. इतर मजुरांचे दीड-दोन रुपयांच्या खोलीत कुटुंब चाले. आडकूला एकट्याला पाच रुपयांची जागा अपुरी वाटे. इतर त्याच्यावर जळत. इतरांची मजुरी रोज दीड रुपया तर आडकू पावणेदोन वाजवून घेई. कामाच्या विश्वासाने दोन गोष्टी मालकही त्याच्या ऐकून घेई.

असा हा आडकोजी, वय वर्षे अठरा, एक दिवस सकाळी उठला. उठल्याबरोबर त्याला वाटले, हे पैसे आपल्याला पुरत नाहीत, काही दुसरा धंदा केला पाहिजे. उठून त्याने खोलीचे दार उघडले. शरदाच्या गारव्याला घेऊन पहाटेच्या उषेने आपले लाल किरण त्याच्याभोवती आवळले. तोच त्याला वाटले, छट् पैसाबिसा सारे झूट आहे. आनंद हाच सत्य आहे. त्या आनंदाच्या भरात त्याने भराभर रोजची कामे संपविली. आपली शिदोरी बांधली आणि तो कामावर निघाला.

साधी, रोज उडणारी चार-दोन पाखरे आज एवढी सुंदर का दिसतात याचे त्याला नवल वाटत होते. कावळे, चिमण्या, कबुतरे तो रोज पाहत होता, पण आजच्या चिमण्या काही विशेष चिंवचिंव् करीत होत्या. फुलून पिवळी झालेली शिरिषाची झाडे आडकूवर हळद शिंपडीत होती. मोटमोठ्या बंगल्यांची फाटके दूधवाले खडखडावीत होते. एका दूधवाल्याला त्याने उगीच एक प्रश्न विचारला आणि त्याला उगीच एक प्रत्युत्तर मिळाले. खांद्यावरील शिदोरीतील तिखट बेसनाचा खमंग वास त्याला तीन-तीनदा घ्यावासा वाटला. गव्हासाठी कमावून तयार ठेवलेली शेतकी फार्माची सरकारी जमीन—त्याला वाटले एक पाण्याचा शिरवा आला तर काय सुगंध सुटेल! गव्हाच्या पेरणीची किंचित थंडी, टिटवी ओरडत आहे की, 'पेरते व्हा'! आपले गाव दूर, आपले घर दूर, इथे कुठे रस्त्यावर एकटे आपले चालणे! दुसऱ्याची कामे करावी आणि सायंकाळी पैका मोजून घ्यावा. अवघ्या दिवसाची किंमत एकच—एक रुपया बारा आणे!

आज त्याला गावाची—आईवडिलांची अतिशय आठवण येऊ लागली. तो राखीत असलेल्या पाटलाच्या गाईपैकी 'चितारी' वर त्याचा फार जीव! त्याला ती चार-पाचदा मनात येऊन चाटू लागली. गेले पाहिजे, गावाला एकदा जाऊन आले पाहिजे!

किंचित पुढे गेल्यावर चौरस्त्याच्या एका कडेला एक रिक्षा उभा होता. त्याच्या अडोशाला उभी राहून एक मुलगी रिक्षाचे मोल करीत होती. त्याने ती मुलगी पाहिली. त्याची नजर खिळली! सकाळच्या लाल किरणांनी पुनः एकदा त्याला कवेत घेतल्यागत वाटले! पऱ्हाटीचे फूल, पोटरीवर आलेला ज्वारीचा धांडा, मोहरीचे सबंध

फुललेले शेत, खापरात तापविलेल्या दुधाच्या साईचा खरपूस वास, अष्टमीच्या रात्री माळिणीने सोडलेल्या वाहत्या दांडाच्या पाण्यात तरंगणारे झुळझुळीत चंद्रबिंब, अगस्त्याच्या कळ्यांची रास !

ती मुलगी विचारीत होती—" ए रिक्षा, किती पैसे घेणार ? तुझ्याजवळ मोड आहे की नाही ? "

आता आडकूजवळ एक दहा रुपयांची मोड असती तर ? आडकू जायला निघाला. रस्त्यातच एक कुत्र्याचे मुटकुळे पडले होते. त्याला डिवचून आडकूने क्यँव क्यँव असा आवाज काढला. कामावर पोचताच खणतीची कुदळ त्याने उचलली. पीळदार बांधा बनला होता त्याचा. त्याला त्या वेळी हाडक्या म्हणणे मूर्खपणा होता.

कुदळ जमिनीवर मारताच छन असा आवाज झाला. पाहतो तो चांदीचा करगोटा चम् चम् चमकतो आहे ! पाटलिणीचा करगोटा इथे कसा याचे आश्चर्य करण्या- अगोदर त्याने तो तिच्या कमरेवरून काढून मवाच्या मुलीच्या कमरेवर चढविला. गावच्या सरव्याच्या आईच्या अंगातली जरीच्या खणाची, एका पट्टीची चोळी तिला घालायला दिली, पुजाऱ्याच्या सुनेसारखी भरली घागर तिच्या कमरेवर ठेवून दिली, सोनाराच्या मंजीसारखे नदीच्या पाण्यात पोट्ट्या बुडवून, ओचे खोचून सगळे धुणे तिच्याकडून धुऊन घेतले !

जेव्हा कुदळीने भरभर मातीच निघू लागली तेव्हा सपासप काम संपवून तो सायंकाळी घरी आला. भुकेने त्याचा जीव वखवखला. भिजवून मोड आणलेले कच्चे गहू चावून खाण्याची त्याला एकदम इच्छा झाली. चूल पेटवून त्याने कणीक भिजवायला घेतली. त्या भिजलेल्या गोळ्याकडे किती वेळ पाहून त्याची तृप्ती होईना. शेवटी तिंबून तिंबून त्याने आपली बोटे खुपसून दुखवून घेतली !

जेवून फेरफटकाऱ्यासाठी तो सहज बाहेर पडला. सकाळच्याच रस्त्याने त्याने एक चक्कर मारून पाहिली. मुटकुळे करून पडलेले कुत्रे तिथेच होते आणि एकाच्या ऐवजी चार-पाच रिक्षावाले स्वतःच्या रिक्षात बसून विड्या फुंकीत होते.

तो घरी आला. अंगणातील तुळशीच्या मंजिऱ्या चांदण्यात चमकल्या. छपरावर फुटलेली दोडकीची वेल वाऱ्याने हालली. त्याच्या खाटेवरील आढ्याच्या फटीत एक चिमणी झोपलेली त्याला दिसली. तिचे ते पांढरे गुबगुबीत गोल पोट ! झोपू द्या बिचारीला ! तो खाटेवर पडला खरा पण त्याच्या मनात एकदम असे आले की, झकासपैकी स्टोव्ह विकत घ्यावा. त्यात भरपूर तेल भरून असा जोरात पंप करावा की, एकजात निळ्या जाळाची परडी फुलून भरारेल ! भर्र् भर्र असा आवाज त्याने मग कितीतरी वेळा ऐकला. चार लोक विचारतील की काय आडकोबा, केवढ्याला पडला स्टोव्ह ? पण स्टोव्ह एका टेबलावर मात्र ठेवायला हवा ! त्यावर ठेवलेले दूध समजा एकदम उतू गेले तर ? त्याने चटकन स्टोव्हची चावी बंद केली. फस्स् असा आवाज

झाला. पण दूध उतू जावयाचे ते गेलेच! खरपूस दूध तापविणे आपल्याने काही जमायचे नाही!

आणि मग त्याला आठवले की, सकाळपासून त्याच्या मनात स्टोव्हचा विचार मुळीच नव्हता. लग्न करायचे म्हणून तो विचार करीत होता. तो अशक्य वाटला म्हणूनच स्टोव्ह घ्यायचे आपल्या मनात आले. झोपलेल्या चिमणीचे पोट दिसले नसते तर साऱ्या रात्रभर स्टोव्हचा आवाज त्याच्या खोलीभर भरांटला असता. चिमण्या चांगल्याच असतात. दोघे मिळून आपली घरटी बांधतात, मजा मजा करतात.

तसे म्हणजे लग्न करणे चांगलेच असते. आता तो हाडक्या नसून त्याचे शरीर गोटीबंद झाले होते. छोट्या खोलीत मोजक्या वस्तूंची माया त्याने व्यवस्थित लावून ठेविली होती. पेटीच्या तळाखाली काही नोटाही होत्या. एक तर हिरवी नोटही होती. एवढ्या भांडवलावर चार-पाच लग्ने होतील. आपल्याला तर सध्या एकच कर्तव्य आहे. तेही आपले एकट्याचे, दुसऱ्या कुणाचे नाही.

रात्र असल्याने झोपणे भाग. पण झोप म्हणजे विलंब. न झोपणे ठीक. एवढाच वेळ वाचेल. जागेपणी त्या चिमणीच्या पोटातून तो तडक आपल्या गावाला गेला. पहिल्या प्रथम सीतानानीची रंगीच त्याला भेटली. जिला घेऊन जायला आपण इथवर आलो तिचीच भेट झाल्याने त्याचा जीव भांड्यात पडला. बरेच झाले, झोपलो नाही ते!

त्याने असे ठरवून टाकले की, रंगी आपली बायको झाल्यावर तिला कापूस वेचायला मुळीच पाठवायचे नाही, खुडणावर ओणव्याने कणसे भरू द्यायची नाहीत, हलवाग्याच्या दुकानासमोर उभे राहून मिठाई खाऊ द्यायची नाही. कारण अशाच ठिकाणी ती त्याच्या मनात भरली होती. नाही, ते सगळे आता बंद करणे योग्य! तिला खायचे असेल तर चांगला स्टोव्ह पेटवावा आणि वाटेल तो पदार्थ करून खावा. दूध मात्र मुळीच उतू जाऊ देऊ नये. किल्ली बंद करण्याचे तिला शिकविले की झाले! एवीतेवी पेटीच्या तळाचे रुपये तिला दिसणारच! सांगून टाकावे आपणच झाले!

खरे म्हणजे या वेळी तो गावी गेला तो दोन-तीन वर्षांनी! आई-बापांना आनंद झाला. सोनार, पाटलीणबाई, सख्या, त्याची आई, पुजाऱ्याची सून, सगळे त्याला भेटले. सगळ्यांनी त्याच्याकडे पाहून एकमताने सांगितले की, तुझे नाव तुला मुळीच शोभत नाही. ते बदलले पाहिजे.

इतके झाल्यावर सीतानानी रंगीबद्दल 'नाही' कसे म्हणणार? सगळ्यांचे अगोदर मत की, लग्नाला फार उशीर केला आडकूने! रंगीलाही तेच वाटे. आता उशीर करून तिला चीड आणण्यात काय शहाणपण?

चार-आठ दिवसांत सीतानानी आणि बायको यांना घेऊन भाडकू शहरात परत आला. सासू आल्याबद्दल त्याला खरेच आनंद झाला. रंगूला बाहेर कामाला पाठवावयाचे नाही, म्हणजे आपण पैसे मिळविले पाहिजेत. सासू असल्याने त्याने रातपाळीचे काम पत्करले आणि दोन महिन्यांच्या आतच एक दिवस एक भाड्याचा रिक्षा आपल्या दारी आणून उभा केला. रंगीने त्याला तो चालवून दाखवावयास सांगितले. तीनदा ती बाहेर आली, तीनदा आत गेली. मग रिक्षात स्वतःच जाऊन बसली.

चार-सहा दिवसांत त्याच्या हाती व ट्रंकेत पैसे जमू खेळू लागले. चहा-चिवडा त्याला पूर्वीही लागत नव्हता आणि आता तर त्यावर पैसे खर्च करण्याचे कारणच नव्हते.

पण रिक्षा चालवायचा म्हणजे मोड भरपूर हवी जवळ! कुणी असे विचारता कामा नये की, 'ए रिक्षा, तुझ्याजवळ मोड आहे की नाही!' चार-दोन रुपयांची चिल्लर नेहमी असावी माणसाजवळ अशा वेळी! आता त्याला 'चिल्लर', 'खुर्दा' अशा शब्दापेक्षा 'मोड', 'सुटे पैसे' असे शब्द फार वापरावयास आवडू लागले. सीतानानीचे काय! ती चार दिवसांनी गावी जाईल. पण रंगीने 'मले, तुले' म्हणता उपयोगी नाही. आपल्याला नाही का शहराची भाषा आली? मग रंगीला का येऊ नये?

सीतानानीचे परत जाणे उमळले. त्याने मोडता न घालता नवे लुगडे घेऊन गावकऱ्यांच्या सोबतीने तिला पाठवून दिले. रंगीसाठी दुसऱ्या दिवशी एक आरसा, एक नवी साडी, डूल विकत आणले. त्या सगळ्या पेहेरावात तिला हळूहळू 'मले तुले' म्हणण्याचा संकोच वाटू लागला. रंगी त्याला न रागावता खुश ठेवू लागली. जिच्याशी लहानपणापासून आपण लग्न करावयाचे ठरविले ती रंगी अशी झकास उतरल्याचे समाधान तो अनुभवू लागला.

आणि त्याला तीच सवारी नियमितपणे मिळाली, जी त्या दिवशी-बरेच दिवसांपूर्वी-दुसऱ्या रिक्षेवाल्याला मोड विचारीत होती. सकाळी आठ वाजता सवारी कॉलेजात सोडावयाची, साडेबाराला परत आणावयाची!

पाण्याच्या शिडकाव्याने रानफूलही टवटवते. घरच्या कुंडीतला रंगीचा गुलाब आकाराला आला. आणि तोच पोशाख, तोच पेहेराव, जो त्याच्या रिक्षात वीस आणि वीस चाळीस मिनिटे दिसत होता. म्हणजे अधिक पैसे कमावले पाहिजेत. आणि रिक्षा पण चांगला, चकचकीत ठेवला पाहिजे. उगीच लोकांचे कपडे खराब व्हायला नकोत.

रोज सायंकाळी एक ना एक वस्तू तो विकत घेऊन येई! हळूहळू घरात पितळी भांडी आली, सतरंजी आली, भाजी पिशवीत येऊ लागली. आणि आता हाडक्याचे नाव चंद्रकांत ठेवण्याइतका तो बदलून गेला.

मधूनच कॉलेजातून येताना ती मुलगी एखाद दुसरा शब्द आडकूशी बोलू लागली. तिच्या घरच्या मंडळींचा आडकूवर विश्वास वाढला. दसऱ्याला त्यांच्या घरी सोने द्यावयास आडकू रंगीसहित गेला. रंगीने तेथे अगदी शहरच्या भाषेत उत्तरे दिल्यामुळे तिचेही नाव बदलून टाकण्याचा विचार त्याच्या मनात आला.

रंगू शिकली मुळीच नव्हती. पण तिला शिकावेसे वाटू लागले. का वाटले याचे कारण ती जाणू लागली. आपल्याला कोणकोणत्या वस्तू आणून दिल्या जातात हे तिला उमजल्यामुळे त्या घरी वारंवार जाण्याचेही तिला कळू लागले !

आणि एक दिवस रंगीच्या मध्यस्थीने त्या मुलीच्या वडिलांनी आडकूजवळ गोष्ट काढली की, त्यांनी एक रिक्षा घ्यायची, आडकूने नोकरी करायची, त्यांच्या घराच्या मागच्या बाजूच्या फरशी व विजेच्या दोन खोल्यांत रंगूने संसार सजवायचा आणि या सर्वांच्या मोबदल्यात आडकू मागेल तो पगार व मुलीचे वडील मागतील तेवढा विश्वास परस्परांनी घ्यायचा.

आता रंगीवर बरीच जबाबदारी पडली. आपले मूळचे गोरे तोंड नेहमी उजळ ठेवले पाहिजे, पुष्कळ गोष्टी जाणल्या पाहिजेत, दुर्बिणीतून दिसणाऱ्या वस्तूसारखे उठून दिसले पाहिजे. आडकूचा जीव तिच्यात गुंतल्याने सगळ्या गोष्टी ती इतक्या भराभर शिकली की, एक दिवस आडकूने भीती घेतली की, आपण जर आता अधिक शिकलो-सुधारलो नाही तर रंगीला आपण नवरा म्हणून शोभणे शक्यच नाही !

२०।१०।५३

१२५

बळी ?

पाहिलेल्या आणि पारखलेल्या मुली जेव्हा सद्गुणाचा आणि पावित्र्याचा आव आणतात तेव्हा फार एकटे एकटे वाटते. आपण सोडून का होईना पण सगळे जग सुधारू लागल्याची जाणीव तशी काही वाईट नाही. तरी हा एकलेपणा कधी कधी असह्य होऊन जातो.

दीड वर्षांपासून मालिनी माझ्याकडे येते. आताशा बरेचदा येते. अपेक्षेपेक्षा अधिक बोलते, अंदाजापेक्षा अधिक वेळ थांबते आणि कधी कधी तर असेही वाटून जाते की, एवढासा इशारा मजकडून मिळाला तर ती जाणारही नाही.

पण आता तिच्या येण्यात गंमत वाटत नाही. तिच्याशी बोलण्याचा माझा सोस निमाला. जागेपणीच्या प्रत्येक क्षणी तिचा विचार करणाऱ्या मला तिच्या येण्याने,

तिच्या बोलण्याने विसावा लाभत नाही. एके काळी जिला मी माझ्या सर्वस्वाच्या सुगंधाची उपमा दिली, तिच्याकडे नुसते डोळे भरून पाहण्याचीही उभारी माझ्या मनाला राहिली नाही.

विचित्र असते माणसाचे मन. पूर्वी ती येत नव्हती म्हणून तिच्यावर व माझ्यावर मी रागावत असे. ती आली म्हणजे माझ्या खोलीभर सप्तसूर छेडले जात. आज वीणेच्या तारा छेडणारी ती तशीच आहे. पण वीणेची तार तुटली आहे. ती तार का जोडावी याचे उत्तर मात्र सापडत नाही.

पुष्कळदा वाटते, यात मालिनीचा दोष नाही. दोष माझा आहे. तिच्या रूपात, गुणात, वागण्यात मी उणीव शोधावी असे काहीच घडले नव्हते. कुणीही हेवा करील अशी तिची रूपसंपदा. तेवढ्या एका संपदेच्या बळावर ती सारे आसमंत खेळवू शकत होती. तिचे ते सौंदर्य वसंताच्या झुळकीने बहराला येऊनसुद्धा आज--

आज मालिनी येते, बोलते आणि निघून जाते !

गेल्या वर्षी एका सकाळी ती माझ्याकडे आली. आज एवढ्या हक्काने मी तिच्याबद्दल बोलतो आहे. त्या वेळी हक्काचा प्रश्नच नव्हता. फक्त एक रूपगर्विता सकाळी उषेच्या लालीसारखी आपल्या दारात आली एवढेच तिचे माझे नाते ! ती आली. 'बसा' म्हटल्याबरोबर बसली. प्रश्नार्थक मुद्रेने तिच्याकडे पाहताच ती हसली. तिने आपले नाव सांगितले; ती कुठे राहते, तिचे लग्न कधी आणि कुणाशी झाले, याचाही तिने उल्लेख केला. थोरामोठ्याची ती मुलगी आणि थोरामोठ्यांच्या घरात पडलेली ! अर्थ स्पष्ट होता की, तिचे असेल ते काम तिने मला सांगावे, पण माझ्या कामाचा पत्कर घ्यायला मात्र ती मोकळी नाही ! त्याला माझी तयारी होती. पुष्कळ गोष्टी मिळतील तेवढ्याच हव्याशा वाटतात. बागेच्या कुंपणाआडची कृष्ण-कमळीची वेल आणि मालिनी !

'बरं, आपलं काम काय ?'

'विशेष नाही; मी तुमची सगळी पुस्तकं वाचली आहेत.'

'एवढं सांगायला इथवर आला तुम्ही ?'

'तसंच नाही, पण...'

'मग काय ? तुम्हांला आवडली नाही ती ?'

'तसं नव्हे ! तुम्ही शरद देशमुखांना ओळखता ?'

'कोण देशमुख ?'

'अय्या ! पण ते तर म्हणाले की, तुमची त्यांची ओळख आहे म्हणून !'

'देशमुख म्हणजे कापडाच्या कारखान्याचे मालक म्हणता तुम्ही ?'

'होय, तुम्ही कोण समजला ?'

'त्यांची माझी प्रत्यक्ष ओळख नसल्याने एकदम त्यांचं नाव माझ्या ध्यानात आलं नाही!'

'प्रत्यक्ष ओळख म्हणजे?'

'म्हणजे असं की, त्यांच्या पत्नींना मी ओळखतो. त्या मजकडे बरेचदा येतात.'

'तुमच्याकडे येतात?'

'होय.'

'कशाला?'

'कशाला! त्यांना लेखनाची हौस आहे. त्यांची दोन पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. तिसऱ्याचं हस्तलिखित या इथं माझ्या टेबलाच्या खणात आहे आणि ते घेऊन जायला त्या कधीही अगदी या क्षणीसुद्धा, येऊ शकतील.'

'तुमच्याकडे एकट्याच येतात त्या?'

'हो, पुष्कळ वेळा, कधी कधी दोघंही येतात; पण तुमच्या विचारण्याचा अर्थ?'

'अर्थ असा काही नाही; पण तुम्हांला आवडतात त्या?'

'हे देखील तुम्ही विचारण्याचं कारण?'

'तसं नव्हे. सहज, माझी देशमुखांशी ओळख आहे म्हणून.'

'देशमुख तुमच्याकडे येतात?'

'होय.'

'एकटेच येतात?'

'म्हणजे काय?'

'म्हणजे काही नाही! तुम्ही नेमके जे प्रश्न मला विचारले तेच मी तुम्हांला विचारतो. तुम्हांला देशमुख आवडतात? देता येईल तुम्हांला या प्रश्नाचं उत्तर?'

'तुमचा गैरसमज झाला आहे.'

'पहिल्या भेटीत गैरसमज होण्यासारखे प्रश्न विचारायला मी तुमच्यासारखा सुंदर नाही.'

'सुंदर माणसांनी केलेला गैरसमज सहन होतो?'

'मला असं वाटतं की, तुम्ही तुमचं काम सांगावं म्हणजे सौंदर्याच्या प्रश्नाला जरा वेगळं वळण मिळेल.'

'का? सौंदर्याची चर्चा आवडत नाही तुम्हांला?'

'आवडते. पण ती अशा माणसाशी की...'

'म्हणजे माझं सौंदर्य तुम्हांला कबूल आहे. फक्त...'

'तुम्ही तुमचं काम सांगाल का?'

'मी सगळ्यांनाच सुंदर दिसू शकते का? उदाहरणार्थ...'

'तुम्ही तुमचं काम सांगाल का ?'

'सांगते, पण त्या अगोदर मला सांगा की, समजा, एखाद्याच्या अवतीभवती सुंदर नि गुणी माणसं असली तरीही तो माझ्याकडे पाहू शकेल काय ?'

'या तुमच्या प्रश्नाचं उत्तर मजजवळ आहे, आणि ते मी दिल्यास तुम्हांला माझ्याकडे पुनः यायचं काम पडणार नाही. मला वाटतं, तुमचं काम संपलं. तुम्ही चुकून माझ्याकडे आला आहात.'

'मी चुकत नसते.'

'मग काय चुकवीत असता ? की...'

'की, काय ? मला राग येत नसतो.'

'की, चुकविल्या जाता ?'

मालिनी यावर अगदी मोकळेपणी हसली. तिचे ते हास्य रागालोभापलीकडचे होते. तिच्या बोलण्याला मी कल्पीत होतो तो अर्थ नव्हता आणि तिच्याशी बोलण्याची व तिला बोलू देण्याची भीतीही नव्हती. म्हणूनच तिचे त्या सकाळचे येणे मला आवडले. थोड्या वेळाने तिने कामही सांगून टाकले.

'मला लेखनकला अवगत होऊ शकेल ?'

'होऊ शकेल. पण आताच लेखक व्हायचं कशाला ?'

'तो माझा प्रश्न आहे. मी शरद देशमुखांना विचारलं. त्यांनी मला तुमच्याबद्दल सांगितलं. तुम्ही शिकवाल का मला ? मी श्रम करायला तयार आहे.'

'तुमच्या श्रमांनीच तुम्हांला येईल. माझ्या शिकविण्याची गरज नाही. तुम्ही यापूर्वी काही लिहिलं आहे ?'

'काही नाही.'

'लेखक होण्याचं कधीपासून तुमच्या मनात आहे ?'

'गेल्या दोन महिन्या...नाही, फार दिवसांपासून.'

'प्रसिद्ध लेखकांची कोणती पुस्तकं वाचली आहेत ?'

'कोणतीच नाही.'

'वासंती देशमुखांची पुस्तकं वाचली आहेत ?'

'मी त्यांना प्रसिद्ध लेखिका मानीत नाही.'

'म्हणजे तुम्हांला लेखकांविषयी मतं आहेत ! या मतांचा तुमच्या सध्याच्या इच्छेशी...'

'तसं नव्हे, पण त्या लेखिकेबद्दल तुम्हांला वाटतो तेवढा जिव्हाळा मला वाटण्याचं कारण नाही.'

'मग मलाही आपल्याला शिकविण्याचं कारण नाही.'

'मी तर शिकायचं ठरवलं आहे; आणि तुम्ही मला शिकविणारही आहात. माझा स्वभाव जरा फटकळ आहे. म्हणून उत्तराला उत्तर मी देते एवढेच.'

'म्हणजे तुम्ही आता मघासारख्या पुनः मोकळेपणी हसणार तर?'

"मग ठरलं ना शिकवायचं? तुम्ही सांगाल ते वाचीन, सुचवाल ते लिहीन कबूल?'

'आज कबूल नाही.'

'का?'

'विशेष कारण नाही. उद्या मी तुमच्या घरी येईन आणि तोवर तुमचा निश्चय राहिलाच तर बघू.'

'माझ्याकडे कशाला यायचं?'

'का येऊ नये? सगळ्यांशी ओळख होईल माझी. तुम्ही उद्या लेखक झाल्यावर घरची सगळी माणसं तुम्हांला कुठं ठेवू नि कुठं नाही असं करतील. थोडं यश मलाही मिळेल. आता देशमुखांचंच पाहा ना! त्यांना त्यांच्या पत्नीचं किती कौतुक आहे! त्यांचं पहिलं पुस्तक छापायला ते स्वतः मुंबईस गेले होते, माझाही खर्च त्यांनी दिला मुंबईचा.'

'मला नाही हे खरे वाटत!'

'तुमच्या खरं न वाटण्याचा संबंध कुठं येतो?'

'पण आमच्या घरी नाही कुणाला एवढं कौतुक वाटायचं.'

'म्हणजे?'

'तुम्ही फार अर्थ विचारता. तुम्हांला माझ्याकडे यायचं कारण नाही.'

'मग काय तुम्ही मजकडे येणार?'

'हो.'

'सतत येणार?'

'हो.'

'कधी?'

'तुम्ही सांगाल तेव्हा!'

'वेळी अवेळी सुद्धा!'

'तुम्ही सांगाल ती वेळ अवेळ असणार नाही या भरवशाने तुम्ही दिलेल्या अवेळी देखील येईन.'

मालिनीच्या या उत्तराने कुणीही जन्मभर तिला शिकवायला तयार होईल. मी तसेच केले. फक्त एक विचार केला नाही, तो म्हणजे तिच्या घरी जाण्याचा. तेवढे केले असते तर हा विषाद, हे औदासीन्य, ही तितिक्षा, हा उबग नशिबी आला नसता.

कधी कधी जिंकले जाण्यात सुख वाटते. मालिनी काही शिकली नाही तरी चालेल! तिने शिकूच नये. मी मात्र शिकवीत राहावे. त्यासाठी वेळ अवेळीचे बंधन असू नये.

हेच ते माणसाचे मन ! याच मनाला मर्यादा नसतात आणि याच मनाला पोचही नसतो. वेळेची अवेळ न करण्याचा शब्द तिने घेतला होता; पण मालिनीला 'माला' म्हणायला अडचण नव्हती. शिवाय सांगेन तेव्हा येण्याची तिची तयारी. मी तिच्या घरी येऊ नये ही तिची इच्छा. पाण्यावर एखाद-दुसराच थेंब पडतो. आत जाता येत नसल्यामुळे तो वरच पसरतो आणि त्याच्या शक्तीप्रमाणे वरचा सगळा भाग व्यापून टाकतो. त्यामुळे माझ्या वेळेला बंधन राहिले नाही. मालिनीवाचूनच्या सगळ्या वेळा मला अवेळाच वाटू लागल्या आणि—

कच्च्या कैरीला कल्पना असते की नाही कुणास ठाऊक, पण पाडाच्या आंब्याला नक्कीच माहीत असते की, आपला उपयोग काय !

इथेच, इथेच मी गेल्या दीड वर्षापासून अडखळलो आहे. पाडाचा आंबा तोडायचा पण खायचा नाही. हीच रीत जर मला शिकता आली असती तर सौंदर्याने मुसमुसलेली माला आज जी माझ्याकडे येते...

पण खरेच; ती आता कशाला माझ्याकडे येते ? शिकण्याच्या ज्या उत्कंठेने तिने मालिनीची माला होण्याचे स्वीकारले ती तिची उत्कंठा आज राहिली नाही. मी दिलेल्या वेळीही ती येत नाही. मी सांगितलेले कधी वाचले नाही. आणि सुचविले तसे लिहिले नाही. कदाचित ते विषय तिला आवडले नसावे. कदाचित त्या विषयात मी स्वतःलाच कोठे तरी दडपले असावे. ज्या पुष्करणीत मी उडी घालीन त्याच पुष्करणीत तिनेही विहार करावा आणि पोहण्याचे प्रशस्तिपत्र मिळवावे ! कदाचित मी सांगेन तसे, त्या दिशेने तिने लेखक व्हावे. हे तिला आवडले नसावे, किंवा—

किंवा तिला नुसते लेखिका व्हायचेच नसावे !

मग ती आरंभी तरी माझ्याकडे आली कशाला ? अहल्या व इंद्र यांच्या कथानकाच्या आधारे तिने एक गोष्ट लिहिली होती. त्या गोष्टीतील इंद्र कोण हे कदाचित तिला उमजले असावे आणि म्हणून तिची लेखनाची हौस फिटली असावी !

हे सगळे खरे असते तर जीवनातील एक निष्फळ निराशेचा प्रसंग म्हणून मला हाय खाता आली असती. अश्रूंत बुडविलेल्या शब्दांनी लेखन करता आले असते. तिच्या नावाचा जप करीत करीत ती माला शब्दांनी मी अमर करून टाकली असती. जे मिळावयास हवे ते मिळाले नाही म्हणजे असंख्य मरेपर्यंत शोक करतात. त्यांच्या पाठीवरून मला कोवळ्या शब्दांचे हात फिरविता आले असते. पण खऱ्या अर्थाने ज्याचा मला हपाप नव्हता ते न मिळाल्याचा शोक ! त्याला काही अर्थ आहे काय ? त्या विषादाला काही सीमा आहे काय ?

अशीच एक दिवस मालिनी आली. .आपली पुस्तके तिने टेबलावर ठेविली आणि टेबलाचा खण उघडून त्यात ते कादंबरीचे हस्तलिखित शोधू लागली.

'माला, काल का नाही आलीस तू ?'

'शरद देशमुखांनी चहाला बोलावलं होतं. पण यातले,... '

'आणि परवा ?'

'परवा मी सिनेमाला गेले होते.'

'कोण कोण ?'

'आम्ही सगळे.'

'सगळे म्हणजे ?'

'तुम्ही फार अर्थ विचारता. आम्ही आणि देशमुख गेलो होतो. पण या टेबलातलं... '

'तुम्ही कोणत्या 'शो' ला गेला होता परवा ?'

'दुसऱ्या. पण या टेबलातलं इथलं ते... '

'दुसऱ्या 'शो'ला ? म्हणजे मग वासंतीबाई आल्याच नव्हत्या तर... '

'कशावरून ?'

'कशावरून काय ! आम्ही सर्वांनी त्या दिवशी माझ्या इथे त्यांच्या तिसऱ्या कादंबरीचं वाचन केलं !'

'तिसऱ्या ? या टेबलाच्या खणात होती तिचं ?'

'हो.'

'कुठाय् ते हस्तलिखित ? तेच तर मी मघापासून विचारते आहे.'

'ते नेलं त्यांनी.'

'कशाला ? छापायला ? आणि तुम्ही आता मुंबईला जाणार ? शरद देशमुख देखील जाणार ?'

'नाही. पण तू परवा रात्री... '

'थांब. ती कादंबरी कधी प्रकाशित होणार ?'

'ती छापली जाणार नाही.'

'कारण ?'

'कारण देशमुखांना ती आवडली नाही.'

'आवडली नाही ? मग दोन कादंबऱ्यांचं कौतुक ?'

'कौतुक जन्मभर करायचं नसतं आणि वासंतीताईंचा पहिला धर्म पती आणि दुसरा लेखन हे मला माहीत आहे.'

'म्हणजे काय ?'

चळी ?

'माला, तुझ्या घरची स्थिती काय हे मला माहीत नाही. वासंतीताईंशी त्यांच्या लेखनकलेवर भाळून लग्न केलं नाही हे नक्

'हे एक नवीनच ऐकते मी. पूर्वी का नाही सांगितलं मला ?'

'कशाला सांगायचं ?'

'नाही; म्हणजे ?'

'पण तुझा चेहरा असा काळाठिक्कर का पडला ? तुला बरं नाही सांगणार नाहीस तू ? काय होतंय् तुला ?'

'काही नाही.'

'मग आज अशी का दिसतेस तू ? माला, माझ्याजवळूनही लपविणार तू माझ्याकडून काही घडलं आहे ?'

'काही नाही. पण हे तुम्ही खात्रीनं सांगता ?'

'काय ?'

'हे ! आता सांगितलं हे !'

'तुला काय बाटलं, मी खोटं बोलतो तुझ्याशी ? माझ्यावर विश्वास नाही तुझा ? मी कधी तुझी प्रतारणा केली आहे का ? पण तुझा या सगळ्याशी संबंध काय ?'

'बराय्. येते मी.'

'कुठं निघालीस ? थांब, मला अजून तुझ्याशी बोलायचं आहे.'

'तुम्ही न बोलायला काय ध्याल आता ? आणि मला असं छळण्याचा तुम्हांला काय अधिकार ?'

'माला, ए माला, मालिनी...!'

पण माझी हाक मालिनी सोडून सगळ्यांनी ऐकली. टेबलावरच्या रिकाम्या फुलदाणीतून तिचा निनाद उठला. जे जे म्हणून हजर होते त्या सगळ्यांनी ती हाक ऐकली. मालिनी फक्त हजर नव्हती. भिंतीवर असलेला फोटो दोरी तुटून खाली आपटला. हाती असलेले फाउंटनपेन खाली पडून तुटले. छताच्या कडेला असलेल्या घरट्यातून चिमणी भुर्रकन् उडून गेली. वाऱ्याच्या झोताने खिडकीतून चार-दोन वाळलेली कडू लिंबाची पाने आत आली. ज्याच्या येण्याचे प्रयोजन नव्हते ते सगळे आले, आणि जे जाऊ नये असे वाटत होते ते सगळे गेले !

भिंतीवरून कोसळलेले चित्र मी उचलले. काच निखळून पडली होती. नदी-काठच्या जंगलाचा आसमंत त्यात चितारला होता. एक अशी मोठीशी वेल कुठल्याशा उंचवट्यावरून उगवलेली. मध्येच एका झाडाला तिने फांद्याफांद्यातून

. निरंतर, निष्पर्ण असे ते विळखे ! त्यांतून वेलही वाचू

काहीशा अंतरावर त्याच वेलीचा एक शेंडा दुसऱ्या, शेजारच्या , हिंदोळ्यावर झुलत असलेला. असंख्य पाने, असंख्य फुले-- पडलेल्या आहे,--अशी की नजर खिळली आहे !

झाले, काच निखळली तर !

ग मला त्याबद्दल काहीच म्हणायचे नाही, मालिनी कधीच आली नसती तर हणण्याचे कारणही नव्हते. तथापि अजून मालिनी येते, बैस न म्हणताही , आणि जशी येते तशीच निघून जाते !

हेच तिचे येणे कळत नाही. म्हणूनच कुठेतरी खुपते, कुठेतरी, दुखते, ती ाली नाही तर चुकचुक वाटते. आली तर जाणार कधी ? आणि गेली तर येणार कधी ?

११।४।५४

▣ ▣ ▣

परिशिष्ट

१

मी का आणि कसे लिहिले ?

मी का आणि कसे लिहिले ? का लिहिले या प्रश्नाचे सोपे व सरळ उत्तर, मला लिहावेसे वाटले म्हणून लिहिले असे आहे. कठीण प्रश्न असा आहे की, इतर काही न करता मला लिहावेसेच का वाटले ? हा प्रश्न जेव्हा जेव्हा मी माझ्या मनाला विचारला तेव्हा तेव्हा त्याने मला विलक्षण आणि निराशाजनक असा जवाब दिला. तो असा की, तुला इतर काही करता आले नाही म्हणून तू लिहावयास घेतलेस.

मला इतर काही का करता आले नाही ? मला कोणी आडकाठी घातली की काय ? वस्तुस्थिती तशी नाही. काय वाटेल ते करण्याचे निर्भेळ स्वातंत्र्य माझ्याइतके फार थोड्यांना लाभले असेल. ते इतके अनिर्बंध होते की, जगाच्या दृष्टीने मी सहज वाया जाऊ शकलो असतो.

माझे स्वातंत्र्य इतके अनर्गल होते की, चांगले वागण्याचा, जनरीत संभाळण्याचा प्रामाणिक प्रयत्न करूनही माझ्या विद्यार्थीदशेत, माझ्या कॉलेजजीवनात आणि सध्याच्या माझ्या पोटापाण्याच्या उद्योगात देखील पुष्कळसे प्रवाद आणि गैरसमज माझ्याबद्दल डोकावले होते व आहेत. कॉलेजात असताना माझ्याबद्दल, माझ्याशी निकट संबंध नसलेले असे बोलत की, मी त्या वेळच्या कॉलेजजीवनातील जातीच्या व परजातीच्या चार-दोन सुंदर मुलींवर एकदम एका तडाख्याने प्रेम करीत असे. काही चार-दोन मुली माझ्यावरही प्रेम करीत असत. हे जेव्हा जेव्हा मी ऐके तेव्हा तेव्हा मला हसू येई. वस्तुस्थिती अशी होती की, मला मुलींशी शहराच्या सभ्यपणाने धड बोलताही येत नसे आणि शिष्टाचाराप्रमाणे ओळख, आठवणही ठेवता येत नसे. त्या वेळच्या कॉलेजशिरस्त्यात मुलींची आठवण आणि वर्णने 'गजगामिनी', 'हंसिनी', 'पद्मिनी', 'काम्बोजतुरगाङ्गना' असल्या अतीव सुंदर, सुयोग्य आणि देवभाषाप्रचुर शब्दांत होत असत. मला ते शब्दही जमत नसत, आणि तशी आठवणही येत नसे. खेड्यापाड्याचे अन्नपाणी घेतलेल्या आम्हासारख्या मंडळींना एखाद्या मुलीने आपला विपुल अनावर केशभार आवरण्याचा प्रयत्न करूनही जर तिच्या काही बटा वाऱ्याशी खेळायला मोकळ्या असतील तर तिला 'लटारीबटारी' अशी नावे द्यावयाला सुचत. आमच्या या १२०° उष्णतामानाच्या देशात राहूनही आपल्या आईबापांच्या पूर्वपुण्याईमुळे जिचा रंग अतीव उजळ राहिला आहे अशी आमच्या दृष्टीने 'भुरी' ठरत असे. त्यांतल्या काही आम्हांला 'आखुडनाक्या', 'चपटतोंड्या' अशा वाटत. ह्या नावांत माझ्या सहपाठिनींना उणेदुणे बोलण्याचा शपथपूर्वक माझा उद्देश नव्हता.

पण मला शहरी भाषा जमतच नसे आणि अजूनही जमत नाही. आज देखील सभ्य माणसाशी व सुशिक्षित सभ्य स्त्रियांशी बोलताना मी इतका वचकतो की, हिंदीतच बोलतो. त्या वेळच्या प्रवादाप्रमाणे जर चार-दोन मुलींनी माझ्यावर खरोखरच प्रेम केले असते, तर मला नाजूक-साजूक शब्द ऐकायला आणि शिकायला मिळाले असते. पण नाजूक-साजूक शब्दांऐवजी काही कारणपरत्वे हा देह मुलींच्या कॉमनरूमबाहेर त्यांच्याशी बोलून परतत असे तेव्हा माझी कणखर पाठ 'रानटी आहे मेला' असल्या वाग्बाणांनी जर्जर होत असे. ते घाव शरीर दणकट असल्यामुळे मनापर्यंत पोचले नाहीत हे सुदैवच म्हणायचे! नाहीतर मला आजतागायत माझ्या हृदयाची मलमपट्टी व डागडुजी करीत बसावे लागले असते!

माझा जन्म खेड्याचा. माझे संस्कार खेड्याचे. जात ब्राह्मणाची. परंतु लहानपणी आपल्या गुणांमुळे इतर जातींचेच अन्न माझ्या अंगी लागले आहे. त्या खेड्यात बहुसंख्य लोक गोंड, गोवारी, कुणबी असेच होते. खेळावयाचे ते त्यांच्या मुलांत. जेवावयाचे ते घरी न कळवता गुपचिप त्यांच्या घरी. त्या गोंडांच्या स्त्रिया खास ह्या देशाच्या रंगाच्या. दिवसभराच्या कष्टाने त्यांचे अंग घामाने चिकचिकून जात असे. केसांचा ताग होत असे. पण प्रेमाने असेल नसेल तो तुकडा मांडीवर बसवून जेव्हा त्या मला भरवीत तेव्हा तो गोड लागत असे. त्यांच्या अंगाची, त्यांच्या भाकरतुकड्याच्या कदान्नाची शिसारी येत नसे. घरची मंडळी माझ्या गरीब (?) पणामुळे मेटाकुटीला येत. ती इतकी की, माझे वडील बंधू मला आत्ताआत्तापर्यंत 'सैतानची लंगोटी' म्हणत. सैतान म्हटले असते तर त्या वेळी वाईट वाटले नसते, पण त्याची लंगोटी होण्यात मला मनस्वी चीड येई. त्या संतापात मी कित्येकदा त्यांच्यावर माझ्या दातांची व नखांची शस्त्रे घेऊन चाल केली असेल.

असे हे खेड्याचे संस्कार. शिकायला शाळा नाही. टागोरांसारखे माझेही नाव शाळेत आठव्या वर्षी घातले होते. आणि आठ वर्षेपर्यंत आम्हांला मन मानेल ते करायला मुभा मिळाली होती. गोंडा-गोवाऱ्यांच्या बायका त्या वेळी देखील आपल्या मनोरंजनासाठी मला चिडवीत. तेथे एक कुणब्याची पोर होती. माझ्याएवढी असेल. किंवा कदाचित थोडी लहानमोठी असेल. तिला त्यांनी आपल्या कल्पनेतून माझी 'बायको' ठरवून टाकले होते. मुलगी चांगली व गोरीगोमटी होती. एक-दोन वर्षांत तिचे आमच्यापैकीच एकाशी लग्न झाले होते; व तिचा नवरा आमच्यातच खेळत असे. प्रेम वगैरे काय म्हणतात ते त्या वेळी काही कळत नव्हते म्हणून बरे. नाहीतर आम्ही तिघेही उगीचच मानसशास्त्रविषयक कादंबऱ्या लिहिणारे लेखक झालो असतो!

आठ वर्षांनंतर जेव्हा कसब्याच्या गावी आलो तेव्हा शाळेत नाव घातले गेले. आमच्या घराण्यात फारसा शिकलेला त्या वेळी कुणी नव्हता व त्यामुळे शाळेत जायचे म्हणून जात होतो. डोके होते व ते बरे चालत होते. त्यामुळे वर्गात पहिला नंबर राहून

कसानकी मिळाली होती. म्हणून मास्तरांच्या गैरहजेरीत मुलांना दटावता येत; असे, व त्यांच्यावर जरब बसावा म्हणून शेलक्या शिव्या आणि परिणामकारक म्हणीही पाठ करणे आवश्यकच होते.

आईकडचे संस्कार मात्र उत्तम होते. आई धर्माधिकाऱ्यांच्या कुळाची. शुद्ध ब्राह्मण्य आणि धर्मनिष्ठा त्या घराण्यात ओतप्रोत भरलेली. जेव्हा जेव्हा आजोळी जावे लागे तेव्हा खेडवळपणामुळे खूप फजिती व्हायची. तेथे सर्वच शिकलेले, विद्वान, संस्कारी भाषा बोलणारे. आमच्या उच्चारा-उच्चारावर तेथील थोरामोठ्यांची करमणूक होई. त्यामुळे आपल्यामध्ये काही तरी उणीव आहे याची तीव्र जाणीव मला फार लहानपणी झाली. त्या न्यूनगंडातून घरच्या गरिबीमुळे वाहेर पडायला अवसर नव्हता. वर्गातला पहिला नंबर ह्या न्यूनगंडामुळेच कायम राही. मराठी शिक्षण झाल्यावर इंग्रजी शिकायला मामांकडे आलो. मामा जिल्ह्याचे न्यायाधीश होते. त्यांची साधुवृत्ती, धर्मभीरुता, कडक शिस्तीचा स्वभाव आणि वागण्याचा करार -- सर्वच शिकण्यासारखे होते. त्या सुखात राहूनही आपण गरीब आहोत, आपल्याला या सर्वांच्या बरोबरीने यावयाचे आहे; याची सतत आठवण असे. त्यामुळे मानसिक दुःखे मनातल्या मनात गिळण्याची व शारीरिक दुःखे निमूट सहन करण्याची सवय लागली. अंगात तीन तीन दिवस ताप असताही सतत आपले काम करण्यात कृतकृत्यता वाटे. मिडल् स्कूलमध्ये स्कॉलरशिप मिळाली. हायस्कूलमध्ये 'नागपूरला आलो. वडिलांनी चक्क सांगितले, "शिकविण्याची ऐपत आपली नाही. तुमच्या भरवशावर तुम्हांला शिकायचे असल्यास शिका."

पटवर्धन हायस्कुलात नाव घातले. बरीच मुले श्रीमंत, चांगल्या घराण्याची नाजूक-साजूक अशी असत. नीटनेटके कपडे करीत. ह्यांपैकी एकही परिस्थिती मला अनुकूल नव्हती. एक खोली स्वस्त भाड्याने घेऊन मी आणि माझे वडील बंधू हाताने स्वयंपाक करून शिकत असू. व्यायाम, आखाडा यांची सवय मला त्या वेळी खूप होती. शहरी मुलांना आपल्या खेडवळ भाषेत संबोधून त्यांना नकोनकोसे करण्यात, आपण कुणी तरी आहोत आणि त्यांच्यापेक्षा आपल्याजवळ काही विशेष आहे, हे समाधान त्या वेळी अशा वागण्याने मिळे. न्यूनगंड सारखा वाढतच होता, आणि गरिबीमुळे सर्व क्षेत्रे वंद झाली होती. त्या वेळी पुष्कळ वाटे. मला क्रिकेट खेळता येत असे. हायस्कुलात खूप खेळावेसे वाटे. पण ग्राउंडवर जाऊन खेळल्यास स्वयंपाक कोण करील ? आणि घामाने भिजलेले कपडे रोज बदलण्यास कपडे तरी कुणाजवळ होते ? मग उगीच ऐट मारायची की, 'कसला तो क्रिकेटचा खेळ, रिकामे उन्हातान्हात टापक-टिपक करीत राहायचे.' गाणे आवडे, सिनेमाला जावेसे वाटे, पण त्यालाही पैसे लागत. प्रवासाची हौस होती ती देखील भागेना.

सर्व बाजूंनी असा कोंडमारा झाल्यामुळे आपला अहंकार तृप्त करावयाला परवडण्यासारखे क्षेत्रच नव्हते. शहरात सहाध्यायांची शरीरे किडकिडीत असत. आपण

आपले शरीर सुदृढ करून त्यांच्यावर कडी करावी, त्याला पैसे लागत नाहीत, म्हणून माझा आखाड्याचा शोक मर्यादेबाहेर वाढला. नमस्कारांचे संकल्प, दंडांच्या शर्यती; कुस्ती, मल्लखांब पहाटे चार वाजल्यापासून सुरू असे. मला मोटार चालवायला मिळाली पाहिजे हा संकल्प ऐपतीबाहेरचा होता. पण एका दमात दंड मारता आले पाहिजेत ही आकांक्षा सहज साध्य होती. तीच मी पुरी केली.

स्कॉलरशिप मिळत असल्यामुळे अभ्यासाचे मान कायम ठेवावे लागत असे. मॅट्रिक पास झालो. आणि अगदी स्वतःच्या जबाबदारीवर आर्थिक दृष्टीने निराधार अवस्थेत कॉलेजात नाव घातले. कॉलेजच्या रंगीबेरंगी, हौशी, खेळकर, सुगंधी वातावरणात गरिबी खूप बोचायला लागली; आणि ती दिसू नये म्हणून अटोकाट प्रयत्नही करावे लागले. ज्या ज्या गोष्टी पैसा मागत असतील त्यांची त्यांची चक्क नावड, माझ्यात न्यूनगंड दिसू नये म्हणून मी व्यक्त करू लागलो. टेनिस खेळता येईना. मुलींशी ओळखी वाढविण्याचे सुख भोगता येईना. स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, काटकसर आणि आनंदी राहणे, हे सर्व मी माझ्या परिस्थितीशी झटापटी करीत असता शिकलो. थोडीशी बुद्धी होती. वाचन-लेखनाला पैसा लागत नव्हता म्हणून ती आवड वाढली आणि ती साधना परवडली. जे जे आपली लेखनशक्ती विकसित करावयास आवश्यक होते ते ते मला माझ्या खोलीत बसून विनापैशाने करता येत असे. सुदैवाने किंवा दुर्दैवाने म्हणा, मला बरे-वाईट खूप अनुभव मिळाले होते. नवे नवे घेण्याची स्वतंत्रता होती; कोणी अडवायला नव्हते. घराण्याच्या खानदानीचे संस्कार होते. पाहायला-भोगायला खूप मिळाले होते. जीवनाच्या शुभ व अशुभ, सुलभ आणि दुर्लभ, मंगळ आणि अमंगळ बाजू पारखायला मिळाल्या होत्या. आपण काही पाहिले तर लोकांना सांगावे अशी तळमळ पुढे पुढे मला लागली. पूर्वसुकृतामुळे मला मित्र पुष्कळ; सुस्वभावी, निगर्वी आणि गुणी लाभले होते. मला पैसा कमी पडला असेल, पण प्रेम, सौहार्द, जिव्हाळा कधीही आणि आजतागायत कमी पडला नाही. त्यामुळे लिहायला प्रोत्साहन मिळाले. गोष्टी छापून येऊ लागल्यानंतर ज्यांना जीवन अनुकूल होते त्यांच्या-पेक्षाही माझी जास्त विचारपूस व्हायला लागली; आणि ज्या न्यूनगंडापायी मी बेजार झालो होतो, तो अशा रीतीने कमी करण्याचे उत्कृष्ट व ऐपतीचे साधन माझ्या हाती लागल्याने मी लिहायला लागलो. लेखनाची मनोभावे साधना मी सुरू केली. जसजसे लिहीत गेलो, तसतसे मनाचे रांजण भरलेले आहेत असा प्रत्यय येत गेला आणि लिहिल्यावाचून राहवेना म्हणून मी लिहिले !

हे मला विचारल्या गेलेल्या प्रश्नाच्या पूर्वार्धाचे उत्तर !

आता मी कसे लिहिले ?

मी अत्यंत प्रामाणिकपणे आपणांला असे सांगू इच्छितो की, मी लिहिण्यासाठी कागद, टाक आणि शाईच वापरली. काही थोर कलावंतांनी रक्ताने लिहिल्याचे दाखले

मान्यवर टीकाकार देतात. मी लिहिण्यासाठी रक्तबिक्त वापरले नाही. अगदी एक पैशात चार दौती होणारी शाईच वापरली. अलंकारिक भाषा मी कशाला वापरू ? रक्ताचा उपयोग लिहिण्याकडे करण्यापेक्षा दुसऱ्या चांगल्या गोष्टींकडे करण्याचे मला कळत होते व कळते. आपले भरपूर आणि चांगले रक्त दुसऱ्या गरजू माणसांना देण्यासाठी डॉक्टराच्या सुईमध्ये भरण्याने त्या रक्ताचा सदुपयोग होऊ शकतो. आत्मस्तुती करीत नाही, पण ज्या ज्या वेळी रक्ताचा उपयोग करण्याची संधी आली त्या त्या वेळी ती साधण्यासाठी मी क्षणाचा विचार केला नाही. टक्क्याटोणप्यांनी आता तर वेडरपणा, निर्भयपणा व मग्रूरीही आली आहे. जी परिस्थिती भोगली त्याहून, येऊन येऊन आणखी वाईट परिस्थिती ती काय येणार ? असा विश्वास वाढल्यामुळे थोडासा उर्मट-पणाही माझ्यात मिनला आहे.

तथापि प्रश्नाचा रोख माझ्या लेखनाच्या साधनेशी आहे असे मला वाटते विविध अनुभवांनी जीवनाचे जे सहज आणि विविध दर्शन मला घडले तीच माझी साधना होय. लिहिल्यानंतर एक गमक मात्र मी कसोशीने पाळले की, मला जे जे माझे लिखाण निकृष्ट वाटले ते ते कसलाही मोह न बाळगता मी फाडून टाकले आहे. माझ्या संग्रही साठलेली एक ओळही नाही. कॉलेजच्या प्रथम वर्षात ह्या न्यूनगंडापायीच मी देवधर्मात पडलो होतो. रामतीर्थ–विवेकानंदांच्या ग्रंथांनी मी भारून गेलो होतो. प्राणायाम, ध्यान-धारणा, शरीरकष्ट, संयम, ह्यांच्यापायी मी कितीतरी वेळ घालविला. त्यामुळे एखादी गोष्ट सोडताना मला विचार करावा लागत नाही. क्रांतिकारकांच्या अमर्याद त्यागाने दिपलो गेल्यामुळे मोहही फारसा मला नाही. आपण जे काय लिहिले ते चार-आठ दिवस तसेच पडून राहू द्यायचे आणि विसर पडल्यानंतर ते पुन्हा वाचावयाचे; बरे वाटले तर दोन-तीनदा लिहून शुद्ध करून प्रसिद्धीला पाठवावयाचे, निकृष्ट वाटल्यास तेथल्या तेथे फाडून फेकून द्यावयाचे. आरंभी आरंभी पुष्कळ चोखंदळपणा माझ्यात होता. एकेका शब्दासाठी दिवस दिवस मी अडून बसे. आणि एक एक गोष्ट आठ आठ, दहा दहा वेळा लिहून काढी.

असा हा या प्रचंड देहाच्या जीवनातील उणीवांमधून आकारास आलेला लेखनसाधनेचा वृत्तान्त आहे. मला स्वतःबद्दल सांगावे लागल्यामुळे अगदी अडचणीत सापडल्यासारखे झाले होते. त्यामुळेच थोडेसे विषयांतरही झाले. लिहिल्यावाचून राहवले नाही म्हणून मी लिहिले आणि जे लिहिले त्याची अगदी निर्भय रीतीने परीक्षा केल्यावाचून ते प्रसिद्ध होऊ दिले नाही.

एवढेच मला सांगायचे होते. क्षमस्व.

६-२-४९

२

कथेची कहाणी

आजवर माझ्या कथांची नऊ पुस्तके प्रकाशित झाली. माझी पहिली कथा 'अम्मा' प्रकाशित झाल्या दिवसापासून आजवर अठ्ठावीस वर्षांचा कालावधी लोटला. व्यक्तीच्या जीवनात एवढा काल म्हणजे काही थोडाथोडका नव्हे. या अवधीत मी जे लेखन केले त्याची पुस्तकांच्या हिशेबाने संख्या पुष्कळ होईल, पण माझ्या गणती त्याला फार किंमत नाही. मला माझ्या कथांसंबंधीच आस्था आहे. कथेशी एकनिष्ठ राहण्याचा मी प्रयत्न केला. मला असे वाटते की, एकच माध्यम प्रकटीकरणासाठी वापरणे बरे ! पतिव्रतेच्या निष्ठेला पुण्य मिळते ! माझ्या दृष्टीने ते मला मिळाले. या निवेदनाच्या निमित्ताने मी जेव्हा माझ्या गोष्टी वाचल्या तेव्हा पुनःप्रत्ययाचा आनंद की काय म्हणतात, तो मला झाला की नाही कुणास ठाऊक, पण हे सारे विषय मीच हाताळले की काय, ते हाताळणारा मी एक होतो की अनेक, याची एक विलक्षण जिज्ञासा मला लागली. या जिज्ञासेची परी पद्धती मला समजावून सांगता यावयाची नाही. तशी कुवत नसल्यामुळेच मी माझ्याबद्दल आजवर कमीच सांगितले.

काही लिहिण्यासांगण्याची चार गंडांतरे माझ्यावर आली. ता. ५-५-४५ रोजी मुंबई मराठी साहित्य संघात "माझ्या लघुकथांचे उगम" या विषयावर माझे मित्र श्री. प्रभाकर पाध्ये आणि श्री. वा. रा. ढवळे यांच्या भीतीने मी बोल्लो. काय बोल्लो ते आठवत नाही. पण चांगला दोन तास बोलत होतो. श्रोत्यांमध्ये सगळे जाणते लोक कै. र. धों. कर्व्यांसारखे नाणे वाजवून घेणारे होते. ऐटीत वेळ मारून नेणे शक्य नव्हते. खरे खरे जे होते ते सांगून टाकले. कै. कर्वे यांनी जवळ येऊन समाधान व्यक्त केले.

दुसरा प्रसंग नागपूर महाविद्यालय (मॉरिस कॉलेज) येथील शारदा मंडळाच्या रजतमहोत्सवाच्या वेळी ता. ६-२-४९ ला "मी का व कसे लिहिले" या विषयावर बोलण्याचा. (मी मॉरिस कॉलेजात असताना १९३५ मध्ये या मंडळाचा कार्यवाह होतो. त्या वेळी प्रा. ना. सी. फडके हे वार्षिकोत्सवासाठी आले होते. गेल्या २५ वर्षांत त्यांचा मजवरील स्नेह वृद्धिंगत होत गेला म्हणून ते साल माझ्या ध्यानात राहिले.) हे माझे भाषण कोणीतरी टिपून घेतले. ते अधिकृत करून मी 'नागवेल'च्या प्रस्तावनेत टाकून दिले.

तिसरा प्रसंग ता. ५-१०-५४ ला ओढवला. नागपूर येथे 'सुविचार व्याख्यान-माला' म्हणून एक उपक्रम प्रा. डोळके यांनी केला होता. त्या मालेत मी एक पुष्प

गुंफले. या तिन्ही प्रसंगांनिमित्त मी एकूण पाच तास मजबद्दल बोलले. काय बोलले हे माझे मला सांगता येत नाही. ज्याला बोलता येते त्याला ते लिहून काढायला जमत नाही. ते जमले असते तर हे निवेदन खरडत बसावे लागले नसते.

लेखकाचे लिखाण किंवा वक्त्याचे भाषण हे वाचक किंवा श्रोता यांच्यासाठी असते. त्याची चर्चा लेखक किंवा वक्त्याने करू नये. माझ्या गोष्टींसाठी मी कोणते विषय निवडले इ. जर मी सांगू लागलो तर अशी भीती वाटते की, मी लिहिलेल्या साऱ्या सत्यकथाच आहेत असा गैरसमज होईल. त्या सत्याच्या आड जे सत्य निष्कर्षिले जाईल ते फार भयंकर होईल. लेखाच्या आत लेखक दडलेला असतो हे म्हणून पाठ करणारी मंडळी " एकच प्याला " वरून गडकऱ्यांच्या माथी दारुडेपणा मारतात. जे सत्य आहे ते मांडणे हे ललित लेखकाचे कामच नव्हे. असे लिहिणारा हा ललित लेखक आहे असे जरी मला कोणी पटवून दिले तरी मी राजी होणे शक्य नाही, जग जसे दिसते तसे रंगविणे, माणसे जशी वागतात तसे चित्रित करणे हे वृत्त-लेखकाचे काम आहे. ललित लेखक जग दाखवीत नाही; उपदेशाची हिरिरी बाळगीत नाही. त्याचे स्वतःचे विश्व तो उभवितो आणि त्या विश्वाचा जगाशी पडताळा करण्याचे काम तो वाचकावर सोपवितो. त्याच्या विश्वाची रंगरंगोटी, व्यापव्याप्ती त्याची स्वतःचीच असते.

असे माझे कोणते विश्व होते की काय ? आहे की काय ? राहील की काय ? भविष्यकाळाची भाषा मला का सुचली ते सांगून टाकतो. गेल्या आठ-दहा वर्षांत मी एकही गोष्ट लिहिली नाही. जे लिहिले ते सगळे ललितेतर ! तेव्हा मी " खलास " झालो असे माझे मित्र, माझे वाचक मला सांगतात. ' खलास ' होण्यात माझे आणि इतरांचेही नुकसान काही नाही; पण मी खलास झालो नाही हे सिद्ध करण्यासाठी भराभर गोष्टी लिहिल्या पाहिजेत असे माझ्या मनात अजूनही येत नाही. खरेच, का नाही लिहिल्या मी गोष्टी ? याचे उत्तर ओघात यावयाचे आहे.

तर, मी लिहीत होतो माझ्या विश्वासंबधी. असे विश्व उभे करण्याइतके अनुभव मला आले, पेलणार नाहीत इतके अनुभव मला पेलावे लागले. अनुभवांची संख्या महत्त्वाची नाही, उद्‌बोधन महत्त्वाचे आहे. अनुभव चित्रित करण्याचे कार्य माझे नव्हे. अनुभवाने लेखक समृद्ध होतो, त्याच्या मनाचा ताल तोल डौल सुधारतो. असे अनुभव मला येत गेले त्या वेळी कित्येकदा त्यांचा अर्थही मला कळेना. श्रीकृष्णाला कंसाशी लढत घ्यावयाची आहे हे ठाऊक होते. पण एका सात-आठ वर्षांच्या मुलासमोर जेव्हा हा अनुभवाचा कंस उभा राहिला... !

मी दहा वर्षांचा होतो. गाव प्लेगने उठला होता. शेता-शेतातून झोपड्यांत वसला होता. मारुतिरायांचे मंदिर गावात होते. प्रदक्षिणा घातल्यावाचून जेवावयाचे नाही हा नियम. एका सायंकाळी मी दर्शन घेऊन परतत होतो. एकटा होतो. रस्त्याच्या मधोमध एक चांगला जाडा दणकट माणूस मेलेला दिसला. वाटले, इथून पळ काढावा.

पण कसा कोणास ठाऊक, एक पोक्त विचार मनात आला, की या मुडद्याचे काय होईल ? कसे तरी ते धूड रस्त्यावरून बाजूला ओढू लागलो. तेवढ्यात एक माणूस दिसला— मला खरोखरच तो देव वाटला. त्याच्या पाया पडलो. दोघांनी मिळून त्या प्रेताची विल्हेवाट लावली. त्यानंतर रोग, साथ पसरून कित्येकदा दिवसातून दहा दहा मुडद्यांची गती लावण्याचे प्रसंग मजवर आले. मला वाटले, आपले बालपण संपले. माणूस व त्याचा मुडदा या दोघांबद्दलची भीती संपली. प्रेत जर आपल्याला काही करीत नाही तर भूत तरी काय करणार ? तेव्हा ज्या भुताबद्दल मोठी माणसेही दबक्या आवाजात बोलतात त्यांची ओळख करून घेण्याचा मी प्रयत्न आरंभिला आणि पुढे चार वर्षे अक्षरशः रात्री-बेरात्री मी भुते शोधीत हिंडलो.

भुते असावी असे मला वाटत होते खास ! त्याला थोडा पूर्वेतिहास आहे. आज मी माझ्या मनाशी त्या प्रसंगाची शहानिशा करतो तेव्हा मला ते खोटे वाटते. पण खोटेपण आजही सिद्ध करता येत नाही. बाळपणाच्या त्या कल्पना असे म्हणून मी माझा अहंकार सिद्ध करतो एवढेच ! त्या वेळी मी आठ वर्षांचा असेन. प्रायमरी शाळेत शिकत होतो. माझ्या गावची शाळा किल्ल्यावर होती. विस्तीर्ण आवार पर-कोटाच्या भिंतींनी वेष्टिलेला. तिथून कोणत्याही बाजूने वस्तीत उतरायचे म्हणजे दरीत उतरत असल्यासारखे वाटे. शाळा सकाळ आणि दुपार अशी भरावयाची. मुलांनी सकाळी लवकर हजर राहावे म्हणून त्या वेळचे शिक्षक बक्षिसाचे आमिष दाखवीत. ते बक्षीस कोणते हे सांगितले तर आज पोरसुद्धा विश्वास ठेवणार नाही. आमचे शिक्षक एका सकाळी वर्गात म्हणाले--" जो सतत महिनाभर सर्वांत अगोदर शाळेत येईल त्याला पहिल्या नंबरावर बसावयास मिळून शिवाय वृत्तपत्राचा एक अख्खा मोठा कागद बक्षीस मिळेल." त्या वेळी तेवढा मोठा कागद मिळाला तर त्याचा जंगी पतंग करता येत असे, आणि वृत्तपत्राच्या कागदाशिवाय त्या वेळच्या आमच्या बालबाजारात आणि ऐपतीत दुसरा कागद मिळत नसे. मी पहाटे यावयाचे ठरविले. अंघोळ करून घरच्या वडील मंडळीस नमस्कार केल्याशिवाय शाळेत जावयाची घरी मनाई असे. अंघोळ करावयाची तर ऊन पाण्यासाठी आईला फार पहाटे उठवावे लागे. हा रोजचा ताप नको म्हणून गार पाण्याने अंघोळ करून उजाडते न उजाडते तोच शाळेच्या आवारातील मोठ्या लोखंडी फाटकाजवळ मी हजर असे. ते सहा-सात फूट उंच गजांचे फाटक आत उडी मारून पार करावयाचे आणि शाळेचा शिपाई येऊन शाळा उघडीपर्यंत तास दीड तास आवारात बसून राहावयाचे. खरे म्हणजे आपण असे काही बोललो हे शिक्षक विसरूनही गेले असावेत, (असे आता वाटते.) पण मोजून बावीस दिवस असा मी सर्वांच्या अगोदर आलो. तेविसावा दिवस ! नीट उजाडले नव्हतेच. पोचलो, फाटक ओलांडून आत उडी मारली आवारात. उजव्या बाजूला एक जुना पडका मोठा हौद होता. खेळताना तेथे आम्ही आमचे कपडे ठेवीत असू. उडी आत पोचताच मी उजव्या बाजूला पाहिले तो--

मला तेथे एका लहान मुलाची पाठमोरी आकृती दिसली. डोक्याला जरीची टोपी, केस सोनेरी, हौदावर टेकविलेल्या हातात सोन्याची कडी, पांढरा स्वच्छ सदरा– मला वाटले, घात झाला ! कुणीतरी मुलगा आपल्या अगोदर पोचला, आपला बावीस दिवसांचा खटाटोप व्यर्थ गेला ! मी चिडलो. त्याला ललकारून एक दगड उचलून मी धावलो. एकच निमिष ! ती आकृती पाठमोरीच हालली व तिने हौदात उडी मारली. मला आनंद झाला की आता हा सापडला. मी हौदाजवळ पोचलो, पण ती आकृती मला तिथे दिसली नाही. शिपाई येईतोवर सुमारे तासभर मी शोध करीत राहिलो. शिपायाला सांगितले, शिक्षकांना सांगितले; पण सगळे माझ्यावरच रागावले. त्या दिवशी शिक्षा म्हणून मला वर्गात " खुर्ची " मिळाली. मला काही कळेना.

हा धाकदपटशा. त्यामुळे असल्या गोष्टी मोठ्याने बोलू नयेत एवढेच मला समजले. म्हणू मी पुढे त्याची कोठे वाच्यता केली नाही. नंतर माझी मोठी बहीण माहेरपणाला म्हणून आली. आईपेक्षाही तिचा मला अधिक लळा होता. एक दिवस रात्री हळूहळू तिला मी ते " रहस्य " सांगितले. ती म्हणाली–" अरे, तू पायाळू आहेस म्हणून तुला असं काही काही दिसतं. "

झाले ! हे पायाळूपणाचे एक लचांड मागे लागले. मी पायाळू आहे हे मी सगळ्यांना सांगत सुटलो. हेतू असा की, एखादा " जाणता " आपल्याला यातले अधिक काहीतरी सांगेल. पण त्याचा जो परिणाम झाला त्याने ज्ञान तर झाले नाहीच, पण एका शिक्षकाने मात्र जेवढा काय छळ करावयाचा तो करून घेतला. पायाळू व निष्पाप मुलाला धन दिसते असे त्याचे ' ज्ञान ' होते. तो मला त्याच्या अन् माझ्या सोयीने वेळीं अवेळीं स्मशानात नेऊन मंत्रतंत्र करू लागला. बरे झाले ! दिवाळीला आईबरोबर मामाकडे गेलो व तिथे ती आजारी झाल्याने दोन महिने तिकडे राहिलो ! तेवढ्यात त्या गुरुमहाराजांची बदली झाली की नोकरी सुटली आणि मी बचावलो. आज असे वाटते की, हे सगळे मी त्याच वेळी घरच्या माणसांच्या कानांवर घालावयास हवे होते. पण गुप्तता, ते दबत दबत बोलणे, ती अद्‌भुताची आस–अशा काहीतरी विचित्र, विलक्षण भोवऱ्यात मन फिरत होते !

लहानपणी दिसलेल्या या भुताच्या भाऊबंदास जरा भेटावे म्हणून मग मी पुष्कळ हिंडलो. त्यांची भेट झाली नाही पण रात्री-बेरात्री, नद्या, जंगले, मसणवटी यांचे एक आकर्षक, रोमांचकारी असे दर्शन झाले व ते माझ्या फार उपयोगी पडले. एकट्या, निराट, निर्जन अशा स्थळी अपरात्री चंद्राला सोबतीला घेऊन जेव्हा मी तिष्ठत बसे तेव्हाची माझी सुखदुःखे चंद्राला सांगताना मी त्याच्याशी इतका समरस झालो होतो की आज देखील माझ्या खोलीत बसून उदयास्ताच्या वेळी चंद्राचे अननुभूत, अनुपम अशा झुळकेने होणारे आगमन व निर्गमन मला जाणवते.

मला निसर्ग हा असा पाहायला मिळाला. त्यानंतर मला जे अनुभव आले त्यात अद्‌भुत असे काही नव्हते. कल्पनाशक्तीला तीव्रता आणण्यास त्यांचा उपयोग झाला

असावा. या अनुभवांचे थोडेसे टाचण, त्यात बरेचसे कल्पनेचे पाणी, सत्याचे लिंबू व सत्याभासाची साखर घालून " संस्कार " या माझ्या संग्रहातील आरंभीच्या कथांत दिले !

अनुषंगानेच दुसरे काही अनुभव लिहून टाकतो.

मॅट्रिक पास झालो होतो. कॉलेजमध्ये जाण्याच्या पूर्वीचा सुट्टीतील उन्हाळा मी माझ्या गावी घालवीत होतो. सकाळ-सायंकाळ व्यायाम (एक लक्ष दंड मारण्याचा वाह्यात संकल्प केला होता.) करावयाचा आणि पडेल ते घरकाम संभाळून वाचन करावयाचे. त्या वेळी मॅट्रिक पास झालेला आगळा प्राणी माझ्या गावी मीच होतो. कादंबरी जरी वाचली तरी लोकांना वाटायचे, मी अभ्यास करतो आहे. कौतुकाच्या धाकात कोणी त्रास देत नसे. आमच्या वेळी जीवनात काहीतरी आदर्श असावा असा समज असे. हा समज, मला वाटते, दुसऱ्या महायुद्धापर्यंत टिकला. विद्यार्थ्याने खूप शरीर कमवावे, खूप वाचन करावे असे होते. त्यामुळे एकेक सुट्टी एकेका ग्रंथकारास देऊन मी ॲबॉटचे नेपोलियन, रोमाँ रोलाँचे जाँ क्रिस्टोव, टॉलस्टॉयचे वॉर अँड् पीस, इ. पुस्तके वाचली. या सुट्टीत मी हॉलकेनची मास्टर ऑव् मॅन ही कादंबरी घेतली होती. तिने मला विलक्षण चटका लावला होता. तिच्यातला व्हिक्टर स्टॉवेल, वेसी कोलिस्टर, फिनेली स्टॅनले, आता या क्षणी देखील माझ्याशी बोलत आहेत असे वाटते. त्यांतली भाषणे मोठ्याने वाचण्यात मला विलक्षण आनंद वाटायचा. दुपारी दोनच्या सुमारास मी स्टॉवेलचे न्यायाधीशाच्या खुर्चीतील भाषण आवेशात वाचीत होतो, त्यातले ते वाक्य-- स्पीक आउट वेसी, स्पीक आउट !- तन्मय होऊन मी डोळे मिटले. क्षणभराने पुस्तक मिटून मी शून्य नजर बाहेर खिडकीच्या गजांपलीकडे रोखली. तो काय,- स्वप्न !-स्वप्नच ते !

बैठकीच्या समोर पंधरा यार्डांवर मारुतीचा पार होता व त्यामागे एक दगडाची कच्च्या बांधणीची उंच विहीर होती. त्या विहिरीवर एक तरुणी ओणवी, दोर विहिरीत तोलून मजकडे बघत होती, किती वेळ कुणास ठाऊक ! मी तिच्याकडे पाहिले. त्यानंतर कदाचित अर्धा तास, कदाचित एक तास, आम्ही बघत राहिलो. नंतर तिने घागर ओढली, कमरेवर घेतली आणि माझ्या शेजारून खाली मान घालून निघून गेली. पाठमोरा एक आणखी दृष्टिक्षेप !

ही कोण ? सारा गाव माझ्या ओळखीचा होता. शेजारीपाजारी सगळ्यांनी मला अंगाखांद्यावर खेळविले होते. आमच्या विहिरीवर ज्याअर्थी पाणी भरायला आली होती त्याअर्थी ती जवळच कुठली तरी असली पाहिजे. कोण ? कुमारी की विवाहित ? कुणाची ? हिरवे, नारिंगी प्रश्न डोळ्यांसमोर इंद्रधनूचा पिंगा घालू लागले. हॉल केन, त्याचे जग; मी, माझे जग-सगळे जिथल्या तिथेच राहिले. सायंकाळ झाली. आईने दिवा आणून ठेवला.

मला काय होत आहे हेच कळेना. ती कोण, कुठली हे कळावे असे खूप खूप वाटत होते. पण तिच्याबद्दल चौकशी करावयाचीच भीती वाटू लागली, का ? हा ' का '

माझ्या मनात इतका इतका गरगरला की, मी एकदम पुष्कळच शिकलो. ते स्वप्न नंतर सहा-सात दिवस मी सतत पाहिले. ती सतत दिसावी, वारंवार दिसावी असे मला इतके वाटायला लागले की, ती कुठे दिसू नये म्हणून शेजाऱ्यांची सगळी घरे स्वतःपुरती मी बंद केली. कसातरी रेटत होतो स्वतःला ! आई विचारायची की झाले काय ? काय सांगणार ? शेवटी तिने चार दिवसांनी माझी दृष्ट काढली. मिरच्या ओवाळून चुलीत घातल्या. त्यांची खेस सुटली नाही. ती माझी भोळी आई मला म्हणाली.—" दीठ लागली रे तुला ! " तरी मी स्वप्नातलेच उत्तर दिले, होय दीठ लागल्यानेच हे असे झाले आहे. दहा फूट अंतरावरून फक्त दीठच–दुसरे काही नाही.

खरेच, ते काय होते ? कुणास ठाऊक. नंतर चार वर्षांनी मी बी. ए. पास झालो, लग्न झाले, थोडा धीटपणा आला. शेजाऱ्यांनी कौतुकाने बोलावले म्हणून आमच्या माळ्याकडे गेलो. तिथे मला ते स्वप्न दिसले, दोन मुले मांडीवर घेऊन बसलेले. त्या शेजाऱ्याची ती दुसरी बायको होती तर ! त्या वेळी नुकताच पाट लावून आली होती ! या वेळी जेव्हा तिला पाहिले तेव्हा तिच्याशीही बोललो. चारचौघींसारखीच ती वाटली. पण ज्या स्वप्नात ती दिसली त्यातले ते तरंग, तो आकार, ती टवटव !–जाऊ द्या ! मीही चौकस होत नाही अन् तुम्ही पण होऊ नये ! चौकशी करून काही पत्ता लागावयाचा नाही. नवे जग सुरू झाले तेव्हा ते सगळे जुने जग आपल्या आशा-आकांक्षा, गुणदोष यांसहीत कणाकणाने, क्षणाक्षणाने ढासळून गेले आहे. चौकशी केली तर ती विहीर दिसेल पण ती माणसे, त्यांची घरे—सगळे गेले. त्या घराच्या जागी एक किराण्याचे दुकान आहे, अन् काचेच्या एका मळक्या बरणीत रंगीबेरंगी पेपरमिंटच्या वड्या आहेत, संपले !

पण त्याची जी सुरवात; ते स्वप्न ! त्या स्वप्नाच्या साहाय्याने मी कुठला कुठे पोचलो. मला सगळं दिसायला, जाणवायला लागले । मला माणसे दिसायला लागली, स्त्री दिसायला लागली. आई म्हणून मी स्त्री पाहिली होती, बहीण म्हणून पाहिली होती, पण स्त्री म्हणून स्त्रीकडे पाहण्याचे कसब मला त्या स्वप्न-दिवसापासून प्राप्त झाले. म्हणूनच लग्नाच्या अगोदर जेव्हा मी 'झोपेत लिहिलेली गोष्ट' लिहिली, आणि लग्न झाल्यावर मी 'सखी', 'सती' रंगविल्या तेव्हा मला स्त्रियांच्या ओळखीची गरज भासली नाही. त्या स्वप्नाने मला नेणिवेतून जाणीवेत आणून टाकले होते. कधी कधी कुणाच्या आशीर्वादाने अदृष्ट दृष्ट होते म्हणतात, तसेच काहीसे झाले ! एक तऱ्हेवाईक अनुभव म्हणून सांगितला. काही प्रकाश पडला तर बघा; नाहीतर तथास्तू !

ते जग संपले. पोटापाण्याचे, दुनियादारीचे जग सुरू झाले. 'तमन्ना', 'आरमान', 'दिल' यांपेक्षा 'मी' 'माझे' हे अधिक महत्त्वाचे वाटू लागले. त्यानंतर दोन गोष्टींचा—बरा की वाईट कुणास ठाऊक–विलक्षण परिणाम मजवर झाला. पहिली

म्हणजे माझे एका तपाचे वर्धेचे वास्तव्य, वेचाळीसचा तुरुंगवास आणि दुसरी म्हणजे १९४५ ते ५० च्या दरम्यान घडलेली एक घटना-जिची वाच्यता इथे नको !

तेरा जानेवारी १९३७ ला मी वर्धेस आलो आणि तेरा जून १९४९ मध्ये मी वर्धा सोडले. या बारा वर्षांच्या अवधीत माझे पोरपण मला सोडून द्यावे लागले, आकाशातून खाली उतरावे लागले. झेपतील तेवढ्या सर्व जबाबदाऱ्या घ्याव्या लागल्या. वर्धेच्या मंडळींची काम घेण्याची पद्धती अशी की, एखादे काम एखाद्यावर सोपविले की निश्चिंत व्हायचे. त्यामुळे आपली कुवत दाखवायला जसा अवसर होता तसेच कामही बिघडू शकत असे. मला जबरदस्तीने काम यशस्वी करावे लागले. मला तेथे खूपच शिकता आले. माझी प्रकृती निकोप होती. आठ-दहा तास एका बैठकीत पोटाचे काम संभाळूनही मी राबू शकत होतो. वर्धेस यावयाच्या अगोदर मला नोकरी किंवा पोटाचा उद्योग नव्हता. वर्धेस माझे मामेबंधू प. पू. आचार्य दादा धर्माधिकारी होते. माझ्या जन्मजन्मांतरीच्या भाग्याने मला असे बंधू लाभले. मी पुष्कळ मोठी माणसे अगदी जवळून पाहिली, पण दादांची उंची, खोली, धैर्य, निःस्पृहपणा, जन्मभर साधक राहण्याची वृत्ती-कसे वर्णन करू ? ज्या कोणा एका व्यक्तीचा अभिमान, अनुकरण करण्याची अतीव इच्छा माझ्या मनात रुजली असेल तर ती व्यक्ती म्हणजे दादा ! पण ते माझे असल्याने मला फारसे साधून घेता आले नाही. मातेचे वात्सल्य, पित्याची कणव, थोरांचा दुवा आणि बंधूची आत्मीयता-त्यांच्या एखाद दुसऱ्या शब्दातून मी जे शिकलो ते मला ग्रंथपारायणातूनही शिकता आले नाही. त्यांनी मला कोणत्याही बाबतीत त्यांच्यावर विसंबून राहायला शिकविले नाही. वर्धेला दुसरी व्यक्ती म्हणजे कै. पू. जमनालालजी बजाज ! त्यांनी मजकडे सदासर्वदा मातेच्याच दृष्टीने पाहिले. त्यांच्यामुळेच मी वर्धेला टिकलो. या दोन भक्कम आधारांवर मी वर्धेस आचार्य काकासाहेब कालेलकर, कै. कि. घ. मश्रूवाला यांची उंची पाहू शकलो. भजन-कीर्तनामध्ये नामगजरात माणूस जसा स्वत्व विसरतो तसा मी वर्धेस राहिलो. आजूबाजूला सर्वच सूर्यचंद्राच्या योग्यतेची माणसे होती. आत्मोन्नतीसाठी परमेशाचे एक नाव पुरे, शरीरशुद्धीसाठी बादलीभर पाणी पुरे; पण वर्धेला पाण्याची सरोवरे आणि नामांची पर्वणी होती. एक मन आणि दोन हात यांनी उचलता येणार नाही एवढे मला वर्धेस अहोरात्र मिळत होते. माझ्या तिथल्या स्थितीची कल्पना देण्याचा प्रयत्न करतो. लहानपणापासून मला कसरत आखाड्याचा शौक होता. कसरतीवर काहीतरी पौष्टिक खावे असा त्या वेळी प्रघात होता. म्हणून रात्री नारळ किंवा अंजीर दुधात मुरवून दुसरे दिवशी खायला मिळायचा. अंजिराचे अंजीरपण जसे दुग्धमय होई तसा मी तेथे मुरून गेलो होतो. ती बारा वर्षे बारा दिवसांसारखी वाटतील इतका तेथील प्रसन्न दांडगा होता.

वर्धेला गांधींचा प्रत्यक्ष सहवास-" मी पाहिलेले गांधीजी " वगैरेसारखे पुस्तक लिहिता येईल असा मला लाभला नाही. त्यांच्यापर्यंत पोचण्याची कुवत माझ्यात

नव्हती आणि कुवत नसली तरी पोचण्याचा वेशरमपणाही माझ्यात नव्हता. चंद्र-किरणांनी भागत होते; सूर्याकडे गेलेच पाहिजे अशी गरज नव्हती. विनोबा होते; ते तर विदेही. त्यांच्या लेखी माणूस नि दगड सारीच परमेशाची रूपे, सर्वच समतेचे अधिकारी. असे सारखे वाटायचे की, आपल्या हातून काहीतरी घडावे आणि त्या निमित्ताने त्यांच्याकडे पोचण्याची कुवत यावी. पण तसे घडले नाही. असंख्य धारांनी पाऊस पडावा पण अळवावर थेंबही उरू नये, थेंब पडला होता हे सिद्ध करण्यासही साधन मिळू नये ! हाय रे !

पण अळू वाढतो तो पाण्याच्या पोषणानेच की नाही ?

सगळे आठवते, गर्दी करते पण भीती वाटते की इतर सर्व गोष्टींपेक्षा ज्याला मी बाजूला सारू इच्छितो तो 'मी' च यात अधिक दिसेन. असे आपण लिहायचे आणि त्या सर्वांची नावे घेण्याची पात्रताही अंतर्यामीच्या दरबारात नाहीशी करून टाकायची !

माझा वेचाळीसचा तुरुंगवास म्हणजे माझ्या दृष्टीने सुखाची पर्वणीच होती. त्या सव्वा वर्षांत आमच्याकडील सर्वच सानथोर पुढारी मला आतून बाहेरून पाहावयास मिळाले. ब्रह्मसूत्र, योगसूत्र, तुलसीरामायण, अमृतानुभव, विवेकसिंधू यांचा आंबुला चाखायला मिळाला; आणि सर्वांत थोर भाग्य म्हणजे हिशेब केला तर सुमारे सहाशे तास मला पू. विनोबांजवळ ज्ञानेश्वरी शिकायला मिळाली. ज्ञानेश्वरीची एक शुद्ध प्रत संपादन करण्याचा प्रयत्न दिवसाचे सहा-सात तास एकत्र बसून करण्यात आला. एक अध्याय झालाही होता, पण ते हस्तलिखित फार जपण्याचा उद्योग केला म्हणून गहाळ झाले ! येथील वास्तव्याचा संस्कार माझ्यावर इतका झाला की, त्याचा ठसा आजही माझ्यावर आहे. या अवधीत मला इतके कळून चुकले की, आपण आजवर जे वाचले ते, जे जगलो तें, या पदव्या, हे मोठेपण फुकट आहे. यातली एकच गोष्ट सत्य आहे, ती म्हणजे विनोबांच्या मुखाने ज्ञानेश्वरीसारखी ग्रंथमाउली आपल्याशी बोलली. चौऱ्यांशी लक्ष योनींपैकी माझी गेल्या जन्मातली योनी कोणती होती हे ठाऊक नाही. पण तेव्हा किंवा त्याही अगोदरच्या जन्मोजन्मी काहीतरी सुकृत कणाकणाने चित्रगुप्ताच्या कागदात जमा झाले असावे. आणि त्याचे पुण्यफळ अल्पकाळ प्राप्त झाले असावे. माझ्या अवघ्या उमरीतला सर्वांत पुण्यमय, प्रसादमय काळ कोणता ? तर हे सहाशे तास. बाकी सगळे फुकट !

त्यामुळे तुरुंगातून सुटलो तो पार बदलून. संसाराची घडी विस्कटली होती, पैका-अडका हाती नव्हता, नोकरी गेली होती. पण क्षणभरसुद्धा असा विचार मनाला शिवला नाही की हे सगळे विषय चिंतेचे आहेत. नोकरी किंवा पैसा यापेक्षाही हाती काम आहे की नाही हाच विचार मनात असे. काम भरपूर होते. त्या सर्वांसंबंधी एक प्रकारचे औदासीन्य माझ्या मनात भरले होते. त्याचा बरेवाईटपणा कसाला

लावण्याचे प्रयोजन नव्हते. पण मन कसे विचित्र वघा ! हे सगळे फुकट आहे हे आपल्यास कळले हाच अहंकार माझ्या मनात दाटू लागला, साठू लागला. वाचन कमी झाले, लेखन कमी झाले, कशात काही अर्थ आहे, अमूक एक केले म्हणजे अमूक एक मिळते, मिळाले पाहिजे हे माझ्या मनापर्यंत पोचतच नसे. लिहिले तर नाव मिळेल, न लिहिले तर नाव जाईल हे काहीच मला जाणवत नसे. खूप मिळाल्याचा आनंद मला होईनासा झाला व खूप गमावल्याचे दुःखही पोचेनासे झाले. अशा स्थितीत आपण कुणाचे काही देणे-घेणे लागतो, आपल्या मदतीने कुणाचे काही बरे होईल नाहीतर नुकसान होईल—काही काही वाटत नव्हते !

अशा अवस्थेत एक विलक्षण अनुभव मला आला. तो येथे देत नाही. त्या वेळी मला हे जाणवले की, आपण आजवर जे काय मिळवले त्याचा काही एक उपयोग नाही; आपण म्हणजे इतरांसारखेच, जीव आहे म्हणून वळवळ करणारे कीटक ! त्यामुळे पूर्वीचे औदासीन्य अधिक गडद झाले. मला जेव्हा विचारण्यात येई, की अरे, तू लिहीत का नाहीस ? नाव कमविलेला मराठीचा कथालेखक तू ! त्या वेळी माझे मन माझ्याशीच वाद घालीत असे की कसली कथा ? कुठला लेखक ? तुझ्या कथांतल्या प्रसंगांना जीव फुटून जेव्हा ते तुझ्याकडे येतात व तुझ्या मदतीसाठी आसुसतात तेव्हा ते आवाहन तुझ्याने स्वीकारून होत नाही मग नुसती लेखणी झिजविण्यात काय अर्थ ? अवघा सहा वर्षांचा काळ तो, पण इकडची दुनिया पार तिकडे होऊन गेली !

याच सुमारास माझा ' प्रस्थान ' कथासंग्रह निघाला. त्याला माझे मित्र श्री. प्रभाकर पाध्ये यांनी विस्तृत प्रस्तावना लिहिली. माझ्या निवेदनात मी असे लिहिले होते की, एकतर माझे लेखन अजिबात थांबेल किंवा अधिक जोमाने सुरू होईल. त्या वेळी मी याच मनाच्या अवस्थेत होतो. त्यानंतर माझा ' पाथेय ' संग्रह प्रकाशित झाला, मला बक्षीसही मिळाले. पण त्याचे सुखदुःख मला जाणवले नाही. हे असे का ? याचे उत्तर शोधायला मन धजत नसे.

तुरुंगातला एक प्रसंग मला आठवतो. ज्ञानेश्वरी शिकत असताना दोन ओव्यांचा चिर परिणाम मजवर झाला—

जैसा देव पूजून पाहिजे । पेरून शेता जाईजे
तोषोन प्रसाद घेईजे । अतिथीचा ॥

वरी कवणें एके उपायें । पडिलें तें उभें होये ।
तेंच कीजे परी घाये । नेदावें वर्मीं ॥

ज्या दिवशी या ओव्या शिकलो त्याच्या एक-दोन दिवसांनंतरच पू. विनोबांना मी एक चित्र दाखविले. हिमालय चढत असताना एक माणूस खाली कोसळत होता आणि

दुसरा पायथ्याशी उभा राहून फोटो घेत होता. विनोबांनी ते चित्र पाहिले आणि सहज म्हणाले—" हा माणूस एवढ्या उंचीवरून पडत असताना या दुसऱ्याला फोटोशिवाय दुसरे काहीच करणे सुचले नाही काय ? "

मी सर्दच झालो. दुःख रंगविण्याऐवजी, वर्णन करण्याऐवजी ते दूर करण्यातच शक्ती वेचणे-त्यानेच जीवनाशी इमान राखता येईल. नुसते लेखन ? छीः !

जेव्हा माझे मन कसल्या कुठल्या अनुभूतीने काळवते, कळवळते तेव्हा सवयीने पछाडलेले एक मन म्हणते-लिहून काढ ! पण कुणी तरी त्याला गप्प बसवून म्हणते-लेखन ! छीः !

कदाचित ही पळवाट असेल; कदाचित लेखनाच्या बाबतीत माझ्या निष्क्रियतेचे हे समर्थनही असेल ! पण हे असणे जसे शक्य आहे तसेच हेही शक्य आहे की, मी हा इथे मनाचा एकेक पापुद्रा सोलून तिथे शोधण्याचा प्रयत्न करतो आहे, तो शोधच मला लागत नसेल किंवा हे कसे मांडावे हेच मला कळत नसेल ! असेल नसेल त्या प्रामाणिकपणे एवढेच सांगू शकेन ती, हे समर्थन करण्यासाठी लिहीत नाही. वयाच्या ४६ व्या वर्षी आयुष्याचा आढावा घेतल्यानंतर कोणत्या गोष्टी खोल खोल दडल्या आहेत आणि कशा, कुठे ठसून गेल्या आहेत त्यांचेच दिग्दर्शन मी केले. ते स्पष्ट नाही याची जाणीव मला आहे आणि ते याहून सुस्पष्ट करता येत नाही याची खंतही आहे.

असे काहीतरी होईल हे ठाऊक होते, म्हणूनच मी श्री. अरविंद गोखले यांना म्हणालो की, कथांची निवड तुम्ही करताहात, अनंतरावांची तुम्हांला मदत आहे, तुम्हीच जे दोन शब्द जोडायचे ते जोडा, तेव्हा त्यांनी मला कळविले, कलावंतासारखे ते कळविणे होते. त्यांचे वाक्य मला इथे द्यावयाचे नाही, पण कलावंत कलेची निर्मिती करू शकतो, टीकाकार होण्याचे त्याला जमत नाही असा त्यात अर्थ होता. त्यांनी लिहिले की, निवेदन तुमचेच हवे, त्यात आत्मकथन हवे; " आपले हे निवेदन अनेक दृष्टींनी महत्त्वाचे व आगळे ठरेल. निवेदनात आपण कथालेखनास कसे उद्युक्त झाला, त्या वेळची वाङ्मयीन दैवते, सृष्टी, आदर्श, अडचणी, आपल्या कथालेखनाचा विकास व वळण, पूर्वसूरींचे, नवे, समकालीन, पाश्चात्य लेखक यांचा परिणाम, आपले कथा व इतर लेखन, आपला जीवनविषयक दृष्टिकोण, त्यातील बदल; काय काय केले; काय झाले; काय राहिले; " " पुस्तकासोबत आपले चरित्रवजा टिपण, आपल्या कथासंग्रहांची यादी, आपणांसंबंधी आलेले महत्त्वाचे लेख असणे अवश्य आहे; " " परिशिष्ट म्हणून आपण दिलेली भाषणे, त्यातील महत्त्वाची भाषणे ही देखील यायला हवीत. "

हे सर्व साधावे कसे ? भाषणे किती दिली याची नोंद क्रमशः ठेवली नाही. असंख्य म्हणणे अतिशयोक्ती होईल, पण कॉलेजबाहेर मी इतकी जाहीर व्याख्याने दिली की त्यांची नोंद बोलून दाखवावयास आणखी एक भाषण द्यावे लागेल. मला बोलता येते आणि माझे भाषण कधी कधी वक्तृत्वाच्या सदरात मोडेल असे होते हे

खरे. हिंदीइतकेच चांगले मराठीही मला बोलता येते हेही खरे, पण त्यामुळे एक कायमची उणीव माझ्यात राहिली. माझी स्वतः लेखनाची सवय तुटली. बोलताना विचार, मुद्दे, कल्पना जशा भराभर सुचतात तशा वेगाने लिहून काढायला होत नाही. कोणी लिहून घेणारे असले तर जनते आणि त्या अभावी गोष्ट असो, लेख असो, लिहून होत नाही. स्वतः लिहून काढलेला मजकूर मी माझाच जेव्हा वाचतो तेव्हा मला तो बोजड वाटतो. साधे रेडियोचे हस्तलिखितसुद्धा कोणी लिहून घेतल्याशिवाय तयार होत नाही. भाषा कमावण्याचे मनापासून मी कसून प्रयत्न केले, शब्दांचा अभ्यासही केला पण हे बोलताना जसे जमते तसे लिहिताना नाही. ही मोठीच उणीव माझ्यात निर्माण झाल्याने माझ्या भाषणाबद्दल मला कोणी शाबासकी दिली तरी मला फारसा आनंद होत नाही.

गोखल्यांच्या सूचनांपैकी माझ्या दृष्टीने कशाचा उल्लेख राहिला तेवढा पुरा करून टाकतो. आत्मकथन भरपूर आलेच आहे. दुसरा प्रश्न मी कथालेखनास कसा उद्युक्त झालो ? 'नागवेल' आणि 'यौवन' या संग्रहांतील आरंभीच्या मजकुरात याचे थोडेसे उत्तर आलेच आहे. मला लिहिण्याची मोठी पोटतिडीक होती म्हणून मी लेखनास उद्युक्त झालो असे सुतराम नाही. पहिली गोष्ट मी लिहिली तेव्हाची माझी मनःस्थिती आठवण्याचा मी प्रयत्न करतो आहे पण विशेष असे काहीच घडले नाही. वाचन पुष्कळच झाले होते. मी जे काय वाचीत असे त्याचा माझ्या मनावर फार चटकन परिणाम होत असे. आपल्यासही असे लिहिता येईल असे वाटत असे. पण काही नवा पायंडा पाडावा असा हेतू मनात बाळगून त्या जाणीवेने मी खरेच लिहिले नाही ! मराठी भाषेतील थोर व अष्टपैलू लेखक श्री. वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर यांनी "पाच कथाकार" मध्ये माझ्याबद्दल फार आस्थेने लिहिले. 'संस्कार' या माझ्या संग्रहाची पन्नास पृष्ठांची विस्तृत प्रस्तावना त्यांनी हौसेने लिहिली. ते त्यांचे मजवर फार मोठे ऋण आहे. त्यात त्यांचा मोठेपणा व वाङ्मयाबद्दलची आस्था पानापानावर दिसते. एरवी असे कोण कोणाला उचलून घेतो ! त्यांच्या आणि इतर टीकाकारांच्या मते मी मराठी कथेला काही नवे वळण लावले असे मानले जाते. पण ते कसे हे मला स्पष्ट करता येत नाही. मला एकच शक्यता वाटते. माझ्या अगोदरच्या लेखकांनी लिहिलेल्या बहुधा सर्व मराठी कथा माझ्या वाचून झाल्या होत्या. त्यांचे संस्कार घेऊन मी जेव्हा माझ्या दृष्टिकोणातून लिहू लागलो तेव्हा त्यांचा काळ आणि माझा काळ यात फरक पडल्यामुळे माझ्या लेखनात त्यांच्याहून निराळे काही आले असेल; याहून अधिक मला काही एक सांगता यावयाचे नाही !

कोणकोणत्या लेखकांचा माझ्या लिखाणावर परिणाम झाला हे देखील सांगणे कठीण आहे. कोणाचाच झाला नाही किंवा झाला असेल तर सर्वांचाच झाला असे म्हणता येईल. माझ्या चांगल्या म्हणून ज्या कथा समजल्या जातात त्या जेव्हा मी

लिहिल्या त्या वेळी माझे वाचन संख्येने पुष्कळ असले तरी प्रकाराने कमी होते. इंग्रजी कथा-कादंबऱ्या मी पुष्कळच नंतर वाचल्या. मी लिहिले त्या वेळी मराठी कथेत दिवाकर कृष्ण, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर हे अग्रेसर होते. एक गंमत मला आठवते. १९४६ साली मी मुंबईस गेलो होतो. माझे चहाते, मित्र, बंधुबांधव आणि प्रकाशक श्री. हरिभाऊ मोटे यांच्याकडे गेलो. त्या वेळी सौ. कृष्णाताई मोटे मला म्हणाल्या– "तुमच्या लिखाणावर चेकॉवची फार छाप आहे. मी परवा माझ्या एका भाषणात उल्लेखही केला आहे." तेव्हा मी 'असेल' असे मोघम म्हणून गप्प बसलो. पण त्या वेळपावेतो मी चेकॉवचा एक शब्दही वाचला नव्हता. नंतर मात्र मिळेल तेवढा वाचला. काळाच्या दृष्टीने पाहिले तर जशी माझी चेकॉववर छाप पडली नाही तसेच माझ्यावरही त्याचे ऋण नाही. रेडियोवर टेपरेकॉर्ड झालेले आपलेच भाषण आपण जेव्हा घरी बसून ऐकतो तेव्हा तो आपला आवाज आहे हे आपल्याला ओळखू येत नाही, इतरांना तो स्पष्टपणे ओळखू येतो. हे जसे गौडबंगाल आहे तसेच हेही असले पाहिजे.

दुसरा एक मुद्दा आठवला म्हणून त्याचाही इथे उल्लेख करतो. तो म्हणजे माझ्या कथांवर गांधीवादाची छाप आहे! मला छाप वाटत नाही, थाप वाटते! गांधीजींचा विचार मांडावा असे कल्यून मी एकही गोष्ट लिहिली नाही. लेखक जेव्हा लिहितो तेव्हा त्याच्या अंतर्मनावर त्याच्या पूर्वीच्या साहित्याचा व जीवनदृष्टीचा संस्कार असतो. त्याच्या मनाची पातळी जशी असेल तसा तो संस्कार उमटतो. ती तऱ्हकडी जेव्हा त्याच्या प्रचीतीच्या, प्रत्ययाच्या अणीने बोलू लागते तेव्हा त्यात पूर्वसूरींचे सगळेच असते! पण ही उपपत्तीही फारशी बरोबर नाही. काहीही न वाचलेला माणूस एखाद्या वेळी बोलतो किंवा लिहितो तेव्हा त्याच्यावर तर कोणती छाप नसते ना? जीवन त्याच्यावर जसे उमटले असेल तसे त्याचे साहित्य निर्माण होईल, असाच जर काहीसा परिणाम गांधीजींचा मजवर झाला असेल तर तो जसा मला नाकबूल करता येणार नाही तसा प्रत्यक्ष कबूल करायलाही मजजवळ पुरावा नाही. दुसरे म्हणजे माझ्या गोष्टी सोवळ्या असतात त्यामुळे विद्यार्थ्यांच्या क्रमिक पुस्तकांत घालता येतात. 'क्रव्याद', 'सती', 'तेवढा एक तास' या गोष्टी सोवळ्या असतील तर जगात ओवळे काही असू शकत नाही. वाचकाला त्या वाचून ओवळे झाल्यासारखे वाटत नाही एवढे खरे! नेसूचे ढिले धोतर वाचकाला सांडायला लावावयाचे की ते पक्के कसायला लावावयाचे हा विवाद्य मुद्दा आहे म्हणे, तेव्हा तो इथेच सोडू!

माझ्या कथांवर टीकात्मक, परीक्षणात्मक लिखाण किती झाले हे मला ठाऊक नाही. झाले असेल तर ते मला वाचायला मिळाले नाही. माझा व्यवसाय व हिंदीचा पगडा यांमुळे मराठी वृत्तपत्रांचे माझे वाचन फारच कमी राहिले आहे.

साहित्यातील नवे प्रवाह वगैरेसंबंधीची परिभाषा मला कळत नसल्यामुळे त्याबद्दल मला आस्थाही नाही. आता हेच बघा की ! सध्याच्या कथेला नवकथा म्हणतात. मी पुष्कळ शोधून पाहिले पण मला अजून ती लघुकथा वाटते. जीवन जसे जुने नवे काही नसते, त्याचा प्रवाह जसा सतत चालू असतो तसेच साहित्य प्रवाहाचे आहे. जीवनातून निघालेला, उठलेला, फेकला गेलेला माणूस जीवनात आला म्हणजे तो नवजीवन असा शब्द कधी कधी वापरताना आढळतो. आजारी माणूस कधी पुनर्जीवन मिळाल्याचे म्हणतो. आत्माही जुनी शरीरे टाकून नवी शरीरे धारण करतो म्हणतात. कपडे जीर्ण झाले की आपण त्यांचा उपयोग वेगळा करून नवे कपडे शिवतो. तसेच जुनी कथा, नवी कथा यांच्याबद्दल काही झाले किंवा होणार आहे असे मला वाटत नाही. हरिद्वारची गंगा जुनी व काशीची नवी, हिवाळ्यातील जुनी अन् उन्हाळ्यातील नवी असे गंगेचे पाणी जुने नवे होत असले तर मला ठाऊक नाही अन् ज्यांना ठाऊक आहे म्हणतात त्यांची भेट वेण्याची माझी इच्छा नाही. नव्याजुन्यापेक्षा तारतम्याची परिभाषा कोणी वापरली तर मला समजू शकेल. कथा मधुर होती ती मधुरतर, मधुरतम झाली असे कुणी म्हणेल किंवा कथा जमिनीवर होती ती खड्ड्यात गेली असेही म्हणेल तरी साहित्याच्या सातत्यावर श्रद्धा ठेवणारा माझ्यासारखा माणूस एक वेळ राजी होईल. नवकथेच्या प्रकाराला माझ्यापासून सुरवात झाली असे अनेकांनी म्हटल्यामुळे मी त्यासंबंधी विशेष आस्था दाखवूनही मला त्यातले काही समजले नाही. तेव्हा इतरांना मी कसे समजावून देऊ ?

माझ्यामध्ये जे काय साहित्यगुण असतील त्यांच्या संवर्धनास आणि समृद्धीस सगळ्यात कारणीभूत जर काही झाले असेल तर ते माझे झालेले कौतुक आणि मला मिळालेले प्रोत्साहन. पुण्या-मुंबईचे लोक इकडील साहित्यिकाला कमी लेखतात व इकडील लेखक त्यांची पर्वा करीत नाहीत असाही एक वाद असल्याचे ऐकतो. माझे कौतुक मुंबई-पुण्यानेच केले, मी लाडावून जाईन इतके केले. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त न केली तर मला अंतर्यामी सद्गती देणार नाही. माझ्याबद्दल लेखक म्हणून जे प्रेम व जी आस्था दाखविली गेली तिला मी काही एक प्रत्युतर देऊ शकलो नाही याची खंत मला आहे. माझ्यावर माझ्या जडण-घडणीच्या अवस्थेत निरपेक्ष, अकृत्रिम, असीम प्रेम केले श्री. पु. भा. भावे (त्याला श्री लावणे हेही परकेपणाचे वाटते) यांनी, श्री. गो. रा. दोडके यांनी, श्री. प्रभाकर पाध्ये, सौ. कमलाताई पाध्ये यांनी ! पैकी पहिले तीन साहित्यक आहेत. त्यांचे विचार-विकार, पंथ-प्रकृती भिन्न आहेत. पण फुलझाडाला पाणी मिळाले ते यांच्या हातच्या झारीतून. श्री. के. नारायण काळे, श्री. काणेकर, आचार्य काकासाहेब कालेलकर, श्री. भाऊसाहेब खांडेकर, प्रा. ना. सी. फडके, श्री. मा. गो. देशमुख, डॉ. वि. भि. कोलते, श्री. मधुकर मंगरूळकर, डॉ. प्रभाकर माचवे, श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, श्री. सच्चितानंद हिरानंद वात्स्यायन–भीती वाटते, किती वाढवू ही यादी, आणि कोणी सुटेल की काय ? ही सगळी आपापल्या क्षेत्रातील मातब्बर

माणसे ! यांच्या कौतुकांच्या साथीने माझ्या कथेने बाळसे धरले आहे. अधिक काय लिहू ? आरंभी हरिभाऊ मोऱ्यांनी मला उचलून धरले नसते तर माझ्यात आत्मविश्वासच जागला नसता. माझ्या कथांवर श्री. के. ना. काळे, निशिकांत खानोलकर, माधव मनोहर, प्रा. श्री. के. क्षीरसागर, आचार्य कालेलकर यांनी लिहिल्याचेच मला तेवढे या क्षणी आठवते. माझ्या संग्रहांना काका कालेलकर, मधुकर मंगरूळकर, प्रभाकर पाध्ये, वि. स. खांडेकर, मा. गो. देशमुख यांनी प्रस्तावना लिहिल्या. खेड्यात वाढल्यामुळे असेल, आधुनिक शिक्षणात पुढे न गेलेल्या घराण्यात माझा जन्म झाल्यामुळे असेल किंवा ज्यांचा सहवास मला लाभला त्यांच्या अगाध विद्वत्तेमुळे असेल, पण माझ्या मनात एक प्रकारचा बुजरेपणा, संकोच दडला होता तो या कौतुकाने पार नाहीसा झाला आणि माझा विश्वास इतका जागला की त्याचे पर्यवसान वेदरकारीत झाले ! या सर्वांना या प्रसंगीं मी अभिवादन करतो.

आत्मस्तुती म्हणून नव्हे पण एका गोष्टीचा उल्लेख करतो. लोकांना आपल्या कथा आवडतात व तशा कथा लिहिता येतात आपल्याला अशी खात्री झाल्यानंतरही मी तृतीचा निःश्वास टाकला नाही. त्यासाठी जी साधना करावी लागते तिच्यात मी कसूर केली नाही. कथेशी एकनिष्ठ राहता यावे, कथेचे माध्यम डागळू नये म्हणून इतर कुठलाही वाङ्मयप्रकार हाताळण्याचे मी कटाक्षाने टाळले. प्रबंधात्मक लिखाण मी केले. त्याची जाणकारांनी प्रशंसाही केली पण ते म्हणजे मी दिलेल्या भाषणांचा सारांश होय. मी स्वतंत्र प्रयास केला नाही. एवढेच नव्हे तर १९४२ मध्ये तुरुंगात असताना आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी जवळजवळ सहा तास (तीन दिवस मिळून) माझ्या साहित्य प्रवृत्तींबद्दल चर्चा केली. ते म्हणाले, "तुमची प्रकृती नाट्याला अनुकूल आहे. कुठल्याही प्रसंगी गांगरून न जाणारी तुमची वृत्ती लोकांना विचलित करील असे नाट्य निर्माण करू शकेल; मी म्हणतो म्हणून तुम्ही नाटक लिहा." तेव्हा मी त्यांना नम्रपणे सांगितले की, माझ्यात जे काय असेल ते माझ्या कथेतूनच प्रकट झाले तरच मला हवे आहे. एरवी नको. कृष्णाची योग्यता मला माहीत आहे, पण रामाचे माझे आराधन एकनिष्ठ राहू द्या ! मला अजून असे वाटते की, माझी कुवत मी इतर वाङ्मयप्रकारांवर खर्च केली असती तर मला कथा लिहिता आली नसती. निष्ठा एकदा डागळली तर ती सर्व जीवन डागळून टाकते !

सध्या माझ्याने मला सुचूनही कथा लिहून होत नाहीत. चित्रणापेक्षा, बोलण्यापेक्षा इतर काही कर्तव्ये आपल्यास आहेत या जाणीवेने मी इतका व्यापला गेलो आहे की, कथेच्या द्वारे जीवनात प्रश्न परिप्रश्न निर्माण करण्याऐवजी त्यांतील एखादा सोडविण्यासाठी आपण खपले पाहिजे असेच मला वाटते. साहित्याच्या वाचनावरही या माझ्या वृत्तीचा परिणाम झाला आहे. माझे अत्यंत आवडते लेखक म्हणजे मोपासां, चेकॉव, झोला, ऑस्कर वाइल्ड, शरद्बाबू इ. मोजकेच राहिले आहेत. पैकी मोपासां, चेकॉवची

साहित्यातील नवे प्रवाह वगैरेसंबंधीची परिभाषा मला कळत नसल्यामुळे त्याबद्दल मला आस्थाही नाही. आता हेच बघा की ! सध्याच्या कथेला नवकथा म्हणतात. मी पुष्कळ शोधून पाहिले पण मला अजून ती लघुकथा वाटते. जीवन जसे जुने नवे काही नसते, त्याचा प्रवाह जसा सतत चालू असतो तसेच साहित्य प्रवाहाचे आहे. जीवनातून निघालेला, उठलेला, फेकला गेलेला माणूस जीवनात आला म्हणजे तो नवजीवन असा शब्द कधी कधी वापरताना आढळतो. आजारी माणूस कधी पुनर्जीवन मिळाल्याचे म्हणतो. आत्माही जुनी शरीरे टाकून नवी शरीरे धारण करतो म्हणतात. कपडे जीर्ण झाले की आपण त्यांचा उपयोग वेगळा करून नवे कपडे शिवतो. तसेच जुनी कथा, नवी कथा यांच्याबद्दल काही झाले किंवा होणार आहे असे मला वाटत नाही. हरिद्वारची गंगा जुनी व काशीची नवी, हिवाळ्यातील जुनी अन् उन्हाळ्यातील नवी असे गंगेचे पाणी जुने नवे होत असले तर मला ठाऊक नाही अन् ज्यांना ठाऊक आहे म्हणतात त्यांची भेट घेण्याची माझी इच्छा नाही. नव्याजुन्यापेक्षा तारतम्याची परिभाषा कोणी वापरली तर मला समजू शकेल. कथा मधुर होती ती मधुरतर, मधुरतम झाली असे कुणी म्हणेल किंवा कथा जमिनीवर होती ती खड्ड्यात गेली असेही म्हणेल तरी साहित्याच्या सातत्यावर श्रद्धा ठेवणारा माझ्यासारखा माणूस एक वेळ राजी होईल. नवकथेच्या प्रकाराला माझ्यापासून सुरवात झाली असे अनेकांनी म्हटल्यामुळे मी त्यासंबंधी विशेष आस्था दाखवूनही मला त्यातले काही समजले नाही. तेव्हा इतरांना मी कसे समजावून देऊ ?

माझ्यामध्ये जे काय साहित्यगुण असतील त्यांच्या संवर्धनास आणि समृद्धीस सगळ्यात कारणीभूत जर काही झाले असेल तर ते माझे झालेले कौतुक आणि मला मिळालेले प्रोत्साहन. पुण्या-मुंबईचे लोक इकडील साहित्यिकाला कमी लेखतात व इकडील लेखक त्यांची पर्वा करीत नाहीत असाही एक वाद असल्याचे ऐकतो. माझे कौतुक मुंबई-पुण्यानेच केले, मी लाडावून जाईन इतके केले. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त न केली तर मला अंतर्यामी सद्गती देणार नाही. माझ्याबद्दल लेखक म्हणून जे प्रेम व जी आस्था दाखविली गेली तिला मी काही एक प्रत्युतर देऊ शकलो नाही याची खंत मला आहे. माझ्यावर माझ्या जडण-घडणीच्या अवस्थेत निरपेक्ष, अकृत्रिम, असीम प्रेम केले श्री. पु. भा. भावे (त्याला श्री लावणे हेही परकेपणाचे वाटते) यांनी, श्री. गो. रा. दोडके यांनी, श्री. प्रभाकर पाध्ये, सौ. कमलाताई पाध्ये यांनी ! पैकी पहिले तीन साहित्यिक आहेत. त्यांचे विचार-विकार, पंथ-प्रकृती भिन्न आहेत. पण फुलझाडाला पाणी मिळाले ते यांच्या हातच्या झारीतून. श्री. के. नारायण काळे, श्री. काणेकर, आचार्य काकासाहेब कालेलकर, श्री. भाऊसाहेब खांडेकर, प्रा. ना. सी. फडके, श्री. मा. गो. देशमुख, डॉ. वि. भि. कोलते, श्री. मधुकर मंगरूळकर, डॉ. प्रभाकर माचवे, श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, श्री. सच्चितानंद हिरानंद वात्स्यायन-भीती वाटते, किती वाढवू ही यादी, आणि कोणी सुटेल की काय ? ही सगळी आपापल्या क्षेत्रातील मातबर

माणसे ! यांच्या कौतुकांच्या सार्थीने माझ्या कथेने बाळसे धरले आहे. अधिक काय लिहू ? आरंभी हरिभाऊ मोऱ्यांनी मला उचलून धरले नसते तर माझ्यात आत्म-विश्वासच जागला नसता. माझ्या कथांवर श्री. के. ना. काळे, निशिकांत खानोलकर, माधव मनोहर, प्रा. श्री. के. क्षीरसागर, आचार्य कालेलकर यांनी लिहिल्याचेच मला तेवढे या क्षणी आठवते. माझ्या संग्रहांना काका कालेलकर, मधुकर मंगरूळकर, प्रभाकर पाध्ये, वि. स. खांडेकर, मा. गो. देशमुख यांनी प्रस्तावना लिहिल्या. खेडयात वाढल्या-मुळे असेल, आधुनिक शिक्षणात पुढे न गेलेल्या घराण्यात माझा जन्म झाल्यामुळे असेल किंवा ज्यांचा सहवास मला लाभला त्यांच्या अगाध विद्वत्तेमुळे असेल, पण माझ्या मनात एक प्रकारचा बुजरेपणा, संकोच दडला होता तो या कौतुकाने पार नाहीसा झाला आणि माझा विश्वास इतका जागला की त्याचे पर्यवसान वेदरकारीत झाले ! या सर्वांना या प्रसंगीं मी अभिवादन करतो.

आत्मस्तुती म्हणून नव्हे पण एका गोष्टीचा उल्लेख करतो. लोकांना आपल्या कथा आवडतात व तशा कथा लिहिता येतात आपल्याला अशी खात्री झाल्यानंतरही मी तृतीचा निःश्वास टाकला नाही. त्यासाठी जी साधना करावी लागते तिच्यात मी कसूर केली नाही. कथेशी एकनिष्ठ राहता यावे, कथेचे माध्यम डागळू नये म्हणून इतर कुठलाही वाङ्मयप्रकार हाताळण्याचे मी कटाक्षाने टाळले. प्रबंधात्मक लिखाण मी केले. त्याची जाणकारांनी प्रशंसाही केली पण ते म्हणजे मी दिलेल्या भाषणांचा सारांश होय. मी स्वतंत्र प्रयास केला नाही. एवढेच नव्हे तर १९४२ मध्ये तुरुंगात असताना आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी जवळजवळ सहा तास (तीन दिवस मिळून) माझ्या साहित्य प्रवृत्तींबद्दल चर्चा केली. ते म्हणाले, "तुमची प्रकृती नाट्याला अनुकूल आहे. कुठल्याही प्रसंगी गांगरून न जाणारी तुमची वृत्ती लोकांना विचलित करील असे नाट्य निर्माण करू शकेल; मी म्हणतो म्हणून तुम्ही नाटक लिहा." तेव्हा मी त्यांना नम्रपणे सांगितले की, माझ्यात जे काय असेल ते माझ्या कथेतूनच प्रकट झाले तरच मला हवे आहे. एरवी नको. कृष्णाची योग्यता मला माहीत आहे, पण रामाचे माझे आराधन एकनिष्ठ राहू द्या ! मला अजून असे वाटते की, माझी कुवत मी इतर वाङ्मय-प्रकारांवर खर्च केली असती तर मला कथा लिहिता आली नसती. निष्ठा एकदा डागळली तर ती सर्व जीवन डागळून टाकते !

सध्या माझ्याने मला सुचूनही कथा लिहून होत नाहीत. चित्रणापेक्षा, बोलण्यापेक्षा इतर काही कर्तव्ये आपल्यास आहेत या जाणीवेने मी इतका व्यापला गेलो आहे की, कथेच्या द्वारे जीवनात प्रश्न परिप्रश्न निर्माण करण्याऐवजी त्यांतील एखादा सोडविण्या-साठी आपण खपले पाहिजे असेच मला वाटते. साहित्याच्या वाचनावरही या माझ्या वृत्तीचा परिणाम झाला आहे. माझे अत्यंत आवडते लेखक म्हणजे मोपासां, चेकॉव, झोला, ऑस्कर वाइल्ड, शरद्बाबू इ. मोजकेच राहिले आहेत. पैकी मोपासां, चेकॉवची

मी पारायणे केली असून शरद् आणि ऑस्कर वाइल्ड मला जवळजवळ मुखपाठ आहेत. दैनंदिन जीवनात मला कधी रडायला येत नाही, पण या लेखकांच्या सृष्टीशी जेव्हा मी समरस होतो, तेव्हा इतके खारे पाणी कुठून येते कुणास ठाऊक; पण साहित्यानंदाने माझे डोळे झरझरतात. पुस्तक वाचून संपवावयाला मला फार वेळ लागतो. करमणूक म्हणून वाचण्याचे कसब अजून मला साधले नाही. गार्डनरची रहस्यमय कादंबरीही बसल्या बैठकीत माझ्याने संपत नाही. खूप वाचले म्हणजे आपले ज्ञान वाढते यावर माझा विश्वास राहिला नाही. प्राक्तनसदोषामुळे समजा, एखाद्या वेटावर मी हद्दपार झालो आणि मजजवळ ज्ञानेश्वरी व शरद् किंवा वरीलपैकी एखाद्या लेखकाचे साहित्य असले तर शिक्षा संपूनही मी परत येईन असे मला खात्रीपूर्वक सांगता येत नाही. मला असे वाटते की, इतके वाचन केल्यानंतर मन इतके समृद्ध व्हावयास हवे की वाचायची गरज पडू नये. Experience is an instinct असे ऑस्कर वाइल्ड म्हणतो तसे जग व जीवन मला सहजप्रवृत्तीने समजायला हवे. कदाचित माझे हे चुकत असेल. पण असे होते खरे ! अतिशय महत्त्वाच्या विषयांवरही जेव्हा मला भाषण करावयाचे असते तेव्हाही मला फार पुस्तकांची गरज भासत नाही. शितावरून भाताची परीक्षा करण्या-इतका सखोलपणा जेव्हा माझ्यात येईल तेव्हा मला फार आनंद होईल.

मी जीवनाचा उपासक आहे पण जीवनासाठी कला असे मी मानीत नाही. मी कलेसाठी कलाच मानतो, निष्ठेने मानतो. ही माझी मान्यता समजावून देण्याची पात्रता व पर्वा माझ्यात नाही, आणि समजावून देण्यासाठी विवाद करण्याची इच्छाही नाही. कला, जीवन इ. संबंधीचे टॉल्स्टॉय, कालेलकर यांचे विचार वाचूनही मी कलेसाठी कलाच मानतो. सत्य, शिव, सुंदर हे जसे अभिन्न असते–सत्य आहे म्हणून शिव व म्हणूनच सुंदर तसे जीवन, कला वेगळी नाहीत. साहित्य हे जर स्फुरत असेल तर मी शपथेवर सांगतो, ती कलाच आहे. जीवन स्फुरत नाही कधी ! याबद्दल कोणी वाद घातला तर स्लेटपाटीवर खिळा घासल्यागत माझे मन कचकचते. ज्यांच्यात जगण्याची कुवत नाही त्यांच्यासाठी कला म्हणजे कलाच होय !

तरी मी जीवनाचा उपासक आहे, जीवनात जो आनंद असेल तो कलेचाच होय. मी नुसता उपासक आहे, त्यावर उपाय करणारा वैद्य नव्हे ! विफलतेचे चित्र रंगविण्यापेक्षा ती दूर करणे हेच मला धन्यतेचे वाटते. कुणाचे दुःख वर्णन करून मी थांबलो तर मजकडून कसला तरी द्रोह झाला असे मला वाटते. मी लिहितो म्हणूनच मी सतत लिहिले पाहिजे असा मक्ता घेण्यात मला सुख वाटत नाही. मी लेखक व्हावे म्हणून लिहिलेही नाही. मला कोणी लेखक म्हटले तर मला आनंद होतो पण मी हुरळून जात नाही. कोणी साहित्याचे वादंग माजविले तर त्याची कुवत तेवढीच असे म्हणून मी बाजूला होतो. इतके जगल्यानंतर माझ्याजवळ जगण्यापुरते काहीच जमले नसेल तर मी जगलोच नाही असे माझे मन मला बोल लावील. तसे ते बोलत नाही यातच मला समाधान आहे.

माझे काही संकल्प आहेत. त्यांवर माझी निष्ठा आहे. अशी निष्ठा असल्याशिवाय लिहिण्यातच काय पण जगण्यातही अर्थ नाही असे मला वाटते. या निष्ठेनेच मी लिहिले आणि लिहीत राहीन. कुणाचे अनुकरण करण्याचे किंवा कोणी आपल्यापुढे गेला म्हणून वैषम्य वाटून आपली निष्ठा चळू देण्याचे पाप मी केले नाही. पुढेही तसे होऊ नये एवढेच देवाजवळ मागणे आहे.

या संकल्पासाठी जी साधना हवी असते तिच्यासाठी माझी शक्ती कदाचित अपुरी पडेल. संकल्पही पुरे होणार नाहीत. मला त्यात विषाद नाही. सगळ्यांनाच सर्वपूर्तीचे समाधान लाभते असे नाही. काहींचा प्रवास मध्येच संपतो पण म्हणून बिघडले कुठे ? माझे जीवन म्हणजे नियतीचे जीवन नव्हे. मी संपलो तरी नियती संपणार नाही. माझी निष्ठा, माझे संकल्प नियतीत मिसळून जातील. मी संपेन पण माझे संकल्प नष्ट व्हायचे नाहीत. विवादाची हिरिरी माझ्यात नाही. मला जे लिहावेसे वाटले ते लिहिले जात नाही. कारण मी ज्याची उपासना करतो ते जीवन ' देव पूजूनि पाहिजे ' अशा स्थितीला आले आहे. जीवनाचे घाव पाहून मला स्फूर्ती होत नाही. घाव बुजविण्याचे कार्य जे करतील त्यांची सेवा करायला मी उत्सुक आहे. जे दिसते ते रंगविण्यात मी कधी भाग घेतला नाही. जे दिसायला हवे, जसे दिसायला हवे ते तसे दिसले पाहिजे आणि तसे दिसत नसेल तर ते चित्रित करून आपली जबाबदारी संपली असे मला वाटत नाही. वैफल्याचे चित्रण माझ्याने करवत नाही ते याचमुळे ! वैफल्याची किंकाळी मी कशाला वर्णन करू ! तीच तर स्वयंस्फूर्त आहे. माझ्या वर्णनाने तिच्यात भर पडायची नाही. माझ्या साधनेची दिशा वर्णनाबरोबर शुश्रूषेकडे जाते त्याला मी काय करू ? मला दिसलेले जीवन माझ्या दृष्टीने सजवून पाहण्याचा मला छंद आहे. तोच धर्म आहे असे माझे मन माला सांगते.

मी असलो काय अन् नसलो काय, जीवन राहावयाचे आहे एवढी जाणीव माझ्यासाठी पुरेशी आहे. प्रयत्नांतून फल मिळावे इतकी माझी मरणावर निष्ठा नाही.

मला वाटते एवढेच पुरे ! लिहिले तेही मोठे मुद्देसूद असे नाही. त्यातून इतरांना काही मिळेल असा हेतूही नाही. पण माझ्या या कहाणीवाचून पुस्तक प्रकाशित करावयाचे नाही असा श्री. अनंतराव कुळकर्णी यांचा निश्चय आहे. गेले सहा महिने-त्यासाठी पुस्तक छापून पडून आहे. मी अर्थशास्त्राचा अध्यापक. आर्थिक दृष्टीतून मी विचार केला. मला वाटले, कागद, छपाई यांत गुंतलेला पैसा या मंडळींना इतका धीर धरू देणार नाही. पण माझ्या अर्थविचारांतून कल्पांतापर्यंत थांबण्याचा अनर्थ ते करतील असे वाटल्यामुळेच हे लिहून हातावेगळे करीत आहे. एकादशी करणाऱ्या कुलवंताच्या सुनेने सगळ्यांसाठी स्वयंपाक करावा अन् स्वतः उपाशी राहून आपली जबाबदारी पार पाडावी याच वृत्तीने मी हे लिहिले आहे.

उणीपुरी तीस वर्षे वाङ्मयप्रपंच मी केला. या प्रवासात अनेक पांथस्थ भेटले; अनेकांनी मार्गदर्शन केले; अनेकांनी दुखल्याखुपल्यावर फुंकर घातली. त्यांपैकी आजही काहींची भेट होते; काहींची होत नाही, होणार पण नाही. सगळ्यांची आठवण होते. त्या आठवणी हर्षखेदाचे उमाळे जागवितात. या आत्मनिवेदनाच्या नाजूक, पवित्र क्षणी त्यांचे स्मरण करतो; त्यांच्या सद्भावनेबद्दल, हितकामनेबद्दल त्यांच्या पायांवर डोई ठेवून माझे प्रणाम त्यांच्या चरणी रुजू करतो. अस्तू !

७-८-६०

३

अक्षरसृष्टीत पदार्पण

माझी पहिली लघुकथा मी कधी लिहिली हे आता आठवत नाही. माझ्या इच्छेने मी लेखक झालो नाही. इंग्रजी चौथीच्या परीक्षेत मला स्कॉलरशिप मिळाली. ती मिळाली नसती तर मला कोणी पुढे शिकविलेही नसते. नागपूरला येऊन मी पटवर्धन हायस्कूल-मध्ये नाव घातले. एक खोली घेऊन मी आणि माझे वडील बंधू हाताने स्वयंपाक करून अवघा खर्च महिना आठ रुपयांत भागवीत असू. कधी थंडा फराळ, तर कधी शुद्ध हवा खाऊन आरोग्यसंवर्धन चालू होते.

नवव्या वर्गात शहरातील हायस्कुलात आल्याबरोबर वातावरण एकदम बदलले. मिड्ल स्कूलमध्ये माझ्या वर्गाचाच नव्हे तर अवघ्या शाळेचा मी कॅप्टन होतो. क्रिकेट, हुतुतू, कुस्ती, मल्लखांब यांत प्रवीण होतो. पण शहरातल्या शाळेत आल्याबरोबर मला कोणी विचारीना आणि माझी गरिबी कोणाला विचारूही देईना. या शाळेतील आरंभीच्या तीन महिन्यांतच एक विचित्र प्रसंग घडला. वर्गात मी काहीतरी गडबड केली असावी. मला भूक लागत असे म्हणून खिशात एक-दोन पोळ्या मी घेऊन येई. मागील बेंचवर बसून लिहिता लिहिता मी पोळीचा एक एक तुकडा खात होतो. रोजारचा मुलगा मागू लागला. थोडी गडबड झाली. आम्हांला श्री. इनामदार मास्तर गणित शिकवीत होते. हसरे, आनंदी. ते हसतहसत म्हणाले, " अरे, तू गडबड करतोस ? तू असा वागतोस ? साडेतीन शहाण्यांपैकी एका संपूर्ण शहाण्याच्या कुळात जन्मलेला, आणि तू असं करायचं ? छेः ! " एवढेच म्हणून त्यांनी निर्मळ हसून दिले. इतर कोणत्याही शिक्षे-पेक्षा या त्यांच्या बोलण्याचा माझ्या मनावर कायमचा परिणाम झाला. मी समोरच्या बेंचवर बसू लागलो.

जागा बदलून समोर आलो. आता आणखी समोर गेले पाहिजे म्हणून आम्ही चार मित्रमंडळींनी एक ' चेतना ' नावाचे हस्तलिखित मासिक काढले. त्याचा संपादक मी. पुढे पुढे लेखक मी आणि प्रकाशकही मीच. आरंभ करून दोस्त पांगले. पण मी मात्र ते मासिक तीन वर्षे चालविले. चरित्र, कथा निबंध, कविता मासिकात असावयास हवी. वेगवेगळ्या नावांखाली मीच त्या लिहू लागलो. त्यासाठी वाचनही केले. चरित्रे लिहिणे सोपे होते. गुरुगोविंदसिंह, स्वामी रामतीर्थ इथून सुरवात करून ज्यांची ज्यांची माहिती मला मिळेल त्या सर्व क्रांतिकारकांची चरित्रे मी त्या मासिकात लिहिली. निबंधही मोठे प्रगल्भ लिहीत असे. एका निबंधाचे शीर्षक मला आठवते. ' वधूवरांच्या उच्चतम प्रेमाचा विपर्यास ! ' आणि लेखक कोण ? तर पंधरा वर्षांची मिसरूड न

फुटलेली भित्री भागुबाई, म्हणजे मीच! गोष्टीही लिहिल्या, कविता मात्र जमल्या नाहीत. आजतागायत मी कवितेच्या वाटेस गेलो नाही. कवितांचे वाचन मात्र त्या वेळी खूपच झाले. रे. ना. वा. टिळक, माधव ज्यूलियन, कवी यशवंत, गडकरी, गिरीश, कवी माधव, काणेकर यांच्या कविता मला मुखपाठ होत्या. 'यशोधन' मी पहिल्या पानावरील रविकरण मंडळाच्या सदस्यांपासून तर शेवटच्या कव्हरावरील जुजबी मजकुरापर्यंत गंमतीने म्हणून दाखवीत असे. पण कवितेची 'कळा' मला जमली नाही.

'चेतना' मासिकाने मला लेखक आणि लेखकू दोन्ही बनविले. माझे अक्षर सुवाच्य, सुस्पष्ट आणि सुंदर झाले. ड्रॉइंगच्या परीक्षा मी मिड्ल स्कुलातच पास झालो होतो. मासिक सजविण्याची कला 'चेतने'नेच मला अवगत करून दिली. ते सगळे अंक मी अजून जपून ठेवले आहेत.

या पार्श्वभूमीवर मी १९३२ सालच्या १६ जुलैला नागपूरच्या मॉरिस कॉलेजात प्रवेश केला. त्याच दिवशी माझा वाढदिवस होता. 'चेतना' बंद पडली होती, पण आत काही जागे झाले होते. माझी प्रसिद्ध झालेली पाहिली लघुकथा 'अम्मा' ही मी १-८-१९३२ रोजी सायंकाळी सहा वाजता एका बैठकीत लिहिली आणि दुसरी १८ सप्टेंबर १९३२ ला संध्याकाळी सात वाजता लिहिली. दोन्ही गोष्टी नागपूरच्या 'मुलांचे मासिक'मध्ये छापून आल्या. आता आपण लेखक झालोच आहोत तर काही-तरी चांगले लिहिले पाहिजे, अशी जाणीव माझ्या मनाने घेतली.

कल्पनेचे जग उभवीत असताना वास्तव जग दृष्टीआड करून निभणे शक्यच नव्हते. चार-पाचशे दंड-बैठका रोज केल्यानंतर मला भूकही लागत असे आणि उपास माझ्याने करवत ना! वाट्याला आलेले भोगलेच पाहिजे अशी परिस्थिती असल्यामुळे मला जीवनविमुख होता आले नाही. जीवनाचा उबग, कंटाळा, हाय हाय असेही कधी वाटले नाही. दिवसा जगावे, रात्री लिहावे, पहाटे व्यायाम करावा, सायंकाळी नियमित देवदर्शन करावे, असा आखीव कार्यक्रम जवळजवळ दोन वर्षे माझा चालू होता.

'अम्मा' या माझ्या कथेत एका गरीब स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. 'सव्वापाच आणे' ही माझी दुसरी गोष्ट देखील एका गरीब हमालावर लिहिलेली. गरिबांबद्दल मला मुद्दाम कळवळा निर्माण करावा लागला नाही. मी तसाच जगत होतो. त्यातूनही स्वाभिमान कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो. स्वाभिमान का? तर इनामदार मास्तरांचे ते वाक्य! अब्रू टिकावी म्हणून आणि डोके शाबूत राहावे म्हणून त्याही परिस्थितीत मी शिकवणी केली नाही किंवा कोणाकडे तास दोन तासांचे कामही पत्करले नाही. चोरबंड्यांचे घराणे म्हणजे एके काळचे या भागातील नावाजलेले श्रीमंत घराणे. नाव मोठे, निदान दर्शन खोटे होऊ नये, इतपत शिकवण मला इनाम-

दारांच्या त्या वाक्याने मिळून चुकली होती. असाच दुसरा प्रसंग मागे माझ्यावर वेतला होता. माझ्या एका श्रीमंत आतांकडे दिवाळीला मी गेलो होतो. कापडखरेदी करायला ते, त्यांचा मुलगा व मी दुकानात गेलो. त्यांनी मुलासाठी त्या काळात पाच रुपये वाराचे कोटासाठी कापड घेतले. माझ्यावद्दलही त्यांना जिव्हाळा होता. माझ्या-साठीही त्यांनी तेरा आणे वाराचे कापड घेतले. मला वाटते, १९२० ते १९३६ पर्यंत सतत दारिद्र्याशी झगडताना त्या दिवशी माझ्या डोळ्यांत आसवे आली. एरवी गरिबी मी विनाउत्तर सहन केली असे माझ्या वडिलांनीच उत्तर आयुष्यात मला प्रशस्तिपत्र दिले होते. हा कोटाचा प्रसंग मला गरिबीतले सगळेच शिकवून गेला. त्यानंतर मी कोट वापरलाही नाही. ' अम्मा ', ' सव्वापाच आणे ', ' मिठाचे थेंब ', ' भाकरीची गोष्ट ', ' त्या आणि त्यांची दुःखे ' या गोष्टींमध्ये जी गरिबांची चित्रे मी रेखाटली ती एक प्रकारच्या आंतरिक तळमळीने, पतिशोधाच्या भावनेने !

' मुलांच्या मासिका ' त माझी कथा प्रसिद्ध झाल्यानंतर माझे वाचन खूपच वाढले. कॉलेजात माझे मित्र, रसिक आणि माझ्यापेक्षा अनेक पटींनी बहुश्रुत होते. श्री. गो. रा. दोडके, श्री. मा. नी. गलगलीकर यांची वाचनाची आणि रसिकतेची शक्ती जबरच. त्यांच्या सहवासात मीसुद्धा मराठीतले कथा, कविता, निबंध, इंग्रजीतले मिळेल तेवढे ललित साहित्य वाचले. मला ते पचलेही. वाचीत असताना मला त्यातून काय घेता येईल, असा एक स्वार्थी विचार सतत माझ्या मनात जागा असे. त्यामुळे मला ग्रंथातील दोष दिसत नसत.

३ एप्रिल १९३३ ला मी ' काचेची किमया ' ही गोष्ट लिहिली. ती त्या वेळी ' प्रतिभा ' पाक्षिकात प्रसिद्ध झाली. ' प्रतिभे ' चा त्या वेळचा दरारा असामान्य होता. तिच्यात प्रसिद्धी मिळताच मी एका रात्रीत चांगला लेखक झालो. या गोष्टीचे मी दिलेले शीर्षक ' मिळालेली बहीण ' असे होते. ' प्रतिभे ' ला गोष्ट पाठविली. त्याच्या तिसऱ्या दिवशी मला श्री. के. नारायण काळे यांचे पत्र आले. ते ' प्रतिभे ' चे संपादक होते. गोष्ट त्यांना आवडली होती. शीर्षक त्यांना पसंत नव्हते. शीर्षक बदलविण्याची आणि त्या अनुषंगाने चार-दोन वाक्यांत फेरफार करण्याची त्यांनी परवानगी मागितली. माझा आनंद गगनात मावेना. ' प्रतिभे 'त आपले नाव, म्हणजे काय, आहे काय !

१६-१२-१९३३ ला मी ' आणभाक ' गोष्ट लिहिली. १०-४-१९३४ ला ' रात्रिरेवं व्यरंसीत् ', २९-४-१९३४ ला ' विहीर ' आणि ३०-४-१९३५ ला ' मातीची भांडी ' या गोष्टी मी लिहिल्या. त्या प्रसिद्ध होताच मी कथालेखक झालो. कौतुकाची, अभिनंदनाची पत्रे कोल्हापूर, गोवा, लाहोर, बनारस इथून येऊ लागली आणि ' आणभाक ' लिहिल्याबरोबर मला एक मित्र मिळाला. त्याचे नाव पु. भा. ऊर्फ बाळ भावे. आज भावे आघाडीचा लेखक आहे. १९३४ ते ३७ च्या दरम्यान माझ्या-

वर बाळाने जेवढा स्नेह केला तेवढा कुणावर केला असेल असे मला वाटत नाही. त्या तीन वर्षांच्या अवधीत जास्तीत जास्त वेळ मी बाळच्या संगतीत घालविला. रात्र रात्र भटकणे, जाऊ नये तिथे जाणे, पाहू नये ते पाहणे—सगळे बाळच्या संगतीत! त्याचे त्या वेळीही सगळे काम अफाट, वेछूट असे! पण तो माझा रक्षक, आप्त, बंधू, सखा—सगळेच होता. तो सिगरेट पीत असे, चहा पीत असे. पण मी सुपारी खाल्लेलीही त्याला सहन व्हायची नाही. माझ्याशी कोणी कठोर वागला तर बाळ त्याला सरळ चापून काढायचा. त्याने त्या वेळीं मला एक चित्र बक्षीस दिले होते. त्याच्या मागे लिहिले होते, 'An angelic girl for an angelic boy' माझ्या खोलीत आल्याबरोबर त्या मित्राकडे पाहून पहिल्या प्रथम तो म्हणायचा, 'Come to life, Betty Low' आणि मग माझ्याकडे त्याच्या तीन सिगरेट्स ओढून होईपर्यंत नुसताच बघत बसायचा. रात्री नऊपासून पहाटे चारपर्यंत आठ-दहा मैलांची नागपूरच्या आसमंतातील झाडी-जंगलातून रपेट मारून आल्यानंतर स्टेशनवर येऊन तो लेकाचा दोन कप चहा ढोशीत असे. पण मला मात्र तिथले पाणीदार दूध घशात ओतावे लागे. पुढे तुरुंगातून सुटल्यानंतर मी सिगरेट पिऊ लागलो. माझ्या तोंडात सिगरेट पाहताच त्याला मनापासून वाईट वाटले. बाळच्या संगतीत मला जनाचे आणि मनाचे एक वेगळेच दर्शन झाले. आज व्यवसाय, भिन्न भिन्न क्षेत्रे यांमुळे आमच्या गाठीभेटी होत नाहीत, पण ते दिवस या सगळ्या दुराव्यावर मात करून देतात!

'काचेच्या किमये' नंतर माझी ओळख 'महाराष्ट्रा' चे सुविख्यात श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याशी झाली. त्यांनीही मजवर अकारण लोभ केला. थोरा-मोठ्यांच्या ओळखी करून दिल्या. श्री. खांडेकर, कवी यशवंत यांच्या मी जवळ आलो तो भाऊसाहेबांमुळेच. रोज त्यांच्याबरोबर सायंकाळी दोन अडीच तास फिरायला जात असे. शनिवारी रात्री 'महाराष्ट्रा' चा रविवारचा अंक निघाला की मग आम्ही फिरायला जात असू. त्यांच्या गप्पागोष्टींतून मी पुष्कळ शिकलो. १९३३ ते १९३६ च्या दरम्यान भाऊसाहेबांची प्रसिद्ध झालेली सगळी पुस्तके त्यांनी मला अत्यंत जिव्हाळ्याने चार वाक्ये लिहून भेट दिली. लेखकासाठी जी बाह्य परिस्थिती अनुकूल असावी लागते ती नागपूरपुरती माडखोलकरांनी दिली आणि जे कौतुक व्हावे लागते ते बाळ भावे यांनी केले.

हंस जसा तरंगाचा झोका मिळताच सरोवरातील एका कमळापासून दुसऱ्या कमळा-कडे जातो, तसेच माझे त्या अवधीत झाले. 'प्रतिभे'चे संपादक—श्री. के. नारायण काळे, 'जोत्स्ने'चे श्री. वि. स. खांडेकर आणि श्री. वा. रा. ढवळे, 'पारिजात'चे श्री. रघुवीर सामंत, 'कले'चे श्री. बाबूराव आगाशीकर, 'संजीवनी'चे श्री. प्र. श्री. कोल्हटकर यांनी माझे इतके कौतुक केले, की, मी लेखक झालो नसतो तर 'नालायक' या विशेषणाशिवाय दुसरे विशेषण मला स्वतःला लावताच आले नसते.

'प्रतिभा' ह. वि. मोट्यांनी पुढे आपल्याकडे घेतली. मोट्यांचा उल्लेख मी सगळ्यांत शेवटी करतो. कारण त्यांचे ऋण अमर्याद आहे. 'प्रतिभे'चा लेखक म्हणून, त्यांनी मला आपला म्हणून मानले ते कायमचे. त्यांच्यात रसिकता, दिलदारपणा आणि आपले मानले की काय हवे ते करण्याची तयारी होती. हा माणूस वेगळा. याचे 'दिल' काही वेगळेच! १९३४ मध्ये मी प्रथम मुंबईला गेलो. माझे मावस बंधू श्री. गोपाळ दिनकर पिंपळकर (आता सिव्हिल सर्जन) हे त्या वेळी परळच्या मेडिकल कॉलेजात शिकत होते. मेडिकल कॉलेजचा विद्यार्थी, पण मराठी वाङ्मयाची अतिशय ओढ आणि आस्था. त्याने मुंबई दाखविली, राणीचा बाग दाखविला आणि मोटेही दाखविले. मजेचा प्रसंग! दुपारी गिरगावात शिरलो. के. नारायण काळ्यांची चौकशी केली. एक गोरे लठ्ठ गृहस्थ बसले होते. ते म्हणाले, "काळे पुण्याला गेले आहेत."

माझा चेहरा उतरला. मोट्यांना मी ओळखीत नव्हतो. त्या गृहस्थांना मी विचारले, "आपण कोण?"

ते म्हणाले, "मी मोटे, तुम्ही?"

"माझं नाव चोरघडे."

"चोरघडे? शक्यच नाही."

"का?"

"चोरघड्यांना मी ओळखतो. ते 'प्रतिभे'चे लेखक—"

"अहो, तोच मी—वामन चोरघडे."

"माफ करा. 'आणभाक', 'काचेची किमया', 'विहीर' लिहिणारे चोरघडे म्हणजे कोणी तरी बडे गृहस्थ असावेत याबद्दल माझी इतकी खात्री होती की तुम्ही इतके लहान असाल हे मला अजून देखील खरे वाटत नाही."

तिथून मोट्यांची ओळख झाली. मोट्यांना प्रकाशक, निर्माता म्हणून मराठी जग ओळखते. पण त्यांच्यातला रसिक, चोखंदळ मोटे ज्यांना माहीत आहे त्यांना मोट्यांपासून दूर व्हावेसे कधीच वाटणार नाहीं. आम्ही किती तरी दिवस एकत्र राहिलो. मुंबईला त्यांच्याकडे मी उतरत असे. मरीन ड्राइव्हर समुद्राच्या लाटांकडे पाहत तीन तीन तास आम्ही बोलत बसू. एक दिवस मोटे खूपच बोलत राहिले—त्या वेळच्या सगळ्या लेखांबद्दल, त्यांच्या लेखनाबद्दल! शेवटी ते म्हणाले, "चोरघडे, लघुकथेच्या क्षेत्रात तरी ज्याच्याकडून अपेक्षा करावी असा लेखक, तुम्ही सोडून दुसरा कोणी मला आज दिसत नाही. तुमच्या लघुकथांचा पहिला संग्रह मी काढतो."

या त्यांच्या वाक्याहून त्या वेळी तरी माझ्या लेखकाच्या जीवनात दुसरे श्रेय व प्रेय काही नव्हते. माझा पहिला कथासंग्रह 'सुषमा' २०-४-१९३६ ला मोट्यांनी

मोठ्या हौसेने प्रसिद्ध केला. उत्कृष्ट छपाई, उत्कृष्ट कागद आणि त्या वेळच्या मानाने उत्कृष्ट बहिरंग घेऊन 'सुषमा' मिरवली. 'प्रतिभे'च्या कव्हर पेपरवर अर्पण-पत्रिकेच्या ब्लॉकसहित मोठी जाहिरात वर्षभर 'प्रतिमे'त येत राहिली.

'सुषमा' प्रकाशित झाल्यावर माझ्या कथांचे मूल्यमापन होऊ लागले. 'जोत्स्ने'च्या निमित्ताने श्री. प्रभाकर पाध्ये यांची ओळख झाली. त्यांच्या निमित्ताने एक अतिशय जिव्हाळ्याचा स्नेही मला लाभला. 'ज्योत्स्ना', 'पारिजात' नंतर 'सत्यकथा' श्री. पु. आणि वि. पु. यांनी नावारूपाला आणली आणि 'प्रतिभे' सारखाच लेखकवर्ग तयार करण्याचा प्रयत्न केला. वरील तीन मासिकांनंतर मजवर सत्यकथेचेच ऋण आहे हे मी आनंदाने व अभिमानाने मान्य करतो.

पुढे खांडेकरांनी माझे जे कौतुक केले तसेच कथालेखक म्हणून मी पावले टाकीत होतो तेव्हा भावे, के. नारायण काळे, मोटे आणि पाध्ये यांनी मला उचलून घेतले. खांडेकरांनी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात देखील माझा योग्यतेपेक्षा अधिक उल्लेख केला. कोणाची कोणती अभावित कृती कुणावर कसा सखोल परिणाम करून जाते याचे ठळक उदाहरण म्हणजे मला लाभलेले या मंडळींचे पाठबळ!

माझ्या त्या संस्कारक्षम अवस्थेत माझ्यापुढे जे आदर्श होते आणि ज्यांच्यामुळे माझ्याकडून कोणतेही अनुचित कृत्य घडले नाही त्याचा उल्लेख करून टाकतो.

पहिले वंदन माझ्या आईवडिलांना. वडिलांना मी स्थितप्रज्ञच समजत असे. आईने मला लोकसाहित्याचा लळा लावला. या दोन दैवतांव्यतिरिक्त माझे पूजाविषय म्हणजे माझे मामा कै. त्र्यंबक धुंडिराज धर्माधिकारी; आणि माझे मामेबंधू आचार्य शंकर त्र्यंबक ऊर्फ दादा धर्माधिकारी. चारित्र्य, दानत, सत्य व शुभ यांवरील निष्ठा यांची सगुण उपासना मी यांनाच वंदन करून केली. माझे प्रेमविषय म्हणजे माझा मामेभाऊ गंपू धर्माधिकारी आणि माझी मधली बहीण ताई. यांच्याइतका लळा मला माझ्या आई-बद्दलही नव्हता. माझे बंधू, माझ्या बहिणी---आमच्या कुटुंबात दारिद्र्य होते, पण तितकाच गोडवा होता. ज्या सुखाने आम्ही गरिबी भोगली. पौराणिक काळात जर आम्ही जन्माला आलो असतो तर गोपाळांच्या काल्याच्या वेळी देवांनी जशी त्यांच्यावर फुले उधळली तशीच फुले आम्ही कोंड्याचा मांडा करून खात होतो तेव्हा उधळली गेली असती.

१९३२ मध्ये माझी पहिली गोष्ट प्रसिद्ध झाली. २० एप्रिल १९३६ मध्ये माझे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले आणि २० जून १९३६ ला माझे लग्न झाले. माझा हा प्रेमविवाह त्या वेळी तरी आमच्याकडे पुष्कळच गाजला. कॉलेजच्या बाहेर दवाखान्याच्या रूक्ष वातावरणातील एका डॉक्टर मुलीशी मी केव्हा सूत जमविले याबद्दल माझे मित्र, नातेवाईक यांना फारच नवल वाटले. पण मी जे प्रेम केले ते रेंगाळत

ठेवले नाही. तीन महिन्यांच्या अवधीत परिचय, प्रेम आणि लग्न—तिन्ही उरकली. आरंभापासून अखेरपर्यंत बाळ भावे सोडला तर कोणाला थांगपत्ताही नव्हता.

जिच्याशी मी लग्न केले ती टोपणनावाने लेख लिहीत असे. 'संजीवनी' च्या किती तरी अंकांत तिचे लेख, कथा, कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. गीता सानेची ती मैत्रीण आणि कृष्णाताई मोट्यांची ती शिष्या! लग्न झाल्यानंतर तिचे बिचारीचे लेखन बंद झाले. तिच्या गोष्टींचा एक कथासंग्रह 'सुखदुःखे' म्हणून महाराष्ट्र ग्रंथभांडाराचे श्री. शं. वा. कुलकर्णी यांनी छापायला घेतला होता. तो पुढे निघाला नाही. परवा 'झाकलं माणिक' या शीर्षकाखाली तिचे नाव असलेले एक पुस्तक मला बुक-डेपोत दिसले. पण प्रकाशक कोण, याचा पत्ता लागला नाही. लग्नामुळे माझी दुनिया बदलली, पण तिच्या लेखनकलेला नख लागले. "आता मी गोष्टी प्रसिद्ध केल्या तर तुम्ही तुमच्या टाकाऊ गोष्टी माझ्या नावाने प्रसिद्ध करता असे लोक म्हणतील, त्यापेक्षा मी न लिहिलेले बरे!" असे म्हणून तिने लेखन बंद केले. 'शंकितेचे प्रेम,' 'ही पाहा पालवी गळाली' या तिच्या गोष्टी तिच्या चोरून मी मासिकांना पाठविल्या. त्या प्रसिद्ध झाल्या. तेही तिला फारसे आवडले नाही. तिचा उल्लेख माझ्या लेखनाच्या अनुषंगाने करण्याचे मुख्य कारण असे की, ती डॉक्टर असल्यामुळे लग्न झाल्यावरोवर तिच्या साहाय्याने मी हॅवलॉक एलिस, इव्हन व्लॉच यांचे 'सेक्स सायकॉलॉजी' वरील सारे ग्रंथ समजावून घेऊन अभ्यासिले आणि वाचनामध्ये जी उणीव होती ती पूर्ण केली. कनिंगहॅमचे 'हिस्टरी ऑफ सिख्स,' गिबनचे 'डिक्लाइन् अँड फॉल ऑफ रोमन एम्पायर' हे याच अवधीत माझे वाचून झाले. आपल्यामुळे आपल्या पत्नीचे लेखन थांबले या जाणीवेने मी अधिक लिहू लागलो.

'सुषमे' नंतर 'हवन' ते 'नागवेल' पर्यंत माझे आठ कथासंग्रह प्रसिद्ध झाले. 'प्रस्थान,' 'पाथेय,' 'प्रदीप' यांच्यावर सन्मान, बक्षिसेही मला मिळाली. पण १९३२ ते ३६ पर्यंतचा माझ्या मनाचा घडणीचा काळ—त्या काळातील सुखःदुखे, माती आकारास येताना होत असलेल्या यातना आणि आनंद यांचे जेव्हा स्मरण होते तेव्हा विलक्षण असा एक प्रसन्न जागा होतो. या काळात मी जे पाहिले, अनुभवले त्याच्या चिरंतन खुणा माझ्या पुढील साहित्यावर उमटलेल्या आहेत. याच काळात मी 'सखी' च्या निकट सान्निध्यात आलो आणि 'सती' ही मला त्याच वेळी भेटली.

कथेच्या क्षेत्रात मी नवा पायंडा पाडला, नवकथा माझ्यापासून सुरू झाली असे एक नव्हे, अनेक लोक म्हणतात. जे म्हणतात त्यांचे भले होवो! त्यांच्याबद्दल मी कृतज्ञ आहे. पण मला त्याची त्या वेळीही जाणीव नव्हती आणि आजही नाही. यात मी स्वतःची स्तुती करीत नाही; ईश्वरसाक्ष वस्तुकथनच करीत आहे.

स्नेहाचे आलवाल, दारिद्र्याचे उन्ह आणि कौतुकाचे जल मिळून माझा लेखनाचा अंकुर वाढला, बहरला आणि फुलाफळाला आला. त्याची वाढ खुंटेल अशी कोणी

त्यावर सावलीही धरली नाही, आणि त्याला कीड लागेल असाही कोणी प्रयत्न केला नाही. आजच्या विज्ञानयुगात याच जन्मावर कुणाचा विश्वास राहिला नाही तर पुनर्जन्म मानायला तयार कोण होईल ? पण लेखनक्षेत्रात मी माझी पावले टाकीत असताना मला रडता पडता उचलून कडेवर घेणारी मंडळी लाभली हे मी माझे पूर्व-सुकृत समजतो. एरवी असे भाग्य लाभायला या जन्मी मी काहीच केले नव्हते—खरेच नाही—अगदी शपथ !

१–१०–६०

४

" त्या तिथे तरुतळी "

इ. स. १६ जुलै १९३२ ! त्या दिवशी वार कोणता होता हे आता आठवत नाही. पटवर्धन हायस्कूलमधून मॅट्रिक पास झालो होतो. पुढे शिकण्याची ऐपत नव्हती, इच्छाही नव्हती. कारण इतकेच की, मराठीचे डिस्टिङ्क्शन तीन मार्कांनी आणि संस्कृतचे दीड मार्काने हुकले होते. पुढे शिकून तरी काय दिवे लावणार ?

नोकरी करायची, पण तिकडेही मन ओढ घेईना. " तुम्ही गरीब, तुम्हांला पुढे शिकण्याची इच्छाच कशी होऊ शकते ! " असे वडीलधारी पितृवत माणसे म्हणत होती ! त्यांनी तसे म्हटले नसते तर मी पुढे शिकलोही नसतो. आम्हांला आकांक्षा असू नये काय ? मग शिकूच आम्ही ! या जिद्दीनेच मी कॉलेजच्या पहिल्या प्रवेश-दिवशी पटवर्धन हायस्कूलच्या भिंतीवरून मॉरिस कॉलेजच्या कांपाउंडमध्ये उडी टाकली !

तो दिवस म्हणजे १६ जुलै १९३२ ! त्याच दिवशी माझा वाढदिवस होता. वयाची अठरा वर्षे पूर्ण झाली होती ! ते वय आणि तो काळ माझ्या आयुष्यात तरी खरोखर मोठा आणीबाणीचा होता. आजवर जे शिकलो ते पक्के होत होते; जे बीज रुजले त्याला कोंब फुटत होते; आशा-आकांक्षा पुढे झेपावत होत्या; परिस्थिती त्यांना मागे खेचत होती; गरिबीचा संकोच होता ! कॉलेजात प्रवेश केल्याबद्दल कुणी तरी आपल्याला दोष देत आहे असेच सारखे वाटत होते ! ' न द्यावा जिथे पाय तेथे दिला '; असला संभ्रम निर्माण झाला होता. गरीब मी, खेडवळ मी !

पण तो संभ्रम लवकरच नाहीसा झाला--अगदी दोन-तीन महिन्यांतच ! कारण जे कॉलेजियन मला भेटले त्यांच्या तुळी माझ्यात काहीच कमी नव्हते. मन माझे सुदृढ होते; शरीर तर आजूबाजूला तुलनेला गवसू नये असे होते. ही मुले जर शिकू धजतात तर आपण का नाही ? उलट खेड्यात जन्मलो, शहरात राहिलो--दोन्हीकडची संपदा आपल्याजवळ आहे असा भरवसा जागला. मी निःसंकोच झालो !

जीवन आकाराला येण्याचा तो काळ ! त्या चार वर्षांत व्हायचे ते सगळे संस्कार मजवर होऊन गेले. मुले पाहिली, मुली बघितल्या; अध्यापक पाहिले, त्यांचा धाकदरारा अनुभवून घेतला. मनाचे मनोरे गगनाला कुरवाळतील असे उभविले ! आंबट-गोड, कडू-तिखट, खारट-तुरट सगळ्याची चव घेतली. " दिसले सुस्वप्न देवी, मज दिव्य उषाकाळी " च्या लकेरी ओठावर आळवित्या आणि ' परि मम

भाळी दग अश्रूचा हारा डवरलाहे ' असे हुंदकेही दिले ! " Nothing here for pride and show. The root is high, the house is low " ही खंत राहिली आणि " I have no parting sigh to give, so take my parting smile ;" असे उद्‌गार काढून निरोपही दिले, एवढेच नव्हे तर पाण्यापर्यंत पोचवून परतही आलो.

—आणि हे सगळे या मॉरिसच्या छोट्या, टुमदार, घरासारख्या वाटणाऱ्या इमारतीत ! हवे ते, हवे तेवढे वाचावे; जे अध्यापक चांगले शिकवितील त्यांच्या तासाला हजर राहावे, इतरांना बुट्टी देऊन झाडाखाली येऊन बसावे !

मॉरिसच्या कांपाउंडातील ती झाडे ! माझ्या अगोदरच्या कित्येक पिढ्यांवर त्यांनी सावली धरली होती; माझ्यासारख्या कित्येकांनी आपली सुखदुःखे त्यांना सांगितली होती. त्या वृक्षांखाली मी दिनप्रतिदिन तासन्‌तास घालविले. माझ्या अगोदर कित्येकांनी घालविले असतील आणि माझ्यानंतरही कित्येकांच्या आठवणी त्या झाडांच्या डहाळ्या डहाळ्यांतून सळसळत असतील. त्या झाडांखाली बसल्यावर एक विलक्षण अनुभूती प्रत्ययास येत असे. आज मी बसलो, काल कोण बसले असेल ? उद्या कोण बसणार ? कुणास ठाऊक !

प्रिन्सिपलच्या ऑफिससमोर छोटी, सुंदर बाग होती. ऑफिसच्या मागे मुलींची कॉमन-रूम होती. मुलींचा घोळका बागेत हिंडायचा. कधी त्यांच्याकडे तर कधी बागेत तर कधी क्षितिजाकडे पाहत झाडाखाली बसून राहायचे ! तासाची घंटा होई; मुले जमत, जुने उठून जात, नवे येऊन बसत !

माझ्या वेळेला आपापल्या विषयात नावाजलेले अध्यापक मॉरिसमध्ये होते. संस्कृतसाठी गु. मिराशी, चतुर्वेदी; अर्थशास्त्राला गु. सेनगुप्त, दादाचानजी, नानावटी; इंग्रजीला गु. सुंदरलाल, कुसुमावती देशपांडे, चोरडिया, मदनगोपाल, गुह; तत्त्वज्ञानाला गु. फाटक, देशमुख; मराठीला गु. बनहट्टी ! काहींचे शिकविणे आवडत असे, काहींचे आवडत नसे. इंग्रजीचे एक अध्यापक शिकवीत मोठ्या आवेशाने पण मला काही समजत नसे. समजायच्या त्या त्यांच्या बोलण्यातल्या चुका ! कित्येक दिवस त्याच टिपल्या. एक दिवस त्यांनी निबंध लिहून आणायला सांगितला. The Epic of Ramayan ! हायस्कुलात इंग्रजीची खूपच अभिरुची वाढली होती. निबंधचे निबंध, धडेचे धडे, शेकडो कविता पाठ होत्या. पहिला वहिला म्हणून कसून मेहनत करून निबंध लिहिला. अध्यापकांनी वही मागून टेबलाजवळ बोलाविले. वही उघडताच त्यांना त्यांच्या टिपलेल्या चुका दिसल्या, शीर्षक दिसले At least avoid this ! झाले ! निबंध जिथल्या तिथेच राहिला. एखादी सुरी पकडावी अशी पेन्सिल मुठीत आवळून त्यांनी बोळा फिरवावा तशी फिरविली व वही फेकून दिली ! त्यानंतर एक जोरकस व्याख्यान दिले ! त्या व्याख्यानातल्या शिव्या नवीन म्हणून आणि चुका जुन्या म्हणून

मी टिपून घेतल्या ! दुसरे वेळी क्रिकेट मॅचवर निबंध दिला. लिहून नेला तेव्हा तीच गत ! बैल लाल चिंधीला बुझतो तसे ते माझी वही पाहून चिडत. तिसऱ्यांदा निबंध दिला. मी पहिल्या निबंधातला मजकूर लिहून वर, दिलेल्या निबंधाचे शीर्षक My ambition असे दिले. वर्षभर असे चालले ! मजकूर तोच, शीर्षक बदललेले ! वही फेकली जाईल त्या दिवसाला तो विषय झाडाखाली जमल्यावर पुरत असे !

मराठीला गु. श्री. ना. बनहट्टी होते. मराठीचा तास सगळ्यात शेवटी ! इतक्या वेळ बसून कोण राहणार म्हणून मी तो विषयच घेतला नाही. वास्तविक मी घ्यायला हवा होता. मला विषय सोपा वाटत होता. लिहूही लागलो होतो पण त्या एका अडचणीमुळे मी मराठीच्या पद्धतशीर अभ्यासाला आचवलो.

संस्कृतला रघुवंशाचे तीन सर्ग नेमले होते. कालिदासाची ती अद्‌भुत काव्यशक्ती, ती सुललित शब्दशोभा, निर्दोष वृत्तरचना आणि विषय कोणता तर प्रभू राम अयोध्येला परतताना सीतामाईला विमानातून स्मृतिस्थळे दाखवितात तो ! पण—! पण हे शिकविणे अशा काही बोजड, रूक्ष आवेशात व्हायचे की माझी संस्कृतची आवड करपून गेली ! " विभाति गंगा यमुना तरंगै : " असो किंवा " ऐंद्रि किल नखस्तस्मिन् " असो, अवाज तोच, ना चढ ना उतार, कठोर, कोमल काही नाही— पाटीवर खिळा घासल्यागत वाटायचे ! मी संस्कृतच्या तासाला जाणे सोडून दिले !

याच वेळी म्हणजे १९३३ मध्ये माझ्या लघुकथा 'प्रतिभे' त छापून येऊ लागल्या. त्यांचा बोलबाला दुसऱ्या कथेनंतरच होऊ लागला. त्या वेळी साहित्यवाचनाची अभिरुची होती. तिसरी कथा प्रकाशित झाली— " मानव्याच्या दिशा ! " संस्कृतच्या तासाला गु. मिराशींनी हजेरी घेतली. माझे नाव येताच ते थांबले; मला इंग्रजीत म्हणाले— " 'प्रतिभे'त आलेली गोष्ट तुम्हीच लिहिली काय ? " मी गोरामोरा झालो. भीती वाटली की आता आपली धडगत नाही. सगळ्यांदेखत इथेही आता भलेबुरे ऐकावे लागणार ! समोर मुलीही बसल्या होत्या. मी गप्प उभा राहिलो. मागून आवाज आला— " होय सर ! त्यानंच लिहिली आहे. " तसे मिराशी हसले आणि म्हणाले— " You must maintain the same excellence in Sanskrit also ! " या त्यांच्या एका वाक्याने माझा करप पार नाहीसा झाला आणि कितीतरी संस्कृत मी त्या क्षण दोन क्षणांत शिकून घेतले ! संस्कृतात मी लिहिलेले निबंध सोपे, सुटसुटीत म्हणून त्यांना आवडत. ते कौतुकही करीत पण काय असेल ते असो मी संस्कृतच्या तासांना फार कमी हजर राहिलो. अर्थशास्त्राचे तर अवघ्या वर्षात मी तेराच तास रुजू केले !

वर्गात कमी हजर असणारा मी, वर्गाबाहेर करीत तरी काय होतो ? वाचन ? फारसे नाही. उनाडक्या ? छे ! हॉटेल ? मुळीच नाही. मग ?

वेद हे अपौरुषेय आहेत असे म्हणतात. स्मृती म्हणजे पूर्वसुरींचे ज्ञान. श्रुती म्हणजे ऐकलेले स्फुरलेले ज्ञान ! झाडाखालच्या त्या व्यासपीठावर श्रोता म्हणून येऊन

बसायचे. कानी पडेल ते ऐकायचे, डोळा दिसेल ते पाहायचे, सुचेल ते बोलायचे ! वाङ्मयभक्त आले की साहित्यचर्चा कानी पडे; विद्यार्थी संघाची मंडळी आली की निवडणुकीचे राजकारण पिंजले जाई ! रंगेल सोयरे आले की लग्नमाऱ्या आखाड्यापासून तो गामा झिस्कोच्या लांब रुंद बातांचा फड जमे; रंगेल छटेल आले की मुलींच्या गोष्टी निघत—कोण कशी आहे, कशी बोलते, कशी वागते ! अर्जुनाने स्थितप्रज्ञाबद्दल विचारले तेवढ्याच जिज्ञासेने कशी बोले, कशी वागे, कशी फिरे म्हणून प्रश्नोत्तरे व्हायची !

त्यावेळी मॉरिसमध्ये मुलींची संख्या एका श्वासात मोजता येत असे. पाहिल्या वर्षापासून तो एम्. ए. पर्यंतच्या अवघ्या सत्तर पंचाहत्तर मुली. कॉलेजात येणे म्हणजे ऐपतीचे काम, अकलेचे काम ! त्यांपैकी काहींजवळ एक किंवा दोन्ही अनुकूलता होत्या. मुलींचे दिसणे–पण ते दिसणेच म्हणजे सबकुछ इतके मन अधीर किंवा गहाण ठेवले नव्हते. जगात सगळे किंवा सगळ्या रूप घेऊन येत नाहीत एवढे कळत होते. आणि मला वाटते त्या वेळच्या मुली सुखवस्तू घराण्यांतल्या, सुखाची साय चेहऱ्यावर तरळत असलेल्या व आपण मुली आहोत, आपला विशेष काही धर्म आहे असे मानणाऱ्या होत्या ! त्यामुळे आजचे ते "हायरे, अगोबाई !" फारसे नव्हते. तुमच्या जगात तुम्ही राहा, तुम्हांला ती बाग दिली आहे; आमच्या जगात आम्ही राहतो या इथे तरुतळी–श्रुतिस्मृतींना उजळा देत ! असा एक अलिखित तह झाला होता. नाकीडोळी नीटस असलेल्या मुलींची संख्या अधिक होती, किंवा आम्ही त्यांनाच मुली मानत होतो. त्यांच्याबद्दल गप्पा थापा मारणारे पुष्कळ होते, त्यांच्याशी बोलण्याची इच्छा बाळगणारेही काही कमी नव्हते, पण प्रत्यक्ष बोलू धजणारे मात्र कंपाउंडमधील झाडांसारखेच तुरळक ! म्हणून मला वाटते कुतूहल अधिक, आकर्षण फार आणि स्वप्नसृष्टी जागलेली !

तासाची घंटा झाली, वर्ग भरला म्हणजे अध्यापकांबरोबर मुली वर्गात येत. त्यांच्या येण्याने वर्ग शांत होऊन सावर धरी. तास संपला की मुली निमूट बाहेर जात. अन् मुलेही दुसऱ्या दारातून बाहेर पडत. हसणे, खिदळणे, साद–पडसाद जे काय व्हायचे ते सर्व मिळून, सर्व साक्षीने ! आडपल्याड असे काही नव्हते. अधिक खोल जाण्याची इच्छा नसल्यामुळे मला त्यापैकी काही कळलेही नसेल हे शक्य आहे पण माझ्या सारख्यांचीच संख्या जास्त होती.

चार वर्षे मी मॉरिसमध्ये शिकलो. या अवधीत घडलेला एक प्रसंग ! परीन भरुचा व चमनलाल धावन या दोघांनी तेलंखेडीमध्ये परपस्परांना चिरआलिंगन देत एकमेकांना एकमेकांशी बांधून घेऊन आत्महत्या केली. ते कळले तेव्हाच कित्येकांना हेही कळले की त्या उभयतांचे प्रेम होते आणि ते सफल होण्याची आशा नव्हती. वीस-बावीसची

ती स्वप्नाळू बालके ! त्या उभयतांचा मृत्यू डोळ्यांनी पाहिला. काय वाटले ते त्या वेळीही कळले नाही आणि आताही कळत नाही ! काहीतरी भव्य, दिव्य, अतीव करुण असे घडले होते. मन वरच्या थरावर चढून आक्रंदन करीत होते. हे सगळे आठवले म्हणजे अजून ती दोन्ये डोळ्यांसमोर दिसतात. असे वाटते, कालपर्यंत ती दोन्ये सगळ्यांशी बोलत होती, सगळ्यांत मिसळत होती आणि आज मात्र ते चेहरे हसत नाहीत, ते ओठ बोलत नाहीत; चैतन्य स्थिरावले, पाखरांची फडफड बंद झाली ! फांद्याफांद्यावरची चिवचिव थांबली तो किनाराही नाही, ते वादळही नाही; ते आक्रंदनही नाही ! निमाले, श्रम निमाले !

हे झाले ते काय झाले ? कसे झाले ? का झाले ? असे झाले असते तर ? आणि तसे झाले नसते तर ? हे असे होणे अटळच होते काय ? हे व्हावे असेच कुणाला तरी वाटत होते काय ? आणि होऊ नये म्हणून तरी कोणी प्रयत्न केला होता काय ? हे सगळे प्रश्न फणा काढलेल्या सापाप्रमाणे स्मृतीच्या डोळ्यांसमोर तरंगतात ! त्या वेळीही तरंगले ! आजही त्यांचा डोल डोलतच आहे ! असे का ? कुणास ठाऊक !

विलक्षण प्रसंग ! कधी घडला नाही असा, कधी घडणार नाही असा, कधी घडू नये असा ! इतिहासात हे असलेच काही नमूद होत असते काय ? कोणी कुणासाठी रडावे यासंबंधी काही नियम आहेत म्हणे ! कोणी कुणासाठी रडू नये यासंबंधीही शास्त्रात काही निषेध आहेत म्हणे ! पण त्या दिवसापुरती तरी आमची श्रुती आणि उक्ती खाऱ्या खाऱ्या, ऊन ऊन पाण्याने भिजून गेली होती. आज ते आटवते; डोळे ओले होतात अन् सुकूनही जातात ! सुकू नका असे आर्जवाने सांगितले तरी सुकतात– हातावर ओतलेले स्पिरिट जसे सुकते तसे ! आजवर मिळविलेल्या अनुभवांचा तो शहाणपणा आहे की मूर्खपणा–कुणास ठाऊक ?

चार वर्षे दैनंदिन कार्यक्रम चालू होते. आमच्यावर सावली धरणारे ते झाड त्या अवधीत चार वेळा निष्पर्ण झाले ! पान पान गळून पडले त्याचे ! त्या पानांची वावडी करीत मोजून चार वेळ वारा काटपतंग खेळला ! चार वेळ ते झाड नव्या पालवीने बहरून आले, नव्या फुलोऱ्याने नटले, नव्या फळांनी रसरसले ! पाखरांची चंगळ झाली ! एका वर्गातून दुसऱ्यात, तिसऱ्यात, तिथून चौथ्यात अशा क्रमाने आमचीही प्रगती झाली. अध्यापक शिकवीत होते, आम्ही शिकत होतो. ढग भरून येत अन् आमच्या मनातले मोर पिसारा पसरून नाचू लागत ! वसंत आला आणि मन फुलवून गेला ! ग्रीष्म आला, अश्रू सुकवून गेला ! वर्षा आली अन् कुठून कुठून भरून आणलेले रांजण ओतून गेली ! हेमंत आला आणि सोने वाटून गेला ! शरद येऊन त्याने मनाच्या कप्प्याकप्प्यातून चांदीचे चांदणे शिंपून दिले ! शिशिराच्या गारव्याने उबेची आस खूप लागली––" गगनवारा शिरता हृदयास फुलोरा आला !

रंग भरले निराळे, दुखवी सुखे वरचेवरी !" ऊन पाऊस, धूपछाव, अश्रूफुले यांचे चक्र फिरत गरगरत ती चार वर्षे निघून गेली !

या माझ्या कॉलेज जीवनात वाचन, मननाखेरीज कशाचीही आस बाळगणे शक्य नसल्यामुळे सार्वजनिक अशा कुठल्याच भानगडीत मी पडलो नाही. गरिबीचे कवच म्हणतात ते हे ! नाही म्हणायला मराठी साहित्याची सेवा करणारी मॉरिसची "शारदा मंडळ" ही संस्था–तिचा मी कार्यवाह म्हणून निवडून आलो ! या संस्थेचा दशवार्षिकोत्सव १९३५ मध्ये माझ्या अमदानीत साजरा झाला. "फुलोर" नावाचा प्रातिनिधिक संग्रह पै पै गोळा करून प्रकाशित केला. मायबोली मराठीची पूजा त्या-निमित्त घडली. उत्सवाची सांगता करायला प्रो. ना. सी. फडके आले. विद्यार्थीजीवन संपले तरी त्यांची मैत्री, स्नेह उत्तरोत्तर वाढला. एक हृदय, एक चित्त हे मॉरिसचे ध्येयवाक्य ! ते तिथल्या वातावरणात सामावले होते. वाऱ्याच्या सळसळीतून ते ऐकू येत होते; फुलांच्या उमलण्यातून ते प्रस्फुट होत होते; मैना साळुंक्यांच्या चिलबिलीतून ते आकार घेत होते. या मॉरिसच्या परिसरात जो कोणी पाऊल टाकील तो आपला वाटत होता. असे वाटायचे की हे कॉलेज नव्हे, ऐसपैस असे आपले घर आहे ! हे अध्यापक नव्हेत, ही वडीलधारी माणसे आहेत ! त्यांतली काही कडक, चिडखोर, उग्र असतील, असोत पण सगळी कशी माया–ममता घेऊन आलेली आणि त्यांच्या देकारात कार्पण्य न दाखवणारी ! घरात जसे निःसंकोच वाटते तसे तेथे वाटायचे. भांडणे होत पण तीही आपुलकीत भिजलेली ! दह्यासारखी थिजलेली !

असे काहीसे ते वातावरण ! ते काय शिकवून गेले, किती सांगून गेले यांचे मितिमाप काही नाही, पण इथेच मला मित्र लाभले, मैत्रिणी लाभल्या ! "काचेची किमया" मला दिसली ती इथेच ! "पिंजरा" जाणवला तो इथेच ! "कुसुमची पहिली गोष्ट" मी इथेच ऐकली ! "झोपेत लिहिलेली गोष्ट" माझ्या जागतेपणी मी इथेच शब्दित केली ! "मानव्याच्या दिशा" याच वातावरणात मी जोखल्या ! "कला-विकास" मी इथेच साधला ! जीवनाची "आणभाक" मी इथेच घेतली ! "अंतरंग" माझे मी इथेच उघड केले ! 'पोर' म्हणून जिच्याबद्दल मला फुललेली कणव जाणवली तिने मला इथेच थोरपण दिले ! "वास्तुदेवते"ची अश्रुदीक्षा इथेच तरळली ! "विहीर" म्हणून जवळ गेलो तो एक आगळे जीवन इथेच माझ्या प्रत्ययास आले ! "प्रत्येकाने सांगितलेली गोष्ट" मला त्या तरुतळीच्या व्यासपीठावरच ऐकायला मिळाली ! "मातीची भांडी" तडा गेल्याबरोबर निकामी होतात याचे जाणपण मी इथेच कमावले ! जिच्या डोळ्यांच्या खुणेने मी नेणपणाचे जाणपण केले ती आणि जिच्या कुवेरधनाच्या मोलाने उच्चारलेल्या मधुबोलांनी मी माझ्या सुखाचे रांजण भरून घेतले ती माझी जन्मजन्मांतरीची "सखी" इथे इथेच मला भेटली ! इथल्याच हिरवळीवर तिने पदन्यास केला ! इथल्याच बागेतली फुले वेचून तिने आपल्या वेणीत

माळली ! या बागेतल्या त्या छोट्या हौदावर हंसिनीसारखी बसलेली इथेच मी तिला बघितली ! आजही असे वाटते की, मी जर ती आस डोळ्यांत आणून पाहिले तर या घडीलाही तिच्या पावलांच्या खुणा उमटलेल्या मला दिसतील ! तिच्या पदकमलांनी धन्य झालेले मातीचे कण ती आज कोठे आहे याची वार्ता सांगतील !

जीवनाची " सुषमा " याच कालावधीत मला तेजोमय करून गेली आणि " हवन " केल्याशिवाय जीवनाला ओज येत नाही याचेही प्रत्यंतर मी इथेच घेतले !

चार भिंतींनी वेष्टिलेल्या अभ्यासकक्षांतून मी किती व कोणते ज्ञान घेतले कोण जाणे ! पण त्या भिंताडांच्या बाहेर परिसरामध्ये मला जे दिसले, जे भासले, जे प्रत्ययास आले त्याने मात्र माझ्या जीवनाला कलशाचा आकार दिला !

अजून देखील सहाध्यायांपैकी एखादा भेटतो तेव्हा हे चोवीस वर्षांचे अंतर वस्त्रासारखे बाजूला होते अन् त्याच्याशी हात मिळवताच विलक्षण, हवीहवीशी वाटणारी ऊब सुखावून जाते !

हे माझ्या वर्गबंधो ! मी आज तुला भेटलो, तसाच आपली कुणी आपला बंधू भेटला तर त्याला माझी ही विनवणी सांग की–

इथे भेटले सगे–सोयरे
इथे भेटली ' सखी '
इथेच झाले मम मन उन्मन
नीर क्षीर पारखी !

सगेसोयरे ! कोण सगेसोयरे ? सुखदुःखाचे सांगाती असतात तेच ना ? जेथे जातो तेथे ते भेटतात ! त्यांची भेट ! त्याहून सुखमय, त्याहून श्रेय–प्रेय. दुसरे आहे तरी काय ?

मॉरिस कॉलेज ऊर्फ नागपूर महाविद्यालय, नागपूर, या संस्थेच्या अमृत महोत्सव प्रसंगी निघणाऱ्या स्मृतिअंकात माजी विद्यार्थी या नात्याने केलेले आत्मनिवेदन

५–१२–६०

□ □ संपूर्ण चोरघडे □ □

□ मध्यांतर □

ऋणानुबंध

प्रिय वामनराव,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष

'संपूर्ण चोरघडे' प्रसिद्ध होत आहे. या निमित्ताने मी काही 'सदिच्छा व्यक्त कराव्यात' अशी तुम्ही विनंती केलीत. तुमची विनंती मला मानलीच पाहिजे. सन्मित्राची विनंती म्हणजे आज्ञाच की !

'संपूर्ण चोरघडे' म्हणजे वामन चोरघडे यांनी लिहिलेल्या साऱ्या कथा. वामनराव, लेखक म्हणून तुम्ही 'कथे'शी एकनिष्ठ अगदी एकनिष्ठ राहिलात. तुम्ही मराठी वाचकाला चांगल्या सकस कथा दिल्यात याचे काही श्रेय तुमच्या या एकनिष्ठेकडे जाते असे मला नेहमी वाटत आलेले आहे.

वामनराव, तुमच्या कथा-विश्वाचे वैचित्र्य मी पाहिलेले आहे. तुम्ही जे अवलोकिलेत, जे अनुभविलेत, जे तुमच्या अंतःकरणाला भिडले तेच तुम्ही लिहिलेले आहेत हे खरे असले तरी तुमच्या या अनुभवांच्या जोडीला जातिवंत कलाकाराची प्रतिभा आणि काव्यात्मता या नेहमीच साथ करीत आलेल्या आहेत.

लिहावे वाटले तेव्हाच आणि तितकेच तुम्ही लिहिलेत आणि शिवाय त्यातील जे तुम्हांला चांगले वाटले तेच तेवढे आम्हा वाचकांना दिलेत. यामुळे मागणीप्रमाणे पुरवठा तुम्हांला जमला नसला तरी वाचकांच्या मनातील तुमचे स्थान तुम्ही कायम टिकवून ठेविलेले आहे.

श्रद्धा, संस्कार, मानवता या गोष्टींचे ऋण तुम्ही मानता म्हणूनच तुमची कथा सर्वस्पर्शी झालेली आहे. वास्तवतेचे नसते थोतांड तुम्हांला मान्य नसल्यामुळे तुमची कथा निरोगी राहिली असून ती विकृत झाली नाही असे तुमच्या या वाचकाचे मत आहे.

१९३५ ते १९५५ (१९५३ अधिक बरोबर) हा काल तुम्ही गाजविलात. अंतर्मुख होऊन वाचकास विचार करावयास लावणारी नव्या शैलीची कथा तुम्ही या काळात आम्हांस दिलीत. छोटी छोटी वाक्ये, लयबद्ध आणि नादपूर्ण भाषा आणि सूचक शब्द यांनी तुमचे कथा निवेदन (होय ! तुमच्या लेखनाला मी निवेदनच म्हणतो.) अशा काही

समर्पक शैलीत चालते की, विस्मयाने विचारावेसे वाटते, वामनराव, कुठून जमवलेत हे सारे ?

वामनराव, तुमच्या साहित्याचे मूल्यमापन करण्याची ही जागा नव्हे, तो माझा अधिकारही नव्हे. पण तुमच्या कथेचा एक वाचक म्हणून जे वाटते ते लिहून गेलो. आणखी थोडेसे लिहून हे संपवितो. मधला काही काळ तुमची कथा तुमच्यावर रुसली होती. आता ती पुन्हा तुमच्या बरोबर नांदू लागली आहे. पुन्हा चांगल्या कथा तुम्ही लिहू लागला आहात हे मान्य करूनही असे म्हणावेसे वाटते की तुमच्यातील लेखकाला तुम्ही अधिक निवांतपणा द्यावयास हवा आहे, त्याला अधिक एकटा सोडावयास हवा आहे. एक मात्र खरे की, निवडक कथाकारांच्या खास दरबारात तुम्हांला स्थान आहे आणि तेही मानाचे आहे. ते दीर्घ काळ तसेच राहील.

तुमचा मीही एक प्रकाशक ! पण आपले संबंध केवळ लेखक–प्रकाशक इतकेच मर्यादित राहिलेले नाहीत, त्यात काही घरगुती स्नेहभाव निर्माण झाला आहे. त्याचे बरेचसे श्रेय तुमच्या स्नेहशील आपुलकीलाच आहे; हे मला येथे आवर्जून सांगितलेच पाहिजे. मित्राबद्दल तुम्हांला वाटणारी काळजी किती हळवी आहे याचा अनुभव मला आलेला आहे. याबद्दलचा अधिक तपशील मी येथे दिला तर तो तुम्हांला आवडणार नाही; पण सध्याचे राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्रीयुत बाळ यांची – या एकाच मित्राची – साक्ष याबाबत पुरी होईल.

व्यक्तिशः मला तुम्ही जसा तुमचा स्नेह दिला आहे तसे कॉन्टिनेन्टललाही तुम्ही आपले मानून तुमची 'चोरघडे यांची कथा' दिलेली आहे. आणखीही काही दिलेले आहे ! त्याचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून आता थांबतो.

असे काही लिहून झाले–बोलून झाले की, शेवटी परमेश्वराजवळ काही मागावे असा रिवाज आहे. पण तुमच्याविषयी त्याच्या दारी मी काही रदबदली करावी इतकी पुण्याई मजजवळ नाही आणि त्यानेही तुम्हांला काही कमी दिले – केलेले नाही. तुम्हीही संतुष्ट, तृप्त आहात. सबब तो उपचार रद्द.

पुणे
१५–८–६६

तुमचा स्नेहांकित
अ. अं. कुलकर्णी

श्री. प्राचार्य वामनराव चोरघडे
'राजीव' धरमपेठ विस्तार
नागपूर

कृ. सा. न. वि. वि.

आपल्या १९३२ ते १९६० ह्या काळातील कथांचा संग्रह छापण्यास प्रारंभ झाला असून महिना सव्वा महिन्यात पुस्तक प्रकाशित होईल हे वाचून आनंद झाला. त्याकरिता आपले मनःपूर्वक अभिनंदन. 'कोणत्याही प्रथितयश साहित्य समीक्षकांपेक्षा 'ही ज्या आपल्याला 'फार मोलाच्या आहेत' असे आपण मानता व लिहिता त्या माझ्या सदिच्छा व शुभेच्छा आपल्या अंगीकृत कार्याच्या पाठीशी निरंतर आहेतच. मात्र त्यासंबंधात एकच गोष्ट विशेषत्वाने खटकते व म्हणूनच ती आवर्जून लिहावीशी वाटते. तिच्या दृष्टीनेच एक अगत्याची सूचना करावीशी वाटते ती अशी की, आपण आपल्या ह्या 'संपूर्ण चोरघडे'च्या शेवटी 'समाप्त' असे कोणत्याही प्रकाराने व्यक्त न करता स्पष्टपणे 'अपूर्ण–पुढे चालू' असे लिहावे. कारण आपले कथालेखनही १९६० पर्यंत झाले तेवढेच पूर्ण न ठरता अजून पुढेही आपल्याला सर्व प्रकारची उदंड समर्थता लाभावी आणि आपल्या हातून नाना प्रकारचे उदंड लेखन व्हावे अशीच अंतरीची उत्कट इच्छा आहे. ह्या सूचनेचा अव्हेर होऊ नये एवढेच पुन्हा-पुन्हा सांगणे. यापेक्षा अधिक काय लिहू ?

कळावे, लोभ असावा, ही विनंती.

मुंबई
१५-८-६६

आपला
बा. ग. ढवळे

ज्योतिर्मयी – चोरघडे आणि मी

परवा परत एकदा श्री. चोरघड्यांनी त्यांच्या-माझ्या २२ वर्षांच्या सहवासासंबंधी काहीतरी लिहाच असा आग्रह धरला.

चोरघड्यांबद्दल मी लिहावयाचे कशाच्या भांडवलावर, तर माझ्याजवळ त्यांची असलेली पत्रे आणि आमच्या अधूनमधून झालेल्या भेटीगाठी यांच्या बळावर. म्हणजेच त्यांच्या-माझ्यामध्ये झालेल्या किरकोळ व्यवहारावरून. इतक्या तुटपुंज्या साधनांच्या साह्याने चोरघड्यांची ओळख करून देण्यास धजावणे मला अवघड वाटते. ही ताकद माझी नाही.

चोरघड्यांच्या आग्रहाला मान तुकवली म्हणून मग त्यांच्या-माझ्यामधील २२ वर्षांच्या पत्रव्यवहाराची फाईल काढली.

चोरघड्यांच्या फाईलमध्ये पत्रव्यवहार ५८ पर्यंतचा आहे.

१९५८ नंतर पत्रव्यवहार किंवा खरे बोलावयाचे तर परस्परांशी कोणताच व्यवहार न करता माझे आणि चोरघड्यांचे संबंध स्नेहभावाचे राहिले आहेत असे म्हणण्यास हरकत नाही.

माझ्या स्वभावाप्रमाणे माझ्या मनाने या २२ वर्षांच्या कालखंडाचे निरनिराळे तुकडे तुकडे करून टाकले.

६६ ते ५९ या सात वर्षांत व्यवहार नाही. संबंध चांगले.

५८ ते ५२ संबंध तात्पुरत्या व्यवहाराचे. माझा चेक मागेपुढे गेला असेल. त्यांच्याकडून त्यांच्या कॉलेजची बिले वेळेवर आली असतील, नसतीलही.

या काळातील व्यवहार जुजबी होता.

श्री. चोरघड्यांचा व माझा घनिष्ट संबंध आला ५२ ते ४४ या आठ वर्षांत.

या आठ वर्षांच्या सलग कालखंडाचे माझ्या मनाने दोन तुकडे केले.

एक तुकडा ४९ ते ४४.

'भक्तिकुसुमे' या पुस्तकाच्या संदर्भात व दुसरा ४९ ते ५२.
४४ ते ४९ या कालखंडात माझी मनोवृत्ती दोन प्रकारची होती.
एक वृत्ती वाचकाची.
दुसरी वृत्ती प्रकाशकाची.

चांगले वाटेल ते सर्व आपण प्रकाशित करावे या वृत्तीने मी पछाडलेला होतो. या प्रकाशनाच्या वृत्तीने पछाडलेल्या मला त्यातील नफा-नुकसानीचा विचार सुचत नव्हता, म्हणूनच ४६ साली रु. ३०,००० रोख देऊन कंपनी घेतली. (केल्या छंदाबद्दल किंवा वेडाबद्दल आज हळहळ नाही, कारण नशिबाने आज जमिनीवर दोन्ही पाय रोवून उभा आहे.)

३०,००० रु. चा उल्लेख अपरिहार्य म्हणून करतो.

पुढचा पॅरा ह्याची साक्ष देईल.

आपल्या ३१।५।५१ च्या पत्रात चोरघडे म्हणतात :

"तुमच्या या अखेरच्या पत्रावरून तुम्ही १२५ रुपयांसही महाग असल्याचे कळले. तुम्ही लिहिण्याअगोदर मला याची कल्पना असणे शक्य नव्हते, आणि ती कशी असणार बरे ! जी देशमुख कंपनी आपली भागीदारी तीस हजार रुपयांचा नगदी चेक देऊन तोडते तिची परिस्थिती इतकी वाईट की तिला रुपये एकशेपंचवीससाठी दोन दोन महिन्यांचे वायदे करावयास भाग पाडावे. ही स्थिती मराठीच्या दृष्टीने भयंकर आहे."

४६ साली कंपनी घेतल्यापासून पैशाची चणचण जाणवत होती, त्रास होत होता पण ललित प्रकाशनच फक्त करीन अशी शेखी मिरवणाऱ्या मला पैशाच्या चणचणीचे महत्त्व एवढे वाटले नाही. पाय जमिनीवर नव्हतेच.

'संस्कार' पुस्तक प्रकाशित करण्यामागे माझे हे वेडच आहे. 'संस्कार' पुस्तकातली 'ज्योतिर्मयी' कथा व हे पुस्तक मी असेच प्रकाशित केले. श्री. वा. रा. ढवळे यांच्या संपादकत्वाखाली मुंबई साहित्य संघाने काढलेल्या 'साहित्य' या नावाच्या मासिकात 'ज्योतिर्मयी' गोष्ट आली. ती मी वाचली आणि मी मुग्ध झालो. 'ज्योतिर्मयी' लघुकथा म्हणून कशी आहे, हे मला माहीत नाही, पण त्या गोष्टीमध्ये काव्य आहे. आणि संस्कार करण्याची शक्ती आहे. निदान मला अद्यापीही या गोष्टीची ओढ आहे.

'ज्योतिर्मयी' च्या ओढीनेच मी चोरघड्यांजवळ लघुकथांच्या पुस्तकाची मागणी केली. व्यवहाराला बसले म्हणजे या पुस्तकात धंदा नाही हे समजे, पण असे प्रत्येक पुस्तकच पाय खोलात नेते आहे हे त्या धुंदीत लक्षात आले नाही. माझ्या डोळ्यांवर धुंदी असली तरी कठोर सत्याने किंवा वस्तुस्थितीने ४९ ते ५२ का जवळजवळ ५५ पर्यंत मला या सत्याची ओळख चांगली पटविली.

त्या काळाबद्दल लिहिताना मी असं म्हणेन की काही थोडी माणसे वगळली तर बाकीची सर्व माणसे माणसासारखी वागली.

सुखाचे झाले म्हणजे माणूस दुसऱ्याबद्दल बरे बोलतो. त्रास झाला, दुसऱ्याला बोल लावतो.

चोरघडे माझ्याशी माणसासारखे वागले असेच मी म्हणेन. त्या वागण्याचा कोणताच संस्कार आज मनावर नाही.

मी खेडेगावातून शहरात आलेला. बाळपणी हूड असलेला. मला शहरी रीतिरिवाज, बोलीभाषा सुरुवातीला कळत नव्हती. पुढे आवर्जून ती शिकावी असे कधी मनाला वाटले नाही.

माझ्या ओबडधोबड वागण्याचा त्रास माझ्याजवळ येणाऱ्या प्रत्येकालाच होतो. तसा तो चोरघड्यांना झाला. (माझा ओबडधोबडपणा घालवण्याचा आता मी थोडाबहुत प्रयत्न करतो, परंतु त्यात माझी प्रगती बेताचीच.)

माझ्यापुरतं मी असं म्हणेन की आम्ही दोघेही परस्परांशी माणसासारखे वागतो.

चोरघड्यांमधील हा माणूस मला जास्त महत्त्वाचा वाटतो. सात्त्विकतेची साधना करतानाही हा माणूस डोकावतो तो मला आवडतो.

पुणे
दि. १५-८-६६

रा. ज. देशमुख

श्रीयुत चोरघडे यांस

सप्रेम नमस्कार,

आपल्या, आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या, लघुकथांचा संग्रह 'संपूर्ण चोरघडे' म्हणून लवकरच प्रसिद्ध होणार आहे, असे परवाच ऐकले. आनंद झाला. या होणाऱ्या प्रकाशनाबद्दल मःनपूर्वक अभिनंदन.

या प्रकाशनासंबंधी ऐकताच—मनातल्या मनात, गेल्या तीस वर्षांचे अंतर, गळून पडलेः— समोर पाहतो तो तुमची धिटुकली 'सुषमा'–किती मोहक ! किती तरल !

'तुमच्या कथा वाचकांना नाजुकशा केळीच्या पानाप्रमाणे मोहक वाटतात' असे तुम्हांला लिहिलेले एका रसिक वाचकाचे पत्रही आठवले.

आता या तुमच्या 'सुषमे'चा आविष्कार अधिक व्यापक होणार; याचा आनंद मला तितक्याच उत्कटतेने होत आहे.

मुंबई
१५–८–६६

आपला
ह. वि. मोटे

REFBK-0015144